# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१९ डिसेंबर, २००५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१२/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.१२.२००५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | १८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | १९. | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | २०. | श्री. सतरामदास जेसवानी |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना | २१. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ७. | श्रीमती मोकल सीमा | २२. | श्रीमती खिलनानी भावना |
| ८. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | २३. | श्रीमती माने किरण |
| ९. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | २४. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| १०. | श्री. उमाप रामदास | २५. | श्री. पाटील विश्वनाथ |
| ११. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | २६. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १२. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | २७. | श्री. पंजाबी नारायण |
| १३ | श्रीमती अनिता गुप्ता | २८. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १४. | श्री. पवार नाना | २९. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| १५. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ३०. | श्रीमती निना नाथानी |
| १६. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ३१. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| १७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ३२. | श्रीमती दासानी मिनु |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. सोनवणे नथु, २. श्री. वाघे शामु, ३. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे, ४. श्री. दिलीप गायकवाड, ५. श्री. एडके गणपत गोविंद, ६. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल, ७. श्री. मुलचंदानी महेंद्र, ८. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल, ९. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती, १०. श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे, ११. श्री. निकम शांताराम, १२. श्री. टाले प्रमोद, १३. श्री. ठाकुर विनोद लालसिंग, १४. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), १५. श्रीमती वसिटा बेबी, १६ . श्री. ठाकुर अशोक, १७. श्री. वनवारी किशोर नारायणदास, १८. श्री. साधवानी मोहन, १९. श्रीमती साधवानी जया, २०. श्री. बच्चाराम रुपचंदानी, २१. श्री. राज असरोंडकर, २२. श्री. रमेश चव्हाण, २३. श्री. जाधव प्रशांत, २४. श्री. जाधव सुरेश, २५. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, २६. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल, २७. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास, २८. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, २९. श्री. भालेराव गौतम, ३०. श्रीमती कृष्णानी रेखा, ३१. श्री. रामरख्यानी मोहनदास, ३२. श्रीमती किरण माखिजा, ३३. श्री. जयसिंघानी अनिल, ३४. श्रीमती करोतिया मालती, ३५. श्री. अंकुश म्हस्के, ३६. श्री. साधवानी मनोज, ३७. श्री. पुरस्वानी जमनादास, ३८. श्रीमती भटिजा कोमल, ३९. श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना, ४०. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ४१. श्रीमती छाब्रिया भारती, ४२. श्री. जग्यासी राजु, ४३. श्री. संजय रामचंद्र बठीजा, ४४. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, ४५. श्री. पंजाबी लाल देवनदास, ४६. श्री. लालवानी दिलीप जेठानंद, ४७. श्री. हरदास माखिजा, ४८. श्री. राजेश वदारिया, ४९. श्री. इदनानी राजु चंद्रभान हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

दुपारी ४.०० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. महापौर :— आजच्या या सभेचे कामकाज पुढील सुचना देईपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी ४.०५ वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १७ जानेवारी, २००६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १७/१/२००६ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.१२.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित झाल्यामुळे ती सभा मंगळवार दिनांक १७.१.२००६ सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी
२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३८. | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३९. | श्रीमती माने किरण |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ४०. | श्री. रमेश चव्हाण |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४१ | श्री. जाधव प्रशांत |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना | ४२. | श्री. जाधव सुरेश |
| ८. | श्री. सुर्यकांत लिंगे | ४३. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४४. | श्री. भालेराव गौतम |
| १०. | श्री. गायकवाड दिलीप | ४५. | श्रीमती कारीरा रेखा |
| ११. | श्री. महेंद्र मुलचंदानी | ४६. | श्रीमती वसिटा बेबी |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४७ | श्री. ठाकुर अशोक |
| १३ | श्री. एडके गणपत | ४८. | श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४९. | श्री. पंजाबी नारायण |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी | ५०. | श्रीमती दिपा पंजाबी |
| १६. | श्री. उमाप रामदास | ५१. | श्री. मनोज साधवानी |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५२. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| १८. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५३. | श्रीमती कोमल भटिजा |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर | ५४. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ | ५५. | श्रीमती माखिजा किरण |
| २१. | श्रीमती अनिता गुप्ता | ५६. | श्री. लबाना होशियारसिंग |
| २२. | श्री. पवार नाना | ५७. | श्री. पमनानी ईश्वर |
| २३. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५८. | श्री. बोडारे धनंजय |
| २४. | श्री. जग्यासी राजु | ५९. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| २५. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ६०. | श्री. पाटील विश्वनाथ |
| २६. | श्री. निकम शांताराम | ६१. | श्री. पंजाबी नारायण |
| २७. | श्री. टाले प्रमोद | ६२. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २८. | श्री. ठाकुर विनोद | ६३. | श्रीमती निना नाथानी |
| २९. | श्रीमती सोनेजी मिना | ६४. | श्रीमती भारती छाब्रिया |
| ३०. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६५. | श्री. संजय बठिजा |
| ३१. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६६ | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३२. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६७. | श्री. बेहरानी मोहन |
| ३३. | श्री. वनवारी किशोर | ६८. | श्रीमती मालती करोतिया |
| ३४. | श्री. साधवानी मोहन | ६९ | श्रीमती दासानी मिनु |
| ३५. | श्री. सतरामदास जेसवानी | ७०. | श्री. इदनानी राजु |
| ३६. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७१. | श्री. पंजाबी लाल |
| ३७. | श्रीमती खिलनानी भावना | ७२. | श्री. लालवानी दिलीप |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. वाघे शामु, २. श्रीमती साधवानी जया, ३. श्री. राज असरोंडकर, ४. श्री. खेमाणी देवेंद्रसिंग, ५. श्री. जयसिंघानी अनिल, ६. श्री. चौधरी राजेंद्र, ७. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, ८. श्री. हरदास माखिजा, ९. श्री. राजेश वदारिया हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सायंकाळी ४.४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>**मा. सचिव :—**</u> प्रश्न क्र. ४५६ हा श्री. रामदास उमाप यांचा असून त्यांनी प्रश्न मागे घेतला आहे.

प्रश्न क्र. ४५७ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे. यावेळी ते सभागृहात अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तात नोंद घेण्यात येत आहे.

**?** <u>प्रश्न क्र. ४५७ :—</u> खालील दर्शविलेल्या ठिकाणातील बांधकामे महानगरपालिकेच्या नियमानुसार आहे का?

संबंधीत बांधकामावर आपण काय कारवाई केली आहे?

आजच्या तारखेला सदर बांधकामाची स्थिती काय आहे?

१) सर्वानंद हॉस्पीटलच्या पाठीमागे असलेले लोड बेअरींग काम.
२) वसंत बहार रोडमध्ये चालु असलेले आर.सी.सी. बांधकाम.

<u>उत्तर :—</u> सदर लोड बेअरींगचे पहिल्या मजल्यावरील बांधकाम दिनांक १५/११/२००५ रोजी निष्कासित करण्यात आलेले आहे.

सदर बांधकामाचा नकाशा मंजूर असून, वाढीव बांधकामाबाबतचा अहवाल नगररचनाकार विभागाकडून प्राप्त होताच पुढील कारवाई करण्यात येईल.

<u>**मा. सचिव :—**</u> प्रश्न क्र. ४५८ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे. यावेळी ते सभागृहात अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तात नोंद घेण्यात येत आहे.

**?** <u>प्रश्न क्र. ४५८:—</u> माहे जूलै ऑगस्ट—२००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व त्यामूळे निर्माण झालेल्या पुरपरिस्थितीमुळे शहरातील बहूतांश परिसरात पुराचे पाणी शिरुन मोठया प्रमाणात नुकसान मोडतोड व वित्तहानी झालेली आहे. अनेक गोरगरीब नागरीकांची घरे हक्काचा निवारा पूर्णपणे उध्वस्त होऊन त्यांचे संसार रस्त्यावर आले आहेत. पूरामुळे नुकसान झालेल्या पुरग्रस्त नागरीकांना महानगरपालिकेतर्फे घरपट्टी (हाउस टॅक्स) माफ करणेसाठी ठराव पारीत केला गेला आहे का? असल्यास त्यांची प्रत मिळावी तसेच त्या अनुषंगाने खालील प्रश्नांवर महासभेत चर्चा होऊन सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.

प्र.क्र. १ अ) पुरग्रस्त नागरीकांना घरपट्टी माफ करणेचा ठराव पारीत झाला असल्यास त्यांची अंमलबजावणी होणार आहे किंवा नाही?

<u>उत्तर :—</u> नाही.

पुरग्रस्त नागरीकांना घरपट्टी माफ करणेबाबतचा ठराव अद्याप पारित झालेला नाही. त्यामुळे अंमलबजावणीचा प्रश्न उद्भवत नाही.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ४५९ हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले, श्री. राजु जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

प्रश्न क्र. ४५९ :— श्री. किसन लाहोरी यांनी प्लॉट नं. ६१९ (पी) मधूबन हॉटेलसमोर, उल्हासनगर—१ या ठिकाणी इमारत बांधकाम केले असून त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.

प्र.क्र. १ अ ) सदर इमारतीचा प्लान मंजूर आहे का? प्लान कोणाचे नावे मंजूर झाला आहे?
ब) इमारतीची सनद किती चौरस वॉल आहे? इमारतीत किती चौ. यार्ड जागा इमारतीकडे उपलब्ध आहे का?
क) सदर इमारत बांधकाम किती मजली आहे? इमारतीच्या प्रत्येक माळयावर किती प्लान मंजूर आहे? प्रत्येक मजल्यावर किती सदनिका आहेत? इमारतीत किती दुकाने आहेत?
ड) इमारतीने पायाभरणी व पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे का?
ई) सदर भुखंड आरक्षीत आहे का? कश्यासाठी?
प) सदर इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे आहे का? सदर इमारतीत वाढीव बांधकाम केले आहे का? केले असल्यास वाढीव बांधकाम किती?
फ) सदर इमारतीचे वाढीव अनधिकृत बांधकामास नोटीस बजावली आहे का? कोणत्या प्रकारची तिचा कालावधी किती होता तो संपृष्टात आला का? प्रशासनाने सदर इमारती विरुध्द कोणती कारवाई केली आहे का?

उत्तर :— अ) होय. सदरचा नकाशा श्री. चंदर के. मोर्यानी व इतर यांचेतर्फे कुलमुखत्यार श्री. भरत डी. गालानी यांचे नांवे मंजूर करण्यात आलेला आहे.
ब) ५६७.७२ चौ.मी.
क) सदर इमारतीस तळमजला + ४ मजलेची परवानगी देण्यात आलेली आहे व प्रत्येक मजल्यावर २ सदनिका मंजूर करण्यात आलेल्या आहेत व दुकानांना मंजूरी देण्यात आलेली नाही.
ड) सदर इमारतीस दि. १४.८.२००२ रोजी पायाचा दाखला देण्यात आलेला आहे व बांधकाम पुर्णतेचा दाखला देण्यात आलेला नाही.
ई) नाही.
प) नाही. सदर इमारतीमध्ये तळमजला + ५ मजले मिळुन एकूण २४४.१५ चौ.मी.चे अनधिकृत बांधकाम आहे.
फ) सदर इमारतीस दि. १६.९.२००५ रोजी अतिक्रमण विभागातर्फे नोटीस बजावण्यात आलेली आहे व त्याचा कालावधी एक महिन्याचा आहे व त्याबाबत अनधिकृत बांधकाम विभागामार्फत कारवाई करण्याचे काम सुरु आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौरजी मी वरीलप्रमाणे प्रश्न विचारला असून त्याला प्रशासनाने उत्तर दिले आहे की, १६.९.२००५ ला नोटिस दिली आहे. नोटिस दिल्यानंतर एक महिन्यानंतर आपण काय कारवाई केली आहे? आयुक्त साहेब उत्तर दयावे. याचे उत्तर कोण देणार आहे? नाहीतर पुन्हा ८५५ इमारतींसारखे प्रकरण होईल.

प्रभाग क्षेत्र अधिकारी १ (श्री. तुकाराम तारदाळकर) :— सदर इमारतीला १६.९.२००५ रोजी अतिक्रमण विभागातर्फे नोटिस बजावण्यात आलेली आहे. त्याचा कालावधी एक महिन्याचा होता. परंतु मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सध्या ८५५ इमारतींचे निष्कासन सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे ते काम थांबले आहे. आम्ही लवकरात लवकर अनधिकृत बांधकाम पाडु.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— आज नोटिसीची मुदत संपुन किती दिवस झाले? १६.१०.२००५ ला मुदत संपली आहे. तुम्ही तेथे लोक राहायला येतील याची वाट पाहत आहात काय?

प्रभाग क्षेत्र अधिकारी १ (श्री. तुकाराम तारदाळकर) :—वाट वगैरे आम्ही बघत नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— हे तसेच आहे. तुम्ही वाटच बघत आहात. तेथे लोक राहायला येतील आणि त्यानंतर ८५५ इमारतींसारखे प्रकरण होईल. त्यावेळी देखिल बिल्डरवर कारवाई होणे आवश्यक होते परंतु तसे

झाले नाही म्हणुन आज अशी परिस्थिती झाली आहे. तीच परिस्थिती पुढे होईल का? तुम्ही त्याची वाट बघत आहात का?

**मा. उप–महापौर श्री. विनोद तलरेजा यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**<u>प्रभाग क्षेत्र अधिकारी १ (श्री. तुकाराम तारदाळकर) :–</u>**आम्ही लवकरात लवकर कारवाई करु.

**<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>** लवकरात लवकर म्हणजे कधी कारवाई करणार आहात ते सांगा. आतापर्यंत कारवाई का नाही केली? जर उदया तेथे लोक राहायला आले तर त्यासाठी तुम्ही जबाबदार असाल. अधिकारी जबाबदार असतील. सर्वसाधारण लोकांनी तेथे घर घेतल्यानंतर तुम्ही ते तोडणार आहात का? ही जबाबदारी तुमची नाही का? तुम्ही वाट बघता आहात आणि त्या बिल्डरला पाठींबा देत आहात. तुम्ही स्थगिती आदेश येण्याची वाट बघत आहात का?

**मा. सदस्या श्रीमती निना नाथानी , श्रीमती बेबी वसिटा या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**<u>प्रभाग क्षेत्र अधिकारी १ (श्री. तुकाराम तारदाळकर) :–</u>**लवकरात लवकर १५–२० दिवसात आम्ही कारवाई करु.

**<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>** आता किती महिने झाले आहेत? अनधिकृत बांधकाम होवुन दिड वर्ष झाले आहे. आम्ही प्रश्न विचारल्यानंतर तुमच्या लक्षात आले की, ते बांधकाम अनधिकृत आहे. त्यानंतर तुम्ही नोटिस दिली. म्हणजे अधिकारी किती हलगर्जी आहेत. तुमच्यामुळे शहरातील लोक परिणाम भोगत आहेत. तुम्ही सरळ हात वर करता की, लोकांनी घेतले ते चुकीचे घेतले आहे. तुम्ही किती चुकीचे आहात? खरे म्हणजे तुमच्यावर कारवाई झाली पाहिजे. लोक राहायला आल्यानंतर तुम्ही लोकांची घरे उध्दवस्त करता? त्यापेक्षा तुम्ही आताच कारवाई करा. तुम्ही मला उत्तर दया की, कारवाई कोणत्या तारखेला करणार आहात? आणि जबाबदारीने उत्तर दया. तुम्ही अशाप्रकारे बिल्डरला मदत करीत आहात. तुम्ही आताच का तोडत नाही.

**<u>प्रभाग क्षेत्र अधिकारी १ (श्री. तुकाराम तारदाळकर) :–</u>** २० ते २५ दिवसात आम्ही तोडु.

**<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>** तेथे कोणी सदनिका विकत घेवु नये म्हणुन तुम्ही आताच्या आता तेथे फलक लावा. तुम्ही तसा फलक लावणार आहात काय? तेथे जर लोक राहायला गेले तर सगळा दोष तुमच्यावर येईल. लोक राहायला गेल्यानंतर तुम्ही पाडता का? उल्हासनगरमध्ये हे जे झाले आहे त्याला कारणीभुत तुम्ही आहात. तुम्ही बांधकामे वेळेवर तोडत नाही. आम्ही तुमच्या निदर्शनास आणुन देतो. तरी तुम्ही त्याच्यावर कारवाई करत नाही. नंतर तुम्ही हात वर करुन मोकळे होतात.

**<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>** मा. महापौरजी, व आयुक्त साहेब मला असे वाटते की, प्रशासनाने त्यांच्या मागील चुकांपासुन अजुनपर्यंत काहीही धडा घेतलेला नाही. आजही नंदलाल समितीच्या अहवालानुसार अधिका–यांवर तलवार टांगती आहे. मा. उच्च न्यायालयाने देखिल आदेश दिले आहेत की, नंदलाल समिती अहवालात ज्या अधिका–यांचे नावे दिले आहेत त्यांच्यावर काय कारवाई केली याचा अहवाल २५ तारखेला प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना सादर करण्याचे निर्देश दिले आहे. तर मला असे वाटते की, आता ही जी घटना घडली आहे त्यावरुन आपण सर्वांनी व विशेष करुन अधिका–यांनी धडा घ्यायला हवा. शहरात सध्या जी कामे सुरु आहेत ती कमीत कमी थांबवायला तरी हवीत. ८५५ इमारतींच्या प्रकरणात आपणा सर्वांना जे भोगावे लागले आहे त्याची पुनरावृत्ती तरी व्हायला नको. मला असे वाटते की, आपण ही जबाबदारी प्रभाग अधिकारी श्री. तुकाराम यांच्यावर ढकलु शकत नाही. आयुक्तांवर देखील याची पुर्ण जबाबदारी आहे. मला असे वाटते की, यापुढे विना परवाना व एफएसआय च्या उल्लंघनाची जी कामे चालु असतील त्याची पुर्ण जबाबदारी आयुक्तांवर दयायला हवी. यासाठी सभागृह जबाबदार असणार नाही. आम्हांला सर्वांना असे वाटते की, आयुक्तांनी कठोरपणे कारवाई करायला हवी. शहरात जी काही अनधिकृत बांधकामे सुरु आहेत ती लवकरात लवकर थांबायला हवी. सर्व गोष्टींची पुनरावृत्ती व्हावी असे मला वाटत नाही. प्रधान सचिवांनी आपली चौकशी करावी असे व्हायला नको. यासाठी आपण मेहरबानी करुन ही सर्व कामे थांबवावी व कारवाई करावी. अशी आम्हां सर्वांची मागणी आहे.

**<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–</u>** मा. महापौरजी, मी आयुक्तांकडुन एक खुलासा घेवु इच्छितो की, काल महाराष्ट्र शासनाने जो अध्यादेश काढला आहे त्यानुसार १.१.२००५ पुर्वीच्या बांधकामांवर कारवाई होणार नाही असे म्हटले आहे. जर तसे असेल तर आपण या ठिकाणी घोषित करावे की, त्यानंतरच्या बांधकामांवर काय

कारवाई होईल? तसेच ३–५ वर्षांपुर्वीची जी जुनी बांधकामे असतील त्यावर देखिल निष्कासनाची कारवाई होईल काय? मी हे आयुक्तांच्या तोंडुन ऐकु इच्छितो.

<u>मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):–</u> आम्हांला अजुन अध्यादेशाची प्रत अधिकृतरित्या प्राप्त झालेली नाही. अध्यादेशाची प्रत प्राप्त झाल्यानंतर आम्ही त्यातील निर्देशाप्रमाणे काम करु.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौर महोदया, आपण पिठासीन अधिकारी म्हणुन सभेच्या मुख्य पदी आहात. सदस्य जे प्रश्न विचारतात त्यावर जे उत्तर प्रशासनातर्फे दिले जाते त्याची अंमलबजावणी प्रशासन जर करत नसेल तर महासभेबरोबरच तो आपला देखील अपमान आहे. आपणांस त्याचे काही एक वाटत नाही असे माझे मत आहे. हा प्रश्न वारंवार उपस्थित करण्यात आला आहे. आमच्या श्रीमती जयश्री सुर्वे यांनी हाच प्रश्न जुलै महिन्यात उपस्थित केला होता. त्यावेळी त्याचे उत्तर दिले होते. आता पुन्हा श्री. रमेश चव्हाण यांनी हा प्रश्न उपस्थित केला आहे. त्याला उत्तर देतांना नगररचना विभागाने सांगितले आहे की, त्याठिकाणी २४४.१५ चौरस मिटर अनधिकृत बांधकाम आहे. ही माहिती असतांना देखील प्रशासनाने काहीही कारवाई केलेली नाही. ज्यावेळी ८५५ इमारतींचा प्रश्न आला त्यावेळी आपण बोललात की हे सर्व अधिका–यांचे काम आहे. मला वाटते की ते योग्य होते. त्यावेळी आपण बोलत होतात तर आम्हांला ते चुकीचे वाटत होते परंतु हे खरे आहे. हे अधिका–यांमुळेच वाढले आहे. परंतु आपणांस जर असे वाटत असेल की, निष्पाप लोकांचा बळी जावु नये तर हा जो लाहोरी बिल्डर आहे तो निघुन जाईल व तेथे राहणा–या लोकांवर कारवाई होईल. यासाठी आपण प्रशासनाला आदेश दयायला हवे. आपण त्यांना सांगायला हवे की, दोन वेळा हा विषय आमच्या समोर आला आहे. यावर ठोस कारवाई व्हायला हवी. आयुक्त साहेब, तुम्ही हे सर्व ऐकले आहे. परंतु असे शांतपणे ऐकुन चालणार नाही. तुमच्या लक्षात आल्यावर तुम्ही काय कारवाई केली? याचा निर्णय लगेच दयायला हवा. तुम्ही आयुक्त आहात, प्रशासनाचे प्रमुख आहात. लोकप्रतिनिधींचे प्रमुख महापौर आहेत. येथे लोकप्रतिनिधींचा अपमान होत आहे आणि ते उघडया डोळयांनी बघत आहेत. जुलै पासुन हा विषय सुरु आहे. त्याबद्दल तुम्हांला काहीही वाटत नाही. महापौर महोदया, याबद्दल आपण आपले मत मांडावे. जर असेच चालु राहिले तर महासभेत प्रश्न उपस्थित करण्यात काही अर्थ नाही. तसेच महासभा घेण्यात देखिल काही अर्थ नाही.

<u>मा. महापौर :–</u> सन्माननिय सदस्यांनो, शासनाची जी अधिसुचना आली आहे त्याप्रमाणे १ जानेवारी, २००५ पुर्वीची सर्व बांधकामे नियमित होणार आहेत. आयुक्तांना अजुन अधिकृतरित्या त्याची प्रत प्राप्त झालेली नाही. त्यांना ती प्रत प्राप्त झाल्यावर ते त्यावर अभ्यास करुन पुढील बैठकीत तुम्हांला माहिती देतील. सदरच्या अधिसुचनेप्रमाणे १ जानेवारी, २००५ रोजी नंतर जी बांधकामे झाली आहेत ती १०० टक्के नाहीतर १००० टक्के तुटणार आहे. परंतु माझी आयुक्तांना एक विनंती आहे, आज मी व आमदारांनी आपणांस एक पत्र दिले आहे. पत्रकार वारंवार तक्रार करीत असतात, आम्ही जोधपुरला प्रशिक्षणासाठी गेलो होतो तेथे देखिल वारंवार टेलिफोनवर तक्रारी यायच्या की, अनधिकृत बांधकामे सुरु आहेत. आजही एका स्थानिक वर्तमानपत्रात कॅम्प नं. ४ व५ येथे सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामांची यादी छापुन आली आहे. कॅम्प नं. १, २, ३ मध्येही बांधकामे सुरु असतील. जर अनधिकृत बांधकामे सुरु असतील तर आमची आपणांस विनंती आहे की, ब–याच मोठया त्रासानंतर आता कुठे आम्हांला दिलासा मिळाला आहे. तर यानंतर पुढे पुन्हा त्रास होवु नये, आम्ही अनधिकृत बांधकामांच्या पुर्णत: विरोधात आहोत. येथिल सर्व ८१ सदस्य त्याच्या विरोधात आहेत. यापुढे एक इंचही अनधिकृत बांधकाम होवु नये यासाठी आयुक्तांनी दक्षता घ्यावी. मला दु:खाने म्हणावे लागते की, ब–याचवेळा तक्रार करुनही कारवाई केली जात नाही. आजही मी वर्तमानपत्रात बातमी वाचल्यानंतर त्याची माहिती मागविली असता मला सांगितले की, आमचे लोक गेले आहेत माप घेत आहेत, उदया सांगु. तर अशी चालढकल करायला नको. यासाठी आयुक्तांनी सक्त सुचना दयायला हव्यात. प्रथम आपण शहरात जी काही बांधकामे सुरु आहेत ती थांबवावीत. सर्व बांधकामांची तपासणी केल्यानंतरच बांधकाम सुरु करु दयावे. या आधी या शहराने फार भोगले आहे, यापुढे भोगण्याची लोकांमध्ये शक्ती देखील नाही. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> मा. आयुक्त साहेब, अधिसुचना मंजुर झाली असली तरीही १.१.२००५ नंतरची सर्व बांधकामे तोडायची आहेत. तुम्ही या बांधकामाला १६.९.२००५ ला नोटिस दिली आहे त्यामुळे हे बांधकाम त्यामध्ये येणार नाही. त्यामुळे यावर कारवाई होणे आवश्यक आहे. तुम्ही काय कारवाई कराल ते सांगा. तुम्ही काही बोलतच नाही.

<u>मा. महापौर :–</u> आयुक्त साहेब, सध्या जी बांधकामे सुरु आहेत ती आधी आपण तातडीने थांबवावीत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> याला सप्टेंबरमध्ये नोटिस दिली आहे त्यामुळे यावर कारवाई होणे आवश्यक आहे. आयुक्त साहेब, तुम्ही बोलत का नाहीत?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– आयुक्त साहेब, तुम्ही बोलत का नाही? आम्हांला तुमचे धोरण तरी कळायला हवे.

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):– जी नविन बांधकामे आहेत त्यासाठी निष्कासनाची कारवाई सुरुच राहिल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– तुम्ही आधी उत्तर काय दिले आहे ते वाचा. तुम्ही यामध्ये १६ सप्टेंबर लिहिले आहे. अजुन आपल्याला काय हवे?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– गरीब लोकांचे नुकसान होवु नये हा आमचा उद्देश आहे. तसे झाल्यास त्यासाठी तुम्ही जबाबदार असाल.

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):–तपासुन त्यावर त्वरीत कारवाई करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– तपासायची गरजच काय आहे? तुमचे उत्तर स्पष्ट आहे. २४४ चौ.मी. बांधकाम वाढीव आहे. किती वेळा तपासणार आहात?

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :– एकावेळी एका सदस्यानेच बोलावे. महापौर महोदया, आपण तसे आदेश दयावेत.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मा. महापौर महोदया, श्री. रमेश चव्हाण यांनी जो प्रश्न उपस्थित केला, अनधिकृत बांधकामांबद्दल येथे पुन्हा एकदा मुद्दा उपस्थित केला गेला आहे. जेव्हा एखादा माणुस उच्च न्यायालयात जातो अथवा एखादा नगरसेवक जेव्हा महासभेत प्रश्न उपस्थित करतो, त्याच्या पुर्वीच प्रशासन अनधिकृत बांधकाम होवु नये यासाठी कारवाई का करत नाही? तुम्ही एखादया नगरसेवकाने प्रश्न उपस्थित करण्याची अथवा एखादया नागरीकाने उच्च न्यायालयात जाण्याची वाट का पाहता? हा मोठा आश्चर्याचा प्रश्न आहे. या ८५५ इमारतींबाबत महाराष्ट्र शासनाने जी अधिसुचना मंजुर केली आहे, त्यासाठी आम्ही महाराष्ट्र शासनाचे, मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील साहेब, पालकमंत्री श्री. गणेशरावजी नाईक, आमदार श्री. पप्पु कालानी व महापौर श्रीमती ज्योती कालानी व आमचे विधान परिषदेचे पिठासीन अधिकारी उपसभापती श्री. वसंतराव डावखरे, तसेच ज्या विधानपरिषद सदस्यांनी व ज्यांनी या महान कार्यासाठी विशेष प्रयत्न केले त्या सर्वांना आम्ही या सभागृहात धन्यवाद देतो. आता आयुक्त साहेबांनी सांगितले की, त्यांना अधिकृतरित्या प्रत प्राप्त झालेली नाही. असे शक्य आहे. परंतु आता विश्वपातळीवर सर्वांना याची माहिती झाली आहे. १ जानेवारी, २००५ पुर्वीची सर्व बांधकामे नियमित केली असून त्यानंतर जी अनधिकृत बांधकामे झाली असतील तर त्यावर कारवाई व्हायला हवी. परंतु आश्चर्याने व खेदाने म्हणावे लागते की, आजमितीस या शहरात जवळपास ३०० अनधिकृत बांधकामे सुरु आहेत, गेल्या दोन–तीन महिन्यात ही बांधकामे पुर्ण केली आहेत. महापालिकेला एवढेच काम आहे का की ज्या ८५५ इमारती १५–२० वर्षांपुर्वी तयार झाल्या आहेत त्या रिकाम्या करायच्या व तोडायच्या आणि नविन सुरु असलेले बांधकामांकडे दुर्लक्ष करायचे.असे केले तर अजुन काही दिवसांनी सध्या ज्या इमारतींचे काम चालु आहे त्यांची देखिल काही वर्षांनी अशीच अवस्था होईल. ही समस्या मुळापासुन दुर करण्यासाठी आपण उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे. आम्ही यासाठी आपणांस विरोध करणार नाही. परंतु उच्च न्यायालयाचे असे देखिल म्हणणे होते की, यापूढे एकही अनधिकृत बांधकाम होवु नये यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी. राणीमॉ इमारतीचे निष्कासन सुरु आहे. लक्ष्मीगंगाचे निष्कासन पुर्ण झाले. परंतु सध्या ज्या इमारतींचे काम सुरु आहे त्यांच्यावर एवढया दिवसात काय कारवाई केली हे येथे येवुन अधिका–यांनी सांगावे. श्री. रमेश चव्हाण हा जो प्रश्न उपस्थित केला आहे हा संपुर्ण शहरासाठी एक चिंतेचा प्रश्न आहे. दु:खाने म्हणावे लागते की, जुन्या इमारती रिकाम्या करुन तोडल्या जात आहेत तर मग नविन बांधकामे का तोडली जात नाहीत. यासाठी आपण एक विशेष अधिकारी नियुक्त करुन त्यावर जबाबदारी सोपवावी. कारण जेव्हा–जेव्हा हा मुद्दा उपस्थित केला जातो तेव्हा तेव्हा प्रशासनासोबत सत्तापक्षाला देखील जाब विचारला जातो, त्यांना देखील दोषी धरले जाते. यासाठी आम्ही आपणांस निवेदन करतो की, यापुढे एकही अनधिकृत बांधकाम व्हायला नको व आमच्यावर आळ यायला नको. यासाठी आयुक्तांनी एका विशेष अधिका–याची नियुक्ती करुन त्याच्यावर सध्या चालु असलेली बांधकामे व १.१.२००५ नंतरची बांधकामे तोडण्याचे काम सोपवावे. असे न झाल्यास त्या अधिका–याला जबाबदार धरण्यात यावे. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :— मा. महापौर महोदया, मी हरकतीच्या मुद्दयाद्वारे एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधु इच्छितो, आपण सर्व नगरसेवक अनधिकृत बांधकामांच्या विरोधात आहोत परंतु जी बांधकामे अधिकृत आहेत, ज्यामध्ये ५०—६० वर्षापासुन लोक राहत आहेत, अशा घरांना दुरुस्तीची आवश्यकता असते. मागील महासभेमध्ये अशा बांधकामांना दुरुस्तीसाठी परवानगी दयावी असे ठरले होते. परंतु सदरच्या परवानग्या आता बंद का करण्यात आल्या आहेत? कृपया याची माहिती आयुक्तांनी दयावी धन्यवाद.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—मा. महापौरजी, विषय बघितला तर लाहोरी बिल्डरचा आहे. परंतु दुधाने तोंड पोळलेला माणुस ताक देखिल फुंकुन पितो. उल्हासनगर शहरातील लोकांनी गेल्या दोन महिन्यात जे कष्ट उचलले आहेत, ज्या यातना भोगल्या आहेत, कुणी देशोधडीला लागले, कुणी पागल झाले. याचे कारण असे होते की, त्यांनी त्यांच्या घरासाठी संपुर्ण पैसे लावले होते. बिल्डर त्यांना घर विकुन निघुन गेला होता, अधिकारी देखील निघुन गेले आहेत. परंतु नुकसान मात्र सर्वसामान्य माणसाचे झाले आहे. श्री. दिलीप लालवानी यांनी येथे विधानपरिषदेतील सदस्यांचे आभार प्रकट केले आहेत. परंतु मी सांगु इच्छितो की, विधान परिषदेमध्ये या विषयावर सुमारे दोन ते अडीच तास चर्चा झाली होती. याबाबत भाजपाचे आमदार श्री. गुरुमुख जगवानी, स्थानिक आमदार श्री. रामनाथ मोते यांनी लक्षवेधी दाखल केली होती. त्यावर श्री. नितीन गडकरी, श्री. संजय दत्त, श्रीमती मंदा म्हात्रे, आमचे श्री. अनंत तरे, श्री. अरविंद सावंत, श्री. कन्हैयालाल गिडवानी, श्री. पांडुरंग फुंडकर, ......................

मा. महापौर :— श्री. जितेंद्र आव्हाढ, श्री. गुरुनाथ कुलकर्णी .

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— या सर्वांनी या विषयावर चर्चा केल्यावर श्री. राजेश टोपे, श्री. नगरविकास राज्यमंत्री यांच्यावर दबाव आणुन त्यांना उत्तर देण्यासाठी उद्युक्त केले. उल्हासनगर शहर हे निर्वासितांचे शहर आहे. हे सर्व त्यांना सांगितले. हे सर्व ऐकुन घेतल्यानंतर उपसभापती श्री. वसंत डावखरे यांनी आदेश दिलेत. यासाठी मा. मुख्यमंत्री यांनी देखिल महत्वाची भुमिका बजावली आहे. यासाठी मी शिवसेना व भाजपाच्या माध्यमातुन आभार प्रकट करतो. परंतु यापुर्वी जे झाले आहे ते पुन्हा व्हायला नको. सामान्य लोक चुकी करतील व त्यांना कष्ट उचलावे लागतील असे होवु नये यासाठी प्रशासनाचे प्रमुख म्हणुन आपण निर्णय घ्यावा असे मला वाटते.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— मा. महापौरजी, येथे सांगितले गेले की, या बांधकामांना सप्टेंबर महिन्यात नोटिस दिली आहे. तर फक्त याच इमारतींला नोटिस दिलेली नसुन हजारो इमारतींना अशाप्रकारे नोटिसा दिलेल्या आहेत. त्यामुळे निर्णय घेतांना फक्त याच इमारतींसाठी निर्णय न घेता संपुर्ण शहरासाठी निर्णय घ्यायला हवा.

मा. आयुक्त (श्री.डी.एस. पाटील):— सध्या जी अनधिकृत बांधकामे सुरु आहेत ती निष्कासीत करण्याची कारवाई लवकरात लवकर करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. आयुक्त साहेब, मा. महापौरांनी आदेश दिला आहे की, सध्या सुरु असलेली सर्व बांधकामे त्वरीत थांबविण्यात यावी. सर्व सभागृहाचे हेच म्हणणे आहे. त्यामुळे आपण सुरु असलेली कामे त्वरीत बंद करावीत. निष्कासन नंतर करा आधी कामे थांबवा.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :— जुन्या घरांच्या दुरुस्ती परवानगी बाबत खुलासा करावा.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :— मा. आयुक्त साहेब, मी जाणुन घेवु इच्छिते की, लेखी अर्ज दिला तरच कारवाई केली जाते का? नगरसेवक जर तक्रार करत असेल तर त्याची तक्रार ग्राहय धरली जात नाही का? त्यांच्या तक्रारींवर कारवाई का केली जात नाही हे अतिक्रमण विभागाला विचारावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, अनधिकृत बांधकामांबाबत येथे बरीच चर्चा झाली आहे. सर्वांचे मत हेच आहे की, अनधिकृत बांधकामे थांबायला हवीत. आमचे सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांनी सांगितले की, दुरुस्ती परवानगी बंद केली आहे. उल्हासनगर महानगरपालिकेची काय कार्यप्रणाली आहे हे कळुन येत नाही कारण आजपर्यंत तीन वेळा दुरुस्ती परवानगी चालु व बंद केली आहे. ज्यावेळी पालकमंत्री यांनी उल्हासनगर येथे जनता दरबार आयोजित केला होता त्यावेळी आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांनी तेथे सांगितले

होते की, ज्या माणसाकडे सनद, यु.नं., ई.नं., चालता नं., १९९५ पुर्वीचे प्रापर्टी कार्ड असेल व त्याने अर्ज केला तर एक आठवडयाच्या आत त्याला दुरुस्ती परवानगी देण्यात येईल. असे आश्वासन दिल्यानंतर दुरुस्ती परवानगी देणे सुरु झाले होते. आज दुरुस्ती परवानगी बंद करण्याचे कारण काय आहे. जर अनधिकृत करत नसेल तर अधिकृत बांधकाम करण्याची तरी संधी दयायला हवी. महापालिकेला दुरुस्ती परवानगीपोटी रुपये ५०० एवढे शुल्क प्राप्त होते. यामुळे महापालिकेला महसुल देखील प्राप्त होतो. मी आयुक्त साहेबांना सभागृहात विनंती करतो की, ते आता महापालिकेत नविन आहेत, त्यांना शिकायला वेळ लागेल. परंतु प्रत्येक माणुस थोडया फार दिवसात शिकण्याचा प्रयत्न करतो. परंतु आयुक्त साहेब मात्र सर्व कामे एकाच व्यक्तिवर सोपवत आहेत. सर्व कामे श्री. लोणारे यांना सांगण्यात येतात. तुम्हांला कामांचे विकेंद्रीकरण करायला हवे. आज येथे नविन उपायुक्त आले आहेत तुम्ही त्यांच्याकडे काम सोपवा. तुम्ही जर कामाचे वाटप केले नाही, बांधकाम विभाग, नगररचना विभाग, जकात विभाग देखील श्री. लोणारे यांनी बघितला तर उर्वरीत विभाग प्रमुख काय काम पाहतील? यासाठी कृपा करुन तुम्ही तुमच्या सहका—यांवर तरी विश्वास ठेवा. तुम्ही शहर अभियंता, लेखा विभाग, जकात विभागात श्री. गर्जे यांच्यावर विश्वास ठेवा. एकाच माणसावर सर्व कामे सोपविल्याने सर्व कामे प्रलंबित आहेत. आज नगरसेवक निधीची, आधी मंजुरी दिलेली कामे होत नाहीत. असे चालणार नाही. यासाठी आपणांस सर्व कामे जलद करुन सुरुवात करावी लागेल. शहरातील सर्व कामे ठप्प झाली आहेत. अनधिकृत बांधकामांबाबत आपण दर सोमवारी बैठक घेतात. त्यामध्ये आपण जी कामे सुरु असतात ती तोडतात. परंतु जेव्हा आम्ही तक्रार करतो तेव्हा आम्हांला सांगण्यात येते की, सर्व कर्मचारी राणीमॉ इमारतीत गेले असल्याने तुमचे काम होणार नाही. जी कामे सुरु आहेत ती देखील तुटायला हवीत. कृपया आपण दुरुस्ती परवानगीबाबत खुलासा करावा तसेच कर्मचा—यांवर देखील विश्वास ठेवावा. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>**मा. महापौर :—**</u> सन्माननिय सदस्यांनो, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. बहुतेक नगरसेवक सदर प्रशिक्षणासाठी उपस्थित राहतात. आम्हांला तेथे शिकवले होते की, ज्या सदस्याचा प्रश्न असतो त्यानेच चर्चा करायला हवी. त्याबाबत इतर १०—२० सदस्यांनी उभे राहुन बोलायला नको. तसेच बोलायचे असेल तर एकदाच बोलावे. महापौरांच्या अनुमतीशिवाय कोणीही बोलायला नको. मला हे सांगतांना आनंद होत आहे की, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वतीने महिला लोकप्रतिनिधींसाठी महाबळेश्वर येथे एक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी असा तीन दिवसाचा प्रशिक्षण कार्यक्रम आहे. तेथे महापालिकेत लोकप्रतिनिधींची काय भुमिका असावी हे शिकविले जाणार आहे. येथे महिला तर शांत असतात, त्यामुळे प्रशिक्षण पुरुषांसाठी ठेवायला हवे. सर्व महिलांना मी विनंती करते की, या प्रशिक्षण कार्यक्रमात आपण सहभागी व्हावे. यासाठी आपण आजच आपली संमती दयावी. कारण वारंवार त्या कार्यालयातुन फोन येत आहे. आपल्या कार्यालयातुन किती प्रतिनिधी येतील याची माहिती विचारली जात आहे. नागपुर, जळगाव व उल्हासनगर या तीन महापालिकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आहे. तुम्ही येथे दुरुस्ती परवानगी बाबत सांगितले की, आयुक्त साहेबांनी परवानगी बंद केली आहे. आता येथे चर्चा झाली की, अनधिकृत बांधकामे सुरु आहेत. अनधिकृत नसतील परंतु एफएसआय च्या उल्लंघनाची बांधकामे असतील. यासाठी आयुक्तांनी दुरुस्ती परवानगी बंद केली आहे. आता आपण येथे निर्णय घेतला की, चालु असलेली सर्व अनधिकृत बांधकामे थांबविण्यात यावीत. व सर्वांची कागदपत्रे तपासुन त्यानंतरच त्यांना परवानगी दिली जावी. आता २५ तारखेलाही न्यायालयात सुनावणी आहे ती झाल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल. धन्यवाद.

<u>**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—**</u> मा. महापौर महोदया, माझ्या प्रश्नावर अजुन योग्य उत्तर दिलेले नाही. कारवाई कधी करणार, किती दिवसात करणार? त्यांनी सांगितले की लवकरात लवकर कारवाई करु. लवकरात लवकर म्हणजे कधी?

<u>**मा. महापौर :—**</u> सध्या नगररचनाकार प्रशिक्षणासाठी बाहेर गेले आहेत.

<u>**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**</u> मा. महापौर महोदया, आपण त्यांच्यातर्फे दुरुस्ती परवानगीचे आश्वासन दिले आहे तर मग याबाबतीतही आपणच आश्वासन दया.

<u>**मा. महापौर :—**</u> आयुक्तांनी तर सांगितले आहे की, सध्या चालु असलेली सर्व बांधकामे थांबविण्यात येतील. आयुक्त साहेब त्या बांधकामाची कागदपत्रे मागवुन कारवाई करतील.

<u>**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—**</u> हे बांधकाम कमीत कमी एक ते दिड वर्ष जुने आहे. सध्या तेथे काम सुरु नाही. दिड वर्षापुर्वीच काम पुर्ण झाले आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— मा. महापौर महोदया, हा मुद्दा सर्वांसाठी लागु होतो. जेवढी बांधकामे आता सुरु आहे त्या सर्वांना हे लागु होईल.

मा. महापौर :—बांधकाम जुने आहे की नवे ते कागदपत्रे मागविल्यानंतर स्पष्ट होईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर महोदया, त्या इमारतीत अदयाप लोक राहायला गेले नाहीत.

मा. महापौर :—आता अधिसुचना आली आहे. त्यानंतर कार्यवाहीची रुपरेषा तयार होवुन काय करायचे तो निर्णय घेतला जाईल. त्याप्रमाणे या बांधकामावर देखिल कारवाई केली जाईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— सभागृह नेता यांचे असे म्हणणे आहे की, उदया लाहोरी बिल्डर यांना भेटणार आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मी असे म्हणाालो की, आयुक्त साहेब उदया तुमच्या सोबत तेथे पहाणी करतील.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— तुम्ही आयुक्तांना आदेश देत आहात काय? आपण आदेश दिला तरी चालेल.

मा. महापौर :— आज नगररचनाकार नाहीत, त्यामुळे परवाच्या बैठकीत यावर उत्तर दिले जाईल. आता येथे निर्णय झाला आहे की, सर्वांची बांधकामे बंद करुन कागदपत्रे मागविण्यात येतील. त्यासाठी आधी यांची कागदपत्रे मागविण्यात येतील.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— आयुक्त साहेब, ८ दिवसात कारवाई होईल काय?

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील) :— मघाशी सांगितल्याप्रमाणे, आमचे सहा. आयुक्तांनी सांगितले की, ८—१५ दिवसात कार्यवाही करु. तर त्याप्रमाणे आम्ही कारवाई करु.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— १५ दिवसाच्या आत कारवाई करणार का? जर कारवाई केली नाही तर त्यासाठी तुम्ही सर्वस्वी जबाबदार रहाल.

मा. आयुक्त (श्री. डी.आर. पाटील) :— १५ दिवसात आम्ही कार्यवाही करु.

मा. सचिव :— प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौरजी, विलंब झाल्याबद्दल क्षमा मागतो. आपले सदस्य श्री. नाना पवार यांचे भाचे श्री. मिलींद आत्माराम साळवी यांचे निधन झाले आहे. तसेच कॅम्प नं. ५ मध्ये श्री. दयाल खिलुमल कटारिया उर्फ आर.के. दयाल यांचे देखिल निधन झाले आहे. तसेच आमचे सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांच्या भावाची मुलगी दिपा नरेंद्र जेसवानी यांचे देखिल निधन झाले आहे. या सर्वांना श्रध्दांजली दयावी अशी मी विनंती करतो.

---

## शोक प्रस्ताव

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

श्री. नाना पवार यांचे भाचे श्री. मिलींद आत्माराम साळवी यांचे नुकतेच निधन झाले आहे. कॅम्प नं. ५ मधील श्री. दयाल खिलुमल कटारिया उर्फ आर.के. दयाल यांचे देखिल निधन झाले आहे. तसेच श्री. सतरामदास जेसवानी यांच्या भावाची मुलगी दिपा नरेंद्र जेसवानी यांचे देखिल निधन झाले आहे.

यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ७१ अ** **दिनांक:–१७.१.२००६**

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. मिलींद आत्माराम साळवी, श्री. दयाल खिलुमल कटारिया उर्फ आर.के. दयाल, दिपा नरेंद्र जेसवानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– मा. महापौर महोदया, हा जो अध्यादेश पारीत झाला आहे त्यासाठी महासभेतर्फे अभिनंतदन प्रस्ताव पारीत करण्यात यावा.

काही सदस्य :– प्रस्ताव पास करा.

---

## अभिनंदन प्रस्ताव :–

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
श्री. दिलीप लालवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे
श्री. लाल पंजाबी

भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानातुन मोठया प्रमाणवर स्थलांतरित झालेल्या निर्वासितांनी उल्हासनगर शहरात आश्रय घेतला होता. त्यामुळे उल्हासनगर शहर हे निर्वासितांचे शहर म्हणुन ओळखले जाते. उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ अत्यंत कमी म्हणजे फक्त १३ चौ.कि.मी एवढे आहे. महापालिकेचे क्षेत्रफळ अत्यंत कमी असल्याने शहराच्या विकासासाठी अत्यंत कमी जागा उपलब्ध आहे. त्यामुळे उल्हासनगर शहरात दाटीवाटीने अनेक बांधकामे उभी राहिलेली आहेत.

शहराच्या सर्वांगिण विकासासाठी वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक व स्वतंत्र विकास नियंत्रण नियमावली असणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे महासभा ठराव क्र. ६५, दि. ५/१२/२००५ अन्वये सुधारित विकास नियंत्रण नियमावली मंजुर करण्यासाठी व वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक मिळणेसाठी प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता.

दिनांक २७/१२/२००५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत सदर प्रस्तावास मा. मंत्रीमंडळाने मंजुरी दिलेली असुन याबाबतचा अध्यादेश लवकरच येण्याची शक्यता आहे. सदरचा निर्णय हा उल्हासनगर शहरवासियांसाठी महत्वपुर्ण व विकासाच्या दिशेने जाणारा आहे.

सदरचा निर्णय घेणेकामी कॉग्रेस (आय) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती सोनियाजी गांधी, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.ना.श्री. शरदचंद्र पवार, मा.मुख्यमंत्री ना.श्री. विलासराव देशमुख, मा. उपमुख्यमंत्री ना.श्री. आर.आर. पाटील, मा. विधानपरिषद उपसभापती ना.श्री.वसंतराव डावखरे, मा.पालकमंत्री ना. श्री. गणेशजी नाईक, मा. नगरविकास राज्यमंत्री ना.श्री.राजेश टोपे, मा. विधानपरिषद सदस्य मा. श्री गुरुमुख जगवानी, मा. श्री. नितीन गडकरी, स्थानिक आमदार मा.श्री.पप्पु कालानी, मा.श्री.रामनाथ मोते, मा. श्री कन्हैयालाल गिडवाणी, मा.श्री. अरविंद सावंत, मा.श्रीमती मंदा म्हात्रे, मा.श्री.अनंत तरे, मा. श्री. पांडुरंग फुंडकर, मा. श्री. गुरुनाथ कुलकर्णी, मा. श्री. जितेंद्र आव्हाड, मा.श्री.संजय दत्त यांनी महत्वपुर्ण भुमिका बजावलेली आहे.

उल्हासनगर शहरासाठी वरील सर्वांनी विशेष प्रयत्न केल्याने उपरोक्त सर्वांचे अभिनंदन करण्यासाठी महासभेसमोर प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ७१ ब</u> <u>दिनांकः—१७.०१.२००६</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरासाठी विशेष प्रयत्न करुन सुधारित विकास नियंत्रण नियमावली मंजुर केल्याबद्दल कॉग्रेस (आय) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती सोनियाजी गांधी, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.ना.श्री. शरदचंद्र पवार, मा.मुख्यमंत्री ना.श्री. विलासराव देशमुख, मा. उपमुख्यमंत्री ना. श्री. आर.आर. पाटील, मा. विधानपरिषद उपसभापती ना.श्री.वसंतराव डावखरे, मा.पालकमंत्री ना.श्री. गणेशजी नाईक, मा. नगरविकास राज्यमंत्री ना.श्री.राजेश टोपे, मा. विधानपरिषद सदस्य मा. श्री गुरुमुख जगवानी, मा. श्री. नितीन गडकरी, स्थानिक आमदार मा.श्री.पप्पु कालानी, मा.श्री.रामनाथ मोते, मा. श्री कन्हैयालाल गिडवाणी, मा. श्री. अरविंद सावंत, मा.श्रीमती मंदा म्हात्रे, मा.श्री.अनंत तरे, मा. श्री. पांडुरंग फुंडकर, मा. श्री. गुरुनाथ कुलकर्णी, मा. श्री. जितेंद्र आव्हाड, मा.श्री.संजय दत्त या सर्वांचे आभार व्यक्त करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u>श्री. नाना पवार व श्री. शांताराम निकम यांनी साईबाबा मंदिराजवळील प्रवेशद्वाराच्या कामाबाबत लक्षवेधी सुचना दाखल केली होती परंतु ते आता ती लक्षवेधी सुचना मागे घेतली आहे त्यामुळे प्रशासनातर्फे यावर निवेदन करण्यात येणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>आता नगरसेवक निधीचे काम बंद पडले आहे त्याचे काय?

<u>मा. सचिव :—</u> लक्षवेधी सुचना क्र. २. ही लक्षवेधी सुचना जकात वसुलीबाबत होती. परंतु मागील बैठकीत याचप्रकारची लक्षवेधी सुचना आली होती. त्यामुळे या लक्षवेधीचे सुचक श्री. नरेंद्रकुमार ठाकुर व अनुमोदक श्री. नारायण पंजाबी यांनी लक्षवेधी सुचना मागे घेतली आहे त्यामुळे प्रशासनातर्फे यावर निवेदन करण्यात येणार नाही. आपण विषयांना सुरुवात करण्यापुर्वी येथे उपायुक्त पदावर नियुक्ती झालेले श्री. सावंत हे त्यांची ओळख सर्वांना करुन देतील.

<u>उप—आयुक्त (डॉ. दिपक सावंत):—</u> आदरणिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, मी डॉ. दिपक ज्ञानदेव सावंत उल्हासनगर महानगरपालिकेत उपायुक्त पदावर आजपासुन रुजु झालेलो आहे. मी अगोदर मुख्याधिकारी, रिसोड नगरपरिषद, जि. वाशिम येथे कार्यरत होतो. महाराष्ट्र शासनाने प्रतिनियुक्तीने माझी उल्हासनगर महापालिकेमध्ये नियुक्ती केलेली आहे. महापालिकेत कार्यरत असतांना मी आपणा सर्वांबरोबर सहकार्याने काम करेन अशी ग्वाही मी या प्रसंगी आपणा सर्वांना देतो. एवढे बोलुन माझे दोन शब्द संपवितो.

<u>मा. सचिव :—</u>आपले हार्दिक स्वागत आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

**मा. सदस्य श्री. मनोज साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

---

**विषय क्र. २ :—** मागील विशेष महासभेचे दिनांक ०५/१२/२००५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—**मागील बैठकीत नियंत्रण नियमावलीबद्दल जी चर्चा झाली होती त्यावेळी श्री. राजेश वदारिया, श्री. हरदास माखिजा व मी ज्या सुचना केल्या होत्या, त्यापैकी काही सुचनांचा समावेश केला आहे. तसेच काही सुचनांचा समावेश करण्याचे राहुन गेले आहे. तसेच बांधकाम नियमावलीचे जे पुस्तक आहे ते पुस्तक ठरावाचा एक भाग केले होते. त्या पुस्तकात सदरच्या ठरावातील सूचनांचे परावर्तन झालेले नाही. ते करणे आवश्यक आहे. जर मी यादी वाचुन दाखविली तर त्यासाठी एक तास लागेल. मी आपणांस दुरुस्तीची यादी देतो. त्याप्रमाणे आपण दुरुस्ती करुन घ्यावी. अन्यथा हे इतिवृत्त पुढील सभेत मंजुर करावे.

**काही सदस्य :—** ठिक आहे.

**मा. सचिव :—** इतिवृत्त कायम? कुणाची काही हरकत?

**काही सदस्य :—**पास—पास...........

**मा. महापौर :—** मागील विशेष महासभेचे दिनांक ०५/१२/२००५ रोजीचे इतिवृत्त श्री. किशोर वनवारी यांनी बांधकाम नियंत्रण नियमावलीत परावर्तीत करावयाच्या सुधारणांसह कायम करण्यात येत आहे.

**मा. सचिव :—**विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ३ :—**एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा—२ अंतर्गत महापालिका हद्दीतील रस्त्यांचे रुंदीकरण व नुतनीकरण करणेकामी ४९ कामांच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

---

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**मा. महापौरजी, रस्ते विकासाचा हा जो प्रस्ताव महासभेत आला आहे तर हा प्रस्ताव डेफर्ड पेमेन्ट अंतर्गत पास करण्यात यावा. महासभेने प्रशासकिय व वित्तीय मान्यता दयावी व त्यानंतर या कामासाठी त्वरीत निविदा काढली जावी. तसेच जे आवश्यक रस्ते आहेत ते मा. महापौरांच्या सुचनेनुसार केले जावे. सध्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट आहे परंतु आयुक्त साहेबांनी आम्हांला पत्र दिले आहे की ते हा विषय मागे घेवु इच्छितात. परंतु पास करायचे अथवा नाही हा महासभेचा अधिकार आहे. गोषवारा प्रशासनाकडुन महासभेसमोर आला आहे. आयुक्त साहेबांना असे वाटले की, लेबर पेमेंटद्वारे हा प्रस्ताव आहे. परंतु प्रत्यक्षात डेफर्ड पेमेन्ट द्वारे सदरचे काम करायचे आहे. ही सुधारणा करुन हा प्रस्ताव मंजुर करावा. महासभेने प्रशासकिय व वित्तीय मान्यता दयावी त्यानंतर त्वरीत निविदा काढुन प्राथम्याने रस्त्यांचे काम सुरु करावे. महापालिकेची आर्थिक परिस्थिती यापुर्वी देखिल खराब होती. परंतु ज्यावेळी श्री. चंद्रशेखर हे आयुक्त होते त्यावेळी देखिल आम्ही ३३ रस्त्यांचे काम केले होते. त्यावेळी देखिल आम्ही रुपये १० कोटीचा निधी वर्ग केला होता व उर्वरित काम कर्जाद्वारे केले होते. सध्या या रस्त्यांचे काम करणे आवश्यक आहे. वर्तमानपत्रात आम्ही वाचतो की, रस्त्यांची अवस्था खराब आहे. शहरातील रस्ते निवडणुकीपुर्वी तयार करणे अत्यावश्यक आहे. तसेच शहरात रस्त्यांवर सध्या जे खड्डे पडले आहेत ते देखिल भरले जावेत. कारण आज रस्त्यांची परिस्थिती अत्यंत खराब आहे. कॅम्प नं. १ ते ३ मध्ये थोडेफार तरी काम झाले आहे. कॅम्प नं. ४ व ५ मध्ये परिस्थिती अत्यंत खराब आहे. यासाठी मेहरबानी करुन डांबराच्या रस्त्यांना बीएमएसीने भरण्यात यावे. तसेच हे रस्ते लवकरात लवकर मंजुर करावे. धन्यवाद।

**मा. सचिव :—** हा विषय मागे घेण्यासाठी प्रशासनातर्फे पत्र देण्यात आले आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— सचिव साहेब, तुम्ही जे पत्र दिले आहे त्यामध्ये चुका आहेत.

मा. सचिव :— हे पत्र माझ्यातर्फे दिले नसुन सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे दिले आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— यामध्ये तारीख देखिल २००५ ची आहे.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :— मा. महापौरजी, यामध्ये एका रस्त्याचे काम वगळले आहे. पवई चौक ते उल्हासस्टेशन या रस्त्याचे काम देखिल समाविष्ट करण्यात यावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— मा. महापौर महोदया, रस्याबाबत सर्व लोकांना वाटते की, नविन रस्ते व्हायला हवेत, त्यांची दुरुस्ती व्हायला हवी, रुंद रस्ते व्हायला हवे. परंतु मी एका कायदेशीर मुद्दयावर बोलु इच्छितो. जर या विषयाचा गोषवारा मागे घेतला तर कायदेशीरदृष्टया ते योग्य होणार नाही. गोषवारा मागे घेतल्यानंतर आपण त्या विषयाला मंजुरी देवु शकत नाही. यासाठी माझी एक विनंती आहे की, जर आपण यावर योग्य निर्णय घेवु इच्छित असाल तर प्रशासनाने योग्य प्रकारे गोषवारा आणणे आवश्यक आहे. नंतर कोणतीही कायदेशीर अडचण होवु नये म्हणुन मी हे सांगत आहे. यासाठी मी उच्च न्यायालयाच्या एका निर्णयाचा हवाला देवु इच्छितो. जेव्हा मुंबई महापालिकेत कर्मचा—यांना अनुदान देण्याचा विषय सुरु होता त्यावेळी तेथिल नगरसेवकांनी आयुक्तांनी गोषवारा दिलेला नसतांनाही कर्मचा—यांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु मा. उच्च न्यायालयाने सदरच्या निर्णयाला बेकायदेशीर ठरविले होते. त्यामुळे मला असे वाटते की, कायदेशिररित्या आपण योग्य निर्णय घ्यायला हवा. कोणतेही बेकायदेशिर काम होवु नये यासाठी मी सर्वांना सावध करीत आहे. कोणत्याही विषयासाठी योग्य गोषवारा असणे आवश्यक आहे. त्यामुळे नंतर कोणतीही तांत्रिक अडचण उद्भवणार नाही.

मा. महापौर :— या ५९ रस्त्यांबाबत जेव्हा आम्ही बैठकीत निर्णय घेतला होता त्यावेळी असे ठरले होते की, या रस्त्यांचे काम डेफर्ड पेमेन्ट अंतर्गत करण्यात यावे. या योजनेअंतर्गत रस्त्याची रुपरेषा ठरवुन कधी कोणत्या टप्प्यावर किती देयक अदा करायचे हे ठरविले जाते. ६—६ महिन्याच्या अंतराळाने ३ वर्षाच्या कालावधीत सदरचे देयक अदा करायचे असते. परंतु आयुक्तांनी हा प्रस्ताव आणतांना त्यामध्ये बदल केलेला आहे. त्यांनी लेबर बेसीसवर ठेवले आहे. परंतु आपण तसे काम करु शकत नाही. आपल्या महापालिका निधित पुरेसा निधी नसल्याने आपण हे काम करु शकत नाही. त्यामुळे माझी आयुक्तांना विनंती आहे की, २० तारखेच्या बैठकीमध्ये जो मुळ प्रस्ताव होता तो आयत्यावेळचा विषय म्हणुन आणावा. त्यावेळी आम्ही त्याला मंजुरी देवु.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :— मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, शहरातील बरेच मुख्य रस्ते खराब झाले आहेत. उल्हासनगर कॅम्प नं. ४ पेट्रोल पंप ते ओटी व २५ सेक्शन ते नेताजी या रस्त्यांवरील खड्डे तरी भरणे आवश्यक आहे. मी शहर अभियंता यांना १० वेळा विनंती केली आहे की, डॉ. चंदीरामानी यांच्या येथिल मुख्य रस्त्यावर एवढे मोठे खड्डे झाले आहे की, दिवसभरात कमीत कमी १०—१५ अपघात होतात. एवढे छोटे काम देखिल केले जात नाही. तर याकडे लक्ष दयावे.

मा. सदस्य श्री. विश्‍वनाथ पाटील :— मा. महापौर महोदया, आता तुम्ही नविन रस्त्यांच्या कामाचा प्रस्ताव येथे आणला आहे परंतु या अगोदर जे ३२ ते ३३ रस्ते तयार केले होते, त्यापैकी किती रस्त्यांचे काम बाकी आहे याचा खुलासा येथे झाला तर नविन रस्ते बनविण्यासाठी आम्ही चर्चा करु शकतो. आधीचे रस्ते पुर्ण आहेत काय याचा अगोदर विचार करण्यात यावा. याबद्दल आधी खुलासा करावा.

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ३ :—एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा—२ अंतर्गत महापालिका हद्दीतील रस्त्यांचे रुंदीकरण व नुतनीकरण करणेकामी ४९ कामांच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.**

---

मा. सचिव :—विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

विषय क्र. ४ :– **प्रस्तावाची सुचना :–**

महापालिकेच्या आस्थापनेवरील ''अतिरिक्त आयुक्त'' हे पद रद्दबातल करणेसाठी सन्माननिय पालिका सदस्य श्री. किशोर वनवारी व श्री. विनोद ठाकुर यांच्या प्रस्तावाची सुचना विचारात घेणे.

---

मा. सचिव :– हा प्रस्ताव सुचक व अनुमोदक यांनी मागे घेतला आहे.

मा. महापौर :– सदरचा विषय सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

---

विषय क्र. ४ :– **प्रस्तावाची सुचना :–**

महापालिकेच्या आस्थापनेवरील ''अतिरिक्त आयुक्त'' हे पद रद्दबातल करणेसाठी सन्माननिय पालिका सदस्य श्री. किशोर वनवारी व श्री. विनोद ठाकुर यांच्या प्रस्तावाची सुचना विचारात घेणे.

---

मा. सचिव:–कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.४० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– २० जानेवारी, २००६

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०.१.२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०.१.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा ही पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती संगिता जावळे | ३५. | श्री. राज असरोंडकर |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३६. | श्रीमती माने किरण |
| ४. | श्री. सोनवणे नथु | ३७. | श्री. रमेश चव्हाण |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | ३८. | श्री. जाधव प्रशांत |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना | ३९. | श्री. जाधव सुरेश |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४०. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ८. | श्री. वाघे शामु | ४१. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४२. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४३. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४४. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४५. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४६. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७ | श्री. भालेराव गौतम |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्रीमती वसिटा बेबी |
| १६. | श्री. उमाप रामदास | ४९. | श्री. ठाकुर अशोक |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५०. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५१. | श्री. अंकुश म्हस्के |
| १९. | श्री. पवार नाना | ५२. | श्री. पंजाबी नारायण |
| २०. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५३. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २१. | श्री. जग्यासी राजु | ५४. | श्रीमती भटिजा कोमल |
| २२. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ५५. | श्री.जयसिंघानी अनिल |
| २३. | श्री. निकम शांताराम | ५६. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २४. | श्री. टाले प्रमोद | ५७. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५८. | डॉ. श्रीमती निना नाथानी |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५९. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६०. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६१. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६२. | श्रीमती करोतिया मालती |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६३. | श्रीमती मिनु दासानी |
| ३१. | श्री. सतरामदास जेसवानी | ६४. | श्री. इदनानी राजु |
| ३२. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्रीमती भावना खिलनानी | ६६. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३४. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | | |

तर,

१. मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी, मा.सदस्य / सदस्या २. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, ३. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल, ४. श्रीमती साधवानी जया, ५. श्री. साधवानी मोहन, ६. श्रीमती अनिता गुप्ता, ७. श्री. चौधरी राजेंद्र, ८. श्री. साधवानी मनोज, ९. श्री. रामरख्यानी मोहनदास, १०. श्रीमती किरण माखिजा, ११. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, १२. श्री. पुरस्वानी जमनादास, १३. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, १४. श्री. हरदास माखिजा, १५. श्री. राजेश वदारिया हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सांयकाळी ४.५५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. आयुक्त श्री. डी.एस. पाटील हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी उप–आयुक्त श्री. दिपक सावंत हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी मा. उप–महापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–मा. महापौरजी, आजची सभा उदया दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित केली जावी. कारण सभागृहाचे मत हेच आहे. तसेच आमच्या नगरसेवकांना महत्वाच्या बैठकीसाठी बाहेर जायचे आहे. त्यामुळे बैठक उदया १२.०० वाजेपर्यंत स्थगित करावी.

मा. सदस्या श्रीमती बेबी वसिटा, मा. सदस्य श्री. राज असरोंडकर, श्री. सुरेश गायकवाड हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—मा. महापौरजी, यांनी सर्वांचे एकमत असल्याचा जो शब्द वापरला आहे तो चुकीचा आहे. आमच्या असे निदर्शनास आले आहे की, गेल्या काही महिन्यांपासुन सत्तापक्षातील सदस्य बैठकीचे कामकाज देखिल चालवु शकत नाहीत. जर आपण गेल्या सहा—सात महिन्यातील सभांचे कामकाज पाहिले तर दिसुन येईल की, एक बैठक दोन—दोन, तीन—तीन वेळा स्थगित झाली आहे. यासाठी फुटकळ कारणे दिली जातात, जसे पगडीला जायचे आहे, हे करायचे आहे, ते करायचे आहे. जर आपण बैठकीचे कामकाज पुर्ण करु शकत नसाल तर बैठक आयोजितच करु नका. आमचा याला विरोध आहे. जर आपणांस बहुमताने, दादागिरीने निर्णय घ्यायचा असेल तर आपण घेवु शकतात.

मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :—हे पहा, सभा स्थगित करावी असे काही सदस्यांचे मत आहे. यामध्ये दादागिरीचा काही प्रश्नच येत नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, मी श्री. लाल पंजाबी यांच्या मताशी सहमत नाही. यांचे असे म्हणणे आहे की, आम्ही महासभा दोन—तीन वेळा स्थगित केली आहे परंतु कोणत्याही महासभेचे कामकाज आजमितीस प्रलंबित नाही. एखादया महिन्याची महासभा प्रलंबित असल्यास आपण तसे उदाहरण देवुन दाखवा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— सभा स्थगित करायची असेल तर आठ—दहा दिवसांसाठी स्थगित करा. सभा उदया पर्यंत स्थगित करण्यासाठी आमचा विरोध आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— जर यांचा विरोध असेल तर आपण मतदान घ्यावे.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :— तुमचे आता हे नेहमीचेच झाले आहे. उदयापर्यंत स्थगित करु नका. आठ—दहा दिवसानंतर करा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— सभा संध्याकाळी ४.०० वाजता आयोजित करावी.

मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :—सचिव साहेब, कृपया मतदान घ्यावे.

मा. सचिव :— जे सदस्य सभेचे कामकाज उदया १२ वाजेपर्यंत स्थगित करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया हात वर करावे.

४२ मते

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
५. श्री. वाघे शामु बाबु
६. श्री. ऐडके गणपत गोविंद
७. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
८. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
१०.श्री. पवार नाना आनंदा
११.श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
१२.श्री. जग्यासी राजु
१३.श्री. निकम शांताराम ओंकार
१४.श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१५.श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१६.श्रीमती. वनवारी मोना अशोक

१७.श्री. वनवारी किशोर नारायणदास
१८.श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१९.श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
२०.श्रीमती. खिलनानी भावना रवि
२१.श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
२२.श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२३.श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
२४.श्रीमती. पंजाबी दिपा नारायण
२५.श्रीमती. भठिजा कोमल अमृत
२६.श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
२७.श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
२८.श्री. तलरेजा विनोद चंदीराम
२९.श्रीमती. नाथानी निना प्रकाश
३०.श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
३१.श्री. पंजाबी नारायण
३२.श्री. भठिजा संजय रामचंद्र
३३.श्री. मोकल चंदाराम
३४.श्रीमती. दासानी मिनु राजकुमार
३५.श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
३६.श्री. लाल बिहारी यादव
३७.श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ
३८.श्री. जाधव सुरेश मधुकर
३९.श्री. टाले प्रमोद नामदेवराव
४०.श्री. भालेराव गौतम यशवंत
४१.श्री. ठाकुर अशोक भगवानदास
४२. श्रीमती मिना सोंडे

<u>मा. सचिव :–</u> जे सदस्य सभेचे कामकाज उदया १२ वाजेपर्यंत स्थगित करण्याच्या बाजुने नाहीत त्यांनी कृपया हात वर करावे. श्रीमती सिमा मोकल आपले मत कोणत्या बाजुने आहे?

<u>११ मते</u>
१. श्रीमती. जावळे संगिता रमेश
२. श्री. उमाप रामदास राघोजी
३. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाशोमल
४. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश
५. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग
६. श्री. सोनावणे नथु
७. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा
८. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
९. श्री. पाटील विश्वनाथ गौतम
१०. श्रीमती. मोकल सिमा
११. श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

<u>मा. सचिव :–</u> आज या सभेत तीन लक्षवेधी सुचना, एक अभिनंदन प्रस्ताव व आयत्यावेळचे तीन विषय प्राप्त झाले आहेत. बैठक स्थगित करण्यापुर्वी यावर निर्णय घेणे आवश्यक आहे.

**मा. सदस्या श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>काही सदस्य :–</u> आयत्यावेळचे सर्व विषय नियमित सभा सुचनेवर आणण्यात यावे.

<u>मा. सचिव :–</u> श्री. किशोर वनवारी सुचक असलेले व श्रीमती मोना वनवारी अनुमोदक असलेली लक्षवेधी सुचना मागे घेतली आहे. तसेच श्री. अशोक ठाकुर, श्री. गौतम भालेराव व श्रीमती बेबी वसिटा यांनी देखील लक्षवेधी

सुचना मागे घेतली आहे.  एकच लक्षवेधी सुचना उर्वरीत असुन त्याचे सुचक श्रीमती भावना खिलनानी व अनुमोदक श्री. सतरामदास जेसवानी आहेत. या लक्षवेधी सुचनेचा विषय रस्ता रुंदीकरणा अंतर्गतची बांधकामे हटविणे बाबतचा आहे. मा. महापौरांनी सदरची लक्षवेधी सुचना दाखल करुन घेतली आहे. तसेच आयत्यावेळीचे विषय आपल्या सर्वांच्या मान्यतेने नियमित विषयसुचीवर आणण्याचा निर्णय झाला आहे. श्री. प्रमोद टाले यांनी अभिनंदन प्रस्ताव सादर केला आहे. उल्हासनगर येथिल कु. गौरी अकोलकर व कु. पल्लवी बर्वे यांची जबलपुर येथे होणा—या हॉकी स्पर्धेमध्ये निवड झाली आहे. त्याबद्दल त्यांचा अभिनंदन प्रस्ताव सादर केला आहे. तर कृपया आपण त्यांच्या अभिनंदनाचा कार्यक्रम पार पाडावा. मा. महापौरांतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात येईल.

मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :— आयत्या वेळचे विषय नियमीत विषयसूचीवर आणण्यात यावेत तसेच लक्षवेधी सूचना दाखल करुन घेण्यात येत आहे.

**मा. सदस्या श्रीमती करोतिया मालती राधाचरण, श्रीमती भारती छाब्रिया यांनी सभागृहात प्रवेश केला.**

---

## अभिनंदन प्रस्ताव :—

सुचकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले
अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ९ मध्ये राहणा—या कु. गौरी अकोलकर वय वर्षे १९ व कु. पल्लवी बर्वे वय वर्ष २० यांची मुंबई वुमेन्स हॉकी असोसिएशन तर्फे जबलपुर येथे होणा—या ३६ व्या ज्युनिअर नॅशनल हॉकी स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातुन निवड झाली आहे. त्यांच्या या कामगिरीने उल्हासनगर शहराच्या नावलौकिकात भर पडली आहे.  याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ७१क — दिनांकः—२०.१.२००६

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ९ मध्ये राहणा—या कु. गौरी अकोलकर व कु. पल्लवी बर्वे यांची मुंबई वुमेन्स हॉकी असोसिएशन तर्फे जबलपुर येथे होणा—या ३६ व्या ज्युनिअर नॅशनल हॉकी स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातुन निवड झाल्याने त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी यांनी कु. गौरी अकोलकर व कु. पल्लवी बर्वे यांना पुष्पगुच्छ देवून सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन केले.

मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :— सदरची सभा उदया दुपारी १२.०० वाजेपर्यंत बहुमताने स्थगित करण्यात येत आहे.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे, श्री. दिलीप गायकवाड, श्री. रमेश चव्हाण व श्री. अनिल जयसिंघानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ५.०५ वाजता मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी यांनी सभा स्थगीत केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– २१ जानेवारी, २००६

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २१.१.२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०.१.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदरची सभा स्थगित करुन शनिवार दिनांक २१.१.२००६ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती संगिता जावळे | २८. | श्रीमती भावना खिलनानी |
| ३. | श्री. सोनवणे नथु | २९. | श्रीमती माने किरण |
| ४. | श्री. टेकचंदानी राजु | ३०. | श्री. रमेश चव्हाण |
| ५. | श्रीमती रामचंदानी भावना | ३१. | श्री. जाधव प्रशांत |
| ६. | श्री. वाघे शामु | ३२. | श्री. जाधव सुरेश |
| ७. | श्रीमती मोकल सीमा | ३३. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ८. | श्री. दिलीप गायकवाड | ३४. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३५. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्री. एडके गणपत गोविंद | ३६. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ११. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३७. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १२. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३८. | श्री. भालेराव गौतम |
| १३ | श्री. उमाप रामदास | ३९. | श्री. ठाकुर अशोक |
| १४. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४०. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १५. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४१. | श्री. पंजाबी नारायण |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४२. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४३. | श्री. साधवानी मनोज |
| १८. | श्री. पवार नाना | ४४. | श्रीमती भटिजा कोमल |
| १९. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ४५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २०. | श्री. जग्यासी राजु | ४६. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २१. | श्री. टाले प्रमोद | ४७ | श्रीमती छाब्रिया भारती |
| २२. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ४८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ४९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २४. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५०. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५१. | श्रीमती करोतिया मालती |
| २६. | श्री. सतरामदास जेसवानी | ५२. | श्रीमती मिनु दासानी |
| २७. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | ५३. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

१. मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी, मा.सदस्य / सदस्या २. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, ३. श्री. निकम शांताराम, ४. श्री. ठाकुर विनोद लालसिंग, ५. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास, ६. श्री. साधवानी मोहन, ७. श्रीमती साधवानी जया, ८. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल, ९. श्री. राज असरोंडकर, १०. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, ११. श्रीमती कृष्णानी रेखा, १२. श्रीमती वसिटा बेबी, १३. श्री. अंकुश म्हस्के, १४. श्री. चौधरी राजेंद्र, १५. श्री. पुरस्वानी जमनादास, १६. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे, १७. श्री. मुलचंदानी महेंद्र, १८. श्रीमती अनिता गुप्ता, १९. श्री. रामरख्यानी मोहनदास, २०. श्रीमती किरण माखिजा, २१. श्री. जयसिंघानी अनिल, २२. डॉ. श्रीमती निना नाथानी, २३. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, २४. श्री. इदनानी राजु चंद्रभान,

२५. श्री. पंजाबी लाल देवनदास, २६. श्री. हरदास माखिजा, २७. श्री. राजेश वदारिया, २८. श्रीमती खांडेकर प्रेमा हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

दुपारी १२.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. आयुक्त श्री. डी.एस. पाटील हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी उप—आयुक्त श्री. दिपक सावंत हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी मा. उप—महापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> कालच्या सभेसही आयुक्त साहेब उपस्थित नव्हते. आजही ते अनुपस्थित आहेत. त्यामुळे महासभा आज स्थगित करावी व पुढील महिन्यात एक तारखेनंतर ठेवावी कारण भाजपाचा देखील कार्यक्रम आहे असे श्री. पंजाबी यांनी आम्हांला सांगितले आहे.

यावेळी मा. आयुक्त श्री. डी.एस. पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला व ते आयुक्त पदावर आसनस्थ झाले.

<u>काही सदस्य :—</u> सभा स्थगित करावी.

<u>मा. सचिव :—</u> सदरची सभा पुढील सुचना मिळेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे. यावर कुणाची काही हरकत आहे का?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u> मा. महापौरजी, महासभा किती वेळा स्थगित करायची याला काही मर्यादा आहे की नाही? काल आपण सभा आजपर्यंत स्थगित केली होती. असे होते तर सभा आज ठेवायची नव्हती. महिला सभेसाठी येतात परंतु वारंवार सभा स्थगित केली जाते. तसेच आयुक्त साहेब देखिल आता आले आहेत. महापालिकेच्या सभागृहाला शिस्त आहे की नाही? आयुक्त साहेब येथे उपस्थित असतांना आपण त्यांना उपस्थित नाहीत असे सांगत आहात.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—</u> मा. महापौरजी, सभा स्थगित करण्यापुर्वी मी सांगु इच्छितो की, कॅम्प नं. ४ व ५ मध्ये सध्या मोठया प्रमाणावर पाण्याची टंचाई जाणवत आहे. यावर आयुक्तांनी निवेदन करावे.

<u>मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव :—</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात ब—याच वर्षांपासुन पाण्याची समस्या जाणवत आहे. परंतु येथे शासनाकडुन फक्त आश्वासन मिळते काम काहीही होत नाही.

<u>मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :—</u> यावर पुढील बैठकीत चर्चा करण्यात येईल. आता सदर सभेचे कामकाज पुढील सुचना मिळेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—</u> पाण्याचे काय झाले? चार दिवसांपासुन कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाणी नाही.

<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u>आपण सभा संपल्यानंतर आयुक्तांना भेटावे ते यावर काहीतरी मार्ग काढतील.

<u>मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव :—</u> एक—एक सदस्य भेटेल का? सर्वांच्या समस्यांचे निराकरण होणार आहे अथवा नाही? मी दोन दिवसांपुर्वी भेटलो आहे परंतु काहीही मार्ग निघालेला नाही.

<u>मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :—</u> मी आयुक्त साहेबांना तसे निर्देश देतो. तसेच सदरची सभा पुढील सूचना मिळेपर्यंत सर्वानुमते स्थगित करण्यात येत आहे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १२.४५ वा मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी यांनी सभा स्थगीत केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)<br>महापालिका सचिव<br>उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ८/२/२००६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ८/२/२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०.१.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदरची सभा स्थगित झाल्याने सदर सभा शनिवार दिनांक २१.१.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती ही सभा पुन्हा स्थगित झाल्यामुळे सदर सभा बुधवार दिनांक ८/२/२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी या पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :— श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३४. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ४. | श्री. सोनवणे नथु | ३५. | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | ३६. | श्री. जाधव प्रशांत |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना | ३७. | श्री. जाधव सुरेश |
| ७. | श्री. वाघे शामु | ३८. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४०. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४१. | श्री. पाटील विश्वनाथ |
| ११. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४२. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १२. | श्री. एडके गणपत गोविंद | ४३. | श्री. अंकुश म्हस्के |
| १३ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४४. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४५. | श्री. पंजाबी नारायण |
| १५. | श्री. उमाप रामदास | ४६. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १६. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४७ | श्री. साधवानी मनोज |
| १७. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४८. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४९. | श्रीमती भटिजा कोमल |
| १९. | श्रीमती अनिता गुप्ता | ५०. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २०. | श्री. पवार नाना | ५१. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २१. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५२. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २२. | श्री. जग्यासी राजु | ५३. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २३. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ५४. | श्रीमती निना नाथानी |
| २४. | श्री. निकम शांताराम | ५५. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २५. | श्री. टाले प्रमोद | ५६. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५७. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५८. | श्रीमती करोतिया मालती |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५९. | श्रीमती मिनु दासानी |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६०. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३०. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६१. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६२. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३२. | श्री. सतरामदास जेसवानी | ६३. | श्री. राजेश वदारिया |
| ३३. | श्री. राज असरोंडकर | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, २. श्री. मुलचंदानी महेंद्र, ३. श्रीमती वसिटा बेबी, ४. श्री. ठाकुर अशोक, ५. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल, ६. श्री. साधवानी मोहन, ७. श्रीमती माने किरण, ८. श्री. रमेश चव्हाण, ९. श्रीमती सुर्वे जयश्री, १०. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, ११.श्रीमती साधवानी जया, १२. श्रीमती कृष्णानी रेखा, १३. श्रीमती भावना खिलनानी, १४. श्री. भालेराव गौतम, १५. श्रीमती किरण माखिजा,

१६. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, १७. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, १८. श्री. हरदास माखिजा हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>**मा. सचिव :—**</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........

<u>**मा. सचिव :—**</u> प्रश्न क्र. ४६० हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे ते यावेळी अनुपस्थित असल्याने त्यांचे प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

**?** <u>**प्रश्न क्र. ४६० :—**</u> महात्मा फुले शिक्षण हमी योजना राबविणे प्रकरणी केलेल्या मुद्दयांची माहिती आगामी महासभेपुढे मांडण्यात यावी. व लेखी स्वरुपात त्याचा खुलासा देण्यात यावा ही विनंती.

१. महात्मा फुले शिक्षण हमी योजना महापालिकेमार्फत राबविणेत येते का?
२. असल्यास एकुण किती लाभार्थीना या योजनेचा लाभ मिळाला आहे?
३. योजनेची अंमलबजावणी केव्हापासुन करण्यात आली आहे?
४. सदर योजनेची अंमलबजावणी केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत? योजना अदयाप सुरु न करण्यास त्यास जबाबदार कोण?

१. <u>उत्तर :—</u> होय.
२. एकुण लाभार्थी ५,१०८
३. सदर योजनेची अंमलबजावणी २००१—०२ पासून सुरु झाली आहे.
४. सदर योजनेबाबत फौजदारी गुन्हा दाखल असल्याने अंमलबजावी थांबविली आहे. योजनेबाबत पोलिस चौकशी सुरु असल्याने निश्चित कुणाला जबाबदार धरता येणार नाही.

<u>**मा. सचिव :—**</u> प्रश्न क्र. ४६१ हा श्री. मोहन साधवानी यांचा आहे. ते यावेळी अनुपस्थित असल्याने त्यांचे प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

**?** <u>**प्रश्न क्र. ४६१ :—**</u> हाउ मेनी चेरीटेबल ट्रस्ट /एज्युकेशन ट्रस्ट/ रिलीजीअस ट्रस्ट हॅव अप्लायड् फोर ग्रान्ट / अेड अॅण्ड हाउ मेनी ऑफ देम हॅव बीन गिवन ग्रान्ट/ अॅड इन लेझी ३ इअरर्स. एल्सो मेन्शन हाउ मच अमाउंट हॅस बीन सेक्शनड् फोर द लास्ट ३ इअरर्स.
काइन्डली डु द निडफुल अॅण्ड ऑबलाईज.

<u>उत्तर :—</u> शासनाकडे ४ शैक्षणिक संस्थांनी या कार्यालयामार्फत अनुदानासाठी प्रस्ताव सादर केले होते. मागील ३ वर्षात एका शैक्षणिक संस्थेला शासनाकडून अंशत: अनुदान मंजुर झाले आहे. सदर अंशत: अनुदाना वितरण वेतनपथक (प्राथ.)जि.प. ठाणे यांचेमार्फत करण्यात आले. त्यामुळे निश्चित अनुदानाची रक्कम या कार्यालयाकडून सांगता येत नाही.

<u>**मा. सचिव :—**</u> प्रश्न क्र. ४६२ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

**?** <u>प्रश्न क्र. ४६२ :—</u> वन सिव्हील सुट नं. ३०६/९१ फिल्ड बाय श्री. मंगोमल साधुमल एण्ड ऑदर्स अगेन्स्ट द कार्पोरेशन इन द इअर १९९१. वॉट इज द करन्ट पोझिशन ऑफ द अबोव्ह सेड केस एण्ड गिव द डिटेल्ड् हिसस्टोरी ऑफ द अबोव्ह रिफर्ड केसण

<u>उत्तर :—</u> सदर प्रकरणी वकिलांकडुन माहिती मागविली असुन त्यानुसार श्री. मघोमल साधुमल आणि इतर यांनी ठाणे दिवाणी न्यायालयात दावा क्र. ३०६/९१ दाखल केला होता. मा. दिवाणी न्यायाधिश यांनी सदर प्रकरणी वादग्रस्त जागेबाबत जसे आहे तसे (स्टेटस को) आदेश काढले होते. अंतरिम आदेशाच्या अर्जाच्या अंतिम सुनावणी नंतर वरीलप्रमाणे स्टेटस को दावा निकाली निघेपर्यंत कायम करण्यात आले होते. मा. न्यायाधिशांनी सदरहु आदेश कायम करणेसाठी कारणे दिलेली आहेत. सदरहु आदेशाविरुध्द महानगरपालिकेतर्फे म.सी.ए.क्र. ४०/९२ दाखल केले होते. ते अपिल अंतिम सुनावणीनंतर ठाणे जिल्हा न्यायालयामार्फत फेटाळण्यात आले आणि त्या व्यतिरिक्त त्या आदेशानुसार वादीस स्वखर्चाने जिल्हा निरिक्षक भुमी अभिलेख (D.I.L..R.) यांना जमिनीच्या सीमांकन व रस्त्यावर असणा—या बांधकामासंबंधी मोजमाप करुन घेवुन मुळ दिवाणी न्यायालयात नकाशा सादर करण्याचे निर्देश दिले होते. परंतु जिल निरिक्षक भुमी अभिलेख (D.I.L.R.) किंवा तालुका निरिक्षक भुमी अभिलेख (T.I.L.R.) यांनी अदयापपर्यंत अहवाल दिला नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे वकिलांनी अपिलेट कोर्टाच्या आदेशान्वये वादीने पावले उचलली नसल्याने सदर दावा फेटाळण्यात यावा असा अर्ज केला आहे.

तसेच मुळ दिवानी न्यायालयातर्फे सदर दाव्यातील मुद्दे निश्चित करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी पुरावा घेतल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. जोपर्यंत अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत महानगरपालिकेने स्टेटस को मेन्टेन करायचा आहे असे दिवाणी न्यायालयाचे स्पष्ट आदेश आहेत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—</u> महापौर महोदया, हा प्रश्न मी २०/१२/२००५ ला विचारला होता. हा प्रश्न या पुर्वी देखिल विचारला होता. दु:खाने म्हणावे लागते त्यावेळी महासभेत आश्वासन दिले होते की, हा स्थगन आदेश उठवुन आम्ही कारवाई करु. सीसी रोडवर अनाधिकृतरित्या दुकान बनविण्याचा हा मुद्दा आहे. अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी शासनाने जो अध्यादेश काढला आहे त्यामध्ये देखिल स्पष्ट लिहिले आहे की, कोणत्याही रस्त्यावर बनलेले बांधकाम अधीकृत करण्यात येवु नये. या प्रश्नाच्या उत्तरात लिहिले आहे की, १९९१ मध्ये हे प्रकरण उजेडात आले होते. यामध्ये असेही लिहिले आहे की, सध्या स्थगन आदेश आहे. परंतु आम्ही या आधी देखिल आपल्या निदर्शनास आणले आहे की, न्यायालयाने जो स्थगिती आदेश दिला होता तो बिल्डरने पाळला नव्हता. ज्यावेळी स्थगिती आदेश दिला होता त्यावेळी तेथे छप्पर व शटर लावले नव्हते परंतु स्थगिती आदेश दिल्यानंतर तेथे छप्पर व शटर लावण्यात आले आहे. चार दुकानांचे तीन दुकाने करण्यात आली होती. ती दुकाने भाडयाने देण्यात आली होती. तरीदेखिल महापालिकेने काही कार्यवाही केली नव्हती. महापालिका जर स्वत:च्याच सिमेंट रोडवर अतिक्रमण होत असतांना काही कार्यवाही करत नसेल व एवढया वर्षापासुन असलेला स्थगिती आदेश उठविण्याचा प्रयत्न करत नसेल तर हा प्रश्न गंभीर आहे असे म्हणावे लागेल. या शहरात आपण लोकांची घरे व दुकाने तोडुन रस्ते मोठे करतो कारण या शहरासाठी मोठे रस्ते आवश्यक आहेत. परंतु येथे सिमेंट कॉक्रीटच्या रस्त्यावर दुकान बनविले जाते. वारंवार तक्रार करुन देखिल योग्य ती कारवाई केली जात नाही. १९९१ पासुन स्थगन आदेश असला तरीही दाव्याचे कामकाज चालवुन आदेश उठविला जात नाही. या प्रश्नाचे जे उत्तर दिले आहे ते देखिल प्रश्न उपस्थित करणारेच आहे. विधी विभागाचे अधिकारी या प्रकरणात कारवाई कधी होईल हे सांगतील का? १७ वर्षापासुन प्रकरण कोर्टात सुरु आहे आणि त्यावर मार्ग काढण्यासाठी काही कारवाई केली जात नाही, टीआयएलआर कडुन अहवाल मागविण्यासाठी आदेश दिल्यानंतर काय केले ते सांगितले जात नाही. विधी विभागाच्या अधिका—याने येथे येवुन आम्हांला माहिती दयावी. विधी अधिका—यांना येथे उत्तर देण्यासाठी बोलवा.

<u>प्रभारी विधी अधिकारी (श्रीमती प्राजक्ता कूलकर्णी):—</u> मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व सन्माननिय सदस्य व सर्व अधिकारी वर्ग श्री. दिलीप लालवानी यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत महापालिकेतर्फे न्यायालयात उत्तर दाखल केले आहे. त्यानंतर अपिल रद्द झाले असून संबंधिताला टीआयएलआर व डीआयएलआरचा अहवाल देण्यास सांगितला आहे. परंतु अजुन त्यांनी तो अहवाल दिला नाही. आमच्या वकिलांनी ही केस निकाली निघण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. पुढील सुनावणी १७ तारखेला होणार आहे त्यावेळी काही ना काही होईल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—सर्व प्रथम मी आपणांस सांगु इच्छितो हा प्रश्न मी यापुर्वी ८/१२/२००३ ला विचारला होता. त्यावेळी त्याचा क्रमांक २७५ असा होता. त्यावेळी मला जी माहिती दिली होती ती चुकीची दिली होती. त्यामुळे मी पत्र दिले होते व नंतर मला दुरुस्ती करुन पुन्हा पत्र दिले होते. मला त्यावेळी सांगितले होते की, लकवरात लवकर यावर निर्णय घेवु. त्यावेळी देखिल प्रकरण न्यायालयात आहे असे सांगितले होते व आता देखिल तेच सांगितले जात आहे. १९९१ पासुन प्रकरण न्यायालयात आहे असे सांगितले जात आहे. जेव्हा महापालिकेच्या एखादया मालमत्तेवर अतिक्रमण होते व महापालिका काहीही कारवाई करत नाही ही बाब गंभीर आहे. या शहरातील बरेच सार्वजनिक शौचालय हडप करण्यात आले आहे. बरेचसे रस्ते, सीसी ब्लॉक हडप करण्यात आले, परंतु आपण न्यायालयाची सबब सांगुन काहीही कारवाई करत नाही. आपण सदरचे प्रकरण न्यायालयात सुनावणीसाठी पाठ पुरावा करुन आणु शकतो, निकाली काढु शकतो. परंतु असे होत नाही. यासाठी मी आपणांस दोष देत नाही. आपण नव्यानेच काम हाती घेतले आहे. तसेच हे प्रकरण आपण यशस्वीपणे हाताळाल अशी मी आपणांस शुभेच्छा देतो. याबद्दल आपण लवकरच काहीतरी कराल व मला तसे उत्तर दयाल अशी आशा बाळगतो.

प्रभारी विधी अधिकारी (श्रीमती प्राजक्ता कूलकर्णी):—ठिक आहे, धन्यवाद ।

मा. सचिव :— प्रश्न क्र. ४६३ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

? प्रश्न क्र. ४६३:— द्वारका, नियर रामायण नगर, उल्हासनगर—३ फोर विच द नोटिस हॅस अल्रेडी बीन सर्व्हड् टु द ऑक्युपाईज ऑफ द अपार्टमेंट. व्हॉट एक्शन इज टेकन बाय द युएमसी?

उत्तर :— सदर इमारत ही ८५५ च्या यादीत असल्याने मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही सुरु आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:— ठिक आहे.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ४६४ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

? प्रश्न क्र. ४६४ :— गोल्डन टॉवर, नियर कैलास कॉम्पलेक्स, उल्हासनगर—२ फोर विच द नोटिस हॅस बिन सर्व्हड् टु द डिफॉल्टर वॉट इज द करंट पोझिशन ऑफिस केस?

उत्तर :— सदर इमारतीची नस्ती शोधण्यात येईल. तथापी, तोपर्यंत इमारतीतील संबंधीतांना कागदपत्र सादर करण्याबाबत नोटीस देवुन कागदपत्र तपासुन पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:— ठिक आहे.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ४६५ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

? प्रश्न क्र. ४६५ :— हिरा मोती बीअर बार, नियर निलम हॉटेल, कल्याण—अंबरनाथ रोड, उल्हासनगर—३ फोर विच द नोटिस हॅस अल्रेडी बीन सर्व्हड टू द डिफाल्टर व्हाट इज करन्ट पोझिशन ऑफ द केस?

उत्तर :— डॉक्युमेन्टरी कॉल नोटिस इज इश्युड ऑन १३.१.०६ टु द ओनर ऑफ द बार द डॉक्युमेन्टस विल बी स्क्रुटीनाइझ एण्ड फदर ॲक्शन (लिगल) वुड बी टेकन.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:— ठिक आहे.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ४६६ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

__प्रश्न क्र. ४६६ :–__ सद्यस्थितीत उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत टेलिफोन विभागामार्फत (MTNL) वायर टाकण्याचे काम सुरु असून सदर खोदकामाची परवानगी महापालिकेने दिली आहे काय? दिली असलयास किती शूल्क वसूली (रक्कम) करण्यात आली? किती खोदाईची परवानगी देण्यात आली आहे? परवानगी प्रमाणे खोदाई केली आहे का? कि वाढीव खोदाई केली आहे? याबाबत महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिति मिळणेस विनंती आहे.

__उत्तर :–__१) सदर खोदकामाची परवानगी महापालिकेने दिली आहे.
२) रु. ७३,१७,५५०/– शुल्क वसुली करण्यात आली.
३) ७ रस्त्यांच्या खोदाईची परवानगी देण्यात आली आहे.
४) काम सुरु आहे. काम पुर्ण झाल्यानंतर पुन्हा संयुक्त मोजमाप करुन योग्य ती कार्यवाही करणेत येईल.

__मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–__ ज्या रस्त्यांना खोदकामासाठी परवानगी दिली आहे ते कोणते आहेत? तसेच किती खोदकाम करण्यासाठी परवानगी दिली आहे? कारण त्यांनी आपल्या मुख्य डीपी रस्त्यांवर सेप्टीक टॅंक बनविण्याचे काम सुरु केले आहे. याचीही परवानगी दिली आहे का?

__प्रभारी शहर अभियंता (श्री. एम.ए. जवादे):–__ ज्या रस्त्यांवर खोदकामासाठी परवानगी दिली आहे ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. शांतीनगर नाका ते नविन टेलिफोन एक्सचेंज
२. गुरुद्वारा ते शहाड, उल्हासनगर–१
३. कोर्ट ते १७ सेक्शन
४. फालोवर लाईन ते आरओबी
५. व्हीनस ते श्रीराम नगर
६. श्रीराम नगर ते १७ सेक्शन
७. आरओबी ते मानेरा रोड

यांना खड्डे खोदायला व इन्स्पेक्शन चेंबर्स बनवायला परवानगी दिलेली आहे. या दोन्ही कामांसाठी त्यांच्याकडुन शुल्क वसुल केले आहे.

__मा. सचिव :–__ प्रश्न क्र. ४६७ हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे. ते यावेळी अनुपस्थित असल्याने त्यांचे प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

__प्रश्न क्र. ४६७:–__ उल्हासनगर महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी श्री. युवराज भदाणे, यांचे सेवापुस्तकात तत्कालीन मा. आयुक्त श्री. सोनवणे साहेब तसेच उप–आयुक्त (मुख्यालय) श्री. लोणारे साहेब यांनी कोणता शेरा (रिमार्क) मारला आहे का? कोणता?

याबाबत महासभेत चर्चा होवुन सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

__उत्तर :–__ नाही.

__मा. सचिव:–__प्रश्नोत्तराचा कालावधी संपला असून लक्षवेधी सुचना आहे, जीचे सुचक आहेत श्रीमती भावना खिलनानी व अनुमोदक श्री. सतरामदास जेसवानी आहे. सदरची लक्षवेधी सुचना त्यांनी मागे घेतली आहे.

__मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–__ दोन लक्षवेधी होत्या ना?

__मा. सचिव :–__ आधी तीन होत्या परंतु मागील सभेत दोन मागे घेण्यात आल्या. आता जी एक आहे ती पण मागे घेतली आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– विषयाला सुरुवात करण्यापुर्वी मी आयुक्त व महापौरांच्या निदर्शनास आणु इच्छितो की, आपल्या एक सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे पाण्याच्या समस्येसाठी व इतर कामासाठी आमरण उपोषणाला बसल्या आहेत. जेव्हा एखादा सामान्य नागरीक उपोषणाला बसतो त्यावेळी मा. महापौर, उपमहापौर किंवा आयुक्त साहेब त्यांना जावुन उठवतात. या महिला सदस्या आहेत त्यामुळे यांनाही उपोषणावरुन उठवायला हवे. तसेच त्यांची कामे देखील व्हायला हवेत. मग तो कोणत्याही पक्षाचा असो. यासाठी मा. महापौर व आयुक्तांनी त्यांच्या मागण्यांकडे लक्ष दयायला हवे. त्यांची कामे मंजुर झालेली आहेत. त्यामुळे ते व्हायला हवीत. त्यांची एकुण आठ कामे आहेत. जीजामाता उदयान व पाण्याची लाईन टाकणे अशा प्रकारची कामे आहेत.

मा. महापौर :– श्रीमती जयश्री सुर्वे यांनी त्यांचे निवेदन दिलेले आहे, मी आयुक्तांना, संबंधीत विभाग प्रमुखांना निवेदन करते की त्यांनी या प्रकरणात लक्ष घालुन जी कामे लवकरात लवकर करणे शक्य आहे ती लवकरात लवकर सुरु करावीत.

मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव :– मी नेहमी पाण्याच्या समस्येवर येथे बोलत असतो. परंतु अधिकारी वर्ग पाण्याचे नाव ऐकुनच कान व डोळे बंद करुन घेतात. त्यांना काही ऐकायलाच येत नाही. मी एक तारखेला पत्र दिले होते त्याची प्रत देखिल मी आणली आहे. आठ दिवसात पाण्याच्या समस्येवर मार्ग न निघाल्यास मलाही उपोषणाला बसावे लागेल. ५० वेळा पत्र दिले आहे व आयुक्तांनाही पत्र दिले आहे. आयुक्तांचे एकच आश्वासन असते की पैसे नाहीत. पैसे नाहीत तर जनता काय करेल? जनतेला तर पाणी हवे. पाणी नाही मिळाले तर कर काय भरतील? ज्यांना पाणी देवु शकत नाहीत त्यांची कर माफी करा. आमच्या येथे ५० लिटरच्या डब्यांमधुन पाणी आणले जाते. जर यावर काही मार्ग काढला नाही तर मला महापालिकेसमोर उपोषणाला बसावे लागेल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– महापौर महोदया, उपमहापौर महोदय याचा अर्थ आम्ही या आधी जे बोललो होतो ते योग्य होते हे स्पष्ट झाले आहे. एक नगरसेविका उपोषणाला बसल्या आहेत, दुसरे नगरसेवक बसणार आहेत. तरी देखिल आमचे सभागृह नेता व गटनेता म्हणतात की, सर्व काही आलबेल आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी असे बोललो नाही की, सर्वीकडे आलबेल आहे. मी असे बोललो की, माणसाने नेहमी काहीतरी शिकायला हवे. आज महापालिकेकडे एवढे पैसे नाहीत की, महापालिका स्वत: काही करु शकेल. यासाठी आर्थिक उदारवाद स्विकारुन तशी धोरणे आपल्याला अवलंबावे लागतील. मी माझ्या विचारावर आताही कायम आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:– शोले चित्रपटात धर्मेंद्रची शिष्टाई करण्यासाठी अमिताभ जातो. जरी तो दारु पितो, चरस खातो, जुगार खेळतो, कोठयावर जातो तरीदेखिल चांगला आहे. याचाच अर्थ उल्हासनगर पालिका खड्डयात गेली तरी चांगली आहे अशा प्रकारे आपण बोलत आहात. यासाठी आम्ही आपले अभिनंदन करतो. मा. महापौर महोदया, श्रीम. जयश्री सुर्वे व त्यांचे पती श्री. सुनिल सुर्वे कालपासुन आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांचा प्रशासनावर आरोप आहे की, २००३ पासुन जीजामाता उदयानाचे काम सुरु केले आहे परंतु ठेकेदाराने दोन लाख रुपये मागितले व ते दिले नाहीत म्हणुन त्यांनी काम बंद केले आहे. त्यांनतर त्यांच्या प्रभागात आठ कामे मंजुर झाले आहेत. परंतु कामे पुर्ण झाली नाहीत. म्हणुन ते उपोषणाला बसले आहेत. सभागृह नेता यांनी सांगितले की, महापालिकेची परिस्थिती चांगली आहे तर मी त्यांना विनंती करेन की, त्यांनी ती कामे त्वरीत सुरु करावीत.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :– मा. महापौर महोदया, मी पाण्याच्या विषयाबद्दल आज एक लक्षवेधी दिली आहे त्याचे काय झाले ते सांगावे.

मा. सचिव :–येथे दोन सुचना प्राप्त झाल्या आहेत. एक सुचना श्री. अशोक ठाकुर व श्री. गौतम भालेराव यांची आहे त्यांनी पाण्याची परिस्थिती खराब असल्याने त्याबाबत लक्षवेधी सुचना दिली आहे. परंतु ही स्थगित केलेली महासभा असल्याने यामध्ये लक्षवेधी दाखल करता येत नाही. त्यामुळे मा. महापौरांनी ती अस्विकृत केली आहे. दुसरी सुचना श्री. प्रमोद टाले यांनी दिली आहे. त्यांची सुचना अशी आहे की, या शहरातील रस्त्यांची अवस्था खराब झाली आहे. यामुळे त्यांना पाठदुखीचे दुखणे लागले आहे. ही सुचना महासभेसमोर आणण्यासाठी त्यांनी विनंती केली आहे. परंतु ही स्थगित महासभा असल्याने मा.महापौरांनी ती अस्विकृत केली आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २ :—** मागील महासभेचे दिनांक १९/११/२००५ रोजीचे (त्यात दि. १६/१२/२००५ व १९/१२/२००५) इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**मा. महापौर:—** मागील महासभेचे दिनांक १९/११/२००५ रोजीचे (त्यात दि. १६/१२/२००५ व १९/१२/२००५) इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

**मा. सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३ :—** मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेल्या माहे ऑक्टोबर २००५ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल व त्यात विधी अग्राहय प्रकरणी स्थायी समिती ठराव क्र. ५८, दिनांक २०/१२/२००५ अन्वये दिलेले आदेश कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**मा. महापौर:—**सदरचा विषय पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ३ :—** मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेल्या माहे ऑक्टोबर २००५ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल व त्यात विधी अग्राहय प्रकरणी स्थायी समिती ठराव क्र. ५८, दिनांक २०/१२/२००५ अन्वये दिलेले आदेश कायम करणे.

**प्रस्तावना:—**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे ऑक्टोंबर २००५ चा जमा खर्चाचा अहवाल.**

वित्तीय वर्ष २००५—२००६ च्या “अ” व “क” अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न व माहे ऑक्टोंबर २००५ मध्ये प्राप्त झालेले उत्पन्न हे पुढे दर्शविलिले आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रूपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | १२९,१९,९५,००० |
| “क” | ३३,६७,५५,००० |
| एकूण | १६२,८७,५०,००० |

अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित जमा रूपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | महसूल जमा | १४३,५०,३१,००० |
| २ | शासकीय अनुदान | ७,०९,००,००० |
| ३ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १२,११,५०,००० |

| | | |
|---|---|---|
| | एकूण | १६२,७०,८१,००० |
| | प्रारंभिक शिल्लक | १६,६९,००० |
| | एकुण :— | १६२,८७,५०,००० |

वित्तीय वर्ष २००५—२००६ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रूपये १४३,५०,३१,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे ऑक्टोंबर २००५ पर्यंत समप्रमाणात रूपये ८३,७१,०२,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रू. ४४,८५,२८,०००/— ( एकूण महसूल जमेच्या ३१. २५ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे ऑक्टोंबर २००५ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प "अ" | | अंदाजित | माहे ऑक्टोंबर २००५ पर्यंत अपेक्षित | प्रत्यक्ष जमा (रू. १०००/—पुर्णाकांत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जकात | ८०,५०,००,००० | ४६,९५,८३,००० | ३८,५१,०५,००० | ८२.०० |
| २ | मालमत्ता कर | २६,५२,००,००० | १५,४७,००,००० | २,२५,१७,००० | १४.५५ |
| ३ | एम्. आर. टी. पी. वसूली | ९९,१०,००० | ५७,८१,००० | ३३,४०,००० | ५७.७७ |
| ४ | मार्केट उत्पन्न | १०,००,००० | ५,८३,००० | — | — |
| ५ | रूग्णालय फी | ८५,००० | ५०,००० | ३२,००० | ६४.०० |
| ६ | परवाना व इतर फी | २,३३,३५,००० | १,३६,१२,००० | २६,७०,००० | १९.६१ |
| ७ | संकीर्ण | ९२,४६,००० | ५३,९४,००० | १,३८,३८,००० | २५६.५४ |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २,२४,५०,००० | १,३०,९६,००० | १३,२२,००० | १०.०९ |
| | एकूण—अ | १,१३,६२,२६,००० | ६६,२७,९९,००० | ४२,८८,२४,००० | ६४.६९ |
| | अर्थसंकल्प "क" | | | | |
| १ | पाणी बिले वसुली | २४,००,००,००० | १४,००,००,००० | १,४४,७४,००० | १०.३३ |
| २ | मालमत्ता कर | ५,४६,००,००० | ३,१८,५०,००० | ४५,३२,००० | १४.२२ |
| ३ | परवाना/इतर फी | ४१,०५,००० | २३,९५,००० | ६,७५,००० | २८.१८ |
| ४ | संकीर्ण | १,००,००० | ५८,००० | २३,००० | ३९.६५ |
| | एकुण "क" | २९,८८,०५,००० | १७,४३,०३,००० | १,९७,०४,००० | ११.३० |
| | एकुण "अ" व "क" | १,४३,५०,३१,००० | ८३,७१,०२,००० | ४४,८५,२८,००० | ५३.५८ |

"अ" व "क" अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रू. १,६२,८७,५०,०००/—(प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे ऑक्टोंबर २००५ मध्ये रू. ५०,१०,९४,५७२/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

**खर्च :—**

माहे एप्रिल २००५ ते ऑक्टोंबर २००५ या कालावधीमध्ये रू. ४६,९९,९५,७४०/— खर्च लेखांकित झालेला आहे.
खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकांचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजूरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदी अधिन आहे.

माहे ऑक्टोंबर २००५ ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे :— माहे ऑक्टोंबर २००५ मध्ये महापालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या/निधन पावलेल्या कर्मचा—यांची ४३ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निर्दशनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे :—

## मालमत्ता कर विभाग

विषय :— घरपट्टीची वसूल केलेली रक्कम रूपये ५३९७/—महापालिका कोषागारात जमा न केल्याबाबत.

कर विभागाचे सन २००४—२००५ चे लेखा परिक्षण केले असता, खालील कर्मचा—यांकडून रक्कम रूपये ५३९७/— (रूपये पाच हजार तीनशे सत्त्याण्णव फक्त) अपहार झाल्याचे दिसून आले आहे.

१) श्री. जी. आर. सावळे (लिपिक) याने घरपट्टी करापोटी रक्कम रूपये ८४५/—(रूपये आठशे पंचेचाळीस फक्त) पावती क्रमांक १७४३७३ दिनांक १४/०२/२००५ अन्वये स्वीकारली असून सदर रक्कम अद्याप महापालिका कोषागारात जमा केलेली नाही.

२) श्री. महेश उमाप (लिपिक) यांनी घरपट्टी करापोटी रक्कम रूपये २२४९/—(रूपये दोन हजार दोनशे एकोणपन्नास फक्त) पावती क्रमांक १४४६०९ दिनांक २८/०२/२००५ तसेच त्यांनी रक्कम रूपये २३०३/—(रूपये दोन हजार तीनशे तीन फक्त) पावती क्रमांक १९४६१८ दिनांक १७/०३/२००५ अन्वये संबंधित घरमालकाकडून वसूल केली आहे. तथापि सदर एकूण रक्कम रूपये ४५५२/—(रूपये चार हजार पाचशे बावन्न फक्त) अद्याप महापालिका कोषागारात जमा केलेली नाही. म्हणजेच सदर रक्कमेचा त्यांनी अपहार केल्याचे दिसून येते.

या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/करवि/लेपवि/असज्ञा/१२१/०५ दिनांक १३/१०/०५ अन्वये सदर बाब कर निर्धारक व संकलक व उप—आयुक्त (शहर) उल्हासनगर महानगरपालिका यांचे निर्दशनास आणून दिले असून सदर रक्कम संबंधित लिपिकाकडून तीन दिवसाचे आत वसूल करून महापालिकेच्या कोषागारात जमा करणे बाबत सूचना दिलेली आहे. तथापि अद्याप त्यांचेकडून कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन अहवाल लेखा परिक्षण विभागास प्राप्त झालेला नाही.

माहे फेब्रुवारी २००५ ते सप्टेंबर २००५ महापालिकेच्या सर्वसाधारण महासभेच्या विषय सूचिमध्ये समावेश न झालेल्या गंभीर बाबी बाबत:—

महापालिकेचा मागील महिन्याचा मासिक जमा खर्चाचा अहवाल पुढील महिन्यात दरमहा स्थायी समितीस सादर केला जातो. लेखा परिक्षण विभागाने लेखा परिक्षणामध्ये आढळलेल्या गंभीर बाबींचा सदर अहवालामध्ये वेळोवेळी समावेश केलेला आहे व सदर अहवालाच्या दोन प्रती दर महा स्थायी समितीस सादर केल्या आहेत. परंतु स्थायी समितीकडून त्यापैकी एक प्रत सचिव कार्यालयास प्राप्त न झाल्यामुळे सदर गंभीर बाबींचा समावेश महापालिकेच्या महासभेच्या सर्वसाधारण विषय सूचिमध्ये समावेश झालेला नाही. तरी कृपया सदर बाबींचा पुढील कार्यवाहीसाठी पुन्हा या अहवालात समावेश करण्यात येत आहे.

सदरच्या बाबी खालीलप्रमाणे :—

**माहे फेब्रुवारी २००५**

मालमत्ता कर विभाग

विषय :— रू.२३४०/— चा अपहार श्रीम. मीना शितलानी रोखपाल

आपल्या विभागाचे सन २००३—२००४ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षणाचे वेळी असे निदर्शनास आले की, श्री. अे. एच्. परमार यांनी दिनांक १८/६/०३ रोजी गोवर्धन प्रितम बॅरेक नं. ११७६, रू.नं. १८, शॉप नं. १, पवई चौक उ.न. ३ यांचे कडून पुस्तक क्रमांक ८६९ मधील पावती क्रमांक ०८६८४८ अन्वये रू.२३४०/— (रूपये दोन हजार तीनशे चाळीस फक्त) स्विकारून सदरची रक्कम त्यांनी त्याच दिवशी कर विभागातील रोखपाल श्रीम. मिना शितलानी यांचेकडे जमा करून स्वाक्षरी घेतल्याचे दिसत आहे. परंतु श्रीम. मिना शितलानी यांनी सदरची रक्कम रू.२,३४०/— ही महापालिका कोषागारात भरणा केलेली नाही. तरी सदर रकमेचा सुकृत दर्शनी अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी याबाबत योग्य ती शहनिशा करून खुलासा करावा. अन्यत: सदरची रक्कम संबंधितांकडून तात्काळ वसूल करून महापालिका कोषागारात जमा करून तसा अहवाल

लेखा परिक्षणास द्यावा. असे या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर विभाग/असज्ञा/११७/०५ दिनांक १७/०२/२००५ अन्वये कर निर्धारक व संकलक, उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि सदर प्रकरणी कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन अद्याप प्राप्त झालेले नाही.

विषय :— न वटलेल्या धनादेशाची रक्कम रू.३४४५/—खातेदाराकडून वसूल करणेबाबत.

आपल्या विभागाचे सन २००४—२००५ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करताना असे निर्देशनास आले की, खालील टॅक्स वसुली लिपिक यांनी खालील प्रमाणे मालमत्ता कराची रक्कम धनादेशाव्दारे स्विकारली असून सदर धनादेश न वटता परत येऊनही व त्याबदल्यात रोख रक्कम वसूल केलेली नसतानाही खातेदाराच्या खात्यावर सदर रक्कम जमा केल्याची संगणकांत नोंद घेतली आहे.

| अ.क्र. | पुस्तक क्रमांक | दिनांक | रक्कम | धनादेश क्रमांक व दिनांक | टॅक्स वसुली काराचे नांव | धनादेश न वटता परत आल्याची दिनांक | पावती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | १६४१ | ५/११/०४ | ३४४५ | ८१६१०३ | श्री. एम. एम. पंजाबी | ४/८/०४ | १६४०७१ |

तरी सदर रक्कम रू.३४४५/—(रूपये तीन हजार चारशे पंचेचाळीस फक्त) धनादेश वटलेला नसताना खातेदाराच्या खात्यावर संगणकामध्ये रक्कम जमा कशी केलेली दाखविली आहे, याचा खुलासा करावा. तसेच न वटलेल्या धनादेशाच्या बदल्यात रोख रक्कम संबंधित खातेदाराकडून तात्काळ वसूल का करण्यात आली नाही. याबाबत खुलाशासह रक्कम त्वरीत वसूल करून वसूलीचा अहवाल लेखापरिक्षण विभागास द्यावा. असे या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर विभाग/असज्ञा/११६/०५ दिनांक १७/०२/२००५ अन्वये कर निर्धारक व संकलक, उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आलेले आहे. तथापि त्यांच्याकडून कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

## माहे मार्च २००५

### कर विभाग

विषय :— श्री अशोक चांदवानी वसूली लिपिक कर विभाग यांनी अपहरित केलेली रक्कम रू. १३०००/— बाबत.

आपल्या विभागातील वसूली लिपिक श्री. अशोक चांदवानी यांनी पावती पुस्तक क्रमांक १६४० मधील पावती क्रमांक १६३९८१ दिनांक १६/०७/०४ अन्वये रू. १३०००/— (रू. तेरा हजार मात्र) खातेदार श्री. थारोमल डी. रोहरा (खाते क्रमांक वार्ड नं.३०/२५७७ अनुक्रमांक ३०/२३६८) यांचेकडून वसूल केली असून सदरच्या रकमेचा भरणा महानगरपालिका कोषागारात केलेला नाही.

त्यामुळे त्यांनी सदर रकमेचा कायमस्वरूपी अपहार केल्याचे दिसून येत आहे. तरी सदरची रक्कम संबंधितांकडून तात्काळ वसूल करून महापालिकेच्या कोषागारात जमा करावी.

तसेच सदर रकमेच्या अपहाराबदद्ल संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याबाबत अहवाल मा. आयुक्त यांना सादर करण्यात यावा व तसा अहवाल लेखा परिक्षण विभागास त्वरीत द्यावा. असे या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर विभाग/असज्ञा/११८/०५ दिनांक २६/०४/२००५ अन्वये कर निर्धारक व संकलक, उप—आयुक्त(शहर) उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

## माहे एप्रिल २००५

### पाणी पुरवठा विभाग

आक्षेप क्र. १ श्री. टी. एस्. राऊत(मजूर) यांनी पाणीपट्टी वसूलीची रक्कम रू.३५,२८५/— चा अपहार केल्याबाबत.

पाणी पुरवठा विभागाने श्री. टी. एस्. राऊत(मजूर) यांस पाणीपट्टी वसुली लिपिकाचे काम देण्यात आले होते. माहे मे २००२ ते माहे आक्टोबर २००३ या कालावधीत पाणीपट्टीच्या देयकापोटी जमा केलेल्या रकमेपैकी रक्कम रू.३५,२८५/—(रूपये पस्तीस हजार दोनशे पंच्याऐंशी फक्त) अद्याप श्री. राऊत यांनी महापालिका कोषागारात जमा केलेली नाही. त्यामुळे त्यांचेकडून सदर रक्कम एक रकमी वसूल करून महापालिका कोषागारात जमा करणेबाबत तसेच सदर रक्कम भरणा करीपर्यंतच्या कालावधीसाठी द.सा.द.शे. १८ टक्के दंडनिय व्याजाची वसूली त्यांच्याकडून करावी. तसेच सदर रकमेचा अपहार केल्याप्रकरणी त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी मा. आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव दाखल करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा. क्र.उमपा/लेपवि/१२६ दि.२९/४/२००५ अन्वये कार्यकारी अभियंता व उप अभियंता(देयक) पााणी पुरवठा विभाग यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

आक्षेप क्र. २ श्री. एन्.ए. डोंगरे(मजूर) पाणीपट्टी वसूलीची रक्कम विलंबाने भरल्यामुळे दंडनिय व्याजाची रक्कम रू.४७५०/— वसूल करणेबाबत.

पाणी पुरवठा विभागातील श्री. एन्. ए. डोंगरे(मजूर) यांनी माहे एप्रिल २००१ ते डिसेंबर २००१ या कालावधीत वसूल केलेल्या रक्कमा ७ ते १४ महिन्यानंतर महापालिका कोषागारात जमा केल्या आहेत.

वास्तविक पाहता श्री. डोंगरे यांनी पाणीपट्टी वसूलीच्या रकमा ज्या दिवशी वसूल केल्या त्याच दिवशी किंवा दुस—या दिवशी महापालिकेच्या कोषागारात जमा करणे आवश्यक होते. तथापि त्यांनी तसे न केल्यामुळे त्यांनी महापालिकेच्या रकमेचा तात्पुरत्या स्वरूपाचा अपहार केल्याचे दिसून येते. त्यामुळे विलंबाने भरणा केलेल्या रकमेवर द.सा.द.शे. १८ टक्के दराने व्याजाची रक्कम रू.४७५०/—(रूपये चार हजार सातशे पन्नास फक्त) त्यांच्याकडून वसूल करून महापालिका कोषागारात भरणा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र. उमपा/लेपवि/१२८/०५ दि.२९/४/२००५ अन्वये कार्यकारी अभियंता व उप अभियंता (देयक) पाणी पुरवठा विभाग यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

**माहे जुलै २००५**

## पाणी पुरवठा विभाग

मुद्दा क्र. १ :— पाणी पट्टी बिलाची रक्कम विलंबाने भरल्याने व्याजाची कमी वसूली केलेली रक्कम रूपये ७६,०९८/— वसूल करणे बाबत.

पाणी पुरवठा विभाग उल्हासनगर — ५ कार्यालयाचे सन २००२—२००४ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण केले असता असे निर्दशनास आले की, एकूण ८६ पाणीपट्टी बिल ग्राहकानी पाणीपट्टी बिलाची रक्कम विलंबाने भरल्यामुळे त्यांचेकडून दर साल दर शेकडा रूपये १८ टक्के दराने विलंबाच्या कालावधीची रक्कम रूपये ७६०९८/—(रूपये शहात्तर हजार अठ्ठयाण्णव फक्त) संबंधित वसूली लिपिकांनी वसूल केल्याचे दिसून येत नाही. तरी सदर रक्कम संबंधित ग्राहकाकडून वसूल करून महापालिका कोषागारात जमा करणेबाबत व संबंधित वसूली लिपिकांनी सदर रक्कम वेळीच वसूल का केली नाही याबाबतच्या खुलाशासह पुर्तता अहवाल सादर करणेबाबत या विभागाचे ज्ञापन जा.क्र. उमपा/लेपवि/पाणीपुरवठा विभाग/असज्ञा/१७५ /०५/दिनांक १६/७/२००५ अन्वये कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व उप अभियंता पाणीपुरवठा(देयक) यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

मुद्दा क्र. २ :— पाणीपट्टी बिलाची थकित रक्कम रूपये १,३१,२६९/— वसूल करणे बाबत.

सन २००२—२००४ या वित्तीय वर्षाचे पाणी पुरवठा विभाग, उल्हासनगर — ५, या कार्यालयाचे लेखा परिक्षण करतांना असे निर्दशनास आले की, माहे मार्च २००० नंतर पाणीपट्टी बिलाच्या रकमेचा समावेश घरपट्टीच्या बिलामध्ये झाल्यामुळे माहे मार्च २००० पर्यंतच्या पाणीपट्टीच्या संपूर्ण रक्कमा संबंधित ग्राहकाकडून वसूल करणे आवश्यक होते. तथापि एकूण ८५ पाणीपट्टी ग्राहकाकडून रूपये १,३१,२६९/—(रूपये एक लाख एकतीस हजार दोनशे एकोणसत्तर फक्त) इतकी रक्कम थकीत असल्याचे संबंधित ग्राहकाचे

संगणकीय खात्यावरून दिसून येते. तरी सदर थकित रक्कमांचे पाणीपट्टी ग्राहकांच्या घरपट्टी बिलामध्ये समायोजन करून वसूली का केली नाही. तसेच पाणीपट्टी बिलामध्ये थकीत रक्कमा न दर्शविता ग्राहकांना क्लिअर पावत्या कश्या देण्यात आल्या या बाबतच्या संबंधित वसूली लिपिकाच्या खुलाशासह सदर रक्कमा संबंधित ग्राहकाकडून द.सा.द.शे. १८ टक्के व्याज दराने वसूल करून महापालिका कोषागारात जमा करणेबाबतच्या खुलाशासह पुर्तता अहवाल सादर करणेबाबत या विभागाचे ज्ञापन क्र. उमपा/लेपवि/पाणी पुरवठा विभाग/असज्ञा/१७६/०५ दिनांक १६ जुलै २००५ अन्वये कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व उप अभियंता पाणी पुरवठा (देयक) यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

**माहे ऑगस्ट २००५**

## पाणी पुरवठा विभाग

१) उल्हासनगर शहराच्या स्वच्छता कार्यक्रमात बाधा आणणा—या व्यक्तींकडून वाहतूक खर्च व प्रशासकीय आकार रक्कम रू. २७,२५०/— कमी वसूल केले बाबत.

सन २००४—२००५ या वित्तीय वर्षाचे आरोग्य विभागाचे लेखापरिक्षण करतांना असे निर्दशनास आले की, मा. आयुक्त यांचा आदेश क्र. उमपा/आरोग्य/५०४ दिनांक २६ सप्टेंबर २००२ अन्वये शहराचे स्वच्छता कार्यक्रमात बाधा आणणा—या व्यक्तिकडून किमान व कमाल आकार वसूल करण्याची तरतुद केलेली आहे.

सदर आदेशास अनुसरून संबंधित प्रभागातील स्वच्छता निरीक्षकांनी स्वच्छतेस बाधा आणणा—या व्यक्तींकडून किमान आकार वसूल करणे अपेक्षित आहे. तथापि संबंधित स्वच्छता निरीक्षकांनी किमान रक्कमेपेक्षाही कमी रक्कम संबंधित व्यक्तिकडून वसूल केल्यामुळे महापालिकेच्या रू.२७,२५०/—(रूपये सत्तावीस हजार दोनशे पन्नास फक्त) इतक्या महसूलाचे नुकसान झाले आहे.

सबब किमान रक्कमेपेक्षा कमी भरून घेतलेली रक्कम संबंधित निरीक्षकांकडून वसूल करून महापालिकेच्या कोषागारात जमा करणेबाबत व दंडाची रक्कम कमी वसूल केल्याबाबतच्या त्यांच्या खुलाशासह वसूलीचा अहवाल लेखा परिक्षण विभागास कळविणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र. उमपा/लेपवि/आरोग्य विभाग/असज्ञा/६८/०५ दिनांक २३/०८/२००५ अन्वये उप—आयुक्त (आरोग्य विभाग) यांना कळविण्यात आले आहे. तथापि संबंधितांकडून वसूली केले बाबत कोणतीही कारवाई केल्याचे अनुपालन या विभागास अद्याप प्राप्त झालेले नाही.

स्थायी समिती ठराव क्र. ५८ — दिनांक:—२०/१२/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे माहे ऑक्टोबर २००५ पर्यंतचा महापालिका लेख्यांची छाननी व मुख्य लेखा परीक्षकांचा विधी अग्राहय प्रकरणी अहवालाचा विचार करुन उपरोक्त कर्मचा—यां विरुध्द् कारवाईच्या दृष्टीने खालील आदेश देत आहे.

१) महापालिका उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.
२) उपरोक्त कर्मचा—यांकडुन अपहार केलेल्या रकमेचा व्याजासह भरणा करुन घेण्यात यावा.
३) उपरोक्त कर्मचा—यांची त्वरित विभागीय चौकशी करण्यात यावी.
४) आयुक्तांना खात्री वाटल्यास आवश्यकतेनुसार दोषी कर्मचा—यांविरुध्द् पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात यावा.
५) मुख्य लेखा परिक्षकांनी सूचना दिल्यानंतरही ज्या विभागप्रमुखांनी दोषी कर्मचा—यांविरुध्द् काहीही कारवाई केलेली नाही अशा विभागप्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात यावी.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र: ७४ दिनांक:–८/२/२००६

सुचकाचे नाव :– श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेला माहे ऑक्टोबर २००५ पर्यंतचा जमा खर्च व त्यात विधी अग्राहय प्रकरणी अहवाला आधारे स्थायी समिती ठराव क्र. ५८, दि. २०/१२/२००५ अन्वये दिलेले आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ४:– विशेष समित्यांची रचना करणे.

---

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–मा. महापौर महोदया, हा जो विषय आहे याला मागील वर्षी देखिल शिवसेना व भाजपाने विरोध केला होता. या समित्यांमुळे महापालिकांचा काही एक विकास होत नाही. आताच सभागृहात विरोधी पक्षातील सदस्य व सत्तापक्षातील सदस्य पाण्यासाठी, रस्त्यांसाठी दु:खी आहेत असे दिसुन आले. ठेकेदाराने संप केला आहे. नगरसेविका उपोषणाला बसली आहे. असे वातावरण असतांना, शहराची अवस्था खराब असतांना, मा. आयुक्तांकडे एखादया ट्रस्ट साठी रुपये ११ हजार मदतीची मागणी केली असता त्यासाठी असमर्थता दर्शविण्यात येते. उल्हासनगरची तिजोरी खाली आहे. अशा परिस्थितीत समितीची रचना करणे चुकीचे होईल. त्यामुळे शिवसेना व भाजपाचा यासाठी विरोध आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–मा. महापौरजी, ज्या प्रभाग समित्या आहेत तेथे ब–याच दिवसांपासुन बैठका देखील होत नाहीत. प्रभाग समितीच्या बैठकीत सत्ताधारी पक्षातील सदस्य काही बोलु तरी शकतात येथे तर ते काहीच बोलु शकत नाहीत.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:–तुमची सगळी कामे झाली आहेत. पाण्यासाठी एक लाख मंजुर झाले आहेत. तुम्ही येथे खोटे बोलत आहात. तुमचे काम झाले आहे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत होते तेव्हा कोण काय बोलत आहे ते कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:— आता हे मध्ये—मध्ये का बोलत आहेत? महाबळेश्वरला हेच प्रशिक्षण घेवुन आले का? थायलंडला देखिल आता हेच शिकायला जाता काय? आम्ही विषय समित्यांच्या विरोधात आहोत. ज्या प्रभाग समित्या आहेत तेथे देखिल आमचे काम होत नाही. श्री. जमनादास पुरस्वानी हे त्याला साक्षी आहेत. त्यांना देखील विचारा.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत होते तेव्हा कोण काय बोलत आहे ते कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :— श्री. पुरस्वानी हे कधीही बैठकीला येत नाहीत. त्यांना विचारा ते कधी येतात का? ते जकातीचा धंदा करायला जातात. धुळयाला जातात.

मा. सचिव :— कोणत्या समितीवर कोणते सदस्य असतील याबाबतचा प्रस्ताव माझ्याकडे प्राप्त झाला आहे. मी सदस्यांची नावे वाचुन दाखवितो....... सार्वजनिक बांधकाम समिती ——
१. श्री. ईश्वर पमनानी २.श्री. सुर्यकांत लिंगे ३. श्री. नाना पवार ४. श्रीमती कोमल बठिजा

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—तुम्ही नावे वाचु नका, शिवसेना व भाजपाचा याला विरोध आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— आमचा याला विरोध आहे. तुम्हांला समित्या बनवुन काय लुटायचे असेल ते लुटा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— १९९७ ते ९९ मध्ये समित्या बनवुन तुम्ही लुटायचेच काम केले होते का? आणि जे पुरस्वानी आता म्हणत आहेत की, समित्या बनवु नका तर ९७ ते २००२ सलग पाच वर्ष ते सभापती म्हणुन काम करत होते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— त्यावेळी प्रभाग समित्या नव्हत्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—श्री. बोडारे, हे तीन वर्ष उपमहापौर म्हणुन कार्यरत असतांना त्यांनी देखिल वाहनभत्ता घेतलेला आहे. जमनुजी १०० उंदिर खाऊन मांजर तिर्थयात्रेला चालली असा हा प्रकार आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— त्यावेळी प्रभाग समित्या नव्हत्या. प्रभाग समित्या स्थापन झाल्यानंतर प्रभागांची कामे प्रभाग समितीतुन व्हायला हवी. परंतु येथे असे होत नाही.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :— तेथे सर्व कामे होतात तुम्ही येत नाहीत.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत होते तेव्हा कोण काय बोलत आहे ते कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— श्री. जमनादास पुरस्वानी हे येथे कधीच नसतात, ते जकातीच्या कामासाठी धुळयाला जातात.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, सभेचे कामकाज चालविण्याचा हा प्रकार चुकीचा आहे. आम्ही याचा निषेध करतो.

यावेळी शिवसेना व भाजपाच्या खालील सदस्यांनी सभात्याग केला.

१. श्रीमती सिमा मोकल
२. श्री. दिलीप गायकवाड
३. श्री. उमाप रामदास
४. श्रीमती नंदिनी बामणकर
५. श्रीमती प्रेमा खांडेकर

६. श्री. बच्चाराम रुपचंदानी
७. श्री. राज असरोंडकर
८. श्री. धनंजय बोडारे
९. श्री. जमनादास पुरस्वानी
१०. श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे
११. श्री. राजेंद्र चौधरी
१२. श्री. विश्वनाथ पाटील

मा. सचिव :— मी समिती सदस्यांची नावे वाचुन दाखवितो.

| १. सार्वजनिक बांधकाम समिती | | सदस्य |
|---|---|---|
| १. | श्री. ईश्वर पमनानी | सदस्य |
| २. | श्री. सुर्यकांत लिंगे | सदस्य |
| ३. | श्री. नाना पवार | सदस्य |
| ४. | श्रीमती कोमल बठिजा | सदस्या |
| ५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्य |
| ६. | श्रीमती मीनु राज दासानी | सदस्या |
| ७. | श्रीमती भावना रामचंदानी | सदस्या |
| ८. | श्री. विनोद ठाकुर | सदस्य |
| ९. | श्री. महेंद्र मुलचंदानी | सदस्य |

| २. नियोजन व विकास समिती | | सदस्य |
|---|---|---|
| १. | श्री. नारायण पंजाबी | सदस्य |
| २. | श्री. मोहनदास रामरख्यानी | सदस्य |
| ३. | श्री. होशियारसिंग लबाना | सदस्य |
| ४. | श्री. अंकुश म्हस्के | सदस्य |
| ५. | श्री. सुरेश जाधव | सदस्य |
| ६. | श्रीमती भावना खिलनानी | सदस्या |
| ७. | श्रीमती सुजाता रिजवानी | सदस्या |
| ८. | श्री. दर्शनसिंग खेमाणी | सदस्य |
| ९. | श्री. गोविंदराम लुंड | सदस्य |

| ३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती. | | सदस्य |
|---|---|---|
| १. | श्री. किशोर ना. वनवारी | सदस्य |
| २. | श्री. राजु जग्यासी | सदस्य |
| ३. | श्री. अंकुश म्हस्के | सदस्य |
| ४. | श्री. शाम बाबु वाघे | सदस्य |
| ५. | श्री. प्रभुनाथ गुप्ता | सदस्य |
| ६. | श्री. गौतम भालेराव | सदस्य |
| ७. | श्री. राज असरोंडकर | सदस्य |
| ८. | श्री. गणपत एडके | सदस्य |
| ९. | श्री. राजु टेकचंदानी | सदस्य |

| ४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती | | सदस्य |
|---|---|---|
| १. | श्रीमती दिपा पंजाबी | सदस्या |
| २. | श्री. चंदाराम मोकल | सदस्य |
| ३. | श्रीमती कोमल बठिजा | सदस्या |

४. श्री. मनोज साधवानी सदस्य
५. श्रीमती नीना नाथानी सदस्या
६. श्री. शांताराम निकम सदस्य
७. श्रीमती मिनु दासानी सदस्या
८. श्रीमती माया मसंद सदस्या
९. श्री. लालबिहारी यादव सदस्य

५. महिला व बालकल्याण समिती सदस्य

१. श्रीमती दीपा पंजाबी सदस्या
२. श्रीमती भारती छाब्रिया सदस्या
३. श्रीमती नीता अहुजा सदस्या
४. श्रीमती भावना रामचंदानी सदस्या
५. श्रीमती भावना खिलनानी सदस्या
६. श्रीमती कमला शर्मा सदस्या
७. श्रीमती रेखा कारीरा सदस्या
८. श्रीमती मालती करोतिया सदस्या
९. श्रीमती मीना सोंडे सदस्या

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती सदस्य

१. श्री. नाना पवार सदस्य
२. श्रीमती मालती करोतिया सदस्या
३. श्री. प्रभुनाथ गुप्ता सदस्य
४. श्रीमती नीना नाथानी सदस्या
५. श्रीमती मिना सोंडे सदस्या
६. श्री. अशोक ठाकुर सदस्य
७. श्री. विनोद ठाकुर सदस्य
८. श्री. सतरामदास जेसवानी सदस्य
९. श्री. प्रशांत जाधव सदस्य

७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती

१. श्री. महेंद्र मुलचंदानी सदस्य
२. श्रीमती मोना वनवारी सदस्या
३. श्रीमती. माया मसंद सदस्या
४. श्री. विनोद तलरेजा सदस्य
५. श्रीमती अनिता गुप्ता सदस्या
६. श्रीमती बेबी वसिटा सदस्या
७. श्री. अनिल जयसिंघानी सदस्य
८. श्री. सुर्यकांत लिंगे सदस्य
९. श्री. प्रमोद टाले सदस्य

८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्री. शांताराम निकम सदस्य
२. श्रीमती मोना वनवारी सदस्या
३. श्री. सुरेश गायकवाड सदस्य
४. श्री. राजू टेकचंदानी सदस्य
५. श्रीमती सुजाता रिजवानी सदस्या
६. श्री. राजु जग्यासी सदस्य
७. श्रीमती रेखा कारीरा सदस्या
८. श्री. श्यामसुंदर रोहडा सदस्य
९. श्री. मनोज साधवानी सदस्य

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर:—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

विषय क्र. ४:— विशेष समित्यांची रचना करणे.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्याचप्रमाणे ठराव करून आपल्या पालिका सदस्यामधून विशेष समित्या नियुक्त करता येतील. महापालिका स्थायी समिती परिवहन समिती इत्यादीचे कामकाज विषयक नियमातील नियम ४ (अ) अनुसार निम्नलिखित एक वा अधिक विशेष समित्या नियुक्त करता येतील.

१. सार्वजनिक बांधकाम समिती.
२. नियोजन व विकास समिती
३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती.
४. आरोग्य व परिरक्षण समिती
५. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती
६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती
७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
८. महिला व बालकल्याण समिती

दि. १५.५.९७ च्या महासभा ठराव क्र. ६ व्दारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित केले आहे. आणि अशा कोणत्याही क्षेत्रात समावेश केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमच समुचित समितीपुढे ठेवले जातील व ते अशा समितीच्या शिफारशीसह महासभेत येतील. यामुळे दि. २०/१/२००५ चा ठराव क्र. ६४ द्वारे वरील ८ समित्यांची रचना करण्यात आलेली असुन त्यांचा कालावधी दि. १९/१/२००६ रोजी संपुष्टात येत आहे. म्हणुन विशेष समित्यांची रचना करणेस महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ७५ दिनांक:—८/२/२००६

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

हि महासभा प्रत्येक विशेष समितीत ९ पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या पुढील आठ विशेष समित्यांची नेमणूक करित आहे.

| १. सार्वजनिक बांधकाम समिती | | सदस्य |
|---|---|---|
| १. | श्री. ईश्वर पमनानी | सदस्य |
| २. | श्री. सुर्यकांत लिंगे | सदस्य |
| ३. | श्री. नाना पवार | सदस्य |
| ४. | श्रीमती कोमल बठिजा | सदस्या |
| ५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्य |
| ६. | श्रीमती मीनु राज दासानी | सदस्या |
| ७. | श्रीमती भावना रामचंदानी | सदस्या |
| ८. | श्री. विनोद ठाकुर | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९. | श्री. महेंद्र मुलचंदानी | सदस्य |

**२. नियोजन व विकास समिती** **सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. नारायण पंजाबी | सदस्य |
| २. | श्री. मोहनदास रामरख्यानी | सदस्य |
| ३. | श्री. होशियारसिंग लबाना | सदस्य |
| ४. | श्री. अंकुश म्हस्के | सदस्य |
| ५. | श्री. सुरेश जाधव | सदस्य |
| ६. | श्रीमती भावना खिलनानी | सदस्या |
| ७. | श्रीमती सुजाता रिजवानी | सदस्या |
| ८. | श्री. दर्शनसिंग खेमाणी | सदस्य |
| ९. | श्री. गोविंदराम लुंड | सदस्य |

**३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती.** **सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. किशोर ना. वनवारी | सदस्य |
| २. | श्री. राजु जग्यासी | सदस्य |
| ३. | श्री. अंकुश म्हस्के | सदस्य |
| ४. | श्री. शाम बाबु वाघे | सदस्य |
| ५. | श्री. प्रभुनाथ गुप्ता | सदस्य |
| ६. | श्री. गौतम भालेराव | सदस्य |
| ७. | श्री. राज असरोंडकर | सदस्य |
| ८. | श्री. गणपत एडके | सदस्य |
| ९. | श्री. राजु टेकचंदानी | सदस्य |

**४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती** **सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १०. | श्रीमती दिपा पंजाबी | सदस्या |
| ११. | श्री. चंदाराम मोकल | सदस्य |
| १२. | श्रीमती कोमल बठिजा | सदस्या |
| १३. | श्री. मनोज साधवानी | सदस्य |
| १४. | श्रीमती नीना नाथानी | सदस्या |
| १५. | श्री. शांताराम निकम | सदस्य |
| १६. | श्रीमती मिनु दासानी | सदस्या |
| १७. | श्रीमती माया मसंद | सदस्या |
| १८. | श्री. लालबिहारी यादव | सदस्य |

**५. महिला व बालकल्याण समिती** **सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती दीपा पंजाबी | सदस्या |
| २. | श्रीमती भारती छाब्रिया | सदस्या |
| ३. | श्रीमती नीता अहुजा | सदस्या |
| ४. | श्रीमती भावना रामचंदानी | सदस्या |
| ५. | श्रीमती भावना खिलनानी | सदस्या |
| ६. | श्रीमती कमला शर्मा | सदस्या |
| ७. | श्रीमती रेखा कारीरा | सदस्या |
| ८. | श्रीमती मालती करोतिया | सदस्या |
| ९. | श्रीमती मीना सोंडे | सदस्या |

**६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती** **सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. नाना पवार | सदस्य |
| २. | श्रीमती मालती करोतिया | सदस्या |
| ३. | श्री. प्रभुनाथ गुप्ता | सदस्य |
| ४. | श्रीमती नीना नाथानी | सदस्या |
| ५. | श्रीमती मिना सोंडे | सदस्या |
| ६. | श्री. अशोक ठाकुर | सदस्य |
| ७. | श्री. विनोद ठाकुर | सदस्य |
| ८. | श्री. सतरामदास जेसवानी | सदस्य |
| ९. | श्री. प्रशांत जाधव | सदस्य |

७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. महेंद्र मुलचंदानी | सदस्य |
| २. | श्रीमती मोना वनवारी | सदस्या |
| ३. | श्रीमती. माया मसंद | सदस्या |
| ४. | श्री. विनोद तलरेजा | सदस्य |
| ५. | श्रीमती अनिता गुप्ता | सदस्या |
| ६. | श्रीमती बेबी वसिटा | सदस्या |
| ७. | श्री. अनिल जयसिंघानी | सदस्य |
| ८. | श्री. सुर्यकांत लिंगे | सदस्य |
| ९. | श्री. प्रमोद टाले | सदस्य |

८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शांताराम निकम | सदस्य |
| २. | श्रीमती मोना वनवारी | सदस्या |
| ३. | श्री. सुरेश गायकवाड | सदस्य |
| ४. | श्री. राजू टेकचंदानी | सदस्य |
| ५. | श्रीमती सुजाता रिजवानी | सदस्या |
| ६. | श्री. राजु जग्यासी | सदस्य |
| ७. | श्रीमती रेखा कारीरा | सदस्या |
| ८. | श्री. श्यामसुंदर रोहडा | सदस्य |
| ९. | श्री. मनोज साधवानी | सदस्य |

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५:—** निवड समितीच्या शिफारसीनुसार श्री दत्तात्रय बाजीराव जाधव यांच्या ''वरिष्ठ लिपीक'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे

———————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास......

**मा. महापौर :—**सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. ५:—** निवड समितीच्या शिफारसीनुसार श्री दत्तात्रय बाजीराव जाधव यांच्या ''वरिष्ठ लिपीक'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर वरिष्ठ लिपिक या संवर्गाची एकूण २५ पदे मंजुर आहेत. सेवाभरती नियमाप्रमाणे सरळसेवेने ०६ पदे व पदोन्नतीने १९ पदे भरावयाची आहेत. सरळसेवेने भरावयाच्या ०६ पदांपैकी ०३ पदे आरक्षणाची व ०३ पदे खुल्या प्रवर्गासाठी आहेत. खुल्या प्रवर्गातील ०३ पदे रिक्त आहे. आणि आरक्षणाची ०३ पदे भरलेली आहेत. अशाप्रकारे वरीष्ठ लिपिक या संवर्गातील २५ पदांपैकी १८ पदे कार्यरत आहेत. ही बाब विचारात घेवून खुल्या प्रवर्गातील ०३ रिक्त पदांपैकी ०१ पदावर श्री. दत्तात्रय बाजीराव जाधव, प्रकल्पग्रस्त उमेदवार हे लिपिक या पदाची सेवाभरती नियमावलीतील अर्हता धारण करीत असल्याने त्यांची का. आ. क्र. उमपा/साप्रवि/प्र.क्र. ३४/५७/०५, दिनांक २७/१/२००५ अन्वये ६ महिन्याच्या कालावधीसाठी वरीष्ठ लिपिक या मंजुर व रिक्त पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाचे दिनांक ३ जानेवारी, १९९७ च्या परिपत्रकामध्ये प्रकल्पग्रस्त उमेदवारांना वर्ग क व ड संवर्गात परस्पर नियुक्ती देतांना एकूण संवर्ग बळाच्या ५ टक्के इतकी पदे भरता येईल, असे निर्देश दिलेले आहेत.

सदर शासन परिपत्रकातील तरतुदीच्या अनुषंगाने श्री. दत्तात्रय बाजीराव जाधव यांनी ६ महिन्याच्या कार्यालयीन सेवेत समाधानकारक काम केले असल्याने कामाची निकड हा निकष लक्षात घेवून त्यांना रुपये ४०००—१००—६००० या वेतनश्रेणीत (अधिक नियमानुसार मिळणारे इतर भत्ते) वरीष्ठ लिपिक या मंजुर व रिक्त पदावर नियमित नियुक्तीसाठी २ वर्षाच्या परिवीक्षाधीन कालावधीसाठी नियुक्ती करण्यात येईल.

सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) मधील तरतुदीनुसार मा. महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

**महासभा ठराव क्र:** ७६ **दिनांक:—८/२/२००६**

सुचकाचे नाव :— श्री. मोहनदास रामरख्यानी
अनुमोदकाचे नाव :— श्रीम. कोमल बठिजा

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार निवड समितीच्या शिफारसीनुसार श्री दत्तात्रय बाजीराव जाधव यांच्या ''वरिष्ठ लिपीक'' या पदावरील नियुक्तीस २ वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीस अधिन राहुन मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

**विषय क्र. ६ :—श्रीमती वैशाली वामन काथार यांना अनुकंपा तत्वावर ''लिपिक'' पदावर नियुक्ती देणे.**

---

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u>मा. महापौर महोदया, यांच्या पतीचे लेप्टोने निधन झाले होते त्यामुळे त्यांना इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता त्वरीत कामावर घेतले जावे.

<u>मा. महापौर :—</u>पैश्यांचा प्रश्न असता तर आपण इतिवृत्त कायम होण्याची वाट पाहिली नसती परंतु हा नियुक्तीचा प्रश्न असल्याने इतिवृत्त कायम होणे आवश्यक आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—</u> मा. महापौरजी, अनुकंपा तत्वावरची सुमारे २१ प्रकरणे प्रलंबित आहेत.

<u>मा. महापौर :—</u> हा वेगळा विषय आहे. तुम्ही जे म्हणत आहात ते देखिल पुढील बैठकीत येणार आहे. हे अधिकारी नव्याने महापालिकेत आले होते व पुराच्या काळात काम करतांना त्यांचे निधन झाले होते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> या आधी नर्स नियुक्त करण्याचा प्रस्ताव देखील पुढे ढकलला होता तो देखिल पुन्हा आणावा.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. महापौर :—</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ६ :—श्रीमती वैशाली वामन काथार यांना अनुकंपा तत्वावर ''लिपिक'' पदावर नियुक्ती देणे.**

<u>प्रस्तावना</u>

दि २६ व २७ जूलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टी व त्यामुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे उल्हासनगर शहरातील बहुतांश भागात (३.१९ चौ.कि.मी.) पुराचे पाणी शिरून अनेकांची घरे उध्द्वस्त होवून मोठया प्रमाणात जिवीत व वित्त हानी झालेली होती. तसेच विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा, वाहतूक व्यवस्था ही पूर्णपणे बाधीत होवून शहरातील सर्व उद्योग धंदे व व्यवहार ठप्प झाले होते. नैसर्गिक आपत्तीमुळे पाणी पुरवठा वितरण व्यवस्था पूर्णपणे कोलमडून गेल्याने नागरिकांचे अशुध्द पाण्यामुळे हाल होत होते.

सदर कालावधीत उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे नैसर्गिक आपत्तीवर उपाय योजना करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला होता. अशा भयंकर नैसर्गिक आपत्तीच्यावेळी कै. वामन बी. काथार, शाखा अभियंता यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून बचाव कार्य केले व पूरात अडकलेल्या अनेक नागरिकांना वाचविण्यास मदत केली तसेच पाणी पुरवठा बंद असलेल्या विभागातील नागरिकांना टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे कामी मोलाचे योगदान दिले. त्यामुळे सदर विभागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय झाली. तसेच ज्या विभागात पुराच्या दुषीत पाण्यामुळे साथीच्या रोगांची लागण होण्याची शक्यता होती अशा विभागातून पिण्याचे पाण्याचे सूक्ष्मजीविय तपासणी केल्याने अनेक नागरिकांना होणारी साथीच्या रोगाची लागण संभाव्य जिवीत हानी टाळता येणे शक्य झाले . तसेच नागरिकांना जलवाहिनीद्वारे सुरळीत पाणी पुरवठा होण्यासाठी वरिष्ठांचे आदेशानुसार सतत अहोरात्र कठोर परिश्रम घेवून जिवाची पर्वा न करता काम केल्याने शहराचा पाणी पुरवठा दोन दिवसांत सुरळीत झाला त्यातही कै. वामन बी. काथार यांचा मोलाचा वाटा आहे.

कै. काथार, शाखा अभियंता यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता स्वत:ला झोकुन देवुन केलेले काम वाखाणण्याजोगे आहे. हे काम करत असतांना त्यांचा झालेला मृत्यु ही बाब दुर्देवी असून सदर आपत्कालीन परिस्थितीत कर्तव्य बजावत असतांना झालेल्या मृत्युमुळे कै. काथार यांच्या कुटुंबियांना मोठा आघात झालेला आहे. सदर पुरपस्थितीदरम्यान शासनाने मृत व्यक्तींना मदत करुन भरीव मदत केली आहे. या अनुषंगाने त्यांच्या वारस कुटंबियांना मदत देणे व भविष्यात त्यांच्या कुटंबियांची हेळसांड व वाताहात होवू नये म्हणून मानवतेच्या दृष्टीने उल्हासनगर महानगरपालिकेत त्यांच्या पत्नी श्रीमती वैशाली वामन काथार यांना लिपिक पदावर नोकरी देणे बाबतच्या प्रस्तावास विशेष बाब म्हणून मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ७७ दिनांकः–८/२/२००६

सुचकाचे नाव :– श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीम. मिनु दासानी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरात दिनांक २६ व २७ जुलै २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पुर परिस्थितीत कर्तव्य बजावत असताना मृत्युमुखी पडल्याने कै. वामन काथार, शाखा अभियंता यांची पत्नी श्रीमती वैशाली वामन काथार यांना मानवतेच्या दृष्टीकोनातुन विशेष बाब म्हणुन अनुकंपा तत्वावर महापालिका सेवेत ''कनिष्ठ लिपिक'' या पदावर नियुक्तीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७:–** विद्युत विभागातील निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेकामी मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

मा. महापौर :–सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. ७:–** विद्युत विभागातील निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेकामी मान्यता देणे.

प्रस्तावना

विद्युत विभागा मार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यासाठी जनसंर्पक कार्यालया मार्फत वर्तमान पत्रात निविदा सुचना देउन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

त्यांच्या प्रतिसादात श्री. राधेश्याम पांडे, श्री. सलीम ाहा, श्री. अंनवर हसन खांन, श्री. अहमद शेख, श्री. साले शेख, मे. पदमावती मेटलस, मे. अवध असोसियटस, श्री. अकबर अली हुसेन, मे. मयुर वेस्ट पेपर मर्चनट, मे. कसन अली व कॉ., मे. तब्बब हुसेन सॅक्रप टेडुर्स, श्री. महारा ट्र टायर सर्व्हस, मे. नसीबदार मुसेब व कॉ., श्री. रामनारायण पांडे, मे. साईनाथ इंटरप्राझेस, मे. गुलशन स्टील, मे. एच. बी. एम. टेडर व मे. नाज ट्रेडींग कां. यांनी कोरे निविदा चे कोरे प्रपत्र खरेदी केले

सदर निविदा इशारा रक्कमे सह सादर करण्याची मुदत ५/१२/०५ रोजी सायकाळी ५.०० वाजे पर्यंत होती, ३ निविदा धारकांनी इशारा रक्कमे सह सिलबंद निविदा सादर केल्या व ते दिनांक ५/१२/०५ रोजी सांयकाळी ५.३० वाजता उघडण्यात आल्या त्यांच्या तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

**COMPERATIVE STATEMENT**

| Sr. No. Umc /Secretary/ /05 | Description of Unserviceable articles | Unit | Approx Qty. | Expected cost<br>Per Unit in Rs. | Shri. R.N. Pandey<br>Per Unit in Rs. | M/s. Sainath Enterprises Per Unit in Rs. | Shri. Ahmed Shaikh<br>Per Unit in Rs. | Amount of Highest Rate x Qty.<br>in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ४० वॉ. कॉपर चोक | २०० नग | २०० नग | १५.९२ प्रति नग | 12 | 17 | 20.55 | 4110.00 |
| २. | ४० वॉ. टयुब लाईट | १६५० नग | १६५० नग | ३.७५ प्रति नग | 1.50 | 1.10 | --- | 2475.00 |
| ३. | २५० वॉ. सोडियम चोक | ४६० नग | ४६० नग | १२०.०१ प्रति नग | 130 | 127 | 125.11 | 59,800.00 |
| ४. | २५० वॉ. सोडियम बल्ब | ६७५ नग | ६७५ नग | ४१.०१ प्रति नग | 20 | 42 | --- | 28,350.00 |
| ५. | १०० अॅ. कटाउट बेस फक्त | ४०० नग | ४०० नग | ८.०१ प्रति नग | --- | 2 | 9.05 | 3,620.00 |
| ६. | २५० वॉ. होल्डर | २०० नग | २०० नग | २.०१ प्रति नग | --- | 0.50 | --- | 100.00 |
| ७. | इगनीटर | १३५० नग | १३५० नग | २.०१ प्रति नग | ____ | 1 | ____ | 1350.00 |
| ८. | २५० वॉ सोडियम कॅप फक्त | १०० नग | १०० नग | ५.०१ प्रति नग | --- | 3 | 5-11 | 511.00 |
| ९. | बंद झालेली खिडकी वातानुकुलित यंत्र | २ नग | २ नग | ६००.०० प्रति नग | 700 | 6 | 915-00 | 1830.00 |
| १०. | अल्युमिनियम सॅक्रप (शिट व कास्टींग मिक्स) | ३५० कि. | ३५० कि. | ७६.१४ प्रति नग | 70 | 60 | 70.15 | 24552.50 |
| ११. | अल्युमिनियम केबल / वायर | २५० कि. | २५० कि. | २५.०१ प्रति कि. | 28 | 27 | 28-05 | 7012.5 |
| १२. | जी. आय/ लोखंड सॅक्रप (मिक्स) | ५०० कि. | ५०० कि. | १३.२० प्रति कि. | 11 | 10 | 12.00 | 6000.00 |
| १३. | टयुब स्टारटर्स | ३००० नग | ३००० नग | ०.१२ प्रति नग | --- | 0.13 | --- | 390.00 |
| १४. | टयुब साईड होल्डर्स | १०५० नग | १०५० नग | ०.१० प्रति नग | --- | 0.10 | --- | 105-00 |
| १५. | टयुब लाईट कॅप | ७५० नग | ७५० नग | ०.१० प्रति नग | --- | 0-05 | --- | 375-00 |
| १६. | जुने पंखे | १५ नग | १५ नग | २०१.०० प्रति नग | 201 | 205 | 210 | 3150 |
| १७. | जुने टेलीफोन संच | ५० नग | ५० नग | २१.२१ प्रति नग | --- | 21-00 | --- | 1050 |
| | | | | एकूण —— | | | | 144781 |

सदर तुलनात्मक तक्त्या नुसार ——

| Name of Agency | Item No. for which agency is highest & also equal to or above expected cost | Item No. for which agency is highest but less than expected cost |
|---|---|---|
| Shri. R.N. Pandey | 3 | 2 |
| M/s. Sainath Enterprises | 4,13 & 14 | 6,7,15 & 17 |
| Shri. Ahmed Shaikh | 1,5,8,9,11 & 16 | 10 & 12 |

वरील तक्त्या प्रमाणे अॅटम क्रं. २ मध्ये श्री. राम नायरण पांडे याचे दर सर्वाधिक असून, अॅटम क्रं. ६,७,१५ व १७ मध्ये मे. साईनाथ इन्टरप्राझेस याचे दर सर्वाधिक असून आणि अॅटम क्रं. १० व १२ मध्ये श्री. अहेमद शोख याचे दर सर्वधिक असून ही आपल्या ठरवलेल्या दरा पेक्षा कमी आहे त्या मुळे त्यांना सदर अॅटमच्या दर वाढवण्या साठी सांगण्यात आले.

वाटाघाटी नंतर मे. श्री. राम नारायण पांडे, यांनी अॅटम क्रं. २ – रु. १.५० चे वाढवून रु.३.७५ दिले आहे.

श्री. अहमद शेख यांनी असे लिहुन दिलेले आहे की अॅटम क्र. १० व १२ मध्ये तो दर कुढले ही दर वाढवून देवू शक्त नाही.

तसेच मे. साईनाथ इन्टरप्राझेस यांना ही अॅटम क्र. ६,७,१५ व १७ मध्ये दर वाढवून देण्याचे नकारले आहे.

वरील बाबी लक्षात घेता अॅटम क्र. ६,७,१०,१२,१५ व १७ या साठी तीन ही निविदाधारका कडून बंद लखोटया सुधरित देण्या साठी विचारण्यात आले.

तीनही निविदाघारकांना सुधारित दर बंद लखोटयात देण्या साठी पत्र क्रमांक २/१५४ दिनांक १२/१२/०५ रोजी देण्यात आला. सुधारित दर देण्याची शेवटची तारीख २३/१२/०५ होती. तो पर्यंत फक्त श्री. अहमद शेख व श्री. आर. एन पांडे यांनी ही सुधारित दर सादर केले व ते लाखोटे दिनांक २७/१२/०५ रोजी सकाळी ११.३० वाजता उघाडण्यात आले. त्याचे सुधारित दर पुढील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Description of Unserviceable articles | Unit | Approx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | Shri. R.N. Pandey | Shri. Ahmed Shaikh | M/s. Sainath Enterprises |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | २५० वॉ. होल्डर | नग | २०० नग | २.०१ प्रति नग | २.०२ | No Bid | यांनी सुधारित दर सादर केले नाही |
| ७. | इगनीटर | नग | १३५० नग | २.०१ प्रति नग | २.०२ | No Bid | |
| १०. | अल्युमिनियम सॅक्रप (शिट व कार्स्टीग मिक्स) | कि. | ३५० कि. | ७६.१४ प्रति नग | ७६.१५ | ७०.१५ | |
| १२. | जी. आय/ लोखंड सॅक्रप (मिक्स) | कि. | ५०० कि. | १३.२० प्रति कि. | १३.२१ | १२.०० | |
| १५. | टयुब लाईट कॅप | नग | ७५० नग | ०.१० प्रति नग | ०.११ | No Bid | |
| १७. | जुने टेलीफोन संच | नग | ५० नग | २१.२१ प्रति नग | २१.२२ | No Bid | |

वरील सुधारित दर मिळाल्या नंतर निविदाचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Description of Unserviceable articles | Unit | Approx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | Shri. R.N. Pandey Per Unit in Rs. | M/s. Sainath Enterprises Per Unit in Rs. | Shri. Ahmed Shaikh Per Unit in Rs. | Amount of Highest Rate x Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ४० वॉ. कॉपर चोक | नग | २०० | १५.९२ प्रति नग | 12 | 17 | **20.55** | 4110.00 |
| २. | ४० वॉ. टयुब लाईट | नग | १६५० | ३.७५ प्रति नग | **3.75** | 1.10 | --- | 61,87.50 |
| ३. | २५० वॉ. सोडियम चोक | नग | ४६० | १२०.०१ प्रति नग | **130** | 127 | 125.11 | 59,800.00 |
| ४. | २५० वॉ. सोडियम बल्ब | नग | ६७५ | ४१.०१ प्रति नग | 20 | **42** | --- | 28,350.00 |
| ५. | १०० अॅ. कटाउट बेस फक्त | नग | ४०० | ८.०१ प्रति नग | --- | 2 | **9.05** | 3,620.00 |
| ६. | २५० वॉ. होल्डर | नग | २०० | २.०१ प्रति नग | **2.02** | 0.50 | --- | 404.00 |
| ७. | इगनीटर | नग | १३५० | २.०१ प्रति नग | **2.02** | 1 | --- | 2727.00 |

| Sr. No. | Description of Unserviceable articles | Unit | Approx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | Shri. R.N. Pandey Per Unit in Rs. | M/s. Sainath Enterprises Per Unit in Rs. | Shri. Ahmed Shaikh Per Unit in Rs. | Amount of Highest Rate x Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | २५० वॉ सोडियम कॅप फक्त | नग | १०० | ५.०१ प्रति नग | --- | 3 | **5.11** | 511.00 |
| ९ | बंद झालेली खिडकी वातानुकुलित यंत्र | नग | २ | ६००.०० प्रति नग | 700 | 6 | **915.00** | 1830.00 |
| १०. | अल्युमिनियम सॅक्रप (शिट व कास्टींग मिक्स) | कि. | ३५० | ७६.१४ प्रति नग | **76.15** | 60 | 70.15 | 26652.50 |
| ११. | अल्युमिनियम केबल / वायर | कि. | २५० | २५.०१ प्रति कि. | 28 | 27 | **28.05** | 7012.5 |
| १२. | जी. आय/ लोखंड सॅक्रप (मिक्स) | कि. | ५०० | १३.२० प्रति कि. | **13.21** | 10 | 12.00 | 6605.00 |
| १३. | टयुब स्टारटर्स | नग | ३००० | ०.१२ प्रति नग | --- | **0.13** | --- | 390.00 |
| १४. | टयुब साईड होल्डर्स | नग | १०५० | ०.१० प्रति नग | ... | **0.10** | --- | 105.00 |
| १५. | टयुब लाईट कॅप | नग | ७५० | ०.१० प्रति नग | **0.11** | 0.05 | --- | 82.50 |
| १६. | जुने पंखे | नग | १५ | २०१.०० प्रति नग | 201 | 205 | **210** | 3150.00 |
| १७. | जुने टेलीफोन संच | नग | ५० | २१.२१ प्रति नग | **21.22** | 21.00 | --- | 1061.00 |
| | एकूण –– | | | | | | | 152598.00 |

सदर सुधारित दराचा तुलनात्मक तक्ता नुसार मे. राम नारायण पांडे अॅटम क्रमांक २,३,६,७,१०,१२,१५ व १७ मध्ये सर्वात जास्त व अपेक्षीत दरा पेक्षा ही सर्वात जास्त आहे, मे. अहमद शेख अॅटम क्रमांक १,५,८,९,११ व १६ मध्ये सर्वात जास्त व अपेक्षीत दरा पेक्षा ही सर्वात जास्त आहे व मे. साईनाथ एटरप्राईस अॅटम क्रमांक ४,१३ व १४ मध्ये सर्वात जास्त व अपेक्षीत दरा पेक्षा ही सर्वात जास्त आहे.

वरील बाबी लक्षात घेता ज्या अॅटम मध्ये ज्याचे दर जास्त आहे ते अॅटम त्यांना उपलब्ध परिमाण व मार्च २००६ आखीर पर्यंत जमा होणा–या परिमाण विलेवाट करणेस मान्यता मिळण्या करीता मा. महासभाच्या मंजुरी साठी सादर.

महासभा ठराव क्र: ७८ दिनांक:–८/२/२००६

सुचकाचे नाव :– श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती निता अहुजा

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार महापालिकेच्या विद्युत विभागातील निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेकामी प्रशासनास बाब क्र. २,३,६,७,१०,१२,१५ व १७ साठी उच्चतम दराचे निविदाकार मे. राम नारायण पांडे, बाब क्रमांक १,५,८,९,११ व १६ साठी उच्चतम दराचे निविदाकार मे. अहमद शेख व बाब क्रमांक ४, १३ व १४ साठी उच्चतम दराचे निविदाकार मे. साईनाथ एटरप्राईस यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र.** ८:–संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान राबविणे व गुणानुक्रमे बक्षिस देणे मान्य करणे.

---

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :–मा. महापौर, मागच्या वर्षी स्वच्छता अभियाना अंतर्गत आमच्या प्रभागाला बक्षिस मिळाले होते त्याचे पुढे काय झाले? त्याची कल्पना दिली तर बरे होईल.

मा. महापौर :–संबंधीत अधिकारी श्री. लोणारे साहेब यांची बदली झाली असल्याने नविन अधिका–यांना याची कल्पना नाही तुम्ही त्यांना नंतर भेटुन माहिती घ्या.

काही सदस्य :–पास–पास......

मा. महापौर :–सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र.** ८:–संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान राबविणे व गुणानुक्रमे बक्षिस देणे मान्य करणे.

प्रस्तावना

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अभियान–२००३/प्र.क्र.१८/पा.प १.२१, दिनांक २४ डिसेंबर, २००३ नुसार नागरी स्वच्छतेच्या कार्यक्षेत्रातउत्कृष्ट कार्य करणा–या महानगरपालिका व नगरपालिकांना प्रोत्साहन मिळावे व त्यायोगे नागरी स्वच्छतेच्या कार्यास चालना मिळावी. या दृष्टीकोनातुन दरवर्षी राज्यातील नागरी भागात दरवर्षी दिनांक १४ नोव्हेंबर पासुन संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान राबविण्यास सुरवात झाली.

दरवर्षी दिनांक १४ नोव्हेंबर पासुन संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान व पंडीत जवाहरलाल नेहरू स्वच्छ शहर स्पर्धा उपरोक्त संदर्भित शासन निर्णयाच्या आधारे या महापालिकेत राबविली जाते. महानगरपालिकेसाठी या स्पर्धेसाठी चार फे–या घेण्यात येतात. त्यापैकी महापालिकास्तरावर पहिली व दुसरी फेरी घेवुन त्यामधुन फेरीनिहाय प्रशासकिय वॉर्डातुन स्वच्छ प्रशासकिय वॉर्डांची बक्षिसाठी निवड करावयाची आहे.

पहिली फेरी:–

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानाअंतर्गत महापालिका स्तरावर होणा–या पहिल्या फेरीसाठी प्रत्येक प्रभाग समितीतुन गुणानुक्रमे रोख रक्कमेची दोन बक्षिसे प्रथम व द्वितीय क्रमांकासाठी देण्यात येतील ती खालिलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

**१ ले बक्षिस –– रू. २ लाख –– ४ प्रभाग समिती वॉर्डांना २ लाख प्रमाणे ८ लाख रूपये.**
**२ रे बक्षिस –– रू. १ लाख –– ४ प्रभाग समिती वॉर्डांना १ लाख प्रमाणे ४ लाख रूपये.**

अशाप्रकारे एकुण १२ लाख रूपये पहिल्या फेरीसाठी मंजुरी देण्यात यावी.

दुसरी फेरी:–

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानाअंतर्गत महापालिका स्तरावर होणा–या पहिल्या फेरीतुन प्रत्येक प्रभाग समितीतुन गुणानुक्रमे प्रथम क्रमांकासाठी निवड झालेल्या प्रत्येकी चार वॉर्डासाठी महापालिका स्तरावर दुसरी फेरी घेण्यात येईल. व या चार प्रभागसमितीतील प्रथम क्रमांकाच्या वॉडामधुन दुस–या फेरीतुन गुणानुक्रमे रोख रक्कमेची तीन बक्षिसे प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी देण्यात येतील ती खालिलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१ ले बक्षिस ––– रू. ३ लाख
२ रे बक्षिस ––– रू. २ लाख
३ रे बक्षिस ––– रू. १ लाख

उपरोक्त रक्क्म संबंधित प्रभाग समिती वॉर्डातील नागरी सुविधांवर खर्च करावयाची असुन बक्षिसाच्या रक्कमेचा विनियोग कशाप्रकारे करावयाचा आहे याबाबत स्थायी समितीमध्ये निर्णय होईल त्याप्रमाणे संबंधित प्रभागसमिती अधिकारी यांनी बक्षिसाच्या रकमेचा विनियोग करावयाचा आहे. तसेच ज्या प्रभाग समितीच्या वॉर्डात बक्षिसे मिळतील त्या वॉर्डातील सर्व नगरसेवक व स्वच्छता निरीक्षक यांना प्रमाणपत्र देण्यात यावे. असे महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे

<u>महासभा ठराव क्र:</u> ७९ <u>दिनांक:–८/२/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. होशियारसिंग लबाना

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती भारती छाब्रिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत महापालिका स्तरावर होणा–या पहिल्या व दुस–या फेरीतुन गुणानुक्रमे महापालिका निधीतुन उल्लेखलेल्या बक्षिसांच्या रोख रकमेच्या विनियोगास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९:–** श्री.प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव यांना अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवणेकामी *'Procedure Manual for Check and Control Over Unauthorised Constructions"* या शिर्षकाखाली पुस्तक प्रसिध्दीसाठी व त्याबद्दल पारिश्रमीक स्विकारण्यास अनुमती देणे.

---

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u>मा. महापौरजी, उपमहापौरजी, मी याबद्दल श्री. प्रकाश कुकरेजा यांचे अभिनंदन करतो.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>मा. महापौर :–</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ९:–** श्री.प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव यांना अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवणेकामी *"Procedure Manual for Check and Control Over Unauthorised Constructions"* या शिर्षकाखाली पुस्तक प्रसिध्दीसाठी व त्याबद्दल पारिश्रमीक स्विकारण्यास अनुमती देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव यांनी अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी *च्तवबमकनतम डंदनंस वित बीमबा ंदक ब्वदजतवस वअमत न्दंनजीवतपेमक ब्वदेजतनबजपवदे* या शिर्षकाखाली एक पुस्तक लिहिले आहे. सदरहु पुस्तक प्रसिध्द करण्यासाठी श्री.कुकरेजा यांनी महापालिकेकडे परवानगी मागितलेली आहे. सदर पुस्तकाच्या प्रकाशनानंतर त्यापोटी त्यांना जी रॉयल्टी किंवा आर्थिक लाभ होईल त्यासाठी महानगरपालिकेची परवानगी आवश्यक आहे.

सदरहु पुस्तक महाराष्ट्रातील सर्व नगरपालिकांना व महानगरपालिकांना त्यांच्या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर कायद्याच्या चौकटीत राहुन आळा घालण्यासाठी उपयुक्त ठरु शकते. सदरहु पुस्तकाच्या प्रसिध्दीनंतर उल्हासनगर महानगरपालिकेची प्रतिमा उंचावण्यास देखिल मदत होवु शकते.

तथापि सदरहु पुस्तक प्रसिध्द् करण्यासाठी महानगरपालिकेच्या महासभेची मान्यता घ्यावी लागेल. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५० (२) अन्वये कोणत्याही महापालिका अधिका–यास तो कामावर असताना एखादे विशिष्ट काम करीत असेल तर त्याबद्दल पारिश्रमीक स्विकारण्यास परवानगी देता येवु शकते. त्यामुळे सदर पुस्तकाच्या प्रकाशनासाठी श्री. प्रकाश कुकरेजा यांना परवानगी देण्यास हरकत नाही.

श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव यांना *च्तवबमकनतम डंदनंस वित बीमबा ंदक ब्वदजतवस वअमत न्दंनजीवतपेमक ब्वदेजतनबजपवदे* हे पुस्तक प्रसिध्द् करण्यासाठी महासभेची परवानगी आवश्यक असल्याने महासभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ८० <u>दिनांक:–८/२/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव यांना अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवणेकामी *'च्तवबमकनतम डंदनंस वित बीमबा ंदक ब्वदजतवस व्अमत न्दंनजीवतपेमक ब्वदेजतनबजपवदे८* या शिर्षकाखाली पुस्तक प्रसिध्दीसाठी व त्याबद्दल पारिश्रमीक स्विकारण्यास अनुमती देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी श्री. प्रकाश कुकरेजा यांनी लिहिलेल्या *'Procedure Manual for Check and Control Over Unauthorised Constructions"* या पुस्तकाचे मा. महापौर, मा. उपमहापौर व मा. आयुक्त यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

मा. सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.३० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १५.२.२००६

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १५.२.२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक १५.२.२००६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३७. | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३८. | श्री. राज असरोंडकर |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ३९. | श्री. ठाकुर अशोक |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४०. | श्रीमती अनिता गुप्ता |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना | ४१. | श्रीमती माने किरण |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४२. | श्री. रमेश चव्हाण |
| ९. | श्री. वाघे शामु | ४३. | श्री. जाधव प्रशांत |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४४. | श्री. जाधव सुरेश |
| ११. | श्रीमती मोकल सीमा | ४५. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| १२. | श्री. दिलीप गायकवाड | ४६. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४७ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ४८. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४९. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५०. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १७. | श्री. उमाप रामदास | ५१. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५२. | श्री. अंकुश म्हस्के |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५३. | श्री. चौधरी राजेंद्र |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५४. | श्री. पंजाबी नारायण |
| २१. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५५. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २२. | श्री. पवार नाना | ५६. | श्री. साधवानी मनोज |
| २३. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५७. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| २४. | श्री. जग्यासी राजु | ५८. | श्रीमती भटिजा कोमल |
| २५. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ५९. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २६. | श्री. निकम शांताराम | ६०. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २७. | श्री. टाले प्रमोद | ६१. | डॉ. श्रीमती निना नाथानी |
| २८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६२. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २९. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६३. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६४. | श्रीमती मिनु दासानी |
| ३१. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३२. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६६. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३३. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६७. | श्री. राजेश वधारिया |
| ३४. | श्री. साधवानी मोहन | ६८. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| ३५. | श्री. सतरामदास जेसवानी | ६९. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३६. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७०. | श्रीमती भावना खिलनानी, |
| | | ७१. | श्री. भालेराव गौतम |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. डॉ. साधवानी जया, २. श्रीमती सुर्वे जयश्री, ३. श्रीमती वसिटा बेबी, ४. श्री. जयसिंघानी अनिल, ५. श्रीमती किरण माखिजा, ६. श्री. संजय रामचंद्र बठीजा, ७. श्रीमती करोतिया मालती, ८. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, ९. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, १०. श्री. हरदास माखिजा हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सायंकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :— स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २००६—०७ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००५—०६ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे

---

**मा. स्थायी समिती सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी वित्तीय वर्ष २००५—०६ चे सुधारीत अंदाजपत्रक व वर्ष २००६—०७ चे मूळ अंदाजपत्रक तसेच शिक्षण मंडळाचे वर्ष २००६—०७ चे सुधारीत अंदाजपत्रकाची प्रत मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांना सादर केली.**

मा. महापौर :—मा. उपमहापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सर्व सन्माननिय नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी, कर्मचारी, उपस्थित नागरीक तसेच पत्रकार आपणा सर्वांचे मी हार्दिक अभिनंदन करते.

उल्हासनगर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्यानंतर हा १० वा बजेट तयार केला जात आहे. १० पैकी ६ बजेट तयार करण्यामध्ये स्थायी समितीची सभापती या नात्याने माझे योगदान राहिले आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी कित्येक वेळा विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सहकार्य केले आहे. यासाठी त्यांचेसुध्दा मी आभार व्यक्त करते. स्वतंत्र भारताची नागरीक या नात्याने आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थांकडुन ब—याचशा अपेक्षा ठेवत असतो. त्या आम्ही महानगरपालिकेचा बजेट तयार करण्याच्या प्रक्रीयेमध्ये भाग घेवुन पुर्ण करु शकतो.

आता आपण बजेटकडे वळुया. वर्ष — २००५—२००६ उत्पन्नाची सर्व साधने तसेच आवश्यक त्या जबाबदा—या पार पाडण्यासाठी अपेक्षित खर्च लक्षात घेता १६२ कोटीचे लक्ष प्रशासनासमोर ठेवले होते. परंतु शहरामध्ये आलेली पुर परिस्थिती तसेच अनाधिकृत बांधकामावरील कारवाईच्या मुद्दयांमुळे हे लक्ष्य प्रशासन साध्य करु शकले नाही. त्यामुळे या अंदाजास १२८ कोटींपर्यंत मर्यादीत ठेवण्यात आले. पुरपरिस्थितीमध्ये ज्या हुशारीने उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने जे कार्य करण्यात आले, ते या वर्षातील सर्वात मोठे साध्य आहे. याबाबतची प्रशंसा केवळ शहरातच झाली नाही तर सभोवतालच्या परिसरामध्ये सुध्दा त्याची प्रशंसा केली गेली. यावेळी योगदान देणा—या सर्व अधिकारी, कर्मचारी व शहर वाशियांचे मी अभिनंदन करते.

उल्हासनगर शहरामध्ये मागील ४०—५० वर्षामध्ये केलेल्या सर्व अनाधिकृत बांधकामांना नियमित केले गेले. यासाठी वर्ष २००५—२००६ या वर्षाची गणती इतिहासामध्ये होईल. लाखो लोक बेघर होण्यापासुन वाचले. त्या सर्वांच्या वतीने मी आभार व्यक्त करते. या कामात केंद्र शासन, राज्य शासन तसेच शहराचे आमदार श्री. सुरेश पप्पु कालानी यांचे विशेष योगदान राहिले आहे.

जकात हे उत्पन्नाचे एक मुख्य साधन आहे. शहरातील व्यापा—यांची मागणी लक्षात घेता जकात वसुलीचे काम महानगरपालिका प्रशासनाकडे देण्यात आले होते. परंतु जेव्हा स्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे निदर्शनास आली त्यावर त्वरीत नियंत्रण आणण्यासाठी यावर्षी जकात वसुलीचे खाजगीकरण करण्यात आले. काळाची गरज लक्षात घेवुन सर्व संमतीने घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये सहा ते सात कोटीची उत्पन्नात वाढ झाली आहे. वर्ष २००५—२००६ मध्ये रस्त्यांची जी कामे पुर्ण करण्यात आली ती या प्रकारची आहेत.

१. प्रेमनगर टेकडी, उल्हासनगर—५.
२. करुणा अपार्टमेंट पासुन दशेहरा मैदान उल्हासनगर—५.
३. राधास्वामी सत्संग हॉल शेजारी कल्व्हट, उल्हासनगर—३.
४. सिरु चौक पासुन ते गुरुद्वारा, उल्हासनगर—२.
५. वसंत बहार, बॅरेक नं. १९६९ पर्यंत, उल्हासनगर—५.
६. शिवाजी चौकापासुन ते संतु बिल्डींग, उल्हासनगर—३.

वर्ष — २००६—२००७

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार वर्ष २००६—०७ साठी प्रशासनाच्या वतीने उत्पन्न व खर्चांचा जो अंदाज सादर करण्यात आला होता तो याप्रकारे आहे....

''अ'' व ''क'' अंदाजपत्रकाचे उत्पन्न १२८.७३ कोटी

''अ'' व ''क'' अंदाजपत्रकाचे खर्च १९२.१ कोटी

प्रत्येक वर्षाप्रमाणे उत्पन्न आणि खर्चाच्या अंदाजा बरोबर प्रशासनाने मालमत्ता कर तसेच पाणीपट्टीच्या दरामध्ये ६३ कोटीच्या वाढीचा प्रस्ताव ठेवला होता आम्ही हे मान्य करतो की, ज्या दराने आम्ही लोकांना पाणी देतो तो अतिशय कमी आहे. त्यानुसार होणारी वसुली एमआयडीसीचे बील भरण्यासाठी पुरेशी नाही. परंतु जेथ पर्यंत मालमत्ता कराच्या दराचा प्रश्न आहे. तो संतुलीत आहे व त्यामध्ये वाढ करण्याचा कोणताही प्रश्न

नाही तरीही प्रत्येक वर्षाप्रमाणे आमचा असा प्रयत्न आहे की, नागरीकांना करांच्या ओझ्यापासुन अधिकाधिक काळ वाचविले जावे. फक्त करांमध्ये वाढ करुन उत्पन्न वाढविले जाते असे मी मानत नाही. कर वाढीचे दु:ख नेहमी कर दात्यांना सहन करावे लागते. कर दात्यावर अन्याय होवु नये यासाठी कर वाढ न करता करांच्या थकबाकीच्या वसुलीकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. एकीकडे करदात्यांचा असा वर्ग आहे जो नियमितपणे कर भरत आहे तर दुसरीकडे असा एक वर्ग आहे जो अनेक वर्षांपासुन कर भरत नाही. कर्ज न भरणा—यांचे ओझे नेहमी कर भरणा—यांवर लादणे उचित नाही. थकबाकीची त्वरीत वसुली केली जावी अशी प्रशासनाला ताकिद देतांना स्थायी समितीच्या सदस्यांनी अंदाजपत्रकाला संतुलीत करण्याचा जो प्रयत्न केला आहे तो याप्रकारचा आहे.
.

<u>उत्पन्न</u>

| | |
|---|---|
| प्रारंभीची शिल्लक | ०.१३ लाख |
| जकात | ७२ कोटी |
| मालमत्ता कर | ५० कोटी |
| पाणीपट्टी वसुली | ४१ कोटी |
| अनुदान | ५.३० कोटी |
| इतर | २८.८७ कोटी |
| **एकुण——** | **१९७.३० कोटी** |

<u>खर्च</u>

| | |
|---|---|
| पगार भत्ते व प्रशासकिय खर्च | ३५.४४ कोटी |
| हुडको कर्ज | ०.३५ लाख |
| एमएमआरडीए कर्ज | २.६४ कोटी |
| एमआयडीसी | ४२.०० कोटी |
| भुयारी गटार कर्ज | १२.६४ कोटी |
| पाणी पुरवठा योजना कर्ज | १४.८९ कोटी |
| सार्वजनिक आरोग्य | ६.०४ कोटी |
| सार्वजनिक दिवाबत्ती | ४.२५ कोटी |
| प्राथमिक शिक्षण | ६.८४ कोटी |
| अग्निशमन | ०.३७ लाख |
| डिस्पेंसरी आणि आरोग्य विषय कार्यक्रम | १.३८ कोटी |
| पाणी पुरवठा | ७.२१ कोटी |
| भुयारी गटार | २.९५ कोटी |
| ड्रेनेज | १.७४ कोटी |
| बांधकाम विभाग | ३१.५३ कोटी |
| प्रभाग समिती | १.९७ कोटी |
| इतर | २४.९० कोटी |
| **एकुण ——** | **१९७.१४ कोटी** |

महानगरपालिकेकडे सोपविण्यात आलेली कामे व जबाबदा—या या महापालिका कर्मचारी तसेच अधिकारी यांच्या सहकार्याने पार पाडल्या जातात. या कर्मचा—यांचा पगार तसेच इतर भत्यासाठी ३५ कोटी रुपयांची तरतुद केलेली आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या एक तृतियांश पेक्षा अधिक भाग पाणी खरेदीवर खर्च होत आहे. या खर्चात मोठया प्रमाणावर कपात करण्यासाठी मागील एक वर्षापासुन आम्ही कपात करीत आहोत. परंतु मागविलेल्या निविदांवर प्रशासनाकडुन निर्णय घेतला जात नसल्याने या कामी आम्हांला अदयापपर्यंत यश मिळालेले नाही. यासाठी अंदाजपत्रकामध्ये ४२ कोटी रुपयांची तरतुद केलेली आहे. प्रशासनास आम्ही आग्रह करतो की, या निविदेस अंतिम स्वरुप देण्याबाबतचा प्रस्ताव लवकरात लवकर स्थायी समितीपुढे आणला जावा. महानगरपालिका क्षेत्रामध्ये अधिकतर विकास कामे बांधकाम विभागामार्फत केली जातात. यासाठी ३२ कोटी

रुपयांची तरतुद या विभागासाठी करण्यात आलेली आहे. या विकास कामांमध्ये ज्या रस्त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे तसेच कार्यवाही सुरु आहे त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | नाव | रक्कम | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १. | साई पॅलेस बॅ. नं. १४२५, उल्हासनगर–४ | २२ लाख | निविदा मागविल्या आहेत. |
| २. | परिवर्तन अपार्टमेंट पासुन ब्लॉक सी. ३०, उल्हासनगर–४ | ९ लाख | प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला आहे. |
| ३. | देव समाज रोड, उल्हासनगर–४ | ११ लाख | प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला आहे ज्यास आजच मंजुरी मिळाली आहे. |
| ४. | गुप्ता किराणा स्टोअर्स पासुन रमाबाई नगर, उल्हासनगर–३. | ३२ लाख | स्विकृतीसाठी पत्र दिले आहे. |
| ५. | स्विमींग पुल ते आयलसिंगानी चेंबर्स, उल्हासनगर–३ | ५० लाख | स्विकृतीसाठी पत्र दिले आहे. |
| ६. | गुप्ता किराणा स्टोअर्स पासुन संतोषी माता मंदिर, उल्हासनगर–५ | ९ लाख | स्विकृतीसाठी पत्र दिले आहे. |
| ७. | रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत तयार केलेल्या रस्त्यांची देखभाल | ५० लाख | स्विकृतीसाठी पत्र दिले आहे. |
| ८. | सीरु चौक ते नेहरु चौक रस्त्याच्या बाजुची गटार आणि पदपथ, उल्हासनगर–२. | २० लाख | स्विकृतीसाठी पत्र दिले आहे. |
| ९. | नेहरु चौक ते अमन चौक रस्त्याच्या बाजुचे पदपथ | ९ लाख | स्विकृतीसाठी पत्र दिले आहे. |
| १०. | जकात नाका नं. ६ च्या मागे २५० पदपथ पुल दुरुस्त करणे | १७ लाख | काम चालु आहे. |

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे नियमित केली तर त्या शुल्कापोटी करोडो रुपये जमा होतील अशी अपेक्षा आहे. ही रक्कम पायाभुत सोयी सुविधांसाठी खर्च करावयाची आहे. आम्ही या कामी हे पैसे शहराच्या विकासाठी व अर्धवट कामे पुर्ण करण्यासाठी खर्च करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करु. स्थायी समिती सदस्यांची इच्छा आहे की, पुढील वर्षी ज्या रस्त्यांची कामे हाती घ्यायची आहेत त्यामध्ये पवई उड्डान पुलापासुन उल्हासनगर स्टेशन पर्यंत रेल्वे रुळाला समांतर अशा एका रस्त्याचाही समोवश केला जावा. यासाठी या रस्त्याचा विकास २००६–२००७ च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केला आहे. डिफर्ड पेमेन्ट सिस्टिमची घोषणा जी मागील वर्षी आम्ही केली होती इन्फ्रास्टक्चर फंड या माध्यमातुन जमा होणा–या रक्कमेतुन रस्ते विकास कामे सुरु केली जातील. नगरसेवक निधी प्रत्येक नगरसेवकास साडेचार लाख, महापौर निधी पन्नास लाख, उपमहापौर निधी पंचवीस लाख, तसेच स्थायी समिती सभापती निधी पंचवीस लाख रुपये ठेवण्यात आला आहे.

खर्चात कपात करण्यात सर्वात पुढे आहे आमचा विदयुत विभाग, विदयुत विभागापासुन चर्चा करु या. या विभागातुन खर्चाची कपात करण्यासाठी जे संभाव्य पर्याय समोर आले आहेत ते या प्रकारचे आहेत. पहिल्या सत्रामध्ये महानगरपालिका क्षेत्रातील दिवाबत्तीपैकी एक चर्तथांश दिवाबत्ती स्वंयचलित केली जाईल असा प्रस्ताव असुन त्यानुसार विहित केलेल्या वेळेत दिवाबत्ती लावली जाईल व निर्धारीत केलेल्या वेळेत ती बंद होईल. ही योजना यशस्वी झाल्यानंतर सर्व ठिकाणच्या सार्वजनिक दिवाबत्तीचे अशाप्रकारे स्वंयचलन केले जाईल ज्यामुळे विजेच्या वापरात बरीचशी बचत होईल. विजेच्या बिलामध्ये कपात करण्यासाठी शहरातील दिवाबत्ती मध्यरात्री नंतर कमी करण्याची योजना आहे. या योजनेमुळे वाहतुकीवर कोणताही परिणाम होणार नाही. मात्र विजेच्या बिलामध्ये बरीच कपात होईल. सौर ऊर्जा तसेच पवनचक्की वीजनिर्मितीसाठी १० किलो व्हॅट क्षमतेचा प्रकल्प एप्रिल महिन्यापर्यंत पुर्ण होण्याची अपेक्षा आहे व त्यानंतर दोन ते तीन महिन्यामध्ये तो सुरु होईल ज्यामुळे महानगरपालिका मुख्यालयाच्या आणखी काही विभागांमध्ये या विजेची पुर्तता केली जावु शकेल. पैश्याची कमतरता लक्षात घेता या वर्षी कमी खर्चामध्ये तसेच विभागामार्फत उदयानांचा विकास करण्याची योजना आहे व त्यासाठी ३२ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणा–या विदयार्थ्यांसाठी ६.८३ कोटी रुपये शिक्षण मंडळासाठी सुरक्षित ठेवले आहेत. महाराष्ट्र शासनातर्फे राबविण्यात येणारी '' मिड डे मिल'' म्हणजेच महानगरपालिकेच्या

तसेच इतर खाजगी शाळेत येणा—या मुलांना प्रोत्साहित करण्यासाठी शाळांमध्ये जेवणाची व्यवस्था सुरु केली जाईल. या योजनेनुसार शहरातील जवळ जवळ ३१ हजार मुलांना शाळेत जेवण दिले जाईल. आपणा सर्व नगरसेवकांना माझी विनंती आहे की, त्यांनी या योजनेची माहिती आपल्या प्रभागातील सर्व विदयार्थ्यांच्या पालकांना दयावी जेणेकरुन अधिकाधिक मुले शाळेत येवुन शिक्षण घेवु शकतील.

या शिवाय पाणी वितरण व्यवस्था देखभाल दुरुस्तीसाठी ७ कोटी रुपये, भुयारी गटार योजना दुरुस्तीसाठी ३ कोटी संबंधित विभागास देण्याची तरतुद ठेवली आहे. आमची अशी विनंती आहे की, ज्या प्रमाणे स्थायी समितीमध्ये ज्याप्रमाणे सर्व सदस्यांनी मिळुन अर्थसंकल्प तयार केला. त्याप्रमाणे महासभेमध्ये सुध्दा सर्व पक्षाच्या सदस्यांनी या अर्थसंकल्पास सर्वसंमतीने मंजुरी दयावी. धन्यवाद, जयहिंद, जय महाराष्ट्र, जयभिम, जय झुलेलाल।

**मा. उप—महापौर यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी :—</u> मा. महापौर महोदया, आम्ही स्थायी समितीमध्ये अर्थसंकल्पास विरोध केला होता. परंतु आपण तो सर्व संमतीने पारीत कसा केला? अर्थसंकल्पास आमचा विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—</u> मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, कधी कधी असे होते की, मी एकदा बॅकेत गेलो, तेथे अतिशय चांगली आणि सुशीक्षीत महिला होती ती म्हणाली भाऊ इकडे या मी गेलो, ती म्हणाली पास बुक पहा यामध्ये किती रक्कम शिल्लक आहे? त्यावर मी म्हणालो एवढी शिकली सवरलेली महिला आहे मला का विचारत आहे? तर पाहिले असता, ४० वर्षाचे वय असावे मी समजलो की हिला चष्मा लागलेला असावा. आम्ही आपणांस प्रत्येक चांगल्या कामास सहकार्य दिले आहे. स्थायी समितीमध्ये आम्ही आपणांस जे सहकार्य दिले त्याबाबतीत असे झाले की, एका शाळेमध्ये एक मुलगी जात होती, त्या शाळेमध्ये एक शिक्षक होते. ते अतिशय चांगले होते त्यांना कधी राग येत नसे. एकदा परिक्षा चालु असतांना तिने लिहिले की, ''गाय आमची माता, यापुढे आणखी काही नाही येत आता''. तर जो आदर्श शिक्षक होता तो हे वाचुन अतिशय क्रोधित झाला. त्याने लिहिले की, नंदी आमचा बाप आहे मार्क देणे पाप आहे. अशा प्रकारे त्याने शेरा लिहीला तो पाहुन सर्व आश्यर्चचकीत झाले. सर्वजण एकमेकाला म्हणु लागले हा तर आदर्श शिक्षक होता. हा तर आता शिव्या देवु लागला आहे. तर असे काही प्रकार होतात. इतिवृत्तातामध्ये लिहिले आहे की...............

<u>मा. उपमहापौर :—</u>अर्थसंकल्पावर बोला, अर्थसंकल्पावर........

**मा. सदस्या श्रीमती भावना रामचंदानी, श्रीमती निता अहुजा, श्रीमती मीना सोंडे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—</u> सभापती महोदया, हा काल्पनीक बजेट आहे. तो वास्तविकतेला धरुन नाही. त्याला आमचा विरोध आहे. हा जो प्रस्ताव आहे तो महासभेत सादर करा. तेथे चर्चा होवुन अंतिम निर्णय होईल. तसेच टॅकरवर शुल्क आकारण्यास आमचा तिव्र विरोध आहे. तुम्ही नळाने पाणी दया आणि बिल घ्या. अशा प्रकारचा आम्ही विरोध केलेला आहे. त्यानंतर यांनी तेथे माझी सही वगैरे घेतली. त्यादिवशी काही समजले नाही नंतर घरी आलेल्या कागदांवर पाहिले तर अनुमोदक म्हणुन मी सही केलेली आहे. या प्रस्तावास आमचा विरोध आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र ।

**मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, श्री. नारायण पंजाबी, श्री. राजु जग्यासी, श्री. प्रमोद टाले यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, व सर्व सन्माननिय सदस्य, निवडणुकीचे भाषण चालु होते. एक नेता भाषण देत होता. भाषण काही अशा प्रकारचे होते की, मागील वेळेस निवडणुक जिंकलो होतो. तेव्हा नळ लावले होते, मागील वेळेस निवडणुक जिंकलो होतो. तेव्हा नळ लावले होते. व आताच्या वेळेस निवडणुक जिंकलो तर नळाद्वारे पाणी देतो. मा. महापौर महोदया श्रीमती ज्योती कालानी जी, यांनी अतिशय चांगले भाषण सभागृहासमोर केले. परंतु अतिशय दु:खाने म्हणावे लागत आहे की, शासनाचे आपणांस सहकार्य नाही. किंवा प्रशासन काम करत नाही. किंवा नशिबाची आपणांस साथ नाही. आपले प्रत्येक भाषण चुकीचे असल्याचे सिध्द झाले आहे. मागील वर्षी १८ फेब्रुवारीस जे भाषण आपण

महासभेत केले होते त्यातील काही भाग मी आपणासमोर मांडत आहे. सर्वात पहिली गोष्ट नशिबाने आपणांस जी साथ दिली ती गोष्ट सुध्दा मी आपणासमोर मांडेन. आपण आपल्या भाषणामध्ये म्हटले होते की, आज १८ तारखेस हा जो अर्थसंकल्प मी सादर करीत आहे, स्थायी समितीच्या सभापती या नात्याने आपणासमोर अर्थसंकल्प सादर करण्याची ही माझी शेवटची वेळ आहे. कारण की, त्यानंतर काही तासांनी आपण महापौर होणार होता. परंतु आता मी आपणांस शुभेच्छा देतो की, आपले भाषण चुकीचे सिध्द झाले. आपणांस अर्थसंकल्प सादर करण्याची आणखी एक संधी मिळाली. आपल्या भाषणाची त्रुटी मी आपल्यासमोर मांडत आहे. त्यावेळी अर्थसंकल्प सादर करण्याची ती वेळ शेवटची नव्हती. आपणांस पुन्हा एकदा अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मिळाली. त्यासाठी मी आपणांस धन्यवाद सुध्दा देतो. त्यानंतर आपण म्हटलात की, गरीबांना करांच्या ओझ्यापासुन मुक्त करण्यासाठी बीपीएल योजना (दारिद्रय रेषेखालील लोकांना करांपासुन सवलत) लागु केली जाईल. परंतू आजपर्यंत अतिशय कमी लोकांना याचा फायदा मिळाला आहे. त्यानंतर पृष्ट क्र. १३ वर घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत कच—यापासुन मुक्तता आपण म्हणाला होतात की, या शहराला कच—यापासुन मुक्ती देवू. परंतु या अगोदरच्या सभेमध्ये आपल्याच नगरसेवकानी लक्षवेधी सुचना मांडली होती की शहरामध्ये कचरा खुपच आहे, खुपच आहे. आपले भाषण चुकीचे होते. त्यानंतरचा मुद्दा आहे, प्रभाग समित्यांची स्थापना. प्रभाग समित्यांची स्थापना तर आपण केली. परंतु त्या व्यवस्थितपणे चालत नाहीत. यांचबरोबर आपण विषय समित्यांचीही नेमणुका करत आहात. त्यामुळे आपल्या प्रभाग समित्या पुर्णपणे कमकुवत आहेत. त्यापुढे आपण लिहिले आहे की, महापालिका निधी अंतर्गत झोपडपट्टी सुधार कार्यक्रम, याबाबतीत मी आपणांस विचारु इच्छितो की, मागील ९ वर्षाचा इतिहास जर पाहिला तर म्हाडा अंतर्गतचे काम नाही मध्ये जमा आहे. या अंतर्गतचे विकास कार्य शुन्य आहे. मला तर असे वाटते की, या शहरामधील झोपडपट्ट्यांमध्ये विकास कामे काही झालेलीच नाहीत. त्यापुढे आपण लिहिले आहे की, जकात खाजगीकरण तसेच महानगरपालिका कर्मचा—यांमार्फत जकात वसुली, आपण स्वत: म्हटले आहे की, महानगरपालिका कर्मचा—यांमार्फतच्या जकात वसुलीत आम्हांस सफलता मिळाली आहे. व यापुढे सुध्दा महापालिका स्वत: जकात वसुली करेल. परंतु आज आपण पुर्णपणे अयशस्वी झाला आहात. कारण की आपण जकात वसुलीचे काम खाजगी ठेकेदारास दिले आहे. त्यानंतर आपण म्हटले आहे मालमत्ता कराची वसुली, मी आपणांस सांगु शकेन की आजपर्यंत २५ टक्के सुध्दा वसुली झालेली नाही. त्यानंतर आपण पुढे म्हटले आहे की, पावसाळयापुर्वी नाल्यांची योजनाबध्द साफसफाई करुन पुरपरिस्थिती पासुन मुक्तता केली जाईल. परंतु निसर्गाचा कोप म्हटला जावा किंवा आपली व्यवस्था किंवा आपले शासन, प्रशासन, २५ वर्षाचे रेकॉर्ड ब्रेक करुन या शहरामध्ये पुराचे पाणी आले त्यापुढे मी आपणांस सांगु इच्छितो की, त्या अर्थसंकल्पामध्ये आपण जे काही म्हटले होते, वसुलीच्या बाबतीत उल्हासनगर शुन्य आहे. आपण म्हटले होते की, आम्ही अधिकाधिक वसुली करु, विकास कार्य करु. आपण म्हटले होते की, फेरीवाल्यांना परवाना देवुन फी वसुल केली जाईल. परंतु आजपर्यंत फेरीवाल्यांना परवाना देवुन फी वसुल केलेली नाही. आपण म्हटले होते की, पैसे दया आणि वाहने पार्क करा. या पध्दतीनुसार फी वसुल केली जाईल. परंतु एक सुध्दा पे आणि पार्क येथे तयार झाला नाही. आपण म्हटले होते की, थकबाकीची त्वरीत वसुली केली जाईल, परंतु पुर्वीपेक्षा अधिक थकबाकी झाली आहे. आपण म्हटले होते की, जलशुध्दीकरण केंद्र तयार करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदांबाबत त्वरीत निर्णय घेवु. येणा—या वर्षामध्ये विजेच्या बिलामध्ये कपात होवु शकेल. परंतु असे काही होवु शकले नाही. जलशुध्दीकरण केंद्राबाबत आपली कोणतीही योजना यशस्वी होवु शकली नाही. आपणांस सफलता जी काही मिळाली आहे ती फक्त एका गोष्टीसच मिळाली आहे. आपण लिहिले आहे की, जकातीपोटी ८० कोटी ५० लाखाची वसुली होईल. परंतु आपण केवळ ६५ कोटीपर्यंत सिमित राहिलात व मी सांगु शकेन की, २००४—२००५ मध्ये आमच्या शहरामध्ये जकात कराची वसुली ६५ कोटीपेक्षा जास्त झालेली आहे व आजच्या अर्थसंकल्पामध्ये जे आकडे वाढवावयास पाहिजे ते आकडे कमी केले आहेत. आपण लिहिले आहे की, जकातीपोटी आम्ही ७२ कोटी वसुल करु. मा. आयुक्त साहेबांनी स्थायी समितीसमोर जकाती बाबतचा जो ७६ कोटीचा प्रस्ताव पाठविला होता त्यामध्ये कपात करुन आपण तो ७० कोटीचा केला. त्यामुळे या शहरास ६ कोटीचे नुकसान झाले. आपण असे असे आकडे वाढविलेले आहेत की ज्यास आम्ही कधीच पार करु शकत नाही. आपण सांगितले की, मिळकत कराची वसुली आपण ५० कोटी पेक्षा जास्त करु. मा. आयुक्त साहेबांनी आश्वासन दयावे की ते किती कोटीची मिळकत कराची वसुली करु शकतील. त्यांनी स्वत: येथे सांगितले आहे की, १२८ कोटी पेक्षा जास्त उत्पन्न येवु शकणार नाही व आपण म्हणत आहात १९७ कोटी. मागील आकडे पाहिले तर आपण कधीही १२५ कोटीचा आकडा पार केलेला नाही. तर आता अशी कोणती परिस्थिती निर्माण होणार आहे की, ज्यामुळे आपण १९७ कोटीचे उत्पन्न मिळविणार आहोत. मागील दहा वर्षाचा इतिहास पाहिला तर, मागील १८ फेब्रुवारीपासुन आजपर्यंत विकास कार्य शुन्य आहे. आमचे उत्पन्न शंभर कोटीपर्यंत सिमित राहते व शंभर कोटी आमचे फक्त पगारावर खर्च होतात. आमची विकास कामे शुन्यावर येतात. ७० कोटी तुटीचा जो अर्थसंकल्प आपण सादर केला आहात, मा. आयुक्त साहेबांच्या अंदाजाने आपले उत्पन्न १२८ कोटीपेक्षा जास्त होवु शकणार नाही व आपण खर्च १९७ कोटी दर्शविला आहे. म्हणजेच जवळ जवळ ७०

कोटी तुटीचा हा अर्थसंकल्प आहे. असा हा अर्थसंकल्प आपण येथे पारीत केला तर येणा-या काही दिवसामध्ये उल्हासनगर महानगरपालिका २०० कोटी रुपये तुटीमध्ये चालेल. त्यानंतर तर असे दिसुन येईल की, ज्याप्रकारे महाराष्ट्र शासन १ लाख कोटी रुपये तुटीमध्ये चालली आहे. त्यानुसार आपली महानगरपालिका सुध्दा त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत २०० कोटी तुटीमध्ये चालेल यासाठी मी आपणांस निवेदन करेन की, हा जो अर्थसंकल्प आहे तो चुकीचा आहे, त्यामध्ये सुधारणा केली जावी. व आयुक्त साहेबांनी जो १२८ कोटीचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे, त्यानुसार यामध्ये फेरबदल केला जावा. किंवा आपण सांगा आपण दर्शविलेली वसुली कशी कराल? एकंदरित मी म्हणेन की हा जो अर्थसंकल्प आहे तो बोगस आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त, सभागृहातील माझे सर्व सहकारी, जेव्हा मला या अर्थसंकल्पाची प्रत मिळाली तर असे वाटत होते की, आत पाहिले तर बरीचशी फुले असतील, परंतु मी जसे पाहिले की, जसे की नविन बाटली आणि जुनीच दारु याप्रमाणे वाटले. बाटली नाही परंतु आतमध्ये जी दारु आहे ती जुनीच आहे. अर्थसंकल्पामध्ये नविन अशी कोणतीच बाब आम्हांला दिसुन आलेली नाही. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये आपण जी काही आश्वासने दिली होती ती पुर्ण झालेली नाहीत. २४ रस्त्यांची घोषणा केली होती. मला नाही वाटत की, त्यामधील चार रस्ते सुध्दा यावर्षी पुर्ण झाले असतील. पूर्ण शहरामध्ये एवढे काही खड्डे आहेत की, ते भरण्यासाठी आमच्याकडे पैसे नाहीत. ड्रेनेज साफ करण्यासाठीच्या गाडीची किंमत ११ लाख रुपये आहे ३ वर्षापासुन ती रक्कम आपण देवु शकत नाहीत. त्यामुळे संपुर्ण शहरामध्ये अंडरग्राउंड ड्रेनेजची समस्या निर्माण झालेली आहे व ती दुर होत नाही. मागील वर्षी मी उदयानांबाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर उत्तर मिळाले होते की, संपुर्ण शहरामध्ये २४ उदयाने आहेत. ती विकसीत करण्यासाठी काही रक्कमेची तरतुद केली होती. परंतु दु:खाने म्हणावे लागत आहे की, एक सुध्दा उदयान विकसीत झाले नाही. व हळु हळु ती सर्व उदयाने खाजगी संस्थांना देण्यात आली. आज मा. महापौर महोदयांनी म्हटले की, उदयाने विकसीत करण्यासाठी आम्ही ३२ लाख रुपयांची तरतुद केली आहे. मागील ४ वर्षामध्ये कोणत्याही उदयानाकडे लक्ष पुरविले नाही. पाण्याबाबतीत संपुर्ण शहरामध्ये हाहा:कार आहे. सत्ताधारी पक्षाचे जे लोक आहेत ते प्रत्येक १५ दिवसानंतर उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयासमोर उपोषण करतात. तर या व्यवस्थेमध्ये सुधारणा कधी होईल? महाराष्ट्र जीवन प्रधिकरणाची योजना अदयाप तयार झाली नाही. पाण्याची टाकी अदयाप पुर्ण झालेली नाही त्यामुळे आम्हांला पाणी मिळत नाही, खड्डे भरले जात नाहीत. उदयाने विकसीत केली जात नाहीत. तर विकास कसा होईल? मागील चार वर्षामध्ये आमचा शहरामध्ये काहीच विकास कामे झाली नाहीत. झोपडपट्टयांचा जो प्रश्न आहे त्यांच्यासाठी म्हाडा कडुन जो निधी येतो तो सुध्दा आम्ही मंजुर करुन घेतला नाही. दलित वस्तीबाबत जिल्हाधिकारी कार्यालय व शासनाकडुन आम्हांस जो निधी मिळतो तो निधी सुध्दा आपण आणु शकलो नाही. रस्ता निधी सुध्दा आजपर्यंत आपण मिळवु शकलो नाही. शासनाकडुन जे अनुदान मिळते ते शासन व प्रशासन मंजुर करुन आणु शकले नाही. तर आज हा जो आपण अर्थसंकल्प दिला आहे मला असे वाटते की तो आकडयांचा अर्थसंकल्प दिला आहात. आमचे बंधु श्री. जमनादास पुरस्वानी यांनी म्हटले की, आपण आकडयांची जुळवाजुळव केली आहे आपण म्हटले आहे की आम्ही पाणी बिलाची ४१ कोटीची वसुली करु. परंतु आजपर्यंत ९ कोटी पेक्षा जास्त वसुली झालेली नाही. महापौर महोदयांना विनंती आहे की हा जो अर्थसंकल्प आहे त्यामध्ये सुधारणा केली जावी. प्रत्यक्षात जेवढा आहे तेवढाच अर्थसंकल्प तयार केला पाहिजे. हा जो अर्थसंकल्प आहे तो बोगस आहे. या अर्थसंकल्पामुळे शहरामध्ये विकास कामे होवु शकणार नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-</u> गेल्या चार वर्षामध्ये बजेटच्या बाबतीत अनेक ठिकाणी आकडे वाढवुन दिशाभुल केली जात आहे. व ते काम शाळेचे असो किंवा रस्त्याचे असो त्यामध्ये मोठ मोठे आकडे दिसतात प्रत्यक्षात मात्र कामे होत नाहीत. जी काही कामे झाली नाहीत ती मी या ठिकाणी सांगणार आहे. शहाड फाटक पासुन आयडीआय कॉलनीकडे एक रस्ता जातो तो गेल्या तीन वर्षापासुन स्थायी समितीमध्ये मंजुर होवुन सुध्दा का तयार केला जात नाही? त्याबाबत आम्ही कित्येकवेळा पत्र देवुन विचारणा केली आहे. काही वेळेस निविदेचा तर काही वेळा ठेकेदाराचा बहाणा सांगितला गेला. व रस्त्याचे काम केले नाही. मागील वर्षी श्री. मलंगगड यात्रेचे दिवशी सन्माननिय आमदारांनी श्रीफळ तोडुन त्या रस्त्याच्या कामाचे उद्घाटन केले. आमदार भाई जगताप व त्यांच्या युनियनचे कार्यकर्ते व मी सुध्दा तेथे उपस्थित होतो. त्यावेळेस मी सन्माननिय आमदारांना विचारणा केली की, श्रीफळ तोडुन आपण उद्घाटन तर केले आहे परंतु या रस्त्याचे काम सुरु होईल किंवा नाही याबाबत आपण नागरीकांना अश्वस्त करावे. या कामाबाबत गेल्या दोन वर्षापासुन मी पाठपुरावा करत आहे. परंतु काम होत नाही. त्यावेळेस आमदारांनी आश्वासन दिले होते की, श्री. दिलीप गायकवाडजी मी ज्या ठिकाणी उद्घाटन करतो त्याचे दुस-याच दिवशी तेथे काम सुरु होते. मी म्हटले फारच चांगली गोष्ट आहे परंतु दु:खाने म्हणावे लागत आहे की, दोन वर्ष होवुन सुध्दा त्या ठिकाणी ते काम अदयाप सुरु झालेले नाही. अर्थसंकल्पामध्ये रस्त्याबाबत फार मोठे आकडे दर्शविले जातात. करोडो रुपये रस्त्यांसाठी तरतुद ठेवुनही

त्या रस्त्यांचे काम होत नाही. दुसरे शाळेचा महत्वपुर्ण मुद्दा येथे मी उपस्थित करु इच्छितो. माझ्या प्रभागामध्ये शहाड गावठण येथे २३ व २६ नंबर ही नगरपालिकेची प्राथमिक शाळा आहे. या शाळा पुर्णपणे मोडकळीस आल्या आहेत. तेथे विदयार्थी बसु शकत नाही. त्यामुळे खाली असलेल्या शाळेमध्ये या मुलांना बसवुन शाळा चालविली जाते. या शाळेच्या ४० टक्के भागावर अतिक्रमण झालेले आहे. याबाबतीत अनेकवेळा सांगुनही आणि लेखी कळवुनही त्या शाळेस संरक्षण भिंत बांधली जात नाही. येथे शाळांसाठी आपण लाखो/करोडो रुपयांची तरतुद करतो. रस्ते तयार करु म्हणुन सन्माननिय महापौर येथे आश्वासन देतात. प्रत्यक्षात काम तर काही होतच नाही. यासाठी दु:खाने म्हणावे लागत आहे की, प्रभागामध्ये नगरसेवक निधिची जी कामे करायची असतात ती सुध्दा करण्यास ठेकेदार तयार होत नाही. कारण की त्यांना वेळेवर देयके मिळत नाहीत. म्हणुनच जेव्हा जेव्हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आणि त्यामध्ये ज्या ज्या कामांसाठी ज्या ज्या रक्कमेची तरतुद दर्शविली आहे त्या त्या रक्कमेची कामे झालेली नाहीत. या पुढे तरी होतील की नाही या बाबतीत आपण आश्वासन दयावे. शहाड गावठण येथिल मराठी व हिंदी माध्यमांच्या शाळांच्या जागा त्वरीत महापालिका शासन व प्रशासनाने ताब्यात घेतल्या पाहिजेत. कारण की, त्यावर अतिक्रमण होवुन ८५५ च्या ठिकाणी ८५६ हा आकडा येता कामा नये. यासाठी मी आपणांस येथे पुन्हा पुन्हा निवेदन करु इच्छितो की, शहाड गावठाण येथिल शाळांच्या जागेवर संरक्षण भिंत बांधुन तेथे महापालिकेने फलक लावला पाहिजे. एवढे बोलुन या अर्थसंकल्पास विरोध करुन मी माझे बोलणे संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र ।

**मा. सदस्या श्रीमती भावना रामचंदानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.** 

**<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u>** मा. महापौरजी, मा. उपमहापौर, सन्माननिय सभागृह, जेव्हा मी ही अर्थसंकल्पाची प्रत बघितली. मा. महापौरांनी एक अतिशय चांगला प्रस्ताव येथे मांडला आहे. श्री. उमाप यांच्या सुध्दा एका रस्त्याचे काम मंजुर झाले आहे. हा जो रस्ता आहे तो जेथुन महापालिकेला उत्पन्न मिळते, जो औद्योगिक पट्टा आहे, तेथे रस्ता तयार करण्यासाठी गेल्या दोनतीन वर्षापासुन मी प्रयत्न केले त्याला आज यश मिळाले त्यासाठी मी महापौरांना धन्यवाद देतो. दुसरा विषय असा आहे की जेव्हा मी अर्थसंकल्पाची प्रत बघितली शहरामध्ये नदी किनारी असलेली जी वस्ती होती, झोपडपट्टी होती, तेथे पुराच्या वेळेस जास्तीत जास्त नुकसान झाले होते व तेथे सीसी पॅसेज, ड्रेनेज ज्या नागरी सुविधा दयायच्या होत्या, यांचे अतिवृष्टीमुळे जे नुकसान झाले ते भरुन काढण्यासाठी व त्या जागा विकसित करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये पुरेश्या रक्कमेची तरतुद ठेवावयास पाहिजे होती. गलिच्छ वस्त्यांच्या विकास कार्यासाठी अधिकाधिक रक्कमेची तरतुद ठेववावयास पाहिजे होती. ती ठेवली नाही. दुसरी गोष्ट अशी की अर्थसंकल्पामध्ये आश्वासन तर दिले जाते परंतु त्या नुसार विकासकार्य होत नाही याबाबतीत आमच्या कित्येक नेते मंडळीने येथे सांगितले आहे. मागील वेळेस नगरसेवक निधी ४ लाख रुपये ठेवला होता. सर्व नगरसेवकांना त्यामधील फक्त २ लाखाचा निधी मिळाला. बाकी रक्कमेची कपात केली. असे होता कामा नये. यावेळेस साडेचार लाख रुपयाच्या रक्कमेची आपण जी तरतुद केली आहे, आम्हांला वाटत नाही की साडेचार लाख रुपये निधी आम्हांला मिळेल म्हणुन. आम्ही अशी अपेक्षा व्यक्त केली होती की, हे शेवटचे निवडणुकीचे वर्ष आहे. नगरसेवक निधी नियमितपणे मिळतो हा आमचा ३–४ वर्षापासुनचा अनुभव आहे. बाकीचा निधी मिळण्यासाठी लढाई करण्यापेक्षा नगरसेवक निधी मिळणे अधिक सोपे असते. त्यानुसार प्रत्येक नगरसेवकास अधिकाधिक निधी मिळेल अशी आमची अपेक्षा होती. परंतु तसे या अर्थसंकल्पात झाले नाही. प्रत्यक्षात गलिच्छ वस्त्यात जे विकास कार्ये आजपर्यंत व्हावयास पाहिजे होती तशी झाली नाहीत. कित्येक झोपडपट्टयात अशी स्थिती आहे की तेथे मातीच माती आहे. गटारांची सोय नाही. दिवाबत्तीची व्यवस्था नाही. माझ्या अंदाजाप्रमाणे शहरातील सर्व झोपडपट्टयांचा सर्व्हे केला तर असे दिसुन येईल की ३० टक्के सुध्दा विकास कामे झालेली नाहीत. म्हणुन अर्थसंकल्पामध्ये झोपडपट्टी विकासासाठी आणि जी तरतुद करावयास पाहिजे होती ती अदयापपर्यंत केलेली नाही. त्याचबरोबर बजेटमध्ये जे आकडे दर्शविले जातात ते दर वर्षी प्रमाणे वाढवुन लिहिले जातात. वस्तुस्थिती दर्शक अर्थसंकल्प सभागृहात यावयास पाहिजे होता मात्र तो आलेला नाही. यासाठी आम्ही या अर्थसंकल्पाबाबतीत पुर्णपणे नाराज आहोत.

**<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–</u>** मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य आज जो अर्थसंकल्प सादर झालेला आहे, हा अर्थसंकल्प जेव्हा सर्व शोधक नजरेने बघितला असता संपुर्ण शहरामध्ये काही विकास कामे करता येतील का? आणि प्रशासनाच्या आस्थापना आणि इतर विषयांवर होणा–या खर्चाची असे एकंदरित स्वरुप जरी असले तरी आमच्या मा. महापौर महोदया या संपुर्ण शहराच्या माता आहेत. या मातेने शहरातील प्रत्येक मुलाकडे पाहिले पाहिजे. मी जेव्हा अर्थसंकल्प पहात होतो तेव्हा उल्हासनगर कॅम्प नं. १,२,३ व नंतर ४ व ५, उल्हासनगर कॅम्प नं. ४ व ५ यांच्यावर थोडासा अन्यायकारक वाटतो. मराठीमध्ये एक म्हण आहे, ''घार उडते आकाशी लक्ष तीचे पिला पाशी.'' तीची १० पिल्ले असली

तरी १० पिल्लांवरती एक सारखेच प्रेम असते. कॅम्प नं. ४,५ च्या लोकांवर या अर्थसंकल्पाने थोडासा अन्याय केला आहे असे मला म्हणायचे आहे. आजच्या तारखेला कॅम्प नं. ४ व ५ मधील रस्ते सर्वात जास्त खराब आहेत. आजच्या तारखेला पाण्याची जी समस्या आहे ती सर्वात जास्त कॅम्प नं. ४ व ५ मध्ये आहे. आमच्याशी सावत्रपणाचा व्यवहार करु नका. एवढेच माझे म्हणणे आहे. राहिला प्रश्न रस्त्यांचा आम्ही गलिच्छ वस्त्यांमध्ये काम करतो. गलिच्छ वस्त्यांमधील रस्ते सर्वात जास्त खराब आहेत. उड्डान पुलापासुन भरत नगर पर्यंतचा एक रस्ता जो पुल झाल्यामुळे उल्हासनगर व अंबरनाथ शहरासाठी जोड रस्ता झाला. कुर्ला कॅम्प येथिल रस्ता, गुरुनानक येथिल रस्ता, डॉ. आंबेडकर चौक, सुभाष टेकडी येथे येणा–या एप्रिल महिन्यामध्ये फार मोठी मिरवणुक निघणार आहे. या सर्व विभागाचे रस्ते अतिशय खराब असुनही त्यांच्यासाठी अर्थसंकल्पामध्ये काहीही तरतुद केलेली नाही. एकात्मीक रस्ते विकास (आय.आर.डी.पी.) कार्यक्रमाच्या यादीतुन हा रस्ता वगळला गेला. अश्या प्रकारे सावत्रपणाचा व्यवहार होता कामा नये. झोपडपट्टी विकास निधी जो ५ टक्के सक्तीने खर्च केला पाहिजे, परंतु आजपर्यंत कधी तो खर्च झाला नाही. मात्र यापुढे तो खर्च झाला पाहिजे. व हे रस्ते अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करुन त्यांची कामे लवकरात लवकर सुरु झाली पाहिजेत. धन्यवाद ।

**मा. सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आणि सर्व सहाकारी हो, अर्थसंकल्पावरील चर्चेची भाषणे प्रत्येकजण शांततेने ऐकुन घेत आहे. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. आम्ही लोकांनी सुध्दा मा. महापौरांचे भाषण अतिशय तन्मयतेने ऐकुन घेतले. व अशी अपेक्षा व्यक्त करतो की, आपण आमचे विचार सुध्दा गंभीरतेने ऐकुन घ्या. व त्याबाबत काही विचार सुध्दा कराल. महापौर महोदया, अर्थसंकल्पीय भाषणामध्ये प्रशासनाला निर्देश देत होत्या की, मालमत्ता कराची वसुली अधीकाधिक झाली पाहिजे परंतु प्रशासन त्याकडे लक्ष देत नाही. अर्थसंकल्पीय भाषणाची आम्हांस प्रत मिळाली असती तर त्याबाबत आम्ही अधिक विस्ताराने बोलु शकलो असतो. त्यांनी असेही म्हटल्याचे मी ऐकले आहे की, प्रशासनीक खर्चात कपात करा. त्याबाबत सुध्दा प्रशासन बरोबर लक्ष देत नाही. मला एक गोष्ट आठवली चार ओळची ती गोष्ट आहे. चार लोकांनी असा विचार केला की, आपण धंदा व्यापार करावा. त्यांना असे वाटले की, मुंबई सारख्या एका मोठया शहरामध्ये आपण एक हॉटेल खोलावे. कर्ज घेतले, मोठे हॉटेल उघडले. एक आठवडा निघुन गेला. कुणीही गि–हाईक आले नाही. १५ दिवस उलटुन गेले कुणीही गिन्हाईक आले नाही. एक महिना झाला कुणीही गि–हाईक आले नाही कारण हॉटेलच्या बाहेर एक फलक लावला होता, '' व्हीजीटर्स आर नॉट अलाउड्'' म्हणजेच बाहेरच्या लोकांना आत येण्यास मनाई आहे. त्यानंतर त्यांनी विचार केला की, आपण दुसरा व्यवसाय करु या. एक गॅरेज उघडण्याचा विचार केला. मुंबईमध्ये गॅरेजचा व्यवसाय फार मोठया प्रमाणात चालतो. तर त्यांनी एक गॅरेज उघडले. पुन्हा तीच गोष्ट झाली. एक आठवडा उलटला, १५ दिवस उलटले, एक महिना, दोन महिने उलटले. एक सुध्दा गि–हाईक आले नाही. कारण त्यांनी गॅरेज पहिल्या माळयावर उघडले. नंतर त्यांच्या मनात विचार आला की, मुंबई सारख्या शहरामध्ये टॅक्सीवाले सुध्दा बरेच पैसे कमवितात म्हणुन आपण टॅक्सी घेवु या, त्यानुसार त्यांनी टॅक्सी घेतली, चर्चगेट पासुन व्हीटी, व्हीटी पासुन बांद्रा, बांद्रा पासुन खार, खार ते चर्चगेट फिरु लागले आणि पुन्हा तेच एक आठवडा, १५ दिवस, एक महिना, दोन महिने उलटुन गेले. तरी एक सुध्दा गि–हाईक आले नाही. कारण की, ते चौघेही एकाच वेळी टॅक्सीत बसलेले असत. त्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, आपले नशिब खराब आहे, धंदा व्यापारात काही फायदा होत नाही. म्हणुन ही टॅक्सीच जुहु चौपाटीला समुद्रामध्ये फेकुन देवु या. जुहु चौपाटीवर गेले. टॅक्सी समुद्रात ढकलुन दिली. ती पुढे न जाता एका बाजुला अडकुन राहिली. ना पुढे जात होती ना मागे येत होती.कारण की, दोन माणसे पुढुन ढकलत होती तर दोन मागुन ढकलत होती. तर सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, कोणताही धंदा व्यवसाय करण्यासाठी, शासन चालविण्यासाठी किंवा प्रशासन चालविण्यासाठी कुशलतेची गरज भासते. मी असे म्हणत नाही की, आपणामध्ये कुशलता नाही. परंतु ज्या कुशलतेने आपण काम करावयास पाहिजे होते, त्या कुशलतेचा आपण विचार केलेला नाही. कुशलतेचा वापर न केल्यामुळे आपली स्थिती अशी झाली आहे. शहरामध्ये आज आपण पाहिले तर शहराच्या विकासाची कामे ठप्प झाली आहेत, रस्त्यांची स्थिती खराब आहे, पाणी पुरवठयाची स्थिती खराब आहे, सार्व–सफाईची स्थिती खराब आहे. हे फक्त विरोधी पक्षीय सदस्यच बोलत नाहीत तर सत्ताधारी पक्षाचे सदस्यही बोलत असल्याचे आम्ही बघत आहोत. कधी कुणी नगरसेवक ॲन्थोनी ठेकेदाराच्या बाबतीत त्रस्त होतो. या शहरामधील सार्व. साफसफाईचे काम बरोबर होत नसल्याचे सांगुन ठेका रद्द करण्याचे बोलले जाते. सत्ताधारी पक्षाचा कुणी नगरसेवक लक्षवेधी सुचना मांडतो. भुयारी गटार योजनेचे काम बरोबर होत नाही. त्याचबरोबर प्रवेशद्वाराचे काम बरोबर होत नाही. अशा कितीतरी प्रकारची कामे होत नाहीत. रस्त्यातील खड्डे भरले जात नाहीत. पक्षभेद विसरुण सर्वजण ओरडत असतात. आपल्या चार वर्षाच्या कार्यकालावधीमधील जो अर्थसंकल्प आहे तो पुढेच सरकत नाही.

मला असे वाटते की, आपण यावर जरा विचार करावा. मी विचार केला होता काही मुद्दे आपणासमोर मांडु त्यावर आपण जरा विचार करावा. हा जो अर्थसंकल्प आहे त्यामध्ये चार वर्षापासुन वाढ का होत नाही? आकडेवारीनुसार मी आपणांस सांगत आहे, आपल्या कार्यकालावधीचे २००२–०३ या वर्षाचे जे पहिले वर्ष होते त्यावेळेस आपला जो प्रस्तावित अर्थसंकल्प होता तो १५७ कोटीचा होता. सुधारीत अर्थसंकल्प ११९ कोटीचा झाला, व प्रत्यक्षातील जो अर्थसंकल्प आला तो १०० कोटीचा. २००३–०४ या दुस–या वर्षी आपला जो प्रस्तावित अर्थसंकल्प होता तो १६८ कोटीचा होता. सुधारीत अर्थसंकल्प ११६ कोटीचा झाला. व प्रत्यक्ष जो अर्थसंकल्प आला तो १०४ कोटीचा. २००४–०५ या तिस–या वर्षामध्ये आपला प्रस्तावित अर्थसंकल्प होता १८५ कोटीचा. सुधारीत अर्थसंकल्पात तो १२० कोटीचा झाला. व प्रत्यक्षात वसुली आली १०१ कोटीची. प्रत्यक्षात जे उत्पन्न येते ते १०० कोटीच्या आसपास व या चालु वर्षाची स्थिती सुध्दा अशीच आहे. प्रस्तावित अर्थसंकल्प होता १६५ कोटीचा. सुधारीत अर्थसंकल्पामध्ये आपण ११२ कोटीचा आकडा दर्शविला आहे. प्रत्यक्षातील आकडे येण्याचे अदयाप बाकी आहे. सुधारीत अर्थसंकल्पाचे आकडे आपण कमी केले आहेत. म्हणुन ही वसुली १०० कोटीच्या आसपासच राहण्याची शक्यता आहे. आपण मालमत्ता कराच्या वसुलीबाबत बोललात. आपण पाहिलात तर वसुली किती कमी येत आहे. मिळकत कराच्या वसुलीचे लक्ष ठेवले होते आपण ३९ कोटीचे. सुधारीत अर्थसंकल्पात ते १७ कोटी पर्यंत सिमित झाले. प्रत्यक्षात वसुली किती होईल ते आपण समजु शकतात. पाणी पट्टीची जी वसुली आहे ती सुध्दा प्रस्तावित केली होती २३ कोटीची व सुधारीत अर्थसंकल्पामध्ये आकडे कमी करुन ती ९ कोटीची दर्शविली आहे. प्रत्यक्षात किती वसुली होईल ते आपण समजु शकतो. अनुदान सुध्दा ७ कोटीवरुन कमी होवुन ते ३ कोटी पर्यंत आले आहे. जेव्हा आपण वसुली बाबत सांगत होतात व आपण स्वत: मान्य केले आहे. ज्या मोठ मोठया व्यक्ती आहेत त्या कर भरत नाहीत. व मी जे आता आकडेवारी आपणांस सांगितली त्यावर सुध्दा आपणांस विचार करावा लागेल. हा जो अर्थसंकल्प चार वर्षापासुन एका ठिकाणी स्थिरावला आहे. तो सुध्दा चार वेळा करांमध्ये वाढ केल्यानंतर सुध्दा, दोन वेळा जकात दर वाढविले पहिल्या वेळेस ४१ बाबींवर व दुस–या वेळेस ८ बाबींवर, दोन वेळेस मालमत्ता करांचे दर वाढविण्यात आले. एक वेळेस २००३–०४ या वर्षामध्ये जे वार्षिक भाडे मंजुर होते, त्यामध्ये बदल करण्यात आला. व मागील वर्षी पाणी पुरवठा लाभ कर व दिवाबत्ती कर हे दोन्ही कर मिळुन ५ टक्के वाढविण्यात आली. त्याचबरोबर एक विशेष सफाई कर, हॉटेल्स व मंगल कार्यालय यांच्यासाठी १० टक्के कर वाढविण्यात आला. एवढे कर वाढवुनही आपली वसुली वाढत नाही व मी असे मान्य करतो की, जे मोठ मोठे लोक आहेत ते कर भरत नाहीत. या बाबतीत विचार करा असे का होत आहे? याबाबतीत मी आपणांस सांगु इच्छितो की, माझ्याबरोबर एक व्यक्ती काम करत होता, जेव्हा जेव्हा रेल्वे भाडयामध्ये वाढ होत होती तेव्हा तेव्हा तो आम्हांला चहा पाजत असे. एकदा मी त्यास विचारले की, रेल्वेचे भाडे वाढल्यानंतर आपण आम्हांस चहा का पाजता? त्या व्यक्तीने उत्तर दिले की, मी तर कधी तिकीट काढत नाही, बिना तिकिट प्रवास करतो. जास्त पैसे वाचल्याने चहा पाजला. जे ठराविक मध्यम वर्गीय लोक आहेत तेच कर भरतात. जे मोठ मोठे राज्यकर्ते आहेत ते कराची रक्कम भरतच नाहीत. जसजशी थकबाकीची रक्कम वाढत जाते तसतसे ते सांगु लागतात की, महानगरपालिकेस कसा चुना लावला. दुस–या वर्षी पुन्हा कराची रक्कम वाढत जावुन एक लाखाची रक्कम सव्वा लाख होते व ते पुन्हा खुश होवुन म्हणतात की, सव्वा लाख रुपये वाचले. त्यांना असे वाटते की, ज्या विधवा आहेत, गरीब लोक आहेत, मध्यमवर्गीय लोक आहेत जे वेळच्या वेळी कराची रक्कम भरतात. ते मुर्ख लोक आहेत. आम्ही तर कर भरत नाहीत, आमच्याकडे कुणी येत नाहीत. मला आठवण आहे मी तर नाव घेवुन घेवुन सांगतो, डॉल्फीन क्लब वाल्याकडे प्रत्येक वर्षी आमच्या कर विभागातील लोक ॲसेसमेंट करण्यासाठी जात असत तर त्यांना ॲसेसमेंट करु दिली जात नसे. असे बरेचसे लोक आहेत जे कर भरत नाहीत तर याबाबतीत आम्हांला विचार करावा लागेल. आपली कर वसुली का होत नाही? याबाबतीत सुध्दा आपणांस काही विचार करावा लागेल. व सर्वात विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे की, अर्थसंकल्पात तरतुद केल्याप्रमाणे जर आपली करांची वसुली येत नसेल तर सर्वात जास्त परिणाम जर कशावर होत असेल तर तो शहराच्या विकासावर. आपण जर आकडे बघितले तर असे दिसुन येईल की, जेव्हा जेव्हा वसुली कमी झाली तेव्हा विकास कामे कमी झाली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग ज्या विभागाकडे शहरातील विकास कामांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे त्या विभागासाठी तरतुद करण्यात आलेल्या या वर्षीचे रक्कमेचे आकडे मी आपणांस सांगतो. या विभागासाठी २४ कोटींची आपण तरतुद सांगितली होती. सुधारीत अर्थसंकल्पात ती १२ कोटीची झाली. व मला वाटते की, प्रत्यक्षात त्यापेक्षाही कमी रक्कम खर्च होईल. रस्ते बांधणी व सुधारणा या लेखा शिर्षासाठी आपण या वर्षी तरतुद केली होती साडेआठ कोटी रुपयांची. सुधारीत अर्थसंकल्पात आपण त्यासाठी ठेवले ३ कोटी २० लाख प्रत्यक्षात तर त्यापेक्षाही कमी खर्च होईल. आपण जरा विचार करा, आपण अर्थसंकल्पात कायकाय आश्वासने दिली होती? १०–१२ महिन्यामध्ये कधी आपले भाषण उघडुन पाहिले आहे का? आपण असे लिहिले होते की, आम्ही थकबाकीची वसुली करु परंतु ती झाली नाही. आपण असे म्हटले होते की, १०० कोटी रुपये खर्च करुन जलशुध्दीकरण केंद्र बांधु. हे या वर्षी म्हटले नाही तर याच्या अगोदरच्या वर्षात. हे तिसरे वर्ष आहे आपण या बाबीचा पुर्न उच्चार करत आहात. जरा विचार करा आपण आणखी एक

आश्वासन दिले होते चालु वर्षाच्या बजेट बाबत बोलत आहेत की शहाड स्टेशन जवळ एक माहिती तंत्रज्ञान केंद्र तयार केले जाईल. त्यामध्ये बहुउद्देशीय सिनेमागृह असेल, व्यापारी संकुल असेल, तेव्हा एक प्रोजेक्ट तयार करुन दाखविला होता की बाहेरगावचे लोक जेव्हा कल्याण किंवा शहाड स्टेशनला उतरतील तेव्हा येथिल भलेमोठे माहिती तंत्रज्ञान केंद्र पाहुन म्हणतील की हे शहाड स्टेशन आहे की बंगलौर मधील कुठले स्टेशन आहे. परंतु जरा विचार करा त्या प्रकल्पाचे काय झाले? आपण या मोठ मोठया गोष्टी केल्या होत्या त्याचबरोबर लहान–लहान गोष्टींकडे सुध्दा मी येत आहे. गेल्या तीन वर्षांपासुन आपण म्हणत आहात की, शहाड पंपींग स्टेशन बाजुला जो नाला आहे त्याचा जो प्रवाह वळवायचा आहे तो वळविला जाईल. याबाबतीत जरा विचार करा त्याचे काय झाले? हे तर सोडाच दुसरी एक लहानशी गोष्ट आपण सांगितली होती. कारण की, आपले अर्थसंकल्पीय भाषण मी काळजीपुर्वक वाचत असतो. पाचही वर्षांचे आपले अर्थसंकल्पीय भाषण मी वाचुन आलो आहे. आपण लिहिले होते की, प्रत्येक प्रभागामध्ये जेष्ठ नागरीकांसाठी एक लायब्ररी चालु केली जाईल. जरा आपण विचार करा. याबाबत आपण काय केले आहे? मागील वर्षाच्या सुधारीत अर्थसंकल्पावर चर्चा चालु होती त्यावर मी बोलत होतो. आता येणारे जे २००६–०७ हे वर्ष आहे त्याबाबत मी बोलत आहे. आपण जरा विचार करा ज्याप्रकारे आपण ४ वर्षाचा अर्थसंकल्प तयार केला आहे काय हा अर्थसंकल्प त्यासारखा नाही? आयुक्तांचा अंदाज होता की, हा अर्थसंकल्प १२८ कोटींचा असेल व आपण त्यामध्ये आकडे वाढवुन तो १९७ कोटीचा केलात यावरुन मला माझ्या आयुष्यातील एका गोष्टीची आठवण होते. मी उल्हासनगरच्या टेक्नीकल शाळेत शिकत होतो. तेथे एक शिक्षक होते त्यांनी चित्रकलेच्या वहीतील माझ्या एका चित्रास १० पैकी ५ मार्क दिले. त्यावर मी त्या शिक्षकांकडे गेलो आणि म्हणालो सर मी एवढे चांगले चित्र काढले आणि आपण मला १० पैकी फक्त ५ मार्क दिले. त्यावर त्यांनी अर्धा मार्क जोडुन दिला. त्यावर मी त्यांना पुन्हा विनंती केली की, सर आणखी जरा बघा ना? त्यावर त्यांनी पुन्हा अर्धा मार्क वाढवुन दिला. एवढे चांगले चित्र काढले आहे आणि काल आपणांस चहा सुध्दा पाजला त्यावर त्यांनी आणखी अर्धा मार्क वाढवुन दिला. त्यानंतर पुन्हा एकदा मी विनंती केला असता पुन्हा त्यांनी अर्धा मार्क वाढवुन दिला. सुरुवातीस मला जे पाच मार्क होते त्याचे नऊ मार्क झाले. तर ही परिस्थिती अशी आहे थोडे थोडे वाढवुन अर्थसंकल्पीय आकडे वाढविले आहेत. मुळ १२८ कोटीचा अर्थसंकल्प १९७ कोटी पर्यंत वाढविला. मिळकत कराबाबत आयुक्तांचा जो अंदाज होता २० कोटीचा त्यास ५० कोटी केले गेले. पाणी पट्टीची वसुली १० कोटी दर्शविली होती. तिला ४१ कोटी केले गेले. आपण जरा विचार करा ही एवढी वसुली शक्य आहे का? मी नऊ वर्षाचे आकडे आपणांस देवु शकतो. हे जावु दया आपल्या कार्यकालावधीचे आकडे मी आपणांस देतो. २००२–०३ या वर्षामध्ये मिळकत कराची जी वसुली झाली ती आहे १९ कोटी. २००३–०४ मध्ये १५ कोटी. २००४–०५ मध्ये १५ कोटी ७७ लाख. जरा विचार करा मिळकत कराची ५० कोटीची जी वसुली आपण प्रस्तावित केली आहे ती होईल काय? तीच स्थिती पाणी पट्टी वुसलीची आहे. १० कोटीच्या ऐवजी आपण ४१ कोटी केली. मी आपणांस आपल्याच कार्यकालावधीतील आकडे देतो. २००२–०३ वर्षामध्ये वसुली झाली आहे १३ कोटी ४६ लाख, २००३–०४ या वर्षामध्ये ११ कोटी ५६ लाख. २००४–०५ या वर्षामध्ये ८ कोटी ४२ लाख. आता आपण लक्ष्य ठेवले आहे ४१ कोटीचे जरा विचार करा हे होईल काय? प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पात आपण मोठ मोठया गोष्टी करतात. १०२ कोटी रुपये खर्चाच्या बांधा व वापरा या तत्वावरील जलशुध्दीकरण केंद्राबाबत बोलत नाही. मी माहिती तंत्रज्ञान केंद्राबाबत बोललो त्याचा मी पुर्नउच्चार करत नाही. परंतु आपण विचार करा मागील चार वर्षामध्ये आपण लोकांना कोण–कोणती आश्वासने दिलीत? आपण हे सुध्दा म्हटले होते की, उल्हासनगरच्या शेजारी असलेली ६ गावे लवकरच महापालिका क्षेत्रात समाविष्ट केली जातील. आपण आणखी सुध्दा एक फार मोठे आणि सोनेरी स्वप्न शहर वाशियांना दाखविले. या सभागृहामध्ये असेही सांगितले होते की, एक फार मोठा वर्तृळाकार रस्ता तयार केला जाईल. शहाड, उल्हासनगर, विठ्ठलवाडी या स्टेशनवर वाहनतळ तयार केले जातील. व मला आठवते की, या सभागृहामध्ये आम्ही तसा ८२ कोटी रुपये खर्चाचा ठरावही पारीत केला होता. ठराव क्र १४, दि. १९/५/२००३. जरा विचार करा त्या प्रकल्पाचे काय झाले? याच सभागृहात आपण म्हटले होते की, हिराघाट येथे जो बोट क्लब आहे तो बांधा व वापरा या तत्वावर दिला जाईल. शहरामध्ये प्रदुषण नियंत्रण केंद्र उघडले जाईल. त्यासाठी फार मोठा काही खर्च नव्हता. फक्त १९ लाखाचा खर्च होता. जरा विचार करा हे काम झाले का? आपण या सभागृहामध्ये हे सुध्दा म्हटले होते की, आम्ही दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) नागरीकांना मिळकत कर माफ करु. जे पुरग्रस्त लोक आहेत, जसे दुस–या महानगरपालिकेने त्यांना एक वर्षाचा मिळकत कर माफ केला आहे त्याप्रमाणे आम्ही सुध्दा त्यांना एक वर्षाचा मिळकत कर माफ करु. पंर्तु आपण जरा विचार करा आपण हे केले आहे का? आपण रस्त्यांबाबत बोललात की, अमुक अमुक जे रस्ते तयार केले जातील जर प्रत्येक वर्षाचे रस्ते जर मी आपणांस सांगितले २००३ या वर्षी आपण किती रस्त्यांचे काम हाती घेणार होतात? २००४–०५ मध्ये तर आपण ५७ रस्ते विकसित करण्याचे ठरविले होते. याबाबतीतील आकडे सुध्दा अशा प्रकारे वाढले होते की, सर्वात प्रथम १० रस्ते त्यानंतर आणखी २७, त्यानंतर आणखी ३० रस्ते. अशाप्रकारे एकुण ५७ रस्त्यांची यादी तयार झाली होती. व आता आपण म्हणालात की, डिफर्ड पेमेन्ट सिस्टिवर आम्ही काम करु. याबाबतीत आपण जरा

विचार करा. याबाबत अर्थसंकल्पात आपण किती वेळा बोलल्या आहात.आणखी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो सौर प्रकल्पाबाबत आपण म्हणालात. मी आपणांस सांगु इच्छितो सौर प्रकल्प नावाचा जो प्रकल्प होता या प्रकल्पाचा उल्लेख प्रत्येक अर्थसंकल्पामध्ये येत असतो. कमीत कमी चौथ्यांदा आपण म्हटले आहे. जरा विचार करा, आपण आपल्या अंर्तमनाला विचारा की आपण हे केले आहे का?तर माझ्या मनामध्ये एक प्रश्न निर्माण होतो की माझ्या मनामध्ये प्रश्न निर्माण होतो की, येथे जे लोक बसले आहेत ते अशा या अर्थसंकल्पाला सहकार्य देतील का? जो अर्थसंकल्प पुर्णपणे वाढविलेला आहे. काय आम्ही अश्या अर्थसंकल्पास सहकार्य करु शकतो? ज्यामध्ये कर वसुलीचे जे लक्ष दिले आहे ते पुर्णपणे चुकीचे आहे. काय आम्ही अश्या अर्थसंकल्पास सहकार्य करु शकतो ज्यामध्ये कर माफीबाबत काही तरतुद नाही. मी आपणांस आठवण करुन देवु इच्छितो की, २००३–०४ मध्ये जेव्हा मिळकत कर वाढविण्याबाबत चर्चा केली जात होती ती आम्ही मिळकत कर दर वाढविण्याच्या विरोधात असु आम्ही वाढीचा प्रस्ताव मागे घेवु. तर काय आम्ही अश्या अर्थसंकल्पास मान्यता देवु शकतो. की ज्यामध्ये करवृध्दी बाबत काहीही उल्लेख नाही. काय आम्ही अशा अर्थसंकल्पास सहकार्य करु शकतो? ज्यामध्ये दारिद्रय रेषेखालील नागरीकांच्या कर माफीची क्षमता नाही. काय आम्ही अश्या अर्थसंकल्पास सहकार्य करु शकतो की ज्यामध्ये केवळ फक्त आश्वासनेच आहेत. जरा विचार करा. आपणांस उत्तर मिळेल. जास्त काही न बोलता मी माझे भाषण पुर्ण करतो. व अपेक्षा करतो की, आपण या बाबतीत विचार कराल. जय हिंद, जय महाराष्ट्र ।

**मा. सदस्या श्रीम. अनिता गुप्ता, श्रीम. निना नाथानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.** 

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :–</u> यांना असाच स्वरुपाचा अर्थसंकल्प पाहिजे काय? एक वर्षामध्ये कितीतरी कामे केलीत, ८५५ इमारती निष्कासनामधुन वाचविल्या. शहरामध्ये रस्ते तयार केले. ही कामे त्यांना दिसुन येत नाही काय?

<u>मा. उप–महापौरः–</u> श्री. बोडारेजी आपण बोलावे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> निती काय आहे? विरोधी पक्षाने प्रथम बोलावे नंतर सत्ताधारी पक्षाने असे काही आहे काय? मग मी बोलावे असा आग्रह का? श्री. नाना पवार बोलण्यासाठी उभे राहिले होते. त्यांना बसण्यास सांगितले, श्री. दिलीप लालवानी हे सुध्दा बोलण्यासाठी उभे राहिले होते. त्यांनाही बसविले.

<u>मा. उप–महापौर :–</u> नाही असे नाही, आपण बोललात तर चांगले होईल. आपल्यानंतर फक्त सभागृह नेते बोलतील.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> म्हणजेच इतर सदस्य बोलणार नाहीत?

<u>मा. उप–महापौर :–</u> बहुतेक करुन कोणी बोलणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> बहुतेक करुन कोणी बोलणार नाही असे न म्हणता निती काय आहे?

<u>मा. उप–महापौर :–</u>आम्हांला सुध्दा तेच वाटते की, आपल्या नंतर फक्त सभागृह नेत्यानेच बोलावे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौर महोदया, मला असे वाटते की, महिन्यातुन एक महासभा होते. व ही तर एक अत्यावश्यक अशी अर्थसंकल्पावरील सभा आहे. या सभेत सर्वांना चर्चा करण्याची संधी मिळाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>बिल्कुल. म्हणुनच मी बोलु इच्छितो. मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, उपमहापौर महोदय, उपस्थित सर्व अधिकारी, या सभागृहात उपस्थित आमचे सर्व सन्माननिय सदस्य, सर्वात प्रथम तर मी या अर्थसंकल्पाचे समर्थन करतो. विशेष करुन या गोष्टीचे समर्थन करतो की, या अर्थसंकल्पात कोणतीही कर वाढ केलेली नाही. यासाठी या अर्थसंकल्पाचे मी स्वागत करतो. महापौर महोदया, या अर्थसंकल्पाचे मी यासाठी ही सुध्दा समर्थन करतो की, या अर्थसंकल्पात नगरसेवक निधी २ लाखावरुन ४. ५० लाख रुपये केला आहे. या वेळेस आमच्या सभागृहामध्ये अर्थसंकल्पावर प्रदिर्घ चर्चा झाली आहे. आमचे सदस्य श्री. नथु सोनवणे, श्री. जमनु पुरस्वानी, श्री. बच्चाराम रुपचंदानी, श्री. दिलीप गायकवाड, श्री.

रामदास उमाप, श्री. प्रमोद टाले, श्री. लाल पंजाबीजी यांनी अतिशय चांगली चर्चा केली. अर्थसंकल्प भविष्याची रुपरेषा ठरवित असतो. व या गोष्टीला नेहमी खेळाडु वृत्तीने घेतले पाहिजे की, विरोधी पक्षाकडुन जर काही एखादी सुचना येत असेल तर ती ऐकुन घेतली पाहिजे. मा. महापौर महोदया व आयुक्त साहेब सुध्दा ऐकत आहेत. भलेही आमच्या विरोधी पक्ष सदस्यांनी कथा ऐकविल्या असोत, मागील अर्थसंकल्पाचे आकडे ऐकविले, त्या सर्व गोष्टी आम्ही काळजी पुर्वक ऐकल्या. व त्यांच्या विचारातुन आम्ही कोणकोणत्या गोष्टी घेवु शकतो. याचाही प्रयत्न केला. काय काय समजु शकतो. सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी म्हटले की, आपण आपल्या कुशलतेचा परिणाम कधी दिला नाहीत. या गोष्टीचे मला थोडे दु:ख झाले. हे संपुर्ण शहर आमच्या कुशलतेबाबत पुर्णपणे अवगत आहे. हेच कारण आहे की, १९८६ पासुन आजपर्यंत मधील २ वर्ष वगळता सत्ता आमच्याकडे आहे. म्हणजेच सर्वसामान्य जनता आमच्या कार्यकुशलतेबाबत परिचित आहे. तर बहुमताचा नेहमीच आदर केला पाहिजे. विरोधी पक्ष शहर हिताचे मुद्दे जर समोर आणत असेल त्यावर नियमित विचार केला पाहिजे. त्याबाबत विचार करण्याचा आम्ही जरुर प्रयत्न करु. तर मा. महापौर महोदया, या अर्थसंकल्पाचे मी यासाठी सुध्दा समर्थन करतो की, या अर्थसंकल्पामध्ये पवई पासुन उल्हासस्टेशन पर्यंतच्या एका रस्त्याच्या कामाची तरतुद केली आहे. हा रस्ता शहरासाठी एक वरदान ठरेल म्हणुन यासाठी सुध्दा अर्थसंकल्पाचे मी समर्थन करतो. परंतु येथे माझी एक लहानशी सुचना आहे. तीच्यावर सुध्दा लक्ष दिले जावे. सर्वात प्रथम वारंवार जकात, मालमत्ता कर, पाणीपट्टी वाढविण्यासाठीचा प्रस्ताव आणते का? यावेळेस सुध्दा कितपत दर वाढीचा प्रस्ताव आणला आपण तो मान्य केला नाही. शहराच्या हिताच्या दृष्टीने आपण निर्णय घेतला म्हणुन आपले स्वागत आहे. परंतु प्रशासनाला उत्पन्न वाढविण्यासाठी दुसरा काही मार्ग दिसत का नाही? उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत एक परिवहन सेवा सुरु केली पाहिजे. ज्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढु शकते. आता नुकतीच मिरा—भाईंदर महानगरपालिकेने परीवहन सेवा सुरु केली आहे. ज्या अंतर्गत एक निविदा काढण्यात आली त्या निविदेनुसार डिझेल ठेकेदाराचे, वाहनचालक ठेकेदाराचा, देखभाल ठेकेदाराची, फक्त वाहक महानगरपालिकेचा आहे. व तिकीट महानगरपालिकेने छापलेले असुन ते किलोमिटरच्या हिशोबाने दिले जाते यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ झाली आहे. काय आपण मिरा—भाईंदर महानगरपालिकेकडुन ही योजना आपल्याकडे राबविण्यासाठी विचार का करु शकत नाही? यासाठी मी आयुक्त महोदयांना हा प्रश्न विचारतो की, उल्हासनगर रेल्वे स्टेशनच्या बाहेर आमचे माजी नगराध्यक्ष व आमचे विद्यमान आमदार श्री. पप्पु कालानी यांनी एक फार मोठा जो खड्डा होता तो भरुन तेथे सिमेंट कॉंक्रिटचा एक टर्मिनन्स तयार केले. तर या ज्या आराम बसेस उल्हासनगर मधुन जातात किंवा एसटीच्या ज्या बसेस जातात, तेथे त्यांचे स्थानक तेथे तयार करण्यामध्ये महानगरपालिकेचे जाते काय? वाहतुकीची समस्या सुटु शकते. व तेथे बुकिंगसाठी गाळे वगैरे जे तयार केले जावु शकतात त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढु शकते. त्यासाठी महानगरपालिकेस काय खर्च येणार आहे? उल्हासनगर महानगरपालिकेची एवढी भाजी मार्केटस् आहेत, परंतु त्यातुन उत्पन्न मिळत नाही. ती जर आपण कुण्या ठेकेदारास दिली तर त्यामुळे काहीना काही उत्पन्न आपणांस मिळेल. यामध्ये महापालिकेचे जाते काय? उल्हासनगर महानगरपालिकेने पाणी पुरवठयाबाबत एवढया चांगल्या योजनेचा विचार केला. परंतु त्यावर अंमलबजावणी करण्यासाठी महापालिकेचे जाते काय? उल्हासनगर महापालिका क्षेत्राअंतर्गत जेवढे काही सार्वजनिक दिवाबत्तीचे दिवे आहेत त्यांच्या खर्चासाठी येथे बराचशा प्रयत्न केला आहे. श्री. मुकेश आयलानी यांना मिस्टर क्लीन म्हटले जाते त्यांना मी धन्यवाद देवु इच्छितो. परंतु रस्त्यावरील दिवाबत्तीस सौर ऊर्जेमध्ये रुपांतरीत करुन बांधा व वापरा या तत्वावर दिले जावे. व त्यांच्या खांबांवर एखादयाने जाहिराती लावुन या जाहिरातीच्या पैश्यातुन त्यांनी वसुली केल्यास त्यामध्ये महानगरपालिकेचे जाते काय? या शहरामध्ये आम्ही मुलभुत आवश्यक सेवा देवु शकलो नाहीत. या शहरात जवळ जवळ २०० सुलभ शौचालयांची व मुता—यांची आवश्यकता आहे. तर सुलभ शौचालय तयार करुन देण्यामध्ये, जेथे बाजारपेठा आहेत अशी ठिकाणे निवडुन काही ठेकेदाराने तेथे सुलभ शौचालय बांधले आहेत परंतु उर्वरीत ज्या जागा आहेत तेथे सुलभ शौचालय बांधण्यासाठी कुणी येत नाहीत म्हणुन अश्या ठिकाणच्या जमिनीचा पट्टा एखादया बेरोजगारास ३० वर्षासाठी करारतत्वावर दिल्यास तो बॅंकेकडुन कर्ज काढुन तेथे सुलभ शौचालय बांधु शकतो. तर या कामी ना हरकत दाखला देण्यास महापालिकेचे जाते काय? ॲन्थोनी ठेकेदाराबाबत ओरड केली जात आहे. मा. महापौरांनी सुध्दा निर्देश दिले होते. ३० हजारामध्ये जो कचरा उचलला जात होता तो पनवेलकर ५९ हजारात तर आता हे एक लाख १९ हजारामध्ये उचलत आहेत. ही महानगरपालिका ठेकेदाराकडुन योग्य पध्दतीने काम घेवु शकत नाही. तर त्याचा ठेका रद्द करण्यामध्ये आपले जाते काय? मी येथे सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष यामध्ये खेळ खेळत नाही तर या शहराला योग्य अशी दिशा देण्यामध्ये आपणा सर्वांना योग्य ती जबाबदारी पार पाडायची आहे. मा. महापौरांचे हेच प्रयत्न आहेत व हे सर्व प्रश्न मी आपल्या आयुक्त साहेबांना विचारत आहे. या प्रश्नांवर विचार केला जावा. कल्याण महानगरपालिका क्षेत्रामध्ये आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाटयास येणारे पाणी जात आहे. व उल्हासनगर वाशियांना पिण्यास पाणी मिळत नाही. उल्हासनगर स्टेशनच्या बाहेर पार्किंगचे बेकायदेशीरपणे शुल्क वसुल केले जात आहे. शहाड स्टेशनजवळ पार्किंगचे अवैद्यपणे शुल्क वसुल केले जात आहे. तर या ठिकाणचे पार्किंगच्या निविदा काढण्यामध्ये महापालिकेचे जाते काय? गुलशन नगर प्रकल्प हा एक

अतिशय चांगला प्रकल्प आमचे मा. आमदार श्री. पप्पु कालानी व मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी तयार केला आहे. प्रशासनाने त्यावर तत्परतेने कार्यवाही केली पाहिजे. त्यावर अंमलबजावणी करण्यामध्ये आपणा लोकांचे जाते काय? झाडे लावण्याची मोहिम सुरु झाली. निविदा काढण्यात आल्या. त्यानुसार ठेकेदाराने १८ महिन्यापर्यंत झाडे लावुन त्यास पाणी दयावे. कित्येक ठिकाणी तर झाडे गायब झालीत. काही ठिकाणावरुन त्याच्या सभोवतालची जाळी गायब झाली. १८ महिन्यानंतर बोलले जाईल की झाड लावलेले पाहिजे होते. ठेकेदार तेथे झाड लावल्याचे दाखवुन देईल परंतु त्याची १८ महिन्यापर्यंत जतन करण्याचे त्याचे काम होते ते जर त्याने केले नसेल तर त्याच्यावर निगरानी ठेवण्यामागे प्रशासनाचे जाते काय? प्रत्येक महिन्यामध्ये असे काही प्रस्ताव येतात की, अमुक एका ठिकाणचे पिंपळाचे झाड तोडायचे आहे. कडुलिंबाचे झाड, आंब्याचे झाड तोडायचे आहे. कुणाची काही हरकत असेल तर .................. अहो, कुणी हरकत का घेईल? शासनाचे काम आहे पर्यावरण वाचविणे. वृक्ष तोड होवु देवु नये. त्यावर लक्ष देण्यामध्ये प्रशासनाचे जाते काय? असे केले तर शहरामध्ये हिरवळता वाढु शकते. बोट क्लब बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर देण्याचा निर्णय झाला होता. सत्ताधारी पक्ष सुध्दा हे मान्य करत आहे. तसेच विरोधी पक्षाने सुध्दा हा मुद्दा उपस्थित केला आहे. परंतु प्रशासनास बांधा वापरा व हस्तांतरीत करा या स्वरुपाचा प्रस्ताव महासभेपुढे आणण्यामध्ये जाते काय? काय खर्च आहे? ८५५ इमारती नियमित करण्याचा महाराष्ट्र शासनाने अध्यादेश जारी केला आहे. व त्या अध्यादेशानुसार दंडाची जी काही रक्कम वसुल होईल ती महानगरपालिका क्षेत्राच्या विकासासाठी वापरली जाईल असे मा. मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख, मा. उप—मुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील व आमचे श्री. पप्पु कालानी साहेब यांनी म्हटले आहे की, अनाधिकृत इमारती लवकरात लवकर नियमित व्हाव्यात. याकामी प्रयत्न करण्यामध्ये प्रशासनाचे जाते काय? मी कित्येकवेळा म्हटले आहे की, या शहरामध्ये कुणी आपले घर किंवा एखादी खोली भाडयाने देत असेल तर आपल्या कर विभागातील कर्मचारी त्यास त्रास देतात की आपण भाडयाच्या हिशोबाने मालमत्ता कर भरा. परंतु या शहरामध्ये लग्नाचे हॉल, लान्स, पब, हॉटेल्स, लॉज व अश्या जेवढया काही व्यवस्था आहेत, त्यांच्याकडुन भाडयाच्या हिशोबाने मालमत्ता कर वसुल केला जात नाही. त्यांच्याकडुन आपण भाडयाच्या हिशोबाने मालमत्ता कर वसुल करावा. यामध्ये प्रशासनाचे जाते काय? कल्याण महानगरपालिकेमध्ये जकात विभागामार्फत १०० रुपये एस्कार्ट फी वसुल केली जाते. परंतु येथे एस्कार्ट फी २० रुपये ठेवण्यात आलेली आहे. येथे सुध्दा एस्कार्ट फी १०० रुपये केली जावी. असे केल्याने शहरातील व्यापा—यांवर कोणतेही ओझे पडणार नाही. परंतु एस्कार्ट फी १०० रुपये केली जात नाही. एस्कार्ट फी १०० रुपये करण्यामध्ये प्रशासनाचे जाते काय? असे केले तर महापालिकेचा कितीतरी महसुल वाढु शकतो. राहिला प्रश्न पाण्याचा, पाण्यामुळे महापालिका फार मोठया आर्थिक संकटात आहे. परंतु जेवढया काही व्यवसायीक नळजोडण्या आहेत त्यांकडे आयुक्त साहेब आपण लक्ष दयावे. अशा नळजोडण्यांचा नव्याने सर्व्हे करुन आपले उत्पन्न वाढविण्यामध्ये आपले जाते काय? दुकानांच्या बाहेर सामान लावणे, रस्त्यांच्या मधोमध हातगाडया उभ्या करणे, जनावरे मोकळी सोडणारे लोक, व आपले राज्य समजुन रस्त्याच्या मध्ये वाहने उभे करणारे लोक अश्या लोकांकडुन दंड वसुल करण्यामध्ये आपले जाते काय? या शहरामध्ये कित्येक उदयाने उद्वस्त झाली आहेत. त्यांना जर बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर देवुन ती हिरवीगार केली तर आपल्या महानगरपालिकेचा त्यामध्ये खर्च जातो काय? उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रत्येक मिळकतीवर महापालिकेचा मालकी हक्क लिहिलेला असला पाहिजे. टाऊन हॉल आपण ठेक्यावर दिला. तेथे कुमार सभागृह असे लिहिले आहे. नंतर जेव्हा ओरड केली तेव्हा कुठे अतिशय लहान अक्षरामध्ये जनरल अरुण कुमार वैद्य असे लिहिले गेले. परंतु महानगरपालिकेची मिळकत आहे. महानगरपालिकेचे नाव लिहिले नाही. प्रजापिता ब्रम्हकुमारी या संस्थेस आम्ही पीसपार्क दिले. त्यावर महानगरपालिकेची मालकी असल्याने महापालिकेचे नाव तर लिहिले जावे? आपणांस आपल्या मिळकतीवर हक्क सांगण्यामध्ये जाते काय? जेव्हा पासुन नगरपालिका/ महानगरपालिका स्थापन झाली आहे आम्ही किती साार्वजनिक शौचालय बांधली, त्यातील किती राहिली? ती पाहणे काय आपली जबाबदारी नाही? त्यातील किती शौचालये आपल्या परवानगी विना तोडली गेली? किती तरी मुता—या हडप केल्या गेल्या? हे पाहण्यामध्ये आपले जाते काय? हे पाहण्यामध्ये काही खर्च आहे काय? प्रत्येक बाबीसाठी म्हणता आपणाकडे पैसा नाही. प्रत्येक वस्तु पैश्याने होत नाही. सत्ताधारी पक्षाच्या सुचनांकडे आपण थोडे लक्ष दया. व आपण या शहराचा चौफेर विकास करु शकता. आमचे काम आहे प्रशासनास दिशा देणे आपण मालमत्ता कराची एवढी वसुली करुन दया. आपण अश्याप्रकारची व्यवस्था करुन दया जर प्रशासनाने कठोरतेने हे काम केले तर निश्चित पणे विरोधी पक्षांकडुन आमच्यावर अश्याप्रकारचे आरोप लागणार नाहीत म्हणुन या सभागृहात अर्थसंकल्पाबाबत आम्ही अशी सुचना करतो की, सत्ताधारी पक्षाकडुन आपणांस जे काही निर्देश दिले जातात त्यांच्याकडे आपण लक्ष दयावे. या शहरामध्ये अश्या काही इमारती आहेत ज्यांच्यावर मोठ मोठे टॉवर उभारण्यात आले आहेत. ते टॉवर कोणाचे आहेत? हे जाणुन घेवुन त्यांच्याकडुन शुल्क वसुल करणे हे महापालिकेचे काम आहे. महानगरपालिकेचे यामध्ये जाते काय? जसे श्री. लाल पंजाबी यांनी म्हटले आपण जरा विचार करा. त्यापध्दतीने आम्ही म्हणत आहोत आपले जाते काय? आमचे भाजपाचे गटनेता श्री. जमनादास पुरस्वानी यांनी अतिशय चांगली उदाहरणे दिली. त्याबद्दल धन्यवाद देतो. त्यांचे वक्तृत्व

अतिशय चांगले आहे. व मा. महापौर महोदया, ज्या स्थायी समितीच्या सभापती सुध्दा आहेत त्यांना पुन्हा एकदा धन्यवाद देतो. ज्यांनी शहराला दिशा देणारा अर्थसंकल्प, गरीबांचा कैवारी ठरणारा अर्थसंकल्प, कोणत्याही प्रकारची करवाढ करण्यात आलेली नाही अश्या प्रकारचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. कारण या शहरामध्ये ८५५ अनाधिकृत इमारतींचा मुद्दा चालु होता त्यामुळे शहरातील धंदा व्यापार काही अंशी बंद होता. या शहरामध्ये २६ जुलै रोजी जो पुर आला त्यामुळे बरेचसे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने सुचविल्याप्रमाणे जर करवाढ केली असती तर जखमेवर मीठ चोळल्यासारखे झाले असते. परंतु मा. महापौरांनी असे होवु दिले नाही. आणि यामुळेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने आम्ही आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या महापौर, उपमहापौर यांना पुन्हा एकदा धन्यवाद देतो. व अशा प्रकारे शहरवाशियांचे मन जिंकण्यासाठी आपण अतिशय चांगला असा संपर्क साधत गेला आहात व प्रशासनाला अधिकाधिक कार्यक्षम करुन उत्पन्न वाढविले तर चांगले होईल याचबरोबर एक लहानशी सुचना देखिल आहे. मा. महापौर महोदया, प्रस्तावित रस्त्यांची एक यादी तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये उल्हासनगर १ येथिल एखादा तरी रस्ता जरुर घ्यावयास पाहिजे होता. कराची रक्कम पुर्ण शहरामधुन गोळा होते. कॅम्प नं. ३ व ४ मध्ये बरेचशे रस्ते तयार झाले आहेत. ५ नंबरमध्ये सुध्दा रस्ते तयार करण्यात आले आहेत परंतु कॅम्प नं. १ मधील एखादया तरी रस्त्यांचे नाव आपण समाविष्ट करुन घ्यावे. हीच माझी आपणांस विनंती आहे, सुनिता अपार्टमेंटचा जो रस्ता आहे तो मेहरबानी करुन आपल्या अर्थसंकल्पात समाविष्ट करुन तो पारीत करावा. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र, जय भिम, जय झुलेलाल ।

मा. सदस्य श्री. मनोज साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> अर्थसंकल्पावरील चर्चेने प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करुन शहरामध्ये ज्या सत्यघटना घडत आहेत त्या आमचे श्री. दिलीप लालवानी यांनी सभागृहासमोर मांडल्या आहेत, प्रशासन काम करण्यामध्ये कश्याप्रकारे अपयशी ठरली आहे. यासाठी भारतीय जनता पार्टी व शिवसेनेच्या वतीने श्री. दिलीप लालवानी यांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष अशी कुणाच्या मनामध्ये भावना न ठेवता सर्वांमध्ये एक हृदय तर आहे. जो सत्यता जाणु शकतो. यासाठी मी पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टी व शिवसेनेच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवार :—</u> मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त व सचिव साहेब, सभागृहात उपस्थित असलेले सर्व सन्माननिय सदस्य , प्रथमतः मी या अर्थसंकल्पाचे समर्थन करतो. यामध्ये जनहित पाहिले गेले आहे. अंर्थसंकल्प पाहण्यापुर्वी मनामध्ये एक प्रकारची भिती होती. असे वाटत होते की, या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये जर वेगवेगळे कर वाढविले तर जनतेमध्ये फार मोठया प्रमाणावर नाराजी दिसुन येईल. त्याचे कारण असे आहे की, २६ जुलै रोजी शहरामध्ये मोठया प्रमाणावर जी पुर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती, त्यामध्ये नागरीकांचे फार मोठया प्रमाणावर आर्थिक नुसार झाले होते, जिवित हानी सुध्दा झाली होती. अशा परिस्थितीत प्रशासनाची शिफारस पाहता मा. महापौरांनी जर कर वाढ केली असती तर ते चांगले झाले नसते. मा. महापौरांनी एक अतिशय चांगला अर्थसंकल्प सभागृहासमोर मांडला आहे. अशा बिकट परिस्थितीत उल्हासनगर महानगरपालिकेची सत्ता आपण चालवत आहात. अशा स्थितीत सर्वांनी मा. महापौरांना सहकार्य दिले पाहिजे. व हा जो अर्थसंकल्प आहे तो एकमताने पारीत झाला पाहिजे असे मला वाटते. राहिली गोष्ट विकासाची, विकास कामे थांबलेली नाहीत ती होत आहेत. महानगरपालिकेत १०० कोटी रुपयांची वसुली होते ही काही लहानशी रक्कम नाही. आस्थापना खर्चाची कमाल मर्यादा पार झालेली नाही. आपण महाराष्ट्रातील इतर महानगरपालिका पाहिल्या तर त्यांचा आस्थापनेवरील खर्च मर्यादेच्या बाहेर गेला आहे. याचा अर्थ आम्ही लोक महानगरपालिकेस योग्य प्रकारे चालवत आहोत. आस्थापनेवरील खर्च झाल्यानंतर जो पैसा उरतो त्यातुन विकास कामे केली जात आहेत. जास्त उत्पन्न गोळा करण्याची आमची जर इच्छा असेल, अधिकाधिक विकास कामे करण्याची तर त्यात चुकीचे काय आहे? शहराचा विकास अधिकाधिक होवो हे तर प्रत्येक लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. व मला असा विश्वास आहे की, सत्ताधारी पक्षाचे जे लक्ष्य आहे ते जरुर पुर्ण होईल. येणा—या कालावधी मध्ये विरोधी पक्षीयांना टिकाटिप्पणी करण्याची संधी मिळणार नाही. ही अपेक्षा व्यक्त करुन मी अर्थसंकल्पावरील चर्चा समाप्त करतो. जय भिम, जय महाराष्ट्र, जय झुलेलाल ।

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मा. महापौर महोदया, उप—महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व सदस्य, प्रथम तर मी मा. महापौर महोदयाचे व सचिव साहेबांचे लक्ष वेधु इच्छितो की, स्थायी समितीमध्ये आमचे सदस्य श्री. नथु सोनवणे, श्रीमती रेखा कृष्णानी, यांनी या प्रस्तावास विरोध केला होता. परंतु ठरावामध्ये आपण लिहिले आहे की, सर्वानुमते मंजुर. असे जर स्थायी समितीमध्ये होत असेल तर ते चुकीचे आहे. जर कुणी सदस्य तेथे विरोध करत असेल तर प्रस्तावावर मतदान घेणे हे आपले काम होते. पीठासीन अधिकारी म्हणुन आपले कर्तव्य होते आदेश देण्याचे, जर त्यांनी आदेश दिले नसतील तर सचिवांचे काम होते मतदान घेण्याचे, परंतु हे जे झाले ते चुकीचे आहे. जर स्थायी समिती व महासभेमध्ये आमचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न होत असेल तर त्याचे उत्तर बाहेर देण्याचा आम्हांला प्रयत्न करावा लागेल हे लक्षात ठेवा. येथे मी स्पष्ट करु इच्छितो की, श्री. नथु सोनवणे यांनी असे म्हटले आहे की, हा जो अर्थसंकल्प आहे तो काल्पनिक आहे. अवास्तव आहे आमच्या श्रीमती संगीता जावळे यांनी सुध्दा म्हटले आहे की, यास आमचा विरोध आहे.

**मा. सचिव :—** मा. महापौर महोदया, सन्माननिय विरोधी पक्ष नेता साहेब यांनी जे म्हटले की, स्थायी समितीमध्ये अर्थसंकल्पाचा जो प्रस्ताव होता तो सर्वसंमतीने नव्हता. त्यांचे म्हणणे आहे की, स्थायी समितीमधील शिवसेना भाजपाच्या सदस्यांचा प्रस्तावास विरोध होता. ही गोष्ट बरोबर नाही. जेव्हा मा. आयुक्त साहेबांनी आपले अंदाज सादर केले. त्यानंतर सन्माननिय सदस्य श्री. नथु सोनवणे यांनी म्हटले की, त्यांचे मत या प्रस्तावाच्या विरुध्द आहे. जेव्हा आयुक्त साहेबांनी आपले अंदाज सादर केले होते त्याचवेळी त्यांनी असे म्हटले होते. त्यानंतर सर्व विषयांवर चर्चा झाली. सन्माननिय सदस्य श्री. नथु सोनवणे व शिवसेना—भाजपाच्या अन्य सदस्यांचे म्हणणे असे होते की, कोणताही कर वाढविता कामा नये. मा. आयुक्त साहेबांकडुन कर वाढीचा जो प्रस्ताव आला होता त्यास त्यांचा विरोध होता. जेव्हा सभेमध्ये चर्चा झाली चर्चेअंती अश्या निर्णयापर्यंत आले की, सत्ताधारी व विरोधी पक्ष यांचे एकच मत आहे की, कर वाढविता कामा नये. यावर बहुतांश सर्व सदस्यांचे एक मत झाले होते व त्यानंतर सन्माननिय सभागृह नेता की जे स्थायी समितीचे सदस्य आहेत. त्यांनी विरोधी पक्षाच्या सदस्यांना असे म्हटले की, आपणांस ज्या काही हरकती होत्या त्या हरकतीचे आम्ही निवारण केले आहे. आता सत्ताधारी व विरोधी पक्षाचे एकच मत आहे. म्हणुन हा जो प्रस्ताव आहे तो एकमताने पारीत झाला पाहिजे. त्यानंतर मी स्थायी समिती सभेमध्ये ३ वेळा मोठया आवाजात जोरदारपणे विचारणा केली. एकमत? एकमत? एकमत? त्यावेळेस कुणीही विरोध दर्शविला नाही. त्यानंतर मा. पीठासीन अधिकारी यांनी घोषित केले की, हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत केला जात आहे. नियम असा आहे की, जेव्हा सन्माननिय पीठासीन अधिकारी घोषणा करतात की, हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत झाला, तोपर्यंत त्या सभेतील कोणताही सन्माननिय सदस्य मतदानाची मागणी करत नाही तोपर्यंत त्यास सर्वसंमतीने पारीत झाल्याचे मानले जाते. व त्यानंतर अर्थसंकल्पाचा जो ठराव पारीत केला गेला त्यास सन्माननिय सदस्य श्री. नथु सोनवणे यांचे अनुमोदन आहे. व त्यांनी कुणाच्या जोरजबरदस्तीने ठरावावर स्वाक्षरी केली नाही व तो ठराव पुर्णपणे वाचल्यावरच त्यांनी स्वाक्षरी केली आहे. हे सर्व झाल्यानंतर मी जर दोषी असल्याचे वाटत असेल तर आपणच न्याय करावा.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** स्थायी समितीच्या इतिवृत्तांतात नोंद आलेली आहे व त्यांनी येथे सुध्दा म्हटलेले आहे की, शेवट पर्यंत त्यांनी म्हटले की, आम्हांला मंजुर नाही व हे बरोबर नाही. त्यानंतर श्री. किशोर वनवारी यांनी म्हटले आहे, आपण आमच्याशी सहमत आहात. श्री. किशोर वनवारी यांच्या नावाने एका वाक्याची अशी नोंद आली आहे की, आपण यावर नंतर बोलु. आपल्या मताशी आम्ही सहमत आहोत. व त्यानंतर काही सदस्यांनी पास—पास म्हटले आहे. त्यानंतर पुढे काही नाही फक्त ठराव पारीत झाला आहे. असे झाले आहे. अशी इतिवृत्तातात नोंद झाली आहे. त्या आधारावर मी बोलत आहे. यापुढे असे होता कामा नये. जर कुणी विरोध केला आहे, जो पर्यंत तो म्हणत म्हणत असेल की, होय मंजुर आहे, परंतु कुठेही त्याचा तसा उल्लेख नाही की, श्री. नथु सोनवणे, श्रीमती संगिता जावळे यांनी त्या प्रस्तावाचे अनुमोदन केले आहे. असा कुठेही उल्लेख नाही हेच मला म्हणायचे आहे.

मा. महापौर महोदया, २००६—०७ करिता आपण अर्थसंकल्प तयार करत आहोत. जसे श्री. दिलीप लालवानी यांनी म्हटले की, हा आपल्या भविष्यासाठी आहे. आपले भविष्य कसे असेल ते आपल्या हातात आहे. जर आपण चुकीच्या पध्दतीने जात असु तर निश्चितच आहे की, आपले भविष्य अंधकारमय आहे. जर आपणांस आपले भविष्य चांगले हवे असेल तर आपणांस आपले कर्तव्य, आपले वर्तमान चांगले असले पाहिजे. जर आपण वर्तमान काळामध्ये चुका करत असाल तर आपले भविष्य चुकीचेच आहे. मग आपण प्रशासनास विचारत राहणार की प्रशासनाचे जात काय आहे? आता आम्ही विचारत आहोत की, शासन करते काय आहे? कारण की, शासनाचे प्रशासनावर नियंत्रण असले पाहिजे. तर जेवढया वेळ श्री. दिलीप लालवानी यांनी म्हटले की, प्रशासनाचे जाते काय? मी एकच वेळ म्हणतो की, सचिव साहेब आपण तेवढया वेळ असे लिहावे की, प्रशासन करते काय? त्यांचे जे प्रश्न आहेत त्यासाठी शासन करते काय? श्री. दिलीप लालवानी आपली ती वाक्य जर मागे घेत असतील तर खुप चांगले होईल. २००५—०६ च्या अर्थसंकल्पामध्ये पृष्ठ क्र. २८ वर

डीपीडीसी मध्ये आपण जी तरतुद दर्शविली होती २ कोटी ४५ लाख व प्रत्यक्षात मिळाले ७५ लाख तर हा जो एक कोटी ४० लाखाचा फरक आहे तो कुठे गेला? कारण की, या वर्षी सुध्दा आपण तो कुठे कॅरी फॉरवर्ड केलेला नाही. या वर्षीचा डीपीडीसीचा निधी आहे ७५ लाख. मागील वर्षीचा निधी आपण दर्शविला होता २ कोटी ४५ लाख. प्रत्यक्षात खर्च झालेला आहे ७५ लाख ६६ हजार. तर एक कोटी ४० लाखाचा जो फरक आहे आणखी दुसरी एक गोष्ट आहे खासदार निधीतुन रिअप्रोप्रीएशन करुन तो निधी महापालिका इमारतीसाठी खर्च केला आहे. खासदार निधीची रक्कम जर दुस—या लेख्यामध्ये वर्ग करायची असेल तर ती आपण वर्ग करु शकतो का? त्यासाठी जिल्हाधिका—यांची मंजुरी असली पाहिजे?

**मा. सदस्य श्री. वाघे शामु, श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले.** 

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):—</u>............ २ कोटी ४५ लाख रुपये मंजुर होते. परंतु तेवढी रक्कम न मिळाल्यामुळे ती सिमित करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> जी रक्कम शासनाकडुन येते ती येणार असल्याचे निश्चित होते? मग ती का मिळाली नाही?

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):—</u>नाही, याबाबतचे प्रस्ताव तयार करण्यात आले होते. त्यानुसार मंजुरी मिळाली नाही. व एवढीच रक्कम आम्हांस मिळाली आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> म्हणजेच शासनाकडुन १ करोड ४० लाख रुपयांची निधी आमदार निधी म्हणुन यायची होती ती आली नाही. १ कोटी ४० लाखाची तुट, बरोबर ना? महापौर महोदया, आता अर्थसंकल्पावर चर्चा करतांना आमचे श्री. लाल पंजाबी यांनी शासनाच्या सर्व चुका आपल्या समोर मांडल्या आहेत. प्रशासनाने तर अदयापपर्यंत काही म्हटलेलेच नाही. परंतु नंतर म्हणतील, जेव्हा आम्ही या महासभेतुन बाहेर जावु, नगरसेवक निधीतील प्रस्ताव मंजुर करण्यासाठी सुध्दा निधी नाही. असे सांगतील. आता ज्या काही अडचणी आहेत, जे आपण करु शकत नाही, त्याबाबत प्रशासनाच्या माध्यमातुन खुलासा येणे आवश्यक आहे. आयुक्त साहेब, आपण या विषयावर टिप्पणी करा. माझे बोलणे झाल्यानंतर करा परंतु करा कारण अर्थसंकल्पीय लेखा शिर्षामध्ये ज्या कामांसाठी तरतुद आहे ती कामे करुन घेतल्याशिवाय आम्ही राहणार नाहीत म्हणुन होत असेल तर सांगा नसेल होत तर नाही म्हणुन सांगा. नाहीतर आमचे श्री. दिलीप गायकवाड नेहमी म्हणतात की, ''गाव जले और हनुमान बहार''जेव्हा कधी आम्ही आयुक्त साहेबांकडे जातो, नगरसेवक निधीतील कामांबाबत तेव्हा ते म्हणतात की, मी काय करु, पैसा कुठुन आणु. सगळयाचे नाटक करता येते, पैश्यांचे नाटक करता येत नाही असे आयुक्त साहेबांचे म्हणणे आहे. म्हणुन करु शकत असाल तर येथे सांगा, करु शकत नसाल तर तेही येथे सांगा. आम्हांला दु:ख होणार नाही. आता या अर्थसंकल्पावर चर्चा करतांना श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. लाल पंजाबी, श्री. दिलीप लालवानी यांचे मी खास अभिनंदन करतो. त्यांनी असे दर्शवुन दिले नाही की, मी सत्ताधारी पक्षाचा आहे की, विरोधी पक्षाचा आहे. पक्षभेद पार करुन त्यांनी शहराच्या हिताच्या दृष्टीने मुद्दे मांडले ते योग्य आहेत. त्यांचे पुन्हा अभिनंदन. प्रशासन अर्थसंकल्प तयार करते. त्यामध्ये शासन फेरफार करुन महासभेपुढे आणते. स्थायी समितीमध्ये ठराव बहुमताने किंवा एकमताने होतो, ही वेगळी गोष्ट आहे. प्रशासन अर्थसंकल्प कसा तयार करते याबाबत मला वाटते आमचे श्री. नथु सोनवणे अधिक चांगलयाप्रकारे आकडेमोड करु शकतील. श्री. जमनादास पुरस्वानी यांनी म्हटले की फक्त आकडयांची जुळवाजुळव मागील चार वर्षामध्ये काय होते, मिळकत करामध्ये, जकात करामध्ये किती आकडे ॲडजस्ट केले. प्रशासनाची चुक अशी आहे की, ते सुरुवातीपासुन याबाबतीत गंभीर नाही. व शासनही नाही. मी आपणांस दर्शवु इच्छितो की, मागील वर्षाच्या अर्थसंकल्पात प्रशासनाने १२६ कोटीचे उत्पन्न दर्शविले होते. २००२—०३ चा जो अर्थसंकल्प सादर केला होता त्यावेळेस मालमत्ता कराचे व जकात कराचे दर यापेक्षा कमी होते. परंतु त्यावेळेस प्रशासनाच्या वतीने जे अपेक्षित उत्पन्न दर्शविले होते ते १४८ कोटी रुपयांचे, खर्च दर्शविला होता १६८ कोटी, २० कोटीची तुट भरुन काढण्यासाठी त्यांनी मिळकत कर व पाणीपट्टीच्या करामध्ये वाढ केली होती. तेव्हा शासनाने तो वेगळाच अर्थसंकल्प सादर केला होता. त्यावेळेस आम्ही विरोध केला होता की, हे चुकीचे आहे. २००३—०४ मध्ये कोणतीही कर वाढ न करता १४८ कोटी रुपयांचे उत्पन्न दर्शविलेले असतांना त्यावेळेस प्रशासनाच्या वतीने १५७ कोटी रुपये दर्शविले. हे आकडे कुठुन आणले कसे आणले काही माहित नाही. मागील वर्षाचे उत्पन्न होते ९९ कोटीचे होते. व यांनी सरळ दर्शविले होते १५७ कोटी आता २००५—०६ मध्ये मालमत्ता करामध्ये वाढ झाली. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात टॅकर्सवर भाडे आकारले होते. व जकातीमध्ये

५.५ कोटी रुपयांचे दर वाढविले होते. तरीही प्रशासनाकडुन अर्थसंकल्पात जे अपेक्षित उत्पन्न दर्शविले होते १२६ कोटी रुपये. व या वर्षी जकात दरांमध्ये जी वाढ झाली आहे, मागील वर्षाची जकात वसुली होती ६५ कोटी रुपये. या वर्षाची अपेक्षित वसुली आहे ७२ कोटी. तरीही उत्पन्नामध्ये वाढ किती आहे? १२८ कोटी. हे कोणत्या आधारावर? फक्त आकडयांची जुळवाजुळव करण्याचे प्रशासनाचे काम चालु आहे, त्याचप्रमाणे शासनाचेही काम चालु आहे. आम्ही जेव्हा भविष्य बघतो तेव्हा आम्हांस असे दिसुन येते की, आमचे वर्तमानच खराब आहे. आमच्या श्री. नाना पवार यांनी सांगितले की, कुठेच कामे होत नाहीत. त्या सत्यतेचा त्यांनी स्विकार केला आहे. श्री. दिलीप लालवानी यांनी सुध्दा म्हटले आहे. त्या दिवशी मी शोले या चित्रपटातील डॉयलॉग सांगितला होता, अमिताभ विरुची शिफारस करण्यासाठी जातो. तो सर्व गोष्टीने खराब असतांना सुध्दा त्याचा मित्र चांगला आहे. त्याच्याशी लग्न कर असे मावशीला सांगतो. श्री. दिलीप लालवानी यांनी म्हटले अर्थसंकल्प अतिशय चांगला आहे. त्याचबरोबर श्री. नाना पवार यांनी सुध्दा म्हटले की, अर्थसंकल्प खुपच चांगला आहे. या शहरासाठी मा. महापौर महोदयांनी अतिशय चांगला अर्थसंकल्प दिला आहे, महापौर महोदया, आपले भाग्य आहे. मागील ५ वर्षापासुन आपण स्थायी समितीच्या सभापती आहात. सद्या महापौर आहात, सत्ता आपल्याकडे आहे. शहरास आपण चांगल्या दिशेने घेवुन जावु शकत होतात परंतु चुकीच्या नितीमुळे आपण उल्हासनगरची ही दशा केली आहे. श्री. दिलीप लालवानी यांनी म्हटले की, आमची निति चांगली आहे. श्री. किशोर वनवारी म्हणतात की, आम्हांला चार वेळा जनतेने निवडुन दिले आहे. म्हणजेच निति चांगली आहे. निति चांगली आहे असे नाही. मागील वेळेस लालु प्रसाद व राबडीदेवीचे उदाहरण दिले होते. लालुची काय स्थिती झाली? बिहारमध्ये त्यास तीनवेळा निवडुन दिले. आता गेला ना? जर योग्य निति अवलंबिली तर उल्हासनगरची प्रगती होईल. परंतु आपली निति चुकीची आहे हे श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले. बीपीएलची स्कीम, जेव्हा निवडणुक तोंडावर येते तेव्हा नितींची स्कीम काढली जाते. लोकांना फायदा मिळो अथवा न मिळो परंतु योजना जाहिर करतात त्याचा परिणाम उल्हासनगर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवर होतो. कारण की, लोक टॅक्स भरायचे विसरुन जातात. २१ हजार लोकांनी या योजने अंतर्गत अर्ज केले आहेत. ६०० लोकांना त्याचा फायदा मिळाला, नाही मिळाला ही गोष्ट वेगळी आहे. २१ हजार लोकांनी अर्ज केले. व अर्ज करुन ते स्तब्ध बसुन राहिले. टॅक्स भरण्यास ते तयार नाहीत. आपली ही निति चुकीची होती. त्याचा परिणाम उल्हासनगर महानगरपालिका भोगत आहे. दुसरे जसे बांधकाम आहे आपण प्रथम आराखडा तयार करतो आणि त्यानुसार बांधकाम करतो. जर बांधकाम नकाशा मंजुर करुन न घेता बांधकाम केले तर ते बांधकाम अनाधिकृत होते. जर प्लॅन दोन माळयांचा आहे आणि प्रत्यक्षात आपण सहा माळयांचे बांधकाम केले तर एक वर्षानंतर ती इमारत पडणारच आहे. त्यावेळेस चुक लोकांची राहणार नाही. जसे ८५५ इमारतींचे झाले. त्यांमध्ये राहणा—या लोकांचा दोष नव्हता. तो शासन आणि प्रशासनावर नंतर आला होता. तसेच या अर्थसंकल्पामध्ये आकडयांची जुळवाजुळव करण्याच्या चुकीच्या नितीचा अवलंब करत आहात त्याचा परिणाम महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीवर दिवसेंदिवस होत आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती बिघडत चालली आहे ती सांभाळण्याच्या पलिकडे आहे. महापौरांनी आपल्या भाषणामध्ये म्हटले, नियंत्रणाच्या बाहेर आहे हे केवळ आपल्या नितीमुळेच. तीन वर्षापुर्वी जकात खाजगीकरणाला विरोध होता. त्यावेळेस निवडणुका तोंडावर होत्या म्हणुन जकात वसुली महापालिकेने ताब्यात घेतली. त्यावेळेस नियंत्रण कोणाचे होते? महापौर महोदया, आपण आपल्या भाषणात म्हणालात की, जकात वसुलीची स्थिती नियंत्रणाच्या बाहेर होती. तर मग त्यावर नियंत्रण कुणाचे होते? नियंत्रण आपणांस करायचे आहे. गाडी आपल्या हातात दिली आहे. तीच्यावर नियंत्रण आपण ठेवायचे आहे. ज्या दिशेस घेवुन जायचे आहे त्या दिशेस आपण घेवुन जावु शकतात परंतु आपण योग्य ती दिशा दिली नाही. वरली येथे पुलाचे काम अर्धवट स्थितीत आहे. या पुलावरुन आपण ताशी १२० किलोमिटर वेगाने गाडी घेवुन गेलात तर गाडी शेवटी समुद्रातच बुडणार आहे. तर नियंत्रण ठेवणे हे आपले काम होते. परंतु आपण ते ठेवु शकला नाहीत हे श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले की आपण नियंत्रण ठेवु शकला नाहीत आपण फक्त प्रस्ताव पारीत केला. जे वायदे केले होते ते निभावुन नेले नाहीत त्याची कारणे ही आहेत. जकात विभागामध्ये प्रशासनाने त्याच चुका केल्या आहेत. मी दोघांच्याही चुका दाखवुन देत आहे. मागील वर्षी जकातीचे अपेक्षित उत्पन्न होते ७२ कोटी ५० लाख. स्थायी समितीने वाढवुन ते केले ७७. ५० कोटी. महासभेत हा प्रस्ताव जेव्हा आला तेव्हा सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सांगितले की, एवढी जकात वसुली होवु शकणार नाही. होवु शकत असेल तर प्रशासनास विचारा, त्यावेळेस प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले होते की, हा अंदाज आहे, अंदाज आहे तर मग त्यावेळेस कसे फसले? तर त्यावेळेस प्रत्यक्ष उत्पन्न मिळाले ६५ कोटी रुपये, बरोबर आहे? आता २००४—०५ मध्ये जकातीचे उत्पन्न ६१.७ कोटी होते, त्यामध्ये ५.५ कोटी रुपयांची वाढ केल्यानंतर ते होते जवळ जवळ ६८ कोटी.या रक्कमेवर १० टक्के नैसर्गिक वाढ पकडली तर तीही ७२ कोटीच्या आसपास जाते. व या वर्षाचे १० टक्के पकडले तर ७७ ते ७८ कोटीवर जकात उत्पन्न जावयास पाहिजे होते. ८० कोटीच्या आसपास जाते परंतु यावेळेस ते दर्शविले आहे ७२ कोटी. तर प्रशासन कोणते आकडे जुळवत आहे. कोणते प्रकार अवलंबित आहे हेच समजुन येत नाही. प्रशासन जो प्रस्ताव समोर आणते त्यामध्ये शासन सुधारणा करते. शासनाने, सत्ताधारी पक्षाने १९७ किंवा १९८ कोटी

म्हणजेच २०० कोटीच्या जवळपासचा आकडा निश्चित केला आहे. तर प्रशासनाने १२५ ते १३० कोटीचा आकडा दर्शवायचा भलेही उत्पन्न १०१ कोटी रुपये का ना हो? प्रत्येक वर्षी १०२ कोटीच्या वर आपले उत्पन्न कधीच गेले नाही. तरीही प्रशासन १२५ ते १२६ कोटीचे उत्पन्न गृहित धरते. ठिक आहे हा अंदाज आहे परंतु अंदाजामध्ये काही फरक असला पाहिजे १ टक्के, २ टक्के. जे जकातीचे उत्पन्न आम्ही ८० कोटी ठेवले होते ते ६१ कोटी वर गेले आहे. एवढा फरक आहे, हा अंदाज आहे? जर असे अंदाज राहिले तर आम्ही शहरास कुठे घेवुन जाणार आहोत? म्हणुन अंदाज तर बरोबर करा. या दृष्टीने आताचा आमचा जो अर्थसंकल्प आहे तो चुकीचा आहे. मी निती आणि नितीर्या या बाबत जे म्हटले आहे. श्री. निळकंठ खाडीलकर होते त्यांनी लिहिले होते की, नियती कुणाला माफ करत नाही. आता आपण बहुमताच्या आधारावर जर ठराव पारीत करणार असाल तर मी एक गाण्याचा संदर्भ देतो, ''मैं चाहु ये करु, मै चाहु वो करु, मेरी मर्जी''. असे येथे चालणार नाही. कधी ना कधी याचा आपणांस हिशोब दयावाच लागणार आहे. उत्पत्ती स्थिती आणि लय हा निसर्गाचा नियम आहे. जेथे स्थिती आहे, तेथे लय आहेच. परंतु स्थितीमध्ये राहत असतांना सर्व काही विसरुन जाणे चुकीचे आहे. जसा स्थायी समितीमध्ये बहुमताच्या जोरावर आपण चुकीचा निर्णय घेतला. वारंवार असे होत आहे. प्रत्येक माणुस आपल्या मागील चुका सुधारत असतो. मागे वळुन त्याने पाहिले तर आपली चुक काय आहे तरच तो ती चुक सुधारु शकेल. व त्याचा परिणाम चांगला येवु शकेल. परंतु आपण मागे वळून पाहणारच नसाल प्रत्येक वर्षी आपला अर्थसंकल्प ७२ कोटी, १६३ कोटी, १७० कोटी, १९० कोटी, १९७ कोटी मात्र प्रत्यक्षात आपले उत्पन्न आहे १०१ कोटी रुपयाचे, ९९ कोटीचे आपण हे पाहत नाहीत? आपण हे पहा. जागे रहा, आपण जे करत आहात ते चुकीचे करत आहात. आमचे श्री. किशोर वनवारी, श्री. दिलीप लालवानी यांना हे पसंत आहे—पसंत नाही. त्यांनी त्यांच्या मनातील गोष्ट सांगितली. त्यांना अर्थसंकल्प पसंत नाही. परंतु तरीही त्यांनी म्हटले की, अर्थसंकल्प अतिशय चांगला आहे, प्रशासनाचे काय जाते असे म्हणुन त्यांनी अर्थसंकल्प पसंत नसल्याचे दर्शवुन दिले आहे. परंतु त्यांनी कुण्या एखादया व्यक्ती किंवा पक्षाच्या बाबतीतील भावना न ठेवता, त्यांनी ती शहराच्या बाबतीत ठेवल्यास ती योग्य होईल. निती चांगली असेल तर नितीर्या सुध्दा चांगल्या राहतील. आपण चांगल्या पध्दतीने अवलंब करु शकला व त्याचा फायदा उल्हासनगरला होईल. कृपया या अर्थसंकल्पामध्ये जी वास्तविकता आहे ती समोर ठेवुन अर्थसंकल्प तयार करा. अन्यथा या अर्थसंकल्पास आमचा पुर्णपणे विरोध आहे.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव, श्री. राज असरोंडकर हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—</u>मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब, सभेचे कामकाज सुरु झाले तेव्हापासुन मी असा विचार करत होतो की, या सभेमध्ये बराच गोंधळ होईल परंतु असा काही गोंधळ या सभेत झालेला नाही. याचा अर्थ असा आहे की, हा अर्थसंकल्प अतिशय चांगला आहे. या अर्थसंकल्पामध्ये जनतेचा पुर्णपणे विचार केला गेला आहे. आता आताच पुर येवुन गेला आहे. त्या पुरपरिस्थितीतुन लोक अदयाप सावरलेले नाहीत. अश्या लोकांवर जर आपण कर वाढ केली तर लोक नाराज होतील. दुसरी गोष्ट अशी की, ८५५ अनाधिकृत इमातींच्या निष्कासनाबाबतची जी काही कार्यवाही चालु होती त्याबाबत सुध्दा लोक दुःखी होते असे असतांना जर आपण कर वाढविले तर लोक आणखी दुःखी होतील. या सर्व परिस्थितीचा विचार करुन हा अर्थसंकल्प तयार केला आहे. यासाठी मा. महापौर व स्थायी समितीच्या सभापती यांचे मी आभार प्रकट करतो. येथे ब—याचश्या सदस्यांनी चर्चा केली. सन्माननिय सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी मागील वर्षाच्या अर्थसंकल्पातील आकडेवारीची माहिती दिली. मा. महापौरांनी काय काय आश्वासने दिली होती व ती पुर्ण केली नाहीत. या ऐवजी जर त्यांनी असे सांगितले असते की, त्यांनी काय काय करावयास पाहिजे हे जर त्यांनी सांगितले असते तर त्यामध्ये त्यांचे काय जाते? श्री. जमनु पुरस्वानीजी जरा विचार करा आपण जर चांगल्या चांगल्या सूचना केल्या असत्या तर आपले काय गेले असते? या अर्थसंकल्पाचे समर्थन करतांना येथे एक गोष्ट सांगु इच्छितो, एकदा सखाराम आपले गाढव विक्रीस घेवुन चालला होता. त्यांच्याबरोबर त्यांचा एक लहान मुलगा सुध्दा होता. हे तिघेही बाजाराकडे चालले होते. समोरुन एक महिला येत होती, ती म्हणाली, अरे सखाराम या गाढवावर या मुलाला बसविले असते तर यामध्ये तुझे काय गेले असते? त्यावर सखारामने विचार केला की, हे बरोबर आहे. त्याने त्या मुलाला गाढवावर बसविले व पुढे चालु लागला. रस्त्यात त्याला काही वृध्द लोक भेटले. ते म्हणु लागले असा काय मुलगा आहे हा? आपल्या म्हाता—या बापाला पायी चालण्यास लावले व स्वतः गाढवावर बसला आहे. हे काही चांगले नाही. त्या मुलास म्हणु लागले जरा विचार कर तु तुझ्या वडिलांना गाढवावर बसविले असते तर त्यामध्ये तुझे काय गेले असते? त्यावर त्या मुलाने विचार केला की, हे बरोबर आहे. त्याने आपल्या वडिलांना गाढवावर बसविले व स्वतः पायी चालु लागला. काही अंतर पुढे गेल्यानंतर काही महिला भेटल्या. त्या म्हणु लागल्या काय हा म्हातारा माणुस आहे? स्वतः गाढवावर बसला आहे, या मुलाला सुध्दा बसविले असते तर त्यामध्ये त्याचे काय गेले असते? त्यानंतर त्याने मुलाला

सुध्दा गाढवावर बसविले. ते गाढव लहानसे होते. त्यावर हे दोघे बाप—लेक बसले होते. थोडे अंतर पुढे गेल्यानंतर आणखी काही माणसे भेटली. ते म्हणु लागले की, अशी काय ही माणसे आहेत, दोघेच्या दोघे गाढवावर बसले आहेत, त्या लहानश्या गाढवाचा विचार करत नाहीत. गाढव मरणार नाही? त्यावर सखारामने विचार केला की, हेही बरोबर आहे. तर या गोष्टीवरुन असे दिसुन येते की, लोकांचे काम आहे सांगण्याचे, लोक तर सांगतच राहतील, आपण आपले काम केले पाहिजे. व हा जो अर्थसंकल्प आहे तो अतिशय चांगला आहे. त्याचे मी समर्थन करतो. आमच्या पॅनलचे नगरसेवक श्री. प्रमोद टाले यांनी जे म्हटले की, अर्थसंकल्पात सुभाष टेकडीकडे लक्ष दिले नाही. तर कृपया याबाबतीत जरा लक्ष दिले जावे. याचबरोबर दुर्बल घटक व गलिच्छ वस्ती निधीमध्ये जर थोडा निधी वाढविला तर बरे होईल. अर्थसंकल्पाचे समर्थन करुन मी माझे भाषण संपवितो.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u> धन्यवाद, महापौरजी. अर्थसंकल्पाच्या शेवटच्या पृष्ठाकडे मी आयुक्तांचे लक्ष वेधु इच्छितो. वेगवेगळया ठिकाणावरुन घेण्यात येणा—या कर्जाचा त्यांनी तपशिल दिला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडुन कर्ज घेतले आहे. हुडको कडुन कर्ज घेतले आहे. एमएमआरडीए कडुन कर्ज घेतले आहे. ते पाहिले तर ९७६० कोटी म्हणजे जवळ जवळ १० हजार कोटी पर्यंत आपण कर्ज घेतलेले आहे. व त्यावर आपणांस २१ कोटी रुपयाचे नुकसान होत आहे. माझी आपणांस अशी सूचना राहिल की, १४.५ टक्के व्याज दाराची जी कर्ज आहेत तसेच १५.४५ टक्के व्याज दराची जी कर्ज आहेत किंवा १३ टक्के व्याज दराची जी कर्ज आहेत तसेच ११ टक्के व्याज दराची जी कर्जे आहेत आजच्या तारखेला व्याजाचा दर अतिशय कमी झालेला आहे. अतिशय कमी दरामध्ये बाजारपेठेत किंवा हुडको सारख्या संस्थाकडुन फार मोठया प्रमाणावर कर्ज उपलब्ध होवु शकते. म्हणुन नविन कर्ज घेवुन जुने कर्ज फेडण्यात यावे. कारण की, ९ हजार कोटी घेतल्यानंतर आपणांस २१ कोटी दयायचे आहेत. हे जे नुकसान आहे ते दिवसेंदिवस वाढत जाईल. आता यावर आपण नियंत्रण ठेवले नाही तर पुढे खुप त्रासाचे होईल. नविन कर्ज घ्या किंवा त्याच संस्थांना सांगा की व्याजाचा दर कमी करा. धन्यवाद.

**मा. सदस्या श्रीमती दिपा पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब व सन्माननिय सदस्य महापौरांनी जो अर्थसंकल्प सादर केला आहे त्याचे मी समर्थन करतो. दारिद्रय रेषेखालील नागरीकांचा मिळकत कर माफ करण्याच्या योजनेवर बोलतांना ब—याचशा सदस्यांनी आपल्या मा. महापौरांवर आरोप लावले आहेत. परंतु यावर मी प्रकाश टाकु इच्छितो की, आतापर्यंत ६०० अर्जांना मंजुरी देण्यात आलेली आहे व असे म्हटले जाते की, २१ हजार अर्ज अजुन प्रलंबित आहेत. हे जे अर्ज आहेत त्यातील काही अर्ज चुकीचे असल्याचे मला वाटते. मा. महापौरांनी मागील दोन महिन्यापासुन बीपीएल संदर्भात तहसिल येथे दोन बैठक घेतल्या आहेत, त्यांचा सर्व्हे बरोबर झाला पाहिजे यासाठी दखल घेतली पाहिजे.. यासाठी मी महापौरांना धन्यवाद देतो. तो सर्व्हे करण्यासाठी सुवर्ण जयंतीचे प्रकल्प अधिकारी श्री. गायकवाड यांची नेमणुक केली आहे. परंतु ते सक्षम नाहीत की ते बीपीएलच्या सर्व्हेक्षणासाठी पाठपुरावा करु शकतील. तसेच पर्यावरणाच्या बाबतीत आमच्या आमदार साहेबांनी पर्यावरण केंद्र चालु केले आहे. जी दुर्गंधी बाहेर पडते ती नियंत्रीत करण्याचा प्रयत्न केला आहे. या दोन—चार मुद्दयांबाबत आमच्या महापौर महोदया व आमदार साहेब नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत. मला दुःख होते की, प्रशासन कोणत्याही बाबतीत बरोबर पाठपुरावा करत नाही. जसे नुकताच पुर आला होता त्यात बाधित झालेल्या लोकांना पुरग्रस्ताचा दाखला मिळायला पाहिजे होता. त्याबाबत सुध्दा प्रशासन काहीही प्रयत्न करत नाही. एवढे बोलुन मी माझे दोन शब्द संपवितो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u> मा. महापौरजी, आता आताच आमचे मित्र श्री. शांताराम निकम यांनी म्हटले की, या अर्थसंकल्पावर बराच गोंधळ व्हावयास पाहिजे होता. परंतु त्यांना मी सांगु इच्छितो की, सत्ताधारी पक्षाचे श्री. दिलीप लालवानी यांनी बराचसा हल्ला केला आहे. विरोधकांची जरुरत पडली नाही. राहिली गोष्ट यांचे काय जाते? त्यांचे काय जाते? श्री. शांताराम निकम हे चांगले शिक्षक आहेत. ते ज्या शाळेमध्ये शिकवितात त्या शाळेकडे अधिक लक्ष न देता, त्यांनी उल्हासनगरच्या राजकरणामध्ये अधिक लक्ष दिले आहे. त्यामुळे त्यांच्या शाळेचे जेवढे काही विदयार्थी होते ते नापास झाले. मी त्यांना सांगु इच्छितो की, तिकडे लक्ष दिले असते तर यांचे कायम गेले असते? ते विदयार्थी तर पास झाले असते. दुसरी गोष्ट अशी की, आमचे मित्र श्री. चंदाराम मोकल यांनी सांगितले की, दारिद्रय रेषेखालील ज्या ६०० नागरीकांचा मिळकत कर माफ करण्यात आलेला आहे त्या नागरीकांना पुन्हा मालमत्ता कराची देयक पाठविण्यात आलेली आहेत. यावर लक्ष दिले तर अधिक चांगले होईल.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** मा. महापौरजी, अर्थसंकल्पावर बोलण्या अगोदर थोडया उशिराने हा प्रस्ताव मांडत असल्याबद्दल क्षमा मागतो. आमच्या कर विभागातील कर्मचारी गिरधारी ठाकुर यांचे आज निधन झाले आहे. मला असे वाटते की, २ मिनिट स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली दिली जावी.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—** मा. महापौर महोदया, टॅकरचा एक क्लीनर, आकाश कॉलनी येथे टॅकर खाली येवुन मरण पावला आहे. त्याला सुध्दा श्रध्दांजली अर्पित केली जावी.

---

शोक प्रस्ताव

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

उल्हासनगर महापालिकेचे कर विभागातील कर्मचारी श्री. गिरधारी ठाकुर यांचे दिनांक १५.२.२००६ रोजी निधन झाले आहे. तसेच टॅकरचा एक क्लीनर आकाश कॉलनी येथे टॅकर खाली येवुन मरण पावला आहे.

यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ८० अ — दिनांक:—१५.२.२००६

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. गिरधारी ठाकुर व टॅकर खाली चिरडुन मरण पावलेला टॅकरचा एक क्लीनर यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—** महापौर महोदया, मला असे वाटते की, एक नविन अधिकारी आपल्या महापालिकेत आले आहेत. त्यांचा परिचय करुन दिला जावा.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** मा. महापौरजी, अर्थसंकल्पावर मला २ शब्द नव्हे तर बरेचसे शब्द बोलायचे आहेत कारण की, प्रत्येक जण बरीचशी चर्चा केल्यानंतर शेवटी म्हणतो की, मी माझे दोन शब्द समाप्त करतो. सर्वात प्रथम मी आमचे श्री. नथु सोनवणे यांनी उपस्थित केलेल्या विषयाबाबत बोलु इच्छितो. स्थायी समितीमध्ये सर्व सदस्य उपस्थित होते. अधिकारी उपस्थित होते. अर्थसंकल्पाचा जो प्रस्ताव पारीत झाला तो आम्हां सर्वांच्या समोर पारीत झाला. त्या प्रस्तावावर आम्हां सर्वांचे एकमत झाले होते. श्री. नथु सोनवणे यांनी म्हटले गाय आमची माता आहे, आम्हांला काही येत नाही. तर मी म्हणु इच्छितो की, बैल आमचा बाप आहे, सही करणे पाप आहे.

मा. सदस्या श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— आपण एकदम बरोबर बोललात. आम्ही बीपीएलच्या प्रस्तावावर स्वाक्षरी केली. फक्त आपल्याच प्रभागातील ६०० अर्जांना मंजुरी मिळाली. इतर प्रभागातील नागरीकांचे बीपीएलचे अर्ज मंजुर झालेच नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मी मान्य करतो आपणांवर दबाव आहे. आता आपण नाही म्हणता, ठिक आहे. आमच्या श्री. जमनु पुरस्वानी यांनी जे म्हटले की, अर्थसंकल्प असा आहे, तसा आहे. प्रभाग समितीच्या बैठका होत नाहीत. मी त्यांना सांगु इच्छितो की, जेव्हा जेव्हा बैठका होतात. तेव्हा ते धुळयाला जातात. जास्त करुन ते येथे राहतच नाहीत ते धुळयाला जातात.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— हरकतीचा मुद्दा, मला सांगा की, प्रभाग समिती क्र. १ मध्ये किती लाखाची कामे झाली आहेत? एक रुपयाचे सुध्दा झाले नाही.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :— तुमची ही भुल आहे. आपण खोटे बोलता. आपण येथे राहतच नाही. आपण धुळयाला जातात.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :— श्री. जमनु पुरस्वानी यांनी प्रथम हे सांगावे की, ते धुळयाला का जातात?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आयुष्यामध्ये कुणीही प्रॅक्टीकली बोलतच नाही. येथे शायरी म्हणुन दाखवितात, सिनेमांची गाणी गातात. स्वत: काहीपण बोलतात. परंतु दुस—याचे सहन करु शकत नाहीत. आज मला श्री. गुरुनानक देव यांचे एक उदाहरण आठवते. गुरुनानक देवजी दोन लोकांना घेवुन आपल्या गावी गेले. तेथे एका माणसाने त्यांची सेवा केली. त्यांना खाऊ पिऊ घातले, मान सन्मान दिला. त्याला त्यांनी शेवटी शेवटी आर्शिवाद दिला. परमेश्वर करो, तुझा सर्वीकडे संचार होवो. त्यानंतर ते दुस—याकडे गेले. जेथे त्यांच्याशी सन्मानपुर्वक व्यवहार केला गेला नाही. खाऊ पिऊ घातले नाही, मान सन्मान दिला नाही. त्यास त्यांनी आर्शिवाद दिला की, तु या एकाच ठिकाणी आयुष्यभर रहा. तर यावर ते शिष्यगण घाबरुन गेले व म्हणाले की, ज्यांनी सेवा केली त्यांना तुम्ही सर्वीकडे फिरत रहा असा आर्शिवाद दिला तर ज्यांनी सेवा केली नाही, जे लोक खराब आहेत त्यांना म्हणतात की तुम्ही एकाच ठिकाणी रहा. चांगले लोक सगळीकडे जातील तर ते चांगलेपणा सर्वीकडे पसरवतील व घाणेरडे लोक एकाच ठिकाणी राहिले पाहिजेत याचा अर्थ असा की, अर्थसंकल्पामधील ज्या काही वाईट गोष्टी आहेत त्या काढुन टाकल्या पाहिजेत. चांगल्या सूचना दिल्या पाहिजेत. जसे श्री. शांताराम निकम यांनी म्हटले, मा. स्थायी समिती सभापती ज्या येथे अर्थसंकल्प सादर करतात तसे करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. स्थायी समिती सभापती महासभेमध्ये अर्थसंकल्प सादर करतात. स्थायी समितीमध्ये मा. आयुक्त अंदाज सादर करतात. तेथे ते त्यांचे कर्तव्य आहे. तेथे आम्ही त्यांचे ऐकुन घेतल्यानंतर पुन्हा पुढील वर्षाचा अर्थसंकल्प. श्री. लाल पंजाबी व इतर लोकांचे सुध्दा ऐकुन घ्यावे लागते. आम्ही सर्वांचे अतिशय चांगल्याप्रकारे ऐकुन घेतो. ठिक आहे पुढील वर्षी बोला. तर आज अर्थसंकल्पावर ही जी चर्चा होत आहे. आपण लोक फिरुन फिरुन असे म्हणतात की, हा आकडा चुकीचा आहे, तो आकडा चुकीचा आहे. आपण आम्हांस उत्साहित करु इच्छिता. आयुक्त साहेबांनी ६३ कोटी तुटीचा जो अर्थसंकल्प आमच्यासमोर सादर केला आहे, त्यानुसार आम्ही सर्व बाबींवर कर वाढ करावी. परंतु आम्ही शहरवाशियांवर कोणतीही नविन कर वाढ लादु इच्छित नाही. आपण लोक आम्हांस कितीही उत्साहित करा आम्ही कर वाढ करणार नाही. आम्ही लोक थकबाकीवरच लक्ष केंद्रीत करुन थकबाकी वसुल करु. आमच्याकडे निर्विवाद बहुमत असल्याने आम्ही कोणतीही कर वाढ करणार नाही ही आमची जबाबदारी आहे. यावर्षी ८५५ अनाधिकृत बांधकामाच्या निष्कासनाचा मुद्दा आला. पुरपरिस्थिती उद्‌भवली. यामुळे शहरातील व्यापार ठप्प झाला. त्यामुळे कुणावरही नविन कर लादणे सत्ताधारी पक्ष कधीही मान्य करणार नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— हरकतीचा मुद्दा, हे चुकीचे बोलत आहेत आम्ही कधीही कर वाढ करण्याबाबत बोललो नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– या अगोदर चार वेळा वाढविलात.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–श्री. शांताराम निकम यांनी म्हटले की, प्रत्येकाचे मत असते. प्रत्येक सदस्य अभ्यास करुन आपले विचार मांडत असतो. व हे म्हणतात की, शायरी करतात. आमच्या सदस्यांनी अभ्यास करुन येथे वस्तुस्थिती व आकडेवारी मांडली आहे, त्यावर आपण चर्चा करा ना? ज्याबाबत आम्ही बोललो नाही ते आपण का मांडत आहात? आपण करा किंवा करु नका आपल्या हातात आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– यांना दुसरे काही काम नाही. हे फक्त अभ्यासच करत राहतात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मला आपणाकडुन प्रमाणपत्र घ्यायचे नाही. श्री. नथु सोनवणे मला प्रमाणपत्र देवु शकत नाहीत. माझी जी भुमिका आहे ती मी पार पाडेन. आपणाकडुन मला प्रमाणपत्र घ्यायचे नाही.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– आपण हुशार आहात, त्याबद्दल नाही बोलत मी. मी हे सांगु इच्छितो की,....

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–येथे दोनच पर्याय आहेत, एकतर कर वाढविणे व दुसरे म्हणजे आकडयांची जुळवाजुळव केली पाहिजे. तसे केले नाही तर कर वाढविले पाहिजेत. हे दोनच मुद्दे आहेत, तीसरा मुद्दा आहेच नाही.

मा. महापौर :–श्री. नथु सोनवणेजी, कृपया आपण बसुन घ्यावे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– मी काही टिप्पणी करत नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:– आपण मला उत्तर देण्यासाठी नाहीत. मी अर्थसंकल्पावर बोलत आहे.

मा. महापौर :–काही सदस्यांनी अर्थसंकल्पावर आप–आपले विचार व्यक्त केले आहेत. ज्यांनी केले नाहीत त्यांना बोलु दिले जावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– आता मी दुसरे एक उदाहरण देवु इच्छितो. श्री. लाल पंजाबी साहेबांनी आम्हांस ब–याचशा गोष्टी सांगितल्या. परंतु त्यातील एक गोष्ट आम्हांला खटकली. रेल्वेचे जेव्हा कधी भाडे वाढते तेव्हा एक व्यक्ती त्यांना बॅकेत चहा पाजतो. हे म्हणतात की, रेल्वेची भाडे वाढ झाली मग आपण आम्हांस चहा का पाजता? त्यावर तो व्यक्ती म्हणतो की, मी रेल्वेचे कधीही तिकीट थोडेच घेतो? तो तिकीट चोर आहे. आणि हे त्यांची चहा पितात, तिकीट चोराची चहा पितात. तर असेही होता कामा नये. आमचे श्री. लाल पंजाबी सन्माननिय नगरसेवक आहेत. त्यांनी तिकीट चोराचा चहा पिता कामा नये. आपण त्यांची सुध्दा चहा पिता?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– माझे बोलणे आपणांस समजले नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– श्री. लाल पंजाबी साहेबांनी म्हटले, विचार करा, विचार करा. विचार करता करता मागील सहा वर्षापासुन या निर्णयापर्यंत पोहचले आहेत की, हे सहा वर्षापासुन बोलत आहेत, बोलणे बंद करणार नाहीत. तर माझी मा. महापौरांना विनंती आहे की, जरा विचार करा आणि जाते काय? या दोघांची एक समिती तयार करा. जरा विचार करा या समितीचे सभापती श्री. लाल पंजाबी यांना करा. आणि यामध्ये जाते काय या समितीचे सभापती श्री. दिलीप लालवानी यांना करा. आपण या दोन समित्या तयार करु या. आणि हे जे ठिक नाही आहे अशा परिस्थितीबाबत आपण लोक आम्हांला सूचना करा व सुधारणा करुन दया. एक कमिटी स्थापन करुन तिचे नावच ठेवु या, जरा विचार करा. व दुस–या समितीचे नाव ठेवु यामध्ये जाते काय. याबाबतचा ठराव सर्व संमितीने पास करु या.

मा. सदस्य श्री. राजु टेकचंदानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–</u> करत काय आहेत? ही समिती कधी तयार होईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> आज यांनी जो बीपीएलचा मुद्दा उपस्थित केला, आज कुणी म्हटले सहाशे अर्जांना मंजुरी मिळाली आहे तर कुणी म्हटले पाचशे मंजुर आहेत. मी स्थायी समितीमध्ये सदस्य आहे. म्हणुन मला माहिती आहे की, साधारणत: नऊशे प्रकरणांना मंजुरी मिळालेली आहे. व हेही मान्य करतो की, दारिद्रय रेषेखालील ज्या नागरीकांनी मालमत्ता कर माफीसाठी अर्ज दिला आहे, त्याचा कर माफ केल्यानंतरही थकबाकी दर्शवुन त्यांना बिल पाठविले जात आहे. जे २१ हजार अर्ज प्रलंबित असल्याचे आपण म्हंटलात त्याबाबत मी खुलासा करु इच्छितो प्रत्यक्षात ९,६०० अर्ज प्रलंबित आहेत त्याबाबत स्थायी समितीत सुध्दा मी बोललो आहे की हे अर्ज ३१ मार्च पर्यंत निकाली निघाले पाहिजेत. याबाबत मी सर्व सदस्यांना विनंती करेन की, बीपीएलची जी योजना आहे, ती यावर्षी सुध्दा चालु राहिली पाहिजे. व त्यांची कर माफीची जी विनंती आहे ती २००३ व २००४ या वर्षापर्यंत सीमीत राहिली पाहिजे. त्याचबरोबर कर विभागातील अधिकारी व कर्मचा–यांना महापौर निर्देश देतील की, या योजनेचा फायदा फक्त झोपडीधारक, बॅरेकमध्ये राहणा–या लोकांनाच होवु नये तर इमारतीमध्ये राहणारा एखादा ज्याचे उत्पन्न २४ हजाराच्या आत आहे, त्यासही बीपीएल स्कीम नुसारचा फायदा मिळाला पाहिजे. व ज्या लोकांनी या योजनेअंतर्गत फायदा मिळण्यासाठी अर्ज केले आहेत अशा लोकांनी टोकन नंबर दाखविल्यानंतर त्यांच्याकडुन फक्त चालु बिलाची रक्कम घेतली पाहिजे. व जे अर्ज प्रलंबित आहेत (९,६००) त्याच्याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेतला पाहिजे. व त्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आला पाहिजे. व यावर्षी सुध्दा बीपीएलची स्कीम चालु राहिली पाहिजे. मला असे वाटते की, यापुर्वीच्या आयुक्तांकडे जे प्रस्ताव जात होते ते थांबवुन ठेवत होते. आता आमचे जे नविन आयुक्त साहेब आले आहेत, मी असे कधी ही पाहिले नाही की, त्यांच्याकडे एखादा प्रस्ताव प्रलंबित आहे व मला असे वाटते की, सर्वसंमतीने आज हा ठराव पारीत व्हावा. आमच्या विरोधी पक्ष नेत्यांनी म्हटल्याप्रमाणे अर्थसंकल्पामध्ये ज्या ज्या कामांबाबत तरतुद आहे, तसेच नगरसेवक निधीतील जी कामे आहेत अशा कामांचे प्रस्ताव तयार करुन अशी कामे प्रशासनाने स्वत:हुन केली पाहिजेत. नाहीतर नगरसेवक लोक प्राकलने घेवुन फिरतात. यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतुद ठेवली जाते. यावर्षी पुर्वीपेक्षा बरीचशी कमी तरतुद अर्थसंकल्पामध्ये ठेवलेली आहे. यापुर्वी १०–१०, १२–१२ कोटी रुपयांची तरतुद केली जात असे. सध्या फक्त महापालिका निधी २–३ कोटी रुपये ठेवला जात आहे. तर ती जी कामे आहेत, ती कुणाचीही कामे रखडता कामा नयेत व त्याचबरोबर महानगरपालिकेची जी आर्थिक स्थिती आहे, त्याबाबत प्रत्येक वर्षी आम्ही असे म्हणत असतो की, कर्मचा–यांनी थकबाकी वसुलीकडे लक्ष दिले पाहिजे, वसुली वाढविली जावी. आता जकात विभागाचे कर्मचारी सुध्दा आले आहेत. ८५५ अनाधिकृत इमारतींच्या निष्कासनाचा मुद्दा १८ महिन्यासाठी आता बाजुला पडला आहे. जकात वसुलीचा प्रस्ताव सर्व पक्षांच्या नगरसेवकांच्या सहमतीने पारीत झाला आहे. काही सदस्यांनी म्हटले की, कधी जकात वसुलीचे काम महापालिका करते तर कधी हे काम खाजगी ठेकेदारास दिले जाते. जेव्हा सर्व पक्षांच्या सदस्यांनी महापालिकेने जकात वसुलीचे काम पाहण्याबाबतचा जेव्हा निर्णय घेतला, त्यावेळेस काही नगरसेवक वसुली कमी आहे असे म्हणत, एका वर्षातच १० लक्षवेधी सुचना महासभेत आल्या. सर्व पक्षीयांच्या संमतीने जकात वसुलीचे खाजगीकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये सर्व पक्षांचे सहकार्य आहे. आज काही गोष्टींवर आम्ही कधी काही निर्णय घेतो तर कधी काही निर्णय घेतो. त्यानंतर त्यामध्ये बदल सुध्दा होतो. कधी निर्णय घेतात की, जकात वसुलीचे काम महापालिकेने चालवावे तर कधी निर्णय घेतात की, जकात वसुलीचे खाजगीकरण करावे. कधी टाऊन हॉल बाबतीत विरोध करतात तर कधी ते काम आपल्या माणसाला मिळावे म्हणुन बाजु घेतात. अशा प्रकारे सर्व पक्षांच्या वतीने निर्णयांमध्ये बदल होत असतात. या सर्व बाबतीत माझ्याकडे ४०–५० उदाहरणे आहेत परंतु ती मी आज देणार नाही. बराच वेळ झालेला आहे. म्हणुन आता मला असे वाटते की, अंदाजपत्रकामधील काही लेखा शिर्षामध्ये बदल केले जावे. राष्ट्रीय युवा धोरणासाठी ५ लाख रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये आणखी १० लाख रुपये वाढविले जावेत. जे १६ लाख रुपये शिल्लक आहेत, त्यामध्ये १० लाख रुपये दर्शविले जावेत. मा. महापौरांना मी धन्यवाद देवु इच्छितो त्यांनी, यावर्षी नगरसेवक निधी ४.५० लाख केला आहे. याचबरोबर प्रभाग समितीसाठी मागील वर्षी दिड लाख रुपये ठेवण्यात आले होते. पहिले तीन लाख रुपयांची तरतुद असायची. परंतु मागील वर्षी ती दिड लाखाची केली होती. यावर्षी प्रत्येक सदस्याला आपल्या प्रभागात सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत १–१ लाखाचे जे कोणतेही काम तो करु इच्छित असेल ते तो करु शकेल असे ७६ नगरसेवकांचे १–१ लाख रुपये प्रभाग समितीमध्ये वाढविले जावेत व पाणी पुरवठयाचे पैसे देण्यासाठी जी तरतुद केली आहे त्यातील १ करोड रुपये कमी केले जावेत. शववाहिनी जी अनेक वर्षापासुन नादुरुस्त आहे, एक नविन शववाहिनी खरेदी केली जावी. व महानगरपालिकेच्या वतीने एक वॉटर टॅंकर सुध्दा खरेदी केला जावा. त्याबाबत सुध्दा येथे तरतुद केली जावी.

पाणी पुरवठयाचे जे एक कोटी रुपये कमी केले जात आहेत त्यातुन शहरामध्ये राष्ट्रपुरुषांचे जेवढे काही पुतळे लावले आहेत ते धुण्यासाठी वॉटर टॅंकर घेवुन तो पाठविला जावा. त्याचबरोबर उल्हासनगरमध्ये जेवढी काही झाडे लावली जातात त्यांना पाणी देण्यासाठी सुध्दा टॅंकर पाठविला जावा. तसेच रस्त्यांसाठी जी तरतुद केली आहे त्यामध्ये डिफर्ड पेमेन्ट सिस्टिम नुसार ५७ रस्त्यांचा जो समावेश करण्यात आलेला आहे, व रस्ते विकासासाठी महानगरपालिका निधीमध्ये जी ५ कोटी रुपयांची रक्कम ठेवली आहे, त्यामध्ये श्री. दर्शनसिंग यांच्या प्रभागातीलएक रस्ता मागील वर्षी अर्थसंकल्पात अंतर्भुत होता तो यावर्षी पुन्हा समाविष्ट केला जावा. व दुसरा सुनिता अपार्टमेंट पासुन माजी नगरसेवक श्री. आनंद बिजलानी यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचा समावेश यामध्ये करण्यात यावा याबाबत श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले आहे. या रस्त्याचा सुध्दा यामध्ये समावेश केला जावा व कॅम्प नं. ५ मध्ये कैलास कॉलनी चौक जो आहे त्याचा सुध्दा यामध्ये समावेश केला जावा. तसेच आम्ही बजेटमध्ये लिहिले आहे की, पवई पासुन उल्हासनगर स्टेशनपर्यंतच्या रस्त्यांचा समावेश करुन त्याचबरोबर अन्य रस्ते लिहिले आहेत अन्य रस्ते त्यामध्ये येतीलच पण या तीन–चार रस्त्यांचा सुध्दा त्यामध्ये समावेश करण्यात यावा. व श्री. राजेश वधारिया यांनी ज्या योजनेबाबत सांगितले त्या योजनेसाठी सुध्दा १० लाख रुपयांची तरतुद केली जावी. तसेच श्री. दिलीप लालवानी यांनी जसे म्हटले की, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका त्याचबरोबर इतर महानगरपालिकेमध्ये महानगरपालिकेने फक्त ना हरकत दाखला दिला आहे, अशा ठिकाणी जे लोक आपली एसटी बससेवा देतात ते लोक महापालिकेला ५० पैसे प्रती किलोमिटर या दराने पैसे देतात, बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर ना हरकत दाखला देण्यामध्ये सुध्दा महापालिकेला करोडो रुपयाचे उत्पन्न मिळते. आपल्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये जो कोणी परिवहन सेवा चालु करु इच्छित असेल त्यास ना हरकत दाखला देण्यात यावा. या परिवहन सेवेमध्ये महानगरपालिकेला आपल्या स्वत:चे काहीही पैसे लावण्याची गरज नाही. महानगरपालिकेने फक्त ना हरकत दाखला दिलातर महापालिकेला करोडो रुपयाचे उत्पन्न मिळु शकेल. व जकात खाजगीकरणाबाबत यावर्षी डिसेंबर महिन्यापासुन प्रक्रिया सुरु करावी. मला असे वाटते निवडणुका कधीही लागु शकतात. निवडणुक प्रक्रीया चालु होण्या अगोदर येणा–या वर्षासाठी या इलेक्टेड बॉडीने जकात ठेवा निश्चित करावा. जेणे करुन आपणांस जी निश्चित स्वरुपाची रक्कम मिळते ती पुढील वर्षी सुध्दा मिळु शकेल. सर्वात शेवटी सर्वांसमोर हे निवेदन ठेवुन असे म्हणु शकेन की, आम्ही हे जे आजपर्यंत प्रयत्न केले आहेत मला असे वाटते की ते प्रयत्न सफल होवोत. एवढे रस्ते समाविष्ट केले जावेत, एवढे कोटी रुपये ठेवत आहोत. परंतु काही ना काही तांत्रिक अडचणी येतात, ८५५ इमारतींचे निष्कासन, पुरपरिस्थिती अशा कोणत्या ना कोणत्या अडचणी येतात अशा कारणामुळे जी वसुली कमी होते, त्यामुळे उत्पन्न कमी होते. परंतु आम्हांला खात्री आहे की आम्ही निश्चितच यशस्वी होवु, आमच्या मनामध्ये तसा विश्वास आहे आम्हांला खात्री आहे. तर यावर्षी कोणतीही कर वाढ न करता, हा जो अर्थसंकल्प आहे तो सर्वसंमतीने पारीत केला जावा धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> श्री. किशोर वनवारी यांनी म्हटले की, जकात खाजगीकरणाचा प्रश्न जो सर्वसंमतीने पारीत झाला परंतु तो प्रस्ताव महासभेमध्ये सर्वसंमतीने पारीत झालेला नाही. तो स्थायी समितीने केला आहे.

<u>मा. महापौर :–</u>सन्माननिय सदस्यहो, साहव्या वेळेस स्थायी समितीच्यावतीने अर्थसंकल्प आपल्यासमोर मांडला आहे. सर्वांचे विचार ऐकले. सर्वांनी ज्या सुचना दिल्या.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मी जो मुद्दा उपस्थित केला होता त्यावर प्रशासनाचे काय म्हणणे आहे, प्रशासनाने काहीही खुलासा केलेला नाही. गप्प का बसले आहेत? किशोरजी? कामे झाली नाहीत तर आम्ही आपणाकडे येवु हे लक्षात ठेवा. प्रशासनाने यावर काहीतरी मत प्रदर्शित केले पाहिजे. जे प्रस्तावित केले आहे ते बरोबर आहे किंवा चुकीचे आहे? आयुक्तांनी बोलले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> आयुक्तांनी बोलले पाहिजे. यासाठी आम्हांस असे वाटते की, आयुक्तांनी आपले विचार प्रकट करावे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> नाहीतर एक गोष्ट करा, ही सर्व जबाबदारी आपण घ्या. त्यामुळे सर्व गोष्टी संपुन जातील. सभागृह नेता व आपण..... आम्ही प्रशासनास विचारणार नाही, आपण जबाबदारी घ्या.

<u>मा. महापौर :–</u> हे पहा, अर्थसंकल्प आम्ही तयार केला आहे. आपल्या समोर सादर केला आहे. मी आपणासमोर आणखी दोन शब्द बोलु इच्छिते. कृपया आपण बसुन घ्यावे. आपण मला मध्येच थांबवुन असे म्हणु शकत नाही की, आयुक्तांनी उत्तर दयावे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, आपण पीठासीन अधिकारी आहात. आम्ही उपस्थित केलेल्या मुद्दयाचे समाधान तर झाले पाहिजे. व विरोधी पक्ष नेता म्हणुन माझे समाधान होत नसेल तर बाकीच्या सदस्यांचे काय होईल? मी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्यावर प्रशासन गप्प बसु शकत नाही कारण की अंमलबजावणी त्यांना करायची आहे.

मा. महापौर :— अर्थसंकल्प त्यांनी तयार केला आहे. आम्ही लोक अर्थसंकल्प तयार करुन त्यांना देवु त्याची त्यांना अंमलबजावणी करावीच लागेल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, दुर्भाग्याने तेच तर मागील दोन वर्षापासुन होत नाही. मागील वर्षाचा अर्थसंकल्प १९२ कोटीचा आहे व उत्पन्न १०१ कोटीचे आहे. प्रत्येक वर्षाचा अर्थसंकल्प आपण पहा. नाहीतर अर्थसंकल्पाची पुर्ण जबाबदारी आपण घ्या प्रशासनावर टाकु नका. आम्ही आपणाकडे येवु. ही पुर्ण जबाबदारी आपली आहे. जो—जो निधी मंजुर आहे त्यानुसार कामे झाली पाहिजेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आम्ही आपणाकडे येवु.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :— मा. महापौरजी, आपल्या भाषणास सुरुवात झाली होती. ते मध्येच थांबविणे योग्य नाही.

मा. महापौर :— तीन—तीन सदस्य एकाच वेळी बोलु शकत नाहीत, कृपया बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—महापौर महोदया, मी माझ्या पहिल्या भाषणामध्ये हा मुद्दा उपस्थित केला होता की, माझ्या या मुद्दयाबाबत प्रशासनाचे काय म्हणणे आहे? आपले काम होते की, त्यावर प्रशासनाला आदेश देवुन खुलासा करण्यास लावणे.

मा. महापौर :— सर्वात प्रथम मी अर्थसंकल्प आपणासमोर मांडत आहे. आपल्या प्रश्नाबाबत प्रशासनाला आश्वासन दयावे लागेलच त्यांना ते करावे लागेलच.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— तेच तर पाहिजे आम्हांला.

मा. महापौर :— आमचे काम आहे अर्थसंकल्प तयार करुन देणे त्यावर कार्यवाही करण्याचे काम प्रशासनाचे आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—महापौरजी, आम्हांला सुध्दा तेच पहिजे. प्रशासनाने बोलले पाहिजे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— त्यांना आश्वासन देवु दया ना.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— आम्ही म्हटले आहे की, आपण जी आश्वासने दिली आहेत ती पुर्ण करु शकलो नाहीत.

मा. महापौर :— आपण दोन मिनिट, मला माझे भाषण पुर्ण करु दया. त्यावर प्रशासन काय म्हणते ती त्यांची जबाबदारी आहे. सन्माननिय सदस्यहो, आपणा सर्वांचे विचार आम्ही ऐकुन घेतले. आपल्यासमोर हा ६ व्यांदा अर्थसंकल्प मी सादर केला आहे. व एक म्हण आहे की, ''सीर सलामत तो पगडी हजार''. ती बरोबर आपणांस लागु होते. आपण पाहिले आहे, मागील वर्षी आपणांस कोणत्या परिस्थितीतुन जावे लागले. आपणा सर्वांना माहित आहे, पुर आला. त्यामध्ये पुर परिस्थितीशी झुंज देत शहरास त्यातुन कसे बाहेर पाडले? त्यानंतर ८५५ अनाधिकृत इमारतींच्या निष्कासनाचा मुद्दा होता. त्यामध्ये सुध्दा आमचे दोन—तीन महिने फुकट गेले. अशा परिस्थितीमुळे आम्ही आपले लक्ष्य पुर्ण करु शकलो नाही. व आम्हांला खात्री आहे की, येणा—या काही दिवसामध्ये आमच्याकडे फार मोठया प्रमाणावर पैसे येतील व ते पैसे आम्ही पायाभुत सोयी सुविधांवर खर्च करु. शहराचा विकास अतिशय चांगल्या प्रकारे होईल. व ''स्वच्छ उल्हास, हरित उल्हास'' हे जे आमचे स्वप्न आहे ते आम्ही पुर्ण करु. आयुक्तांनी आपले अंदाज आम्हांला सादर केले. त्यांनी करांमध्ये वाढ सुचविली होती. आम्ही ती वाढ न करता आम्ही कर वाढ कमी केली. आयुक्त साहेबांना आदेश आहे की, महासभेमध्ये

आम्ही जो अर्थसंकल्प आपणांस तयार करुन दिला आहे, जी वस्तुस्थिती आणि आकडेवारी आहे ती आपल्यासमोर ठेवली आहे. एमआयडीसीचे जे कर्ज आहे ते आम्ही चुकवु शकत नाही. यावर्षी आपण १० कोटीची वसुली कराल. जर आमचे देणे ४० कोटीचे आहे तर वसुली १० कोटी न करता आम्हांला ती ४० कोटी करावीच लागेल. व प्रशासनास तेवढी वसुली करायचीच आहे. मागील वर्षी आपण पाहिले असेल की, अनाधिकृत बांधकामे तोडण्यासाठी २०० कर्मचा–यांचे पथक तयार करण्यात आले होते. हे कर्मचारी प्रभाग समित्यांमध्ये जावुन बसत असत. त्यामुळे करांची वसुली बरोबर होवु शकली नाही. त्यानंतर पुर आला होता. पुरपरिस्थितीमध्ये ब–याचशा समस्यांशी झुंज दयावी लागली त्यामुळे आम्ही करांची वसुली करु शकलो नाही. जकात वसुली महानगरपालिका करत होती. आमच्याकडे पुरेसा कर्मचारी उपलब्ध नव्हता त्यामुळे वसुली करु शकलो नाही. आता आमचे कर्मचारी आमच्याकडे परत आले आहेत. व आता आपण पाहत असालच मागील काही दिवसांपासुन मालमत्ता कराची वसुली अतिशय चांगली होत आहे. व आम्हांला खात्री आहे की, आयुक्त साहेब सर्वोतोपरी प्रयत्न करुन जेवढी काही थकबाकीची रक्कम आहे ती वसुल करतील व अशा प्रकारचे जे आश्वासन आहे ते सभागृहाला देतील.

<u>मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील) :–</u> आयुक्त कार्यालयाने अंदाजपत्रक तयार केले होते. ते स्थायी समितीपुढे सादर केले होते.
<u>मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u> कृपया हिंदीत बोला.

<u>मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील) :–</u>हिंदीमध्येच बोलण्यास सुरुवात केली आहे. तुम्ही थोडावेळ थांबा जरा. आम्ही जे अंदाज तयार केले होते. ते नंतर स्थायी समितीपुढे सादर केले होते. त्यांमध्ये स्थायी समितीने फेरफार करुन मंजुर केलेला प्रस्ताव आपणासमोर महासभेत आणला आहे. आपल्या निर्देशानुसार अर्थसंकल्पावर अंमलबजावणी करण्याचा पुर्ण प्रयत्न केला जाईल.
<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. आयुक्त साहेब.........

<u>मा. उप–महापौर :–</u> कृपया बसुन घ्या.

<u>मा. सचिव :–</u> पास? सर्वसंमतीने? नाही?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> दोन तास चर्चा झाल्यानंतर मतदान?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> हे पहा.............. सर्व संमतीने पारीत करु................ एका मुद्दयाबाबत आपण स्पष्टीकरण कराल तर आम्ही अर्थसंकल्प सर्वसंमतीने पारीत करु. मालमत्ता कराची वसुली ५० कोटी कशी येईल ते जरा आपण सांगा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>मतदान......मतदान.....

<u>मा. उप–महापौर :–</u> सर्व संमतीने? आयुक्त साहेबांनी खुलासा केला आहे ना.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> १९७ कोटी रुपयाची वसुली करुन दाखवा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> एवढी वसुली करुन दाखविली तर आम्ही आपणांस राष्ट्रपती पारीतोषक देवु.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> ५ वर्ष करु शकले नाहीत, यावर्षी काय करणार आहेत?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>जो अर्थसंकल्प आता मंजुर होत आहे त्याच्याबरोबर शिक्षणमंडळाचाही अर्थसंकल्प आहे. हे दोन्ही अर्थसंकल्प एकत्रितपणे मंजुर केले जावेत.

<u>मा. सचिव :–</u> ठिक आहे?

<u>मा. महापौर :–</u>सचिव साहेब, या प्रस्तावावर मतदान घ्या.

<u>मा. सचिव :–</u> जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या बाजुने ४० मते

१. श्री. लालबिहारी यादव
४२.श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४३.श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
४४.श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
४५.श्री. ऐडके गणपत गोविंद
४६.श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
४७.श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
४८.श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
४९.श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
५०.श्री. पवार नाना आनंदा
५१.श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
५२.श्री. जग्यासी राजु
५३.श्री. निकम शांताराम ओंकार
५४.श्री. ठाकुर विनोद लालसिंग
५५.श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे)
५६.श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
५७.श्री. गायकवाड सुरेश नामदेव
५८.श्रीमती. वनवारी मोना अशोक
५९.श्री. वनवारी किशोर नारायणदास
६०.श्री. जेसवानी सतराम पुनमदास
६१.श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
६२. श्री. मोकल चंदाराम
६३.श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
६४.श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
६५.श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
६६.श्रीमती. पंजाबी दिपा नारायण
६७.श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण
६८.श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
६९.श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
७०.श्री. तलरेजा विनोद चंदीराम
७१.श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
७२.श्रीमती. छाब्रिया भारती पहलाज
७३.श्रीमती. दासानी मिनु राजकुमार
७४.श्रीमती भावना खिलनानी
७५.श्री. जाधव सुरेश मधुकर
७६.श्री. टाले प्रमोद नामदेवराव
७७.श्री. भालेराव गौतम यशवंत
७८.श्री. ठाकुर अशोक भगवानदास
३९. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी
४०. श्रीमती कोमल बठिजा

मा. सचिव :— जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.
प्रस्तावाच्या विरोधात १६ मते

१२. श्रीमती. जावळे संगिता रमेश
१३. श्रीमती. मोकल सिमा चंद्राराम
१४. श्री. उमाप रामदास राघोजी

१५. श्री. पुरस्वानी जमनादास खुपचंद
१६. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाशोमल
१७. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश
१८. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग
१९. श्री. सोनावणे नथु
२०. श्री. गायकवाड दिलीप
२१. श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन
२२. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा
२३. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
२४. श्री. चव्हाण रमेश महादेव
२५. श्री. बोडारे धनंजय बाबुराव
२६. श्री. पाटील विश्वनाथ गौतम
२७. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम

<u>मा. महापौर :–</u> स्थायी समितीने प्रस्तावित केलेला २००५–०६ चा सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००६–०७ साठी तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये श्री. किशोर वनवारी यांनी सुचविलेल्या काही फेरफारासह अर्थसंकल्प अंतिम करण्याच्या प्रयोजनार्थ पूढील प्रमाणे ठराव बहुमताने संमत करण्यात येत आहे.

---

☑

<u>विषय :–</u> स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २००६–०७ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००५–०६ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे

<u>प्रस्तावना :</u>

सन २००५–२००६ या वर्षा करिता अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न **रू. १६२.८८ कोटी** अपेक्षीत होते आणि खर्च **रू. १६२.८३** कोटी अपेक्षित होता. अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न झाले नाही त्यामूळे खर्चात कपात करणे आवश्यक असून सदर वर्षात उत्पन्नाचा खर्चाशी मेळ बसविण्यासाठी आयुक्तांनी सन २००५–२००६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात येणे प्रमाणे स्थायी समितीसमोर सुधारणा प्रस्तुत केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| उत्पन्न | : | ११३.०९ कोटी |
| खर्च | : | ११२.९७ कोटी |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदी प्रमाणे आयुक्तांनी सन २००६–२००७ करिता उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार केले असून ते स्थायी समितीसमोर खालील प्रमाणे सादर केले आहे.

| | | |
|---|---|---|
| उत्पन्न | : | १२८.७३ कोटी |
| खर्च | : | १९२.०१ कोटी |

वित्तीय वर्ष २००५–२००६ चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता रहाणारी तुट रू. **६३.२८ कोटी** मालमत्ता कर, पाणी पट्‌टी, टॅंकर भाडे व इतर फी च्या दरामध्ये वाढ करणेचा स्वतंत्र प्रस्ताव आयुक्तांनी पुस्तीकेच्या स्वरुपात स्थायी समितीपुढे सादर केला आहे. तसेच आयुक्तांनी स्थायी समितीकडे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करताना त्या सोबत वर्ष २००४–०५ चे लेखा विवरण पत्र व अर्थसहाय देवून पुरवण्यात आलेल्या सेवां बाबत अहवाल जोडला आहे. सदर सेवा म्हणजे पाणीपुरवठा व मलजलाची विल्हेवाट, कचरा साफ करणे त्याची वाहतुक करणे व विल्हेवाट लावणे आणि रस्त्यावरील दिवाबत्तीची व्यवस्था इत्यादी.

<u>शिक्षण मंडळाचे सन २००६ – २००७ चे मुळ अंदाजपत्रक. :</u>

मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडाव्याची कार्य व कर्तव्य लक्षात घेता उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे ठराव क्र. १४९ दिनांक २३/८/०५ अन्वये खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** : १२,८७,०३,००० /—
**अंदाजपत्रकीय खर्च रुपये** : १२,८७,०३,००० /—

उपरोक्त दर्शविलेल्या एकुण अंदाजात रुपये ४,५२,२६,७५०/— शासकीय अनुदान अपेक्षित असुन उर्वरित रक्कम रुपये ७,२८,८३,२५०/— महानगरपालिकेकडून महापालिका अनुदान म्हणून अदा करावयाची असल्याने ती ही तरतुद करण्यात आली होती.

त्यानंतर शिक्षण मंडळ ठराव क्र. १५८ दिनांक १७/१२/२००५ अन्वये अंदाजपत्रकात सुधारणा करण्यात आली असून खालीलप्रमाणे फेरफार करण्यात आले आहे.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** : १२,४२,०३,००० /—
**अंदाजपत्रकीय खर्च रुपये** : १२,४२,०३,००० /—

उपरोक्त अंदाजात रक्कम रुपये ६,८३,९८,२५० /— महानगरपालिकेकडून अनुदान म्हणून अदा करावयाची आहे.

शिक्षण मंडळाचे सन २००६ — २००७ चे अंदाजपत्रक, आयुक्तांचे सन २००५—२००६ चे सुधारीत अंदाजपत्रक, सन २००६—२००७ चे जमा—खर्चाचे अंदाज, कर वाढीचे प्रस्ताव व प्रशासनाकडून तपशिलवार माहिती घेवून अधिनियमाचे कलम ९६ नुसार स्थायी समितीने पुढीलप्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले आहे.

<u>महानगरपालिकेचे सन २००५ — ०६ चे सुधारित अंदाजपत्रक :</u>

प्रशासनातर्फे सन २००५ — २००६ करिता **उत्पन्न** रु. **११३.०९ कोटी व खर्च** रु. **११२.९७ कोटी** चे सादर करण्यात आलेले असुन पुढील प्रमाणे फेरफार करुन स्थायी समितीने अर्थसंकल्पीय अंदाज फेर निश्चितीसाठी प्रस्तावित केले आहे.

(आकडे हजारात)

| अ. क्र. | पान क्र. | ज्या लेखा शिर्षातुन रक्कम हस्तांतरण करावयाची आहे. | रक्कम | ज्या लेखा शिर्षात रक्कम हस्तांतरण कराव्याची आहे. | पान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| **A BUDGET - Part I** | | | | | |
| १ | १४ | कर्मचा—यांना गणवेश, रेनकोट | १००० | बोनस | १३ |
| २ | १३ | रजा प्रवास भत्ता | २०० | वैद्यकीय सवलत | १३ |
| ३ | १५ | पोस्टल स्टॅम्प खर्च | १०० | टेलीफोनए इन्टरकॉम बसविणे | १५ |
| ४ | १९ | श्वान निर्बीजीकरण | १०० | लसटोचणी खर्च | १९ |
| ५ | २४ | अनधिकृत बांधकाम निष्कासित खर्च | ६०० | पुर किंवा अन्य आपतीच्या खर्च | २३ |
| ६ | २४ | क्रीडा खर्च | २०० | इतर खर्च | २४ |
| **A BUDGET - Part II** | | | | | |
| ७ | २७ | महापालिका इमारती बनविणे | ३५० | खासदार फंडातून विकास कार्य | २८ |
| ८ | २७ | रस्ते, प्रवास व पुल इत्यादि | ५०० | वा. आंबेडकर यो. विकास कार्य | २९ |
| **C BUDGET - Part I** | | | | | |
| ९ | ३९ | रजा वेतन व निवृत्ती वेतन फंड अंशदान | १०० | बोनस | ३९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | ३९ | रजा वेतन व निवृत्ती वेतन फंड अंशदान | ७० | वैद्यकीय सवलत | ३९ |
| ११ | ४१ | कुपनलीका दुरुस्ती खर्च | १०० | संगणकीकरण खर्च | ४२ |
| १२ | ४१ | पाणी टॅंकर भाडे | १००० | पा.पु.इमारती विद्युत,टेलीफोन बिले | ४२ |
| १३ | ४२ | बूस्टर मशीनरी चालवणे खर्च | ५०० | पा.पु.इमारती विद्युत,टेलीफोन बिले | ४२ |

महानगरपालिकेचे सन २००६ – ०७ चे मुळ अंदाजपत्रक :

प्रशासनातर्फे सन २००६–२००७ करिता **उत्पन्न रु. १२८.७३ कोटी व खर्च रु. १९२.०१ कोटी** चे सादर करण्यात आलेल्या अंदाजात स्थायी समितीने पुढील प्रमाणे फेरफार करुन अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले आहे.

(आकडे हजारात)

| पान क्र. | **INCOME /** उत्पन्न (Commissioner's Est.) | | १२८७२७९ | **EXPENDITURE /** खर्च (Commissioner's Est.) | | १९२०१४५ | पान क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मालमत्ता कर | | | दिवाबत्ती दुरुस्ती व निगा | + | १००० | १६ |
| २ | सर्व साधारण कर | + | १३८००० | दुर्बल घटक वसाहतीत दिवाबत्ती दुरुस्ती व निगा | + | ५०० | १६ |
| २ | महापालिका शिक्षण कर | + | २७००० | रस्त्यावरिल दिवाबत्ती विद्युत बिले | - | २००० | १६ |
| २ | वृक्ष कर | + | ३००० | शोध–विकास व वीज बचत | + | ५०० | १६ |
| २ | पथकर | + | ३३००० | प्राथमिक शिक्षण | - | ४४८५ | २० |
| ९ | शिक्षण कर रिबेट | + | ४५००० | घन कचरा व्यवस्था | - | ४००० | २६ |
| ९ | रोजगार हमी करावरील रिबेट | + | ६००० | रस्ते, प्रवास व पुल इत्यादि | + | ४०००० | २७ |
| ३४ | पाणी पुरवठा लाभ कर | + | १५००० | नगरसेवक निधीतून विकास कार्य | + | २०२५० | २७ |
| ३४ | मल प्रवाह सुविधा लाभकर | + | ६००० | जमीन संपादन | - | २५०० | २८ |
| ३४ | मल प्रवाह कर | + | २७००० | शिक्षण कर परतावा | + | ४५००० | ३२ |
| ३४ | विशेष मल प्रवाह कर | + | ७५० | रोजगार हमी कर परतावा | + | ६००० | ३२ |
| ३ | विकास शुल्क | + | २५००० | एम.आय.डी.सी पाणी पुरवठाबिले | - | ६०००० | ४१ |
| ५ | इनफ्रास्ट्कचर फंड | + | ५०००० | भुयारी गटार निगा | + | ६००० | ४३ |
| ३४ | पाणी बिले वसूली | + | ३१०००० | पाणी पुरवठा साहित्य बसविणे (नवीन) | + | ४००० | ४६ |
| | **TOTAL /** एकूण | | १९७३०२९ | पाणी पु साहित्य बसविणे–दुर्बल घटक | + | १००० | ४६ |
| | | | | **TOTAL /** एकूण | | १९७१४१० | |
| | | | | **CL. BALANCE /** अखेरची शिल्लक | | १६१९ | |

शिक्षण मंडळाचे सन २००६ – २००७ चे मुळ अंदाजपत्रक.

शिक्षण मंडळाचे सन २००६ – २००७ चे अंदाजपत्रक स्थायी समितीने पुढील प्रमाणे तयार केले आहे.

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : १२,४२,०३,००० /–
अंदाजपत्रकीय खर्च रुपये : १२,४२,०३,००० /–

उपरोक्त अंदाजात रक्कम रुपये ६,८३,९८,२५० /– महानगरपालिकेकडून अनुदान म्हणून अदा करावयाची आहे.

विविध कर व दराचा प्रस्ताव :—

अ) पाणी टॅकर भाडे :—

पाणी टॅकर भाडयाची प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यास शिफारीश करण्यात आली आहे.

ब) मालमत्ता कर :—

मालमत्ता करातील दरात कोणतीही वाढ मंजूर न करता प्रचलित दर कायम करण्यास शिफारीश करण्यात आली आहे.

क) पाणी पट्टी दर :—

पाणी पट्टीच्या दरात कोणतीही वाढ मंजूर न करता प्रचलित दर कायम करण्यास शिफारीश करण्यात आली आहे

ड) अग्निशमन सेवा दर :—

अग्निशमन सेवा दर आकारणी अमान्य करण्यास शिफारिश करण्यात आली आहे.

इ) वर्ष २००४ — २००५ चे लेखा विवरणपत्र :—

प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेले वर्ष २००४ — ०५ चे लेखा विवरण ची माहिती नोंद करण्यात आली आहे.

उ) वर्ष २००४ — २००५ मध्ये अर्थसहाय्य देवून पुरविण्यात आलेल्या सेवाबाबतचा अहवाल :—

प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेले वर्ष २००४ — ०५ मध्ये अर्थसहाय्य देवून पुरविण्यात आलेल्या सेवाबाबतचा तपशिल विचारात घेवून हा अर्थसहाय्य महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून कायम ठेवण्यास शिफारीश करण्यात आली आहे.

महासभा ठराव क्रमांक ८१ — दिनांक : १५/२/२००६

सुचकाचे नांव : श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव : श्री. शांताराम निकम

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींच्या अधिन राहुन व अर्थसहाय्य देवुन पाणी पुरवठा सेवांबाबतचा अहवाल विचारात घेवुन स्थायी समितीने ठराव क्रमांक ८५ दिनांक ६.२.२००६ अन्वये महापालिकेस सादर केलेल्या सन २००६—०७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजास व सन २००५—०६ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास काही फेरफारांसह अंतिम स्विकृती देत आहे.

## परंतु

१ कोणत्याही प्रकारची करवाढ, दरवाढ न करता करांचे प्रचलित दर कायम राहतील.

२ सन २००६—०७ करीता महापालिकेच्या उपलब्ध निधीतुन अर्थसहाय्य देवुन पाणी पुरवठा सेवा देणे कायम राहिल.

३ सन २००५—०६ करीता उत्पन्न रु ११३.०९ कोटी व खर्च रु ११२.९७ कोटी च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज अंतिम असेल.

४ स्थायी समितीने सन २००६—०७ साठी शिफारीस केलेल्या रु १९७.३० कोटीचे उत्पन्न व रु. १९७.२० कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाज पुढीलप्रमाणे फेरफारांसह अंतिम असेल.

*(आकडे हजारात)*

| उत्पन्नाचे लेखा शिर्ष | रुपये १९७३०२९ (स्थायी समिती अंदाज) | खर्चाचे लेखा शिर्ष | रुपये १९७१४१० (स्थायी समिती अंदाज) |
|---|---|---|---|
| | | एम.आय.डी.सी पाणी पुरवठा देयके | — १०००० |
| | | राष्ट्रीय युवा धोरण अंमलबजावणी | + १००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रस्ते दुरुस्ती (अ अंदाज – प्र.समिती–१ ) | + २१०० |
| | | रस्ते दुरुस्ती (अ अंदाज – प्र.समिती–२ ) | + १९०० |
| | | रस्ते दुरुस्ती (अ अंदाज – प्र.समिती–३ ) | + १८०० |
| | | रस्ते दुरुस्ती (अ अंदाज – प्र.समिती–४ ) | + १८०० |
| | | वाहन खरेदी (अ अंदाज–भाग २–सामान्य प्रशासन) | + १००० |
| | | वाहन खरेदी (अ अंदाज–भाग २–सामान्य) | + १००० |
| **एकुण :–** | १९७३०२९ | **एकुण :–** | १९७२०१० |
| | | **अखेरची शिल्लक :–** | १०१९ |

५ महापालिका शिक्षण मंडळाचे सन २००६–०७ चे अर्थसंकल्पीय अंदाजास जसे आहे तसे मान्य असेल.

६ स्थायी समिती ठराव क्र. ६७, दिनांक ८/७/२००४ अन्वये दारिद्रय रेषेखालील मालमत्ताधारकांना करमाफीची योजना दि. ३१/३/२००७ पर्यंत कायम ठेवण्यात येईल परंतु सदरची योजना आरसीसी बांधकाम किंवा इतर बांधकामात राहणा–या पात्र मालमत्ताधारकांनाही लागु होईल.

७ उल्हासनगर शहरात २६ जुलै ते २८ जुलै २००५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या निवासी व वाणिज्य मिळकतधारकांना मालमत्ता कर (शासकीय कर व पाणीपट्टी वगळुन) आकारणीमध्ये सुट देणारी योजना आखण्यात येईल व यासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत ३१/३/२००७ पर्यंत असेल.

८ यावर्षी रस्ते विकास कार्यक्रमांतर्गन हाती घेण्यात येणा–या कामांमध्ये खालील अतिरिक्त रस्त्यांचा समावेश करण्यात येईल.

१ निरंकारी सत्संग हॉल ते फिश मार्केट, उल्हासनगर–१
२ कैलास कॉलनी चौक, उल्हासनगर–५
३ अन्य रस्ते

वरील सर्व बाबींच्या तरतुदीच्या प्रयोजनासाठी उक्त अंदाजपत्रक छापुन प्रत्येक पालिका सदस्यास त्याची प्रत पाठवण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानले जाईल.

सुचकाची सही /–

अनुमोदकाची सही /–

**बहुमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :–**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.४० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२०.३.२००६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०.३.२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०.३.२००६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३५. | श्री. ठाकुर अशोक |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, | ३६. | श्रीमती माने किरण |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ३७. | श्री. रमेश चव्हाण |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३८. | श्री. जाधव प्रशांत |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना | ३९. | श्री. जाधव सुरेश |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४०. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४१. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४२. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४३. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४४. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४५. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४६. | श्री. भालेराव गौतम |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४७ | श्रीमती वसिटा बेबी |
| १६. | श्री. उमाप रामदास | ४८. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४९. | श्री. अंकुश म्हस्के |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५०. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५१. | श्री. पंजाबी नारायण |
| २०. | श्री. पवार नाना | ५२. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २१. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५३. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| २२. | श्री. जग्यासी राजु | ५४. | श्रीमती भटिजा कोमल |
| २३. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ५५. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २४. | श्री. निकम शांताराम | ५६. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २५. | श्री. टाले प्रमोद | ५७. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५८. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५९. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६०. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २९. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६१. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६२. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३१. | श्री. सतरामदास जेसवानी | ६३. | श्रीमती मिनु दासानी |
| ३२. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६४. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्रीमती भावना खिलनानी | ६५. | श्री. हरदास माखिजा |
| ३४. | श्री. राज असरोंडकर | ६६. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. वाघे शामु, २. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, ३. श्रीमती अनिता गुप्ता, ४. श्री. सुरेश नामदेव गायकवाड, ५. श्री. साधवानी मोहन, ६. डॉ. साधवानी जया, ७. श्री. बच्चाराम रुपचंदानी, ८. श्री. पाटील विश्वनाथ, ९. श्री. साधवानी मनोज, १०. श्रीमती किरण माखिजा, ११. डॉ. श्रीमती निना नाथानी, १२. श्रीमती करोतिया मालती, १३. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, १४. श्री. इदनानी राजु चंद्रभान, १५. श्री. राजेश वधारिया हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सांयकाळी ४. ३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** मा. महापौरजी, प्रश्नोत्तरास सुरुवात करण्यापुर्वी आपले महापालिका सदस्य श्री. पृथ्वी वलेचा यांचे एक नातेवाईक श्री. राजकुमार लक्ष्मणदास वलेचा यांचे नुकतेच निधन झाले आहे. तरी त्यांना कृपया श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

---

**शोक प्रस्ताव**

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

महापालिका सदस्य श्री. पृथ्वी वलेचा यांचे पुतणे श्री. राजकुमार लक्ष्मणदास वलेचा यांचे नुकतेच निधन झाले आहे.

यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ८६ अ** **दिनांक:—२०.३.२००६**

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. राजकुमार लक्ष्मणदास वलेचा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :—** विषय क्र. १ वाचुन दाखवितात. प्रश्नोत्तरे.........

प्रश्न क्र. ४६८ हा श्रीमती नंदिनी बामणकर यांचा आहे. त्या यावेळी अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

?

**प्रश्न क्र. ४६८ :—** १)उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग १,२,३, व ४ ची मंजुर पदे किती व कोणती आहेत? २) त्यापैकी किती पदे भरण्यात आली असून किती पदे रिक्त आहेत? ३) तसेच बॅकलॉग प्रमाणे प्रत्येक पदाचा बॅकलॉग किती तो भरण्यात आला आहे का? ४) किती बॅकलॉग भरणे बाकी आहे? ५) तसेच दिनांक १.१.२००५ पासून आजपर्यंत कोणत्या पदावर किती नियुक्त्या करण्यात आल्या आहेत? ६) सदर कर्मचा—यांची नावे दयावी. कृपया याबाबत महासभेत चर्चा होवुन सविस्तर माहिती दयावी ही विनंती.

**उत्तर :—**

| वर्ग | मंजूर | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| अ | २९ | २० | ०९ |
| ब | ४१ | १७ | २४ |
| क | ६३२ | ४७१ | १६१ |
| ड | २५२४ | २०९३ | ४३१ |
| एकुण | ३२२६ | २६०१ | ६२५ |

२) २६०१ भरलेली व ६२५ रिक्त आहेत.
३) अनुशेषाप्रमाणे सद्यस्थितीत मुख्य विधी अधिकारी व कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदांवर नियुक्ती देणेबाबतची प्रक्रिया चालू आहे. (सोबत विवरणपत्र अ,ब,क,ड)
४) वरीलप्रमाणे ५) दिनांक १/१/२००५ पासुन सद्यस्थितीत महानगरपालिका आस्थापनेवर एकुण ७५ कर्मचा—यांना नियुक्त्या देण्यात आल्या. ६) सोबत विवरणपत्र इ जोडले आहे.

<u>मा. सचिव :—</u> प्रश्न क्र. ४६९ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

? <u>**प्रश्न क्र. ४६९ :—**</u> उल्हासनगर महानगरपालिकेने शहरात किती ठिकाणी व्यायामशाळा/समाजमंदिर बांधली आहेत? (कृपया यादी दयावी.)

अ) त्यापैकी किती व्यायामशाळा समाजमंदिरे खाजगी संस्थांकडे देखभालीसाठी सोपविलेली आहेत?

ब) उर्वरित पैकी किती व्यायामशाळा / समाजमंदिरे पालिकेच्या प्रत्यक्ष कब्ज्यात आहेत?

क) व्यायामशाळा /समाजमंदिरे यांच्या सार्वजनिक वापरासाठी महापालिकेचे काय धोरण ठरले आहे?

<u>उत्तर :—</u> मालमत्ता नोंदवहीनुसार एकंदरित ३९ समाजमंदिर व्यायामशाळा आहेत.

त्याची यादी सोबत जोडली आहे.

अ) सदरची माहिती दिलेल्या यादीत उपलब्ध आहे.

ब) सार्वजनिक वापरासाठी तसेच सार्वजनिक प्रयोजनार्थ होम असल्याने नागरीक सदर वास्तुंचा सार्वजनिक कार्यक्रम करीता वापर करीत आहेत.

क) सदर वास्तुंचा नागरीकांच्या सार्वजनिक कार्यक्रमांकरीता वापर होत आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— मा. महापौर महोदया, प्रशासनाने या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. परंतु मला असे वाटते की, संबधित अधिकारी यांनी व्यासपिठावर येवुन त्यांच्या उत्तराचा पुनरुच्चार केला तर योग्य होईल. त्यांनी सभागृहात असे सांगितले की, आमच्या एवढयाच मालमत्ता आहेत. तर आमचे समाधान होईल. मी वरील प्रमाणे प्रश्न विचारला होता परंतु मला उत्तर दिलेले आहे की, आमच्याकडील नोंदी प्रमाणे एवढया मालमत्ता आहेत. तर हे दिशाभुल करणारे उत्तर आहे. नेमका काय प्रकार आहे. मी असे विचारले आहे की,किती व्यायामशाळा व समाजमंदिरे बांधलेली आहेत? आणि तुम्ही असे म्हणता की, आमच्या नोंदी प्रमाणे एवढया मालमत्ता बांधलेल्या आहेत. मी तो प्रश्न विचारला नाही की, नोंदी किती आहेत? मी विचारले आहे की, किती बांधल्या आहेत? तर त्याचे उत्तर काय आहे?

उप—आयुक्त (मालमत्ता), (श्री. अशोक बागेश्वर):— जेवढी समाज मंदिरे व व्यायामशाळा बांधलेली आहेत त्याच्या नोंदी महापालिकेकडे आहे व नोंदी नुसार समाजमंदिर २९, व्यायामशाळा २ असे एकुण ३१ आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— बांधलेल्या देखिल एवढयाच आहेत काय? की नोंद इतकीच आहे.

उप—आयुक्त (मालमत्ता), (श्री. अशोक बागेश्वर):—बांधलेल्या आहेत त्याच्या नोंदी आहेत व त्याप्रमाणे उत्तर दिले आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— मा. महापौर महोदया, प्रश्न कसा आहे ते तुम्हीच बघा. महापालिका लोकांच्या सुविधेसाठी समाजमंदिरे, व्यायामशाळा व इतर मालमत्तांचे बांधकाम करते व त्यावर पैसा खर्च करते. लोकांच्या सोयीसाठी त्याचा उपयोग व्हावा हा त्यामागचा हेतु असतो. परंतु शहरात असे दिसुन येत नाही. मी अधिका—याचे नाव सांगणार नाही परंतु त्यांच्या बोलण्यावरुन असे वाटले की, त्यांना महापालिकेच्या काही कामासाठी महापालिकेची मालमत्ता हवी होती. ती मालमत्ता महापालिकेचीच होती. परंतु ते असे सांगत होते की, मालमत्तेचा वापर करण्यासाठी ते गेल्या ६ महिन्यांपासुन झगडत आहेत. मला असे वाटते की, महापालिकेसाठी व येथिल प्रशासनासाठी ही बाब अतिशय लज्जास्पद आहे. आपली जागा आपणांस वापरायची आहे व त्यासाठी आपण ६ महिन्यांपासुन झगडत आहोत. प्रशासन झगडत आहे म्हणजे काय करत आहे हे कळुन येत नाही. आपली मालमत्ता असेल तर तेथे जावुन ताबा घ्यायला हवा, टाळा असेल तर तो काढुन आपला टाळा लावायला हवा. यामध्ये काय अडचण आहे हे कळुन येत नाही. मी बघितले आहे की, महापालिका खर्च करुन ब—याच ठिकाणी मालमत्ता तयार करते. परंतु १० रुपये खर्च करुन त्यावर महापालिकेचे नाव टाकायला देखिल प्रशासनाला वेळ नाही. किंवा त्यांच्याकडे तेवढे पैसे खर्च करण्यास नाहीत. ही लोकांच्या पैश्याची सरळसरळ लुट आहे. आपण लोकांचे पैसे खर्च करुन मालमत्ता बनवतो व त्यानंतर जर ती मालमत्ता खाजगी लोकांच्या हातात जात असेल तर ती लोकांच्या पैश्याची लुट आहे. जर एखादे मंडळ अथवा संस्था त्याचा सांभाळ करीत असेल तर प्रशासनाने निर्णय घेवुन ती मालमत्ता त्यांच्याकडे सोपवायला हवी. जर एखादी व्यायामशाळा एखादया संस्थेस दयायची असेल तर प्रशासनाने त्यासाठी प्रस्ताव मागवुन कारवाई करायला हवी. परंतु आपल्या किती मालमत्ता आहेत हेच आपल्याला माहिती नाही. प्रश्न विचारल्यानंतर मालमत्ता विभागात एवढयाच नोंदी आहेत असे उत्तर दिले जाते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, महापालिकेच्या ताब्यात किती समाजमंदिरे आहेत? ते महापालिकेच्या ताब्यात असायला हवे की, लोकांच्या ताब्यात असायला हवेत?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— मा. महापौर महोदया, हा एक गंभीर प्रश्न आहे. महापालिकेची मालमत्ता महापालिकेच्याच ताब्यात राहण्याचा व ती लोकांच्या उपयोगात येण्यासाठी हा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर अर्धवट असल्याने हा प्रश्न पुढील महासभेपर्यंत राखुन ठेवण्यात यावा. तसेच किती समाजमंदिरे व व्यायामशाळा बांधलेल्या आहेत याचे उत्तर सार्वजनिक बांधकाम विभागाने दयायला हवे. त्यांनी तसे उत्तर दिले तर आकडेवारी जुळुन येईल. खरेतर उत्तर त्यांनीच दयायला हवे होते. मी असे विचारले होते की, किती मालमत्ता बांधल्या आहेत? परंतु उत्तर मालमत्ता विभागाने दिले आहे की एवढया नोंदी आहेत. मी तसे विचारलेच नव्हते. कारण मला ठाऊक होते की, मालमत्ता विभागाच्या ताब्यात एकही मालमत्ता नाही. परंतु प्रत्यक्षात किती बांधले आहेत याचे योग्य उत्तर दिलेलेच नाही. त्यामुळे आपण आपला अधिकार वापरुन हा प्रश्न राखुन ठेवावा. तसेच या शहरात किती समाज मंदिर, वाचनालय व व्यायामशाळा बांधलेल्या आहेत याची माहिती पत्त्यासह महासभेत सादर करण्यासाठी बांधकाम विभागाला आदेश दयावेत. येथे काही ठिकाणी लिहिले आहे की, व्यायामशाळा कार्यरत आहेत. परंतु तेथे प्रत्यक्षात काहीही नाही. हे पुर्णत: चुकीचे व खोटे उत्तर आहे. याची चौकशी व्हायला हवी. तरी आपण त्याबाबत आदेश दयावेत.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—**मा. महापौर महोदया, मी आपले लक्ष एका मुद्दयाकडे वेधु इच्छितो. सिंधुवाडी येथे एक समाजमंदिर बनविलेले आहे. परंतु तेथे फक्त कोबा केलेला असुन टाईल्स लावलेल्या नाहीत. पंखे जुने लावले आहेत, पाण्याचे कनेक्शन दिलेले नाही. आम्ही तेथे बघितले की, बरेच दिवस कुणीतरी वडेपाव बनवित होते. कोणी कोणाला भाडयाने दिले होते याची माहिती नव्हती. जेव्हा आम्ही आरडाओरड केला तेव्हा तो वडापाववाला तेथुन निघुन गेला. महापालिकेच्या समाजमंदिरासारख्या ज्या मालमत्ता आहेत त्यांची देखरेख करण्यासाठी एक समिती बनवायला हवी. महापालिका प्रशासनाने त्यांची जबाबदारी उचलायला हवी. समाजमंदिराचा अश्याप्रकारे जो दुरुपयोग सुरु आहे तो त्वरीत थांबवायला हवा. तसेच सिंधुवाडी येथिल अपुर्ण असलेले समाजमंदिराचे बांधकाम पुर्ण करुन लोकार्पित करण्यासाठी प्रशासनाला निर्देश दयायला हवेत अशी आम्ही आपल्याकडे मागणी करीत आहोत. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** मा. महापौर महोदया, फक्त समाजमंदिरेच नाही तर महापालिकेच्या व नगरपालिकेच्या जेवढया देखिल मालमत्ता आहेत त्या महापालिकेने ताब्यात घ्यायला हव्यात. मग त्या शाळा,कॉलेज अथवा मार्केट असले तरी ताब्यात घ्यायला हवेत. त्या सर्वांचे सर्वेक्षण करुन जेवढया महापालिकेच्या मालमत्ता आहेत त्या महापालिकेच्याच ताब्यात घ्यायला हव्यात. काही वेळा एक वर्षासाठी ठराव करतात, त्यानंतर मालमत्ता संस्थेला देतात. परंतु त्यानंतर संस्था भाडे देते अथवा नाही हे कोणी बघत नाही. त्याचे नियम व शर्ती काय आहेत? त्याप्रमाणेच काम चालायला हवे. आपण त्याबाबतचा आदेश बांधकाम विभागास व मालमत्ता विभागास दयावा.

**मा. सदस्य श्री.दिलीप गायकवाड:—** मा. महापौर व आयुक्त साहेब, माझ्या प्रभागातील शहाड गावठण येथिल शाळा क्र. २३ नादुरुस्त असल्याने तानाजी नगर येथिल सिंधी शाळा क्र. २६ येथे स्थलांतरीत केली आहे. यापुर्वी मा. आयुक्त श्री. सोनावणे यांनी स्वत: जावुन तेथे पाहणी केली होती. तेथिल शाळेच्या जागेवर जवळपास ४० टक्के अतिक्रमण झाले आहे. त्या जागेला कुंपण देखिल नाही अथवा महापालिकेचा बोर्ड देखिल नाही. यासाठी मी वारंवार पत्र देखिल दिले आहे. तरी कृपया ती जागा ताब्यात घेवुन तेथे महापालिकेचा बोर्ड लावण्यात यावा. धन्यवाद.

**मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :—**मा. महापौर व आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात ५ वर्षापुर्वी एक समाजमंदिर बनविण्यात आले होते. ते समाजासाठी, क्लासेस वगैरे चालविण्यासाठी बनविले होते. परंतु त्याचे उद्घाटन करण्यापुर्वीच कुणीतरी समाजमंदिरावर स्वत:चा फोटो लावला आहे तरी महापालिका त्याकडे लक्ष देत नाही. याबद्दल माझ्या प्रभागातील नागरीक तक्रार करीत आहेत. तरी कृपया त्याकडे लक्ष दयावे. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—** मा. महापौर, उप महापौर व आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, माझ्या प्रभागात म्हणजे माझ्या पत्नीच्या प्रभागात हनुमान नगर येथे नगरसेवक निधीतुन समाजमंदिर बनविले होते. असे असतांनाही समाजकंटकांनी त्या समाजमंदिराचा ताबा घेवुन तेथे गैरधंदे सुरु केले आहेत. संभाजी नगर येथिल समाजमंदिरातही असेच धंदे सुरु आहेत. माझ्या पत्नीने पॅनलमध्ये तिसरे समाजमंदिर बनविले आहे तेथे देखिल असेच धंदे सुरु आहेत. माझी महापालिकेला विनंती आहे की, आम्ही आमच्या नगरसेवक निधीतुन जी समाजमंदिरे बनविली आहेत, कमीत कमी त्याचा ताबा तरी लवकरात लवकर घेवुन गरीब जनतेच्या फायदयासाठी त्याचा उपयोग करावा.

**मा. महापौर :—** सन्माननिय सदस्यांनो, आपल्या महापालिकेच्या जेवढया काही मालमत्ता आहेत त्या महापालिकेच्याच ताब्यात राहणे आवश्यक आहे. याबद्दल ब—याच वेळा मी पत्रव्यवहार देखिल केला आहे. सरकारच्या योजनांचा फायदा घेण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. २५ जानेवारीला त्यापैकी काही योजनांची सुरुवात आम्ही केली होती. त्यासाठी आम्हांस जागेची आवश्यकता होती. १०—१५ दिवस जागेचा शोध घेतल्यानंतर आम्ही काही जागा निश्चित केल्या होत्या. जेथे आम्ही काम सुरु करु शकलो असतो. यासाठी मी मालमत्ता विभागाला पत्र देखिल दिले आहे व ब—याचवेळा प्रत्यक्ष देखिल सांगितले आहे. राष्ट्रीय युवा धोरणासाठी आम्ही निधी जमविला असून सरकारच्या इतर योजनांही आपल्याला राबवायच्या आहेत. आता नुकतेच आपल्याला सरकारची एड्स साठी योजना राबविण्याची परवानगी मिळाली आहे. यासाठी त्यांचे तंत्रज्ञ देखिल येणार आहेत. यासाठी आपणांस त्यांना जागा उपलब्ध करुन दयावी लागेल. अशा इतर योजना राबविण्यासाठी आपल्याला समाजमंदिरांची नितांत आवश्यकता आहे. आपल्याकडे सध्या सहा आरोग्य केंद्र आहेत. परंतु त्यांची संख्या अपुरी आहे. आपले काम आता वाढत असल्याने अजुन सहा केंद्राची आवश्यकता आहे. यासाठी देखिल जागेची आवश्यकता आहे. याबद्दल ब—याच तक्रारी प्राप्त होत असतात परंतु आपले

बरेचसे नगरसेवक याबाबत मौन बाळगुन आहेत. त्यांच्या प्रभागात मोठी–मोठी समाजमंदिरे आहेत परंतु तेथे काय होत आहे व ते कोणाच्या ताब्यात आहे याबद्दल ते बोलत नाहीत. आता कुणी तोंड उघडायला तयार नाही. परंतु मी याची चौकशी केली आहे. मी श्री. रौराळे यांना देखिल सांगितले होते की, अजुन सहा नागरी केंद्रांचे उद्घाटन करायचे आहे यासाठी कसेही करुन टाळा तोडुन ते आपल्या ताब्यात घ्यावेत. परंतु दु:खाने सांगावे लागते की, आजपर्यंत असे होवु शकले नाही. आता ब–याच नगरसेवकांनी याबद्दल तक्रार केली आहे. तसेच प्रश्नही दिला आहे. आपल्याला जागेची गरज असल्याने मी आयुक्तांना देखिल विनंती करेन की, शासनाच्या योजना राबविण्यासाठी आपल्याला जागेची आवश्यकता आहे. यासाठी आपण मालमत्ता विभागाला आदेश दयावेत की, आपली जेवढी काही समाजमंदिरे आहेत ती आपल्या ताब्यात घ्यावीत. आवश्यकता भासल्यास टाळा तोडुन आपला टाळा लावावा. जेणेकरुन आपण योजना राबवु शकु व आपली मालमत्ता आपल्या ताब्यात देखिल येईल. यासाठी एक आठवडयाच्या आत योग्य ती कार्यवाही करुन तीस समाजमंदिरांची चावी आपल्या ताब्यात घ्यावी. जसे श्री. बोडारे यांनी सांगितले तर मार्केट देखिल आपल्या ताब्यात घ्यावीत. येणा–या महासभेत याबद्दलचा अहवाल दयावा. तसेच आठ दिवसाच्या आत समाजमंदिराचा ताबा आपल्या हातात घ्यावा.

**मा. सदस्या श्रीमती निता अहूजा यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**</u>मार्केट, शाळा, कॉलेज तसेच महापालिकेच्या जेवढया काही इमारती आहेत त्यावर महापालिकेचाच ताबा असायला हवा. संस्थेला दिले असेल तर संस्था नियमाचे पालन करते अथवा नाही हेही बघावे.

<u>**मा. महापौर:–**</u> शाळा आपल्या ताब्यात आहे. एक शाळा आपल्या ताब्यात आहे.

<u>**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**</u> ज्या शाळा खाजगी संस्थांना दिल्या आहेत त्यांचे देखिल बघावे.

<u>**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–**</u> सिंधुवाडी येथिल समाजमंदिराचे काम पुर्ण करुन ते देखिल ताब्यात घ्यावे.

<u>**मा. सचिव :–**</u> प्रश्न क्र. ४७० हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

<u>**प्रश्न क्र. ४७० :–**</u> उल्हासनगर महानगरपालिकेच्या २००५–०६ वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते विकासासाठी किती वित्तीय तरतुद होती?
अ) या तरतुदीतुन रस्ते विकासाची एकुण किती कामे करण्यात आलीत?

ब) त्यापैकी किती ठिकाणी शहर विकास आराखडयातील तरतुदीनुसार शहर विकास आराखडयातील तरतुदीनुसार रस्ते विकास करण्यात आला?

<u>उत्तर :–</u> ८,५०,००,०००/–
अ) ५ कामे (पैकी १ प्रगतीपथावर)
ब) ५ ही कामे विकास आराखडयातील तरतूदीनुसार रस्तांमधील आहेत.

<u>**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :–**</u> मा. महापौर महोदया, मी वरीलप्रमाणे प्रश्न विचारला असता मला उत्तर दिले आहे की, ५ कामे केली आहेत. मी बांधकाम विभागाकडुन खुलासा घेवु इच्छितो की, हा जो ८.५० कोटी खर्च झाला आहे तो ५ कामांवरच झाला आहे का?

<u>**प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):–**</u>मा. महापौर महोदया, यावर्षीच्या अर्थसंकल्पात रस्ते नवनिर्माणासाठी व पुल नवनिर्माणासाठी रुपये ८.५ कोटी तरतुद ठेवली होती. त्या अंतर्गत सुमारे ८० कामे मंजुर झाली आहेत. ही जी ५ कामे आहेत ती आम्ही हाती घेतलेली कामे आहेत. त्यापैकी ३ कामे पुर्ण झाली

असून २ कामे प्रगतीपथावर आहेत. ८० कामांपैकी २७ कामे मोठी असून त्यांची निविदा प्रक्रिया सुरु आहे तसेच २२ कामांची निविदा प्रक्रिया झाली आहे. ही जी कामे आहेत ती मोठे रस्ते व अंतर्गत रस्त्याची आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— याचा अर्थ सर्व कामे ही मुख्य रस्त्यांची नाहीत.

प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):—नाही, यामध्ये अंतर्गत रस्ते, रस्त्यालगतच्या नाल्या, साकव अशी विविध कामे समाविष्ट आहेत. रस्त्यांशी संबंधीत असल्याने ही कामे या लेखा शिर्षात येतात.

मा. सदस्य श्री. राज असरेंडकर :—मा. महापौर महोदया, आपण रस्त्यांची कामे करण्यासाठी वेगवेगळयाप्रकारे अर्थसंकल्पात तरतुदी करतो. जसे रस्ता दुरुस्ती, नगरसेवक निधी व इतर निधी आहेत. यामध्ये एक मुख्य शिर्ष म्हणजे रस्ते विकासाचे शिर्ष आहे. आपण जेव्हा त्याची तरतुद करतो तेव्हा अशी अपेक्षा केली जाते की, या शहरातील जे मुख्य, विकास आराखडयातील रस्ते आहेत, जेथे मोठयाप्रमाणावर वाहतुक असते अशा रस्त्यांचा विकास या शिर्षातंर्गत करणे आवश्यक असते. परंतु प्रत्यक्षात असे होत नाही. आपण अंतर्गत रस्त्यांच्या कामांसाठी नगरसेवक निधी देखिल वापरतो, रस्ते दुरुस्तीचा निधी देखिल वापरतो, प्रभाग समितीचा देखिल वापरतो, तसेच रस्ते विकासाचा निधी देखिल वापरतो. तर जे मोठे व मुख्य रस्ते आहेत त्यांसाठी वेगळी काही तरतुद आहे का?

प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):—मुख्य रस्ते याच शिर्षातर्गत दुरुस्त केले जातात.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—आपल्या बांधकाम विभागात रस्त्यांचे रजिस्टर आहे काय? रस्त्यांच्या रुंदीच्या मोजमापासह आपल्याकडे रजिस्टर आहे का, यादी आहे का?

प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):—आपल्याकडे यादी तयार आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— मा. महापौर महोदया, ज्यावेळी आम्ही आपल्या बजेटमध्ये रस्त्याच्या विकासासाठी स्वतंत्र तरतुद करतो तेव्हा मुख्य रस्त्यांची दुरुस्ती केली जावी अशी अपेक्षा करतो. परंतु आपण अंतर्गत रस्त्यांसाठी हा निधी मोठया प्रमाणावर वापरत आहोत तसेच रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी स्वतंत्रपणे रुपये ५० लाख खर्च करत आहोत. जर आपण रस्ते विकास निधीतुन ८ ते १० रस्ते बनविले तर आपल्या शहरातील बहुतांश रस्ते विकसित होवु शकतात. परंतु जे मुख्य वर्दळीचे रस्ते आहेत तेथे हा खर्च केला गेला नाही. अंतर्गत रस्त्यांसाठी जास्त खर्च झाला आहे. तर अशाप्रकारे खर्च करणे हे किती तार्किक आहे? शिर्के साहेब उत्तर दया.

प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):—आमच्याकडे जेवढे देखिल प्राकलने मंजुर झाली आहेत ती सर्व नगरसेवकांच्या मागणीवरुन झालेली आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— नगरसेवक निधिसाठी कुणाची मागणी असते?

प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):—नगरसेवकांनी मागणी केलेली कामे केली जातात.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— नगरसेवक निधीसाठी आपण नगरसेवकांकडुन प्रस्ताव मागवतो मग जनरल निधीसाठी कुणाकडुन मागवतो?

प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):—सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये जेवढी देखिल कामे होतात ती सर्व नगरसेवक सुचवतात त्याप्रमाणे हाती घेतली जातात.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— बजेट तयार करतांना तुम्ही किती रस्ते करायचे, किती वाचनालय बांधायचे, याबद्दल काही नियोजन करता काय?

प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):—महासभेने मागील आर्थिक वर्षात अर्थसंकल्प मंजुर करतांना काही रस्ते बनविण्यासाठी मार्गदर्शक सुचना दिल्या होत्या त्याप्रमाणे आम्ही दोन—तीन रस्त्यांची कामे

हाती घेतली होती. एक संतु बिल्डींगचा रस्ता आहे, सिरु चौक येथिल रस्ता आहे अशा दोन–तीन रस्त्यांची कामे आम्ही केलेली आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :– सगळे रस्ते का केले नाहीत?

प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):–आर्थिक परिस्थितीमुळे ते शक्य नव्हते.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :– परंतु आपण कामे तर करतो आहोत. आता ८.५ कोटी तर खर्च झाले आहेत.

प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):–सध्या तरी पुर्ण खर्च केले नाहीत. कामे प्रस्तावित केली आहेत. २२ रस्त्यांची निविदा प्रक्रिया झाली आहे. ५ कामे हाती घेतली असुन त्यापैकी ३ कामे पुर्ण झाली असुन २ प्रगतीपथावर आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :– त्या लेखा शिर्षात किती तरतुद शिल्लक आहे?

प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):–सध्या काहीही तरतुद शिल्लक नाही. निधीच्या हिशोबाने मी बोलत नसुन लेखा शिर्षाबद्दल बोलत आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :– मा. महापौर महोदया, यांनी जे उत्तर दिले त्यावरुन असे दिसुन येते की, लेखा शिर्षात तरतुद आहे परंतु त्यातुन काय काम करायचे याची तरतुद नाही. आपले सन्माननिय सदस्य त्यामध्ये माझा देखिल समावेश आहे. आम्ही प्रस्ताव सादर करतो. नंतर त्यामधुन मग अंतर्गत रस्ते व इतर कामे केली जातात. असे असेल तर मग रस्ते विकासासाठी वेगळी तरतुद ठेवण्यात काही गमक नाही. रस्ते विकासासाठी रुपये ८.५ कोटीची तरतुद असतांना देखिल आपणांस खड्डे भरण्यासाठी अजुन ५० लाख खर्च करावे लागतात. येणा–या काळामध्ये रस्ते बनविण्यासाठी काही प्रस्ताव आहे का?

प्रभारी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (श्री. आर.बी. शिर्के):–आता आम्ही आयआयडीपी, टप्पा–२ प्रस्तावित करणार आहोत. त्यामध्ये सर्व मुख्य रस्त्यांचा अंतर्भाव असणार आहे. नविन वर्षात ही कामे करण्यात येतील.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :– मा. महापौर महोदया, यांच्या उत्तरातुन काही साध्य झाले नाही. हे सिध्द झाले आहे की, विकासासाठी काहीही नियोजन नाही. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला आपण आदेश दयावा की, नविन वर्षात काही तरी नियोजन करुन त्याची अंमलबजावणी करावी.

मा. सचिव :– प्रश्न क्र. ४७१ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ४७१ :– शहीद अरुण कुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल की इमारत) का ठेका किन किन शर्तो पर दिया गया है और क्या वे सभी शर्ते पूरी हुई है? इस सन्दर्भ में सविस्तर जानकारी दी जाये साथ ही ये भी अवश्य जानकारी दी जाए की

१) टाऊन हॉल की वह इमारत कितने चौरस फुट की है? आज की मार्केट वेल्यु उस इमारत की क्या है और कितना किराया दर माह उमनपा ने वसूला है?

२) रविवार के दिन उक्त सभागृह की बुकिंग करने का अधिकार किसे है?

३) क्या उक्त सभागृह सांस्कृतिक, शैक्षणिक और सामाजिक संघटनो को अपने कार्यक्रम करने के लिए उमनपा ने कोई दर तय करके ठेकेदार को दी है जैसे जकात ठेके पर देने से पुर्व उन्हें टॅक्स की दरों की सुची के आधार पर ही जकात वसूलने की शर्ते रखी गई थी?

४) क्यों शहिद जनरल अरुण कुमार वैद्य (टाऊन हॉल की ईमारत) पर उमनपा की मिल्कीयत का बोर्ड लगाना जरुरी नहीं समझा गया है? जबरी उक्त ईमारत का ठेकेदार कुमार है पर मालिक आज भी उल्हासनगर मनपा है इसका भी स्पष्टीकरण दे।

उत्तर :— १)उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या नावपावती नुसार अ.क्र. २९१ चे क्षेत्रफळ ४९२५ ३/९ चौ. वार म्हणजेच ४११९.७० चौ.मी. आहे. ३३५१०.२२ चौ.मी. आहे. तसेच इमारतीचा बाजारभाव सार्व.बांध. विभागाशी निगडित आहे व करारनाम्याप्रमाणे अभिकर्ता कडुन प्रतिवर्षी (५ वर्षापर्यंत) रुपये ३,००,०००/— एवढे भाडे आकारणी केली जाते.
२) गर्व्हमेंट रेसोल्युशन अरबन डेव्हलपमेंट डीपार्टमेंट नं. व्हीडीसी/युएमसी२०००/२२९७/पीके१४३/युडी—२३, दि. १२/८/०२ नुसार आठवडयाच्या प्रत्येक रविवारी ड्रामा प्लेज व सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता मनपाने ठरवून दिलेल्या दराने आरक्षण ठेवण्यात येईल.
३) मनपाने ठरवुनल दिलेल्या दरांनुसार सांस्कृतिक कार्यक्रम शैक्षणीक व सामाजिक संघटनांकडुन अभिकर्तानि फी आकारावयाची आहे.
४) सदर इमारतीवर शहिद अरुणकुमार वैदय सभागृह (टाऊन हॉल) असा नाम फलक लावणे जरुरीचे आहे. तसेच सदर इमारतीचा ठेकेदार कुमार पी. चैनानी असुन सदर इमारत मनपा मालकीची आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— मा. महापौर महोदया, या प्रश्नास सुरुवात करण्यापुर्वी मी सचिव साहेबांकडुन सल्ला घेवु इच्छितो. सचिव साहेब, आज एखादा स्टॅम्प पेपर निर्गमित केला असेल तर त्यावर किती दिवसांपर्यंत करारनामा करणे आवश्यक असते, जर सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटला असेल तर काय होईल?

मा. सचिव :— त्याची वैधता समाप्त होईल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— माझ्या प्रश्नाचा हेतु हाच आहे. सन २००० मध्ये स्टॅम्प पेपर घेण्यात आला परंतु करारनामा २००२ मध्ये केला गेला. त्यामुळे मला हा स्टॅम्प पेपर तेलगीचा आहे असे मला वाटते. त्यामुळे यावर काय चर्चा करायची हा प्रश्न पडला आहे. महापौर महोदया, कोणताही स्टॅम्प पेपर हा निर्गमित केल्यानंतर ६ महिन्यांसाठी वैध असतो. २३/११/२००० ला हा स्टॅम्प पेपर निर्गमित झाला आहे. त्यानंतर १९/८/२००२ ला करारनामा झाला आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, मी या विषयावर बोलु इच्छितो. ज्यावेळी हा करारनामा झाला त्यावेळी कोण सही करत होते? ठेकेदारासोबत महापालिकेने करार केला होता. महापालिका तर्फे कोणत्या अधिका—याने करारनामा केला? कोणत्या अधिका—याने दुर्लक्ष केले? कृपया याबाबत सविस्तर माहिती दयावी.

मा. सदस्य श्री. राजु टेकचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— महत्वाची गोष्ट म्हणजे स्टॅम्प पेपरची वैधता संपलेली आहे. हा स्टॅम्प पेपर नोटरी अथवा रजिस्टर केला गेला नाही. मला असे वाटते की, सचिव साहेब ज्यांना येथे कायदयाची सर्वात जास्त माहिती आहे त्यांनी आम्हांला याबद्दल माहिती दयावी. हा करारनामा प्राप्त करुन घेण्यासाठी मी पाच दिवसांपासून मालमत्ता विभागात खेटे घालत होतो. परंतु मला करारनामा देण्यात टाळाटाळ करण्यात येत होती. आता १५ मिनिटांपुर्वीच मला हे प्राप्त झाले आहे. मी ते पुर्ण वाचले नाही परंतु त्यातील काही मुद्दे काढले आहे. तर महापालिकेत कशाप्रकारे कारभार सुरु आहेत हे सचिवांनी सांगावे. तसेच हा करारनामा वैध आहे का हे देखिल सांगावे. सचिव साहेब, मला कायदयाबद्दल माहिती नसल्याने आपण मला माहिती दयावी जेणेकरुन पुढील चर्चेस प्रारंभ करता येईल.

मा. सचिव :— मी स्टॅम्प पेपरच्या वैधतेबद्दल आपणांस सांगितले आहे. आपणांस कायदेशीर मुद्दयांवर अभिप्राय हवा असेल तर त्यासाठी विधी अधिकारी उत्तर देतील.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— मा. महापौर, उप—महापौर प्रश्न उत्तराचा कालावधी वाढविला आहे का? सुरुवात किती वाजता झाली?

मा. सचिव :— ५.१५ वाजता सुरुवात झाली.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—आता कधी संपणार आहे?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—अजून मी प्रश्नाला सुरुवातच केली नाही. विधी अधिका—यांना येथे बोलवा. महापौर महोदया, येथे विधी अधिकारी उपस्थित नाहीत. मा. महापौर महोदया, हा करारनामा वैध मानायचा की नाही हे मला सांगावे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :— मा. महापौरजी, श्री. लालवानी हे एका प्रश्नाचे उत्तर मागत आहेत. कायदयाची माहिती मिळण्यासाठी आपल्या महापालिकेने विधी अधिकारी ठेवले आहेत. ते देखिल एक सोडुन दोन ठेवले आहेत. आज महासभेत हा प्रश्न येणार आहे याची माहिती त्यांना असतांना देखिल सभागृहात दोन्ही विधी अधिकारी अनुपस्थित आहेत याचे कारण काय आहे?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—मा. महापौर महोदया, हा एक जटिल प्रश्न आहे याचे प्रश्न मिळाल्यानंतर मी पुढील प्रश्न विचारु शकेन.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :— मा. महापौर महोदया, विधी अधिकारी कुठे आहेत? त्यांना येथे बोलवा. आम्ही आजपर्यंत विधी अधिका—यांना कधीही सभागृहात पाहिलेले नाहीत. कोण आहेत? त्यांचा परिचय तरी करुन दया.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— मा. महापौर महोदया, एक मजेची गोष्ट सांगु इच्छितो. निविदा सुचना २३/१०/२००० ला प्रसिध्द झाली. स्थायी समितीचा ठराव २५/१०/२००० ला मंजुर झाला. महासभेत २०/७/२००० ला हा प्रस्ताव मंजुर झाला. महापालिकेने २३/११/२००० ला कार्यादेश दिला. परंतु करारनामा २००२ मध्ये झाला. दोन वर्षानंतर? स्टॅम्प पेपर आहे सन २००० चा. मला असे वाटते की, ठेकेदाराशी आधी जो करारनामा केला होता तो फाईलमधुन काढुन दुसरा करारनामा ठेवला आहे. असे असेल तर मुळ करारनामा कुठे आहे?

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :— मा. महापौरजी, श्री. लालवानी यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी येथे विधी अधिका—यांचा अजुन पत्ता नाही. किती वेळा त्यांना बोलवायला हवे. त्यांना येथे बोलवा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— महापालिकेचे काम कसे चालते ते बघा. निविदा सुचना २३/१०/२००० ला प्रसिध्द होते, स्थायी समितीचा ठराव २५/१०/२००० ला मंजुर होता, महासभेत २०/७/२००० ला हा प्रस्ताव मंजुर होतो, महापालिकेने २३/११/२००० ला कार्यादेश देते, परंतु करारनामा २००२ मध्ये होतो आणि स्टॅम्प पेपर आहे सन २००० चा. मला कळत नाही की चक्कर काय आहे? दाल में काला है या पुरी दाल काली है?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—मा. महापौर महोदया, हा प्रश्न आहे की चर्चा सुरु आहे? प्रश्नामध्ये भुमिका वगैरे मांडायची असते काय? तसे असेल तर आजपासुन आम्ही देखिल सुरुवात करु.

मा. महापौर :— हे विधी अधिका—यांना काही प्रश्न विचारु इच्छितात परंतु विधी अधिकारी सध्या येथे उपस्थित नाही. तसेच आता प्रश्नोत्तराचा कालावधी देखिल संपला आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— हा प्रश्न पुढील महासभेसाठी राखुन ठेवण्यात यावा.

मा. महापौर :— हा प्रश्न राखुन ठेवण्यात येईल तसेच यावर उत्तर देण्यासाठी पुढील महासभेत विधी अधिकारी यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—मा. महापौर महोदया, विधी अधिकारी यांचे दर्शन तरी आम्हांला घडवा. ही पध्दत चुकीची आहे. या अधिका—यांनी शिस्तीचे पालन करायला हवे, हा पुर्ण महासभेचा अपमान आहे. येथे महापालिकेतर्फे पगार घ्यायचा व एवढी मस्ती दाखवायची हे चुकीचे आहे. आम्ही आतापर्यंत येथे विधी अधिकारी व विधी सल्लागार यांना पाहिलेले नाही. आम्ही प्रश्न कशासाठी विचारतो? जो प्रश्न कायदयाशी संबंधीत असेल त्याचे उत्तर देण्यासाठी विधी अधिकारी व विधी सल्लागार उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :—** विधी अधिकारी आता आल्या आहेत. त्यांची येथे फार मागणी होत आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना उदया कॅव्हेट दाखल करायचे असल्याने त्या व्यस्त होत्या. पुढील वेळी त्या याचे उत्तर देतील. आपल्याकडे जे विधी सल्लागार साळवी आहेत त्यांच्या सेवा खंडित करण्यासाठी मी आयुक्तांना पत्र देखिल दिले आहे. ते निवृत्त आहेत, तसेच त्यांची प्रकृतीही बरोबर नसते ब—याच दिवसांपासुन ते रजेवर आहेत. त्यामुळे मी आता देखिल आयुक्तांना विनंती करते की, त्यांच्या सेवा संपुष्टात आणाव्यात.

**मा. सचिव :—**कृपया लक्ष दयावे, भारतीय जनता पक्षातर्फे गटनेते पदी श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचे नाव सुचविण्यात आले असुन मा. महापौरांनी यास मान्यता दिली आहे. त्यांना हार्दिक शुभेच्छा! तसेच आता आपल्या महापालिकेत एक नविन शासकीय अधिकारी श्री. मिलींद सावंत जे उपायुक्त पदी रुजु झाले आहेत ते येथे येवुन त्यांची ओळख आपणांस करुन देतील.

**उपायुक्त, अ.बां.नि.वि.( श्री. मिलींद सावंत):—** मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य, मी पहिल्यांदाच येथे उभा असल्याने माझा परिचय आपणांस करुन देतो. माझे नाव मिलिंद सावंत असे असुन १९९० मध्ये मी महाराष्ट्र शासनाचा मुख्याधिकारी संवर्गात दाखल झालो आहे. यापुर्वी उस्मानाबाद, रत्नागिरी, तळेगाव, बदलापुर, श्रीवर्धन या नगरपालिकांमध्ये मुख्याधिकारी म्हणुन काम केले आहे. आता येथे मी उपायुक्त पदावर रुजु झालो असुन माझ्या हातुन चांगले काम होईल व आपले सहकार्य मिळत राहील अशी आशा ठेवुन माझे दोन शब्द संपवतो.

**मा. सचिव :—** कृपया लक्ष दयावे. ५ लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

लक्षवेधी सूचना कमांक १

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी
अनुमोदकाचे नाव :— श्री. विश्वनाथ पाटील

विषय :— उल्हासनगर शहरातील पुरग्रस्त नागरीकांना घरपट्टी माफ करणे बाबत.

लक्षवेधी सूचना कमांक २

सुचकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

विषय :— उल्हासनगर शहरात भुयारी गटार योजनेचे काम ठेकेदार व्यवस्थित करीत नसल्याबाबत

लक्षवेधी सूचना कमांक ३

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

विषय :— आरक्षित भुखंडांवर बांधकाम परवानगी दिल्यानंतर किती विकासकांनी महापालिकेला नियमाप्रमाणे जमिन / सदनिका हस्तांतरित केल्या त्याची माहिती.

लक्षवेधी सूचना कमांक ४

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

विषय :— भुयारी गटार योजनेची काम व्यवस्थित होत नसल्याबाबत तसेच सदर कामाचा ठेका देताना झालेल्या भ्रष्टाचाराबाबत.....

यापैकी फक्त दोनच लक्षवेधी सुचना स्विकृत करता येतील व त्याबद्दलची घोषणा देखिल मा. महापौरच करतील.

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :—** मा. महापौर व सचिव साहेब, माझी लक्षवेधी आपण वाचली नाही ती देखिल वाचुन दाखवावी.

**मा. सचिव :—**
लक्षवेधी सूचना क्रमांक ५

सुचकाचे नाव :— श्री. अशोक ठाकुर
अनुमोदकाचे नाव :— श्री. गौतम भालेराव

विषय :— उल्हासनगर शहरात साफसफाईचे काम व्यवस्थितरित्या होत नसल्याबाबत तसेच नाला सफाईच्या कामास सुरुवात न झाल्याबाबत.....
पहिली लक्षवेधी सुचना जी घरपट्टी माफ करण्यासंबंधी आहे त्या सुचनेला मा. महापौरांनी मान्यता दिली आहे व दुसरी लक्षवेधी सुचना जी आहे जिचे सुचक श्री. जमनादास पुरस्वानी व अनुमोदक श्री. धनंजय बोडारे ती भुयारी गटार योजनेशी संबंधीत आहे. उर्वरित तीन लक्षवेधी सुचना याच विषयाशी सबंधीत आहेत. श्री. धनंजय बोडारे व श्री. जमनादास पुरस्वानी यांची आरक्षित भुखंडावरील बांधकाम परवानगीशी संबंधीत लक्षवेधी सुचना मा. महापौरांनी अस्विकृत केली आहे. त्यामुळे पहिली लक्षवेधी सुचना व इतर तीन लक्षवेधी सुचना ज्यांचा विषय एकच आहे त्या स्विकृत करण्यात येत आहे. तसेच आयत्यावेळचे विषय म्हणुन पुढील प्रस्ताव प्राप्त झाले आहेत आपली मान्यता असल्यास ते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करुन घेता येतील.

आयत्या वेळचा विषय क्र १

विषय :— दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत ४३ विविध कामांच्या प्राकलनास मान्यता मिळणेबाबत....

आयत्या वेळचा विषय क्र २

विषय :— उल्हासनगर शहराच्या विकास योजनेनुसार विकास साधणे बाबत.

आयत्या वेळचा विषय क्र ३

विषय :— मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. १०३, शीट क्र. ५४ मध्ये खेळाचे मैदानासाठी फेरबदल करणे बाबत.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—** मा. महापौरजी, या तीन विषयांपैकी दोन विषय कायदेशीररित्या आयत्यावेळचे विषय म्हणुन महासभेत आणणे योग्य होणार नाही. आरक्षणाचा व विकास आराखडाचा जो विषय आहे, दोन्ही विषय विशेष महासभेत आणायला हवेत, सर्वसाधारण महासभेत आणणे योग्य होणार नाही. याबाबत कायदा देखिल आहे. याबाबत सचिव देखिल आपणाला मार्गदर्शन देतील.

**मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंड, श्री. श्यामसुंदर रोहडा, श्री. ईश्वर पमनानी, श्रीमती भावना खिलनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**मा. महापौर :—** दलीत वस्तीशी संबधित कामांचा विषय आयत्या वेळचा विषय म्हणुन सभेच्या कामकाजात सर्वानुमते समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच इतर दोन विषय समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येत नाही.

**मा. सचिव :—** आपले असे म्हणणे आहे की, फक्त एकच विषय घ्यावा, दलित वस्तीचा. आपल्या सर्वांच्या संमतीने व मा. महापौरांच्या आदेशाने दलित वस्तीचा एकच विषय आयत्यावेळचा विषय म्हणुन आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यात येत आहे. लक्षवेधी सुचनेला प्रारंभ करण्यात येत आहे.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्र. १

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विश्वनाथ पाटील

**विषय :— उल्हासनगर शहरातील पुरग्रस्त नागरीकांना घरपट्टी माफ करणे बाबत.**

लक्षवेधी सुचनेद्वारे आपले विनंती पुर्वक लक्षवेधु इच्छितो की, माहे जुलै, २००५ मध्ये अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमुळे शहरातील बहूतांश भाग पाण्याखाली येवुन जनजिवन विस्कळीत झाले होते. पुराचे पाणी नागरीकांचे घरात शिरुन चिजवस्तु, सामान कपडालत्ता, अन्नधान्य कागदपत्र घरेदारे यांचे मोठया प्रमाणात नुकसान होवुन जिवित व वित्तहानी झाली होती. यापैकी अनेक नागरीकांना शासनाकडुन आर्थिक मदतही मिळाली आहे. परंतु शहरातील छोटेमोठे दुकानदार व कारखानदार सदर आर्थिक मदतीपासून वंचित राहिले आहे अशा पुरग्रस्त नागरीकांना दुकानदार व कारखानदारांना महापालिकेने घरपट्टी माफ करावी म्हणून महासभेत चर्चा करणेत आली व चर्चेत अनुषंगाने मा. महापौर यांनी संबंधीतांची घरपट्टी माफ करण्यात येईल असे सभागृहास आश्वासन दिले होते. परंतु मिळकत धारकांना देण्यात आलेल्या घरपट्टीच्या पावत्या बघितल्या असता चालुवर्षी पुरग्रस्तांना घरपट्टी माफ करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास येत आहे. सदरचा प्रकार हा पुरग्रस्तांचे भावनाशी खेळण्याचा प्रकार वाटतो. तरी कृपया पुरग्रस्त नागरीकांना दुकानदार व कारखानदार यांना घरपट्टी माफ करणे या महत्वाचे लक्षवेधी सुचनेवर चर्चा होवुन संबंधीतांना घरपट्टी माफ व्हावी ही आगेहाची नम्र विनंती.

---

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :—** मा. महापौर व आयुक्त साहेब, मी जी लक्षवेधी सुचना दिली आहे त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :—** आपली लक्षवेधी सूचना स्विकृत केली आहे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** मा. महापौरजी, लक्षवेधीद्वारे या सभागृहाचे लक्ष केंद्रीत करत असुन दिनांक २६ जुलै रोजी उल्हासनगर शहरामध्ये महापूर आला होता. त्यानंतर ऑगस्ट महिन्यामध्ये जी महासभा झाली होती त्या सभेत मा. महापौरांनी आश्वासन दिले होते की, जेथे जेथे पूर आला आहे, ज्या घरांचे, दुकानदारांचे व कारखानदारांचे नुकसान झाले असेल अशा लोकांची एक वर्षाची घरपट्टी माफ करण्यात येईल. परंतु तो अदयापपर्यंत माफ केला नाही. उलट ती घरपट्टी पुन्हा त्यांना देण्यात आली आहे. त्यामुळे लोकांमध्ये चीड निर्माण झाली आहे. मा. महापौरांनी घरपट्टी माफ करण्यासाठी लवकरात लवकर काहीतरी उपाययोजना करावी. मागच्या वेळेस मी याच विषयावर प्रश्न विचारला होता त्यावेळी चर्चा झाली तेव्हा सांगितले होते की, तहसिलदारांकडुन यादी मागवु. आता तहसिलदारांनी यादी महापालिकेत दिली आहे. ते दिल्यानंतर कर माफीसाठी काही ठराव करणे आवश्यक असेल तर तो ठराव आजच्या महासभेत आणून त्याला मंजुरी दयावी व त्या लोकांची एक वर्षाची घरपट्टी माफ करावी. ज्या लोकांचे पुराने नुकसान झाले होते अशा लोकांना राज्यसरकारने रुपये ५ हजाराची मदत दिली होती. परंतु जे दुकानदार व कारखानदार आहेत ज्यांच्या दुकानात पाणी शिरले होते अशा लोकांना एक पैश्याचीही मदत दिली नाही. फक्त त्यांच्या भावना भडकावण्याचे काम राज्यसरकारने केले आहे. आपण जर त्यांची घरपट्टी माफ केली नाही तर आपल्या विरुध्दही त्या लोकांच्या भावना भडकतील. म्हणुन महापौरांनी त्या लोकांची घरपट्टी माफ करण्यासाठी आताच्या आता महासभेमध्ये ठराव करण्याची गरज असेल तर तो ठराव करुन घ्यावा. दुसरे म्हणजे या लक्षवेधीद्वारेच पुरग्रस्तांच्या बाबतीत मी एक प्रश्न उपस्थित करु इच्छितो की ज्या लोकांच्या घरात पुराचे पाणी शिरुन नुकसान झाले होते अशा लोकांना पुरग्रस्त म्हणुन दाखला दयायला हवा होता. तो दाखला या महापालिकेने दिलेला नाही. तहसिलदाराने जो दाखला दिलेला आहे तो फक्त सरकारी कर्मचा—यांना दिला आहे. बाकीचे लोक त्या विभागात राहतात त्यांचेही नुकसान झाले आहे. त्या लोकांनाही तो दाखला मिळावा. तो दाखला महापालिकेने दयावा की तहसिलदाराने दयावा हे निश्चित करुन कुणीतरी तो दाखला दयावा. कारण सरकारी नोकरांव्यतिरिक्तही काही लोक त्या भागांमध्ये राहतात. त्यामध्ये रिक्षावाले आहेत, हातमजुरी करुन पोट भरणारे आहेत, कारखानदार व दुकानदारांचे सर्व कागदपत्रे पुरामध्ये वाहून गेले आहेत. ते राज्य शासनाच्या अथवा आरटीओच्या ऑफिसमध्ये काही

कामानिमित्त गेल्यास त्यांच्याकडे पुरग्रस्ताच्या दाखल्याची मागणी केली जाते. यासाठी या लोकांना पुरग्रस्ताचा दाखला आपण दयायला पाहिजे. या विषयावरही आपण चर्चा करावी. दुसरा विषय असा आहे की, महापूर आलेल्या विभागामध्ये लोकांची लाकडाची, लफाटयाची घरे, कच्ची बांधकामे दुरुस्त करण्यासाठी लोक आपल्याकडे परवानगी मागतात. कागदपत्रे असल्याशिवाय आपली महापालिका परवानगी देत नाही तसेच त्यांच्याकडे काहीही कागदपत्रे नाहीत. आता तर महापालिकेने परवानगी देणेही बंद केले आहे. या सर्व विषयांवर आपण विस्तृत चर्चा करावी. दुसरी गोष्ट म्हणजे या शहरामध्ये ज्या वेळी महापूर आला होता त्यावेळी लोकांना महापूरातुन वाचविण्यासाठी जी व्यवस्था आवश्यक होती तर अग्निशमन विभाग वगळता ती आपल्याकडे नव्हती. पुन्हा अशी परिस्थिती निर्माण झाली तर त्यावर मात करण्यासाठी ती उपाययोजना आपण तयार ठेवणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना आखली नाही तर पुन्हा तशी परिस्थिती निर्माण होईल. मागच्यावेळेस महापालिकेच्या अधिका—यांना व नगरसेवकांना जो त्रास झाला आहे, लोकांच्या भावना भडकल्या होत्या त्यांना सामोरे जावे लागले आहे. असे होवू नये यासाठी महापालिकेने उपाययोजना आताच आखायला हवी. अशी लक्षवेधी सुचना मी मांडत आहे. तसेच ही लक्षवेधी सुचना मांडण्यासाठी महापौरांनी जी परवानगी दिली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. आता यावर विस्तृत चर्चा झाली आहे, त्यावर उपाययोजनाही व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करतो.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :—</u> मा. महापौरजी, शहरात जो पुर आला होता त्याबद्दल मी काही बोलु इच्छितो. माझ्या प्रभागातील काही विभाग पाण्याखाली गेला होता. कृष्णा नगर, दुलारी पाडा, लक्ष्मणकडु चाळ, सेक्शन—२६ व योगेशनगर. तेथिल रहिवाशी मा. महापौरांकडे आल्यानंतर मा. महापौरांनी त्यांच्यासाठी तहसिलदारांना एक पत्र दिले होते. परंतु तहसिलदारांकडे वारंवार चकरा मारुनही त्यांनी काही एक केले नाही. ब—याचशा लोकांना काही एक मदत दिली नव्हती. तर मला असे वाटते की, ज्यावेळी करमाफीची योजना सुरु होईल त्यावेळी मा. महापौरांनी ज्या लोकांना पत्र दिले होते त्यांनाही या योजनेचा फायदा दिला जावा असे माझे निवेदन आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u> मा. महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, मागच्या महासभेमध्ये मा. महापौरांनी आश्वासन दिले होते की, तहसिलदारांकडुन पुरग्रस्तांची यादी मागविली जाईल. ती यादी आलेली आहे परंतु त्या अगोदर मी त्यांना सांगितले होते की, सन्माननिय श्री. सोनवणे साहेब हे आयुक्त असतांना त्यांनी पुरग्रस्तांची यादी बनविली होती. त्यामुळे तहसिलदारांकडुन यादी मागवायची आवश्यकता नव्हती. आता यादी आली असल्यास ताबडतोब ठराव करुन पुरग्रस्तांना कर माफ करण्यात यावा. कारण आम्ही प्रभागात गेल्यानंतर आम्हांला वारंवार लोक प्रश्न विचारत असतात की, आम्ही कर भरावा अथवा नाही. काही लोकांनी आधीच कर भरलेला आहे. त्यांनी कर भरलेला असल्यास त्यांना पैसे परत दयावे अथवा पुढील वर्षीच्या करामध्ये योग्य ते समायोजन करावे. धन्यवाद ।

<u>मा. महापौर :—</u> सन्माननिय सदस्यांनो, प्रशासनाने देखिल एक प्रस्ताव दिला आहे की, कर माफी करु नये आणि कर माफी केल्यास काय—काय नुकसान होईल. तर मला असे वाटते की, श्री. हरेश इदनानी यांनी येथे येवुन माहिती दयावी त्यानंतर आपल्या सर्वांच्या सहमतीने निर्णय घेतला जाईल.

<u>उप—मुख्यलेखा अधिकारी (श्री. हरेश इदनानी):—</u>मा. महापौर, अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या मिळकतदारांना कर माफी देण्याबाबत जी सुचना प्राप्त झाली आहे त्यावर प्रशासनाचा जो प्रस्ताव आहे तो मी आपल्यासमोर वाचुन दाखवितो. उल्हासनगर शहरात २६ जुलै ते २८ जुलै २००५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पुरपरिस्थितीत बाधित झालेल्या मालमत्ता धारकांना सन २००५—०६ चे मालमत्ता करात सुट देणेबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

शहरात बाधित झालेल्या निवासी/ अनिवासी मालमत्ता धारकास शासनातर्फे अंदाजे ४ कोटी वित्तीय अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. शिवाय महानगरपालिका तर्फे नागरीकांना अन्न, धान्य, औषधे, चटई, जेवण, आरोग्य सेवा इत्यादी पुरविण्यात आल्या होत्या. अशा नागरीकांचा तपशिल तहसिलदार, उल्हासनगर या कार्यालयाकडुन उपलब्ध करुन घेण्यात आलेला असुन अदयापपर्यंत अनुदान वाटप केलेल्या नागरीकांची संख्या एकुण २८,९१६ दिसते. तहसिलदार, उल्हासनगर यांच्याकडुन ज्या नमुन्यात माहिती प्राप्त झालेली आहे. त्या नमुन्यात फक्त बांधिताचे नाव, कुटुंबातील सदस्यांची संख्या, क्षेत्र व अनुदानाची रक्कम इत्यादी नमुद करण्यात आलेली आहे.

सदर माहितीच्या अनुषंगाने करात सवलत देणेसाठी प्राप्त होणा—या अर्जांवर निर्णय घेतांना खालील बाबींची पूर्तता होणे अनिवार्य आहे.

१. महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत असलेला मालमत्ता क्र./वार्ड क्र. इत्यादी बाबींचा तपशिल यादी मध्ये नमुद नाही.

२. तसेच मालमत्तेचा पुर्ण पत्ता यादीमध्ये नोंदविण्यात आलेला नाही.

३. ज्या नागरीकांना आर्थिक अनुदान वाटप करण्यात आलेले आहे ती व्यक्ती महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे मालमत्ताधारक/भोगवटादार असल्याची खात्री होत नाही.

वरील बाबींचे कमतरतेमुळे मालमत्ताधारक/भोगवटाधारकाचे नाव, मालमत्ता क्र., वार्ड क्र., पत्ता शोधणे तसेच त्या अनुषंगिक इतर बाबींची पुर्तता करुन अर्जाचा निपटारा करणेस अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

महानगरपालिका हद्दीत अंदाजे एकुण १५०००० मिळकतींवर कर आकारणी करण्यात येते. अनुदान प्राप्त झालेल्या २८,९१६ मालमत्तांना करात सवलत दिल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम होईल.

महानगरपालिकेची आर्थिक स्थिती हालाखीची असल्याने शहरातील नागरीकांना मुलभुत सेवा पुरविण्यास प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. त्यामुळे महानगरपालिकेवर विविध कर्जाचा बोजा खालीलप्रमाणे निर्माण झाला आहे.

| अ. क्र. | तपशिल | थकित रक्कम |
|---|---|---|
| १. | एम आय डी सी | रु. ४७.०० कोटी |
| २. | पाणी पुरवठा योजना कर्ज | रु. ११.२६ कोटी |
| ३. | भुयारी गटारे योजना कर्ज | रु. १०.७२ कोटी |
| ४. | ठेकेदार व पुरवठादार यांचे देयके | रु. १०.०० कोटी |

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा बोजा असल्याने वारंवार पाणीकपातीचा प्रश्न निर्माण होत आहे. यांची सर्व सन्माननिय सदस्यांना जाणीव आहे.

सबब, महानगरपालिकेची वित्तीय स्थिती पाहता अतिवृष्टीमुळे निर्माण झालेला पुर परिस्थितीत बाधित झालेल्या नागरीकांना मालमत्ताकरात सवलत देण्याचा प्रस्तावास शिफारस करता येत नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> मा. महापौर महोदया, या विषयाबाबत प्रशासनाने त्यांची बाजु मांडली आहे, त्यांचे ते कामच आहे, तो त्यांचा हक्क आहे. परंतु लोकप्रतिनिधींसाठी हा एक भावनात्मक विषय आहे असे मला वाटते. आता आपण विसरले असू परंतु २६ जुलैचे चित्र डोळयासमोर येते, ते चित्र आपण आयुष्यभर विसरायला नको. आम्ही देवाकडे अशी प्रार्थना केली आहे की, पुन्हा असे चित्र आमच्या डोळयासमोर यायला नको. परंतु ज्या भावनेने आपण काम करायला पाहिजे होते ती भावना या सभागृहात दिसून येत नाही. मला चांगले आठवते की, ऑगस्ट–सप्टेंबरच्या महिन्यात याच विषयावर महासभेत लक्षवेधी सुचना आली होती त्यावेळी मा. महापौरांनी पुरग्रस्तांची घरपट्टी माफ करण्याचे आदेश दिले होते. त्यावेळी मी ठाणा, कल्याण व इतर महापालिकेचे उदाहरण दिले होते. सर्व महापालिकांनी ऑगस्ट महिन्यात ठराव पारीत करुन त्याची अंमलबजावणी केली होती. परंतु आपली महापालिका २० मार्चला यावर काय करायचे, प्रशासनाचे काय म्हणणे आहे हे बघत आहे. आम्ही या मुद्दयावर राजनिती करु इच्छित नाही. किती लोकांकडे थकबाकी शिल्लक आहे, मार्केटची वसूली किती बाकी आहे. हे सर्वांना माहिती आहे. परंतु ३१ मार्च पुर्वी यावर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. एखादया प्रेताचे केस काढल्याने ते हलके होत नाही.

**मा. सदस्य श्री. गणपत एडके यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौर, येथे तीन विषयावर चर्चा सुरु आहे, त्याबद्दल आपण यापुर्वी निर्णय दिला आहे. मी देखिल यापुर्वी जेव्हा महापौरांच्या खुर्चीवर बसलो होतो त्यावेळी कर माफ करण्यात यावा

असे सांगितले होते. प्रशासनाने यासाठी आपल्यासमोर यादी आणणे आवश्यक आहे. किती लोकांची घरपट्टी माफ करण्यात येत असून त्याची रक्कम किती आहे हे सांगायला हवे. कर्जाची रक्कम न दाखवता जेवढा कर माफ करायचा आहे तेवढी रक्कम दाखवायला हवी. तसेच आजपर्यंत बीपीएलची ९,२०० प्रकरणे प्रलंबित आहेत. यांनी कारण सांगितले होते की, ३१ मार्च पर्यंत आम्ही वसुलीसाठी व्यस्त आहोत. ३१ मार्च नंतर ती प्रकरणे देखिल निकालात काढायला हवी. अन्यथा पुढील वर्षी निवडणूक आहे. त्यावेळी लोक आपल्याला प्रश्न विचारतील. तिसरे म्हणजे महापालिकेत देखिल पुराचे पाणी येते. मागील वर्षी आम्ही पाहिले होते की, महापालिकेत देखिल गच्चीवर भाडयाने तंबु लावले होते. रेकॉर्ड रुममध्ये पाणी येवु नये म्हणुन दुस—या माळयावर तंबु लावले होते. आता या वर्षी आपले, माझे, सचिव साहेबांचे, सर्वांचे कार्यालय नुतनीकरण करण्यात येत आहे. जर महापालिकेवर अजुन एक स्लॅब टाकला नाही तर कार्यालय बनविण्याचा काही एक फायदा होणार नाही. यासाठी मी आपणांस व आयुक्तांना १ मार्चला पत्र दिले आहे. विरोधी पक्षनेता यांनी देखिल लिहिले आहे की, दुस—या मजल्यावर एक स्लॅब टाकावा अन्यथा पुर्ण महापालिकेत पाणी वाहील. मग पुन्हा भाडयाचे तंबु लावावे लागतील, यावेळी देखिल तंबुमध्ये बांबु लावावा लागेल.यासाठी एक स्लॅब टाकावा. तसेच लोकांना सवलत देखिल दयावी.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. महापौर महोदया, या मुद्दयावर मी सांगु इच्छितो की, याच विषयावर मागील वर्षी मी लक्षवेधी सुचना टाकली होती. यावर्षी देखिल तंबु लावावा लागेल कारण स्लॅब टाकलेला नाही तसेच वॉटरप्रुफींगही केलेले नाही. लेखा विभागाची व इतर विभागांची अवस्था खराब होणार आहे, महत्वाची कागदपत्रे पुन्हा पाण्यात वाहणार आहेत. पुर्ण वर्षभर फक्त आश्वासने दिले. परंतु कारवाई केली नाही. दालनांची सजावट केली गेली परंतु यावर्षी पुन्हा भाडयाचे तंबु लागणार आहेत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> मा. महापौर महोदया, एक माळा वाढावा असे आम्हांला देखिल वाटते परंतु जागेचे टायटल तरी आधी क्लीअर करा. नगररचनाकार याला मंजुरी देतील का?

<u>मा. महापौर :—</u>सन्माननिय सदस्यांनो, पुरग्रस्तांना करमाफी करण्यात यावी हा आदेश मागेही आम्ही दिला होता. आता हा विषय पुन्हा आला आहे. प्रशासनाने आमचा प्रस्ताव फेटाळला आहे. त्यांनी किती नुकसान होईल, बजेटमध्ये किती फरक होईल ही कारणे दिली आहेत. परंतु जसे आपण सांगितले की, आपण ते दृश्य पुन्हा आपल्या डोळयासमोर आणले तर थरकाप उडतो. अशा परिस्थितीत पुरग्रस्त लोकांना मदत करणे हे आपले परम कर्तव्य आहे. काही नगरपालिका व महानगरपालिकांनी एक महिन्याचा, दोन महिन्याचा अथवा काही कालावधीचा टॅक्स माफ केला आहे. परंतु आपण ज्या २९ हजार मालमत्ता आहेत त्यांचा पुर्ण वर्षाचा टॅक्स माफ करणार आहोत. पाण्याचे बिल व इतर शासकिय कर यांचा भरणा त्यांना करावा लागेल. महापालिकेचा कर त्यांना पुर्णपणे माफ करण्यात येईल. काही दिवसांपुर्वी विठ्ठलवाडी शॉपकिपर्स असोसिएशनचे एक शिष्टमंडळ आमच्याकडे आले होते. त्यांचे देखिल असे निवेदन होते की, आपण पुरग्रस्त लोकांचा एक वर्षाचा टॅक्स माफ केला आहे. या ज्या २९ हजार मालमत्ता आहेत त्यामध्ये सर्वांचा समावेश होईल. आता आपल्या सर्वांच्या सहमतीने त्यांचा एक वर्षाचा टॅक्स माफ करण्यात येईल. आता काही वेळापुर्वी श्री. राज असरोंडकर यांनी प्रश्न विचारले होते की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे बजेट किती आहे व खर्च किती होतो? परंतु दुःखाने सांगावे लागते की, आपल्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असुन पुन्हा पाऊस झाला तर काय होईल याची कल्पना करवत नाही. आता तर सर्वांनी कार्यालय देखिल सुसज्ज केली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे साडे आठ कोटीचे बजेट आहे. आपण जर एक माळा वाढवला तर बरे होईल. त्यामुळे एप्रिल महिन्यात जे पहिले काम हाती घेतले जाईल ते हेच घेतले जाईल. तर आता मी आपल्या सर्वांच्या सहमतीने घोषित करते की, पुरग्रस्त लोकांचा एक वर्षाचा टॅक्स माफ करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> मी सांगु इच्छितो की, यापुर्वी देखिल आपण दोन वेळा सभागृहात असे बोलला आहात. बजेटच्या वेळी देखिल आपण बोलला होतात.

<u>मा. महापौर :—</u> बजेटच्या वेळी चर्चा झाली नव्हती तरतूद ठेवली होती.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> पुरग्रस्त लोकांबद्दल आपण ऑगस्ट महिन्यात आयुक्तांना निर्देश दिले होते. तसेच अजुन एकदा आपण सभागृहात या विषयावर निर्देश दिले होते. परंतु मला असे वाटते की, आपण निर्देश दिल्यानंतर आयुक्त अंमलबजावणी करत नाही. त्यामुळे आयुक्तांनी सभागृहात या विषयावर वक्तव्य करावे असे मला वाटते. जर त्यांना काही अडचण असेल तर आपण त्यावर मार्ग काढु. असे व्हायला नको की, आपण सुचवाल व ते फेटाळतील. यामुळे आपला मान देखिल राहत नाही.

**मा. महापौर :—** सभागृहाने मान्यता दिल्यानंतर ते कसे काय फेटाळतील?

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—** मागील वेळी देखिल त्यांनी अंमलबजावणी केली नव्हती हे आपण स्वतःच सांगितले. यामुळे आपण ठराव करावा अथवा आयुक्तांनी स्वतः स्पष्टीकरण दयावे.

**मा. महापौर :—** यावर आयुक्त साहेब खुलासा करतील. तसेच यांनी सांगितले की, एवढे नुकसान होईल तर मला असे वाटते की, पाण्याचे बिल व शासकिय कर भरल्यानंतर जास्त नुकसान होणार नाही. तसेच आता येथे बीपीएलवर चर्चा झाली. हे दुःखाने म्हणावे लागते की, अजुन ९,५०० प्रकरणे प्रलंबित आहेत. फक्त एक हजार प्रकरणात निकाल झाला आहे. यामुळे आपल्यासमोर मोठे प्रश्न चिन्ह आहे. मी आयुक्तांना सांगेन की, मागील वर्षी पुरामुळे व ८५५ इमारतींच्या प्रकरणांमुळे ते होवु शकले नाही. परंतु आता ६ महिन्यांच्या आत सर्व प्रकरणे निकाली काढुन स्थायी समितीसमोर आणावीत. आपण सर्व संमती देत असाल तर आजच त्याबाबत आपण ठराव करु.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** मा. महापौरजी, या लक्षवेधीद्वारे मी अजुन दोन प्रश्न सभागृहासमोर मांडले होते. पहिला मुद्दा म्हणजे तहसिलदारांकडुन फक्त शासकिय नोकरांना पुरग्रस्ताचा दाखला दिला होता. उर्वरित दुकानदार, कारखानदार व ऑटोरिक्शा चालविणारे लोकांना तहसिलदारांकडुन अदयाप दाखला मिळालेला नाही. त्यांना देखिल दाखल्याची फार आवश्यकता आहे. दाखला महापालिकेने दयावा अथवा तहसिलदारांना देण्यासाठी सांगावा. ज्या पुरग्रस्तांचे नुकसान झाले आहे त्यांचा पंचनामा झाला आहे. त्या सर्वांना दाखला दयायला हवा. तो तहसिलदाराने अथवा महापालिकेने दयायला हवा.

**मा. महापौर :—** तहसिलदारांकडुन २९०० लोकांच्या नावाची सिडी आपल्याला मिळाली आहे. त्यांचेच काम होईल.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** त्या सर्वांना दाखला दयायला हवा. तसेच दुसरे म्हणजे २६ जुलैला जेव्हा पुर आला होता त्यावेळी आपल्याला काहीही यंत्रणा उपलब्ध नव्हती. पुन्हा अशी परिस्थिती आली तर काय करायचे? यावर आपण आज येथे विचार करायला हवा. तसे केले तर चांगले होईल.

**मा. सदस्य श्री. नाना पवार :—** जुलै महिन्यात जवळपास सर्व महाराष्ट्रात पुर आला होता. त्यावेळी आपले शहर देखिल पुराच्या तडाख्यात सापडले होते. त्याबद्दल सभागृहात सांगु इच्छितो की, मुंबई शहरात राज्यसरकारने मिठी नदीसाठी एक प्रकल्प हाती घेतला आहे. त्यासाठी मुंबई महापालिकेला काहीही खर्च करायचा नाही असे मला वाटते. आपल्या येथे जी वालधुनी नदी आहे जिला वालधुनी नाला असेही म्हणतात. तर उल्हासनगर महापालिका प्रशासन ज्याप्रमाणे मिठी नदीचा प्रकल्प सुरु आहे त्याचप्रमाणे वालधुनी नाल्याचा प्रकल्प हाती घेतल्यास, जसे त्याची रुंदी व खोली वाढविणे. हा एक चांगला प्रकल्प होईल. मला असे वाटते की, त्याची सुरुवात देखिल झाली होती. परंतु गेल्या काही दिवसांपासुन कोणीही त्याबद्दल काहीही बोलत नाही. दरवर्षी वालधुनी नाल्याच्या परिसरात पुराच्या पाण्याने लोकांना त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे जर वालधुनी नाल्याचा विकास राज्यसरकारकडुन झाला तर योग्य होईल. यासाठी आम्ही मा. आयुक्तांना विनंती करतो की, मिठी नदीप्रमाणेच वालधुनी नाल्याचा विकास करण्यासाठी आपण शासनाला प्रस्ताव सादर करावा. धन्यवाद ।

**मा. आयुक्त (श्री. डी.एस.पाटील):—** आता सन्माननिय सदस्यांनी घरपट्टी माफ करण्याचा जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्यावर मी सांगु इच्छितो की, आपल्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती खराब आहे हे पुन्हा सांगण्याची गरज नाही. परंतु सर्वांच्या भावना लक्षात घेता व येथे जी चर्चा झाली आहे ते ऐकुन आपला ठराव झाला तर मालमत्ता कराची रक्कम माफ करण्यात येईल. पाणीपट्टी व इतर शासकिय कर मात्र भरावे लागतील.

**मा. सदस्य श्री. नाना पवार :—**मा. आयुक्त साहेब, मिठी नदीप्रमाणेच वालधुनी नाल्याचा विकास करण्यासाठी आपण राज्य शासनाकडुन मदत का घेत नाहीत? मा. महापौरजी, राज्य शासनाने पुराच्या वेळी ज्याप्रमाणे मुंबई महापालिकेला मदत केली त्याचप्रमाणे उल्हासनगर महापालिकेला देखिल मदत करु शकते.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** मा. महापौर, ४ महिन्यापुर्वी मी महासभेत प्रश्न उपस्थित केला होता की, वालधुनी नाल्याच्या परिसरात शासकिय अधिकारी व आपले अधिकारी सर्व्हे करीत आहेत. तर हे खरे आहे का हे मी विचारले होते. त्यावेळी सांगितले होते की, पुढील महासभेत याची माहिती देवु. आपण जर ती माहिती घेतली तर कळेल की, महाराष्ट्र शासन यामध्ये काही करत आहे अथवा नाही. सावकारे साहेबांना त्याची माहिती आहे.

**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—** मा. महापौरजी, हे वालधुनी नाल्याच्या दोन किलोमिटरच्या लांबीत संरक्षक भिंत बांधावी असे म्हणत आहेत. परंतु उल्हास स्टेशन येथे जो छोटा पुल पडला आहे तो बनवु शकत नाहीत तर नाल्याचे काम काय करणार? तो तरी बनवा. नुसते चॉकलेट देत आहेत.

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—** मा. महापौर, आयुक्त व सचिव साहेब, श्री. नाना पवार यांनी मिठी नदीबद्दल सांगितले व वालधुनी नाल्याचा प्रकल्प हाती घेण्याबाबत सुचविले. राज्य शासनाने मिठी नदीचा प्रकल्प हाती घेतला परंतु मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प हा शिलकीचा अर्थसंकल्प असतांनाही राज्य सरकार मुंबई महापालिकेला मदत करु शकते तर उल्हासनगर महापालिकेचा अर्थसंकल्प शिलकीचा नसल्याने राज्य शासनास उल्हासनगर महापालिकेला मदत करण्यात काही अडचण येणार नाही. त्यामुळे श्री. नाना पवार यांनी जो प्रस्ताव आणला आहे त्याला मी अनुमोदन देतो.

**कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):—** मा. महापौरजी, उप—महापौर, आयुक्त, सचिव साहेब व सन्माननिय नगरसेवक वालधुनी नाल्याबाबत पुरानंतर एमएमआरडीएने एक बैठक घेतली होती. वालधुनी नाल्याची पुररेषा निश्चित करण्यासाठी त्यांनी पाटबंधारे खात्यास सुचना दिल्या होत्या. त्या विभागाचे सर्व्हेक्षणाचे काम सुरु आहे. त्यानंतर नाशिक येथिल मेरी या संस्थेमध्ये त्याचा अहवाल गेल्यानंतर ते यावर मार्ग काढणार आहेत. त्यानंतर शासन त्यावर अंतिम निर्णय घेईल.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—**ज्या कामाचा मुर्हुत केला होता ते काम सुरु झाले की नाही?

**कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):—**मिशन वालधुनीचे जे काम होते, त्याचे उद्घाटन केल्यानंतर पुर आला होता. त्या ठिकाणी जे बांधकाम करायचे होते ते केल्यास प्रवाहास अडथळा निर्माण होईल असे नाशिक येथिल संस्थेने सांगितल्याने व आम्ही जोपर्यंत सांगत नाही तोपर्यंत काम हाती घेवु नका असे सांगितल्याने ते काम सध्या हाती घेतलेले नाही.

**मा. सचिव:—**लक्षवेधी सुचना क्र. २ पुढीलप्रकारे आहे.

## लक्षवेधी सूचना क्र. २

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

**विषय** :— भुयारी गटार योजनेची काम व्यवस्थित होत नसल्याबाबत तसेच सदर कामाचा ठेका देताना झालेल्या भ्रष्टाचाराबाबत.....

उल्हासनगर महानगरपालिकेच्या ड्रेनेज विभागामार्फत सिस्टीमची योग्य प्रकारे निगा दुरुस्ती व देखभाल करण्यात येत नसल्याने नागरीकांच्या असंख्या तक्रारी वाढल्या आहेत, तक्रारींचे निवारण होत नसल्याने नागरीक त्रस्त आहेत व सक्शनगाडी नादुरुस्त आहे हे कारण प्रशासनाकडुन वारंवार सांगण्यात येत आहे. सदरची जुनी सक्शनगाडी नादुरुस्त होत असल्याने व अपुरी पडत असल्याने १ वर्षापूर्वी नविन सक्शनगाडी खरेदी करण्यात आली आहे परंतू सदर गाडी आजतागायत वापरात आलेली नाही सदरची गाडी निधी अभावी वापरात आणली गेली नाही असे समजते हे खरे आहे काय? गाडी वापरात न येण्याची कारणे काय आहेत? तसेच ड्रेनेज विभागामार्फत करण्यात येणारी कामे योग्य रितीने केली जात नसून निकृष्ट दर्जाची केली जात आहेत व ड्रेनेज

विभागाचा ठेका देतांनाही भ्रष्टाचार झाला आहे असे वाटते तरी सदरच्या महत्वाच्या मूलभूत नागरी सुविधेबाबत महासभेत चर्चा होवुन सविस्तर माहिती मिळावी.

---

या लक्षवेधी सुचने सोबतच श्री. सतरामदास जेसवानी, श्री. गोविंदराम लुंड, श्री. अशोक ठाकुर व श्री. गौतम भालेराव यांच्या लक्षवेधी सुचना देखिल याच विषयाशी संबधीत असल्याने त्यावर देखिल चर्चा करण्यात येईल. सदरची लक्षवेधी सुचना पुढील प्रमाणे आहेत.

---

## लक्षवेधी सूचना

सुचकाचे नाव :— श्री.सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

**विषय :— उल्हासनगर शहरात भुयारी गटार योजनेचे काम ठेकेदार व्यवस्थित करीत नसल्याबाबत**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातर्फे भुयारी गटार साफ करण्यासाठी जो ठेकेदार ठेवला आहे तो व्यवस्थीत काम करीत नसल्याने शहरात दिवसेंदिवस भुयारी गटाराची समस्या वाढत चालली आहे. महासभेत या विषयावर लक्षवेधी सुचना दाखल करुन चर्चा करावी ही विनंती.

---

---

## लक्षवेधी सूचना

सुचकाचे नाव :— श्री. अशोक ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. गौतम भालेराव

**विषय :— उल्हासनगर शहरात साफसफाईचे काम व्यवस्थितरित्या होत नसल्याबाबत तसेच नाला सफाईच्या कामास सुरुवात न झाल्याबाबत.....**

उल्हासनगर शहरात सध्या साफसफाईची ज्वलंत समस्या आहे. कचरा व्यवस्थित उचलला जात नाही, नाले साफ केले जात नाहीत. तसेच सफाई कर्मचारी कमी असुन खाडाबदली कर्मचा—यांची नियुक्तीही केलेली नाही. भुयारी गटार देखिल साफ होत नसुन नाले सफाई करण्यासाठी अदयाप कर्मचा—यांची नियुक्ती केलेली नाही.

सदरचा प्रश्न महासभेत उपस्थित करुन त्यावर चर्चा करण्याकरीता आम्ही ही लक्षवेधी सुचना दाखल करीत आहोत.

---

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> या लक्षवेधी सुचनेद्वारे सभागृहाचे लक्ष वेधु इच्छितो की, आज शहरात भुयारी गटार योजनेची जी दुर्दशा झाली आहे ती माझ्या सदस्य पदाच्या कालावधीत कधीही झालेली नव्हती. याचे जिवंत उदाहरण म्हणजे विरोधी पक्षासोबत सत्ताधारी पक्षातील सदस्य देखिल वर्षातुन तीन वेळा या विषयावर लक्षवेधी सुचना आणत आहेत. तरी देखिल त्याकडे कुणाचेही लक्ष नाही. दुर्दशा होण्याचे एक मुख्य कारण म्हणजे उल्हासनगर महापालिकेत भुयारी गटार साफ करण्याची जी गाडी आली आहे ती ८ ते ९ वर्षापुर्वी आली होती. आज ती गाडी वर्षातुन ६ महिने बंद असते. आपण ती गाडी दुरुस्त करण्यासाठी मागील तीन वर्षात जेवढा खर्च केला आहे तेवढया खर्चात एक नविन गाडी आली असती. नविन गाडी बद्दल आम्ही

सभागृहात बोललो असता पुरपरिस्थिती नंतर मा. महापौरांनी सभागृहात आश्वासन दिले होते की, सप्टेंबर महिन्यापर्यंत नविन गाडी तयार होवुन येईल. त्यानंतर भुयारी गटार योजनेची परिस्थिती सुधारेले. परंतु ६ महिन्यानंतर देखिल ती गाडी आलेली नाही. ज्याप्रमाणे अग्निशमन दलाची गाडी १० वर्ष उभी राहुन शहराचे २० लाख रुपये पाण्यात गेले. त्याचप्रमाणे भुयारी गटार योजनेच्या गाडीची वाट लागायला नको. एक दुसरा महत्वाचा खुलासा मी या सभागृहात करु इच्छितो. आपण जेव्हा नगरसेवक म्हणुन निवडुन जातो व महापौर महोदया जेव्हा येथे महापौर म्हणुन बसतात तेव्हा प्रत्येक वस्तु ही घासाघीस करुन विकत घेणे हे आपले कर्तव्य बनते. परंतु आज मी ज्या विषयाची चर्चा करणार आहे ती ऐकुन तुम्हांस आश्चर्य वाटेल की, भुयारी गटाराच्या कामात सुमारे १० लाखाचा भ्रष्टाचार झालेला आहे. माझी अशी मागणी आहे की, भुयारी गटार योजनेशी संबंधीत अधिका–यांनी व्यासपिठावर येवुन माझ्या काही प्रश्नांची उत्तरे दयावीत. भुयारी गटार योजनेचा या पुर्वीचा ठेका ज्याची निविदा आपण मागविली होती तो किती रक्कमेला गेला होता? मा. महापौर महोदया, मी आपणांस सांगु इच्छितो की, मागील वेळी जेव्हा आपण या कामासाठी निविदा मागविल्या होत्या त्यावेळी ५ कंपन्यांनी निविदा भरल्या होत्या. त्यामध्ये सतगुरु कंन्स्ट्रक्शन यांनी ४०.३२ टक्के कमी दराने, व्ही.एम. हरजानी यांनी ४१ टक्के कमी दराने, योगिता कंपनीने ४०.६० टक्के कमी दराने, शारदा इंटरप्रायजेसने ४१.०४ टक्के कमी दराने व हरीहरेश्वर यांनी ४०.३२ टक्के कमी दराने निविदा भरल्या होत्या. सर्व ठेकेदाराने प्राकलनीय किंमतीपेक्षा ४० टक्के कमी दराने निविदा भरल्या होत्या. त्यामुळे रुपये २५ लाखाचे काम आपण रुपये १५ लाखामध्ये केले होते. परंतु आज आपण निविदा न मागविता सदरचा ठेका प्राकलनीय किंमतीत भोलेनाथ या कंपनीला रुपये २५ लाखाला दिला आहे. यामुळे महापालिकेचे रुपये १० लाखाचे नुकसान झाले आहे. निविदा न मागवता ठेका आहे त्या किंमतीत देण्यात आला आहे. यासाठी जबाबदार कोण आहे? याची जबाबदारी प्रशासनाची आहे की शासनाची आहे? त्याचा खुलासा या लक्षवेधीद्वारे व्हायला हवा. मुळ किंमतीत ठेका घेवुनही एवढया तक्रारी येत आहेत. सत्ताधरी पक्षातील सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांनी स्पष्ट लिहिले आहे की, ठेकेदार काम व्यवस्थित करीत नाही. तीन तीन लक्षवेधी सुचना सभागृहात आल्या आहेत. १० लाखाचे नुकसान होत आहे. तर याची जबाबदारी कोण घेणार आहे? हा ठेका थेट कसा काय दिला? यासाठी निविदा का मागविली नाही? हा ठेका त्वरीत रद्द करायला हवा. तसेच निविदा मागवुन जो ठेकेदार योग्य भावात व चांगले काम करेल त्यांना ठेका दयायला हवा. तसेच ज्या गाडीसाठी आम्ही आठ महिन्यांपासुन भटकत आहोत, गाडी आली आहे तरी वापर का सुरु केला जात नाही? याचा खुलासा देखिल येथे व्हायला हवा. गाडी न येण्याचे कारण काय आहे? आठ महिन्यांपुर्वी मा. महापौरांनी आश्वासन दिले होते की, १५ दिवसात गाडी येईल मग आजपर्यंत गाडी का आली नाही? याचाही खुलासा व्हायला हवा. मी ब–याच वेळा भुयारी गटार योजनेची तक्रार पाणी पुरवठा विभागात केली आहे, अधिका–यांना सांगितले आहे, आयुक्त साहेबांना कार्यालयात जावुन सांगितले आहे. आयुक्त साहेबांनी तेथिल अधिका–यांना देखील सांगितले आहे तरीदेखील काम होत नाही. आज पुर्ण शहरात रस्त्यांवर गटारे भरुन वाहत आहेत. यासाठी जबाबदार कोण आहे? १० लाख रुपये जास्त खर्च करुनही काम चांगले होत नाही, तसेच ठेकेदारासाठी निविदा देखील काढली जात नाही. थेट काम दिले जाते. ही मनमानी कशी काय चालते? प्रशासन काय चुका करते ते शोधुन काढणे शासनाचे काम आहे. परंतु मला दु:खाने म्हणावे लागते की, शासनाची नजर अदयाप प्रशासनावर गेलेली नाही. याचा खुलासा येथे व्हायला हवा.

**कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):–**मा. महापौर महोदया, मागील वर्षी जेव्हा पुर आला होता त्याच्या आधी ठेक्याची मुदत संपली होती. त्यावेळी सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता की, काम लवकर व्हायला हवे. यासाठी या कामाचे वाटप ४ विविध सोसायटयांना देण्यात आले होते. त्यानंतर कामास सुरुवात करण्यात आली होती. तुम्ही भुयारी गटार योजनेच्या गाडीबद्दल तक्रार केली तर मी सांगु इच्छितो की, आपल्याकडे एकच गाडी असून भुयारी गटाराची लांबी ११२ कि.मी. एवढी आहे. ब–याच ठिकाणी चोकअप होते. एका गाडीने सर्व काम करणे शक्य होत नाही. दुसरी गाडी तयार आहे परंतु एमआयडीसीचे पैसे दयायचे असल्याने त्यांना पैसे देता आले नाही. आता या महिन्याच्या शेवटी नविन गाडी येईल.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–** नविन गाडीची खरेदी कधी केली आहे?

**कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):–** दिड दोन वर्ष झाले आहे.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**आपल्या घरची गाडी असेल, स्वत:ची स्कुटर असेल व ती खराब झाली असेल तर ती तुम्ही किती दिवसात दुरुस्त करतात?

**कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):–** ही गाडी मार्च अखेर पर्यंत येईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—दिड वर्ष का आली नाही? अग्निशमन दलाची गाडी सडुन गेली, शहराचे २० लाख रुपयाचे नुकसान झाले. त्यासाठी चौकशी केली परंतु अहवाल आला नाही. आता पुन्हा तसेच करायचे आहे का?

कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):— या गाडीची परिस्थिती चांगली आहे, आम्ही स्वत: बघुन आलो आहोत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—पैसे भरुन देखिल दिड वर्षात ही गाडी का सुरु झाली नाही? तसेच मागील वर्षी जे काम ४० टक्के कमी दराने केले होते ते काम या वर्षी निविदा न मागवता प्राकलनीय किंमतीत का देण्यात आले?

कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):— पुर परिस्थितीच्या वेळी आधीच्या ठेकेदाराचे काम संपुष्टात आले होते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—आपण निविदा का मागविली नव्हती? ते तुमचे काम होते. निविदा कालावधी संपण्यापुर्वी एक महिना आधी नविन निविदा काढायला हवी होती.

कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):— त्यावेळी चर्चा करुन हे काम चार ठेकेदारांमध्ये विभागुन देण्यात यावे असे ठरले होते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—यासाठी यांच्यावर कारवाई करायला हवी तसेच महापालिकेचे जेवढे नुकसान झाले आहे ते अधिका—यांकडुन भरुन घ्यायला हवे. अन्यथा मी उच्च न्यायालयात अथवा अॅन्टीकरप्शन ब्युरो येथे तक्रार करेन. याचा खुलासा येथे व्हायला हवा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौर महोदया, मी या विषयावर खुलासा करु इच्छितो की, ज्यावेळी स्थायी समितीमध्ये हा विषय आला होता त्यावेळी सर्वसंमतीने पास झाला होता. त्यामध्ये आपल्या पक्षाचे सदस्य देखिल उपस्थित होते. परंतु त्यांनी विषयाचे गांभिर्य लक्षात घेतले होते, शहरात पुर आला होता, घाण वाढली होती. यामुळे त्वरीत काम चालु करणे आवश्यक होते. दुसरे म्हणजे गाडीचे. यासाठी सर्व नगरसेवक तक्रार करीत आहेत. कॅम्प नं. १ ते ५ मध्ये एकच गाडी असल्याने १५ दिवसानंतर गाडी उपलब्ध होते. त्यासाठी नविन गाडी त्वरीत मागवुन कॅम्प नं. ४ व ५ साठी एक गाडी व कॅम्प नं. १ ते ३ साठी एक गाडी देण्यात यावी असा ठराव देखिल झाला आहे. तर ती गाडी लवकरात लवकर मागविण्यात यावी.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, यांनी सांगितले की, पुर आल्याने लवकरात लवकर ठेका देण्यात आला होता. परंतु ठेका संपण्यापुर्वी एक ते दिड महिना आधी नविन निविदा मागविणे हे प्रशासनाचे कर्तव्य होते, २ महिने आधी निविदा काढायला हवी होती. यामुळे आपली बचत झाली असती. एक,दोन,तीन वेळा निविदा मागवायला हवी होती. यामुळे शहराचे पैसे वाचले असते. आमचे मित्र येथे सांगतात की, सर्वानुमते निर्णय झाला होता परंतु तो निर्णय स्थायी समितीत झाला होता. महासभेत नाही. त्यामुळे याचा विरोध मी करु शकतो. मी आधी देखिल सांगितले आहे की, घाईने काम दयायचे असेल तर ते दोन अथवा तीन महिन्यासाठी देता येवु शकते व सदर कालावधीत निविदा मागविता येवु शकते. परंतु आज ६ महिन्यानंतरही आपण त्याकडे लक्ष दिलेले नाही. आजपर्यंत या शहराचे ५ लाख रुपये वाया गेले आहेत. जर ठेका सुरु ठेवला तर अजुन ५ लाखाचे नुकसान होईल. यासाठी जबाबदार कोण असेल याचा खुलासा येथे व्हायला हवा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— मा. महापौर व आयुक्त साहेब, श्री. जमनु पुरस्वानी यांनी एक गंभीर मुद्दा येथे उपस्थित केला आहे. सर्व सभागृह त्यावर गंभीरतेने विचार करीत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. भुयारी गटार विभाग हा या महापालिकेचा सर्वात घाणेरडा विभाग आहे. येथे काहीही काम होत नाही. महिनोनमहिने लोकांच्या तक्रारीकडे लक्ष दिले जात नाही. आपण बघाल की रस्त्यावर चेंबर भरुन वाहत असतात. हा भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर सभागृह नेता यांनी सांगितले की, सर्वसंमतीने निर्णय झाला होता. याचा अर्थ असा होत नाही की, आपण नंतर बोलु शकत नाही. आपण वर्तमानपत्रामध्ये वाचले असेल की, भ्रष्टाचाराचे मुद्दे चार ते सहा वर्षानंतर देखिल बाहेर येतात. ही अधिका—यांची चुकी आहे. अधिका—यांनी

विषय अशाप्रकारे सादर केला असेल की, ज्यामुळे विषय पास करावा असा निर्णय घ्यावा लागला असेल. कोणतीही निविदा ही व्यवस्थितरित्या सादर करणे हे प्रशासनाचे कामच आहे. जर एखादा भ्रष्टाचार झाला असेल अथवा अनियमितता झाली असेल तर कोणताही सदस्य ते कधीही निदर्शनास आणु शकतो. तो विषय आधी सर्वसंमतीने पास झाला असेल तर बाहेर काढता येणार नाही असे होणार नाही. प्रस्ताव चांगल्याप्रकारे आणणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मला असे वाटते की, आयुक्तांनी या प्रकरणात जे दोषी आहेत त्यांच्याविरुध्द चौकशी करुन कारवाई करायला हवी. यासाठी आपणही त्यांना सहकार्य करायला हवे. यासाठी जबाबदारी निश्चित केली पाहिजे. ज्या अधिका–यांनी तो प्रस्ताव आणला त्याच्यावरही कार्यवाही व्हायला पाहिजे. भ्रष्टाचाराचे मुद्दे तर १० वर्षांनी देखिल बाहेर निघतात ते आपण वर्तमानपत्रात देखिल वाचले आहे. यासाठी महापौरांनी आयुक्तांना निर्देश दयायला हवे की, हा प्रस्ताव कसा काय पास झाला? त्यानंतर भुयारी गटार सफाईचे काम चांगल्याप्रकारे व्हायला हवे. तसेच दिड वर्षापासुन जी गाडी येवु शकली नाही त्यासाठी अधिका–यांवर कारवाई करायला पाहिजे. तसेच एका दोघांना निलंबित करायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u> मा. महापौर महोदया, आता कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, भुयारी गटाराची लांबी ११२ किलो मिटर आहे. तर मी सांगु इच्छितो की, एखादा लंगडा माणुस देखिल पायी चालला तर तो ६० किलोमिटर चालु शकतो. नाशिकला दोन दिवसात पोहचेल. तर मग ११२ कि.मी. मध्ये गाडी जावु शकत नाही? मधुबन ते कॉलेज रोड येथे ब–याचवेळा पाणी रस्त्यावर वाहत असते. महापौरांनी देखिल हे बघितले असेल.मी तर चार वर्षात तेथे एकदाही गाडी बघितली नाही. तर हे ११२ कि.मी. मध्ये कुठे मासे पकडत असतात हे त्यांना विचारा. कुठे डुबकी मारत असतात.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :–</u> मा. महापौर महोदया, या लक्षवेधीद्वारे मी सभागृहासमोर अजुन एक मुद्दा आणु इच्छितो. मी कार्यकारी अभियंत्यांना विचारु इच्छितो की, भुयारी गटार योजनेमध्ये भरुन वाहत असलेले चेंबर साफ करणे एवढेच काम अभिप्रेत असते का? सावकारे साहेब यांनी उत्तर दिले तर बरे होईल. ही भुयारी गटार योजना नेमकी आहे तरी काय? ज्या दिवशी गटार भरेल त्यादिवशी त्याची तक्रार करणे व ते साफ करणे एवढेच मर्यादीत काम आहे का? माझ्या माहितीप्रमाणे मालमत्ता करामध्ये आपण भुयारी गटार कर व विशेष भुयारी गटार कर असे दोन कर घेतो. ज्यावेळी एखादा विशेष कर वसुल केला जातो तेव्हा शहरात त्या कामासाठी एखादी विशेष योजना सुरु आहे असा त्याचा अर्थ होतो. अशा योजनेसाठी लोकवर्गणी घेतली जाते. जर भुयारी गटार योजनेचेच काम व्यवस्थित सुरु नसेल तर लोकांवर भार का टाकला जात आहे? जर कार्यप्रणालीच व्यवस्थित नाही तर लोकांवर भार का टाकला जात आहे? ज्यावेळी लोकांची तक्रार नसते त्यावेळी या विभागामार्फत भुयारी गटार योजनेशी संबंधीत कोणते काम केले जाते? याची माहिती सावकारे साहेबांनी दयावी. मा. महापौर महोदया, माझा प्रश्न सरळ आहे. भुयारी गटार साफ करण्याचे काम मजुर करतात. तर मग कनिष्ठ व उपअभियंता काय काम करतात? त्यांचा या योजनेमध्ये काय सहभाग आहे?

<u>कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):–</u> मा. महापौर महोदया, संपुर्ण शहरासाठी भुयारी गटार योजना राबविण्याची योजना तत्कालीन महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण महामंडळाने तयार केली होती. त्यावेळी ११२ किमी लांबीचे काम केले होते. त्यामध्ये दोन पंपींग स्टेशन होते व एक एसटीपी होता. आज त्या प्लांटमध्ये १० ते १२ एमएलडी पाणी जाते. ब–याचशा मलवाहिन्या चोकअप असल्याने त्यांचे काम करण्यासाठी आपल्याला एक कृति आराखडा तयार करायचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :–</u> मी असे विचारले की, सध्या काय काम चालु आहे? भुयारी गटार साफ करण्याचे काम मजुर करतात तर मग सध्या कनिष्ठ व उपअभियंता काय काम करीत आहेत? त्यांचा या योजनेमध्ये काय सहभाग आहे?

<u>कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):–</u>सध्या या विभागात उप–अभियंता श्री. नारवानी असुन कनिष्ठ अभियंता श्री. जाधव आहेत. हे दोघे चोकअपच्या काही तक्रारी असतील तर तक्रार निवारणाचे काम बघतात. कोणाची काही तक्रार असेल तर ते जागेवर जावुन बघतात.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :–</u> या अधिका–यांचे काम शुन्य आहे. फिल्डवर हे काय काम करतात? एखादे गटार जर वारंवार भरुन वाहत असेल तर त्यासाठी हे काय उपाययोजन ा करतात?

कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):—यासाठी आपल्याकडे पुरेसा कर्मचारी नाही. आपण एमजीपीकडे तीन उप—अभियंता व सहा शाखा अभियंत्यांची मागणी केली आहे. ते उपलब्ध झाल्यानंतर आपली योजना व्यवस्थित चालवता येईल.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— नगरसेवकांच्या तक्रारी वगळता आपल्या विभागाने या विभागाच्या कामात सुधारणा आणण्यासाठी आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविला आहे का?

कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):—मागील वर्षी आम्ही कृति आराखडा तयार केला होता.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— आपण अशी ठिकाणे शोधली आहेत काय की ज्या ठिकाणी वारंवार तक्रार निर्माण होते. असे आपण कधी केले आहे काय?

कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):—भुयारी गटार योजनेची लांबी ११२ कि.मी. असुन पुरेसा कर्मचारी वर्ग नाही त्यामुळे आम्ही एमजेपीला पत्र दिले आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— याचा अर्थ आपण लोकांकडुन भुयारी गटार कर घेतो, विशेष भुयारी गटार कर घेतो, बजेटमध्ये या कामासाठी तरतुद करतो, याचा अर्थ ही तरतुद आपण फक्त गटारे साफ करण्यासाठी करतो.

कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. (श्री. आर.आर. सावकारे):—आम्ही साडेचार ते पाचहजार ठिकाणी कनेक्शन दिले आहेत.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— मा. महापौर महोदया, हा एक गंभीर विषय आहे परंतु प्रत्यक्षात फिल्डवर काम होत नाही. यांच्या उत्तरावरुन एक बाब स्पष्ट होते की, यांनी आयुक्तांकडे एकही प्रस्ताव पाठविलेला नाही की ज्यामुळे या योजनेत सुधार होईल. त्यांनी अशी ठिकाणेही निश्चीत केली नाहीत जेथे वारंवार तक्रार निर्माण होते. ब—याचवेळा एखादया ठिकाणी चेंबर साफ केल्यानंतर दोन दिवसांनी पुन्हा गाडी मागवायला लागते. यांचे काम फक्त हेच नाही. एक तर गाडी मिळत नाही. मध्यंतरी मला १५ दिवस गाडी मिळाली नव्हती. मी दोन वेळा तक्रार देखिल केली होती.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, यापुर्वीचे जे आयुक्त होते ते लक्षवेधीची व्याख्या अशी करत असत की, याचा परिणाम जनसामान्यावर किती विपरीतपणे होईल अशा विषयास लक्षवेधीद्वारा सभागृहासमोर आणले जाते. व हा विषय असाच आहे की, याचा जनसामान्यांवर विपरीत प्रभाव पडत आहे. आज उल्हासनगरमध्ये गॅस्ट्रोची साथ चालु आहे. टायफाईड, मलेरिया यांची साथही मोठया प्रमाणावर आहे. आरोग्य विभागामार्फत जर याकामी शहरातील रुग्णालयांचा सर्व्हे केला तर असे दिसुन येईल की, टायफाईड व मलेरियाची साथ वाढलेली आहे. प्रत्येक रुग्णालयामध्ये रुग्ण दाखल होत आहेत. त्यांच्यावर उपचार होत आहेत. खाजगी रुग्णालयातील रुग्णांची आपणाकडे आकडेवारी नाही आहे. जी लक्षवेधी श्री. जमनादास पुरस्वानी यांनी येथे मांडली आहे त्याबाबत त्यांना धन्यवाद देतो. आता लक्षवेधीवर आम्ही काय विचार करतो? ते महापौर व आयुक्त साहेबांवर अवलंबुन आहे. परंतु आमच्या श्री. राजेंद्र चौधरी यांनी पुरग्रस्तांबाबत जी लक्षवेधी मांडली होती तिच्याबाबतीत आयुक्त साहेबांनी सारस्य दाखविले नाही. ती गंभीरतेने घेतली नाही. मा. महापौरांनी त्यांना उत्तर देण्यास सांगितले म्हणुन त्यांनी उत्तर दिले. परंतु त्यांनी गंभीरतेने घेतली नाही. आम्ही लक्षवेधी यासाठी देतो की, आपले लक्ष वेधले जावे. परंतु एका कानातुन ऐकुन दुस—या कानातुन सोडण्यासाठी ती नाही आहे. हे आयुक्त साहेबांनी लक्षात घ्यावे. लक्षवेधी आपले लक्ष वेधण्यासाठी देतो. ती कृपया ऐकुन घ्या. आम्ही बोलतो सभागृहात जोरजोरात ओरडतो आणि आपले लक्ष नसते आपण वाचन करत असतात. नंतर महापौर महोदया सांगणार तेवढे तुम्ही बोलणार. मघाशी जे झाले ते चुकीचे आहे. नगरसेवकांनी लोकांची व्यथा मांडल्यानंतर त्यावर वस्तुस्थितीदर्शक पर्याय काढणे हे प्रशासनाचे काम आहे. त्यात कुठे अडचण आली तर शासनाकडुन किंवा आम्हां सदस्यांकडुन तुम्ही मदत मागा. ठराव पाहिजे तर तो करुन घ्या. म्हणजे महापौर सांगतील तेवढेच बोलायचे हे बरोबर नाही. या लक्षवेधीद्वारा या महानगरपालिका क्षेत्रामधील ११२ कि.मी. लांबीच्या ड्रेनेज लाईनच्या ज्या समस्या आहेत त्या आपल्यापुढे मांडल्या आहेत त्या सोडविण्यासाठी प्रशासनाने कश्या चुका केल्या आहेत. हा विषय स्थायी समिती सभेपुढे आला असता तो सर्वसंमतीने पारीत केला. असे आमच्या श्री. किशोर वनवारी यांनी सांगितले परंतु जे चुकीचे आहे ते चुकीचेच आहे. ठराव सर्वसंमतीने होवो अगर एकमताने होवो तो चुकीचा आहे. हे सिध्द सुध्दा झाले आहे कारण की, जो शिष्टाचार आहे तो त्यांनी

तोडला आहे. सभागृहनेता शेवटी शेवटी बोलतात. परंतु या विषयावर ते प्रथम बोलले. त्यांचा जो हेतु होता तोच चुकीचा आहे. तो स्पष्ट करण्यासाठी त्यांना शिष्टाचार तोडावा लागला. वारंवार शिष्टाचार शिकविणारे यांनी आज शिष्टाचार तोडला आहे. स्थायी समितीमध्ये जो प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत झाला आहे तो चुकीचा आहे जर याबाबतीत कारवाई करण्याची जरुरत पडली तर सर्वांवर कारवाई करावी लागेल. मागच्या वर्षाची निविदा १५ लाखात गेला आहे. यावर्षी निविदा मागविल्या नाहीत. यावेळेस २५ लाख असेच दिले गेले आहेत. असा भ्रष्टाचाराचा मुद्दा श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जो काढला आहे तो चुकीचा आहे. १० लाखाची गाडी दिड वर्षापासुन पडुन आहे. १० लाख असेच ठेकेदाराला दयावे हा कुठला नियम आहे? आयुक्त साहेब, महापौर साहेब हा विषय खुप गंभीर आहे. उल्हासनगर महानगरपालिकेला एका गाडीची आवश्यकता आहे. ती गेल्या ९ वर्षापासुन चालु आहे. प्रत्येक महिन्यात ती नादुरुस्त होते. तक्रार केल्यानंतर असे सांगण्यात येते की, ती गाडी गॅरेजमध्ये आहे. आणि त्यानंतर ती एखादया प्रभागात पाठविली जाते म्हणजे एका महिन्यामध्ये एक प्रभाग, एका प्रभागाचा नंबर मोठया मुश्किलीने येतो. ड्रेनेजचा चेंबर चोकअप झाल्यामुळे त्याचे पाणी उलट दिशेने शौचालयात येते. त्याबाबतीत तक्रार केल्यानंतर सुध्दा त्या प्रभागामध्ये १५ दिवसानंतर किंवा तीन आठवडयानंतर ही गाडी पाठविली जाते. यामुळे लोकांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होत आहे. तात्काळ परिणाम दिसुन येत नाही परंतु काही दिवसांनी त्याचा परिणाम दिसु लागतो. आपणांस वाटत असेल की, शौचालयाचे पाणी लोकांच्या घरात गेल्याने काही फरक पडत नाही असे काही वाटते का? आरोग्य अधिकारी आहेत का? याचा परिणाम होत नसेल तर तुम्ही सांगा याबाबत किती गंभीरतेने तुम्ही दखल घेत आहात ते महत्वाचे आहे. आमच्या मते त्याचा विपरीत परिणाम होत आहे परंतु गेल्या दिड वर्षापासुन आपण मागविलेली गाडी केवळ पैसे नाहीत म्हणुन येत नाही त्याची कारणे तुम्ही दया. श्री. जमनादास पुरस्वानी यांनी येथे दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. एकतर अ‍ॅटपार्ट ......देण्याची गरज काय होती? २६ जुलैमुळे पुरग्रस्ताच्या महिन्यात घाई करुन त्याला ठेका दिला आहे. जुलै महिन्यात आमचा ठेका बंद होणार आहे तर त्याचे २ महिना आधीच कारवाई करायला हवी होती ती केली नाही. ठेकेदाराने त्याचा चुकीचा वापर केला व त्याचे समर्थन स्थायी समितीने सुध्दा केले. पुर आल्याचा गैरफायदा घेवुन कुणी ठेकेदार जर मागील वर्षाचा १५ लाखाचा ठेका यावर्षी २५ लाखात घेत असेल? याचा अर्थ प्रशासनाने व स्थायी समितीने त्यास मंजुरी देता कामा नये. म्हणजेच त्याने ब्लॅकमेल केले आपण लोक ब्लॅकमेल झालो ही जी प्रथा आहे ती चुकीची आहे. तर अशी होवु नये म्हणुन या लक्षवेधीद्वारे आपले लक्ष वेधु इच्छितो व केवळ १० लाखासाठी, मागील वेळेस जेव्हा याबाबत प्रस्ताव आला होता त्यावेळेस आम्ही म्हटले होते की थेंबाथेंबाने सागर तयार होतो तेव्हा शासनाच्या वतीने सांगण्यात आले होते की नाही काही नाही होत विषय काय होता, महापौरांच्या चीन दौ–याचा व आयुक्त साहेबांच्या नविन गाडीचा. त्यावेळेस आम्ही म्हटले होते की, उल्हासनगरची जी आवश्यकता आहे तिच्याकडे लक्ष दया. त्यावेळेस याबाबीकडे दुर्लक्ष करण्यात आले होते व म्हटले गेले होते की, काही होत नाही. १० लाख रुपयांसाठी अंडरग्राउंड ड्रेनेजची गाडी येण्याचे थांबले आहे. त्यावेळेस सुध्दा आम्ही हाच विषय उपस्थित केला होता परंतु त्यावेळी सुध्दा आपण त्याकडे लक्ष दिले नव्हते. जी आवश्यकता आहे ती नजरेआड करता. व जे अनावश्यक आहे त्यावर खर्च करता ज्या लोकांना कर माफ केला पाहिजे तो होत नाही. व पैसे वाले जे लोक आहेत त्यांच्याकडे कर वसुलीसाठी आपले अधिकारी कर्मचारी फिरकत सुध्दा नाहीत. तर ही दुहेरी निती आहे ती बंद करा. व अ‍ॅट पार वर या ठेकेदारास हे जे काम दिले आहे त्याबाबतची निविदा रद्द करुन नविन निविदा मागवुन याबाबतीत जेजे संबंधीत अधिकारी किंवा पदाधिकारी आहेत त्यांची चौकशी केली जावी. व हा ठेका रद्द करुन ही जी अंडरग्राउंड ड्रेनेजची गाडी आहे ती नविन आली पाहिजे आणखी दोन वर्ष आपण लक्ष दिले नाही तर ती गाडी सडुन जाईल. जशी फायर ब्रिग्रेडच्या गाडीची स्थिती झाली तशी या गाडीची सुध्दा स्थिती होईल. गाडीवर जो खर्च केला आहे तो फुकट जाईल. तर त्या पैश्याचा योग्य उपयोग होण्यासाठी किंवा सदुपयोग होण्यासाठी किंवा ती गाडी शहराच्या कामी यावी म्हणुन लवकरात लवकर त्याबाबतचे पेमेंट करुन गाडी येथे आणावी. उल्हासनगरमध्ये तक्रार केल्यानंतर १५–१५ दिवस गाडीसाठी जी वाट पहावी लागते त्याचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर होतो. तो मेहरबानी करुन थांबवा. व या निविदेमध्ये जर भ्रष्टाचार झाला असेल तर त्याची चौकशी केली जावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :–</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, दोन महिन्याअगोदर मी सुध्दा ड्रेनेजविषयी लक्षवेधी सुचना दिली होती. त्यावेळी आश्वासन देण्यात आले होते की, १५ दिवसामध्ये याबाबतचे पेमेंट केले जाईल व गाडी येईल. श्री. बोडारे साहेबांनी म्हटले ती सुध्दा एक हकिकत आहे. जो ठेकेदार आहे तो बेईमान आहे. व त्याचा उद्देश हाच आहे की, फसवणुक कशी करता येईल व महापालिकेकडुन अधिकाधिक पैसे कसे वसुल करता येतील. त्या हिशोबाने त्यास जो ठेका दिला आहे तो रद्द करणे आवश्यक आहे. व योग्य ती कार्यप्रणाली अवलंबुन नविन निविदा मागविली जावी. व कायदयानुसार एखादया चांगल्या ठेकेदारास ठेका दिला जावा. शहरामध्ये ड्रेनेजची एवढी काही समस्या आहे. न्यु इरा हायस्कुलच्या बाजुला आरकेटी कॉलेज आहे तेथे हजारो विदयार्थी शिक्षण घेत आहेत. तेथे अनेक वर्षापासुन भुयारी गटाराचे पाणी रस्त्यावरुन वाहत आहे. व

तेथुन जेव्हा मोटार सायकाल किंवा कार जाते तेव्हा त्यांच्या बाजुने चालणा—या पदाचा—यांच्या कपडयांवर या गटाराच्या पाण्याचे शिंतोडे उडतात. तर येथिल जनता विचार करीत आहे की या महापालिकेकडुन फायदा काय आहे? पाण्याची समस्या आहे. सार्वजनिक साफसफाई होत नाही. कोणताही निर्णय घेतला जात नाही. ३२५ सफाई कामगारांना नोकरीस लावायचे आहे. त्याबाबतीत सुध्दा अदयाप निर्णय होत नाही. लोक सेवानिवृत्त होत आहेत त्यांच्या जागी नेमणुका करायच्या आहेत त्याबाबतीत सुध्दा निर्णय होत नाही. लग्न समारंभाच्या कालावधीत सफाई कामगार दोन,दोन तीन,तीन महिने गावी जातात त्यामुळे संपुर्ण शहराची सार्वजनिक साफसफाई कामी वाट लागते. त्याबाबतीत सुध्दा निर्णय घेतला जात नाही. तर खाडाबदलीवर सफाई कामगारांची नेमणुक करणे अतिशय जरुरीचे आहे. कच—याचा ठेका जेव्हा या ठेकेदाराने घेतला तेव्हा असे सांगण्यात येत होते की, जगामध्ये कचरा उचलणा—या ठेकेदारामधील हा चांगला ठेकेदार आहे. त्यावेळी त्याने त्यांच्या कर्मचा—यांना जे काळे पिवळे गणवेश दिले होते त्या गणवेशातील ते सफाई कामगार पाहुन नागरीक खुपच खुश झाले होते. परंतु आजच्या तारखेला त्यांचा जो परिणाम आहे तो शुन्य आहे व त्याचा सुध्दा ठेका रद्द झाला पाहिजे. व महानगरपालिकेने नोकरभरती करुन सार्वजनिक साफसफाईचे काम आपल्या हाती घेतले पाहिजे ते अतिशय चांगले होईल. तसेच स्वच्छता निरिक्षकांना अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभागाचे काम दिले आहे. त्या हिशोबाने त्याचा सुध्दा दुरुपयोग होत आहे. तर स्वच्छता निरिक्षकांकडुन अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभागाचे काम काढुन घेण्यात यावे व त्यांना सांगण्यात यावे की, सार्वजनिक साफसफाईवर लक्ष पुरविण्यात यावे. माझ्या प्रभागामध्ये कालच ४ मलेरियाचे रुग्ण आढळून आले आहेत, कावीळची साथ पसरली आहे, टायफाईडचीही साथ पसरली आहे. बरेचसे लोक आजारी पडले आहेत. यासाठी माझी विनंती आहे की, अंडरग्राउंड ड्रेनेजकडे सुध्दा लक्ष पुरविले जावे त्याचबरोबर सफाई कामगारांचा जो मुद्दा आहे त्याकडेही लक्ष दिले जावे. दुसरा एक महत्वाचा विषय असा आहे की, नालासफाईसाठी प्रत्येक प्रभागामध्ये पावसाळयाअगोदर जे १०—१० हंगामी सफाई कामगार ठेवले जातात प्रत्यक्षात काय होते जेव्हा गोलमैदान किंवा नदी किना—याचा जो भाग आहे त्यामध्ये जेव्हा पावसाचे पाणी पुरासारखे पसरते त्यावेळेस लोक शोधत फिरतात की कोणते १० रोजंदारी सफाई कामगार ठेवले आहेत? तर याबाबतची जी प्रक्रिया आहे ती पहिल्यापासुनच चालु ठेवली जावी. हे जे १०—१० रोजंदारी सफाई कामगार ठेवणार आहात त्यांची पावसाळयाच्या अगोदरच आपणाकडे यादी उपलब्ध असली पाहिजे. तर याविषयावर जरा लक्ष दिले जावे धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—</u> मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सदस्य व पत्रकार, आता येथे भुयारी गटारांबाबत चर्चा होत आहे. ड्रेनेजची गाडी वेळेवर मिळत नसल्याबाबत सर्व नगरसेवक ओरड करत आहेत. यासाठी दुसरी गाडी लवकरात लवकर आणली पाहिजे. परंतु जी मुख्य समस्या आहे तिच्याकडे कुणाचे लक्ष जात नाही. भुयारी गटाराची जी लाईन टाकण्यात आली आहे तिचे जे पाईप आहेत ते सहा इंच व्यासाचे आहेत, त्यावेळेस हे पाईप कमीत कमी एक फुट व्यासाचे टाकले असते तर चांगले झाले असते परंतु त्यावेळेस याबाबीकडें लक्ष दिले नाही. सध्या शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ज्यावेळेस हे काम झाले त्यावेळेस शहराची लोकसंख्या ४ लाखाच्या आसपास असेल आज ही लोकसंख्या आता ८ लाखाच्या आसपास आहे. नविन नविन घरे तयार होत आहेत. ड्रेनेजलाईनच्या आजुबाजुला जी घरे आहेत ते लोक आपल्या घरामध्ये शौचालय बांधतात व थेट लाईन चेंबरमध्ये सोडतात. जर त्यांनी सेप्टीक टॅक बांधला तर तो मैला सेप्टीक टॅक मध्ये जाईल व केवळ पाणी चेंबरमध्ये जाईल. परंतु असे न होता थेट चेंबरमध्ये ज्या लाईन टाकल्या आहेत त्यामुळे मैला थेट चेंबरमध्ये जातो व काही दिवसानंतर ६ इंच व्यासाची जी लाईन आहे ती चोकअप होते याबाबतीत जर आपण थोडे सर्व्हेक्षण केले तर आपणांस दिसुन येईल की वारंवार तेच चेंबर चोकअप होत आहेत. २—४ वर्षाचा आपण जर तपशिल पाहिलात तर आपणांस हे दिसुन येईल. मी सुध्दा आजपर्यंत ज्या तक्रारी दिल्या आहेत त्याच त्याच विभागाच्या मला पुन्हा पुन्हा तक्रारी दयाव्या लागत आहेत. माझ्या असे निदर्शनास आले की, ९० टक्के लाईन्स थेट ड्रेनेज चेंबर्समध्ये सोडण्यात आल्या आहेत. मी ब—याचवेळा स्वच्छता निरिक्षकांना सांगितले आहे जसे की, काही लोक रस्त्यावर थुंकतात, शौचास बसतात किंवा कचरा टाकतात, अशा लोकांवर दंड आकारला जातो. त्यानुसार ज्या ज्या लोकांनी आपल्या शौचालयाची ड्रेनेज लाईन थेट ड्रेनेज चेंबर्समध्ये सोडली आहे ज्यांच्या शौचालयास सेप्टीक टॅक नाही अशा लोकांवर दंड आकारला जावा. व लवकरात लवकर सेप्टीक टॅक बांधण्यात त्यांना सांगितले जावे. दुसरी एक गोष्ट अशी की ड्रेनेजची बरेचसे चेंबर्स उघडी आहेत, काही लोक आपल्या घरातील सांडपाणी जाण्यासाठी चेंबरचे झाकण उघडे करुन ठेवतात त्यामुळे त्यात कचरा जातो व ६ इंच व्यासाची ती पाईप लाईन बंद होवुन जाते व चेंबर चोकअपची समस्या निर्माण होते यासाठी मी सभागृहाला विनंती करेन त्याचबरोबर मा. महापौरांना विनंती करेल की असे जे लोक आहेत जे आपले जबाबदारी समजत नाहीत जे फक्त आपला हक्क समजतात, हक्क आणि कर्तव्य ही एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत जर आपणांस हक्क पाहिजे असतील तर आपली कर्तव्यही पार पाडली पाहिजेत. समस्या वाढु दिल्या नाही पाहिजेत. येथे जे नगरसेवक आहेत त्यांचे सुध्दा हे काम आहे की, त्यांनी

नागरीकांना सांगितले पाहिजे की आपली जबाबदारी काय आहे? ड्रेनेज लाईनमध्ये कचरा टाकु नये. ज्यांनी ड्रेनेज लाईनमध्ये डायरेक्ट लाईन टाकली आहे त्यांच्यावर दंड आकारला जावा. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, आता जो विषय चालु आहे, अंडरग्राउंड ड्रेनेजचे जे ४,५ प्राकलन आहेत. मला श्री. बोडारे यांनी सांगितले की, मी प्रोटोकॉल (शिष्टाचार) तोडला आणि तुम्ही मध्येच म्हणालात मी म्हटले की, जर शॉर्टकर्टमध्ये समजले तर बरे होईल म्हणुनच मी मध्येच बोललो. जर समजले नसेल तर त्याचा मी खुलासा करतो. उल्हासनगर महापालिकेत ५ लाखांपर्यंत जे प्राकलन पास होते तो डीडीआरकडे पाठविले जाते. ॲट पार निविदेला म्हटले जाते प्राकलनास नाही. श्री. जमनादास पुरस्वानी अभ्यास करुन येतात परंतु तो अर्धवटच. मी असे म्हणतो की याचा खुलासा पुढील महासभेत झाला तरी चालेल. जे ५—५ लाखाच्या आत जे प्राकलन तयार होते ते भलेही नगरसेवक निधीचे असो, महापालिका निधीची असो किंवा डीडीआरला जातो, ५ लाखाचे टेंडर तयार होते. आज सार्वजनिक बांधकाम विभागातुन कमीत कमी ५—६ वेळा निविदा पास झाल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निविदा कुणीही भरत नाहीत. याकारणाने महापालिकेची परिस्थिती खराब आहे. पाणी पुरवठा विभागात बरेचश्या निविदा ७—७ वेळा मागविल्या आहेत. कुणीही भरत नाहीत. हे जे ५ लाखापर्यंतचे प्राकलन आहे ते प्रशासनाच्या वतीने स्थायी समितीपुढे आले होते. स्थायी समितीने फक्त प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली होती. त्यानंतर महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. आपण लोक त्यानंतर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (डीडीआर) यांच्याकडे नंतर ते पाठवितो. त्यांच्याकडुन हे काम ज्या कुण्या ठेकेदाराला दिले जाते त्यानंतर त्यास ३ दिवसापर्यंत काम वाटप केल्याबाबतचे आदेश प्राप्त होतात. त्यानंतर तो महानगरपालिकेशी करार करतो त्यानंतर त्यास कार्यादेश मिळतो. तर स्थायी समितीने कुणाच्याही नावाने ठेका दिलेला नाही. ॲटपार्टने (निविदा दरानुसार) नाही तर दरवर्षी महाराष्ट्र शासनाच्या सुचीने जिल्हा दरसूची लागु केली जाते त्यानुसार दिले जाते. दरवर्षी हे जिल्हादरसुचीतील दर वाढत असतात. त्यानुसार आम्ही ४ प्राकलनांना प्रशासकिय व वित्तीय मंजुरी दिलेली आहे. जिल्हा उपनिबंधकांकडुन कामाचे वाटप झाल्यानंतरच त्यांना कार्यादेश दिले आहेत व ते ४ वेगवेगळया नावाने आहेत. तर आपण जे म्हणत आहात स्थायी समितीने जो ठेका दिला, ठेका स्थायी समितीने दिला नाही तर तो डीडीआर यांनी दिला आहे तेथे सुध्दा बैठक होते त्यामध्ये हे काम कुणाला दयायचे हे निश्चित होते. तर हे जे प्राकलन मंजुर झाले आहे नगरसेवक निधीतील कामे सुध्दा अशीच होतात. ही सुध्दा नगरसेवकाचीच मागणी आहे. जेव्हा श्री. चंद्रशेखर साहेब आले होते ते म्हणत की, ५० हजार, १लाखाचे किंवा ५ लाखाचे प्राकलन असो मी निविदा मागवेन. देकार प्राकलनीय रक्कमेपेक्षा कमी आले पाहिजे. त्यावर आम्ही म्हटले होते की नाही आमचे प्राकलन डीडीआरकडे पाठविले जावे. टेंडर कुणी भरते, नाही भरते दुसरा ठेकेदार काम करेल, करणार नाही. यासाठी डीडीआरकडे पाठविण्याबाबत शासनाचे सुध्दा आदेश आहेत. ५ लाखापर्यंतचे प्राकलन डीडीआरकडे पाठविले जाते. आमच्या नगरसेवक निधितील कामाचे प्राकलन डीडीआरकडे पाठविले जाते. तर आज आम्ही स्थायी समितीमध्ये ज्या चार प्राकलनांना प्रशासकिय व वित्तीय मंजुरी दिली त्या कामाचे कार्यादेश अलग अलग ठेकेदारांना मिळाले आहेत व त्यांचे काम काय आहे? गाडी देणे नाही. गाडीवर जे वेगवेगळे कामगार पाठविले जातात ते ठेकेदाराचे कामगार असतात. प्रत्येक प्रभागामध्ये ज्या काही तक्रारी येतात त्यानुसार ठेकेदार तेथे माणसे पाठवितो. कामगार देणे हे त्यांचे काम आहे. ते जेवढे कामगार देतात तेवढयाच कामगारांचे आमचे कनिष्ठ अभियंता देयक तयार करतात. तेवढयाच कामगारांचा त्यांना पगार मिळतो. आज जी चुकीची समज होत आहे ॲटपार्ट वगैरे काही नाही चारही कामे डीडीआरकडुन वाटप करण्यात आली आहेत.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> महापौर महोदया, जेव्हा यांनी माझ्या प्रस्तावावर टिप्पणी केली त्यानुसार सभागृहात त्याचा खुलासा करण्याचा मला पुर्ण अधिकार प्राप्त होतो. मा. सभागृह नेता यांनी ज्या गोष्टीबाबत चर्चा केली मी त्याबाबत सहमत आहे की, ते काम भोलेनाथ सोसायटीला दिले आहे. ते काम ठाणे येथे डीडीआर यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले. मी एक विचारु इच्छितो की, याअगोदर जेव्हा निविदा काढण्यात आली होती व ४० टक्के प्राकलनीय रक्कमेपेक्षा कमी दरामध्ये निविदा भरली होती त्यानुसार यावर्षी सुध्दा निविदा काढावयास पाहिजे होते हे काम थेट सोसायटीला देवुन यामध्ये भ्रष्टाचार करण्यात आला आहे आतापर्यंत आम्ही हा आरोप प्रशासनावर लावला आहे. या लक्षवेधीनंतरही जर मा. महापौर व सभागृहनेता पक्षपात करत असतील तर त्यांच्यावर माझा असा आरोप असेल की, प्रशासनाबरोबर शासनसुध्दा या भ्रष्टाचारामध्ये समाविष्ट आहे. आज मी या सभागृहाचे लक्ष या लक्षवेधीकडे आकर्षित केले आहे. प्रशासनाने जाणीवपुर्वक निविदा न मागविता सोसायटीला देण्यासाठी लहान—लहान कामे आणली आहेत. आपण तर हे अतिशय चांगल्यारितीने ओळखता आपण चार—पाच वर्षे स्थायी समितीमध्ये आहात. डीडीआर यांच्याकडे जी काही प्राकलने पाठविली जातात त्यातील ज्या कुणाला ते काम पाहिजे असेल तो ठेकेदार त्या कामाचे त्यांच्याकडुन पत्र घेवुन येतो. व ही पुर्णपणे मिलीभगत आहे. कामाचे लहान लहान भाग केल्याने शहराचे नुकसान होईल. ते आम्ही बिल्कुल सहन करणार नाही. या अगोदर आपण ऐकले असेल कल्याण मधील

आमचे भाजपाचे नगरसेवक श्री. नंदु जोशी यांनी कल्याण महानगरपालिकेतील क्लोरीनचा भ्रष्टाचार उघडकीस आणला होता त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागास पत्र लिहिले होते की, क्लोरीन खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाला आहे. त्याबाबत लाचलुचपत विभागाने त्यांना उत्तर दिले होते की, यामध्ये काहीही भ्रष्टाचार झालेला नाही त्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात दावा दाखल केला. त्यानुसार कल्याण महानगरपालिकेमध्ये दोन वर्षाच्या कालावधीमध्ये जेवढे काही आयुक्त आले त्या सर्वांना चौकशीला सामोरे जावे लागले. मला असे वाटत आहे की, प्रशासनाबरोबर शासन सुध्दा या प्रकरणांमध्ये फसले जावे. परंतु आतापर्यंत माझा आरोप फक्त प्रशासनावर आहे. प्रशासनाने फिरवुन फिरवुन एखादया संस्थेला अधिक दराने काम देण्यासाठी या कामाचे तुकडेतुकडे करुन स्थायी समितीपुढे प्रस्ताव आणला. व तो स्थायी समितीने मंजुर करुन डीडीआरकडे पाठविला त्यानंतर कार्यादेश घेवुन काम केले. याकामी मा. महापौर महोदया, जर या गोष्टीचे समर्थन करीत असतील की हे बरोबर आहे तर पुढील कार्यवाहीसाठी आम्हांला रस्ता मोकळा आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांनी म्हटले की, शॉर्टकर्टमध्ये समजावण्याचा प्रयत्न केला आहे. ती त्यांची चुकीची समजुत आहे की आपणच समजदार आहात बाकी कुणी नाही. आपण जर मान्य करत नसाल तर ते शोधुन काढण्यासाठी दुसरे रस्ते आहेत परंतु आम्हांला तिथपर्यंत जायचे नाही. आपण जर मान्य करत असाल की प्रशासनाने चुक केली आहे यापुढे ते सुधारतील. यापुढे ते चुक सुधारतील परंतु त्यांनी चुक करुन सुध्दा ते म्हणत असतील की केलेली चुक बरोबर आहे व आपणांस समजत नाही असे जर म्हणत असतील तर आम्हांला आयुक्त साहेबांना समजावे लागेल. त्याचे रस्ते वेगळे आहेत. तेथपर्यंत जाण्यासाठी आम्हांला मजबुर करु नका. व ज्या पध्दतीने आपण समजावले त्यानुसार आपण स्थायी समितीचे सभापती होण्यास पात्र आहोत हे आपण दर्शविले. चुकीचे करुन सुध्दा आपण सुधारणा केल्याचे दर्शविले. त्याबद्दल आपली करावी तेवढी प्रशंसा थोडीच आहे. चुकीचे असुन सुध्दा त्यावर आपण खुलासा देता. परंतु आपण जे केले ते बरोबर नाही. श्री. जमनादास पुरस्वानी यांनी म्हटले की मागील वर्षी त्या कामावर जो खर्च झाला तो किती? व या वर्षाचा खर्च किती? खर्च वाढविण्यासाठी आपण जी पध्दत अवलंबित आहात ती चुकीची आहे. तो प्रकार चुकीचा आहे. खर्च वाढला आहे याकडे आम्ही आपले लक्ष वेधले आहे. तो कमी करण्यासाठी आपण काय करु शकता ते सांगा. खर्च वाढविण्यासाठी जर आपण कामांची चीरफाड केली आहे. तुकडे तुकडे केले आहेत मात्र खर्च वाढला आहे. आपला उद्देश खर्च कमी करण्याचा होता. परंतु खर्च वाढविण्यासाठी आपण ते काम ५–५ लाखामध्ये विभागले आहे. आपण जे सांगितले ते आमच्या लक्षात आले नाही असे नाही तर ते सर्व आमच्या लक्षात आले आहे. परंतु आम्हांस असे वाटते की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या पैश्याची बचत झाली पाहिजे. व जी बचत होत आहे त्यातुन अंडरग्राउंड ड्रेनेजची गाडी आली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी, आमचे सभागृह नेता यांनी जे सांगितले की डीडीआर मार्फत काम येथे दिले गेले. श्री. बोडारे साहेब म्हणाले की, महानगरपालिकेचा पैसा वाचविला पाहिजे. आम्ही त्यांच्या गोष्टीशी सहमत आहे फक्त सहमतच नसुन आम्ही महानगरपालिकेस मदत करतो. उदाहरणार्थ कालच मी टॅक्सचा कॅम्प लावुन महानगरपालिकेस साडे अकरा लाख मिळवुन दिले. तर मी येथे आपणांस व श्री. जमनादास पुरस्वानी यांना सांगु इच्छितो की, आपण कुठल्याही विषयाची पुर्ण माहिती ठेवत जा. कॅम्प नं. १ पासून कॅम्प नं. ५ पर्यंत आपल्या म्हणण्यानुसार या अगोदरची निविदा किती मध्ये गेली होती? १९ लाखामध्ये.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>प्राकलनीय रक्कमेपेक्षा किती टक्के कमी दराने निविदा गेली होती,

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u> आपण २५ लाख म्हणत आहात आपण सभागृहाची दिशाभूल करत आहात. चुकीची माहिती देत आहात. आपणांस काही माहिती आहे? व ही सुध्दा माहिती देतो की कॅम्प नं. १ ते ५ पर्यंतची निविदा २० लाखामध्ये गेली आहे. व गाडीवर जे मजुर लागतात ते सुध्दा यामध्ये समाविष्ट आहेत. याची आपणांस माहिती आहे? आपणांस कोणतीही माहिती नाही. मी श्री. बोडारे साहेबांच्या मताशी पुर्णपणे सहमत आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> निविदा प्राकलनीय रक्कमेपेक्षा किती टक्के कमी दराने गेली ते मला सांगा.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>आमच्या महानगरपालिकेच्या पैश्याचा कुठेही दुरुपयोग होता कामा नये. याबाबत आपणांस जी कोणतीही चौकशी बसवायची असेल ती बसवा. परंतु आपण जरा विषयाची माहिती घेवुन सभेपुढे प्रस्ताव आणावा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, याचा अर्थ यामधुन असे तात्पर्य निघते की, जर आपण समर्थन करत असाल २० लाख किंवा २५ लाखाचीच गोष्ट नाही. डीडीआर दरापेक्षा ४० टक्के कमी दराने, व यावेळेस जी निविदा गेली आहे ती डीडीआरच्या दराने गेली आहे म्हणजेच ४० टक्याचे नुकसान आहे.

मा. महापौर :— सन्मानिय सदस्यहो, महानगरपालिकेचे कोणत्याही प्रकारे आर्थिक नुकसान होवु नये. मी चीनला जाण्याविषयी श्री. बोडारे साहेबांना खुपच त्रासाचे होत होते. ते म्हणत होते की, १० लाख रुपये खर्च होईल. दिशाभुल करत होते. अडीच लाख रुपये खर्च येणार होता. परंतु यांची हरकत पाहता मी तो दौरा रद्द केला. व आमच्या श्री. राजु जग्यासी यांनी कालच्या रविवारच्या दिवशी मालमत्ता कर वसुलीसाठी एक विशेष कॅम्प आयोजित केला होता त्याचा उद्देश असा होता की, महानगरपालिकेची अधिकाधिक कर वसुली व्हावी. काल साडे अकरा लाख रुपयांची कर वसुली केली.

**मा. सदस्या श्रीमती भावना रामचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— हरकतीचा मुद्दा. आमची सुचना आपल्या लक्षात आली व तिचा विचार करुन आपण आपला चीन दौरा रद्द केला. महानगरपालिकेचा पैसा फुकट जाणार होता तो वाचला. आमचे म्हणणे बरोबर असते परंतु ते आपल्या उशिरा लक्षात येते.

मा. महापौर :— श्री. जमनादास पुरस्वानी यांनी आपल्या भाषणामध्ये दोन—तीन वेळा म्हटले की, जर महापौर आमच्या म्हणण्याशी सहमत नसतील तर मी कोर्टात दाद मागेन, मी हे करेन ते करेन. मला माझे म्हणणे मांडण्याची आपण संधी दिली नाहीत. आपण आपले बोलणे पुर्ण केले नाही तर मी बोलणार कशी? व कोर्टात जावु अशी जर आम्हांला धमकी देत असाल तर आपले हात मोकळे आहेत. आम्ही कोणत्याही भ्रष्टाचारामध्ये सामिल नाही. राहिली गोष्ट येथे जी चर्चा झाली त्याबाबतीत संबधीत विभाग चौकशी करेल. व आम्ही सर्वजण मिळुन महानगरपालिकेची किती बचत होवु शकेल याबाबतीत विचार करेल. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, गाडीच्या बाबती तर आपण बोलला नाहीत, दिड वर्षापासुन गाडी पडुन आहे ती का येत नाही?

मा. महापौर :— श्री. सावकारे यांनी म्हटले आहे की मार्चच्या शेवटच्या आठवडयापर्यंत गाडी येईल. आम्ही या गोष्टीकडे लक्ष देवु की मार्चच्या शेवटी गाडी आलीच पाहिजे.

मा. सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

विषय क्र. २ :— मागील महासभांचे इतिवृत्त कायम करणे.

अ) सर्वसाधारण महासभा दिनांक २०/०१/२००६(त्यात दि. २१/०१/२००६ व ०८/०२/२००६)
ब) विशेष महासभा दिनांक ८/२/२००६
क) सर्वसाधारण महासभा दिनांक १५/२/२००६
ड) विशेष महासभा दिनांक १८/२/२००६

---

काही सदस्य :—पास—पास……

मा. महापौर :— मागील महासभांचे सर्वसाधारण महासभा दिनांक २०/०१/२००६(त्यात दि. २१/०१/२००६ व ०८/०२/२००६) विशेष महासभा दिनांक ८/२/२००६ सर्वसाधारण महासभा दिनांक १५/२/२००६

विशेष महासभा दिनांक १८/२/२००६ चे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा. सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :—** मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेल्या माहे नोव्हेंबर २००५ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल व त्यात विधी अग्राहय प्रकरणी स्थायी समिती ठराव क्र. १०३, दिनांक १५/०२/२००६ अन्वये दिलेले आदेश कायम करणे.

---

लेखा परिक्षणाचा अहवाल आहे. पास?

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ३ :—** मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेल्या माहे नोव्हेंबर २००५ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल व त्यात विधी अग्राहय प्रकरणी स्थायी समिती ठराव क्र. १०३, दिनांक १५/०२/२००६ अन्वये दिलेले आदेश कायम करणे.

प्रस्तावना

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे ऑक्टोंबर २००५ चा जमा खर्चाचा अहवाल.**

वित्तीय वर्ष २००५—२००६ च्या "अ" व "क" अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न व माहे नोव्हेंबर २००५ मध्ये प्राप्त झालेले उत्पन्न हे पुढे दर्शविलिले आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रूपये |
|---|---|
| १ | २ |
| "अ" | १२९,१९,९५,००० |
| "क" | ३३,६७,५५,००० |
| एकूण | १६२,८७,५०,००० |

अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित जमा रूपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | महसूल जमा | १४३,५०,३१,००० |
| २ | शासकीय अनुदान | ७,०९,००,००० |
| ३ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १२,११,५०,००० |
| | एकूण | १६२,७०,८१,००० |
| | प्रारंभिक शिल्लक | १६,६९,००० |
| | एकुण :— | १६२,८७,५०,००० |

वित्तीय वर्ष २००५—२००६ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रूपये १४३,५०,३१,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे ऑक्टोंबर २००५ पर्यंत समप्रमाणात रूपये ९५,६७,२३,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रू. ५१,१६,८४,०००/— ( एकूण महसूल जमेच्या ३५.६६ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

**माहे नोव्हेंबर २००५ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.**

| लेखा शिर्ष | अंदाजित | माहे नोव्हेंबर | प्रत्यक्ष जमा | टक्केवारी |
|---|---|---|---|---|

| अर्थ संकल्प "अ" | | | २००५ पर्यंत अपेक्षित | (रू. १०००/—पुर्णाकांत) | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जकात | ८०,५०,००,००० | ५३,६७,००,००० | ४३,५५,५१,००० | ८१.१५ |
| २ | मालमत्ता कर | २६,५२,००,००० | १७,६८,००,००० | २,५४,१९,००० | १४.३७ |
| ३ | एम्. आर. टी. पी. वसूली | ९९,१०,००० | ६६,०७,००० | ३४,८०,००० | ५२.६७ |
| ४ | मार्केट उत्पन्न | १०,००,००० | ६,६७,००० | — | — |
| ५ | रूग्णालय फी | ८५,००० | ५७,००० | ३५,००० | ६१.४० |
| ६ | परवाना व इतर फी | २,३३,३५,००० | १,५५,५७,००० | ८२,४०,००० | ५२.९६ |
| ७ | संकीर्ण | ९२,४६,००० | ६१,६४,००० | १,४०,०५,००० | २२७.२० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २,२४,५०,००० | १,४९,६७,००० | १३,९२,००० | ९.३० |
| | एकूण—अ | १,१३,६२,२६,००० | ७५,७५,१९,००० | ४८,८१,२२,००० | ६४.४३ |
| | अर्थसंकल्प "क" | | | | |
| १ | पाणी बिले वसुली | २४,००,००,००० | १६,००,००,००० | १,७७,०३,००० | ११.०६ |
| २ | मालमत्ता कर | ५,४६,००,००० | ३,६४,००,००० | ५०,३८,००० | १३.८४ |
| ३ | परवाना/इतर फी | ४१,०५,००० | २७,३७,००० | ७,९५,००० | २९.०४ |
| ४ | संकीर्ण | १,००,००० | ६७,००० | २६,००० | ३८.८० |
| | एकुण "क" | २९,८८,०५,००० | १९,९२,०४,००० | २,३५,६२,००० | ११.८२ |
| | एकुण "अ" व "क" | १,४३,५०,३१,००० | ९५,६७,२३,००० | ५१,१६,८४,००० | ५३.४८ |

"अ" व "क" अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रू. १,६२,८७,५०,०००/—(प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे ऑक्टोंबर २००५ मध्ये रू. ५६,५३,७५,९८७/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

खर्च :—

माहे एप्रिल २००५ ते नोव्हेंबर २००५ या कालावधीमध्ये रू. ५३,००,०२,४३१/— खर्च लेखांकित झालेला आहे.
खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकांचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजूरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदी अधिन आहे.

माहे नोव्हेंबर २००५ ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे :— माहे नोव्हेंबर २००५ मध्ये महापालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या/निधन पावलेल्या कर्मचा—यांची ५ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निर्देशनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे :—

## मालमत्ता कर विभाग

विषय :— घरपट्टीची वसूल केलेली रक्कम रूपये २,३७,८५९/—रोखीने वसूल करणे बाबत.

कर विभागाचे सन २००५–२००६ चे लेखा परिक्षणात असे निर्देशनास आले की, कर विभागातील वसूली लिपिकांनी मालमत्ता करापोटी धनादेशाद्वारे वसूल केलेल्या रक्कमेपैकी, धनादेश बॅंकेत जमा केल्यानंतर ते न वटता परत आलेले आहेत. संबंधीत वसूली लिपिकांनी धनादेश न वटता परत आल्यानंतर सदर धनादेशांची रक्कम मालमत्ता धारकांकडून रोखीने वसूल करणे आवश्यक होते. तथापि वसूलीबाबत ठोस कार्यवाही केली नसल्यामुळे रु. २,३७,८५९/–(रुपये दोन लाख सदोत्तीस हजार आठशे एकोणसाठ फक्त) कराची वसूली थकित असल्याचे दिसून येते. सदर वसूली तातडीने करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन क्र. जा.क्र.उमपा/लेपवि/कर विभाग/असज्ञा/१२२/०५, दिनांक १२/१२/२००५ अन्वये कर निर्धारक व संकलक (शहर) व उप–कर निर्धारक व संकलक यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून वसूलीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

स्थायी समिती ठराव क्र. १०३ दिनांक:– १५/२/२००६

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्रीम. लक्ष्मीबाई ससाणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे माहे नोव्हेंबर २००५ पर्यंतचा महापालिका लेख्यांची छाननी व मुख्य लेखा परीक्षकांचा विधी अग्राहय प्रकरणी अहवालाचा विचार करुन उपरोक्त कर्मचा–यां विरुध्द् कारवाईच्या दृष्टीने खालील आदेश देत आहे.

१) प्रशासनाने उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे.

२) कर विभागातील वसुली लिपिकांनी मालमत्ता करापोटी धनादेशाद्वारे वसुल केलेल्या रक्कमेचा धनादेश बॅंकेत जमा केल्यानंतर न वटता परत आलेल्या प्रकरणी वसुलीबाबत ठोस कारवाई न केल्यास कसुरदार अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुध्द् विभागीय चौकशी बसविण्यात यावी.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क: ८७ दिनांक:–२०/३/२००६

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. नथु सोनवणे

ही महासभा मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेला माहे नोव्हेंबर २००५ पर्यंतचा जमा खर्च व त्यात विधी अग्राहय प्रकरणी अहवाला आधारे स्थायी समिती ठराव क. १०३, दिनांक १५/०२/२००६ अन्वये दिलेले आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ४:— मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेल्या माहे डिसेंबर २००५ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल व त्यात विधी अग्राहय प्रकरणी स्थायी समिती ठराव क्र. १०४, दिनांक १५/०२/२००६ अन्वये दिलेले आदेश कायम करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

विषय क्र. ४:— मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेल्या माहे डिसेंबर २००५ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल व त्यात विधी अग्राहय प्रकरणी स्थायी समिती ठराव क्र. १०४, दिनांक १५/०२/२००६ अन्वये दिलेले आदेश कायम करणे.

प्रस्तावना

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे डिसेंबर २००५ चा जमा खर्चाचा अहवाल.**

वित्तीय वर्ष २००५—२००६ च्या "अ" व "क" अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न व माहे डिसेंबर २००५ मध्ये प्राप्त झालेले उत्पन्न हे पुढे दर्शविलिले आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रूपये |
|---|---|
| १ | २ |
| "अ" | १२९,१९,९५,००० |
| "क" | ३३,६७,५५,००० |
| एकूण | १६२,८७,५०,००० |

अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित जमा रूपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | महसूल जमा | १४३,५०,३१,००० |
| २ | शासकीय अनुदान | ७,०९,००,००० |
| ३ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १२,११,५०,००० |
| | एकूण | १६२,७०,८१,००० |
| | प्रारंभिक शिल्लक | १६,६९,००० |
| | एकुण :— | १६२,८७,५०,००० |

वित्तीय वर्ष २००५—२००६ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रूपये १४३,५०,३१,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे डिसेंबर २००५ पर्यंत समप्रमाणात रूपये १,०७,६२,७३,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रू. ५६,६२,०२,०००/— ( एकूण महसूल जमेच्या

३९.४५ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे डिसेंबर २००५ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प "अ" | | अंदाजित | माहे डिसेंबर २००५ पर्यंत अपेक्षित | प्रत्यक्ष जमा (रू. १०००/—पुर्णाकांत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जकात | ८०,५०,००,००० | ६०,३७,५०,००० | ४८,२२,०५,००० | ७९.८६ |
| २ | मालमत्ता कर | २६,५२,००,००० | ११,८९,००,००० | २,७९,६०,००० | १४.०५ |
| ३ | एम्. आर. टी. पी. वसूली | ९९,१०,००० | ७४,३२,००० | ४१,१९,००० | ५५.४२ |
| ४ | मार्केट उत्पन्न | १०,००,००० | ७,५०,००० | — | — |
| ५ | रूग्णालय फी | ८५,००० | ६४,००० | ३८,००० | ५९.३७ |
| ६ | परवाना व इतर फी | २,३३,३५,००० | १,७५,०१,००० | ८३,२२,००० | ४७.५५ |
| ७ | संकीर्ण | ९२,४६,००० | ६९,३४,००० | १,४४,५९,००० | २०८.५२ |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २,२४,५०,००० | १,६८,३८,००० | १७,३२,००० | १०.२८ |
| | एकूण—अ | १,१३,६२,२६,००० | ८५,२१,६९,००० | ५३,८८,३५,००० | ६३.२३ |
| | अर्थसंकल्प "क" | | | | |
| १ | पाणी बिले वसुली | २४,००,००,००० | १८,००,००,००० | २,०९,२७,००० | ११.६२ |
| २ | मालमत्ता कर | ५,४६,००,००० | ४,०९,५०,००० | ५५,२१,००० | १३.४८ |
| ३ | परवाना/इतर फी | ४१,०५,००० | ३०,७९,००० | ८,९३,००० | २९.०० |
| ४ | संकीर्ण | १,००,००० | ७५,००० | २६,००० | ३४.६६ |
| | एकुण "क" | २९,८८,०५,००० | २२,४१,०४,००० | २,७३,६७,००० | १२.२१ |
| | एकुण "अ" व "क" | १,४३,५०,३१,००० | १,०७,६२,७३,००० | ५६,६२,०२,००० | ५२.६० |

"अ" व "क" अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रू. १,६२,८७,५०,०००/—(प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे डिसेंबर २००५ मध्ये रू. ६२,०८,५६,२१७/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

खर्च :—

माहे एप्रिल २००५ ते नोव्हेंबर २००५ या कालावधीमध्ये रू. ६०,२२,१४,५११/— खर्च लेखांकित झालेला आहे.

खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकांचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजूरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदी अधिन आहे.

माहे डिसेंबर २००५ ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

<u>निवृत्ती वेतन प्रकरणे :—</u> माहे डिसेंबर २००५ मध्ये महापालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या/निधन पावलेल्या कर्मचा—यांची ५ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

<u>लेखा परिक्षणामध्ये निर्देशनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे :—</u>

## पाणी पुरवठा विभाग

<u>आक्षेप क्र. १</u>

विषय :– नळजोडणी खंडीत करणे, पुन्हा उघडणे व पुन: जोडणी करणे बाबतच्या शुल्काची रक्कम रुपये ३२०/– विलंबाने भरल्याने दंडनिय व्याजाची रक्कम रुपये १५०/– वसूल करण्याबाबत.

पाणी पुरवठा विभागाचे सन २००३–२००४ चे लेखा परिक्षण केले असता असे निर्दशनास आले की, श्री. डी.आर.जाधव, लिपिक यांनी नळ जोडणी खंडीत करणे, पुन्हा उघडणे व पुन: जोडणी करणे करिता रुपये ३२०/– शुल्क वसूल केले आहे.

| पावती क्रमांक व दिनांक | रक्कम | विलंबाचा कालावधी |
|---|---|---|
| ००००२४/११/०२/२००३ | ४०/– | |
| ००००२५/११/०२/२००३ | १४०/– } | ३३ महिने |
| ००००४८/०९/०७/२००३ | १४०/– | २९ महिने |
| | ३२०/– | |

सदर शुल्काची रक्कम ज्या दिवशी वसूल केली त्याच दिवशी ती महापालिका कोषागारात जमा करणे आवश्यक होते. तथापि संबंधित लिपिकाने सदर रक्कम दिनांक ०१/१२/२००५ रोजी महापालिकेच्या स्टेट बॅक खाते क्र. ५१४९ मध्ये विलंबाने भरणा केला आहे.

महापालिकेच्या महसूलाची रक्कम स्वत:जवळ ठेवणे व विलंबाने जमा करणे म्हणजे सदर रक्कमेचा तात्पुरत्या स्वरुपाचा अपहार केल्याचे सिध्द होत असल्याने त्यांचेकडून सदर नळ जोडणी शुल्काच्या रक्कमेवर द. सा.द.शे. १८ टक्के दराने व्याजाची रक्कम रुपये १५०/– एक रक्कमी वसूल करुन महापालिकेच्या कोषागारात जमा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा. क्र. उमपा/लेपवि/पापु विभाग/असज्ञा/१७९/०५, दिनांक २२/१२/२००५ अन्वये कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग व उप–अभियंता पाणी पुरवठा विभाग (देयक), उल्हासनगर–५ यांना कळविण्यात आले आहे. तथापि त्यांच्याकडुन अदयाप कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## आक्षेप क्र.२

विषय :– पाणी पट्टी बिलाचे रुपये ३,६५,६३०/– चे धनादेश न वटल्यामुळे रोखीने वसूली करणे बाबत.

पाणी पुरवठा विभाग, उल्हासनगर–५, या कार्यालयाचे सन २००३–२००४ या वित्तीय वर्षाचे पाणी पट्टीच्या जमा रक्कमांचे लेखा परिक्षण केले असता असे आढळून आले की, महापालिका क्षेत्रातील ५६ ग्राहकांकडुन स्विकारलेले धनादेश महापालिकेच्या बॅकेतील खात्यामध्ये जमा केले असता, ते न वटता परत आले आहेत.

वास्तविक पहाता धनादेश न वटता परत आल्यानंतर, संबंधित वसुली लिपिकाने सदर धनादेशाची दंडनिय दराने रोखीने त्वरीत वसूली करणे आवश्यक होते. तथापि त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याने पाणी पट्टी बिलाची रक्कम रुपये ३,६५,६३०/– (रुपये तीन लाख पासष्ट हजार सहाशे तीस फक्त ) प्रलंबित असल्याचे दिसून येते. तरी सदर थकित रक्कम तातडीने वसूल करुन महापालिका कोषागारात जमा करणे बाबत संबंधित लिपिकांना सक्त सुचना द्याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखा परिक्षणास त्वरीत देणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा. क्र. उमपा/लेपवि/पापु विभाग/असज्ञा/१८०/०५, दिनांक २२/१२/२००५ अन्वये कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग व उप–अभियंता पाणी पुरवठा (देयक), उल्हासनगर–५ यांना कळविण्यात आले आहे. तथापि त्यांच्याकडुन अदयाप कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## आक्षेप क्र. ३

विषय :– पाणी पट्टी बिलाचे रुपये ४,१३,८३४/– चे धनादेश न वटल्यामुळे रोखीने वसूली करणे बाबत.

सन २००४–२००५ या वित्तीय वर्षाचे पाणी पुरवठाा विभाग, उल्हासनगर–५ या कार्यालयाचे लेखा परिक्षण केले असता असे निदर्शनास आले की, पाणी पट्टी बिलापोटी ४७ ग्राहकाकडुन स्विकारलेले धनादेश महापालिकेच्या बॅकेतील खात्यामध्ये जमा केले असता ते न वटता परत आलेले आहेत.

वास्तविक पाहता न वटता परत आलेल्या धनादेशाची रक्कम संबंधित ग्राहकाकडुन दंडनिय रक्कमेसह तातडीने वसूल करणे आवश्यक होते. परंतु अदयाप सदर रक्कमेची वसूली झाल्याचे दिसून येत नाही. तरी सदर रक्कम रुपये ४,१३,८३४/– (रुपये चार लाख तेरा हजार आठशे चौतीस फक्त) संबंधित ग्राहकाकडुन वसूल करुन महापालिका कोषागारात जमा करणेबाबत संबंधित लिपिकांना सक्त सूचना द्याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरिक्षण विभागास त्वरीत देणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा. क्र. उमपा/लेपवि/पां.पु. विभाग/असज्ञा/१८१/०५, दिनांक २२/१२/२००५ अन्वये कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग व उप–अभियंता पाणी पुरवठा विभाग (देयक), उल्हासनगर–५ यांना कळविण्यांत आले आहे. तथापि त्यांच्याकडुन अद्याप कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १०४ <u>दिनांक:– १५/२/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :– श्रीम. लक्ष्मीबाई ससाणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे माहे डिसेंबर २००५ पर्यंतचा महापालिका लेख्यांची छाननी व मुख्य लेखा परीक्षकांचा विधी अग्राहय प्रकरणी अहवालाचा विचार करुन उपरोक्त कर्मचा–यां विरुध्द् कारवाईच्या दृष्टीने खालील आदेश देत आहे.

१) प्रशासनाने उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे.
२) पाणी पुरवठा विभागातील वसुली लिपिकांनी पाणी बिलापोटी धनादेशाद्वारे वसुल केलेल्या रक्कमेचा धनादेश बॅकेत जमा केल्यानंतर न वटता परत आलेल्या प्रकरणी वसुलीबाबत ठोस कारवाई न केल्यास कसुरदार अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुध्द् विभागीय चौकशी बसविण्यात यावी.
३) श्री.डी.आर.जाधव, लिपिक यांच्याकडुन व्याजाची रक्कम प्रशासनाने ७ दिवसात वसुल करावी व महापालिका कोषागरात जमा करावी.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र:</u> ८८ <u>दिनांक:–२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. नथु सोनवणे

ही महासभा मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेला माहे डिसेंबर २००५ पर्यंतचा जमा खर्च व त्यात विधी अग्राहय प्रकरणी अहवाला आधारे स्थायी समिती ठराव क्र. १०४, दिनांक १५/०२/२००६ अन्वये दिलेले आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५:–** जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणेकामी महिला व बालकल्याण समितीचे ठराव क्र. ४, दिनांक ७/३/२००६ कायम करणे.

---

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>महिला व बालकल्याण समितीचा हा जो विषय आहे ज्याप्रकारे हा कार्यक्रम घेण्यात आला, विरोधी पक्ष नेत्यास बोलावले नाही. ना या कार्यक्रमाबाबत पुरेशी जाहिरात केली. हा एका पक्षाचा कार्यक्रम आहे असे होता कामा नये.

<u>मा. महापौर :–</u> आपण जे म्हणत आहात ते बिल्कुल चुकीचे बोलत आहात. आरोप लावत आहात. आपण हे बोलु शकता का की त्यांना बोलावले गेले नाही?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>कार्यक्रम पत्रिकेवर त्यांचे नाव होते का? हा शिष्टाचार नाही काय?

<u>मा. महापौर :–</u> ते सभेस आले नाहीत. आम्हांला कोणत्याही प्रकारचे सहकार्य दिले नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>महानगरपालिकेचा हा शिष्टाचार नाही आहे काय?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौर महोदया, या अगोदर महानगरपालिकेचे जेवढे काही कार्यक्रम होत होते मग तो २६ जानेवारीचा असो किंवा महानगरपालिकेच्या वतीने आयोजित केलेला कोणताही कार्यक्रम असो एखादया समितीने आयोजित केलेला एखादा कार्यक्रम असो. त्यामध्ये आयुक्त, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, व गटनेते यांचा समावेश असतो. त्यांची नावे असतात परंतु यावेळेस फक्त मा. महापौर व महिला बालकल्याण समितीच्या सभापतींचे नाव होते.

<u>मा. महापौर :–</u> महिलांचा तो विशेष कार्यक्रम होता म्हणुन.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>महिला व बालकल्याण समितीच्या वतीने सर्व महिलांना निमंत्रीत केले असते. तर आणखी चांगल्याप्रकारे हा कार्यक्रम आयोजित करता येवु शकला असता. आमच्या महिला नगरसेविकांचे तेच म्हणणे होते की आम्हांला बोलावले नाही. औपचारीकता म्हणुन आम्हांला निमंत्रण पत्रिका दिली होती. परंतु त्यात आमचा सहभाग घेतला नव्हता.

<u>मा. महापौर :–</u> हा कार्यक्रम करायचा किंवा नाही यासाठी एक विशेष सभा बोलावण्यात आली होती. परंतु कुणी आले नव्हते.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने:–</u> नाही, नाही आम्हांला बोलावले नव्हते.

<u>मा. महापौर :–</u>नाही, नाही आपण चुकीचे बोलत आहात. श्रीमती मिना सोंडे या स्वत: आपणांशी दुरध्वनीवरुन बोलल्या होत्या.

मा. सदस्या श्रीमती मिना सोंडे:—सर्व राजकिय पक्षाच्या महिला सदस्यांना मी दुरध्वनी केले होते.

यावेळी काही महिला सदस्या एकत्रित बोलत होत्या. त्यांच्या आवाजात नेमके कोण काय बोलत आहेत ते नेमके समजुन येत नव्हते.

मा. सचिव :—पास?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौर महोदया, या विषयाबाबत आम्ही विरोध करु इच्छित नाही. परंतु त्याचबरोबर हेही सांगु इच्छितो की, जर योग्य प्रकारे कार्यक्रम करायचा असेल तर सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या सर्व सदस्यांना बोलावुन कार्यक्रम केला पाहिजे.

मा. महापौर :—आम्ही असेच करु इच्छितो आपण बैठकीस या तर खरे. आपण एका सुध्दा बैठकीस येत नाहीत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— असे बोलु नका. प्रथम आपण शिष्टाचार शिका. असे बोलणे आपणांस शोभत नाही. आपण स्वत: शिष्टाचार शिका. आपण विरोधी पक्ष नेतास म्हणतात शिका? सर्वात प्रथम शिष्टाचार पाहण्यास आपण शिका.

मा. उपमहापौर :—श्री. पंजाबी साहेब, विरोधी पक्ष नेत्याबाबत बोलले गेले नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:— महापौरांशी कसे बोलले जाते ते आपण शिका. बोलण्याची ही पध्दत नाही. अशा प्रकारे आपण महापौरांचा अपमान करु नका.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— विरोधी पक्ष नेत्यांशी असे बोलतात?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—त्यांचे म्हणणे असे आहे की महानगरपालिका जी निमंत्रण पत्रिका छापते त्यामध्ये त्यांचे नाव आले पाहिजे. हे त्यांचे म्हणणे बरोबर आहे. प्रशासन निमंत्रण पत्रिका छापते त्यामध्ये त्यांचे नाव आले पाहिजे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— विरोधी पक्ष नेत्यांना आपण असे बोलत आहात?

मा. उप—महापौर :— नाही, श्री. पंजाबी साहेब त्या असे बोलल्या नाहीत.

मा. सचिव :— पास? सर्व संमतीने?

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र.** ५:— जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणेकामी महिला व बालकल्याण समितीचे ठराव क्र. ४, दिनांक ७/३/२००६ कायम करणे.

प्रस्तावना

जागतिक महिला दिन ८ मार्च, २००६ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमांतर्गत खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

- प्रत्येक प्रभाग समिती कार्यालयात रांगोळी स्पर्धा

* भव्य रॅली १. उमपा मुख्यालय ते गोल मैदान, पायी
  २. गौलमैदान ते कॅम्प क्र. ५ वाहनासह
* प्रत्येक नागरी आरोग्य केंद्रात खततपासणी व लोहयुक्त गोळया वाटप
* टाऊन हॉल येथे जाहिर कार्यक्रम
  डॉक्टर/वकिल/सामाजिक कार्यकर्ता यांची भाषणे
  कल्चरल प्रोग्राम
  आरोग्य प्रदर्शन

तरी वरील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

| अ.क्र. | तपशिल | आवश्यक परिणाम | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| १. | बॅनर्स डिजीटल | ३० नग, ४ मीटर X ५ मिटर | १५००० रुपये |
| २. | निमंत्रण पत्रिका छपाई कवरसह | २० mm X १५ mm या आकारात एका कलरमध्ये ५०० नग बोथसाईड प्रिंटींगसह | ४५०० रुपये |
| ३. | चहा, नास्ता, पाणी | १५० नास्ता पॉकेट | ४००० रुपये |
| ४. | होर्डींग्ज लावणेसह | १० नग, ५ फुट X१० फुट | २०००० रुपये |
| ५. | बॅनर्स डिजीटल घोषवाक्य | १० नग, ४ मीटर X ५ मीटर | ५००० रुपये |
| | | एकुण—— | ४८, ५००/— |

तरी सदर वरीलप्रमाणे साहित्य खरेदीकरीता एकुण रुपये ४८,५००/— (रुपये अठ्ठेचाळीस हजार पाचशे मात्र) एवढा खर्च येणार असून सदरचा खर्च सन २००५—०६ मध्ये C—४ (iii) महिला व बालकल्याण खर्च या लेखाशिर्षातून प्रस्तावित आहे.

महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. ४ दिनांक :— ७/३/२००६

सुचकाचे नाव:— श्रीमती कमला शर्मा

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती भारती छाब्रिया

ही महिला व बालकल्याण समिती वरील प्रस्तावनेनुसार दिनांक ८ मार्च, २००६ रोजी महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजनार्थ अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही /—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
महिला व बालकल्याण समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र: ८९ दिनांक:—२०/३/२००६

सुचकाचे नाव :— श्रीमती निता अहुजा

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती दिपा पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करणे व अंतर्भुत खर्चास मान्यता देणेकामी महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र. ४, दिनांक ७/३/२००६ कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

-----------------------------------------------------------

⇨ **विषय क्र. ६:–** श्री श्रावण मुकुंद पवार, माळी यांचा स्वेच्छानिवृत्तीचा प्रस्ताव मंजुर करणे.

-----------------------------------------------------------

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>मा. सचिव :–</u> सर्व संमतीने?

<u>मा. महापौर :–</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ६:–** श्री श्रावण मुकुंद पवार, माळी यांचा स्वेच्छानिवृत्तीचा प्रस्ताव मंजुर करणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. श्रावण मुकुंद पवार, माळी सध्या कार्यरत सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका मध्ये दिनांक १/६/१९८२ पासुन कार्यरत असून त्यांची सेवा २२ वर्षे ०४ महिना २२ दिवस झालेली आहे. त्यांनी दिनांक २८/११/२००५ च्या अर्जान्वये तीन महिन्याची स्वेच्छा सेवा निवृत्ती नोटिस दिली आहे. त्यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ च्या कलम ६५ (१) मधील तरतुदीनुसार नियुक्ती प्राधिकारी सदर स्वेच्छा निवृत्ती मंजुर करण्यास सक्षम असल्याने श्री. श्रावण मुकुंद पवार, माळी यांना दिनांक २५/०२/२००६ पासुन महापालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्ती मंजुर करण्याचा प्रस्ताव महासभेपूढे मंजुरीसाठी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९० <u>दिनांक:–२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री श्रावण मुकुंद पवार, माळी यांचा स्वेच्छानिवृत्तीचा प्रस्ताव मंजुर करीत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ७:— श्री. नितेश प्रकाश रंगारी यांच्या प्रकरणात कर निरीक्षक या पदासाठी तीन वर्षाच्या अनुभवाची अट शिथील करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>हा विषय रिजेक्ट केला जावा.

<u>मा. सचिव :—</u> परंतु त्याची कारणे दयावी लागतील. ती सांगा. कारणे ठरावात लिहावी लागतील.

१. व्यक्तीसापेक्ष अट शिथील करणे योग्य होणार नाही.
२. शासन परिपत्रक क्र. ..., दिनांक ५ मार्च, १९५५ हे गुणवत्तेच्या दृष्टीकोनातुन निवडीचा दर्जा शिथील करण्याबाबतचा आहे अर्हतेबाबत नाही.
३. प्रस्तृत प्रकरणी श्री. नितेश रंगारी हे महापालिकेच्या सेवाशर्ती नियमातील अर्हता अट क्र. २ धारण करीत नसल्याने ते नियुक्तीस पात्र नाहीत.
४. श्री. नितेश रंगारी यांच्या ऐवजी पुरेश्या प्रमाणात योग्य, अर्हताधारक मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध होवु शकतात.

ठिक आहे?

<u>काही सदस्य :—</u>पास,पास...

<u>मा. महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र.** ७:— श्री. नितेश प्रकाश रंगारी यांच्या प्रकरणात कर निरीक्षक या पदासाठी तीन वर्षाच्या अनुभवाची अट शिथील करणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्र.बी.सी.सी—२००२/१३०६/१६—ब, दिनांक २६ मार्च, २००३ अन्वये सरळसेवा व पदोन्नतीमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढणेसंबंधी दिलेल्या आदेशानुसार उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील शिल्लक अनुशेषानुसार जिल्हा सेवायोजन कार्यालय, विविध रोजगार व मार्गदर्शन माहिती व संचालनालय, मुंबई व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर या कार्यालयाकडुन रिक्त अनुशेषानुसार मागणी करून प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती माहे जून २००३ मध्ये घेण्यात आल्या होत्या. सदर मुलाखतीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. त्यामध्ये महापालिकेचे ०४ व शासनाकडील वरील ०३ कार्यालयांचे अधिकारी सदस्य म्हणुन होते. महापालिकेने गठीत केलेल्या समितीमार्फत उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. महापालिकेच्या सरळसेवा अनुशेषांतर्गत कर निरीक्षक या संवर्गातील अनु.जाती याप्रवर्गाचे ०१ पद भरावयाचे होते. सदर पदासाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीमध्ये गुणवत्तेनुसार श्री. नितेश प्रकाश रंगारी यांची निवड करण्यात आली होती. सदर उमेदवारांच्या निवडीस महासभा ठराव क्र. ५९ दिनांक २०/६/२००३ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार श्री. नितेश रंगारी यांना कार्यालयीन क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुलि/८१, दिनांक ३० जुलै, २००३ च्या आदेशान्वये कर निरीक्षक या पदावर कार्यालयीन आदेशातील १० अटी व शर्तीच्या अधीन राहुन नियुक्ती देण्यात आली होती.

उल्हासनगर महानगरपालिकेने स्वतंत्र सेवाशर्ती नियमावली तयार केली असुन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आली आहे. त्यामध्ये कर निरीक्षक या पदासाठी सरळसेवेने भरावयासाठी शैक्षणिक अर्हता पुढीलप्रमाणे दिलेली आहे. — १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी (स्था. स्वराज्य संस्थेची पदविकाधारकास प्राधान्य ) २) स्था. स्वराज्य संस्थेतील कर/जकात विभागातील ३ वर्षाचा अनुभव.

श्री. नितेश रंगारी यांना कर निरीक्षक या पदावर नियुक्ती दिलेल्या दिनांक ३० जुलै, २००३ च्या आदेशातील अट क्र. १ मधील पुर्तता करणेसाठी त्यांची मुळ कागदपत्रे तपासली असता महापालिकेच्या सेवाशर्ती नियमावलीतील कर निरीक्षक संवर्गाचे सरळसेवेने भरावयाच्या पदासाठी दिलेल्या अर्हतेतील अट क्र. २ वरील “

स्था. स्वराज्य संस्थेतील कर/जकात विभागातील ३ वर्षाचा अनुभव '' हि अर्हता श्री. नितेश रंगारी धारण करीत नसल्याने त्यांची नियुक्ती कार्यालयीन क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुलि/१२०, दिनांक १८ ऑगस्ट, २००३ च्या आदेशान्वये रदद् करून याबाबत रंगारी यांनी मा. उच्च न्यायालयात क्र. ५८५५/२००३ अन्वये दाखल केलेल्या याचिकेची माहिती देण्याचा प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर केला असता मा. महासभेने ठराव क्र. ७३ दिनांक १९/९/२००३ अन्वये श्री. रंगारी यांची नियुक्ती रदद् करण्याचा ठराव पारित केलेला आहे.

मा. उच्च न्यायालयाने सदर रिट याचिका क्र. ५८५५/२००३ दिनांक १३/४/२००४ रोजी निकाली काढले असुन त्यामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेने श्री. नितेश रंगारी यांची नियुक्ती रदद् केल्याची कार्यवाही योग्य असुन त्यामध्ये काही त्रुटी असल्याचे आढळुन येत नाही असा निर्णय दिला आहे. सदर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरूध्द श्री. रंगारी यांनी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सीएलपी (सी) १८५०१/२००४ अन्वये आव्हान केले होते. मा. सर्वोच्च न्यायालयाने श्री. रंगारी हे मागासवर्गीय उमेदवार असल्याने त्यांच्या नियुक्तीबाबत महापालिकेच्या सेवाशर्ती नियमावलीतील अटी शिथिल करण्याचे अधिकार महापालिकेस असल्याने अट शिथील करणेबाबतच्या निर्णयाची माहिती सहा आठवडयाच्या आत पुरविणेस कळविले आहे.

शासनाचे परिपत्रक क्र. रावसेविभाग क्र. बी.एस.सी. १०५५, दिनांक ५ मार्च १९५५ च्या परिपत्रकामध्ये उमेदवाराची किमान अर्हता शिथील करणेबाबत – उमेदवाराची निवड करतानाच्यासंदर्भात गुणवत्तेच्या सर्वसाधारण दर्जाची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यानंतर पुरेशा प्रमाणात मागासवर्गीयातील उमेदवार उपलब्ध होत नाही असे आढळुन आले तर त्या वर्गातील उमेदवारांच्या बाबतीत गुणवत्तेच्यादृष्टीने निवडीचा दर्जा शिथील करण्यात यावा आणि जे उमेदवार सर्वसाधारणपणे योग्य वाटतील आणि जे नेमणुक करण्याच्यादृष्टीने आवश्यक असलेल्या गुणवत्तेच्या किमान दर्जाचे असतील त्यांची निवड करण्यात यावी असे निर्देश दिले आहेत. सदर शासन परिपत्रक हे उमेदवाराच्या गुणवत्तेबाबत आहे अर्हतेबाबत नाही. प्रस्तुत प्रकरणी श्री. रंगारी हे महापालिकेच्या सेवाशर्ती नियमावलीतील अर्हता अट क्र. २ धारण करीत नसल्याने त्यांची नियुक्ती रदद् करण्यात आली आहे.

सबब, मा. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचे आदेश रद्द करून (Set aside) उपरोक्त दिनांक ५ मार्च १९५५ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार सेवाशर्ती नियमावलीतील अट शिथील करण्याबाबत विचार करावा असे आदेश दिले आहेत. ही बाब विचारात घेवून या प्रकरणी कर निरिक्षक पदाचे सेवा भरती नियमातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील ०३ वर्षाच्या अनुभवाची अट शिथिल करण्याचा प्रस्ताव मुं. प्रां. म. अधिनियम १९४९ चे कलम ४५४ अन्वये मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९१ <u>दिनांक:–२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. नितेश प्रकाश रंगारी यांच्या प्रकरणात कर निरीक्षक या पदासाठी तीन वर्षाच्या अनुभवाची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८:–** श्री ना.उ. रौराळे यांच्या महापालिकेच्या सेवेत अतिरिक्त अयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

---

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** या विषयावर एक मिनिट बोलण्यासाठी आम्हांला संधी दया. हे जे विषय आहेत विषय क्र. ८,९ व १० हे एकसारखे आहेत त्याबाबतीत आम्हांला एकत्रितपणे बोलायचे आहे. आता जे अधिकारी प्रतिनियुक्तीवर आले आहेत, आजच्या दिवशी मी त्यांच्यावर थेट आरोप लावु इच्छित नाही. मी माझ्या मनातील शब्द येथे मांडु इच्छितो. त्यांचे जे वर्तन आहे वर्तनाबाबतीत येथे बोलले नाही पाहिजे. परंतु त्यांनी इशा–यामध्ये समजले सुध्दा पाहिजे. व कुठल्याही एका पक्षाच्या मग तो सरकारी पक्ष असो किंवा विरोधी पक्ष असो त्यांच्या इशा–यावर चालता कामा नये. व त्यांनी तटस्थपणे आपले काम केले पाहिजे. काही दिवसांपुर्वी आम्ही पाहिले आहे की, हे जे अधिकारी आहेत त्यांच्याबाबतीत वर्तमानपत्रामध्ये ज्या बातम्या छापुन येतात त्या बातम्यांच्या बाबतीत तर मी बोलु इच्छित नाही. परंतु त्यांचे जे वर्तन असले पाहिजे ते चांगले असले पाहिजे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. व मागे आम्ही म्हंटलेही होते की काही अधिकारी आहेत ते राजकारण करतात आणि ते एखादया राजकिय पक्षाचे स्वीय सहाय्यक आहेत अशा प्रकारचा त्यांचा व्यवहार असता कामा नये. एवढेच मी बोलु इच्छितो.

**मा. सचिव :–**पास?

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**मा. महापौरजी, अधिका–यांच्या प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याचा हा जो विषय येथे आला आहे त्याबाबत मी बोलु इच्छितो की, या अगोदर सेंच्युरी गेस्ट हाउस मधील प्रकरण गाजले होते. त्याप्रकरणाची चौकशी करण्याचे आयुक्तांनी निर्देश दिले होते. परंतु ती चौकशी अदयाप मागे पडली आहे. तो अधिकारी एका महिलेला घेवुन रात्रभर त्या गेस्ट हाउसवर राहिला. त्याबाबत कुणीही काहीही चौकशी केली नाही. तसेच उल्हास विकास या वृत्तत्रात एक वृत्त प्रसिध्द झाले आहे. त्यामध्ये या तीन अधिका–यांपैकी कोणी एखादा अधिकारी असेल तर आपण काय करणार आहोत? हे पहा ते वृत्तपत्र त्याबाबतमीचा मथळा आहे ''मनपा अधिकारी शराब व शबाब के पार्टीमें डुबे''

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–** एक मिनिट, एक मिनिट, कुणीही बोलत असतांना मी मध्येच बोलत नाही. येथे आमच्या माता–भगिनी बसल्या आहेत. येथे ब–याचशा महिला बसल्या असल्याने काही शब्द मी उच्चारणार नाही. असे अधिकारी येथे असतांना आम्हांला बाहेर फलक लावावे लागतील की कृपा करुन आपल्या आई, बहिण, मुलगी यांना महापालिकेत पाठवु नका. शराब, शबाबमध्ये बुडलेले ते अधिकारी कोण आहेत?

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–**शहरामध्ये चर्चा चालु आहे की, परवा जांभुळ येथे काय झाले?

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–** त्या वर्तमानपत्रात ही बातमी देणा–या त्या पत्रकारास विचारले पाहिजे की ते अधिकारी कोण आहेत?

**मा. महापौर :–** कृपया आपण बसुन घ्या मी सांगते. पहिली गोष्ट तर वर्तमानपत्रामध्ये जे काही छापुन येते ते सत्य नसते. हे एकदाच नाही तर हजार वेळा आम्ही बोललो आहोत. व सभागृहात वर्तमानपत्रातील बातमीचा मुद्‌दा चर्चेस घेतला जावु शकत नाही. हा सुध्दा एक नियम आहे. जांभुळ येथे आम्ही बैठक बोलावली होती. तेथे सत्ताधारी पक्षाचे सर्व सदस्य होते आपण केवळ अधिका–यांवरच नाही तर आम्हांवर सुध्दा आरोप लावत आहात. महापौरांना काही अधिकार नाहीत का? बैठक बोलवण्याचे? पाणी पुरवठयासंदर्भात आम्ही तेथे बैठक बोलावली होती. आमची ती अनौपचारीक बैठक होती. पालेगाव येथे आम्ही आमची पुर्ण टिम घेवुन गेलो होतो. त्यानंतर जांभुळ येथे गेलो होतो. आपला जो आरोप आहे तो थेट सत्ताधारी पक्षाच्या महिलांवर आहे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–**मा. महापौरजी, हे आपण आपणावर का ओढवुन घेत आहात?

मा. महापौर :— तर मग आपण शराब व शबाब असे का म्हणत आहात?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आम्ही अधिका—यांबाबत बोलत आहोत.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—इतिवृत्त लिहिणा—यांना विचारा मी नगरसेवकांचे नाव घेतले आहे काय? त्याच बरोबर सभेच्या कामकाजाचे रेकॉर्डींगही होत आहे त्यात पहा मी नगरसेवकांचे नाव घेतले आहे का? आपण आपल्यावर ओढुन घेवुन नका.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— महाराजजी आम्ही सर्व लोक एकत्र होतो.

मा. महापौर :—पाणी पुरवठयाबाबत आम्ही तेथे बैठक बोलावली होती. व अधिकारी आमच्या बरोबर होते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— हे आपण आपणावर ओढुन घेवु नका कारण काय की मी सेंच्युरी गेस्ट हाऊसचे प्रकरण सिध्द केले आहे.

मा. महापौर :—आभारी आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सेंच्युरी गेस्ट हाउसचे प्रकरण मी सिध्द केले आहे.

मा. महापौर :— ते प्रकरण वेगळे होते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— सेंच्युरी गेस्ट हाउसच्या प्रकरणाबाबतीत आम्ही काहीच बोलत नाही. जांभुळ गेस्ट हाउसमध्ये आम्ही सर्वजण एकत्र होतो. सर्व नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होत्या.

मा. महापौर :—कृपया बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आता श्री. लाल पंजाबी यांनी जसे म्हटले की, हे तिन्ही विषय एकत्र घेतले जावेत. मा. महापौरांनी जो खुलासा केला त्याच्याशी मी सहमत आहे. जांभुळ येथे अनौपचारीक बैठक होती तेथे महिला, पुरुष, नगरसेवक व त्याचबरोबर अधिकारीही उपस्थित होते. ती बैठक पाणी पुरवठयाच्या समस्येबाबतची होती. या तीन विषयांबाबत श्री. पंजाबी साहेबांनी जे म्हटले त्याबाबतीत मी मा. महापौरांना विनंती करेन की ते तिन्ही विषय मंजुर केले जावेत, एक—एक वर्षासाठी, तिन्ही अधिका—यांचे लागोपाठ विषय आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— महापौर महोदया, ज्या वर्तमानपत्राचा श्री. भुल्लर महाराज यांनी उल्लेख केला आहे कुण्या अधिकारी किंवा पदाधिका—याबाबत असे वृत्त येत असेल आणि ते जर चुकीचे असेल तर त्या वर्तमानपत्रावर केस दाखल केली पाहिजे आणि ते वृत्त जर बरोबर असेल तर त्याचा खुलासा झाला पाहिजे. त्या बातमीमध्ये असा उल्लेख आला आहे की रात्री उशिरा पर्यंत, दिड वाजेपर्यंत..........

मा. महापौर :— कुण्या वर्तमानपत्रातील बातमीचा आपण सभागृहात संदर्भ देवु शकत नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— शहरामध्ये चर्चा चालु आहे की तेथे महापालिकेचे अधिकारी गेले होते. महानगरपालिकेचे नाव खराब होत आहे.

मा. महापौर :— आमची तेथे बैठक होती.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— आपण त्याचा खुलासा करा.

मा. उप—महापौर :— खुलासा तर करु दया.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** त्या वर्तमानपत्राच्या संपादकावर केस करा. शहरात लोक आम्हांला विचारतात महापालिकेत काय चालु आहे?

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**महापालिकेचे आम्ही लोकप्रतिनिधी आहोत.

**मा. महापौर :—**होवु शकते. कुणी जाणीवपुर्वक लिहिले असेल.

**मा. उपमहापौर :—**कुणी जाणीवपुर्वक लिहिले असेल.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** महापौरांनी स्पष्टीकरण दिले आहे की, आम्ही सर्वजण बरोबर होतो.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—** याबाबतीत आमची एक सुचना सुध्दा आहे. ती बैठक महानगरपालिकेत का होवु शकत नव्हती? ती आपण बाहेर का घेतलीत?

**मा. महापौर :—**कारण की पाणी पुरवठयाबाबतची बैठक होती. आम्ही पालेगाव येथे गेलो होतो.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—** अधिका—यांची बैठक महापालिकेत सुध्दा होवु शकत होती.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** परंतु ती महापालिकेच्या खर्चातुन केलेली नव्हती. आम्ही ती कुठेही करु शकतो ना?

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** याबाबतीत मी बोलु इच्छितो की, श्री. रौराळे साहेब लिहुन देतात त्यांना माहिती नाही, आमच्या श्रीमती जयश्री सुर्वे या उपोषणाला बसल्या होत्या. आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणुन श्री. रौराळे साहेब तेथे आले होते. आता त्यांच्या प्रतिनियुक्तीचा विषय मान्यतेस येथे आला आहे. लोकांना आश्वासन दिल्यानंतर त्याची पुर्तता करणे हे अतिरिक्त आयुक्त, आयुक्त यांचे कर्तव्य आहे. तेही लिहुन दिल्यानंतर, त्यांनी काय लिहुन दिले त्यांना आज माहित नाही. त्यांनी जे आश्वासन दिले होते त्यानुसार अदयापपर्यंत काही काम सुरु झालेले नाही. तेथिल ड्रेनेजचे काम अदयापही सुरु झालेले नाही. शिवाजी नगर, गजानन नगर, ज्योती कॉलनी येथिल काम अदयाप सुरु झालेले नाही. ज्योती कॉलनी येथिल लोक पुन्हा आमरण उपोषणास बसत आहेत. अतिरिक्त आयुक्तांच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीचा प्रस्ताव आज महासभेपुढे मान्यतेसाठी आला आहे तो आम्ही नामंजुर करत नाहीत. पहिले आम्ही नामंजुर केला होता. परंतु या प्रस्तावास जर श्री. किशोर वनवारी व श्री. विनोद ठाकुर हे मंजुरी देत असतील असे काय झाले? कारण की १९.१२. २००५ रोजीच्या सभेमध्ये या दोघांनी प्रस्ताव आणला होता. प्रस्तावीत ठराव नं. ६६, तो जर वाचलात तर असे दिसुन येईल की, उल्हासनगर महानगरपालिकेचा खर्च वाचविण्यासाठी या पदाची आवश्यकता नाही तर मग ते पद आपण निर्माण का करायचे? म्हणुन ते पद रद्द करण्यासाठी त्यांनी प्रस्ताव आणला होता. ४ वर्षापुर्वी २००२ मध्ये अतिरिक्त आयुक्तांचे पद निर्माण करु नका असे म्हटले होते. एका उपायुक्तास अतिरिक्त आयुक्त म्हणुन येथे आणण्यात आले. त्यानंतर त्यास आयुक्त बनविले. त्यावेळेस आम्हां राजकीय लोकांचा हेतु काय होता? त्याच वेळेस विरोधी पक्ष म्हणुन आम्ही हा मुद्दा आपल्या लक्षात आणुन दिला होता. तेव्हा आपण तो नजरेआड केला होता. परंतु ही गोष्ट चुकीची आहे. १९.१२.२००५ रोजीच्या ठरावाच्या माध्यमातुन ही बाब सभागृहापुढे आणली होती. श्री. लाल पंजाबी यांनी जो राग व्यक्त केला तो यासाठीच होता. अधिका—यांचे जे वर्तन आहे ते येथे आल्यानंतर त्यांनी राजकारणामध्ये भाग घेता कामा नये. त्यांनी नि:पक्षपातीपणे काम केले पाहिजे. परंतु ते तर तसे करत नाहीत. कारण की त्या उद्देशानेच त्यांना येथे आणलेले असते असा आपणांवर आमचा स्पष्ट आरोप आहे. कोणी अधिकारी मिळाला नाही तर अतिरिक्त आयुक्तांचे पद रद्द करायचे आणि जर कुणी मिळाला तर दिलेला तो प्रस्ताव रद्द करुन मागे घेतला. आता श्री. रौराळे साहेब आले आहेत. एके दिवशी मला एक अडचण होती त्यावेळेस मी त्यांना बोलावले होते. त्यांना विचारले श्री. रौराळे साहेब आपण याल का? ते माझ्याकडे येण्यास घाबरतात. मी त्यांना आठवण करुन दिली की, मी विरोधी पक्ष नेता आहे मी नगरसेवक किंवा एखादया राजकिय पक्षाचा नेता म्हणुन आपणांस बोलावत नाही. उल्हासनगर शहरातील एक शिष्टमंडळ येथे आलेले आहे व त्यांच्या प्रश्नांवर चर्चा करायची आहे, त्यावेळी त्यांनी म्हटले की, साहेब मला बोलावु नका. मी निघत आहे. हनुमान नगर येथिल अडचण होती. तेथिल शिष्टमंडळ आले होते. आयुक्त साहेब यांबाबतीत तुमच्याबरोबर सुध्दा चर्चा झालेली आहे. तुमच्या अधिका—यांना स्पष्ट सुचना दया. कुण्या पार्टीची बांधीलकी म्हणुन किंवा कुणाला वाकुन किंवा दबुन तुम्ही काम करु नका. काम करायचे असेल तर

नि:पक्षपातीपणे, कुणाच्या दबाबवाखाली न येता करा. उल्हासनगर महानगरपालिकेत शासनाने पाठविलेले तुम्ही अधिकारी आहात. नागरीकांसाठी काम करण्यास तुम्ही आला आहात. त्यादिवशी त्यांना मी हे सांगितले होते. चुकीचे असेल तर त्यांनी सांगावे की ते चुक होते. महापौर महोदया, एखादे शिष्टमंडळ आल्यानंतर चर्चा करण्यासाठी अधिका—यास जर बोलावले तर, आणि त्यावर अधिका—यांने म्हटले की नाही, नाही. मी आपणाकडे आलो तर लोकांचे गैरसमज होतात. हे योग्य आहे का? हे कोणत्या प्रकारे वागतात? एकतर ते घाबरतात किंवा काम करु इच्छित नाहीत. किंवा एखादया पक्षाचा कार्यकर्ता म्हणुन काम करु इच्छित आहेत. यासाठी श्री. लाल पंजाबी व श्री. भुल्लर महाराज यांनी मुद्दा उपस्थित केला होता. महासभेमध्ये आम्ही फक्त ठराव पारीत करतो तेथुन त्यांची अंमलबजावणी अधिकारी करतात. अधिका—यांचे वर्तन जर बरोबर राहिले नाही तर उल्हासनगर महानगरपालिकेचा कारभार बरोबर चालणार नाही. व दुरवरचे परिणाम उल्हासनगरच्या जनतेस व तुम्हां आम्हांस भोगावे लागतील. यासाठी महापौर महोदया व आयुक्त साहेबांना विनंती आहे की, अधिका—यांना वर्तणुकीविषयी सक्त सुचना दिल्या जाव्यात आणि तरीही जर फरक पडत नसेल तर त्याचा विचार पुढे आहे.

<u>मा. सचिव :—</u>प्रतिनियुक्तीचे तिन्ही विषय पास? एक वर्षासाठी?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. ८:—** श्री ना.उ. रौराळे यांच्या महापालिकेच्या सेवेत अतिरिक्त अयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना :</u>

शासन निर्णय क्र. उमपा—२००५/प्र.क्र. ४/०५/नवि—२१, दिनांक १९/१/२००६ अन्वये श्री. ना.उ. रौराळे यांची ''अतिरिक्त आयुक्त'' या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती केलेली आहे. त्यानुसार श्री. ना.उ. रौराळे यांनी वरील पदाचा पदभार दिनांक २३/१/२००६ पासुन स्विकारलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५ अन्वये श्री. ना.उ. रौराळे यांच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. करिता, सदरहु प्रस्ताव महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९२ <u>दिनांक:—२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्री. मोहन बेहरानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. गौतम भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री.ना.उ. रौराळे यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक २३/१/२००६पासुन एक वर्षासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९:—** श्री दिपक सावंत यांच्या महापालिकेच्या सेवेत उप अयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ९ :—** श्री दिपक सावंत यांच्या महापालिकेच्या सेवेत उप अयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

प्रस्तावना

शासन निर्णय क्र. एमसीओ—१२०६/१०/प्र.क्र. ०५/०६/नवि—१४, दिनांक ६/१/२००६ अन्वये डॉ. दिपक सावंत यांची ''उप—आयुक्त'' या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती केलेली आहे. त्यानुसार डॉ. दिपक सावंत यांनी वरील पदाचा पदभार दिनांक १७/१/२००६ पासुन स्विकारलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५ अन्वये डॉ. दिपक सावंत यांच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. करिता, सदरहु प्रस्ताव महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र: ९३ — दिनांक:—२०/३/२००६

सुचकाचे नाव :— श्री. होशियारसिंग लबाना

अनुमोदकाचे नाव :— श्री. अशोक ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. दिपक सावंत यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत उप आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक १७/०१/२००६ पासुन एक वर्षासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :—** श्री अशोक बागेश्वर यांच्या महापालिकेच्या सेवेत उप अयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. १०:—** श्री अशोक बागेश्वर यांच्या महापालिकेच्या सेवेत उप अयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

प्रस्तावना

शासन निर्णय क्र. एमसीओ—१२०६/०४/प्र.क्र. ०१/०६/नवि—१४, दिनांक ३/२/२००६ अन्वये श्री. अशोक बागेश्वर यांची ''उप—आयुक्त'' या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती केलेली आहे. त्यानुसार श्री. अशोक बागेश्वर यांनी वरील पदाचा पदभार दिनांक ७/२/२००६ पासुन स्विकारलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५ अन्वये श्री. अशोक बागेश्वर यांच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. करिता, सदरहु प्रस्ताव महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्रः ९४ दिनांकः—२०/३/२००६

सुचकाचे नाव :— श्री. ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. लालबिहारी यादव

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अशोक बागेश्वर यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक ७/२/२००६पासुन एक वर्षासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११:—** आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समितीच्या सदस्या श्रीमती दिपा नारायण पंजाबी यांचा राजीनामा मंजुर करणे व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करणे.

---

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— श्रीमती दिपा पंजाबी यांचा राजीनामा स्विकृत करुन त्यांच्या जागी श्री. पृथ्वी वलेचा यांना त्या समितीवर सदस्य म्हणुन घेतले जावे.

मा. सचिव :— सर्व संमतीने?

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ११ :—** आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समितीच्या सदस्या श्रीमती दिपा नारायण पंजाबी यांचा राजीनामा मंजुर करणे व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करणे.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये महापालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून विशेष समित्यांची नेमणुक करता येते. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. ७५, दिनांक ८.२.२००६ अन्वये ८ विशेष समित्यांची नेमणूक केली असून त्यामधील आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समितीच्या ९ सदस्यांमध्ये श्रीमती दिपा नारायण पंजाबी यांची सदस्या म्हणून नेमणूक केली आहे

श्रीमती दिपा नारायण पंजाबी यांनी त्यांचेकडील दिनांक ४/३/२००६ रोजीच्या पत्रान्वये आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती सदस्या पदाचा राजीनामा सादर केला आहे.

तरी श्रीमती दिपा नारायण पंजाबी यांचा राजीनामा मंजुर करणे कामी व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करण्याकामी महासभेपूढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ९५ दिनांक:—२०/३/२००६

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रामदास उमाप

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समितीच्या सदस्या श्रीमती दिपा नारायण पंजाबी यांचा राजीनामा मंजुर करीत आहे व त्यांच्या जागी श्री. पृथ्वी वलेचा यांची नेमणुक करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२:–** माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती सदस्य श्री. राजु जग्यासी यांचा राजीनामा मंजुर करणे व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करणे.

---

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>श्री. राजु जग्यासी यांचा राजीनामा स्विकृत करुन त्यांच्या जागी श्रीमती दिपा नारायण पंजाबी यांना सदस्य म्हणुन त्या समितीवर घेतले जावे.

<u>मा. सचिव :–</u> सर्व संमतीने? पास?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>मा. महापौर :–</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. १२:–** माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती सदस्य श्री. राजु जग्यासी यांचा राजीनामा मंजुर करणे व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करणे.

<u>प्रस्तावना</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये महापालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून विशेष समित्यांची नेमणुक करता येते. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. ७५, दिनांक ८.२.२००६ अन्वये ८ विशेष समित्यांची नेमणूक केली असून त्यामधील माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समितीच्या ९ सदस्यांमध्ये श्री. राजु जग्यासी यांची सदस्य म्हणून नेमणूक केली आहे

श्री. राजु जग्यासी यांनी त्यांचेकडील दिनांक ४/३/२००६ रोजीच्या पत्रान्वये माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती सदस्य पदाचा राजीनामा सादर केला आहे.

तरी श्री. राजु जग्यासी यांचा राजीनामा मंजुर करणे कामी व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करण्याकामी महासभेपूढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९६ <u>दिनांक:–२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. जाधव प्रशांत

अनुमोदकाचे नाव :– श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती सदस्य श्री. राजु जग्यासी यांचा राजीनामा मंजुर करीत आहे व त्यांच्या जागी श्रीमती दिपा नारायण पंजाबी यांची नेमणुक करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

मा. सचिव :– विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३ :– श्री. रामजी महेश्वरी, निलंबीत वरिष्ठ लिपिक यांना सेवेत पुर्नस्थपित करण्यास मान्यता देणे.**

---

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** यांना कामावर घेतले जावे. परंतु आजपर्यंत त्यांची खातेनिहाय चौकशी पुर्ण झालेली नाही ती पुर्ण केली जावी व कामावर घेतले जावे.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** श्री. किशोर वनवारी यांनी म्हटले की खातेनिहाय चौकशी पुर्ण केली पाहिजे. न्यायालयाने त्यांना निर्दोष ठरविले असतांना हे योग्य होईल का? त्यांना निर्दोष करुन जवळ जवळ सात महिने झाले आहेत. सभा सुचनेच्या हिशोबाने २४ ऑगस्ट, २००५ ला..........

**मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. ना.ना. रौराळे):–**मा. महापौर महोदया, मा. आयुक्त, सर्व सन्माननिय सदस्य, श्री. रामजी महेश्वरी यांना न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे त्यामुळे त्यांच्या विरुध्दची खातेनिहाय चौकशी पुर्ण करण्याची आवश्यकता वाटणार नाही. त्यामुळे त्यांना सेवेत पुर्नस्थापनेचा जो प्रस्ताव आहे तो मान्य करणेस विनंती आहे.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, ८ महिने हा विषय सभागृहाच्या पटलावर आणला नाही. ८ महिन्याच्या पगाराचे काय? त्याचे नुकसान झाले असेल? हा विषय एवढया उशिरा ८ महिन्यानंतर सभागृहापुढे आणण्याचे कारण काय? हे जाणीवपुर्वक केले काय?

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** काय आहे? आता आपला प्रस्ताव काय आहे?

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–**चौकशी पूर्ण करण्याची आता आवश्यकता राहिलेली नाही.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** ठिक आहे.

**मा. सचिव :–** त्यांना पुर्ण पगार भरुन दयावा लागेल. पगाराच्या बाबतीत आपले काय म्हणणे आहे?

**मा. उप–महापौर :–** पगार भरुन दयायचा आहे? श्री. लाल पंजाबी साहेब......

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–**कायदयानुसार.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–**कायदयानुसार.

**मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):–**याबाबतीत सर्व नियम तपासुन निर्णय घेण्यात येईल.

**मा. सचिव :–**नाही, आपण स्पष्ट सांगा, तसा ठराव करावा लागेल.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** आयुक्त साहेबांनी सांगावे कायदयानुसार काय केले जावु शकते?

**मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):–**न्यायालयाने त्यांना निर्दोष केल्याने नियमानुसार त्यांना ज्या दिवसापासुन ते सेवेत नाहीत, त्या दिवसापासुनचे संपुर्ण वेतन, भत्ते देय राहतील.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप:–** मधल्या आठ महिन्याच्या फरकासाठी काही तरतुद आहे का? कायदयात काही तरतुद आहे का? न्यायालयाचे निर्देश असतांना सुध्दा सभागृहापुढे हा विषय आठ महिने उशिरा का आणला?

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—नियमानुसार त्यांना थकबाकीची रक्कम सुध्दा देण्यात येईल.

मा. सचिव :—माफ करा, यांचे म्हणणे आहे की, त्यांना कामावर घेण्यासाठी ८ महिन्याचा जो विलंब झाला आहे, केवळ त्याचाच पगार भरुन दिला जाईल. जेवढया कालावधीत ते निलंबित होते त्या कालावधीच्या पगाराचे काय? त्याबाबतीत स्पष्टीकरण आले पाहिजे. कारण की कायदा असा आहे की जर आपण त्यांना कामावर घेत आहात तर त्यांच्या पगाराबाबतीत सुध्दा निर्णय घ्यायचा आहे. तर त्यांचे म्हणणे असे आहे की जोपर्यंत ते निलंबित होते त्या कालावधीचा ते पगार देवु इच्छित नाहीत.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—निलंबन कालावधीचा त्यांना पुर्ण पगार मिळाला पाहिजे.

मा. उप—महापौर :—श्री. लाल पंजाबीजी हा विषय आपण पुढे ढकलुया याबाबतीत सर्व माहिती गोळा करुन पुढील महासभेत प्रस्ताव आणु या.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :— त्यांना कामावर घेण्याचा निर्णयापर्यंत आता आपण आलो आहोत. फक्त गोष्ट पगाराची आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— श्री. उमाप साहेब, त्यांना कामावर घेवु या.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— मी एक गोष्ट सांगु इच्छितो की, गोषवा—यामध्ये हे यावयास पाहिजे. मी विशेष करुन आयुक्त साहेबांस सांगु इच्छितो की, जेव्हा अशा प्रकारचा विषय महासभेत येतो तेव्हा त्याबाबतचा गोषवारा स्पष्ट असला पाहिजे. मा. महापौरांनी प्रशासनाला निर्देश दयावेत की जेव्हा अशा बाबतचा विषय महासभेत येतो तेव्हा त्याबाबतचा गोषवारा स्पष्ट असला पाहिजे. प्रशासनाने पुर्ण अभ्यास करुन गोषवारा आणला पाहिजे. या विषयाबाबत प्रशासनाने अभ्यास केलेला दिसत नाही. ते आता आम्हांला सांगतात की ही स्थिती आहे, प्रशासनानेच अभ्यास केला नाही. त्यांना जी काही भरपाई दयायची आहे त्याबाबत काय निर्णय घेतला जावु शकतो? यासाठी याबाबतचा गोषवारा नेहमी स्पष्ट असला पाहिजे.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—मा. न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्त केल्यामुळे त्यांचा जो निलंबन कालावधी होता तो सेवाविषयक बाब गृहित धरुन ज्या दिवसापासुन त्यांना निलंबित केले त्या दिवसापासुनचे वेतन व भत्ते त्यांना देय राहतीलच.

मा. सचिव :—जेवढया कालावधीत ते निलंबीत होते तेवढया कालावधीचा त्यांना पगार दयायचा आहे? पास? सर्व संमतीने?

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे. 

---

☑

**विषय क्र. १३ :— श्री. रामजी महेश्वरी, निलंबीत वरिष्ठ लिपिक यांना सेवेत पुर्नस्थपित करण्यास मान्यता देणे.**

प्रस्तावना

श्री. रामजी महेश्वरी, वरीष्ठ लिपिक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईमध्ये पारितोषण रक्कम रु. १०००/— स्विकारलेचे त्यांचेकडील क्र. एसीबी/ठाणे/पीबीके/१४२/९७ दिनांक १९/७/१९९७ च्या पत्रान्वये कळविलेनुसार कार्यालयाकडील क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे—१/२३९, दिनांक २१/८/१९९७ च्या आदेशान्वये निलंबीत करणेत आले आहे. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने श्री. महेश्वरी यांचेविरुध्द मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकामी त्यांचेकडील क्र. सी.आर. ९४/ठाणे/९७/३४३, दिनांक १२/१/९८ च्या पत्राने कळविले असता सक्षम प्राधिकारी मा. महासभा असल्याने मा. महासभेपुढे प्रस्ताव ठेवला असता महासभा ठराव क्र. २०, दिनांक १६/९/९८ अन्वये श्री. महेश्वरी

यांचेविरुध्द मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकामी मान्यता दिली होती. सदर प्रकरण ४७/९९ मा. न्यायालयात प्रलंबित होते.

मा. विशेष सत्र न्यायालयाने सदर क्र. ४७/९९ प्रकरणी दिनांक २४/८/२००५ रोजी पुढीलप्रमाणे निर्णय दिला आहे. ''श्री. महेश्वरी यांचे विरुध्द दाखल केलेल्या गुन्हामध्ये लाचलुचपत भ्रष्टाचार कायदा १९८८ चे नियम ७ व १३ (१) (ड) तसेच पोटनियम १३ (२) अन्वये ठेवण्यात आलेल्या दोषारोपातुन दोषमुक्त करण्यात येत आहे.

श्री. महेश्वरी, यांना सद्यस्थितीत ७५ टक्के निर्वाह भत्ता मिळत आहे. त्यांना मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार दोषमुक्त करण्यात आले असल्याने सेवेत पुर्नस्थापित करुन महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा, आणि निलंबन, बडतर्फी सेवेतुन काढुन टाकणे त्यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ७१ चे पोटनियम ३ मधील तरतुदीनुसार त्यांचा निलंबन कालावधी हा सेवाकाळ धरुन त्यांच्याविरुध्द कारवाई झाली नसती तर जेवढा पगार व भत्ता मिळण्यास ते पात्र राहिले असते तेवढा पगार व भत्ता मिळण्यास ते पात्र राहिले असते तेवढा पगार व भत्ता त्यांना अनुज्ञेय राहिल.

सबब, श्री. रामजी महेश्वरी, वरीष्ठ लिपिक (निलंबित) यांना सेवेत पुर्नस्थापित करणेचा प्रस्ताव नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा असल्याने मान्यतेसाठी मा. महासभेपुढे सादर करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९७ <u>दिनांक:–२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :– श्री. रामदास उमाप

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे मा. न्यायालयाच्या दोषमुक्तीच्या आदेशामुळे श्री. रामजी महेश्वरी, निलंबित वरीष्ठ लिपिक यांना महापालिका सेवेत पुर्नस्थापित करण्यास मान्यता देत आहे.

*परंतु*

त्यांचा निलंबन कालावधी सेवाकाल धरुन जेवढा पगार व भत्ता मिळण्यास ते पात्र राहिले असते तेवढा पगार व भत्ता त्यांना अनुज्ञेय राहिल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १४:–** श्री. डी.डी.पंजाबी, लिपिक यांना मंजुर केलेल्या दिनांक १/१२/२००५ ते ३०/११/२००६ कालावधीच्या विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजुरी देणे.

---

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मा. महापौरजी, प्रशासनाने हा असा विषय आपणासमोर आणला आहे ज्याबाबत महासभेची मंजुरी पाहिजे परंतु प्रशासनाने त्यांची रजा अगोदरच मंजुर केली आहे. व चार महिन्यानंतर महासभेपुढे प्रस्ताव आणला आहे. आज मार्च महिन्यामध्ये महासभेपुढे प्रस्ताव आणला आहे त्यांची रजा कधीची मंजुर केली आहे? १/१२/२००५ पासुन ते ३०/११/२००६ पर्येंत तर याबाबतीत सर्वात प्रथम प्रशासनाने महासभेची मंजुरी घ्यावयास पाहिजे होती. त्यानंतर त्याची रजा मंजुर करावयास पाहिजे होती.

मा. उप–महापौर :–या अगोदर ब–याचवेळा असे म्हटंले गेले आहे की प्रथम महासभेची मंजुरी घेतली जाईल व नंतर कारवाई केली जाईल परंतु या निर्णयाची अंमलबजावणी होतांना दिसत नाही यास्तव हा प्रस्ताव रिजेक्ट केला जावा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–सचिव साहेब, आम्ही हा प्रस्ताव रिजेक्ट करु परंतु त्यात तांत्रिक अडचण काय आहे? त्यांनी रजा घेतली आहे. यांनी ती दिली सुध्दा आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– त्यांनी रजा घेतली आहे.


मा. सचिव :–हा प्रस्ताव रिजेक्ट केला तर त्यांना पुन्हा कामावर यावे लागेल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– रजा मंजुर केली आहे तर हा प्रस्ताव पारीत केला जावा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– सचिव साहेब, विषय क्र. १४ चे काय?

मा. सचिव :–नकारात्मक ठराव पारीत केला. त्यांची रजा मंजुर केली नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– असे बरेचसे विषय सभागृहात येतात. ज्याबाबत वारंवार असे होते की ते नंतर सभागृहापुढे आणले जातात त्यांना मान्यता देतो. परंतु आज असा विषय आलेला असतांना आपण तो नाकारत आहोत ज्यांची सुट्टी मंजुर झालेली आहे. ती रद्द करुन त्यांना पुन्हा कामावर बोलवत आहोत. हे बरोबर नाही म्हणुन सर्वांशी एकच न्यायाने वागावे किंवा एकच नियम करा की यापुढे कुणाचाही विषय आला तर तो मंजुर केला जाणार नाही.

मा. सदस्या श्रीमती रेखा कारीरा व श्रीमती सुजाता रिजवानी या सभागृहातुन बाहेर गेल्या. 

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–श्री. जमनादास पुरस्वानी म्हणतात म्हणुन हा विषय पारीत केला जावा. यानंतर प्रशासनाने उशिराने प्रस्ताव आणु नये.

मा. सचिव :– ठिक आहे? पास?

काही सदस्य :–पास–पास......

मा. महापौर :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे. 

---

☑

**विषय क्र. १४:–** श्री. डी.डी.पंजाबी, लिपिक यांना मंजुर केलेल्या दिनांक १/१२/२००५ ते ३०/११/२००६ कालावधीच्या विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजुरी देणे.

प्रस्तावना

श्री. डी.डी. पंजाबी, लिपीक, जकात विभाग यांनी दिनांक २६/१०/२००५ च्या अर्जान्वये दिनांक १ डिसेंबर, २००५ ते ३० नोव्हेंबर, २००६ एक वर्षाच्या कालावधीची वाढीव विशेष असाधारण रजा मंजूर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे.

शासनाने वित्त विभागाकडील निर्णय क्र. अरजा २४०२/२५/सेवा–८, दिनांक ७/१०/२००२ व शासन निर्णय क्र. अरजा २४०४/प्र.क्र. ५६/०४/सेवा–८, दिनांक १४ जानेवारी, २००५ नुसार शासकिय सेवेत प्रविष्ट झालेल्या किमान ५ वर्ष इतकी सतत सेवेत असलेल्या स्थायी / अस्थायी कर्मचा–यांना विशेष असाधारण

रजा मंजूर करता येईल. अशी रजा संपूर्ण सेवेच्या कालावधीत ५ वर्षाच्या मर्यादेपर्यंत फक्त एकदाच घेता येईल ही योजना सदर आदेश दिनांक १/१/२००५ पासून ते दिनांक ३१/१२/२००५ पर्यंत अंमलात आहे. मा. शासन निर्णयातील परिच्छेद ९ मध्ये विशेष असाधारण रजा मंजूर करण्यास नियुक्ती प्राधिकारी सक्षम असतील अशी तरतूद आहे. त्यांची यापूर्वी दिनांक १/१२/२००४ ते ३०/११/२००५ पर्यंतची एक वर्षाची विशेष असाधारण रजा महासभा ठराव क्र. ८६, दिनांक ३०/३/२००५ अन्वये मंजूरन करण्यात आलेली आहे.

वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री. डी.डी. पंजाबी, लिपिक, जकात विभाग यांची महापालिकेतील आतापर्यंत सेवा ९ वर्षे ७ महिने इतकी झाली असुन त्यांचा विशेष असाधारण रजेचा अर्ज दिनांक २६/१०/२००५ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला असुन शासनाच्या वरील दि. ७ ऑक्टोंबर २००२ व १४ जानेवारी २००५ मधील शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहुन त्यांची दिनांक १/१२/२००५ ते ३०/११/२००६ पर्यंतच्या १ वर्षाच्या कालावधीची वाढीव विशेष असाधारण रजा दिनांक ६/२/२००६ च्या आदेशान्वये मंजुर केली आहे. सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९८ <u>दिनांक:–२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. डी.डी.पंजाबी, लिपिक यांना प्रशासनाने मंजुर केलेल्या दिनांक १/१२/२००५ ते ३०/११/२००६ कालावधीच्या विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५:–** उपवैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदासाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणे.

---

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u>मा. महापौरजी, हे जे पद आहे ते आरक्षणामध्ये येते का? मला अशी माहिती मिळाली आहे की, हे पद अनुसुचित जातीसाठी राखीव आहे.

<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रैराळे):–</u>आरक्षित पद असले तरी आपण फक्त प्रस्ताव पाठवत आहोत. शासनाकडुन जी आस्थापना सुची मंजुर होवुन आली आहे त्या आस्थापना सुचीमध्ये जी अर्हता दर्शविली आहे, एमबीबीएस, डीपीएच ही जी अर्हता आहे ती शिथील करण्यासाठी पाठवत आहोत. त्यांना आपण कोणतीही पदोन्नती देत नाही. किंवा कुणालाही याचा सध्या फायदा होणार नाही.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :— माझे म्हणणे असे आहे की, ही जी शैक्षणीक अर्हता आपल्याला पाहिजे अशा प्रकारचा उमेदवार कुणी भेटु शकणार नाही का? अट शिथील करावी असे का वाटते? याचे कारण काय?

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—एक पद आरक्षणाचे व एक पद खुल्या संवर्गातील आहे. आपणाकडे जो कर्मचारी कार्यरत आहे त्यांची सेवा जास्त झालेली आहे. तथापी त्यांच्याकडे जी अर्हता पाहिजे ती नसल्यामुळे त्यांना यापुढे पदोन्नतीची संधी मिळणार नाही. तथापी अदयाप आपण त्यांना पदोन्नती देत नाही. सध्या कोणताही लाभ देत नाही. आपण जी आस्थापना सुची शासनाकडे मंजुरीसाठी पाठविली तिच्यामध्ये अर्हतेचा जो विषय आहे त्या अर्हतेत आपण थोडी शिथीलता करत आहोत तेवढाच फक्त विषय आहे.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल:—मा. महापौर,उप—महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब व सन्माननिय सदस्य हा जो विषय आपण आणला आहे तो कुणाला पदोन्नती देण्यासाठी आणलेला आहे आता आपण जे म्हणत आहात की पदोन्नती दयायची नाही. २ वर्षानंतर याच वैद्यकीय अधिका—यास आपणांस पदोन्नती दयायची आहे. ठिक आहे, त्यांनी ५ वर्ष काम केले आहे. त्यांना पदोन्नती दिली पाहिजे. परंतु यानंतर जी काही पदे भरली जातील ती आवश्यकतेप्रमाणे भरली पाहिजेत. नाहीतर अशा प्रकारचा ठराव पुन्हा केला तर काही फायदा नाही. जे तज्ञ डॉक्टर पाहिजे ते मिळणार नाहीत. आपल्या गोषवा—यानुसार असे वाटते की, २ वर्षानंतर यांनाच आपणांस पदोन्नती दयायची आहे.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—शासनाकडुन अदयाप आस्थापनासुचीस मंजुरी मिळालेली नाही.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— बरोबर आहे परंतु तुम्ही जो प्रस्ताव आणला आहे, तो पदोन्नती देण्यासाठीच आणलेला आहे. नाहीतर नाही म्हणुन सांगा तुम्ही?

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—सध्या आम्ही त्यांना काहीच फायदा देत नाही.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— २ वर्षांनी देणार? सध्या नाही.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—परंतु शासनाकडुन मंजुर होवुन येईल हेही सांगता येणार नाही.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— शासनाकडुन मंजुर होवुन येणार नसेल तर पाठविण्याचा प्रश्नच येत नाही. परंतु जर एकाला पदोन्नती देण्यासाठी हा ठराव आणला असेल तर त्याबाबतीत आमची काही हरकत नाही. परंतु यापुढे जर तुम्हांला भरती करायची असेल तर आस्थापना सुचीमध्ये दर्शविलेल्या अर्हतेप्रमाणे त्या उमेदवारांची भरती करावयास पाहिजे. आणि या ठरावातुन असे दिसुन येते की, दोन वर्षानंतर तुम्हांला या व्यक्तीला पदोन्नती दयायची आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :— श्री. रौराळे साहेब, मी एक मिनिट बोलु इच्छितो की, अतिवृष्टीच्या काळात काही कर्मचा—यांनी मौलाची कामगीरी केली आहे, त्यातील काही कर्मचा—यांची स्वच्छता निरिक्षक या पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यासाठी आम्ही काही नावे सुचविली आहेत. त्या विषयास सभागृह नेत्यांनीही मान्यता दिली होती. आपल्या महानगरपालिकेतील स्थानिक कर्मचा—यांना त्यांचे मनोबल वाढविण्याकरीता त्यांना पदोन्नती दिली पाहिजे. त्यामध्ये जी तीन नावे दिली होती त्यामध्ये श्री. दिपक उज्जेनवाल, श्री. वामन सोनवणे आणि आणखी एक नाव आहे याबाबत त्यावेळी सभागृह नेत्यांनी ही निर्णय दिला होत की पुढील महासभेत या कर्मचा—यांचा पदोन्नतीबाबतचा विषय आणला जाईल. तर त्यांच्याबाबतीत काय झाले?

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— श्री. रौराळे साहेब या गोषवा—यातील शेवटचे वाक्य तुम्ही वाचा आणि त्याचे स्पष्टीकरण दया. तरी सदर पदावर पदोन्नतीसाठी शैक्षणीक अर्हतेची अट शिथील करुन अनुभवाच्या अटीत वाढ करण्याकरीता प्रस्ताव महासभेपुढे प्रस्तृत. तुम्हांला पदोन्नतीसाठी शिक्षणाची अट शिथील करावयाची आहे. याचा अर्थच तो होतो की, तुम्हांला दोन वर्षांनी त्यांना पदोन्नती दयायची आहे. नाहीतर हे वाक्य गोषवा—यातुन काढुन टाका.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—शासनाकडुन आस्थापना सुची मंजुर झाल्यानंतर पात्रता आणि सर्व अर्हता तपासुन जे उमेदवार पदोन्नतीसाठी पात्र राहतील त्यांच्या नावाचा विचार करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— श्री. रौराळे साहेब, या अगोदर श्रीमती नंदीनी बामणकर यांनी विचारलेल्या प्रश्नावर उप—वैद्यकीय अधिकारी हे पद कुठेही नाही. वैद्यकीय अधिकारी ही दोन पदे आहेत. उप—वैद्यकीय अधिकारी हे पद कुठेही नाही. ते पद मंजुर आहे असे कुठेही नाही. आहे का? तो तक्ता पहा. एक आहे वैद्यकीय आरोग्य अधिकारी विवरणपत्र अ मध्ये. विवरणपत्र ब मध्ये वैद्यकीय अधिकारी २. उपवैद्यकीय अधिकारी हे पद मंजुर आहे अशी कुठेही नोंद नाही.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—आस्थापना सुची मंजुरीस पाठवितांना उप—वैद्यकीय अधिकारी हे पद मंजुरीस पाठविले आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—अजुन मंजुर झालेले नाही. मग जे पद मंजुर नाही त्या पदासाठी आताच अट शिथील करण्यासाठी प्रस्ताव का आणता? शासनाकडुन आला का प्रस्ताव मंजुर होवुन?

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—आपण जी आस्थापना सुची मंजुरीस पाठविली आहे त्यामध्ये ही अट आपणांस समाविष्ट करायची आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— आस्थापना सुची केव्हा पाठविली आहे? १९९६ ला, ९७ ला?आणि त्यामध्ये आपण २००२ ला सुधारणा करता? त्यामुळे श्री. चंदाराम मोकल हे बोलतात ते बरोबर आहे. तुम्ही कुणा तरी एक व्यक्तीला समोर ठेवुन शिक्षणाची अट शिथील करावी आणि अनुभवाची अट वाढवावी. म्हणजे एक व्यक्तीचा अनुभव वाढतो आहे म्हणुन त्याला सामावुन घेण्यासाठी तुम्ही हा प्रस्ताव आणला आहे. एका बाजुला श्री. रंगारीचा प्रस्ताव अट शिथील करु नये म्हणुन आम्ही रद्द करतो. आणि दुस—या बाजुला हा प्रस्ताव. ही विसंगती दिसते. श्री. रंगारीचा प्रस्ताव होता म्हणुन तो रद्द झाला आणि येथे कुणाला तरी ठेवायचे आहे म्हणुन त्यास मान्यता दयायची म्हणजे श्री. रंगारी यांच्यावर अन्याय झाल्यासारखे होईल. एका वेळेस जो निर्णय झाला की, अट शिथील करायची नाही तर ते एक धोरण असले पाहिजे. कुण्या एकाच्या बाबतीत अलग व कुण्या एकाच्या बाबतीत अलग असे होता कामा नये. दुसरी गोष्ट आमच्याकडे जे २ वैद्यकीय अधिकारी भरलेले आहेत. सरळसेवा नियमानुसार त्यामधील एक पद आरक्षणामध्ये आले पाहिजे. बरोबर? आरक्षणातले पद नाही. दोन्ही खुल्या प्रवर्गासाठी दिलेली आहेत.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—सरळसेवेने अनुसुचीत जातीचा एक. पदोन्नतीने एक पद.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— कुठे आहे? आता आपणाकडे जी २ वैद्यकीय अधिका—यांची पदे आहेत ती दोन्ही पदे भरलेली आहेत रिक्त एक सुध्दा नाही. पहिल्यांदा चुक केली आहे. अनुसुचीत जातीतील एक पद भरावयास पाहिजे होते.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—एक पद मागासवर्गीयांसाठी.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— पण आता जे आहेत ते मागासवर्गीय आहेत काय?

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—आता जे प्रतिनियुक्तीचे पद आहे त्यातील वैद्यकीय अधिका—यांचे पद आहे हे मागासवर्गीयांचे आहे. आणि दुसरी जी दोन पदे आहेत ती खुल्या संवर्गातील आहेत सरळसेवेने आपणांस एक पद भरायचे आहे मागासवर्गीयांचे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— ते आपण आता भरु शकतो का?

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—पदोन्नती समितीची अदयाप बैठक लावायची आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— नाही, नाही वैद्यकीय अधिका—यांची तुमच्याकडे २ पदे आहेत ती तुम्ही भरलेली आहेत?

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—भरलेली आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— अनुसुचीत जातीचा उमेदवार तुम्ही भरु शकता का?

**<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—</u>**एक शासन निर्णय असा आहे की, ज्या मागासवर्गीयांच्या पदावर खुल्या संवर्गातील जे उमेदवार असतील त्यांना सेवेतुन कमी करु नये किंवा त्यांचे पद रद्द करु नये असा एक शासन निर्णय आहे त्यामुळे मागासवर्गीयांचे ते पद जोपर्यंत हे सेवानिवृत्त होत नाहीत तोपर्यंत भरता येणार नाही.

**<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>** मग पदोन्नतीसाठी त्याचा काही विचार करता का? त्याला काढु शकत नाहीत? अनुसुचीत जातीच्या जागेवर दुस—या प्रवर्गातील माणुस भरल्यानंतर त्याला तुम्ही काढु शकत नाहीत. हा शासनाचा आणि न्यायालयाचा आदेश आहे, निर्देश आहे. पण त्याला पदोन्नती देता येईल का?

**<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—</u>**आस्थापना सुचीनुसार त्यांना पदोन्नती आस्थापना सुची मंजुर झाल्यानंतर देता येईल.

**<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>** पदोन्नती देता येईल? जर त्याचे पदच अस्थायी आहे ते पद स्थायी झालेच नाही.

**<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—</u>**आस्थापना सुची मंजुर झाल्यानंतर...

**<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u>**अनुसुचीत जातीची ती जागा भरलीच कशी? भरलेली असतांना सुध्दा तुम्ही पदोन्नती देणार कशी? अनुसुचीत जातीच्या आरक्षणाचे काय? या जागेवर तुम्ही जी भरती केली तीच मुळी चुकीची आहे.

**<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—</u>**महानगरपालिका जेव्हा अस्तित्वात आली. तेव्हा अनुसुचीत जातीच्या पदांवर काही नेमणुका करण्यात आलेलया आहेत. आस्थापना सुची मंजुरीस पाठवितांना आरक्षणाची जी पदे आहेत त्यांचा समावेश केलेला आहे.

**<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>** माझा प्रश्न असा आहे की, रंगारीचा या अगोदरचा जो प्रस्ताव होता तो असाच होता. तो नामंजुर का केला? तो तर लिपिक आहे. एका वैद्यकीय अधिका—याच्या पदासाठी आपण शैक्षणिक अर्हता शिथील करतो तर मग एका लिपिकाच्या पदासाठी आपण अट शिथील करु शकत नाही? रंगारीचा प्रस्ताव आपण नामंजुर केला. हे जे दिसते ते चुकीचे आहे. जो संदेश जात आहे तो चुकीचा जात आहे. महानगरपालिकेमध्ये दुजाभाव केला जात आहे. एक रंगारी जो लिपिक आहे त्याच्या बाबतीत आपण अट शिथील करु शकत नाही. परंतु उपवैद्यकीय अधिका—यांच्या शैक्षणीक अर्हतेची अट आपण शिथील करतो?

**<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>** निश्चित स्वरुपाचे एक धोरण असले पाहिजे.

**<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>** निश्चित स्वरुपाचे धोरण असले पाहिजे. आपण हा केले आम्ही ही हा केले. जे नियम तयार केले आहेत त्यांवर आम्ही ठाम आहोत. जर उमेदवार मिळत नसतील तर अशा स्थितीमध्ये अट शिथील करणे क्रमप्राप्त आहे.

**<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>** मा. महापौरजी, आज हा विषय महासभेपुढे आला आहे. असे नाही की आम्ही कुणाच्या बाबतीत अट शिथील केलेली नाही. महासभेसमोर श्री. अभिजीत यांचा विषय आला होता, श्री. अभिजीत हे नागरीक सुविधा केंद्रात काम करतात. वयाच्या ३० व्या वर्षापर्यंतच्या उमेदवारास सेवेत घेवु शकतो. त्यांचे वय ३१ वर्षाचे होते. त्यांच्याबाबतीत महासभेपुढे विषय आला होता. त्यांचे वय एक वर्षाने शिथील केले पाहिजे. आम्ही लोकांनी त्यांच्या वयाची अट शिथील केली होती. आज येथे हा जो विषय आला आहे तो उप—वैद्यकीय अधिका—यांच्या शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करण्याबाबतचा आहे. जेव्हा महाराष्ट्र शासनाकडुन हा प्रस्ताव मंजुर होवुन येईल त्यानंतर आम्ही त्याबाबतीतील फायदा त्यांना देवु शकतो. आज डॉ. राजा रिजवानी यांचा प्रस्ताव आहे. आणि ते स्थानिक अधिकारी आहेत. त्यांच्याबाबतीत आरक्षणाचा सुध्दा मुद्दा नाही. म्हणुन मी आमच्या सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती करेन की, शासनाकडुन जेव्हा या पदास मंजुरी मिळेल त्यानंतर या पदाचे त्यांना फायदे मिळु शकतील. श्री. रंगारीचा विषय कधी आला होता? त्यामध्ये काय होते?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— एकाच्या बाबतीत जर अट शिथील करत आहात तर दुस—याच्या बाबतीतही अट शिथील केली पाहिजे. सर्वांच्या बाबतीत अट शिथील केली पाहिजे. मग भलेही ती शैक्षणीक पात्रतेची असो, अनुभवाची असो, जातीची असो.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, विषय क्र. ७ हा जो श्री. रंगारी बाबतचा विषय आहे तो श्री. रंगारी उच्च न्यायालयात गेला होता. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात गेला होता. त्याच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे. तरीही त्याच्या अनुभवाची अट शिथील करण्याचा प्रस्ताव आमच्या इलेक्टेड बॉडीने रिजेक्ट केला आहे. गोषवा—याचा शेवटचा परिच्छेद असा आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचे आदेश रद्द करून (Set aside) उपरोक्त दिनांक ५ मार्च १९५५ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार सेवाशर्ती नियमावलीतील अट शिथील करण्याबाबत विचार करावा असे आदेश दिले आहेत. ही बाब विचारात घेवून या प्रकरणी कर निरिक्षक पदाचे सेवा भरती नियमातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील ०३ वर्षाच्या अनुभवाची अट शिथिल करण्याचा प्रस्ताव मुं. प्रां. म. अधिनियम १९४९ चे कलम ४५४ अन्वये मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तर श्री. रंगारीच्या बाबतीत सुध्दा असे झाले पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौरजी, श्री. रंगारीचा मुद्दा असा होता की, तो शिक्षण मंडळात काम करतो त्यास कर निरिक्षक केले जावे. श्री. रंगारीची माहिती आपण लक्षपुर्वक वाचा, तो शिक्षण मंडळात काम करतो त्यास कर निरिक्षक केले जावे. परंतु तसे झाले नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— श्री. रौराळे साहेब, कृपया श्री. रंगारीचे जरा प्रकरण सांगा ना.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):— स्थानिक स्वराज्य संस्थेचा अनुभव त्यांना पाहिजे होता.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—ते शिक्षण मंडळात नाहीत, नविन नियुक्ती केलेली आहे. ते नक्की कोणते काम करत आहेत, सफाई कामगार की मुकादम?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—त्यांना अनुभव नव्हता? सांगा ना?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—त्यास स्थानिक स्वराज्य संस्थेमधील अनुभव नव्हता.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— अट शिथिल करण्याचे आपणावर आहे ना? येथे मिस्त्री क्षेत्रीय निरिक्षकाचे काम करत आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आपण त्यावेळेस बोलला नाहीत. तो विषय निघुन गेल्यावर आपण आता बोलत आहात.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—वनवारी साहेब, येथे प्रस्ताव काय आहे? उप—वैद्यकीय अधिका—याची शैक्षणीक अर्हतेची अट शिथील करुन अनुभवाची अट वाढवायची आहे. व दुस—या प्रस्तावामध्ये त्याची शैक्षणीक अर्हता परिपुर्ण आहे. फक्त त्याने महानगरपालिकेमध्ये काम केलेले नाही. तर असे कितीतरी लिपिक आहेत की ज्यांनी महानगरपालिकेत काम केलेले नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—श्री. बोडारे साहेब, श्री. डी.डी. पंजाबी यांचा विषय होता तो आपण रिजेक्ट केला होता परंतु श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले म्हणुन आपण तो पारीत केला. तो विषय झाला. त्यानंतर तो आपण उपस्थित करत आहात.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आम्ही धोरणात्मक निर्णयाबाबत चर्चा करत आहोत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— त्याला अनुभवच नव्हता. त्यानंतर तो ठराव पारीत झाला तरी आपण काही बोललाच नाही.

मा. सचिव :—श्री. रंगारीचे प्रस्ताव तर पास केला आहे ना? त्याचा प्रस्ताव आधी रिजेक्ट केला होता ना?

मा. महापौर :– विषय क्र. ७ बाबत पूर्ण विचार करुन यापूर्वीच श्री. रंगारी बाबत घेतलेला निर्णय आपणा सर्वांच्या संमतीने रद्द समजण्यात येईल व त्याजागी आता त्यांना कामावर घेण्याबाबत सुचविलेल्या निर्णयाप्रमाणे ठरावाचा कार्यवृत्तांतात अंतर्भाव करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–सर्वोच्च न्यायालयाचा अवमान तर नाही?

मा. सचिव :– हे आपणांस व प्रशासनास ठरवायचे आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–आम्ही आताच आपल्या निदर्शनास आणत आहोत कारण की, आताच चुकीचे होत आहे. आता मी जोर–जोराने ओरडुन सांगेन की हे चुकीचे होत आहे. श्री. रंगारी यांचा विषय रिजेक्ट केला तर हा विषय सुध्दा रिजेक्ट केला पाहिजे. परंतु हा विषय रिजेक्ट करत नाहीत त्या विषयाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे सुध्दा दुर्लक्ष केले सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्टपणे आदेश आहे की, महानगरपालिकेने अट शिथील करावी. आयुक्त साहेब, हे महासभेच्या लक्षात आणुन देणे प्रशासनाचे काम आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–आयुक्त साहेब, आपण सुध्दा याबाबतीत आपला अभिप्राय दिला पाहिजे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– सर्वोच्च न्यायालयाचा काय आदेश आहे?

मा. आयुक्त (श्री. डी.एस.पाटील):–सर्वोच्च न्यालयाच्या निर्देशानुसार श्री. रंगारी हे जे कर्मचारी आहेत त्यांच्या बाबबतीत महानगरपालिका अपॉइंटमेंट ॲथोरीटी आहे म्हणजेच महासभा. मे कंन्सीडर फॉर हीज अपॉइंटमेंट असे म्हटलेले आहे. आता आपण त्याबाबतीत निर्णय घ्यायचा की त्यांना घ्यायचे किंवा नाही आणि त्याला कारण दर्शवावे लागेल. त्यांची अपॉइंटमेंट ॲथोरीटी महासभा आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–तुम्ही जो गोषवारा पाठविला आहे त्याबाबतीत तुमचे स्पष्ट मत काय आहे?

मा. आयुक्त (श्री. डी.एस.पाटील):–आम्ही जो प्रस्ताव पाठविला आहे त्याच्यामध्ये लिहिले आहे की, मा. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचे आदेश रद्द करुन उपरोक्त परिपत्रकाच्या तरतुदीनुसार सेवा शर्ती नियमावलीतील अटी नियमानुसार विचार व्हावा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–आयुक्त साहेब, चुकी होते प्रस्ताव व्यवस्थित वाचा. उच्च न्यायालयाने महासभेवर टाकल्यानंतर महासभेने पुन्हा नियुक्ती रद्द केली आहे. त्याविरोधात तो श्री. रंगारी सर्वोच्च न्यायालयात गेलेला आहे. म्हणजेच सर्वोच्च न्यालयाने उच्च न्यायालयाचे अगोदरचे आदेश म्हणजेच नियुक्ती रद्द केल्याबाबचे आदेश निकालात काढलेले आहेत. म्हणजेच त्याची नियुक्ती मान्य केलेली आहे.
मा. आयुक्त (श्री. डी.एस.पाटील):–सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय वाचुन दाखवितो.

“ The appellant claims to be a Scheduled Caste candidate and, therefore, the authority had the power to consider whether or not to relax the requirement of three years experience as prescribed by the Rules. In that view of the matter, we allow the appeal and set aside the decision of the High Court. The writ petition is disposed of by directing the concerned authority ot consider whether, in the facts of the case, the appellant was entitled to reiaxation. Such consideration shall be done within a period of six weeks from the production of the copy of the order before the competent authority. The appeal is disposed of accordingly .”

AND THIS COURT DOTH FURTHER ORDER that this ORDER be punctually observed and carried into execution by all concerned;

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :– एवढे हे करण्यापेक्षा कायदेशीर मत घ्या, विधी सल्लागाराकडुन. कोर्टाचा आदेश काय आहे? आपण काय करायला पाहिजे ते देतील ना आपले मत?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– आयुक्त साहेब, जसे श्री. बोडारे साहेब म्हणतात तसा आपण आपला अभिप्राय दिलेलाच नाही?

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे. 

---

☑

**विषय क्र. १५:—** उपवैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदासाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, तत्कालीन उल्हासनगर नगरपालिकेचे दिनांक २१/१०/९६ रोजी महानगरपालिकेत रुपांतर झाल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार संवैधानिक पदे व अधिनियमानुसार कार्यवाही करण्यासाठी आवश्यक असलेली इतर पदे महापालिकेच्या आस्थापना सूचीवर निर्माण करण्यासाठी राज्य शासनाची मान्यता आवश्यक असल्याने त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापना सूचीवर विविध संवर्गातील पदे निर्मितीचा प्रस्ताव प्रशासकीय ठराव क्रमांक १४, दिनांक २/११/१९९६ व क्र. २५, दिनांक १३/१२/९६ अन्वये मान्यता देवुन शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता.

सदरची आस्थापना सूची प्रस्तावित करताना त्यामध्ये आरोग्य खाते मुख्यालय (वैद्यकिय विभाग) साठी वैद्यकिय आरोग्य अधिकारी १ पद, उपवैद्यकिय आरोग्य अधिकारी १ पद व सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी १ पद अशाप्रकारे पदे प्रस्तावित करण्यात आली होती.

शासन निर्णय क्र. उमपा—२२९८/२०३०/प्र.क्र.२५९/९८/नवि—२३, दिनांक १३/६/२००३ अन्वये सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी व वैद्यकिय आरोग्य अधिका—याचे प्रत्येकी एक पद मंजुर करण्यात आले असुन उपवैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदास मंजुरी प्रतिक्षाधीन आहे. उप वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदासाठी पदोन्नतीद्वारे पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे.

१) शैक्षणिक अर्हता —— एम.बी.बी.एस व डी.पी.एच
२) महानगरपालिकेत वैद्यकिय अधिकारी या पदावरील ५ वर्षांच्या सेवेचा अनुभव

सध्या महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदावर शासनाचे अधिकारी कार्यरत आहेत. तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दोन वैद्यकिय अधिकारी अनुक्रमे श्रीमती रेलवानी व श्री. राजा रिझवानी हे कार्यरत आहेत. महापालिकेत कार्यरत असणा—या वैद्यकिय अधिका—यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याने त्यांना वर्षानुवर्षे एकाच पदावर काम करावे लागत आहे.

सध्या महापालिकेत कार्यरत असलेले वैद्यकिय अधिकारी हे निर्धारित शैक्षणिक अर्हता म्हणजेच डी.पी.एच ची पदवी धारण करीत नसल्याने त्यांना ''उपवैद्यकिय आरोग्य अधिकारी'' या पदावर पदोन्नती देता येत नाही. वास्तविक पाहता महापालिकेतील वैद्यकिय अधिकारी वर्षानुवर्षे वैद्यकिय अधिकारी या पदावर कार्यरत असल्याने व सेवेचा दिर्घ अनुभव असल्याने त्यांना उपवैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदावर पदोन्नती दिल्यास त्यांच्या सेवेचा लाभ घेता येवु शकतो. परंतु ते शैक्षणिक अर्हतेच्या अटीची पुर्तता करु शकत नसल्याने त्यांना सदर पदावर पदोन्नती देता येत नाही.

यासाठी उपवैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करुन, या पदासाठी आवश्यक अनुभवाची अट ५ वर्षाऐवजी ७ वर्षे केल्यास सदर पदावर महापालिकेत कार्यरत असलेल्या वैद्यकिय अधिका—यांना पदोन्नती देता येवु शकते.

त्यामुळे ''उपवैद्यकिय आरोग्य अधिकारी'' या पदावर पदोन्नतीसाठी सध्या असलेली शैक्षणिक अर्हतेची अटी शिथील करुन पुढीलप्रमाणे अर्हता निश्चित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) शैक्षणिक अर्हता — एम.बी.बी.एस
२) महानगरपालिकेत वैद्यकिय अधिकारी या पदावरील ७ वर्षांच्या सेवेचा अनुभव

तरी सदर पदावर पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करुन अनुभवाच्या अटीत वाढ करण्यासाठीचा प्रस्ताव महासभेसमोर मान्यतेसाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ९९ दिनांक:—२०/३/२००६

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उपवैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदासाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १६:—** उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी पुर्वीचा ठराव क्र. १६ दिनांक १९/५/२००४ यात बदल करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १६:—** उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी पुर्वीचा ठराव
क्र. १६ दिनांक १९/५/२००४ यात बदल करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनेक प्रकारचे व्यवसाय चालविण्याकरीता व इतर प्रयोजनाकरीता व्यवसाय धारकाकडुन विवक्षित वस्तुची साठवणुक करण्यात येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, ३८३, ३८६ नुसार आयुक्तांना दिलेल्या अटी व शर्तीनुसार आणि त्यास अनुसरुन कोणत्याही नियमात विर्निदिष्ठ केलेल्या कोणत्याही वस्तु कोणत्याही जागेत किंवा जागेवर परवान्यांशिवाय ठेवता येणार नाहीत.

आसपासच्या इतर महानगरपालिकांचे सदर विषयासंबंधीचे उपविधी पडताळुन अधिनियमाचे कलम ४५८ (२०), ४५५ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नव्याने नियम व उपविधी तयार करण्यात आले असुन सदर विषयी वस्तु व व्यापार साठवणुकी संबंधी संपुर्ण माहिती तसेच जागा वापरासंबंधी प्रारुप उपविधी व नियमावली तयार केलेली आहे.

सदर उपविधी व प्रारुप नियमावलीस महासभा ठराव क्र. १११, दिनांक १९/१२/२००३ नुसार प्राथमिक मंजुरी मिळाली होती. त्यानुसार ठरावात नमुद केल्याप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रामध्ये उपविधी व प्रारुप नियमावलीस आवश्यक ती प्रसिध्दी देवुन दिनांक ३१/१/२००४ अखेर सुचना व हरकती मागविल्या होत्या. तसेच प्रस्तृत प्रारुप उपविधीस महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दी देण्यात आली होती. व जनतेच्या अवलोकनासाठी खुली ठेवली होती. तथापि वरील मुदतीत कोणाचे सुचना अगर हरकती प्राप्त झाल्या नाहीत.

सदर उपविधी अंतिम मंजुरीकरीता राज्य शासनाकडे पाठविणे अगोदर महासभेपुढे अंतिम मंजुरीकरीता प्रस्तावित करणे आवश्यक असल्याने महासभेपुढे प्रस्तावित करण्यात आले. परंतु महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ नुसार शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी धंदे व व्यवसाय करणेसाठीचे परवान्यासंबंधी प्रारुप उपविधी व प्रारुप नियमावलीस अंतिम मान्यता दिलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (१०) अन्वये उपद्रवकारक व धोकादायक उदयोग किंवा प्रयोग यांचे नियमन व उपशमन करणे व महापालिकेच्या आवश्यक कर्तव्यात समाविष्ट आहे. कायदयाने महानगरपालिकेवर लादलेल्या या कर्तव्याच्या पालनासाठी वरील उपविधी करुन त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे शहरातील उदयोग व्यवसायाचे नियमन व सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता या बाबी साध्य होवु शकणार आहेत. तसेच या उपविधी अंमलात आणल्यास महानगरपालिकेस निश्‍चित स्वरुपाचे उत्पन्न प्राप्त होवु शकणार आहे. या बाबी विचारात घेवुन महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ नुसार घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठीचा प्रस्ताव महासभेकडे पुर्नविचारार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १०० <u>दिनांकः—२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी पुर्वीचा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ यात बदल करण्यास या परिस्थितीत मान्यता देत नाही.

*<u>कारण</u>* →

१ प्रशासनाकडुन तपशिलवार सविस्तर अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

२ सदरहु प्रस्ताव कोणत्याही कायदेशिर तरतुदीशी विसंगत नसल्याबाबत कायदेतज्ञाचा अहवाल दिलेला नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १७:—** उल्हासनगर महानगरपालिका सेवेत ''फायरमन'' या पदासाठी निवड समितीने निवड केलेल्या १३ उमेदवारांना फायर फायटिंगच्या कोर्सची अट शिथील करुन नियुक्ती देणेस मान्यता देणे.

---

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—</u>मा. महापौर महोदया, हे जे प्रकरण आहे यातील भ्रष्टाचार सर्वात मोठा दिसत असला तरी यापेक्षा मोठा भ्रष्टाचार यापुर्वीच अनुशेष भरतीमध्ये झाला आहे. त्यावेळी नियुक्त्या देतांना लोकांकडुन एक—एक दिड—दिड लाख रुपये घेण्यात आले महिलांनी अक्षरक्षः त्यांचे मंगळसुत्र गहाण ठेवून विकुन अधिका—यांना पैसे दिले होते. हे जे प्रकरण आहे ते देखिल असेच आहे. १३ फायरमनच्या जागा भरण्यासाठी सेवायोजन कार्यालयाकडुन ही जी यादी मागविण्यात आली होती ती यादी तुम्ही जर तपासली तर असे दिसुन येईल की, या लोकांकडुन पैसे घेतलेले आहे. या जागा भरण्यासाठी अटी शिथील का कराव्यात? उल्हासनगरमध्ये स्थानिक कर्मचारी मिळत नाहीत का? ही भरती पुर्णपणे रद्द करुन नविन भरती करावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>हा प्रस्ताव नाकारण्यांत यावा.

<u>मा. महापौर :—</u>सदर प्रस्तावाबाबत पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

☑

**विषय क्र. १७:—** उल्हासनगर महानगरपालिका सेवेत ''फायरमन'' या पदासाठी निवड समितीने निवड केलेल्या १३ उमेदवारांना फायर फायटिंगच्या कोर्सची अट शिथील करुन नियुक्ती देणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती समितीने सन १९९०—९१ च्या अहवालामध्ये शिफारस क्र. २.३. मध्ये महापालिका सेवेतील सर्व संवर्गातील कर्मचा—यांच्या /पदांचा आढावा घेवुन ज्या पदावर नियुक्तीनंतरही प्रशिक्षण घेवुन उमेदवार अर्हता प्राप्त होवु शकतो. त्या पदांना विशिष्ठ अटी न लादता अनुशेष भरुन काढावा अशी शिफारस शासनाकडे केली हाती. सदर समितीने केलेल्या शिफारसीची पुर्तता करण्यासाठी शासनाने नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र. भविजा—१०९१/७८८/सीआर—४८/९१,दिनांक २७/०५/१९९२ अन्वये महापालिकेतील पदांवर विशिष्ट अटी न लादता उमेदवारांना सदरच्या पदांवर प्रशिक्षण देवून सेवेमध्ये सामावून घेणे शक्य आहे किंवा नाही याचा आढावा घेण्यात यावा व तद्नंतर अनुशेष भरुन काढावा यासाठी दर ३ महिन्यांनी अनुशेषाचा आढावा घेवून पदे भरण्यात येईल असे पहावे असे आदेश निर्गमित केले आहेत.

महापालिकेने ''फायरमन'' या संवर्गातील अनुशेषाची पदे भरण्याकरीता सेवायोजन कार्यालयाकडुन उमेदवारांची यादी मागवून दिनांक २८ व २९ जानेवारी, २००४ रोजी मुलाखती घेवून निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार केली होती. त्यामध्ये अनुशेषातील खालील १३ उमेदवारांची निवड करण्यात आली होती. सदर उमेदवारांकडे फायरमनचे प्रशिक्षण पदविका नसल्याने, त्यावेळी निवडयादी प्रसिध्द करण्यात आली नव्हती.

शासनाच्या दिनांक २७ मे, १९९२ च्या परिपत्रमातील सुचना व अनुशेष भरुन काढण्याचे शासनाचे धोरण विचारात घेवुन ''फायरमन'' या पदासाठी निवड केलेल्या पुढील १३ उमेदरवारांना सेवेत सामावुन घेवुन फायरफायटिंगचा कोर्स पूर्ण करणे शक्य असल्याने प्रशिक्षणाची अट शिथील करुन सदर उमेदवारांना नियुक्त्या देण्यात याव्यात.

<u>सरळ सेवा भरती —— निवडयादी व प्रतिक्षायादी</u>

पदाचे नाव —— फायरमन

| प्रवर्ग | पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नाव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचं नाव |
|---|---|---|---|
| अनु. जमाती | १० | १. अरुण लुनाजी वाजे | पात्र उमेदवार नाही |
| | | २. अशोक बळीराम सारक्ते | |
| | | ३.भगवान आत्माराम गडग | |
| | | ४. प्रभाकर तुकाराम पाटिल | |
| | | ५. सुरेश वाल्या खरपडे | |
| | | ६. विष्णू एकनाथ खुताडे | |
| | | ७. सुनिल भंगळू काळप | |
| | | ८. भगवान सखाराम अधारी | |
| | | ९. राजू पांडुरंग गावीत | |
| | | १०. शाम धवळू भवर | |
| विमुक्त जाती (अ) | ०२ | १. शरद एस. पळशीकर | ——''—— |
| भ.ज. (ब) | ०१ | —— | —— |
| भ.ज. (क) | ०३ | १. गुणवंत एस. माने | —— |
| भ.ज. (ड) | ०१ | १. अमिताभ ए पिंपळे | अल्पेश जगन्नाथ संखे |

शासनाच्या धोरणाप्रमाणे व वरील दिनांक २७/५/१९९२ च्या आदेशाप्रमाणे अनुशेषाची पदे भरण्याचा प्रस्ताव महासभेपूढे मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १०१ <u>दिनांक:—२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका सेवेत ''फायरमन'' या पदासाठी निवड समितीने निवड केलेल्या १३ उमेदवारांना फायर फायटिंगच्या कोर्सची अट शिथील करुन नियुक्ती देणेस मान्यता देत नाही.

*कारण →*

१ व्यक्ति सापेक्ष अट शिथील करणे योग्य होणार नाही.

२ उमेदवारांची निवड करताना गुणवत्तेच्या सर्वसाधारण दर्जाची व अर्हतेबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे.

३ उपरोक्त उमेदवारांऐवजी पुरेशा प्रमाणात योग्य अर्हताधारक मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध होवु शकतात.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८:—** आयात होणा—या ग्रे क्लॉथवर सवलतीचा जकात दर आकारणेकामी स्थायी समिती ठराव क्र. ३३, दिनांक १२/८/२००५ कायम करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १८:—** आयात होणा—या ग्रे क्लॉथवर सवलतीचा जकात दर आकारणेकामी स्थायी समिती ठराव क्र. ३३, दिनांक १२/८/२००५ कायम करणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयांकित कामी सचिव, क्लॉथ डाईंग ॲन्ड प्रोसेसर्स असोशिएशन, उल्हासनगर यांनी त्यांच्या दिनांक १४/४/२००५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका येथे ग्रे क्लॉथवर ०.५० टक्के प्रमाणे जकात कर आकारणी केली जाते. उल्हासनगर महानगरपालिकेत सदर मालावर यापुर्वी १.६० टक्के प्रमाणे आकारणी केली जात होती. त्या वाढ करुन दिनांक १/४/२००५ रोजीपासुन १.८० टक्के प्रमाणे जकातीची आकारणी करण्यात येत आहे. आता १.८० टक्के यथा मुल्यवरुन ०.५० टक्के या दराने आकारणी करावयाची झाल्यास उल्हासनगर महानगरपालिकेच्या जकात नियमात अनुसुची १ बाब क्र. ६१ चे पुर्नवर्गीकरण, नियम ५ मधील तरतुदीनुसार करणे आवश्यक आहे.

सबब मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९९ व जकात नियम १९९६ नियम ५ मधील तरतुदीनुसार उक्त प्रस्ताव मंजुरीसाठी स्थायी समिती व महासभेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

स्थायी समिती ठराव क्र. ३३ दिनांक:—१२/८/२००५

सुचकाचे नाव :— श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लक्ष्मी ससाणे

ही स्थायी समिती महासभेच्या मंजूरीच्या आधिन राहून शहरात आयात होणा—या ग्रे क्लॉथवर ०.५० टक्के प्रमाणे जकात कर आकारणेस शिफारस करित आहे व उल्हासनगर महानगरपालिकेचे जकात नियम अनुसूची १ मधील बाब क्र. ६१ चे पुर्नवर्गीकरण करणेकामी नियम ५ चे अनुषगांने शिफारस करित आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र:</u> १०२ <u>दिनांक:—२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे आयात होणा—या ग्रे क्लॉथवर सवलतीचा जकात दर आकारणेकामी स्थायी समिती ठराव क्र. ३३, दिनांक १२/८/२००५ कायम करणेस मान्यता देत नाही.

<u>*कारण*</u> →
सध्या जकात वसुलीचे काम खाजगी अभिकर्त्यामार्फत करण्यात येत आहे त्यामुळे आयात होणा—या ग्रे क्लॉथवर सवलतीचा जकात दर आकारल्यास अभिकर्त्याशी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन होईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १९:—** दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत पाणी पुरवठया संबंधी कामांस मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १९:—** दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत पाणी पुरवठया संबंधी कामांस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे शाासन निर्णय क्र. विवयो १०२०००/१५९२, प्र.क्र. १८९, नवि ४, मंत्रालय, मुंबई दिनांक ५.३.२००२ अन्वये नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत पाणी पुरवठयात सुधारणा करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करुन सादर करण्याचे निर्देश देणेत आलेले आहेत.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिलेल्या सूचनेनुसार नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत उल्हासनगर शहरातील कम्प क्र. १ ते ५ मधील अनुसूचित जाती (आरक्षित) प्रभागामध्ये पाणी पुरवठयात सुधारणा करण्याकरीता नविन वितरण वाहिनी टाकणे, विंधनी विहिरी खोदून तिचेवर नविन जेट पंप बसविणे इत्यादी कामाचे रुपये ६१,९१,५२४/— इतक्या किंमतीचे खालील यादीप्रमाणे १२ प्रस्ताव तयार करुन मंजूरीसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करण्यात आले आहेत.

**दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत पाणी पुरवठा विभागामार्फत प्रस्तावित केलेल्या कामांची यादी**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकाची किंमत |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर ३, आयोध्या नगर येथे ८० मीमी व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | १९०५६०/— |
| २. | उल्हासनगर ३, सम्राट अशोक नगर येथे ८० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे. | २१०१७५/— |
| ३. | उल्हासनगर ३, गांधीनगर ते आझाद नगर या परिसरात १५० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे | ८४९२९१/— |
| ४. | उल्हासनगर ४, साई प्रसाद हॉस्पीटल भालेराव बंगला, नाग मंदिर, शिव नगर, रोमा अपार्टमेंट, मिलिंद नगर येथे १५० मीमी एम.एस. व्यासाची व ८०/१०० मीमी व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ३७१४५०/— |
| ५. | उल्हासनगर ३, स्मशान भूमी ते पवई भागात १५० मीमी व्यासाची जलवाहिनी टरकएरे | २४७४६५०/— |
| ६. | उल्हासनगर ३, शिवसेना ऑफिस चोपडा जवळ व गौतम नगर येथे जुन्या विंधन विहिरींवर जेट पंप बसविणे. | १६५०४०/— |
| ७. | उल्हासनगर ३, आझाद नगर व चंद्रशेखर शाळेजवळ विंधन विहिरींवर खोदुन नविन जेट पंप बसविणे. | २९१५१२/— |
| ८. | उल्हासनगर ३, वडोळगाव व सम्राट अशोक नगर येथे विंधन विहिर खोदून जेटपंप बसविणे. | ३६८०३२/— |
| ९. | उल्हासनगर ४, ब्लॉक अ ३२८, अंकुश घुडे यांचे घराजवळ कांबळे भवन, सिध्दार्थ नगर व मारुती जाधव यांच्या घराजवळ विंधन विहिरींवर जेट पंप बसविणे. | ४१२६००/— |
| १०. | उल्हासनगर ४, स्वागत नगर, लालचक्की, पाच दुकान, साने गुरुजी नगर, पाच पांडव कॉलनी येथे जून्या विंधन विहिरींवर जेट पंप बसविणे. | ४१२६००/— |
| ११. | उल्हासनगर ४ , राम नगर व समता नगर येथे विंधन विहिर खोदून जेट पंप बसविणे. | २२८७७६/— |
| १२. | उल्हासनगर ३, भाऊजी नगर, शांती नगर, सातारा कॉलनी येथे विंधन विहिर खोदुन जेट पंप बसविणे. | २१६८३३/— |
| | **एकुण——** | ६१९१५२४/— |

सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजूरीसाठी महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: १०३ — दिनांक:—२०/३/२००६

सुचकाचे नाव :— श्री. नाना पवार

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत पाणी पुरवठया संबंधी उपरोक्त १२ कामांना व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. २० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २०:—** श्रीमती कल्पिता कुकरेजा, दुरध्वनी चालक यांना मंजुर केलेल्या दिनांक १/१/२००६ ते ३१/१२/२००६ कालावधीच्या विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजुरी देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. २०:—** श्रीमती कल्पिता कुकरेजा, दुरध्वनी चालक यांना मंजुर केलेल्या दिनांक १/१/२००६ ते ३१/१२/२००६ कालावधीच्या विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्रीमती कल्पिता कुकरेजा, दुरध्वनी चालक, जकात विभाग यांनी दिनांक ८/१२/२००५ च्या अर्जान्वये दिनांक १ जानेवारी, २००५ ते ३१ डिसेंबर, २००६ एक वर्षाच्या कालावधीची विशेष असाधारण रजा मंजूर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे.

शासनाने वित्त विभागाकडील निर्णय क्र. अरजा २४०२/२५/सेवा—८, दिनांक ७/१०/२००२ व शासन निर्णय क्र. अरजा २४०४/प्र.क्र. ५६/०४/सेवा—८, दिनांक १४ जानेवारी, २००५ नुसार शासकिय सेवेत प्रविष्ट झालेल्या किमान ५ वर्ष इतकी सतत सेवेत असलेल्या स्थायी / अस्थायी कर्मचा—यांना विशेष असाधारण रजा मंजूर करता येईल. अशी रजा संपूर्ण सेवेच्या कालावधीत ५ वर्षाच्या मर्यादेपर्यंत फक्त एकदाच घेता येईल ही योजना सदर आदेश दिनांक १/१/२००५ पासून ते दिनांक ३१/१२/२००५ पर्यंत अंमलात आहे. मा. शासन निर्णयातील परिच्छेद ९ मध्ये विशेष असाधारण रजा मंजूर करण्यास नियुक्ती प्राधिकारी म्हणुन महासभा सक्षम आहे

वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्रीमती कल्पिता कुकरेजा, दुरध्वनी चालक, जकात विभाग हया स्थायी कर्मचारी असून त्यांची महापालिकेतील आतापर्यंत एकुण सेवा २५ वर्षे ४ महिने २३ दिवस इतकी झाली असुन त्यांचा विशेष असाधारण रजेचा अर्ज दिनांक ८/१२/२००५ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला असुन शासनाच्या दिनांक ७/१०/२००२ मधील शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहुन त्यांची दिनांक १/१/२००६ ते ३१/१२/२००६ पर्यंतच्या १ वर्षाच्या कालावधीची विशेष असाधारण रजा मंजुरीचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १०४ <u>दिनांक:—२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती कल्पिता कुकरेजा, दुरध्वनी चालक यांना प्रशासनाने मंजुर केलेल्या दिनांक १/१/२००६ ते ३१/१२/२००६ कालावधीच्या विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. २१ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. २१ :— <u>प्रस्तावाची सुचना :—</u>

बॅ.क्र. ३१/ए समोर, भिमनगर, उल्हासनगर—१ येथील महापालिका उद्यानाची वेळ निश्चित करणे बाबत सन्माननिय सदस्य श्री. नाना पवार व श्री. राजु जग्यासी यांचा प्रस्ताव मान्य करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

विषय क्र. २१ :— <u>प्रस्तावाची सुचना :—</u>

बॅ.क्र. ३१/ए समोर, भिमनगर, उल्हासनगर—१ येथील महापालिका
उद्यानाची वेळ निश्चित करणे बाबत सन्माननिय सदस्य श्री. नाना पवार
व श्री. राजु जग्यासी यांचा प्रस्ताव मान्य करणे.

सूचक : श्री. नाना पवार

अनुमोदक : श्री. राजु जग्यासी

*प्रस्ताव :*

उल्हासनगर महानगरपालिकेचे बॅ.क्र. ३१/ए समोर, भिमनगर, उल्हासनगर–१ येथे स्वत:चे मालकीचे उद्यान आहे. सदर उद्यान उघडण्याची व बंद करण्याची वेळ निश्चित केलेली नाही.

सदर उद्यानात फिरावयास येणा–या नागरिकांसाठी वेळ निश्चित करणे आवश्यक आहे. सदर उद्यानात ज्येष्ठ नागरिक, लहान मुले व महिला यांना प्रवेश देणे योग्य होईल. यासाठी सदर उद्यानाची वेळ सकाळी ७ ते ९ व सायंकाळी ५ ते १० वाजेपर्यंत निश्चित केल्यास ज्येष्ठ नागरिक व महिलांना सदर उद्यानाचा लाभ घेणे सुलभ होईल. तसेच विहीत वेळेतच उद्यान उघडे ठेवल्याने असामाजिक तत्वांना सदर उद्यानाचा गैरवापर करता येणार नाही. उद्यानाची वेळ निश्चित झाल्यानंतर सदर ठिकाणी माहितीसाठी फलक लावणे देखिल आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे बॅ.क्र. ३१/ए समोर, भिमनगर, उल्हासनगर–१ येथील उद्यानाची वेळ निश्चित करणेस मान्यता मिळणेकामी महासभेपुढे सादर.

महासभा ठराव क्र: १०५ दिनांक:–२०/३/२००६

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका निहित ''बॅ.क्र. ३१/ए समोर, भिमनगर, उल्हासनगर–१'' या उद्यानात फिरावयास येणा–या नागरिकांसाठी प्रवेशाची वेळ सकाळी ७ ते ९ व सायंकाळी ५ ते १० वाजेपर्यंत निश्चित करीत आहे आणि त्या प्रयोजनार्थ फलक लावणेस निर्देशित करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. २२ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्या वेळचा विषय

विषय क्र. २२:– दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत ४३ विविध कामांच्या प्राकलनास मान्यता मिळणेबाबत....

---

काही सदस्य :–पास–पास......

मा. महापौर :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. २२:–** दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत ४३ विविध कामांच्या प्राकलनास

मान्यता मिळणे.

प्रस्तावना

दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र.विघयो–१०२००/१५९२/प्र.क्र. १८९/नवि–४ दिनांक ५/३/२००२ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अनुसूचित जातीच्या प्रभागामध्ये व ज्या वस्तीमध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या ५०: पेक्षा जास्त आहे. अशा वस्त्यांमध्ये मुलभूत सोयी,सुविधांची कामे जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन त्यांचेकडून उपलब्ध करुन देण्यात येणा–या

निधीमधून करणे आहे. या योजनेबाबत मा जिल्हाधिकारी ठाणे यांनी त्यांच्या सभागृहात बोलावलेल्या दि. ०७/१२/२००५ बैठकीच्या वेळी या योजने अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता संबंधित कामांना मंजुरी देण्याचे शासनाचे निर्देश असल्याचे सुचना दिल्या आहेत. त्या दृष्टीने स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून शौचालय व नाल्यांची कामे सार्वजनिक बांधकाम खात्याकडून प्रस्तावित करण्यात येत आहेत.

सार्वजनिक बांधकाम खात्याने सोबत जोडलेल्या यादीनुसार अनुसूचित जातीच्या प्रभागामधील तसेच महानगरपालिकेत उपलब्ध असलेल्या दलित वस्त्यांच्या यादीतील काही वस्त्यांमध्ये लोकोपयोगी व स्वच्छता दृष्टीकोनातून काम प्रस्तावित करण्यात येत आहे.

उक्त शासन निर्णयानुसार सदर प्रस्तावांना आवश्यक असल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचनाकार यांनी शिफारस दिलेली आहे. सदर प्रस्ताव महासभेच्या मान्यतेनंतर मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे आहे.

तरी प्रस्तावित केलेल्या रु.१,५१,६२,२२७/– खर्चाच्या खालील ४३ कामांना महासभेची मान्यता मिळणे करीता प्रस्तावित आहे.

***दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत वर्ष 2005-2006 करीता प्रस्ताव***

| *अ.क्र.* | *प्रभाग क्र.* | *कामाचे नाव* | *प्राकलनीय किंमत* |
|---|---|---|---|
| 1 | 1 | उल्हासनगर-1 येथील लासी कंपाउंड जवळ प्लायवूड फॅक्टरीच्या मागे प्रभाग क्र.1 येथे 10 सिटचे शौचालय बांधणे | 499757 |
| 2 | 5 | उल्हासनगर-2 येथील भय्यासाहेब आंबेडकर नगर येथील रामदास ़यंबक शिंदे यांच्या घराजवळ 10 शिटाचे बैठकिचे शौचालय बनविणे | 499757 |
| 3 | 5 | उल्हासनगर-2 दुर्गानगर येथील हनुमान मंदीर पासून कल्वर्टपर्यंत नाला बनविणे | 299950 |
| 4 | 5 | उल्हासनगर-2 यैथील रमाबाई आंबेडकर नगर येथील महापालिकेच्या पंपरुम पासून ते बाबुराव घोरपडे, अरविंद यांचे घर, नितीन अशोक हुडके ते चर्चजवळ नाला बनविणे | 279300 |
| 5 | 1 | उल्हासनगर-1 येथील जयस्वाल यांचे घर, मोरया हॉटेल, राजनिथू, शिंदे यांचे घर, इंदू चाळ, स्टार बेकरी जवळ नाला जवळ | 294350 |
| 6 | 1 | उल्हासनगर-1 येथील सिंग हाऊस जवळ उपाध्याय हाऊस विष्णू यांचे घरामागे, गणेश हॉस्पीटल, गवळी पाडा, शाळा नं.17 समोर ते ममता नगर येथे नाला बांधणे | 230950 |
| 7 | 5 | उल्हासनगर-2 येथील रमाबाई आंबेडकर नगर येथील आशा भालेराव, संतोष ऑटो, दादू लोखंडे व हनुमान नगर येथील गुप्ता किराणा स्टोर जवळ नाली बनविणे | 290650 |
| 8 | 1 | उल्हासनगर-1 येथील समाज मंदीर, कमला बाई हाऊस, पेरमिले यांचे घर व राजन किराणा स्टोर, आंबेडकर नगर आणि नाला, मोहन ससाणे यांचे घर ते सार्व.शौचालय जवळ नाली बांधणे | 299650 |
| 9 | 6 | उल्हासनगर-3 वार्ड क्र.6 नरेश यादव ते 10 सिटांचे शौचालय पर्यंत नाला बांधणे | 270700 |
| 10 | 8 | उल्हासनगर-3 येथिल सम्राट अशोक नगर येथे वासनिक यांच्या घरापासून अप्पा सोनावणे यांच्या घरापर्यंत आणि भिंगारे यांच्या घराजवळील परिसरात नाला बनविणेबाबत | 264400 |

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | 6 | उल्हासनगर-3 शास्त्रीनगर येथील शिला कलशेही यांच्या घरापासून नरेश यादव यांच्या घरापर्यंत नाला बनविणे बाबत | 299850 |
| 12 | 6 | उल्हासनगर-3 येथील वडार कॉलनी येथे नाला बनविणेबाबत | 197400 |
| 13 | 6 | उल्हासनगर-3 वार्ड क.6 निजाम बिल्डिंग ते किराणा वाया धनगर हाऊस येथे नाला बाधणे बाबत | 299600 |
| 14 | 6 | उल्हासनगर-3 वार्ड क.6 बाल्कनजी बारी धोबीघाट येथे 10 सीटचे शौचालय बांधणे | 499957 |
| 15 | 6 | उल्हासनगर-3 गरीबनगर मनोज पवार ते लच्चू किराणा स्टोर वाया समाजमंदीर आणि गांधीनगर येथे चंद्रकांत टोकन यांचे घरापासून ते नागरीक किराणा श्री.श्रावण दिनकर यांचे घरापासून पंम्पींग होउस येथे नाली बांधण्याबाबत | 199890 |
| 16 | 8 | उल्हासनगर-3 वार्ड क.2 समाज मंदीर समोर आंनदनगर येथे नाली बांधणेबाबत | 54250 |
| 17 | 8 | उल्हासनगर-3 वार्ड क.8 सार्व.शौचालय ते नदीपर्यंत रेणूका सोसायटी येथे नाली बांधेणे | 199650 |
| 18 | 8 | उल्हासनगर-3 येथील बॅ.नं.1075 च्या मागे आशिर्वाद सोसायटीच्या बाजूस जुने ट्रफ शौचालय तोडून नवीन दहा बैठकीचे शौचालय बनविणे | 499957 |
| 19 | 15 | उल्हासनगर-4 प्र.क.15 मध्ये वाल्मिकीनगर येथे सुर्यकांत शिंदे ते ओमकार टयूशन क्लासचे मागे नाला बनविणे | 499860 |
| 20 | 17 | उल्हासनगर-4 प्र.क.17 मध्ये हरीजन पाडा येथे अनगुरी रामसिंगच्या घरापर्यत व रामचंद्र यादवच्या घराजवळ नाली बनविणे | 99880 |
| 21 | 18 | उल्हासनगर-4 प्र.क.18 येथे मिलिंदनगर मध्ये एस.पी.देशमुख यांच्या घराजवळ व स्कूल नं.14 जवळ नाली बनविणे | 299600 |
| 22 | 18 | उल्हासनगर-4 प्र.क.18 मध्ये महात्मा फुले जयभीम नगर मध्ये बुध्दमंदीर जवळ ते सोनावणे यांच्या घरापर्यंत नाला बनविणे | 499850 |
| 23 | 15 | उल्हासनगर-4 प्र.क.15 येथे सितारामनगर मध्ये आनंद कुंभारच्या घराजवळ साकव ते मद्रासीपाडापर्यंत नाला बनविणे | 499590 |
| 24 | 19 | उल्हासनगर-3 प्र.क.19 येथे नागसेन कॉलनी मध्ये डी.गावडे स्कूल जवळ 10 सीटचे शौचालय बनविणे | 499757 |
| 25 | 19 | उल्हासनगर-3 प्र.क.19 मध्ये गऊबाईपाडा येथे स्मशानभूमी मागे ते सार्वजनिक शौचालय पर्यत नाला बनविणे | 499860 |
| 26 | 19 | उल्हासनगर-3 प्र.क.19 शांतीनगर मध्ये प्रियदर्शनी अपार्टमेंट जवळ 10 सीटचे शौचालय बनविणे | 499757 |

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | 19 | उल्हासनगर-3 प्र.क्र.19 येथे पंचशील नगर मध्ये मुख्य रस्ता पासून डी.खान हॉस्पीटल ते सार्वजनिक शौचालय पर्यंत नाली बनविणे | 99880 |
| 28 | 13 | उल्हासनगर-3 प्र.क्र.13 मध्ये सिमरन पॅलेस व वृंदावन सोसायटी जवळची नाली बनविणे | 499855 |
| 29 | 19 | उल्हासनगर-3 प्र.क्र.19 मध्ये रामगीरधर इंन्डस्ट्रिज जवळ व मारुती प्रकाश ऑटो ते भाऊजीनगर जवळ नाला बनविणे | 497350 |
| 30 | 9 | उल्हासनगर-4 येथील प्र.क्र.9 मध्ये साईबाबा नगर येथील भिमचौकापासून रेल्वेलाईन पर्यंत हजेरी शेड मार्गे जाणारा नाला बांधणे | 299800 |
| 31 | 9 | उल्हासनगर-4 येथील प्र.क्र.9 मधील भरतनगरमध्ये पान पाटील यांच्याघरापासून काटवे यांच्या घरापर्यंत नाला बांधणे | 299950 |
| 32 | 9 | उल्हासनगर-4 येथील प्र.क्र.9 मधील नागसेन नगर येथे बुध्दविहारापासून सुरवाडे यांच्या घरापर्यंत गीता निवास मार्गे जाणारा नाला बांधणे | 299900 |
| 33 | 9 | उल्हासनगर-4 येथील प्र.क्र.9 मधील रामजी आंबेडकर नगर येथील संध्या किराणा स्टोअर्सच्या मागील बाजूस 10 बैठकीचे शौचालय बांधणे | 496800 |
| 34 | 14 | उल्हासनगर-4 येथील प्र.क्र.14 मधील श्रीकृष्ण कॉलनी पाच पांडव कॉलनी ब्राम्हणपाडा या ठिकाणी नाला बांधणे | 300000 |
| 35 | 10 | उल्हासनगर-5 येथील प्र.क्र.10 मधील विरतानाजीनगर मध्ये श्रीराम हिवाळे यांच्या घराजवळ 10 बैठकीचे शौचालय बांधणे | 496800 |
| 36 | 14 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र.14 मधील साईलिला आर्केड बिल्डिंगपासून सरस्वती शाळेपर्यंतचा नाला बांधणे | 299900 |
| 37 | 10 | वीरतानाजी नगर मधील महेश सबलोक यांच्या घराजवळ 10 बैठकीचे शौचालय बांधणे | 496800 |
| 38 | 9 | उल्हासनगर-4 येथील प्र.क्र.9 मधील रामजी आंबेडकर नगर येथील हिरालाल गायकवाड पासून नगरपालिका शौचालयापर्यंत मधुकर साजवे यांच्या घरापासून बाबन मोरे यांच्या घरापर्यंत आर.एस.रायबोले पासून करतार सिंग यांच्या घरापर्यंत नाला बांधणे | 298300 |
| 39 | 14 | उल्हासनगर-4 येथील प्र.क्र.14 मधील देवकी प्लाझा बिल्डिंग पासून बॉडी हेल्थ क्लबपर्यंतचा नाला बांधणे | 299000 |
| 40 | 10 | उल्हासनगर-4, प्र.क्र.10 येथे 10 सीटचे शौचालय बनविणे | 499900 |
| 41 | 8 | उल्हासनगर-3, प्र.क्र.8 सम्राट अशोक नगर येथील भिमराव वाघे यांचेघरापासून ढोके यांचेघरापर्यंत नाली बनविणेबाबत | 299900 |
| 42 | 8 | उल्हासनगर-3, प्र.क्र.8 सम्राट अशोक नगर येथील आरपीआय ऑफीस ते साकव, पांडे किराणा ते ओम नवनाथ कम्युनिकेशन, ढोके यांचे घरापासून हेल्थ सेंटर येथे नाली बनविणेबाबत | 299950 |
| 43 | 15 | उल्हासनगर-4 येथे, प्रभाग क्र.15 मध्ये गजानन नगर साईनाथ कॉलनी ते एकविरा कॉलनी पर्यंत नाला बनविणे बाबत | 499970 |

| एकूण प्राकलनीय किंमत रु. | 15162227 |
|---|---|

महासभा ठराव क्र: १०६ दिनांक:–२०/३/२००६

सुचकाचे नाव :– श्री. नाना पवार

अनुमोदकाचे नाव :– श्री. रामदास उमाप

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत उपरोक्त ४३ विविध कामांच्या प्राकलनास व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. २३ वाचुन दाखवितात

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. २३:–** अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या मिळकत धारकांना मालमत्ता करात सुट देणेबाबत.

---

काही सदस्य :–पास–पास......

मा. महापौर :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. २३:–** अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या मिळकत धारकांना मालमत्ता करात सुट देणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरात २६ जुलै ते २८ जुलै २००५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पुरपरिस्थितीत बाधित झालेल्या मालमत्ता धारकांना सन २००५–०६ चे मालमत्ता करात सुट देणेबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

शहरात बाधित झालेल्या निवासी/ अनिवासी मालमत्ता धारकास शासनातर्फे अंदाजे ४ कोटी वित्तीय अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. शिवाय महानगरपालिका तर्फे नागरीकांना अन्न, धान्य, औषधे, चटई, जेवण, आरोग्य सेवा इत्यादी पुरविण्यात आल्या होत्या. अशा नागरीकांचा तपशिल तहसिलदार, उल्हासनगर या कार्यालयाकडुन उपलब्ध करुन घेण्यात आलेला असुन अदयापपर्यंत अनुदान वाटप केलेल्या नागरीकांची संख्या

एकुण २८,९१६ दिसते. तहसिलदार, उल्हासनगर यांच्याकडुन ज्या नमुन्यात माहिती प्राप्त झालेली आहे. त्या नमुन्यात फक्त बांधिताचे नाव, कुटुंबातील सदस्यांची संख्या, क्षेत्र व अनुदानाची रक्कम इत्यादी नमुद करण्यात आलेली आहे.

सदर माहितीच्या अनुषंगाने करात सवलत देणेसाठी प्राप्त होणा—या अर्जांवर निर्णय घेतांना खालील बाबींची पूर्तता होणे अनिवार्य आहे.

४. महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत असलेला मालमत्ता क्र./वार्ड क्र. इत्यादी बाबींचा तपशिल यादी मध्ये नमुद नाही.

५. तसेच मालमत्तेचा पुर्ण पत्ता यादीमध्ये नोंदविण्यात आलेला नाही.

६. ज्या नागरीकांना आर्थिक अनुदान वाटप करण्यात आलेले आहे ती व्यक्ती महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे मालमत्ताधारक/भोगवटादार असल्याची खात्री होत नाही.

वरील बाबींचे कमतरतेमुळे मालमत्ताधारक/भोगवटाधारकाचे नाव, मालमत्ता क्र., वार्ड क्र., पत्ता शोधणे तसेच त्या अनुषंगिक इतर बाबींची पुर्तता करुन अर्जाचा निपटारा करणेस अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

महानगरपालिका हद्दीत अंदाजे एकुण १५०००० मिळकतींवर कर आकारणी करण्यात येते. अनुदान प्राप्त झालेल्या २८,९१६ मालमत्तांना करात सवलत दिल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम होईल.

महानगरपालिकेची आर्थिक स्थिती हालाखीची असल्याने शहरातील नागरीकांना मुलभुत सेवा पुरविण्यास प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. त्यामुळे महानगरपालिकेवर विविध कर्जाचा बोजा खालीलप्रमाणे निर्माण झाला आहे.

| अ. क्र. | तपशिल | थकित रक्कम |
|---|---|---|
| १. | एम आय डी सी | रु. ४७.०० कोटी |
| २. | पाणी पुरवठा योजना कर्ज | रु. ११.२६ कोटी |
| ३. | भुयारी गटारे योजना कर्ज | रु. १०.७२ कोटी |
| ४. | ठेकेदार व पुरवठादार यांचे देयके | रु. १०.०० कोटी |

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा बोजा असल्याने वारंवार पाणीकपातीचा प्रश्न निर्माण होत आहे. यांची सर्व सन्माननिय सदस्यांना जाणीव आहे.

सबब, महानगरपालिकेची वित्तीय स्थिती पाहता अतिवृष्टीमुळे निर्माण झालेला पुर परिस्थितीत बाधित झालेल्या नागरीकांना मालमत्ताकरात सवलत देण्याचा प्रस्तावास शिफारस करता येत नाही.

<u>महासभा ठराव क्र:</u> १०७ <u>दिनांक:—२०/३/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्री नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :— श्री राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २६ व २७ जुलै २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित व्यक्तिंनी भोगवटा केलेल्या मालमत्ता / इमारतींच्या बाबतीत सन २००५—०६ चा मालमत्ता कर (पाणीपट्टी व शासकीय कर वगळुन) माफ करण्यास मान्यता देत आहे.

*परंतु*

१ महानगरपालिकेने विहीत केलेल्या नमुन्यात बाधित व्यक्तिंनी सप्टेंबर २००६ पर्यंत करमाफीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

२ बाधित व्यक्तिचे अथवा कुटूंबातील सदस्याच्या नावाची नोंदणी महापालिकेच्या कर आकारणी पुस्तकात असणे आवश्यक राहील. त्यासाठी अर्जासोबत शिधापत्रिका, दुकाने व संस्था नोंदणी परवाना, व्यापार परवाना अथवा इतर तत्सम कागदपत्रांची छायांकित प्रत जोडणे आवश्यक राहील.

३ ज्या व्यक्तिंना तहसिलदारांकडुन शासकीय अनुदान प्राप्त झाले असेल अशा व्यक्तिच करमाफीचा लाभ घेण्यासाठी अनुज्ञेय असतील. अतिवृष्टीमुळे बाधित झाल्याबाबत तहसिलदार, उल्हासनगर यांचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

४ अर्जासोबत पुराने नुकसान झाल्याचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहील.

५ कर निर्धारक व संकलक यांच्याकडे असे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांचे अभिप्राय घेतल्यानंतर अतिरिक्त आयुक्त अंतिम निर्णय घेतील.

६ अंतिम निर्णय झाल्यानंतर बाधित व्यक्तिचा सन २००५–०६ साठीचा मालमत्ता कर (पाणीपट्टी व शासकीय कर वगळुन) निर्लेखित झाल्याचे मानण्यात येईल.

७ बाधित व्यक्तिने यापूर्वी २००५–०६ च्या मालमत्ता कराच्या रकमेचा महापालिकेत भरणा केला असल्यास त्या रक्कमेचे पुढील वर्षात समायोजन करण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर रात्री ८.०० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:–२२/३/२००६

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २२/३/२००६ रोजीच्या</u>
<u>सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २२.३.२००६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

<u>१) मा. महापौर :–श्रीमती ज्योती कालानी</u>
<u>२) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३८. | श्रीमती भावना खिलनानी |
| ४. | श्री. सोनवणे नथु | ३९. | श्री. ठाकुर अशोक |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | ४०. | श्रीमती माने किरण |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना | ४१. | श्री. रमेश चव्हाण |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४२. | श्री. जाधव प्रशांत |
| ८. | श्री. वाघे शामु | ४३. | श्री. जाधव सुरेश |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४४. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४५. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४६. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४७ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४८. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४९. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५०. | श्री. भालेराव गौतम |
| १६. | श्री. उमाप रामदास | ५१. | श्रीमती वसिटा बेबी |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५२. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५३. | श्री. अंकुश म्हस्के |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५४. | श्री. चौधरी राजेंद्र |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५५. | श्री. पंजाबी नारायण |
| २१. | श्रीमती अनिता गुप्ता | ५६. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २२. | श्री. पवार नाना | ५७. | श्री. साधवानी मनोज |
| २३. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५८. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| २४. | श्री. जग्यासी राजु | ५९. | श्रीमती भटिजा कोमल |
| २५. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ६०. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २६. | श्री. निकम शांताराम | ६१. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २७. | श्री. टाले प्रमोद | ६२. | श्रीमती किरण माखिजा |
| २८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६३. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २९. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६४. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| ३०. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६५. | डॉ. श्रीमती निना नाथानी |
| ३१. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६६. | श्रीमती छाब्रिया भारती |
| ३२. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६७. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| ३३. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६८. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३४. | श्री. साधवानी मोहन | ६९. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३५. | श्री. सतरामदास जेसवानी | ७०. | श्रीमती मिनु दासानी |
| ३६. | डॉ. साधवानी जया | ७१. | श्रीमती करोतिया मालती |
| ३७. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७२. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| | | ७३. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| | | ७४ | श्री. पंजाबी लाल देवनदास |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, २. श्री. बच्चाराम रुपचंदानी, ३. श्री. राज असरोंडकर, ४. श्री. पाटील विश्वनाथ, ५. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ६. श्री. हरदास माखिजा, ७. श्री. राजेश वधारिया हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सांयकाळी ४.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. आयुक्त श्री. डी.एस. पाटील हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी अतिरिक्त आयुक्त श्री. नाना रौराळे हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. महापौर महोदया, आमच्या घरी वरसीचा कार्यक्रम असल्याने मी सर्वांना निमंत्रण पत्रिका वाटत आहे. तसेच आपण सर्वांनी कृपया त्यासाठी उपस्थित राहावे ही विनंती.

<u>मा. सचिव :—</u>दिनांक १ एप्रिल, २००६ पासुन स्थायी समितीचे ८ सदस्य निवृत्त होत असल्याने त्यांच्या जागी नव्याने ८ सदस्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने ८ पदांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आला होता. त्यासाठी ११ सदस्यांनी नामनिर्देशन पत्र भरले होते. परंतु विहित वेळेत मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण व मा. सदस्या श्रीमती बेबी वसिटा यांनी त्यांचे नामनिर्देशन पत्र मागे घेतलेले आहे. आता स्थायी समितीचे ८ सदस्यांचे पदासाठी ९ उमेदवार रिंगणात असून त्यांची नावे येणेप्रमाणे आहेत.

१. श्री. उमाप रामदास राघवजी
२. श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह
३. श्रीमती खांडेकर प्रेमा भिमराव
४. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज
५. श्रीमती बठिजा कोमल अमृत
६. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
७. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
८. श्री. वनवारी किशोर नारायणदास
९. श्री. साधवानी मोहन रहंदोमल

यामधून आपणांस केवळ ८ सदस्यांची निवड करायची आहे. ८ जागांसाठी ९ उमेदवार आहेत. आपणामधील कुणी उमेदवार जर आपली उमेदवारी मागे घेवू इच्छित असेल तर त्यासाठी ५ मिनिटाची वेळ दिली जात आहे.

**यावेळी मा. सदस्य श्री. लाल पंजाबी हे सभागृहाच्या बाहेर गेले.** 

**यावेळी मा. सदस्य श्री. रामदास उमाप यांनी त्यांची उमेदवारी मागे घेत असल्याबाबतचे पत्र मा. सचिव यांच्याकडे सादर केले. तसेच श्री.किशोर वनवारी यांनी त्यांची उमेदवारी मागे घेत असल्याबाबतचा अर्ज मा. महापौर यांच्याकडुन सचिवांकडे प्राप्त झाला तसेच मा. महापौरांनी त्याबाबतची घोषणा करणेस सचिवांना निर्देश दिले.**

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, श्री. रामदास उमाप यांनी त्यांची उमेदवारी मागे घेतली असल्याने तसेच इतर कोणी माघार घेतली नसल्याने आता फक्त आठच उमेदवार शिल्लक असल्याने ८ उमेदवार बिनविरोध निवडुन आल्याने घोषित करावे.

 **यावेळी मा. सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सचिव :—</u> श्री.रामदास उमाप व श्री. किशोर वनवारी यांनी त्यांचे अर्ज विथड्रॉ केले असुन.........

मा. महापौर :—श्री. किशोर वनवारी यांचा फॉर्म रिजेक्ट केला जात आहे, रिजेक्ट, रिजेक्ट, रिजेक्ट. फॉर्म रिजेक्ट. श्री. किशोर वनवारी यांच्या सुचक व अनुमोदकाने फॉर्म विथड्रॉ केला असल्याने त्यांचा फॉर्म रिजेक्ट करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— उमाप साहेब आपण बोला. श्री. किशोर वनवारी बाहेर होवुच शकत नाही.

मा. महापौर :— श्री. किशोर वनवारी यांच्या सुचक व अनुमोदकाने फॉर्म विथड्रॉ केला असल्याने त्यांचा फॉर्म रिजेक्ट करण्यात येत आहे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी:— कायदा काय आहे ते सांगा. विधी अधिका—यांनी येथे येवुन सांगावे. सचिव साहेब आपण सांगा की नियम काय आहे?

मा. महापौर :— फॉर्म रिजेक्ट. बैठकीचे कामकाज संपले आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— चिटींग चालणार नाही. चिटींग बंद करा. चिटींगचा धंदा बंद करा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मी उमेदवार स्वत: येथे उपस्थित आहे. मी माझी उमेदवारी विथड्रॉ केलेली नाही. तसेच आज अर्जाची छाननीही नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— सचिव साहेब, यावर तुम्ही तुमचे मत प्रदर्शित करा.

मा. महापौर :— श्री. रामदास उमाप यांनी त्यांचा फॉर्म विथड्रॉ केला आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— तुम्ही ५ मिनिटं वेळ दिली होती. त्यामध्ये श्री. उमाप यांनी त्यांचा अर्ज मागे घेतला आहे.

मा. महापौर :— श्री. किशोर वनवारी यांचा फॉर्म रिजेक्ट झाला असुन उर्वरित ७ उमेदवार निवडुन आले आहेत.

प्रस्तावना

विषय क्र. १:— दि. १ एप्रिल, २००६ पासुन निवृत्त होणा—या ८ स्थायी समिती सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणूक करणे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये प्रत्येक वर्षी स्थायी समितीमध्ये निवडून आल्यानंतर एका वर्षानंतर त्या कलमाचे पोटकलम ३ अन्वये कोणते निम्मे सदस्य व कशाप्रकारे निवृत्त होतील हे विर्निदिष्ट करण्यात आलेले आहे. त्याअर्थी स्थायी समितीचे जे सदस्य जास्तीत जास्त कालावधीपर्यंत आपल्या पदावर असतील ते सदस्य निवृत्त होतील. त्यानुसार दिनांक १/४/२००६ पासून निवृत्त होणा—या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१. श्री. वनवारी किशोर नारायणदास
२. श्री एडके गणपत गोविंद
३. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
४. श्रीमती जावळे संगिता रमेश
५. श्रीमती वनवारी मोना अशोक
६. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
७. श्री. सोनवणे नथु काशिराम
८. श्री. बठिजा संजय रामचंद

निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नविन आठ सदस्यांची नेमणूक केली

पाहिजे. त्यामुळे या आठ पदांच्या रिक्त जागा भरण्यासाठी दिनांक २२/३/२००६ रोजीच्या सभेच्या कार्यसूचीवर क्र. १ चा विषय असून निवडणूक कार्यक्रमाच्या तरतूदीप्रमाणे दिनांक १४/३/२००६ रोजी ज्या उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केली व ज्यांची नामनिर्देशन पत्रे दिनांक १६/३/२००६ रोजी वैधरित्या घोषित करण्यात आली. त्यांची नावे येणेप्रमाणे.........

१. श्री. उमाप रामदास राघवजी
२. श्री. खेमाणी देवेद्रसिंह चंदासिंह
३. श्रीमती खांडेकर प्रेमा भिमराव
४. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज
५. श्रीमती बठिजा कोमल अमृत
६. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
७. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
८. श्री. वनवारी किशोर नारायणदास
९. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
१०. श्री. चव्हाण रमेश
११. श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास

वरील उमेदवारांपैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली.

१. श्रीमती बेबी वसिटा
२. श्री. रमेश चव्हाण

सभेस प्रारंभ झाल्यानंतर जे उमेदवार आपली उमेदवारी मागे घेवु इच्छित असतील त्यांच्यासाठी ५ मिनीटांचा वेळ देण्यात आला असता सदर वेळेमध्ये श्री. रामदास उमाप व श्री. किशोर वनवारी यांचे उमेदवारी मागे घेत असल्याबाबतचे अर्ज प्राप्त झाल्याने उर्वरित ७ उमेदवार निवडून आल्याची घोषणा करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. १०७ अ — दिनांक :— २२/३/२००६.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार स्थायी समिती सदस्यपदी खालीलप्रमाणे ७ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

१. श्री. खेमाणी देवेद्रसिंह चंदासिंह
२. श्रीमती खांडेकर प्रेमा भिमराव
३. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज
४. श्रीमती बठिजा कोमल अमृत
५. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
६. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
७. श्री. साधवानी मोहन रहंदोमल

मंजुर

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** छाननीमध्ये माझा अर्ज वैध घोषित झाला आहे. सचिव साहेब, आपण अर्जांची जी छाननी ठेवली होती, त्यामध्ये माझा अर्ज वैध घोषित झाला होता. आज छाननी करण्याचा दिवस

नाही. ९ अर्ज वैध घोषित झाले असुन सचिव साहेबांनी ते वाचुन देखिल दाखविले आहे. तसेच बाहेर त्यांची यादी देखिल लावली आहे. मतपत्रिका देखिल ९ उमेदवारांची आहे.

मा. महापौर :—श्री. रामदास उमाप विथड्रॉ, श्री. खेमाणी दर्शनसिंग, श्रीमती खांडेकर प्रेमा भिमराव, श्रीमती छाब्रिया भारती पहिलाज, श्रीमती बठिजा कोमल,...........

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— हे कायदयाच्या विपरित आहे. आज छाननी करण्याचा दिवस नाही. सचिव साहेबांनी केलेल्या छाननी मध्ये ९ अर्ज वैध घोषित झाले आहे.

मा. महापौर :— श्री. म्हस्के अंकुश, श्री. गोविंदराम लुंड, श्री. किशोर वनवारी फॉर्म रिजेक्ट, श्री. साधवानी मोहन अश्या ७ जणांचा फॉर्म मंजुर झाला आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— सगळे पास झाले आहे, आता रिजेक्ट करु शकत नाही. हा एनसीपी पक्षाचा अपमान आहे. हा श्री. अरुण गुजराथी साहेबांचा अपमान आहे, ज्यांनी आदेश दिला आहे. आज छाननीचा दिवस नाही. हे चुकचे आहे. सर्वानुमते निर्णय झाला आहे. कायदयाच्या दृष्टीने चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— चिटींग बंद करा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आज छाननीचा दिवस नाही. सचिव साहेब, ९ अर्ज वैध घोषित झाले आहेत. त्यापैकी एकाने माघार घेतली असल्याने ८ बिनविरोध निवडुन आले आहेत.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :— मा. महापौरांनी निर्णय दिला आहे, त्याची अंमलबजावणी केली जावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— सचिव साहेब, कायदा काय आहे ते तुम्ही सांगा. आज छाननीचा दिवस नसल्याने फॉर्म रिजेक्ट करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— सचिव साहेब, आपण उत्तर दया.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— सचिव साहेब, यासाठी जबाबदार आपण असाल. मा. महापौरजी कायदयाच्या विरोधात चुकीचा निर्णय देत आहेत.

मा. सदस्या श्रीमती कमला शर्मा :—मतदान घ्या, मतदान....

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— सचिव साहेब, नेमके काय झाले आहे?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— चोरांचे राज्य संपले आहे.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :— मा. महापौरांनी निर्णय घेतला आहे.

मा. सदस्या श्रीमती कमला शर्मा :—मतदान घ्या, मतदान....

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— मतदान घेण्याची हिंमत दाखवा. तुम्हांला कायदा कळतो तरी काय? मतदान घ्या म्हणत आहात. सचिव साहेब आपण उत्तर दया.

मा. महापौर :— ज्याला बोलण्याची हौस असेल त्याने बाहेर जावुन बोलावे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :—मा. महापौरांनी निर्णय घोषित केला आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—कायदा काय आहे ते सांगा.

मा. सचिव :— कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष द्या.

**मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :–** सचिव साहेब, नियम तरी सांगा.

**मा. सचिव :–** मी बोलायला तयार आहे. परंतु तुम्ही ऐकायला तयार नाहीत.

**मा. महापौर :–** बैठक समाप्त होत आहे. कृपया सर्वांनी राष्ट्रगितासाठी उभे रहावे.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–** तुम्ही किशोर वनवारीला का घाबरता? तो तर तुमचाच आहे.

यावेळी मा. महापौरांनी जनगणमन या राष्ट्रगीताच्या गायनास सुरुवात करुन सायंकाळी ५.०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

टिप :– मा. सदस्य श्री. किशोर वनवारी, श्री. लाल पंजाबी, श्रीमती निता आहुजा, श्रीमती मिनु दासानी, श्री. नथु सोनवणे हे महासभेला उपस्थित होते परंतु त्यांनी हजेरीपटावर स्वाक्षरी केली नव्हती त्यांना सभेस उपस्थित समजण्यात येईल

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–३१/३/२००६

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ३१/३/२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक ३१/३/२००६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :–श्रीमती ज्योती कालानी
२) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३९. | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ४०. | श्री. राज असरोंडकर |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ४१. | श्री. ठाकुर अशोक |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४२. | श्रीमती माने किरण |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना | ४३. | श्री. रमेश चव्हाण |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४४. | श्री. जाधव प्रशांत |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४५. | श्री. जाधव सुरेश |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४६. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४७ | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४८. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५०. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५१. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १६. | श्री. उमाप रामदास | ५२. | श्री. भालेराव गौतम |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५३. | श्रीमती वसिटा बेबी |
| १८. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५४. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५५. | श्री. अंकुश म्हस्के |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५६. | श्री. चौधरी राजेंद्र |
| २१. | श्रीमती अनिता गुप्ता | ५७. | श्री. पंजाबी नारायण |
| २२. | श्री. पवार नाना | ५८. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २३. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५९. | श्री. साधवानी मनोज |
| २४. | श्री. जग्यासी राजु | ६०. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| २५. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ६१. | श्रीमती भटिजा कोमल |
| २६. | श्री. निकम शांताराम | ६२. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २७. | श्री. टाले प्रमोद | ६३. | श्रीमती किरण माखिजा |
| २८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २९. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| ३०. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६६. | डॉ. श्रीमती निना नाथानी |
| ३१. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६७. | श्रीमती छाब्रिया भारती |
| ३२. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| ३३. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३४. | श्री. साधवानी मोहन | ७०. | श्रीमती करोतिया मालती |
| ३५. | श्री. सतरामदास जेसवानी | ७१. | श्रीमती मिनु दासानी |
| ३६. | डॉ. साधवानी जया | ७२. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३७. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७३. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३८. | श्रीमती भावना खिलनानी | ७४. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. वाघे शामु, २. श्री. पाटील विश्वनाथ, ३. श्री. जयसिंघानी अनिल, ४. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, ५. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ६. श्री. हरदास माखिजा, ७. श्री. राजेश वधारिया हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सायंकाळी ४.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—</u> मा. महापौर महोदया, सभेला सुरुवात करण्यापुर्वी मी येथे श्रध्दांजली प्रस्ताव सादर करु इच्छितो. आपले उल्हासनगर शहराचे माजी कॉंग्रेस जिल्हा अध्यक्ष श्री. दुनिचंद कालानी यांच्या पत्नी श्रीमती विमला कालानी व शिक्षण मंडळाचे माजी सभापती श्री. परसराम कालानी यांच्या पत्नी श्रीमती जयश्री कालानी, तसेच उल्हासनगर शहरातील कॉंग्रेस नेते श्री. गोवर्धन गिडवानी यांचे काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. तरी सभागृहाने त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी अशी मी विनंती करतो.

---

<u>शोक प्रस्ताव</u>

सुचकाचे नाव :– श्री. दिलीप लालवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

उल्हासनगर शहराचे माजी कॉंग्रेस जिल्हा अध्यक्ष श्री. दुनिचंद कालानी यांच्या पत्नी श्रीमती विमला कालानी व शिक्षण मंडळाचे माजी सभापती श्री. परसराम कालानी यांच्या पत्नी श्रीमती जयश्री कालानी, तसेच उल्हासनगर शहरातील कॉंग्रेस नेते श्री. गोवर्धन गिडवानी यांचे काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १०७ ब** **दिनांक:–३१/३/२००६**

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्रीमती विमला कालानी, श्रीमती जयश्री कालानी, श्री. गोवर्धन गिडवानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १:– दि. १ एप्रिल, २००६ पासुन रिकाम्या होणा–या १ स्थायी समिती सदस्यपदाची जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणूक करणे.

---

**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–** मा. महापौर महोदया, निवडणूक प्रक्रिया सुरु होण्यापुर्वी मी काही वेळ घेवु इच्छितो जेणेकरुन बिनविरोध निर्णय होवु शकेल. आपण आम्हांला विचार करण्यासाठी एक–दिड तासाचा कालावधी दयाल अशी आम्ही आशा करतो.

**मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :–**मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त साहेब, मला देखिल थोडा वेळ हवा आहे. आम्हांला थोडा वेळ दया.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** मा. महापौर महोदया, श्री. नारायण पंजाबी व श्रीमती सिमा मोकल यांनी निवडणूक प्रक्रिया सुरु होण्यापुर्वी आपल्याकडे काही कालावधीची मागणी केली आहे परंतु मला असे वाटते की, निवडणूकीसाठी अर्ज दाखल केल्यानंतर विचार करण्यासाठी पुष्कळ कालावधी होता. आता या नंतर दुसरी बैठक शहराच्या विकासाबद्दल आहे. ती बैठक ५.०० वाजता आहे. ही बैठक ४.०० वाजता होती परंतु आता ४. ४५ झाले आहे. त्यामुळे अजुन वेळ देणे योग्य होणार नाही. जो निर्णय घ्यायचा होता तो आधी देखिल घेवु शकले असते, आता देखिल होवु शकतो. जर बिनविरोध निर्णय झाला तर चांगलेच होईल.जर विचार करण्यासाठी वेळ मागत असतील तर यापुर्वी त्यांना पुष्कळ वेळ मिळाला आहे. पाच– दहा मिनिटांसाठी ठिक आहे परंतु एक–दिड तास बसणे म्हणजे फार होईल. ही या महिन्यातील तिसरी बैठक आहे. २० तारीख,

२२ तारीख.  २२ तारखेला निवडणूक झाल्यानंतर आज ३१ तारीख आहे म्हणजे ९ दिवस उलटून गेले आहेत. त्यामुळे विचार करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला आहे.  आता पुन्हा विचार करायचा असेल तर पाच–दहा मिनिटे ठिक आहे परंतु एक–दिड तास योग्य होणार नाही.  असे करुन पुढची बैठक पुढे ढकलणे योग्य होणार नाही. कारण तो विषय देखिल महत्वाचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–</u> ५.०० वाजेची बैठक झाल्यानंतर वेळ दिला तरी चालेल.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> मा. महापौर महोदया, आमचे सदस्य श्री. नारायण पंजाबी व श्रीमती सिमा मोकल त्यांचे निवेदन आपल्याकडे केले आहे.  जर बिनविरोध निवडणूक झाली तर ती एक चांगली सुरुवात होईल.  जर त्यांना आपसात चर्चा करण्यासाठी एक–दिड तासाचा वेळ हवा असेल, सर्वानुमते निर्णय होत असेल तर ती एक चांगली गोष्ट होईल.  त्यामुळे दोन्ही सदस्यांच्या निवेदनावर गंभीरतेने विचार करावा. धन्यवाद.

<u>मा. महापौर :–</u>आता लवकरच दुस–या बैठकीची वेळ होत आहे.  तसेच मा. सदस्यांना विचार करण्यासाठी काही कालावधी हवा आहे.  जर बिनविरोध निर्णय झाला तर फार चांगले होईल.  म्हणुन मी सभागृहाला निर्देश देते की, दुस–या बैठकीला आता सुरुवात करुया.  तसेच ती बैठक पुर्ण झाल्यानंतर जे सदस्य उमेदवारी मागे घेवु इच्छित असतील ते येथे मागे घेवु शकतात.  मी माझ्या दालनात उपस्थिती आहे.  तेथे देखिल घेवु शकतात.  त्यानंतर दुसरी बैठक पुढे सुरु करु.  आता दुस–या बैठकीला आपण सुरुवात करु त्यानंतर पहिली बैठक सुरु करु. ५.०० वाजायला १०–१५ मिनिटे शिल्लक आहेत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> आपण दुस–या बैठकीचे कामकाज वेळे आधी सुरु करु शकत नाही.

<u>मा. महापौर :–</u> दुसरी बैठक ५.०० वाजता सुरु करुन त्यानंतर या बैठकीचे कामकाज सुरु करु.  तोपर्यंत आपले सन्माननिय सदस्य विचार करु शकतील.

सायंकाळी ४.४५ वाजता मा. महापौरांनी बैठकीचे कामकाज स्थगित केल्याचे जाहिर केले.

सायंकाळी ५.३० वाजता बैठकीस पुनश्चः प्रारंभ करण्यात आला. यावेळी खालील सदस्य सभागृहात उपस्थित होते.

<u>१)  मा. महापौर :–श्रीमती ज्योती कालानी</u>
<u>२) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३९. | श्री. राज असरोंडकर |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ४०. | श्री. ठाकुर अशोक |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ४१. | श्रीमती माने किरण |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४२. | श्री. रमेश चव्हाण |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना | ४३. | श्री. जाधव प्रशांत |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४४. | श्री. जाधव सुरेश |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४५. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४६. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४७ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४९. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५०. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५१. | श्री. भालेराव गौतम |
| १६. | श्री. उमाप रामदास | ५२. | श्रीमती वसिटा बेबी |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५३. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५४. | श्री. अंकुश म्हस्के |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५५. | श्री. चौधरी राजेंद्र |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५६. | श्री. पंजाबी नारायण |
| २१. | श्रीमती अनिता गुप्ता | ५७. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २२. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५८. | श्री. साधवानी मनोज |
| २३. | श्री. जग्यासी राजु | ५९. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| २४. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ६०. | श्रीमती भटिजा कोमल |
| २५. | श्री. निकम शांताराम | ६१. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २६. | श्री. टाले प्रमोद | ६२. | श्रीमती किरण माखिजा |
| २७. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६३. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २८. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६४. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २९. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६५. | डॉ. श्रीमती निना नाथानी |
| ३०. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६६. | श्रीमती छाब्रिया भारती |
| ३१. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६७. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| ३२. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६८. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३३. | श्री. साधवानी मोहन | ६९. | श्रीमती करोतिया मालती |
| ३४. | श्री. सतरामदास जेसवानी | ७०. | श्रीमती मिनु दासानी |
| ३५. | डॉ. साधवानी जया | ७१. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३६. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७२. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३७. | श्रीमती भावना खिलनानी | ७३. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३८. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | | |

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— मा. महापौर महोदया, आताच आम्हांला एक दु:खद घटना कळली आहे. गलिच्छ वस्ती निर्मुलन समितीचे सभापती श्री. नाना पवार यांचा अपघात झाला आहे. त्यामुळे ही सभा काही दिवसांसाठी स्थगित करावी असे निवेदन मी सभागृहाला व मा. महापौरांना करीत आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:— मा. महापौरजी, खोटा अपघात करु नका. खरे झाले असेल तर बोला. अन्यथा सदस्यावर वाईट वेळ येईल. घाणेरडे राजकारण करण्यासाठी असे काम करु नका. याआधी देखिल एकदा असेच झाले आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :—मा. महापौर महोदया, ही फार दु:खाची बाब आहे की, आपले सदस्य श्री. नाना पवार यांचा अपघात झाला आहे व आपले काही सदस्य बाके वाजवत आहेत. यावर आमचा आक्षेप आहे. हे मर्यादांचे उल्लंघन आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– मा. महापौर महोदया, आमचा असा आरोप आहे की, आपणांस स्थायी समितीमध्ये आपला पराभव दिसत असल्याने यासाठी बनाव केला जात आहे, नाटक केले जात आहे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहेत हे कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– आपणांस कोणी सांगितले की, अपघात झाला आहे, ते कोणत्या दवाखान्यात दाखल आहेत?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मा. महापौर महोदया, आमच्या सभापतींसोबत एक दु:खद घटना झाली आहे असे असतांना बाके वाजविले जातात. हे योग्य नाही. त्यामुळे आमची आपणांस विनंती आहे की, आजची सभा काही दिवसांसाठी स्थगित केली जावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मा. महापौर महोदया, आपले काही सदस्य बाके वाजवत आहेत ते श्री. नाना पवार यांचा अपघात झाला म्हणुन वाजवत नाहीत. जेव्हा पहिल्या सभेचे कामकाज सुरु झाले त्यावेळी सांगायला हवे होते की, श्री. नाना पवार यांचा अपघात झाला आहे. पहिल्या सभेचे कामकाज देखिल चालायला नको होते. आता अचानक पहिल्या सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर ........

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :– आम्हांला आताच निरोप मिळाला असल्याने आम्ही आता सांगत आहोत. आम्हांला काय आधीच माहिती होती काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मा. महापौर महोदया, श्री. दर्शनसिंग खेमाणी हे आताच सभागृह नेता झाले आहेत त्यामुळे त्यांनी शिकायला हवे की, एखादा सदस्य बोलत असतांना त्याचे बोलणे झाल्यानंतरच बोलायला हवे. त्यांना ही मर्यादा शिकावी लागेल. माझी एक विनंती आहे की, ही जी महासभा स्थगित केली जात आहे तर आजची ही महासभा स्थगित करता येणार नाही. दुसरे म्हणजे महासभा मतदान घेवुन स्थगित करावी लागते. जर आपणांस सभा स्थगित करायची असेल तर आपण मतदान घ्या. जर बहुमत सभा स्थगित करण्याच्या बाजुने असेल तर आमचे काही म्हणणे नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– किशोरजी, आता निवडणूकीची प्रक्रिया सुरु झाली आहे. सचिव साहेब, एकदा निवडणूकीची प्रक्रिया सुरु केल्यानंतर थांबवता येते का हे आपण सांगा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–ज्यांना जायचे असेल त्यांनी मतदान करुन लवकर जावे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– कायदा काय आहे ते सांगा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– जर अशाप्रकारे लोकशाहीची हत्या होत असेल तर आम्ही एकाही महासभेचे कामकाज चालु देणार नाही. निवडणूक प्रक्रिया रद्द करता येवु शकते का हे आपण सांगा.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– तुम्ही सांगा, हसत का आहात?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– ३१ तारखेला सदस्य निवृत्त होत असल्याने दुस–या सदस्यास तेथे जाणे आवश्यक आहे. आपण याबद्दल माहिती दयावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– निवडणूक प्रक्रिया अध्यात थांबविता येईल काय? आपण बैठक सुरु झाल्यानंतर पहिली बैठक दुस–यांदा व दुसरी बैठक पहिल्यांदा घेवु असे देखिल सांगितले आहे. आता निवडणूक प्रक्रिया सुरु झाली आहे हे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी देखिल सांगितले आहे. तसेच जे सदस्य जावु इच्छित असतील ते मतदान करुन तेथे जावु शकतात. आम्ही देखिल मतदानानंतर त्यांना भेटायला जावु. परंतु आधी निवडणूक प्रक्रिया पुर्ण करावी.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– श्री. नाना पवार हे कोणत्या हॉस्पीटल मध्ये आहेत? माझे चांगले मित्र आहेत.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर महोदया, श्री. नाना पवार थोडया वेळापुर्वी येथे बैठकीमध्ये होते. अचानक बाहेर जावुन इमारतीतुन पडले काय?

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— कायदा काय आहे ते सांगा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. सचिव साहेब, आपण माहिती देत नाहीत. व नंतर दुस—या बैठकीत सांगाल की मला बोलु दिले नाही. त्यामुळे आपण सभेला माहिती दयावी असे निवेदन करतो. निवडणूक प्रक्रिया थांबविता येवु शकते काय?

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— सचिव साहेब, उत्तर दया.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौरजी, श्री. नाना पवार यांचा अपघात झाला असेल तर आम्हांला सर्वांना याचे दु:ख वाटत आहे. ही प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर आपण सर्व त्यांना बघायला जावु. कोणत्या हॉस्पीटलमध्ये आहेत ते सर्व सोबत जावुन बघु. ते आपले सदस्य आहेत त्यामुळे आपण त्यांना जावुन बघायचे आपले कर्तव्य आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आपण बिनविरोध निर्णय घेणार आहात. त्यासाठी आपण एक तास वेळ घेतला आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— अपघात झाला असेल तर जावु ना?

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— सचिव साहेब, आपण संभ्रमात का पडला आहात? तुम्ही संभ्रमात पडु नका. कायदा काय आहे ते सांगा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा. महापौर, उप—महापौर, या निवडणुक प्रक्रियेतुन काही होईल अथवा नाही? परंतु सर्व शहरवासी बघत आहेत की, सभागृहात काय होते, राजनिती काय असते? तसेच उल्हासनगर शहराची राजनिती कशी सुरु आहे. एखादया गोष्टीसाठी काय काय बहाणे सांगितले जातात हे ते देखिल बघत आहेत व आम्ही देखिल बघत आहोत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— त्या गरीबाचा अपघात का केला?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— दर्शनसिंग हे आता सभागृह नेता झाले आहेत. श्री. किशोर वनवारी यांनी ज्या चुका केल्या आहेत त्या त्यांनी पुन्हा करायला नको.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— तुम्ही राजकारणाने प्रेरित होवु नका, लोकशाहीचा खुन करु नका.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—प्रकाशजी, तुम्ही कायदा सांगा. पुन्हा सांगाल की मला बोलण्याची संधी दिली नाही. सत्य सांगणे हे आपले काम आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—श्री. नाना पवार यांचा अपघात करु नका.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— आधी खुलासा करा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत की, एकदा निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यानंतर कोणतेही न्यायालय ती थांबवु शकत नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— सचिव साहेब, उत्तर दया. तुम्ही माईक सुरु करुन बोला.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—सभागृहाचा तुमच्यावर विश्वास आहे. लोकशाहीचा खुन व्हायला नको.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— तुम्ही गळा दाबणार नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– कोणाचाही बळी चढवु नका.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– उत्तर दया. उशिर करु नका. अजुन उशिर व्हायला नको.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– अजुन कुणाचा अपघात व्हायला नको.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– सचिव साहेब, श्री. अरुण गुजराथी साहेबांचा पुन्हा अपमान होत आहे. श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचा आदेश आहे, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेसचा.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– कायदा काय आहे हे सभागृहाला सांगा. ते राष्ट्रवादी बद्दल बोलले परंतु कायदा काय आहे ते सर्व सभागृहाला सांगा. निवडणूकीची प्रक्रिया सुरु झाली आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–हा कायदा आहे. ३१ तारखेपर्यंत सदस्यांची निवडणूक व्हायला हवी. हा कायदा आहे. नाहीतर तोपर्यंत सभापतीची निवडणूक होवुच शकत नाही.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– प्रक्रिया सुरु झाल्यानंतर ती थांबविण्याचा कायदा आहे का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– उल्हासनगरमध्ये कायदा नाही का?

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :–कायदा चालत नसेल तर आम्ही चालवु.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–जंगलराज आहे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– ते संपले आहे. पहिल्यांदा आपणांस पत्र मिळाले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–जंगलराज आहे, जंगलराज.......

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :–श्री. वनवारीजी आपण ६–८ वर्षापासुन सभागृह नेता होतात. आणि आज आपणांस येथे जंगलराज दिसत आहे का? तुम्हांला लाज वाटायला हवी. शेम टु यु.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहेत हे कळून येत नव्हते.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :–कायदा सर्वात मोठा आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– कायदयापेक्षा कोणीही मोठे नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :– कायदयापेक्षा कोणीही मोठे नाही हे सर्वांना माहिती आहे. तुम्हांला आज जंगलराज दिसत आहे का?

यावेळी मा. सदस्य श्री. मनोज साधवानी, श्री. गोबिंदराम लुंड व श्री. सतरामदास जेसवानी हे सभागृहाच्या बाहेर गेले.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– तुम्ही देखिल एक दिवस शिकार व्हाल. काळजी करु नका. लवकरच तुम्ही देखिल श्री. किशोर वनवारी यांचे समर्थन कराल. निवडणूक प्रक्रिया सुरु झाली आहे. श्री. जमनुजी आपण दया कारण आपल्या पार्टीचा प्रश्न आहे. आम्ही कोणाच्याही पार्टीत दखल देत नाही.

मा. महापौर :— माझ्या टेबलवर दोन विथड्रावल फॉर्म आहेत. एक श्री. नारायण पंजाबी यांचा व एक श्री. किशोर वनवारी यांचा आहे. ज्यांचा मी स्विकार करीत आहे. व श्रीमती सिमा मोकल यांना सदस्य म्हणुन घोषित करीत आहे.

---

☑

प्रस्तावना

विषय क्र. १:— दि. १ एप्रिल, २००६ पासुन रिकाम्या होणा—या १ स्थायी समिती सदस्यपदाची जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणूक करणे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये प्रत्येक वर्षी स्थायी समितीमध्ये निवडून आल्यानंतर एका वर्षानंतर त्या कलमाचे पोटकलम ३ अन्वये कोणते निम्मे सदस्य व कशाप्रकारे निवृत्त होतील हे विर्निदिष्ट करण्यात आलेले आहे. त्याअर्थी स्थायी समितीचे जे सदस्य जास्तीत जास्त कालावधीपर्यंत आपल्या पदावर असतील ते सदस्य निवृत्त होतील. त्यानुसार दिनांक १/४/२००६ पासुन ८ सदस्य निवृत्त होत असल्याने दिनांक २२/३/२००६ रोजी स्थायी समिती सदस्यांच्या निवडणूकीचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. सदर दिवशी खालीलप्रमाणे ७ उमेदवार बिनविरोध निवडून आले होते.

१. श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह
२. श्रीमती खांडेकर प्रेमा भिमराव
३. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज
४. श्रीमती बठिजा कोमल अमृत
५. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
६. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
७. श्री. साधवानी मोहन रहंदोमल

परंतु स्थायी समिती सदस्याचे एक पद रिक्त असल्याने रिक्त जागा भरण्यासाठी दिनांक ३१/३/२००६ रोजीच्या सभेच्या कार्यसूचीवर क्र. १ चा विषय असून निवडणूक कार्यक्रमाच्या तरतूदीप्रमाणे दिनांक २४/३/२००६ रोजी ज्या उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केली व ज्यांची नामनिर्देशन पत्रे दिनांक २७/३/२००६ रोजी वैध घोषित करण्यात आली. त्यांची नावे येणेप्रमाणे.........

१. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ
३. श्रीमती मोकल सिमा चंदाराम
४. श्री. वनवारी किशोर नारायणदास

वरील उमेदवारांपैकी विहित मुदतीत श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ यांनी आपली उमेदवारी मागे घेतली.

सभेस प्रारंभ झाल्यानंतर श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास व श्री. वनवारी किशोर नारायणदास यांचे उमेदवारी मागे घेत असल्याबाबतचे अर्ज प्राप्त झाल्याने उर्वरित १ उमेदवार निवडून आल्याची घोषणा करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. १०७ क — दिनांक :— ३१/३/२००६.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार स्थायी समितीच्या एका रिक्त पदावर सदस्यपदी श्रीमती मोकल सिमा चंदाराम हया बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

मंजुर

महापौर / पीठासीन अधिकारी

यावेळी मा. सदस्य श्री. मनोज साधवानी, श्री. गोबिंदराम लुंड व श्री. सतरामदास जेसवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मी आजही कोणताही विथड्रावल दिलेला नाही. हा अन्याय होत आहे.

मा. महापौर :– कृपया जनगणमनासाठी उभे राहावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मी आजही कोणताही विथड्रावल दिलेला नाही. हा माझा विथड्रावल अर्ज नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– सचिव साहेब, आजही तीच पुनरावृत्ती होत आहे. आजही उमेदवार सांगत आहे की, विथड्रावल केलेले नाही. यासाठीच मी त्यावेळी आपणांस कायदा विचारत होतो. उमेदवार स्वत: सांगत आहे की, विथड्रा केलेले नाही.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहेत हे कळून येत नव्हते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– कुणीतरी माझी बनावट स्वाक्षरी केली आहे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.१५ वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–२०/४/२००६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/४/२००६ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार दिनांक २०/४/२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :–श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ४३. | श्रीमती माने किरण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, | ४४. | श्री. रमेश चव्हाण |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ४५. | श्री. जाधव प्रशांत |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४६. | श्री. जाधव सुरेश |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना | ४७ | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४८. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्री. वाघे शामु | ४९. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ५०. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ५१. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ५२. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ५३. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ५४. | श्री. भालेराव गौतम |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५५. | श्रीमती वसिटा बेबी |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १७. | श्री. उमाप रामदास | ५७. | श्री. अंकुश म्हस्के |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५८. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५९. | श्री. पंजाबी नारायण |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ६०. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २१. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ६१. | श्री. साधवानी मनोज |
| २२. | श्रीमती अनिता गुप्ता | ६२. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| २३. | श्री. पवार नाना | ६३. | श्रीमती भटिजा कोमल |
| २४. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ६४. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २५. | श्री. जग्यासी राजु | ६५. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २६. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ६६. | श्रीमती किरण माखिजा |
| २७. | श्री. निकम शांताराम | ६७. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २८. | श्री. टाले प्रमोद | ६८. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २९. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६९. | डॉ. श्रीमती निना नाथानी |
| ३०. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ७०. | श्रीमती छाब्रिया भारती |
| ३१. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ७१. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| ३२. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ७२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३३. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ७३. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७४. | श्रीमती करोतिया मालती |
| ३५. | श्री. साधवानी मोहन | ७५. | श्रीमती मिनु दासानी |
| ३६. | श्री. सतरामदास जेसवानी | ७६. | श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास |
| ३७. | डॉ. साधवानी जया | ७७. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३८. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७८. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३९. | श्रीमती भावना खिलनानी | ७९. | श्री. हरदास माखिजा |
| ४०. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | ८०. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ४१. | श्री. राज असरोंडकर | ८१. | श्री. राजेश वधारिया |
| ४२. | श्री. ठाकुर अशोक | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्तरे.........

मा. सचिव :– प्रश्न क्र. ४७१ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

**प्रश्न क्र. ४७१ :–** शहीद अरुण कुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल की इमारत) का ठेका किन किन शर्तो पर दिया गया है और क्या वे सभी शर्ते पूरी हुई है? इस सन्दर्भ में सविस्तर जानकारी दी जाये साथ ही ये भी अवश्य जानकारी दी जाए की

१) टाऊन हॉल की वह इमारत कितने चौरस फुट की है? आज की मार्केट वेल्यु उस इमारत की क्या है और कितना किराया दर माह उमनपा ने वसूला है?

२) रविवार के दिन उक्त सभागृह की बुकिंग करने का अधिकार किसे है?

३) क्या उक्त सभागृह सांस्कृतिक, शैक्षणिक और सामाजिक संघटनो को अपने कार्यक्रम करने के लिए उमनपा ने कोई दर तय करके ठेकेदार को दी है जैसे जकात ठेके पर देने से पुर्व उन्हें टॅक्स की दरों की सुची के आधार पर ही जकात वसूलने की शर्ते रखी गई थी?

४) क्यों शहिद जनरल अरुण कुमार वैद्य (टाऊन हॉल की ईमारत) पर उमनपा की मिल्कीयत का बोर्ड लगाना जरुरी नहीं समझा गया है? जबरी उक्त ईमारत का ठेकेदार कुमार है पर मालिक आज भी उल्हासनगर मनपा है इसका भी स्पष्टीकरण दे।

उत्तर :– १)उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या नावपावती नुसार अ.क्र. २९१ चे क्षेत्रफळ ४९२५ ३/९ चौ. वार म्हणजेच ४११९.७० चौ.मी. आहे. ३३५१०.२२ चौ.मी. आहे. तसेच इमारतीचा बाजारभाव सार्व.बांध. विभागाशी निगडित आहे व करारनाम्याप्रमाणे अभिकर्ता कडुन प्रतिवर्षी (५ वर्षापर्यंत) रुपये ३,००,०००/– एवढे भाडे आकारणी केली जाते.

२) गर्व्हमेंट रेसोल्युशन अरबन डेव्हलपमेंट डीपार्टमेंट नं. व्हीडीसी/युएमसी२०००/२२९७/पीके१४३/युडी–२३, दि. १२/८/०२ नुसार आठवडयाच्या प्रत्येक रविवारी ड्रामा प्लेज व सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता मनपाने ठरवून दिलेल्या दराने आरक्षण ठेवण्यात येईल.

३) मनपाने ठरवुनल दिलेल्या दरांनुसार सांस्कृतिक कार्यक्रम शैक्षणीक व सामाजिक संघटनांकडुन अभिकर्तानेफी आकारावयाची आहे.

४) सदर इमारतीवर शहिद अरुणकुमार वैदय सभागृह (टाऊन हॉल) असा नाम फलक लावणे जरुरीचे आहे. तसेच सदर इमारतीचा ठेकेदार कुमार पी. चैनानी असुन सदर इमारत मनपा मालकीची आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–

मा. सचिव :– प्रश्न क्र. ४७२ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

**प्रश्न क्र. ४७२ :–** पुज्य फर्निचर बाजार पंचायत उल्हासनगर–३ के दुकानदारों द्वारा बारबार मुत्रीघर या सुलभ शौचालय की मांग उठाने के बावजुद ध्यान क्यों नहीं दिया जा रहा है? जब की ये शहरवासियों की मुलभुत आवश्यकता है और उमनपा की प्राथमिक डयुटी है? उक्त सन्दर्भ में सविस्तर जानकारी दें साथ ही ये भी बजाएं की १) दी नवजीवन को. ऑप. बॅक, उल्हासनगर–३ के सामने जो मुत्री व्यवस्था थी उसे वहां से हटाया क्यों गया?

२) उस मुत्रीघर के आसपास की जगह पर जो दो कॅबिन लगा दी गई है वे किसकी हैं और वहां कैसे रखी गई है ?

३) वहां पुन: मुत्रीघर/सुलभ शौचालय की व्यवस्था कब तक होगी?

उत्तर :– सदर ठिकाणी मुत्रीघर किंवा सुलभ शौचालय बांधणीची मागणी झाल्यास त्याबाबत कार्यवाही करता येईल.

१. रस्ता रुंदीकरण केल्यामुळे सदर ठिकाणचे मुत्रीघर अनधिकृत बांधकाम विभागाकडुन तोडण्यात आले आहे.
२. शिल्लक जागेतील दोन कॅबिनला नगरररचना विभागाकडुन परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर मुत्रीघराच्या बाजुला  जागेवर दोन कॅबिन लावलेल्या आहेत त्या अपंग व्यक्तींना एसटीडी/पीसीओ बुथ करीता नगररचना विभागामार्फत परवानगी देण्यात आलेली आहे.

३. सदर ठिकाणी मुत्रीघर किंवा सुलभ शौचालय बांधणीची मागणी झाल्यास त्याबाबत कार्यवाही करता येईल.

जागा उपलब्ध असल्यास आवश्यकतेनुसार.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– ठिक आहे.

मा. सचिव :– प्रश्न क्र. ४७३ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ४७३ :– उल्हासनगर शहर में जो गाय बैल आजादी से घुमते फिरते है और लोगों को अपने सिंगो का निशाना बनाते हैं उन जानवरों के मालकों (तबेला मालिक) के प्रति किस प्रकार की कारवाई नियम अनुसार की जा सकती है? इस संन्दर्भ में सविस्तर जानकारी देते हुए ये बताया जाए की उमनपा ने इस संदर्भ में क्या कदम आज तक उठाए है ? साथ ही ये भी बताया जाये की तबेला मालिक जो नालियों में गोबा बहा देते है उस संन्दर्भ में उमनपा ने अब तक क्या कारवाई की है ?

उत्तर :– सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडुन कोंडवाडा दुरुस्तीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. मोकाट जनावरांच्या तक्रारींवर संबंधीत प्रभाग अधिकारी/ स्वच्छता निरिक्षक जनावरे पकडुन मालकावर दंडात्मक कार्यवाही करतात तसेच तबेल्यातील शेण नालीत सोडणा–या तबेला मालक यांना नोटिस बजावण्यात येते. तसेच दंडात्मक कार्यवाही केली जाते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– ठिक आहे.

मा. सचिव :– प्रश्न क्र. ४७४ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ४७४ :– १)उल्हासनगर मनपा द्वारा जिस ठेकेदार को कचरा उठाने का ठेका दिया गया है उस

एन्थोनी ठेकेदार के कार्योसे उमनपा प्रशासन कितना संतृष्ट है?

२) क्या बार बार महासभा में एन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग कंपनी के कामकाज पर ऊंगलिया उठने के बावजुद भी प्रशासन ने इस संन्दर्भ में कुछ कदम उठाया है? यदि हां तो क्या?

३) एन्थोनी ने उमनपा प्रशासन से किये गये करार के अनुसार कौन कौनसी शर्ते पुरी की है और कौन कौनसी शर्ते पुरी नही की है? उसकी सविस्तर जानकारी दी जाये । एग्रिमेंन्ट में दी हुई शर्तों पर टिक मार्क करके सविस्तर जानकारी दी जाए सही के लिए ✔ शर्तें पुरी नहीं होने पर X निशान लगाकर जानकारी दें।

१. उत्तर :– होय.
२. कचरा वाहतुकीच्या कामाबाबत जी तक्रार या कार्यालयास प्राप्त होते. ती ठेकेदारास कळविण्यात येते त्याप्रमाणे ते त्वरीत तक्रार निवारण करतात.

महानगरपालिका व मे. एन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग कंपनी यांचे बरोबर कचरा वाहतुकीच्या कामाचा केलेला करारनामा बाबतची माहिती लांबलचक असल्याने आरोग्य विभागात उपलब्ध आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:— ठिक आहे.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ४७५ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

? प्रश्न क्र. ४७५ :— १)उल्हासनगर नगरपालिका / महानगरपालिका ने आजतक उल्हासनगर शहर ने

आजतक उल्हासनगर शहर में कितने सार्वजनिक शौचालय, कितने मुत्रीघर, कितने सुलभ शौचालय बनवाये है? अनकी सविस्तर जानकारी दें । किस साल में कहां कितने सीटर के शौचालय बनवाये गये और रेकॉर्ड के अनुसार उनकी कुल संख्या कितनी है ?

२) उनमें से कितने शौचालय / मुत्रीघर उमनपा या नपा की परमिशन लेकर तोडे गये और कितने बिना परमीशन के तोडे गये उनकी लोकेशन सहित जानकारी दें?

३) जहॉ शौचालय या मंत्रीघर थे और अब नही है इस स्थलों पर अब क्या है लोकेशन के साथ पुरी जानकारी दे।

४) इस समय कितने सार्वजनिक शौचालय / मुत्रीघर/सुलभ शौचालय है वे कहां कहां है और अनकी परिस्थिती क्या है इसकी सविस्तर जानकारी दे ।

उत्तर :— उपलब्ध दस्तऐवजानुसार उल्हासनगर शहरात एकुण ७१० सार्वजनिक शौचालय असून आरोग्य विभागामार्फत सुलभ शौचालये बांधणेकरीता परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु सुलभ शौचालयांचे बांधकाम पुर्ण केलेल्या संस्थांनी अदयापपर्यंत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला सादर न केल्याने किती सुलभ शौचालयांचे बांधकाम पुर्ण झालेले आहे याबाबत माहिती उपलब्ध नाही.

१. उल्हासनगर नगरपालिका /महानगरपालिका कालावधीत आजपर्यत (वर्षनिहाय) बांधलेल्या सार्व. शौचालयांची/मुत्रीघरांची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे.
२. एकुण १८० शौचालये परवानगीने तोडण्यात आलेले आहेत.
३. परवानगीने तोडण्यात आलेल्या शौचालयाच्या जागी सीसी पॅसेज, हजेरी शेड, सुलभ शौचालये, समाज मंदिर इत्यादीसाठी वापर केलेला आहे.
४. उमपा क्षेत्रात एकुण ७१० सार्व. शौचालय व ३१ सुलभ शौचालय असुन सदरची माहिती लांबलचक असल्याने मालमत्ता विभागाकडे माहितीसाठी उपलब्ध आहे.

यादी

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— ठिक आहे.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ४७६ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

१. **प्रश्न क्र. ४७६ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात जिन्स कारखान्यांची संख्या किती आहे?

२. किती जिन्स कारखान्याला महानगपालिकेची रितसर परवानगी दिली आहे का?

३. किती जिन्स कारखान्यांना अधिकृत नळजोडणी आहे? त्याचे असणारे गाळे अधिकृत रितसर परवानगी काढुन केले आहेत का?

४. किती कारखान्यास प्रदुषण नियंत्रक मंडळाची परवानगी आहे? ट्रेड लायसन्स काठले आहे का? अशी कारखान्यांची संख्या किती?

**उत्तर :—** १. याबाबतची सांख्यिकी माहिती महानगरपालिकेत उपलब्ध नाही.
२. दोन जिन्स कारखान्यास महानगरपालिकेकडुन परवानगी देण्यात आली आहे.
३. प्रदुषण नियंत्रक मंडळाकडुन जिन्स कारखान्यासाठी जारी करण्यात आलेलया परवानगीचा तपशिल महानगरपालिकेस पाठवित नाही.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—** ठिक आहे.

**मा. सचिव :—** प्रश्न क्र. ४७७ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

**प्रश्न क्र. ४७७ :—** सदयस्थितीत उल्हासनगर महानगरपालिकेने शहरातील फेरीवाल्याकडुन दैनिक कर वसुलीसाठी निविदा मागविली असून सदरची निविदा जय श्रीराम इंटरप्रायझेस यांना देणेत आली आहे. त्यानुसार खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवुन सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

१. उल्हासनगर शहरातील फेरीवाल्यांचे महानगरपालिकेने सर्वेक्षण केले आहे का?

२. फेरीवाल्यांचे सर्वेक्षण केले असल्यास फेरीवाल्यांचे प्रकारानुसार विविध प्रकारानुसार त्यांची आकडेवारी (संख्या) दयावी व शहरातील एकुण फेरीवाल्यांची संख्या किती? संख्या दयावी.

फेरीवाला क्षेत्र व ना फेरीवाला क्षेत्रातील फेरीवाल्यांची संख्या किती? आकडेवारी विभागवार दयावी.

**उत्तर :—**

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** ठिक आहे.

**मा. सचिव :—** प्रश्न क्र. ४७८ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

? **प्रश्न क्र. ४७८ :—** प्रभाग क्र. १ मधील राजीव गांधीनगर, महात्मा फुलेनगर येथिल अनधिकृत बांधकामाबाबत विचारलेल्या प्रश्नाचे सुचक व समाधानकारक उत्तरे मिळणेबाबत.

प्र. १ अ) दिनांक २४/३/२००६ च्या पत्रानुसार प्रभाग क्र. १ मधील राजीव गांधीनगर, महात्मा फुलेनगर, व्ही. पी. नाईक कॉलनी येथिल अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत तक्रार प्रभाग क्षेत्र अधिकारी यांना करुनही अदयापपर्यंत सदर बांधकाम पुर्णत: निष्कासित केले आहे का? कोणते बांधकाम निष्कासीत केले नाही? का? सदर बांधकाम पुर्णत: कधी निष्कासीत करण्यात येईल? त्याचा कालावधी दयावा.

प्र.क्र. १ ब) राजीव गांधीनगर मधील श्री. खान व महात्मा फुलेनगर मधील श्री. कादर भंगारवाला यांनी घर बांधकाम परवानगी घेतली आहे का? कोणत्या कागदपत्राचे आधारे? त्यांना बांधकाम परवानगी दिली आहे?

प्रक्र. १ क) प्रभाग क्र. १ मध्ये दिनांक २६ व २७ जुलै, २००५ रोजीच्या अतिवृष्टीमुळे बाधित झाल्यामुळे किती झोपडया, घरे धोकादायक म्हणून घोषित केली आहेत अगर धोकादायक असल्याबाबत नोटीस बजावलया आहेत का? यापैकी राजीव गांधीनगरमध्ये किती घरे/झोपडया धोकादायक म्हणून नोटिस बजावली आहे?

प्र.क्र. १ ड) प्रभाग क्र. १ मध्ये किती घरांना/झाोपडयांना अतिवृष्टीमुळे बाधीत झाल्याने घर / झाोपडी बांधकाम दुरुस्तीसाठी परवानगी दिली आहे? पुरग्रस्ताचा दाखला व शासकिय निधीचा दाखल्याचे आधारे घर अगर झोपडीचे बांधकाम परवानगी मिळू शकते का? सदर दाखल्यांचे आधारे बांधकाम परवानगी नियमानुसार होवु शकते का? पुरग्रस्त दाखला शासकिय अनुदान दाखल्याचे आधारे जर बांधकाम परवागनी मिळत असेल तर प्रभाग क्र. १ मधील बहुतांश विभाग पुरग्रस्त बाधीत असून त्या सर्वाकडे दाखले आहेत त्या आधारे संबंधीत नागरीकांना बांधकाम करण्याची परवानगी मिळू शकते काय?

उत्तर :—

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** ठिक आहे.

**मा. सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मागील महासभांचे इतिवृत्त कायम करणे.

अ) सर्वसाधारण महासभा दिनांक २०/०३/२००६
ब) सर्वसाधारण महासभा दिनांक ३१/३/२००६
क) विशेष महासभा दिनांक ३१/३/२००६

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**मा. महापौर :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २०/०३/२००६, सर्वसाधारण महासभा दिनांक ३१/३/२००६ , विशेष महासभा दिनांक ३१/३/२००६ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

**मा. सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—**ब्लॉक नं सी—६९९ ते सी—७०३ येथे रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेल्या लोकांना पर्यायी जागा देणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**मा. महापौर :—** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

---

**मा. सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर      वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १९/५/२००६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/५/२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १९/५/२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश

२) मा. उपमहापौर :—श्री. तलरेजा विनोद चंदीराम

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती जावळे संगिता रमेश | ३५. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ४. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | ३६. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३७. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| ६. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | ३८. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| ७. | श्री. वाघे शामु बाबु | ३९. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्रीमती मोकल सीमा चंदाराम | ४०. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४१. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १०. | श्री. एडके गणपत गोविंद | ४२. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४३. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १२. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४४. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| १३ | श्री. उमाप रामदास राघोजी | ४५. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल |
| १४. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४६. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १५. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४७ | श्रीमती पंजाबी दिपा नारायण |
| १६. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४८. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १७. | श्री. पवार नाना आनंदा | ४९. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १८. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५०. | श्रीमती भटिजा कोमल अमृत |
| १९. | श्री. जग्यासी राजु | ५१. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| २०. | श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा | ५२. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २१. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५३. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायण |
| २२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५४. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| २३. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ५५. | श्री. लबाना होशियारसिंह हरिसिंह |
| २४. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५६. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| २५. | श्री. निकम शांताराम ओंकार | ५७. | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| २६. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५८. | श्रीमती छाब्रिया भारती पहलाज |
| २७. | श्री. जेसवानी सतरामदास पुनमदास | ५९. | श्री. बठीजा संजय रामचंद्र |
| २८. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६०. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्रीमती खिलनानी भावना रवी | ६१. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३०. | श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग | ६२. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| ३१. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास | ६३. | श्रीमती दासानी मिनु राजकुमार |
| ३२. | श्रीमती माने किरण बाळकृष्ण | ६४. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३३. | श्री. चव्हाण रमेश महादेव | ६५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३४. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ | ६६. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| | | ६७. | श्री. वधारिया राजेश नानिकराम |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास, २. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर, ३. श्री. गायकवाड दिलीप, ४. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ५. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, ६. श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र, ७. श्री. ठाकुर विनोद लालसिंग, ८. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), ९. श्री. साधवानी मोहन रहंदोमल, १०. डॉ. (श्रीमती)साधवानी जया मोहन, ११. श्री. भालेराव गौतम यशवंत, १२. श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास,

१३. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, १४. श्री. माखिजा हरदास सन्मुखदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
३. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
४. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
५. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. सुरेश बनसोडे, मुख्य लेखा परिक्षक
७. श्री.ए.पी.गुरगुळे, नगररचनाकार
८. श्री. हरेश इदनानी, प्रभारी उप–आयुक्त
९. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१०. श्री. आर.बी. शिर्के, प्रभारी कार्यकारी अभियंता, स्थापत्य
११. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१२. श्री. अ.म.काटे, प्रभाग अधिकारी, प्रभाग क्षेत्र क्र. २

४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे......... यावेळेस माझ्या मागे असलेल्या घडयाळात सायंकाळचे ४.४० वाजले आहेत.

<u>मा. सचिव :–</u> प्रश्न क्र. ४७१ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ४७१ :–</u> शहीद अरुण कुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल की इमारत) का ठेका किन किन शर्तो पर दिया गया है और क्या वे सभी शर्ते पूरी हुई है? इस सन्दर्भ में सविस्तर जानकारी दी जाये साथ ही ये भी अवश्य जानकारी दी जाए की
१) टाऊन हॉल की वह इमारत कितने चौरस फुट की है? आज की मार्केट वेल्यु उस इमारत की क्या है और कितना किराया दर माह उमनपा ने वसूला है?
२) रविवार के दिन उक्त सभागृह की बुकिंग करने का अधिकार किसे है?
३) क्या उक्त सभागृह सांस्कृतिक, शैक्षणिक और सामाजिक संघटनो को अपने कार्यक्रम करने के लिए उमनपा ने कोई दर तय करके ठेकेदार को दी है जैसे जकात ठेके पर देने से पुर्व उन्हें टॅक्स की दरों की सुची के आधार पर ही जकात वसूलने की शर्ते रखी गई थी?
४) क्यों शहिद जनरल अरुण कुमार वैद्य (टाऊन हॉल की ईमारत) पर उमनपा की मिल्कीयत का बोर्ड लगाना जरुरी नहीं समझा गया है? जबरी उक्त ईमारत का ठेकेदार कुमार है पर मालिक आज भी उल्हासनगर मनपा है इसका भी स्पष्टीकरण दे।

<u>उत्तर :–</u> १)उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या नावपावती नुसार अ.क्र. २९१ चे क्षेत्रफळ ४९२५ ३/९ चौ. वार म्हणजेच ४११९.७० चौ.मी. आहे. ३३५१०.२२ चौ.मी. आहे. तसेच इमारतीचा बाजारभाव सार्व.बांध. विभागाशी निगडित आहे व करारनाम्याप्रमाणे अभिकर्ता कडुन प्रतिवर्षी (५ वर्षापर्यंत) रुपये ३,००,०००/– एवढे भाडे आकारणी केली जाते.
२) गर्व्हमेंट रेसोल्युशन अरबन डेव्हलपमेंट डीपार्टमेंट नं. व्हीडीसी/युएमसी२०००/२२९७/पीके१४३/युडी–२३, दि. १२/८/०२ नुसार आठवडयाच्या प्रत्येक रविवारी ड्रामा प्लेज व सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता मनपाने ठरवून दिलेल्या दराने आरक्षण ठेवण्यात येईल.
३) मनपाने ठरवुनल दिलेल्या दरांनुसार सांस्कृतिक कार्यक्रम शैक्षणीक व सामाजिक संघटनांकडुन अभिकर्ताने फी आकारावयाची आहे.
४) सदर इमारतीवर शहिद अरुणकुमार वैदय सभागृह (टाऊन हॉल) असा नाम फलक लावणे जरुरीचे आहे. तसेच सदर इमारतीचा ठेकेदार कुमार पी. चैनानी असुन सदर इमारत मनपा मालकीची आहे.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** मा. महापौर महोदया, आयुक्त महोदय, सचिव साहेब, प्रश्न क्र. ४७१ आज सुध्दा तेथेच आहे. जो १४/२/२००६ पासुन सुरु झाला होता. फेब्रुवारी, मार्च, एप्रिल व आता मे महिना चालु आहे. परंतु या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळाले नाही. ३० वर्षासाठी टाऊन हॉलचा जो ठेका देण्यात आला त्यासाठी जे स्टॅम्प पेपर वापरण्यात आले ते २३ नोव्हेंबर, २००० चे आहे व करारनामा १९ ऑगस्ट, २००२ रोजी झाला आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे सचिव यांची यावर ना स्वाक्षरी आहे ना मुद्रा (शिक्का) आहे. तर प्रश्न असा निर्माण होतो की, हा करारनामा वैध मानला जावु शकतो किंवा नाही? जर वैध मानला गेला तर ही एवढी मोठी चुक कशी झाली आहे? जेव्हा या महानगरपालिकेत विधी अधिकारी आहेत, उप—आयुक्त सुध्दा आहेत, आयुक्त सुध्दा आहेत, सचिव महोदय सुध्दा आहेत, कायदयाची माहिती असणारे सर्व अधिकारी आहेत. अशा प्रकारची चुक उल्हासनगरमधील एखादया सर्व सामान्यानी केली किंवा कमी शिकलेल्या एखादया माणसाने केली तर समजण्या सारखे होते. परंतु महानगरपालिका आपली मिळकत कुण्या एखादयाला ३० वर्षासाठी ठेक्याने देते किंवा करारावर देते व त्यामध्ये एवढी मोठी चुक करते तर ही गोष्ट समजुन येत नाही. तर या गोष्टीचा सर्वात प्रथम खुलासा केला पाहिजे. जो प्रश्न मी १४ फेब्रुवारी २००६ पासुन विचारत आलो आहे. प्रथम माझ्या या मुद्दयाचे स्पष्टीकरण केले तर मी मुळ प्रश्नाकडे येवु शकेन.

आयुक्त महोदय, प्रशासनाचे प्रमुख या नात्याने या प्रश्नाचे उत्तर मी आपणाकडुन जाणुन घेवु इच्छितो. मला माहित आहे त्यावेळेस आपण आयुक्त म्हणुन नव्हता. त्यावेळेस श्री. पोखरकर साहेब आयुक्त म्हणुन होते. परंतु यावेळेस प्रशासनाचे प्रमुख आपण आहात. म्हणुन सर्वात प्रथम आपण हे मान्य करा की, ही एवढी मोठी चूक कशी झाली? तिला जबाबदार कोण आहे? याबाबत आपण आपले विचार प्रकट केले तर मी माझ्या पुढील प्रश्नाकडे वळेल. नाहीतर महासभे मागुन महासभा होतील व माझा प्रश्न तसाच राहिल. प्रश्नोत्तराची अर्ध्या तासाची वेळ पुर्ण होत जाईल. म्हणुन सर्वात प्रथम मला समाधानकारक उत्तर तर दिले जावे? हा करारनामा वैध आहे किंवा नाही? आयुक्त महोदय, माझे बोलणे आपणांस ऐकु येत आहे काय? येत असेल तर माझ्या या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर दिले जावे.

**श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त):—** सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय नगरसेवक महोदयांनी टाऊन हॉल बाबत जो प्रश्न विचारला आहे, करारनामा झाला आहे. त्या स्टॅम्प पेपरची वैधता आहे किंवा नाही? त्यावर जो करारनामा केला आहे त्याची वैधता काय आहे? याबाबत कायदेशीर मत घेण्यासाठी आपल्या महानगरपालिकेच्या पॅनलवर असलेले जे वकिल श्री. चुंबळे यांच्याकडे हे प्रकरण पाठविले आहे. त्यांच्याकडुन जे कायदेशीर मत येईल ते महासभेपुढे सादर करण्यात येईल.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—**मा. महापौर महोदया, १४ फेब्रुवारी, २००६ रोजी विचारलेला प्रश्न आहे. दोन महासभा होवुन गेल्या तिसरी महासभा चालु आहे. व आता पर्यंत या विषयाबाबत कायदेतज्ञास हे विचारले नाही. आपल्या माहितीसाठी मी विचारणा करु इच्छितोकी, आपल्या महानगरपालिकेत कायदेविषयक सर्वात हुशारात हुशार आहेत आमचे श्री. सचिव साहेब श्री. प्रकाश कुकरेजा, एलएलबी आहेत. त्यांनी म्हटले होते की, कोणत्याही स्टॅम्प पेपरची वैधता फक्त सहा महिने असते. काय आपण सचिव साहेबांच्या मताशी सहमत नाहीत काय? किंवा कुणाचे एखादे कायदेशीर मत येईल तेव्हा आपण सभागृहास सांगणार आहेत काय आपण सभागृहाची वेळ फुकट का घालवत आहात? सभागृहाला आपण संभ्रमीत का करत आहात? आपल्याकडुन चुक झाली आहे की काय? चुक झाली असेल तर ती सुधारली जावु शकते. परंतु चुकीवर चुकी, चुकीवर चुकी असे स्पष्टीकरण करत जाणे म्हणजे महाचुक आहे. ही महाचुक कधीही माफ करण्या लायक नसते. यासाठी सर्वात प्रथम तर जसे की सचिव साहेबांनी सांगितले की, स्टॅम्प पेपरची वैधता सहा महिन्यापर्यंत असते हे आपणांस माहित आहे किंवा नाही? हे तर आपणांस माहित आहे की स्टॅम्प पेपरची वैधता सहा महिने असते आपण उप—आयुक्त आहात एवढे तरी आपणांस माहित आहे? आयुक्त महोदय, आपणांस एवढे माहित आहे आपण (आयएएस) भारतीय प्रशासकिय सेवेतील अधिकारी आहात. कोणत्याही स्टॅम्प पेपरची वैधता किती असते याबाबत केवळ होय किंवा नाही मध्ये उत्तर दया. सहा महिने असते किंवा त्यापेक्षा जास्त असते? आयुक्त महोदय, चुक झाली असेल तर तिचा स्विकार करा.

**श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त):—** बॉम्बे स्टॅम्प डयुटी ॲक्ट नुसार स्टॅम्प पेपरची वैधता सहा महिन्यापर्यंत असते. परंतु आपण पुढे जो प्रश्न केला आहे की स्टॅम्प वैध आहे किंवा नाही? व त्यावर जो करारनामा झााला आहे तो वैध आहे किंवा नाही? याबाबत कायदेतज्ञांकडुनच कायदेशीर मत घ्यावे लागेल. आणि त्यानुसार कार्यवाही करण्याचा मी आपणांस आश्वासन देतो.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—** धन्यवाद. एवढा प्रश्न प्रलंबित ठेवा. आता मी पुढील प्रश्नाकडे वळतो. महापौर महोदया मी माझा दुसरा प्रश्न विचारु इच्छितो की, टाऊन हॉलला बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यात

आला आहे काय? नगररचनाकारांकडुन या मुद्दयाची मी माहिती जाणुन घेवु इच्छितो की बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र टाऊन हॉल बाबत दिले आहे काय?

श्री. ए.पी.गुरगुळे (नगररचनाकार):—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी जो प्रश्न विचारला आहे की, टाऊन हॉलला बांधकाम पुर्णत्वाचा दाखला दिला आहे किंवा नाही? तर आता पर्यंत त्यास बांधकाम पुर्णत्वाचा दाखला दिलेला नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— धन्यवाद.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—महापौर महोदया, याबाबत मी एक प्रश्न विचारु इच्छितो, .................

मा. महापौर :— श्री. दिलीप लालवानी यांचा प्रश्न आहे त्यांना बोलु दया. आपण आपला स्वतंत्र प्रश्न टाकु शकता. त्यानुसार आपणांस उत्तर दिले जाईल. सध्या त्यांच्या प्रश्नावर चर्चा चालु आहे कृपया आपण बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—५ हजार इमारतींमध्ये किती इमारतींना बांधकाम पुर्णत्वाचा दाखला आहे?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— महापौर महोदया, हा महानगरपालिकेचा टाऊन हॉल आहे. कायदा लागु करणारे लोक येथे राहतात. व अधिका—यांनी आपलाच टाऊन हॉल ठेक्यावर दिला आहे. मी त्यांना विचारु इच्छितो आपण आपली इमारत कुणाला ठेक्यावर देत आहोत. त्याचबरोबर आपण बांधकाम पुर्णत्वाचा दाखला का नाही दिला? हा मुद्दा कुण्या एखादया खाजगी मिळकतीचा नाही. हा महानगरपालिकेशी संबंधीत मुद्दा आहे. तेव्हा आपणच कायदयाचे पालन केले नाही तर आपण शहर वाशियांना कसे सांगणार की, आपण कायदयाचे पालन करा म्हणुन. त्यासाठी मी धन्यवाद देवु इच्छितो की, नगररचनाकार यांनी मोकळया मनाने या गोष्टीचा स्विकार केला आहे की, आम्ही बांधकाम पुर्णत्वाचा दाखला दिलेला नाही. मी श्री. बागेश्वर साहेबांना धन्यवाद देतो कारण त्यांनी या गोष्टीचा स्विकार केला आहे की, स्टॅम्प पेपरची वैधता ही सहा महिन्यांसाठीच असते. टाऊन हॉलची इमारत बनवितांना ठेकेदाराने जी तोडफोड केली आहे व जे बांधकाम केले आहे यासाठी त्याने दुरुस्ती परवानगी अथवा बांधकाम परवानगी घेतली आहे काय? याचेही उत्तर दयावे.

नगररचनाकार (श्री. ए.पी. गुरगुळे):— मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, श्री. दिलीप लालवानी यांनी प्रश्न केला आहे की, दुरुस्ती परवानगी दिली आहे की बांधकाम परवानगी दिली आहे तर मी सांगु इच्छितो की, त्यांचे नकाशे मंजुर झाले आहेत तसेच कोणत्याही प्रकारची दुरुस्ती परवानगी दिलेली नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—त्यानंतर आपल्याकडे पुर्णत्वाच्या दाखल्यासाठी अर्ज केला आहे काय?

नगररचनाकार (श्री. ए.पी. गुरगुळे):—मागीतला आहे परंतु अजुन तो प्रलंबित आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—कधी मागितला आहे?

नगररचनाकार (श्री. ए.पी. गुरगुळे):—मी तारीख निश्चित करुन आपणांस सांगतो.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—तरी अंदाजे किती महिन्यापुर्वी मागणी केली आहे?

नगररचनाकार (श्री. ए.पी. गुरगुळे):—तीन महिने झाले असतील.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—याचा अर्थ मी येथे प्रश्न दाखल केल्यानंतर त्यांनी अर्ज केला आहे.

नगररचनाकार (श्री. ए.पी. गुरगुळे):—मी अंदाजे सांगितले आहे. निश्चित तारीख अर्ज बघुनच सांगता येईल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—याचा अर्थ मी प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी अर्ज केला आहे. हा टाऊन हॉल पुर्णत्वाचा दाखला घेतल्या शिवायच लोकार्पित करण्यात आलेला आहे. ज्या हॉलला पुर्णत्वाचा दाखला नाही, करारनामा योग्य नाही, महापालिकेला करारनाम्यातील अटीप्रमाणे टाऊन हॉलचे भाडे निश्चित करुन दयायचे होते. प्रशासनाने ते केले आहे काय? टाऊन हॉलचे भाडे किती घ्यायचे हे महापालिकेने निश्चित करुन दयायला हवे होते. ज्याप्रमाणे आपण जकातीचा ठेका देतो की आपणांस एवढया दराने जकात वसुल करायची आहे

त्याचप्रकारे टाऊन हॉलचे देखिल करावयास पाहिजे होते. आपण ते केले आहे काय? आपण पुर्णत्वाचा दाखलाच दिला नाही त्यामुळे आपण भाडे देखिल निश्चित करु शकत नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– आपण ज्या महापालिकेत उभे आहोत त्या इमारतीला तरी पुर्णत्वाचा दाखला दिला आहे काय?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–मा. महापौर महोदया, अदयाप माझा प्रश्न संपला नाही. मी मुद्दयावर बोलत आहे. आपल्या महापालिकेचे प्रशासन कश्याप्रकारे काम करीत आहे याचे उदाहरण मी आपल्या समोर ठेवत आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– महापालिकेच्या इमारतीला पुर्णत्वाचा दाखला नाही हे आपणांस माहित नाही काय?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–असे असेल तर लोकांना पुर्णत्वाचा दाखला व बांधकाम परवानगी घेण्यासाठी का भाग पाडले जाते?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– उल्हासनगरमध्ये कोणत्याही इमारतीला पुर्णत्वाचा दाखला नाही हे आपणांस माहित नाही काय?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–याचा अर्थ आपण अनधिकृततेला समर्थन देत आहात काय?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– तुमच्या इमारतीला पुर्णत्वाचा दाखला आहे काय?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–मा. महापौर महोदया, अजुन माझा प्रश्न पुर्ण झालेला नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– तुम्ही पुर्ण करा त्यानंतर आम्ही बोलु.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–मा. महापौर महोदया, ज्या टाऊन हॉलला पुर्णत्वाचा दाखला नाही, ज्याचे भाडे निश्चित केले नाही त्या टाऊन हॉलमध्ये जे कार्यक्रम सुरु आहेत, जो भाडयाने दिला जात आहे ते भाडे कोण निश्चित करत आहे? ठेका देतांना एक वर्षाच्या आत बांधकाम पुर्ण करुन, पुर्णत्वाचा दाखला घेवुन त्यानंतर हे सभागृह लोकार्पित करायचे असे ठरले होते. सन २००० मध्ये हा ठेका दिला होता, आज सन २००६ सुरु आहे. ते सभागृह लोकार्पित झाले, लोकांकडुन भाडे वसुल केले जाते परंतु महापालिकेकडे काय आले, काही भाडे आले? काही नाही आले. ६ वर्ष झाले परंतु टाऊन हॉलमधुन आपणांस एक रुपया देखिल मिळालेला नाही. आपले प्रशासन कशाप्रकारचा कारभार करीत आहे? महापालिकेने टाऊन हॉलचे भाडे निश्चित केले? नाही केले. जर निश्चित केले नसेल तर ठेकेदार कोणत्या हिशोबाने पैसे वसुल करीत आहे? नियमाप्रमाणे ठेकेदाराने महापालिकेच्या मालमत्तेचे भाडे वसुल करतांना महापालिकेची पावती दयायला हवी. ज्याप्रमाणे जकातीचे ठेकेदार देतात. परंतु येथे लेटरपॅडवर लिहून दिले जाते की, दहा हजार मिळाले व दहा हजार बाकी आहेत. असे काम चालु असतांना आपण ते मुक दर्शक म्हणुन पाहणे कसे काय चालेल? बुकिंग साठी लोकांनी त्यांचे लेटरहॅड घेतलेले आहे. दुसरे म्हणजे करारनाम्यात एक गोष्ट स्पष्ट करण्यात आली आहे की, जेवढे रविवार येतील तेवढया रविवारी सभागृह महापालिकेला दयायला हवे. मग ते सामाजिक कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रम व अन्य सांस्कृतिक कार्यक्रमासाठी दयायला हवे. परंतु ठेकेदार रविवारी कोणालाही सभागृह भाडयाने देतो. यासाठी महापालिकेकडुन त्यांनी ना हरकत दाखला देखिल घेतलेला नाही. महापौर महोदया, करारनाम्यात स्पष्ट लिहिले आहे की, अटी व शर्तीची पुर्तता झाली नाही तर आयुक्तांना ठेका रद्द करायचा अधिकार आहे. माझ्याकडे एकच नाही तर अशी अनेक उदाहरणे आहेत जे अटींची पुर्तता झाली नाही हेच सांगतात. असे असतांनाही अजुनही तो ठेका श्री. कुमार चैनानी यांच्याकडे आहे. तुम्ही तुमच्या उत्तरात श्री. कुमार चैनानी ठेकेदार असल्याचे सांगितले आहे. करारनाम्याच्या शर्तीप्रमाणे ठेकेदाराने टाऊन हॉलसाठी रुपये २,०२,८५,०००/– खर्च करायला हवे होते. त्या खर्चावर पर्यवेक्षण कोणी केले? त्या ठिकाणी काय काय वस्तु लागल्या याची पाहणी आमच्या शहर अभियंत्यांनी केली आहे काय? उल्हासनगर शहराला टाऊन हॉल देणे हे आमचे आमदार श्री.पप्पु कालानी यांचे स्वप्न होते. ते जेलमध्ये गेल्यानंतर १९९२ मध्ये टाऊन हॉलचे काम बंद झाले. ते काम अर्धवट झाले व फक्त खुर्च्या लावण्याचे काम शिल्लक होते, वातानुकुलन यंत्र, साउंड सिस्टम यांचे काम शिल्लक राहिले होते. विद्युत जोडणी देखिल बाकी होती. अश्या छोटया छोटया कामांसाठी टाऊन हॉलचे काम पुर्ण होवु शकले नाही. महापालिकेचे म्हणणे होते की आमच्याकडे पैसे नाही. त्यामुळे त्याचा ठेका ३० वर्षांसाठी देण्यात आला. तर महापालिकेने या ४ गोष्टींची पुर्तता केली

असती तर एक करोडपेक्षा जास्त खर्च आला नसता. रुपये एक करोडच्या आत आपण या शहराला एक चांगला टाऊन हॉल देवु शकलो असतो. जेथे पगडी, गरीबांची लग्ने, मुंज, इतर कार्यक्रम होवु शकले असते. रुपये एक हजार या अत्यल्प दराने आपण टाऊन हॉल भाडयाने देवु शकलो असतो. आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांनी जे स्वप्न पाहिले ते आपण कितपत साकार करु शकलो हे आम्हांला सांगा? आज तेथे २ करोडपेक्षा जास्त खर्च झाला आहे त्याचा हिशोब कोणाकडे नाही. एवढया मोठया इमारतीत आपण प्रदर्शनासाठी, लग्नासाठी, बियरबार उघडण्यासाठी परवानगी दिली. या मागे एकच हेतु होता की, आपण शहराला स्वस्त दराने टाऊन हॉल उपलब्ध करुन देवु शकु. महापौर महोदया, आपला हा हेतु सफल झाला आहे काय? महापौर महोदया, मी स्पष्टपणे सांगु इच्छितो की, टाऊन हॉल हे फक्त एक उदाहरण आहे. माझा कोणालाही विरोध नाही, द्वेष नाही, मी फक्त आपले प्रशासन कश्याप्रकारे काम करीत आहे, किती जबाबदारीने काम करीत आहे, त्याकडे मी लक्ष वेधु इच्छितो. जेणेकरुन आपले लक्ष त्यांच्याकडे जावुन आपण प्रशासनाकडुन शहर हितासाठी कार्य करुन घेवु शकतो. यामुळे जर कोणी या प्रश्नाकडे राजकिय नजरेतुन बघत असेल तर तसे बघु नये. श्री. कुमार चैनानी हे माझे चांगले मित्र आहेत. यामुळे त्यांचे नुकसान व्हावे असे मला वाटत नाही. परंतु या शहराच्या महापालिकेत आम्ही नगरसेवक आहोत, आम्ही विश्वस्त आहोत. यामुळे शहर हितासाठी महापालिका प्रशासनाकडुन चांगल्या प्रकारे काम करुन घेणे हे आमचे कर्तव्य आहे. ते कर्तव्य लक्षात घेवुन आम्ही हे काम करु इच्छितो.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u> हप्ता मिळणे बंद झाले आहे काय?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>महापौर महोदया, माझी श्री. मोहन बेहरानी यांच्या वक्तव्यावर सक्त हरकत आहे.

<u>मा. महापौर :–</u> तुम्ही तुमचे म्हणणे सुरु ठेवा. ज्यांना बोलायचे आहे त्यांना बोलु दया. तुम्ही तुमचा मुद्दा चालु ठेवा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>मा. महापौर महोदया, मी माझ्या वैयक्तीक स्वार्थासाठी हे बोलत नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u> तुमच्या लक्षात हे आताच आले काय?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>माझ्या लक्षात आता आले आहे परंतु आपल्या तर अजुनही लक्षात आले नाही. मा. महापौर महोदया, ही इमारत ४,७२५ वार एवढया मोठया भुखंडावर बनली आहे. जर ही इमारत एखादया खाजगी विकासकाकडे असती तर त्यासाठी पाण्याचे व मालमत्ता कराचे देयक किती आले असते याची माहिती श्री. हरेश ईदनानी यांनी दयावी. मा. महापौर महोदया, आपण एवढा मोठा त्याग केला आहे. जेवढे मालमत्ता कराचे देयक आले असते त्यापेक्षा कमी दराने आपण हा टाऊन हॉल दिला आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u> पैसे मिळणे बंद झाले काय?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>मी तुमच्याशी बोलत नाही आहे. तुम्ही अशाप्रकारे बोलत राहिलात तर आम्ही देखिल गप्प बसणार नाही.

<u>मा. महापौर :–</u>श्री. लालवानीजी हा विषय गेल्या तीन महिन्यांपासुन सुरु आहे. प्रश्नोत्तराचा अर्धा तास यामध्ये पुर्ण होत आहे. आपले जे सन्माननिय सदस्य मध्ये मध्ये बोलुन तुमच्या बोलण्यात बाधा आणत आहेत त्यामागे त्यांचा काय हेतु आहे हे सर्व समजु शकतात. तुम्ही तुमचे म्हणणे चालु ठेवा. कारण या गोष्टींवर अंकुश लागायला हवा तसेच आपला प्रश्नही पुर्ण व्हायला हवा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>मा. महापौर महोदया, या प्रश्नात जी मुख्य खोच होती ती तेथेच ठेवुन मी प्रश्न पुढे सुरु ठेवला आहे. ही एवढी मोठी इमारत महापालिकेनेच तयार केली असतांनाही ठेकेदाराने या इमारतीवर महापालिकेचा नावाचा फलक अथवा महापालिकेचे बोधचिन्ह लावलेले नसुन ती इमारत स्वत:च्या मालकीची असल्याप्रमाणे वापरत आहे. यावर आम्हांला सक्त आक्षेप आहे. त्यावर महापालिकेचे नाव व बोधचिन्ह हे लागायलाच हवे. कारण ही महापालिकेची मालमत्ता आहे. आपण या सर्व बाबींचे अवलोकन केले तर दिसुन येते की, ठेकदार हा करारनाम्यातील एकाही अटीची पुर्तता करीत नाही. त्यामुळे हा ठेका त्वरीत रद्द करायला हवा. तसेच सामान्य जनतेला कमीत कमी दराने सभागृह उपलब्ध करुन देण्यासाठी महापालिकेने प्रयत्न

करायला हवे. जेणेकरुन आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांनी जे स्वप्न पाहिले आहे ते साकार होवु शकेल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> मा. महापौर महोदया, श्री. दिलीप लालवानी यांनी जे सांगितले की, रविवार व सुट्टीच्या दिवशी सभागृह महापालिकेला उपलब्ध करुन दयायला हवे ते योग्यच आहे. रविवार व इतर दिवशी महापालिकेला टाऊन हॉलमधील सभागृह विनामुल्य मिळण्यासाठी योग्य ती कार्यवाही व्हायला हवी असे आमचे म्हणणे आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—</u> मा. महापौर महोदया, टाऊन हॉलच्या तांत्रिक बाबींबाबत मला माहिती नाही. परंतु हा एक महत्वपुर्ण मुद्दा आहे. श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले की, तेथे विंग नाही, विद्युत जोडणी नाही. ठेकेदाराला एवढया सवलती दिल्यानंतरही जर महापालिकेच्या मालकीचे ऑडीटोरिअम शहरातील जनतेला सवलतीच्या दराने मिळत नसेल तर लोकांसाठी अशा प्रकल्पाची किंमत शुन्य आहे. जर टाऊन हॉलमध्ये काही कार्यक्रम/ नाटक करायचे असेल तर ठेकेदार त्याचे भाडे रुपये ५०,००० आहे असे सांगतो. मी येथे कल्याण महापालिकेचे उदाहरण देवु इच्छितो, कल्याण महापालिकेने तेथे आचार्य अत्रे नाटयगृह बनविले आहे. तेथे नाटकाचे तिकिटाचे दर रुपये ६० ते ७० आहेत. कल्याण महापालिका तोटा सोसुनही ते नाटयगृह चालवत आहे. परंतु येथे तर सुट्टीच्या दिवशी महापालिकेला सभागृह देणे आवश्यक असतांनाही ठेकेदार अवाजवी भाडयाची मागणी करतो. यासाठी सुट्टीच्या दिवशी सवलतीच्या दरात लोकांना नाटयगृह उपलब्ध करुन देण्यासाठी महापालिकेला त्वरीत कारवाई करायला हवी. आपण लोकांना १५ ते २० हजार भाडयाने ते देवु शकतो. असे झाले तरच टाऊन हॉल बनविण्याचा उद्देश साध्य होवु शकतो. जर लोकांच्या हितासाठी ते दिले जात नसेल तर ठेका त्वरीत रद्द करायला हवा. जर लोकांना याचा फायदा होत नसेल तर हे स्पष्ट होते की, ठेकेदाराच्या हितासाठी व इतर संबंधीत लोकांच्या हितासाठी हा टाऊन हॉल बनविला आहे. यासाठी माझी आपणांस विनंती आहे की, नाटक व इतर सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी लवकरात लवकर सवलतीचे दर निश्चित करायला हवेत. असे करुन तो काही मेहरबानी करणार नाही कारण असे करण्यासाठी राज्य शासनाने स्पष्ट आदेश दिले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. महापौर महोदया, टाऊन हॉलचा विषय मागच्या महासभेपासुन सुरु आहे. या विषयावर मी महासभेला विस्ताराने माहिती दिली आहे की, उशिर का झाला? करारनाम्याचे कारण काय आहे? हे सर्व सांगितले होते. जेव्हा एखादा ठेकेदार महापालिकेची मालमत्ता बीओटी तत्वावर घेतो त्यावेळी करारनामा करण्याची जबाबदारी ठेकेदाराची नसते. त्याची जबाबदारी महापालिकेच्या शासन व प्रशासनाची असते. आज जेव्हा एखादे छोटे घर कोणी भाडयाने देतो तेव्हा करारनामा करणे हे भाडेकरुचे काम नसते. मालकाने चांगल्या प्रकारे करारनामा करुन घ्यायचा असतो. जर या करारनाम्यामध्ये काही चुक असेल, तारखेत घोटाळा झाला असेल तर ते बघणे हे शासनाचे व प्रशासनाचे काम आहे. या करारनाम्यावर त्या वेळच्या स्थायी समिती सदस्यांनी स्वाक्ष—या केल्या त्यांनीही करारनामा वाचुन बघायला हवा होता. त्यावर आजचे आमचे उप—महापौर श्री. विनोद तलरेजा व सदस्या श्रीमती कमला शर्मा यांची स्वाक्षरी आहे. तसेच सचिव साहेब व इतर अधिकारी ज्यांनी हा करारनामा केला होता त्यांनी हे बघायला हवे होते की, आपण जो करारनामा करीत आहोत तो कितपत योग्य आहे. माझ्या मताप्रमाणे यासाठी ठेकेदारावर आरोप करणे योग्य होणार नाही. दुसरे म्हणजे रविवारचा जो विषय आला त्याबद्दल मी सांगु इच्छितो की, हा विषय मी बांधकाम विभागाचा सभापती असतांना आला होता. त्यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, हे काम महापालिकेचे आहे. जर एखादा ठेकेदार आपली पाच हजाराची वस्तु पन्नास हजाराला देत असेल तर त्यामध्ये आपली चुक आहे, महापालिकेची चुक आहे. त्यांनी येथे विषय आणुन दर निश्चित करायला हवेत. यामध्ये ठेकेदाराची चुक नाही. आपले कर्तव्य आहे की, महापालिकेने ठराव आणुन दर निश्चित करायला हवेत तसेच पुर्णत्वाचा दाखला दयायला हवा. जेणेकरुन तो व्यवस्थितरित्या काम करु शकेल. तसेच रविवारी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी लोकांना सभागृह देवु शकेल. त्यामुळे मी मा. महापौरांना निवेदन करेन की, श्री. दिलिप लालवानी यांनी चांगला विषय उपस्थित केला आहे, गंभीर विषय आहे. एकाच व्यक्तीला लक्षात न घेता तीन वर्षापासुन जेवढे करारनामे झाले आहेत त्या सर्व करारनाम्यांची चौकशी व्हायला हवी.

<u>मा. सचिव :—</u> प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u>मा. महापौर महोदया, आपण या प्रकरणी चौकशी समिती स्थापन करावी. तसेच पुढील महासभेत त्याचा अहवाल यायला हवा. तसेच पुढील बैठकी पर्यंत हा प्रश्न राखुन ठेवला जावा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– आमचे पण काही प्रश्न आहेत, आम्हांलाही बोलण्याची संधी मिळायला हवी.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– मा.महापौर महोदया, प्रश्नोत्तराचा कालावधी संपला असेल तर हा प्रश्न पुढील बैठकीत घेण्यात यावा.

मा. महापौर :– प्रश्नोत्तर कालावधी संपला असल्याने आता आपण बैठकीचे कामकाज पुढे सुरु करु या. श्री. दिलीप लालवानी यांचा हा प्रश्न मागील चार बैठकांपासुन सुरु आहे............

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– आम्हांला पण यावर बोलायचे आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– आम्हांला देखिल काही प्रश्न विचारायचे आहेत.

मा. महापौर :– या प्रकरणाचा अहवाल आल्यानंतर चर्चा करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– आमचे काही पुरक प्रश्न आहेत, ते आधी ऐकुन घ्या.

मा. महापौर :– तुमची काय तक्रार आहे?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– तक्रार नाही, पुरक प्रश्न आहेत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– आमचे पण आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– सर्वांना बोलण्याची संधी दिली जावी.

मा. महापौर :– तुम्ही कार्यसुचीवर प्रश्न आणा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– मी काय बोलत आहे हे आपणांस समजले नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– चौकशी समिती समोर सर्वांनी प्रश्न करावेत.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

मा. महापौर :– आता प्रश्नोत्तराचा कालावधी संपला असल्याने आपण हा प्रश्न पुढील बैठकीत घेवु. त्यावेळी आपण प्रश्न विचारा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– आता या विषयावर बोलता येणार नाही. प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

मा. महापौर :– तुम्ही खाली बसा. प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– महापौरजी, आम्ही आपणांस विनंती करु शकतो, निर्देश देवु शकत नाही. आपण आपला निर्णय दया.

मा. महापौर :–श्री. दिलीप लालवानी यांनी या प्रश्नावर ज्या शंका उपस्थित केल्या होत्या त्यावर अधिका–यांनी जे उत्तर दिले आहे ते संशयास्पद आहे. जसे स्टॅम्प ६ महिन्यानंतर वैध नसतो. तसेच ज्या काही इतर गोष्टी बोलल्या गेल्या आहेत त्या बद्दल आयुक्तांनी चौकशी बसवुन पुढील बैठकीत त्याचा अहवाल आणावा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– दुनिचंद कालानी कॉलेजचा विषय नाही आणणार का?

मा. महापौर :– तुम्ही त्याबद्दल प्रश्न विचारा. त्यानंतर त्यावर चर्चा होईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:— तुम्ही चुकीचे निर्देश देत आहात.

मा. महापौर :—तुम्हांला ज्या काही शंका आहेत त्याबद्दल महासभेत प्रश्न विचारा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— ज्याप्रमाणे श्री. अशोक खोत हे जेल मध्ये गेले आहेत त्याप्रमाणेच यांनाही तुम्ही जेल मध्ये पाठवाल.

मा. महापौर :— तुम्ही त्यांना घाबरवण्याचा प्रयत्न करु नका.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— सगळयांना बोलण्याची संधी दया.

मा. महापौर :—अधिका—यांना जेल मध्ये जाल असे सांगुन घाबरवण्याचा प्रयत्न करु नका. तुम्ही खाली बसा.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—मा. महापौर महोदया, चौकशीचे आदेश दयावेत.

मा. महापौर :— चौकशीचे आदेश दिले आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:— महाराष्ट्र शासनापेक्षा महापालिका मोठी नाही. सर्वांना बोलण्याची संधी दया.

मा. सदस्य श्री. जिवन ईदनानी :—आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— ही कालानी प्रायव्हेट कंपनी नाही. ही महापालिका आहे.

मा. महापौर:— या प्रकरणाची पुर्ण चौकशी करुन पुढील बैठकीत अहवाल देण्यात यावा. तसेच आपले पुरक प्रश्न देखिल पुढील बैठकीत विचारावेत. आता बैठकीचे कामकाज पुढे सुरु करावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— हवे तर तुम्ही प्रश्न पुढील बैठकीत घ्या. आम्हांला प्रश्न विचारायचे आहेत.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :—मा. महापौर महोदया, तुम्ही फक्त तुमच्याच सदस्यांना सदस्य मानता का? तुमचे दिलीप लालवानी जर तुमचे सदस्य असतील तर बाकीचे सदस्य कुणाचे आहेत? महापौरांनी सर्वांना एकाच नजरेने बघायला हवे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— माजी महापौर योग्य बोलत आहेत.

मा. महापौर :— तुम्ही समजण्याचा प्रयत्न करा. मी सर्वांना बोलण्याची संधी दिली आहे. परंतु आता प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :—हे चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आम्हांला बोलण्याची संधी मिळालेली नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— महाराष्ट्र शासनापेक्षा महापालिका मोठी नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आम्हांला बोलण्याची संधी मिळालेली नाही याची नोंद घेतली जावी.

मा. महापौर :– प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे तरी आपण कसे काय बोलत आहात.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– पुढील बैठकीत हा प्रश्न ठेवा.

मा. महापौर :–पुढील बैठकीत हा प्रश्न ठेवला आहे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– माजी महापौर जिंदाबाद। करोतिया मॅडम जिंदाबाद ।

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :– दुजाभाव बंद करा.

मा. सदस्य श्री. जिवन ईदनानी :– सचिव साहेब, हा लोकशाहीचा खुन आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– तुम्ही तुमच्या अधिकारांचा गैरवापर करीत आहात.

मा. सदस्य श्री. जिवन ईदनानी :– अधिकारांचा गैरवापर होत आहे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. जिवन ईदनानी :– सचिव साहेब, लोकशाहीचा खुन होत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– उल्हासनगरचे डीएमसी व आयुक्त जेलमध्ये जातील. महाराष्ट्र शासनाचा आदेश आहे. त्यांच्या आदेशाने टाऊन हॉल दिला आहे. तुम्ही सगळेपण जेल मध्ये जाल.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–सचिव साहेब, आमच्या सर्व सन्माननिय सदस्यांना नियमांचे पालन करण्यासाठी माहिती दया. मा. महापौरांनी चौकशी समिती नेमण्यासाठी एकदा आदेश दिल्यानंतर चौकशी समिती बसायलाच हवी.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :– नागरीक बघत आहेत की येथे काय चालु आहे. महापालिकेचे पैसे वाचविणे हे आपले कर्तव्य आहे. आजपर्यंत टाऊन हॉलमधुन महापालिकेने किती पैसे वसुल केले आहेत? जर केले नसतील तर का नाही केले? त्याला सवलत का दिली? महापौर व आपण लोकप्रतिनिधी आहोत. महापौरांनी चौकशी समितीसाठी जे आदेश दिले आहेत ते योग्य आहेत.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

मा. महापौर:–माझे सर्व सदस्यांना निवेदन आहे की, लोकांनी आपणांस निवडुन पाठविले आहे व लोकांच्या हितासाठी आपण येथे बसलो आहोत. आपण आपली प्रकृती खराब करण्यासाठी येथे बसलेलो नाहीत. आमचे सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचा रक्तदाब वाढल्याने त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :– जो पर्यंत जिवंत राहु तोपर्यंत लोकांसाठी लढत राहु.

**मा. महापौर :—** आपण जिवंत राहिलो तर लढु शकु. त्यासाठी आपणांस जिवंत राहावे लागेल.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** दुस—या अधिका—यांनी हॉस्पीटलमध्ये जायला नको.

**मा. सचिव :—** कृपया लक्ष दयावे. चार लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या आहेत त्या पुढील प्रमाणे आहेत.

*लक्षवेधी सूचना क्र. १*

सुचकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्र चौधरी

विषय :— उल्हासनगर महानगरपालिकेचे शहर अभियंता पद रिक्त असल्याबाबत.

*लक्षवेधी सूचना क्र. २*

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :—श्री. जीवन इदनानी

विषय :— उल्हासनगर शहरातील महापालिकेने परवाना दिलेल्या फेरीवाल्यांकडुन दंडनिय रक्कम व शुल्क वसुली करणेकामी महापालिकेने मे. जय साईराम एंटरप्रायजेस यांच्याशी केलेला करारनामा रद्द केल्याने त्या संबधात चर्चा होणेबाबत....

*लक्षवेधी सूचना क्र. ३*

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्र चौधरी

विषय :— पावसाळा सुरु होण्यापूर्वी अतिवृष्टीमुळे जिवीत व वित्तहानी होवु नये यासाठी विविध उपाययोजना करणे तसेच धोकादायक वृक्षांची विल्हेवाट लावणेबाबत...

*लक्षवेधी सूचना क्र. ४*

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी
अनुमोदकाचे नाव :—श्री. होशियारसिंग लबाणा

विषय :— उल्हासनगर शहरात लागलेले अनधिकृत पोस्टर्स व होर्डींग यांच्यावर कारवाई करणेबाबत....

श्री. रमेश चव्हाण व श्री. राजेंद्र चौधरी यांनी शहर अभियंता पदाबाबत जी लक्षवेधी सुचना टाकली आहे ती मा. महापौरांनी अस्विकृत केली आहे. दुसरी लक्षवेधी सुचना जिचे सुचक श्री. किशोर वनवारी व अनुमोदक श्री. जिवन ईदनानी आहेत, त्या लक्षवेधी सुचनेचा विषय उल्हासनगर शहरातील महापालिकेने परवाना दिलेल्या फेरीवाल्यांकडुन दंडनिय रक्कम व शुल्क वसुली करणेकामी महापालिकेने मे. जय साईराम एंटरप्रायजेस यांच्याशी केलेला करारनामा रद्द केल्याने त्या संबधात चर्चा होणेबाबत असा आहे ही लक्षवेधी सुचना देखिल मा. महापौरांनी अस्विकृत केली आहे. तिस—या लक्षवेधी सुचनेचे सुचक श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व अनुमोदक श्री. राजेंद्र चौधरी आहेत, त्या लक्षवेधी सुचनेचा विषय पावसाळा सुरु होण्यापूर्वी अतिवृष्टीमुळे जिवीत व वित्तहानी होवु नये यासाठी विविध उपाययोजना करणे तसेच धोकादायक वृक्षांची विल्हेवाट लावणेबाबत असा आहे. ही लक्षवेधी सुचना मा. महापौरांनी स्विकृत केली आहे व चौथी लक्षवेधी सुचना जिचे सुचक श्री. राजु जग्यासी व अनुमोदक श्री. होशियारसिंग लबाना आहेत, त्या लक्षवेधी सुचनेचा विषय उल्हासनगर शहरात

लागलेले अनधिकृत पोस्टर्स व होर्डींग यांच्यावर कारवाई करणेबाबत असा आहे. ही लक्षवेधी सूचना मा. महापौरांनी स्विकृत केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौर व सचिव साहेब, मी एक कायदा विचारु इच्छितो. मी माझी लक्षवेधी सुचना १८ तारखेला दिली आहे. बाकीचे लक्षवेधी सुचना १९ तारखेला दिल्या आहेत. माझी लक्षवेधी सुचना आधी आली असतांना देखील अमान्य केली आहे. त्याचे कारण काय आहे? तसेच आधी दिलेली लक्षवेधी आधी घ्यायची आहे कि नंतर आलेली लक्षवेधी आधी घ्यायची आहे? याबद्‌दल कायदा काय आहे ते सांगावे.

<u>मा. सचिव :–</u> लक्षवेधी सुचना कोणत्या क्रमाने प्राप्त झाली आहे या गोष्टीला महत्व नाही. जनहित व तातडीची आवश्यकता कशाला आहे या दोन तत्वांना महत्व दिले जाते. मा. महापौरांनी या दोन लक्षवेधी सुचना याच तत्वावर स्विकारल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> माझी लक्षवेधी सुचना प्रशासनाच्या विरोधात आहे. दोन अधिका–यांविरुध्द अॅन्टी करप्शन ब्युरो मध्ये तक्रार करण्यात आली आहे. पैसे न मिळाल्याने फेरीवाल्यांचा ठेका रद्द केला आहे. यामध्ये महापालिकेचा काही संबंध येत नाही का? येथे काहीही होवु शकते. प्रशासनाला यामध्ये खुलासा करण्यात काय आपत्ती आहे?

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u> कोणती लक्षवेधी सुचना स्विकृत करायची अथवा अस्विकृत करायची हा मा. महापौरांचा विशेष अधिकार आहे. त्याबद्‌दल आपण बोलु शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> तुम्ही खुलासा करायला का घाबरता?

<u>मा. महापौर ::–</u>सन्माननिय सदस्यांना निवेदन आहे की, लक्षवेधी सुचना स्विकृत वा अस्विकृत करणे हा महापौरांचा अधिकार असतो. कोणती लक्षवेधी सुचना तातडीची आहे व कोणती लक्षवेधी सुचना आवश्यक आहे हे बघुन लक्षवेधी स्विकृत करावी लागते. त्यामुळे मी या दोन लक्षवेधी सुचना स्विकृत केल्या आहेत. यापेक्षा जास्त बोलणे योग्य होणार नाही. तसेच श्री. किशोर वनवारी हे ज्या विषयाबद्‌दल बोलत आहेत त्या विषयावर स्थायी समितीमध्ये अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ चर्चा झाली आहे . तसेच त्याचा निर्णय देखिल आला आहे. त्या प्रकरणात आम्ही हस्तक्षेप करु इच्छित नाही. त्या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे. आता दोन लक्षवेधी सुचना स्विकृत केल्या असून त्यावर चर्चा करण्यात येईल.

<u>मा. सचिव :–</u> पहिली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी त्यांचा प्रस्ताव मांडावा.

---

## <u>लक्षवेधी सूचना क्र. १</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :–श्री. राजेंद्र चौधरी

**विषय** :– पावसाळा सुरु होण्यापूर्वी अतिवृष्टीमुळे जिवीत व वित्तहानी होवु नये यासाठी विविध उपाययोजना करणे तसेच धोकादायक वृक्षांची विल्हेवाट लावणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये लक्षवेधीद्वारे सुचित करण्यात येते की, गेल्या वर्षीच्या २६ व २७ जुलै, २००५ रोजीच्या अतिवृष्टीमुळे उल्हासनगर शहराला प्रचंड हानी पोहचली होती. पुराच्या तडाख्यामुळे उल्हासनगर शहराचे जिवन पुर्णत: विस्कळीत झाले होते. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे उल्हासनगर शहराची जिवित व वित्तीहानी झाली होती. अतिवृष्टीच्या तडाख्यामुळे नागरीकांना बेघर, उपासमार, रोगराई, पाण्याची टंचाई, निवारा, व नागरी

सुविधांचा अभाव या भिषण समस्यांना सामना करावा लागला होता. अदयापही बहुतांश नागरीक पुराच्या तडाख्यातुन सावरले गेले नाहीत. येत्या पावसाळयाची हुरहुर नागरीकांच्या मनात निर्माण होत आहे.

अदयापही शहरातील नदी किना—या लगतचा परिसर, मोठे नाले सफाईबाबत प्रशासनाने कोणतीही हालचाल केली नाही. गतवर्षीचा अतिवृष्टीचा भयंकर अनुभव लक्षात घेवुन प्रशासनाने पावसाळयापूर्वी खबरदारीचा योग्य उपाययोजना राबविल्या पाहिजेत. त्याकरीता प्रशासनाने महासभेत सर्व पक्षीय सदस्यामार्फत सविस्तर चर्चा करुन अतिवृष्टीचा सामना करण्यासाठी उपाययोजनाबाबत आखणी केली पाहिजे. त्यासाठी महापालिकेच्या अतिदक्षता विभागास अतिवृष्टीचा सामना करण्यासाठी शहरात कोणत्याही ठिकाणी तत्परतेने जाण्यासाठी अग्निशमन विभागाला व अतिदक्षला विभागाला अत्याधुनिक साहित्ययंत्रणा (कमीत कमी दोन यांत्रिक होडया) पुरविणे अत्यावश्यक आहे. पुरग्रस्त विभागात सदर होडयाचा मोठया प्रमाणात वापर करण्यात येईल. अतिदक्ष विभागाला तज्ज्ञानाचा योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण दिल्यास पुरग्रस्त परिस्थिती नियंत्रणाखाली येवु शकते.

पुरग्रस्त परिस्थिती आटोक्यात येण्यासाठी सदर पथकास सुसज्ज अत्याधुनिक संरक्षक साहित्य पुरविण्यात येवुन सदर पथकास तज्ज्ञांमार्फत योग्य प्रशिक्षण देण्यात येणेबाबत प्रशासनाने सदर महासभेत लक्षवेधीवर सविस्तर चर्चा अंति निर्णय घेण्यात यावा. तसेच अतिवृष्टीमध्ये पावसाळयात जोराच्या वादळामुळे झाडे कोसळुन जिवित व वित्तहानी होवुन नागरीकांचे घरांचे नुकसान सोसावे लागते. त्या कारणास्तव प्रशासनाने पावसाळयापुर्वी प्रभाग समितीमार्फत उल्हासनगरमधील धोकादायक पडायला आलेल्या वृक्षाची वेळीच विल्हेवाट लावण्यात यावी. जेणेकरुन वादळ व पावसापासुन पडझड होणा—या वृक्षापासुन नागरीकांच्या घरांची हानी होणार नाही. धोकादायक वृक्षांच्या नागरीकांच्या तक्रारीचे पाहणी अंती त्वरीत तक्रारीचे निवारण करावे. येत्या पावसाळयापासुन नागरीकांच्या संभाव्य पुराचा धोका लक्षात घेता खबरदारीचा उपाय म्हणुन वेळीच प्रशासनाने नागरीकांना पुराची झळ पोहचु नये म्हणून प्रशासकिय यंत्रणा सतर्क ठेवावी. संबंधित विभागाच्या अधिका—यांना कामास लावावे. तरी सदर लक्षवेधीचा गांभीर्यपुर्वक विचार करुन अतिवृष्टीला सामोरे जाण्यासाठी पावसाळयापुर्वी अतिदक्षता विभगाला सुसज्ज, संरक्षक, अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध करुन त्यांना तज्ज्ञांमार्फत योग्य प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी. पावसाळयापुर्वी नदी किना—या लगतचा परिसर, मोठे नाले व्यवस्थितरित्या साफ करुन घेण्यात यावेत. सदर लक्षवेधीची सविस्तर चर्चा करुन येत्या पावसाळयापुर्वी दक्षतेबाबत विचारविनिमय करावा ही विनंती.

---

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> मा. महापौरजी, मागील वर्षी २६ व २७ जुलैला जो पुर आला होता तो लक्षात घेवुन या वर्षी झोपडपट्टीमध्ये लोकांसाठी नावांचा बंदोबस्त करायला हवा. मागील वर्षी ती व्यवस्था नसल्याने लोकांचे फार नुकसान झाले होते. बरेच लोक वाहुन गेले होते, ज्यांचा अदयाप पत्ता लागलेला नाही. ब—याच लोकांचे मृतदेह नंतर हाती लागले होते. यासाठी नावा, पाणबुडे यांचा बंदोबस्त करायला हवा. तसेच पाणी लवकर निघुन जाण्यासाठी पावसाळयापुर्वी नाले सफाई देखिल योग्य प्रकारे व्हायला हवी. तिसरे म्हणजे ब—याच लोकांच्या घरात झाडांमुळे त्रास होत आहे, सदरची झाडे तोडण्यासाठी लोक तक्रारी करुन थकले आहेत. या सर्व बाबींवर चर्चा होवुन काही तरी मार्ग निघायला हवा.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी श्री. भुल्लर यांना सांगु इच्छितो की, या मुद्दयावर मागील स्थायी समिती बैठकीत चर्चा झाली होती. त्यावेळी उपाययोजना करण्यासाठी श्री. रौराळे यांना सांगण्यात आले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> मा. महापौरजी, हे उत्तर कशाला देत आहेत.

<u>मा. महापौर :—</u> ही लक्षवेधी सुचना स्विकृत केली आहे. पावसाळयापुर्वी शहरातील नाले सफाईचे काम सुरु झाले आहे. तसेच हा विषय महत्वाचा असल्याने यावर भरपुर चर्चा करण्यात यावी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> होडयांची व्यवस्था प्रत्येक झोपडपट्टीमध्ये करायला हवी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u> मा. महापौरजी, आज ही जी लक्षवेधी सुचना येथे दाखल केली आहे याच विषयावर दोन महिन्यापुर्वी महासभेत लक्षवेधी सुचना दाखल केली होती. त्यावेळी मी चर्चा केली होती की २६ जुलैला जो पुर आला होता त्यावेळी महापालिकेकडे काहीही यंत्रणा उपलब्ध नव्हती. फक्त अग्निशमन दल होते. तर आता येणा—या पावसाळयात पुर आला तर, पुर यायला नको, परंतु आला तर त्यावर मार्ग काढण्यासाठी महापालिकेकडे यंत्रणा उपलब्ध असायला हवी. यासाठी आम्ही आज लक्षवेधी सुचना विचारली आहे. त्यामुळे या लक्षवेधीवर महासभा विचार करुन योग्य मार्ग काढेल अशी मी आशा करतो. त्याचप्रमाणे ३० एप्रिलला जेव्हा आम्ही लक्षवेधी सुचना विचारली होती तेव्हा पुरग्रस्त लोकांची घरपट्टी माफ करण्याबाबत

मुद्दा उपस्थित केला होता. त्यासाठी ठराव देखिल केला होता. महापालिकेने त्या ठरावाची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यासाठी आपण अधिका—यांना आदेश दयाल अशी मी आशा करतो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. महापौर महोदया, मागील वर्षी अतिवृष्टीमुळे ब—याच ठिकाणी झाडे पडुन वित्तहानी व अपघात झाले होते. मी वृक्ष प्राधिकरण समितीचा सदस्य आहे. मी विचारु इच्छितो की, किती लोकांचे अर्ज अदयाप प्रलंबित असुन त्यावर कारवाई झालेली नाही? झाड पडुन जिवीतहानी व्हायची वाट तुम्ही बघत आहात काय? प्रभाग अधिका—याने आणुन दिलेले व आम्ही पास केलेले किती प्रकरणे अदयाप प्रलंबित आहेत? तसेच कोणामुळे प्रलंबित आहेत याचे उत्तर दया.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> मा. महापौर महोदया, श्री. भुल्लर व श्री. चौधरी यांनी लक्षवेधी सुचना दाखल केली आहे. दरवर्षी ७ जुनला पाऊस सुरु होण्याची शक्यता असते व तसे मानले जाते कारण मृग नक्षत्र ७ जुनला सुरु होते. मागील वर्षी २६ जुलैच्या अतिवृष्टीनंतर ऑगस्ट महिन्यात आपली महासभा झाली होती. त्यामध्ये पुढील वर्षी आपत्ती आल्यानंतर निवारण करण्याऐवजी आपत्ती येण्यापुर्वीच जे पिडीत लोक आहेत त्यांना मदत करण्यासाठी, त्यांच्यापर्यंत अधिकारी अथवा पदाधिकारी यांच्यामार्फत उपाययोजना पोहचविण्यासाठी एक यंत्रणा सक्रिय ठेवायला हवी अशी चर्चा त्या महासभेत झाली होती. प्रशासनाने व शासनाने देखिल हे मान्य केले होते. परंतु लक्षवेधी सुचना आल्यावर काय उपाययोजना केल्या आहे याचे निवेदन होणे आवश्यक आहे. आता पुन्हा पावसाळा सुरु होणार आहे. पुन्हा पुर येईल अथवा नाही याची कोणीही शाश्वती देवु शकत नाही. परंतु पुर आल्यानंतर त्यासाठी काय काय उपाययोजना केल्या आहेत याचे विवरण येथे देणे आवश्यक आहे. आम्ही महासभेत ज्या सुचना केल्या होत्या, पुराच्या वेळी काम करतांना काही अडचणी आल्या होत्या. जसे बोटी नव्हत्या. ऐनवेळी लोकांना पुरातुन काढण्यासाठी कल्याण व ठाणे येथुन होडया मागविल्या होत्या. लाईफ जॅकेट नव्हते. तसेच प्रशिक्षीत गार्ड देखिल नव्हते. तर अशा सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत प्रशासनाने काही कारवाई केली आहे अथवा नाही याचे विवरण देणे आवश्यक आहे. महासभेला सुरुवात झाली तेव्हा पासुन आम्ही पाहत आहोत की लोकप्रतिनिधी प्रशासनावर टिका करीत आहेत. टिका करणे योग्य आहे, तुम्हांला राग आला तरी चालेल परंतु तुम्ही त्यातुन चांगले ते घ्या. नुसती टिका केली म्हणुन राग मानुन घेवु नका. प्रशासनाने सतर्क व्हावे हा त्यामागील अर्थ आहे. प्रशासनाने लोकाभिमुख काम करावे. लोकांच्या ज्या अपेक्षा आहेत त्या पुर्ण करण्यामागची लोकप्रतिनिधींची जी तडफड आहे ती बघा. उल्हासनगरच्या लोकांचे रक्षण करणे, त्यांची जिवीत व वित्तहानी होवु नये म्हणुन काम करणे हे तुमचे कर्तव्य आहे. परंतु दुर्देवाने येथे जे—जे विचारले गेले, पहिली लक्षवेधी डॉल्फीन क्लबची होती. महाराज तुम्हांला विचारत होते परंतु तुम्हांला त्याचे उत्तरही देता आले नाही. अशा प्रकारे प्रशासन काम करीत आहे. आता जी लक्षवेधी विचारली आहे त्याबाबतही तसेच आहे. एका लोकप्रतिनिधीला उच्च रक्तदाबामुळे ॲडमिट व्हावे लागले. तरीपण त्या प्रतिनिधीचे उत्तर तुम्ही देवु शकले नाहीत. त्याचे समाधान तुम्ही करु शकले नाहीत. टाऊन हॉलच्या बाबतीत काय झाले त्यावर आता चर्चा करु शकत नाही. पण टाऊन हॉलचा विषय हा वैयक्तीक न होता तो शहराच्या उपयोगासाठी कसा करता येईल हे पाहणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने तुम्ही प्रयत्न करा. कारण या ठिकाणी त्याचे भाडे सुध्दा निश्चीत केलेले नाही. अशा प्रकारचे प्रशासन येणा—या आपत्तीमध्ये लोकांना कसे काय वाचवेल याकडे आम्ही साशंकतेने पाहत आहोत. कृपया लोकांच्या जिवीताचे नुकसान होवु नये यासाठी वेळीच लक्ष दया. तसेच तातडीने उपाययोजना करा. येणा—या आपत्तीवर मार्ग काढण्यासाठी तुम्ही काय नियोजन केले आहे हे आम्हांला सांगितले तर पुढील प्रश्न उपस्थित करता येतील. आज २८मे आहे, ७ जुनला पाऊस सुरु होईल. पाऊस सुरु झाल्यानंतर अथवा पावसानंतर उद्‌भवणा—या परिस्थितीवर तुम्ही मात कसे करणार? रौराळे साहेब, तुमची चर्चा नेहमीच सुरु असते. आज मी व्हीटीसी ग्राउंड येथिल अग्निशमन दलाचे कार्यालय बघितले. तेथे फक्त एकच फायरमन होता. एक फायरमन व एक अधिकारी काय करु शकतो? हे चुकीचे आहे की योग्य आहे? एका वर्षापुर्वी झालेल्या चर्चेवर तुम्ही काय समाधान शोधले आहे? तसेच येणा—या परिस्थितीवर कशी मात करणार आहात? याबाबत या लक्षवेधीवर आपण निवेदन करावे त्यानंतर आम्ही पुढील प्रश्न विचारु.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> २६ जुलैला जो पुर आला होता त्याला दोन महिन्यानंतर एक वर्ष पुर्ण होणार आहे. ती भयानक घटना आपण कधीही विसरु शकणार नाही. यासाठी आमचे सहयोगी श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी योग्य वेळी लक्षवेधी सुचना आणल्याबद्दल आम्ही त्यांचे स्वागत करतो. तसेच मा. महापौरांनी या लक्षवेधीवर खुलेपणाने चर्चा करण्यासाठी जे आमंत्रण दिले आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. महापौर महोदया, २६ जुलैला उल्हासनगरमध्ये जो भयानक पुर आला होता त्याने आपल्याला एक धडा शिकविला आहे. असे होवु नये यासाठी पावसाळयापुर्वी दोन—तीन महिने आधी आपण जागे व्हायला हवे. आता ही वेळ योग्य आहे त्यामुळे नाले सफाई चांगल्या प्रकारे व्हायला हवी. नाले, नाली व नदी किनारी जी अतिक्रमणे आहेत ते हटायला हवेत. तसेच ज्या ठिकाणी नदी व नाले झाकले गेले असतील अशा ठिकाणी बांधकामे तोडुन व नाले

खोल करुन प्रवाह मोकळा केला पाहिजे. जेणेकरुन पाणी वेगाने निघुन जाईल व सखल भागात पाणी तुंबणार नाही. मी अजुन एक निवेदन करु इच्छितो ज्या ज्या ठिकाणी पुर आला होता, ज्याची माहिती महापालिकेकडे आहे अशा ठिकाणी जास्तीत जास्त लक्ष दयायला हवे. जेणे करुन या वर्षी पुन्हा तेथे लोकांना त्रास सहन करावा लागणार नाही. महापौर महोदया, योग्य वेळी योग्य निर्णय घ्यायची ही वेळ आहे. त्यासाठी ही जी चर्चा आहे त्यामध्ये आता आमची सुचना आहे की, नदी नाले योग्य प्रकारे साफ केले जावे, त्यांच्या शेजारील व वरील अतिक्रमण त्वरीत हटवावे, नदी–नाले खोल करावेत. ते खोदुन जेसीबी मशिनने कचरा काढायला हवा. अशा प्रकारे प्रशासनाने या गोष्टींकडे प्राथम्याने लक्ष दयायला हवे. धन्यवाद ।

<u>मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :–</u> मा. महापौर महोदया, या सोबतच ज्या वृक्षांमध्ये विदयुत तारा अटकलेल्या आहेत त्या काढण्यासाठी विदयुत विभागाला महापालिकेतर्फे पत्र देण्यात यावे. धन्यवाद ।

<u>मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :–</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मला फार दु:ख होत आहे की आपण येणा–या पुराबद्दल चर्चा करीत आहोत. परंतु पुर्ण वर्ष माझ्या प्रभागातील लोक माझ्याकडे येवुन पुरग्रस्त दाखल्याची मागणी करीत आहेत. पुन्हा पुर आल्यावर व ते लोक त्यामध्ये वाहुन गेल्यावर आपण त्यांना दाखला देणार आहोत काय? आम्ही त्यांना काय उत्तर देणार? मी कालच प्रभागात गेली होती त्यावेळी लोक मला दाखला कधी मिळेल असे विचारत होते.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:–</u> मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्य, मागच्या वर्षी २६ जुलैला महाभयंकर असा प्रलय उल्हासनगर शहराने बघितला त्यानंतर आज एक वर्ष पुर्ण होत आहे. थोडयाच दिवसात पावसाळा सुरु होणार आहे. हे होत असतांना मागील वर्षी जेथे जेथे पुराचा फटका पडला त्या त्या विभागात काय समस्या आहेत आणि काय समस्या निर्माण होणार आहेत याची चाचपणी व विश्लेषण येथिल अधिका–यांनी केले पाहिजे असे माझे मत आहे. आमच्या प्रभागातील भारतनगरमध्ये जेव्हा पुर आला तेव्हा ५,२५,५० घरे उध्द्वस्त झाले. येथिल अधिका–यांनी तेथे काय व्यवस्था केली आहे. संपुर्ण हिराघाट उध्दवस्त झाले होते. हिराघाटच्या परिसरात अधिका–यांनी काय व्यवस्था केली आहे? ज्या ज्या विभागात पुराचा फटका पडला होता त्या–त्या विभागात अधिका–यांनी काय व्यवस्था केली आहे? आज भुल्लर महाराजांनी जी लक्षवेधी आणली आहे त्याच्या माध्यमातुन मी अधिका–यांचे लक्ष वेधु इच्छितो की, भारतनगर मधील नाले सफाई गेल्या पाच वर्षापासुन झालेली नाही. असे बरेच विभाग आहेत जेथे व्यवस्था कधीच झाली नव्हती. ती व्यवस्था युध्द पातळीवर करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानंतर पावसाळा सुरु होण्यापुर्वी झोपडपट्टीमध्ये राहणारा वर्ग तो सर्वात जास्त बाधित होतो. त्यांची जेव्हा दुरुस्तीची कामे चालु असतात तेव्हा त्यांना दुरुस्ती परवानगी मिळत नाही. तुमचे कायदे असे आहेत की झोपडीला दुरुस्ती परवानगी मिळतच नाही. त्यामधुन लोकांना होणारा त्रास व होणारा भ्रष्टाचार कुठेतरी थांबविणे आवश्यक आहे. नदी किनारी जेवढया झोपडपट्टया आहेत, जेवढी घरे आहेत त्यांना दुरुस्ती करायची असेल व त्यांच्याकडे कागदपत्रे नसतील तर काय करायचे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. झाडे तोडण्याचा देखिल प्रश्न आहे. त्यासाठी युध्दपातळीवर माणसे लावणे आवश्यक आहे. हे सर्व करत असतांना जर पुर आला तर पुरामध्ये आपली काय–काय तयारी आहे, पुरामध्ये लोकांना जेवणाची सोय आहे काय? त्यांना खादय पुरविण्याची काही सोय आहे काय? याची तयारी असली पाहिजे. त्यांची राहण्याची काही सोय आहे काय? याची तयारी असली पाहिजे. शहरामध्ये साफ–सफाईचे काम जो ठेकेदार करतो तो काही परिस्थिती उद्‌भवल्यास काय कारवाई करेल याची चाचपणी केली पाहिजे. महापालिकेचा औषध पुरवठा तयार आहे काय, आरोग्य शिबीर तयार आहे काय? या सर्वांची व्यवस्था जर तुम्ही केली तर आपण निश्चितपणे पुराला तोंड देवु शकतो असे मला वाटते. मी पुन्हा सर्वांना विनंती करेन की, येणा–या काळात संकट उद्‌भवल्यास त्यासाठी तयारी करावी धन्यवाद ।

<u>मा. महापौर :–</u> संबंधीत अधिकारी यांनी केलेल्या उपाययोजनेची माहिती तुम्हांला आता येथे येवुन देत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, मी सांगु इच्छितो की, पुराच्या वेळी अधिकारी ५.४५ ला घरी निघुन जातात. उप–आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, स्वच्छता निरिक्षक यांनी एक पथक बनवावे व २४ तास कोणीतरी कामावर राहिल हे बघावे.

<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):–</u> आदरणीय महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब व मा. सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी जी लक्षवेधी सुचना दिली आहे त्या अनुषंगाने मी निवेदन करतो की, महापालिकेच्या वतीने पावसाळयापुर्वी व पावसाळयानंतर करावयाच्या उपाययोजनांसाठी आम्ही कृति आराखडा तयार केला. हा आराखडा मा. जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला आहे. त्या शिवाय आज मा. आयुक्तांच्या

अध्यक्षतेखाली पावसाळयापुर्वी करावयाच्या उपाययोजनांबाबत एक बैठक घेण्यात आली. त्यामध्ये नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी दोन यांत्रिक बोटी, रबर डिंगी, २० लाईफ जॅकेट, ६ वुड कटर मशिन, बोट चालविण्यासाठी प्रशिक्षकाची नेमणुक करावी असे निर्देश दिले आहेत. त्याशिवाय भांडार विभागामार्फत चार रबर डिंगी, चार वुडकटर मशिन खरेदी करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. त्याशिवाय मा. आयुक्तांच्या निर्देशांप्रमाणे अग्निशमन विभागासाठी दोन यांत्रिक बोटी, ६ रबर डिंगी, ४ वुडकटर मशिन खरेदी करण्याची कारवाई सुरु आहे. त्याशिवाय अतिवृष्टीपासुन जिवित व वित्तीहानी होवु नये म्हणुन दक्षता विभागाला अत्याधुनिक यंत्र देण्यात आले आहेत. तसेच छोटे–मोठे नाले सफाई करण्याकरीता तात्पुरत्या स्वरुपात प्रत्येक प्रभागात दहा हंगाामी सफाई कामगार ४५ दिवसांसाठी नेमले आहेत. तसेच शहरातील ४२ मुख्य नाले प्रोक्लेन मशिनद्वारे साफ करण्यासाठी निविदा मंजुर करण्यासाठी दिनांक २०/५/२००६ पासुन कामास सुरुवात करण्यात येणार आहे. त्याशिवाय ज्या मा. सदस्यांना कृति आराखडयाची प्रत आवश्यक असेल त्यांना ती बैठक संपल्यानंतर पुरविण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> हिंदीत बोला. ज्यांना समजले नसेल त्यांना त्यामुळे समजेल.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> मा. महापौर महोदया, झाडांबद्दल काय कारवाई करणार? वृक्षप्राधिकरण समितीमध्ये आम्ही आहोत. झाड तोडायची परवानगी आम्ही दिलेली आहे. परंतु ते कोठे थांबले आहे याचे उत्तर दया. असे किती प्रकरणे आहेत जे मंजुर झाले आहेत परंतु झाडे तोडली नाहीत? त्याचे कारण सांगा. समिती कशाला स्थापन केली आहे? झाड एखादया घरावर पडुन अपघात झाला तर त्याची जबाबदारी तुमच्यावर असणार आहे. कारण आम्ही समितीमध्ये विषय मंजुर केला आहे. आता ते कुठे थांबले आहे ते सांगा. तुम्ही सांगत नसाल तर मी तुम्हांला सांगतो की ते कुठे थांबले आहेत?

**सन्माननिय सदस्य / सदस्या श्रीमती किरण माखिजा, श्रीमती मोना वनवारी, श्री. किशोर वनवारी, श्रीमती मालती करोतिया, श्री. अंकुश म्हस्के, श्री. राजु ईदनानी, श्री. सुरेश जाधव, श्री. प्रशांत जाधव, श्री. लालबिहारी यादव हे सर्व सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा.अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):–</u> वृक्ष तोडण्यासाठी प्रभाग अधिका–यांची वृक्ष अधिकारी म्हणुन नियुक्ती केलेली आहे व त्याप्रमाणे ते कारवाई करतात.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> आता पर्यंत किती झाडे तोडली आहेत. प्रभाग अधिकारी शहर अभियंत्यांवर जबाबदारी ढकलीत आहेत. तुम्हांलाही माहिती आहे. श्री. प्रशांत जाधव यांना मागे एका नाल्या संदर्भात शहर अभियंत्याची सही हवी होती. त्यावेळी सावकारे साहेबांना विनंती करुन त्यांची सही घेतली होती. झाडा संदर्भात मी तुम्हांला भेटुन बोललो देखिल आहे. शहर अभियंता नाहीत म्हणुन झाडे तोडली जात नाहीत. उदया काही जर अपघात झाला तर सर्व जबाबदारी तुमच्यावर असणार आहे हे लक्षात ठेवा. तसेच अपघात होण्याची दाट शक्यता आहे. शहरात जवळ जवळ १०० ठिकाणी अशी झाडे आहेत जी घरावर टेकलेली आहेत. झाडे का तोडली नाहीत याचे उत्तर दया. प्रभाग अधिका–यांनी एक तरी झाड तोडले आहे काय याचे उत्तर दया.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> मा. महापौर महोदया, गेल्या वर्षी माझ्या प्रभागातील एका ब्रिटीश कालीन शौचालया जवळ झाड धोकादायक स्थितीत असल्याने ते तोडण्याचा आदेश पारीत झालेला आहे. एक वर्ष झाले तरी अजुन तोडलेले नाही. अग्निशमन दलाचे लोक हत्यारे नाहीत, यंत्र नाहीत, माणसे नाहीत असे कारण सांगतात. मोठया मोठया इमारतींना लागुन जे झाडे असतात ते धोकादायक असतात. हवेने अथवा चक्रीवादळाने झाड पडल्यास त्याच्या खाली लोक येवुन जिवीत हानी होवु शकते.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> मा. महापौर महोदया, आमच्या पॅनल क्र.१२ मध्ये एक–दिड वर्षापुर्वी सार्वजनिक ठिकाणी असलेले झाड तोडण्यासाठी परवानगी मागीतली आहे. त्यांनी मान्यता दिली आहे परंतु ते झाड कोण तोडेल? ते घरांवर पसरलेले आहे. मागील वर्षी बॅरेक नं. १७९० जवळ एक झाड पडले होते. कमीत कमी ३ घरांवर ते पडले होते त्यामुळे ५ ते ६ माणसे मरणार होते. नशिबाने ते वाचले. ते जर मेले

असते तर प्रशासनाने काय केले असते? तुमचे जे कर्तव्य आहे ते पावसाळयापुर्वी पुर्ण करा. पावसाळयात हवा सुरु असतांना तुम्ही ते कसे काय तोडणार? कृपया याकडे लक्ष दयावे धन्यवाद ।

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर महोदया, कृपया माझ्या प्रश्नाचे उत्तर दया.

मा.अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):— वृक्ष अधिका—यांना वृक्ष तोडण्यासाठी सुचना देण्यात येतील. तसेच श्री. सतरामदास यांनी जे सांगितले त्याबाबतीतही सर्वांना सुचना देण्यात येतील.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर महोदया, असे किती झाडे आहेत जे समितीमध्ये पास झाले आहेत? तुम्हांला त्याची माहिती आहे काय? किती झाडे धोकादायक आहेत? कोणाच्या सहीने ते थांबले आहेत?
तुम्ही ते अधिकार कोणाला दिले आहेत काय?

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):— वृक्ष अधिका—यांना..........

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—मा. महापौर महोदया, महापालिकेने वृक्ष समिती स्थापन केली आहे. त्यामध्ये काही नगरसेवक सदस्य आहेत. त्यांनी कोणती झाडे तोडायची यासाठी ठराव पास केला आहे. त्यावर शहर अभियंत्यांची सही लागते परंतु ते नसल्याने ते ठराव तसेच पडुन आहेत. याची माहिती यांना नाही असे मला वाटते. त्यांनी माहिती घेवुन महासभेला योग्य उत्तर दयावे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :— सचिव साहेब, तुम्ही याचे उत्तर दिले तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— श्री. रौराळे हे नविन अधिकारी आहेत. ते बाहेरुन आले आहेत त्यामुळे त्यांना माहिती नाही.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):— पावसाळयापुर्वी जे—जे वृक्ष धोकादायक अवस्थेत असतील ते तोडण्याची कारवाई करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— असे किती धोकादायक झाडे आहेत?

मा.अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):— त्याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती प्रभाग अधिका—याकडुन घेवुन देण्यात येईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— प्रभाग अधिका—याकडे मी स्वत: दहा वेळा गेलो आहे. ते म्हणतात, रौराळे साहेबांना सांगा. शहर अभियंत्यांची सही लागते. एकतर प्रभाग अधिकारी खोटे बोलत असतील अथवा आपण खोटे बोलत असाल. तुम्ही सांगा की शहर अभियंत्यांची सही आवश्यक आहे काय? एवढे प्रस्ताव पास झाले आहेत एकतरी झाड तोडले आहे काय? याचे उत्तर दया.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):— झाड तोडण्यासाठी माझ्याकडे कोणतीही संचिका प्रलंबित नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मग त्या कुठे आहेत ते आम्हांला सांगा. तुम्ही आपला हात झटकुन दुस—यावर जबाबदारी ढकलत आहात.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— माहिती नाही तर उत्तर कशाला देता? हे काय उत्तर आहे काय? ते काय विचारत आहेत आणि आपण काय उत्तर देत आहात?

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— मा. महापौरजी............

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मा. महापौरजी, एका सदस्याला उत्तर मिळाले नसतांना दुसरे सदस्य उभे राहुन बोलत आहेत. हे काय सुरु आहे? त्यांना उत्तर मिळाल्यानंतर तुम्ही बोला.

मा. सचिव :—कृपया लक्ष दया. वृक्ष प्राधिकरणात १६ सदस्य आहेत. त्याचे अध्यक्ष मा. आयुक्त आहेत. कायदयाप्रमाणे कोणालाही झाड तोडायचे असल्यास त्यासाठी अर्ज करावा लागतो. यासाठी चार प्रभाग समित्यांमधील प्रभाग अधिका—याची वृक्ष अधिकारी म्हणुन नियुक्ती केलेली आहे. त्यांच्याकडे अर्ज प्राप्त

झाल्यानंतर हरकती व सुचनांसाठी जाहिरात प्रसिध्द केली जाते. त्यानंतर प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणाकडे आल्यावर प्रस्तावास मान्यता दिली जाते. खाजगी जागेवरील झाड तोडायचे असल्यास ते मालकालाच तोडावे लागते. तत्पुर्वी त्यांना आपल्याकडुन परवानगी घ्यावी लागते. जनहितासाठी रस्त्यावरील अथवा इतर सार्वजनिक जागांवरील धोकादायक महापालिका तोडते. वृक्ष तोडल्याची परवानगी घेताच वृक्ष अधिका—याने सदर ठिकाणी झाड तोडले आहे अथवा नाही, तोडले असल्यास त्या ठिकाणी नविन झाड लावले आहे अथवा नाही हे बघायचे असते. वृक्ष अधिका—यांना खटला दाखल करायचे देखिल अधिकार आहेत. यासाठी ते आदेश देखिल देवु शकतात. शहर अभियंता यांची नियुक्ती मुख्य वृक्ष अधिकारी म्हणुन केलेली आहे. त्यांनी त्यांच्यावर पर्यवेक्षण करायचे असते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— यामध्ये शहर अभियंता यांची स्वाक्षरीची आवश्यकता असते काय?

मा. सचिव :—वृक्ष अधिकारी थेट सही करु शकतात.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— आमच्या प्रभाग समिती ४ मध्ये श्री. नितनवरे हे प्रभाग अधिकारी आहेत. पेपरमध्ये जाहिरात देणे व इतर सर्व बाबींची पुर्तता झालेली आहे तरी देखील प्रभाग अधिकारी माझी दिशाभुल करीत आहेत. तसेच शहर अभियंता यांची सही व्हायची असल्याने सर्व थांबले आहे असे ते सांगतात.

मा. सचिव :— वृक्ष अधिका—यांना स्वतंत्र अधिकार आहेत. त्यांना खटला भरण्याचे व आदेश देण्याचे अधिकार आहेत. मुख्य वृक्ष अधिका—यांनी त्यांच्यावर फक्त नियंत्रण ठेवायचे असते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— तर मग जेवढे प्रस्ताव आहेत तेवढे वृक्ष पावसाळयापुर्वी तोडण्यास आदेश दया.

मा. सचिवः— वृक्ष प्राधिकरणाचा जो पहिला ठराव झाला होता त्यामध्ये वृक्ष अधिका—यांची कार्य व कर्तव्य निश्चित करण्यात आली होती. तो ठराव सर्वांना दिला होता.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— तुम्ही प्रभाग अधिका—यांना याची माहिती दिली नव्हती काय? त्यांना याची माहिती नाही काय?

मा. सचिव :— सर्वांना ठरावाची प्रत दिली आहे. तसेच ते स्वतः देखिल बैठकीस उपस्थित होते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मग ते दिशाभुल का करीत आहेत? यावर नियंत्रण कोणाचे आहे? हे एकटया प्रभाग अधिका—याचे काम नाही. हे सर्वांचे काम आहे. तुमचे व्यवस्थापन, नियंत्रण हवे. उदया अपघात झाला तर फक्त वृक्ष अधिका—यालाच नाही तर आयुक्तांना जबाबदार धरले जाईल. सर्व अधिका—यांना धरले जाईल. आज १०० पेक्षा जास्त वृक्ष आहेत. तुम्ही ८ दिवसात ते तोडाल का? तुमच्याकडे एवढे मनुष्यबळ आहे काय? यासाठी तुम्ही काय नियोजन केले आहे? उदया जिवीतहानी झाली तर काय करणार? याला तुम्ही जबाबदार राहाल. आयुक्त साहेब तुम्ही उत्तर दया, ही जबाबदारी सर्वस्वी तुमची असणार आहे.

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):—तुम्ही म्हणता त्याप्रमाणे मी सर्व प्रकरणांचा आढावा घेवुन आदेश पारीत झाले असतील तर पुढील कारवाई करतो.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— माझाच विभाग नाही तर सर्व विभागात आहे. तसेच हे पावसाळयापुर्वी होईल काय?

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):—पावसाळयापुर्वीच करणार आहे आम्ही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— आज ४ महिने झाले आहेत. उदया वृक्ष पडुन काही जिवीत व वित्तहानी झाली तर ती तुम्हांला भरुन दयावी लागेल.

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):—झाली तरच.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :— मा. आयुक्त साहेब, आमच्या पॅनल क्र. १२ मध्ये कमीत कमी १० झाडे तोडण्यासाठी मान्यता मिळालेली आहे. तरी श्री. नितनवरे यांच्याकडुन माहिती घेवुन पावसाळयापुर्वी ती तोडुन घ्यावीत. धन्यवाद ।

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— झोपडपट्टीमध्ये छोटया घरासमोर असलेले झाड हे सार्वजनिक जागेत असल्याचे मानुन तोडण्यात यावे. नाहीतर आपले अधिकारी झाड खाजगी जागेत आहे असे सांगुन तोडणार नाहीत. असे व्हायला नको.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— मा. महापौर महोदया, याच विषयावर मी महत्वपुर्ण मुद्दा मांडु इच्छितो. श्री. रौराळे, अतिरिक्त आयुक्त यांनी सांगितले की, कृति आराखडा तयार करुन जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविला आहे. परंतु त्या आराखडयाप्रमाणे अधिका—यांवर जबाबदारी निश्चित केली आहे काय? नाहीतर आराखडा फक्त कागदावरच राहिल.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—कृति आराखडयामध्ये सर्व अधिका—यांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— कृति आराखडयाची अंमलबजावणी लवकरात लवकर व्हायला हवी. श्री. राज असरोंडकर यांनी सांगितले की प्रभाग अधिका—यांकडे जबाबदारी सोपवायला हवी. त्याबद्दल मी सांगु इच्छितो आज १९ तारीख आहे , ७ तारखेला पाऊस सुरु होतो. वालधुनी नाल्यामध्ये मोठया प्रमाणावर कचरा साचला आहे. अजुन त्याची सफाई सुरु केलेली नाही. तो नाला देखिल लवकरात लवकर साफ व्हायला पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मा. महापौरजी, यांनी सांगितले की, दोन नावा घेणार आहोत. उल्हासनगरला दोन नावा पुरेशा आहेत काय?

**मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी, श्रीमती संगिता जावळे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :— मा. महापौर साहेबा, अग्निशमन दलाला दोरखंड देखिल घेवुन दयावेत. मागील वेळी त्यांच्याकडे ते देखिल नव्हते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, चर्चा सुरु असतांना त्यामध्ये महापालिकेची इमारत देखिल पुरग्रस्त होते याचा उल्लेख केला गेला नाही. जर छतावर शेड लावले नाहीत अथवा वॉटर प्रुफिंग केले नाही तर मागील वर्षी प्रमाणेच कार्यालयांचे यावर्षी देखिल नुकसान होईल. यामुळे यावर्षी कार्यालयांच्या नुतनीकरणावर जो खर्च केला आहे तो पाण्यात जाईल. मी स्मरणपत्र देवुन देखिल अदयाप काहीही कार्यवाही झालेली नाही. काही कारवाई केली आहे काय?

उप—आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौरजी, मागील वर्षी उल्हासनगर शहरात पुर येवुन नुकसान झाले होते. यासाठी यावर्षी पुर आल्यानंतर काय उपाययोजना करायची या करीता कृति आराखडा बनविला आहे. श्री.रौराळे साहेब यांनी आपणांस आता त्याची माहिती दिली आहे. पुर आल्यानंतर लोकांचा जीव वाचविणे हे सर्वात महत्वाचे असते. पुराचे पाणी आल्यानंतर ज्या ठिकाणी पाणी भरते त्या ठिकाणच्या लोकांना जेथे स्थलांतरीत करायचे असते अशी ठिकाणे आम्ही निश्चित केली आहेत. दुसरे म्हणजे पुराच्या वेळी लोकांना प्यायला पाणी मिळत नाही तसेच आपली पाणी पुरवठा यंत्रणा देखिल पाण्याखाली जाते. यासाठी टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची तरतुद कृति आराखडयात ठेवली आहे. दुसरे म्हणजे पुराने जी घाण वाहुन येते त्यामुळे शहरात रोगांचा फैलाव होतो. त्याचा प्रतिबंध करणे आवश्यक आहे. यासाठी कृति आराखडयात ज्या डॉक्टरांची नियुक्ती केलेली आहे ते डॉक्टर टायफाईड, मलेरिया इत्यादी रोगांचा फैलाव होवु नये म्हणुन कारवाई करतील. तसेच नाले सफाई देखिल केलेली आहे. त्याचप्रमाणे २४ तास नियंत्रण कक्ष स्थापन केलेला असुन त्यामध्ये कर्मचा—यांची नियुक्ती केलेली आहे. पुर येण्याची शक्यता लक्षात घेवुन व लोकांच्या अडचणी विचारात घेवुन या सर्व उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. तसेच ज्या दोन बोटी घेतल्या आहेत त्या यांत्रिक बोटी आहेत. तसेच ६ साध्या बोटी घेतलेल्या आहेत, आणिबाणीसाठी दोन बोटी आहेत. दोन फायबर बोटी, दोन यांत्रिक बोटी, ४ रबर बोट अशी व्यवस्था केली आहे. बोट चालविण्यासाठी अग्निशमन दलातील कर्मचा—यांना प्रशिक्षण देणे कामी प्रशिक्षकाची नियुक्ती करावी असे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. अशा प्रकारे कृति आराखडा तयार केला आहे. माझे वरीष्ठ श्री. रौराळे साहेब यांनी त्याची माहिती आपणांस दिली आहे. धन्यवाद।

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— बागेश्वर साहेब, कृति आराखडयाची प्रत सर्व लोकप्रतिनिधींना दया. सर्वांचे फोन नंबर, मोबाईल नंबर दया. त्यामुळे संपर्क करता येईल. केलेली उपाययोजना, संबंधीत व्यक्ती व त्यांचा क्रमांक दया.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :– माझ्या प्रभागात औदयोगिक विभाग आहे. तेथे मोठया प्रमाणावर कचरा निघतो तसेच ३७ मोठे नाले आहेत. ज्याप्रमाणे प्रत्येक प्रभागात १० लोक सफाईसाठी दिले आहेत त्याचप्रकारे या विभागात देखिल विशेष पथक सफाईसाठी दयायला हवे. कारण अचानक पाऊस आल्यास खेमाणी येथिल मोठया नाल्यात सर्व कचरा वाहुन येतो व अटकतो. त्यानंतर खेमाणी चौकात लोकांच्या दुकानात पाणी भरते. यासाठी १० लोकांचे एक विशेष पथक औदयोगिक विभागातील नाला सफाईसाठी देण्यात यावे.

उप–आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–सन्माननिय महोदयांनी जी सुचना केली आहे त्याबददल मी आयुक्तांतर्फे आश्वासन देतो की एक–दोन दिवसात विशेष पथकाची नियुक्ती केली जाईल. तसेच बोडारे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे कृति आराखडयाची प्रत सर्व नगरसेवकांना दिली जाईल. त्यामध्ये सर्व अधिका–यांचे नाव, पत्ते व मोबाईल क्रमांक आहेत. धन्यवाद ।

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :– मा. महापौरजी, मी उमाप साहेबांना सांगु इच्छितो की, मी स्वत: उप–आयुक्त श्री. सावंत यांच्या सोबत या नाल्याची पाहणी केली आहे. तसेच १० माणसे देण्याचे कबुल केले आहे. हे मी आपल्या माहितीसाठी सांगत आहे.

मा. महापौर :– हा मुद्दा समाप्त करण्यापुर्वी मी सांगु इच्छिते की, पुरग्रस्तांची घरपट्टी माफ करण्याचा निर्णय देखिल घेण्यात आला होता. त्यावरही अंमलबजावणी केली जावी. आता दुसरी लक्षवेधी सुचना सुरु करावी.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– वॉटर प्रुफींगचे काय झाले? तसेच अग्निशमन विभागात आज एकच फायरमन होता. त्याचे काय करणार?

मा. महापौर :–फायरमनचा बंदोबस्त हे करतील. यांनी कृति आराखडा बनविला आहे. वॉटर प्रुफिंग बद्दल मी सांगु इच्छिते की यासाठी मी दोन चार बैठका घेतल्या आहेत. तसेच श्री. सोनेसर ज्यांनी ही इमारत बनविली होती त्यांना देखिल त्यासाठी बोलाविले होते. आम्ही इमारतीचे बांधकाम करण्यासाठी रुपये ५० लाखाचा निधी देखिल ठेवला आहे. आता महानगरपालिका झाली असल्याने सदस्य संख्या व इतर कार्य देखिल वाढले आहेत. त्यामुळे दालने अपुरे पडत आहेत. यासाठी अजुन एक मजला बांधावा लागेल. यासाठी रुपये ५० लाखाच्या निधीची तरतुद केली आहे. आज वातावरण उष्ण आहे. त्यामुळे कामकाज कसे होईल याची चिंता होती. यासाठी यापुर्वी हा हॉल एसी करण्यासाठी विचारणा केली होती. त्यावेळी श्री. आयलानी यांचे म्हणणे होते की, नविन बांधकाम केल्यानंतर तेथे नविन हॉल बनवुन एसी लावणे सुलभ होईल. येथे स्प्लीट एसी लावणे शक्य होणार नाही, यासाठी मोठी तोडफोड करावी लागेल. आजच त्याबाबत चर्चा झाली आहे. तसेच श्री. सोनेसर यांनी अजुन एक प्लान दिला आहे. त्यानुसार संपुर्ण इमारतीला जलरोधक बनविण्यासाठी रुपये ४ ते ५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यानंतर किमान ३ वर्ष तरी पाणी गळतीचा प्रश्न उद्भवणार नाही. आता एक–दोन दिवसात निर्णय घेवुन वॉटर प्रुफींगचे काम सुरु करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– बांधकाम करण्याआधी परवानगी घेणार आहात की नाही?

मा. महापौर:–प्लान पास झालेला आहे.

मा. सचिव:–लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. राजु जग्यासी व अनुमोदक आहेत श्री. होशियारसिंग लबाणा. त्यांनी त्यांचा प्रस्ताव सादर करावा.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्र. २

सुचकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :–श्री. होशियारसिंग लबाणा

**विषय :—** उल्हासनगर शहरात लागलेले अनधिकृत पोस्टर्स व होर्डींग यांच्यावर कारवाई करणेबाबत....

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर शहरातील विविध ठिकाणी विना परवानगी लावण्यात आलेले अनधिकृत बॅनर्स, पोस्टर्स लावल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामध्ये काही बॅनर्स व पोस्टर्स फाटलेल्या अवस्थेत असल्याने शहरात जाता येतांना शहर अनधिकृत बॅनर्स व पोस्टर्समय झाल्याचे दिसुन येत असुन बॅनर्स, पोस्टर्स फाटलेल्या अवस्थेत असल्याने ते काढणे देखिल अत्यंत गरजेचे असून कारण उल्हासनगर शहरात इतर शहरातून येणारे व्यवसायिक व इतर नागरीक याबबात चर्चा करीत असतात.

तरी उल्हासनगर शहरातील विविध ठिकाणी विना परवानगी लावण्यात आलेले अनधिकृत बॅनर्स व पोस्टर्स हटविण्याबाबत महासभेपुढे चर्चा करण्यात येवुन निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

---

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, या विषयावर मागील स्थायी समिती बैठकीमध्ये चर्चा झाली होती. यासाठी ब—याचवेळा अधिका—यांना पत्र देखिल दिले आहे. परंतु त्यानंतरही या विषयाकडे लक्ष दिलेले नाही. आज मी पुर्ण सभागृहाचे लक्ष या विषयाकडे वेधु इच्छितो. आपण शहरातील कोणत्याही भागातुन गेलो तरी प्रत्येक चौकामध्ये होर्डिंग लावल्याचे दिसुन येते. सदरचे होर्डिंग दिवसेंदिवस वाढत असलेले दिसुन आले आहे. आजपासुन सहा महिन्यापुर्वी चौकात चार होर्डिंग असतील तर आज त्याठिकाणी सात होर्डिंग झाले आहेत. त्यासाठी काही कायदा आहे की नाही ते कळुन येत नाही. यासाठी आपण एखादया एजन्सीची नियुक्ती केली आहे काय? तसेच किती होर्डिंग लावावीत याची संख्या निर्धारीत करुन दिली आहे काय? तसेच यावर कोण लक्ष ठेवते? त्यांना नेमुन दिलेल्या संख्ये एवढेच होर्डिंग लावतात की जास्त लावतात? यासाठी मी चार—पाच उदाहरणे देतो. आपला जो रेल्वे पुल आहे तेथे आपण गेलात तर आपणांस दिसुन येईल की, पुर्ण पुल होर्डिंगने झाकला गेला आहे. तेथे कोणीही लाकडाचे अथवा लोखंडाचे खांब लावुन त्यावर होर्डिंग लावतो. याकडे लक्ष कोण देईल? व्हिनस येथिल जो फाउंटन आहे तो देखिल होर्डिंगने झाकला गेला आहे. सपना गार्डन येथे देखिल असेच आहे. यासाठी मी मा. महापौरांना विनंती करतो की, जे होर्डिंग परवानगी शिवाय लावले असतील ते काढण्यासाठी त्यांनी आदेश दयावेत. तसेच कोणत्या एजन्सीला हे काम दिले आहे तसेच किती होर्डिंग लावण्याची परवानगी दिली आहे? ही पुर्ण माहिती महासभेसमोर यायला हवी. तसेच शहरातील इतर होर्डिंग ज्यामुळे लोकांना त्रास होतो ते सर्व काढुन टाकावे. धन्यवाद ।

<u>मा. महापौर :—</u> या मुद्दयाला आपण पुरासोबत देखिल जोडु शकतो. जो कृति आराखडा तयार केला आहे त्यामध्ये याचा देखिल उल्लेख व्हायला हवा. शहरात बांबु व खांब लावुन जे होर्डिंग लावले जातात ते काढुन टाकावेत यासाठी आमच्या सन्माननिय सदस्या श्रीमती प्रेमा खांडेकर यांनी देखिल पत्र दिले आहे. तसेच एक महिन्यापुर्वी या सर्व गोष्टी विचारात घेवुन मी देखिल पत्र दिले होते. तसेच आता परवानगी शिवाय जे होर्डिंग शहरात लावले आहेत, मग ते कोणाचेही असो, ते सर्व काढुन टाकावेत. हा आदेश मानुन त्वरीत कारवाई करावी. धन्यवाद।

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.** २ :— श्री चंद्रकांत र. सानप यांची ठोक पगारावर एक वर्षासाठी करार तत्वावर जे. सी.बी ऑपरेटर म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. २ :—** श्री चंद्रकांत र. सानप यांची ठोक पगारावर एक वर्षासाठी करार तत्वावर जे.सी.बी ऑपरेटर म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे जे. सी. बी. मशिन हे वाहन चालविण्यासाठी ''जे. सी.बी. ऑपरेटर'' या पदावर एका कर्मचा—याची निवड होणेसाठी दिनांक १९/४/२००६ च्या दै. वार्ताहर या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

जे. सी.बी. ऑपरेटर या पदावर नियुक्ती करणेसाठी इच्छूक उमेदवारांची दिनांक २८/४/२००६ रोजी प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात आली. त्यावेळेस एकूण चार उमेदवारांकडून मुलाखतीसाठी अर्ज प्राप्त झाले त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | अर्ज क्र. | अर्जदाराचे नांव |
|---|---|---|
| १ | १ | श्री. चंद्रकांत रघुनाथ सानप |
| २ | २ | श्री. खैरे सचिन दिपक |
| ३ | ३ | श्री. जेठीथोर विनोद लक्ष्मण |
| ४ | ४ | श्री. संदिप विठ्ठल सोनावणे |

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने तसेच कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/ मुली /३३९, दिनांक २८/४/२००६ अन्वये महापालिका आस्थापना सुचीवरील सरळसेवा/पदोन्नतीची रिक्त पदांवर नियुक्ती करणेसाठी खालील अधिका—यांची निवडसमिती गठीत करण्यात आली आहे.

१) श्री. नाना रौराळे — अतिरिक्त आयुक्त — मा.आयुक्तांचे प्रतिनिधी तथा मा.व.क. प्रतिनिधी
२) श्री. अशोक बागेश्वर — उप आयुक्त — सदस्य
३) श्री. दिपक सावंत — उप आयुक्त — सदस्य

वरीलप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या निवडसमितीमार्फत जे. सी. बी. ऑपरेटर या पदासाठी आलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. जे. सी. बी. ऑपरेटर या पदाच्या मुलाखतीसाठी प्राप्त झालेल्या ०४ अर्जदारांपैकी प्रत्यक्ष मुलाखतीच्यावेळी ०३ उमेदवार मुलाखतीस उपस्थित होते. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.
१) श्री. चंद्रकांत रघुनाथ सानप
२) श्री. खैरे सचिन दिपक
३) श्री. संदिप विठ्ठल सोनावणे

जे. सी.बी. ऑपरेटर या पदाच्या मुलाखतीसाठी ४० गुण निर्धारित केले होते. त्यापैकी सदर गुण हे शैक्षणिक अर्हता, विशेष अर्हता व अनुभव, सामान्य ज्ञान व व्यक्तिमत्व या चार भागांमध्ये प्रत्येकी १० गुण याप्रकारे विभागुन दिले होते. त्याप्रमाणे निवड समिती सदस्यांनी प्रत्येक उमेदवारास एकूण ४० गुणोपैकी दिलेले गुण एकत्रित करून त्यांची सरासरी काढली असता खालीलप्रमाणे उमेदवारांची गुणवत्ता यादी दिसुन येत आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नांव | मिळालेले गुण |
|---|---|---|
| १ | श्री. चंद्रकांत रघुनाथ सानप | १२९ |
| २ | श्री. खैरे सचिन दिपक | ११९ |
| ३ | श्री. संदिप विठ्ठल सोनावणे | ९० |

''जे. सी. बी. ऑपरेटर'' या पदाच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या वरिल तीन उमेदवारांना मिळालेल्या गुणांमधून त्यांची गुणवत्ता यादी तयार केली असता श्री. चंद्रकांत रघुनाथ सानप हे सर्वाधिक गुण प्राप्त करून प्रथम क्रमांकावर आहेत व द्वितीय क्रमांकावर श्री. खैरे सचिन दिपक हे आहेत.

दिनांक १९/४/२००६ च्या दै. वार्ताहर या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार प्रत्यक्ष मुलाखतीत प्रथम क्रमांकावर असलेले उमेदवार श्री. चंद्रकांत रघुनाथ सानप यांना जे. सी. बी. ऑपरेटर या पदावर ०१ वर्षासाठी करार तत्वावर रू. ४०००/— इतक्या ठोक वेतनावर नियुक्ती देणेसाठीचा प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ३ दिनांक:—१९/५/२००६

सुचकाचे नाव :— श्री. देवेंद्रसिंह खेमाणी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

हो महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या निवड समितीच्या शिफारसीनुसार श्री. चंद्रकांत सानप यांना जेसीबी ऑपरेटर या पदावर एक वर्षासाठी करार तत्वावर रु. ४०००/— इतक्या ठोक वेतनावर नियुक्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

⇨

विषय क्र. ३ :— प्रस्तावाची सूचना :—

उल्हासनगर कॅम्प नं. १ येथिल साधु वासवानी उद्यान व गोल मैदान परिसरात नशापान व मांसाहारावर बंदी घालणे कामी सन्माननिय सदस्या श्रीमती निता आहुजा व श्रीमती मिनु दासानी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

मा. महापौर :—हा प्रस्ताव गोल मैदान येथिल साधु वासवानी गार्डन, रोटरी क्लबचे गार्डन, प्रजापिता ब्रम्हकुमारीजचे गार्डन यासाठी आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— मा. महापौर महोदया, काही दिवसांपुर्वी नेताजी गार्डनचा विषय येथे आला होता. त्यावेळी देखिल आम्ही हा मुद्दा उपस्थित केला होता. आम्हांला असे वाटते की, उदयानात नशापानास व मासांहारास बंदी व्हायला हवी. परंतु यामुळे लोकांमध्ये चुकीचा संदेश जातो की, या उदयानात बंदी आहे व इतर उदयानात दारु पिण्यास सुट आहे. हे कोण थांबवेल? मला चांगले आठवते कदाचित आपण विसरला असाल त्यावेळी आपण बोलला होतात की, आम्ही सर्व उदयानात बंदी घालण्यासाठी निर्देश देवु. असे असेल तर एका उदयानाचा ठराव आणण्याची काही आवश्यकता नाही. आपण असे केल्यास सर्वांना संदेश जाईल की, इतर उदयानांमध्ये खुलेआम दारु पिऊ शकतो. या उदयानाचे नाव देवप्रकाश आहे म्हणुन बंदी आहे तर मग सपना गार्डनला महापुरुषाचे नाव नाही म्हणुन तेथे नशापान होवु शकते काय?

मा. महापौर :— आम्ही आपल्या प्रस्तावाचे स्वागत करतो. शहरातील जेवढी उदयाने आहेत तेथे नशापान व मासांहारास बंदी घालण्यासाठी आपण आता सर्वानुमते निर्णय घेवु. धन्यवाद।

मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंड :— मा. महापौर महोदया, आपण हा एक चांगला निर्णय घेतला आहे. यापुर्वी देखिल मी आपल्याकडे तक्रार केली होती की, गार्डनमध्ये वॉचमन नाही. कालच उदयानात दारु पिऊन भांडणे झाली आहेत. यासाठी उदयानांची रक्षा करावी धन्यवाद । चांगल्या—चांगल्या उदयानांमध्ये वॉचमन नाही आहे. महापालिकेची लाखो रुपयाची मालमत्ता आहे.

मा. महापौर :— यासाठी देखिल आम्ही नियोजन करीत आहोत.

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

सूचक : श्रीमती निता आहुजा
अनुमोदक : श्रीमती मिनु दासानी

*प्रस्तावना :*

उल्हासनगर कॅम्प नं. १ येथिल साधु वासवानी उद्यान, गोल मैदान महानगरपालिकेच्या मालकीचे आहे. या उद्यानास थोर संत पुरुषांच्या नावाने ओळखले जाते. सदरच्या उद्यानामध्ये व गोल मैदान परिसरामध्ये ब—याच वेळा काही लोक नशापान व मांसाहार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे उद्यानातील व गोल मैदानातील पाविञ्याचा भंग होतो. सदर उद्यानामध्ये मोठया प्रमाणात आबालवृध्द व महिला येत असल्यामुळे सदर ठिकाणी नशापान व मांसाहार करणे योग्य नाही.

सभेत चर्चेअंती श्री. लाल पंजाबी, पालिका सदस्य यांनी उपसूचना मांडल्याने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात महापालिका निहीत बरीच उद्याने आहेत, सदर उद्यानांमध्ये देखिल नशापान व मांसाहारावर बंदी घालणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी नशापान व मांसाहारावर बंदी न घातल्यास लोकांमध्ये चुकीचा संदेश जावु शकतो. यासाठी उल्हासनगर महानगरपालि निहीत सर्व उद्यानांमध्ये मांसाहार व नशापानावर बंदी घालण्यासाठी महासभेसमोर प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ४ दिनांक : १९/५/२००६

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका निहीत सर्व उद्यानांमध्ये मांसाहार व नशापान न होणेसाठी योग्य ती उपाययोजना करण्यासाठी प्रशासनास निर्देश देत आहे.

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— मा. सचिव साहेब, ................

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— एक विशेष बाब आहे व शहराच्या हिताची बाब आहे.

मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :— मी देखिल शहराच्या हिताबद्दलच बोलत आहे. मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त व सचिव साहेब, येथे सेंच्युरी कंपनी बाबत माहिती देणारा एक कागद जोडला आहे.

<u>मा. महापौर :—</u> श्री. मोकल सध्या यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. नंतर आपल्या मुद्दयावर येवु. दोन हरकतीचे मुद्दे आहेत आधी त्यावर चर्चा करु.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> हरकतीच्या मुद्दयाद्वारे मी एक प्रश्न विचारतो. एक विशेष बाब आहे, ज्यामुळे उल्हासनगरमध्ये प्रत्येक नागरीक त्रस्त आहे. त्यामध्ये महापौर, आयुक्त, सचिव, विधी अधिकारी सर्वांचा संबंध आहे. ८५५ इमारतींचा मुद्दा उच्च न्यायालयात होता, न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर तो शासनाकडे गेला त्यावर शासनाने अधिसुचना काढली. त्या अधिसुचनेच्या आधारे उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी कारवाई सुरु केली आहे. त्यासाठी उल्हासनगर मधील प्रत्येक मालमत्ता धारकाला नोटिस देण्यात येत आहे. जे देखिल सुरु आहे त्याची कोणालाही माहिती नाही. आपण काय करणार आहोत याचीही माहिती नाही. शासनाने आदेश काय दिले आहेत व आपण काय करीत आहोत? मालमत्ता विभागातील नोंदी प्रमाणे आपण सर्वांना नोटिसा देत आहोत. नेमके काय सुरु आहे याची माहिती नगररचनाकार अथवा आयुक्तांनी दिली तर योग्य होईल. त्यामुळे जे लोक घाबरले आहेत, आम्हांला विचारणा करीत आहेत, त्यांना माहिती दिली जावी. झोपडपट्टीवाल्यांना देखिल नोटिसा दिल्या आहेत. शासनाच्या धोरणाप्रमाणे १९९५ पुर्वीच्या झोपडया आधीच नियमित झाल्या आहेत. मुंबई मध्ये त्या नियमीत झाल्या आहेत. उल्हासनगर मधील नियमित करण्यासाठी आम्ही १९९७ मध्ये ठराव पारीत केला होता, २००२ मध्ये, २००४ मध्ये ठराव पारीत केला आहे. याची अंमलबजावणी कोण करणार? त्या अधिका—याचे नाव देखिल माहित नाही. जिल्हाधिकारी कार्यालयातुन जो नमुना आला आहे त्याप्रमाणे येथिल अधिका—यांनी काम सुरु केले आहे. सखोल अभ्यास करुन त्यानंतर नोटिसा दयायला हव्या होत्या. यामुळे १९९५ च्या शासन निर्णयावर काय परिणाम होईल? नोटिस मध्ये असे लिहिले आहे की, ३० दिवसाच्या आत दंड न भरल्यास बांधकाम अनधिकृत मानुन कारवाई केली जाईल. लोक १९७० पासुन झोपडपट्टीमध्ये राहत आहेत. त्यामुळे १९९५ चा जीआर त्यांना लागु होतो जर आपण प्रयत्न केला तर. ३ वेळा ठराव पारीत करुनही शासनाकडे प्रस्ताव पडुन आहे. आपण त्यावर कारवाई केलेली नाही. परंतु आता या प्रमाणे कारवाई झाल्यास आधीचे सर्व प्रयत्न वाया जातील. यासाठी येथे योग्य उत्तर नगररचनाकार व आयुक्तांनी दयायला हवा. १,४०,००० मालमत्तांपैकी ब—याचशा मालमत्ता अधिकृत आहेत. सदनिका धारकांकडे कागदपत्रे चुकीच्या पध्दतीने मागितले आहेत. एका—एका सदनिका धारकाकडे इमारतीचा प्लान मागितला आहे. म्हणजे एखादया इमारतीत ५० फ्लॅट असतील तर ५० नकाशे दयावे लागतील. ब—याच लोकांना त्यांच्या स्वत:च्या अनधिकृत बांधकामांची माहिती नाही. त्यांना विकासक, वास्तुविशारद, जमिन मालक यांच्याकडुन दाखला आणायला सांगितला आहे जो ते आणु शकत नाहीत. यासाठी लोकांना आम्ही काय सांगायचे यावर मार्ग काढा.

<u>मा. महापौर :—</u> सन्माननिय सदस्यांनो हा एक चांगला व मोठा मुद्दा आहे. पुर्ण शहर या मुद्दयाशी संबंधीत आहे. थोडक्यात हा मुद्दा गुंडाळता येणार नाही. यासाठी एक विशेष महासभा आयोजित करावी असे मला वाटते. ज्यामुळे आपल्या सर्व नगरसेवकांना याची माहिती मिळेल. शहरात काही लोक या मुद्दयावरुन गोंधळ पसरवित आहेत, लोकांची दिशाभुल करीत आहेत. यासाठी आम्ही बैठक बोलावुन माहिती घेतली आहे. अधिका—यांचे असे म्हणणे आहे की, लोकांना पत्रके गेल्यानंतर त्यांनी दोन फॉर्म भरुन देणे आवश्यक आहे. ही केवळ एक औपचारीकता आहे. हे काम महापालिकेला सोपविले आहे. पदसिध्द प्राधिकरणाचे काम अजुन सुरु झालेले नाही. महापालिकेला फक्त नोटिसा वाटण्याचे व त्यानंतर लोकांकडुन फॉर्म भरुन घेण्याचे काम दिले आहे. श्री. बोडारे यांनी सांगितले आहे की, लोकांना फॉर्म कसे भरावे याची माहिती नाही. यावर अधिका—यांचे म्हणणे असे होते की, ज्या लोकांना माहिती नाही त्यांनी अर्जात ''माहिती नाही'' असे लिहिले तरी चालेल. परंतु फॉर्म भरण्याची औपचारीकता पुर्ण करावीच लागेल. जे लोक फॉर्म भरतील तेच लोक बांधकाम अधिकृत करण्यासाठी दावा करु शकतात, जे फॉर्म भरणार नाहीत ते तसा दावा करु शकणार नाहीत. या मुद्दयावर आम्ही एक विशेष महासभा बोलवणार आहोत, त्यामध्ये अधिकारी सर्व विस्तृत माहिती देतील.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> मा. महापौरजी, या नोटिसांचे उत्तर कुठे दयायचे याची माहिती दिली जात नाही. प्रभाग समिती कार्यालयात देखिल उत्तर घेतले जात नाही.

<u>मा. महापौर :—</u>यासाठी विशेष महासभा बोलवु.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> माझी एक सुचना आहे. विशेष महासभा बोलविण्यापुर्वी काही लोकांनी एकत्र बसुन साधारणत: उपस्थित होणारे प्रश्न तयार करावे.

मा. महापौर :—डिबेट ठेवु या.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— यामध्ये एफएसआय ४ पर्यंत मंजुर होईल असे लिहिले आहे. तर मग ज्या लोकांचे बांधकाम ४ एफएसआय मध्ये बसत नाही ते काय करतील? अशा काही शंका आहेत. यासाठी आपण बसुन असे प्रश्न तयार करायला हवेत व नंतर त्यावर विधी तज्ञांमार्फत अथवा सरकार मार्फत मार्ग काढायला हवा. लोकांच्या व नगरसेवकांच्या मनात काय शंका आहेत याची माहिती घेवुन त्यानंतर बैठक ठेवली तर योग्य होईल असे मला वाटते.

मा. महापौर :—यासाठी विशेष महासभेपुर्वी आपण एक सर्व पक्षीय बैठक ठेवुन त्यामध्ये विधी तज्ञांना बोलवु.

मा. सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— राष्ट्रगितापुर्वी मी दोन शब्द बोलु इच्छितो. मी महत्वपुर्ण मुद्दयावर बोलु इच्छितो त्यामुळे सर्वांनी खाली बसावे. आपण सर्वांनी थोडा वेळ दिला तर बरे होईल. मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब आपण माहितीसाठी एक पत्र दिले आहे. हे मा. सदस्यांच्या माहितीसाठी दिले आहे की दुस—या कुणाच्या माहितीसाठी दिले आहे हे कळुन येत नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— आयुक्तांना नंतर विचारा. त्यांनी राष्ट्रगितासाठी उभे राहायला सांगितले आहे.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— तुम्ही खाली बसा, मला थोडे बोलु दया. मी आधीच बोललो होतो की मला बोलायचे आहे. त्यावेळी मा. महापौरांनी मला हरकतीचा मुद्दा असल्याने नंतर बोलायला सांगितले. हे पत्र आयुक्तांनी सर्व सदस्यांना दिले आहे. आपणांस देखिल दिले आहे, आपल्याला देखिल बघायचे आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— तुम्हांला वाचुन समजले नाही काय?

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— समजले नाही म्हणुन विचारत आहे. तुम्हांला देखिल समजले नाही. कोणालाही समजले नाही.

मा. महापौर :—तुम्ही बोलु शकता.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— यांनी ४ वर्षाची वसुली ४६,१३,००२ दाखविली आहे. १९९५ नंतर १० वर्षात किती वसुली केली याची माहिती यांनी दिलेली नाही. यामध्ये फक्त ४ वर्षाच्या वसुलीची माहिती दिली आहे. १९९६ पासुन आजपर्यंत १० वर्षात किती वसुली केली आहे ते दिलेले नाही. त्यामुळे वस्तुस्थिती काय आहे ते स्पष्ट होत नाही. सचिव साहेबांनी जे उत्तर दयायला पाहिजे होते ते दिलेले नाही. १० वर्षात वसुली झाली आहे अथवा नाही? यामध्ये मला काहीतरी चुकीचे वाटत आहे. याचा खुलासा सचिव साहेबांनी दयायला हवा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— विषय नाही तरी उत्तर हवे आहे.

मा.सचिव :—मा.महापौर महोदया, आपणांस हे जे पत्र दिले आहे त्यामध्ये हेतु हाच आहे की, आपले ४६,१३,००२/— रुपये सेंच्युरी कंपनीने अडवुन ठेवले होते. यासाठी त्यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, त्यानंतर न्यायालयाने त्यांना स्थगन आदेश दिला होता. सन १९९१—९२ पर्यंत मालमत्ता कर आकारणीपोटी सेंच्युरी रेयॉन कंपनीस रु. २७,२२,१०३/— एवढी रक्कम आकारण्यात येत होती. तद्नंतर तत्कालीन नगरपालिकेने पुनश्च: करयोग्य निर्धारण मुल्य करुन सदर कंपनीला रु. ४५,२३,१७१ एवढी कर आकारणी निश्चित केली होती. ही कर आकारणी सन १९९२—९३, १९९३—९४ आणि १९९४—९५ साठी अंगीकार करण्यात आली होती. तत्पूर्वी तत्कालीन नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री.एस.डी.शिंदे व सेंच्युरी रेयॉन कंपनीचे उपाध्यक्ष श्री एन.सी.मेहता यांनी दि. ३०/०१/१९९१ रोजी कंपनी व नगरपालिके दरम्यान एक अनौपचारीक करार केला होता. सदर अनौपचारीक करारापोटी कंपनीने नगरपालिकेला आगाऊ कर्जापोटी रु १ कोटी एवढी रक्कम दिली होती व सदरची रक्कम कंपनीच्या मालमत्ता कर व जकात करापोटी देय असलेल्या रक्कमेतुन समायोजित करण्यातयेईल असे ठरले होते.त्या अनुषंगाने त्यांच्या जकात करापोटी रु ७४,८२,१८२ व मालमत्ता करापोटी रु २५,१७,८१९/— एवढी रक्कम समायोजित करण्यात आली होती. करारातील शर्तीप्रमाणे

सेंच्युरी रेयॉन कंपनीच्या जुन्या मालमत्ता कर रक्कमेपोटी रु. २७,२२,१०३/— एवढी रक्कम कायम करण्यात येईल तसेच कंपनीने नविन बांधकाम केल्यास त्यास नगरपालिका नव्या दराने कराची आकारणी करेल असे ठरले होते. सन १९९२—९३ मध्ये जेव्हा दि. ३/२/९२ ला कंपनीला कर आकारणीपोटी रु. ४५,२३,१७१/— चे बिल देण्यात आले तेव्हा कंपनीने ऑथेराईज्स व्हॅल्युएशन अधिका—यापुढे आकारणीस हरकत घेतली तसेच अनौपचारीक कराराप्रमाणे नगरपालिका कराची आकारणी/करयोग्य मुल्य वाढवु शकत नाही असा युक्तीवाद केला होता. परंतु संबधित अधिका—याने कंपनीचा हा युक्तीवाद फेटाळुन लावत सदर कर आकारणी योग्य असल्याचा निर्वाळा दिला होता. या विरुध्द् दाद मागण्यासाठी सेंच्युरी रेयॉन कंपननी मा. मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्रमांक १२५५/९३ दाखल केली होती. वास्तविक एम.एम. ॲक्ट १९६५ मधील कलम १६९ प्रमाणे जर कर आकारणी दोषपुर्ण असेल तर संबधित मालमत्ताधारक दिवाणी न्यायालयात अपील दाखल करुन दाद मागु शकतो. त्याप्रमाणे सेंच्युरी रेयॉन कंपनीने वाढीव कराविरुध्द् दाद मागण्यासाठी अपील क्रमांक १२/९२ दाखल केले होते. सदरचे अपिल प्रलंबित असतानाही सेंच्युरी रेयॉन कंपनीने मा. मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर याचिकेत सुनावणीअंती मा. उच्च न्यायालयाने विविध अंतरिम आदेश दिले होते की, जोपर्यंत या प्रकरणात अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत नगरपालिकेने १९९१—९२ ला रु. २७,२२,१०३/—ची जी कर आकारणी केली होती ती रक्कम अविवादीत रक्कम म्हणुन ९१—९२ ते ९४—९५ पर्यंत भरावी व उर्वरित रक्कम जर कंपनीच्या बाजुने निर्णय न आल्यास अंतिम निर्णयानंतर भरतील. त्यामुळे कंपनीकडुन रु. ४६,१३,००२— एवढी रक्कम महापालिकेस देय आहे. त्यानंतर सदर याचिकेत अंतिम सुनावणीअंती मा. न्यायालयाने सेंच्युरी रेयॉन कंपनीस उल्हासनगर येथील दिवाणी न्यायालयात अपिल दाखल करुन दाद मागावी तसेच जोपर्यंत त्या अपिलात अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत अविवादीत रक्कमेपेक्षा जास्त रक्कम नगरपालिकेने मागण कारु नये असे आदेश दिले होते. त्यानंतर सेंच्युरी रेयॉन कंपनीने उल्हासनगर येथील दिवाणी न्यायालयात एम.ए क्र. १२/९२, १५/०४, १६/०४, १७/०४ दाखल केले होते. या चार अपिलांवर बचाव पक्षातर्फे नगरपालिकेसाठी ॲड.श्री.अशोक कदम यानी व सेंच्युरी रेयॉन कंपनीतर्फे त्यांचे वकील श्री.व्ही.डी.गौतम व श्री. व्ही.ए.फडके यांनी काम पाहिले. तसेच यासाठी महापालिकेतर्फे तत्कालीन विधी अधिकारी श्री.प्रकाश कुकरेजा यांनी सर्व आवश्यक ते पुरावे, "l( व इतर संबधित कागदपत्रे न्यायालयात सादर केली. सदर प्रकरणात न्यायालयामध्ये महापालिकेतर्फे पुरावा देण्यासाठी कर विभागातील अधिका—यांना हजर राहणेबाबत आदेश देण्यात आले होते, परंतु सदरचे प्रकरण गुंतागुंतीचे व महापालिकेच्या आर्थिक हितावर दुरगामी परिणाम करणारे असल्याने तत्कालीन विधी अधिकारी म्हणुन मी स्वत: न्यायालयात उपस्थित राहुन महापालिकेतर्फे प्रभावी पुरावे सादर केले होते. सदर प्रकरणात मी पाठपुरावा केल्याने २००४ मध्ये सुनावणी पुर्ण होवुन मा.न्यायाधिशांनी निकाल राखुन ठेवला होता. त्यानंतर दि. ११/५/२००६ रोजी मा. जॉइंट जे.एम.एफ.सी श्रीमती अनिता जाधव यांनी सेंच्युरी रेयॉन कंपनीने दाखल केलेले चारही अपिल फेटाळुन लावले व महापालिकेच्या बाजुने निकाल दिला. महापालिकेचे वकील श्री.अशोक दम यांनी त्यांच्या दि. १७/५/२००६ च्या पत्रान्वये महापालिकेला या निर्णयाबाबत अवगत केले आहे. तसेच कंपनीला मालमत्ता करापोटी रु.४५,२३,१७१/— ची जी आकारणी केली ती योग्य असल्याचा देखिल निवाडा दिला व कंपनीतर्फे महापालिकेस सन १९९१—९२ ते १९९४—९५ दरम्यान न भरलेली रक्कम ४६,१३,००२/— भरावी लागेल. सन ९५—९६ नंतर जी आकारणी करण्यात आलेली आहे ती रक्कम कंपनीने आजपर्यंत भरलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u>वसुली ४५ लाखाच्या हिशोबाने केली आहे की २७ लाखाच्या हिशोबाने केली आहे?

<u>मा. सचिव :—</u> ४५ लाखाच्या हिशोबाने त्यांनी रुपये ४६ लाख कमी भरलेले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u>१९९६ ते आतापर्यंत किती वसुली केली आहे. ४५लाखाच्या हिशोबाने केली आहे काय?

<u>मा. सचिव:—</u> नंतर जेवढी रक्कम निर्धारीत केली होती तेवढी वसुल केली आहे. ४५ लाखापेक्षा जास्त म्हणजे रुपये ५२ लाखाप्रमाणे केलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u>तुम्ही याची माहिती दयायला हवी होती. ती माहिती यामध्ये दिलेली नाही.

यावेळी मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांनी मा. महापौरांकडे एक विनंती पत्र सादर केले.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u> मा. महापौर महोदया, हरकतीच्या मुद्दयाद्वारे मी एक विनंती पत्र दिले होते.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–** प्रशासनाने ही जी माहिती दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. आपले बुडालेले पैसे काढुन आणले आहेत. परंतु ज्या केसेस आपण हारतो अथवा जी कामे होवु शकत नाही, जेथे प्रशासन ढिलाई दाखवते याची माहितीही दयायला हवी. ते देखिल समोर यायला हवे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–** मा. महापौर महोदया, हे काय सुरु आहे? हे काय खेळाचे मैदान आहे काय?

**मा. सचिव :–**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.४० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १७/७/२००६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १७/७/२००६ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १७/७/२००६ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश

२) मा. उपमहापौर :—श्री. तलरेजा विनोद चंदीराम

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती जावळे संगिता रमेश | ३६. | श्रीमती खिलनानी भावना रवी |
| ४. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | ३७. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३८. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३९. | श्रीमती माने किरण बाळकृष्ण |
| ७. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | ४०. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४१. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ९. | श्रीमती मोकल सीमा चंदाराम | ४२. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| १०. | श्री. गायकवाड दिलीप | ४३. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४४. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४५. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४६. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७ | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४९. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५०. | श्री. भालेराव गौतम यशवंत |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५१. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १९. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र | ५२. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| २०. | श्री. पवार नाना आनंदा | ५३. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २१. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५४. | श्रीमती पंजाबी दिपा नारायण |
| २२. | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ५५. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २३. | श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा | ५६. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| २४. | श्री. निकम शांताराम ओंकार | ५७. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| २५. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५८. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५९. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६०. | श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६१. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| २९. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ६२. | श्रीमती छाब्रिया भारती पहलाज |
| ३०. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६३. | श्री. बठीजा संजय रामचंद्र |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३२. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ६५. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३३. | श्री. जेसवानी सतरामदास पुनमदास | ६६. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३४. | डॉ. (श्रीमती) साधवानी जया | ६७. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३५. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६८. | श्री. माखिजा हरदास सन्मुखदास |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास, २. श्री. यादव लालबिहारी बुझारत , ३. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन , ४. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग, ५. श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास, ६. श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास, ७. डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश, ८. श्रीमती करोतिया मालती राधाचरण, ९. श्रीमती दासानी मिनु राजकुमार, १०. श्री. बेहराणी ठाकुरदास

वर्यलदास, ११. श्री. लालवानी दिलीप जेठानंद, १२. श्री. वधारिया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
३. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
४. श्री. मिलींद सावंत, उप—आयुक्त
५. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
६. (डॉ.) के.आर. खरात, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. ए. एस. कांबळे, प्रभारी मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
९. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०.(डॉ.) राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
११. श्री. एस.बी. गायकवाड, प्रशासनाधिकारी
१२.श्री. सुंदरेश्वरन, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध. विभाग
१३.श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१४.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग
१५.श्री. व्ही.आर. गर्जे, प्रभारी सहा. नियंत्रक
१६.श्री. तुकाराम तारदाळकर, प्रभारी प्रभाग अधिकारी व मुख्य लिपिक

दुपारी २.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सचिव : विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे......... आता दुपारचे २.१५ वाजले आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— सचिव साहेब, लंच ब्रेक कधी करणार?

मा. महापौर :— मला बाहेर जायचे आहे. त्यामुळे प्रश्नोत्तराचा कालावधी संपल्यानंतर लंच ब्रेक घेवु.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौर महोदया, मागील बैठकीत प्रश्न क्र. ४८४ अर्धवट राहिला आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— पुर्ण झाला आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— त्यावेळी मी बोलली होतो की, मला बोलायचे आहे.

मा. सचिव :—नियमाप्रमाणे प्रश्न क्र. ४८५ सुरु आहे. परंतु त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना ४८४ बद्दल काही बोलायचे आहे. मा. महापौरांनी त्यांना अनुमती दिली तर ते बोलु शकतील.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—मा. महापौरजी, प्रश्न क्र. ४८४ बद्दल मी विचारु इच्छितो की, सर्वसाधारण निधी काय आहे? याची माहिती दयावी. तसेच त्या निधीचा हेतु काय आहे हे देखिल सांगावे.

मा. आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):— सर्वसाधारण निधीसाठी बजेटमध्ये रुपये ९.८० कोटीची तरतुद केली आहे. नगरसेवक निधी, महापौर व उपमहापौर निधी अंतर्गत सदस्यांनी सुचविलेली कामे करण्यात येतात. सर्वसाधारण निधितुन मोठी कामे म्हणजे जी नगरसेवक निधीतुन करता येणार नाही अशी कामे केली जातात. यात रस्ते, पुल, उदयान सुशोभिकरण अशी मोठी कामे केली जातात. नगरसेवकाचा विचार न करता संपुर्ण शहराचा विचार करुन मोठी कामे या निधीतुन केली जातात. मी या आधीही निवेदन केले आहे की रुपये ९.८०कोटी भागिले सर्व सदस्य अशा प्रकारे निधीचे वाटप करता येणार नाही. यासाठी कामाचे प्राथम्य, निधी किती आहे हे पाहुन सर्वसाधारण निधीतील कामे हाती घेतली जातील.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौर महोदया, आयुक्त महोदयांनी फार चांगले उत्तर दिले आहे. कारण आमच्या सदस्या श्रीमती सुर्वे यांनी प्रश्न विचारला आहे की, निधीचे वाटप कश्याप्रकारे करण्यात येणार आहे? त्यावर उत्तर दिले आहे की, निधीचे समान वाटप करण्यात येईल. परंतु असे करणे शक्य होणार नाही. हे चुकीचे आहे.

मा. आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—यासाठीच जेव्हा प्रश्न विचारला तेव्हा मी खुलासा केला आहे की, असे शक्य होणार नाही. कामाची निकड, प्राथम्य व निधी उपलब्धता पाहुन काम केले जाते. जे काम नगरसेवक निधीतुन होणार नाही व ज्यामुळे शहराचे चांगले काम होईल असे काम केले जाईल.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :—प्राथम्य कोण निश्चित करेल हे आधी येथे सांगावे. कारण काही ठिकाणी रुपये ५० लाखाचे कामे होतात व काही ठिकाणी ५ लाखाचे देखिल होत नाही.

मा. आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—प्राथम्य महासभा ठरवेल. ते सर्व आपल्यासमोर सादर केले जाईल.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :— मा. महापौर व आयुक्त साहेब, बजेटमध्ये विविध लेखा शिर्षात जी तरतुद ठेवली आहे ती त्याच कामासाठी वापरली जाणार आहे की, ते देखिल सर्वसाधारण निधीत टाकले जाणार आहे. दलित वस्तीच्या निधीचे काय करणार? उदयानांच्या व दलित वस्तीच्या निधीचे काय करणार?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—केंद्र शासन व राज्य शासनाकडुन जो निधी येईल तो त्यांच्या मार्गदर्शक सुचना व अटींप्रमाणे वापरला जाईल. बजेटमध्ये ज्या लेखा शिर्षातर्गत तरतुद असेल त्याच कामासाठी तो वापरला जाईल. सर्वसाधारण निधीतुन जी कामे करायची असतील त्याची यादी तयार करुन व ती येथे सादर करुन त्यावर चर्चा केली जाईल.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :— आयुक्त साहेब, वेगवेगळया लेखा शिर्षातर्गत कामे करण्यासाठी आम्ही तुमच्याकडे प्रस्ताव दिले आहेत. त्याप्रमाणे तुम्ही कामे करणार आहात काय?

मा. आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—जो प्रस्ताव येईल त्याची छाननी करुन तो मंजुर केला जाईल.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— आयुक्त साहेब, शौचालय दुरुस्तीसाठी प्राधान्य दिले जावे. मी सहा सिटचे शौचालय बांधण्यासाठी अर्ज दिला आहे. त्यामध्ये निधी उपलब्ध नसल्याचा शेरा दिला आहे. यासाठी शौचालयाला प्राधान्य दयायला हवे. येथे जो नगरसेवक जास्त ताकदवान असतो त्याच्या प्रभागात जास्त कामे होतात. तो निधीचा जास्त वापर करतो. येथे बरेच नगरसेवक असे आहेत ज्यांना सर्वसाधारण निधी औषधासाठीही दिलेला नाही. यासाठी तुम्ही लक्ष घालावे व मागील पाच वर्षात कोणत्या नगरसेवकाला किती सर्वसाधारण निधी दिला आहे ते पहावे. तुमच्याकडे आता जुने शौचालय तोडुन नविन शौचालय बांधण्यासाठी जे प्रस्ताव आले आहे त्यांना प्राधान्य दयावे. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—मा. महापौर व आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण निधीतुन कोणती कामे हाती घ्यावी हा प्रश्न येथे उपस्थित झाला आहे. आयुक्तांनी सांगितले की, यातुन उड्डाण पुल, रस्ते व बगीच्याची कामे हाती घेण्यात येतील. परंतु ज्या कामांमधुन लोकांची सेवा होते अशी कामे देखिल हाती घ्यायला हवी. उदाहरणार्थ जेव्हा शुळ साहेब आयुक्त होते तेव्हा आमच्या प्रभागात हजेरी शेड बनविण्यात आले होते. त्यानंतर पॅनल क्र. १९ब मध्ये अजुनपर्यंत हजेरी शेड बनविण्यात आलेले नाही. त्यासाठी जागा उपलब्ध आहे व आपल्याकडें प्रस्ताव देखिल आलेला आहे. या गोष्टीकडे आपण लक्ष दयावे ही विनंती.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ४८५ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ४८५ :–</u> उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील आरक्षित भुखंडावर बांधकाम परवानगी देवून संबंधित विकासकाकडुन महापालिकेस बांधकामातील काही भाग (नियम अटी व शर्तीनुसार) घेण्यातयेत असतो. अश्या किती आरक्षित भुखंडावर महापालिकेने बांधकाम परवानगी दिली आहे. प्रत्येक बांधकामामध्ये महापालिकेला अटी व शर्तीनुसार देय बांधकाम किती चौ.मि. आहे. आजतागायत किती देय असलेली बांधकामे महापालिकेने ताब्यात घेतली आहेत व किती बांधकामे ताब्यात घेणेची बाकी आहेत याची सविस्तर व खुलासेवार माहिती मिळणेसाठी दिनांक २८/२/२००६ रोजी पत्र दिले होते. परंतू तीन महिन्यांचा कालावधी संपूनही प्रशासनाने माहिती दिलेली नाही. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून माहिती मिळावी ही नम्र विनंती.

१. अ) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील आरक्षित भुखंडावर बांधकाम परवानगी देवुन संबंधीत विकासकाकडुन महापालिकेस बांधकामातील काही भाग (नियम अटी व शर्तीनुसार) घेण्यात येत असतो. अश्या किती आरक्षित भुखंडावर महापालिकेने बांधकाम परवानगी दिली आहे. प्रत्येक बांधकामामध्ये महापालिकेला अटी व शर्तीनुसार देय बांधकाम किती चौ.मि. आहे. आजतागायत किती देय असलेली बांधकामे महापालिकेने ताब्यात घेतली आहेत. व किती बांधकामे ताब्यात घेणेची बाकी आहेत?

ब) सदर पत्राचे लेखी उत्तर प्रशासनाकडुन अपेक्षित होते परंतु उत्तर न देण्यामागे कारणे काय आहेत? सदर पत्राचे उत्तर न देण्यामागे कोणाला वाचविणेचा उद्देश आहे काय?

<u>उत्तर :–</u> समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन आातापर्यंत मंजूर करण्यात आलेल्या बांधकाम परवानग्यांची यादी सोबत जोडलेली आहे. आजतागायत (१) १९३, वाहनतळ, श्री. पुरुषोत्तम भागचंद व श्री. जितु भागचंद व इतर, प्लॉट नं. १७० (भा), शिट नं. ३२, उल्हासनगर–३, (२) १४७, होलसेल मार्केट श्री. सुंदरदास एस. रिझसिंघानी व इतर, यु. नं. १६, शिट नं. ४९, उल्हासनगर–३, (३) १४८, शॉपिंग फॉर डिसहाउस, श्री. सुनिल राजवानी व इतर, प्लॉट नं. १४/२५ ते १४/२८, शिट नं. ४९, उल्हासनगर–३ हया ३ इमारतीचे बांधकाम महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली आहेत व उर्वरित इमारतीमध्ये बांधकाम ताब्यात घेण्याबद्दल करारनामा विकासकाकडुन घेण्यात आलेला आहे.

ब) दरम्यानच्या काळात बांधकाम नियंत्रण नियमावली, अनधिकृत बांधकामे नियीमत करण्याच्या शासनाच्या धोरणाबाबत तसेच अधिवेशनाचा काळ यामुळे सदर उत्तर देण्यास विलंब झालेला आहे.

तेथिल लोक निर्वासित होवु नये यासाठी आम्ही सर्व प्रयत्न करीत आहोत. परंतु कुठेतरी धडा घेणे आवश्यक असतांनाही महापालिका प्रशासनाकडुन तेच तेच केले जात आहे. श्री. आर.डी. शिंदे हे आयुक्त असतांना १९९९ साली तीन प्लान मंजुर झाले आहेत. त्यानंतर महासभेमध्ये चर्चा झाली होती. त्यावेळी तत्कालीन प्रांत अधिकारी श्री. गिरी यांना पत्र दिले होते की, उल्हासनगरमधील आरक्षित भुखंड ताब्यात घेतलेले नसले तरी ते तुमचे नक्कीच नाहीत. यापुढे सनद तरी देवु नका. त्यावेळी आयुक्त व नगररचनाकारांना सांगितले होते की, जरी तुमचे अधिकार त्यांनी ताब्यात घेतले व सनद दिली तरी प्लान मंजुर करायचा किंवा नाही हे काम महापालिकेचे आहे. त्यावेळी तीनच नकाशे मंजुर झाले होते व विधान परिषदेमध्ये हा प्रश्न उपस्थित झाला होता, गाजला होता. त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये हे मुद्दे उपस्थित केले होते परंतु महापालिकेने त्याकडे डोळेझाक केली. १९८७ साली उल्हासनगरच्या उपविभागीय अधिका–यांनी महापालिकेला एक पत्र दिले व विकास आराखडयात आरक्षित असलेले भुखंड ताब्यात घेण्यासाठी सुचना दिली होती. परंतु त्यावेळेस तसे झाले नाही त्यामुळे आरक्षित भुखंडावर इमारती उभ्या राहिल्या. त्याचे परिणाम लोकांना आता भोगावे लागत आहेत. हे झाल्यानंतर कामात सुधारणा होणे आवश्यक होते परंतु तसे झाले नाही. १९९९मध्ये तीन भुखंडांवर ज्या कामासाठी आरक्षण होते ते काम न होता दुस–याच कामासाठी परवानगी दिली गेली. यासाठी विधी मंडळात प्रश्न उपस्थित केले गेले. त्यावेळी महासभेत चर्चा झाली होती की, आता पर्यंत झाले हे ठिक आहे परंतु यापुढे ज्या प्रयोजनासाठी आरक्षण असेल त्या प्रयोजनासाठी महापालिका भुखंडाचा विकास करेल तसेच कोणालाही

विकास करण्याची परवानगी देणार नाही. परंतु त्यानंतरही आज १२ कामांची यादी येथे दिली आहे. माझा पहिला आक्षेप असा आहे की, १९९९ मध्ये आयुक्तांनी आश्वासन दिले होते की, यापुढे आम्ही आरक्षित भुखंडावंर बांधकाम परवानगी देणार नाही. तर मग आता या कामांना कोणी परवानगी दिली आहे? लोकांना सुविधा देण्यासाठी महापालिकेने विकास आराखडा तयार केला आहे, शासनाने तयार केला आहे. परंतु त्यानंतरही कायदयाचा गैरवापर करुन बारा लोकांना बांधकाम परवानगी दिली आहे. त्याचा तक्ता येथे दिला आहे. प्रथम क्रमांकावर हौसिंग फॉर डिसहाउस आहे. यासाठी परवानगी देतांना त्यावेळी कोणती अट होती? हा प्लान २००१ मध्ये मंजुर केला आहे. त्याचे पुढे काय झाले? याची माहिती दिली नाही. महापालिकेने फक्त ३ ठिकाणचे बांधकाम आपल्या ताब्यात घेतले आहे याची माहिती येथे दिली आहे. उर्वरित ९ प्लॉट आपल्या ताब्यात का घेतले नाही? प्लान मंजुर करतांना आपण घाई केली, करारनामा केला की, २५ टक्के बांधकाम महापालिकेला दयायचे आहे. हौसिंग फॉर डिसहाउस मध्ये बेघरांना सदनिका दयायची असते. यासाठी सदनिका जास्तीत जास्त ३५० चौ. फुटाची असणे आवश्यक असते. प्लॉट क्र. ६१९ वर बिल्डरला जी जागा विकसीत करायची होती त्या ठिकाणी बिल्डरने इमारत उभी केली आहे. परंतु महापालिकेला जी इमारत बनवुन दयायची होती ती अदयाप बनविलेली नाही. प्लान २००१ मध्ये मंजुर झाला आहे. तरी देखिल महापालिकेने अदयाप काहीही कारवाई केली नाही. आरक्षण क्र. १४८ येथेही महापालिकेने जागा ताब्यात घेतली आहे की नाही याचा उल्लेख केला नाही. असे असतांना विकासकाने जो प्लान टाकला तो मंजुर का केला? तिस—या क्रमांकावर वाहनतळ आहे. तेथे बिल्डरने वाहनतळ विकसीत करुन दिला त्यानंतर उर्वरीत प्लॉटचे काय झाले? तसेच त्या पार्किंगची अवस्था आता काय आहे? महापालिका लोकांच्या वापरासाठी त्याचा उपयोग करीत आहे काय? त्याचीही माहिती मिळणे, चौकशी करणे आवश्यक आहे. क्रमांक ४ वर मार्केट आहे.महापालिकेने २५ टक्याप्रमाणे येथिल जी जागा ताब्यात घेतली आहे, त्याची आजची अवस्था काय आहे? त्या जागेचा लिलाव केला आहे काय, कोणाला दिली आहे काय, सध्याचे तेथिल बाजारमुल्य काय आहे? पुढे जावुन महापालिकेला त्याचा काय फायदा होणार आहे? त्याची माहितीही येथे मिळणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे जी इमारत हौसिंग फॉर डिसहाउससाठी आहे तेथे अजुन लोकांना घरे दिली नाहीत. २००१ मध्ये दुसरा प्लान मंजुर केला आहे श्री. मुकेश वाधवानीच्या नावाने. त्यांनी ७.४.२००० ला पहिला प्लान मंजुर केला आहे. दुसरा प्लान २९.१.२००१ ला दिला आहे. महापालिकेच्या ताब्यात जी जागा दयायची होती ती बिल्डरने दिलेलीच नाही. असे असतांना रिवाईज प्लान मंजुर कसा काय झाला? याच्या मागे एक मोठे रॅकेट आहे. बिल्डर एसडीओ ऑफिसमधुन सनद काढतात. सनद काढण्यासाठी महापालिकेने अटकाव करणे आवश्यक होते. कारण जागा महापालिकेची होती. त्यामुळे एसडीओ ऑफीस त्यावर मालकी सांगु शकत नाही. परंतु असे केले गेले नाही यामागे काहीतरी मोठे कारण अथवा नाईलाज असेल. आपल्या जागेवर एसडीओ ऑफिस ताबा सांगत असेल तर ते चुकीचे आहे. त्यानंतर देखिल महापालिकेने प्लान मंजुर केले आहेत. तेथिल मालमत्ताही आपल्या ताब्यात घेतलेल्या नाहीत. यातील १२ पैकी ४—५ प्लॉट हाउसिंग फॉर डिसहाउससाठी व इतर शॉपिंग फॉर डिसहाउससाठी आरक्षित आहेत. महापालिका रस्ता रुंदीकरणात बेघर झालेल्या लोकांना जागा देत नाही हे श्री. महाराज भुल्लर यांच्या प्रश्नाच्या वेळी स्पष्ट झाले होते. परंतु आपल्याकडे जागा असतांनाही महापालिकेच्या काही अधिका—यांमुळे, कर्मचा—यांमुळे अथवा काही चुकीच्या कारणांमुळे ती जागा ताब्यात घेवुन लोकांना फायदा देवु शकलेलो नाही. माझी आपणांस विनंती आहे की, मला यामध्ये सविस्तर माहिती हवी आहे. या जागेचे सध्याचे बाजारमुल्य काय आहे? तसेच यापुढे अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव मंजुरीस आल्यास त्याला मंजुरी देण्यात येवु नये. महापालिकेने लोकांना सुविधा देण्यासाठी आपली मालमत्ता विकसित करायला हवी, व महापालिका तसे करेल असा विश्वास मी येथे व्यक्त करतो. तसेच या प्रकरणाची सविस्तर माहिती मला देण्यात यावी.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी, श्री. मनोज साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौर महोदया, आयुक्तांनी सर्वसाधारण निधी बद्दल सांगितले की, अंदाजे ९ कोटी एवढी तरतुद आहे. त्याबद्दल मी काही प्रश्न विचारु इच्छितो.

<u>मा. महापौर :—</u> तो प्रश्न संपला आहे, आता दुस—या प्रश्नावर चर्चा सुरु आहे. तुम्ही पुढील बैठकीत बोला.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> त्याच विषयावर चर्चा सुरु आहे. श्रीमती सुर्वे यांचा प्रश्न आहे.

<u>मा. महापौर :—</u>श्री. बोडारे यांच्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे.

__मा. आयुक्त :-__ज्या बारा मालमत्ता आहेत त्यापैकी तीन ठिकाणी विकासकाने महापालिकेला जागा नियमाप्रमाणे हस्तांतरीत केली आहे तसेच उर्वरित ९ ठिकाणी करारनाम्याप्रमाणे जागा ताब्यात घेण्याची कारवाई लवकरच करण्यात येईल. विरोधी पक्ष नेता यांनी जागेच्या बाजारमुल्याबद्दल जी माहिती मागितली आहे ती पुढील बैठकीत देण्यात येईल.

__मा. महापौर :-__ आयुक्त साहेब, प्लॉट क्र. ७०५ येथे देखिल निष्कासन करण्यात आले होते. त्या ठिकाणी काय परिस्थिती आहे याचा अहवालही पुढील बैठकीत दयावा. तो भुखंड महापालिकेच्या ताब्यात असेल तर लवकरात लवकर त्याला कुंपण घालण्यात यावे.

__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-__या प्रकरणाची संपुर्ण माहिती प्रश्नोत्तराच्या स्वरुपात मिळणे शक्य नसल्याने दिनांक २८.२.२००६ ला मी प्रशासनाला एक पत्र देवुन विस्तृत माहिती मागितली आहे. किती इमारती आपल्याला जागेचा ताबा घ्यायचा आहे, किती ताबा घेतला आहे, घेतला नसेल तर त्याचे कारण काय आहे?हे सर्व विचारले आहे. तसेच प्लान मंजुर करतांना सदनिका किती आकाराच्या आहेत?नियमाप्रमणे हॉसिंग फॉर डिसहाउस साठी सदनिका बनवितांना ३५० चौ. फुटापेक्षा जास्त आकाराची सदनिका बनविता येत नाही. परंतु माझ्या माहितीप्रमाणे त्या ठिकाणी ६००,७०० ते १००० चौ. फुटाच्या सदनिका बनविल्या आहेत. जर असे असेल तर चुकीचे आहे. यापुर्वी जेव्हा चर्चा झाली होती त्यावेळी असे असेल तर प्लान रद्द करावा असे सांगितले होते. ही सगळी माहिती मिळण्यासाठी मी २८.२.२००६ ला पत्र दिले होते. त्याचे उत्तर मला देण्यात यावे.

__मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-__मा. महापौर महोदया, महापालिकेच्या ताब्यात जी मालमत्ता मिळेल तिचा रेकॉर्ड ठेवला जावा व त्यापासुन काहीतरी उत्पन्न मिळेल अशा प्रकारे सदुपयोग केला जावा.

__मा. सचिव :-__ प्रश्न क्र. ४८६ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

__प्रश्न क्र. ४८६ :-__ उल्हासनगर महानगरपालिकेने मिशन वालधूनी म्हणुन महासभेत ठराव क्र. ७५मंजुर केला असून सदर ठराव मंजुर होवुन एक वर्षाचा कालावधी संपृष्टात आला आहे. ठराव मंजुर केल्यापासुन महापालिका प्रशासनाने सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी काय कारवाई केली? सदर विषयाची आजची सद्यस्थिती काय आहे? याबाबत महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळावी ही नम्र विनंती.

__उत्तर :-__ दि. २६ व २७ जुलै, २००५ रोजी अतिवृष्टी झाल्यामुळे उल्हासनगर शहरात पुरपरिस्थिती निर्माण झालेली होती. अशी पुरपरिस्थिती भविष्यात टाळण्यासाठी उल्हास खो-यातील नदी, नाले, उपनदया यांचे सविस्तर सर्वेक्षण करुन उपाय योजना करण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे दि. २६.८.०५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत हे काम महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) यांचेकडे सोपविण्यात आली आहे.

मिशन वालधुनी प्रकल्पात वालधुनी नाल्यावर निरनिराळया ठिकाणी एकुण १० ''ग्रीन ब्रीज'' व ४ ''ग्रीन लेक'' करण्याचा समावेश होता. सदर ''ग्रीन लेक'' व ''ग्रीन ब्रिज'' यामुळे वालधुनी नाल्याच्या प्रवाहास अडथळा निर्माण होवू शकतो काय? याबाबत मेरी या संस्थेकडे विचारणा करण्यात आली होती. यावर सदर संस्थेने उल्हास खो-यातील पूरनियंत्रण रेषा व पुरपरिस्थिती नियंत्रण याबाबतचा अंतिम अहवाल जोपर्यंत प्राप्त होत नाही तोपर्यंत सदरचे काम हाती घेवु नये असे कळविले आहे. त्यामुळे सदरचे काम हाती घेणेत आलेले नाही. मेरी या संस्थेकडुन अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर व त्यांनी मान्यता दिल्यास सदरचे काम हाती घेणेत येईल.

__मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-__ मी वरीलप्रमाणे प्रश्न विचारला होता. त्यावर काय कारवाई झाली?

__कार्यकारी अभियंता, पा.पु. (श्री. आर.आर. सावकारे):-__मा. महापौर, आयुक्त, उपमहापौर व उपस्थित सर्व नगरसेवक दि. २६ व २७ जुलै, २००५ रोजी अतिवृष्टी झाल्यामुळे उल्हासनगर शहरात पुरपरिस्थिती निर्माण झालेली होती. अशी पुरपरिस्थिती भविष्यात टाळण्यासाठी उल्हास खो-यातील नदी, नाले, उपनदया यांचे सविस्तर सर्वेक्षण करुन

उपाय योजना करण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे दि. २६.८.०५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरचे काम एमएमआरडीएकडे दिल्यानंतर त्यांच्याकडे सर्वेक्षणाची यंत्रणा नसल्याने त्यांनी सदरचे काम जलसंपदा विभागाकडे दिले होते. त्यांनी उल्हास नदी खो–यातील सर्वेक्षणाचा अहवाल मेरी या संस्थेकडे पाठविला आहे. मेरीचा अंतिम अहवाल आल्यानंतर आपण पुढील काम करु शकतो. यावर काय उपाययोजना करायची हे शासन ठरवेल.

**मा. सदस्या श्रीमती निता अहुजा, श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–** या प्रकल्पाचे उद्‌घाटन पालकमंत्री यांनी केले होते.

**कार्यकारी अभियंता, पा.पु. (श्री. आर.आर. सावकारे):–**याबद्‌दल मी सांगु इच्छितो की, ५० लाख खर्च करुन आपण जे ग्रीन ब्रीज तयार करणार होतो त्यामध्ये १० ठिकाणी ग्रीन ब्रीज व १० ठिकाणी ग्रीन लेक तयार करणार होतो. आपण जर ते काम केले असते व त्यानंतर एमएमआरडीएने जर पात्र खोल व रुंद करायला सांगितले असते तर आपले पैसे व्यर्थ गेले असते. म्हणुन आपण हा प्रस्ताव मेरीकडे पाठविला होता. मेरीचा अहवाल आल्यानंतरच आपण पुढील काम करु शकतो.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** या कामाचे उद्‌घाटन ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री मा.श्री.गणेश नाईक यांच्या हस्ते झाले होते. उद्‌घाटनापुर्वी आपण चौकशी केली नव्हती का? यामुळे मा. पालकमंत्री यांची अवमान्यता होते.

**कार्यकारी अभियंता, पा.पु. (श्री. आर.आर. सावकारे):–**या कामाचे उद्‌घाटन मे २००५ मध्ये झाले होते व पुर जुलै, २००५ मध्ये आला होता. त्यानंतर पुरनियंत्रण रेषा निश्चित करण्याचे काम मेरीला दिले होते. तर आपण आधी काम केले असते व नंतर मेरीने पात्र रुंद करण्याचा अहवाल दिला असता तर आपले पैसे फुकट गेले असते.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–** प्रश्न २५.५.२००६ ला विचारला आहे. सद्यस्थितीत एमएमआरडीएकडे वालधुनी नाला रुंद करण्यासाठी काही प्रयत्न सुरु आहेत काय? याबद्‌दल काही बैठक झाली आहे काय?

**कार्यकारी अभियंता, पा.पु. (श्री. आर.आर. सावकारे):–**महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेने त्यांचा अंतरिम अहवाल एमएमआरडीएकडे सादर केला आहे. आपल्याकडे त्याची प्रत आलेली नाही.

**मा. सचिव :–** प्रश्न क्र. ४८७ हा श्री. नथु सोनवणे यांचा आहे.

**प्रश्न क्र. ४८७ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत पाणी पुरवठयात सुधारणा करणेसाठी तसेच पाणी समस्या सोडविणेसाठी शहरात विविध ठिकाणी अनेक प्रकरच्या जलवाहिन्या टाकण्यात येत असतात त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवुन सविस्तर, सुचक, समाधानकारक माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) दिनांक २० मे, २००२ पासुन आजतागायत उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणी विभागामार्फत किती ठिकाणी, कोणत्या आकाराच्या, प्रकाराच्या जलवाहिन्या टाकण्यात आल्या? सदर मंजूर कामाची ठिकाणे, प्रभाग क्रमांक, नगरसेवकाचे नाव, कामाची अंदाजीत रक्कम, त्यापैकी किती कामे पुर्ण झाली? किती कामे प्रलंबित आहेत? कामे प्रलंबित असल्यास त्याची कारणे? व सदर कामासाठी कोणत्या निधीचा वापर करण्यात आला?

**उत्तर :–** पाणी पुरवठा विभागात पाणी पुरवठयात सुधारणा करण्याच्या दृष्टीने निरनिराळया ठिकाणी जलवाहिनी टाकण्यात आल्या आहेत. सदर सन २००२ पासुन विविध भागात टाकण्यात आलेलया जलवाहिन्यांच्या कामांची सविस्तर माहिती तयार करण्याकरीता जवळ जवळ ३ महिन्याचा कालावधी लागणार आहे. यामुळे संपुर्ण माहिती एकत्रित झाल्यानंतर उत्तर देण्यात येईल.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:— आपण तीन महिन्यानंतर उत्तर देणार आहात त्यावेळी आचारसंहिता सुरु होईल. तर मग उत्तर घेवुन काय करायचे? मला प्रत्येक प्रभागात किती काम झाले ते उत्तर हवे होते. तुम्ही सांगितले की ३ महिने लागतील. तोपर्यंत मी काय करु?

मा. सदस्य श्री. रामदास उमाप, श्री. सुरेश गायकवाड, श्री. संजय बठिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सचिव :— तुम्हांला उत्तर दिले आहे. तुम्ही आता निवेदन करीत आहात. उत्तरात काही चुक असेल तर सांगा. उत्तर ठिक असेल तर तसे सांगा.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—उत्तर ठिक नाही. भुख लागली आहे तरी देखिल मी हे मानणार नाही. त्यांनी तीन महिन्याची मुदत मागितली आहे. कागदपत्र तयार करायला तीन महिने लागतात तर मग जलवाहिनी टाकायला किती दिवस लागतील?

कार्यकारी अभियंता, पा.पु. (श्री. आर.आर. सावकारे):—मा. महापौर व आयुक्त साहेब, मा. सदस्यांनी २००२ पासुनची माहिती मागितली आहे. एवढी माहिती काढायला वेळ लागेल म्हणुन तसे उत्तर दिले आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— किती वेळ लागेल? ८ जुनला प्रश्न दिला आहे. एक महिना निघुन गेला आहे.

कार्यकारी अभियंता, पा.पु. (श्री. आर.आर. सावकारे):—एक महिन्यात देतो.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—आमची बरीच कामे होत नाहीत. वेळ जातो.

कार्यकारी अभियंता, पा.पु. (श्री. आर.आर. सावकारे):—तुम्ही २००२ पासुनची माहिती मागितली आहे. रेकॉर्ड तपासुन माहिती दयावी लागेल. त्यामुळे वेळ लागेल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—तुमच्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणे माहिती संगणीकृत केली जात नाही काय?

कार्यकारी अभियंता, पा.पु. (श्री. आर.आर. सावकारे):—तशी सिस्टम आहे परंतु चेक करावे लागेल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— यासाठी तीन महिन्याची काय गरज आहे?

कार्यकारी अभियंता, पा.पु. (श्री. आर.आर. सावकारे):—पुढील बैठकीत देतो.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ४८८, ४८९, ४९० हे श्री. प्रमोद टाले यांचे आहेत. परंतु ते यावेळी सभागृहात अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांत नोंद घेण्यात येत आहे.

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता, श्रीमती मोना वनवारी, श्रीमती किरण माखिजा हे सभागृहातुन बाहेर गेल्या.

प्रश्न क्र. ४८८ :— प्र.क्र. १) शहरात टॅंकरने पाणी वितरीत करण्याचे टेंडर कधी काढले गेले? सदर ठेका कोणाला मिळाला? किती कालावधीसाठी सदर ठेका मंजुर करण्यात आला?

प्र.क्र. २) सदर ठेक्या व्यतिरिक्त इतर कुठल्या व्यक्तीला किंवा संस्थेला टॅकरने पाणी वितरीत करण्यास परवानगी दिली आहे काय? असल्यास कुठल्या नियमाधीन सदर परवानगी दिली? (दिली असल्यास) त्याचा नेमका उद्देश काय?

<u>उत्तर :–</u> १. शहरात टॅकरद्वारे पाणी वितरीत करण्याची मुळ निविदा दि. ८.२.०५ रोजी मागविण्यात आली होती. या कामाकरीता ५ निविदा प्राप्त झाल्या होत्या. निविदा धारकांबरोबर वेळोवेळी वाटाघाटी करण्यात आल्यानंतर पाच निविदा धारकांपैकी चार निविदा धारकांनी सारख्या दराने काम करण्यास सहमती दर्शविली. या अनुषंगाने सदर काम चारही निविदा धारकांना समप्रमाणात विभागुन देणेबाबत प्रशासनाने स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर केला होता. स्थायी समिती ठराव क्र. ५५, दिनांक ३१.१०.०५ अन्वये मे. श्वेता ट्रान्सपोर्ट, कल्याण यांनाच सदर काम देण्यात आले. उर्वरित ठेकेदारांनी मागील वर्षी समाधानकारक काम न केल्यामुळे त्यांना काम देण्यात आले नाही. सदर काम मे. श्वेता ट्रान्सपोर्ट कल्याण यांना प्रथमत: एक वर्षासाठी मंजूर करण्यात आले आहे. सदर काम मे. श्वेता ट्रान्सपोर्ट, कल्याण यांना दिनांक १०.११.०५ पासुन देण्यात आले आहे.

२. कॅम्प क्र. १ ते ५ मधील टंचाई ग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम महापालिकेतर्फे मे. श्वेता ट्रान्सपोर्ट यांना देण्यात आले आहे. म.औ.वि. मंडळाच्या पाले येथिल मुख्य जलवाहिनीवरील पाण्याचा दाब कमी झाल्यामुळे पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होत नसवल्याने व म.रा.वि.वि.कंपनीच्या भार नियमामुळे होत असलेल्या अपु–या पाणी पुरवठयामुळे नागरीकांच्या व नगरसेवकांची टॅकरची मागणी वाढल्यामुळे संबंधीत ठेकेदारास दिलेल्या वेळेत आवश्यक तेवढे टॅकर वाढविणेबाबत वेळोवेळी लेखी नोटिसा देवुन सुध्दा संबंधीत ठेकेदाराने तांत्रिक अडचणीमुळे टॅकरांच्या संख्येत वाढ केली नाही. वर नमुद केलेल्या कारणांमुळे टॅकरची मागणी पूर्ण करण्याकरीता व नागरीकांच्या व नगरसेवकांच्या तक्रारी निवारण करण्याच्या दृष्टीने टॅकर पुरवठयाबाबत अतिरिक्त ठेकेदार नियुक्त करणे गरजेचे होते. याबाबत नगरसेवकांनीही लेखी स्वरुपात मागणी केली होती. याकरीता मे. गायत्री वॉटर सप्लायर्स यांनी निविदा मान्य झालेल्या दराने काम करण्यास सहमती दर्शविली. तसेच टॅकर पुरविणेबाबत कोणत्याही प्रकारची कुचराई करणार नाही याबाबतचे लेखी पत्र दिले. यामुळे सदर प्रस्ताव तयार करुन मा. स्थायी समितीच्या ठराव क्र. १९, दि. २४.५.०६ अन्वये मंजुर झाल्यानंतर कामाचा आदेश देण्यात आलेले आहे.

<u>प्रश्न क्र. ४८९ :–</u> १) जानेवारी, २००६ ते आज तारखेपर्यंत आपल्या नगररचना विभागाने किती प्लॉन पास केले व कुठले केले याची विस्तृत लेखी माहिती दयावी.

२) सदर प्लानची चालु असलेली कामे सदयस्थितीत कुठल्या परिस्थितीत आहे?

३) प्लीन्थ सर्टीफिकेट किती, कोणत्या कामांना दिली आहे?

४) किती व कोणत्या बांधकामात अतिरिक्त बांधकाम आहे?

<u>उत्तर :–</u> १. जानेवारी, २००६ ते आजच्या तारखेपर्यंत नगररचना विभागाकडे एकुण ५८ नकाशे मंजूर करण्यात आलेले आहेत.

२. त्यापैकी १७ कामे पूर्ण झालेली असुन ४१ कामे प्रगतीपथावर आहेत.

३. ३३ इमारतींना पायाचा दाखला देण्यात आलेला आहे. त्याची यादी सोबत जोडलेली आहे.

४. आतापर्यंत ४ इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम आढळुन आलेले आहे.  त्याची यादी सोबत जोडलेली आहे.

**<u>प्रश्न क्र. ४९०. :—</u>** प्र.क्र. १) कुर्ला कॅम्प विभागात ब्लॉक अे/९५ समोर असलेल्या ''अशोका'' या बांधकामाबाबत....

अ) सदर बांधकामाबाबत असलेली सनद किती आहे?
ब) सदर बांधकामास किती एफ.एस.आय. बांधण्यास परवानगी आहे? सध्या किती बांधकाम आहे?
क) सदर बांधकामांत किती अतिरिक्त बांधकाम आहे? त्यावर आपण काय कारवाई केली?
ड) सदर बांधकामाबाबत नगरविकास खात्याकडून काय आदेश आहेत? असल्यास हायकोर्ट आदेशानुसार अनाधिकृत बांधकामावर काय कारवाई केली आहे? नसल्यास कधी करणार आहे?

<u>उत्तर :—</u> अ. ३३२.०६ चौ.मी.
ब. ३३१.९१ चौ.मी. व सध्या जागेवर ३३१.९१ चौ.मी.
क. सध्याच्या तारखेपर्यंत सदर इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम नाही. त्यामुळे कारवाई करता आलेली नाही.
ड. सदर बांधकामाबाबत नगरविकास खात्याकडुन कुठल्याही प्रकारचे आदेश प्राप्त झालेले नसल्यामुळे व हायकोर्टाचे कुठल्याही प्रकारचे आदेश प्राप्त झालेले नसल्यामुळे तसेच सदर इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम आढळुन आले नसल्यामुळे सदर इमारतीच्या बांधकामावर कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही.

**<u>मा. सचिव :—</u>** प्रश्न क्र. ४९१ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा असुन तो त्यांनी मागे घेतला आहे. तसेच प्रश्न क्र. ४९२ हा श्री. नाना पवार यांचा आहे.

**मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. होशियारसिंह लबाना, श्री. गोविंदराम लुंड, श्री. दिलीप गायकवाड यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**<u>प्रश्न क्र. ४९२ :—</u>** येणा—या महासभेमध्ये खालील प्रश्नावर चर्चा करुन उत्तर मिळणेस विनंती आहे.

प्र. क्र. १) उल्हासनगर महानगरपालिकेतील आस्थापना सुचीवरील रिक्त पदे किती व कोणती पदोन्नतीचे, सरळसेवा भरतीचे?
प्र.क्र. २) अनुशेष प्रमाणे रिक्त पदे पूर्ण भरण्यात आली नाहीत त्याचे कारण काय?
प्र.क्र. ३) पदोन्नतीचे आणि सरळसेवा भर्ती बाबतचे निकष कोणते?

<u>उत्तर :—</u> १) उल्हासनगर नगरपालिकेचे दिनांक २१/१०/१९९६ रोजी महानगरपालिकेत रुपांतर झाल्यानंतर जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे—२/३५, दिनांक १३/१२/१९९६ नुसार एकुण—४३४८ पदांना मंजुरी देण्यासाठी नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे मागणी दाखल केलेली होती. त्यानुसार नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक उमपा—२२९८/२०३०/प्र.क्र. २५०/९८/नवि—२३, दिनांक २८/०९/९९, शासन निर्णय क्र. उमपा/२२९८/२०३०/२५९/९८/नवि—२३, दिनांक १५/१०/२००१ शासन निर्णय क्र. उमपा/२२९८/२०३०/२५९/९८/नवि—२३,दिनांक १३/६/२००२ नुसार एकुण १२८१ पदांना मंजुरी मिळालेली आहे. तत्कालीन नगरपालिकेच्या आस्थापनेवरील १९४५ पदे व शासनाकडुन मंजुरी दिलेली १२८१ पदे असे संवर्गनिहाय एकुण ३२२६ पदे मंजुर असुन, उर्वरित ११२२ पदांना मंजुरी मिळालेली नाही. सध्या महानगरपालिकेच्या आस्थापनेवर संवर्गनिहाय एकुण २५९२ पदांवर अधिकारी/कर्मचारी कार्यरत असून रिक्त पदांच्या तपशिलाबाबत परिशिष्ट सोबत जोडला आहे.

२) महानगरपालिका आस्थापनेवर संवर्गनिहाय एकुण ४२३ पदांचा असलेल्या अनुशेषापैकी एकुण १९९ पदे भरण्यात आली आहेत, उर्वरीत पदांचा अनुशेष भरण्यासाठी निवड समिती पदांचा आढावा घेत असून सरळसेवेने तथा पदोन्नतीने संवर्गनिहाय असलेला अनुशेष भरण्याची कार्यवाही करणेबाबत शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००६५३०/प्र.क्र. /७१/१६ ब, दिनांक ६/५/२००६ चे आदेश प्राप्त झाले असून त्यानुसार अनुशेष भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

३) महानगरपालिकेने आस्थापनेवर संवर्गनिहाय सरळसेवा/पदोन्नतीसाठी वेगवेगळे सेवा भरती प्रवेश नियमावली तयार केले असुन त्यानुसार प्रशासकिय कामाचा निपटारा त्वरीत होणेसाठी आवश्यक त्या पदांची आस्थापनेवर कर्मचा—यांची भरती करण्यात येते.

मा. सदस्य श्री. नाना पवार :– मा. महापौर व आयुक्त साहेब, सचिव साहेब व उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य, हा जो प्रश्न आहे हा अनुशेषाचा प्रश्न आहे. अनुशेषाची नोकरी भरती करण्यासंबंधी राज्य शासनाने ब–याचवेळा महापालिकेला सुचना दिल्या आहेत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. विश्वनाथ पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सचिव :–प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे. पुढील बैठकीत आपला प्रश्न घेण्यात येईल.

मा. सदस्य श्री. नाना पवार :–मा. सचिव साहेब, मी आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, श्री. देवेंद्रसिंह खेमाणी यांनी प्रश्नोत्तराच्या कालावधीत जो मुद्दा उपस्थित केला तो मागील सभेचा मुद्दा होता. ज्यावेळी श्री. बोडारे यांचा प्रश्न सुरु झाला त्यावेळेपासुन प्रश्नोत्तराचा तास सुरु करायला हवा होता. परंतु तसे केले गेले नाही. त्यानंतर जेव्हा माझा प्रश्न आला त्यावेळी आपण कालावधी संपला असे घोषित करता. हे योग्य नाही. मा.महापौर महोदया, माझा एकच प्रश्न आहे.

मा. महापौर :–आता प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. पुढील बैठकीत आपला प्रश्न सुरु ठेवण्यात येईल.

मा. सदस्य श्री. नाना पवार :– सचिव साहेबांनी ज्यावेळी श्री. खेमाणी यांचा प्रश्न सुरु झाला त्यावेळेपासुन वेळ मोजला आहे. त्यामुळे अजुन वेळ शिल्लक आहे. तो प्रश्न या बैठकीचा नव्हता.

मा. महापौर :–आता आपला प्रश्न अर्धवट राहिल्यास तो पुढील बैठकीत घेतला जाईल. त्यामुळे तो त्या बैठकीचाही भाग असेल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. प्रमोद टाले यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. नाना पवार :– हे यांनी आधीच सांगायला पाहिजे होते. एक सेकंदही नाही झाला आणि वेळ संपायची घोषणा केली.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–मा. महापौर महोदया, आपण प्रश्नोत्तराचा कालावधी संपल्यानंतर लंच ब्रेक करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. त्याचे काय झाले?

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :– जे नगरसेवक मधुमेहाचे रुग्ण आहेत त्यांच्यावर हा अन्याय होत आहे. ही काय पध्दत आहे काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– ज्यांना मधुमेह आहे त्यांचा विचार केला जावा.

मा. सचिव :–कृपया लक्ष दयावे. चार लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

लक्षवेधी सूचना क्र. १

सुचकाचे नाव :– श्रीमती जयश्री सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड

विषय :– प्रभाग क्र. १५ मधील नागरी सुविधांची कामे मंजुर होवुनही होत असलेल्या दिरंगाई बाबत.

लक्षवेधी सूचना क्र. २

सुचकाचे नाव :– श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

विषय :– लेखा विभागामार्फत जानेवारी २००६ ते जुन २००६ या कालावधीत ठेकेदारांना अदा केलेल्या देयकांची माहिती मिळणेबाबत.

लक्षवेधी सूचना क्र. ३

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

विषय :– अनधिकृत बांधकामे नियमाधीन करण्यासाठी सुरु असलेल्या प्रक्रियची माहिती मिळणे बाबत.

लक्षवेधी सूचना क्र. ४

सुचकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. रामदास उमाप

विषय :– उल्हासनगर येथिल शासकिय/ महापालिकेच्या रुग्णालयात श्वान दंशावरील लसीचा तुटवडा असल्याबाबत.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–कुत्रा चावल्यानंतर जे इंजेक्शन दिले जाते त्याचा महापालिकेच्या व मध्यवर्ती रुग्णालयात तुटवडा आहे. माझ्या प्रभागात एका मुलाला कुत्रा चावला होता त्यानंतर इंजेक्शनसाठी ब–याच ठिकाणी चकरा माराव्या लागल्या. यासाठी लक्षवेधी आणली आहे.

मा. सचिव :–या चार लक्षवेधी सुचनांपैकी दोन लक्षवेधी सुचना मा. महापौरांनी दाखल करुन घेतल्या आहेत. पहिली लक्षवेधी सुचना श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, श्री. राजेंद्र चौधरी यांची अनधिकृत बांधकाम नियमित करण्याबाबतची आहे. दुसरी लक्षवेधी सुचना श्वान दंशावरील लसीच्या तुटवडयाबाबत श्री. बच्चाराम रुपचंदानी व श्री. रामदास उमाप यांची आहे. या दोन लक्षवेधी सुचना दाखल करुन घेतल्या आहेत.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :–मा. महापौर व आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगरपालिकेचे एका जाहिर आवाहनाचे पत्रक माझ्याकडे आहे. ज्यावर आयुक्तांची व महापौरांची स्वाक्षरी आहे. कृपया त्याच्यावर थोडा खुलासा करावा.

मा. सचिव :–मा. महापौरांच्या आदेशाप्रमाणे भोजन करण्यासाठी या सभेचे कामकाज अर्ध्या तासासाठी स्थगित करण्यात येत आहे. अर्ध्या तासानंतर सभेस पुन्हा प्रारंभ करण्यात येईल.

यावेळी मा. महापौरांनी सभेचे कामकाज अर्ध्या तासासाठी स्थगित करण्यात येत असल्याचे जाहिर केले.

दुपारी ३.५० वाजता सभेस पुन्हा प्रारंभ करण्यात आला. यावेळी मा. महापौर महोदया अनुपस्थित असल्याने उपमहापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते. तसेच खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा. उपमहापौर :—श्री. तलरेजा विनोद चंदीराम

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | २१. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ३. | श्री. सोनवणे नथु काशीराम | २२. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल |
| ४. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | २३. | श्रीमती माने किरण बाळकृष्ण |
| ५. | श्रीमती मोकल सीमा चंदाराम | २४. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ६. | श्री. गायकवाड दिलीप | २५. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ७. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | २६. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ८. | श्री. एडके गणपत गोविंद | २७. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ९. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | २८. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| १०. | श्री. उमाप रामदास राघोजी | २९. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ११. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ३०. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ३१. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १३ | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ३२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १४. | श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा | ३३. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १५. | श्री. निकम शांताराम ओंकार | ३४. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| १६. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ३५. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| १७. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ३६. | श्री. बठीजा संजय रामचंद्र |
| १८. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ३७. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| १९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ३८. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २०. | श्री. जेसवानी सतरामदास पुनमदास | ३९. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग |

तर,

१. मा. महापौर श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश, मा.सदस्य / सदस्या २. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास, ३. श्रीमती जावळे संगिता रमेश, ४. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर, ५. श्री. वाघे शामु बाबु, ६. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ७. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल, ८. श्री. यादव लालबिहारी बुझारत, ९. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन , १०. श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र, ११. श्री. पवार नाना आनंदा, १२. श्रीमती आहुजा निता प्रकाश, १३. श्री. वधारिया राजेश नानिकराम, १४. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), १५. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास, १६. श्री. साधवानी मोहन रहंदोमल, १७. डॉ. (श्रीमती) साधवानी जया, १८. श्रीमती खिलनानी भावना रवी, १९. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग, २०. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश, २१. श्री. भालेराव गौतम यशवंत, २२. श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास, २३. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, २४. श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास, २५. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती, २६. श्रीमती पंजाबी दिपा नारायण, २७. श्री. साधवानी मनोज लालचंद, २८. श्रीमती बठीजा कोमल अमृत, २९. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, ३०. श्रीमती माखिजा किरण लखी, ३१. श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग, ३२. श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास, ३३. डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश, ३४. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज, ३५. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, ३६. श्री. पंजाबी लाल देवनदास , ३७ श्री. माखिजा हरदास सन्मुखदास ३८. श्रीमती करोतिया मालती राधाचरण, ३९. श्रीमती दासानी मिनु राजकुमार, ४०. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ४१. श्री. लालवानी दिलीप जेठानंद हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

<u>मा. सचिव</u>:—लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व अनुमोदक आहेत श्री. राजेंद्र चौधरी.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

**विषय :—** अनधिकृत बांधकामे नियमाधीन करण्यासाठी सुरु असलेल्या प्रक्रियची माहिती मिळणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाचा अद्यादेश क्रमांक १/२००६, दिनांक १४ जानेवारी, २००६ नुसार उल्हासनगर शहरातील मालमत्ता धारकांना मुल्यमापन न करता सरलसकट नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तथापी सदर नोटिसीच्या अनुषंगाने माहिती सादर करण्यासाठी मिळकत धारकाकडुन पाहिजे तसा प्रतिसादर मिळाला नाही. याबाबत लोकजागृती करतांना संबंधित जबाबदार अधिकारी मा. आयुक्त साहेबांनी वृत्तपत्रकात दिलेल्या वकृत्व सर्वशी जबाबदार आहे. लोकजागृती करतांना प्रशासनाच्यावतीने नागरीकांना सतत अहवान करण्यात आले आहे. परंतु १८ महिन्यांच्या कालावधीत सदर प्रक्रिया करणे बंधनकारक असतांनाही ७ महिने होवुन ही नागरीकांचा प्रतिसाद लाभत नाही यास कारणीभुत प्रशासन आहे. प्रशासनास नेमके अधिकृत व अनधिकृत बांधकामे कोणती याबाबत साशंकता आहे. नोटिसा मिळुनही बहुतांश नागरीकांनी ६० दिवसांत उत्तरे दिली नाहीत. कारण की अद्यापपर्यंत नागरीक द्विध्दा अवस्थेत आहेत. महापालिका सदस्यांना याबाबत आकलन केले गेले नाही. मा. आयुक्तांनी वृत्तपत्रकातुन दिलेल्या विधानानुसार प्रथम पहिल्या टप्यात ८५५ इमारती, दुस—या टप्प्यात इतर इमारती व तिस—या टप्प्यात बॅरेक, चाळ व झोपडी सदर बांधकामे नियमाधित करण्यात येतील यामूळे नागरीक भ्रमिक झाले आहेत. तर एकीकडे मा. जिल्हाधिकारी साहेबांनी सर्वच बांधकामे एकाच वेळी नियमाधित करण्याचा आदेश दिला आहे. तर यासाठी नेमके करावे काय याबाबत प्रशासनाच्या वतीने मा. आयुक्तांनी या संदर्भात महासभेत स्पष्टीकरण करावे. महासभेतमहापालिका सदस्यांचे निरसन करावे. जेणे करुन सदर कामात महापालिका सदस्य प्रशासनाला सर्वतोपरी योग्य सहकार्य करु शकतील. या विषयावर सर्वपक्षीय सदस्यांना विचारविनिमय करण्यात येईल. तरी मा. आयुक्तांनी या विषयावर योग्य स्पष्टीकरण करावे ही नम्र विनंती. या लक्षवेधी सुचनेची सविस्तर चर्चा करुन योग्य खुलासा करण्यात यावा ही नम्र विनंती.

---

<u>मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :—</u>आयुक्त साहेब, जाहिर आवाहनाचे जे पत्रक आपण छापले आहे. त्याबद्दल कृपया खुलासा करावा. या पत्रात असे नमुद केले आहे की, अनधिकृत इमारतींसाठी 'क' नमुन्यात अर्ज दाखल करायचे आहे. त्यासाठी वास्तुविशारद व संरचनात्मक अभियंत्याच्या स्वाक्षरीची आवश्यकता आहे. तसेच बॅरेक, कच्चे बांधकाम व झोपडपट्टी यांच्यासाठी वास्तुविशारदाच्या स्वाक्षरीची गरज नाही. तर याबद्दल जरा खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> मा. महापौर व आयुक्त साहेब, ..............

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>मा. महापौर, मला दु:ख होते की, एवढी महत्वाची लक्षवेधी सुचना असतांना आपले सदस्य येथे अनुपस्थित आहेत. जर आम्ही निघुन गेलो तर कोरम देखिल पुर्ण होणार नाही. काम कसे काय चालेल? याचा अर्थ शहराचे मुद्दे आपण गांभिर्याने घेत नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> त्यांना शहराची काही आवश्यकता नाही, काही काळजी नाही. परंतु आपल्याला तर आहे. विचार तर आपल्याला करायचा आहे. त्यांना थोडी करायचा आहे.

<u>मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :—</u> ते जेवायला गेले आहेत. आता थोडया वेळात येणार आहेत. महिलांना जेवायला जास्त वेळ लागतो.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>आम्हीपण जेवायला गेलो होतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—कमीत कमी श्री. भुल्लर यांच्या लक्षवेधीच्या वेळी तरी सर्वांनी उपस्थित राहायला हवे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— ही माझी नाही तर शहराची लक्षवेधी सुचना आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—हा गंभीर मुद्‌दा आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— कोरम देखिल विरोधी पक्षाच्या सदस्यांमुळे पुर्ण होत आहे.

मा. पीठासीन अधिकारी :— आम्ही आपले आभारी आहोत.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— मा. महापौर व आयुक्त साहेब, शासनाने १४/१/२००६ रोजी उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी अध्यादेश काढला होता. त्यासाठी झोपडपट्‌टी, ८५५ इमारती, बॅरेक व सर्व मालमत्तांना नोटिस देखिल दिली आहे. त्याबद्‌दल आयुक्तांनी वर्तमानपत्रात निवेदन दिले आहे की, आधी ८५५ इमारतींचे काम करु. त्यांनतर दुस—या इमारती व नंतर झोपडपट्‌टया घेवु. यामुळे लोकांच्या मनात संभ्रम आहे की नेमके काय करायचे? त्या दिवशी जिल्हाधिका—यांनी सांगितले की, सर्वांनी एकत्र उत्तर दयायचे आहे. यावर आयुक्तांनी स्पष्टीकरण दिले तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—श्री. भुल्लर यांनी जी लक्षवेधी सुचना दिली आहे त्यावर अधिका—यांनी प्रत्येक बैठकीत वेगवेगळे उत्तर दिले आहे. ज्यावेळी आम्ही जिल्हाधिका—यांकडे गेलो त्यावेळी वेगळे बोलत होते. टाऊन हॉलमध्ये वेगळे सांगितले गेले. एकदा सांगतात की, झोपडपट्‌टीला नियमित करु शकत नाही कारण त्या आधीच संरक्षित आहेत. असे होते तर त्यांना नोटिस का दिली? याचे उत्तर कोणी देवु शकत नाही. दुसरे म्हणजे लोकांना दंडाची आकारणी किती होईल याची माहिती नाही. अधिकारीही यावर उत्तर देवु शकत नाही. तिसरे म्हणजे ४ एफएसआय वापरुन झाल्यानंतरही इमारतीतील जो भाग शिल्लक राहिल तो नियमित करणार अथवा नाही? जिल्हाधिकारी म्हणतात की, आधी तुम्ही विहीरीत उडी मारा, त्यानंतर वाचले तर ठिक आहे नाहीतर मरा. हे आपण देखिल ऐकले असेल. ऐकले नसेल तर आपणांस व्हीडीओ कॅसेट देतो. जिल्हाधिका—यांसारखा माणुस म्हणतो की, आधी तुम्ही विहीरीत उडी मारा नंतर बघु. हजार—बाराशे लोकांसमोर जिल्हाधिकारी असे म्हणाले होते. त्यामुळे लोकांमध्ये संभ्रम आहे. जिल्हाधिकारी जे प्राधिकारी आहेत ते जर योग्य उत्तर देवु शकत नसतील तर लोक काय करणार? त्याशिवाय ज्या बॅरेकस्‌ आहेत, ज्यांना १९६५ मध्ये सरकारने सनद दिली आहे त्यांना पुन्हा नियमित करण्याची काय गरज आहे? लोकांना असे वाटते की, १९६५ मध्ये केंद्र शासनाने आपणांस सनद दिली आहे, त्यानंतर महाराष्ट्र शासनाने मालमत्तेचा दाखला दिला आहे. असे असतांना पुन्हा नियमित करण्याची गरज काय आहे? याबद्‌दल अजुन स्पष्टीकरण दिले गेले नाही. यामुळे माझी आपणांस विनंती आहे की, आपण सभागृहात यावर स्पष्टीकरण दयावे. कारण १ लाख ५० हजार लोकांची झोप उडालेली आहे. लोक याबद्‌दलच विचारणा करीत आहेत, एक महिन्यापुर्वी ते ८५५ इमारतींबाबत चौकशी करायचे, त्याआधी पाण्याबद्‌दल चौकशी करायचे. आता ते फॉर्म बद्‌दल चौकशी करत आहेत. समजा एखादया इमारतीत १६ सदनिका असतील तर त्यापैकी १२ सदनिकाधारकांनी अर्ज केल्यास १२ सदनिका अधिकृत होतील की पुर्ण इमारत अधिकृत होईल. झोपडपट्‌टीचे काय होणार, ज्यांच्याकडे सनद आहे त्यांचे काय होणार, ज्यांचे बांधकाम ४ एफएसआय पेक्षा जास्त आहे त्यांचे काय होणार? या सर्व मूद्‌दयांवर स्पष्टीकरण दयावे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौर व आयुक्त साहेब, या मुद्‌दयावरच बोलतो. आताच श्री. प्रशांत जाधव यांनी आपल्याकडे एक पत्रक दिले आहे. या पत्रकाचे आपण टाऊन हॉलमध्ये जिल्हाधिका—यांच्या उपस्थितीत वितरण केले होते. त्यावर आपली व महापौरांची सही आहे. त्या पत्रकातील तिस—या व चौथ्या मुद्‌दयावर असे लिहिले आहे की, कच्चे बांधकाम असणारे व झोपडपट्‌टी धारक यांना क फॉर्मवर वास्तुविशारदाची सही घेण्याची आवश्यकता नाही. तर मला असे विचारायचे आहे की, झोपडपट्‌टी धारकांनी फक्त ब फॉर्म भरायचा आहे का? दुसरी गोष्ट म्हणजे फॉर्म भरतांना त्या सोबत कोणती कागदपत्र जोडायची आहेत. ब फॉर्म हाच आमचा अर्ज असणार आहे की दुसरा अर्ज करावा लागणार आहे? आवश्यक

कागदपत्रांमध्ये राशन कार्ड, टॅक्स पावती व अजुन कोणती कागदपत्र दयायची आहेत? तसेच टॅक्स पावतीचा भरणा करणे आवश्यक आहे काय? कृपया आपल्या खुलाश्यामध्ये आपले उत्तर दयावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, शहरातील ८५५ इमारती नियमित करण्याचा मुद्दा हा एक गंभीर मुद्दा आहे. पुर्ण शहरात लोकांमध्ये याबाबत तणाव आहे. लोकांना असे वाटते की, फक्त ८५५ इमारतींचा प्रश्न न्यायालयात होता. असे असतांना सर्वच्या सर्व म्हणजे दिड लाख मालमत्ता धारकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये झोपडपट्टी, चाळ, बंगले, इमारती, सनद असलेल्या बॅरेकच्या खोल्या या सर्वांचा समोवश होतो. जर एखादया गरीब माणसाने झोपडी बांधली असेल व त्यामध्ये काहीही बदल केलेला नसेल तर तो फॉर्म का भरुन देईल? येथे हजारो बॅरेकच्या रुमना सनद दिलेली आहे, जे अजुन पऱ्याचे आहेत. पाकिस्तानमधुन निर्वासीत म्हणुन येथे आल्यानंतर त्यांना ज्या बॅरेक दिल्या होत्या त्यामध्ये काहीही बदल केलेला नाही. ते लोक म्हणतात की, आम्ही फॉर्म का भरावा? दुसरे म्हणजे महापालिकेने जी नोटिस पाठविली आहे त्यामध्ये मालमत्तेचे मोजमाप किती आहे ते विचारले आहे. खरेतर ज्या लोकांना मालमत्ता कराचे देयक जाते त्या सर्वांच्या मालमत्तेचे कर विभागातर्फे निर्धारण केले जाते. महापालिकेकडे तो रेकॉर्ड आहे. नोटिस अशी दयायला पाहिजे होती की आमच्याकडील रेकॉर्डप्रमाणे तुमची एवढया एवढया आकाराची खोली आहे, जर तुम्ही काही बदल केला असेल तर हा फॉर्म भरा. अथवा तुम्ही दोन माळयाचे अनाधिकृत बांधकाम केले असेल तर अर्ज करा. जर त्या माणसाने वाढीव बांधकाम केले असेल तर त्याने नोटीसला उत्तर दयायला हवे. अजुनपर्यंत दंडाची रक्कम काय असेल ते निश्चीत केलेली नाही. दुसरे म्हणजे वास्तुविशारदाने प्रती चौरस फुट रुपये दोन एवढा आकार निश्चित केला आहे. परंतु वास्तुविशारद जी कागदपत्र मागतात ती लोक देवु शकत नाही. जर माझ्याकडे सर्व कागदपत्र असतील तर माझे बांधकाम अनधिकृत कसे होईल? वास्तुविशारद सीटी सर्व्हेचा प्लान, डीमार्केशन प्लान व इतर कागदपत्राची मागणी करतात जर ते सर्व कागदपत्र आणु शकत असतील तर त्यांचे बांधकाम अनाधिकृत कसे होईल? ते फक्त मालमत्ता कराची पावती जोडु शकतात. ते जेव्हा वास्तुविशारदाकडे जातात तेव्हा वास्तुविशारद त्यांना सांगतो की, माझ्याकडे तीस–चाळीस–पन्नास इमारतींचे काम आहे, तुमच्या कामांना तीन महिने लागतील. येथे कालावधी मात्र दोन महिन्याचा निश्चित केला आहे. ८५५ इमारतींसाठी जास्त वेळ देणे आवश्यक आहे कारण न्यायालयाने आपल्याला १८ महिन्याचा कालावधी दिला आहे. ८५५ सोडुन जी इतर बांधकामे आहेत ती या अध्यादेशाप्रमाणे कधीही नियमित करता येवु शकतील. यासाठी पहिले प्राधान्य ८५५ इमारतींना, द्वितीय प्राधान्य इतर बांधकामांना व तिसरे झोपडपट्टीसाठी ठेवायला पाहिजे. यासाठी जो दोन महिन्यांचा कालावधी दिला आहे तो वाढवायला हवा. कारण आपण बघितले असेल की, आपण दिड लाख नोटिसा दिल्यानंतर फक्त हजार अर्ज प्राप्त झाले आहेत त्यापैकी महापालिकेच्या नियमाप्रमाणे फक्त २०० प्रकरणात कारवाई होवु शकते. इतर अर्जांमध्ये कागदपत्रांची कमतरता आहे. हा एक गंभीर मुद्दा आहे. ज्यावेळी मालमत्ता कराची देयके वाटायची असतात त्यावेळी आपण कर्मचा–यांना घरोघरी पाठवितो. यासाठी आता हे अर्ज भरुन घेण्याकामी कर्मचा–यांना लोकांच्या घरोघरी पाठवुन अर्ज भरुन घेतले पाहिजे. यासाठी आपले काही कर्मचारी नियुक्ती करावे. जसे आता कर निरिक्षकांना काहीच काम नाही कारण जानेवारी ते मार्च वसुलीचे काम असते. यासाठी पथके बनवुन प्रत्येक कॅम्पात पाठवायला हवेत. लोकांमध्ये याबद्दल जागृकता नाही, ते स्वत:हुन पुढे येत नाहीत. ज्या लोकांना कळत नाही त्यांना मार्गदर्शन करायला हवे. असे करुन जास्तीत जास्त फॉर्म भरुन घ्यावेत. आयुक्तांनी मध्यंतरी सांगितले होते की, फॉर्मवर वास्तुविशारदाची स्वाक्षरी नसेल तरी चालेल याबाबत जिल्हाधिका–यांकडे चर्चा झाली आहे. असे केल्याने लोक स्वत: फॉर्म भरुन देवु शकतील. त्यांना काहीही अडचण येणार नाही. धन्यवाद।

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>हा एक गंभीर मुद्दा आहे. याबद्दल आमची देखिल जिल्हाधिकारी सोबत दोन–तीन वेळा बैठक झाली आहे. आम्ही देखिल तेथे काही प्रश्न उपस्थित केले. मी सांगु इच्छितो की, दोन महिन्यापुर्वी महासभेत विरोधी पक्ष नेत्यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी महापौर उपस्थित होत्या. आमचे असे म्हणणे होते की, या विषयावर एक सर्वपक्षीय बैठक ठेवण्यात यावी. त्यामध्ये मुद्दे उपस्थित करता आले असते. ते आपण शासनाकडे उपस्थित करु शकलो असतो. परंतु ती बैठक झाली नाही व दोन महिने असेच निघुन गेले. या नोटीसांना लोकांनी प्रतिसाद दिला नाही त्यामागे बरीच कारणे आहेत. आता लक्षवेधीवर आयुक्त कश्याप्रकारे उत्तर देतील हे आम्हाला चांगले माहित आहे. त्यांना शासनातर्फे उत्तर दयायचे आहे, अध्यादेशातीलच भाषेत ते बोलतील. परंतु मला असे वाटते की, आयुक्तांनी महापालिकेची भाषा काय आहे, महापालिकेचे म्हणणे काय आहे ते शासनासमोर सादर करायला पाहिजे. यासाठी मी हा विषय उपस्थित केला आहे. श्री. बच्चाराम रुपचंदानी व श्री. किशोर वनवारी यांनी सांगितले की, अध्यादेशामागील भावना चांगली

आहे, आम्ही तिचा आदर करतो. जळगावचे आमदार श्री. गुरुमुख जगवानी यांनी विधानपरिषदेत हा मुद्दा उपस्थित केला होता, त्यावेळी आमच्यापैकी बरेचसे लोक तेथे उपस्थित होते. त्यावेळी दुस—या पक्षाच्या ब—याच सदस्यांनी त्यांना पाठींबा दिला होता. त्यानंतर अध्यादेश निघाला होता. परंतु बांधकामे नियमित करण्यासाठी जी प्रक्रिया सुरु केली आहे ती अयोग्य आहे. यामुळेच लोकांकडुन अपेक्षित प्रतिसाद प्राप्त झाला नाही. १ लाख ४८ हजार लोकांना नोटिसा दिल्या गेल्या. तुम्हांला ऐकुन आश्चर्य वाटेल की, ज्या मालमत्ता अस्तित्वात नाहीत त्यांना देखिल नोटिसा देण्यात आल्या. ज्या मालमत्ता जागेवर नाहीत त्यांना देखिल अनाधिकृत ठरवुन नोटिसा देण्यात आल्या. अशाप्रकारे सुमारे २९ हजार नोटिसा देण्यात आल्या आहेत. ज्यावेळी महापालिकेचे कर्मचारी नोटिस दयायला जात होते त्यावेळी त्यांना मालमत्ता धारक अथवा मालमत्ता सापडत नव्हती. त्यावरुन कामकाज कसे सुरु आहे ते दिसुन येते. अशी परिस्थिती आणीबाणीच्या कालावधीत होती. त्यावेळी अंदाधुंदी कारभार सुरु होता. त्यावेळी अटक करण्यासाठी कोरे वारंट काढले जात होते. त्यावर माणसाचे नाव नसायचे, जो माणुस घरी असायचा त्याचे नाव त्यावर टाकले जायचे. अशाच प्रकारे येथे मालमत्ता अस्तित्वात नसतांना देखिल हजारो नोटिसा काढण्यात आल्या आहेत. यामुळे लोकांना असे वाटते की, पुर्ण शहराला नोटिसा दिल्या आहेत आपल्याला काही होणार नाही. यामुळे प्रकरणातील गांभीर्य नष्ट झाले आहे. मी देखिल बॅंकेत अधिकारी म्हणुन काम केले आहे. त्यावेळी आम्हांला असे शिकविले जायचे की, एखादा माणुस चुक करत असेल तर त्याला ज्ञापन दया. परंतु ज्ञापन दिल्यावर त्या माणसाला असे वाटायला हवे की त्याने काहीतरी चुक केली आहे. एक अधिकारी असा होता जो कोणी कर्मचारी १५ मिनिटे उशिरा आला तरी ज्ञापन द्यायचा. त्यामुळे त्या कार्यालयात सर्व कर्मचा—यांना ज्ञापन मिळाले होते. त्यामुळे त्या ज्ञापनाचे गंभीर्य नष्ट झाले होते. येथे देखिल सर्वांना नोटिसा दिल्याने त्यातील गांभीर्य नष्ट झाले आहे. ही प्रक्रिया कशी चुकीची आहे हे देखिल मी आपणांस सांगतो. सर्वांना वास्तुविशारदातर्फे अर्ज करण्यास सांगितले आहे. झोपडपट्टीतील रहिवाश्यांना देखिल असेच सांगितले आहे. १९९५ पर्यंतच्या सर्व झोपडपट्टया संरक्षित आहेत. तरी देखिल त्यांना नोटिस दिली आहे. त्यांना कोणी तोडुच शकत नाही. तरी देखिल नोटिस दिली आहे. ११/५/१९६५ च्या शासकिय आदेशाप्रमाणे बॅरेकस् नियमित केलेल्या आहेत. त्यांना देखिल नोटिस दिलेली आहे. यामुळे लोकांमध्ये संभ्रमाची परिस्थिती आहे. जर एखादया झोपडपट्टी धारकाने अथवा दुकानदाराने फॉर्म भरुन दिला तर त्याचा अर्ज पाहुन सक्षम प्राधिकारी त्याचे बांधकाम नियमित करणार आहे काय? असे होवु शकणार नाही. तज्ञ समिती जागेवर जावुन पाहणी करेल. जागेवर अनाधिकृत बांधकाम किती आहे, एफएसआयचे उल्लंघन किती आहे हे बघतील. यासाठी जेव्हा नोटिस दिली त्याचवेळी नोटिसमध्ये अनधिकृत बांधकाम किती आहे याचा उल्लेख करायला हवा होता. त्यामध्ये अनाधिकृत बांधकाम किती आहे व दंड किती लागेल याची माहिती दयायला हवी होती. असे केले असते तर लोकांचा प्रतिसाद चांगला मिळाला असता. आपल्या महापालिकेतर्फे शासनाकडे एक प्रतिनिधी मंडळ नेवुन या सर्व बाबी स्पष्ट करायला हव्या होत्या. आम्ही मे महिन्यात तशी मागणी देखिल केली होती. परंतु दुर्भाग्याने तसे झाले नाही. याच कारणांमुळे लोकांमध्ये संभ्रमाची स्थिती आहे. जर मी कायद्याच्या दृष्टीकोनातुन बोलतो तर अजुन बरेच काही बोलु शकतो. जर आपण अध्यादेशाचा अभ्यास केला तर दिसुन येईल की, हा अध्यादेश उच्च न्यायालयाच्या आदेशावर आधारीत होता. त्यामध्ये असे लिहिले आहे की, १/१/२००५ पुर्वीचे जे काही आदेश असतील, नोटिसा असतील त्या रद्द होतील. तसेच जर त्याची अंमलबजावणी झाली नाही तर ८५५ इमारतीचे आदेश पुर्नजिवित होतील. यासाठी आधी ८५५ इमारतींचा प्रश्न हाती घ्यायला हवा. जर आपण तसे केले असते व नेमका किती दंड भरायचा आहे याची माहिती लोकांना दिली असती तर लोकांनी चांगला प्रतिसाद दिला असता. जिल्हाधिका—यांनी आधी ८५५ इमारतींपासुन सुरुवात करायला हवी होती. हे काम टप्याटप्याने करायला हवे होते. असे केले असते तर चांगला प्रतिसाद मिळाला असता. यासाठी मी सत्तापक्षाला उघडपणे दोष देईन. त्यांनी दोन महिन्यापुर्वी बैठक घेवुन सर्वांना याची व्यवस्थित माहिती दिली असती तर यामध्ये शासनाला यश प्राप्त झाले असते. मला असे वाटते की, येथिल आयुक्तांनी शासनासमोर सरकारचा पक्ष सादर न करता येथिल लोकांच्या भावना जिल्हाधिकारी अथवा नगरविकास विभागाकडे सादर करायला हव्यात. आयुक्तांनी लोकांच्या मनातील संभ्रम शासनापर्यंत पोहचवावा. तसेच यावर काहीतरी मार्ग कसा निघेल यावर विचार करावा. धन्यवाद।

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :— मा. महापौर, आयुक्त, या नोटिसा दिल्यानंतर झोपडपट्टीमध्ये जी स्थिती आहे ती मी येथे सांगु इच्छितो. आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या सोबत चर्चा केल्यानंतर असे निष्पन्न झाले होते की, झोपडपट्टीला अर्ज करण्यासाठी वास्तुविशारदाची काही गरज नाही. परंतु आज शहरात एक बरेच मोठे पथक झोपडपट्टीमध्ये कार्यरत आहे. ते प्रत्येक झोपडपट्टी धारकाकडुन ५०० ते ४००० रुपये वसुल करीत आहेत. झोपडीचा नकाशा बनवुन व फाईल तयार करुन प्रकरण तयार करायचे काम सुरु आहे. जर वास्तुविशारदाची गरज नसेल तर ज्या झोपडीधारकांनी पैसे देवुन प्लान तयार केला असेल त्याच्यासाठी आयुक्त काय करणार? ज्यांनी पैसे भरले आहेत त्यांचे काय करणार? दुसरे म्हणजे १९९५ ते २००० पर्यंतच्या झोपडपट्टया शासनाने संरक्षित म्हणुन घोषित केल्या आहेत. असे असतांना त्यांना नोटिसा का दिल्या आहेत? तिसरे म्हणजे लोकांचा

प्रतिसाद न मिळण्याचे मुख्य कारण म्हणजे वास्तुविशारद प्रती चौरस फुट २ ते ३ रुपयाची मागणी करीत आहेत. त्यामुळे लोक फॉर्म भरण्यास तयार नाहीत कारण त्यांच्याकडे पैसे नाहीत. ज्या लोकांना वास्तुविशारदाची सही घेण्याची आवश्यकता नाही व ज्यांनी पैसे भरले असतील त्यांचे काय करणार? अशा प्रकारे जर कोणी गरीबांची फसवणुक करीत असेल, पैसे वसुल करीत असेल तर यावर मार्ग काढण्यासाठी प्रशासनाने काहीतरी करायला हवे. दुसरी सुचना अशी आहे की, प्रत्येक मालमत्ता धारकाकडे महापालिकेने कर्मचारी पाठवुन फॉर्म कसा भरायचा, कोणती कागदपत्रे सादर करायची याची माहिती दयायला हवी. धन्यवाद ।

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :</u>—मा.महापौरजी, महाराष्ट्र शासनाने उल्हासनगर शहरातील लोकांची मालमत्ता सुरक्षीत राहावी, अनाधिकृत बांधकाम अधिकृत व्हावे यासाठी फॉर्म काढले आहेत. त्यानंतर घरोघरी जावुन दिड लाख लोकांना नोटिसा दिल्या आहे. आपल्या महापालिकेतील नागरी सुविधा केंद्रात जो संगणक आहे त्यामध्ये सर्व दुकानांची व घरांची मोजमापे नमुद आहेत. आज आपण बघितले तर शहरात तिसरी पिढी राहत असल्याचे दिसुन येते. आमचे वडील वारले आहेत तसेच आमचे मोठे बंधु जे मालमत्तेचे काम बघायचे ते आता निवृत्त झाले आहेत. आता तिसरी पिढी जे कागदपत्रे वडिलांनी ठेवली होती ते कुठुन आणेल? आमच्या वडिलांचे निधन होवुन तीस वर्ष झाले आहेत. आम्ही कागदपत्रे कोठुन आणणार? कॅम्प नं. ५ येथिल नगररचना विभागाच्या कार्यालयात सर्व कॅम्पच्या शिट्स आहेत, मोजमापे आहेत. अजुन पुरावा आम्ही कोठुन आणणार? ज्यावेळी लोक आपल्या अभियंत्यांकडे दाखला मागण्यासाठी जातात त्यावेळी ते त्यांना पुरावा आणण्यासाठी सांगतात. मी आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, उल्हासनगरमध्ये लोकांना त्यांच्या जमिनीची सनद घ्यायची असल्यास त्यासाठी कोणाचा तरी सहारा घ्यावा लागतो. त्यानंतर त्यांना मुंबई येथुन सनद मिळते. ती जागा कितीला विकली जाते ते आपणांस माहिती नाही. जमिन असल्यानंतरही नागरीकांना रुपये २,५००/— दयावे लागतात, सनद चढविण्यासाठी. आता शासनाने जी योजना काढली आहे त्याचा सदुपयोग व्हायला हवा. यासाठी आयुक्तांनी सोपा मार्ग काढायला हवा ज्यासाठी लोकांना फायदा होवु शकेल. सर्व नागरीकांना लाभ होईल अशी योजना शासनाकडे सादर करायला हवी. धन्यवाद ।

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :</u>—मा. आयुक्त साहेब, सर्व लोक येथे विचार मांडतात. आतापर्यंत चार—पाच बैठका झाल्या आहेत. जिल्हाधिकारी यांनीच दोन बैठका घेतल्या आहेत. पण तुम्ही हिंदी व मराठीमध्ये एक हॅण्डबिल तयार करुन त्यात सविस्तर माहिती दिल्यास सर्वांना सुलभ होईल. त्यामध्ये ८५५ इमारती या तारखेपर्यंत, इतर इमारती या तारखेपर्यंत, त्यानंतर चाळी आणि बॅरेक, त्यानंतर झोपडपट्टी विभाग असे लिहून दिले तर बरे होईल. हॅण्डबिल तयार करुन आमच्याकडे दया. नाहीतर दोन—तीन टिम तयार करा, आपल्याकडे ट्रेसर आहेत, जागेवर स्केल काढुन सर्व लिहुन काढा. आपल्याकडे सर्व लिहिलेले आहे. काखेत कळसा, गावाला वळसा असा प्रकार सुरु आहे. उगाच वेडे बनविण्याचे काम चालु आहे. लोक दोन वेळेच्या जेवणासाठी मरत आहेत. मुंबई—उल्हासनगर, उल्हासनगर—मुंबई अशा फे—या मारत आहेत. कमावण्यामध्येच त्यांचा वेळ जात आहे. सर्व शहराला कोणी कामाला लावले आहे, धंदयाला लावले आहे. यामधुन सर्व शहरवाशियांची सुटका करा. हॅण्डबिल छापुन सर्वांना वाटा. आम्ही घरोघरी वाटु.

<u>मा. आयुक्त :</u>—मा. महापौर महोदय, या लक्षवेधीचे सुचक श्री. भुल्लर व अनुमोदक श्री. चौधरी, तसेच सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. मी कार्यभार हाती घेतल्यानंतर विविध नगरसेवक, विविध पक्षाचे नेते मला येवुन भेटले व झोपडपट्टीत काय होणार आहे याबद्दल त्यांनी मला विचारणा केली होती. त्यांचे प्रश्न माझ्या समोर येत होते परंतु त्यावेळी मी अध्यादेश पाहिला नव्हता. सामाजिक न्यायाची भाषा वेगळी असते व न्यायालयाची भाषा वेगळी असते. जो अध्यादेश निघाला होता तो २१ एप्रिल २००६ ला कायदयामध्ये रुपांतरीत झाला होता. ज्यावेळी अध्यादेश निघाला होता त्यावेळी तो महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांच्या मान्यतेने निघाला होता. तसेच अधिनियम देखिल असाच तयार झाला आहे. अधिनियम हा विधीमंडळासमोर ठेवल्यानंतर मंजुर होतो. त्यामुळे तो योग्य आहे अथवा नाही यावर मी चर्चा करु शकत नाही कारण ते माझ्या अखत्यारित येत नाही. आता माझ्याकडे जो अधिनियम आहे, तो प्रत्यक्षात कसा अंमलात आणायचा हे आपण बघायला पाहिजे. आता श्री. भुल्लर व इतर सदस्यांनी सांगितले की, कश्याप्रकारे काम करायला हवे. लक्षवेधीच्या चर्चेत सांगितले गेले की, मी वर्तमानपत्रांमध्ये निवेदन दिले आहे की, पहिल्या—दुस—या व तिस—या टप्प्यात काम करण्यात येईल. परंतु मी अश्याप्रकारे काम करण्यात येईल असे बोललो नव्हतो. हे काम तीन विभागात वाटण्यात येईल असे बोललो होतो. ८५५ इमारतींचे जे अर्ज येतील, पक्क्या बांधकामांचे जे अर्ज येतील व झोपडपट्टयांचे जे अर्ज येतील त्याचे तीन विभाग करण्यात येतील. येथे कुठेही असे लिहिलेले नाही की, १८ महिन्यात काम करायचे आहे. अधिनियमाप्रमाणे २१ एप्रिल नंतर ९० दिवसात जिल्हाधिकारी यांनी नोटिस दयायची आहे. नोटीसांचे काम आम्ही २२ एप्रिल, २००६ पर्यंत पुर्ण करायला हवे होते. प्रचंड प्रमाणावर म्हणजे १ लाख ५० हजार नोटिसा वाटायच्या असल्याने या कामास विलंब

झाला. तरी देखिल यामध्ये एक सवलत अशी आहे की, आम्ही २१ एप्रिलला नोटिस काढली असली व नोटिस जुन अथवा जुलैमध्ये प्राप्त झाली असेल तरी प्राप्त झालेल्या दिवसापासुन ६० दिवस मोजायचे आहेत. त्या ६० दिवसांच्या आत संबंधीतांनी अर्ज करणे आवश्यक आहे. ज्या नमुन्यात अर्ज करायचे आहे तो नमुना देखिल शासनाने अ,ब,क,ड असा ठरवुन दिला आहे. विहित नमुन्यातच अर्ज भरुन देणे आवश्यक आहे. आधी प्रशासनाची चुक झाली होती, फक्त इंग्रजीतच अर्ज दिले होते. परंतु नंतर जिल्हाधिका—यांनी त्यात दुरुस्ती करुन मराठीमध्ये देखिल अर्ज उपलब्ध करुन दिले आहे. आता सर्वांच्या मनात एक शंका आहे की, फॉर्म कधी दयायचे आहेत. तर मी सांगु इच्छितो की, आपल्याला नोटिस मिळाल्यापासुन ६० दिवसाच्या आत फॉर्म भरुन दयायचे आहेत. ६० दिवसानंतर २—४ दिवस जास्त लागले तरी फॉर्म घेतला जाईल व फॉर्म ६० दिवसात मिळाला आहे असे दाखविले जाईल. हा अर्ज ज्याचे बांधकाम अनधिकृत आहे त्यांनी करायचा आहे. यांनी आता सांगितले की, तीन पिढयांपासुन कागदपत्र चालत आले आहेत. तर मग मी सांगु इच्छितो की, कागदपत्रे हे अनंतकाळ सांभाळुन ठेवणे आवश्यक आहे. जोपर्यंत त्यात काही बदल होत नाही तोपर्यंत ते आपल्याकडे सांभाळुन ठेवणे हे प्रत्येक नागरीकाचे कर्तव्य आहे. कागदपत्रे नाही असे म्हणता येणार नाही. कायदयात तशी सवलत नाही. कागदपत्रे नसतील तर उपविभागीय कार्यालयातुन आपण त्यांची नक्कल प्राप्त करुन घेवु शकतो. त्यामध्ये काहीही अडचण येणार नाही. या शहरात बॅरेकची बांधकामे व झोपडपट्टयांचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. याबाबत काही नगरसेवक माझ्याकडे आले होते त्यांनी मला विचारले होते की, कच्च्या व पक्क्या बांधकामाची व्याख्या सांगावी. कोणाला वास्तुविशारदाचा दाखला लागेल ते सांगा. तर मी एवढेच बोलेन की जेथे आरसीसी बांधकाम आहे, तळमजल्यापेक्षा जास्त बांधकाम केले आहे, व एखादयाला १० X २० जागा दिली असेल व त्यापेक्षा जास्त पक्के बांधकाम केले असेल अशा ठिकाणी वास्तुविशारदाच्या दाखल्याची आवश्यकता आहे. जर टिनचे बांधकाम असेल, कच्च्या भिंती असतील व मुळ बांधकामात काही बदल केले नसतील, झोपडपट्टीमध्ये तर शासनाने कोणत्याही प्रकारची सनद दिली नाही. अशा लोकांना बांधकाम अधिकृत करुन घेण्यासाठी ही एक चांगली संधी आहे. आधीच्या शासनाच्या कायदयाप्रमाणे झोपडपट्टया संरक्षित घोषित करण्यात आल्या आहेत, त्यांना फोटोपास देण्यात आले आहेत. सर्वांना नाही १०—२० टक्के लोकांना देण्यात आले आहेत. त्यामुळे त्या लोकांच्या बांधकामाला संरक्षण प्राप्त झाले आहे. परंतु ती बांधकामे नियमाधीन झालेली नाहीत. या अधिनियमाप्रमाणे आम्ही ती बांधकामे नियमित करणार आहोत. अधिनियमात प्रत्येक बांधकाम मग ते झोपडपट्टी असो, ८५५ इमारती असो, अथवा इतर कोणतेही बांधकामे असो त्यात फरक केलेला नाही. ब—याच लोकांनी येथे मुद्दा उपस्थित केला की, १ लाख ५० हजार बांधकामांना नोटिसा का दिल्या? यासाठी मी माझ्या आधीच्या अधिका—यांशी चर्चा केली, जिल्हाधिका—यांशी चर्चा केली व त्यानंतर महापालिकेत किती बांधकामे अधिकृत व परवानगी घेवुन बनविलेले आहेत यांची संख्या व किती अनधिकृत आहेत यांची निश्चित संख्या उपलब्ध नसल्याचे दिसुन आले. यामुळे सर्वांना संधी देण्यासाठी सर्वांना नोटिसा दयाव्यात असे जिल्हाधिकारी व यापुर्वीचे आयुक्त श्री. पाटील साहेब यांनी ठरविले. मी येथे सांगु इच्छितो की, ज्या माणसाचे बांधकाम अधिकृत असेल व ज्याच्याकडे सर्व कागदपत्रे उपलब्ध असतील त्याचे नाव दिड लाख नोटिसांमधुन आपोआप कमी होईल. अशाप्रकारे एक लाख मधुन ५० हजारच शिल्लक राहतील. त्यामध्ये पक्की बांधकामे, ८५५ इमारतींचे प्रकरणे व झोपडपट्टयांचा देखील समावेश होईल. आता यामध्ये दोन प्रश्न आहेत की, आपणांस बांधकाम अधिकृत करायचे आहे किंवा नाही? नोटिसा दिल्यानंतर आम्ही वारंवार लोकांना आवाहन करीत आहोत, जिल्हाधिकारी, प्रशासन व महापौर महोदया वारंवार आवाहन करीत आहेत. उल्हासनगरसाठी हा विशेष अधिनियम मंजुर करुन एकाप्रकारे उपकारच केले आहेत. पाकिस्तानमधुन येथे निर्वासीत म्हणुन ज्या व्यक्ती आल्या त्यांच्यासाठी केंद्र शासनाने एक विशेष कायदा देखिल केला आहे. त्यांना फायदा देण्यासाठी हा कायदा तयार केला आहे. दुस—या महानगरांना असा फायदा मिळेल अथवा नाही याबद्दल मला संशय आहे. कारण उल्हासनगरच्या नागरीकांच्या समस्या भिन्न आहेत. शासनाने याचा विचार करुन सर्वांना फायदा देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सर्व लोकांनी दोन महिन्याच्या आत अर्ज करणे आवश्यक आहे. बरेच लोक माझ्याकडे येवुन बोलले की, झोपडपट्टीतील रहिवाशी वास्तुविशारदाची फी देवु शकत नाही तसेच त्यांचे बांधकाम पक्के देखिल नाही त्यामुळे बांधकाम सुस्थितीत असल्याचा दाखला देणे आवश्यक नाही. हा मुद्दा मी मा. जिल्हाधिका—यांसमोर मांडला. तसेच शिवसेनेचे नेते, भाजपाचे नेते, सत्ताधारी पक्षातील सदस्य, सभागृह नेता, महापौर महोदया, अनेक गट, अशासकिय संस्था व वास्तुविशारदांनी देखिल हा मुद्दा जिल्हाधिका—यांकडे मांडला होता. मी येथे आल्यानंतर एवढेच सांगितले होते की, यापुर्वी मी मुंबईत अतिक्रमण निर्मुलनाचे काम केले आहे. लोकांची बांधकामे नियमित करण्याची आवश्यकता आहे कारण ती नियमित नसुन त्यांना संरक्षित म्हणुन घोषित केले आहे. या सर्व झोपडपट्टया शासकिय अथवा निमशासकिय जागेवर बांधलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना नियमित करणे आवश्यक आहे. त्या जागेचे कन्व्हेन्स करुन दयावे लागेल त्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहिल कारण ही जागा जिल्हाधिका—यांची असते. यासाठी शासनाने आयुक्त तथा उपायुक्त यांना पदनिर्देशित प्राधिकारी न करता जिल्हाधिकारी यांनाच पदनिर्देशित प्राधिकारी केले आहे. कारण ही शासकिय जागा आहे. त्या जागेचे हस्तांतरण करायचे असल्यास ते अधिकार

जिल्हाधिका—यांनाच असतात. त्यांना पदनिर्देशित करण्याचे हे पहिले कारण आहे. तसेच नियोजन प्राधिकारणाचे जे अधिकार असतात ते देखिल जिल्हाधिकारी हे वरीष्ठ सनदी अधिकारी असल्याने वापरु शकतात. जिल्हाधिका—यांनी त्यांचे अर्धन्यायीक अधिकार पार पाडावेत यासाठी त्यांना योग्य ते सहकार्य करणे हे महापालिका प्रशासनाचे कार्य आहे. यासाठी तीन नगररचनाकार, तीन संरचनात्मक अभियंता यांची नियुक्ती केली असुन सहा. संचालक नगररचना यांच्या कार्यालयातील तीन अधिका—याची सेवा वर्ग केली आहे. अजुन सहा अधिका—यांची नियुक्ती आम्ही करणार आहोत. हा जो १०—१२ अधिका—यांचा गट असेल यांच्याकडे अर्ज येतील, त्यानंतर त्यांनी नियमाप्रमाणे त्यांची छाननी करावयाची आहे. बरेच लोक कोणती कागदपत्रे दयायची याबद्दल विचारणा करतात. वास्तुविशारद आपल्याला याची माहिती देतील. परंतु जर आपल्याकडे सनद असेल तर सनद दयावी. तुम्ही जर ४० X ५० बांधकामांची परवानगी घेतली असेल व त्यावर दोन माळे बांधले असतील व त्याची परवानगी घेतली नसेल तर आपण मुळ बांधकाम परवानगीची प्रत त्यांना दयावी. जर अ या व्यक्तीने ब या व्यक्तीला जागा हस्तांतरीत केली असेल तर त्याच्याशी संबंधीत कागदपत्रे दयावीत. जर काही फेरफारांची नोंद असेल तर एसडीओ ऑफिसमधुन त्याचा दाखला दया. जर एखादया व्यक्तीच्या वाडवडिलांचे वारसाने चालत आलेले कागदपत्र असतील तर ती सादर करावीत. जर एखादया व्यक्तीच्या नावावर कागदपत्र असतील व ते वारले असतील तर त्यांच्या वारसदाराने, कुटुंबप्रमुखाने अर्ज करावा व दुस—या रकान्यात तसा उल्लेख करावा. तसेच माझ्याकडे बरेच लोक नेमका दंड किती लागेल याची विचारणा करतात. याबद्दल मी सांगु इच्छितो की, अधिनियमाच्या कलम ३ मध्ये एक तक्ता दिला आहे त्यामध्ये कश्याप्रकारे दंडाची आकारणी करण्यात येईल याची माहिती दिली आहे. एखादया बांधकामाला नेमका किती दंड लागेल ते आताच सांगता येणार नाही. बांधकामाचा प्रकार, बांधकाम कुठे आहे, बांधकाम कसे आहे हे सर्व बघुन त्यानंतर दंड किती लागेल ते सांगता येवु शकेल. आरसीसी बाधंकाम असेल तर त्याला वेगळा दंड लागेल व कच्च्या बांधकामाला वेगळा दंड लागेल. त्यामुळे अमुक—अमुक एवढा दंड लागेल असे येथे सांगता येणार नाही. अधिनियमातील तरतुदीनुसार चार एफएसआय पर्यंतची बाधंकामे नियमित करता येवु शकतील. परंतु यासाठी अग्निशमन दलाची अथवा जिल्हाधिकारी जे अधिकारी नियुक्त करतील त्यांचा ना हरकत दाखला आवश्यक आहे. तुमचा वास्तुविशारद बांधकामाबद्दल जो दाखला देईल त्याची छाननी जिल्हाधिका—यांनी स्थापन केलेल्या तज्ञ समितीमार्फतही करण्यात येईल. अर्ज केल्यानंतर त्यामध्ये काही चुक असल्यास, कागदपत्रांची कमतरता असल्यास ती दुर करण्यासाठी आपणांस कळविण्यांत येईल. परंतु ही जी ६० दिवसाची मुदत आहे त्यामध्ये जिल्हाधिकारी, महापालिका प्रशासन, अथवा शासन काहीही वाढ करु शकत नाहीत. कारण आम्हांला अधिनियमाप्रमाणे काम करायचे आहे. परंतु त्यादिवशी जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे की, थोडी फार सवलत सर्वांना दिली जाईल. जेवढे अर्ज आले आहेत त्या सर्वांना जास्तीत जास्त फायदा देण्याच्या दृष्टीकोनातुन अर्जांची छाननी करण्यात येईल, सुनावणी घेण्यात येईल व त्यानंतर आदेश पारीत होतील. आपण जनतेचे प्रतिनिधी आहात. आपण ही लक्षवेधी आणली हे फार चांगले झाले आहे. जेणेकरुन मी येथे निवेदन व आवाहन करु शकतो. येथे ७६ निवडुन आलेले व ५ स्विकृत असे एकुण ८१ नगरसेवक आहेत. तसेच आपल्या येथे १ लाख ५० हजार मालमत्ता आहेत. येथे यांनी सांगितले की, काही मालमत्ता आपल्या रेकॉर्डवर आहेत परंतु अस्तित्वात नाहीत तरीदेखिल त्यांना नोटिस दिली गेली आहे. परंतु ज्या मालमत्ता अस्तित्वात असतील परंतु रेकॉर्डवर नसतील व त्यांना नोटिस गेली नसेल तर त्यांनी माझे हे बोलणे आवाहन समजुन फॉर्म भरावा असे मी सांगेन. त्यांना देखील ही चांगली संधी आहे. ज्या मालमत्ता अस्तित्वात नाहीत त्या वेगळया होतील हे स्पष्ट आहे. एखादया व्यक्तीने सांगितले की, मला नोटिस मिळालेली नाही व माझे बांधकाम १.१. २००५ पुर्वीचे आहे तर त्यांना देखिल नोटिस देण्यात येईल. ज्यांची नोटिस निघाली आहे परंतु मिळाली नाही अशा लोकांना देखिल प्रभाग कार्यालयात नोटिसीची दुय्यम प्रत देण्यासाठी मी आदेश देत आहे. ही संधी सर्वांसाठी आहे. मग ते न्यायालयीन प्रकरण असो, बँरेक असो अथवा झोपडपट्टया असो. आपण सर्वांनी याचा चांगल्याप्रकारे फायदा उठवायला हवा. यासाठी मी निवेदन करीत आहे. यामध्ये काहीही संभ्रम व्हायला नको. मी मुंबई येथे दोन वर्ष काम केले आहे. तेथे १.१.९५ पुर्वीच्या बांधकामांना संरक्षण देण्यात आले आहे. त्यावेळेस ब—याच नविन झोपडया तयार होत होत्या. अधिसुचना मात्र १९९५ मध्ये न येता जुलै २००१ मध्ये आली होती. त्यामुळे दरम्यानच्या ५ वर्षात झालेली बांधकामे तोडणे आवश्यक होते. त्यानंतर मग १.१. २००१ पर्यंत सर्वांना संरक्षण दयावे असे बोलले जात होते. अशा प्रकारे हे एक दुष्टचक्र आहे. हे असेच चालु राहिल. शासन त्यावर विचार करुन योग्य निर्णय घेईन. कोणत्या तारखेपर्यंत बांधकामांना फायदा दयायचा हे अधिकार शासनाचे आहेत. त्याबद्दल आम्ही काही बोलु शकत नाही. परंतु फायदा दयायचा अथवा नाही हे शासनाने बघायचे आहे. आम्ही दिड लाख लोकांना नोटिसा दिल्या आहेत परंतु आज मी आपल्या मार्फत पुन्हा सर्व लोकांना आवाहन करतो तसेच सर्वां पर्यंत पोहचु इच्छितो. यांनी मुद्दा उचलला की, मराठीमध्ये तयार केले आहे तर मग मी सांगु इच्छितो की, आम्ही आता हिंदी व सिंधी मध्ये देखिल तयार करीत आहोत. हे आवाहन तीन्ही भाषेत असेल. कारण मराठी, हिंदी व सिंधी या तिनच भाषांचा उपयोग होतो. यासाठी या तीन्ही भाषांमध्ये आवाहन तयार करु. यानंतर सर्व लोकांकडे आमची यंत्रणा व तुमच्या मार्फत जावु. येथे सांगितले

गेले की, कार्यालयातील लोकांना पाठवुन फॉर्म भरुन घ्यावा. परंतु मी सांगु इच्छितो की, आपल्यासाठी ही एक चांगली संधी आहे. आता महापौर महोदया येथे अनुपस्थितीत आहेत परंतु त्यांनी मला सांगितले होते की, त्यांच्या पक्षातर्फे समाजमंदिरात लोकांसाठी मदतकेंद्र सुरु करण्यात येतील. परंतु सर्व नगरसेवकांनी अर्ज भरुन घेण्यासाठी आम्हांला मदत केली तर चांगले होईल. ज्या भावनेने आपण म्हणत आहात की, लोकांना फायदा मिळावा तर हा फायदा देण्यासाठी शासन, प्रशासन व नागरीक, पत्रकार या चारही लोकांचे सहकार्य आवश्यक आहे. यामध्ये कोणतीही गैरसमजुत ठेवायला नको. त्यादिवशी मी टाऊन हॉल येथे देखिल सांगितले की, प्रत्येकाचे इंटरप्रिटेशन वेगवेगळे असते. प्रत्येकाचे शिक्षण व अनुभव वेगवेगळे असते. लोकांना आम्ही देखिल मदत करु तसेच आपण देखिल मदतकेंद्र सुरु करा जेणेकरुन लोकांना अर्ज भरण्यासाठी सहाय्य मिळु शकेल. नागरीकांना अर्ज भरण्यासाठी आपण देखिल आवाहन करा. एखादया इमारतीने वास्तुविशारदाचा दाखला दिलेला नाही. तर आम्ही असे समजु की हे कच्चे बांधकाम आहे त्यामुळे त्यांनी दाखला दिलेला नाही. परंतु छाननीच्यावेळी असे लक्षात आले की, हे पक्के बांधकाम आहे तर त्यांना योग्य ती संधी दिली जाईल. वास्तुविशारदाचा दाखला देणे आवश्यक आहे. जे अर्ज ६० दिवसाच्या आत येतील त्यांना योग्य ती कागदपत्रे सादर करण्यासाठी योग्य ती संधी दयावीच लागेल. एका सुनावणीमध्ये कोणतेही प्रकरण निकालात काढणे शक्य होत नाही. कमीत कमी तीन सुनावण्या तरी ठेवाव्या लागतात. सर्वांना योग्य ती संधी मिळणार आहे. वास्तुविशारदाचा दाखला कोणाला दयायचा आहे, व कोणाला नाही हे सर्व त्यामध्ये स्पष्ट होणार आहे. यासाठी घाबरुन जाण्याची आवश्यकता नाही. झोपडपट्टी वाल्यांना फक्त तेथे राहण्यासाठी संरक्षण मिळाले आहे. त्यांचे बांधकाम नियमित झालेले नाही. जेव्हा हे बांधकाम अधिकृत होईल त्यावेळेस जमिन त्यांच्या नावावर होईल. यासाठी ज्यांना त्यांचे बांधकाम नियमित करायचे असेल त्यांनी अर्ज करणे आवश्यक आहे. तुम्ही सर्व म्हणत आहात की, आधी ८५५ इमारतींचे काम करा. यासाठी मी देखिल आपल्याशी सहमत आहे. ते न्यायालयीन प्रकरण आहे. त्यांच्यासाठी न्यायालयाने १८ महिन्यांची मुदत निर्धारीत केली आहे. ती मुदत इतरांसाठी नाही. परंतु अर्ज आल्यानंतर वर्ष दोन वर्ष तरी काम चालेल कारण छाननी करणारे जिल्हाधिकारी हे एकटेच आहे. यासाठी अजुन ४–६ अधिकारी नियुक्त करुन त्यांना अधिकार दयावे लागतील. मी अतिरिक्त जिल्हाधिकारी व उपविभागीय दंडाधिकारी म्हणुन काम पाहिलेले आहे. माझ्या अनुभवाप्रमाणे एका महिन्यात २० प्रकरणे निकालात काढायचे असतील तर ४ सुनावण्या घेवुन देखिल एका महिन्यात एवढी प्रकरणे निकाली निघत नाहीत. वकिलांचे म्हणणे होते की, अमुक–अमुक अधिकारी वेळ देत नाहीत. यामुळे नाराजी देखिल होते. तुम्ही कागदपत्रे लवकर दिलीत तर जिल्हाधिका–यांना प्रकरण लवकर निकालात काढता येतील. ८५५ इमारतींचा प्रश्न उभा राहिला नसता तर हा कायदा देखिल तयार झाला नसता. आता याचा फायदा सर्वांना मिळत आहे तर सर्वांनी याचा फायदा घ्यायला हवा. मी जिल्हाधिकारी यांना सांगितले की, जेवढे अर्ज येतील त्यातुन ८५५ इमारतींचे प्रकरणात लवकर निर्णय घेवु या. कारण त्यांना न्यायालयाने १८ महिन्याची मुदत दिली आहे. यासाठी ८५५ इमारतींचा प्रश्न तुम्ही डोक्यातुन काढुन टाका. माझ्याकडे जेवढे लोक आले त्यांना मी सांगितले, विरोधी पक्ष नेता हे जेव्हा मोर्चा घेवुन आले तेव्हा मी त्यांना सांगितले की सर्वांना हे अर्ज करावेच लागतील. मी फक्त एवढेच बोललो की, हे काम तीन विभागात वाटले जाईल. झोपडपट्टी व बॅरेक यांना यातुन वगळेलेले नाही. जर आता या योजनेचा फायदा घेतला नाही तर नंतर जी अनधिकृत बांधकामे राहतील त्यांना दंड लागेल अथवा नियमाप्रमाणे ती हटविली देखिल जातील. अथवा शासन देखिल काही निर्देश देईल. ८५५ इमारतींना या कायदयाने फायदा मिळत असेल तर त्यांनी देखिल फायदा घ्यायला हवा. जर त्यांनी काही केले नाही, कागदपत्र सादर केले नाही तर ती त्यांची जबाबदारी असेल. न्यायालयाने त्यांना १८ महिन्याची मुदत देखिल दिली आहे. मिळालेल्या संधीचा त्यांनी लाभ उचलायला हवा. आम्ही फक्त अपिल करु शकतो. कोणालाही जबरदस्ती करु शकत नाही. ज्यांना अर्ज करायचा आहे ते करु शकतील. महापालिका, आयुक्त व नगरसेवकांनी प्रयत्न करायला हवेत जेणेकरुन लोक अर्ज भरुन देतील. तरी देखिल या बाबतीत कोणाला काही संशय असेल तर कधीही मी स्वत:, उपायुक्त, इतर अधिकारी तसेच प्रभाग समिती कार्यालयातील अधिकारी यांच्याशी संपर्क साधुन तुम्ही तुमची शंका दुर करु शकता. केबल टिव्हीद्वारे देखिल मा. जिल्हाधिकारी, मा. महापौर व मी स्वत: लोकांना आवाहन करणार आहोत. तसेच वर्तमानपत्रात देखिल अपिल करणार आहोत. जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्याचा आमचा प्रयत्न राहिल. आता अजुन एक मुद्दा असा आहे की, एखादया इमारतीत ४० सदनिका असल्या व त्यापैकी फक्त २० सदनिकाधारकांनी अर्ज केला तर इतरांचे काय करणार? तर मी सांगु इच्छितो की, जे लोक अर्ज करतील त्यांचे बांधकाम नियमित होईल व इतरांचे अनधिकृतच राहिल. त्यावर पुढे काय कारवाई होईल ते आताच सभागृहात सांगु शकत नाही. त्यावर शासन जो निर्णय घेईल तो अथवा कायदयातील तरतुदीनुसार कारवाई होवु शकते. सोसायटी असेल तर आम्ही सोसायटीला अपिल करु. त्यांचा प्लान मंजुर नसला तरी त्यांनी काहीतरी बनविले असेल. एखादया अभियंत्याचा अथवा वास्तुविशारदाचा सल्ला घेतला असेल. त्यांच्याकडे कच्ची कागदपत्रे तरी असतील. समजा ४० X ५० चे बांधकाम मंजुर असेल व त्यांनी तळमजला + तीन मजल्याचे बांधकाम केले असेल तर नियमाप्रमाणे त्यांना एफएसआयचा फायदा किती देता येवु शकेल ते पाहुन त्यांचे बांधकाम नियमित केले जाईल. यासाठी त्या इमारतीतील रहिवाश्यांना अर्ज

भरण्यासाठी संबंधीत इमारतीचा सचिव, नगरसेवक अथवा स्वंयसेवी संस्थांनी मदत केली पाहिजे. त्यानंतर वास्तुविशारदाच्या फीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी यांच्याकडे झालेल्या बैठकीच्या वेळी महापौर, विरोधी पक्ष नेता, वास्तुविशारद हे सर्व उपस्थित होते. वास्तुविशारदांनी देखिल कमीत कमी फी घ्यायला हवी. आता त्यांची संख्या कमी आहे. ज्यांचा परवाना रद्द होवुन ५ वर्ष झाले होते अशा १५ वास्तुविशारदांना मी पुन्हा परवाना देणार आहे. जे नविन अर्ज येत आहेत त्यावरही मी दोन दिवसात अंतिम निर्णय घेणार आहे. उदया त्यांना मुलाखतीसाठी बोलावुन त्यांची कागदपत्रे पाहणार आहे. एखादयाने अर्ज केला व त्याच्या जागी दुसरा आला असे होवु नये यासाठी हे करणाार आहे. अंबरनाथ व कल्याण येथिल वास्तुविशारद व अभियंता हे काम करीत असतील तर त्यांना देखिल आम्ही हे काम करु देवु. अशाप्रकारे ५०–१०० अभियंते झाले तर त्यांच्यामध्ये स्पर्धा होवुन दर देखिल कमी होईल. १०–१२ लोक असले तर त्यांची एकाधिकारशाही होवुन ते ४ रुपयाच्या जागी १० रुपये देखिल मागु शकतील. त्यांना असे वाटते की, तुमची दोन–तीन लाखाची मालमत्ता अधिकृत होणार आहे त्यासाठी दोन–चार हजार खर्च केले तर काय होईल. परंतु यावर आम्ही नियंत्रण आणणार आहोत. आम्ही लोकांना व्यवस्थित मार्गदर्शन करु. जे सहा अधिकारी या कामासाठी नियुक्त केले आहेत ते देखिल लोकांना सहकार्य करतील. परंतु ते त्यांचे काम सोडुन हे काम करणार नाही. यासाठी आम्ही महापालिकेच्या कर्मचा–यांना प्रशिक्षण देवु. १५ वास्तुविशारदांना दिड लाख मालमत्तांचे काम करणे शक्य होणार नाही. यासाठी ते १०–१५ मुलांना त्यांच्या हाताखाली नियुक्त करुन त्यांना २ टक्के फि देतील व काम करुन घेतील. एका माणसाला हे काम करणे शक्य नाही. सही करणारे ५० लोक असतील परंतु त्यांच्या हाताखाली १०० ते ४०० लोक काम करु शकतील. त्यांनी त्यांच्या माणसांची संख्या वाढवुन जास्त काम करावे यासाठी देखिल आम्ही त्यांना अपिल केले आहे. त्यांनी किती फी घ्यावी हे नियमाप्रमाणे मी त्यांना सांगु शकत नाही. मा. महापौर महोदया यांनी स्वत: त्यांना अपिल केले आहे तसेच १–२ दिवसात जिल्हाधिका–यांकडे बैठक होणार आहे त्यावेळी देखिल मी त्यांना वाजवी फी घेण्यासाठी अपिल करणार आहे. आधीच लोक घाबरुन गेलेले आहेत. त्यामुळे त्यांना सवलत देण्यासाठी शासन, प्रशासन, वास्तुविशारद हे सर्व प्रयत्न करणार आहेत. श्री. भुल्लर व इतर सदस्यांनी सांगितले की, मालमत्ता विभागात सर्वांच्या मालमत्तांचा अभिलेख आहे. परंतु तो अभिलेख आता जुना झाला आहे. एखादयाने १० X ३० चे बांधकाम केले असेल व ३० वर्षात काही बदल केला असेल तर महापालिकेकडे ती माहिती उपलब्ध नसेल. यासाठी सर्वांना नोटिस दिली आहे. जर सर्वांनी ही बाब निदर्शनास आणली तर बांधकाम नियमित होवु शकेल. महापालिकेकडे असणा–या रेकॉर्ड मध्ये काही कमतरता आहे हे मी मानतो. परंतु जुना रेकॉर्ड देखिल आम्ही तपासुन पाहणार आहोत. ज्यावेळी अर्ज सादर केले जातील त्यावेळी मालमत्ता कराचे देयक, शिधा पत्रिका, मतदार यादीतील क्रमांकाची प्रत असे कागदपत्र सादर करावेत. कागदपत्र दयायचे असतील तर बरेच देवु शकतो. परंतु एखादयाने झोपेचे सोंग घेतले असेल तर अशा माणसाला झोपेतुन उठविणे कठिण असते. जे झोपलेले आहेत ते अपिल केल्यानंतर अर्ज करण्यासाठी येत आहेत. परंतु ज्यांनी झोपेचे सोंग घेतले आहे त्यांना उठविणे मुश्किल आहे. यासाठी मला आपल्या मदतीची आवश्यकता आहे. तसेच कोणतेही बांधकाम हे ४ एफएसआयच्या मर्यादेतच नियमित करता येईल हे मा. जिल्हाधिका–यांनी स्पष्ट केले आहे. त्यापेक्षा जास्त नियमित करता येवु शकणार नाही. श्री. सोनेसर यांचे नेहमी म्हणणे असते की, एक एफएसआय तर आम्हांला मिळणारच होता त्यामुळे तो माफ करण्यात यावा. जर बांधकाम परवानगी घेवुन बनविले असेल तर त्याठिकाणी एक एफएसआयचा प्रश्न येणार नाही फक्त वाढीव बांधकामालाच दंड बसेल. परंतु जर बांधकाम शासकिय जागेत अनाधिकृत रित्या बनविले असेल तर अशा ठिकाणी एक एफएसआय देखिल गणला जाईल व तसा दंड भरावा लागेल. दंड किती भरायचा याचा तक्ता अधिनियमात दिलेला आहे. तुम्ही जर म्हणालात की, प्रत्येक विभागासाठी किती दंड बसेल याचे रेडी रेकनर बनवा तर तसे शक्य होणार नाही. कारण प्रत्येक अर्ज वेगळा असेल. प्रत्येकाला वेगवेगळया दराने दंड आकारला जाईल. वाणिज्य बांधकामासाठी वेगळा दर असेल तसेच कच्च्या व पक्क्या बांधकामासाठी वेगळा दर असेल. हे सर्व आपण लक्षात घ्यायला हवे. आज ४ वाजता जिल्हाधिकारी साहेबांकडे सुनावणी आहे त्यामध्ये जे नविन मुद्दे उपस्थित होतील त्याची माहिती मी आपणांस देईल. मला असे वाटते की, आपल्या मनातील संभ्रम दुर झाला तर लोकांच्या मनातील संभ्रम दुर करण्यामध्ये देखिल आपण यशस्वी होवु. श्री. जाधव यांनी अपिलाच्या पत्रकाबाबत विचारले. त्याबद्दल मी सांगु इच्छितो की, ज्या दिवशी जिल्हाधिकारी येणार होते त्या दिवशी लोकांमध्ये एक संदेश जावा म्हणुन माझ्या व महापौरांच्या सहीने पत्रक काढले होते. त्यामध्ये ज्या कच्च्या बांधकामांच्या ठिकाणी व ज्या बॅरेकच्या ठिकाणी जास्त बांधकाम केले नसेल, जे पुर्वीप्रमाणेच असेल त्यांना वास्तुविशारदाच्या स्वाक्षरीची गरज नाही असा निर्णय जिल्हाधिका–यांनी घेतला होता व आम्ही तो लोकांना कळावा म्हणुन पत्रक काढले होते. धन्यवाद।

<u>मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :–</u>मा. आयुक्तांनी एवढया चांगल्या प्रकारे स्पष्टीकरण दिले असल्याने आपल्या मनातील संशय आता दुर झाला असेल.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—** आयुक्त साहेबांनी चांगले भाषण केले आहे परंतु माझा एक छोटा उपप्रश्न आहे. जिल्हाधिका—यांनी दिड लाख मालमत्तांना नोटिस दिली आहे त्यामध्ये महापालिकेची मालमत्ता आहे काय? जर दिली असेल तर कधी दिली आहे व नोटिस दिल्यानंतर ६० दिवस पुर्ण झाले आहेत काय? याचे उत्तर दयावे.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—**मा. महापौरजी, माझी एक छोटी शंका आहे त्याबद्दल मी आयुक्तांना विचारु इच्छितो की, झोपडपट्टया या शासनाच्या जागेवर बसल्या आहेत हे सर्वांनाच माहिती आहे. परंतु आपल्या शहरात निवासी जागेत असलेले आरक्षण हटविण्याचा प्रयत्न सुरु आहे. ते तेथुन हटविल्यावर कोठे टाकण्यात येणार आहे? याबद्दल माहिती दयावी.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—**मा. महापौर व आयुक्त साहेब, गेल्या वर्षी जो पुर आला होता त्यामध्ये माझ्या प्रभागातील ५० ते ६० टक्के घरे पाण्याखाली होती. त्यांचा पुर्ण संसार उध्दवस्त होवुन वाहुन गेला होता. त्यात ब—याच लोकांची कागदपत्रे देखिल वाहुन गेली होती. अशा लोकांसाठी आपण काय करणार आहात? याची माहिती दिली तर बरे होईल. धन्यवाद।

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**मा.पीठासीन अधिकारी, या विषयावर बरीच चर्चा झाली आहे. मी वैयक्तीकरित्या यावर जिल्हाधिकारी व इतर ठिकाणी बोललो असल्याने मला सर्व माहिती आहे. परंतु जेथे चर्चा व्हायला हवी होती तेथे चर्चा झाली नाही यासाठी महापौर महोदय आपण जबाबदार आहात. एप्रिल पासुन या विषयावर चर्चा सुरु आहे परंतु या महासभेत एकदाही यावर चर्चा झाली नाही. आपण नेहमी म्हणतो की, विषय उपलब्ध नाही. प्रत्येक वेळेस प्रतिनियुक्तीचेच विषय येतात. परंतु आज लक्षवेधीच्या माध्यमातुन हा विषय येथे आमचे सदस्य श्री. भुल्लर व श्री. चौधरी यांनी उपस्थित केला. यावर आयुक्तांनी जे स्पष्टीकरण दिले आहे ते प्रशंसनिय आहे. यापुर्वीच्या प्रशासकीय अधिका—यांना आम्ही वारंवार याबद्दल विचारणा केली परंतु ते काही सांगु शकले नव्हते. कारण त्यांना हा विषयच कळला नव्हता. कोणालाही काही माहिती नव्हते. परंतु आम्ही मोर्चा नेल्यानंतर आयुक्तांनी त्वरीत जिल्हाधिका—यांसमोर बैठक ठेवली. त्याचे इतिवृत्त आम्हांला दिले. उल्हासनगरच्या लोकांची भावना जिल्हाधिका—यांपर्यंत पोहचविल्या. त्यानंतर आता निकाल दिसु लागला आहे. जी पावले उचलली आहेत ती योग्य आहेत. काही गोष्टी ते स्पष्टपणे येथे सांगु शकत नाही. परंतु पुर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दोन्ही प्राधिका—यांनी दिले आहे. याबद्दल आम्ही त्यांना धन्यवाद देतो. अधिसुचना निघाल्यानंतर ९० दिवसाच्या आत नोटिस देणे आवश्यक असते. त्यानंतर ६० दिवसात त्याला उत्तर देणे आवश्यक असते. परंतु अर्ज निकालात कधी काढणार यासाठी काही कालमर्यादा निश्चत केली आहे काय? याचे उत्तर मिळाले नाही. दुसरे म्हणजे तुम्ही अस्तित्वात नसलेल्या मालमत्तांबद्दल बोललात परंतु उल्हासनगरमध्ये ब—याच ठिकाणी एका माणसाने दुस—याला मालमत्ता विकली आहे परंतु त्याचा रेकॉर्डमध्ये कुठेही उल्लेख केलेला नाही. अशावेळी काय करणार? तसेच झोपडपट्टीच्या ठिकाणी दंड आकारणी करण्यासाठी कमीत कमी दंड आकारणी कशी होईल यासाठी आपण शासनाला कश्याप्रकारे प्रस्ताव पाठविणार आहोत. या आधी येथे अशा चुका झाल्या आहेत. अधिसुचना काढण्यापुर्वी शासनाला योग्य प्रकारे येथुन माहिती न दिली गेल्याने अशा प्रकारे अधिसुचना निघाली आहे. जर त्यावेळी विस्तृत चर्चा झाली असती व त्यामध्ये बॅरेक व झोपडपट्टी याचा उल्लेख केला गेला असता तर अधिसुचना योग्य झाली असती. परंतु आता निघालेल्या अधिसुचनेमध्ये इमारतींचाच विचार करण्यात आला आहे. झोपडपट्टी व बॅरेकचा विचार केला गेला नाही. यासाठी आपण त्वरीत शासनास प्रस्ताव पाठवावा. तसेच प्रस्ताव पाठविण्यापुर्वी सर्वांना विश्वासात घेवुन व विचार करुन प्रस्ताव पाठवावा. धन्यवाद ।

**मा. सदस्य श्री. सुरेश जाधव :—** आयुक्त साहेब, बॅरेक व सिमेंट पत्र्याच्या पक्क्या बांधकामांना वास्तुविशारदाच्या दाखल्याची आवश्यकता आहे की नाही हे आपण स्पष्ट केले नाही.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** साहेब आम्हांला झोपडपट्टीची व्याख्या सांगा.

**मा. आयुक्त:—**पहिला प्रश्न असा विचारला की, महापालिकेच्या मालमत्तेला नोटिस दिली आहे की नाही? नोटिस दिली आहे तारीख मी बघुन सांगतो. उत्तर काय दिले ते आम्ही तुम्हांला नंतर कळवतो. महापालिकेच्या रेकॉर्डवर जेवढया मालमत्ता आहेत त्यांना सर्वांना नोटिसा दिल्या आहेत. शासनाच्या ज्या मालमत्ता आहेत, त्यात मग उपविभागीय कार्यालय, तहसिलदार कार्यालय यांना देखिल नोटिसा गेल्या आहेत. त्यांनी देखिल अर्ज करायला हवा. महापालिका व शासकिय कार्यालयांनीही अर्ज करणे आवश्यक आहे. हा एक भाग आहे. झोपडपट्टीची व्याख्या मी तुम्हांला झोपडपट्टी पुनर्वसन कायदा वाचुन सांगेन. माझ्या मनाचे सांगणार नाही. शासनाने जी व्याख्या ठरवुन दिली आहे ती पुढच्या वेळी तुम्ही माझ्याकडे आल्यानंतर तुम्हांला सांगेन. श्री.

जाधव यांनी कच्च्या व पक्क्या बांधकामांबद्दल विचारले झोपडपट्टीमध्ये बॅरेकचा समोवश होणार नाही. मी ब—याच बॅरेक पाहिल्या आहेत तेथे बॅरेक तोडुन तीन माळयाच्या इमारती बांधल्या आहेत. त्यांना वास्तुविशारदाचा दाखला दयावाच लागेल. परंतु ब—याच ठिकाणी त्यांनी जमिनीवरच काही वाढीव बांधकाम केले असेल ते बांधकाम झोपडपट्टीच्याच व्याख्येखाली मोडणार आहे. त्यांना वास्तुविशारदाचा दाखला दयायची आवश्यकता नाही. मला असे वाटते की, सर्वांच्या शंकांचे निरसन एकाच बैठकीत होणार नाही. ही प्रक्रिया सुरुच राहिल. सुनावणीच्या वेळी देखिल काही नविन मुद्दे उपस्थित होवु शकतील. त्यांचाही विचार करावा लागेल. झोपडपट्टयांसाठी दंडाची रक्कम निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी आम्हांला काही सुचना दिल्या आहेत. त्याचा प्रस्ताव आम्ही नगररचनाकार व उप—आयुक्त यांना विचारुन तयार करु. यासाठी १५ दिवसाचा अवधी लागेल. कारण त्यावर विचार करणे गरजेचे आहे. तो प्रस्ताव पाठविण्यापुर्वी तुमच्यासमोर सादर करु. त्याला एक महिना लागला तरी काही हरकत नाही. कारण लगेच आदेश पारित होणार नाहीत. त्यानंतर सर्वांनी विचारले की अर्ज दिल्यानंतर किती दिवसात प्रकरण निकालात निघेल? अर्ज दिल्यानंतर एक महिना मुदत असली तरी पदनिर्देशित अधिकारी योग्य तो निर्णय घेईल. दिड लाख अर्ज माझ्या टेबलावर आले तरी एका महिन्यात यावर निर्णय घेणे शक्य होणार नाही. अर्ज निकाली काढण्याचे अधिकार प्राधिकरणाला आहेत. त्याला कुठलीही बाधा येणार नाही. परंतु अर्ज वेळेत येणे आवश्यक आहे. अर्ज निकाली काढण्यासाठी शासन नंतर मुदतवाढ देणार आहे कारण त्यांना हे माहिती आहे की, एका महिन्यात दिड लाख अर्ज निकालात निघणार नाहीत. सुनावणी एका महिन्यात पुर्ण होत नाही, त्यासाठी तीन ते चार महिने लागु शकतील. न्यायालयाने १८ महिन्यांचा कालावधी दिला आहे. कोणताही कायदा दोन—तीन महिन्यात संपत नाही. तो अनंत काळ कायदयात सुधारणा करुन सुरु राहतो. कायदा एकदा केल्यावर तो लोकांना सरंक्षण देण्यासाठी केला आहे. त्यांना फायदा मिळावा हा त्याचा हेतु आहे. लोकांना मदत मिळावी हे त्यामागील कारण आहे. एक महिन्यात अर्ज आला आणि निकाली काढला असे होणार नाही. आपण एक महिना दिला की आपला हक्क साबित होणार आहे. त्यामुळे आपण बिनधास्त राहिले पाहिजे. त्यांना निर्णय कधीही घेवु दया. तो १८ महिन्यात, १ महिन्यात अथवा २ महिन्यात देतील. अर्ज देणे ही आपली मुख्य जबाबदारी राहिल. लोकांकडुन अर्ज घ्यावेत एवढेच माझे आवाहन राहिल. कलम ८ प्रमाणे आपणांस जिल्हाधिका—याचा निर्णय मान्य नसेल तर आपण नगरविकास सचिवांकडे अपिल देखिल करु शकतो. हे एका महिन्यात होणे शक्य नाही. कारण अपिलासाठी देखिल कालावधी निश्चित केला आहे. त्यांनी निर्णय दिल्यानंतर एक महिन्याच्या आत अपिलात जायचे आहे. त्यामुळे तो कालावधी आपण विचारात घेवु नये. आपण ६० दिवसात अर्ज करायला पाहिजे ही जिल्हाधिका—यांची अपेक्षा पुर्ण करावी एवढेच निवेदन मी येथे पुर्ण करतो. पुरग्रस्तांबाबत मी सांगु इच्छितो की, घोषित झोपडपट्टयांचा रेकॉर्ड आपल्याकडे आहे, त्यांची यादी आहे, त्यावरुन सुध्दा त्यांना दाखला घेता येईल. शिधा पत्रिकेत त्यांचे नाव असेल तर तेथुनही ते दाखला घेवु शकतात. निवडणुक यादीत नाव असेल तर तहसिलदार सुध्दा दाखला देवु शकतात.

<u>मा. सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>पुरग्रस्ताच्या दाखल्याबाबत मी सांगु इच्छितो की, महापालिकेतुन पुरग्रस्ताचा दाखला देण्यापुर्वी तहसिलदारांकडुन मिळालेला दाखला आणायला सांगतात त्याशिवाय अर्जच स्विकृत करत नाहीत. तहसिलदाराचे म्हणणे असे आहे की, सर्व पुरग्रस्त लोकांची यादी महापालिकेत दिली आहे. त्यामुळे दाखला कसा काय देणार? याबद्दल आयुक्तांनी खुलासा करावा.

<u>मा. आयुक्तः—</u>तहसिलदार अथवा उपविभागीय अधिकारी यांनी दिलेली यादी बघुन आम्ही दाखला देवु. त्यामध्ये काही अडचण येणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>आयुक्त साहेब, सीएफसीमध्ये तुमचे अधिकारी अर्ज घेत नाहीत.

<u>मा. आयुक्तः—</u>मी त्यांना सुचना देतो. हा मुद्दा आजच माझ्यासमोर आला आहे. मुद्दाम कोणी जाणीवपुर्वक चुका करीत नाही. त्यांचे ज्ञान कमी असते, त्यांचा अनुभव कमी असतो. यात आपल्याला वेळोवेळी सुधारणा करावी लागते. मी एकदा बोललो म्हणजे ते अंतिम होत नाही. त्यात सुधारणा होवु शकते.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—</u>मा. महापौर, आयुक्त व सन्माननिय सदस्य, आयुक्त साहेब या विषयावर न थांबता ३५ मिनीटे अखंड बोलले आहेत. मी वेळ लावुन ऐकत होतो. माझा असा भ्रम होता की, यापुर्वीचे आयुक्त श्री. सोनवणे साहेब यांनाच फक्त बोलता येते. परंतु श्री. कांबळे साहेब यांनी माझा भ्रम तोडला आहे. आयुक्तांचे अभिनंदन यासाठी करावेसे वाटते की, या ठिकाणी ३५ लोक उपस्थित असले तरी त्यांनी चांगली माहिती दिली आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— यासाठी ते आता पाणी पित आहेत. ते न थांबता बोलले आहेत म्हणुन आता पाणी पित आहेत.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—३५ सदस्य उपस्थित असुनही ते अखंड बोलले आहेत. त्यांनी हे मान्य केले आहे की, ३५ लोकांच्या मागे २ लाख लोक आहेत. ते आज जे बोलले आहेत ते फक्त ३५ लोकांसाठी बोलले नसुन २ लाख लोकांसाठी बोलले आहेत. माझे असे म्हणणे आहे की, आपण फॉर्मवर वास्तुविशारदाची स्वाक्षरी घेणार आहोत व त्यानंतर पुन्हा जागेवर तपासणी करणार आहोत. यापेक्षा आपणच एखादी एजन्सी नेमुन महापालिकेतर्फे मोबदला दिला तर ते काम अधिक सोपे होईल. ही माझी सुचना आहे. तसेच झोपडपट्टीसाठी फक्त ब नमुन्यातील अर्ज करायचा आहे काय याचा खुलासा आपण केला नाही. तसेच कोणते कागदपत्र दयायचे आहेत?

मा. आयुक्त :—फक्त ब नमुन्यातील अर्ज भरायचा आहे. जर बॅरेक असेल तर सनद दयायची आहे. जर आरक्षित भुखंडावर बांधकाम केले असेल तर किती क्षेत्रफळाचे बांधकाम केले आहे याचा उल्लेख करायचा आहे. परंतु तुम्ही तेथे राहता याचा पुरावा दयावा लागेल. यासाठी शिधापत्रिका अथवा निवडणुकीचा दाखला हे देणे गरजेचे आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—माझा अजुन एक मुद्दा आहे. तुम्ही प्रभाग समिती कार्यालयात योग्य त्या सुचना दया. कारण ते असे म्हणतात की, आम्हांला आयुक्तांनी काहीही मार्गदर्शक सुचना दिलेल्या नाहीत.

मा. आयुक्त :—आम्ही त्यांना आवश्यक त्या सुचना देवु. हे काम जरी जिल्हाधिका—यांकडे असले तरी महापालिकेने आपली सर्व यंत्रणा कामाला लावुन हे काम करुन घ्यायला हवे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—झोपडपट्टीमधील आरसीसी बांधकामांना दाखल्याची आवश्यकता आहे काय? ज्यांच्याकडे सनद नाही व दोन माळयांचे बांधकाम केले असेल अशांना दाखल्याची आवश्यकता आहे काय?

मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :—दुस—या लक्षवेधीला प्रारंभ करण्यात यावा.

मा. सचिव:—लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. बच्चाराम रुपचंदानी व अनुमोदक आहेत श्री. रामदास उमाप.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रामदास उमाप

**विषय** :— उल्हासनगर येथिल शासकिय/ महापालिकेच्या रुग्णालयात श्वान दंशावरील लसीचा तुटवडा असल्याबाबत.

उपरोक्त विषयानुसार लक्षवेधीने आपले विनंती पुर्वक लक्षवेधू इच्छितो की, उल्हासनगर शहरातील नागरीकांना श्वान दंश झाल्यास शहरातील मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर—३ अथवा महापालिका रुग्णालयात जखमी व्यक्तींना देण्यासाठी रेबीजचे इंन्जेक्शनची सोय उपलब्ध केलेली असते परंतू आश्चर्याची बाब अशी की, उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालय तसेच महापालिका रुग्णालयात रेबीजचे एकही इन्जेक्शन उपलब्ध नाही. अधिक चौकशी अंती असे कळले की, मा. आयुक्त यांचेकडे सदर औषधाचे टेंडरची फाईल असून अदयापपर्यंत त्यास मंजूरी मिळालेली नाही. जर एखादया नागरीकास श्वान दंश झाल्यास व त्याची खाजगी रुग्णालयात जावुन औषधोपचार करण्याची ऐपत नसल्यास अश्या नागरीकांचे काय करावे हा यक्षप्रश्न आहे. तरी कृपया सदरचे लक्षवेधीवर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळावी ही नम्र विनंती.

---

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मा. महापौर व आयुक्त साहेब, ही एक महत्वाची लक्षवेधी सुचना आहे. गेल्या तीन महिन्यांपासुन मध्यवर्ती रुग्णालयात व महापालिकेत श्वान दंशावरील लसीचा तुटवडा आहे. आयुक्तांना विनंती आहे की, ती उपलब्ध करुन दयावी. तसेच गेल्या तीन महिन्यांपासुन लस उपलब्ध का झाली नाही याचा खुलासा येथे करावा.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी (डॉ. के.आर. खरात):—मा. महापौर महोदय, मा. आयुक्त व सन्माननिय सदस्य, कुत्रा चावल्यानंतर रेबीजची जी लस दिली जाते तीचा तुटवडा असल्याने ही लक्षवेधी येथे आणली आहे. मी सभागृहाला सांगु इच्छितो की, आता यावेळेस मध्यवर्ती रुग्णालयात २०० लसी उपलब्ध आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—याचा अर्थ लक्षवेधी चुकीची आहे असे तुम्ही सांगत आहात काय? काल त्या रुग्णालयात लस उपलब्ध होती काय? तुम्ही लक्षवेधीनंतर लसीचा बंदोबस्त केला आहे. तुम्ही लक्षवेधी चुकीची ठरवता. आज सकाळी तरी लस उपलब्ध होती काय? तुम्ही उत्तरे योग्य प्रकारे दया.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— उत्तर योग्य प्रकारे दयायला हवे.

मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :— श्री. रुपचंदानी यांच्याशी मी देखिल सहमत आहे. हा मुद्दा गेल्या तीन चार महिन्यांपासुन प्रलंबित होता. अशा महत्वाच्या मुद्दयावर देखिल शेरे मारुन प्रकरण इकडे तिकडे पाठविले जात होते. हे अयोग्य आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—लस कधी आला ते सांगा. काल रुग्णालयात लस होती काय? कधी मागविली?

वैद्यकीय आरोग्य अधिकारी :—मी येथे सांगु इच्छितो की, कोणताही कुत्रा चावल्याने माणसास रेबीजची बाधा होत नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—आता कुत्रे जास्त प्रमाणावर चावत आहेत. आपलाच कुत्रा चावत आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—श्री. खरात यांनी सांगितले की, कोणताही कुत्रा चावल्याने रेबीजची बाधा होत नाही. परंतु आम्ही जेव्हा दवाखान्यात जातो तेव्हा पोस्टर बघतो त्यावर लिहिलेले असते की, मांजरीने चाटल्यानंतरही इंजेक्शन घ्यावे. चावायची गोष्ट तर दुरच आहे.

मा. सदस्य श्री.प्रशांत जाधव :— कोणता कुत्रा चावल्यानंतर इंजेक्शन घेणे आवश्यक असते?

मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :— त्यांना बोलु दया. सर्वांना पगडीला जायचे आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी :—मी आपणांस वैद्यकीयदृष्टया सांगत होतो की, प्रत्येक कुत्रा अथवा मांजर चावल्याने रेबीजची बाधा होत नाही. सध्या लसीचा तुटवडा आहे, सर्व महाराष्ट्रात पुरवठा कमी होत आहे. त्यामुळे रुग्णालयात जेव्हा एखादा रुग्ण कुत्रा चावल्याची तक्रार घेवुन येतो त्यावेळी डॉक्टर त्या रुग्णाची माहिती घेतात. पागल कुत्रा चावला आहे काय, शरीराच्या कोणत्या भागाला चावला आहे, त्याला रेबिज होण्याची संभावना किती आहे या सर्व गोष्टींचे अनुमान लावल्यानंतरच प्राधान्य लक्षात घेवुन इंजेक्शन देतात. या ज्या २०० लसी आहेत या जे गंभीर रुग्ण असतील, ज्यांना रेबीज होण्याची शक्यता असेल अशा रुग्णांसाठी राखुन ठेवल्या आहेत. यानंतरही १३/६/२००६ ला १८०० लसी पुरविण्याचा आदेश जय फार्मा या कंपनीला दिला आहे. तसेच येत्या काही दिवसांमध्ये महापालिकाही १६०० लसी पुरविण्यासाठी एका कंपनीला आदेश दिले आहेत.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—मा. महापौर व आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात एका मुलाला कुत्रा चावल्यानंतर ही लक्षवेधी सुचना येथे आली आहे. यामुळे मी किती हैराण झालो होतो याची माहिती श्री. रुपचंदानी यांनी दिली आहे. मी महापालिकेत व मध्यवर्ती रुग्णालयात चौकशी केली होती. येथे भ्रष्टाचाराचा मुद्दा देखिल येतो. श्वान दंशावरील लस कुठे जाते हे आम्हांला देखिल माहिती आहे. खाजगी रुग्णालयात पैसे दिल्यानंतर पाच मिनिटात इंजेक्शन दिले जाते. ते कोणत्या कंपनीचे इंजेक्शन आणतात? शासन मध्यवर्ती रुग्णालयात जे इंजेक्शन पाठविते ते कुठे जाते याची माहिती देखिल आमच्याकडे आहे. तातडीच्या परिस्थितीत लोकांना उपचार मिळावेत यासाठी आपण काही इंजेक्शन राखुन ठेवायला हवेत. तुम्ही येथे उपचाराबद्दल

माहिती देत आहात परंतु आम्ही येथे ती माहिती घ्यायला आलेलो नाही. काल एका लहान मुलाला कुत्रा चावल्यानंतर एक नगरसेवक हैराण होवुन फिरत होता, तुमच्या डॉक्टराकडे येवुन विचारणा केली की एक इंजेक्शन असले तरी चालेल परंतु मिळाले नाही. जर बोलायला गेलो तर या विषयावर बरेच काही बोलता येवु शकेल. मी अधिका—यांचे नांव घेत नाही परंतु त्यांनी आयुक्तांचे नांव खराब करण्याचा प्रयत्न केला आहे. आयुक्तांच्या टेबलावर या प्रकरणाची फाईल पडली आहे परंतु ते यामध्ये काहीतरी शेरे मारीत आहेत असे सांगितले जाते. परंतु अशा प्रकरणावर आयुक्त शेरे मारतील यावर माझा विश्वास नाही. प्रशासन काही चुक करु शकेल परंतु आयुक्त असे करणार नाहीत असा मला विश्वास आहे. तरी कृपा करुन इंजेक्शनचा त्वरीत बंदोबस्त करा. आजही इंजेक्शन उपलब्ध नाहीत.

<u>मा. आयुक्त</u> :—माझ्याकडे कोणतीही फाईल आल्यानंतर मी त्यावर डोळे झाकुन स्वाक्षरी करत नाही. आपल्याकडे किती साठा उपलब्ध आहे हे बघावे लागते. जर १६०० ची मागणी असेल व आपल्याकडे ८००—९०० इंजेक्शन शिल्लक असतील तर जास्त खरेदी करुन काही फायदा होणार नाही. महापालिकेच्या पैश्याचे आयुक्त हे रखवालदार असतात त्यामुळे पैसा योग्य ठिकाणी खर्च करणे ही माझी जबाबदारी आहे. यामुळे आधीचा साठा किती आहे, आधी किती खरेदी केली होती तसेच वापर किती झाला होता याबद्दल मी विचारणा केली होती. आता आम्ही १६०० लसी खरेदी करायला मान्यता दिली आहे तसेच शासनाने १८०० लसी मागवल्या आहेत. एवढया मोठया प्रमाणावर लसी आल्यानंतर त्या अनधिकृतपणे बाजारात विकल्या जाण्याची शक्यता आहे. याला आळा बसावा म्हणुन जेवढी आवश्यकता आहे तेवढीच खरेदी करायला हवी असे माझे म्हणणे आहे. यासाठीच लेखा परिक्षण व तपासणी होत असते. आमचे अधिकारी सांगतात की, आयुक्तांकडे फाईल पाठविली आहे. हे सर्व कार्यालयात सुरु असते. यामुळे मी श्री. रुपचंदानी यांना सांगितले होते की, तुम्हीच तुमची फाईल शोधा, फाईल असेल तर मी आताच सही करतो. माझी काम करण्याची पध्दत माझ्या अधिका—यांना समजण्यास थोडा वेळ लागेल. परंतु मी एवढेच सांगु इच्छितो की, माझ्याकडे आल्यानंतर दोन दिवसात मी फाईलवर सही करतो. मी एक महिन्यासाठी सर्व फाईली ठेवुन दिल्या होत्या कारण मला त्या वाचायच्या होत्या, काम समजुन घ्यायचे होते. वर्तमानपत्रात देखिल बातमी आली होती की, नविन आयुक्त आल्यानंतर विकास कामे होत नाहीत. असे होणारच, सुरुवातीला असे होणे आवश्यक आहे. कारण जे काम सुरु आहे ते योग्य प्रकारे सुरु आहे की नाही हे पाहणे देखिल माझी जबाबदारी आहे. तसेच मी येथे विश्वासाने सांगु इच्छितो की, माझ्याकडे पंधरा फाईली आता पडल्या आहेत. त्यामध्ये खरेदीची अथवा प्राकलनाची कोणतीही फाईल नाही. कोणतेही प्राकलन माझ्याकडे आल्यानंतर एका दिवसात सही होवुन जाते. आपणांस मी हे देखिल आश्वासन देतो की, ज्यांनी त्यांच्या निधीसाठी आवश्यक कागदपत्रे दिली नाहीत ती त्वरीत दयावी. नंतर असे म्हणायला नको की त्यांचे काम आधी झाले आहे. ज्यांची कागदपत्रे आधी येतील त्यांचे काम आधी मंजुर होईल. महापौर व उपमहापौरांना देखिल त्यांचे काम प्रस्तावित करण्यासाठी सांगीतले आहे. त्यानंतर सर्वसाधारण निधीतुन करायच्या कामांची पाहणी करु.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल</u> :—मा. महापौर व आयुक्त साहेब, आता डॉक्टरांनी सांगितले की, कोणताही कुत्रा चावल्यानंतर रेबीज होत नाही. हे चांगले आहे कोणताही कुत्रा चावल्यानंतर रेबीज होत नाही हे चांगले आहे. परंतु कोणताही कुत्रा चावल्यानंतर १५, २० वर्षांनी रेबीज होणार नाही याचा दाखला आपण दयाल का? हा माझा डॉक्टरांना प्रश्न आहे. तुम्ही असे म्हणत असाल तर तुम्हांला तसा दाखला रुग्णाला दयावा लागेल. जर कोणाला रेबीज झाला तर ती पुर्ण जबाबदारी महापालिका व शासनावर असेल. आपण याचे उत्तर दया.

<u>मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी</u> :—आयुक्तांनी आता यावर खुलासा केला आहे. आयुक्तांनी सांगितले की, त्यांच्याकडे दररोज अडीचशे फाईली आल्या तरी त्यांचा निपटारा करण्यासाठी ते सक्षम आहेत. परंतु त्यांनी त्यांच्या अधिका—यांना फाईल लवकर पाठविण्यासाठी सांगावे.

<u>मा. आयुक्त</u> :— डॉक्टरांनी जे सांगितले की, कोणताही कुत्रा चावल्याने रेबीज होत नाही हा त्यांचा स्वानुभव आहे. त्यावर सन्माननिय सदस्यांनी विचारले की, ते तसा दाखला देतील काय? परंतु भविष्यात २५ वर्षात रेबीज होणार नाही असे सांगता येणार नाही. कारण रेबीज कधीही होवु शकतो. रेबीजचे जंतु शरीरात राहुन २० वर्षांनी देखिल कार्यक्षम होवु शकतात. त्यामुळे दाखला देणे अशक्य आहे. यासाठी आम्ही लसीचा पुरेसा साठा करण्याची दक्षता घेत आहोत. १६०० लसींसाठी आदेश दिले आहेत तसेच शासन १८०० मागविणार आहे. यामुळे दाखला देण्याची वेळ येणार नाही तसेच त्यांच्यातर्फे मी सांगतो की, असा दाखला देता येणार नाही.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—**मा. महापौरजी, आयुक्त साहेबांनी येथे चांगले वक्तव्य केले आहे. परंतु खरात साहेब जे बोलले आहेत ते आक्षेपार्ह आहे. आयुक्तांनी त्यांना सांभाळुन घेतले आहे. श्री. रुपचंदानी यांनी त्यांना विचारले की, काल इंजेक्शन उपलब्ध होते का? यावर त्यांनी उत्तर दिले नाही.

**मा. आयुक्त :—**पाहणी केल्यानंतर २०० इंजेक्शन येथे उपलब्ध आहेत असे ते म्हणाले आहेत.

**मा. सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** श्री मिलींद सावंत यांच्या महापालिकेच्या सेवेत उप आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीची माहिती नोंद करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**मा. सचिव:—**हा विषय फक्त माहितीसाठी आहे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**माहितीसाठी असल्याने पास करण्यात यावा. तिनही विषय पास करा.

**मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :—**सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. २:—** श्री मिलींद सावंत यांच्या महापालिकेच्या सेवेत उप आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन आदेश क्र. एमसीओ—१२०६/०४/प्र.क्र. ०१/०६/नवि—१४, दिनांक १६/१/२००६ अन्वये श्री. मिलींद सावंत, मुख्याधिकारी वर्ग—२ यांची या महानगरपालिकेमध्ये उप—आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्री. मिलींद सावंत हे या महानगरपालिकेमध्ये दिनांक १/३/२००६ पासुन रुजु झाले आहेत.

श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त यांचा प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीचा प्रस्ताव महासभेपुढे माहितीसाठी ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र: ७ दिनांकः— १७/७/२००६

सुचकाचे नाव :— श्री. खेमाणी देवेंद्रसिंह

अनुमोदकाचे नाव :— श्री. पाटील विश्वनाथ

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री मिलींद सावंत यांच्या महापालिकेच्या सेवेत उप आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:— श्री एस.बी.गायकवाड यांच्या महापालिका शिक्षण मंडळात प्रशासन अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीची माहिती नोंद करणे.**

---

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—त्यांनी त्यांची ओळख करुन दयावी.

प्रशासन अधिकारी (श्री. एस.बी. गायकवाड):—मा. महापौर, आयुक्त व सर्व सन्मानयि सदस्य, माझे नाव एस.बी. गायकवाड असे असुन माझी शैक्षणिक पात्रता एम.ए. बी.एड अशी आहे. मला २५ वर्षाचा अनुभव आहे. मी माध्यमिक शिक्षक, मुख्याध्यापक, उप—शिक्षण अधिकारी, गट शिक्षण अधिकारी व प्रशासन अधिकारी या पदावर काम केले आहे. आपल्या सर्वांचे मला सहकार्य मिळेल अशी मी आशा करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र ।

काही सदस्य :—पास—पास……

मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे. 👍

☑ **विषय क्र. ३ :—** श्री एस.बी.गायकवाड यांच्या महापालिका शिक्षण मंडळात प्रशासन अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय पुणे आदेश क्र. मपब—१०—२००६/८ ब—१, दिनांक १२/६/२००६ अन्वये श्री. एस.बी. गायकवाड, प्रशासन अधिकारी (शिक्षण) यांची या महानगरपालिकेमध्ये प्रशासन अधिकारी (शिक्षण) या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्री. एस.बी. गायकवाड हे या महानगरपालिकेमध्ये दिनांक १४/६/२००६ पासुन रुजु झाले आहेत.

श्री. एस.बी. गायकवाड, प्रशासन अधिकारी (शिक्षण) यांचा प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीचा प्रस्ताव महासभेपुढे माहितीसाठी ठेवणेस प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ८ <u>दिनांक:— १७/७/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्री. ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री एस.बी.गायकवाड यांच्या महापालिका शिक्षण मंडळात प्रशासन अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :—** श्री बी.सुंदरेश्वरन यांच्या महापालिकेच्या सेवेत कार्यकारी अभियंता (सा.बां.वि) या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीची माहिती नोंद करणे

---

<u>मा. सचिव :—</u>कृपया आपण आपली ओळख करुन दयावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> तसेच सर्वांचे कामही करावे. वापर होवु दया गैरवापर होवु देवु नका.

<u>प्रभारी शहर अभियंता (श्री. बी. सुंदरेश्वरन):—</u>मा. महापौर व आयुक्त साहेब, माझे नाव बी. सुंदरेश्वरन असे आहे. १ जुन पासुन मी येथे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग या पदावर रुजु झालो आहे.

माझ्याकडे शहर अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिला आहे. यापुर्वी मी ठाणे खाडी पुल येथे उप अभियंता म्हणुन कार्यरत होतो.

काही सदस्य :—पास—पास......

मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र.** ४:— श्री बी.सुंदरेश्वरन यांच्या महापालिकेच्या सेवेत कार्यकारी अभियंता (सा.बां.वि)या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई आदेश क्र. पीओजी—११०५/सीआर २८८/ (५)/सेवा—१, दिनांक १२/५/२००६ अन्वये श्री.बी.सुंदरेश्वरन, उप विभागीय अभियंता, ठाणे, खाडी पुल, उप विभाग क्र. २, तुर्भे यांची या महानगरपालिकेमध्ये कार्यकारी अभियंता (सा.बां.) या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्री.बी. सुंदरेश्वरन हे या महानगरपालिकेमध्ये दिनांक १/६/२००६ पासुन रुजु झाले आहेत.

श्री. बी. सुंदरेश्वरन यांचा प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीचा प्रस्ताव महासभेपुढे माहितीसाठी ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र: ९ दिनांक:— १७/७/२००६

सुचकाचे नाव :— श्री. मोकल चंदाराम

अनुमोदकाचे नाव :— श्री. बोडारे धनंजय

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री बी.सुंदरेश्वरन यांच्या महापालिकेच्या सेवेत कार्यकारी अभियंता (सा.बां.वि) या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. आयुक्त :—दुरुस्ती परवानगीबाबत सर्वांची शंका आहे. बांधकाम परवानगी बद्दल बोलतो. दुरुस्ती परवानगीसाठी माझ्याकडे ५३९ अर्ज आले आहेत. त्यापैकी १८९ आधीच निकाली काढले आहेत. कच्ची बांधकामे व झोपडपट्टयांची प्रकरणे वेगळी करण्यासाठी मी त्यांना सांगितले आहे. त्यानंतर माझ्याकडे यादी आल्यावर ४ दिवसात मी मान्यता देईल. नगररचनाकार त्यांना परवानगी देतील. बांधकाम परवानगीचे जे अर्ज

आहेत त्यासाठी प्रत्यक्ष जागेवर पहाणी केल्यावर माझ्याकडे प्रकरण येईल त्यानंतर मी मान्यता देईल. त्यांचे अधिकार देखिल मी वापरेन. कारण त्यामध्ये ब—याच तक्रारी येत आहेत. बांधकाम परवानगीसाठी माझ्याकडे एकही प्रस्ताव आलेला नाही. श्री. रौराळे यांच्याकडे जी प्रकरणे आली होती त्या प्रकरणात त्यांनी काही मुद्दे उपस्थित केल्याने सदरची प्रकरणे पुन्हा नगररचनाकारांकडे गेले आहेत. त्यांची पाहणी झाल्यानंतर ते पुन्हा येतील.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आयुक्त साहेब, तुम्ही म्हणता की माझ्याकडे एकही फाईल नाही परंतु आपल्या कार्यालयात फाईल घेतलीच जात नाही. तुम्ही फाईल घेण्यास नाही सांगितले आहे असे ते सांगतात.

मा. आयुक्त :—बिल्कुल नाही. मी त्यांना सांगतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— आपण श्री. मिलिंद सावंत यांना अतिक्रमणचे काम दिले आहे त्यांना शहरात फिरायला सांगा.

मा. सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :—** महापालिका सदस्य श्री. गौतम भालेराव यांना आजारामुळे ६ महिन्यांसाठी महासभेस गैरहजर राहण्यास मान्य करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. ५:—** महापालिका सदस्य श्री. गौतम भालेराव यांना आजारामुळे ६ महिन्यांसाठी महासभेस गैरहजर राहण्यास मान्य करणे.

प्रस्तावना

महापालिका सदस्य श्री. गौतम भालेराव अर्धांगवायुच्या आजारामुळे दिनांक १/५/२००६ पासुन आजारी आहेत. त्यामुळे ते डॉ.श्री.पी.जे.राजानी, वासिंद यांच्याकडुन उपचार घेत आहेत. श्री. गौतम भालेराव यांना अर्धांगवायुचा झटका आल्याने ते महासभेस हजर राहण्यास असमर्थ आहेत. यामुळे माहे मे व जुन २००६ मध्ये झालेल्या महासभांना ते हजर राहु शकले नाहीत. सदरहु आजारामुळे लागोपाठ ६ महिन्यांच्या अवधीत महापालिकेच्या महासभांना गैरहजर राहण्यास परवानगी मिळणेकामी त्यांनी दिनांक ६/७/२००६ च्या लेखी पत्रान्वये विनंती केलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ११ (ब) अन्वये तात्पुरता आजार किंवा महापालिकेने मान्य केलेले कोणतेही कारण या व्यतिरिक्त प्रसंगी लागोपाठ ३ महिन्यांच्या अवधीत महापालिका सभांना सदस्य स्वत: गैरहजर राहील. तसेच अधिनियमाच्या कलम ११ (क) अन्वये कोणत्याही कारणांमुळे मग ते महापालिकेने मान्य केले असेल किंवा सदस्य लागोपाठ ६ महिन्यांच्या कालावधीत महापालिका सभांना स्वत: गैरहजर राहील किंवा हजर राहण्यास असमर्थ होईल तेव्हा पालिका सदस्य म्हणुन राहण्यास अर्नह होईल.

श्री. गौतम भालेराव, पालिका सदस्य यांना अर्धांगवायुचा आजार असल्याने लागोपाठ सहा महिन्यांच्या अवधीत महासभांना गैरहजर राहण्यासाठी मान्यता मिळणेकामी महासभेसमोर प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: १०  दिनांक:— १७/७/२००६

सुचकाचे नाव :— श्री. रोहडा श्यामसुंदर

अनुमोदकाचे नाव :— श्री. भुल्लर राजेंद्रसिंह

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिका सदस्य श्री. गौतम भालेराव यांना आजारामुळे पुढील ६ महिन्यांसाठी महासभेस गैरहजर राहण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :—** कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.२५ वाजता मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी श्री. तलरेजा विनोद यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांकः– १९/८/२००६

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/८/२००६ रोजीच्या</u>
<u>सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक १९/८/२००६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर श्रीमती कालानी ज्योती सुरेश (पप्पु) हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

<u>१. मा. महापौर श्रीमती कालानी ज्योती सुरेश (पप्पु)</u>
<u>२. मा. उप–महापौर श्री. तलरेजा विनोद चंदीराम</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती जावळे संगिता रमेश | ३८. | श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग |
| ४. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | ३९. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ४०. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४१. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ४२. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ८. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | ४३. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४४. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| १०. | श्रीमती मोकल सीमा चंदाराम | ४५. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ११. | श्री. गायकवाड दिलीप | ४६. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४७ | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४८. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४९. | श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५०. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५१. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५२. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १८. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५३. | श्री. मनवानी अन्नु (सनमुख) |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५४. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५५. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| २१. | श्रीमती गुप्ता अनिता धर्मेंद्र | ५६. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| २२. | श्री. पवार नाना आनंदा | ५७. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| २३. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५८. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| २४. | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ५९. | श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग |
| २५. | श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा | ६०. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| २६. | श्री. निकम शांताराम ओंकार | ६१. | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| २७. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६२. | श्रीमती छाब्रिया भारती पहलाज |
| २८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६३. | श्री. बठीजा संजय रामचंद्र |
| २९. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ६५. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३१. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६६. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| ३२. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६७. | श्रीमती दासानी मिनु राजकुमार |
| ३३. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ६८. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३४. | डॉ. (श्रीमती) साधवानी जया | ६९. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३५. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७०. | श्री. माखिजा हरदास सन्मुखदास |
| ३६. | श्रीमती खिलनानी भावना रवी | ७१. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३७. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल | ७२. | श्री. वधारिया राजेश नानिकराम |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, २. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), ३. श्री. जेसवानी सतरामदास फतनदास, ४. श्रीमती माने किरण बाळकृष्ण, ५. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, ६. श्री. भालेराव गौतम यशवंत, ७. श्रीमती पंजाबी दिपा नारायण, ८. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, ९. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

श्री सदाशिव कांबळे हे आयुक्त म्हणून सभेस उपस्थित होते तसेच खालील अधिकारी सभेस हजर होते

१३. श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त
१४. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
१५. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
१६. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
१७. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
१८. श्री. अनंत कांबळे, प्रभारी मुख्य लेखा परिक्षक
१९. डॉ. के. आर. खरात, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
२०. श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
२१. श्री. बी. सुंदरेश्वरन, प्रभारी शहर अभियंता
२२. श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
२३. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
२४. श्री. बी.एस.गायकवाड, प्रशासन अधिकारी
२५. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
२६. डॉ. राजा रिजवानी, वैद्यकीय अधिकारी
२७. श्री. बी. एम. नितनवरे, प्रभारी प्रभाग अधिकारी

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी, मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– सचिव साहेब, सभेचे कामकाज सुरू करण्यांत यावे.

मा. सचिव :– यावेळेस मा. महापौर व मा. उप–महापौर हे दोघेही सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभेचे कामकाज चालविण्यासाठी आपणा सर्वानुमते एका सदस्याची पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करावी लागेल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–श्री. किशोर वनवारी यांची पीठासीन अधिकारी म्हणुन निवड केली जावी.

**सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांच्या वतीने सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी यांची पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करण्यात आली व ते पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ झाले.**

सांयकाळी ४.२० वाजता वंदे मातरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. पीठासीन अधिकारी :–प्रभाग क्र. २० अ च्या पोटनिवडणूकीमध्ये निवडुन आलेले सदस्य श्री. अन्नु मनवानी यांचे स्वागत केले जावे. तसेच मा. सदस्य श्री. भुल्लर महाराज यांचा सुध्दा वाढदिवस असल्याने मिठाई वाटप करुन सर्व सदस्याचे तोंड गोड केले जावे. तसेच इतर सदस्य जे काही म्हणत आहेत ते मान्य केले जात आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– के न्यूजवाल्यास सभागृहाच्या कामकाजाचे चित्रीकरण करण्यास परवानगी दिली जावी.

मा. पीठासीन अधिकारी :– ठिक आहे.

**मा. आयुक्त श्री सदाशिव कांबळे यांनी सभागृहात प्रवेश केला व ते व्यासपीठावरील त्यांचे आसनावर आसनस्थ झाले.**

**यावेळी मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी या सभागृहात आल्या व त्या पीठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ झाल्या. व सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी हे आपल्या स्थानी आसनस्थ झाले.**

**मा. उप–महापौर श्री. विनोद तलरेजा, मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी, श्री. राज असरोंडकर, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. ईश्वर पमनानी, श्री. पृथ्वी वलेचा, श्री. संजय बठिजा, श्री. गणपत एडके, श्री.चंदाराम मोकल, श्री. राजेश वदारिया, मा. सदस्या श्रीमती निता अहुजा, श्रीमती भारती छाब्रिया, श्रीमती मिनु दासानी, श्रीमती कमला शर्मा, श्रीमती रेखा कारीरा, श्रीमती भावना रामचंदानी, श्रीमती सुजाता रिजवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–मा. महापौर महोदया, आपल्या शहरातील वरीष्ठ पत्रकार श्री. मनोहर जेसवानी यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. मी सभागृहास विनंती करतो की, त्यांना श्रध्दांजली वाहीली जावी.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :–हे अगोदर व्हायला पाहिजे. अगोदर श्रध्दांजली नंतर निवडुन आलेल्या सदस्याचे सभागृहात स्वागत केले पाहिजे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–सचिव साहेब, माझ्या प्रभागात राहणारी एक विद्यार्थीनी परवाच्या दिवशी सीएचएम कॉलेज जवळून जातांना पाण्यामध्ये बुडुन निधन पावली. तिला सुध्दा श्रध्दांजली देण्याचा प्रस्ताव मांडत आहे.

**मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी, डॉ. श्रीमती निना नाथानी, मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव, श्री. दिलीप लालवानी, श्री. मनोज साधवानी, श्री. मोहन रामरख्यानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– माझ्या प्रभागामध्ये सुध्दा श्रीमती सावित्रीबाई फतुमल धनवानी व दुसरे श्री. हरदास मुखी हे निधन पावले आहेत त्यांना सुध्दा श्रध्दांजली वाहीली जावी.

---

शोक प्रस्ताव

सुचकाचे नाव :– श्री. देवेंद्रसिंह खेमाणी
श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. रमेश चव्हाण
श्री. किशोर वनवारी

उल्हासनगर शहरातील वरीष्ठ पत्रकार श्री. मनोहर जेसवानी यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. श्री. रमेश चव्हाण यांच्या प्रभागातील आर.के.टी. कॉलेजची एक विद्यार्थीनी कु. अश्विनी गौडा ही दिनांक १७/८/२००६ रोजी सीएचएम कॉलेज जवळून जातांना पाण्यामध्ये बुडुन निधन पावली. तसेच श्रीमती सावित्रीबाई फतुमल धनवानी व श्री. हरदास मुखी यांचे देखिल काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. १० अ दिनांकः—१९/८/२००६

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. मनोहर जेसवानी, कुमारी अश्विनी गौडा, श्रीमती सावित्रीबाई फतुमल धनवानी व दुसरे श्री. हरदास मुखी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—मा. महापौरजी, प्रभाग क्र. २० अ च्या पोटनिवडणूकीत निवडून आलेले सन्माननिय सदस्य श्री. अन्नु मनवानी यांचे स्वागत करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. परंतु मध्येच सभागृह नेत्यांनी श्रध्दांजली प्रस्ताव मांडल्याने श्रध्दांजली नंतर आता अभिनंदन करायचे आहे.

मा. सचिव :—के. न्युज चॅनेलचे पत्रकार सभागृहात उपस्थित कसे आहेत?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—के न्युजच्या पत्रकारास सभागृहाच्या कामकाजाचे चित्रीकरण करण्यास पीठासीन अधिका—यांनी परवानगी दिलेली आहे. सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालले पाहिजे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी हे सभागुहातुन बाहेर गेले. 

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मी जेव्हा पीठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ होतो तेव्हा मी त्यांना सभागृहाच्या काही कामकाजाचे चित्रीकरण करण्यास परवानगी दिली आहे. के न्यूजवाल्यास मी परवानगी दिली आहे हे सत्य आहे. श्री. अन्नु मनवानी यांच्या स्वागत कार्यक्रमाचे व मा. सदस्य श्री. भुल्लर महाराज यांच्या वाढदिवसानिमित्त होणा—या शुभेच्छा कार्यक्रमाचे चित्रीकरण करण्यास के न्यूज वाल्यास मी परवानगी दिली आहे. त्याचबरोबर सभागृहात मिठाई वाटप करून सर्वांचे तोंड गोड केले जावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— अशाप्रकारची परवानगी नेहमीच दिली जाते. आज एका सन्माननिय सदस्याचे स्वागत करायचे असतांना चित्रीकरण करु नये असे तर काही नाही ना? तसे असेल तर तेही सांगा. श्री. अन्नु मनवानी यांच्या स्वागत कार्यक्रमाचे चित्रीकरण करु नये असे जर आपण म्हणत असाल तर तेही आम्ही मान्य करु.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—याचा अगोदर अशाप्रकारचे कार्यक्रम जेव्हा जेव्हा होत होते तेव्हा चित्रीकरण केले जात होते.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— मा. महापौर महोदया, आपण शहराच्या प्रथम नागरीक आहात. जो कोणी सदस्य निवडून येतो त्याचे सभागृहात शिष्टाचारानुसार स्वागत झाले पाहिजे. त्यामध्ये काही चुकीचे नाही.

मा. महापौर :— नव्याने निवडुन आलेले सन्माननिय सदस्य श्री. अन्नु मनवानी यांचे स्वागत करण्यासाठी तसेच सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांचा दोन दिवसापुर्वी वाढदिवस होता व आज सन्माननिय सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांचा वाढदिवस असल्याने या दोन्ही सदस्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी व निवडून आलेल्या एका सदस्याचे स्वागत करण्यासाठीच्या कार्यक्रमाचे चित्रीकरण करण्यासाठी के न्युज व जनादेश या चॅनलच्या पत्रकारांना परवानगी देण्यात येत आहे.

यावेळी सन्माननिय सदस्य श्री. अन्नु मनवानी यांना काही सदस्यांनी शाल, पुष्पगुच्छ तर काहींनी पुष्पहार अर्पण करून त्यांचे स्वागत केले व सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनाही काही सदस्यांनी पुष्पगुच्छ, पुष्पहार अर्पण करून वाढदिवसा निमित्त शुभेच्छा दिल्या.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–</u>श्री. अन्नु मनवानी हे नगरसेवक म्हणुन निवडून आल्याने त्यांचे येथे स्वागत होत आहे. जनेतेने दिलेला निर्णय सिरसाध्य मानावा लागेल तो सर्वांना स्विकारावा लागेल. यासाठी मी श्री. अन्नु मनवानी यांना शुभेच्छा देतो. तसेच आमचे सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांचा जो वाढदिवस आहे......

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:–</u>मा. महापौरजी, आमचे सदस्य श्री. अन्नु मनवानी यांचे स्वागत झाले आहे. सर्वांनी आपापल्या शुभेच्छा दिलेल्या आहेत त्याबद्दल भाषणबाजी करणे हे मला उचित वाटत नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u>तुम्हांला योग्य वाटत नसेल तर तुम्ही करु नका.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर महाराज व श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा व त्याच बरोबर सर्वात जास्त शुभेच्छा मी आमचे वरीष्ठ नगरसेवक श्री. गोविंदराम लुंड व श्री. श्यामसुंदर रोहरा यांना देत आहे. ते आमच्या विचाराशी सहमत होवून आजपासुन आमच्या बरोबर येवुन बसले आहेत त्याबद्दल त्यांना शुभेच्छा देतो, धन्यवाद ।

<u>मा. सचिव :–</u> एक सुचना आहे. ती मा. महापौरांच्या आदेशानुसार मी आपणांस वाचुन दाखवितो.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:–</u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीत –२००२ मध्ये मी नगरसेवक म्हणुन निवडुन आलो असून महासभेच्या बैठकीमध्ये माझी बसण्याची व्यवस्था भाजपा नगरसेवकांमध्ये केलेली आहे. सद्यास्थितीत सहकार्यांशी वैचारीक मतभेद असल्याने माझी कोंडी होत आहे. तरी माझी महासभेच्या बैठकीमध्ये बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी.

––श्री राज असरोंडकर

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर महोदया, आज अतिशय आनंदाचा दिवस आहे. महासभेमध्ये आमचे नवनिर्वाचीत सदस्य श्री. अन्नु मनवानी यांचे स्वागत करण्यात आले आहे. त्याचबरोबर मा. सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी जे पत्र दिले आहे, आमचे गटनेते व भाजपाचे अध्यक्ष यांच्या डोक्यावर फार मोठे ओझे होते ते आज हलके झाले आहे म्हणुन मी त्यांचे अभिनंदन करतो त्यांनी योग्य वेळी योग्य निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

<u>मा. सचिव :–</u>कृपया लक्ष दया. के न्युज व जनादेश च्या प्रतिनिधींनी सभागृहाच्या बाहेर जावे.

विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.......

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:–</u>मा. महापौरजी, याचबरोबर बैठक व्यवस्थेसंदर्भात आणखी दोन पत्रे दिली होती त्यांना सुध्दा न्याय मिळाला पाहिजे. व माझा येथे एक प्रश्न आहे आमचे सहकारी सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी भाजपा गटाचा त्याग करुन ते आता राष्ट्रवादी पक्षांच्या सदस्यांमध्ये बसले आहेत. तर त्यांची गणना भाजपाचे सदस्य म्हणुन केली जाईल की राष्ट्रवादीचे सदस्य म्हणुन केली जाईल.

<u>मा. सचिव :–</u>आणखी एक आवश्यक सुचना

आय हीअरबाय रिकवेस्टेड यु टु मेक माय सेपरेट सिटींग ॲरेजमेंट इन द हाउस अलॉग विथ ११ ऑदर मेंबर्स हु हॅव अल्सो रिकवेस्टेड फॉर द सेम.

–– श्री. श्यामसुंदर रोहरा

आय हीअरबाय रिकवेस्टेड यु टु मेक माय सेपरेट सिटींग ॲरेजमेंट इन द हाउस अलॉग विथ ११ ऑदर मेंबर्स हु हॅव अल्सो रिकवेस्टेड फॉर द सेम.

–– श्री. गोविंदराम लुंड

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—मा. महापौरजी, आपले नव्याने निवडुन आलेले सन्माननिय सदस्य श्री. अन्नु मनवानी हे आज येथे उपस्थित आहेत. मला असे वाटते की, त्यांनी आपला थोडक्यात परिचय करुन दिला तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौरजी, आता भाजपाच्या सदस्याने म्हटले की, मला बसण्याची स्वतंत्र व्यवस्था पाहिजे. त्यावर भाजपाच्या एका सदस्याने म्हटले की आमच्या डोक्यावरचे ओझे कमी झाले. त्यांनी त्यास पाठवुन दिले, तो सदस्य नविन ठिकाणी स्थानापन्न सुध्दा झाला. तर आपणसुध्दा मन मोठे करा. आमचे सुध्दा ज्या ज्या सदस्यांशी जमते, जे आमचे मित्र आहेत त्यांच्याशी आमचे जमते. जर आमचे आपसामध्ये चांगले जमते तर आम्हास तेथे बसण्यास अनुमती दिली जावी. याबाबत आम्ही गेल्या तीन महिन्यापासुन मागणी करत आहोत. भाजपवाल्यांनी तर एका मिनिटामध्ये त्यास परवानगी दिली. आणखी कोणी आपणांस पाहिजे असेल तर त्यास सुध्दा देवु परंतु आम्हांला सोडा. आमचे सुध्दा आपसामध्ये जमते आम्हांला सुध्दा त्यांच्याबरोबर बसण्यास परवानगी दया. आमचे जर एकमेकांशी जमते तर त्यामध्ये आपले काय जाते?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—आमच्यासारखे मोठे मन आपणसुध्दा करा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आपण सुध्दा मन मोठे करा. आम्हांला सुध्दा आमच्या मित्रांबरोबर बसू दया. बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करा. बाकी इतर थोडे काही आम्ही आपणांस बोलत आहोत?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—हे पहा एकाऐवजी चौदा. असा व्यवहार आहे का? एकाच्या बदल्यात चौदा?

मा. सचिव:— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे......... यावेळी ४.४० मिनिटे झाली आहेत.

**मा. सदस्य श्रीमती किरण माखिजा, श्रीमती कोमल बठिजा, श्रीमती मोना वनवारी, मा. सदस्य श्री. सुरेश गायकवाड, श्री. राजु टेकचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सचिव :— प्रश्न क्र. ४९२ हा श्री. नाना पवार यांचा आहे.

**मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मा. महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, जेव्हा पासुन मी महापालिकेमध्ये निवडून आलो आहे, मला असे आढळुन आले आहे की, महापालिकेच्या इतिहासामध्ये हे असे पहिल्यांदा झाले आहे की, आम्ही जे प्रश्न विचारतो त्याच्या उत्तराबाबत पहिल्यांदाच असे पत्र देण्यात आले आहे की, याबाबत कारवाई केली जाईल. या उत्तराबाबत मी प्रशासनाचे आभार मानतो व याबाबत पुढील कारवाई झाली पाहिजे. एवढेच माझे म्हणणे आहे.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी, श्री. वाघे शामु, मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—सन्माननिय सदस्यांनी स्वतंत्र बैठक व्यवस्थेबाबतचा जो मुद्दा उपस्थित केला होता त्याचे काय झाले?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— होय, बरोबर आहे.

मा. सदस्य श्री. नाना पवार :—मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब व सभेत उपस्थित असलेले सर्व सन्माननिय सदस्य.............

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—मा. महापौरजी, ११ सन्माननिय सदस्यांनी आपणांस पत्र दिले आहे त्याच्याबाबतीत आपण उत्तर दिले नाही. मध्येच विषय कसा पुकारला गेला? आपण अधिनिर्णय दिला पाहिजे.

मा. महापौर :—प्रश्नोत्तराचा कालावधी सुरु झाला आहे. कृपया आपण बसुन घ्यावे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— विषय कसा चालु होईल प्रथम आपण उत्तर तर दया.

मा. महापौर :—आपण बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— बसुन तर घेणारच आहे ना, पुर्ण दिवसभर काय उभा राहणार आहे काय?

मा. महापौर :— त्यांनी म्हटले की, ते आमच्या डोक्यावरचे ओझे होते. परंतु मी असे म्हणते की, हे लोक आजून तरी आमच्या डोक्यावरचे ओझे झालेले नाहीत. जेव्हा ते ओझे बनतील तेव्हा आम्ही त्याना स्वतंत्र बैठकीसाठी परवानगी देवु.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—एका बाबतीत एक कायदा व दुस—या बाबतीत दुसरा कायदा? असे होते काय?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—एका बाबी बाबतीत दोन—दोन कायदे नसतात.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— शहरातील लोकांना किती दिवस गप्प कराल?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—एकच कायदा असतो, दोन—दोन कायदे नसतात.

मा. महापौर :—प्रत्येक पक्षाचा आपापला कायदा असतो. आपण कृपया बसुन घ्यावे. प्रश्नोत्तराचा कालावधी सुरु झाला आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—गप्प का बसेन?

मा. महापौर :—उभे राहा, उभे राहा. श्री. नाना पवार आपण आपला प्रश्न विचारा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—ते पण बोलतील मी पण बोलेल. मी का गप्प बसेन? आपण आमचा आवाज बंद कराल काय? बोलु दया त्यांना, आम्ही पण बोलु, सर्वजण बोलतील. उठा ... सर्वजण बोलु या.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— हा दुहेरी मापदंड आहे. तो बंद झाला पाहिजे. असे होता कामा नये.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत होते हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—आपण उत्तर दया की पुढील वेळेस परवानगी देवु वगैरे........

मा. महापौर :—आपण ज्या उत्तराची अपेक्षा करता ते उत्तर माझ्या संमतीनेच दिले जाईल. तसेही मी उत्तर दिलेलेच आहे. ते सदस्य अदयाप तरी आमच्या डोक्यावर ओझे झालेले नाहीत. तेव्हा ते ओझे ठरतील तेव्हा आम्ही सुध्दा त्यांच्या स्वतंत्र बैठकीस परवानगी देवु.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—ते ओझे बनोत अथवा न बनोत परंतु आपणांस ओझे मानत आहेत, त्याचे आपणाकडे काय उत्तर आहे?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—ऐकुन घ्या, आपण त्यांचे वकिल आहात काय?

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—तुम्ही त्यांचे वकिल आहात काय? कायदयाची माहिती नाही आणि वकिल बनायला चाललात.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी, श्री. मोहन रामरख्यानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मी जो मुद्दा उपस्थित केला होता तो प्रश्नोत्तराचा कालावधी चालु होण्याअगोदर उपस्थित केला होता. त्याचे उत्तर देवुन, प्रश्नोत्तरे चालु करावयास पाहिजेत.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— प्रश्नोत्तराचा कालावधी नंतर चालु झाला आहे.

मा. सदस्य श्री. नाना पवार :—मा. महापौरजी, ...........

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— श्री. नाना पवार कसे बोलतील? प्रथम आपण आपला अधिनिर्णय दया.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—महापौर महोदया, त्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यावर आपण उत्तर दया, अधिनिर्णय दया. जे काही उत्तर दयायचे आहे ते दया. कार्यपध्दती तर पुर्ण करा.

मा. महापौर :— ऐकण्यास कमी येत आहे काय? मी जे उत्तर दिले ते ऐकु आले नाही काय?

**मा. सदस्या श्रीमती मोना वनवारी, श्रीमती किरण माखिजा हया सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आम्हास आपणापेक्षा जास्त ऐकु येते. आपले कान बहिरे होवु शकतात, आमचे नाही. महापौर महोदया, आपले शब्द सौम्य स्वरुपाचे असले पाहिजेत. जसे की आपणांस ऐकण्यास कमी येत आहे काय? नाही तर आपण आमची वैद्यकीय तपासणी करा.

मा. महापौर :—मी दोन वेळा उत्तर दिले आहे, आणखी किती वेळा मी उत्तर देवु. किती वेळा व काय उत्तर देवु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—आपण अधिनिर्णय दया. आपण म्हणता की, बसुन घ्या.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— उत्तर जर असेल तर देतील?

**मा. उप—महापौर श्री. विनोद तलरेजा, मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. महापौर :—मी अधिनिर्णय दिलेला आहे व तोच माझा अधिनिर्णय अंतिम आहे.

मा. सदस्य श्री. नाना पवार :— सर्व सदस्यांना मी विनंती करतो की, हा जो प्रश्न आहे तो अनुशेषाच्या बाबतीत आहे व त्यास मा. महापौरांनी परवानगी दिलेली आहे. व या प्रश्नामध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण नाही. हा प्रश्न विचारण्यामागे आमचा एक चांगला उद्देश आहे. आपल्या महानगरपालिकेने अनुशेष पुर्णपणे भरला पाहिजे. परंतु आपली महानगरपालिका अदयापपर्यंत अनुशेष पुर्णपणे भरु शकलेली नाही महानगरपालिकेने अनुशेष लवकरात लवकर भरला पाहिजे. याबाबतीत शासनाकडुन अनेकवेळा आदेश आलेला आहे. परंतु या प्रश्नाच्या माध्यमातुन जे उत्तर देण्यात आले आहे त्यात असे म्हटले आहे की, आपणाकडे अनुशेषाची ४२३ पदे रिक्त आहेत व त्यातील १९९ पदे भरण्यात आली आहेत तर याचा अर्थ असा होतो की, उल्हासनगर महापालिकेत ५० टक्के सुध्दा अनुशेष भरण्यात आलेला नाही. हा अनुशेष का भरण्यात आलेला नाही? हे तर आम्हांला समजले पाहिजे. तो सर्व नगरसेवकांचा अधिकार आहे. मी महापौरांना विनंती करतो की, या प्रश्नासंबंधी जे संबंधीत अधिकारी असतील त्यांनी आम्हांस सर्वात प्रथम हे सांगावे की, काय अडचणी आहेत? अनुशेष पुर्णपणे का भरला जात नाही? व जर उल्हासनगर महानगरपालिका अनुशेष भरु इच्छित असेल तर तो कधी पर्येत भरणार आहात? या प्रश्नाच्या माध्यमातुन आम्हांला जे लेखी उत्तर मिळाले आहे त्यामध्ये असे

दर्शविले आहे की, अदयापपर्यंत ५० टक्केसुध्दा अनुशेष भरलेला नाही. तर तो का भरलेला नाही? याचे संबंधीत अधिका–यांनी येथे उत्तर दिले तर पुर्ण सभागृहाला माहिती मिळेल.

श्री. अशोक बागेश्वर (उप–आयुक्त,मुख्यालय):–सन्माननिय महापौरजी, जो अनुशेष भरावयाचा बाकी होता.....

काही सदस्य :–कृपया मोठयाने बोला.

श्री. अशोक बागेश्वर (उप–आयुक्त,मुख्यालय):–४२३ पदांचा जो अनुशेष होता त्यातील १९९ पदे भरलेली आहेत. व बाकी जो अनुशेष आहे त्याबाबतच्या भरतीची कार्यवाही सुरु झाली आहे व ती पुर्ण केली जाईल.

मा. सदस्य श्री. नाना पवार :– पुर्ण प्रयत्नात आहोत व कार्यवाही पुर्ण केली जाईल. एक जबाबदार अधिका–याच्या नात्याने हे जे आपण सभागृहामध्ये उत्तर देत आहात, या संदर्भात आपण सभागृहात जे काही बोलाल त्यास अधिक महत्व असल्याने आपले हे जे शब्द आहेत. कार्यवाही सुरु केली जाईल, कार्यवाही सुरु आहे व पुर्ण केली जाईल हे एक आश्वासन आहे. कृपया करुन आपण येथे कोणत्याही प्रकारचे आश्वासन देवु नये. आपण हे सांगा की, अदयापपर्यंत अनुशेष पुर्णपणे न भरण्याचे कारण काय आहे? व आपण किती कालावधी मध्ये पुर्णच्या पुर्ण अनुशेष भरणार आहात? कारण की अनुशेषाचा हा गंभीर विषय आहे. आपण येथे जे उत्तर दयाल त्यातील एक एक शब्दास फार महत्व आहे. आपण सभागृहामध्ये जे काही वक्तव्य कराल ते जबाबदारीचे असले पाहिजे ते केवळ आश्वासन असता कामा नये. हा अनुशेष आपण किती कालावधीमध्ये पुर्णपणे भरुन दयाल? हे सभागृहास सांगा.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त, सन्माननिय सदस्य, मागासवर्गीयांच्या अनुशेषाचा हा जो प्रश्न आहे हा गेल्या तीन–चार वर्षापासुन प्रलंबित असल्यापासुन त्याबाबत आज जी माहिती येथे उपलब्ध झाली आहे. ४२३ पदांचा अनुशेष भरायचा होता. ४२३ पैकी १९९ पदे भरली बाकी भरायची आहेत. ४ वर्षापुर्वी मी जेव्हा या गोष्टीचा सातत्याने पाठपुरावा करत होतो, ज्यावेळेस आम्ही या विषयासाठी उपोषणास बसलो त्यानंतर थोडीफार कारवाई सुरु झाली. मला चांगले आठवते त्यावेळेस संपुर्ण अनुशेष ३ महिन्यामध्ये भरण्याचे तुमच्या अधिका–यांनी आश्वासन दिले होते. त्याचा जेव्हा आम्ही पाठपुरावा करत होतो तेव्हा १९९ पदे भरण्यात आली. ही पदे ज्या तुमच्या निवड समितीने भरली आहेत त्यावेळेचे जे अधिकारी होते ते आता कदाचित नसतीलही. परंतु १९९ पदे भरण्यामागे १९९ लाख रुपयाचा भ्रष्टाचार त्यावेळी झालेला आहे. हा भ्रष्टाचार झालेला आहे आणि त्याबाबतीतील पुरावे सुध्दा आमच्याकडे आहेत. यापुढे अनुशेषाची भरती किती कालावधीत पुर्ण होईल? याचेही उत्तर सापडले पाहिजे. आणि भरती करतांना त्यामध्ये पारदर्शकता असली पाहिजे. त्यामध्ये कुठलाही भ्रष्टाचार असु नये ही एक प्रामुख्याने मागणी आहे. आणि १९९ पदे भरतांना जो भ्रष्टाचार झालेला आहे त्याची चौकशी करण्यासाठी जर तुम्ही चौकशी समिती नेमली आणि त्या संबंधीत अधिका–यांवर आयुक्तांमार्फत कारवाई करावी लागली तर ती करावी अशी आमची मागणी आहे. धन्यवाद।

मा. उप–महापौर श्री. विनोद तलरेजा यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

श्री. अशोक बागेश्वर (उप–आयुक्त,मुख्यालय):– :– सन्माननिय महापौरजी, भरतीची जी प्रक्रिया आहे त्यामध्ये दोन प्रकार येतात एक थेट भरती व दुसरी पदोन्नतीने, थेट भरतीच्या प्रक्रियेमध्ये वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणे, सेवा योजन कार्यालयाकडुन उमेदवाराची यादी मागविणे. समाजकल्याण अधिकारी किंवा प्रकल्प अधिकारी, अनुसुचीत जमाती यांच्याकडुन उमेदवाराची यादी मागविणे व त्यानुसार भरतीची प्रक्रिया पुर्ण करणे व पदोन्नतीची जी पदे भरायची आहेत ती भरतांना आपल्याकडे जे कर्मचारी सेवेमध्ये आहेत त्यांची सेवाजेष्ठता यादी तयार करणे, मागासवर्गीय अनुशेषाचा बिंदु निश्चित करणे ही सर्व कामे करुन मी आपणांस असे आश्वासन देतो की, जेवढी काही पदे उपलब्ध आहेत ती भरण्याची कार्यवाही सहा महिन्यामध्ये पुर्ण केली जाईल.

मा. सदस्य श्री. नाना पवार :–मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, पदोन्नतीच्या संदर्भामध्ये कनिष्ठ अभियंता या पदासाठी सात पदे येथे रिक्त दर्शविली आहेत. कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती देतांना कोणते निकष आपण लावणार आहात त्याचे याठिकाणी स्पष्टीकरण दिलेले नाही. या पदा लगतचे खालचे पद कोणते आहे? आणि ते या उत्तरामध्ये कुठेही आढळत नाही. कनिष्ठ अभियंता सात आणि विद्युतचे दोन कनिष्ठ

अभियंता असे एकुण ९, तर ही ९ पदे कोणत्या पध्दतीने, पदोन्नतीने आपण भरणार आहात? एखादया लिपिकास तर अभियंता बनवु शकत नाही. तर याबाबतीत आपले काय मत आहे? या ९ पदांवर आपण कोणत्या कर्मचा—यांना पदोन्नती देणार आहात?

**श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त,मुख्यालय):—** मा. महापौरजी, कनिष्ठ अभियंत्याचे जे पद आहे त्या पदावर जी पदोन्नती दयायची आहे, ती, तात्रिक अर्हता धारण केलेले जे पद आहे, ते पद कदाचित मिस्त्री, सुपरवायझरचे असेल, त्या पदधारकातुन त्याची सेवा जेष्ठता व त्या संवर्गातील तो कर्मचारी आहे किंवा नाही त्यानुसार पदोन्ती देण्याचे धोरण अवलंबिण्यात येते. तरीही सदरची बाब प्रत्यक्ष तपासुन आपणांस माहिती देतो.

**मा. सदस्य श्री. नाना पवार :—**साहेब, आपण सांगितल्या प्रमाणेच पध्दत आहे परंतु तुम्ही त्या पदांचा उल्लेख केलेला नाही. त्यावर माझे म्हणणे असे आहे की, आपल्या आस्थापना सुचीवर ते पद आहे काय? जर का ते पद नसेल आपल्याकडे त्या पदाचे कर्मचारी नसतील तर मग ही ९ पदे, ही ९ पदे आपण पदोन्नतीसाठी देवु शकत नाही. तर मा. महापौर महोदया, याबाबतीत माझी एक सुचना आहे ती जर कायदयाच्या चौकटीत बसत असेल तर, सरळसेवेसाठी ७५ टक्के व पदोन्नतीसाठी २५ टक्के. याठिकाणी आपणाकडे आस्थापना सुचीवर तांत्रिक पदे नसतील तर १०० टक्के ती सरळ सेवेन भरली पाहिजेत. किंवा आस्थापना सुचीमध्ये काही तांत्रिक पदे असतील तर प्रश्नच उद्भवत नाही. परंतु आम्ही शासनाकडे जी आस्थापना सुची मंजुरीस पाठविली आहे त्यामध्ये जर तांत्रिक पदे नसतील तर कनिष्ठ अभियंत्यांचा सरळ सेवेने भरावयाचा कोटा १०० टक्के असला पाहिजे. प्रत्यक्षात जो आज २५ टक्के आहे. कारण की आपण अनुशेष पुर्णपणे भरु शकलेलो नाही. त्यामुळे तो खाली असलेला दिसेल. याबाबत मी सचिव साहेबांना विचारु इच्छितो की, महासभा असा निर्णय घेवु शकते का, माझ्याकडे अशी माहिती आहे की, आपणाकडे तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नाहीत. जर असतील तर आपण सांगा. आणि जर तांत्रिक कर्मचारी नसतील तर १०० टक्के सरळ सेवेने जागा भरल्या जावु शकतात काय याबाबतीत महानगरपालिका निर्णय देवु शकते काय? १०० टक्के सरळसेवेने पदे भरण्यासाठी ही महासभा कायदयानुसार निर्णय घेवु शकते काय?

**श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त,मुख्यालय):—** मा. महापौरजी, पदोन्नती व थेट भरतीचा हा जो विषय आहे, येथे लगतची खाळची पदे आपल्या आस्थापना सुचीवर मंजुर नाहीत किंवा शासनाकडुन मंजुर होवुन आलेली नाहीत ही पदे थेट भरण्यासाठी त्यांचे रुपांतर करण्यासाठी आपल्या स्तरावर जर शासनाची मंजुरी आवश्यक असेल तर शासनाच्या मंजुरीनंतर ही पदे थेट भरण्याची कार्यवाही केली जाईल.

**मा. सदस्य श्री. नाना पवार :—**आयुक्त साहेब, आपल्याकडे ब—याचशा पदाची आवश्यकता आहे परंतु आपणाकडे ज्या अडचणी आहेत प्रशासन या पदांना पदोन्नती देवु शकत नाही. प्रशासनाच्या अडचणी दुर व्हाव्यात आणि उल्हासनगर महानगरपालिकेने अनुशेष पुर्ण भरावा, एक उदाहरण असे आहे की, ३ लिपिकांकांकडुन, प्रभारी आरोग्य निरिक्षक म्हणुन काम करुन घेत आहोत त्यांच्याकडे पदविका आहे, पात्रता आहे परंतु आपल्याकडे आस्थापना सुचीमध्ये अशी अडचण आहे की, २५ टक्के पदोन्नती, ७५ टक्के सरळसेवा, त्याच्यामुळे अनुशेषाची सुध्दा अडचण निर्माण होते. आणि या ठिकाणी आरोग्य निरिक्षकांसाठी अशी आकडेवारी दर्शविली आहे की, एकुण पदे १८ आहेत. माझ्या सन्माननिय मित्रांना एक कल्पना देतो की, तुम्ही या ५ वर्षामध्ये पाहिले असेल की, माझा हा प्रश्न ५ वा किंवा ६ वा असेल. प्रश्न विचारतांना आम्ही एखादया इमारतीचा एफएसआय किती आहे तिला मंजुरी आहे किंवा नाही, याचे काय झाले? त्याचे काय झाले? अशा प्रकारचा प्रश्न विचारण्यामध्ये मला काही रस नाही. याबाबत कुणाला राग येत असेल तर मी क्षमा मागतो. मी याठिकाणी जो प्रश्न विचारला आहे तो अतिशय महत्वाचा आहे. अनुशेषाचा प्रश्न आहे, कृपया याबाबतीत कुणीही वाईट वाटुन घेवु नये. माझी तर अशी विनंती आहे की जोपर्यंत हा प्रश्न निकाली निघत नाही तो पर्यंत हा प्रश्न चालु ठेवावा. आणि जर का वेळ येत असेल तर येणा—या महासभेमध्ये या प्रश्नावर चर्चा करण्याची वेळ येत असेल तर.......

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—**आपला हा प्रश्न ५—६ महासभा चालेल ना? त्यासाठी आपणांस सुचना दिलेल्या आहेत ना?

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—**मा. महापौरजी, प्रश्नोत्तराचा कालावधी वाढविला पाहिजे. एका प्रश्नाला एवढा वेळ लागला तर त्यापुढील प्रश्न कधी येतील?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—दुसरा प्रश्न चर्चेस येवु नये म्हणुन हे जाणिवपुर्वक केले जात आहे. वेळ काढु पणा करु नका.

मा. सदस्य श्री. नाना पवार :—बाकी विषयांची तर मला काही माहिती नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—त्यांनी तर सांगितले ना की ६ महिन्यामध्ये अनुशेष भरला जाईल म्हणुन. तुम्ही दुसरा प्रश्न विचारला अशा प्रकारे तुम्ही आणखी किती प्रश्न विचारणार?

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—मा. महापौर व आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी विचारलेल्या निष्कासना बाबतीतच्या एका प्रश्नावर एक तास चर्चा चालली होती व यांचा तर हा एवढा महत्वाचा प्रश्न असुन त्यावर ही चर्चा होत आहे त्याबाबतीत यांना विलंब वाटत असेल तर आपणांस यावर विचार केला पाहिजे की, भुल्लर महाराज यांच्या प्रश्नावर पुढील महासभेमध्ये पुन्हा चर्चा झाली होती. त्या प्रश्नासाठी पुर्ण एकएक तासाची वेळ दिली होती.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—आम्ही अशी मागणी केली आहे की, प्रश्नोत्तराचा कालावधी वाढविला जावा. सन्माननिय श्री. नाना पवार यांना या प्रश्नासाठी वेळ दिला जावा यासाठी प्रश्नोत्तराचा कालावधी वाढविला जावा. हा प्रश्न काही महत्वाचा नाही असे आम्ही म्हटलेले नाही. अर्ध्या तासाच्या कालावधीत प्रश्नोत्तरे पुर्ण होत नाहीत. त्यासाठी आणखी दोन—तीन तासाची वेळ दिली जावी.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :— बोलु दया नाहीतर श्री. नाना पवार यांच्यावर कारवाई होईल?

मा. सदस्य श्री. नाना पवार :—आयुक्त साहेब, आपल्याकडे जे कर्मचारी चांगले काम करीत असतील ज्याच्याकडे गुणवत्ता आहे, अशा कर्मचा—यांना पदोन्नती दयायला काही हरकत नाही. आणि याठिकाणी आपल्याकडे पदे रिक्त आहेत. आणि आरोग्य निरिक्षक या पदाचा विचार केला तर आपल्याकडे सहा पदे रिक्त आहेत. आणि आपल्याकडे तीन कर्मचारी असे आहेत ज्यांच्याकडुन आपण प्रभारी आरोग्य निरिक्षक म्हणुन काम करुन घेत आहोत. तर २५ टक्के आणि ७५ टक्के हा जो निकष आहे त्यामध्ये जर का कायदेशीररित्या बदल केला तर त्या कर्मचा—यांना आपल्याला अधिकृतपणे पदोन्नती देता येईल. आपण अनेक वर्षापासुन त्यांच्याकडुन काम करुन घेत आहोत. आरोग्य निरिक्षक म्हणुन आपल्याकडे पदे रिक्त आहेत. परंतु आपली अडचण काय आहे की ७५ टक्के सरळसेवेने व २५ टक्के पदोन्नतीने पदे भरावयाची आहेत. कायदेशीर बाबी तपासुन यामध्ये जर का बदल करता आला, आपल्याला येथे आरोग्य निरिक्षकाची आवश्यकता सुध्दा आहे. असे नाही की आवश्यकता नाही. तीन कर्मचा—यांकडुन आपण प्रभारी आरोग्य निरीक्षक म्हणुन काम करुन घेत आहोत. ज्या कर्मचा—यांकडुन आपण काम करुन घेतो त्यांना त्याचा मोबदला सुध्दा मिळाला पाहिजे हे महानगरपालिकेचे शासन व प्रशासनाचे सुध्दा कर्तव्य आहे. मी सर्व सदस्यांना विनंती करतो की, अनुशेष पुर्ण भरण्यासाठी जे—जे काही आवश्यक असेल ते सहकार्य प्रशासनाला दयावे. तर आयुक्त साहेब या ठिकाणी आपण असे सांगावे की, उल्हासनगर महानगरपालिकेतील अनुशेष लवकरात लवकर किती कालावधीमध्ये आपण पुर्णपणे भरणार आहात?

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—सन्माननिय महापौरजी, मला असे वाटते की, प्रश्नोत्तराचा कालावधी संपण्यात आला आहे. आता वेळ वाढविण्यात यावी. नाहीतर त्यासाठी मतदान घ्या.

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मला तर हा प्रश्न महत्वाचा वाटतो. गेल्या दहा वर्षापासुन मी महापालिकेते येते, मला माहित सुध्दा पडत नाही की येथे भरती कशी होते आणि कुठली मुले भरती होतात व त्याबाबतची जाहिरात कोणत्या वर्तमानपत्रात येते. आणि आता जर हे म्हणत असतील तर, आपले मा. सदस्य का मध्ये—मध्ये बडबड करतात मला हे समजत नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—आम्ही मध्ये—मध्ये बडबड करत नाहीत. प्रश्नोत्तरासाठी वेळ वाढवुन दयावा असे आम्ही म्हणतो. जेणेकरुन त्यांनी या प्रश्नावर बोलावे. या प्रश्नावर त्यांनी चांगला उजेड पाडलेला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—भलेही या प्रश्नावर सहा महिने महासभेत चर्चा होवो आम्हांला त्याबाबत काही हरकत नाही. परंतु तो योग्य पध्दतीने विचारला पाहिजे. ते प्रश्न विचारत आहेत आणि हे शांतपणे उभे आहेत. काही माहिती देत नाहीत हे काय चालले आहे?

मा. सचिव :—प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :—प्रश्नोत्तराचा कालावधी संपण्याचे जाहिर करण्याआधी आपण या मुद्दयाबाबत मतदान घ्या. प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा केला जावा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा केला जावा.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—हे आपण जाणीवपुर्वक करत आहात. आपणांस मागासवर्गीयांची भरती करावयाची नाही असे दिसत आहे. मागील महिन्यामध्ये सुध्दा हा प्रश्न महासभेत चर्चेस आला होता परंतु त्यावेळेस तो पुढे ढकलण्यात आला.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—हा प्रश्न पुढील महासभेत सुध्दा आला पाहिजे. तोपर्यंत आम्ही त्यावर अभ्यास करु. या विषयाबाबत आमच्याकडे अधिक माहिती नाही. श्री. नाना पवार यांनी अधिक माहिती दयावी. व त्यांना हे माहित आहे का की प्रश्न कसा विचारला जातो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—जोपर्यंत या प्रश्नावर चर्चा पुर्ण होत नाही तोपर्यंत प्रश्नोत्तरावरील चर्चा चालु ठेवली जावी.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—मा. महापौरजी, हा अतिशय आवश्यक असा प्रश्न आहे.

मा. सदस्य श्री. नाना पवार :—मा. महापौरजी, मी येथे आता जो अनुशेषाचा प्रश्न उपस्थित केला त्याचे प्रशासनाकडुन अजुन उत्तर मिळालेले नाही. हा जो माझा प्रश्न आहे त्यावर चर्चा चालु ठेवावी.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—मा. महापौरजी, हा प्रश्न पुढील महासभेत पुन्हा चर्चेस आला पाहिजे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—मा. महापौरजी, सभागृहाचे मत असे आहे की, यापुर्वी प्रश्नोत्तराचा कालावधी जसा एक तासाचा होता तसा यावेळी सुध्दा तो असावा. त्यासाठी भलेही आपण मतदान घ्या. कारण की हा प्रश्न केवळ सत्ताधारी पक्षासाठी राहिला नाही आणि कोणाच्या विरोधातही नाही. हा प्रश्न प्रशासनाच्या सुधारणेसाठी आहे म्हणुन मला असे वाटते की त्यावर कुणाची हरकत असता कामा नये.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—मा. महापौरजी, हा प्रश्न मागील महासभेपासुन चालत आलेला आहे. त्यावेळेस सुध्दा त्यावर काही चर्चा चालु झालेली नाही. आता ही आपण तो पुढे ढकलत असाल तर यावरील चर्चा आणखी एक महासभा पुढे चालु राहिल. याचा अर्थ असाच येईल की, मागासवर्गीयांची भरती व्हावी असे आपल्या मनात नाही. यासाठी प्रश्नोत्तराचा कालावधी वाढविला जावा कारण की यापुढील जे काही कामकाज आहे ते काहीच नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—यापुढील प्रश्न दुनिचंद कालानी कॉलेज संदर्भातील आहे तो यावेळेस चर्चेस घ्यायचा नाही. त्यासाठीच ही उपाययोजना चालु आहे.

मा. सदस्य श्री.राजेश वदारिया:—मा. महापौरजी, जसे की प्रश्नोत्तराचा कालावधी वाढविला जावा किंवा नाही असा कोणताही प्रश्न किंवा प्रस्ताव सभागृहापुढे नाही. म्हणुन त्यावर मतदानाची कोणतीही आवश्यकता नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौरजी, महासभेचे जे काही कामकाज चालते त्याची कार्यवाही महासभा निश्चित करते. प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासावरुन अर्ध्या तासाचा करण्याचा अशासकीय प्रस्ताव मी मांडला होता. जसे की हा अनुशेषाचा मुद्दा आहे तो मागील महिन्यापासुन चालु आहे. त्यावर चर्चा करण्यासाठी प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासाऐवजी एक तासाचा केला जावा. नाही तर याबाबत श्री. लाल पंजाबी यांनी म्हटल्याप्रमाणे सभागृहाचे मत घ्या. महासभा कामकाजाबाबत महासभाच निर्णय घेते. त्यानुसार आपण प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा करा. किंवा त्याबाबतीत आपण मतदान घ्या. सभागृहाचे जे मत असेल त्याप्रमाणे कार्यवाही करा. आमच्याकडे बहुमत आहे.

मा. महापौर :— आमचे सचिव साहेब सांगतील की, कोणत्या नियमानुसार प्रश्नोत्तराचा कालावधी किती वेळ चालला पाहिजे? प्रश्नोत्तराचा कालावधी कोणत्या कलमानुसार चालतात हे सर्वात प्रथम सांगितले पाहिजे व त्यावरील वेळ निश्चित कसा केला जावा हे सांगीतले जावे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—आमच्या सचिव साहेबांनी हे सुध्दा सांगावे की, बहुसंख्य सदस्यांच्या वतीने जर एखादी मागणी केली जात असेल तर ती पुर्ण केली जाते किंवा नाही? त्याबाबतीत काही तरतुद आहे?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—या विषयाचे नावच प्रश्नोत्तराचा तास असा आहे. प्रश्नोत्तराचा अर्धातास असे नाव नाही. ते समजुन घेतले पाहिजे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—मा. महापौरजी, प्रश्नोत्तराच्या तासाबाबतीतील तरतुदीबाबत आपण जे बोलत आहात प्रथम येथे कायदयातील तरतुद व प्रथा याबाबतीत सभागृहाचे जे मत होते ते सुरुवातीपासुन असे होते की, ब—याचशा दिवसापासुन प्रश्नोत्तराच्या तासाचा कालावधी एक तासाचा होता. कायदयानुसार पाहिले तर कायदयामध्ये याबाबतीत अर्ध्यातासाची तरतुद आहे. परंतु या सभागृहाची परंपरा अशी राहिली आहे की, आपल्या कार्यकालावधी अगोदर सुध्दा, परंतु जेव्हापासुन आपला कार्यकाळ आला आहे त्यानुसार आम्हांला असे वाटते की, याअगोदर जे कोणी महापौर होते त्यांना याबाबत प्रश्नोत्तराचा तास कितीही चालो अशी चिंता नव्हती. प्रश्नोत्तरे अधिकाधिक चर्चेस येत असतील, प्रशासनामध्ये सुधारणा होत असेल तर त्यामध्ये चुकीचे काय आहे? ही एक सर्वसंमतीची गोष्ट होती. परंतु आपण ती बहुमताच्या जोरावर तोडली आहे. मी कायदयाची गोष्ट करत नाही. कायदा तर असा आहे की, प्रत्येक प्रभाग समितीच्या निवडणुका एप्रिल मध्ये झाल्या पाहिजेत. आपण त्या कधी केल्या का हे आपण आपल्या मनाला विचारा. सार्वमताची गोष्ट वेगळी असते व प्रथेची गोष्ट वेगळी असते. आमच्या महापालिकेत प्रथा अशी होती की, प्रश्नोत्तराचा तास एक तास चालावा. कायदयानुसार पाहिले तर तो कालावधी अर्ध्या तासाचा आहे. परंतु सार्वमत पाहता प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा आहे. आपण संपुर्ण सभागृहाला मान दिला पाहिजे, सन्मान दिला पाहिजे. व या अगोदर जशी एक तासाची प्रथा होती ती चालु ठेवली पाहिजे. कायदा बाजुला ठेवुन या अगोदर आपण जसे करत होतो तसे केले पाहिजे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— सचिव साहेब, आपण सांगा काय तरतुद आहे?

मा. सचिव :—महासभा, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाज विषयक नियम १७ अन्वये प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासाचा असला पाहिजे. नियम या प्रकारचा आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— परंतु या अगोदर कसे होते, मी अगोदरच म्हटले की, कायदयाची गोष्ट केली तर कायदयामध्ये बरीच काही तरतुद आहे. प्रभाग समितीच्या निवडणुका आपण घेतल्या नाहीत.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :—या अगोदर प्रश्नोत्तराचा कालावधी एक तास का चालविला जात होता? व असाच व्यर्थपणे चालविला जात होता काय? मागील दहा वर्षापासुन प्रश्नोत्तराचा तास एक तासाचा चालविला जात होता. तो काय बेकायदेशीर होता काय? त्याबाबत उत्तर दया ना. त्यावेळेस कायदा नव्हता काय?

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :— प्रश्नोत्तराचा कालावधी एकतासाचा ठेवता येवु शकत नाही काय?

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—प्रश्नोत्तराचा कलावधी वाढविण्याची रित काय आहे?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—मा. महापौरजी, सचिव साहेब, बहुसंख्ये सदस्य तर प्रश्नोत्तराचा कालावधी वाढवु इच्छित असतील तर त्याबाबतीत कायदयात काय तरतुद आहे?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— सचिव साहेब, प्रश्नोत्तरासाठी कायदयात अर्ध्या तासाची तरतुद आहे तर यापुर्वी प्रश्नोत्तराचा कालावधी एक तास कसा होता? त्यावेळेस सुध्दा आपण सचिव होता त्यावेळेस आपण सांगावयास पाहिजे होते की, कायदयात अर्ध्या तासाची तरतुद आहे. आज आम्हांस वाटते की, प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा असावा. यावेळेस आपण असे सांगतात की, कायदयात अर्ध्या तासाची तरतुद आहे. याकामी कायदयात कसा बदल करता येईल ते आम्हांस सांगा.

मा. सचिव :—या अगोदर प्रश्नोत्तराचा कालावधी जो एक तासाचा केला होता त्यावेळेस आपण सर्वांनी मिळुन एकमताने ठराव पारीत केला होता. ठराव झाल्यानंतर आपणा सर्वांचे एकमत होते त्यामुळे कायदा बाजुला सारुन ही प्रथा चालु होती. त्यानंतर सुध्दा ठराव करुन प्रश्नोत्तराचा कलावधी एक तासाच्या ऐवजी अर्धातास केला आहे. प्रश्नोत्तराचा कालावधी अर्धा तासाच्या केल्याबाबतचा आपलाच ठराव आहे. व एक तासाच्या कालावधी बाबतचा आपलाच ठराव होता. मात्र कायदयामध्ये या कामी अर्ध्या तासाचीच तरतुद आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—आम्ही पुन्हा प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा करण्याबाबत ठराव करु इच्छित आहोत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा असला पाहिजे असे जर सर्वांना वाटत असेल व सभागृहाचेही तसे मत असेल तर त्यामध्ये चुकीचे काय आहे? असे काही आहे काय की, ही चर्चा बेकायदेशीर होईल?

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :—मा. महापौरजी, अदयापपर्यंत सभागृहासमोर याबाबतचा कोणताही प्रस्ताव नाही. जर असा कोणताही प्रस्ताव नाही तर त्यावर निर्णय कसा घेणार? सभेचे कामकाज चालु असतांना आता अशाप्रकारचा ठराव कसा येईल?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—आम्ही आता प्रस्ताव देत आहोत. आमचा हा प्रस्ताव आहे आम्ही हा प्रस्ताव ठेवला आहे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. सदस्य श्री. राजेश वदारियाजी सभागृहामध्ये असा प्रस्ताव ठेवला जावु शकतो.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—आम्ही तोच प्रस्ताव ठेवत आहोत ना?

मा.महापौर :—सचिव साहेब, सभागृहाचे कामकाज पुढे चालवावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—आपण याबाबतीत सांगा तर खरे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—दोन वेळेस जे दोंन ठराव पारीत केले एकावेळेस एक तासाचा व नंतर अर्ध्या तासाचा जो प्रश्नोत्तराचा कालावधी केला तो ठराव कोणी मांडला होता व तो कसा आला? तो ठराव सुध्दा सभेचे कामकाज चालु असतांनाच आला होता व तो पारीत केला होता. व आज आम्ही प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा करण्याबाबतचा जो ठराव मांडत आहोत. या अगोदर जे दोन ठराव झाले ते सभेचे कामकाज चालु असतांनाच सभेपुढे आले व पारीत झाले. तर मग आजचा ठराव आता का आणु शकत नाही?

मा. सचिव :—त्यासाठी आपणांस अशासकिय प्रस्ताव देवुन नोटिस दयावी लागते.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—मा. महापौरजी, आपण आदेश दिला आहात की, सभेचे पुढील कामकाज चालु केले जावे. तर कृपया सभेचे पुढील कामकाज चालविले जावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—याबाबत आमचा एक हरकतीचा मुद्दा आहे.

मा. सचिव :—हरकतीचा मुद्दा कोणत्या विषयावर? इमप्रोप्रायटी.....

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— तो मुद्दा इतिवृत्तांताच्या वेळेस आम्ही घेवु.

मा. सचिव :—तो मुद्दा आपणास लक्षवेधी सुचनेनंतर घेता येईल.

कृपया लक्ष दयावे. येथे काही लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या आहेत, त्या पुढील प्रमाणे आहेत.

लक्षवेधी सूचना क्र. १

सुचकाचे नाव :– श्री. अंकुश म्हस्के

**विषय :–** उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत झाल्याबाबत.

लक्षवेधी सूचना क्र. २

सुचकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

**विषय :–** डॉल्फीन ते शांतीनगर व नाका नं. १० ते आय.डी.आय. कंपनी पर्यंतचे रस्ते आजतागायत अर्धवट स्थितीत असल्याने नागरीकांना व वाहनांना सदर रस्त्यावरुन ये–जा करणे गैरसोयीचे होत असल्याबाबत व अपघातही होत असल्याबाबत लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सूचना क्र. ३

सुचकाचे नाव :– श्री. अशोक ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती बेबी वसिटा

**विषय :–** जास्त पावसामुळे उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ पर्यंत रस्त्यावर खड्डे पडले असून ते भरणेबाबत.

लक्षवेधी सूचना क्र. ४

सुचकाचे नाव :– श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

**विषय :–** आर.के.टी. महाविद्यालयातील विद्यार्थीनीने उल्हासनगर रेल्वे स्थानकाजवळील पूलावरुन उडी घेवुन आत्महत्या केल्याबाबत तसेच पुलाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत.

लक्षवेधी सूचना क्र. ५

सुचकाचे नाव :– श्री. देवेंद्रसिंह खेमाणी

अनुमोदकाचे नाव :– श्री. चंदाराम मोकल

**विषय :–** श्री. ठाकुर बेहरानी पालिका सदस्य यांचे अर्नहतेच्या प्रकरणाबाबत.

याशिवाय श्री. लाल पंजाबी यांचा हरकतीचा मुद्दा आहे. त्याचा विषय असा आहे......

विषय :– इट इज द कॉन्स्टीटयुशनल डयुटी ऑफ हॉनरेबल मेयर टु होल्ड द इलेक्शन टु चेअरमन ऑफ वार्ड कमेटी इन एव्हरी इअर फर्स्ट मंथ ऑफ एव्हरी फायनान्शीअर इअर दो दी इलेक्शन ऑफ वार्ड कमेटी नं. श्री ॲण्ड फोर टेकन ऑन २७ मे २००६ दिस इअर बट पोस्टपॉण्ड इन डिफीनेटली इट इज देअर फॉर रीक्वेस्ट टु हॉनरेबल मेयर टु होल्ड दी इलेक्शन इमेजिअटली.

**मा. महापौर :–** अ.क्र. ३ व ५ या दोन लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहेत.

**मा. सचिव:–**मा. महापौरांनी केवळ दोन लक्षवेधी सुचनांना मान्यता दिली आहे. ज्या लक्षवेधी सुचनांना त्यांनी मान्यतादिली आहे त्या मी वाचुन दाखवितो.

लक्षवेधी सूचना क्र. ३

सुचकाचे नाव :— श्री. अशोक ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती बेबी वसिटा

विषय :— जास्त पावसामुळे उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ पर्यंत रस्त्यावर खड्डे पडले असून ते भरणेबाबत.

आणि दुसरी लक्षवेधी सुचना क्र. ५ आहे....

लक्षवेधी सूचना क्र. ५

सुचकाचे नाव :— श्री. देवेंद्रसिंह खेमाणी

अनुमोदकाचे नाव :— श्री. चंदाराम मोकल

विषय :— श्री. ठाकुर बेहरानी पालिकस सदस्य यांचे अर्नहतेच्या प्रकरणाबाबत.

<u>मा. सचिवः—</u>लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत श्री. अशोक ठाकुर यांनी आपली लक्षवेधी सुचना मांडावी.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>मा. महापौरजी, रेल्वे स्टेशन येथिल पुलाबाबतची जी लक्षवेधी सूचना आहे ती एवढी महत्वाची लक्षवेधी सूचना असुनही ती आपण का मान्य केली नाही?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> तेथे किती आत्महत्या झाल्यानंतर त्या पुलाबाबतची लक्षवेधी सूचना आपण मान्य कराल?

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—</u>आणखी किती लोकांच्या आत्महत्या पाहिजेत?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>त्याबाबत आम्हांस चर्चा करायची आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>मा. महापौरजी, आयडीआय कंपनीकडे जाणारा रस्ता त्या ठिकाणी दोन मोठया झोपडपट्टया आहेत. गुलशन नगर येथे डॉ. जाकिर हुसेन नावाची एक शाळा आहे, तेथिल रस्त्यावरुन लहान—लहान मुले चालु शकत नाहीत. अशी त्या रस्त्याची अवस्था आहे. आणि महत्वाचे तुम्हांला सांगतो की, त्या रस्त्याच्या शुभारंभासाठी, मा. महापौरजी आपण जरा लक्ष दिले तर बरे होईल. मा. आयुक्त साहेब, तुम्हीही ऐकुन घ्या. येथे जरा लक्ष दया. आमच्यावर पक्षपात होत आहे. काय चालले काय आहे तुमच्या प्रशासनाचे? तीन वर्षापासुन तो रस्ता मंजुर झाला आहे. आमदार भाई जगताप, त्यांचे कार्यकर्ते, या शहराचे आमदार श्री. पप्पु कालानी व तत्कालीन आयुक्त श्री. आर.के. सोनवणे जे होते त्यांनी जकात नाका क्र. १० आयडीआय कंपनीकडे जाणा—या त्या रस्त्यावर शुभारंभाचे नारळ फोडले होते. हा रस्ता का तयार होत नाही याचा खुलासा झाला पाहिजे. आम्ही म्हणुनच लक्षवेधी दिली आहे. दोन—दोन फुट खोल असे खड्डे झाले आहेत. रोज तेथे अपघात होतात, रिक्षा पल्टी होतात. आयडीआयकडे जाणा—या त्या झोपडपट्टीकडे कुणी रिक्षा घेवुन जायला तयार होत नाहीत. रात्रीच्या वेळेस एखादया महिलेला किंवा मुलाला दवाखान्यात न्यायचे म्हटले तर रिक्षा मिळत नाही तर अशा स्थितीत तो रस्ता आहे, त्याच्याकडे लक्षवेधण्यासाठी आम्ही ती लक्षवेधी सुचना दिली आहे. ती लक्षवेधी आज का स्विकृत करण्यात आली नाही? आणि आमदार स्वत: तेथे दोन वर्षापुर्वी रस्ता शुभारंभाबाबत नारळ फोडतात, त्या रस्त्याचे काम होत नाही ही लज्जास्पद गोष्ट आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चोधरी:—</u>मा.महापौरजी, आम्ही येथे एक लक्षवेधी सूचना दिली होती ती अतिशय महत्वपुर्ण अशी होती. परंतु आपण जाणीवपुर्वक ती लक्षवेधी सूचना स्विकृत करत नाहीत. असा आम्ही आपणावर आरोप करत आहोत. त्या लक्षवेधीद्वारे डॉल्फीन क्लब पासुन शांतीनगर पर्यंत जाणा—या रस्त्याचा मुद्दा मांडला आहे. १९९९ मध्ये या रस्त्यास या सभागृहात मंजुरी दिली होती परंतु त्या रस्त्याचे काम होत नाही. परंतु

आपण शहर विकासाच्या गोष्टी करत आहात. मात्र आम्ही असे म्हणतो की, आपण विनाशाच्या गोष्टी करत आहात. शहर विकासाबाबत बोलत नाही. याबाबत वारंवार प्रश्न विचारले जातात परंतु ते आपण येथे चर्चेस घेत नाही. येथिल शासन व प्रशासनाची चामडी गेंडयासारखी जाड झाली आहे असे आम्हांला वाटत आहे. तरी कृपया या शहरातील नागरीकांच्या सुविधेकडे लक्ष दिले जावे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. महापौर, मा. आयुक्त, याच्या अगोदर सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी या विषयावर तीन वेळा लक्षवेधी मांडली. उल्हासनगर रेल्वे पुलाचे जे काम सुरु आहे ते अतिशय संथ गतीने चालु आहे. त्यामुळे महाविद्यालयामध्ये येणा—या जाणा—या विदयार्थ्यांना व प्रवासांना धोक्याचे होत आहे. तेथे एक अपघात सुध्दा झालेला आहे. परंतु जाणुनबुजुन हेतुपुरस्कृत या बाबतची लक्षवेधी सुचना स्विकृत केली जात नाही. आम्ही लक्षवेधी सूचना टाकतो कशासाठी? केवळ तुमचे लक्षवेधण्यासाठी . परंतु शासन आणि प्रशासन हे कोणीच लक्ष देत नाही. परवा तेथे एक मुलगी पडली. मी आपणांस दुरध्वनीवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु त्यावेळेस आपण मुंबई येथे होता. त्या पुलाला रेलींग असते तर ती मुलगी तेथुन उडी मारु शकली नसती. तेथे पुलाचे काम सुरु आहे. काम प्रगतीपथावर आहे असे लिहिले आहे परंतु कामामध्ये कोणत्याही प्रकारची प्रगती नाही. काम ठप्प आहे. दोन दिवसापुर्वी तेथे एका मुलीने आत्महत्या केली. काल संध्याकाळी साडे पाच वाजता तिचे प्रेत मिळाले.

मा. महापौर :—जी लक्षवेधी स्विकृत केली जाते तिच्यावरच चर्चा होते. पाच लक्षवेधींपैकी फक्त दोनच स्विकृत केल्या जावु शकतात ना?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—आमचे हेच दुखणे आहे आपण ज्या लक्षवेधीला प्राधान्य दिले पाहिजे त्याला आपण देत नाही , जो विषय गंभीरतेने घ्यायला पाहिजे तो गंभीरतेने घेत नाहीत. आणखी किती आत्महत्या होवु देणार आहात? १७ वर्षाच्या मुलीने आत्महत्या केली आहे. हे प्रकरण काय आपणांस गंभीर वाटत नाही काय?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— शहर गेले ''बाढ मे''. यांना श्री. ठाकुर बेहरानींचा यांचा मुद्दा येथे उपस्थित करणे महत्वाचे वाटते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—त्यादिवशी आमच्या प्रभागातील कुणीही संपुर्ण रात्रभर झोपले नाही. या पुलाबाबत सभागृहामध्ये तीन वेळा लक्षवेधी सूचना आल्या आहेत परंतु त्या स्विकृत केल्या नाहीत. या विषयावर चर्चा झालेली आहे परंतु कामाबाबत काहीही प्रगती नाही. काम जिथेच्या तिथे ठप्प. तेथे लिहीले आहे ''काम प्रगतीपथावर आहे''. कोणत्या पथावर आहात तुम्ही? सर्व सत्यनाश झाले आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—शहराचा विचार करत नाही म्हणुन तर संपुर्ण शहराचा सत्यानाश झालेला आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—शहर विकासाचा मुद्दा चर्चेस घ्यायचा नाही, श्री. ठाकुर बेहरानीचा मुद्दा चर्चेस घ्यायाचा. श्री. ठाकुर बेहरानीचे प्रकरण तर न्यायालयात आहे त्याचे तुम्ही काय करणार? शहर विकासाचा मुद्दा सोडुन यांच्यासाठी श्री. ठाकुर बेहरानी यांचा मुद्दा महत्वाचा आहे. प्रभाग क्र. २० च्या पोटनिवडणुकीमध्ये जी स्थिती झाली तीच स्थिती सर्व शहर भर होईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. सचिव साहेब, श्री. ठाकुर बेहरानी यांच्याबाबतीत सभागृहामध्ये एक लक्षवेधी सूचना चर्चेस आली आहे. त्यांच्याबाबतीत न्यायालयात प्रकरण प्रलंबित असतांना अशी लक्षवेधी सूचना सभागृहात चचेत आणता येवु शकते काय?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— हे सुध्दा बरोबर आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे ते चर्चेसाठी सभागृहात आणु शकतो का?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— त्यांना चर्चा करु दया , न्यायालयात मी सांगेन, यांना सविस्तर चर्चा करु दया.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**या विषयावर सभागृहात चर्चा होवु शकते काय?

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—**श्री. जमनु पुरस्वानी जी कृपया आपण गप्प बसा. यांना चर्चा करु दया.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**मा.महापौरजी, कित्येक वेळा असे झाले आहे की, कायदयानुसार दोन लक्षवेधी सुचना स्विकृत केल्या जावु शकतात परंतु कधी कधी काही विषय महत्वाचा असल्याने दोन—दोन विषय एकत्रीत करुन त्यावर चर्चा करण्याची संधी सदस्यांना दिली जात होती. तरी आपण सदस्यांच्या भावनांचा विचार करुन त्यांना चर्चा करण्यासाठी परवानगी दयावी. चर्चा करुन त्यावर निर्णय घ्या.

**मा.महापौर:—**श्री. अशोक ठाकुर आपण आपली लक्षवेधी सूचना मांडा. आपणांस असे वाटत असेल की, एखादा विषय वगळावा व दोन विषय एकत्रित करुन त्यावर चर्चा करावी असे जर आपणांस वाटत असेल तर रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे जे काम आहे त्यामध्ये या पुलाचेही काम घेवुन त्यावर चर्चा करु या.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** अधिकारी त्याचे उत्तर देतील काय?

**मा. महापौर :—**रोड कोणता आहे? डॉल्फीनचा ना?

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**मा. महापौरजी म्हणत आहेत व दोन विषय एकत्रित करत आहेत तर अधिकारी उत्तर देतीलच ना? कारण हा ही एक महत्वाचा विषय आहे.

**मा. सचिव:—**लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सूचक आहेत श्री. अशोक ठाकुर व अनुमोदक आहेत श्रीमती बेबी वसिटा

लक्षवेधी सूचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचकाचे नाव :— श्री. अशोक ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती बेबी वसिटा

**विषय :—** जास्त पावसामुळे उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ पर्यंत रस्त्यावर खड्डे पडले असून ते भरणेबाबत.

उल्हासनगरमध्ये जास्त पावसाने कॅम्प क्र. २ ते ५ पर्येतचे वाहतूक रोड पुर्णपणे खड्डे —खोदणे ग्रस्त झालेले आहे. त्यामुळे रोजी—दररोजी काही ना काही अपघात घडतोय व रोडावर सतत वाहतुक जात असते त्यांनी लोकांना येण्या—जाण्याचा पण फार त्रास होत आहे.

तरी आपणांस विनंती पूर्वक अर्जाद्वारे कळवितो की, उदया दिनांक १९/८/२००६ रोजीची जनरल बॉडी मिटींगमध्ये उपरोक्त विषयावर चर्चा करिता परवानगी मिळावी अशी आम्ही विनंती पुर्वक अर्ज करीत आहोत. प्रशासनाने हे वाहतुक रोडाचे खड्डे भरपाई मध्ये दुर्लक्ष कलेले आहे असे आम्हांला वाटते त्यासाठी आम्ही ही लक्षवेधी सुचना देत आहोत.

---

# (दुसरा भाग)

---

सुचकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

**विषय :—** डॉल्फीन ते शांतीनगर व नाका नं. १० ते आय.डी.आय. कंपनी पर्यंतचे रस्ते आजतागायत अर्धवट स्थितीत असल्याने नागरीकांना व वाहनांना सदर रस्त्यावरुन ये—जा करणे गैरसोयीचे होत असल्याबाबत व अपघातही होत असल्याबाबत लक्षवेधी सूचना

उपरोक्त लक्षवेधीने विनंती पुर्वक कळवू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत शहरातील ३३ मुख्य रस्त्यांचे नुतनीकरण व रुंदीकरणाचा कार्यक्रम राबविला असून सदर रस्त्या अंतर्गत डॉल्फीन ते शांतीनगर व नाका नं. १० ते आय.डी.आय. कपनी पर्यंतच्या रस्त्याचा समावेश करण्यात आला होता. सदर रस्त्याचे नुतनीकरण व रुंदीकरणापोटी जवळपास ७५ टक्के इतकी रक्कम खर्च करण्यात आली असून देखिल सदरचे रस्ते आजतागायत अर्धवट स्थितीत असल्याने नागरीकांना व वाहनांना सदर रस्त्यावरुन ये—जा करणे गैरसोयीचे होत आहे. अनेक अपघातही होत आहेत. सदरचे महत्वाचे विषयावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळावी ही नम्र विनंती.

---

# (तिसरा भाग)

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक ३

सुचकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

**विषय :—** आर.के.टी. महाविद्यालयातील विद्यार्थीनीने उल्हासनगर रेल्वे स्थानकाजवळील पूलावरुन उडी घेवुन आत्महत्या केल्याबाबत तसेच पुलाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत.

उपरोक्त लक्षवेधीने विनंती पुर्वक कळवू इच्छितो की, मागील वर्षाचे माहे जुलै, २००५ मध्ये उल्हासनगर शहरात भयानक पुरपरिस्थिती निर्माण होवून शहरातील घरेदारे, रस्ते, नाले नाल्या, यांचे मोठया प्रमाणात नुकसान होवून वित्तहानी झाली होती. याच कालावधी उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील पुल व पुलाचे रेलींग पुर्णपणे वाहून गेले होते. सदर पुलाचे दुरुस्तीचे काम मागील वर्षापासून महानगरपालिकेने हाती घेतले असून ते संथगतीने करण्यात येत असून अदयापपर्यंत अर्धवट स्थितीत आहे पुलाचे काम पुर्ण होवून, पुलाला रेलींग न बसविली गेल्याने महापालिकेच्या हलगर्जीपणामुळे महाविद्यालयीन विद्यार्थीनीस पुलावरुन उडी मारुन आत्महत्या करणेस संधी मिळाली आहे. सदरचे काम करणारे ठेकेदारास बिले अदा केली न गेल्याने काम बंद असल्याचे समजते महानगरपालिका अदयाप किती निष्पाप जिवांचे बळी दिल्यानंतर पुलाचे काम पुर्ण करणार आहे. सदरचे लक्षवेधीवर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

---

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, पावसामुळे संपुर्ण उल्हासनगर शहरातील रस्ते खराब झाले आहेत. रस्त्यांमध्ये मोठ—मोठे खड्डे पडले असल्याने अपघात होत आहे. नागरीक त्रस्त आहेत. खड्डयांमध्ये पाणी भरत असल्यामुळे शहरांमध्ये रोगराई पसरली आहे. मला असे वाटते की, प्रशासन झोपले आहे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**खड्डयांमुळे लोक शिव्या देत आहेत.

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :—** उल्हासनगर वाशियांवर अन्याय केला जात आहे. जकात, मालमत्ता कर, पाणी पट्टी या रुपाने बराचसा पैसा नागरीकांकडुन वसुल केला जात आहे. त्याच्या मोबदल्यात हे प्रशासन काय देत आहे? चारही बाजुने दुर्गंधी, पाण्याचे साम्राज्य, शहरातील रस्ते खराब, पाण्याची समस्या, रोगराई पसरत आहे. त्याबाबत मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की, ड्रेनेजचे जे काम आहे त्याचे कामगारांना कामावरुन का काढले आहे. आणखीही ब—याचशा समस्या आहेत. रस्त्यावरील खड्डे लवकरात लवकर भरले जावेत.

पुढे येणारे गणपती, नवरात्र, दिपावली हे सण लक्षात घेता रस्त्यावरील खड्डे लवकरात लवकर भरले जावेत. धन्यवाद।

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>मा. महापौरजी, आमचे श्री. अशोक ठाकुर यांनी जी लक्षवेधी सूचना दिली आहे ती अतिशय महत्वपुर्ण अशी आहे. कॅम्प नं. १ ते ५ मध्ये संपुर्ण शहरामध्ये रस्त्यांवर फार मोठे खड्डे पडले आहेत. आपण जर स्कुटर किंवा कार मधुन बाहेर गेलात तर रस्त्यांवरील खड्डयात साठलेल्या पाण्यामुळे कुठे खड्डा आहे हे आपणांस दिसुन येणार नाही. व मी दुसरी एक सूचना देवु इच्छितो की, रस्त्यांवर जेवढे काही खड्डे आहेत ते ३१ ऑगस्ट पुर्वी भरण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने ठाणे जिल्हयातील सर्व नगरपालिका, महानगरपालिकांना आदेश दिले आहेत. मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की, याबाबतीत आपल्या प्रशासनाने काय तयारी केली आहे? असे तर नाही ना की आपल्या महानगरपालिकेबाबतीत उच्च न्यायालय ताशोरे उडवेल व आपले जे नागरीक आहेत ते सुध्दा नाराज होतील. मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की, ३१ ऑगस्टपुर्वी रस्त्यावरील खड्डे भरण्याबाबतीत त्यांनी काय उपाययोजना केली आहे? रस्त्यांवरील खड्डे ते भरणार आहेत की नाहीत? जेव्हा आम्ही आपणाकडे येतो तेव्हा आपले एकच उत्तर असते की आपणाकडे पैसे नाहीत. बजेट आपणाकडे आहे, त्यामध्ये किती तरतुद करायची ते आपल्याकडे आहे. प्रत्यक्षात आपणाकडे पैसा उपलब्ध नाहीत. व आपले जे ठेकेदार उपोषणास बसले आहेत ते केवळ त्यांना त्यांच्या बिलाची रक्कम न मिळाल्यामुळे उपोषणास बसले आहेत. तर ३१ ऑगस्टपुर्वी आपण रस्त्यावरील खड्डे कसे बुजविणार आहात? बाहेरील दुस—या कुठल्या संस्थेकडुन आपण हे काम करुन घेणार आहात काय की ज्यामुळे उच्च न्यायालयाचा जो आदेश आहे त्याचे पालन होईल. हे मी आयुक्तांना विचारु इच्छितो कृपया त्यांनी उत्तर दयावे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>मा. महापौरजी, आयडीआय कंपनीकडे जाणारा जो रस्ता मी आता निदर्शनास आणुन दिला आहे त्याच्या आजुबाजुच्या परिसराचाही मी येथे उल्लेख केला आहे. गुलशन नगर, डॉ. जाकिर हुसेन हायस्कुल त्याचप्रमाणे आयडीआय कंपनीकडे जाणारा रस्ता त्याच्या डाव्या बाजुला असलेली झोपडपट्टी चार्ली वेफर्सपासुन ते आयडीआय कंपनीकडे जाणा—या रस्त्याचे काम त्यावेळचे आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांच्या काळात मंजुर केले होते. त्या रस्त्याला तीन वर्ष झाली. त्याच्या अगोदर जकात नाका क्र. १०, म्हणजेच डॉ. जाकिर हुसेन हायस्कुल आहे त्याच्या समोरचा जो रस्ता, एकच रस्ता आहे तो सुध्दा तिकडेच जातो नदीकडे म्हणजे आयडीआय कंपनीकडे. अर्धवट असलेला एक रस्ता व त्यापुढील चार्ली वेफर्स पासुन आयडीआय कंपनीपर्यंत या दोन्ही कामांचा शुभारंभ सन्माननिय आमदार व आयुक्त साहेबांनी केला होता. दोन वर्ष झाले तरी त्या रस्त्याच्या कामास सुरुवात झालेली नाही हे दु:खाने म्हणावे लागत आहे. त्या रस्त्याबाबतीत काय केले आहे? व तो रस्ता केव्हा तयार होईल? याचे या ठिकाणी उत्तर देण्यात यावे. धन्यवाद।

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सन्माननिय महापौरजी, डॉल्फीन क्लबचा हा जो रस्ता आहे त्याबाबत मागील वेळेस सुध्दा लक्षवेधी सूचना मांडली होती त्यावेळेस प्रशासनाने उत्तर दिले होते की, ९७० च्या बाजुला वखारीची जी जागा आहे ती जागा घेण्याबाबतीत न्यायालयाने आदेश दिलेला आहे व नगररचनाकारांना २१ मार्च, २००५ रोजी पत्र दिले आहे. दि. ३१/५/२००५ ला, ७/१०/२००५ व १/४/२००५ ही एवढी पत्र दिल्यानंतर त्यावर काय कारवाई केली ते सांगा. व या जागेची त्या माणसास सनद मिळाली कशी? आपल्या महानगरपालिकेने कारवाई काय केली? जो रोड आहे त्या जागेची सनद कशी मिळाली? प्रशासक शहर वसाहत यांच्या कार्यालयाने या जागेची सनद दिली कशी? या सर्व बाबीची चौकशी झाली पाहिजे. या गोष्टींकडे लक्ष दिले तर आणि न्यायालयात जर याबाबतीचे प्रकरण गेले तर त्या ऐवजी पर्यायी जागा देण्याची काही आवश्यकता पडणार नाही. तर कृपया या बाबतीत लक्ष दिले जावे व त्याच्याकडील सर्व कागदपत्राची छाननी केली जावी. त्याच्याकडील सर्व कागदपत्र बोगस आहेत. व रस्त्याच्या जागेवरील सनद मिळु शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>मा. महापौरजी, १९९९ मध्ये महानगरपालिकेच्या वतीने ३३ रस्त्याच्या रुंदीकरणाचे जे काम महापालिकेने हाती घेतले होते तेव्हापासुन डॉल्फीनपासुन शांतीनगरपर्यंतचा रस्ता तयार करण्याचे सुरु झाले आहे परंतु आजपर्यंत तो रस्ता तयार झाला नाही. का झाले नाही त्याचे कारण काय? या रस्त्यावर जवळ जवळ ७५ टक्के पैसा खर्च झाला आहे व २५ टक्के रक्कम खर्च होणे बाकी आहे व रस्त्याचे काम सुध्दा पुर्ण झालेले नाही. त्याची चौकशी केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त, मी एक गोष्ट लक्षात आणुन देवु इच्छितो की, रिजन्सी हॉल मध्ये आमचा एक जनता दरबार आयोजित केला होता. तेथे कित्येक व्यापारी आले होते तेथे एक

फार मोठा खडडा पडलेला आहे तो बुजविण्याचे काम सुरू होते ते काम अर्धवट स्थितीत येवुन थांबलेले आहे. व्यापा—यांचा धंदा व्यापार कमी झाला आहे. कृपया ही गोष्ट लक्षात घेवुन ते काम त्वरीत पुर्ण करण्यात यावे.

**मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता हया सभागृहातुन बाहेर गेल्या.** 

<u>**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**</u>ठेकेदाराचा तो मुद्दाही येणार आहे. त्यामध्ये सर्व गडबड घोटाळा आहे.

<u>**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—**</u>मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब, सध्या उल्हासनगरमध्ये रस्त्यांच्या खराब स्थितीमुळे एखादयास प्राण गमवावे लागत असेल तर आपण येथे बसुन काही उपयोगाचे नाही. रस्त्यावर असे खड्डे आहेत की ते वाचविण्यासाठी रिक्षावाले ब्रेक मारतात रिक्षा पलटी होते. ब्रेक दाबल्यानंतर रिक्षातुन मुलगा बाहेर फेकला जातो व मागुन येणा—या ट्रकखाली येवुन तो मृत्युमुखी पडतो. आपली परिस्थिती बिकट आहे ही सर्वांनाच माहिती आहे, आपल्यालाच माहिती आहे असे नाही, बाहेरही सर्वांना माहित आहे. परिस्थिती बिकट असेल तर आमचे मानधन बंद करुन तुमचेही पगार बंद करा आणि महापालिका चालवा. पुढची सभा लावा. तुम्हीही पगार घेवु नका आम्हीही मानधन घेणार नाही. जसे असेल तसे खुर्चीवर बसा नाहीतर सभा लावु नका. मी मा. महापौरजींना कळकळुन विनंती करतो जनतेच्या जिवाशी जर खेळत असाल आणि रस्त्यासाठी कुणाचा जीव जात असेल तर आम्हांला ते मानधनाचे ते ४००० रुपये नकोत, तुम्ही पगार घेवु नका. खरंच जर तुमची आर्थिक परिस्थिती बिकट असेल तर तुम्ही येथे ती घोषित करा. सरकारला कळवा की आमची आर्थिक परिस्थिती बिकट आहे आम्ही महापालिका चालवु शकत नाहीत. त्यामुळे आम्ही लोक मानधन घेण्यास तयार नाहीत तुम्हीही पगार घेवु नका असा अहवाल तयार करुन शासनास पाठवा एवढीच मी विनंती करतो. जयहिंद जय महाराष्ट्र।

<u>**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—**</u>मा. महापौर महोदया, रस्त्यांची जी स्थिती आहे, रस्त्यांच्या अवस्थेबाबत सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. आणि प्रत्येक सदस्य आपापल्या प्रभागातील रस्त्यांवर कसे खड्डे पडले आहेत आणि त्यांची स्थिती कशी वाईट आहे हे सांगत आहे.

<u>**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**</u>मा. महापौरजी, आम्ही लक्षवेधी सुचना दिली होती. डॉल्फीन क्लब व जकात नाका क्र. १० व आयडीआय कंपनीच्या रस्त्यांबाबत या रस्त्यांबाबत चर्चा करण्यास सांगितल्याने आम्ही बोलत होतो. मा. सदस्य श्री. राज असरोंडकर हे जे म्हणत आहेत की प्रत्येक सदस्य आपापल्या प्रभागातील रस्त्यांबाबत बोलत आहेत ते चुकीचे बोलत आहेत.

<u>**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—**</u>माझे मित्र श्री. राजेंद्र चौधरीजी.....

<u>**मा. महापौर :—**</u>कृपया हिंदी बोला.

<u>**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—**</u>माझे मित्र श्री. राजेंद्र चौधरीजी यांच्या भाषणाबाबत काही हरकत नाही. परंतु शहराच्या समस्यांबरोबर आपल्या प्रभागातील समस्या ते लोक मांडत आहेत. मी नेहमीच या मुद्दयाचा पाठपुरावा केला आहे. मागील जे आयुक्त होते त्यांच्याकडेही व आता जे आयुक्त आहेत त्यांच्याकडेही. रस्ते दुरुस्तीसाठी, रस्ते विकासासाठी अर्थसंकल्पात जी काही तरतुद आहे काय ती विकास आराखडयातील रस्त्यांवर खर्च होत आहे काय? परंतु सार्वजनिक बांधकाम विभागातुन प्रत्येक प्रभागांमध्ये केली जाणारी जी कामे आहेत त्यांच्यावर आपण नजर टाकली तर असे दिसुन येईल की, रस्ते विकासासाठी तरतुद केलेली रक्कम सिमेंट कॉंक्रिटच्या पायवाटा तयार करणे, एम २५०—३५० रस्ते तयार करणे अशा कामांसाठी रक्कम खर्च झाली आहे. प्रत्येक वर्षी कमीत कमी ५—६ कोटी रुपयांची तरतुद रस्त्यांसाठी केली जाते. रस्ते विकासासाठी ठेवलेल्या तरतुदीपैकी किती रक्कम मागील ५ वर्षामध्ये वर्षनिहाय खर्च झाली आहे? याबाबत मी महासभेमध्ये जेव्हा प्रश्न विचारला होता त्यावर उत्तर मिळाले की, एकुण ८१ कामे झाली त्यातील फक्त ५ कामे विकास आराखडयातील आहेत. त्यातील फक्त ५ कामे विकास आराखडयात दर्शविलेल्या रस्त्याची झाली आहेत. याचा अर्थ आपली जर इच्छा शक्ती नसेल तर आमची ही धारणा नसावी आमची ही इच्छाशक्ती नसावी की रस्ते विकासासाठी जो पैसा आहे तो रस्त्यापर्यंत खर्च व्हावा. व गल्लीबोळांमधील एम २५०—३५० रस्त्यांवर खर्च झाल्यानंतर आम्ही स्वतंत्रपणे रस्त्यांच्या स्थितीबाबत चर्चा करुन त्यांच्या दुरुस्तीची मागणी करावी. असा मी या चर्चेच्या माध्यमातुन येथे प्रश्न उपस्थित करु इच्छितो. व हे कुठपर्यंत योग्य आहे? रस्ते विकासासाठीची रक्कम रस्त्यांवर खर्च न करता ती दुस—या कामासाठी खर्च करुन रस्ते दुरुस्तीसाठी आपण पुन्हा मागणी करावी व रस्ते दुरुस्तीसाठी आपण स्वतंत्रपणे मागणी करावी. आयुक्त महोदय, आपणांस माझा हा प्रश्न आहे.

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—**मा. महापौर, मा. आयुक्त, मा. सचिव, सन्माननिय सदस्य, सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी जो मुद्दा मांडला की, विकास आराखडयांमध्ये दर्शविलेल्या रस्त्यांवर खर्च न करता ती रक्कम गल्ली बोळांमधील सिमेंट पायवाटा एम २५०—एम ३५० रस्त्यांवर खर्च केली जाते. असा खर्च करणारे अधिकारी आहेत. नगरसेवक तर त्याचे काम करतात त्याच्या प्रभागातील गल्लीचे काम झाले पाहिजे आणि ते त्यांचे कर्तव्यच आहे. कारण त्यांना लोकांनी निवडुन दिलेले आहे. पण आपले अधिकारी काय करतात? ज्या अधिका—यांनी विकास आराखडयात दर्शविलेल्या रस्त्याचा निधी गल्लीबोळांतील कामांकडे फिरविला त्या अधिका—यांवर आपण काय कारवाई करणार? त्यांच्यावर कारवाई होणे हे महत्वाचे आहे. जर तुम्ही आज त्यांच्यावर कारवाई केली तर त्यापुढील अधिकारी अशा गोष्टी करण्यात धजावणार नाहीत. आजपर्यंत असे होत गेलेले आहे. कोणीतरी मोठया व्यक्तीने शिफारस करायची आणि विकास आराखडयातील रस्त्यांची कामे सोडुन आणि गल्लीबोळातील रस्त्यांची कामे करायची. सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी आणखी एक मुद्दा घेतला की, येथे प्रत्येक नगरसेवक आपापल्या प्रभागातील रस्त्याबाबत बोलतो त्यांनी तर बोललेच पाहिजे. कारण की लक्षवेधी कॅम्प नं. १ ते ५ मधील रस्त्यांबाबतची आहे. त्यांनी फक्त मुख्य रस्ते असे म्हटलेले नाही. त्यामुळे गल्लीतील रस्ते व अंतर्गत रस्ते सुध्दा यामध्ये आलेच. महोदय, मला असे म्हणायचे आहे की, पाऊस काय मतभेद करतो काय? महानगरपालिकेच्या प्रशासनासारखा की हे काम केले पाहिजे आणि ते काम केले नाही पाहिजे. ज्याप्रमाणे प्रशासनामध्ये मतभेद केला जातो. गेल्या पाच वर्षापासुन पाहतो आहे त्याबाबत तत्कालीन आयुक्त श्री. सोनवणे साहेब यांनी सांगितले की, विकास आराखडयातील जो रस्ता असेल तो मी करेन आणि विकास आराखडयातील तो रस्ता असतांना सुध्दा मी त्यांना घेवुन गेलो. आपण सुध्दा तो रस्ता एकवेळा पहावा. आणि विकास आराखडयातील रस्त्यांसाठीचा निधी जर उपलब्ध असेल तर पहावा कारण की १०० टक्के मागासवर्गीयांची वस्ती असल्यामुळे तिथे त्या रस्त्याचे काम झालेच पाहिजे. पाऊस असे काही म्हणत नाही की हा विकास आराखडयातील रस्ता असल्यामुळे मी येथे कमी पाऊस पाडेल आणि जेथे अंतर्गत रस्ते आहेत तेथे मी जास्त पाऊस पाडेल. असे होत नाही. जसा निसर्ग कुणावर मतभेद करत नाही. तसे आपणही मतभेद करु नये. आणि अंतर्गत रस्ते सुध्दा महत्वाचे आहेत. ज्याप्रमाणे आपल्या शरीराचे अवयव आहेत त्या अवयवांना पोषण देणा—या अनंत धमण्या असतात. त्या सर्वांमुळे हे शरीर चालते. उल्हासनगर शहर जर टिकवायचे असेल, उल्हासनगर शहर सुंदर बनवायचे असेल तर अंतर्गत रस्ते सुध्दा झाले पाहिजेत. आमच्या सन्माननिय महापौर, सन्माननिय सदस्य ज्यावेळेस कोटा येथे आम्ही प्रशिक्षणासाठी गेलो होतो त्यावेळेस आम्ही तेथिल रस्ते पाहिजे इतके सुंदर रस्ते आम्ही पाहिले, उदयपुरचे रस्ते सुध्दा अतिशय सुंदर आहेत. आम्हांला असे वाटले की, आमचेही रस्ते सुंदर पाहिजेत. परंतु शासनाच्या व प्रशासनाच्या मनामध्ये तसे नसेल तर तसे होवु शकणार नाही. आपण आल्यापासुन चांगल्या कामांना आपण सुरुवात करत आहेत, शिस्त आणण्याचा आपण प्रयत्न करत आहात. त्यात आपणांस कुठपर्यंत यश येईल व आपण कुठपर्यंत ठाम राहणार हे आपल्याला कळुन येईल. आपण शेवटपर्यंत ठाम राहिलात, आपण स्वत: मुहुर्त वेळ ठरवली आहे त्यामध्ये नक्कीच यश येईल. आणि कोटा हे जसे एक स्वच्छ आणि सुंदर शहर म्हणुन गणले गेले आहे तसे उल्हासनगरशहर सुध्दा होईल. महोदय मी आपणांस विनंती करेल, मी नगरसेवक असल्यामुळे माझ्या प्रभागातील रस्ते सुंध्दा झाले पाहिजेत. म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक जे गुरुनानक शाळा आहे, या रस्त्यावरुन कमीत कमी चार शाळांचे विदयार्थी जा—ये करत असतात, तक्षशिला शाळेचे विदयार्थी असतात, छत्रपती शिवाजी विद्यालयाचे विदयार्थी असतात, सरस्वती शाळेचे विदयार्थी असतात, नालंदा शाळेचे विदयार्थी असतात, न्यु इंग्लिश शाळेचे विदयार्थी आणि त्याचप्रमाणे कानसई शाळेचे जे विदयार्थी आहेत, अशा प्रकारे जवळ जवळ १० ते १५ हजार विदयार्थी या रस्त्यांवरुन रोज ये—जा करत असतात तेथे राहणारी लोकसंख्या जास्त असल्यामुळे रिक्षांची वर्दळही मोठया प्रमाणावर असते. त्यामुळे हा रस्ता तयार करणे अतिशय महत्वाचे आहे. आणि विकास आराखडयांमध्ये दर्शविलेले रस्ते तर झालेच पाहिजेत. परंतु आमचे लेखा अधिकारी यांनी याच अजेंडयाबरोबर एक पत्र दिले आहे त्या पत्रामध्ये त्यांनी उल्हासनगर महानगरपालिकेची वस्तुस्थिती मांडली आहे. ठेकेदारांचे पेमेंट देण्याचे बाकी आहे. तर आपण आता रस्त्याची कामे कशी करणार याचीच मला चिंता वाटते. लक्षवेधीवर चर्चा होईल कदाचित मा. महापौर आपणास आदेश देतील की उल्हासनगरमधील सर्व रस्त्यावरील खड्डे भरुन काढा. आणि जे आताच ३—४ महिन्यापुर्वी खड्डे भरले होते तेच पुन्हा भरले जातील व आमचे रस्ते तसेच राहतील म्हणजे येरे माझ्या मागल्या असेच होईल. आता पावसाचा मौसम अदयाप संपलेला नाही. आणि खड्डे भरलेल्या रस्त्यांची पुन्हा धुप होईल, काय सांगावे पुन्हा अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाळयात हे काम हाती न घेता, रस्त्यांची कामे करणा—या एका ठेकेदाराचे तर असे मत आहे की, ज्यावेळेस भरपुर ऊन असते त्यावेळेस जर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम केले तर ते काम टिकाऊ असते म्हणुन मी अशी सुचना करेन की, आपण जास्त भावनीक न होता जेव्हा कडक ऊन येईल त्या कडक ऊन्हात जर आपण काम केले तर डांबर त्या ठिकाणी कडक राहील आणि अतिशय चांगल्याप्रकारचे रस्ते आपणाकडे तयार होतील.

आणि आपण येथुन गेल्यावर आपलेसुध्दा लोक नाव काढतील. आयुक्त साहेबांनी अतिशय सुंदर रस्ते बनविले आहेत. तर कृपया लक्षवेधीवरील माझ्या या सुचना आपण ध्यानात घ्याव्यात.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :</u>—मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मी मघाशी स्टेशनजवळील पुलाबाबत बोलत होतो मला बोलण्यास परवानगी दिली त्याबाबत धन्यवाद. या पुलाचे काम कधी पुर्ण झाले आहे? आणि त्याला कार्यादेश आपण कधी दिले आहे? आणि आतापर्यंत काम का झाले नाही? याला जबाबदार कोण? आणि याच्या अगोदर जी चर्चा झाली होती त्यावेळेस आपण असे म्हटला होतात की १५ दिवसामध्ये ते काम होईल. श्री. शिर्के यांनी उत्तर दिले होते. त्याच्यानंतर आपण त्यावर काय उपाययोजना केली आहे. तेथे कोणी पडणार नाही, अपघात होणार नाही. संरक्षण भिंत किंवा अन्य काय उपाययोजना केली आहे? तुम्ही कोणतीही उपाययोजना केली नाही तर ते काम बंद का आहे व त्याबाबत कोणता अधिकारी, व्यक्ती जबाबदार आहे, त्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहेत. त्याबाबत तुम्ही उत्तर दया. ते काम कधी पुर्ण होणार. तुम्ही त्यावर ठामपणे उत्तर दया, तुम्ही जबाबदार अधिकारी आहात तुम्ही जबाबदारीने उत्तर दया. अपघात होणार नाहीत म्हणुन तुम्ही काय काळजी घेणार आहात? आपल्याकडे रिलायन्स, बीएसएनएल अशा कंपन्यांनी मुख्य मुख्य रस्ते खोदले आहेत त्यांनी आपणांस रस्ता खोदाई शुल्क म्हणुन किती रक्कमेचा चेक दिला आहे? आणि किती रक्कम दयायची बाकी आहे? आणि त्यांच्या या कामावर आपल्या कोणत्या अधिका—यांचे नियंत्रण आहे? कारण की आपण रस्ता तयार केल्यानंतर आठ दिवस होत नाहीत तर ते रस्ता खोदण्यास सुरुवात करतात. त्यांच्यावर आपल्या कोणाचेही नियंत्रण नाही. तेथे आपला कोणताही सुपरवायझर नाही, इंजिनिअर नाही, त्याने किती शुल्क भरलेले आहे आणि डांबरी रस्ता किती खोदलेला आहे? सिमेंट रोड किती खोदला आहे? मिटरप्रमाणे काय दर आहे? याबाबतीत कुणी व्यवस्थित उत्तर देवु शकत नाही. शहरातील किती रस्ते खोदलेले आहेत, रुंदी किती, लांबी किती? हे कोणालाही माहित नाही असा जर सावळा गोंधळ चालत असला तर काय होणार आहे? साहेब, कृपया याचे उत्तर दया.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :</u>—मा. आयुक्त, मा. महापौरजी, प्रत्येक वर्षी जुन महिन्यामध्ये रस्त्यांवरील खड्डे भरले जातात. पावसाळयापुर्वी रस्त्यांवरील खड्डे भरले जातात व पावसाळा संपताच रस्त्यावरील डांबर निघुन जाते प्रभाग क्र. १० मध्ये मागील पाच वर्षामध्ये एकाही रस्त्यावरील एकही खड्डा भरला नाही, वारंवार पत्र दिले, निवेदने दिली, अभियंत्यांना भेटलो, आयुक्तांना भेटलो, परंतु त्याचा काहीही फायदा झालेला नाही. खड्डे भरले जातात. त्याची पुन्हा धुप होते. त्यानंतर पुन्हा लक्षवेधी सुचना येतात. काम करणारे ठेकेदार जे आहेत ते रस्त्यावर भिक मागत आहेत. ही आपल्या महापालिकेची स्थिती आहे. आपणाकडे जर पैसेच नाहीत तर प्राकलने का तयार करतात? खड्डे भरण्यासाठी तरतुद का करतात? लक्षवेधी मांडण्याचा काहीच फायदा होणार नाही. तर मेहरबानी करुन या बाबीकडे आपण लक्ष दयावे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :</u>—उत्तर दयायला कोणी संबंधीत अधिकारी उपस्थित आहे किंवा नाही?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :</u>—मा. महापौरजी, गणेश उत्सवाच्या काळात गणेश विसर्जनासाठी घाट तयार केला जातो. मात्र कुणीही ठेकेदार काम करण्यास तयार नसल्यामुळे या वर्षी घाट तयार केला जाणार नाही ही अतिशय शरमेची गोष्ट आहे. गणपती सारख्या देवताबाबत महापालिका अशा प्रकारचा व्यवहार करत आहे ही अतिशय शरमेची गोष्ट आहे.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :</u>— मा. महापौरजी, गणपतीचे नाव घेतले म्हणुन मी उभा राहिलो. आपणांस विनंती करतो की, गणेश घाट तयार केला तर फार मोठे पुण्य होईल. कारण की हिराघाट येथिल पाण्यामध्ये डुकरे वगैरे मेलेली पहावयास मिळतात. त्याचबरोबर उल्हास स्टेशन येथे एक महिला पाण्यामध्ये वाहून गेली. त्याबाबत मानधन देण्यास आम्ही तयार आहोत. यासाठी गणेश घाटसाठी तात्काळ मंजुरी दिली जावी व या सात दिवसामध्ये कुठेतरी गणेश घाटाची व्यवस्था करावी. एक खड्डा तयार करुन त्यामध्ये ५०—६० टॅंकर चांगले पाणी सोडायचे अशा प्रकारची व्यवस्था आपण कुठेही करा. परमेश्वरासाठी एवढे केले तर दरवर्षी आपणांस पिण्यासाठी भरपुर पाणी मिळु शकेल.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :</u>—सोनवणे साहेब, काम कोण करेल? ठेकेदार तर उपोषणास बसले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :</u>— काय?

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :</u>—ठेकेदार बाहेर भिक मागत आहेत हे काम कोण करणार?

**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–** तेच तर म्हणतो ना आपण पगार बंद करु. प्रत्येकी चार हजार याप्रमाणे ८० सदस्यांचे तीन लाख वीस हजार, अधिका–यांचे कुणाचे पंन्नास–पन्नास तर कुणाचे पंचवीस–पंचवीस हजार पगार आहेत. अशा प्रकारे जर पैसे गोळा झाले तर किती पैसे गोळा होतील? १० लाखामध्ये महिन्याला किती मोठे काम होईल? लोक खुश होतील. एवढी मेहरबानी करा त्या ब्रिजवर एक आत्महत्या झाली आहे. आणखी कुणी एक व्यक्ती ब्रिजवरुन पडु नये. आमचे आठच महिने उरले आहेत.

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :–नथुजी मी बोलु?

**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–** हो, बोला.

**मा. सदस्य श्री. राजु जग्यासी:–**सन्माननिय महापौरजी, आमचे मित्र श्री. नथु सोनवणे यांना मी माहिती देवु इच्छितो की, जसे दरवर्षी गणपतीचे विसर्जन केले जाते, आपल्या शहरामध्ये बोट क्लब आहे. तेथे गणपतीचे विसर्जन केले जाते. व दुसरे ठिकाण आहे ४ नंबर येथिल संजय गांधी नगर येथे गणपतीचे विसर्जन केले जाते. आपल्या माहितीसाठी मी सांगु इच्छितो की, संजय गांधी नगर येथे गणपती विसर्जनासाठी घाट तयार करण्याकामीचे प्राकलन मंजुर झालेले आहे. ठेकेदारास काम देण्यात आलेले आहे व श्री. सावकारे साहेब व आयुक्त साहेबांशी त्यांचे बोलणे झालेले आहे. २७ तारखेपुर्वी ते काम पुर्ण होईल व बोटक्लब साठी सुध्दा काल आयुक्त साहेबांशी आमचे बोलणे झाले होते. त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास असे निर्देश दिलेत आहे. मला जी माहिती आहे त्यानुसार मी सांगत आहे. आयुक्त साहेब याबाबतीत खुलासा करतीलच.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–आपण सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहेत काय? सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन असे आपण कसे म्हणत आहात?

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :–श्री. मोहन बेहरानीजी, गणपती विसर्जनाबाबतीत संपुर्ण शहराबाबतीत मी बोलत आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–आम्हांला यांच्याकडुन अश्वासन नको आहे आम्हांला आयुक्तांकडुन आश्वासन हवे आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत होते हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:–श्री. राजु जग्यासी बोलत आहेत त्यांना बोलु दिले जावे.

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :–मी केवळ माहिती देवु इच्छितो.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–फक्त आयुक्त साहेबच उत्तर देवु शकतात. दुसरे कोणीही उत्तर देवु शकत नाही. उत्तर देणे हे सदस्याचे काम नाही.

मा.महापौर :–सर्वांनी बसुन घ्यावे आयुक्त साहेब उत्तर देत आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–ठेकेदारांच्या बाबतीत आपण कसा व्यवहार केला हे सर्वांना माहित आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:–मा. महापौरजी, जेव्हा श्री. राजु जग्यासी बोलत होते तेव्हा मध्येच सर्वजण बोलत होते व ओरडत होते. आता आपण अधिनिर्णय दिला आहात की आयुक्त साहेब उत्तर देतील. त्यानंतरही काही सदस्य उभे राहुन बोलत आहेत हे काय चालले आहे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–बांधकाम विभागाच्या सभापतींनी खुलासा दयावा. पाणी पुरवठा समितीच्या सभापतींनी नव्हे.

**मा. सदस्य श्री. सुरेश जाधव :—**मा. महापौरजी मी एवढेच सांगु इच्छितो की, आमच्या सदस्यांनी सांगितले की, गणेश घाटाचे काम मंजुर झाले आहे. त्याबद्दल मी मा. सदस्य श्री. राजु जग्यासी यांना धन्यवाद देतो. परंतु अडचण अशी आहे की, ठेकेदार लोक काम करण्यास तयार नाहीत व गणेशात्सवासाठी फक्त सात—आठ दिवसच शिल्लक आहेत. एवढया अल्पकालावधीत काम कसे होईल? यासाठी आयुक्तांना सांगु इच्छितो की ते काम लवकरात लवकर करण्यात यावे. फक्त काम मंजुर केल्याने आपली समस्या सुटत नाही. फक्त काम मंजुर करण्यामध्ये काही अर्थ राहणार नाही.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**मा. महापौरजी, मा. सदस्य श्री. राजु जग्यासी यांनी सांगितले की, हिराघाट येथिल जो गणेश घाट आहे त्याचेही काम सुरु होईल. तर त्याबाबत मी त्यांना माहिती देवु इच्छितो की, कालच आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये होतो. तेथे जे शिर्के साहेब आहेत त्यांनी आम्हांला सांगितले की, कुणीही ठेकेदार काम करण्यास तयार नाही. आम्ही सभागृहाचे सदस्य आहोत आम्ही येथे जबाबदारीने बोलत आहोत. आपण उत्तर देवु पाहत आहात उत्तर देण्याची आपणांस फार हौस आहे. आपण टोमणेबाजी करु नका.

**मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—**श्री. चौधरीजी आपण अपु—या माहितीवर बोलत आहात.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत होते हे समजुन येत नव्हते.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** आयुक्त साहेब, उत्तर देण्याअगोदर आपण आपली सद्सद विवेक बुध्दी वापरा, कुणाच्या सांगण्यावरुन बोलु नका. उपयोगी व्हा , दृरुपयोगी होवू नका.(युज होईये मिस युज मत होईय)
**मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**मा. आयुक्त साहेब, सभागृहामध्ये कुणालाही अनौपचारीकपणे खुलासे करुन देवु नका.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**अधिकारी उत्तर देतील तेच चांगले आहे. ठेकेदार कुणीही काम करण्यास तयार नाही.

**मा. आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—**मा. महापौर महोदया, ज्या सन्माननिय सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिली आहे ते श्री. अशोक ठाकुर व श्रीमती बेबी वसिटा व रस्त्यावर जे खड्डे पडले आहेत ते भरण्याबाबत शासन व प्रशासन काय करत आहेत याबाबत मा. सदस्यांनी येथे ज्या प्रतिक्रीया व्यक्त केल्या आहेत त्याबाबत बोलु इच्छितो की, प्रत्येक वर्षी पावसाळयामध्ये रस्त्यांवर खड्डे पडतात व ते भरायचेही आहेत. त्यासाठी मी येण्याच्या अगोदरच मे २००६ मध्ये निविदा मागविण्यात आली होती. आपणाकडे चार निविदा आलेल्या आहेत. व प्रत्येक प्रभागामध्ये जेवढे काही रस्ते आहेत भलेही ते विकास आराखडयातील रस्ते असोत, अंतर्गत रस्ते असोत, त्या सर्व रस्त्यांमधील खड्डे बुजविण्यासाठी निविदा मागविण्यात आलेली आहे. त्यामध्ये त्यांनी जे दर दर्शविले आहेत ते प्राकलनीय दरापेक्षा २४ टक्के जास्त आहेत. त्यासाठी त्यांच्याशी वाटाघाटी करण्याची जबाबदारी प्रशासनावर असते. त्यासाठी कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांनी व त्यांच्या अधिका—यांनी निविदाकारांशी वाटाघाटीसाठी तीन वेळा बैठका घेतल्या आहेत. परवाच्या शनिवारीच त्यांच्याशी वाटाघाटी झाल्या आहेत. डांबराचे दर खुपच वाढलेले आहे असे ठेकेदाराचे म्हणणे आहे. याबाबतीत संबंधीत जी यंत्रणा आहे त्यांच्याकडे आम्ही चौकशी केली आहे. सोमवारी याबाबतीत अंतिम वाटाघाटी होतील. शासन व प्रशासनाच्या वतीने मी सांगु इच्छितो की, हे काम योग्य वेळेत होईल. व यासाठी निविदाकारांनी हे जे प्राकलनीय दरापेक्षा जास्त दर दिले आहेत त्याबाबतीत वाटाघाटी कराव्या लागतील. वाटाघाटी करुन ते दर कमी करण्याचे आमचे प्रयत्न राहतील. मुद्दा हा आहे की, यामध्ये सर्व रस्ते येणार आहेत. व त्याबाबतीत आम्ही लक्ष देत आहोत. वाटाघाटी करण्यामध्ये उशिर झाला आहे. परंतु पावसाळा अजुनही संपलेला नाही. ब—याचशा सदस्यांनी आपला अनुभव सांगितला की भर पावसाळयात खड्डे भरले जातात आणि ते पुन्हा पुन्हा उखडतात. यावेळेस खड्डे भरण्यामध्ये उशिर झाला आहे परंतु योग्य वेळेमध्ये ते भरले जातील. त्याचबरोबर मी खात्री देतो की, हे काम ३१ ऑगस्ट ते १० सप्टेंबर पर्यंत होईल व सोमवारी त्यांना वाटाघाटीस बोलावले आहे. त्याबाबतीत मुख्यालयाचे आमचे जे उपायुक्त आहेत त्यांना मी माझ्या वतीने प्राधिकृत केले आहे की, याबाबतीत सोमवारी अंतिम निर्णय घ्यायचा आहे व हे काम नक्कीच होईल.

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—**मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आपण आता जे उत्तर दिले आहे, सांगितले आहे की, प्राकलनीय दरापेक्षा २४ टक्के जास्त दराने निविदा आल्या आहेत. व आपण असेही म्हटले

की, डांबराचे दर वाढले आहेत. रस्त्यावरील खड्डे भरतांना जे डांबर वापरले जाणार आहे त्या डांबराचे आपण नमुने तपासणीसाठी घेणार आहात काय? याबाबत मा. उच्च न्यायालयाने असे निर्देश दिले आहेत की, डांबराचे नमुने तपासले जातील. तर उल्हासनगरमध्ये ज्या रस्त्यांवरील खड्डे भरणार आहात त्याचे डांबराचे नमुने आपले अधिकारी घेणार आहेत का की आम्हांला नमुने घेवुन प्रयोगशाळेकडे पाठवावे लागतील? यावर सुध्दा आपणांस प्रकाश टाकावा लागेल. ठेकेदार कोणत्या प्रकारचे डांबर वापरणार आहेत, डांबराबाबत आपण बोलला म्हणुन मी हा मुद्दा येथे उपस्थित केला. आपण डांबराचे नमुने घ्याल, ते प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवाल काय? याचे मला याठिकाणी उत्तर पाहिजे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :– मा. आयुक्त साहेब, तुम्ही येथे आता जे सांगितले की ठेकेदार लवकरात लवकर काम चालु करतील. २७ तारखेला गणेश उत्सव सुरु होणार आहे. शहरातील रस्त्यांवर फार मोठे खड्डे पडले आहेत, गणेश घाट नादुरुस्त झाले आहेत. त्यांची दुरुस्ती करुन तेथे पाण्याची व्यवस्था करायची आहे. मला आता असे सांगा की, ठेकेदार तर आता बाहेर उपोषणास बसलेले आहेत. ते काम करणार आहेत किंवा नाही? कारण की गेल्या अनेक दिवसापासुन ठेकेदारांना पेमेंट मिळालेले नाही त्यामुळे ते उपोषणास बसलेले आहेत. महापालिका मुख्यालयासमोर पाच दिवसापासुन तेथे उपोषण चालु आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे कोणतेही काम करण्यास कोणताही ठेकेदार तयार नाही. अशा स्थितीत आपण गणेश घाट व इतर रस्ते यांची कामे कशी करणार आहात? गणपतीच्या मोठ–मोठया मुर्त्या दुस–या शहरातुन या शहरात येतात. अशा वेळेस कोणते ठेकेदार काम करणार आहेत? व याबाबतीत कोणत्या ठेकेदाराने खात्री दिली आहे. याचाही या ठिकाणी खुलासा करण्यात यावा.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :–जर कुणी ठेकेदार काम करण्यास तयार होत असेल आणि जर तो कमी दरामध्ये काम करण्यास तयार असेल तर तो याकामी जे काही साहित्य वापरेल त्याचे नमुने घेवुंन ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात यावेत. ते खड्डे भरतात आणि ते पुन्हा उखडतात. त्याचे कारण असे आहे की, निकृष्ट प्रतीचे साहित्य वापरतात. या कामामध्ये सर्वात जास्त भ्रष्टाचार होतो. म्हणुन प्रत्येक टॅंकरमधील साहित्याचा नमुना घेवुन ते पाठविण्यात यावे व मजबुत काम केले जावे. धन्यवाद ।

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–सन्माननिय आयुक्त साहेब, आता आपण कोणती तारीख दिली होती त्याचा जरा खुलासा करावा कारण की २७ तारखेला गणपती बसतात व ६ सप्टेंबरला विर्सजन आहे. रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम या १० दिवसात व्हावयास पाहिजे होते. तुम्ही या कामी कोणती तारीख दिली आहे ती जरा पुन्हा सांगावी.

मा. सदस्या श्रीमती मिनु दासानी :–मा. महापौरजी व मा. आयुक्त साहेब, ठेकेदारांचा जो मुद्दा येथे उपस्थित झाला आहे त्याबाबतीत मी सांगु इच्छिते की, काही ठेकेदार आहेत ज्यांनी काम हाती घेतले आहे परंतु काही नगरसेवक त्यांना दमदाटी देतात त्यामुळे ते काम करत नाहीत. यासाठी मला असे वाटते की, आपण येथे चौकशी करावी. ते कोणते नगरसेवक आहेत ते ठेकेदारांना दमदाटी देतात ते स्वत: काम करत नाहीत व दुस–यांनाही काम करु देत नाहीत.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–आम्ही सर्व नगरसेवक आहोत. कोणते नगरसेवक दमदाटी देत आहेत? त्यांचे नाव घेतले तर बरे होईल.

मा. सदस्या श्रीमती मिनु दासानी:–त्याची चौकशी केली जावी की कोणते नगरसेवक, कोणत्या ठेकेदारांना दमदाटी करतात?

मा. आयुक्त :–पहिली लक्षवेधी जी होती त्यामध्ये उपस्थित केलेल्या डांबराच्या नमुन्यातील तांत्रिक तपासणी आमचा विभाग करेल ती त्यांची जबाबदारी ठरते. डांबराचे नमुने तपासुनच डांबराचा वापर केला जाईल. एवढेच मी येथे आश्वासन देतो. १० सप्टेंबरची तारीख मी सांगितलेली आहे. जेथे गणेश उत्सवानिमीत्त ज्या रस्त्यांवर रहदारी किंवा वर्दळ होते, ते रस्ते प्रथम घेतले जातील. सोमवारी अंतिम वाटाघाटी झाल्यानंतर ते रस्ते हाती घेतले जातील व ज्या दोन ठिकाणी गणपतीचे विर्सजन केले जाते तेथिल गणेश घाटाची तयारी करण्यात आली आहे. त्या ठिकाणी गणपतीचे विसर्जन केले जाते. ते काम करण्यासाठी जे लोक येणार होते त्यांना कोणीतरी धमकावले आहे. कोणी धमकावले आहे? परंतु आमचे जे अधिकारी आहेत श्री. शिर्के, व उपायुक्त डॉ. श्री. सावंत व पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी श्री. सावकारे हे जे अधिकारी आहेत यांनी उदयापासुनच हे काम करण्याचे मला आश्वासन दिले आहे. पाणी उपासण्यासाठी ज्या मशिन मागवायच्या आहेत व जे कर्मचारी

दयायचे आहेत हे काम प्रथम होईल व त्यानंतर रस्त्यांचे जे काम आहे ते सुध्दा होईल. आता दुसरी एक जी लक्षवेधी आली होती या कामाचा अंदाजित खर्च आहे १५ लाख २ हजार. त्याला तांत्रिक मंजुरी होती. निविदा सुचना क्र. आहे १०, त्याचा दिनांक १६,/८/ २००५ रोजी. स्थायी समितीने तिला मंजुरी दिलेली आहे. व कार्यारंभ आदेश ३१ ऑगस्ट २००५ रोजी दिला आहे. काम करण्याची अंतिम मुदत होती २८/८/२००६ रोजीची. ठेकेदाराचे नाव मे. जी.आर.कंन्स्ट्रक्शन व त्यांना जो दर मंजुर केला होता तो ४.५० टक्के जास्त होता. हे जे काम आहे ते मी येण्याच्या अगोदरपासुन बंद होते. ब—याचशा लोकांनी माझ्यापुढे हा प्रश्न उपस्थित केला होता. काम बंद का होते याचे कारण माहित नाही. परंतु त्याबाबतीत जी काही कारवाई करायची आहे ती करत आहोत. नविन निविदा काढली तर त्यामध्ये आणखी वेळ जाईल. याचा विचार करुन त्यांच्याशीच वाटाघाटी करुन काम करण्याचा आम्ही निर्णय घेतला. ५० टक्के काम झाले आहे. त्यामध्ये खांबाचे मजबुतीकरण आहे. ५० टक्के स्लॅबचे काम झाले आहे. व रेलिंगचे एका बाजुचे काम पुर्ण झाले आहे. व बाकीचे जवळ जवळ ७५ टक्के काम झालेले आहे. सर्व नगरसेवकांच्या ज्या अपेक्षा आहेत, मागणी आहेत त्या योग्य आहेत. मी सुध्दा तेथे दोन वेळा जावुन पाहणी करुन आलो आहे व हे काम आता सुरु केले आहे. एकच काम आहे तेथे जेव्हा स्लॅब टाकला जाईल तेव्हा तेथिल रहदारी थोडया कालावधीसाठी बंद केली जाईल. काम लवकरच पुर्ण होईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—मा. आयुक्त साहेब, आम्ही वारंवार आपणांस सांगत आहोत की, एक लक्षवेधी होती त्यावर चर्चा करण्यासाठी महापौरांनी अनुमती दिली होती आम्ही चर्चा केल्यानंतर आपले उत्तर मिळणे आम्हांला अपेक्षित आहे. ते मिळत नाही. वारंवार उभे राहुन आम्हांला सांगावे लागत आहे. त्या लक्षवेधीचे कृपया आपण उत्तर दयावे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—लवकरच, प्रगतीपथावर अशी मोघम उत्तरे देण्यापेक्षा कालबध्द असा वेळ दया. कारण की लोकप्रतिनिधी या नात्याने नागरीक आम्हांला विचारतात. तुम्ही उत्तर दिले तर आम्हांला त्यांना उत्तर देणे सोपे जाईल. लवकरच हे काही त्याचे उत्तर नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—डॉल्फीन क्लबच्या रस्त्याबाबत माहिती दया साहेब.

मा. आयुक्त :—पुलाचे जे काम आहे ते पंधरा दिवसात पुर्ण होईल. काम बंद होते. उदयापासुन पुन्हा काम सुरु करण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे. ठेकेदाराशी बोलणे झाले आहे व पंधरा दिवसामध्ये काम पुर्ण होईल.एका बाजुचे रेलिंग आहे, दुस—या बाजुचे बाकी आहे स्लॅब पुर्ण झाल्याशिवाय ते करता येणार नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—मा. महापौरजी,मी पुन्हा पुन्हा तेच सांगतो आहे की आमची लक्षवेधी होती मी अनुमोदक होतो. त्या लक्षवेधीवर चर्चा करण्यासाठी मा. महापौरांनी अनुमती दिली आहे. चर्चा केली. लक्षवेधी होती डॉल्फीन क्लब , दुसरा जकात नाका क्र. १० ते आयडीआय कंपनीपर्यंतचा रस्ता.

मा. आयुक्त :—खड्डे असतील तर ते दुरुस्ती केले जातील.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—खड्डे नाहीत....

मा. आयुक्त :— गणपती उत्सवानिमित्त रहदारीचे रस्ते विसर्जनासाठीच्या घाटांची दुरुस्ती करणे याची एक लक्षवेधी होती.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—आमची लक्षवेधी बघून घ्या. अधिका—यांनी समजुन सांगायला पाहिजे. ४—४ वेळा आम्ही उभे राहुन बोलतो.

मा. आयुक्त :—श्री. दिलीप गायकवाड व श्री. चव्हाण साहेबांनी आता जे सांगीतले डॉल्फीन ते शांतीनगर, जकात नाका क्र. १० ते आयडीआय कंपनी. हे जे २ रस्ते आहेत त्याची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. या रस्त्यांची माहिती मी आपणांस तपासुन सांगेन.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—मा. महापौर, दु:ख वाटते की, ४ दिवस अगोदर ही सुचना आम्ही दिली होती आणि त्या लक्षवेधीवर ४ वेळा उभे राहुन सांगावे लागले की आमच्या लक्षवेधीवर कृपया निवेदन करावे. ४ वेळा सांगुनही उत्तर असे मिळते.

<u>मा. आयुक्त :–</u>याबाबत सुध्दा संबंधीत विभागाकडुन मी माहिती घेतलेली आहे.  परंतु ती अदयाप माझ्या पर्यंत पोहचलेली नाही.  कारण की जनता दरबारामध्ये मी दोन तास पालकमंत्री महोदयां बरोबर होतो.  याबाबत मी संबंधीत विभाग प्रमुखांना सुचना दिलेल्या आहेत व ती माहिती पुढील वेळस देतो.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>मा. महापौर महादेया, आणि आयुक्त साहेब, दोन तास अगोदर लक्षवेधी सुचना देण्याचा अर्थ हा आहे की, संबंधीत विभागाने यावर उत्तर देण्यासाठी तयारी करुन यावी.  जर आपण एखादया ठिकाणी व्यस्त होते तर संबंधीत विभागाचे काम होते त्यांना संक्षिप्त टिप्पणी तयार करुन देण्याचे.  व दोन तास अगोदर लक्षवेधी देण्याची जी तरतुद ठेवली आहे ती यासाठीच.  कारण की प्रशासनास या बाबतची तयारी करता यावी. मला वाटते की यापुढे असे होता कामा नये.

<u>मा. आयुक्त :–</u>यापुढे असे होणार नाही एवढे मी आश्वासन देतो.  ३३ रस्त्यांचे ७५ टक्के काम झालेले आहे. परंतु हे जे दोन रस्ते सांगितले जात आहेत ते त्यामध्ये आहेत किंवा नाही हे मी पाहिलेले नाही ते पाहुन मी सांगु शकेन

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>आपण म्हणता की, पुढील वेळेस सांगेन.  पुढील वेळेस म्हणजे पुढील सभा एक महिन्यानंतर येते.

<u>मा. आयुक्त :–</u>त्या अगोदरच त्याबाबतची माहिती मी प्रस्तृत करेन.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u>सन्माननिय आयुक्त साहेब, आपण आता म्हणलात की, त्यांना ७५ टक्के पेमेंट दिले आहे.  डॉल्फीन क्लबचा जो रस्ता आहे त्याचे ४० टक्के सुध्दा काम झालेले नाही.  ७५ टक्के पेमेंट जर तो घेवुन गेला तर राहिलेले काम तो कसे करेल?

<u>मा. आयुक्त :–</u>सर्वसाधारण पेमेंट जे दयायचे असते ते ७५ टक्के दिले आहे . .या रस्त्यांचे मी म्हटलेले नाही. या रस्त्यांचे मी तपासुन सांगतो.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u>त्याच रस्त्याबाबतची लक्षवेधी आहे म्हणुन मी विचारले.

<u>मा. आयुक्त:–</u>त्याची माहिती मी तुम्हांला प्रस्तृत करतो.

<u>मा. सचिव:–</u>लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. देवेंद्रसिंह खेमाणी व अनुमोदक आहेत श्री. चंदाराम मोकल

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक २</u>

सुचकाचे नाव :– श्री. देवेंद्रसिंह खेमाणी

अनुमोदकाचे नाव :–  श्री. चंदाराम मोकल

**विषय :–**  श्री. ठाकुर बेहरानी यांचे प्रकरणाबाबत.

उल्हासनगर प्रभाग क्र. २५ मध्ये जागा क्र. २५ (ड) या जागेवर निवडून आलेले नगरसेवक लोकप्रतिनिधी श्री. ठाकुरदास वर्यलदास बेहरानी गेली काही वर्षापासून महापालिका सभांत उपस्थित न राहणे, तीन महिन्यापेक्षा जास्त सभांना व सहा महिन्यापेक्षा जास्त काळ हे लोकप्रतिनिधी महापालिका सभेस उपस्थित न राहिल्याने आयुक्तांनी त्यांचे विरुध्द कलम ११ प्रमाणे डीसक्वालीफिकेशनची कारवाई करुनही त्यानंतरही सहा महिन्यापेक्षा जास्त काळ सभांना त्यांचे उपस्थित न राहणे याबाबतचे कोर्टातील प्रकरणी पालिका प्रशासनाने ही स्थिती कोर्टाचे

निदर्शनास न आणणे व या कोर्ट प्रकरणाचा पाठ पुरावा पालिका प्रशासनातर्फे हेतु पुरस्पर न होणे. देशाचे राष्ट्रपती व सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या नावे गुजरात मधून बोगस वॉरंट प्रकरणी व उल्हासनगर मधील निरापराध नागरीकांना विरुध्द अशीच खोटी वॉरंट काढुन त्यांना प्रचंड यातना देणे प्रकरणी सदर नगरसेवकाचे गेल्या काही वर्षापासून शहरातून फरार असणे, पालिका प्रशासनाने त्याबाबत कडक कारवाई करण्याचे सोडून अशा लोक प्रतिनिधीला पालिकेचे सर्व लाभ त्यांचे नावे आलेल्या अर्जावरील त्यांच्या सहीची खातरजमा न करता उपलब्ध करुन देणे. गेली काही वर्ष सदर लोकप्रतिनिधी पालिका सभागृहात हजर नसूनही पालिका प्रशासनाने तिकडे दुर्लक्ष करणे या बाबतचे कोर्ट प्रकरणात जाणूनबुजून विलंब लावणे, त्यामुळे या परिसरातील नागरीकांना आपल्या लोकप्रतिनिधीचे प्रतिनिधीत्व महापालिकेत न मिळणे, त्यामुळे या प्रभागातील रहिवाश्यांना भोगावा लागत असलेला त्रास तथा लोकशाही मार्गाने नागरीकांना प्राप्त हक्कात येत असलेली बाधा व या प्रभागातील खुंटलेला विकास व त्यामुळे या प्रभागातील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष व पालिका प्रशासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची उपाययोजना व कारवाई.

सदरचे महत्वाच्या विषयावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळावी व कारवाईचे आदेश व्हावेत ही विनंती.

---

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौरजी, मा. सचिव साहेब या लक्षवेधी बाबत माझा एक प्रश्न होता की असा विषय जो न्यायालयात प्रलंबित आहे त्यावर महासभेत चर्चा होवु शकते काय? हा सर्वसामान्य असा विषय आहे. याबाबत आपण कित्येक वेळा म्हटले आहे की, हा विषय न्यायालयीन प्रलंबित आहे. महासभा यावर चर्चा होवु शकते काय?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—मा.महापौरजी, श्री. जमनु पुरस्वानी बोलत आहेत, जे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे त्याबाबत माझे काहीही म्हणणे नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—भलेही आपण त्यावर चर्चा करा. माझेही यावर काही म्हणणे नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—बोलायचे आहे तर कशाबाबतीत आपणांस बोलायचे आहे?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:—मला जे काही बोलायचे आहे ते कृपया आपण ऐकुन घ्या व आपण मला म्हणाल की सांगा तर मी आपणांस सांगेन की हे ही काही जरुरीचे नाही. जेव्हा बोलण्यास मी उभा राहिलो आहे तर बोलणारच , पुन्हा आपण बोलण्याची आवश्यकता काय आहे? आपण सांगाल तेव्हा मी सांगणार आहे काय? बोलण्यास मी उभा राहिलो आहे तर मी बोलणारच.

मा. महापौर :—श्री जमनुजी आपण बसुन घ्या. त्यांना आपले मत मांडु दया.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—महापौर महोदया, या विषयावर चर्चा केली जावु शकते काय? सचिव साहेब आपण उत्तर दया.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—कायदयानुसार आहे कि नाही हे सांगीतले पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—श्री. जमनुजी, आपण लक्षवेधी वाचा. न वाचता आपण जो मुद्दा उपस्थित केला तो चुकीचा आहे. आपण वाचुन पहा त्यामध्ये काय लिहिले आहे?

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :—या लक्षवेधीवर चर्चा केली जावु शकते किंवा नाही ते आपण सांगा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—या प्रकरणावर चर्चा होत असेल तर मी सुध्दा स्थायी समितीच्या त्या मुद्दयावर चर्चा करेन.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी: श्री—किशोर वनवारीजी आपण ही सुचना देत आहात की धमकी देत आहात? जर आपण सुचना देत असाल तर आम्ही स्विकार करतो जर धमकी देत असाल तर अशा धमकीने मी घाबरणार नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—धमकी गुंड लोक देतात, आम्ही तर सर्वसाधारण नगरसेवक आहोत. गुंड बदमाश लोक धमक्या देतात, साधे सज्जन लोक धमक्या देत नाहीत. आम्ही साधे सरळ आहोत, गुंड दुसरे आहेत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—सचिव साहेब, या विषयावर चर्चा करु शकतो किंवा नाही याचे उत्तर तर दया ना?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:—मा. महापौरजी, श्री. जमनुजी मला बोलु दया........

मा. महापौर :—आपण आपली लक्षवेधी सुचना मांडा नंतर उत्तर दिले जाईल. स्विकृत होण्यालायक आहे किंवा नाही त्याबाबतीत नंतर निर्णय दिला जाईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—स्विकृत तर आपण केली आहेच ना? स्विकृती लायक आहे किंवा नाही असे आपण का म्हणत आहात. ही लक्षवेधी तर आपण स्विकृत केली आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र. २५ मधुन निवडुन आलेले नगरसेवक श्री. ठाकुरदास बेहरानी ब—याच कालावधीपासुन महासभांमध्ये अनुपस्थितीत आहेत त्यांच्या अनुपस्थितीमुळे त्यांच्या प्रभागातील नागरीकांना विविध समस्यांना झुंज दयावी लागत आहे. त्यांना बराचसा त्रास होत आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—प्रभाग क्र. २५ मधील कुणी आपणाकडे आला होता का? त्या पॅनलचे आम्ही लोक नगरसेवक आहोत. कुणाला यायचे झाले तर ते आमच्याकडे येतील. आपणाकडे थोडेच येतील?

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया:—आपणाकडे आले का कोणी समस्या घेवुन?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—आपणांस मर्यादा नाही. मी बोलण्यास उभा असतांना आपण मध्ये बोलत आहात.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—मर्यादा , कोणाला सांगता?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—श्रीमती मिनु दासानी सक्षम नाहीत काय?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:—माजी महापौरांचा प्रभाग आहे तो.

मा. सदस्या श्रीमती मिनु दासानी :—२५ क्रमांकाच्या पॅनलची काय स्थिती आहे?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— काय स्थिती आहे?

यावेळी काही सन्माननिय सदस्य शेम—शेम म्हणुन जोर—जोरात ओरडत होते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—आरोग्य समितीच्या सभापती बोलतात २५ क्रमांकाच्या पॅनलची स्थिती पहा? सत्ता कोणाची आहे?

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :—आम्ही लोक तर नागरीकांच्या तक्रारी येवु सुध्दा देत नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—अहो करा ना काम?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:—मी आपल्या लक्षवेधीवर बोलण्याअगोदर सर्वात प्रथम मी मा. सचिवांकडुन हे जाणुन घेवु इच्छितो की, मा. श्री. ठाकुरजी बेहरानी हे मागील किती दिवसांपासुन व किती महासभांमध्ये अनुपस्थित आहेत.

मा.सदस्या श्रीमती मिनु दासानी :– प्रभाग क्र२५ मधील लोक तक्रारी धेवून फिरतात कुणी त्या ऐकुन घेण्यास तयार नाही कारण त्या प्रभागाचा नगरसेवक त्यांना भेटत नाही.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–तु सिंधीत शिव्या दिल्या तर मी हिंदीत शिव्या देईल. शिव्या देणे मला सुध्दा येते.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–मा. महापौरजी, लक्षवेधीवर चर्चा करण्याअगोदर मी काही माहिती घेवू इच्छितो. मा. सचिवजी या गोष्टीची मला माहिती देतील......

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–माहितीसाठी प्रश्न विचारा ना? नाहीतर माहितीच्या अधिकारान्वये माहिती मागा ना? संपुर्ण शहराचा सत्यानाश झाला यांना ठाकुर बेहरानीच्या विषयाची चिंता लागली आहे. तुम्ही तुमचा प्रभाग पहा. तुमच्या प्रभागातील लोक आमच्याकडे येतात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–उल्हासनगरमध्ये एका प्रभागामध्ये असे लिहिले आहे की नगरसेवक हरवला आहे. शोधुन देणा–यास सव्वाशे रुपये बक्षिस.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–श्री. देवेंद्रसिंह यांच्या प्रभागात लिहिले आहे.

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :–मा. महापौरजी, हे सभागृह आहे की मच्छी मार्केट आहे? मा. महापौरजी हे सभागृह आहे कि मच्छी मार्केट आहे काय चालले आहे हे इकडे?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–काय झाले आहे की काही लोक थोडें स्वतंत्र झाले आहेत. त्यांना माहित नाही स्वातंत्र्याचे महत्व काय आहे? स्वतंत्र झाल्यामुळे ते जास्तच स्वतंत्रता अनुभवत आहेत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–स्वातंत्र नंतर ते जन्मले.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–उल्हासनगर स्वतंत्र झाला नाही.

मा. सचिव :–मा. महापौर महोदया, श्री. ठाकुरदास बेहरानी हे फेब्रुवारी २००४ पासुन गैरहजर आहेत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–बस्स, आणखी काय पाहिजे?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–मला हे जाणुन घ्यायचे आहे की, अशाप्रकारे सलग गैरहजर राहणा–या नगरसेवकावर काय कारवाई केली जावु शकते?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–‘‘मेरे अंगने में तुम्हांरा क्या काम है?’’

मा. सदस्या श्रीमती मिनु दासानी :–मी पण पॅनल क्र. २५ मधील नगरसेविका आहे, मी पण श्री. ठाकुर बेहरानीच्या बाबतीत बोलु इच्छिते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– कॅम्प नं.४ मधुन नगरसेवक गायब, शोधुन देणा–यास एकशे पंचवीस रुपये बक्षिस!

मा. सदस्या श्रीमती निता अहुजा :–महिलांशी सन्मानपुर्वक बोलले जावे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:– सतत गैरहजर राहणा–या नगरसेवकावर काय कारवाई केली जावु शकते?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–तुम्ही कोण होतात विचारणारे न्यायालयात प्रकरण आहे ना? हे काय न्यायालय आहे का? उलटसुलट प्रश्न करता?

मा. सदस्या श्रीमती निता अहुजा :–काय बोलत आहेत?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—काय मी बोलु?

मा. सदस्य श्री. होशियारसिंह लबाना :—महिलांशी सन्मानपुर्वक बोला.

मा. सदस्या श्रीमती मिनु दासानी :—बोलण्याची पध्दत नाही. मच्छी मार्केट आहे काय? महिलांची बेईज्जत का करायची?

मा. सदस्या श्रीमती निता अहुजा:— महिलांचा अपमान का करायचा?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—कोण महिला आहे? कुठली महिला? सरदार महिला आहे काय?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—आमच्या भगिनींसमोर हे कसे बोलत आहेत? हे बिल्कुल उचित नाही.

मा. सदस्या श्रीमती निता अहुजा :—महिलांबरोबर अदबीने बोला. महिलांशी कसे बोलायचे ते शिका.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—होय, शिकवा—शिकवा. आपल्या घरी जावुन शिकवा, दुस—यांना शिकवु नका. घरातुन महिला बाहेर काढता, दुस—यांना सांगता काय? घरातुन सुनेला बाहेर काढता आणि दुस—यांना सन्मान करण्यास शिकवा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—कृपया शांतता राखा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—मी माझ्या भगिनी श्रीमती मिनु दासानी व निता अहुजा यांना निवेदन करतो की, माझे काही मित्र ज्यांना बोलण्याची सवय आहे त्यांना तोंड देण्यास मी सक्षम आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—तुम्ही तोंड देण्यास सक्षम आहात तर महिलांना का पुढे करता?

मा. महापौर :—कृपया आपण बसुन घ्या. घरच्या गोष्टी आपण घरी सोडवा. ही महानगरपालिका आहे येथे जे विषय सभेपुढे आलेले आहे त्यांच्यावर चर्चा करा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—माझा प्रश्न असा होता की, सलग किती वेळा गैरहजर राहणा—या नगरसेवकावर कोणत्या प्रकारची कारवाई होवु शकते.

मा.सचिव :—मा. महापौर महोदया, जी लक्षवेधी सन्माननिय सभागृह नेता यांनी प्रस्तृत केली आहे. लक्षवेधी सुचनेच्या नियमानुसार चर्चा होता कामा नये व हा जो प्रस्ताव आहे तो केवळ मा. श्री. देवेद्रसिंह खेमाणी यांनीच प्रस्तृत करायचा आहे. व त्यावर जे निवेदन आहे ते मा. आयुक्त साहेबांनी प्रस्तृत करायचे आहे. व आपण प्रश्न करुन माझ्याकडे उत्तराची अपेक्षा करत आहात. निवेदन करणे माझ्या कार्यक्षेत्रात नाही. तरी मी संक्षिप्तपणे आपणांस सांगु इच्छितो की,...................

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:—मा. सचिव साहेब, मी आपणांस सांगु इच्छितो की, आमच्या समोर केवढया तरी लक्षवेधींवर चर्चा झालेल्या आहेत. लक्षवेधींवर कशी चर्चा होते? कशी प्रश्नोत्तरे होतात? अधिका—यांना कसे उभे करुन त्यांच्याकडुन कसे उत्तरे दिली जातात हे आम्ही पाहिले आहे, यासाठी जर काही माहिती देवु शकत असाल तर ती देण्यामध्ये आपण मागेपुढे करावयास नको.

मा. सचिव :—मी आपल्या प्रश्नाचेच उत्तर देत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—सचिव साहेबांना धमकावु नका.

मा. सचिव :—मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ११ क व कलम १२ नुसार अशी तरतुद आहे की कोणत्याही नगरसेवकाविरुध्द कारवाई केली जावु शकते. परंतु हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे त्यामुळे त्यावर भाष्य करु इच्छित नाही. म्हणुन संक्षिप्तपणे सांगत आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—मिळाले तुम्हांला उत्तर मिळाले.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:—मा. सचिव साहेब मी तुम्हांला सुचीत करु इच्छितो.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—मा. सचिवांना काय सुचीत करणार? त्यांनी तुम्हांला सुचीत केले तुम्ही त्यांना काय सुचीत करणार? उलटे काम होत आहे काय? कायदयाचे जाणकार ते आहेत की तुम्ही आहात?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—मा. सचिव साहेब, मी आपणांस हे सांगु इच्छितो की, जेव्हापासुन हे प्रकरण न्यायालयात गेले आहे, माझे त्याबाबतीत काहीही म्हणणे नाही. कोर्टामधुन स्थगिती आदेश मिळाल्यानंतर सुध्दा श्री. ठाकुर बेहरानी महासभेमध्ये उपस्थित राहत नाहीत का?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—अहो प्रकरण न्यायालयात आहे, यांना का विचारता? न्यायालयात जावुन विचारा ना?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— हे न्यायालयाचे प्रकरण नाही. न्यायप्रविष्ट आहे. त्याबाबत मी बोलत नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—तुम्ही कोण होतात विचारणारे? सभागृहामध्ये फुकटची बडबड करत राहतात. बडबड करुन सभागृहाची वेळ फुकट घलवता. तुमच्या बोलण्यामुळे आमची एक महत्वाची लक्षवेधी सुचना यामुळे गेली. शहराच्या एका महत्वाच्या समस्येवर चर्चा होवु शकली नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—............ ते सर्व माहिती आहे आम्हांला.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— काय माहित आहे?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— सर्व माहित आहे, खोटया तक्रारी............

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— हे तर सर्वांना माहित आहे की, श्री. ठाकुर बेहरानी हे सभांना उपस्थित राहत नाहीत. हे आपणांसही माहित आहे व सचिव साहेबांना सुध्दा माहित आहे.

मा. सदस्य श्री. सुरेश जाधव :— कुणी सदस्य सभागृहात येत नाही तर यांना त्रास काय आहे? श्री. देवेंद्रसिंह खेमाणी यांना त्रास काय आहे?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—मला बोलु दिले जात नाहीत? माझया बोलण्यामध्ये अडथळे आणले जात आहेत.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रीत आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—मी बोलत असतांना तीन—तीन सदस्य उभे राहुन बोलत आहेत हा माझा अपमान आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—आमदार नऊ वर्ष तुरुंगात होता. विधानसभेमध्ये तो गेला नव्हता हे माहित नाही काय?

मा. महापौर :—आमचे जे सन्माननिय सचिव महोदय आहेत, त्यांना श्री. दर्शनसिंह यांचा असा प्रश्न आहे की, कुणीही नगरसेवक जसे की आमच्या नगरसेविका श्रीमती भगवंती रुपचंदानी या आजारी असल्यामुळे महासभेस येवु शकत नव्हत्या. त्यांना आम्ही सहा महिन्याची मंजुरी दिली होती. सचिवांचे म्हणणे आहे की, हे प्रकरण न्यायालयात असल्यामुळे त्यावर चर्चा करु शकत नाही. चर्चा मी तोपर्यंत करु शकत नाही जोपर्यंत न्यायालयात प्रकरण आहे. यांचे म्हणणे हे आहे, कृपया मध्ये कुणी बोलु नये. यांचे म्हणणे आहे की, सहा महिन्यानंतर

अनर्ह झाल्यानंतरही त्यांना सर्व सुविधा मिळतात त्यांच्याबाबतीत न्यायालयाचा आदेश काय आहे? त्यांचा मानधनाचा चेक बॅकेत पाठविला जातो. व त्यांची पत्रे सार्वजनिक बांधकाम विभाग असो किंवा अन्य कुठला विभाग असो त्या सर्व विभागात जातात. जी व्यक्ती फरार आहे, गुजरात राज्य सरकारने ज्याच्याबाबतीत एक लाख रुपयाचे बक्षिस जाहिर केले आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत होते त्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. महापौर :—काय सचिव महोदयांनी ही माहिती न्यायालयात दिली आहे? आम्ही त्यांना हे विचारु इच्छित आहोत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— एक लाखाची गोष्ट करु नका, खोटं बोलु नका.

मा. महापौर :— पोलिस विभाग त्यांना शोधत आहे. पोलिस इकडे चौकशीसाठी येतात. पोलिस विभाग त्यांना पकडण्यासाठी एक लाख रुपयाचे बक्षिस जाहिर करते आणि आमची महापालिका त्यांना मानधन देते. जी व्यक्ती १८ महिन्यापासून महासभेत उपस्थित राहत नाही असा यांचा प्रश्न आहे कृपया त्याचे उत्तर दिले जावे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—खोटे बोलत आहेत. श्री. नारायण कालानी बारा वर्षापासुन फरार आहेत. त्याच्यावर किती बक्षिस जाहिर केले आहे?

मा. महापौर :— आता सुध्दा आहे. आता सुध्दा ती फाईल आहे. खोटं बोलण्याची काही गोष्ट नाही.

मा. सदस्य श्री. सुरेश जाधव :— हे पहा महासभेमध्ये वैयक्तीक आरोप केले जावु नयेत. ही महासभा आहे, आपले घर नाही. येथे तेच बोला जे सभागृहात बोलले पाहिजे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—शहर हिताबाबत बोलत नाहीत. श्री. ठाकुर बेहरानींची त्यांना आठवण येते. श्री. नारायण कालानी १२ वर्ष फरारी होते हे येथे विसरले. श्री. पप्पु कालानी नऊ वर्ष जेल मध्ये होता ते विसरले का? हे माहित नाही काय?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—माझे तर हेच म्हणणे आहे की, एकतर ते सलगपणे गैरहजर असतात. त्यांची पत्रे येथे कशी येतात? ती कोण स्विकारतो? त्यांच्या निधीचा उपयोग कसा होत आहे? सार्वजनिक बांधकाम विभागाचे लोक जावुन प्राकलने कशी तयार करत आहेत? यासर्व गोष्टीचा खुलासा व्हावा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—सर्व प्रभागाचा विचार करा. एक्साईज चोरीमध्ये आपल्या महापौरसुध्दा ५ दिवस पुणे येथे जेल मध्ये बंद होत्या हे माहित आहे काय तुम्हांला?

मा. महापौर :— हे सर्व माहित आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— महापौर महोदया, आम्हांला माहित नाही. हे काय विचारत आहेत? आपण म्हणता की सर्वांना माहित आहे, आम्हांला माहित नाही. काय झाले होते?

मा. महापौर :— माहिती करुन घ्या.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आपण सांगा ना?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— सांगा, सांगाना?

मा. महापौर :— घरी बसुन माहित करुन घ्या.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—घरी बसुन कसे माहित होईल?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आपण म्हणालात सर्वांना माहित आहे म्हणुन बोललो.

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :— मा. महापौरजी, एकेक सदस्य बोलेल तर आम्ही येथे जो बसलो आहोत त्या सर्वांना कळेल तरी. कमीत कमी शांतपणे तरी बोला ना?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—श्री. लाल पंजाबी आपण एवढे वरीष्ठ असतांना देखील असे खोटे बोलत आहात.

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :—हा सभागृहाचा अपमान आहे. मी तर म्हणते आम्ही काय येथे रिकामटेकडे येथे येवुन बसलो आहोत काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— सचिव साहेबांना बोलु दिले जात नाहीत.

मा. सचिव :—मा. महापौर महोदया, आपले सन्माननिय सभागृह नेता श्री. देवेंद्रसिंह खेमाणी यांच्या ज्या शंका आहेत त्या लक्षवेधीच्या माध्यमातुन त्या अगोदरच येथे प्रस्तृत करण्यात आल्या आहेत. त्या शंकाबाबत मा. आयुक्त साहेबांनी एक निवेदन तयार केले आहे. ते आपले निवेदन आपणांस प्रस्तुत करतील. त्याने आपल्या सर्व शंकाचे निरसन होईल.

मा. आयुक्त :— मा. महापौर महोदया, सर्व सन्माननिय सदस्य, मी आपणांस विनंती करेन की येथे जे काम चालते ते आपण व्यक्तीशः घेवु नये. असे आहे की, जेव्हा कुणी महिला सदस्य किंवा इतर कुणीही सदस्य मग तो सत्ताधारी पक्षाचा असो किंवा कोणत्याही पक्षाचा असो, दुस—या सदस्याने त्यांचे बोलणे संपल्यानंतरच मा. महापौरांची परवानगी घेवुन बोलले पाहिजे. मी आपणा सर्वांना आता एवढीच विनंती करतो की, ही जी लक्षवेधी सुचना आहे ती मा. महापौरांनी स्विकृत केली आहे. त्यांनी ती स्विकृत केली असल्याने मी त्यावर निवेदन करत आहे.

श्री. ठाकुर बेहरानी हे प्रभाग क्र. २५ मधुन फेब्रुवारी २००२ मध्ये निवडुन आले होते. व फेब्रुवारी, २००४ पासुन जुलै, २००४ पर्यंत सलग सहा महिने कोणत्याही महासभेत उपस्थित राहिले नाही. याबाबतीत जी माहिती आहे ती अशी आहे, सर्वसाधारण महासभा १६ फेब्रुवारीला झाली होती, १६ मार्चला सर्वसाधारण महासभा झाली होती, एप्रिलची सर्वसाधारण महासभा १९ तारखेला झाली होती, ती स्थगित होवुन ती पुन्हा २८ एप्रिलला झाली होती, विशेष महासभा १९ मे ला झाली होती, सर्वसाधारण महासभा १९ मे रोजी झाली होती, सर्वसाधारण महासभा १८ जुन, २००४ रोजी झाली होती ती स्थगित झाली होती ती नंतर ३० जुन, २००४ रोजी झाली होती, जुलैची सर्वसाधारण महासभा १९ जुलै रोजी स्थगित होवुन ती २६ जुलै रोजी झाली होती. या सहा महिन्यामध्ये नगरसेवक श्री. ठाकुर बेहरानी हे कोणत्याही सभेस उपस्थित नव्हते. उपलब्ध दस्ताऐवजाची माहिती उपलब्ध आहे. बडोदा पोलिस स्टेशनकडुन त्यांच्या विषयी आम्हांला काही लेखी सुचना देण्यात आल्या आहेत. त्यांच्या विरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलमानुसार जे काही गुन्हे दाखल करण्यात आले होते त्याबाबतीत लिहिले होते.......

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—साहेब, कोणत्या वर्षाचे गुन्हे होते?

मा. आयुक्त :— त्यांनी जे पत्र दिले आहे, त्यातील जर आपणांस माहिती पाहिजे असेल तर मी आपणांस ते पत्र वाचुन दाखवितो.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—कोणत्या वर्षामध्ये दाखल झाले होत? १९९५ मध्ये दाखल झाले होते.

मा. आयुक्त :— त्याचा नंबर आहे १/१९९५. व अलग—अलग कलमे आहेत. त्यामध्ये खोलवर जाण्याची गरज नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ११( क )जे आहे त्यामध्ये अशी तरतुद आहे की, जर सलग ६ महिने कोणताही नगरसेवक सभेस आला नाही तर त्याचे जे पद आहे ते अनर्ह होते. त्या कलमानुसार त्यांना अनर्ह करण्याची तरतुद आहे. व त्यापुढे जे कलम १२ आहे, १२( १) व (२ )मध्ये अशी तरतुर आहे की, कलम ११ नुसार जर सहा महिने ते सभांना उपस्थित राहिले नाहीत तर कुणीही नगरसेवक महापालिकेला लिहुन पाठवु शकतो की ते सहा महिन्यापासुन सभांना येत नाहीत. किंवा आयुक्तांला स्वत:ला असे वाटत असेल की हे सहा महिन्यापासुन सभांना येत नाहीत तर ते स्वतः न्यायालयापुढे अर्ज करुन त्यांना अनर्ह करु शकतात. या प्रस्तृत प्रकरणामध्ये हे जे नगरसेवक आहेत त्यांचे बंधु न्यायालयात गेले आहेत व

कल्याण दिवाणी न्यायालयामध्ये ९५/२००४ अन्वये त्यांनी अर्ज सादर केला आहे. कायदेशीर जी कारवाई आहे ती चालु आहे. परंतु आपल्या महापालिका अधिनियमानुसार कलम १२ (२) च्या तरतुदीनुसार त्यांनी असे लिहिले आहे की जोपर्यंत या प्रकरणाचा न्याय निवाडा होत नाही तोपर्यंत हे जे सदस्य आहेत तो पर्यंत त्यांना सदस्य म्हणुन ठेवावे लागते. आता राहिली गोष्ट ते सभांना उपस्थित न राहताही त्यांना जे मानधन दिले जाते त्याबाबतीत मी चौकशी करेल. परंतु मी एवढेच सांगेन की अधिनियमाच्या ११ कलमातील तरतुदीनुसार जर एखादा सदस्य ६ महिने सभेला येत नसेल तर तो अनर्ह होवु शकतो त्यासाठी कलम १२ मध्ये जी तरतुद आहे, आम्हांस न्यायालयात जावे लागते, आपण जावु शकता किंवा मी सुध्दा जावु शकतो व सदर प्रकरण न्यायालयात दाखल असल्यामुळे याबाबतीत जोपर्यंत अंतिम निर्णय येत नाही तो पर्यंत ते सदस्य म्हणुन राहु शकतात. असे कायदयाचे म्हणणे आहे. हे प्रकरण न्यायालयात असल्यामुळे त्याबाबतीत अधिक चर्चा करु नये अशी मी आपणांस विनंती करतो.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– मा. महापौरजी, माझे म्हणणे असे होते की, स्थगिती आदेश मिळाल्यानंतर ते महासभेमध्ये येत नाहीत. ही सुचना न्यायालयात दिली आहे काय? न्यायालयाकडुन स्थगिती मिळाल्यानंतर ते अनर्ह आहेत याची कोर्टाला माहिती दिली आहे का, ते महासभेत येत नाहीत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–न्यायालयात आपण जावुन सांगा की, ते महासभेत येत नाहीत. आपणांस कुणी मनाई केली आहे काय?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– हा माझा प्रश्न आयुक्त महोदयांना आहे आपणांस नाही आपण कृपया बसुन घ्यावे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–कृपया करुन बसुन घ्यावे आपण मला उभे केले आहे काय? तुम्हांला सांगितल्यानंतरही तुम्ही प्रश्न विचारणे चालु ठेवता? साहेब सांगा त्यांना सांगा.

मा. आयुक्त :–स्थगिती आदेश आहे की नाही, परंतु अंतिम निर्णय येईपर्यंत ज्यांचे सदस्यत्व राहते............

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–परंतु आपण मा. न्यायालयात जर वस्तुस्थितीची माहिती दिली जात नसेल तर माहितीच्या अभावी त्यांचा निर्णय काहीही येवु शकतो.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–ती गोष्ट तुम्ही न्यायालयात जावुन सांगितली पाहिजे ना? येथे आमचा वेळ का फुकट घालविता?

मा. सचिव :–मा. महापौर महोदया, सन्माननिय सभागृह नेता श्री. देवेंद्रसिंह खेमाणी यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याचे एकच उत्तर आहे की कल्याण येथिल न्यायालयात जी याचिका दाखल केली होती तिच्या पहिल्या तारखेलाच महापालिकेच्या वतीने सविस्तरपणे उत्तर दाखल केले आहे. त्याबाबतीत आपणांस कोणतीही शंका व्यक्त करण्याची आवश्यकता नाही. जो काही निर्णय होईल तो मेरिटच्या गुणवत्तेच्या आधाराने निर्णय होईल.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :– याबाबतीत श्री. देवेंद्रसिंह यांना वैयक्तीक रस वाटत आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–कमालीची गोष्ट आहे माझ्या बोलण्याने ब–याचशा लोकांना दु:ख होते. त्यांचे प्रभागवाशीच त्रस्त आहेत त्यांना शोधत आहेत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–मा. महापौर, मा.आयुक्त साहेब, आता आताच सांगीतले की हे प्रकरण न्यायालयात आहे व यावर चर्चा करु शकत नाही. चर्चा झालीही आहे तर कृपया हा विषय चर्चेतुन बाहेर काढला जावा.

मा. महापौर :–बिल्कुल नाही तो इतिवृत्तांतात राहिल. भलेही न्यायालयाला जी काही कारवाई करायची असेल ती करावी. सभेचे पुढील कामकाज चालु केले जावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– माझा हरकतीचा मुद्दा

''प्रभाग समिती क्र. ३ व ४ च्या सभापतींच्या निवडीच्या सभा मा. महापौरांकडून २३ मे पासून अनिश्चित कालावधीसाठी तहकुब केल्या बाबत''

मी हरकतीचा मुद्दा दिलेला आहे की, प्रभाग समितीचा कालावधी ३१ मार्चला पुर्ण होतो. व कायदयामध्ये एक अशी तरतुद आहे की, नविन वित्तीय वर्ष सुरु झाल्यावर म्हणजे एप्रिलमध्ये प्रभाग समितीच्या निवडणुका झाल्या पाहिजेत. २३ मे ला निवडणुका झाल्या होत्या व तो महापौरांचा अधिकार आहे. प्रभाग समिती क्र. ३ व ४ च्या सभापतींच्या निवडणुकीच्या सभा अनिश्चित कालावधीसाठी तहकुब झाल्या. २३ मे नंतर आणखी तीन महिने होवुन गेले आहेत. अदयापपर्यंत त्या निवडणुका झालेल्या नाहीत. जेव्हा प्रश्नोत्तराचा कालावधी चालु होता तेव्हा त्यांनी कायदयाची तरतुद सांगितली होती आणि त्यांच्या त्या बोलण्याचा मला आनंद झाला होता कारण की, मला असे वाटते की नेहमी कायदेशीर बाबीचे पालन झाले पाहिजे. जेव्हा त्यांना सांगितले की, आपण कायदयातील तरतदु सांगा. त्यामुळे मला मनापासुन आनंद झाला. व मला नेहमी असे वाटते की, कायदयाचे रक्षण झाले पाहिजे. तर मी महापौर महोदयांना सांगु इच्छितो की, प्रभाग समितीच्या या ज्या निवडणुका आहेत त्या कायदयानुसार लावाव्यात. या ज्या निवडणूका आहेत त्यापण कायदयानुसार लवकरात लवकर लावाव्यात.

मा. महापौर :—ठिक आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—श्री. लाल पंजाबी हैराण झाले की कायदे सुध्दा असतात.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—उत्तर दया.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—महापौर महोदया, हरकतीच्या मुद्दयावर उत्तर देणे बाकी आहे.

मा. महापौर :—तुम्ही म्हणालात की कायदयानुसार जे बसते ते करा. त्यावर मी म्हटले ठिक आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—कधी करणार? लवकर करा.

मा. महापौर :—करु ना.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—करु म्हणजे कधी?

मा. महापौर :—त्यासाठी योग्य अशी तारीख देवु. एखादी सोयीस्कर तारीख ठरवुन सभा सुचना काढु.

**मा.महापौंकडून हरकतीच्या मुददयांचा निकाल**

'एखादी सोयीस्कर तारीख ठरवून प्रभाग समिती क्र. ३ व ४ च्या सभापतींच्या निवडणूकीची सभा सूचना काढण्यांत येईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— कुठल्या महाराजांकडुन मुहुर्त काढायचा आहे काय? सोयीस्कर तारीख म्हणजे आठ—पंधरा दिवसाची तारीख.

मा. महापौर :—आपणांस सुचना दिली जाईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. सचिव साहेब, हरकतीच्या मुद्दयावर मी सुध्दा म्हटले होते व त्यावेळेस महापौरांच्या आसनावर श्री. किशोर वनवारी हे पीठासीन अधिकारी म्हणुन बसले होते. त्यावेळेस त्यांनी आदेश दिला होता की, हरकतीच्या मुद्दयावर आपण नंतर चर्चा करा. माझा हरकतीचा मुद्दा असा होता की, मागील सहा दिवसांपासुन महानगरपालिका मुख्यालयासमोर काही ठेकेदार उपोषणांस बसले आहेत व लक्षवेधी सुचनेवरही महासभेत चर्चा झाली आहे. रिजेन्सी हॉल शेजारी फार मोठा खड्डा आहे. तेथे सुध्दा काम चालु आहे व आतापर्यंत ते काम अर्ध्यावर येवुन थांबले आहे. शहरामध्ये कित्येक रस्त्यांवर खड्डे पडले आहेत आणि ते बुजविण्याचे काम चालले आहे. कित्येक नगरसेवकांच्या नगरसेवक निधीतील कामे मंजुर होवुन ती अर्धवट पडुन आहेत. ज्याप्रमाणे शासन व प्रशासनाबरोबर विरोधी पक्ष हा एक महापालिकेचा हिस्सा आहे

त्याचबरोबर ठेकेदार हे सुध्दा आपल्या महापालिकेचे एक अंग आहे. त्याचबरोबर आमच्या बरोबर मा. महापौर व आयुक्त साहेबांचे कर्तव्य ठरते की, एका प्रतिनिधी मंडळाने त्यांची भेट घ्यावी. व एवढया दिवसांपासुन उपोषणास बसलेल्या आमच्या त्या बंधुंचे उपोषण सोडवावे. व आज त्यांनी भिक मागो अभियान हे जे दु:खदाखक दृश्य सादर केले अशाप्रकारचे दृश्य कोणी जाणुनबुजुन सादर करीत नाही. त्यांची पण काहीतरी मजबुरी असेल. एवढी मोठी मजबुरी आल्यानंतर कुठे तरी त्यांनी ते पाऊल उचलले असेल, त्यांचे उपोषण लवकरात लवकर उठवावे हे सभागृहातील सर्व सहकारी , आयुक्त व महापौरांचे कर्तव्य ठरते. आापल्या शहरातील विकास कामे जवळ जवळ ठप्प झाली आहेत. ती आपणांस सुरु करता येवु शकतील.

<u>मा. महापौर :—</u>आयुक्त साहेब, याबाबींकडे लक्ष देतील. व त्यांना पेमेंट देण्याची सोय करतील.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौर महोदया, त्यांचे उपोषण सोडविण्यासाठी आपण सर्व पक्षीयांचे प्रतिनिधीमंडळा बरोबर तेथे गेलात तर संपुर्ण सभागृह आपले ऋणी राहिल.

<u>मा. महापौर :—</u>बिल्कुल.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. २ :—</u> मागील महासभांचे इतिवृत्त कायम करणे :—
अ) सर्वसाधारण महासभा दिनांक २०/०६/२००६ (त्यात १७/०७/२००६)
ब) सर्वसाधारण महासभा दिनांक१७/०७/२००६

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. महापौर :—</u> मागील महासभांचे अ) सर्वसाधारण महासभा दिनांक २०/०६/२००६ (त्यात १७/०७/२००६), ब) सर्वसाधारण महासभा दिनांक १७/०७/२००६ इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ३:— मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेला माहे एप्रिल २००६ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल व त्यात विधी अग्राहय प्रकरणी स्थायी समिती ठराव क्र. २९, दिनांक १४/०७/२००६ अन्वये दिलेले आदेश विचारात घेणे.

---

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी, मा. सदस्य श्री. हरदास माखिजा, श्री. मोहन बेहरानी, श्री. मोहन साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सचिव :—</u>स्थायी समितीचा आदेश कायम करायचा आहे काय?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. सचिव:—</u>ठिक आहे? पास?

<u>मा. महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ३ :—** मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेला माहे एप्रिल २००६ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल व त्यात विधी अग्राहय प्रकरणी स्थायी समिती ठराव क्र. २९, दिनांक १४/०७/२००६ अन्वये दिलेले आदेश विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे एप्रिल २००६ चा जमा खर्चाचा अहवाल.

वित्तीय वर्ष २००६—२००७ च्या “अ” व “क” अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न व माहे एप्रिल २००६ मध्ये प्राप्त झालेले उत्पन्न हे पुढे दर्शविलिले आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रूपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | १४७,६६,१४,००० |
| “क” | ४९,६४,१५,००० |
| एकूण | १९७,३०,२९,००० |

अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित जमा रूपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | महसूल जमा | १७१,७१,२७,००० |
| २ | शासकीय अनुदान | ५,३०,००,००० |
| ३ | अनामत रकमा/दायित्वे इ. | २०,१६,५०,००० |
| | एकूण | १९७,१७,७७,००० |
| | प्रारंभिक शिल्लक | १२,५२,००० |
| | एकुण :— | १९७,३०,२९,००० |

वित्तीय वर्ष २००५—२००६ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रूपये १७१,७१,२७,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे एप्रिल २००६ पर्यंत समप्रमाणात रूपये १४,३०,९४,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रूपये ६,४०,०९,०००/—( एकूण महसूल जमेच्या ३.७२ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे एप्रिल २००६ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प “अ” | | अंदाजित | माहे एप्रिल २००६ पर्यंत अपेक्षित | प्रत्यक्ष जमा (रू. १०००/—पुर्णांकांत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जकात | ७२,०३,३५,००० | ६,००,२८,००० | ५,६४,९१,००० | ९४.१० |
| २ | मालमत्ता कर | ३३,५०,००,००० | २,७९,१७,००० | ३५,९२,००० | १२.८६ |
| ३ | एम्. आर. टी. पी. वसूली | ४,१२,००,००० | ३४,३३,००० | ३,४८,००० | १०.१३ |
| ४ | मार्केट उत्पन्न | १०,००,००० | ८३,००० | — | — |
| ५ | रूग्णालय फी | ७५,००० | ६,००० | ३,००० | ५०.०० |
| ६ | परवाना व इतर फी | ११,३६,४०,००० | ९४,७०,००० | १,२५,००० | १.३१ |
| ७ | संकीर्ण | ९८,८७,००० | ८,२४,००० | २,००,००० | २.०२ |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २५,२५,००० | २,११,००० | ३३,००० | १५.६३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण—अ | १२२,३६,६२,००० | १०,१९,७२,००० | ६,०७,९२,००० | ५९.६१ |
| | अर्थसंकल्प "क" | | | | |
| १ | पाणी बिले वसुली | ४१,००,००,००० | ३,४१,६७,००० | २३,३४००० | ६.८३ |
| २ | मालमत्ता कर | ८,१२,५०,००० | ६७,७१,००० | ८,०४,००० | ११.८७ |
| ३ | परवाना/इतर फी | २१,०५,००० | १,७५,००० | ७९,००० | ४५.१४ |
| ४ | संकीर्ण | १,१०,००० | ९,००० | — | — |
| | एकुण "क" | ४९,३४,६५,००० | ४,११,२२,००० | ३२,१७,००० | ०७.८२ |
| | एकुण "अ" व "क" | १,७१,७१,२७,००० | १४,३०,९४,००० | ६,४०,०९,००० | ४४.७३ |

"अ" व "क" अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रू. १,९७,३०,२९,०००/—(प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे एप्रिल २००६ मध्ये रू. ११,२६,९७,२७२/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

खर्च :—

**माहे एप्रिल २००५ ते एप्रिल २००६ या कालावधीमध्ये रूपये ८,१२,१८,१९८/— खर्च लेखांकित झालेला आहे.**

खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकांचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजूरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदी अधिन आहे.

<u>निवृत्ती वेतन प्रकरणे</u> :— माहे एप्रिल २००६ मध्ये महापालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या/निधन पावलेल्या कर्मचा—यांची ३ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निर्दशनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे :—

## वाहन विभाग

विषय :— <u>रूग्णवाहिकेच्या भाडयाची रक्कम रूपये ११००/— वाहनचालकाकडून वसूल करणेबाबत.</u>

दिनांक ३१/३/२००५ रोजी वाहनचालक श्री. विनायक भालेराव व श्री. प्रकाश सोनावणे यांनी रूग्ण वाहिका क्र. MCT — ५९०५, मधून रूग्णासह उल्हासनगर ते अहमदनगर असा ४२० किलोमिटरचा प्रवास केल्याचे दिसून येते. स्थायी समिती ठराव क्रमांक ४३ दिनांक २३/०८/२००२ अन्वये लाभार्थीकडून रूग्णवाहीचे रूपये ५/— प्रती कि.मी. प्रमाणे भाडे रूपये २१००/— (४२०X५=२१००) वाहन चालकाने वसूल केल्याचे दिसून येते. वाहन चालकाने भाडयाच्या पैशांची रितसर पावती तयार करणे आवश्यक होते. तथापि वाहनचालकाने पावती तयार न करता पैसे आपल्याजवळ ठेवले ही अत्यंत गंभीर बाब आहे. तसेच त्याने प्रवासात रूग्णवाहीकेमध्ये रूपये १०००/— चे डिझेल भरले आहे. वास्तविक पहाता रूग्णवाहीकेत पुरेशे इंधन भरून पाठविणे आवश्यक आहे व भाडयाची संपूर्ण रक्कम त्याने महापालिका कोषागारात जमा करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

तसेच अद्याप सदर रक्कम त्याने महापालिकेच्या कोषागारात जमा केल्याचे दिसून येत नाही. तरी सदर रक्कम रूपये ११००/—(रूपये अकराशे फक्त) वर द.सा.द.शे. १८% व्याज दराने मुळ रक्कम भरणा करी पर्यंतच्या कालावधीसाठी त्यांच्याकडून वसूल करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखा परिक्षण विभागास

देणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/वाहन विभाग/असज्ञा/६३/०६ दिनांक २५/४/२००६ अन्वये उप–आयुक्त (वाहन), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि त्यांच्याकडून अद्याप कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

स्थायी समिती ठराव क्र. २९ दिनांक:–१४/७/२००६

सुचकाचे नाव :– श्री. गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे माहे एप्रिल २००६ पर्यंतच्या महापालिका लेख्यांची छाननी व मुख्य लेखा परीक्षकांचा विधी अग्राहय प्रकरणी अहवालाचा विचार करुन उपरोक्त कर्मचा–याविरुध्द् कारवाईच्या दृष्टीने खालील आदेश देत आहे.

१) प्रशासनाने उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे.
२) श्री. विनायक भालेराव व श्री. प्रकाश सोनवणे, वाहन चालक यांच्याकडुन भाडयाची रक्कम व्याजासह प्रशासनाने ७ दिवसात वसुल करावी व महापालिका कोषागरात जमा करावी.
३) संबधित कर्मचा–यांनी ७ दिवसांच्या आत सदर रक्कमेचा भरणा महापालिका कोषागरात न केल्यास त्यांच्या वेतनातुन सदरची रक्कम कपात करण्यात यावी.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र: ११ दिनांक:–१९/८/२००६

सुचकाचे नाव :– श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
अनुमोदकाचे नाव :– श्री. मोकल चंदाराम

ही महासभा मुख्य लेखा परिक्षकांकडुन आलेला माहे एप्रिल २००६ पर्यंतचा जमा खर्च व त्यात विधी अग्राहय प्रकरणी अहवाला आधारे स्थायी समिती ठराव क्र. २९, दिनांक १४/०७/२००६ अन्वये दिलेले आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ४ :– सुभाष नगर ते पंजाबी कॉलनी अंतर्गत (फस्ट गेट ते पंजाबी कॉलनी) हा रस्ता ''ना फेरीवाला क्षेत्र'' म्हणुन घोषित करणे.

---

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–आमचे असे म्हणणे आहे की, संपुर्ण शहरातील रस्त्यांचा प्रस्ताव आला पाहिजे. या एकच रस्त्याचा प्रस्ताव का आणला? नाहीतर काही वेळा काय होते कुण्या एखादया व्यक्तीचा त्यात रस असतो त्यामुळे एकाच रस्त्याबाबतीत ठराव पारीत होतो.

**मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—**मा.महापौरजी, पंजाबी कॉलनी येथे जे फेरीवाले बसतात त्यामुळे तो रस्ता वर्दळीच्यादृष्टीने अतिशय अरुंद होतो. काही वर्षापुर्वी या रस्त्यावरुन एक गणपतीची मुर्ती आणतांना ती मुर्ती पडता पडता वाचली. मोठे नुकसान होणार होते ते वाचले. त्यासाठी सभागृहातील सर्व सदस्य व मा .महापौर महोदयांना निवेदन आहे की तो रस्ता ना फेरीवाला झोन म्हणुन घोषित केला जावा.

**मा. सचिव :—**पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**मा. महापौर :—** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ४:—** सुभाष नगर ते पंजाबी कॉलनी अंतर्गत (फस्ट गेट ते पंजाबी कॉलनी) हा रस्ता ''ना फेरीवाला क्षेत्र'' म्हणुन घोषित करणे.

**प्रस्तावना**

मा. नगरसेवक श्री. प्रभुनाथ दुखंती गुप्ता यांनी दि. ८/११/२००५ च्या पत्रान्वये उल्हासनगर येथिल फस्ट गेट ते पंजाबी कॉलनी येथिल क्षेत्र ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित करणेबाबत विनंती केलेली आहे.

मा. महापालिका महासभा ठराव क्र. १२, दिनांक १९/७/२००२ अन्वये उल्हासनगर शहरातील एकुण १९ रस्ते ''ना फेरीवाला क्षेत्र'' म्हणून घोषित करण्यास मान्यता मिळालेली आहे.

मा. शहर अभियंता उल्हासनगर महानगरपालिका यांचे दिनांक १६/१२/२००५ चे पत्रान्वये प्राप्त अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित करणेकरीता पोलिस वाहतुक नियंत्रण शाखेच्या शिफारसी नंतर महासभेकडुन प्रस्ताव मंजुर करुन घेणे आवश्यक आहे तरी त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

मा. शहर अभियंता यांचे प्राप्त अहवालानुसार मा. पोलिस निरिक्षक वाहतुक नियंत्रण शाखा उल्हासनगर—२ यांचेकडुन ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित करणेबाबत अभिप्राय मागविणेत आले. मा. पोलिस निरिक्षक यांचे अभिप्राय प्राप्त झालेले असुन उल्हासनगर कॅम्प क्र. ३ येथिल फस्ट गेट ते पंजाबी कॉलनी हा रस्ता अरुंद असुन हातगाडीवाले व भाजीवाले रोडवरच विक्रीसाठी उभे राहत असल्यामुळे रहदारीस व वाहतुकीस अडथळा होत असल्यामुळे सदर रस्ता आपले विभागाकडुन ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी असे नमुद केलेले आहे. तसेच कार्यकारी अभियंता सां.बां.वि. यांचेकडुन ''ना फेरीवाला क्षेत्र'' आराखडा व सदर रस्त्याची लांबी रुंदी प्राप्त झालेली आहे ती खालीलप्रमाणे

| अ.क्र. | ना फेरीवाला क्षेत्र नाव | कॅम्प क्र. | रस्त्यांपासुन | विभागापर्यंत | ना फेरीवाला क्षेत्र एकुण लांबी **X** रुंदी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष नगर, पंजाबी कॉलनी अंतर्गत रस्ता | ०३ | फस्ट गेट जवळील डॉ. पाठक यांचे घर | पंजाबी कॉलनी चौक | ४७६ मी. X ६.४५ मी. |

यापुर्वी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८४ अन्वये मा. महासभा ठराव क्र. १२, दिनांक १९/७/२००२ नुसार उल्हासनगर शहरातील १९ रस्ते ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित करणेस मान्यता मिळालेली आहे.

मा. शहर अभियंता उल्हासनगर महानगरपालिका व मा. पोलिस निरिक्षक वाहतुक नियंत्रण शाखा, उल्हासनगर यांचे अभिप्राय विचारात घेता सुभाष नगर, पंजाबी कॉलनी अंतर्गत (फस्ट गेट ते पंजाबी कॉलनी) हा रस्ता ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित करणेबाबत मा. महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब उक्त रस्ता ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित करणेबाबत सदर विषय महासभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्रः १२** **दिनांकः—१९/८/२००६**

सुचकाचे नाव :— श्री. गुप्ता प्रभुनाथ

अनुमोदकाचे नाव :— श्री. लबाना होशियारसिंह

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सुभाष नगर ते पंजाबी कॉलनी अंतर्गत (फस्ट गेट ते पंजाबी कॉलनी) हा रस्ता ''ना फेरीवाला क्षेत्र'' म्हणुन घोषित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.५५ वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २०/०९/२००६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/०९/२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार, दिनांक २०/०९/२००६ रोजी सायंकाळी ४—०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश

२) मा. उपमहापौर :—श्री. तलरेजा विनोद चंदीराम

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती जावळे संगिता रमेश | ४२. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ४. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | ४३. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ४४. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४५. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ४६. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| ८. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | ४७ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्रीमती मोकल सीमा चंदाराम | ४९. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ११. | श्री. गायकवाड दिलीप | ५०. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ५१. | श्री. भालेराव गौतम यशवंत |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ५२. | श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ५३. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५४. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५५. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| १७. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५६. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५७. | श्री. मनवानी अन्नु (सनमुख) |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५८. | श्रीमती पंजाबी दिपा नारायण |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५९. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २१. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ६०. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| २२. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र | ६१. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| २३. | श्री. पवार नाना आनंदा | ६२. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| २४. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ६३. | श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग |
| २५. | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ६४. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| २६. | श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा | ६५. | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| २७. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६६. | श्रीमती छाब्रिया भारती पहलाज |
| २८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६७. | श्री. बठीजा संजय रामचंद्र |
| २९. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६८. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६९. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३१. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ७०. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| ३२. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ७१. | श्रीमती दासानी मिनु राजकुमार |
| ३३. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७२. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३४. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ७३. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३५. | श्री. जेसवानी सतरामदास फतनदास | ७४. | श्री. वधारिया राजेश नानिकराम |
| ३६. | डॉ. (श्रीमती) साधवानी जया | | |
| ३७. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | | |
| ३८. | श्रीमती खिलनानी भावना रवी | | |
| ३९. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल | | |
| ४०. | श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग | | |
| ४१. | श्रीमती माने किरण बाळकृष्ण | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, २. श्री. पाटील विश्वनाथ गौतम, ३. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास,४. श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास, ५. श्री. निकम शांताराम ओंकार, ६. श्री. माखिजा हरदास सन्मुखदास, ७. श्री. लालवानी दिलीप जेठानंद हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

श्री. सदाशिव कांबळे हे आयुक्त म्हणुन सभेस उपस्थित होते तसेच खालील अधिकारी सभेस हजर होते.

२८.श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
२९.श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
३०.श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
३१.श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
३२.श्री. ए.एस.कांबळे, प्रभारी मुख्य लेखा परिक्षक
३३.श्री. बी.सुंदरेश्वरन, प्रभारी शहर अभियंता
३४.श्री. अ.पां.गुरगुळे, नगररचनाकार
३५.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
३६.श्री. तुकाराम तारदाळकर, प्रभारी प्रभाग अधिकारी
३७.श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी
३८.श्री. अ.म.काटे, प्रभाग अधिकारी
३९.श्री.बी.एम.नितनवरे, प्रभारी प्रभाग अधिकारी
४०.श्री.यु.के.रामसिंघानी, सहायक नियंत्रक, अ.बां.नि.वि
४१.श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग
४२.श्री. आर.एस.गिते, अग्निशमन अधिकारी

सायंकाळी ४.१० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:– काही दिवसांपूर्वी मालेगाव येथे झालेल्या दहशतवादी हल्लयात जी प्राणहानी झाली आहे, ब–याच लोकांची हत्या झाली आहे त्या लोकांना श्रध्दांजली अर्पीत करावी अशी मी विनंती करतो.

मा. सदस्य श्री.मोहन साधवानी :– आपले सदस्य श्री. गौतम भालेराव यांच्या वडिलांचे देखिल निधन झाले आहे. त्यांना देखिल श्रध्दांजली दयावी अशी मी विनंती करतो.

शोक प्रस्ताव

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

दिनांक ८.९.२००६ रोजी नाशिक जिल्हयातील मालेगांव येथे भिषण बॉम्बस्फोट होवून त्यामध्ये ३० पेक्षा जास्त निष्पाप लोकांचा बळी गेला आहे. त्याच प्रमाणे महापालिका सदस्य श्री. गौतम भालेराव यांचे वडिल कै. यशवंत भालेराव यांचे देखिल नुकतेच निधन झाले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. १२ अ दिनांक:–२०/९/२००६

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार मालेगांव येथील बॉम्बस्फोटात बळी पडलेल्या व्यक्ती तसेच कै. यशवंत भालेराव यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या

कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्य श्री.राजु जग्यासी :— मा. महापौरजी आपल्या अनुमतीने मी राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या नगरसेवकांना एक सुचना देवू इच्छितो. राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षा तर्फे व्हिप जारी केलेला आहे.
मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— हा महासभेचा विषय नाही.

मा. सदस्य श्री.राजु जग्यासी :— माझे बोलणे पुर्ण होवु दया. मी येथे उपस्थित असलेल्या राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या सर्व नगरसेवक व नगरसेविकांना सुचित करु इच्छितो की, तुम्हाला पक्षातर्फे जो व्हिप देण्यात आलेला आहे त्याच्या आधारावरच आपण येथे मतदान करावे. तसेच महापालिकेच्या रेर्कोड साठी व्हिपची एक प्रत आपणास देखिल देत आहे.
मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— मा.महापौर महोदया व्हिपचा जो विषय आहे त्याचा महासभेशी काही संबध नाही. हा तुमच्या पक्षाचा विषय आहे तो येथे यायला नको.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— आम्ही बघीतलेलाच नाही. ही महासभा आहे पक्षाचे कार्यालय नाही.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— त्यामुळे तो विषय येथे येऊच शकत नाही.

मा. सदस्य श्री.देवेद्रसिंह खेमाणी :— आमच्या व्हिपरना मी सूचना देवू इच्छितो की, श्री.किशोर वनवारी यांनी आता पासूनच पक्षाविरोधात बोलणे सुरु केले आहे. कृपया यांची नोंद घ्यावी.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— मी पक्षाविरोधात काहीही बोललेलो नाही. आम्हाला कोणताही व्हिप मिळालेला नाही.
मा. सदस्य श्री.राजु जग्यासी :— सर्वाना व्हिपची प्रत दिलेली आहे.

मा. सदस्य श्री.देवेद्रसिंह खेमाणी :— सर्वाना व्हिप दिलेला आहे.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— के. न्युज चॅनेलने व श्री. मोहन बेहरानी यांनी सभेचे थेट प्रक्षेपण करण्यासाठी चित्रीकरणाची परवानगी मागीतलेली आहे. आपण त्यांना कृपया त्यासाठी परवानगी दयावी, आपण नेहमी त्यांना परवानगी देतो. के.न्युजला व इतर लोकांना परवानगी दयावी ही विनंती.
मा. महापौर :— माझ्याकडे ज्यांचे अर्ज आले आहेत त्यांना परवानगी देण्यात येत आहे. के.न्युजला परवानगी नाकारण्यात येत असून सन्माननिय सदस्य श्री. मोहन बेहरानी यांना परवानगी देण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— मी के. न्युज साठी परवानगी मागीतलेली नाही. तुम्ही सभागृहाची दिशाभुल करु नका.

मा.महापौर :— तुम्हाला ऐकायला कमी येते असे वाटते. मी असे म्हणाले की, तुम्ही ज्यांच्यासाठी अर्ज केला आहे त्यांच्या साठी परवानगी दिली आहे.
मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— मी ते ऐकले नव्हते. त्यासाठी क्षमा मागतो. मला थोडे उशिरा ऐकू येते.

मा. सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........आता ४.१३ वाजले आहेत.

मा. सचिव :– प्रश्न क्र.४९२ हा श्री. नाना पवार  यांचा आहे.

मा. सदस्य श्री.नाना पवार :– मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य माझा हा जो प्रश्न आहे.......

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :– प्रश्न लवकर विचारा. कथा सांगत बसु नका.

मा. सचिव :– एक सूचना आहे. मा. महापौरांनी के. न्युजला परवानगी दिलेली नाही.

मा. महापौर :– मी के. न्युजला परवानगी दिलेली नसुन श्री. मोहन बेहरानी यांना परवानगी दिलेली आहे.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :– हे सर्व माझ्या वतीने चित्रीकरण करत आहेत.

मा.महापौर :– तुम्ही अर्ज कोणासाठी केला आहे?

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :– हे जे चित्रीकरण करत आहेत ते सर्व माझ्या वतीने करत आहेत.

मा. सदस्य श्री.होशियारसिंह लबाना :– कोण आहेत?

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :– कोण विचारत आहेत?

मा.महापौर :– हे जे चित्रीकरण करत आहेत हे कोणत्या चॅनेलचे आहेत ? के.न्युजचे आहेत काय?

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :– के. न्युजवाले नाहीत, ते माझे प्रतिनिधी आहेत.

मा.महापौर :– ठिक आहे मग त्यांना अनुमती आहे.

मा. सदस्य श्री.नाना पवार :– मा. महापौरजी ...........

मा.सचिव :– श्री. मोहन बेहरानी यांची कोणती माणसे आहेत ते जरा त्यांनी सांगावे.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :– येथे ओळख परेड सुरु आहे काय?

मा.महापौर :– व्हिडीओ शुटीग करण्याकामी तुम्ही कोणासाठी परवानगी मागीतली आहे.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :– मी व्हिडीओ शुटीग साठी परवानगी मागीतली आहे.

मा.महापौर :– कोणासाठी मागीतली आहे, नांव तर सांगा. कोणा एकाचे नांव सांगा.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :– तुम्हाला किती लोक हवे आहेत?

मा.महापौर :– एक.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :– एक माणूस हवा आहे?

मा.महापौर :– आपल्या तर्फे फक्त एकच व्यक्ति शुटीग करेल.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :– दोन तीन माणसे नाही करु शकत?

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :– तुम्ही कशा प्रकारे बोलत आहात? काय बोलत आहात? दुहेरी अर्थाने बोलत आहेत. हे काय सुरु आहे.

मा.महापौर :– यांना ऐकायला कमी येते असे वाटते.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :– जेवढे विचारले जाईल तेवढेच बोला. तुम्ही कसे बोलत आहात?

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :– तुमच्याशी बोलत आहे का?

मा.सचिव :– सभागृहात एवढे लोक जमा झालेले आहेत. ज्यांना परवानगी आहे त्यांनीच थांबावे.

मा. सदस्य श्री.धनजंय बोडारे :– मा. महापौर महोदया व्हिडीओ शुटींग साठी परवानगी मागीतली आहे. किती लोक व्हिडीओ शुटींग करणार आहेत ते विचारले नाही. एकाने केले काय किंवा चार लोकांनी केले काय त्याने काही फरक पडत नाही. जे एका कॅमे–यात येणार आहे तेच चार कॅमेरात येणार आहे. वेगवेगळी शुटींग करणार नाहीत. किती माणसे घ्यावीत किंवा नाहीत या बददल काही निर्बंध नाहीत.

मा.महापौर :– माझे म्हणणे असे आहे की, एका माणसाने थांबावे व इतरानी बाहेर जावे.

मा. सदस्य श्री.धनजंय बोडारे :– सभागृहाच्या कामकाजात पारदर्शकता हवी.

मा.महापौर :– त्यासाठीच तर आपण यांना परवानगी देत आहोत. फक्त एकानेच थांबावे.

मा.सचिव :– मा. महापौरांचे असे म्हणणे आहे की, श्री. मोहन बेहरानी यांचे वतीने एकाच व्यक्तीने व्हिडीओ शुटींग करावे व बाकीच्यानी बाहेर जावे. कारण त्यांना परवानगी नाही.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :– मा. महापौर महोदया मी आपणास एक नियम सांगतो. तो नियम असा आहे की, आपण जर कोणाला अनुमती नाकारत असाल तर त्यावर सभागृह बहुमताने निर्णय घेवू शकते. तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही त्यावर मतदान घ्या. मी तुम्हाला नियम वाचुन दाखवतो.

मा.महापौर :– मी आपणाला कायदा सांगते. महासभेचे कामकाज हे पुर्णपणे महापौरांच्या अधिकार क्षेत्रात असते. येथे काय करायचे अथवा नाही याचा निर्णय महापौर घेतात. तुम्ही जो नियम वाचत आहात तो सभा सुचनेवर घेवुन या आम्ही त्यावर चर्चा करु.

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :– महासभेचे कामकाज हे नियमा प्रमाणे चालते. नियम देखिल महापालिकेने बनविले आहेत.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :– मी तुम्हाला नियम वाचून दाखवतो.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :– मा. महापौरजी प्रश्न उत्तरास प्रारंभ झालेला आहे, श्री. नाना पवार हे उभे आहेत. मध्येच दूसरा विषय सुरु केला आहे.

मा.महापौर :– श्री. नाना पवार आपण सुरुवात करावी तसेच ज्यांना परवानगी नाही त्यांनी सभागृहाबाहेर जावे.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :– आधी कायदा काय आहे ते ऐकुन घ्या व त्यानंतरच निर्णय दया. अभ्यागंताना सभेच्या कालावधीत प्रवेश देण्याचे जे नियम आहेत त्यामध्ये पृष्ठ क्रमांक.१२ वर अ.क्र.२० वर लिहिले आहे की, महापौरांच्या निर्देशांना अधिन राहून एखाद्या व्यक्तीस थेट सहक्षेपणाची दिलेली परवानगी, जर सभागृहात हजर असलेल्या पालिका सदस्यांचे बहुमत, थेट सहक्षेपणाच्या रेकॉर्डीगला संमती देत नसेल, तर रद्द किंवा विखंडित होण्या करीता उत्तरदायी होईल आणि पीठासीन अधिकारी अशा व्यक्तीला बाहेर काढण्याचा निर्देश देईल. आपल्याला हा निर्णय बहुमताने घ्यावयाचा आहे. मी आपणास त्याची प्रत देतो.

**मा. सदस्य श्री.राजेश वधरिया :—** मा.महापौरजी नियमात असे लिहिले आहे की, परवानगी दिल्या नंतर .... परंतू येथे मात्र अदयाप परवानगीच दिलेली नाही त्यामुळे पुढचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आधी परवानगी दिल्या नंतर जर ती रदद करावयाची असेल तर त्यासाठी नियमातील तरतुद आहे.

**मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :—** याबददल सचिवांनी मार्गदशन करावे.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** मा. महापौर महोदया, व्हिडीओ शुटीग साठी परवानगी द्यायची अथवा नाही ही सभागृहात चर्चा चालू आहे.

**मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :—** परवानगी दिलेली आहे. तुम्हाला माहिती नाही.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** तुम्ही उभे राहुन बोला खाली बसुन बोलू नका. बसुन तर कोणीही बोलतो, उभे राहून बोला. सभागृहाने परवानगी देण्या बाबत अदयाप निर्णय घेतलेला नाही. निर्णय झाल्या नंतर परवानगी दयायची अथवा नाही या बददल बोलता येइल. परंतु निर्णय होण्या आधीच व्हिडीओ शुटीग सुरु केले आहे हे कितपर योग्य आहे. विरोधीपक्ष याच्याशी सहमत आहे काय? निर्णय होण्या आधीच व्हिडीओ शुटीग सुरु केले आहे याच्याशी माझे सहकारी श्री. लाल पंजाबी हे सहमत आहेत काय?

**मा. सदस्य श्री.रामदास उमाप :—** मा.महापौरजी श्री. लाल पंजाबी यांनी कायदेशिर मत देण्या बाबत विचारणा केली आहे. आधी ती माहिती देण्यात यावी. मधे कोणी बोलु नये.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** मा. महापौर महोदया, माझा प्रश्न साधा व सरळ आहे. ज्या विषयावर सभागृहाने निर्णय घेतलेला नाही, मी असे म्हणत नाही की, परवानगी दिलेली नाही. मी फक्त ऐवढेच बोललो की, ज्यावर अद्याप निर्णय झाला नाही त्या गोष्टीवर अंमल कसा काय झाला? सचिवांनी यांचे उत्तर दयावे. अजुन निर्णय झाला नाही व त्या आधीच शुटीगला सुरवात झाली आहे यासाठी जबाबदार कोण आहे?

**मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :—** महापौरांनी परवानगी दिली आहे.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** महापौरांनी परवानगी दिलेली नाही, अजुन चर्चाच सुरु आहे.

**मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :—** आम्ही तर म्हणतो की, सर्वानाच परवानगी दया. बहुमताने निर्णय घ्या.

**मा. सदस्य श्री.देवेद्रसिंह खेमाणी :—** महापौरांनी फक्त एकाच माणसाला परवानगी दिलेली होती.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** महापौर महोदया माझे म्हणणे फक्त एवढेच आहे की, अद्याप परवानगी दिलेली नाही व शुटीगला सुरवात झाली आहे यासाठी जबाबदार कोण आहे? यांनी आत मध्ये प्रवेश कसा काय केला? यावर नियंत्रण कोण ठेवतो?

**मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—** श्री. राज असरोंडकर यांच्या प्रश्नांचे उत्तर मी देतो. महापौर महोदयांनी त्यांना आतमध्ये येण्याची परवानगी दिल्या नंतर कोणी आतमध्ये यायचे व कोणी नाही हे बघणे शासन व प्रशासनाची जबाबदारी आहे. महापौरांची परवानगी पाहूनच कर्मचा—यांनी त्यांना आतमध्ये येण्याची परवानगी दिली आहे. त्यासाठी विरोधी पक्ष जबाबदार नाही. आपली सत्ता, शासन व प्रशासन जबाबदार आहे.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** मा. महापौर महोदया आताच सभागृहा मध्ये माझे सहकारी श्री. लाल पंजाबी यांनी प्रश्न उपस्थित केला की, परवानगी दयावी अथवा नाही. निर्णय अजुन झाला नाही तरी देखिल शुटीगला सुरवात झाली आहे, अजुनही सुरु आहे. यासाठी जबाबदार कोण आहे?

मा.सचिव :— मा. महापौरांच्या अनुमतीने मी सांगु इच्छितो की, आधी मा. महापौरांनी कॅमेरामॅन बददल आधी काही निर्देश दिले होते त्यानंतर संभ्रम निर्माण झाला होता त्यामुळे मी पुन्हा त्यांना विचारणा केली होती की, तुम्ही परवानगी दिली आहे काय? यावर त्यांनी सांगितले होते की, मी परवानगी दिलेली नाही. त्यामुळे मी मध्येच प्रश्न थांबवून आपणास माहिती दिली होती की, मा. महापौरांनी त्यांना परवानगी दिलेली नाही. या गैरसमजुती मुळे ते लोक आत मध्ये आले आहेत.

मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :— मा. महापौर महोदया, ज्यांनी परवानगी मागीतली असेल ती आपल्या नांवानेच मागीतली असेल.

मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :— सचिव साहेब, श्री. लाल पंजाबी यांनी आपणास नियमाची जी प्रत दिली आहे तीचे विश्लेषण करुन सभागृहास माहिती दयावी.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— सचिव साहेब कायदेशिर मत दया. तुम्ही तुमचे मत दया.

मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :— मा. महापौर महोदया, आपण येथे एका साधारण मुद्यावर वेळ दवडत आहोत. ज्यांनी परवानगी मागीतली असेल त्यांनी ती नावांनीशी मागीतली असेल. त्यामुळे ज्यांना परवानगी दिली असेल त्यांचे नांव सांगा.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौरजी, माझे मित्र श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, सचिवांनी कायदेशिर मत दयावे. परंतु माझ्या माहिती प्रमाणे सचिवांचे अधिकार त्यांच्या कार्यक्षेत्रातच राहायला हवेत. कायदेशिर मत हे विधी सल्लागार अथवा विधी अधिकारी यांनी दिले तर योग्य होईल.

मा.सचिव :— सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी येथे जी शंका उपस्थित केली आहे.....

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौरजी मी आताच येथे सांगितले आहे की, सचिव साहेबांनी त्यांचे काम करावे, आम्हाला त्या बद्‌दल काही हरकत नाही परंतु कायदेशिर मत देण्यासाठी सचिव हे प्राधिकृत आहेत काय?

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— मी, सचिवांचे मत मागितले आहे.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— कायदेशिर मत हे विधी सल्लागार देवु शकतील, सचिवांना तुम्ही कसे काय विचारता?

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— मी, सचिवांकडून त्यांचे मत विचारले आहे. महासभेचे कामकाज हे सचिवांच्या पर्यवेक्षणाखाली चालते. त्यामुळे त्यांनी उत्तर दयायचे आहे.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौर महोदया माझे म्हणणे नोंदवुन आपण योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.सचिव :— मा. महापौरांचे असे म्हणणे आहे की, श्री. मोहन बेहरानी यांचे वतीने फक्त एका व्यक्तिने थांबावे व इतरांनी सभागृहा बाहेर जावे. श्री. नाना पवार यांनी त्यांचा प्रश्न सुरु करावा.

मा. सदस्य श्री.नाना पवार :— मा. महापौर, उल्हासनगर महानगरपालिकेत जे अधिकारी व कर्मचारी आहेत, त्यांचा अनुशेष अजुन पुर्णपणे भरला गेला नाही. अनुशेषाच्या माध्यमातून जी पदोन्नती व सरळसेवा भरती करावयाची होती ती अजुन महापालिकेने केलेली नाही. मी मागील बैठकीत देखिल प्रश्न विचारला होता की, महापालिकेत ५० टक्कयांपेक्षा जास्त अनुशेष शिल्लक आहेत. आपण जे उत्तर दिले होते त्यावरुन दिसुन येते की, अदयाप ५० टक्के पदे रिक्त आहेत. तर आता हा अनुशेष कधी पर्यत भरण्यात येईल याची माहिती सभागृहात प्रशासनातर्फे दिली तर बरे होईल.

उप आयुक्त (मुख्यालय) :— मा. महापौर महोदया, उल्हासनगर महानगरपालिकेत ३,२२४ पदे मंजुर आहेत. त्यापैकी १६२०पदे चतुर्थ श्रेणीची असल्याने त्याला अनुशेष लागु होत नाही. उर्वरित १२७७ पदे थेट सरळ सेवेने भरायची असुन त्यामध्ये ६५७ पदांचा अनुशेष आहे. पदोन्नतीने ३२७ पदे भरायची होती, त्यातून १६० पदांचा अनुशेष शिल्लक आहे तसेच ८० पदे भरलेली आहेत. सरळसेवेसाठी १८८ पदांचा अनुशेष आहे. आता १६ तारखेलाच डिपीसीची बैठक झाली आहे, त्यामध्ये अनुसुचित जाती साठी १ पद, अनुसुचित जमाती साठी १ पद व विमुक्त जाती साठी १ पद असे एकुण ३ पदे तसेच वर्ग.३ साठी अ.ज. ५ पदे, वि.जा.भ.ज. साठी ३ पदे, वि.जा.भ.ज.(ब) साठी ३ पदे व वि.मा.प्र. साठी १ पद भरावयाचे असा निर्णय झाला आहे.

मा. सदस्य श्री.नाना पवार :— बागेश्वर साहेब आपण जे लेखी उत्तर दिले आहे ते वेगळे आहे व येथे जे उत्तर दिले आहे ते वेगळे आहे. आपण येथे उत्तर देताना सांगितले आहे की, ४२३ पदांच्या अनुशेषांपैकी १९९ पदे भरण्यात आलेली आहेत. उर्वरित पदांचा अनुशेष भरण्यासाठी पुढील प्रक्रीया करण्यात येईल. याचा अर्थ ५० टक्केपेक्षा जास्त पदे रिक्त आहेत. तुम्ही जे लेखी उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे काय? आणि आता सांगत आहात ते खरे आहे काय? गेल्या महासभे मध्ये देखिल मी आपणास सांगितले होते की, आपण जे उत्तर दयाल ते जबाबदारीने दयावे. कारण हा अनुशेषाचा प्रश्न आहे आणि अनुशेष भरणे हे उल्हासनगर महापालिकेवर देखिल बंधनकारक आहे. आता येथे जे उत्तर दिले ते तुम्ही तयारी करुन आल्यानंतर दिले आहे आणि सदस्यांना जे उत्तर दिले आहे ते वेगळे आहे याचा अर्थ आपल्या उत्तरामध्ये तफावत आहे ती तपासून पहा.

उप आयुक्त (मुख्यालय) :— तुम्हाला आता जी माहिती देत आहे ती माहिती ३० जुन २००६ पर्यतची आहे. आपण जर सांगत असाल त्याप्रमाणे काही तफावत असेल तर आम्ही योग्य ती खात्री करुन कारवाई करु.

मा. सदस्य श्री.नाना पवार :— खात्री म्हणजे काय? गेल्या ३ सभामध्ये या प्रश्नांवर येथे चर्चा होत आहे आणि त्याच्या नंतरही तुम्ही अजुन काय खात्री करणार आहात? याठिकाणी तुम्ही लेखी स्वरुपात उत्तर दिले आहे. एवढी पदे भरली आहेत, एवढी पदे रिक्त आहेत असे पध्दतशिरपणे तुम्ही उत्तर दिले आहे. माझा साधा आणि सरळ प्रश्न आहे. ज्या जागा रिक्त आहेत मग त्या पदोन्नतीच्या आहेत अथवा सरळ सेवेच्या आहेत तर ती कारवाई तुम्ही कधी पर्यत पुर्ण करणार आहात? हे सभागृहाला सांगा.

उप आयुक्त (मुख्यालय) :— पदोन्नतीने अनुशेष भरण्यासाठी कारवाई सुरु केलेली आहे. आताच १६ तारखेला एक बैठक झाली, त्या बैठकीत पदोन्नतीच्या जागा भरण्यासाठी योग्य अर्हताधारक कर्मचा—यांचा अनुभव बघुन कारवाई करण्यात येइल. मी आताच आपणास माहिती दिली की, अ.जा., अ.ज., वि.मा.प्र., वि.जा.भ.ज. या प्रवर्गातून पदे भरण्यासाठी डीपीसीने निर्णय घेतला आहे. त्यानंतर निवडयादी तयार करुन मंजूरी साठी महासभेत प्रस्ताव ठेवण्यात येईल. त्याच प्रमाणे शिल्लक जागा टप्प्या—टप्प्याने भरण्याची कारवाई करण्यात येईल.

मा. सदस्य श्री.रामदास उमाप :— मा. महापौरजी, अनुशेष भरण्याचा विषय सभागृहामध्ये १० वर्षाच्या कालावधीत ब—याच वेळा आलेला आहे अनुशेष भरण्यासाठी प्रशासन सुस्तपणे का वागते याचे कारण कळून येत नाही. यामुळे आपल्या महापालिकेतील काही कर्मचारी ज्यांनी महापालिकेची सेवा केली आहे त्यांना निवृत्त झााल्या नंतर फायदे मिळालेले नाहीत. पदोन्नती न मिळाल्याने कुशल कामगार सेवा करुन देखिल फायदयां पासुन वंचित राहिले आहेत. मी सभागृहाच्या माध्यमातून तुम्हाला विनंती करीन की, अनुशेष भरण्याचा हा जो विषय आमचे मित्र श्री. नाना पवार यांनी आणला आहे त्यावर काळजीपूर्वक कारवाई करुन अनुशेष भरुन काढावा. आता आपल्याकडे दोन तीन प्रकरणे अशी आहेत ज्यामध्ये कर्मचारी लवकरच निवृत्त होणार आहेत, निवृत्त झाल्या नंतर त्यांना अनुशेषाचा काही एक फायदा मिळणार नाही, निवृत्ती वेतन व इतर फायदे त्यांना मिळू शकणार नाहीत. तुम्ही सक्षम अधिकारी आहात त्यामुळे तुम्ही लवकरात लवकर अनुशेष भरण्याचा प्रयत्न करावा अशी माझी आपणास विनंती आहे.

मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :— मा. महापौरजी, बागेश्वर साहेबांनी आता जे सांगितले तर हा प्रश्न मागील एक वर्षापासुन आपल्या पुढे येत आहे. श्री. पवार यांनी प्रश्न विचारुन देखिल तीन महिने उलटून गेले आहेत.

आपण सांगितले की, १६ तारखेला बैठक झाली याचा अर्थ अडीच महिन्याने आपली बैठक झाली आहे. आपण एवढया संथगतीने काम का करीत आहात? हा लोकांच्या फायदयाचा विषय आहे, जर आपण हे काम करु शकत नसाल तर आपण उल्हासनगरची सेवा कशी काय कराल? यावर आयुक्तांनी उत्तर द्यायला हवे. मी महापौरांना विनंती करेन की, त्यांनी आयुक्तांना या प्रश्नांवर उत्तर देण्यासाठी निर्देश दयावेत.

मा. आयुक्तः— मा. महापौर महोदया व सर्व सन्माननिय सदस्य, श्री. पवार यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यावर श्री. उमाप यांनी सांगितले की, १० वर्षा पासुन हा विषय येथे सुरु आहे. येथे दोन तीन गोष्टी मी आपणास सांगु इच्छितो. येथे स्थायी व अस्थायी पदांबाबतचा विवाद काही दिवसांपासुन प्रलंबित आहे. विधानमंडळाची जी समिती येथे आली होती त्यांच्या समोर आम्ही जो प्रस्ताव ठेवला होता की, राजपत्रित पदांबाबतचे रोस्टर शासनाकडून मंजुर करुन घ्यावयाचे आहे व वर्ग ३ व वर्ग ४ ची जी पदे आहेत ती विभागीय आयुक्त कार्यालयातील सहाय्यक आयुक्तांमार्फत तपासुन घायची होती. त्यामध्ये काही फरक आढळून आल्याने आता पुन्हा जुळवणी करुन घ्यायची आहे. त्यानंतर पहिल्या टप्प्यात पदोन्नतीची पदे भरण्यासाठी आम्ही प्रक्रीया सुरु केली आहे. लिपीक व वरीष्ठ लिपीकाची जी शिल्लक पदे आहेत त्यापैकी २५ टक्के पदे सरळ सेवेने भरण्यासाठी आमचा प्रयत्न सुरु आहे. जी गोष्ट दहा वर्षात झाली नाही ती एक दोन महिन्यात होणे शक्य नाही त्याला थोडा अवधी लागेल. यासाठी समितीकडून तीन महिन्यांचा अवधी मी मागीतला आहे. आपल्यालाही मी सांगु इच्छितो की, पदोन्नतीची प्रक्रीया पुर्ण होण्यासाठी तीन महिने लागतील. तसेच भरतीसाठी जाहिरात दयावी लागेल त्यासाठी १५ दिवस ते १ महिन्याची मुदत दयावी लागेल. लेखी पीरक्षा घ्यायची आवश्यकता भासल्यास लेखी परीक्षाही घेण्यात येईल. ही कारवाई करण्यासाठी चार महिन्याचा अवधी लागेल. मंजुर पदे लक्षात घेवुन अनुशेष व खुल्या प्रवर्गातील पदे भरण्याचा प्रशासनाचा मानस आहे. मी येथे आपणास आश्वासन देतो की, चार महिन्यात ही कारवाई पुर्ण करण्यात येईल.

मा. सदस्य श्री.नाना पवार :— मा. महापौरजी, आयुक्त साहेबांनी येथे चांगले मत प्रदर्शित केले. मी आयुक्तांचे आभार व्यक्त करतो कारण अनुशेष भरण्याची त्यांची तयारी आहे. गेल्या महासभेत मी काही सुचना दिल्या होत्या. माझी एक सुचना अशी होती की, आपल्याकडे कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नतीने नियुक्ती देण्यासाठी ९ जागा आहेत, ही पदे आपण कशा पध्दतीने भरणार आहोत? कारण त्याच्या खालचे पद आपल्याकडे उपलब्ध नाही.

मा.आयुक्त :— पदोन्नती देण्यासाठी शासनाने तीन वर्षाचा सेवाकाल मान्य केला होता. मी ५ जुनला कार्यभार हाती घेतल्यानंतर हा विषय पहिल्यांदा हाती घेतला होता आणि माझ्या लक्षात आले होते की, ब—याच अधिका—यांनी कर्मचा—यांचे वार्षिक गोपनिय अहवाल लिहलेले नाही. पदोन्ती देण्यासाठी ५ वर्षाच्या गोपनिय अहवालाची आवश्यकता असते. परंतु शासनाची अशी तरतुद आहे की, ३ गोपनिय अहवाल असले व आपण त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कोणतीही कारवाई केली नसेल, कोणतीही शिक्षा झाली नसेल तर अशा प्रकरणांमध्ये तीन वर्षाचे गोपनीय अहवाल लक्षात घेवून कर्मचा—यांना पदोन्नतीसाठी पात्र धरता येवु शकते. आणि ज्या कर्मचा—यांच्या बाबतीत, सर्वच संवर्गामध्ये मग ते कनिष्ठ अभियंता असतील, वरीष्ठ लिपीक असतील, अधिक्षक असतील किवा प्रभाग अधिकारी यांची पदे असतील या सर्वांसाठी ज्यांचा सेवा काल तीन अथवा पाच वर्षे पुर्ण झाला असेल आणि ज्यांचे गोपनिय अहवाल शासनाच्या निर्देशाप्रमाणे ब किंवा ब + असतील अशा सर्वाना सेवाजेष्ठता लक्षात घेवून व अहवालांची परिपुर्णता पाहून पदोन्नती देण्यात येणार आहे. जे कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र आहेत अशा सर्व कर्मचा—यांना पदोन्नती दिली जाईल. वेगवेगळया कामगार संघटनानी माझ्याकडे गेल्या तीन महिन्यात जे मुद्ये मांडले आहेत त्याचा साकल्याने विचार करु. तसेच स्थायी व अस्थायी पदां बाबत मी सांगु इच्छितो की, कोणीतरी हा आपल्या इंटरप्रिटेशनचा प्रश्न केलेला आहे. जे कर्मचारी ३ वर्ष सलग सेवेमध्ये आहेत असे कर्मचारी अस्थायी असले, त्यांना स्थायी केलेले नसले तरी त्यांना पदोन्नती पासुन वंचित ठेवता येणार नाही हे स्पष्ट आहे. ज्या ठिकाणी हरकती उपस्थित होतील त्या ठिकाणी गुणवत्तेवर निर्णय घेवुन पदोन्नती देण्यात येईल. उर्वरित जागा भरण्यासाठी देखिल भरतीची प्रक्रीया सुरु करण्यात येईल. पदोन्नती प्रथम का दयावी लागेल, कारण भरतीची जेवढी प्रक्रीया आहे ती नेमकी किती संख्या आहे हे काढण्यासाठी पहिले पदोन्नतीने पदे भरावी लागतील. मग उर्वरित पदे जी आपल्याला थेट भरायची आहेत किंवा वर्ग ४ मधुन लिपीकाची पदे भरायची आहेत त्याप्रमाणे आपल्याला कारवाई करावयाची आहे आणि कनिष्ठ अभियंता व इतर संवर्गाचा साकल्याने विचार केला जाईल.

**मा. सदस्य श्री.नाना पवार :—** कनिष्ठ अभियंता बाबत मला असे विचारायचे होते की, आपल्याकडे कनिष्ठ अभियंता या पदाखाली तांत्रीक पद उपलब्ध नाही असे असताना आपण कोणत्या कर्मचा—यांना कनिष्ठ अभियंता म्हणुन पदोन्नती देणार आहोत. त्यावेळेला मी सुचना केली होती की, जर कायदयात तरतुद असेल तर पदोन्नती न देता थेट सरळसेवेने भरती आपण करु शकतो काय? कारण कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नतीसाठी ९ पदे आहेत.

**मा.आयुक्त :—** ज्या पदावर पदोन्नती देण्यात येते आणि जर त्याचा मुळ संवर्ग नसेल तर आपणाला ती पदे निश्चितपणे सरळसेवेने भरावी लागतील. तुम्ही जो मुद्या दिला आहे, समजा ड्राफ्टसमन असेल, ज्यांना अनुभव आहे व शासनाच्या इतर विभागात अशा लोकांना जर पदोन्नती साठी पात्र धरत असतील तर मी तसा प्रस्ताव महासभेपुढे आणेल व तशी मंजुरी घेवून त्यावर आपल्याला विचार करता येवु शकेल.

**मा. सचिव :—** प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** मा. महापौर महोदया निवड समिती बनलेली आहे काय? मागासवर्गीय कक्ष स्थापन केलेला आहे काय? त्याचा प्रमुख कोण आहे?

**मा. आयुक्त :—** होय, निवड समिती आहे.

**मा. सचिव :—** प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे. मा. महापौरांचे म्हणणे आहे की, प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** प्रश्नाचे काय झाले?

**मा.सचिव** :— प्रश्न तर झाला. त्यांचा प्रश्न झाला आहे व अर्धा तास देखिल झाला आहे.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** जर कुठेही पदोन्नती द्यायची असेल अथवा सरळसेवेने भरती करावयाची असेल तर त्यासाठी निवड समिती स्थापन करायला हवी. आयुक्तांनी याचे उत्तर दयावे. निवड समितीमध्ये कोण कोण आहे, मागासवर्गीय कक्ष आहे काय, त्याचा प्रमुख कोण आहे?

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—** प्रश्न उत्तराचा कालावधी संपला आहे तर का बोलत आहात?

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** तुम्हाला काय त्रास होत आहे? मागासवर्गीयाचा मुद्दा आहे, तुमच्या पक्षाचा महत्वाचा मुद्दा आहे.

**मा.आयुक्त :—** निवड समिती मध्ये अनुसुचित जातीच्या अधिका—याची नियुक्ती केलेली आहे. समितीचे जे गठन झालेले आहे त्याची माहिती आपल्याला स्वतंत्र देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

**मा. सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मागील सभेचे दिनांक १९.८.२००६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :– मा. महापौरजी मागील महासभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय येथे आला आहे. मी आयुक्तांच्या निदर्शनास आणु इच्छितो की, पृष्ठ क्र.२८ वर लक्षवेधीला उत्तर देताना त्यांनी सांगितले होते की, पुढील महासभेत याचे उत्तर देईन. तर आजच्या महासभेत उत्तर दयावे.

मा. सदस्य श्री राज असरोंडकर :– मा. महापौर महोदया, मागील बैठकीत रस्ते दुरुस्ती बाबत एक लक्षवेधी सुचना आली होती. त्यावर आयुक्तांनी निवेदन करतांना आश्वासन दिले होते, ते इतिवृत्तात देखिल आले आहे की, १० सप्टेंबरच्या आत रस्ते दुरुस्तीचे काम केले जाईल. तर त्या आश्वासनाचे व कामाचे काय झाले? याबाबत कृपया आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– मा. महापौरजी मागील बैठकीत मी एक लक्षवेधी सुचना श्री. ठाकुर बेहराणी यांच्या सबंधात आणली होती. आपण जर इतिवृत्त पाहिले तर दिसुन येइल की, चर्चेच्या वेळी मला व्यवस्थीत बोलु दिले नाही, वेळोवेळी अडथळा आणला गेला आहे, महिलांसोबत गैरवर्तणूक केली गेली आहे, तसेच एका ठिकाणी असे म्हटले गेले आहे की, सरदार महिला आहे काय? हे आक्षेपार्ह आहे. मला असे वाटते की, सभे मध्ये त्यादिवशी आमच्या प्रती गैरवर्तणुक केली गेली आहे व अपमान केला आहे. इतिवृत्त बघीतले तर दिसुन येइल की, लक्षवेधीवर बोलण्यासाठी मला संधीच दिली नाही. एक एक सेंकदाला, मिनीटाला माझ्या बोलण्यामध्ये अडथळा आणला गेला तसेच चुकीच्या शब्दांचा वापर केला गेला. याबद्‌दल आपण काहीतरी कारवाई करायला हवी. सर्व सदस्यांना माहिती आहे की, माझे नांव दर्शनसिंह अथवा देवेंद्रसिंह असे आहे असे असतानाही हा सरदार महिला आहे काय? असे बोलणे कितपत उचित आहे?

मा. सदस्य श्री. होशियारसिंह लबाना :– मा.महापौरजी, सभागृहातील सदस्यांना अदबीने बोलायला शिकवा. हे कोणत्याही समाजाला सरदार म्हणतात, आम्ही हे सिंधी आहेत असे म्हणतो का? वरीष्ठ नगरसेवक आहेत.

मा. सदस्य श्री देवेंद्रसिंह खेमाणी :– हे चुकीचे आहे. तसेच कितीतरी वेळा माझ्या बोलण्यात अडथळा आणला आहे. एक व्यक्ती वांरवार माझ्या बोलण्यात अडथळा आणते व त्यावर काहीही केले जात नाही हे कितपत योग्य आहे.

मा.महापौर :– महापालिकेच्या नियमात स्पष्टपणे लिहिले आहे की, कोणत्याही व्यक्तीवर वैयक्तिक टिप्पणी केली अथवा समाजावर टिप्पणी केली तर त्या सदस्यावर कारवाई केली जावु शकते. यापुढे हे लक्षात ठेवावे तसेच या पुढे काय करायचे याकडे आम्ही लक्ष देवु.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :– आयुक्त महोदय, माझ्या प्रश्नांचे काय झाले?

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :– मा. महापौर व सचिव साहेब, आयुक्तांनी सांगितले होते की, पुढील महासभेत उत्तर देतो, त्यांना उत्तर तर देवु दे. इतिवृत्त पास करण्या आधी त्यांनी उत्तर दयायला हवे.

मा.आयुक्त :– शांतीनगर नाका मार्गे डॉलफिन क्लब या रस्त्याच्या रुंदीकरणा बाबत माहिती अशी आहे की, एकात्मीक रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत टप्पा एक मधील रस्ता क्रमांक दोन अे, सी. ब्लॉक चौक ते शांतीनगर नााका या रस्त्याच्या कामास महापालिका ठराव क्रमांक १२ दिनांक ११.११.१९९९ अन्वये मंजूरी देण्यात आली होती. सदर कामाचा कार्यादेश क्रमांक.४ दिनांक २४.१.२००० अन्वये १२.९६ टक्के जास्त दराने मेसर्स हिंदुस्तान कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आला होती. या कामाच्या निविदेची माहिती अशी आहे की, या कामाची प्राकलनिय किमत १,३८,३०,८२६/– एवढी होती.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :– आयुक्त महोदय मी, आपल्याला असा प्रश्न विचारला आहे की, रस्ते दुरुस्तीची कामे १० सप्टेंबर पर्यत करण्याचे आश्वासन आपण दिले होते. इतिवृत्तात तसे आले आहे त्याचे काय झाले?

मा.आयुक्त :– तुमच्या प्रश्नाचे उत्तर मी नंतर देतो आधी यांच्या प्रश्नाचे उत्तर देतो. निविदेला तांत्रिक मंजुरी १२.१०.१९९९ ला मिळाली होती. निविदा सुचना क्रमांक १६२, दिनांक २२.१०.१९९९ असा आहे. निविदा १६.१२.१९९९ ला उघडण्यात आली होती. स्थायी समितीने ठराव क्रमांक ८६, दिनांक २४.१२.९९ अन्वये त्याला मंजुरी दिली होती. कार्यादेश २४.१.२००० ला दिला होता. या कामाची मुदत सात महिने अशी होती. ठेकेदाराचे नांव मेसर्स हिंदुस्तान कन्स्ट्रक्शन कंपनी असे होते. निविदेचा दर १२.९६ टक्के जादा दराने होते.

त्याठिकाणी अनाधिकृत बांधकामे मोठया प्रमाणावर असल्याने ती हटविणे आवश्यक होते. त्याठिकाणी प्लेन टेबल सर्व्हे देखिल केला होता. त्या रस्त्याची लांबी ९७० मिटर एवढी होती. त्यानंतर शांतीनगर नाका ते नाला येथील काम सुरु केले होते तेथे नाल्याचा पाया कमकुवत असल्याने साकव बांधणे आवश्यक होते. परंतू याबाबीचा निविदेत समावेश नसल्याने ही बाब निविदेत समाविष्ट करणे आवश्यक होते. कामाला सात महिन्याची जी मुदत दिली होती ती तर संपली आहे. डॉलफिन क्लब येथील अनाधिकृत बांधकामे ऑक्टोबर,२००३ मध्ये निष्कासित करण्यात आली होती. त्यानंतर ३७५ मिटर ते ६६० मिटरच्या दरम्यानचे काम सुरु केले होते. डॉलफिन हॉटेल समोर सचदेवनगर येथे जो रस्ता आहे त्या बाबत तेथील नागरिकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यामध्ये भुमापन विभागास सिमांकन करण्यासाठी निर्देश देण्यात आले होते व विधी सल्लागारांचा अभिप्राय घेणे आवश्यक असल्याने नगररचना विभागाने प्रकरण विधी सल्लागारांकडे पाठविले आहे. ६६० ते ९७० मिटरच्या दरम्यान जी अनाधिकृत बांधकामे होती ती जानेवारी,२००५ मध्ये निष्कासित करण्यात आली. तेथे नालीचे कामही करण्यात आले आहे. रस्त्याच्या बांधकामात ज्या वखारी येतात त्या वखार मालकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तेथे भुसंपादनाची कारवाइ करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत व हे काम नगररचनाकारांच्या स्तरावर सुरु आहे. जादा कामांमुळे व अतिक्रमणांमुळे या कामास उशिर झाला होता तसेच सुधारीत प्राकलन मंजुरी साठी स्थायी समिती समोर ठेवले आहे. आपल्या आर्थिक परिस्थिती मुळे ठेकेदाराने आधी जे काम केले होते त्याचे पेमेंट होवु शकले नाही. काम करण्यास जो विलंब झाला आहे त्यासाठी ठेकेदारास विलंब माफी देवुन कामास सुरुवात करावी लागेल. डॉलफिन येथील रस्त्याबाबत एवढेच निवेदन आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u> मा. महापौर, मा.आयुक्त साहेब माझ्या प्रभागातील झाकीर हुसेन शाळा ते शहाड फाटक आयडीआय हा रस्ता बनविण्यासाठी देखिल मी लक्षवेधी दिली होती. त्या बद्दल आपण काही सांगितले नाही की, काम का थांबले आहे? मी दोन वेळा महासभेत बोललो आहे की, या शहरातील स्थानिक आमदारांनी नारळ फोडून तेथे कामास सुरुवात केली होती. तेथील लोकांनी गणपती मध्ये देखिल आमदारांना निवेदन दिले आहे की, रस्ता लवकरात लवकर तयार केला नाही तर आंदोलन करण्यात येईल.

<u>मा. आयुक्त :—</u> शहाड स्टेशन पुर्व येथील रस्त्याबाबत श्री. गायकवाड यांनी विचारले त्या बद्दल मी सांगु इच्छितो की, एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत शहाड स्टेशन पुर्व, सेंच्युरी रेयॉन कम्पाउंड लगत आयडीआय कंपनी कडे जाणारा जो रस्ता आहे त्याबाबत संक्षीप्त टिप्पणी अशी आहे की, प्राकलनीय किंमत रु. ९५,६५,९४,०००/— अशी आहे. या कामाला १२.१०.९९ रोजी तांत्रिक मंजुरी दिली आहे. निविदा क्र.१६२ असुन दिनांक २२.११.९९ असा आहे. निविदा १६.१२.९९ रोजी उघडण्यात आली होती व स्थायी समितीने ठराव क्र.८६ दिनांक २४.१२.९९ अन्वये मंजुरी दिली होती. तसेच कार्यादेश २४.१.२००० ला दिला होता. या कामाची मुदतही सात महिन्याची होती. तसेच ठेकेदाराचे नांव मेसर्स हिंदुस्तान कंन्स्ट्रक्शन कंपनी असे आहे. तसेच त्यांचा निविदा दर पाच टक्के कमी दराने प्राप्त झाला होता. हा रस्ता तयार करण्यासाठी गुलशननगर येथील झोपडपट्टीचा ३० फुट एवढा भाग बाधीत होत होता. तसेच स्टेशनकडे जाणारा भाग देखिल ७० ते ८० फुट बाधीत होत होता. या रस्त्यामध्ये झोपडपट्टीचा ८० टक्के भाग बाधीत होत होता. त्यामुळे त्याठिकाणी खाजगीकरण प्रकल्प अंतर्गत पुर्नवसन करणे आवश्यक होते. त्याठिकाणी पुर्नवसन झाल्यानंतरच या रस्त्याचे काम आम्ही करु शकतो.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u> मा. आयुक्त साहेब, मी, आपल्या लक्षात आणुन देवु इच्छितो की, दोन भागांमध्ये या रस्त्याचे काम मंजुर झाले होते. एक रस्ता चार्ली वेफर ते सेच्युरी गेट पर्यत असा होता, त्याचे काय झाले याची माहिती अजुन पर्यत मिळालेली नाही. पुढच्या वेळी आपण ती दयावी अशी मी आपणास विनंती करतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :—</u> मा. महापौर व मा. आयुक्त साहेब, मी, आपणास हरकतीच्या मुद्याद्वारे आपणास विचारु इच्छितो की, शहरातील रस्त्यावर जे खड्डे पडले आहेत ते कधी भरले जाणार आहेत? आम्ही निवडून आलेलो असल्याने लोक आम्हाला प्रश्न विचारतात. प्रशासन म्हणते की, आम्ही लवकरात लवकर खड्डे भरु असे असताना खड्डे का भरले जात नाहीत. कृपया प्रशासनाने याचा खुलासा करावा. पावसामुळे शहरात जे खड्डे पडले आहेत ते भरण्यासाठी शासनाने निधी देखिल दिला आहे, त्या निधीचा सदुपयोग कधी केला जाईल. हे काम करण्यासाठी कोणी अडथळा केला आहे? का थांबविले आहे? खड्डे कधी भरले जातील? भरले जातील अथवा नाही? रस्ते हे शहराची शोभा असतात, शहरातील प्रत्येक नागरिकाला, व्यापा—याला, विदयार्थ्याला चांगले रस्ते हवे आहेत. रस्त्यांचे काम का केले जात नाहीत याचा खुलासा आयुक्तांनी करावा. तसेच लवकरात लवकर रस्त्यांचे काम करावे कारण आजारी लोक रस्त्यांवरुन खड्डयांमुळे फिरु शकत नाहीत. आयुक्त साहेबांनी याचे उत्तर दयावे त्यानंतरच मी खाली बसेन. रस्त्यावरील खड्डे का भरले जात नाहीत याचा विस्ताराने खुलासा

करावा.  रस्त्यावर खड्डे असल्यामुळे टॅकर देखिल बंद करण्यात आलेले आहेत.  शहराचे शत्रु कोण आहेत? शहराच्या विकासात कोण अडथळे आणत आहेत? रस्त्यांवरील खड्डयामुळे आपण लोकांना टॅकरद्वारा पाणी देखिल देवु शकत नाही. हे काम थांबविणारे तसेच ज्यांच्यामुळे लोकांना पाणी मिळत नाही असे जनप्रतिनिधी कोण आहेत?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–</u>  मा. महापौरजी, श्री. जेसवाणी यांनी चांगला मुद्या उपस्थित केला आहे. रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी अडथळा का आणला गेला तसेच कोणी आणला? महाराष्ट्र शासनातर्फे या कामासाठी  रु. ६० लाखांचे अनुदान मिळालेले आहे. एका बाजुने रस्ते दुरुस्तीचे काम थांबविले जाते व दुसरी कडे महापालिकेवर मोर्चा आणला जातो, धरणे दिले जाते व असे बोलले जाते की, खड्डे लवकर भरण्यात यावेत.  असे दुहेरी राजकारण करण्या मागे कोणते कारण आहे?

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>कृपया आयुक्तांनी खुलासा करावा कारण मी हरकतीचा मुद्या उपस्थित केला आहे. हा शहराचा, नागरिकांचा, व्यापा–यांचा मुद्या आहे.  पॅनेल नंबर १२ मध्ये मी स्वत: नगरसेवक आहे. आमच्या प्रभागात कमीत कमी ३० टॅकर दररोज लागतात, जर आपण त्या ईमारतीना व नागरिकांना पाणी देवु शकलो नाही तर काम कसे काय चालेल? कृपया याबाबत खुलासा करावा.  खड्डे भरण्यासाठी, टॅकर चालु ठेवण्यासाठी, पाणी देण्यासाठी कोण अडथळा आणत आहेत? आम्हाला लोकांनी येथे निवडून पाठविले आहे. जर आम्ही लोकांची कामे केली नाहीत तर आम्हाला येथे बसण्याचा काही एक अधिकार नाही.  आयुक्तांनी याबाबत लवकरात लवकर खुलासा करावा.  जो पर्यत आपण खुलासा करणार नाहीत तो पर्यत मी खाली बसणार नाही. जर तुम्ही माझ्या उभे राहण्यांनी संतुष्ट नसाल तर मी खाली जमीनीवर देखिल बसेल.  परंतु शहरातील रस्त्यावर असलेले खड्डे आधी भरायला हवेत. जर येथील उपस्थित लोकप्रतिनिधी खड्डे भरण्यासाठी अडथळा आणत असतील तर त्यांनी येथे खुलासा करावा की, ते शहराच्या हिताच्या बाजुने नाहीत, येथील नागरिकांना सवलती देण्याच्या बाजुने नाहीत, येथील नागरिकांना पाणी देण्याच्या बाजुने नाहीत.  आयुक्त साहेब यावर लवकरात लवकर खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री.प्रभुनाथ गुप्ता :–</u>  मा. महापौर, उप महापौर, आयुक्त व सर्व सदस्य श्री. जेसवानी हे जे बोलत आहेत ते योग्य आहे. कल्याण–अंबरनाथ या मुख्य रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडले आहेत. पंजाबी कॉलनी येथील एका मुलाचे वडिल देखिल त्यामुळे अपघातात निधन पावले आहेत.  त्यानंतर मोटर सायकल वरुन जात असताना खड्डे चुकविण्याचा प्रयत्न केला असता एकुलता एक मुलगा देखिल मृत्यु पावला आहे.  यासाठी जबाबदार कोण आहे? अधिका–यांना ब–याच वेळा सांगुन देखिल काही होत नाही.  त्याविभागातील कर्मचा–यांना निलंबित करायला हवे? त्या मुलाच्या  कुटूंबाचे काय होईल? आयुक्तांनी यांचे उत्तर दयावे.  मी आपल्याला किती वेळा पत्र दिले आहे.

<u>मा. आयुक्त :–</u>  मागील महासभेत मी खड्डे भरण्यात येतील असे आश्वासन दिले होते.  मे महिन्यात या कामासाठी निविदा प्रक्रीया पुर्ण झाली होती परंतु निविदेतील दर २४ टक्के डिएसआर दराने प्राप्त झाले होते. मे महिन्या नंतर डांबराचे दर वाढल्याने आमच्या बांधकाम विभागाने डीएसआर तयार करणारे अधिक्षक अभियंता यांच्याशी संपर्क साधला तसेच जुन्या दराने काम कसे करता येईल का याबद्दल विचारले.  त्यानंतर त्यांनी आम्हाला पत्र दिले की, डांबराच्या सुधारीत दराने प्राकलन बनवुन कारवाइ करावी.  त्यानंतर १५.९.२००६ रोजी स्थायी समिती मध्ये रस्त्यावरील खड्डे भरण्याचा विषय ठेवण्यात आला होता.  स्थायी समितीचा विषय क्र. १०,११,१२,१३ अन्वये ३०–३० लाखाचे प्रस्ताव ठेवले होते. एकुण १.२० कोटी रुपयांचे चार प्रस्ताव होते. मा. मुख्यमंत्री महोदयांनी एक परिषद घेतली होती तेथे मी स्वत: व मा. महापौर उपस्थित होतो त्यावेळी शासनाने रु. ५८ लाखाचा निधी मंजुर केला होता,  महापालिकेचे बरोबरी एवढे अनुदान म्हणजेच रु. ६० लाख असे एकुण १.२० कोटीचे काम आम्ही करणार होतो. परंतु स्थायी  समितीमध्ये हे विषय नामंजुर झाले आहेत. यामुळे मुदतीत काम सुरु होवु शकले नाही. परंतू नियमा प्रमाणे जी काही कारवाइ करायची असेल ती मी माझ्या तर्फे करेन कारण नियमाप्रमाणे एकदा नामंजुर झालेले विषय तीन महिन्या पर्यत पुन्हा स्थायी समिती समोर आणता येत नाहीत.  परंतु मी, स्थायी समितीला अथवा मा. महापौरांना या बाबत विनंती करेन, हा एक पर्याय माझ्या समोर उपलब्ध आहे.  आपल्या भावना तसेच लोकांना होत असलेला त्रास लक्षात घेवुन मी हे अमान्य केलेले ठराव शासनाकडे घेवुन जाईन व त्यांच्याकडून आदेश प्राप्त करुन घेईन.

<u>मा. सदस्य श्री.धनजंय बोडारे :–</u>  मा. आयुक्त साहेब, यापुर्वी आम्ही सातत्याने आपल्याकडे या गोष्टीसाठी पाठपुरावा केला होता.  गणेश उत्सव, नवरात्र उत्सव, तसेच श्रावण महिन्यात येणारे सण लक्षात घेउन खड्डे भरण्यासाठी आम्ही वारंवार पाठपुरावा केला होता. मागच्या महासभे मध्ये आपण ३१ ऑगस्ट किंवा १० सप्टेंबर

पूर्वी खड्डे भरण्यात येतील असे आश्वासन देखिल दिले होते. असे असताना दिनांक १५.९.२००६ च्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्रमांक १० ते १३ असे चार विषय प्रभाग समिती क्र.१ ते ४ मध्ये विविध ठिकाणी रस्त्यावरील खड्डे भरण्याचा प्रस्ताव आपण आणला होता. नगरसेवक निधीचा प्रस्ताव आल्या नंतर आपण प्रत्यक्ष जागेवर जावुन पहाणी करावी व त्यानंतर सविस्तर प्रस्ताव सादर करावा असे निर्देश आपण बांधकाम विभागाला दिले आहे. आर्थिक संकटात असलेल्या महापालिकेने रु. १.२० कोटीचे काम करण्यासाठी विषय आणला होता. प्रत्येक प्रभाग समिती साठी रु. ३० लाख एवढा खर्च अपेक्षित धरला होता. रस्ते कोणते आहेत, प्रत्येक रस्त्यावर किती खड्डे आहेत, त्यासाठी किती खर्च आहे याचे कोणेतेही विवरण आपण स्थायी समिती मध्ये दिले नव्हते. अशा प्रकारामुळे भ्रष्टाचार होण्याची जास्तीत जास्त शक्यता होती. रु.१.२० कोटी ही काही छोटी रक्कम नाही. नक्की डांबर किती टाकले, माती किती टाकली, टाकले की नाही टाकले याचे काहीही नियंत्रण त्या प्रस्तावा मध्ये नसल्याने त्याठिकाणी विरोध करण्यात आला होता. खड्डे भरले गेलेच पाहिजेत, परंतू भ्रष्टाचाराला आळा घालणे हे लोकप्रतिनिधीचे प्रमुख काम आहे. ते काम लोकप्रतिनिधींनी केले आहे. प्रशासनाची चुक नजरेस आणुन दाखविली आहे. त्यानंतर सुध्दा आम्ही तुम्हाला प्रत्यक्ष पत्र दिले आहे. प्रशासनाने जरी चुक केली असली, त्यामध्ये सविस्तर माहिती देणे आवश्यक होते. तुम्ही आयत्यावेळचा विषय म्हणुन तो विषय महासभे मध्ये आणु शकता. प्रभाग समिती १ मध्ये कोणत्या रस्त्यावर काम करावयाचे आहे याची सविस्तर माहिती दया कारण सांगतात एका ठिकाणी व काम दुस—या ठिकाणी होते. ही वस्तुस्थिती आहे. तुम्ही सुरवातीला केलेली कारवाई व आता केलेली कारवाई यामध्ये विरोधाभास आहे. नगरसेवक निधीची कामे करण्यासाठी देखिल आपण कनिष्ठ अभियंता, उप अभियंता यांना पुन्हा तपासणी करण्यासाठी जागेवर पाठविले. परंतू याठिकाणी १.२० कोटीची कामे करण्यासाठी काहीही नियंत्रण नाही. प्रशासनाचे काम कसे आहे हे मी तुम्हाला सांगतो. मार्च महिन्यामध्ये निविदा मागविल्या, मे महिन्यामध्ये निविदा उघडल्या गेल्या त्यानंतर सप्टेंबर महिन्या पर्यत कोणत्या रस्त्यांवर कामे करायची आहेत याची निश्चित यादी तुमच्याकडे उपलब्ध नाही. प्रशासनाचा कारभार या पुढे तरी सुधारा. अशा कारभारा मुळे लोक वेठीस धरले जात आहेत. उत्सवा निमित्त एक महीन्यापुर्वी अर्ज केला होता, २३ तारखे पासुन नवरात्र उत्सव सुरु होत आहे. सतत पाठपुरावा केल्यानंतर प्रशासना कडून २० तारखेला परवानगी दिली गेली. आपली परवानगी मिळेपर्यत इतर परवानग्या मिळत नाहीत हे प्रशासनाला माहिती नाही. म्हणजे १५ ते २० दिवस प्रशासनाकडून वाट पाहीली जाते, कारवाइ काही नाही. सहा महिन्यापूर्वी प्रशासनाकडे दुरुस्ती परवानगीसाठी अर्ज केला असता सहा महिन्या नंतर उत्तर मिळते की, तुम्ही ही—ही कागदपत्रे सादर केलेली नाहीत म्हणुन तुमचा अर्ज नामंजुर केला जात आहे. अशा प्रकारच्या कारभारामुळे या रस्त्याचे रखडलेले काम, आम्ही जे पत्र दिले आहे त्यावर लवकरात लवकर कारवाई करा. नाकारण्याचे काही काम नाही कारण आम्ही सर्व लोकप्रतिनिधी आहोत. शहराची कामे करण्यासाठीच आहोत. परंतू भ्रष्टाचाराला आळा घालणे हे सुध्दा आमचे काम आहे. भ्रष्टाचार होवु नये म्हणुन आम्ही काळजी घेतली आहे. या प्रकाराची पुनरावृत्ती होवु नये याची दक्षता घेवुन लवकरात लवकर खड्डयाचे काम कसे होईल, रस्ते चांगले कसे होतील यासाठी आपण दखल घ्यावी.

<u>मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— </u> मा. महापौर, रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम दरवर्षी केले जाते. ते कशा प्रकारे केले जाते याची प्रशासनाला चांगल्या प्रकारे माहिती आहे. जर त्यादिवशी आमच्या काही सदस्यांना असे वाटले होते की, प्रशासनाने प्रस्ताव बरोबर बनविलेला नाही तर त्यासाठी सभा स्थगित करुन सुधारीत प्रस्ताव आणण्यासाठी सागता आले असते. प्रस्ताव नाकारण्याची काय गरज होती? एकीकडे प्रस्ताव अमान्य केला जातो व दुसरी कडे मोठे—मोठे हॅन्डबिल वाटले जातात, धरणे व रॅली काढली जाते. अशा प्रकारे दुटप्पी राजकारण करण्याची आवश्यकता काय आहे? जर खड्डे भरले नाहीत तर मोर्चे काढतात व खड्डे भरले तर असे म्हणतात की भ्रष्टाचार आहे याचा अर्थ काय आहे? याचा अर्थ असा आहे की, विरोधी पक्षाने असे ठरविले आहे की, सत्तापक्षाला काम करु दयायचे नाही. असे दुटप्पी राजकारण येथे चालणार नाही. कृपा करुन शहर हितासाठी लोकांना जो त्रास होत आहे तो समजुन घ्यावा. कॅम्प नं. १ ते ५ मधील रस्त्यावरील खड्डे भरण्याचा प्रस्ताव आपण अमान्य केला आहे. लोकांना त्रास होत आहे, वाहतुकीस अडथळा होत आहे, लोकांचे अपघात होत आहेत, गणपती उत्सव तर देवाच्या कृपेने व्यवस्थित पार पडला परंतू नवरात्री मध्ये जेव्हा देवीच्या मुर्तिचे विसर्जन करण्यात येईल त्यावेळी काय होईल? वातावरण खराब करण्यासाठी हे जाणुन बुजून केले जात आहे. या दुटप्पी राजकारणाचा आम्ही विरोध करतो तसेच विरोधी पक्षाने या पुढे जनहितासाठी आम्हाला पुर्णपणे सहकार्य करावे अशी मी विनंती करतो.

<u>मा. सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :— </u> मा. महापौरजी, स्थायी समिती मध्ये एखादा विषय नामंजुर झाल्यानंतर तीन महिन्यांपर्यत तो पुन्हा आणता येवु शकत नाही असे असले तरी महासभा आहे, आयुक्त आहेत. आपण त्यांना आदेश दया, शहर हितासाठी विचार करा तसेच येथे जे जनप्रतिनिधी बसले आहेत त्यांचा विचार काय आहे? रस्त्यांवरील खड्डे भरले जावेत अशी त्यांची इच्छा आहे की नाही. जर त्यांची इच्छा असेल तर निर्णय

घ्यायला उशिर का होत आहे? आज येथे महासभेत सर्व सदस्य उपस्थित आहेत, हा पुर्ण शहराचा मुद्दा आहे, एका प्रभागाचा मुद्दा नाही. राष्ट्रवादी कॉग्रेसच्या नगरसेवकाच्या प्रभागातच रस्ते खराब नाहीत, भाजपाच्या व शिवसेनेच्या प्रभागात नाहीत तर पुर्ण शहरामध्ये रस्ते खराब आहेत. कोणते लोकप्रतिनिधी जनतेच्या हिताच्या बाजुने नाहीत याचा खुलासा येथे करावा.

<u>मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :–</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, एक महिन्या पुर्वी महासभेत जेव्हा चर्चा झाली होती तेव्हा मी सांगीतले होते की, डांबराचे नमुने तुम्ही तपासुन पहा, त्याची प्रत तपासुन पहा. १५ तारखेला स्थायी समितीने जो प्रस्ताव अमान्य केला त्याबद्दल श्री. बोडारे यांना मी सांगु इच्छितो की, राजकीय दबावापोटी तुम्ही हा निर्णय घेतला आहे. तुम्ही लोकांच्या हितासाठी काम केले नाही. विरोधी पक्षाने चुकीचे काम केले आहे. एक महिन्यापूर्वी जेव्हा नमुने तपासणे बाबत बोलले गेले होते व आयुक्तांनी आश्वासन दिले होते की मी नमुने तपासुन पाहिन तसेच त्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठविन असे देखिल सांगीतले होते. एवढे झाल्यानंतरही आपण चारही प्रस्ताव अमान्य केले आहेत असे करुन तुम्ही लोकांच्या विरोधात काम केले आहे. उल्हासनगरच्या जनतेला आज खड्डयां मधुन जावे लागत आहे, लोक मरत आहेत याची आपणास चिंता नाही. राजकिय हेतुने सुड घेण्यासाठी आपण हे काम केले आहे, फार चुकीचे काम केले आहे. तुम्ही आता हे म्हणत आहात की, रस्ते कसे तयार होतील परंतू एक महिन्यापूर्वी यावर चर्चा झाली होती. आपण लोकहिताची बिलकुल काळजी केलेली नाही. राजकिय हेतुने प्रेरीत होवुन आपण जे काम केले आहे ते शहरहिताचे नाही, शहरा विरुध्द काम केले आहे. यासाठी मी त्याचा निषेध करीत आहे.

<u>मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :–</u> मा.महापौरजी, रस्त्यावरील खड्डयाचा मुद्दा हा एक महत्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे मी आपणास विनंती करेन की, विशेष बाब म्हणुन तो विषय येथे आणावा आम्ही सर्व त्याला समर्थन देवु. मी राष्ट्रवादी पक्षाच्या सर्व सदस्यांना विनंती करेन की, हा विषय मंजुर करण्यासाठी आपण सर्वानी आम्हाला सहकार्य करावे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u> मा.महापौर व आयुक्त साहेब, येथे सांगितले गेले की, खड्डयामुळे लोकांना त्रास होत आहे, अपघात होत आहेत, लोकांचे पाय तुटत आहेत तर यासाठी जबाबदार कोण आहेत? खड्डे पडे पर्यत वाट कोणी पाहीली. यासाठी तुम्ही जबाबदार आहात. हे काम आधीच करायला हवे होते. याची जबाबदारी घेण्या ऐवजी तुम्ही आमच्यावर आरोप करत आहात हे चुकीचे आहे. विशेष महासभा बोलावुन अथवा शक्य असल्यास याच महासभेत तो विषय मंजुर करावा अशी भावना आमची देखिल आहे परंतु इतर प्राकलना प्रमाणेच याची देखिल सविस्तर माहिती द्यायला हवी. यासाठी दोन दिवसा नंतर महासभा बोलावली तरी चालेल, यासाठी आमचे समर्थन आहे. परंतू कारभार हा स्वच्छ व पारदर्शक असायला हवा.

<u>मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :–</u> मा. महापौर महोदया, खड्डे भरण्यासाठी आताच येथे निर्णय घेतला जात असेल तर आमच्या राष्ट्रवादी कॉगेस पक्षाच्या सर्व सदस्यांचे त्याला समर्थन आहे.

<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, शहर हितासाठी येथे जी चर्चा चालु आहे, कोणीही नगरसेवक महासभेत असे म्हणणार नाही की, खड्डे भरण्याचा विषय पास करु नका. परंतू प्रश्न असा उपस्थित होतो की, सभागृह नेता यांनी सांगितले की, शिवसेना व भाजपा काम केले तरी विरोध करते व काम नाही केले तरी विरोध करते. मला असे वाटते की, हे सभागृह नेता आहेत तसेच स्थायी समितीचे सदस्य देखिल आहेत. तेथे जे ठराव अमान्य झाले त्यामध्ये सत्ताधारी पक्षाचे सदस्य देखिल होते. रस्त्यावरील खड्डे भरले जावु नयेत अशी त्यांची भावना नाही. बीपीएमसी ॲक्ट मध्ये स्पष्ट लिहीले आहे की, १० मे नंतर बीएमअेसीचे कोणतेही काम करण्यात येवु नये. बीएमअेसी करण्यासाठी कमीत कमी पावसाळयाच्या एक महिन्या आधी खड्डे भरणे आवश्यक असते परंतू येथे जुन, जुलै, ऑगस्ट मध्ये देखिल खड्डे भरले जातात. याचे मी, आपणास उदाहरण देवु शकतो. पावसाळयात खड्डे भरतात परंतू त्यामुळे कायद्याचे पालन होत नाही. दुसरे म्हणजे जेथे बीएमअेसीचे खड्डे भरले जातात तेथे पेनल्टी लावली जाते. तुम्हाला कदाचित माहिती नसेल की, मुंबई महानगरपालिकेत ज्या ठेकेदारांनी काम व्यवस्थित केले नाही त्या ठेकेदारांकडून रु. १ कोटी वसुल करण्यात आले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–</u> बाकीचे मला माहिती नाही परंतू त्या दिवशी स्थायी समिती सदस्यां सोबत आपल्या द्वारे जो खेळ खेळण्यात आला त्याची मला पुर्ण माहिती आहे.

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—** तुम्ही तीन चार वेळा बोलता परंतू सभागृह नेत्याने एकदाच बोलायचे असते. माझी विनंती आहे की, खड्डे भरण्याचा विषय महासभेत आणावा सर्व पक्ष तो विषय एकमताने मंजुर करतील. मुंबई महापालिका व इतर एक दोन महापालिकांसाठी तर उच्च न्यायालयाने आदेश देखिल दिले आहेत. ज्या रस्त्यांचे काम केले आहे परंतू खड्डे पुन्हा पडले आहेत अशा ठिकाणी ठेकेदाराची सुरक्षा अनामत रक्कम राखुन ठेवण्यात आली आहे. जे देखिल खड्डे पुन्हा उखडतील ते ठेकेदारांकडून पुन्हा भरुन घेण्यात यावेत. तसेच स्थायी समिति मध्ये इतर निविदा देखिल अमान्य करण्यात आल्या आहेत. तेथे ''निवडा व उचला'' या तत्वावर काम केले जाते. याचे काम करा त्याचे करु नका असे केले जाते.आज श्रीमती माया मसंद यांच्या प्रभागातील शौचालय तोडण्याचा विषय एक वर्षा पासुन प्रलंबित आहे. श्रीमती जया साधवानी यांच्या प्रभागातील जुने शौचालय तोडण्याचा विषय दिड वर्षा पासुन प्रलंबित आहे. ३१ मार्चला माझ्या प्रभागातील शौचालयाचा विषय आला होता त्यावेळी पुन्हा चौकशी करा असे सांगितले गेले. १९९७ ते ९९ या कालावधीत स्थायी समितीत शिवसेना भाजपाचे वर्चस्व होते, आम्ही देखिल सदस्य होतो त्यावेळी कोणताही विषय आला तरी तो मंजुर केला जायचा. कोणाचाही विषय थांबवला जायचा नाही. तसेच ठेकेदारालाही याचे काम करु नको, त्याचे काम करु नको असे देखिल सांगितले जायचे नाही. यासाठी मी, विनंती करेन की, कामाची गुणवत्ता राखण्यासाठी शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांना निर्देश दिले जावेत. प्रत्येक प्रभागात उल्हासनगरचे नागरिक राहतात, यासाठी कॅम्प नं.१ ते ५ मध्ये खड्डे भरले जावेत. ''निवडा व उचला'' असे करु नका. आमच्या प्रभागात काम करताना देखिल चित्रीकरण केले तरी चालेल. यासाठी आम्ही तयार आहोत. परंतू सर्वाची कामे व्हायला हवीत. हवे असेल तर हा विषय विशेष महासभेत आणावा त्यासाठी विरोधी पक्षनेता यांनी पत्र देखिल दिले आहे.सर्व पक्ष तो विषय मंजुर करतील फक्त त्यामध्ये काही अनियमितता होवु नये यासाठी आयुक्तांनी लक्ष दयावे. अधिका—यांकडे लक्ष दयावे.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** मा.महापौर महोदया, मी, आमचे सहकारी सदस्य श्री.किशोर वनवारी यांचे अभिनंदन करतो कारण त्यांनी सभागृहाला सांगितले की, रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम हे पावसाळयात केले जात नाही. हा मुद्दा पहिल्यांदाच या सभागृहात आलेला नाही. या अगोदर पावसाळयात खड्डे भरण्याचे काम केले जाते म्हणुन ब—याच वेळा येथे हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता त्यावेळी श्री. किशोर वनवारी हे सभागृह नेता होते. हे काम कसे करणे आवश्यक आहे, तातडीची आवश्यकता कशी आहे याबाबत त्यावेळी ते समर्थन करीत असत. ज्यावेळी राजकारणाचा प्रश्न निर्माण होतो त्यावेळी लोक कायद्याप्रमाणे बोलतात हे चांगले आहे. यासाठी मी त्यांचा आभारी आहे. मी आयुक्तांना विचारु इच्छितो की, खड्डे भरण्याच्या कामाची जी लक्षवेधी सुचना होती ती गणेश उत्सव सण समोर ठेवून आणली होती. आमचे सदस्य श्री.अशोक ठाकुर यांनी ती लक्षवेधी आणली होती. त्यांच्या प्रभागातील खड्डे भरण्याचे काम कदाचित झाले असेल कारण ते शांत बसले आहेत. आज ते गप्प आहेत परंतू त्यावेळेला सभागृहाची भावना अशी होती की, गणेश उत्सव व नवरात्र जवळ आली आहे खड्डे लवकर भरले गेले पाहिजेत, हे एक तांतडीचे व महत्वपुर्ण काम आहे. परंतू स्थायी समिति मध्ये त्या विषयाला कलाटणी देण्यात आली. त्याची विविध कारणे विरोधी पक्षनेता यांनी सांगितली. परंतू ही कारणे आजच आली नाहीत. ब—याच वेळा तातडीने अशी कामे करण्यात आली आहेत. अशा वेळी कारणांना व नियमांना बाजुला ठेवले जाते. श्री. किशोर वनवारी यांनी ५ वर्षात या सभागृहाला ब—याच वेळा शिकवले आहे की, जेव्हा तातडीची गरज असते तेव्हा नियम व कायदे बाजुला ठेवले जातात. यासाठी गणपती व नवरात्र उत्सव मध्ये आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात खड्डे भरायला हवे होते, नाही तर स्थायी समिति मध्ये सर्व मुद्दे बाजुला ठेवुन हे विषय सर्वानुमते पास करायला हवे होते. परंतू राजकीय दृष्टीकोनातून तसे केले गेले नाही. त्यामध्ये दुसरे कोणतेही कारण नव्हते. त्यामागे फक्त राजकरण होते. कोणाला तरी खाली पाडायचे होते, त्यासाठी लोकांच्या प्रति अन्याय व्हावा हे चुकीचे आहे. याचा या सभागृहात, तसेच इतिवृत्तात नोंद व्हावी यासाठी निषेध करीत आहे.

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—** माझा हरकतीचा मुद्दा आहे. यांनी पुर्ण भाषण माझ्यावरच केले रस्त्यांवर केलेच नाही. बिचा—याचे पुर्ण लक्ष माझ्याकडेच आहे. ते आता शिकत आहेत. थोडे थोडे बोलत आहेत व योग्य ठिकाणी जावुन बसले आहेत. मी भ्रष्टाचाराला साथ देत नाही.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** श्री. किशोर वनवारी यांनी नियम वाचला असेल की, कोणताही सदस्य ज्यावेळी हरकतीचा मुद्दा उपस्थित करतो त्यावेळी इतर सदस्यांनी खाली बसायचे असते. मी, तुमचा मुद्दा सुधारु इच्छितो. त्यांचे असे म्हणणे आहे की, सर्व भाषण मी त्यांच्याकडे पाहून केले. मी जेव्हा यांच्याकडे पाहून बोलत होतो व जेव्हा नियमांवर बोट ठेवून यांना समजावत होतो की, तुम्ही चुकीचे केले आहे त्यावेळी ते समर्थन करत होते. गेल्या चार वर्षात या सभागृहात जे काही चुकीचे घडले त्यासाठी जर हे जबाबदार नाहीत असे यांनी त्यांच्या अंतरआत्मावर हात ठेवुन सांगितले तर मग हे योग्य बोलत आहेत असे मी म्हणेन.

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—** माझा हरकतीचा मुद्दा आहे, मला खुलासा करण्याची काही आवश्यकता नाही. आपण देखिल माझ्या प्रमाणेच सदस्य आहात. मी चुकीच्या कामांना मदत करत नाही. आपण आरोप केला त्याप्रमाणे मी चुकीच्या कामांना कधीही पाठींबा दिलेला नाही. तुम्हाला मला प्रश्न विचारण्याचा हक्क आहे. परंतू मी चुकीचे काम कधीही केले नाही.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—** महापौर महोदया, याचा अर्थ असा ही होतो की, श्री.किशोर वनवारी यांनी ज्या कामांना पाठिंबा दिला ती कामे चुकीची नव्हती.

**मा. सदस्य श्री.राजु जग्यासी :—** मा.महापौरजी, मी सभेला माहिती देवु इच्छितो कारण सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी स्थायी समिती बद्दल काही गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांनी विचारले की, खड्डे भरण्याचे काम आताच हाती का घेतले? त्याबददल मी सांगु इच्छितो की, महाराष्ट्र शासनातर्फे आपल्याला ५८ लाखाचा निधी मिळालेला आहे. तसेच रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी शासनाने आदेश दिले आहेत. आपल्या महापालिकेची आर्थीक परिस्थिती चांगली नसल्याने ज्यावेळेस शासनाने निधी दिला त्यावेळेस आम्ही विषय स्थायी समिती मध्ये मान्यते साठी ठेवला होता. यांना माहितीसाठी मी सांगु इच्छितो की, चार प्रभाग समित्यांमध्ये कामे करण्यासाठी चार निविदा होत्या. येथे उपस्थित असलेले सर्व नगरसेवक कुठल्या ना कुठल्या तरी प्रभाग समिती मध्ये येतात. यामध्ये सत्ताधारी व विरोधीपक्ष असे होत नाही. यासाठी मी त्यांचा गैरसमज दुर करु इच्छितो. दुसरे यांनी सांगितले की, सिमेंटचे रस्ते देखिल यामध्ये आहेत. त्याबददल मी सांगु इच्छितो की, यांनी सिमेंट रस्त्यांची जी निविदा नामंजुर केली त्यापैकी एक रस्ता श्री.महाराज भुल्लर यांच्या प्रभागातील डॉल्फीन क्लब येथील होता. दुसरा रस्ता नगरसेवक श्री. रामदास उमाप यांच्या प्रभागातील होता. याचा अर्थ फक्त सत्ताधारी पक्षातील कामे होतात असा होत नाही. स्थायी समिती मध्ये पुर्ण शहरातील कामे केली जातात. शहरातील आवश्यक कामे केली जातात. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :—** महापौर महोदया, कृपया आपण खुलासा करावा. तसेच निर्णय घेण्यासाठी मदत करा. धन्यवाद.

**मा.महापौर** सन्माननिय सदस्यानो , रस्ता दुरुस्ती दर वर्षी केली जाते. हे काही पहिले वर्ष नाही. दर वर्षी हा विषय पास होतो. आपण बजेट बघीतले तर दिसुन येईल की, त्यामध्ये खड्डे भरण्यासाठी रु. १ कोटीची तरतुद केली जाते. पावसाळयापुर्वी रस्त्यांवरील खड्डे भरण्यात येतात तसेच पावसाळया नंतर गणेश उत्सव व ईतर उत्सव लक्षात घेवुन खड्डे भरण्यात येतात. या शहराची ही परंपरा राहिली आहे. मग ती नगरपालिका असो अथवा महानगरपालिका असो. रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम दरवर्षी अशा प्रकारे केले जाते. कोणताही पक्ष सत्तेत असला तरी हे काम केले जाते, हे काही नविन नाही. तर आता यामध्ये अडथळे आणले जात आहेत. आपणा सर्वाना माहिती आहे की, मागील स्थायी समितीत हा विषय ठेवण्यात आला होता. वर्तमानपत्रात देखिल आले होते की, मा. मुख्यमंत्री यांनी सर्व महापालिकांचे आयुक्त व महापौर यांची एक बैठक बोलावुन रस्ते दुरुस्तीसाठी अनुदान दिले होते. उल्हासनगर मधील रस्ते दुरुस्त करण्यासाठी रु. ५८ लाख एवढा निधी दिला होता. हे काम आधीच व्हायला हवे होते परंतू आयुक्तांनी तुम्हाला सांगितले की, डीएसआरचे दर न जुळल्याने व चांगले काम होण्यासाठी, ठाणे येथुन डांबराचे दर मागविले होते. आयुक्तांनी सर्व चौकशी करुन हा विषय स्थायी समिती समोर आणला होता. हा विषय वर्षानुवर्ष स्थायी समिती मध्येच मंजुर होतो. हे या शहराचे दुर्भाग्य आहे की, लोक ज्या नगरसेवकांना निवडून देतात ते नगरसेवक हे विसरतात की, ते स्वत: साठी निवडून आले नसुन लोकांनी त्यांना निवडून दिले आहे. येणा—या सहा महिन्यामध्ये निवडणूका होणार आहेत त्यामुळे मी लोकांना आवाहन करेन, मी प्रत्येक चौकामध्ये कॅसेट दाखवेन की जे प्रतिनिधी निवडून आले आहेत ते महापालिकेत कशा प्रकारे काम करीत आहेत, शहरासाठी काय काम करत आहेत. आमचे काही नगरसेवक, विशेषकरुन एनसीपीचे काही नगरसेवक थोडया लाभासाठी, छोटया गोष्टीसाठी रस्त्यांच्या कामांना विरोध करतात, विरोधात हात वर करतात तसेच शहराचे काम होवु नये यासाठी अडथळा आणतात. मी लोकांना निवेदन करेन की, येणा—या काळात अशा लोकांना सक्त विरोध करावा, त्यांच्या प्रभागात त्यांच्या घरात जावुन धरणे धरावेत तसेच त्यांच्या तोंडावर काळी शाई लावण्यासाठी घेवुन जावी. जे लोक शहराचा फायदा न करता विकासात अडथळा आणण्यासाठी येथे बसुन विरोधात हात वर करतात हे या शहराचे दुर्भाग्य आहे. शासनाने ६० लाखाचा चेक आपल्याला दिला होता, शहरातील रस्ते बनविण्यासाठी दिला होता. विरोधीपक्ष तर विरोध करतीलच परंतू दुर्दैवाने आमच्या दोन नगरसेवकांनी थोडयाशा लाभासाठी विरोध केला. यासाठी लोक त्यांना धडा शिकवतीलच.

मा. सदस्य श्री. होशियारसिंह लबाना :– शेम, शेम.....

मा.महापौर :– आता हे प्रस्ताव स्थायी समिती मध्ये नामंजुर झालेले आहेत. यावर पुढे मार्ग निघणार नाही असे नाही. शासनाला आपण पैसे परत देवु शकत नाही. शासन त्यांच्या अधिकारात आम्हास जे काही आदेश देईल त्याचे पालन आम्ही करु. आम्ही येथे लोकांचे प्रतिनिधी म्हणुन निवडून आलो आहोत, नोटांची मशिन म्हणुन नाही. शहराला लुटुन पैसे कमवणे व पार्टीला ब्लॅकमेल करण्यासाठी, शहरातील विकास थांबवण्यासाठी आपण येथे बसलेलो नाही. मी लोकांना अपिल करते की, शहराच्या विकासासाठी आम्ही येथे बसलेलो आहोत, मी महापौर पदावर बसलेली आहे. जो पर्यत मी आहे तोपर्यत या शहराचा विकास, मग आमचे लोक पैशासाठी विकले गेले तरी विकास थांबणार नाही. हे मी आमच्या नगरसेवकांना सांगु इच्छिते. तसेच रस्ते दुरुस्तीचे काम झाल्या शिवाय राहणार नाही. हे मी शासनाकडून त्यांच्या अधिकारात करुन आणेन हे आश्वासन मी सर्व शहराला देवु इच्छिते. मित्रांनो उशिर झाला आहे परंतू आपले काम होणार नाही एवढा उशिर झालेला नाही, आम्ही आमचे काम पुर्ण करुन दाखवु या शहरातील रस्त्यांचे काम लवकरात लवकर करुन दाखवु.

काही सदस्य :–पास–पास......

मा. महापौर :– मागील सभेचे दिनांक १९.८.२००६ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा. सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ३ :–वृक्ष प्राधिकरणामधील एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने त्या जागी नवीन सदस्याची नियुक्ती करणे.

---

मा. सदस्य श्री. राजेश वधारिया :– आम्ही श्रीमती रेखा कारीरा यांचे नांव सुचवित आहोत.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :– भाजपा व शिवसेना तर्फे आम्ही एक पत्र दिले आहे. त्यामध्ये श्रीमती दिपा पंजाबी यांचे नांव सुचविले आहे.

मा. सचिव :– श्रीमती दिपा पंजाबी ठिक आहे.

काही सदस्य :–पास–पास......

मा. सदस्य श्री.राजेश वधारिया :– पास पास असे ओरडुन विषय पास होत नाही. तुम्ही श्रीमती दिपा पंजाबी यांचे नांव कसे काय घोषित केले?

मा. सचिव :– मा.महापौरांनी सांगितले की मंजुर आणि सर्वाना मंजुर आहे.

काही सदस्य :–पास–पास......

मा. महापौर :– सदरचा विषय पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

विषय क्र. ३ :–वृक्ष प्राधिकरणामधील एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने त्या जागी नवीन सदस्याची नियुक्ती करणे.

प्रस्तावना :—

महासभा ठराव क्र.२० दिनांक ३१/८/०२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेंत्रासाठी महापालिका आयुक्तांचे अध्यक्षतेखाली १५ सदस्यांच्या वक्ष प्राधिकरणाची स्थापना करण्यांत आली आहे, या १५ सदस्यांमधील एक सदस्य श्री नारायण पंजाबी यांनी दिनांक २/६/२००६ रोजी महापालिका सदस्यत्वाचा राजिनामा दिल्याने वृक्ष प्राधिकरणामधील एका सदस्याच्या पदाची जागा रिक्त झाली आहे. श्री नारायण पंजाबी याच्या राजीनाम्याने रिक्त झालेल्या जागी दुस—या सदस्याची नेमणूक करण्याकामीचा प्रस्ताव महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: १३ दिनांक:—२०/०९/२००६

सुचकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले
अनुमोदकाचे नाव :— श्री प्रशांत जाधव

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार वृक्ष प्राधिकरणामधील एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने त्या जागी श्रीमती दिपा पंजाबी यांची नियुक्ती करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र.४ :— श्रीमती राशी ओचानी, निलंबीत कनिष्ठ लिपिक यांना सेवेत पुनर्स्थापित करण्यास मान्यता देणे

---

काही सदस्य :—पास—पास......

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

विषय क्र.४ :— श्रीमती राशी ओचानी, निलंबीत कनिष्ठ लिपिक यांना सेवेत पुनर्स्थापित करण्यास मान्यता देणे

प्रस्तावना,

श्रीमती राशी ओचानी कनिष्ठ लिपिक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाई मध्ये पारितोषण रक्कम रु. ३,०००/— स्विकारलेचे त्यांचे कडिल क्र. एसबी/ठाणे/एएसपी/३०/२०००, दिनांक ९ फेबुवारी,२००० च्या पत्रामध्ये कळविले नुसार कार्यालया कडिल क्र.उमपा/साप्रवि/आस्था/टे.६/१७३,दिनांक २३ फेब्रुवारी,२००० च्या आदेशान्वये निलंबीत करण्यात आले आहे. त्या नंतर लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने श्रीमती ओचानी यांचे विरुध्द् मा. न्यायालयात अभियोग दाखल करणे कामी त्यांचे कडिल क्रमांक सी. आर/४२/ठाणे/२००० /४२३१, दिनांक ९ मार्च,२००० च्या पत्रान्वये कळविले असता सक्षम प्राधिकारी मा. सभा असल्याने महासभा ठराव क्रमांक .११ दिनांक २०.७.२००० अन्वये श्रीमती ओचानी यांचे विरुध मा. न्यायालयात अभियोग दाखल करणे कामी मान्यता दिली होती. सदर प्रकरण क्र.१२/२००० मा. न्यायालयात प्रलंबित होते.

२. मा. विशेष सत्र न्यायालयाने सदर क्रमांक १२/२००० प्रकरणी दिनांक १४ जुन,२००६ रोजी पुढील प्रमाणे निर्णय दिला आहे. ''श्रीमती राशी ओचानी यांचे विरुध्द दाखल केलेल्या गुन्हया मध्ये लाचलूचपत भष्ट्राचार प्रतिबंधक कायदा १९८८ चे नियम ७ व १३ (१)(ड) तसेच पोट नियम १३ (२)अन्वये ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून दोषमुक्त करण्यात येत आहे.''

३. श्रीमती राशी ओचानी, यांना सद्यस्थितीत ७५% निर्वाह भत्ता मिळत आहे. त्यांना मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णया नूसार दोषमुक्त करण्यात आले असल्याने सेवेत पुर्नस्थापित करुन महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तरसेवा, आणि निलंबन बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ७१ चे पोट नियम ३ मधील तरतुदी नुसार त्यांचा निलंबन कालावधी हा सेवाकाळ धरुन त्यांच्या विरुध कार्यवाही झाली नसती तर जेव्हढा पगार व भत्ता मिळण्यास ते पात्र राहिले असते तेवढा पगार व भत्ता त्यांना अनुज्ञेय राहिल.

सबब , श्रीमती राशी ओचानी, कनिष्ठ लिपीक (निलंबित) यांना सेवेत पुर्नस्थापित करणेचा प्रस्ताव नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा असल्याने मान्यते साठी मा. महासभे पुढे सादर करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र: १४</u> <u>दिनांक:—२०/०९/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती कमला शर्मा

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे मा. न्यायालयाच्या दोषमुक्तीच्या आदेशामुळे श्रीमती राशी ओचानी, निलंबित कनिष्ठ लिपिक यांना महापालिका सेवेत पुर्नस्थापित करण्यास मान्यता देत आहे.

*<u>परंतु</u>*

त्यांचा निलंबन कालावधी सेवाकाल धरुन जेवढा पगार व भत्ता मिळण्यास त्या पात्र राहिल्या असत्या तेवढा पगार व भत्ता त्यांना अनुज्ञेय राहिल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :— विषय क्र. ५ प्रस्तावाची सुचना वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ विषय क्र.५:— महासभेतील प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासावरून एक तास करणे.

———————————————————————————————————————

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— आमचा विरोध आहे, आम्हाला बोलायचे आहे.

मा. सदस्य श्री.राजेश वधारिया :— मा.महापौरजी, उल्हासनगर महापालिकेच्या आज होणा—या महासभेची सुचना १२.९.२००६ रोजी आपल्या मंजुरीने पुर्वीच निघाली होती. त्या सुचनेमध्ये महासभेच्या मान्यते साठी चार विषय ठेवण्यात आले होते.परंतू यानंतर त्वरीत महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांनी एक पुरक सुचना काढून याच महासभेच्या पटलावर ७ अशासकीय प्रस्ताव आणले आहेत जे माझ्या मताप्रमाणे नियमबाहय आहेत. सभागृहाच्या पटलावर उपरोक्त विषय पुरक सुचनेवर सचिवां मार्फत आणले गेले या विषयांना सभासुचनेवर आणण्यासाठी आपण सचिवांना परवानगी दिली आहे काय या बददल अवगत करावे.

मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :— मा. महापौरजी, आमचे नगरसेवक श्री.राजेश वधारिया यांनी आता जो प्रस्ताव ठेवला आहे याचे उत्तर सचिवांनी दयावे की त्यांनी महापौरांची परवानगी घेतली होती अथवा नाही. विनापरवानगी विषय सभा सुचनेवर आणता येत नाहीत. आम्ही याचा विरोध करतो.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौरजी, आमचे सदस्य श्री. राजेश वधरिया व चंदाराम मोकल यांनी सांगितले की, महापालिकेच्या नियमा प्रमाणे महासभेत कोणताही प्रस्ताव आणण्यापुर्वी मा. महापौरांची परवानगी घेणे आवश्यक आहे. विषय सुचीवरील चार प्रस्ताव मा. महापौरांच्या परवानगीने आले असता उर्वरित सात प्रस्ताव मा. महापौरांचे परवानगी शिवाय कसे काय आणले याबद्दल खुलासा व उत्तर सचिवांनी द्यायला हवे. आम्ही या प्रस्तावांचा व कार्यप्रणालीचा विरोध करतो.

मा. सचिव :— तुम्ही उत्तर तर ऐकुन घ्या.

मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :— उत्तर तर आम्ही ऐकुन घेवु कारण उत्तर ऐकायलाच येथे आलो आहोत. परंतु उत्तर योग्य दयायला हवे.

मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :— त्यांना उत्तर तर देऊ दया.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— तुम्हाला आवडेल असे उत्तर त्यांनी दयायला हवे का?

मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :— तुम्ही गप्प बसा मला बोलु दया. तुम्ही नंतर बोलु शकता.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— तुम्ही कधीही मध्येच उभे राहून बोलता.

मा. सचिव :— मा. महापौरजी महोदया, सभा सुचना काढण्यासाठी महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाज विषयीचे नियम लागु आहेत. सभा सुचना काढण्यासाठी तीन नियम लागु आहेत. पहिला नियम १ (आय) आहे. मी वाचुन दाखवितो.
*''१ (आय) — सभेच्या प्रत्येक नोटीशीत, अशी सभा ज्यावेळी व ज्या ठिकाणी भरवावयाची असेल ती वेळ व ते ठिकाण आणि कलम ४४ खालील प्रश्नांखेरीज अशा सभेत चालवायचे कामकाज निर्दिष्ट केले पाहिजे आणि अशी नोटीस, नगरपालिका सचिवाने भरपूर खप असलेल्या निदान एका स्थानिक वृत्तपत्रातील जाहिरातीद्वारे दिली पाहिजे आणि व्यवहार्य असेल तितपत अशा नोटीशींची एक प्रत प्रत्येक पालिका सदस्यांच्या शेवटच्या माहित असलेल्या पत्त्यावर साध्या पोस्टाने पाठवली पाहिजे.''*

मा.महापौरांनी सभेची तारीख, वेळ व जागा निश्चित केल्या नंतर सचिव कार्यालयास सभेची सुचना काढायची असते. त्यानंतर आय–अ हा नियम आहे.

*आय–अ –– नगरपालिका सचिव, खंड (आय) मध्ये निर्देशिलेल्या नोटीशीत, महापौरांची मान्यता घेतल्याशिवाय, कोणतेही कामकाज दर्शविणार नाही. परंतु महापौर दोन पेक्षा अधिक वेळा अशी मान्यता देण्यास नकार देईन त्याबाबतीत नगरपालिका सचिव, एकूण पालिका सदस्यांपैकी एक चतुर्थांश सदस्यांनी असे कामकाज समाविष्ट करण्याबद्दल दिलेली नोटीस मिळाल्यावर असे कामकाज अशा नोटीशीत अंतर्भूत करील.*

<u>मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :– </u> मी मध्ये बोलु इच्छितो.

<u>मा. सचिव :– </u> माझा खुलासा पुर्ण होवु दया त्यानंतर तुमच्या शंका उपस्थित करा. १(आय) हा नियम स्पष्ट आहे की, दर महिन्याची सभा आयोजित केल्या नंतर त्याची जाहिरात वर्तमानपत्राात देणे तसेच सदस्यांना साधारण पोस्टाने घरी सभा सुचना पोहोच करायची असते. परंतू आम्ही मात्र पेपरात जाहिरात दिल्या नंतरही सर्वाच्या घरी सभासुचना हस्ते पोहोच करतो. आय–अ नियमात स्पष्ट लिहिले आहे की, आय क्लॉज प्रमाणे जी सभासुचना काढायची असते त्यामध्ये कोणताही विषय मा. महापौरांच्या मंजुरी शिवाय आणता येणार नाही. त्याप्रमाणे १२ तारखेला आम्ही जी पहिली सुचना काढली होती त्यावेळेस जे विषय उपलब्ध होते ते मा. महापौरांच्या मंजुरीने विषय पत्रिकेवर घेतले होते. त्याशिवाय नियम ज हा एक स्वतंत्र नियम आहे. त्यामध्ये फक्त सचिवांना अधिकार आहेत. ज्यावेळी महिन्याची सभासुचना निघते त्यानंतर कोणीही सन्माननिय सदस्य तीन पुर्ण दिवस आधी म्हणजेच ते ज्या दिवशी नोटीस देतात तो दिवस व सभेचा दिवस पकडुन पाच दिवसांची नोटिस मला प्राप्त झाली तर त्यांना महासभेच्या विषय पत्रिकेवर जो विषय आणायचा असेल त्या बददल नोटिस देवुन आणु शकतात, सोबत त्यांचे प्रस्ताव देखिल देवु शकतात. महापालिका सचिव सदरचे विषय थेट सभा सुचनेवर आणु शकतात. यासाठी त्यांना सभेच्या एक दिवस आधी सदरची सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी लागते. नियम पुढील प्रमाणे आहे.

*१ ज – कोणत्याही सभेत कलम ४४ खालील कोणत्याही प्रश्नांखेरीज कोणतेही कामकाज पुढे आणण्याची किंवा अशा सभेच्या नोटीशीत पूर्वीच विनिर्दिष्ट करण्यात आला नसेल असा कोणताही मूळ प्रस्ताव मांडण्याची ज्या कोणत्याही पालिका सदस्याची इच्छा असेल अशा पालिका सदस्याने, त्या सभेसाठी ठरवण्यात आलेल्या दिवसाच्या निदान तीन पूर्ण दिवस अगोदर नगरपालिका सचिवास त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे, आणि ज्या कामकाजाची किंवा प्रस्तावाची अशा रितीने नोटीस देण्यात आली असेल त्या कामकाजाची किंवा प्रस्तावांची एक पूरक घोषणा उक्त सचिवाने सभेच्या आदल्या दिवसाच्या आत स्थानिक वृत्तपत्रांत दिली पाहिजे.* हा नियम स्पष्ट आहे. सन्माननिय सदस्य जो प्रस्ताव वेळेत आणतील तो जाहिरातीद्वारे आम्हाला प्रसिध्द करावयाचा आहे तसेच आधीच्या सभेच्या कामकाजाशी संलग्न करायचा आहे. कायदया प्रमाणे यासाठी मा.महापौरांच्या अनुमतीची आवश्यकता नाही. त्याशिवाय १५ तारखेला मला हे प्रस्ताव जेव्हा प्राप्त झाले होते तेव्हा मी हे सर्व प्रस्ताव मा. महापौर व आयुक्तांच्या कार्यालयात माहितीस्तव पाठविले होते. नियमा प्रमाणे ही पुरक सुचना कायदेशिर आहे.

<u>मा सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u> मा. महापौरजी मी सचिवांच्या मताशी सहमत नाही कारण त्यांनी ज्या प्रकारे कायदा वाचुन दाखविला आहे त्याप्रमाणे तो नाही. तुम्ही आय–आय–(अे) व जे एकत्र वाचायला हवेत. कलम ४४ प्रमाणे आम्ही जे प्रश्न विचारतो ते सोडून सर्व कामकाज, प्रस्ताव मा. महापौरांच्या मंजुरीने पटलावर यायला हवेत. आज सभागृहाच्या पटलावर जे प्रस्ताव आले आहे ते सर्व अवैध व नियमबाहय आहेत. तुम्ही हे तुम्हाला हवे तसे वाचाल असे चालणार नाही. आय जे प्रमाणे वाचाल, जे मध्ये स्पष्ट लिहिले आहे की, ज्या नगरसेवकाला कोणताही प्रस्ताव आणायचा असेल, कोणताही प्रस्ताव याचा अर्थ आय मध्ये जे दिले आहे त्याला लागु होते. जर सभासुचना निघाली असेल व कोणालाही कोणतीही बाब सभासुचनेवर आणायची असेल ती महापौरांच्या संमतीने आणावी लागेल. यामध्ये कुठेही असे लिहीलेले नाही की महापौरांच्या परवानगी शिवाय विषय सभा सुचनेवर आणण्याचे सचिवांना अधिकार आहेत. त्यामुळे आजच्या सभेत जे सात प्रस्ताव आणले आहेत ते नियमबाहय आहेत त्यामुळे मी मा.महापौरांना निवेदन करेन की त्यांना नियमबाहय म्हणुन घोषित करावे.

<u>मा. महापौर :– </u> हे सर्व प्रस्ताव जे येथे आले आहेत, तर एकदा स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक होती, सचिव हे महापौरांच्या कार्यालयाचे काम करण्यासाठी असतात, स्थायी समिती कार्यालयाचे काम करण्यासाठी असतात. परंतु वेळोवेळी मी इतिवृत्तात देखिल बोलले आहे की, सचिव आमची दिशाभुल करीत असतात. स्थायी समिती सभापती पदाची जेव्हा निवडणुक होती त्यावेळी सचिव साहेबांना सांगितले होते की, तुम्ही सभा सुचना काढा. परंतू यांचे म्हणणे असे होते की आता हे अधिकार निवडणूक आयोगाला आहेत, त्यांचे लोक येतील, त्यांच्या कडुन आदेश येतील त्यानंतरच निवडणूक होईल. नंतर जेव्हा आम्ही आमच्या

वकीलांकडून या बद्दल सल्ला घेतला तेव्हा त्यांचे म्हणणे होते की हे चुकीचे आहे. त्यावेळी मी सचिवांकडे चार वकील घेवुन गेले होते त्यावेळी त्यांचे म्हणणे होते की तुमचे म्हणणे पण योग्य आहे आणि आमचे म्हणणे पण योग्य आहे. आता जो मुद्दा घेतला आहे तो असा आहे की महासभेचे अधिकार महापौरांकडे आहेत. जेव्हा स्थायी समितीची सुचना निघते, महासभेची. हे विषय नियमित सभा सुचनेवर आणायला हवे होते. या महोदयांनी महासभेची सुचना एका दिवशी काढली व या प्रस्तावाची सुचना दुस—या दिवशी काढली असे करण्यासाठी यांना अधिकार नाहीत. हे नियमबाहय ठरवुन मी हे प्रस्ताव रिजेक्ट करीत आहे. जन गण मन बोलावे तसेच इतर महापालिकांमध्ये देखिल याबाबत चौकशी करावी. कृपया जन गण मन साठी ....

<u>मा.सचिव :— </u> माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहेत हे कळून येत नव्हते.**

<u>मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :— </u> सचिवांवर कारवाई व्हायला हवी. सचिवांवर कारवाई व्हायलाच हवी.

<u>मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— </u> हे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :— </u> सचिवांवर कारवाई व्हायला हवी.

*यावेळी गदारोळ सुरु असतानाच मा. महापौर व इतर काही सदस्यांनी जन गण मन गायनास सुरुवात केली. यावेळी काही सदस्य मात्र त्यांच्या जागेवरच बसुन होते.*

<u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— </u> हा राष्ट्रगिताचा अपमान होत आहे.

*जन गण मन संपल्यानंतर मा. महापौर व खालील सदस्य/सदस्या सभागृहातुन बाहेर गेल्या.*

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती ज्योती कालानी | १७. | श्री. नाना पवार |
| २ | श्री. विनोद तलरेजा | १८. | श्री. राज असरोंडकर |
| ३ | श्री सतरामदास जेसवानी | | |
| ४ | श्री नरेंद्र कुमार ठाकुर | १९ | श्री. राजु जग्यासी |
| ५ | श्री. चंदाराम मोकल | २० | श्रीमती कमला शर्मा |
| ६ | श्री. सुर्यकांत लिंगे | २१ | श्रीमती मिनु राज दासानी |
| ७ | श्री. गणपत एडके | २२ | श्रीमती निता आहुजा |
| ८ | श्री. लालबिहारी यादव | २३ | डॉ.(श्रीमती) निना नाथानी |
| ९ | श्री होशियारसिंह लबाणा | २४ | श्रीमती भारती छाब्रिया |
| १० | श्री. देवेंद्रसिंह खेमाणी | २५ | श्रीमती भावना रामचंदानी |
| ११ | श्री. प्रभुनाथ गुप्ता | २६ | श्रीमती माया मसंद |
| १२ | श्री. ईश्वर पमनानी | २७ | श्रीमती अनिता गुप्ता |
| १३ | श्री. महेंद्र मुलचंदानी | २८ | श्रीमती सुजाता रिझवानी |
| १४ | श्री. मनोज साधवानी | २९ | श्रीमती भावना खिलनानी |
| १५ | श्री. पृथ्वी वलेचा | ३० | श्रीमती रेखा कारिरा |
| १६ | श्री. संजय बठिजा | ३१ | श्रीमती मिना सोंडे |
| | | ३२ | श्री. सुरेश गायकवाड |
| | | ३३ | श्री. राजेश वधारिया |

यावेळी खालील सदस्य सभागृहात आसनस्थ होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती जावळे संगिता | २१. | श्री. चव्हाण रमेश |
| २ | श्री भुल्लर राजेंद्रसिंह | २२. | श्री. जाधव प्रशांत |

३ श्री सोनवणे नथु
४ श्री. टेकचदांनी राजु
५ श्री. वाघे शामु
६ श्रीमती मोकल सिमा
७ श्री गायकवाड दिलीप
८ श्री उमाप रामदास
९ श्रीमती बामणकर नंदिनी
१० श्री रोहडा श्यामसुंदर
११ श्रीमती खांडेकर प्रेमा
१२ श्री. टाले प्रमोद
१३ श्री. ठाकुर विनोद
१४ श्रीमती वनवारी मोना
१५ श्री. वनवारी किशोर
१६ श्री. साधवानी मोहन
१७ श्रीमती साधवानी जया
१८ श्री. लुंड गोविंदराम
१९ श्री. रुपचंदानी बच्चाराम
२० श्रीमती माने किरण
२३. श्री. जाधव सुरेश
२४. श्रीमती सुर्वे जयश्री
२५. श्री बोडारे धनंजय
२६. श्रीमती कृष्णानी रेखा
२७. श्री. भालेराव गौतम
२८. श्रीमती वसीटा बेबी
२९. श्री. ठाकुर अशोक
३०. श्रीमती ससाणे लक्ष्मी
३१. श्री म्हस्के अंकुश
३२. श्री. चौधरी राजेंद्र
३३. श्री. मनवानी अन्नु
३४. श्रीमती पंजाबी दिपा
३५. श्री पुरसवानी जमनादास
३६. श्रीमती बठीजा कोमल
३७ श्रीमती माखिजा किरण
३८ श्री. बेहरानी मोहन
३९ श्रीमती करोतीया मालती
४० श्री पंजाबी लाल
४१ श्री. इदनानी जीवन

*यावेळी काही सदस्यांनी आयुक्तांना सभेत बसायला सांगितले व त्यांच्याशी चर्चा सुरु केली. नेमकी काय चर्चा सुरु आहे हे कळुन येत नव्हते. त्यानंतर आयुक्त व इतर सर्व अधिकारी सभागृहातुन बाहेर गेले. महापालिका सचिव व त्यांच्या अधिनस्त असलेले ३ कर्मचारी सभागृहात उपस्थित होते.*

*त्यानंतर उपस्थित पालिका सदस्यांनी खालीलप्रमाणे संभाषणास सुरुवात केली.*

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :— ही सभा बेकायदेशिररित्या स्थगित केली आहे. सभा स्थगित करण्यासाठी बहुमत घ्यावे लागते. त्यामुळे सभा सुरु राहणार आहे. आयुक्त महोदय सभा सुरु राहणार आहे.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— आमच्याकडे बहुमत आहे सभा सुरुच राहिल.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— सचिव साहेब मागदर्शन करा.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— सचिव साहेब येथे गुंडागर्दी सुरु आहे. जबरदस्ती जन गण मन सुरु करण्यात आले.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— सचिव साहेब आपण उत्तर दया कारण आपल्यावरच त्यांनी आरोप लावले आहेत.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— सर्व अधिका—यांनी येथेच बसायला हवे होते. सभेचे कामकाज सोडून जायला नको होते.

मा. सदस्य श्री.जिवन इदनानी :— सचिव साहेब आपण खुलासा करा, तुम्ही नियम सांगा

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— आमच्याकडे बहुमत आहे.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :— मी सभेचे कामकाज चालविण्यासाठी श्री. धनंजय बोडारे यांचे नांव पीठासीन अधिकारी म्हणुन सुचवित आहे.

मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :— मी श्री. बोडारे यांच्या नांवाला अनुमोदन देत आहे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— कायदा आहे, कायदयाशी खेळू नका.

महासभा ठराव क्र. १४ अ                                        दिनांक :— २०/०९/२००६

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा सभेचे कामकाज चालु ठेवण्यासाठी श्री. धनंजय बोडारे यांची सर्वानुमते पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करीत आहे.

यावेळी श्री. धनंजय बोडारे हे सर्वानुमते पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— मा. महापौरजी अधिका—यांना येथे येण्यासाठी आदेश दया.

मा. सदस्य श्री.राजेद्र चौधरी :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब व त्यांचे अधिकारी बहुमताचा अपमान करीत आहेत.

मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे) :— सचिव साहेब बहुमताने पीठासीन अधिका—याची नियुक्ती झाली आहे. सभेचे कामकाज चालु करावे. महासभेमध्ये आयुक्त व इतर अधिकारी महासभेचा अपमान करुन बाहेर निघुन गेले आहेत. सदर बाबतीत आयुक्तांवर कठोर कारवाई करण्यासाठी सर्व महापालिकेने शासनाला दखल घेण्यासाठी आपण सर्वानी प्रयत्न करावेत.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— सभेच्या कामास प्रारंभ करा.

*यावेळी मा. सदस्य श्री. शामु बाबु वाघे हे सभागृहातुन बाहेर गेले.*

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— मा. महापौर महोदय मी या विषयावर बोलु इच्छितो.

मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे) :— कृपया लक्ष दया. आजचे कामकाज सुरु करीत आहोत, पुढे सुरु करत आहोत.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— मा. महापौर महोदय आधीची सभा जी स्थगित केली त्या बद्दल मी आपणास कायदेशिर माहिती देवु इच्छितो ती नोंदवुन घ्यावी. सभा स्थगित करण्याचे अधिकार बहुमताला आहेत. याबददल अधिनियमात स्पष्ट तरतुद आहे. मी वाचून दाखवतो पृष्ठ क्र. ५ वर एक एन.अे. आहे त्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की पीठासीन अधिकारी बहुमताच्या निर्णयाने कधीही सभा स्थगित करु शकतो. याचा अर्थ महापौर बैठक तेव्हाच स्थगित करु शकतात जेव्हा सभागृहात उपस्थित असलेले बहुसंख्य सदस्य तसा निर्णय घेतील. एवढेच नाही तर याबददल एक जजमेंट देखिल आहे. उच्च न्यायालयाचा निर्णय आहे मी आपणास तो वाचुन दाखवतो. इंद्रवदन मोदी विरुध्द बडोदा नगरपालिका अशी एक केस होती त्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, तेथे देखिल असेच झाले होते , निवडून आलेल्या महापौर सभा स्थगित करुन निघुन गेल्या होत्या. नंतर ते प्रकरण न्यायालयात गेले होते. त्यावर मा. उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे निर्णय दिला होता.
*Section 135-Act and Bombay Provincial Corporations and Rules-Schedule A-Chapter 2, Rule 1(m) – Termination of the first meeting of corporation by Presiding Authority is null and void- In the matter of electing Mayor.- It the Presiding Authority of the 13th February, 1981 meeting had done what he was not authorized to do his action in treating the chapter as closed is to be treated*

*as a nullity and as a matter of necessary corollary to be treated as an action without authority of law. A meeting stands concluded ordinarily if the business of that house meeting is either transacted or dropped. It is the power of the councillors and the councillors alone to drop or decide a particular proceeding or a topic. The Presiding Authority had no jurisdiction in this fashion to abruptly leave the chair and rush into his room, simultaneously declaring that the meeting was terminated or concluded. Therefore it must be held that the decision of the Presiding Authority the Mayor, is not in accordance with law and the topic of electing the Mayor etc., was not completed was left in complete and the question has to be taken up on hand more particularly when a good deal of majority of members now insist that what is left undone should be done. The Hon'ble Court, therefore, set aside the decision of the Presiding Authority closing or terminating of the first meeting of the Corporation.*
येथे जशी आपली सभा सुरु आहे तशीच सभा तेथे देखिल सुरु होती. त्यामुळे सभा सुरु ठेवता येते असा न्यायालयाचा निर्णय आहे. मी पुराव्या दाखल सांगत आहे की इद्रवदन मोदी विरुध्द बडोदा म्युनिसीपल कॉन्सील १९८२ (१जीएलआर.८८) असा उच्च न्यायालयाचा निर्णय आहे. तो तुम्ही रेकॉर्डवर आणा.

**मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे)** :– सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबीजी, हा जो नियम आहे तो सचिवांनी स्पष्टपणे महासभेत सांगितलेला आहे. असा प्रकार होण्याची शक्यता गृहीत धरुन आम्ही आयुक्तांना आधीच अवगत केले होते. तुम्ही ज्या केस बददल सांगितले त्या केसचाही आम्ही पत्रात खुलासा केला आहे. त्यावेळी आयुक्तांनी सांगितले की, हे कायदयाप्रमाणे आहे व मला देखिल कायदया प्रमाणेच काम करायचे आहे. परंतू आताचे त्यांचे वर्तन योग्य नाही, कायदया विरुध्द आहे. आम्हाला त्यांच्याशी काही घेणेदेणे नाही. तुम्ही सांगितले की, बैठक स्थगित करायची असेल तर बहुमत घ्यावे लागेल, सभागृहाचे मत आजमावे लागेल. परंतू आता जे झाले आहे ते अयोग्य आहे. आम्ही सभेचे पुढील कामकाज सुरु करीत आहोत.

**मा. सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी:–** मा. महापौरजी आयुक्तांनी आज जी कृती केली आहे त्याबददल आजच्या सभेत काही तरी करायला हवे.

**मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे)** :–सचिव साहेबांनी महासभेला स्पष्टपणे सांगितले आहे. कायदेशिर बाबी शासन बघुन घेईल.

**मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे)** :–विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ प्रस्तावाची सूचना क्रमांक.१

महासभेतील प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासावरुन एक तास करण्यासाठी सन्माननिय पालिका सदस्य श्री. राजेंद्र चौधरी, श्री. रामदास उमाप व श्री.विनोद ठाकुर यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.
कोणाची या प्रस्तावास हरकत आहे काय?

---

**काही सदस्य** :–पास–पास......

**मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे)** :– प्रश्न उत्तराचा तास अर्ध्या तासा वरुन एक तास करण्यासाठी सदस्य श्री. राजेंद्र चौधरी, श्री. रामदास उमाप, व श्री. विनोद ठाकुर यांनी प्रस्ताव आणला आहे. मी हा विषय मतास टाकत आहे. जे सदस्य हा प्रस्ताव पास करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

*३७ मते*

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती जावळे संगिता | २१. | श्री. चव्हाण रमेश |
| २ | श्री भुल्लर राजेंद्रसिंह | २२. | श्री. जाधव प्रशांत |
| ३ | श्री सोनवणे नथु | २३. | श्री. जाधव सुरेश |
| ४ | श्री. टेकचदांनी राजु | २४. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ५ | श्रीमती करोतीया मालती | २५. | श्री बोडारे धनंजय |
| ६ | श्री. बेहरानी मोहन | २६. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| ७ | श्री गायकवाड दिलीप | २७. | श्री. भालेराव गौतम |
| ८ | श्री उमाप रामदास | २८. | श्रीमती वसीटा बेबी |
| ९ | श्रीमती बामणकर नंदिनी | २९. | श्री. ठाकुर अशोक |

१० श्री रोहडा श्यामसुंदर
११ श्रीमती खांडेकर प्रेमा
१२ श्री. टाले प्रमोद
१३ श्री. ठाकुर विनोद
१४ श्रीमती वनवारी मोना
१५ श्री. वनवारी किशोर
१६ श्री. साधवानी मोहन
१७ श्रीमती साधवानी जया
१८ श्री. लुंड गोविंदराम
१९ श्री. रुपचंदानी बच्चाराम
२० श्रीमती माने किरण

३०. श्रीमती ससाणे लक्ष्मी
३१. श्री म्हस्के अंकुश
३२. श्री. चौधरी राजेंद्र
३३. श्री. मनवानी अन्नु
३४. श्रीमती पंजाबी दिपा
३५. श्री पुरसवानी जमनादास
३६. श्रीमती बठिजा कोमल
३७ श्रीमती माखिजा किरण

**मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे) :–** आपण या प्रस्तावाच्या विरोधात असाल तर तसे सांगा?

**मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल :–** मी या प्रस्तावाच्या विरोधात नाही तसेच बाजुने देखिल नाही.

तटस्थ
श्रीमती सीमा मोकल

**मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल :–** मला काहीच समजले नाही.

**मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे) :–**या प्रस्तावाच्या बाजुने ३७ सदस्य व एक सदस्या तटस्थ आहे.

**काही सदस्य :–**पास–पास......

**मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे) :–**सदरचा विषय पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र.५:–** महासभेतील प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासावरून एक तास करणे.

सुचक :– श्री. राजेद्र शांताराम चौधरी
अनुमोदक :– श्री. रामदास उमाप
श्री. लाल पंजाबी

प्रस्ताव :–

महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाज विषयक नियम ५ (१७) अन्वये प्रत्येक सभेत कोणतेही कामकाज सुरू करण्यापुर्वी प्रश्नोत्तरासाठी अर्धा तासापेक्षा अधिक नसेल इतका वेळ देण्यात येईल अशी तरतूद आहे.

कित्येक वेळा महासभेत पालिका सदस्य एकाच प्रश्नावर अर्ध्या तासापेक्षा जास्तवेळ चर्चा करत असल्याने इतर पालिका सदस्यांना प्रश्न विचारण्यास संधी मिळत नाही त्यामुळे काही पालिका सदस्यांना आपला प्रश्न विचारण्यासाठी ४–४, ५–५, सभा पर्यत वाट पहात रहावे लागते.

महासभेत प्रश्न विचारणे हा प्रत्येक पालीका सदस्यांचा हक्क आहे आणि नियमातील तरतूदी प्रमाणे सभेत प्रश्नोत्तराचा कालावधी अर्धा तास असून तो एक तासापर्यत वाढविता येईल असे पुर्वीच्या महासभा ठराव क्र २१ दिनांक १७.१०.१९९७ प्रमाणे दिसून येते.

मध्यंतरी या महासभेने दिनांक २९.१०.२००५ च्या महासभा ठराव क्र ६४ अन्वये प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासा वरून अर्धा तास करण्याचा निर्णय घेतला. तो ठराव रदद् करण्यासाठी प्रस्तावित

महासभा ठराव क्र: १५ दिनांक:—२०/०९/२००६

ही महासभा वरील प्रस्तावाने अनुसार प्रत्येक महासभेतील प्रश्नोत्तराचा कालावधी अर्धातासावरून एक तास करण्याचा प्रस्ताव मान्य करीत आहे. व पुर्वीचा ठराव क्र ६४ दिनांक २९.१०.२००५ रदद् करीत आहे.

सदरहु ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे) :—विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ प्रस्तावाची सूचना क्र.२

नऊ विशेष समितत्यांचे विर्सजन करण्यासाठीचा प्रस्ताव सन्माननिय पालिका सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. बच्चाराम रुपचंदानी, व श्री.लाल पंजाबी यांनी प्रस्तावाची सूचना विचारात घेण्यासाठी प्रस्ताव आणलेला आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— या बाबत असा ठराव पारीत केला जावा की, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता त्वरीत अंमलबजावणी केली जावी.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— हे जे प्रस्ताव पारीत झाले आहेत त्याबाबत ईतिवृत्त कायम होण्याची वाट न पहात त्यावर त्वरीत कार्यवाही केली पाहीजे.

मा. पीठासिन अधिकारी श्री. धनंजय बोडारे:— या प्रस्तावावर चर्चा करत आहात की पारीत करत आहात?

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— पास,पास........

मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे) :— मी हा विषय मतास टाकत आहे. जे सदस्य हा प्रस्ताव पास करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

*३७ मते*

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती जावळे संगिता | २१. | श्री. चव्हाण रमेश |
| २ | श्री भुल्लर राजेंद्रसिंह | २२. | श्री. जाधव प्रशांत |
| ३ | श्री सोनवणे नथु | २३. | श्री. जाधव सुरेश |
| ४ | श्री. टेकचदांनी राजु | २४. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ५ | श्रीमती करोतीया मालती | २५. | श्री बोडारे धनंजय |
| ६ | श्री. बेहरानी मोहन | २६. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| ७ | श्री गायकवाड दिलीप | २७. | श्री. भालेराव गौतम |
| ८ | श्री उमाप रामदास | २८. | श्रीमती वसीटा बेबी |

९ श्रीमती बामणकर नंदिनी
१० श्री रोहडा श्यामसुंदर
११ श्रीमती खांडेकर प्रेमा
१२ श्री. टाले प्रमोद
१३ श्री. ठाकुर विनोद
१४ श्रीमती वनवारी मोना
१५ श्री. वनवारी किशोर
१६ श्री. साधवानी मोहन
१७ श्रीमती साधवानी जया
१८ श्री. लुंड गोविंदराम
१९ श्री. रुपचंदानी बच्चाराम
२० श्रीमती माने किरण

२९. श्री. ठाकुर अशोक
३०. श्रीमती ससाणे लक्ष्मी
३१. श्री म्हस्के अंकुश
३२. श्री. चौधरी राजेंद्र
३३. श्री. मनवानी अन्नु
३४. श्रीमती पंजाबी दिपा
३५. श्री पुरसवानी जमनादास
३६. श्रीमती बठिजा कोमल
३७ श्रीमती माखिजा किरण

तटस्थ
श्रीमती सीमा मोकल

मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे):— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ विषय क्र.६:— नऊ विशेष समित्यांचे विर्सजन करणs-

सुचक :— श्री. रमेश महादेव चव्हाण

अनुमोदक :— श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी

श्री. लाल पंजाबी

प्रस्ताव :—

उल्हासनगर महानगरपालिकेत नऊ विशेष समित्यांची रचना दिनांक ८.२.२००६ च्या ठराव क्र ७५ द्वारे व महसुल समितीची रचना दिनांक २९.१०.२००५ च्या ठराव क्र ६३ द्वारे करण्यात आली त्या समित्यांचे विवरण खालील प्रमाणे आहे.

१) सार्वजनिक बांधकाम समिती
२) नियोजन व विकास समिती
३) पाणी पूरवठा व जलनिस्सारण समिती
४) आरोग्य व परीक्षण वैद्यकिय समिती
५) माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती
६) गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती
७) क्रिडा, समाज कल्याण व सास्कृतिक समिती
८) महिला व बाल कल्याण समिती
९) महसुल समिती

वरील अ.क्र. १ ते ८ समितीचे कामकाजाचे क्षेत्र दिनांक १५.५.९७ च्या महासभा ठराव क्र ६ द्वारे निश्चीत करण्यात आले होते अ. क्र ९ वरील समितीचे कार्यक्षेत्र अद्याप निश्चित करण्यात आले नाही. तरीही या समितीची वारंवार रचना करण्यात येते हे गैरकायदेशिर आहे.

मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० मधील तरतुदी अनुसार महापालिकेस आपल्या विशेष ठरावाद्वारे आपले अधिकार व कर्तव्य यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्य पार पाडण्यासाठी विशेष समित्यांची रचना करता येते परंतू कोणतीही समिती कोणतेही अधिकार व कर्तव्य पार पाडत नाही त्याच्याकडे काहीही कामकाज नसून त्यांना नाहक कर्मचारी पुरविले जातात व अन्य खर्च केले जातात. महापालिकेची आर्थिक स्थिती बिकट असतांना तेथे कर्मचारी नेमणे व इतर खर्च करणे संयुक्तीक वाटत नाही.

त्यामुळे मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०चे पोट कलम ७ मधील तरतूदीनूसार कोणत्याही वेळी विशेष समित्यांचे विर्सजन करता येईल म्हणून महासभेपुढे प्रस्तावित

महासभा ठराव क्र: १६ दिनांकः— २०/०९/२००६

ही महासभा वरील प्रस्तावित नमुद केलेल्या कारणामुळे वर उल्लेखलेल्या ९ (नऊ) समित्यांचे विर्सजन करण्यास मान्यता देत आहे. व त्या प्रयोजनार्थ दिनांक ८.२.२००६ रोजीचा ठराव क्र ७५ दिनांक २९.१०.२००५ रोजीचा ठराव क्र ६३ मध्ये परीणाम स्वरूपात अंशता बदल मान्य करीत आहे.

सदरहु ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे) :—विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

प्रस्तावाची सूचना क्र.३

साधु वासवानी उद्यानाची जागा सौदर्यीकरण व देखभालीसाठी रोटरी क्लब उल्हासनगर यांना विकसन करण्याचा करार रदद् करणे

---

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा. हा प्रस्ताव पुढे ढकलत आहोत.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— हा प्रस्ताव पुढे ढकलु या.

मा. पीठासिन अधिकारी श्री. धनंजय बोडारे:— सदरचा विषय सर्वानुमते कार्यसूची वरुन वगळण्यात येत आहे.

---

विषय क्र. ७ :— साधुवासवानी उद्यानाच्या जागेच्या भागाचे सौदर्यीकरण व देखभालीसाठी रोटरी क्लब उल्हासनगर यांना विकसन करण्याचा करार रदद करणेकामी सन्माननीय पालिका सदस्य श्री. धनजंय बोडारे, श्री. जमनादास पुरस्वानी व श्रीमती जया साधवानी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे) :—विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

प्रस्तावाची सूचना क्रमांक.४

विशेष महासभा ठराव क्रमांक २८ दिनांक ७.८.२००४ रदद करणे कामी सन्माननीय पालिका सदस्य श्री. धनजंय बोडारे, श्री. राजेंद्र चौधरी व श्री. लाल पंजाबी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे

---

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— पास... पास
मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल :— मी तटस्थ आहे.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— सर्व जण पास पास करीत आहेत तर तुम्ही ही पास करा.

**मा.सदस्या श्रीमती सीमा मोकल :–** १० वर्षात पहिल्यांदाच मी अशी महासभा बघत आहे. त्यामुळे तटस्थ राहणे मी उचित समजते.

**मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे) :–** मी हा विषय मतास टाकत आहे. जे सदस्य हा प्रस्ताव पास करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

*३७ मते*

१ श्रीमती जावळे संगिता
२ श्री भुल्लर राजेंद्रसिंह
३ श्री सोनवणे नथु
४ श्री. टेकचदांनी राजु
५ श्रीमती करोतीया मालती
६ श्री. बेहरानी मोहन
७ श्री गायकवाड दिलीप
८ श्री उमाप रामदास
९ श्रीमती बामणकर नंदिनी
१० श्री रोहडा श्यामसुंदर
११ श्रीमती खांडेकर प्रेमा
१२ श्री. टाले प्रमोद
१३ श्री. ठाकुर विनोद
१४ श्रीमती वनवारी मोना
१५ श्री. वनवारी किशोर
१६ श्री. साधवानी मोहन
१७ श्रीमती साधवानी जया
१८ श्री. लुंड गोविंदराम
१९ श्री. रुपचंदानी बच्चाराम
२० श्रीमती माने किरण
२१. श्री. चव्हाण रमेश
२२. श्री. जाधव प्रशांत
२३. श्री. जाधव सुरेश
२४. श्रीमती सुर्वे जयश्री
२५. श्री बोडारे धनंजय
२६. श्रीमती कृष्णानी रेखा
२७. श्री. भालेराव गौतम
२८. श्रीमती वसीटा बेबी
२९. श्री. ठाकुर अशोक
३०. श्रीमती ससाणे लक्ष्मी
३१. श्री म्हस्के अंकुश
३२. श्री. चौधरी राजेंद्र
३३. श्री. मनवानी अन्नु
३४. श्रीमती पंजाबी दिपा
३५. श्री पुरसवानी जमनादास
३६. श्रीमती बठिजा कोमल
३७ श्रीमती माखिजा किरण

**तटस्थ**

श्रीमती सीमा मोकल

**काही सदस्य :–** पास,पास.............

**मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे) :–**सदरचा विषय पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र.८:–** विशेष महासभा ठराव क्र २८ रदद् करणे.

सुचक:– श्री. धनंजय बा. बोडारे.

अनुमोदक:– श्री. राजेद्र शांताराम चौधरी
श्री. लाल पंजाबी

**प्रस्ताव :**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दिनांक ७.८.२००४ रोजीच्या विशेष महासभा ठराव क्र २८ अन्वये '' सवलत करार तत्वावर'' रुपये १०२ कोटीची खर्च करून तयार करण्यात येणारी योजनेचा ठराव पारीत केला होता.

सध्या उल्हासनगरमधील नागरीकांना उल्हासनगर महापालिकेतर्फे प्राथमिक सुविधाही उपलब्ध करून देवू शकत नाही. तसेच जकात खाजगीकरण, कचरा उचलण्याचे खाजगीकरण, हे पुर्वीपासूनच्या खाजगीकरणांच्या माध्यमातून होत असून पाणी पुरवठा ही महापालिकेने नागरीकास पुरविणारी सेवा असल्याने ती सेवाच रहावी त्याचे खाजगीकरण करणे म्हणजे संपुर्ण महापालिकेचे खाजगीकरण दिसते.

तसेच महापालिकेच्या माध्यमातून यापुर्वी जे खाजगीकरण झालेले आहे उदा. बगीचे, टाउन हॉल, जकात खाजगीकरण, कचरा उचलणे याचा महापालिकेस काहीही फायदा झालेला नाही. उलटपक्षी सर्वसामान्यांना त्याचा त्रासच झालेला आहे. तरी सध्याचे परिस्थितीमध्ये सदर पाणी पुरवठा सेवाही सेवाच रहावी ''सवलत करार तत्वावर'' बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर खाजगीकरणाचे बाबतीत पारीत केलेला ठराव रदद् करीत आहे.

पाणी पुरवठा योजना ही महापालिकेने पुरवायची सेवा असल्याने ती जबाबदारी महापालिकेने पार पाडावी

<u>महासभा ठराव क्र: १७</u> <u>दिनांक:—२०/०९/२००६</u>

ही महासभा वरील प्रस्ताव नमुद केलेल्या कारणांमुळे विशेष महासभा ठराव क्र २८ दिनांक ७.८.२००४ रदद् करीत असून पाणी पुरवठा योजनेचे खाजगीकरण न करता पाणी पुरवठा महापालिकेच्या माध्यमातून जास्तीत जास्त सुधारणा करून नागरीकांची सेवा चालू ठेवण्यासाठी प्रस्तावित करीत आहे.

सदरहु ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. पीठासीन अधिकारी (श्री.धनंजय बोडारे)</u> :—विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>प्रस्तावाची सूचना क्रमांक.५</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आरक्षण क्रमांक.५७ व आरक्षण क्रमांक.१०६ वर असलेल्या शैक्षणिक संस्था तांब्यात घेणे कामी सन्माननीय पालिका सदस्य श्री. मोहन बेहरानी, श्री. मोहन साधवानी व श्री. अंकुश म्हस्के यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे

---

*यावेळी मा. पीठासीन अधिकारी श्री. धनंजय बोडारे हे सभागृहातून बाहेर गेले व त्यांच्या जागी श्रीमती जया साधवानी या पीठासीन अधिकारी म्हणुन सर्वानुमते आसनस्थ झाल्या.*

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> पास....पास

*यावेळी मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी सभागृहात प्रवेश केला.*

<u>मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :—</u> महापालिकेचे आरक्षण क्र.५७ व १०६ येथे दोन भुखंड आहेत. या दोन्ही भुखंडावर महापालिकेच्या ईमारती आहेत. यावर कमीत कमी रु. १ कोटी पेक्षा जास्त खर्च केलेला आहे. आपल्या महापौर श्रीमती ज्योती कालानी या तेथे अध्यक्षा आहेत, १९९१ पासुन त्यांनी अजिबात पैसे भरलेले नाहीत, भाडे भरलेले नाही. तेथे करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. ही आपली महापालिकेची मिळकत आहे. आपण त्यांच्या सोबत करारनामा देखिल केलेला नाही. यासाठी मी प्रस्ताव आणला आहे की, तेथील दोन्ही ईमारती महापालिकेला परत केल्या जाव्यात. तेथे प्राथमिक शाळेत जी मुले आहेत तो विभाग ते

सांभाळतील व ईतर विभाग महापालिकेतील शिक्षण मंडळाने सांभाळावेत. तेथील कर्मचा—यांना देखिल महापालिकेत सामावून घ्यावे. श्रीमती ज्योती कालानी यांनी वर्षानु वर्षे तेथे जो करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे याची चौकशी लाचलूचपत विभागा कडून करायला हवी अशी सुधारणा मी प्रस्तावात करु इच्छितो. प्रस्तावात याचा उल्लेख केला जावा. येथे जो भ्रष्टाचार झाला आहे त्याची चौकशी लाचलूचपत विभागाकडून करण्यात यावी. माझे असे निवेदन आहे. मा.महापौरजी मी प्रस्तावात सुधारणा करु इच्छितो शहीद दुनिचंद कालानी ट्रस्टच्या अध्यक्षा श्रीमती ज्योती कालानी व ईतर सदस्यांनी तेथे जो भ्रष्टाचार केला आहे त्याची चौकशीही लाचलूचपत विभागा कडून करण्यात यावी. या सुधारणेसह प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)— या प्रस्तावा बददल आपल्या सर्वाचे काय मत आहे?श्रीमती मोकल आपले काय म्हणणे आहे.

मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल :— मी तटस्थ आहे.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)— मी हा विषय मतास टाकत आहे. जे सदस्य हा प्रस्ताव पास करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

*३७ मते*

१ श्रीमती जावळे संगिता
२ श्री भुल्लर राजेंद्रसिंह
३ श्री सोनवणे नथु
४ श्री. टेकचदांनी राजु
५ श्रीमती करोतीया मालती
६ श्री. बेहरानी मोहन
७ श्री गायकवाड दिलीप
८ श्री उमाप रामदास
९ श्रीमती बामणकर नंदिनी
१० श्री रोहडा श्यामसुंदर
११ श्रीमती खांडेकर प्रेमा
१२ श्री. टाले प्रमोद
१३ श्री. ठाकुर विनोद
१४ श्रीमती वनवारी मोना
१५ श्री. वनवारी किशोर
१६ श्री. साधवानी मोहन
१७ श्रीमती साधवानी जया
१८ श्री. लुंड गोविंदराम
१९ श्री. रुपचंदानी बच्चाराम
२० श्रीमती माने किरण
२१. श्री. चव्हाण रमेश
२२. श्री. जाधव प्रशांत
२३. श्री. जाधव सुरेश
२४. श्रीमती सुर्वे जयश्री
२५. श्री बोडारे धनंजय
२६. श्रीमती कृष्णानी रेखा
२७. श्री. भालेराव गौतम
२८. श्रीमती वसीटा बेबी
२९. श्री. ठाकुर अशोक
३०. श्रीमती ससाणे लक्ष्मी
३१. श्री म्हस्के अंकुश
३२. श्री. चौधरी राजेंद्र
३३. श्री. मनवानी अन्नु
३४. श्रीमती पंजाबी दिपा
३५. श्री पुरसवानी जमनादास
३६. श्रीमती बठिजा कोमल
३७ श्रीमती माखिजा किरण

तटस्थ
श्रीमती सीमा मोकल

काही सदस्य :—पास—पास......

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)— सदरचा विषय पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे. 

☑ **विषय क्र.९: —** उल्हासनगर महानगरपालिकेच्या आरक्षण क्रमांक.५७ व आरक्षण क्रमांक.१०६ वर असलेल्या शैक्षणिक संस्था तांब्यात घेणे

सुचकः— श्री. मोहन बहरानी
अनुमोदकः— श्री. मोहन साधवानी
श्री. अकुश म्हस्के

**प्रस्ताव :—**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आरक्षण क्र ५७ व आरक्षण क्र १०६ हया दोन्ही जागावर विकसित करण्यात आलेल्या इमारती हया महापालिकेच्या मालकीच्या असून उल्हासनगर मधील सर्वसामान्य व गोरगरीब जनतेच्या मुलांना शिक्षणाच्या सोयीसाठी लाखो रुपये खर्च करून त्या ठिकाणी शैक्षणीक इमारती उभारल्या. दोन्ही आरक्षण विकसित करण्या मागचा एकच उद्देश होता की गरीब मुला—मुलींना विनामुल्या शिक्षण प्रदान करणे.

परंतू आपल्या पदाचा गैरवापर करून तत्कालीन नगराध्यक्षांनी या दोन्ही संस्थावर वर संदर्भ दिलेल्या ठरावाव्दारे व भाडेकरार करून सदर संस्थावर बेकायदेशिर कब्जा केलेला असून तो चुकीचा आहे.

आरक्षण क्र ५७ च्या बाबतीत तत्कालीन नगरपालिका ठराव क्र ५२३ दिनांक २४.५.१९९० ला नगरपालिका व संस्था यांच्यामध्ये झालेला भाडेकरार यामधील अटी व शर्तीचे पालन करण्यासाठी संस्थेने काहीही कारवाई केली नसून भाडे करार तेव्हाच संपलेला आहे. व ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही. त्यानंतर दिनांक ७.३.१९९१ च्या ठराव क्र ५८८ (१) हा कायम स्वरूपी हस्तांतरण करण्या बाबतचा ठराव मंजूर करण्यात आला परंतू त्याबाबतही संस्थेकडून आजतागायत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तसेच संस्थेचे पदाधिकारी हेच नगरपालिकेचे किंवा महानगरपालिकेचे मुख्य पदाधिकारी असल्याने पालिकेच्या प्रशासनावर दडपण आणून त्यांना कारवाई करू दिली नाही.

त्यामुळे ठरावाची आजतागायत अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे तो रदद् करण्यात यावा व भाडेकरार केव्हाच संपुष्ठात आल्यामुळे तो ग्राहय धरता येत नाही.

त्याचप्रमाणे आरक्षण क्र १०६ बाबत नगरपालिकेने ठराव क्र ५६९ दिनांक २१.१२.१९९० पारीत केला त्यानंतर दिनांक १६.५.१९९१ नुसार भाडे करार करण्यात आला या दोन्ही बाबींची पुर्तता संस्थेचे वतीने न करताही दिनांक २०.१२.२००० ला महासभा ठराव क्र २९ नुसार सदर संस्थेला पुढील ३० वर्षाच्या कालावधी करीता इमारती भाडे तत्वावर देण्याचे मंजूर करण्यात आले परंतू त्याही ठरावाची अंमलबजावणी आजतागायत होवू शकलेली नाही.

सदर ठरावाद्वारे भाडे निश्चित करण्या करीता महापालिकेच्या अधिका—यांची नेमणूक केली होती. परंतू नगराध्यक्षा तसेच सध्याच्या महापौर हयाच सदर संस्थेच्या मुख्य विश्वस्त असल्याने त्यांच्या दबावामुळे भाडे निश्चित होवू शकले नाही. तसेच त्यांनी पदाचा गैरवापर करून महानगरपालिकेकडे नाममात्र १ रु. भाडयाने मागणी केलेली आहे. सदर बाब चुकीची असून संस्थेचा मुख्य पदाधिकारीही पालिका सदस्या असल्याने मुंबई प्रातिक अधिनियम कलम १० अन्वये चौकशी करून कार्यवाही करावी.

आता पर्यत भाडे निश्चित न केल्यामुळे महापालिकेचे प्रचंड आर्थिक नुकसान झालेले असून त्यास जबाबदार अधिका—यावर कारवाई करावी. शासनाची मान्यता होणे आवश्यक असतांना ती घेतलेली नाही १९५२ चे मुंबई नगरपालिका कायदयाचे कलम ९२ (३) नुसार नगरपालिका किंवा महानगरपालिकेने तयार केलेल्या वास्तू किंवा संस्था हया लोकोपयोगी असाव्यात परंतू सदर संस्थेने प्रचंड प्रमाणात देणग्या घेवून विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो, त्यावरही महापालिकेचे काही नियंत्रण नाही, गोरगरीब जनतेला शिक्षण घेण्यासाठी महापालिकेच्या पैश्यातून तयार करण्यात आलेली संस्था आपल्या पदाचा गैरवापर करून आपल्या ताब्यात घेवून त्या ठिकाणी दरवर्षी लाखो रुपये वसूल केले जातात.

दोन्ही संस्था बाबत पारीत केलेले ठराव तसेच भाडे करार यांची अंमलबजावणी झालेली नसल्याने वरील ठराव रदद् करून, संस्था महापालिकेने ताब्यात घेवून, अधिका—यांच्या बेजबाबदारपणामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले असल्यामुळे संबधित अधिका—यावर कारवाई करावी तसेच लोकप्रतिनिधीनी सदर संस्थेवर राहुन प्रत्यक्ष सहभागाबदद्ल कलम १० नुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

वरील नमुद प्राथमिक शाळा ही महापालिकेच्या शिक्षण मंडळाअर्तगत चालवावी व माध्यमिक शाळा व महाविद्यालय हे शिक्षण समिती मार्फत चालू ठेवून विद्यार्थी व शिक्षक तसेच इतर कर्मचारी यांच्या सहया महापालिकेत घेण्यास प्रस्तावित करीत आहे.

**महासभा ठराव क्रः१८** **दिनांकः—२०/०९/२००६**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे बेजबाबदार अधिकारी व पदाचा गैरवापर करणा–या पदाधिका–यावर कार्यवाही करणेच्या तसेच आरक्षण क्र ५७ व आरक्षण क्र १०६ वर असलेल्या संस्था, कर्मचा–यासह महापालिकेच्या ताब्यात घेवून चालविण्याचे प्रस्तावित करीत आहे. तसेच सदर ठरावाची अंमलबजावणी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील महासभेत सादर करणेचे निर्देश मा. आयुक्त यांना देत आहे. तसेच या प्रकरणात झालेल्या भ्रष्टाचाराची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन चौकशी करण्यात यावी असेही निर्देश देत आहे.

सदरहु ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. पीठासिन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)–</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ <u>प्रस्तावाची सूचना क्रमांक.६</u>

अस्थायी पदांवर नेमणूक केलेल्या कर्मचा–यांना स्थायी पदांवर सामावुन घेणे व अनुषंगिक फायदे देण्याकामी सन्माननीय पालिका सदस्य श्री.धनंजय बोडारे, श्री. लाल पंजाबी व श्री. वनवारी किशोर यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे

---

<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :–</u> हा प्रस्ताव आम्ही कर्मचा–यांच्या हितासाठी दिला आहे. आमचा १९९६ पासुनचा जो कर्मचारी वर्ग आहे, ज्यांनी रोजंदारीवर काम केले आहे त्यांचाही पदोन्नतीसाठी विचार केला जावा. महापालिकेच्या स्थानिक कर्मचा–यांचा या मध्ये समावेश केला जावा. त्यांना आधी पदोन्नती दयावी. तसेच त्यांची सेवाज्येष्ठताही गणली जावी.

<u>मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)–</u> तुम्ही जे काही सांगितले आहे ते आम्हाला मान्य आहे. महापौर म्हणुन मी आपला प्रस्ताव मान्य करीत आहे. या प्रस्तावा बददल आपल्या सर्वाचे काय मत आहे?श्रीमती मोकल आपले काय म्हणणे आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल :–</u> मी तटस्थ आहे.

<u>मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)–</u> मी हा विषय मतास टाकत आहे. जे सदस्य हा प्रस्ताव पास करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

*<u>३७ मते</u>*

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती जावळे संगिता | २१. | श्री. चव्हाण रमेश |
| २ | श्री भुल्लर राजेंद्रसिंह | २२. | श्री. जाधव प्रशांत |
| ३ | श्री सोनवणे नथु | २३. | श्री. जाधव सुरेश |
| ४ | श्री. टेकचदांनी राजु | २४. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ५ | श्रीमती करोतीया मालती | २५. | श्री बोडारे धनंजय |
| ६ | श्री. बेहरानी मोहन | २६. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| ७ | श्री गायकवाड दिलीप | २७. | श्री. भालेराव गौतम |
| ८ | श्री उमाप रामदास | २८. | श्रीमती वसीटा बेबी |
| ९ | श्रीमती बामणकर नंदिनी | २९. | श्री. ठाकुर अशोक |
| १० | श्री रोहडा श्यामसुंदर | ३०. | श्रीमती ससाणे लक्ष्मी |
| ११ | श्रीमती खांडेकर प्रेमा | ३१. | श्री म्हस्के अंकुश |
| १२ | श्री. टाले प्रमोद | ३२. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १३ | श्री. ठाकुर विनोद | ३३. | श्री. मनवानी अन्नु |

१४ श्रीमती वनवारी मोना
१५ श्री. वनवारी किशोर
१६ श्री. साधवानी मोहन
१७ श्रीमती साधवानी जया
१८ श्री. लुंड गोविंदराम
१९ श्री. रुपचंदानी बच्चाराम
२० श्रीमती माने किरण

३४. श्रीमती पंजाबी दिपा
३५. श्री पुरसवानी जमनादास
३६. श्रीमती बठिजा कोमल
३७ श्रीमती माखिजा किरण

तटस्थ
श्रीमती सीमा मोकल

काही सदस्य :—पास—पास......

मा. पीठासिन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ विषय क्र.१० :— अस्थायी पदावर नेमणूक केलेल्या कर्मचा—यांना स्थायी पदावर सामावून घेणे व अनुषांगीक फायदे देणे

सुचक :— श्री.धनंजय बोडारे

अनुमोदक :— श्री. लाल पंजाबी
श्री. किशोर वनवारी

प्रस्ताव :

महाराष्ट्र शासनाचे दिनांक २१/१०/१९९६ चे शासन निर्णयान्वये तत्कालीन उल्हासनगर नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत करण्यात आले, रुपांतर झाल्यानंतर इतर महानगरपालिकेतील आस्थापनावरील आवश्यक पदे व इतर बाबी लक्षात घेऊन उल्हासनगर महानगरपालिकेसाठी देखील आस्थापना सुची तयार करण्यात आली. तयार करण्यात आलेल्या या आस्थापना सुचीवर नव्याने पदे निर्माण करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले. सदरहू पदे प्रस्तावित करण्याच्यामागे महानगरपालिका आस्थापना व १० ते १५ वर्षापासून रोजंदारी कार्यरत कर्मचा—यांना सामावून घेण्याचा प्रमुख उद्देश होता. त्या आशयाची प्रत सोबत जोडत आहे. उल्हासनगर नगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये विविध पदांवर १० ते १५ वर्षापासून रोजंदारीवर कार्यरत असणा—या कर्मचा—यांना उल्हासनगर महानगरपालिका स्थापनेनंतर महापालिकेच्या सेवेत कायम स्वरुपी सामावून घेणे साठी प्रशासकीय ठराव क्र.१४ दिनांक २/११/१९९६ व प्रशासकीय ठराव क्र.२५ दिनांक १३/१२/१९९६ अन्वये नविन पदे निर्माण करुन शासन मंजूरीच्या अधिन राहून सहा महिन्याचा परिविक्षाधिन कालावधी देऊन कायम वेतन श्रेणीवर नेमणूका दिल्या होत्या.

महापालिकेने शासनाकडे मंजूरीस पाठविलेल्या आस्थापना सुचीस शासनाने शासन निर्णय क्र. उमपा/१२९८/२०३०/प्र.क्र./२५९/९८ नवि—२३ दिनांक १३ जून २००२ अन्वये मंजूरी दिली आहे. शासनाने आस्थापना सुचीस मंजूरी दिल्यानंतर या पदावर अस्थायी कर्मचा—यांना स्थायी पदावर सामावून घ्यावयास पाहिजे होते. प्रत्यक्षात तसे न करता या कर्मचा—यांना अस्थायी पदावर कार्यरत ठेवून नव्याने मंजूर होवून आलेल्या पदांवर भरती करण्यात आलेली आहे. अनुशेषांतर्गत स्थायी पदावर भरती झालेल्या कर्मचा—यांचा परिविक्षाधिन कालावधी पूर्ण झाला असल्याने ते कर्मचारी आता पदोन्नतीसाठी पुढे येत आहेत. त्यामुळे येथील अस्थायी पदावर कार्यरत मागासवर्गीय कर्मचा—यांवर मात्र अन्याय झाला असून एकीकडे अनुशेष भरती व दुसरीकडे अनुशेषांतर्गत मोडणा—या कर्मचा—यांवर अन्याय असे विपरीत परिणाम झाले आहेत. यामुळे गेल्या २०—२५ वर्षापासून महापालिकेच्या सेवेत असलेले व गेल्या १० वर्षापासून अस्थायी पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा—यांच्या पदोन्नतीच्या संधी कुंठीत झाल्या आहेत. या कर्मचा—यांपैकी काहि कर्मचारी मागील महिन्यात सेवानिवृत्त झाले आहेत. अस्थायी पदावरील नेमणूका व अपूरा सेवाकालावधी यामुळे सदर कर्मचा—यांना सेवानिवृत्ती वेतन व अंशदानास मुकावे लागण्याची शक्यता निर्माण झाली. त्यामुळे सुमारे ७०० ते ८०० कर्मचा—यांचे भविष्य अंधारमय झाले आहे. कल्याण—डोंबिवली महानगरपालिका व इतर महापालिकेत अस्थायी पदावर कार्यरत

असणा—या कर्मचा—यांना महापालिकांनी प्राधान्याने स्थायी पदावर कायम सेवेत सामावून घेतले असल्याचे समजते. तरी सदर परिस्थिती शासनापुढे निदर्शनास आणून त्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत अस्थायी पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा—यांना यास्तव सध्या रिक्त असलेल्या मंजूर स्थायी पदावर सामावून घ्यावे व सेवानिवृत्ती वेतनासाठी त्यांची रोजंदारीवरील सेवा ग्राहय धरणे आवश्यक असून नियुक्ती प्राधिकारी यानात्याने महासभेपूढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: १९ दिनांक:— २०/०९/२००६

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेली कारणे लक्षात घेवून उल्हासनगर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्यानंतर तत्कालिन प्रशासक/ आयुक्त यांनी विविध प्रशासकीय ठरावाद्वारे अस्थायी पदावर नेमणूक केलेल्या कर्मचा—यांना स्थायी पदावर सामावून घेणे व सेवानिवृत्ती वेतनासाठी त्यांची रोजंदारीवरील सेवा ग्राहय धरणेकामी शासनाच्या मंजूरीच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

सदरहु ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)— महासभा विषय क्रमांक.११ वाचुन दाखवतात

---

⇨ प्रस्तावाची सूचना क्रमांक.७

स्थायी समितीचे अधिकार निश्चित करणेकामी सन्माननीय पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे, श्री. दिलीप गायकवाड व श्री. लाल पंजाबी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

आपल्या सर्वाचे या बाबत काय म्हणणे आहे?

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— स्थायी समितीला १० लाखा पर्यतचे अधिकार दयावेत. त्यानंतर महासभेला त्या वरील रक्कमेचे अधिकार दयावेत . सर्व विषय महासभेत यायला हवेत जेणे करुन सभागृह त्यावर निर्णय घेवु शकेल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा.महापौर महोदया, मी बोलू इच्छितो. गेल्या आठ वर्षा पासुन एकच व्यक्ती स्थायी समितीचे सभापती आहेत. स्थायी समिती मध्ये जे निर्णय घेतले जातात त्याचे विपरीत परिणाम या महापालिकेवर आर्थीक दृष्टया होत आहेत. त्यांचा परिणाम पुर्ण उल्हासनगर शहराला भोगावे लागत आहेत. स्थायी समिती मध्ये चुकीच्या प्रकारे विषय आणले जात आहेत. वर्षानुवर्षे रस्त्यावर खड्डे पडले होते परंतू यांची झोप उडाली नव्हती. जेव्हा पुर्ण उल्हासनगर शहर खड्डयात गेले तेव्हा लोकांना दाखवण्यासाठी विषय आणला. भ्रष्टाचाराचे जे विषय आहेत ते स्थायी समिती मध्ये येतात. ते थांबविण्यासाठी स्थायी समितीला जे अमर्याद अधिकार दिले आहेत ते कमी करणे आवश्यक आहे. कारण मागील वर्षाच्या एप्रिल महिन्यापासुन तुम्ही जर महासभेची सूचना पाहिली तर दिसून येइल की दोन तीन साधारण विषय असतात, ते देखिल बदली, नियुक्ती, पदोन्नती हेच असतात. याशिवाय दुसरे कोणतेही विषय नसतात. यामुळे आमच्या सर्वाची ईच्छा अशी आहे की, स्थायी समितीचे अधिकार कमी करुन महासभे मध्ये विषय यायला हवेत. त्यांना फक्त १० लाखा पर्यतचे अधिकार देण्यासाठी आम्ही अनुमती देत आहोत.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)— तुमचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे तसेच मी सांगु इच्छिते की, माझ्या पुर्वी येथे श्रीमती ज्योती कालानी येथे महापौर पदावर बसल्या होत्या. त्यांनी भ्रष्टाचारावर भाषण केले, ब—याच गोष्टी सांगीतल्या तसेच जनतेला येथे बसुन आवाहन केले की, रस्त्यावर जावुन नगरसेवकांचे तोंड काळे करावे. त्यांना किती संताप येत होता ते मी बघत होते. आज लोक जागृत झाले आहेत, नगरसेवक जागृत झाले आहेत. याचा परिणाम म्हणुनच आज हा.....

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** मा.महापौर महोदया, या ठरावा व्दारे आम्ही महासभेचा अथवा स्थायी समितीचा अपमान करु इच्छित नाही. त्यामुळे आजच्या महासभेत हा विषय आम्ही वगळू इच्छितो. विषय आणला ही चुक आहे परंतू ही चुक स्थायी समिती सभापतीच्या, पदाधिका–यांच्या निदर्शनास आणण्यासाठी......

**मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)–** मी तुमचे मत घेते. मी हे सांगु इच्छिते की आज या खुर्चीवर बसुन त्यांनी भाषेचा जो उपयोग केला आहे त्यामुळे या खुर्चीच्या महानतेला देखिल धक्का लागला आहे. असे माझे म्हणणे आहे, तुमचे काय म्हणणे आहे ते सांगा.

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :–** हा विषय वगळण्यात यावा.

**मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)–** सर्वाचे मत असे आहे की, हा विषय वगळण्यात यावा त्यामुळे हा विषय सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

**काही सदस्य :–**विषय वगळण्यात यावा.

**मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)–** सदरचा विषय सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे. .✂

---

⌧ महासभा विषय क्रमांक.११, प्रस्तावाची सूचना क्रमांक.७

स्थायी समितीचे अधिकार निश्चित करणेकामी सन्माननीय पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे, श्री. दिलीप गायकवाड व श्री. लाल पंजाबी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे

---

**मा. सदस्य बच्चाराम रुपचंदानी :–** मा. महापौर महोदयाजी, ज्या प्रकारे आयुक्त सभा सोडून निघुन गेले हे अतिशय दु:खदायक आहे. मला असे वाटते की, आपण सर्वानी त्यांचे दालनात जावु या. ते सत्तापक्षाच्या मर्जी प्रमाणे काम करतात असे वाटते. यामुळे माझे सर्वांना निवेदन आहे की, आताचा आता आपण आयुक्तांना भेटू या, आपण त्यांना आधीच सांगितले होते की, सभेत असे घडणार आहे. यावरुन आयुक्तही त्यांना सामील आहेत असे वाटते. त्यामुळे आताच्या आता आपण त्यांना भेटू या.

**मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)–** आयुक्त साहेबांनी बहुमताचा अपमान केला आहे. यामुळे आपल्या सर्वाच्या स्वाक्षरीनिशी मंत्रालयात सचिवांना पत्र देवु व भेटू. तसेच जी काही कायदेशिर कारवाई करता येवू शकेल ती करु. कृपया सर्वानी राष्ट्रगितासाठी उभे राहावे.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–** आयुक्तांची ही वागणुक पक्षपातीपणाची आहे. ते एकतर्फी कामकाज करत असल्याने आम्ही त्यांची निंदा करतो.

**मा. पीठासिन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)–** कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

⚐ जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६–२० वाजता मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२०/१०/२००६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/१०/२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/१०/२००६ रोजी सायंकाळी ४—०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश

२) मा. उपमहापौर :—श्री. तलरेजा विनोद चंदीराम

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती जावळे संगिता रमेश | ४०. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ४. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | ४१. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ४२. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४३. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ४४ | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| ८. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | ४५. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४६. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्रीमती मोकल सीमा चंदाराम | ४७. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ११. | श्री. गायकवाड दिलीप | ४८. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४९. | श्री. भालेराव गौतम यशवंत |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ५०. | श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५१. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५२. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५३. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५४. | श्री. मनवानी अन्नु (सनमुख) |
| १८. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५५. | श्रीमती पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्री. रोहरा श्यामसुंदर जानीलाल | ५६. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५७. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| २१. | श्रीमती गुप्ता अनिता धर्मेंद्र | ५८. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| २२. | श्री. पवार नाना आनंदा | ५९. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| २३. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ६०. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| २४. | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ६१. | श्री. लबाणा होशियारसिंह हरिसिंह |
| २५. | श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा | ६२. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| २६. | श्री. निकम शांताराम ओंकार | ६३. | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| २७. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६४. | श्रीमती छाब्रिया भारती पहलाज |
| २८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६५. | श्री. बठीजा संजय रामचंद्र |
| २९. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६६. | श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश |
| ३०. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६७. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३१. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ६८. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| ३२. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६९. | श्रीमती दासानी मिनु राजकुमार |
| ३३. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७०. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३४. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ७१. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३५. | श्री. जेसवानी सतरामदास फतनदास | ७२. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३६. | श्रीमती खिलनानी भावना रवी | ७३. | श्री. वधारिया राजेश नानिकराम |
| ३७. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल | | |
| ३८. | श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग | | |
| ३९.. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री.महेद्र मुलचंदाणी २. डॉ. (श्रीमती) साधवानी जया
३.श्री. लुंड गोविंदराम डोलुमल ४. श्रीमती माने किरण बाळकृष्ण ५. श्री. पाटील विश्वनाथ गौतम ६. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, ७. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ८. श्री. माखिजा हरदास सन्मुखदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

मा.आयुक्त श्री. सदाशिव कांबळे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन सभेस उपस्थित होते. तसेच खाली दर्शविलेले अधिकारी सभेस हजर होते.

४३. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
४४. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
४५. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
४६. श्री. एस.के.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
४७. श्री. बी.सुंदरेश्वरन, प्रभारी शहर अभियंता
४८. श्री.मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग
४९. श्री आर.आर.सावकारे, कार्यकारी अभियंता, (पापु)
५०. डॉ. के.आर खरात, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
५१. श्री एस.बी.सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
५२. श्री.सा.अ. पठाण,सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी
५३. श्री. अ.म.काटे, प्रभाग अधिकारी
५४. श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी
५५. श्री एस.बी.गायकवाड, प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ)
५६. डॉ. राजा रिझवानी, वैदयकिय अधिकारी
५७. श्री.बी.एम.नितनवरे, प्रभारी प्रभाग अधिकारी
५८. श्री तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक
५९. श्री. आर.एस.गिते, अग्निशमन अधिकारी

सायंकाळी ४–१० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांच्या मातोश्री श्रीमती जसोदाबाई देवनदास पंजाबी यांचे दिनांक २१.९.२००६ रोजी निधन झाले तसेच सन्माननिय सदस्य श्री. प्रमोद टाले यांचे वडिल श्री. नामदेवराव टाले यांचे नुकतेच काही दिवसांपूर्वी निधन झाले त्याच प्रमाणे उल्हासनगर कॅम्प क्र.१ येथील एक सामाजिक कार्यकर्ते श्री. रामसिंग सोनावणे या तीघांचे निधन झाले आहे मला असे वाटते की, सभागृहाने त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :–श्री दिलीप लालवानी

शोक प्रस्ताव

उल्हासनगर महानगरपालिकेतील स्वीकृत पालिका सदस्य श्री.लाल पंजाबी यांच्या मातोश्री श्रीमती जसोदाबाई देवनदास पंजाबी यांचे दिनांक २१.९.२००६ रोजी निधन झाले तसेच उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक ९(क)चे विद्यमान नगरसेवक श्री. प्रमोद टाले यांचे वडिल श्री. नामदेवराव टाले यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. तसेच उल्हासनगर कॅम्प क्र.१ येथील सामाजिक कार्यकर्ते श्री. रामसिंग सोनावणे यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. १९ अ</u> <u>दिनांक:—२०/१०/२००६</u>

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्रीमती जसोदाबाई देवनदास पंजाबी, श्री. नामदेवराव टाले, व श्री. रामसिंग सोनावणे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

१) **प्रश्नोत्तरे**

यावेळेस सायंकाळची ४.१५ मिनीटे झाली आहेत.

<u>मा. महापौर :—</u> उदया पासुन दिवाळी सुरु होत आहे आपणा सर्वाना मी दीपावलीच्या शुभेच्छा देते.

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—</u> प्रश्न क्र. ४९३ हा श्री. मोहन बेहरानी यांचा आहे.

? <u>प्रश्न क्र. ४९३ (अ) :—</u>सिन्स व्हेन शहीद दुनिचंद कालानी मेमोरीयल ट्रस्ट ॲट साईट नं. ५७ ॲन्ड शहीद दुनिचंद कालानी स्कुल ॲट साईट नं. १०६ हॅज बीन गीव्हन ऑन लीज

(अे) टू हुम इट हाजबीन गीव्हन ?

(बी) व्हॉट ईज द पीरेड ऑफ लिज?

(सी) व्हेदर ॲग्रीमेंट हॅजबीन एक्झेक्युटेंड फॉर सच लीज, हाउ मेनी टाईमस ॲग्रीमेंट हाजबीन रिनेव्हड और नॉट?

(डी) व्हॉट ईज द रेंट फिक्सड ॲन्ड हाउमच रेंट ईज डिपॉझिटेड इन कारर्पोरेशन

(इ)व्हेदर अेनी कॉन्सीलर इज पार्ट ऑफ दी इन्स्टीटयुट इन शहीद दुनिचंद कॉलेज ट्रस्ट.

(एफ) व्हेदर रिझॉलुशन नंबरस ५६९ दिनांक २१.१२.१९९०, ५८८ दिनांक ७.३.१९९१ ॲन्ड रिझॉलुशन नंबर २९ दिनांक २०.१२.२००० आर इम्पेमेंटेड और नॉट? इफ एस, व्हॉट इज द रेंट फीक्सड ॲन्ड हाउ मच रिक्व्हरड ?

(जी) इफ नो प्रोपर रेंट इज रिक्व्हरड हु आर द ऑफिसर रिसपॉन्सीबल फॉर द नॉन रिक्व्हरी ॲन्ड लॉस टू द कारर्पोरेशन

<u>उत्तर :—</u> (अे)साईट क्र.५७ व साईट क्र.१०६ शहीद दुनिचंद कलानी मेमोरीयल ट्रस्ट या संस्थेस सर्वसाधारण सभा ठराव क्र.५८८ (१)दिनांक ७.३.१९९१ व महासभा ठराव क्र.५६९ दिनांक २९.१२.१९९० नुसार देण्यात आलेले आहे.

(बी)साईट क्र.५७ कायमस्वरुपी व साईट क्र.१०६, ३० वर्षे कालावधी करीता भाडेपटटयाने देयात आलेले आहेत.

(सी) साईट क्र.५७ चा १६ ऑगस्ट १९९० मध्ये करार करण्यात आलेला आहे व साईट क्र.१०६ चा १०.५.१९९१ मध्ये करार करण्यात आलेला आहे त्यानंतर करारांचे नुतनिकरण करण्यात आलेले नाही.

(डी) साईट क्र.५७ कायमस्वरुपी सर्वसाधरण सभा ठराव क्र.५८८(१) दि.७.२.१९९१ अन्वये कायमस्वरुपी देण्यात आलेली आहे. साईट क्र.१०६ चे भाडे बाबत समिती गठण करणेत आलेली असुन समितीचा अहवाल अप्राप्त आहे.

(इ)सदर बाबत शहीद दुनिचंद कालानी मेमोरीयल अ्रस्ट या संस्थेकडून माहिती मागविणे बाबत कार्यवाही चालु आहे.

(एफ) सर्वसाधारण सभा ठराव क्र.५८८(१) दि.७.२.९१ नुसार साईट क्र.५७ बाबत भाडे आकारणी व करारनाम्याबाबत ठरावत काहीही नमुद केलेले नाही जागा कायमस्वरुपी दिलेली असल्याने मालमत्ताकाराची सन २००४ पर्यतची रक्कम संस्थेने भरणा केली आहे.

(जी) याबाबत भाडे निश्चिती केली नसल्याने कार्यवाही करण्यात आलेली नाही. परंतु नियमानुसार भाडे वसुली बाबत कारवाई करण्यात येईल.

**मा. उप महापौर श्री. विनोद तलरेजा यांनी सभागृहात प्रवेश केला.**

साईट क्र.५७ व साईट क्र.१०६ शहीद दुनिचंद कलानी मेमोरीयल ट्रस्ट या संस्थेस सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५८८ (१)दिनांक ७.३.१९९१ व महासभा ठराव क्र.५६९ दिनांक २९.१२.१९९० नुसार देण्यात आलेले आहे.

**मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी** :— माझा प्रश्न दुनिचंद कालानी कॉलेज आणि मेमोरीयल ट्रस्ट बाबतचा आहे. या संस्थेस महापालिकेकडून दोन भुखंड देण्यात आलेले आहेत याबाबतीत मला जे उत्तर दिले आहे ते बरोबर नाही. ज्या अधिका—यांने हे उत्तर दिले आहे त्या अधिका—यास व्यासपिठावर बोलविण्यात यावे त्यास मी काही प्रश्न विचारु इच्छितो.

सर्वात प्रथम दुनिचंद कालानी मेमोरीयल ट्रस्ट जी आहे तीच्या सभापती श्रीमती ज्योती कालानी हया आहेत व त्याच श्रीमती ज्योती कालानी सभागृहात महापौरांच्या आसनावर आसनस्थ आहेत. त्यांचा या प्रश्नांशी थेट संबध असल्याने त्यांच्या अध्यक्षतेखाली या प्रश्नांवर चर्चा होवू नये म्हणुन त्यांनी या प्रश्नांच्या चर्चेच्या वेळी व्यासपिठा वरुन खाली येवुन बसावे.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिह खेमाणी :—** मी याचा विरोध करतो कारण जो प्रश्न आहे त्यांच्याशी संबधित जे कोणी अधिकारी आहेत ते त्याचे उत्तर देतील त्यामध्ये मा. महापौरांनी बोलायची काही आवश्यकता नाही. संबधित अधिकारी या प्रश्नांचे उत्तर देतील आणि ते सुध्दा जी वस्तुस्थिती असेल त्याच्याच आधारावर ते उत्तर देतील. येथे कोणी कथाकथन करणार नाही. यासाठी मी असे निवेदन करतो की, मा. महापौरांनी आपल्या आसनावर आसनस्थ रहावे.

**मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी:—** श्री. दर्शनसिंग खेमाणी यांचेकडून मी माझ्या प्रश्नांचे उत्तर मागितलेले नव्हते. मी मा. महापौरांकडून उत्तर मागीतले होते. मी महापौरांना हे विचारु इच्छितो की, दुनिचंद कालानी मेमोरीयल ट्रस्टच्या त्या सभापती आहेत. त्या ट्रस्टशी संबधित येथे हा प्रश्न आहे जो पर्यत या प्रश्नांवर चर्चा चालू आहे तो पर्यत त्यांनी या सभागृहात पीठासीन अधिकारी म्हणुन काम पाहु नये. याबाबतीत महापौरांचे काय म्हणणे आहे ते त्यांनी स्पष्ट करावे.

**मा.महापौर :—** श्री. सावंत साहेब आपण उत्तर दया.

**मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :—** _ मी मा.महापौरांना प्रश्न विचारत आहे

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—** आपला प्रश्न आहे त्याचे उत्तर देण्या साठी अधिकारी उभे आहेत. पुन्हा पुन्हा प्रश्न विचारण्याची काय आवश्यकता आहे?

मा. महापौर :– आपल्या प्रश्नांस संबधित अधिकारी उत्तर देईल. दुसरी गोष्ट अशी की हे प्रकरण आपणच न्यायालयात घेवुन गेला आहात. व शासनाकडे प्रलंबित आहे त्यामुळे जो पर्यत निर्णय येत नाही तो पर्यत या विषयावर अधिक भाष्य करता येत नाही.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– शासनाकडे कोणते प्रकरण प्रलंबित आहे?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– मागील महासभेत हा विषय सभासुचनेवर आला होता ते प्रकरण सध्या प्रलंबित आहे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– मागील महासभेत?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– मागील महासभेत अशासकीय प्रस्तावाच्या रुपाने हा प्रस्ताव महासभे पुढे आला होता आणि सध्या तो प्रस्ताव प्रलंबित आहे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी:– _ जो अशासकीय प्रस्ताव आला होता त्याबाबतीत आपले काय म्हणणे आहे.

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– त्या प्रस्तावावर निर्णय होणे अदयाप बाकी आहे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी:– त्याबाबतीत महासभेत काय निर्णय झाला होता?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– जो काही निर्णय झाला होता त्यानंतर ........

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– निर्णय काय झाला होता? महासभेने त्या अशासकीय प्रस्तावा बाबत काय निर्णय दिला होता.

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– महासभेने असा निर्णय दिला होता की, ते दोन्ही भुखंड ताब्यात घेतले जावेत.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :– मला वाटते की, हा प्रश्नांशी संबधित मुद्दा आहे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– मी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत आपण जे उत्तर दिले आहे त्याबाबतीत मी आपणास विचारु इच्छितो की, आपण असे म्हटले आहे की, भुखंड क्र.५७ कायम स्वरुपी दिला आहे.

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– बरोबर

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी:– आपण म्हटले आहे?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– बरोबर

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी:– कायम स्वरुपी देण्यासाठी...... , कायम स्वरुपी देण्यासाठी मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियमाच्या कोणत्या कलमाचा आपण आधार घेतला आहे ते जर सांगा.
मा.महापौर :– मी आपणास हे विचारु इच्छिते की, जे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे त्यावर आपण चर्चा करु शकतो का? आपण कायदेशिर उत्तर दया, आपण चर्चा करु शकतो का?

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी:– त्यामध्ये काय निर्णय झाला आहे?

मा.महापौर :– हे प्रकरण न्यायालयात आहे आणि प्रलंबित आहे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी:– श्री.ठाकुर बेहरानी यांचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असताना आपण ते चर्चेसाठी का घेतले होते?
मा.सदस्य श्री.धनंजय बोडारे :– मा. महापौर महोदया न्यायालयात असे प्रकरण गेले आहे की, ते अशासकीय प्रस्ताव व त्या सभेचे कामकाज कायदेशिर आहे कि बेकायदेशिर आहे याबाबतचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. याबाबत काय करायचे आहे त्याबाबत न्यायालयाचा कोणताही निर्णय नाही. ठरावाच्या कायदेशिरते बाबत, बेकायदेशिरते बाबत प्रकरण न्यायालयात गेले आहे.

मा.महापौर :– अशासकीय प्रस्ताव ते कायदेशिर आहेत की बेकायदेशिर याबाबत न्यालयात प्रकरण प्रलंबित आहे यासाठी हे प्रकरण प्रलंबित ठेवावे याबाबत न्यायालयाकडून निर्णय आल्या नंतर हे प्रकरण आम्ही संलगपणे घेवु

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी:– आपण हे मान्य करता का की, अशासकीय प्रस्ताव पारीत झाले आहेत?

मा.महापौर :– ते बेकायदेशिर आहेत ते त्याच दिवशी मी रद्द केले आहेत आपण न्यायालयात गेला आहात याबाबतीत न्यायालय निर्णय देईल.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– ते कोणी रद्द केले आहेत?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– हा जो प्रश्न आहे तो अशासकीय प्रस्तावांशी संबधित आहे व ते प्रकरण उच्च न्यायालात प्रलंबित आहे. त्यावर चर्चा कशी करणार?

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– त्यांच्याशी संबधित प्रकरण नाही. हा प्रश्न त्या अगोदर पासुन प्रलंबित आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– हे प्रकरण अशासकीय प्रस्तावांचा एक भाग आहे

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– नाही नाही त्याचाच एक भाग असे काही नाही आपण चुकीचे उत्तर देत आहात. मी अधिका–यास विचारु इच्छितो की, आपण हे जे मला उत्तर दिले आहे की तो भुखंड कायम स्वरुपी दिला आहे. असा ठराव झाला आहे. आपण होय किंवा नाही अशा शब्दामध्ये उत्तर दया.

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– होय

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– कायम स्वरुपी देण्याचा ठराव झाला आहे? कोणत्या कायदयाच्या कोणत्या कलमा नुसार आपण तो भुखंड कायम स्वरुपी दिला आहात? आपण तो कायदा सांगा.

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ नुसार

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– कलम कोणते?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– ९२(२)

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– कलम ९२(२) आपण वाचून दाखवा.

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– कलम ९२ हे जे आहे ते हस्तांतरणाच्या बाबतीत आहे.

कोणत्याही नगरपालिकेने राज्य शासनाच्या मंजूरी शिवाय आपली स्थावर मालमत्ता हस्तांतरीत करता कामा नये. या कलमाचा भाग .२ मधे अशी तरतूद आहे की, एकुण पालिका सदस्यांच्या २/३ इतक्या संख्येने सभेत मंजुर झालेला पालिकेचा ठराव अशा हस्तांतरणाच्या प्रस्तावांशी जोडण्यात आला पाहिजे आणि तो शासनाने केलेल्या नियमांशी विसंगत असता कामा नये.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— शासनाकडे पाठविला पाहिजे, आपण तो शासनाकडे पाठविला होता का?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :— या प्रकरणातील संचिका पाहिल्या नंतर असे दिसून येते की, शासनाकडे प्रस्ताव पाठविला नाही.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— शासनाकडे पाठविला नाही मग भुखंड कायम स्वरुपी कसा दिला?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :— ठराव जो झाला आहे तो कायम स्वरुपी देण्या बाबत झालेला आहे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— कायम स्वरुपी देण्या बाबत ज्या कलमा मध्ये तरतुद आहे ते कलमच असे म्हणत आहे की, सदरचा भुखंड कायम स्वरुपी देण्या बाबत ठराव झाल्या नंतर त्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे जाईल, शासनाकडे आपण प्रस्ताव पाठविला नाही तर तो ठराव रदद झाला किंवा नाही त्या ठरावाची अंमलबजावणी झाली किंवा नाही ते मला सांगा.

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :— रद्द होणार नाही परंतू त्यामध्ये काही त्रुटी राहतात.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— अंमलबजावणी झाली नाही.

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :— जी पूर्तता करावयास पाहीजे होती शासनाकडे प्रस्ताव पाठवावयास पाहिजे होता.......

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— अंमलबजावणी झाली नाही ना?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :— नाही झाली.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— आता आपला करार किती वर्षासाठी झाला आहे?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :— तीन वर्षासाठी झाला आहे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी:— कोणत्या तारखे पासुन झाला?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :— भुखंड क्र.५७ बाबतीत जो करार झाला तो दि. १६.८.१९९०.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— दि. १६.८.१९९०? किती वर्षा साठी?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :— तीन वर्षासाठी

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— तीन वर्षे कधी पुर्ण झाले?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :— दिनांक १६.८.१९९३ रोजी.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— त्यानंतर भुखंड क्र.५७ वर त्यांचा जो कब्जा आहे तो अवैध मानला जाईल की वैध मानला जाईल?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा.महापौरजी मी पुन्हा एकदा सांगु इच्छितो की, हे प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित असताना त्यावर ही जी चर्चा होत आहे याबाबतीत उच्च न्यायालयाने जर का काही ताशेरे ओडले तर ........

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— श्री. ठाकुरदास बेहराणी यांच्या प्रकरणाच्या वेळेस तुम्ही उच्च न्यायालयास विसरले होतात काय? उच्च न्यायालयाची आता तुम्हाला आठवण झाली काय?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— उच्च न्यायालयात तर आपण गेला आहात ना? आम्ही तर विसरलो होतो ना? आता आपण आम्हास आठवण करुन दिली ना?

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— तुमचा कायदा तुमच्या खिशात पडला आहे काय? जेथे जो पाहिजे तो दाखवायचा.

मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी, श्रीमती नंदिनी बामणकर यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे यावर चर्चा करणे उचित होणार नाही.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— श्री. ठाकुरदास बेहराणी यांच्या प्रकरणाच्या वेळेस तुम्ही सभागृहाची एक तासाची वेळ व्यर्थ घालविली त्यावेळेस तुम्हाला माहिती नव्हते काय की हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे म्हणुन?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— सभागृहाची वेळ व्यर्थ घालविली जात आहे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी:— न्यायालयाच्या प्रकरणाची आता तुम्हाला आठवण झाली?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— तर त्या दिवशी सुध्दा तुम्ही आठवण करुन दिली होती ना की हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे म्हणुन.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— मी ओरडून ओरडून सांगत होतो परंतू महापौरांनी त्या विषयावरील चर्चा बंद थोडीच ठेवली होती?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— तर त्यावेळी आपण बोलू तरी दिले का? जे बोलायचे होते ते आपण बोलू दिले नाही.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— त्यावेळेस यासाठीच मी मा.महापौरांना मी जेलची आठवण करुन दिली.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— आपण अवांतर बोलू नका, ही काय गोष्ट्र आहे, जेल मध्ये तर आता आणखी काही लोक जाणार आहेत.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— जेल मध्ये तुम्ही लोक जाल.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— जावू ना, काही मोठी गोष्ट्र नाही. आम्हाला जेलमध्ये टाका कायदा आपल्या खिशात आहे ना?
मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :— आमदार नउ वर्षे जेल मध्ये होता.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– जेलची भिती कोणाला दाखवता? जेल मध्ये गेले तर काय होणार आहे? कायदया पेक्षा मोठे कोणीही नाही. कायदयामध्ये आम्ही कुठेही सापडत असुन तर आम्ही जेल मध्ये जावु, कायदयाच्या कक्षेबाहेर असेल तर कुणीही आम्हाला जेल मध्ये टाकू शकणार नाही.मग आपली इच्छा असो अगर नसो. मा. महापौरजी मी आपल्याला निवेदन करतो की, प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित आहे कृपया यावर चर्चा करु दिली जावु नये.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– न्याय प्रविष्ठ आहे तर उत्तर का दिले?

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी– न्याय प्रविष्ठ असेल तर न्यायालयाचा अवमान केल्याचा गुन्हा होईल. आपण आमच्या प्रश्नांचे उत्तर दया.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– आपल्यावर न्यायालयाच्या अवमानतेचा गुन्हा झाला तर होवू दया परंतू तो अधिका–यांवर का व्हावा?

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :– आपण वांरवार उभे राहून का बोलत आहात. अधिका–यांना उत्तर देवु दया, आपण वांरवार उभे राहून प्रश्न उत्तरे का करत आहात?

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– सांगा सांगा आपण का गप्प बसला आहात?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– दिनांक १६.८.१९९० रोजी करार झालेला आहे व तो तीन वर्षासाठी झालेला आहे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– तीन वर्षा नंतरही त्यांच्याकडे जो ताबा आहे तो अवैध आहे कि वैध आहे?

उप आयुक्त श्री. मिलींद सांवत :– त्यानंतर त्याचे नुतनीकरण झालेले नाही.

मा.सदस्य श्री.मोहन बेहराणी :– तर तो ताबा अवैध ठरतो ना?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– मा. महापौरजी प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर दिले आहे. त्याच्यावर आता उप प्रश्न का विचारले जात आहेत? चर्चा केली जात आहे?

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :– प्रकरण न्यायालयात आहे किंवा काहीही आहे अधिका–यांनी उत्तर दिले पाहिजे आपण वारंवार उभे राहून चुकीची माहिती का देत आहात?

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:– मा. महापौर महोदया मी हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन बोलु इच्छित आहे. आपणाकडे कायदयाचे जाणकार लोक आहेत त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे त्यावर चर्चा होवू शकत नाही. महापौरांनी आधि निर्णय दिल्या नंतर चर्चा होत नाही. महापौरां पेक्षा जास्त अधिकार येथे दुस–या कोणाला आहेत काय? नियमा नुसार कारवाई केली पाहिजे, धन्यवाद.

यावेळी जनादेश आपकी आवाज  व के न्युज या स्थानिक  वृत्तवाहिन्याचे  कॅमेरामन सभागृहातील कामकाजाचे चल चित्रीकरण करत होते  ते पाहून शिवसेना, भाजपा, कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या काही सन्माननिय  सदस्यांनी  जोरदार आक्षेप घेवून यांना बाहेर काढा, अशी आरडाओरड केली व सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी व अन्नु मनवानी यांनी या दोन्ही वृत्तवाहीन्याचे कॅमेरामन यांना बळजबरीने  सभागृहातून बाहेर काढले.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— याबाबतीत सभागृह निर्णय घेईल.

मा. महापौर :— हे काय गैरवर्तन  चालले आहे.?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौरजी, है गैरवर्तन आहे.

मा.सदस्या श्रीमती रेखा करिरा, श्रीमती भारती छाब्रिया  यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेच्छा :— हे काय होत आहे? गुंडागर्दी आहे का?

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— वृत्तवाहिन्याच्या प्रतिनिधींना सभागृहातील कामकाजाचे चित्रीकरण करण्यास मनाई केली होती.  कुणाला परवानगी दिली आहे किंवा नाही . बिना परवानगी सभागृहातील कामकाजाचे चित्रीकरण करीत आहेत .

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा.महापौरजी आता काही सदस्यांनी गैरवर्तणुक केली आहे कायदा आपल्या हातात घेतला आहे. श्री. लाल पंजाबी यांनी कायदा हातात घेतला आहे.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेच्छा :— श्री. लाल पंजाबी यांना बाहेर काढा. ही काय गुंडागर्दी चालु आहे?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— त्यांनी कायदा आपल्या हातात घेतला आहे. श्री. लाल पंजाबी सारखे आमचे वरीष्ठ नगरसेवक एका व्यक्तीवर हल्ला करण्यासाठी त्याच्यावर धावुन जात आहेत. हे काय चालले आहे?

मा. महापौर:— के. न्युज वृत्त वाहिनीचे कॅमेरामन बिना परवानगी सभागृहात आले होते यासाठी त्यांनी त्यास मारुन सभागृहातून बाहेर काढले.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— त्यांना मारण्याचा अधिकार आहे का? मा. महापौरजी कोणास मारण्याचा श्री. लाल पंजाबी यांना अधिकार आहे काय?

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— महासभेस अधिकार आहे, सभागृहातून बाहेर काढण्याचा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— ते बिना परवानगी सभागृहात आले कसे?

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेच्छा :—कोणाला विचारुन आले?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौरजी महासभे मध्ये कोणाचे येणे किंवा न येणे हा एक वेगळा विषय आहे. परंतू जर कोणी आला असेल तर त्यास विरोध केला जावू शकतो.

मा. सदस्य श्री. मोहन बेहराणी :— त्यास मारण्यासाठी गेले नव्हते.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— त्यास मारण्या साठी गेले नव्हते वाचविण्यासाठी गेले होते.

मा. सदस्य श्री. होशियारसिंह लबाना:— कोणी मारले होते? ज्यास आपण वाचविण्यासाठी गेला होतात. त्यास कोणी मारले होते?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– श्री. लाल पंजाबी यांनी मारले होते.

मा. महापौर :– महासभेमध्ये वृत्तवाहिन्यांच्या कॅमेरामन यांना ज्याकुणी मारझोड केली आहे त्यांची नांवे इतिवृत्तांत आली पाहिजेत याची इतिवृत्तांत नोंद घ्या हे कृत्य गैरवर्तन आहे. सभेचे पुढील कामकाज चालविले जावे.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :– मा. महापौर महोदया, हे ऐकुण घ्या की, मी त्या कुणालाही मारलेले नाही, त्यामुळे पुढील प्रश्नच उद्‌भवत नाही.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत होते हे समजुन येत नव्हते.

मा. महापौर :– सभागृहाबाहेर असलेल्या पोलिसांनी कृपया आत यावे.

मा. सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :– मा. महापौर महोदया, दिवाळीचा पवित्र सण आहे सर्व सन्माननिय सदस्यांना ताकीद देण्यात यावी की त्यांनी कृपया शांतता राखावी.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत होते हे समजुन येत नव्हते. यावेळी पालिका सदस्य श्री.अन्नु मनवानी हे शेवटच्या रांगेतून उठून सभागृहनेता श्री. देवेंद्रसिंह खेमाणी यांच्या दिशेने इशारा करुन येत होते.

मा. महापौर :– सन्माननिय सदस्य श्री. अन्नु मनवाणी कृपया आपण बसुन घ्यावे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– मा. महापौरजी मी एक गोष्ट्र रेकार्डवर आणु इच्छितोकी, श्री. अन्नु मनवाणीचे नांव मी घेतले नव्हते. ते त्या शेवटच्या रांगेतून उठून मला मारण्यासाठी येत होते.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :– खोटे बोलू नका. खोटे बोलू नका.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– ते मारण्यासाठी येत होते श्री. धनजंय बोडारे व श्री. जमनु पुरस्वाणी यांनी त्यांना थोपवून धरले. व म्हटले की, मारामारी करु नका. त्यासाठी मी श्री. बोडारे व श्री. जमनु पुरस्वाणी यांना धन्यवाद देतो. कारण की,.....मी सांगु इच्छितो की,

मा.सदस्य श्री.धनजंय बोडारे :– श्री. देवेंद्रसिंह खेमाणी व श्री. हौशियारसिंह लबाना या दोघांनाही मी, थोपविले आहे.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :– ते आपल्याला धन्यवाद देत आहेत.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– मला माझे बोलणे पुर्ण करु दया.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:– प्रश्न उत्तराचा कालावधी आहे सभागृहाची वेळ व्यर्थ का घालवित आहात? आपण धन्यवाद दिलेत ना?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– मी हे सांगु इच्छितो की, मागील दहा वर्षा पासुन आम्ही येथे नगरसेवक म्हणुन बसलो आहोत एक नगरसेवक दुस–यास मारण्यासाठी धावुन येत आहे. अशी परिस्थिती कधीही उदभवली नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— तशी संधीही दिली नाही ना?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— श्री.अन्नु मनवाणी हे नव्यानेच नगरसेवक म्हणुन निवडून आले आहेत व मारामारी करण्याचा प्रयत्न करत आहेत हे पुर्णत: निंदनिय आहे.

मा.सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— ही आपली चुकीची समजुत आहे. ते मा. महापौरांना सांगण्यासाठी येत होते. व श्री. देवेंद्रसिंह खेमाणी हे त्यांना मारण्यासाठी येत होते याची कृपया नोंद घेतली जावी. आपण हे जे काही खोटे बोलत आहात ना ते आता बंद करा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, पीठासीन अधिकारी म्हणुन सभागृहाचे कामकाज व्यवस्थितपणे चालावे हे आपल्या अधिकार क्षेत्रात आहे. त्याच प्रमाणे सभागृह व्यवस्थितपणे चालले पाहीजे याबाबत सभागृह नेता यांची सुध्दा तेवढीच महत्वपुर्ण भुमिका आहे. परंतू सुरवाती पासुन मी पहात आहे की, सभागृहामध्ये गोंधळ कसा होईल हेच सभागृहनेता पाहत आहेत. श्री. मोहन बेहराणी यांनी प्रश्न विचारल्या नंतर त्यावर पिठासीन अधिकारी यांनी आपले मत दिले आहे, संबधित अधिकारी प्रश्नांचे उत्तर देत आहेत परंतू मधे मधे सभागृहनेता बोलत आहेत. त्यांची भुमिका त्यांना नंतर मांडता येण्यासारखी आहे ना? सभा चालविण्याचे काम पीठासीन अधिकारी व सभागृह नेता यांचे आहे परंतू येथे उलट होत आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— नाही नाही असे नाही.

मा. महापौर :— मी दाखवू शकते आपणास सभा कशी चालविली जावु शकते ती,

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— आपण धमकी देत आहात का? दाखवु शकते म्हणजे काय?

मा. महापौर :— आपण म्हणता की, सभा कशी चालवायची हे मा. महापौरांचे काम आहे तर मी असे करु शकते की, मी सदस्यांस बाहेर जाण्या बाबत आदेश देवु शकते परंतू असे होवू शकते की ही शेवटची सभा असु शकते कारण की, पुढील महिन्यात आचार संहिता लागु शकते तसेच उदया दिवाळी आहे यासाठी सामान्य वातावरणात सभागृहाचे कामकाज चालले तर त्यामध्ये सर्वाचेच हित आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— कराना ते सुध्दा करा, ते सुध्दा करुन दाखवा.

मा. महापौर :— यासाठी सामान्य वातावरणात सभा होत असेल तर त्यामध्ये सर्वाचेच भले आहे. यानंतर माझ्या आसनावर कोण बसते हे परमेश्वर पाहील परंतु दुर्गंधी करुन निघावे ही काही चांगली गोष्ट नाही. यासाठी आपणा सर्वाना माझे निवेदन आहे की, शिष्ट्राचाराचे पालन करा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— आम्हाला सुध्दा हेच पाहीजे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :— मा. महापौरजी सभागृह नेत्यांना सांगा की, त्यांनी वारंवार उभे राहुन बोलु नये. जे प्रश्न विचारतात त्यांनाच बोलु दिले जावे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— जेव्हा माझा प्रश्न आला होता तेव्हा सर्व लोक उभे राहून पन्नास पन्नास वेळा बोलत होते माझ्या बोलण्याने दुख होते का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी मी बोलू इच्छितो श्री. देवेंद्रसिंह यांना यांगा की, मी सात वर्ष सभागृहनेता होतो मी सर्वात शेवटी बोलत असे मधे मधे कधीही बोलत नसे. व दहा दहा वेळा तर कधीही बोललो नाही. आणि त्या सात वर्षामध्ये अश्या प्रकारच्या भांडणाची परिस्थिती कधीही उद्‌भवली नाही. आपण सभागृहाचे कामकाज चालविता तर आपले काम आहे की, जर कोणी एखादा भांडण करीत असेल तर त्यास समजावणे हे देखिल आपले काम आहे.

मा. महापौर :— शांतता राखा, श्री. किशोर वनवारी आपण बसून घ्या व श्री. मिलींद सांवत आपण या प्रश्नां वरील चर्चा येथेच थांबवुन सचिव महोदय पुढील प्रश्न उत्तरे चालू ठेवावीत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— या, जरा पुढील माहिती दया

महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा :— महापौर महोदयांचे म्हणणे आहे की, पुढील प्रश्न पुकारला जावा.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी:— काय?

महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा :— महापौर महोदयांचे म्हणणे आहे की, पुढील प्रश्न पुकारला जावा.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— पुढला प्रश्न होवु देणार नाही. या प्रश्नाचे पुर्ण उत्तर मिळाले नाही

मा. महापौर :— हा प्रश्न तो पर्यत प्रलंबित ठेवला जाईल जो पर्यत न्यायालयाचा निर्णय येत नाही तो पर्यत.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी:— नाही, न्यायालयातून निर्णय कसा येईल? ते प्रकरण वेगळे आहे व हे प्रकरण वेगळे आहे. या जागांचा ताबा घेण्याचे प्रकरण न्यायालयात गेले आहे.व आम्हास असे वाटते की, ते भुखंड बेकायदेशिररित्या वापरले जात आहेत त्याबाबत मी हा प्रश्न विचारला आहे. कोर्ट प्रकरण वेगळे आहे. त्यांच्याकडे जो अवैधपणे ताबा आहे तो महापालिकेने घेतला पाहिजे. श्री. सावंत साहेब आपण व्यासपीठा वरुन जात आहात काय? हा प्रश्न पुर्ण झालेला नाही तो अर्धवट सोडून आपण मधेच जावु शकत नाहीत.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौरांनी अधिनिर्णय दिला आहे त्याचे पालन केले जावे.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— प्रश्नां वरील चर्चा मधेच थांबविण्याचा कोणालाही अधिकार नाही.या प्रश्नांवरील चर्चा समाप्त झाली किंवा नाही याबाबतीत सभागृह निर्णय घेईल.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— मा.महापौरजी हे जे प्रकरण आहे हे प्रश्नांशी संबधित असे आहे न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांशी ते संबधित नाही. यासाठी प्रश्नांवर चर्चा झाली पाहीजे.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— न्यायालयाच्या निर्णया नंतर हा प्रश्न पुन्हा चर्चेस येईल? या प्रश्नांवरील चर्चा आपण प्रलंबित ठेवली आहात ना? ठिक आहे.

महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा :— प्रश्न क्रमांक ४९४ हा श्री. मोहन बेहरानी यांचा आहे.

प्रश्न क्रमांक.४९४ (१) सीन्स व्हेन शहीद दुंनिचंद कालानी मेमोरीयल ट्रस्ट ॲट साईट नंबर ५७ ॲन्ड शहीद दुनिचंद कालानी स्कुल ॲट साईट नंबर १०६ हॉज बिन गीव्हन ऑन लिज

(२) व्हॉट आर द एक्सपेनसेस डन बाय द कॉन्सील ऑर कार्पोरेशन फार द डेव्हलपमेंट आफ शदीद दुनिचंद कालानी कॉलेज

उत्तर :— (१) :— साईट नंबर १०६

महासभा ठराव क्रमांक. २९ दिनांक :– २०.१२.२००० _अन्वये महापालिकाची जमिन शहीद दुनिचंद कालानी ट्रस्ट या संस्थेने ठरावात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर आणी त्या व्यतिरिक्त आयुक्त ठरावातील अशा अटी व शर्तीवर व भाडेपटयांचा निश्चितीस अधिन राहुन ३० वर्ष कालावधी साठी भाडेपटयांने देण्यास मान्यता दिलेली आहे.

साईट नंबर ५७

सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक. ५८८ (१) दिनांक ७.३.१९९१ अन्वये साईट क्रमांक.५७ ही शहीद दुनिचंद कालानी मेमोरीयल ट्रस्ट यांना कायम स्वरुपी देण्यात आलेली आहे.

(२) नगरपालिकेने कॉलेजच्या प्रगती करीता करण्यात आलेला खर्च खालील प्रमाणे आहे.
साईट क्रमांक.५७ रुपये ५०.५० लक्ष

साईट क्रमांक.१०६ रुपये २७.०० लक्ष

टीपः– सदर प्रश्नांचे उत्तर महासभे समोर यापुर्वी प्रश्न क्र.३३६ व ३३९ नुसार देण्यात आलेले आहे.

**महापालिका सचिव,** श्री. प्रकाश कुकरेजा :– हा प्रश्न सुध्दा त्याच प्रश्नांशी संबधित आहे ना?

**मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :–** हा प्रश्न सुधा पहिल्या प्रश्नांशी संबधित आहे काय? हा प्रश्न सुध्दा प्रलंबित ठेवला जावा काय? नंतर घेणार काय?

**महापालिका सचिव,** श्री. प्रकाश कुकरेजा :– हे दोन्ही प्रश्न प्रलंबित ठेवले जात आहेत.

**प्रश्न क्रमांक ४९५ हा श्रीमती भावना खिलनानी यांचा आहे.**
**त्यांनी तो मागे घेतला आहे.**

**महापालिका सचिव,** श्री. प्रकाश कुकरेजा :– प्रश्न क्रमांक.४९६ हा श्री.बच्चाराम रुपचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्रमांक ४९६ (१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभागामार्फत शहरात विविध ठिकाणी रोड लाईट व विद्युत व्यवस्था करण्यात आली आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नांची सुचक समाधानकारक व सविस्तर उत्तर महासभेत चर्चा होवुन मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) विदयुत विभागामार्फत उल्हासनगर महापालिका हद्दीत किती विद्युत पोल लावण्यात आले आहेत? सदर विद्युत पोलवर मिती लाईट फिक्चर (हायमास्ट, टयूब लाईट, सोडीयम दिवे) जोडले आहेत? यासाठी लाईटचे बिल किती येत होते?
प्र.क्र. १ ब) मा. प्रधान सचिव यांनी पत्र क्र. संकिर्ण २००४/उर्जा/प्र.क्र. १२३/०४/नवि २०/दिनांक २३/१/२००६ अन्वये विजेची खपत कमी करण्याचे सुचविले आहे. व त्या अनुषंगाने उल्हासनगर शहरात लावलेल्या दिवाबत्तीमध्ये एक आड एक बंद करावे असे नियोजन करण्यास सांगितले आहे. त्यानुसार विद्युत विभागाने कोणकोणत्या विद्युत पोल वरील

लाईट एक दिवस आड बंद केले? व त्यानुसार किती दिवे बंद ठेवण्यात आले होते? सदरचे कारवाई नंतर किती विद्युत बिल आले?
उत्तर :– १–अ) दिनांक ३१.३.०६ रोजी पर्यत रस्त्यांवर लावलेले विद्युत दिवाबती

१) संख्या

| | |
|---|---|
| एकुण उ.म.पा. पोलस् | ६,५२२ नग |
| एकुण सोडीयम | १०,४५२ नग (अ) |
| एकुण टयुब लाईटचे दिवे | ३,४८३ नग (ब) |
| एकुण रस्त्यांवर लावलेले विद्युत दिवा बत्ती अ+ ब | १३,९३५ नग |
| एकुण हायमास्ट | १५ नग |

२) उर्जा देयक

| | |
|---|---|
| सरासरी मासिक देयक रक्कम | रुपये २१,२०,६१४/– |
| सरासरी मासिक युनिट | ७,५८,२१० |

१–ब) मा.प्रधान सचिव यांनी पत्र क्र.संर्कीण २००४/उर्जा/प्र.क्र.१२३/०४/नवि.२०/दि.२३.१.२००६अन्वये शहरात **दिर्घ कालीन उर्जा नियोजन** अंतर्गत एक आड एक दिवाबत्ती खांब बंद करण्याचे सुचविले आहे.

या अंतर्गत मार्च २००६ पासुन तांतिक सुसाध्यता निश्चित करण्यासाठी काही जागी एक आड एक पोल बंद करण्याची प्रायोगिक तत्वावर सुरवात करण्यात आलेली आहे व पावसाळा सुरु होताना प्रयोग स्थगित करण्यात आलेला आहे. आपण सदरची बाबत मागीतलेली माहिती सोबत तक्त्यात देण्यात येत आहे.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :– उत्तर ठिक आहे?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:– ठिक आहे.

महापालिका सचिव (श्री.प्रकाश कुकरेजा):– प्रश्न क्रमांक.४९७ हा श्री. मोहन बेहराणी यांचा आहे.

प्रश्न क्रमांक ४९७

प्र. १)पाणी पुरवठा अंतर्गतचे भुयारी गटाराचे कामी मागील वर्षी अर्थसंकल्पामध्ये किती रक्कमेची तरतुद ठेवण्यात आली होती? तसेच पाणी पुरवठा विभागा अंतर्गतचे भुयारी गटाराचे कामी मागील वर्षी किती खर्च झाला?

अ) या कामांमध्ये कोणकोणत्या ठिकाणी किती रक्कमेची कामे झाली?

ब) सदर कामे करणा–या ठेकेदारांची नावे आणि त्याबाबतची सविस्तर माहिती मिळावी.

उत्तर :– पाणी पुरवठा अंतर्गत भुयारी गटाराचे कामी वर्ष २००५–०६ अर्थ संकल्पात मध्ये रुपये ६५ लक्ष रक्कमेची तरतुद ठेवण्यात आली होती.
एकुण रुपये ६५ लक्ष तरतुदी मधुन एकुण २९ कामे मंजुर झालेली असुन त्यांची किमत रुपये ६४.४७ लक्ष ईतकी आहे. याकामां पैकी १६ कामे पुर्ण झाली असुन त्यांचा खर्च रुपये ३७.०३ लक्ष इतका झालेला आहे. १० कामे प्रगतीपथांवर आहेत व उर्वरित ३ कामे डी.डीआर. कडे मजुर कामगार संस्थेच्या शिफारसी करीता पाठविण्यात आली आहेत.

अ) व ब)

सदर कामाची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात सादर करण्यात येत आहे.

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):– आपला/४९७ क्रमांकाचा हा जो प्रश्न आहे याबाबत आपण जी विचारणा केली आहे की पाणी पुरवठा अंतर्गतचे भुयारी गटाराचे कामी मागील वर्षी अर्थसंकल्पामध्ये किती रक्कमेची तरतुद ठेवण्यात आली होती? ६५ लाखाची या कामी तरतुद आहे. त्याची सविस्तर माहिती या प्रश्नाचे उत्तराच्या मागील पृष्ठावर दिलेली आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– माईक समोर बोलाल तर बरे होईल कारण की, आपले बोलणे ऐकु येत नाही.

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):– पाणी पुरवठा अंतर्गत भुयारी गटाराचे कामी वर्ष २००५–०६ अर्थ संकल्पात मध्ये रुपये ६५ लक्ष रक्कमेची तरतुद ठेवण्यात आली होती. एकुण रुपये ६५ लक्ष तरतुदी मधुन एकुण २९ कामे मंजुर झालेली असुन त्यांची किंमत रुपये ६४.४७ लक्ष इतकी आहे. याकामां पैकी १६ कामे पुर्ण झाली असुन त्यांचा खर्च रुपये ३७.०३ लक्ष इतका झालेला आहे. १० कामे प्रगतीपथांवर आहेत व उर्वरित ३ कामे डी.डीआर. कडे मजुर कामगार संस्थेच्या शिफारसी करीता पाठविण्यात आली आहेत.

अ) व ब)

**सदर कामाची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात सादर करण्यात येत आहे.**

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–** नाही, यापुढील जो प्रश्न आहे

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):– **प्रश्न क्रमांक ४९८ का?**

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–** होय

**महापालिका सचिव, श्री.प्रकाश कुकरेजा :–** प्रश्न क्रमांक ४९८ हा श्री. मोहन बेहरानी यांचा आहे.

प्रश्न क्रमांक ४९८

यावर्षी या कामी अर्थसंकल्पात किती रक्कमेची तरतुद करण्यात आली? त्यापैकी आतापर्यंत किती रक्कम खर्च करण्यात आली?

अ) या वर्षी किती कामांची प्राकलने मंजुर झाली आहे? व किती रक्कमेची? त्यांचे कामाच्या ठिकाणाची नांवे व ठेकेदारांची नांवे इत्यादींची सविस्तर माहिती.

**उत्तर:–** पाणी पुरवठा विभागा अंतर्गतचे भुयारी गटाराचे कामी या वर्षी सन २००६–०७ अर्थ संकल्पामध्ये रुपये ११५ लक्ष रक्कमेची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. व आता पर्यत झालेला खर्च निरंक

**अ)**यावर्षी २८ प्राकलणे तयार करण्यात आलेली आहेत यापैकी तीन कामे मंजुर असुन त्यांची किमत रुपये ३.५७ लक्ष इतकी आहेत.

**सोबत सविस्तर कामांच्या ठिकाणांची माहिती जोडत आहे.**

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— पाणी पुरवठा विभागा अंतर्गतचे भुयारी गटाराचे कामी या वर्षी सन २००६—०७ अर्थ संकल्पामध्ये रुपये ११५ लक्ष रक्कमेची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— ११५ लक्ष? अशी काय परिस्थिती निर्माण झाली की, ६५ लाखा ऐवजी ११५ लाखाची तरतुद करावी लागली.

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— महाराष्ट्र जिवन प्राधिकरणांनी शहरामध्ये ज्याकाही लाईन्स टाकल्या होत्या, ज्या काही घरगुती जोडण्या होत्या, बॅरेक्स मधील लाईन्स जुन्या झाल्याने चोकअप झाल्या होत्या त्यांच्या बाबतीत ब—याचश्या तक्रारी होत्या म्हणुन अर्थसंकल्पामध्ये वाढीव तरतुद करावी लागली.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— किती वर्षा पासुन ६५ लाखाच्या तरतुदी मधुन कामे होत होती. किती वर्षा पासुन ६५ लाखाच्या आत खर्च होत होता?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— मागील रेकार्ड सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— एक, अंदाज आपणास माहित तर असेल दोन तीन वर्षा पासुन तर आपण येथे आहात.

मा.सदस्या श्रीमती अनिता गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— ६५ ते ६७ लाखा पर्यत, ८० लाखा पर्यत राहिल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— ती या वर्षी एकदम डब्बल करण्याची काय आवश्यकता पडली?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— तक्रारारी वाढल्या आहेत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— या वर्षी एकदम डब्बल तक्रारी थोडयाच वाढल्या आहेत? ६५ लाखाचे ११५ लाख म्हणजे डब्बल झाले ना?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— तक्रारी जास्त होत्या मागील वर्षी लोकांचे म्हणणे होते की, अर्थसंकल्पीय तरतुद कमी आहे म्हणुन या वेळेस तरतुद वाढविली आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— आम्हाला अशी माहिती आहे की, येथे कामे खुपच कमी होत आहेत व बिले मात्र फार मोठया प्रमाणावर काढली जात आहे, तसेच प्रत्येक झोन मध्ये पुर्वी निविदा काढल्या जात असत. परंतु मागील दोन वर्षा पासुन निविदा काढल्या जात नाहीत त्याचे काय कारण आहे?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— नाही, नाही साहेब मागील वर्षी देखभाल दुरुस्तीची जी निविदा दिली होती मागील वर्षी पुराच्या कालावधी मध्ये अंडर ग्राउंड ड्रेनेजच्या तक्रारी कमी झाल्या होत्या व निविदा काढलेली नव्हती. त्यामुळे या कामाचे चार भाग करुन चार लोकांना दिले होते.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:— ठिक आहे. यावर्षी सुध्दा आपण निविदा का काढली नाहीत?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— साहेब, निविदा यासाठी काढली नाहीत की, प्रस्ताव सादर केला आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:— आपण जो प्रस्ताव सादर केला होता तसाच ५ झोनचा प्रस्ताव सादर केला होता.

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— नाही यावेळेस पुर्णपणे एकच प्रस्ताव सादर केला आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— चार वेगवेगळया झोनचे प्रस्ताव आपण आयुक्तांकडे सादर केलेले आहेत.

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— नाही नाही २० लाखाचे एकच प्राकलन आहे. पुर्णपणे एकच प्राकलन सादर केले आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— एकुण किती रक्कमेचे प्राकलन आपण तयार केले आहे?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— एकुण २० लाखाचे प्राकलन आहे.
मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— २० लाखाचे एकच ?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— कॅम्प नं. १ ते ५ साठी एकुण २० लाखाचे एकच प्राकलन आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— निविदा न मागविता ?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— अंदाजित प्राकलनिय रक्कम आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— निविदे करीता ?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— मंजुरी मिळाले नंतर निविदा काढू.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— २ ऑक्ट्रोबरला कालावधी संपला आहे आपण प्रस्ताव तयार करण्यास उशिर का केला ?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):—काही तांत्रिक अडचणी होत्या त्या नंतर प्रस्ताव पाठविला.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— २ ऑक्ट्रोबरला कालावधी संपला तर २ ऑक्ट्रोबरच्या अगोदर आपण प्रस्ताव का सादर केला नाही? २ ऑक्ट्रोबरच्या अगोदर निविदा मागवून निविदेचे काम संपवावयास पाहीजे होते. आपण दोन तीन दिवसा अगोदर आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविला आहे असे का?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):—प्राकलन मंजुरी साठी पाठविले आहे मंजुरी मिळाल्या नंतर त्याबाबत निविदा काढू.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— नाही परंतू या कामी उशिर का केला? उशिर होण्याचे कारण काय आहे? जाणीवपुर्वक? मागील वर्षी सुध्दा या प्रकरणात घोटाळा झालेला आहे. या वर्षी सुध्दा निविदा उशिरा काढण्या बाबत आपण समाधानकारक उत्तर देवु शकत नाहीत.

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):—प्राकलन तयार करुन मंजुरी साठी पाठविले आहे

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:— नाही नाही परंतू निविदेचा कालावधी २ ऑक्ट्रोबरला संपुष्टात आला आहे. अदयाप पर्यत या कामी आपण तयारी का केलेली नव्हती? खर तर सप्टेंबर महिन्यामध्येच आपण याकामी निविदेची तयारी करावयास पाहीजे होती. आता ऑक्ट्रोबर महिना चालू आहे निविदेचा कालावधी संपुष्टात आला आहे आणि अदयाप आपला प्रस्ताव आयुक्तांकडे प्रलंबित आहे. आता आपण काय करत आहात? निविदा काढाल?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— निविदा काढणार आहोत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— निविदा काढणार आहात?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):—प्राकलनास मंजुरी मिळाल्या नंतर निविदा काढू

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— कधी पर्यत?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):—प्राकलनास मंजुरी मिळाल्या नंतर त्वरीत निविदा काढू.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— व या दरम्यान आमच्या शहरातील काम जे थांबले आहे त्यास कोण जबाबदार? २ ऑक्ट्रोबरच्या नंतर आमच्या शहरातील ही जी कामे थाबली आहेत त्यास कोण जबाबदार?

मा.सदस्य श्री. प्रशांत जाधव सभागृहा बाहेर गेले. 

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— प्राकलन मंजुरीस पाठविले आहे. मंजुरी मिळताच पुढील कार्यवाही केली जाईल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:— प्रस्ताव पाठविण्यास उशिर झाला हे आपण मान्य करता का?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— उशिर झाला.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— यापुढे असा उशिर होणार नाही याची आपण सभागृहात खात्री देता?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— यापुढे असे होणार नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— व पुढील आठवडयात निविदा काढली जाईल याची आपण आम्हास सभागृहात खात्री देता?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— प्रस्ताव मंजुर होताच पुढील कार्यवाही केली जाईल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— व पुढील आठवडया पर्यत होईल असे आपणास वाटते? आमच्या शहरातील काम थांबता कामा नये याबाबत आपण आश्वासन देवु शकता?

श्री.आर. आर. सावकारे,(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग):— ठिक आहे.

महापालिका सचिव, श्री.प्रकाश कुकरेजा :— प्रश्न उत्तरेचा कालावधी संपला.

**मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—** मा. महापौरजी, जसे की, उदया दिवाळीचा सण आहे व आमचे नगरसेवक श्री.अनिल जयसिंघानी यांना वैष्णौदेवी येथे जाताना अपघात झाला आहे. दिल्ली येथुन त्यांना मुंबई येथील हिंदुजा रुग्णालयात आणण्यात आले आहे. आमचे काही सहकारी श्री. अनिल जयसिंगानी यांच्या प्रकृतिची चौकशी करण्यासाठी हिंदुजा रुग्णालयात जावु इच्छित आहेत यासाठी मी आपणास निवेदन करतो की, या सभेचे कामकाज १५ दिवसां साठी तहकुब करण्यात यावे.

**महापालिका सचिव श्री.प्रकाश कुकरेजा :—** एक सूचना आहे. राष्टवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने गटनेता पदासाठी श्री. राजेश वधरिया यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांचे हार्दीक अभिनंदन.

**मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** मा.महापौर महोदया, या सभेचे कामकाज सलगपणे चालू ठेवले जावे कारण की महिन्यातून एकदा ही सभा होते यामध्ये शहराशी संबधित काही विषय असल्याने सभेचे कामकाज सलगपणे चालविले जावे.

**मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—** मा. महापौरजी,मी पुन्हा एकदा आपणास निवेदन करतो की, या सभेचे कामकाज स्थगित केले जावे. आमच्या काही सहकार्याचे असे म्हणणे आहे की, मतदान घेतले जावे सभेचे कामकाज तहकुब करण्यासाठी योग्य वाटत असेल तर मतदान घेतले जावे.

**मा. महापौर :—** सचिव महोदय या प्रस्तावा बाबत मतदान घ्या.

**महापालिका सचिव, श्री.प्रकाश कुकरेजा :—** जे सन्माननिय सदस्य सभेचे कामकाज तहकुब करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**सभा तहकुबीच्या बाजुने २९ मते**

१. श्रीमती ज्योती कालानी
२. श्री.विनोंद तलरेजा
३. श्री. हौशियारसिंह लबाना
४. श्री. सतरामदास जेसवानी
५. श्री.बबन लिंगे
६. श्री. गणपत एडके
७. श्री. सुरेश गायकवाड
८. श्री. चंदाराम मोकल
९. श्री. नरेंद्र कुमार ठाकुर
१०.श्री. देवेंद्रसिंह खेमाणी
११.श्री. प्रभुनाथ गुप्ता
१२.श्री. पृथ्वी वलेच्छा
१३.श्री. नाना पवार
१४.श्री. शांताराम निकम
१५.श्री. राजु जग्यासी
१६.श्री. राज असरोंडकर
१७.श्रीमती कमला शर्मा
१८.श्रीमती मिनु दासानी
१९.श्रीमती भारती छाब्रीया
२०श्रीमती निता आहुजा
२१डॉ. नीना नाथानी
२२.श्रीमती माया मसंद
२३. श्रीमती भावना खिलनानी
२४. श्रीमती रेखा कारीरा

२५. श्रीमती सुजाता रिझवानी
२६. श्रीमती मिना सोंडे
२७. श्री. मनोज साधवानी
२८. श्री. ईश्वर पमनानी
२९. श्रीमती अनिता गुप्ता

व सभेचे कामकाज चालू करण्याच्या बाजुने जे सन्माननिय सदस्य आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>सभेचे कामकाज चालविण्याच्या बाजुने ३६ मते</u>.

१. श्री. धनंजय बोडारे
२. श्री. मोहन बेहरानी
३. श्री. अशोक ठाकुर
४. श्रीमती मालती करोतिया
५. श्री. प्रमोद टाले
६. श्री. गौतम भालेराव
७. श्रीमती बेबी वसीटा
८. श्रीमती कोमल बठीजा
९. श्रीमती दिपा पंजाबी
१०.श्रीमती मोना वनवारी
११.श्रीमती किरण माखिजा
१२. श्री. किशोर वनवारी
१३.श्री. मोहनदास रामरख्यानी
१४.श्री.श्यामसुंदर रोहरा
१५.श्री. राजु टेकचंदानी
१६.श्री. विनोद ठाकुर
१७.श्री. लाल बिहारी यादव
१८.श्री. सुरेश जाधव
१९.श्री. अंकुश म्हस्के
२०.श्री. अन्नु मनवानी
२१. श्री. रमेश चव्हाण
२२. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२३. श्री. राजेंद्र चौधरी
२४. श्री. दिलीप गायकवाड
२५. श्री. नथु सोनावणे
२६. श्रीमती नंदिनी बामणकर
२७. श्रीमती जयश्री सुर्वे
२८. श्रीमती प्रेमा खांडेकर
२९. श्री. शामू वाघे
३०. श्री. बच्चाराम रुपचंदानी
३१. श्री. रामदास उमाप
३२. श्री. जमनु पुरस्वानी
३३. श्रीमती संगिता जावळे
३४ श्रीमती रेखा कृष्णानी
३५. श्रीमती लक्ष्मी ससाणे.
३६. श्रीमती सीमा मोकल

सूचक : श्री. देवेंद्रसिंह खेमाणी

अनुमोदक : श्री. चंदाराम मोकल

*<u>प्रस्ताव :</u>*

महापालिका सदस्य श्री. अनिल जयसिंगानी यांचा काही दिवसांपूर्वी अपघात झाला असुन ते त्यासाठी सध्या मुंबई येथील रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यांच्या प्रकृतीची विचारपुस करण्यासाठी काही सदस्य मुंबई येथे जावु इच्छितात तसेच दि. २१/१०/२००६ पासुन दिवाळीस सुरुवात होत असल्याने दिनांक २०/१०/२००६ रोजी सायंकाळी ४—०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज पुढील सूचना मिळेपर्यंत तहकुब करणेकामी महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. १९ ब</u> <u>दिनांक : २०/१०/२००६</u>

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार यावेळी पुढील दिवशी नंतरच्या वेळेपर्यंत सभा तहकुब करण्याबद्दलचा प्रस्ताव नाकारत आहे व सभेत कार्यसुचीवरील कामकाज तसेच चालु ठेवण्यास मान्यता देत आहे.

<u>बहुमताने</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—</u> सभेचे कामकाज सलगपणे चालु ठेवण्यात येत आहे.

<u>मा. सदस्य किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, आमच्या असंतुष्ट नगरसेवकांच्या गटांमध्ये श्री.लाल बिहारी यादव, श्री.मोहनदास रामरख्यानी, हे सहभागी झाले आहेत आम्ही आमच्या तर्फे व संपुर्ण सभागृहाच्या वतीने त्यांचे स्वागत करतो आणखी सदस्य संख्या वाढत जाईल व शंभर टक्के होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

<u>मा.सदस्य श्री०. प्रमोद टाले :—</u> मा.महापौरजी, आज श्री. शांताराम निकम यांचा वाढदिवस आहे वाढदिवसा निमित्त त्यांना शुभेच्छा.

**मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव यांनी पुनः सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—</u> श्री. प्रमोंद टाले यांनी अतिशय चांगली सुचना केली आहे आमच्या सर्व सहकार्याच्या वतीने श्री. शांताराम निकम यांना हार्दीक शुभेच्छा. व आमच्या बरोबर ते बसु लागल्या बाबत त्यांना शुभेच्छा

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u> मा.महापौरजी, आमच्या भाभी डॉ. निना नाथानी यांचा सुध्दा वाढदिवस आहे मी त्यांना सुध्दा शुभेच्छा देवु इच्छितो.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— हार्दीक शुभेच्छा.

मा. महापौर :— संपुर्ण सभागृहाच्या वतीने आपणा दोघाना वाढदिवसा निमित्त हार्दीक शुभेच्छा.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— येथे काही लक्षवेधी सूचना प्राप्तझाल्या आहेत त्या पुढील प्रमाणे आहेत.

लक्षवेधी सूचना क्र. १

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

विषय :— उल्हासनगरवासियांना अपशब्द बोलणा—या आयुक्तांविरुध्द् ठराव मंजुर करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविणेबाबत

लक्षवेधी सूचना क्र. २

सुचकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव :— सौ. जयश्री सुर्वे

विषय :— १९७८ पासुन महापालिकेत कार्यरत असणा—या कर्मचा—यांच्या रोजंदारी तत्वावरील सेवा समायोजन करणे तसेच त्यांना इतर अनुषंगिक लाभ देणे बाबत......

लक्षवेधी सूचना क्र. ३

सुचकाचे नाव :— श्री. राज असरोंडकर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

विषय :— महापालिकेच्या मालकीची समाजमंदिरे खाजगी व्यक्तींच्या ताब्यात असुन मा. महापौरांनी ते ताब्यात घेण्याचे आदेश देवुनही आदेशाची अंमलबजावणी न झाल्याबाबत....

लक्षवेधी सूचना क्र. ४

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रामदास उमाप

विषय :— शहरातील कचरा ठेकेदारामार्फत व्यवस्थितरित्या उचलला जात नसल्याने शहरात चिकुन गुनीया, डेंग्यु, मलेरिया व इतर रोगांचा प्रसार झाल्याबाबत.

याचार लक्षवेधी सूचनांमधील केवळ दोन लक्षवेधी सूचनांना मा.महापौरांनी स्विकृती दयायची आहे. यापैकी कोणत्या दोन लक्षवेधी सूचना त्या स्विकृत करीत आहेत?

खालील दोन लक्षवेधी सूचनांना मा. महापौरांनी स्विकृती दिलेली आहे.

लक्षवेधी क्रमांक.२

विषय :— १९७८ पासुन महापालिकेत कार्यरत असणा—या कर्मचा—यांच्या रोजंदारी तत्वावरील सेवा समायोजन करणे तसेच त्यांना इतर अनुषंगिक लाभ देणे बाबत......

लक्षवेधी क्रमांक.३

विषय :—महापालिकेच्या मालकीची समाजमंदिरे खाजगी व्यक्तींच्या ताब्यात असुन मा. महापौरांनी ते ताब्यात घेण्याचे आदेश देवुनही आदेशाची अंमलबजावणी न झाल्याबाबत.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— सन्माननिय महापौरजी, मी जी लक्षवेधी सूचना दिली आहे एका बेलगाम प्राण्याने उल्हासनगर मधील जनतेचा अपमान केला आहे. माझी ही लक्षवेधी सूचना स्विकृत करुन आपण उल्हासनगर शहरवासियांना न्याय दिला पाहीजे. हे काहीही बोलत राहतील आज शिव्या दिल्या आहेत, उदया ते लोकांना गोळया घालतील, आमची गांधीवादी जनता भगतसिंग बनण्यास तयार आहे. ते जनरल डायर बनतील ना तर आमचे शहरवासि भगतसिंग बनण्यास तयार आहेत परंतू अशा व्यक्तीची आपण पाठराखण करु नका. ते उल्हासनगर मधील जनतेला हरामखोर बोलतात अशा व्यक्ती बाबतची लक्षवेधीची सूचना स्विकृत करुन तीच्यावर चर्चा झाली पाहीजे. कारण की या पुढे जे कोणी अधिकारी येतील ते विचारपूर्वक बोलतील. ते केवळ ठेकेदारांना हरामखोर बोलले नाहीत तर उल्हासनगर मधील जनतेला ते हरामखोर बोलले आहेत. आपण उल्हासनगरवासियांच्या बाबतीत न्याय करा व लक्षवेधी सूचना स्विकृत करा अशी माझी आपणास विनंती आहे. पाहिजे तर श्री. रमेश चव्हाण आपली लक्षवेधी सूचना मागे घेण्यास तयार आहेत.

मा. महापौर :— नाही तशी काही गोष्ट नाही परंतू उत्तर देण्यासाठी ते सभागृहात उपस्थित असले पाहीजेत ना?

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— हजर असेलेच पाहीजेत अशी काही आवश्यकता नाही.

मा. महापौर :— त्या बाबतीत ते उत्तर देतील ना? शिवी दिली किंवा नाही दिली, दिली तर का दिली?

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— उल्हासनगर मधील जनतेला असे बोलून त्यांनी पळुन का जायचे? न्यायालयामध्ये तारीख आहे त्या अगोदर आमची महासभा , असे काही नाही न्यायालयाच्या तारखेसाठी त्यांनी जाणे आवश्यक आहे.

मा. महापौर :— पुढील महिन्यामध्ये घेवु जेव्हा ते स्वत: येथे उपस्थित असतील.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— पुढील सभा केव्हा होईल? तो पर्यत ते राहतील किंवा नाही? माझे हेच निवेदन आहे की, आपण उल्हासनगरच्या जनतेच्या बाबतीत न्याय करा. हारामखोर असे बोलणा—या प्राण्या बाबतीत ठराव पारीत झालाच पाहीजे व त्यांची येथुन हकालपट्टी झालीच पाहीजे. अधिकारी लोक आहेतच त्यांना सांगण्यासाठी

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा.महापौरजी माझा असा विचार आहे की, आपण तर आधि निर्णय दिला आहातच त्यावर अंमलबजावणी झाली पाहीजे. जी व्यक्ती येथे......

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— श्री. देवेंद्रसिंहजी ते केवळ ठेकेदारांनाच नव्हे तर आपणास सुध्दा ते हरामखोर म्हणाले. उल्हासनगर मधील जनतेला म्हणाले आहेत. ते ठेकेदार नंतर उल्हासनगरचे नागरिक प्रथम आहेत. अशा व्यक्ति विरोधातील लक्षवेधी सूचना येथे स्विकृत झालीच पाहीजे. ते उल्हासनगर मधील जनतेस बोलले आहेत उल्हासनगर मधील जनते मध्ये आपण सुध्दा येता.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मी, आपल्या मताशी सहमत आहे परंतू माझे म्हणणे आहे की, ज्या व्यक्तीवर आरोप लावले जात आहे ती व्यक्ती समोर उपस्थित असली पाहीजे.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— लक्षवेधी स्विकृत करुन पाहीजे तर ते येई पर्यत सभेचे कामकाज तहकुब करा. दोन दिवसा साठी. ही लक्षवेधी सूचना स्विकृत केली जावी.

मा. महापौर :— श्री.राज असरोंडकरजी, आपण काही बोलू इच्छिता?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— महापौर महोदया, लक्षवेधी सूचना मांडणे सदस्यांचा अधिकार आहे. व वेगवेगळया सदस्यांनी वेगवेगळया पध्दतीने आप आपल्या लक्षवेधी सूचना सभागृहात मांडल्या आहेत. त्यांचा

उद्देशच असा असेल की, तो विषय महत्वपूर्ण असेल चार विषय आपणा समोर होते त्यापैकी दोन विषयांचा निर्णय आपण केला आहात, चारही विषय महत्वपूर्ण होते. तेव्हा आपण निर्णय दिल्या नंतर अमुक हा विषय कमी महत्वपूर्ण व अमूक एक विषय हा अधिक महत्वपूर्ण आहे अशी तुलना आपण करु शकत नाही. निर्णय आपण दिला आहात त्यानुसार त्या लक्षवेधींवर चर्चा झाली पाहीजे.

मा.सदस्य श्री. संजय बठिजा यांनी सभागृहात प्रवेश केला

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— सन्माननिय महापौरजी, श्री. रमेश चव्हाण यांनी लक्षवेधी सूचना दिली आहे व ते ती मागे घेण्यास तयार आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— तो विषय महत्वपुर्ण नव्हता का? सभागृहामध्ये ते त्यांची लक्षवेधी सूचना मागे घेत आहेत तर ती लक्षवेधी सूचना महत्वपूर्ण नाही का?

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— उल्हासनगर मधील शहरवासियांना त्यांनी हरामखोर म्हटले आहे हे आपणास मंजुर आहे काय? कोणीही येवुन हरामखोर बोलत असेल व ते आपणास मंजुर असेल तर सांगा. आयुक्तांनी हरामखोर म्हटले आहे आपण त्यांना प्रोत्साहन देत आहात.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—महापौर महोदया, बिना अनुमती चर्चा करण्याचा हे प्रयत्न करीत आहेत हे चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— बिना अनुमती चर्चा करण्याचा काही एक प्रयत्न नाही

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:— चर्चा सुरु झाली आहे ना?

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— उल्हासनगर वासियांना हरामखोर बोलणा—यांना आपण प्रोत्सहन देत आहात म्हणजेच ........

मा. महापौर :— जेव्हा ते स्वत: तेथे उपस्थित असतील तेव्हा चर्चा होईल. व आता ज्या लक्षवेधी सूचना स्विकृत केल्या आहेत त्यांच्यावर चर्चा करु .

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :— मा.महापौरजी, सचिव साहेब........

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— माझी अशी मागणी आहे की, या विषयावर सात दिवसांचे आंत विशेष महासभा बोलावली जावी. अशी माझी आपणास विनंती आहे. आपणास मंजुर आहे ना? सदस्य बोलतील ना मंजुर आहे की नाही ..... पाहिजे तर मतदान घ्या.सात दिवसांच्या आत सभा बोलवा व त्या सभेत हजर राहण्या बाबत आयुक्तांना सक्त निर्देश दया. सन्माननिय महापौरजी हा असा विषय आहे की, मुले आम्हाला विचारतात की, असे कसे आयुक्त उल्हासनगर मध्ये आले आहेत जे आम्हास हरामखोर म्हणतात व आपण लोक म्हणता की काही केले नाही. शरमेने मेले पाहीजे.

मा. महापौर :— पुढील महासभेत हा विषय घेतला जाईल. कृपया सभेचे पुढील कामकाज चालविले जावे.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— माझे असे म्हणणे आहे की, या विषयावर विशेष महासभा बोलावली जावी.पाहिजे तर या विषयावर मतदान घ्या.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :— मा. महापौर महोदयाजी, उल्हासनगर महानगरपालिकेचे जेवढे काही लोकप्रतिनिधी आहेत ते हिम्मतवान आहेत तेव्हा कुठे ते महासभेत बसले आहेत. कोणीही उल्हासनगर मधील जनते बाबत चुकीचा शब्द वापरत असेल तर कोणताही नगरसेवक ते सहन करणार नाही आम्ही आपल्या सोबत राहू. परंतू तेव्हा जेव्हा आयुक्त साहेब सभागृहात उपस्थित असतील. आयुक्त साहेब बाहेरचे अधिकारी आहेत आमच्या उल्हासनगर मधील नागरिकांना जर कोणी शिव्या देत असेल तर आपण जसे म्हणता तसे गोळया खाण्यास आम्ही तयार आहोत. परंतू कृपया त्यांना समोर येवु दया. आपण पाहिले असेल या अगोदरच्या कुण्या आयुक्तांने जर काही चुकीचे केले असेल किंवा काही चुकीचे करण्याचा प्रयत्न केला असेल तेव्हा आपण सर्वांनी मिळून त्यास झुंज दिली होती. त्याप्रमाणे आयुक्त साहेबांना कृपया येवू दया आपल्या बरोबर आम्ही सर्व सुध्दा

उभे राहू. त्यांनी शिवी दिली आहे तर त्यांच्या विरोधात आम्ही सर्व उभे राहू . या प्रकाराचा विरोध आम्ही सर्व शहरवासि करु. जर त्यांनी असा अपशब्द उल्हासनगर मधील कुण्या नागरिकांस किंवा ठेकेदारास वापरला असेल तर त्यांना समोर येवु दया. आम्ही आपल्या बरोबर आहोत गोळी खाण्यासाठी सुध्दा आपल्या बरोबर तयार असु धन्यवाद.

**मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:—** मा.महापौर महोदया, पुढील महासभेमध्ये ही लक्षवेधी सूचना घेतली जावी.

**मा.सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :—** शहरा मधे चिकुन गुनिया सारख्या साथीच्या आजाराची साथ मोठया प्रमाणावर पसरलेली आहे. आपणास या साथीच्या आजाराची समस्या समजली पाहीजे

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—** मा. महापौरजी, एक मिनीट मला लक्षवेधीवर बोलायचे आहे. शहरामध्ये गोरगरीब लोक मरत आहेत स्मशान भूमीमधे रांगा लागल्या आहेत. व हि काही विशेष महासभा नाही आहे असे होता कामा नये आपण आमच्यावर अन्याय करत आहात. चिकुन गुनीया या साथीच्या रोगामुळे स्मशानभूमि मध्ये रांगा लागल्या आहेत. व आपणास या लक्षवेधीचा विषय विशेष महत्वाचा वाटत नाही. ही आश्चर्यकारक बाब आहे. महापौर महोदया, जनतेच्या बाबतीत आपले जर खरेच प्रेम असेल, प्रत्यक्षात लोक मरत आहेत व आपणास महापालिकेची समाजमंदिरे महत्वाची वाटत आहेत स्मशान भूमी मध्ये ज्या रांगा लागल्या आहेत तो विषय आपणास महत्वाचा वाटत नाही. आपण आमच्या लक्षवेधी बाबत आमच्यावर अन्याय केला आहे हे सूचीत करण्या साठी मी येथे उभा राहिलो आहे. ही अतिशय महत्वपूर्ण लक्षवेधी असल्याने मेहरबानी करुन ती घेतली पाहिजे

**.सदस्या श्रीमती भावना रामचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** श्री. रमेश चव्हाण आपण आपली लक्षवेधी सूचना मांडा.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक ०१

या लक्षवेधी व्दारे मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, सन १९८२ मध्ये संप कालावधीत कामास लागलेल्या श्री. मनोहर रामचंदाणी, श्री. राजकुमार पिंजाणी, व इतर कर्मचा—यांनी जुनी सेवाजेष्ठता मिळावी म्हणुन मा. कामगार न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर केसचा निकाल कर्मचा—यांच्या बाजुने लागल्याने महानगरपालिकेने मा. उच्च न्यायालयात अपिल करण्याचे ठरविले परंतू सदर कर्मचा—यांचे केस मध्ये महापालिपालिकेने आउट आफ कोर्ट सेटलमेंट तत्कालीन आयुक्त डी.आर.डी. शिंदे यांच्या मान्यतेने केलेली आहे.

श्रीमती मनिषा आहुजा, श्री.पी.डी. दिडीकर, श्री. डी.के.रहेजा व इतर कर्मचारी यांनी सन २००१ मध्ये कामगार न्यायालयात जुनी सेवा जेष्ठता मिळावी म्हणुन याचिका दाखल केली होती. सदर केसचा निकाल कर्मचा—यांन कडून लागला असुन मा. कामगार न्यायालयाने जुनी सेवा जेष्ठता मंजुर केली आहे. सदर केसचे विरोधात महापालिकेने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

श्री. रमेश काजळे, श्री. जेठानंद ताराचंद , श्री. तानाजी पंतगराव, श्री. उध्दव लुल्ला, श्री. विठ्ठल येवले, व इतर (केस क्र.६४७/९५) काही कर्मचारी देखिल मा. कामगार न्यायालयात गेलेले आहेत व मा.कामगार न्यायालयाचा निर्णय देखिल त्यांचे बाजुने लागला आहे. सदर कर्मचा—यांना नाही अदयाप न्याय मिळालेला नाही.

असे अजुनही काही कर्मचारी आहेत जे न्यायालयीन खर्च परवडत नसलयाने मा. न्यायालयात गेलेले नाहीत परंतू त्यांच्यावर देखिल अश्या प्रकारचा अन्याय झालेला आहे. या कर्मचा—यांना महापालिका न्याय देणार आहे का?

सन १९७८ मध्ये कामास लागलेल्या श्रीमती मनिषा आहुजा, श्री.पी.डी.दिडीकर, श्री. डी.के.रहेजा, रमेश काजळे व इतर या कर्मचा—यांचे बाबतीत मा. उच्च न्यायालयात अपील दाखल केलेली आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा हावून सविस्तर माहिती मिळावी.

प्रश्न क्र.१) (अ)सन १९७८ मध्ये कामास लागलेल्या कर्मचा—यांचे केस मध्ये महापालिकेने मा. उच्च न्यायालयात जाणेचा निर्णय घेतला आहे काय? सदर कर्मचारी कामगार न्यालयात केस जिंकले आहेत का?

(ब)सन १९८२ मध्ये संप कालावधीत कामास लागलेल्या कर्मचा—यांनी कामगार न्यायालयात याचीका दाखल केली होती का? कामगार न्यायालयाने सदर केस मध्ये कोणाचे बाजूने निकाल दिला? सदर केसचे बाबतीत महापालिकेने मा. उच्च न्यायालयात अपील केले होते का? सदर केस मध्ये महापालिकेने आउट ऑफ कोर्ट

सेटलमेंन्ट केली आहे का? केली असल्यास त्याची कारणे काय? (क)सन १९७८ मध्ये कामास लागलेल्या कर्मचा–यांचे केसचे बाबतीत महापालिका मा. उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहेका? वरील प्रकरणे सारखी आहेत का? असल्यास वरील प्रकरणातील कर्मचा–यांना देण्यात येणारा न्याय वेगवेगळा का देण्यात येत आहे? संबधित कर्मचा–यावर महापालिका अन्याय करीत नाही का? वरील केस मधील कर्मचा–यांचे सेवा नियम सारखे आहेत का? सदर प्रकरणात सन १९८२ मध्ये कामास लागलेले कर्मचारी सन १९७८ मध्ये कामास लागलेल्या कर्मचा–यापेक्षा जास्त पगार घेत आहेत का? शासकिय नियमाप्रमाणे एकाच संवर्गात काम करीत असलेल्या कनिष्ठ (ज्युनिअर) कर्मचा–या एवढे वेतन सेवाजेष्ठ कर्मचा–यांना देता येते का? असा नियम आहे का? असल्यास सदरचे नियमांची सत्यप्रत मिळावी. (ड) श्रीमती मनिषा आहुजा, श्री.पी.डी.दिडीकर, श्री. डी.के. रहेजा व इतर कर्मचारी यांचे केसचे बाबतीत मा. उच्च न्यायालयात अपील दाखल करुन महापालिका खर्च का वाढवून पैसे का खर्च करीत आहे? महापालिका वरील अन्याय ग्रस्त कर्मचा–यांची रोजंदारी वरील सेवा समायोजीत करुन न्याय देणार आहे का? जे कर्मचारी न्यायालयात गेलेले नाहीत अश्या कर्मचा–यांचे बाबतीत सहानुभुतीपूर्वक विचार करावा. तसेच ज्या कर्मचा–यांनी न्यायालयात याचीका दाखल करुन त्यांचे बाजुने निर्णय लागलेला आहे अश्या कर्मचा–यांना मनोहर रामचंदानी व इतर यांचे प्रमाणे आउट ऑफ कोर्ट सेटलमेंट करणार आहे का?

सूचक :–श्री. रमेश चव्हाण
अनुमोदक :–सौ. जयश्री सुनिल सुर्वे

---

<u>मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :–</u> या लक्षवेधी व्दारे मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, सन १९८२ मध्ये संप कालावधीत कामास लागलेल्या श्री. मनोहर रामचंदाणी, श्री. राजकुमार पिंजाणी, व इतर कर्मचा–यांनी जुनी सेवाजेष्ठता मिळावी म्हणुन मा. कामगार न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर केसचा निकाल कर्मचा–यांच्या बाजुने लागल्याने महानगरपालिकेने मा. उच्च न्यायालयात अपिल करण्याचे ठरविले परंतू सदर कर्मचा–यांचे केस मध्ये महापालिपालिकेने आउट आफ कोर्ट सेटलमेंट/समझोता तत्कालीन मा. आयुक्त मा. श्री. डी.आर.डी. शिंदे यांच्या मान्यतेने केलेली आहे.

श्रीमती मनिषा आहुजा, श्री.पी.डी. दिडीकर, श्री. डी.के.रहेजा व इतर कर्मचारी यांनी सन २००१ मध्ये कामगार न्यायालयात जुनी सेवा जेष्ठता मिळावी म्हणुन याचिका दाखल केली होती. सदर केसचा निकाल

कर्मचा–यांन कडून लागला असुन मा. कामगार न्यायालयाने जुनी सेवा जेष्ठता मंजुर केली आहे. सदर केसचे विरोधात महापालिकेने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

श्री. रमेश काजळे, श्री. जेठानंद ताराचंद , श्री. तानाजी पंतगराव, श्री. उधव लुल्ला, श्री. विठ्ठल येवले, व इतर काही कर्मचारी देखिल मा. कामगार न्यायालयात गेलेले आहेत.

काही कर्मचा–यांच्या बाबतीत कोर्टाच्या बाहेर तुम्ही (सेटलमेंट) समझोता करता आणि इतर कर्मचा–यांच्या बाबतीत एकाला एक न्याय देता व दुस–याला दुसरा न्याय देतात याबाबतीत तुमचा कोणता अधिकारी स्पष्टीकरण करेल त्यांने व्यासपीठावर यावे.

<u>श्री. अशोक बागेश्वर (उप आयुक्त (मुख्यालय) :–</u> मा.महापौर महोदया, आताच सन्माननिय नगरसेवक श्री. रमेश चव्हाण यांनी जी लक्षवेधी सूचना मांडली आहे याबाबतील सविस्तर माहिती सध्या तर माझ्याकडे उपलब्ध नाही. मी सभागृहास आश्वासन देवू इच्छितो की, जर एखादया कर्मचा–याच्या बाबतीत न्यायालयाने निर्णय दिल्या नंतर त्या विरोधात अपील न करता न्यायालया बाहेर (सेटलमेंट) समझोता केला असेल तर हाच निकष या कर्मचा–यांच्या बाबतीत सुध्दा लावला जाईल. यांच्या बाबतीत कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> मा. महापौरजी, उप आयुक्त साहेब परवा दिवशी चार सफाई कामगारांच्या बाबतीत आपल्याकडे एक आदेश आला होता त्यांच्या बाबतीत सुध्दा असेच झालेले आहे तर त्याचा खुलासा करावा व त्यांना सुधा न्याय मिळवून दयावा.

<u>श्री. अशोक बागेश्वर (उप आयुक्त (मुख्यालय) :–</u> मा.महापौर महोदया, श्री. चौधरी साहेब जे बोलत आहेत त्याबाबतीत मी या अगोदरच अभ्यास केला आहे आणि याबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त साहेब यांच्याकडे

प्रस्ताव सादर करणार आहे. या अगोदर न्यायालया बाहेर जे (सेटलमेंट) समझोता केला आहे व न्यायालयात अपील करायचे नाही याबाबतचा प्रस्ताव आजच मी आयुक्ताकडे सादर केला आहे.

**मा. सदस्य श्री. धनजंय बोडारे :—** श्री. बागेश्वर साहेब ही जी लक्षवेधी सूचना आणलेली आहे, इतर महत्वाचे विषय, सध्याच्या राजकिय व सामाजिक जिवनावर परिणाम करणारे आहेत जे विषय ते विषय बाजुला सारुन मा. महापौरांनी या विषयाची लक्षवेधी सूचना स्विकृत केली आहे. डेंगु, चिकुन गुनिया या सारखे महत्वाचे विषय होते ते बाजुला ठेवले आहेत. तसेच आयुक्तांचे जे वर्तन आहे त्याबाबतीत महाराज भुल्लर यांनी जे सांगीतले उल्हासनगर शहराचे महापौर/पीठासीन अधिकारी, प्रशासन यांच्याकडून जनतेच्या ज्या अपेक्षा असतात त्या पुर्ण झालेल्या नाहीत ते पुराव्या दाखल सांगितले आहे सध्याच्या राजकीय व सामाजिक जीवनावर परिणाम करणा—या या दोन्ही लक्षवेधी सूचना बाजुला ठेवून या विषयाच्या लक्षवेधीला त्यांनी महत्व दिलेले आहे.या महत्वाच्या लक्षवेधीचे उत्तर महासभेमध्ये आपण दिलेले आहे की, जर असे झाले असेल तर, या अगोदर असे झाले आहे अशी आमची शंभर टक्के खात्री आहे कारण लक्षवेधी मध्ये प्रत्येक ठिकाणी याचिका क्रमांक तुम्हाला दिलेला आहे. यांच्या बाबतीत जर झाले असेल तर बाकीच्या कर्मचा—यांच्या बाबतीत सुध्दा तोच नियम लागु करुन त्यांना त्या प्रकारचा फायदा तुम्ही दयाल आणि तशी कार्यवाही केल्याचा अहवाल पुढच्या महासभेमध्ये दयाल अशी या ठिकाणी मी विनंती करतो.

**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** श्री. बागेश्वर साहेब, १९८२ मध्ये कामाला लागलेल्या कर्मचा—यांच्या बाबतीत त्यांच्याशी तुम्ही न्यायालयाच्या बाहेर सेटलमेंट/समझोता केली त्यामुळे त्या कर्मचा—यांना या कर्मचा—यापेक्षा जास्त पगार मिळतो ते केवळ तुम्ही त्यांच्याशी न्यायालया बाहेर (सेटलमेंट) समझोता केल्या मुळेच आणि आता पर्यत या कर्मचा—यांचे जे नुकसान झाले आहे ते सुध्दा त्यांना भरुन मिळावे. असा अहवाल तुम्ही दयावा व सर्वाना समान न्याय दयावा.

**श्री. अशोक बागेश्वर (उप आयुक्त (मुख्यालय) :—** मा. महापौरजी, हे प्रकरण तपासुन घेतो जर देता येत असेल तर पुर्णत: दिले जाईल याबाबतीत कोणताही अडथळा आणण्याचा किंवा कोणावर अन्याय करण्याचा दृष्ट्रीकोन नाही शक्यतो सर्वाना न्याय मिळेल , आणि कुणाचेही आर्थीक नुकसान होणार नाही या दृष्ट्रीकोनातून विचार करुनच निर्णय घेण्यात येईल.

**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** कधी घेणार हा निर्णय.

**श्री. अशोक बागेश्वर (उप आयुक्त (मुख्यालय) :—** पुढच्या महासभे समोर ठेवु.

**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** पुढच्या महासभेत? ठिक आहे.?

**मा.सचिव :—** पुढील लक्षवेधी सूचना जीचे सूचक आहेत श्री. राज असरोंडकर त्यांनी कृपया आपली लक्षवेधी सूचना मांडावी.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक ०२

उल्हासनगर महानगर क्षेत्रातील महापालिकेने उभारलेली महापालिकेच्या मालकीची समाज मंदिरे खाजगी व्यक्तिंच्या ताब्यात असून महासभेत मा.महापौर यांनी सदर मालमत्ता ताब्यात घेण्याचे आदेश देवूनही प्रशासनाने अंमल केलेला नाही. सदर प्रकरणात काही विदयमान नगरसेवक सामील असुन ही बाब गंभीर आहे.

तरी सदर बाबत मा. आयुक्त यांनी निवेदन करावे, यासाठी लक्षवेधी सूचना.

सूचक :—श्री. राज असरोंडकर

अनुमोदक :—श्री. राजु जग्यासी

---

**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—** मा.महापौर महोदया, लक्षवेधीचे चार विषय होते त्यातील काही महत्वपूर्ण, अतिमहत्वपूर्ण अशा प्रकारची त्यांची वर्गवारी सुध्दा केली मी सुरवातीलाच म्हटले होते की, जो सदस्य लक्षवेधी

सूचना मांडतो त्यास त्यांनी मांडलेला विषय अधिक महत्वपूर्ण वाटतो आणि यासाठीच अशा प्रकारचे विषय लक्षवेधी व्दारे येथे आणण्याचे प्रयत्न केले आहेत. हा जो विषय आहे त्यावर या अगोदर सुदधा प्रश्नोत्तराच्या रुपाने चर्चा झालेली आहे. परंतू पुन्हा एकदा लक्षवेधी सूचनेव्दारे पुन्हा एकदा सभागृहामध्ये आणावा लागला त्यांचे कारण हेच आहे की, मागील वेळेस या प्रश्नावर जी चर्चा झाली होती आपण निवेदन केले होते पीठासीन अधिकारी यांनी आपणास आदेश दिला होता की, एक आठवडयाच्या आत, सात दिवसांच्या आत, महानगरपालिकेची जेव्हढी काही समाज मंदिरे आहेत ती ताब्यात घेतली जावीत. समाज मंदिरे गरीब वस्तीमध्ये बांधणे अपेक्षित असते. याकामांचे प्रस्ताव नगरसेवक निधीतून किंवा महानगरपालिका निधीतून करण्याचे प्रस्तावित करतात. परंतू आज जर आपण पाहिले तर महापालिकेने जी समाज मंदिरे बांधलेली आहेत ती महापालिकेच्या ताब्यात नाहीत. मालमत्ता महापालिकेची आहे परंतू ताबा खाजगी व्यक्तींकडे आहे अशा प्रकारचा कार्यभार येथे चाललेला आहे याबाबत मी मा. आयुक्त यांना पत्र देखिल दिले आहे, महासभे मध्ये प्रश्न देखिल विचारला आहे, आज पुन्हा लक्षवेधी सूचना मांडली आहे याबाबत प्रशासनाकडून मला हेच निवेदन अपेक्षित आहे की, महानगरपालिकेच्या ज्या मालमत्ता आहेत, कारण की, ही समाज मंदिरे बांधण्याचा उद्देश असा आहे की, त्या वस्ती मधील जे गरीब लोक आहेत त्यांचे लहान मोठे कार्यक्रम असतात, पगडी असते, महापालिकेचे काही कार्यक्रम असतात. जसे मी मागील वेळी सुध्दा म्हटले होते की, महानगरपालिकेच्या आरोग्य विभागास एका समाज मंदिराची आवश्यकता होती ते याबाबतीत सहा महिन्या पासुन पत्रव्यवहार करत होते, पाठपुरावा करत होते. परंतू महानगरपालिकेची ४० ते ५० समाज मंदिरे असताना सुदधा आरोग्य विभागास एक समाज मंदिर त्यांच्या स्वत:च्या कार्यक्रमासाठी मिळत नाही. तर हे एक दुर्भाग्य आहे व याबाबतीत जेव्हा आम्ही बाहेर चौकशी करतो तेव्हा प्रशासना कडून अशी माहिती मिळते की, ब—याचशा समाज मंदिरावर माजी नगरसेवकांचा किंवा विद्यमान नगरसेवकांचा ताबा आहे. त्यांच्या कडून ती आपल्या ताब्यात घेणे प्रशासनाला शक्य होत नाही. यास्तव मी, प्रशासनाला विनंती करतो की, त्यांनी वस्तुस्थिती दर्शक निवेदन करावे.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> मा.महापौरजी, आयुक्त साहेब, असेच एक समाजमंदिर सन्माननिय नगरसेवीका श्रीमती सीमा मोकल यांनी हनुमान कॉलनी येथे आपल्या नगरसेवक निधीतून बांधुन घेतले आहे. परंतू तेथील असामाजिक तत्वाच्या लोकांनी त्याचा ताबा घेतलेला आहे व नगरसेविकेने जो फलक लावला होता त्यावर रंग मारुन एका मृत व्यक्तीचे नांव लिहून फोटोही लावला आहे. व तेथे अवैध धंदे चालतात याबाबत मागील वेळेसही आवाज उठविला होता. अेवढया चांगल्या प्रकारचे समाजमंदिर महापालिका आपल्या ताब्यात का घेत नाही? दोन चार महिन्या पूर्वी लहान मुलांसाठी आपणास काही लहान—लहान रुग्णालय उघडायची होती त्यावेळी आरोग्य विभागास सांगण्यात आले होते की, हे समाज मंदिर या कामी आपण वापरात आणु शकता परंतू अदयाप पर्यत ते समाज मंदिर काही समाजकटक लोकांच्या ताब्यात आहेत तेथुन ये—जा करणा—या महिलांना शिवीगाळी केली जाते. यास्तव हे समाज मंदिर महापालिकेने लवकरात लवकर आपल्या ताब्यात घ्यावे अशी मी विनंती करतो.

<u>मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल :—</u> मा. महापौरजी, समाजमंदिरा मध्ये अशा प्रकारचे काम चालत असेल तर उल्हासनगर मध्ये समाजमंदिरे बांधलीच जावु नये. तेथे काय काम चालू आहे हे पहाणे महापालिकेच्या अधिका—यांचे काम आहे. तेथील फलकावर असलेले नगरसेविकेचे नांव रंगाने मिटवून त्याठिकाणी एका मृत तरुणाचे नांव लिहले आहे. महानगरपालिकेचे अधिकारी तेथे जावून पाहून आले आहेत काय?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—</u> या बाबत महापालिकेच्या अधिका—यांकडे लेखी तक्रार दिलेली आहे काय?

<u>मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल :—</u> महासभेमध्ये याबाबत मी स्वत: बोलले होते.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—</u> महासभेमध्ये बोललात परंतू आपण लेखी तक्रार दिली आहे काय?

<u>मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल :—</u> नाही, लेखी देण्याची काय आवश्यकता आहे? येथे बोलल्या बाबत इतिवृत्तांत नोद येत असताना लेखी देण्याची काय आवश्यकता आहे? कमालीची गोष्ट्र आहे ना?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—</u> त्यांनंतरही अदयाप पर्यत काही कारवाई झाली नाही?

<u>मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल :—</u> कमालीची गोष्ट आहे आपण असे कसे मला विचारत आहात?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—</u> हया जे काही बोलत आहेत ते आपणास माहित आहे काय?

**श्री.मीलीद सावंत (उप आयुक्त):—**ही गोष्ट्र मला माहित नाही. १४ जुलै रोजी मी कार्यभार स्विकारलेला आहे.त्या अगोदरचे हे प्रकरण आहे.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—** आता तर आपणास माहित झाले आहे ना? आता आपण या बाबतीत काय कारवाइ करणार ते सांगा? किती दिवसात कारवाइ करणार हे सभागृहाला सांगा.

**श्री.मीलीद सावंत (उप आयुक्त):—** १५ दिवसांचे आत

**मा.महापौर :—** श्री. राजेशजी, आपण काही बोलू इच्छित आहात?

**मा. सदस्य श्री. राजेश वधरिया:—** मा. महापौरजी, बरेचशे पैसे खर्च करुन ज्या उद्देशाने महानगरपालिकेने समाजमंदिरे बांधलेली आहेत त्या उद्देशांची पूर्तता होत नाही. असेच एक समाजमंदिर पॅनेल क्र.२२ मध्ये बॅ.नं. ५४३ च्या समोर आहे. त्याचेवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एका ठेकेदाराचा ताबा आहे. त्याने गोडावुन म्हणुन त्याचा वापर सुरु केला आहे. सीमेंट व लोखंडी सळया ठेवुन गोडावून म्हणुनते वापरत आहेत.तर कृपया करुन दोन दिवसामध्ये ते खाली करुन घेण्यात यावे.

**मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—** मा. महापौरजी, या विषयावर सभागृहामध्ये ब—याच वेळा चर्चा झाली आहे आपण आयुक्त साहेबांना आदेश दयावेत की, त्यांनी याबाबतीत कालबध असा कार्यक्रम तयार करावा.व ज्या मिळकती आपल्या ताब्यात नाहीत त्या ताब्यात घेणे कामी ते कोणती कार्यवाही करतील?

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी ही लक्षवेधी दोन चार महिन्यापूर्वी जेव्हा आणली होती तेव्हा समाज मंदिरे व महानगरपालिकेच्या इतर ज्या काही मिळकती आहेत की ज्या खाजगी व्यक्तीच्या ताब्यात बेकायदेशिररित्या आहेत.मग त्या शाळा असोत कॉलेज असोत किंवा समाजमंदिरे असोत त्या सर्व मिळकती ताब्यात घेण्या बाबत आपण आदेश दिला होता. फक्त समाज मंदिरेच का? महापालिकेच्या जेव्हढया मिळकती आहेत त्या ताब्यात घेण्या बाबत आपण आदेश दया.

**श्री.मीलिंद सावंत (उप आयुक्त):—** मा. महापौर महोदया, उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीची आपल्याकडे ४० समाजमंदिरे आहेत त्यातील ७ समाजमंदिरे आपल्या ताब्यात आहेत. मागे आदेश दिल्या नुसार ती सर्व समाजमंदिरे ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु केली होती. परंतू मध्यंतरी मालमत्ता विभागामध्ये कर्मचा—यांची कमतरता होती. एकच कर्मचारी कार्यरत होता त्यामुळे या कामी थोडी अडचण निर्माण झाली. व आता सभागृहाने जी भावना व्यक्त केली आहे. तसेच अतिरिक्त आयुक्तांनी लेखी आदेश दिले आहेत की, जी काही समाजमंदिरे आहेत ती लवकरात लवकर आपल्या ताब्यात घेतली जावीत त्यानुसार मी निवेदन करु इच्छितो की, मा. अतिरिक्त आयुक्त यांच्या आदेशाचा मान राखुन आपली जी ४० समाज मंदिरे आहेत ती लवकरच आम्ही ताब्यात घेवु व या कार्यावाहीचा अहवाल आम्ही आयुक्त साहेबांना देवु.

**मा.सदस्य श्री. धनजंय बोडारे :—** आयुक्त साहेब, जर अतिरिक्त आयुक्त म्हणुन आपण असा आदेश दिला असेल तर आपण मागील त्याच महासभेचे इतिवृत्त काढा. त्यात अशी चर्चा झाली होती की, महानगरपालिकेच्या जेव्हढया काही इमारती आहेत मग त्या शाळा असोत कॉलेज असोत त्या ताब्यात घेण्यासाठी चर्चे अंती आपण होकार दर्शविलेला आहे त्याबाबत सुध्दा आदेश दया.महानगरपालिकेच्या सर्व मालमत्ता/इमारती ताब्यात घेण्याबाबत आदेश दया.

**मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** सर्वांना सारखाच न्याय दिला पाहिजे.

**मा.सदस्य श्री. धनजंय बोडारे :—** शाळा असोत कॉलेज असोत समाजमंदिर किंवा पाणी पुरवठा विभागाची एखादी मालमत्ता असो अशा प्रकारच्या जेव्हढया काही मालमत्ता असतील त्या सर्व मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी अतिरिक्त आयुक्त यांनी आदेश दयावेत केवळ समाजमंदिरे ताब्यात घेण्या बाबतचे ते आदेश देवू शकत नाहीत. एका साठी एक दुस—यासाठी दुसरा न्याय असता कामा नये.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** ठिक आहे.?

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :— साहेब फक्त ठिक नाही असा आदेश दया. इतिवृत्तांत सुधा अशी नोद आलेली आहे. मालमत्ता जी महानगरपालिकेची आहे मग ती कोणतीही असेना, एकाला एक न्याय व दुस—याला वेगळा न्याय असता कामा नये.

मा.सदस्य श्री. धनजंय बोडारे :— तुम्ही सर्वासाठी एकच आदेश काढा.

श्री.नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:— मा.महापौर महोदया, मा.उप महापौर, मा.विरोधी पक्षनेता यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याअनुषंगाने पूर्वीचे इतिवृत्त पाहून त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येइल.

मा.सदस्य श्री. रामदास उमाप :— मा. महापौरजी, आयुक्त साहेबांनी आता जे निवेदन दिले आहे. मी आयुक्त साहेबानां विचारु इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या शहरात एकूण किती मालमत्ता आहेत. प्रशासन अेवढे सुस्त आणि निद्रीस्त आहेत की,

मा.महापौर :— कृपया आपण बसुन घ्यावे सचिव महोदय सभेचे पुढील कामकाज चालू करावे.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— विषय कमांक.२ वाचून दाखवितात

विषय कमांक.२ :— मागील महासभेचे दिनांक २०.९.२००६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे

काही सदस्य पास पास

मा.सदस्य श्री. राजेश वधारिया :— मा. महापौरजी, दि.२०.९.२००६ रोजी जी पहिली महासभा झाली होती त्यासभेचे इतिवृत्त कायम केले जावे. त्यांनतर जी बेकायदेशिररित्या सभा चालविण्यात आली होती.

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :— बेकायदेशिर आपण कसे म्हणु शकता? आपण कोण होतात कायदेशिर आणि बेकायदेशिर म्हणणारे?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :— हा न्यायालयाचा अवमान आहे, प्रकरण न्यायालयात प्रलबित आहे.

मा. महापौर :— प्रकरण न्यायालयात आहे तर इतिवृत्त वगळून इतर बाबीं बाबत न्यायालयाचा निर्णय आल्या नंतर विचार करु.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :— त्यासभेचे इतिवृत्त कायम करावे लागेल.

मा. महापौर :— सचिव साहेब, सभेचे पुढील कामकाज चालविले जावे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— आम्ही इतिवृत्त कायम करु

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :— त्याबाबत सभागृह निर्णय घेईल

मा. महापौर :— न्यायालय ठरवेल.न्यायालयाचा निर्णय आल्या नंतर

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— बहूमताने आम्ही निर्णय घेवु.

मा. महापौर :— इतिवृत्त कायम केले जाणार नाही. ती सभा बेकायदेशिर असल्याचे मी घोषित केले होते व प्रकरण सध्या न्यायालयात प्रलंबित आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— याबाबतीत आपण निर्णय घेवु शकत नाहीत बहुसंख्य सदस्य निर्णय घेतील.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :—बहुसंख्य सदस्य निर्णय घेतील.

मा. महापौर :— काय न्यायालयावर आपला भरोसा नाही काय?

मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :— आपल्यावर भरोसा नाही न्यायालयावर भरोसा आहे.

मा. महापौर :— न्यायालयाचा निर्णय आल्या नंतरच त्याबाबतीत निर्णय घेतला जाईल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:— आपल्याकडे बहुमत नाही, आमच्याकडे बहुमत आहे आम्ही बहुमताने निर्णय घेवु.

मा. महापौर :— सचिव महोदयांना निर्देश देते की, या बाबतीत कायदा काय आहे? याची माहिती दयावी.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :— सांगा सांगा

मा. सदस्य श्री. मोहन बेहराणी :— आपण बहुमत गमावले आहे, याबाबतीत बहुसंख्य सदस्य निर्णय घेतील.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— मा. महापौर महोदया, .......

मा सदस्य श्री. पृथ्वी वलेच्छा :— जो काही निर्णय घायचा तो महापौर घेतील.

मा सदस्य श्री.राजेश वधारिया :— महापौरजी, आपले सन्माननिय सदस्य श्री. मोहन बेहरानी यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याचे मी उत्तर देवू इच्छितो ती सभा बेकायदेशिर यासाठी आहे की, त्याबाबतीत महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे. दुस—या सभेची जी पूरक सूचना देण्यात आलेली आहे ती चुकीच्या पध्दतीने देण्यात आलेली आहे यासाठीच ती सूचना बेकायदेशिर असल्याचे घोषित करण्यात आले आहे आणि त्यानंतर सभा बेकायदेशिर असल्याचे घोषित करण्यात आले आहे.

मा सदस्य श्री.लाल पंजाबी :— महापौर महोदया, याबाबतीत सर्वाना बोलू दिले जावे.

मा. महापौर :— कृपया मध्ये कोणी बोलू नये श्री. राजेश वधरिया यांना बोलू दिले जावे.

मा सदस्य श्री.राजेश वधारिया :— जी सभा नंतर चालविण्यात आली ती बेकायदेशिर असल्याचे घोषित करण्याची आवश्यकताच नव्हती कारण जी पूरक सूचना काढण्यात आली होती ज्या सूचने नूसार त्यासभेचे कामकाज चालविण्यात आले ती सूचनाच बेकायदेशिर आहे. त्यामुळे ती जी सभा चालली ती सूध्दा बेकायदेशिर आहे.

मा सदस्य श्री. धनंजय बोडारे :— महापौर महोदया, इतिवृत्त हे मागील सभेमध्ये जे झाले आहे ते आले आहे की नाही याबाबतीचे असते जे कामकाज झाले ते कायदेशिर आहे कि बेकायदेशिर आहे हे न्यायालय ठरवेल परंतू महासभेचे जे अधिकार आहेत ते महासभेनेच वापरले पाहीजे महासभेचे अस्तित्व आम्ही गमावू इच्छित नाही. न्यायालय जो निर्णय देइल तो आपणास, आम्हास, सर्वाना मान्य करावा लागेल. कामकाज कायदेशिर आहे की बेकायदेशिर आहे हे न्यायालय ठरवेल परंतू इतिवृत्त जे आहे ते कायम करण्यास हरकत काय आहे? बेकायदेशिर असेल तर बेकायदेशिर राहील कायदेशिर असेल तर कायदेशिर राहील.

मा सदस्य श्री.लाल पंजाबी :— मा. महापौरजी जसे आमच्या विरोधी पक्षनेत्याने म्हटले सध्या प्रकरण न्यायालयात न्याय प्रविष्ठ आहे परंतू जेथ पर्यत इतिवृत्त कायम करण्याचा प्रश्न आहे इतिवृत्ताचा अर्थ हा असतो की, जे इतिवृत्त लिहिले आहे ते बिनचुक लिहिले आहे किंवा नाही? हे पाहिले जाते त्यामध्ये कायदेशिर किंवा बेकायदेशिरतेचा प्रश्न नसतो. व याबाबतीत न्यायालयाचा एक निर्णय मी आपणास सांगु इच्छितो की, श्री. रावसाहेब बाबासाहेब काथारे विरुध्द महाराष्ट्र राज्यशासन या प्रकरणा बाबतीत १९९८ चा न्यायालयाचा एक निवाडा आहे.त्यामध्ये असा निर्णय आहे की,

"confirmation of the minutes of an earlier meeting is a declaration of minutes have been accurately written it does not give them additional force again by considering or re-considering of the merits of the resolution."

त्यानुसार इतिवृत्त कायम करण्या बाबत काहीही हरकत नाही याबाबतीत आम्ही शिवसेना भाजपा, कॉग्रेस, राष्ट्रवादी पार्टीच्या काही सदस्यांच्या अश्या प्रकारे एकूण ३७ पालिका सदस्यांच्या सहयांचा एक ठराव दिला असून महापालिका सचिवांनी त्या सभेचे तयार केलेले पृष्ठ क्र.१ ते ३९ चे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्याचा ठरावाची प्रत आजच्या सभेत मा.महापौर, आयुक्त व सचिवांना लेखीस्वरुपात प्रस्तुत केली आहे. म्हणुन हे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यात यावे असा ठराव आम्ही मांडतो.

मा सदस्य श्री.किशोर वनवारी :– ब–याचश्या सदस्यांच्या सहया घेण्याचे बाकी आहे पाहिजे तर आणखी काही सदस्यांच्या सहया घेवुन देवु.

मा.महापौर :– सचिव महोदयांना मी सांगु इच्छिते की, याबाबतीत कायदेतज्ञाचा सल्ला घेवुन जे काही करायचे ते करावे. जी सभा बेकायदेशिर असल्याचे घोषित केले आहे व जन गण मन नंतर जी सभा झाली आहे त्यासभेचे इतिवृत्त आम्ही कायम करणार नाहीत. कारण की प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे त्या बाबतीत काय केले जावु शकते याबाबतीत कायदेतज्ञांचा सल्ला घ्यावा.

मा सदस्य श्री.मोहन बेहरानी :– आपण बेकायदेशिरपणे घोषित केले आहे सभा बेकायदेशिर नाही.

मा सदस्य श्री.देवेन्द्रसिंह खेमाणी :– मी या गोष्टीचा विरोध करतो की, जन गण मन कधीही बेकायदेशिर होवू शकत नाही.

मा सदस्य श्री.मोहन बेहरानी– जण गण मन मध्येच बोलणे हे बेकायदेशिर ठरते आपणास माहिती असले पाहीजे आपणास कायदयाची माहिती नाही.

मा सदस्य श्री.किशोर वनवारी :– सचिव साहेबांना बोलू दिले जावे.

मा.महापौर :– श्री. देवेंद्रसिंह आपण बोला.

मा सदस्य श्री.विनोद ठाकुर :– सचिव साहेबांना बोलू दिले जावे.

मा सदस्य श्री.मोहन बेहरानी :– पुर्ण दिवस आपणच बोलत राहणार का? दुस–यांना बोलू दया, सचिवांना बोलू दया.

मा सदस्य श्री.देंवेंद्रसिंह खेमाणी :– मा.महापौरजी आपल्या अधिनिर्णया नंतर मी बोलू इच्छित नव्हतो परंतू .

मा सदस्य श्री.मोहन बेहरानी :– मग का बोलत आहात?

मा सदस्य श्री.देंवेंद्रसिंह खेमाणी :– श्री. मोहन बेहराणी यांनी मला बोलण्यास प्रवृत्त केले म्हणुन मी बोलत आहे. मी असे मानतो की जेव्हा आपण राष्ट्रगित गाउन पुर्ण केले त्यावेळेसच सभेचे कामकाज पुर्ण झाले व त्यानंतर बेकायदेशिर सभा सुरु झाली.

मा. महापौर :– हे बोलण्याची आवश्यकता नाही हे सर्वांना माहित असल्यात जमा आहे. सचिव साहेब आपण आपले मत दया.

मा सदस्य श्री.धनजंय बोडारे :– महापौर महोदया, त्यासभेचे इतिवृत्त कायम करण्या साठी ३७ सदस्यांनी सहया करुन एक पत्र दिले आहे व त्या अगोदर सभा तहकूब करण्याचा जो एक ठराव होता त्या बाबतीत जे मतदान घेण्यात आले होते त्या प्रस्तावाच्या बाजुने २९ सदस्य होते कोणत्याही महासभेमध्ये कोणत्याही विषया

बाबत जर मतभेद असतील तर बहुमताने निर्णय घेतला जातो. ३७ सदस्य इतिवृत्त कायम करण्याच्या बाजुने आहेत व ......

काही सदस्य :— २९ नाहीत आता ३१ सदस्य आहेत.

मा सदस्य श्री.धनजंय बोडारे :— ३१ सदस्य इतिवृत्त कायम न करण्याच्या बाजुने आहेत. कोणत्याही विषयावर जर मतभिन्नता होत असेल तर बहुमताने निर्णय घेतला जातो त्यानुसार त्या सभेचे इतिवृत्त कायम करण्याच्या बाजुने ३७ सदस्य आहेत. व त्या विरोधात ३१ सदस्य आहेत सचिव साहेब आपण या विषयावर बोलू इच्छित होतात.........

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— मा. महापौर महोदया, हे जे इतिवृत्त आहेत त्यामध्ये दोन्ही परिस्थितीचा उल्लेख आहे एक पहिल्या सभेची जी परिस्थिती आहे ती, व दुस—या सभेची जी परिस्थिती आहे ती व हे सर्वच्या सर्व इतिवृत्त मा. उच्च न्यायालयातच सादर करण्यात आलेले आहे.येथे याबाबतीत निर्णय घेतला पाहिजे की,त्या दिवशी ज्या घटना घडल्या त्याची इतिवृत्तांमध्ये नोंद आली आहे किंवा नाही हे पाहून इतिवृत्त कायम करण्यास हरकत नाही सभेच्या कायदेशिर बेकायदेशिरते बाबत मा. उच्च न्यायालय जो निर्णय देईल त्याचा परिणाम साहाजिकच इतिवृत्तावर येईल परंतू इतिवृत्त कायम करण्यास काही हरकत नसावी.

मा सदस्य श्री.किशोर वनवारी :— पास पास

मा सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधीन राहून

मा सदस्य श्री.किशोर वनवारी :— नाही, नाही, त्याच्याशी तर बांधील आहोत परंतू इतिवृत्तांता मध्ये तशी नोद येवु देणार नाही.

मा. महापौर :— सचिव महोदय या विषयावर मतदान घ्या.

मा सदस्य श्री.किशोर वनवारी :— होय, कृपया मतदान घ्या.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— दि. २०.९.२००६ रोजी झालेल्या सभेच्या पहिल्या व दुस—या भागाचे इतिवृत्त पृष्ट क्र. १ ते ३९ चे एकत्रित इतिवृत्त कायम करण्याच्या बाजुने जे सन्माननिय सदस्य आहेत व केवळ पृष्ठ क्र. १ ते २३ पर्यतचे इतिवृत्त कायम करण्याच्या विरोधात जे सदस्य आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

इतिवृत्त कायम करण्याच्या बाजुने ३७ मते

१श्री. धनंजय बोडारे
२.श्री. मोहन बेहरानी
३.श्री. अशोक ठाकुर
४.श्रीमती मालती करौतिया
५.श्री. प्रमोद टाले
६.श्री. गौतम भालेराव
७.श्रीमती बेबी वसीटा
८.श्रीमती कोमल बठीजा
९.श्रीमती दिपा पंजाबी
१०.श्रीमती मोना वनवारी
११.श्रीमती किरण माखिजा
१२. श्री. किशोर वनवारी
१३.श्री. मोहनदास रामरख्यानी
१४श्री.श्यामसुंदर रोहरा
१५.श्री. राजु टेकचंदानी

१६.श्री. विनोद ठाकुर
१७.श्री. लाल बिहारी यादव
१८.श्री. सुरेश जाधव
१९श्री. अंकुश म्हस्के
२०.श्री. अन्नु मनवानी
२१. श्री. रमेश चव्हाण
२२. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२३. श्री. राजेंद्र चौधरी
२४. श्री. दिलीप गायकवाड
२५. श्री. नथु सोनावणे
२६. श्रीमती नंदिनी बामणकर
२७. श्रीमती जयश्री सुर्वे
२८. श्रीमती प्रेमा खांडेकर
२९. श्री. शामू वाघे
३०. श्री. बच्चाराम रुपचंदानी
३१. श्री. रामदास उमाप
३२. श्री. जमनु पुरस्वानी
३३. श्रीमती संगिता जावळे
३४ श्रीमती रेखा कृष्णानी
३५. श्रीमती लक्ष्मी ससाणे.
३६. श्रीमती सीमा मोकल
३७. श्री. प्रशांत जाधव

जे पालिका सदस्य केवळ सभेच्या पहिल्या भागाचे इतिवृत्त पृष्ठ क्र. १ ते २३ पर्यत कायम करण्याच्या बाजुने आहेत. अणि पहिल्या व दुस–या सभेचे एकत्रित इतिवृत्त पृष्ठ क्र. १ ते ३९ चे इतिवृत्त कायम करण्याच्या बाजुने नाहीत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>दुस–या सभेचे इतिवृत्त कायम न करण्याच्या बाजुने ३१ मते.</u>

१.श्रीमती ज्योती कालानी
२.श्री.विनोंद तलरेजा
३.श्री. हौशियारसिंह लबाणा
४.श्री. सतरामदास जेसवाणी
५.श्री.बबन लिंगे
६.श्री. गणपत एडके
७.श्री. सुरेश गायकवाड
८.श्री. चंदाराम मोकल
९.श्री. नरेंद्र कुमार ठाकुर
१०.श्री. देवेंद्रसिंह खेमाणी
११श्री. प्रभुनाथ गुप्ता
१२.श्री. पृथ्वी वलेच्छा
१३.श्री. नाना पवार
१४.श्री. शांताराम निकम
१५.श्री. राजु जग्यासी
१६.श्री. राज असरोंडकर
१७.श्रीमती कमला शर्मा
१८.श्रीमती मिनु दासानी
१९श्रीमती भारती छाब्रीया

२०श्रीमती निता आहुजा
२१डॉ. नीना नाथानी
२२.श्रीमती माया मसंद
२३. श्रीमती भावना खिलनानी
२४. श्रीमती रेखा कारीरा
२५. श्रीमती सुजाता रिझवानी
२६. श्रीमती मिना सोंडे
२७. श्री. मनोज साधवानी
२८. श्री. ईश्वर पमनानी
२९. श्रीमती भावना रामचंदानी
३०.श्रीमती अनिता गुप्ता
३१. श्री. संजय भठीजा

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :– इतिवृत्त बहुमताने कायम करावे लागेल.

सूचक : श्री. धनंजय बोडारे

अनुमोदक : श्री. बच्चाराम रुपचंदानी

महासभा ठराव क्र. १९ क दिनांक : २०/१०/२००६

ही महासभा दिनांक २०/०९/२००६ रोजीच्या महासभेच्या इतिवृत्तातील सचिवांनी प्रस्तुत केलेले पृष्ठ क्र. १ ते ३९ जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

बहुमताने

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. महापौर :– मागील महासभेचे दि. २०.९.२००६ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे वरील ठराव क्र. १९ क नुसार बहुमताने कायम करण्यात येत आहे.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :– विषय क्रमांक.३ वाचून दाखविताता.

विषय क्रमांक.३ :– उल्हासनगर–४ येथील जिजामाता उद्यानाचा विकास व नुतनीकरण करणेकामी महापालिकेस अर्थसंकल्पीय (उद्यान नुतनीकरण व दुरुस्ती) लेखा शिर्षातील अनुदानात रु. २५ लाख समायोजन करण्यास मान्य ता देणे.

मा.सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला

**मा. महापौर :—** सन्माननिय सदस्यों उल्हासनगर —४ येथे बाळ शिवाजी आणि जिजामातेचा पुतळा आहे त्या उदयानाची स्थिती फारशी चांगली नाही. पाण्याची टाकी तयार करण्यात आली आहे. हा विषय या साठी येथे आणण्यात आलेला आहे की, तेथे बाळ शिवाजी राजांचे एक सुंदरसे उदयान तयार व्हावे उदयांन बाबतीत मी नेहमीच सकारात्मक विचार करते शहरास आपण चांगल्यात चांगली उदयाने दयावीत. तर कृपया माझी सर्वाना अशी विनंती आहे की, हा प्रस्ताव सर्वानुमते पारीत केला जावा.

**काही सदस्यः—** पास पास सर्व संमतीने.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** हा विषय अतिशय महत्वपूर्ण आहे.काही तांत्रीक अडचणी आल्यामुळे तीन चार वर्षा पासुन हे काम चालू आहे. प्रशासनाने या कामामध्ये फारच सर्तकता दाखविली त्यासाठी प्रशासनाला धन्यवाद देतो. एवढा पाठपूरावा केल्या नंतर कुठे हा प्रस्ताव स्थायी समिती, महासभे पुढे आला. परंतू हे काम लवकरात लवकर करण्यासाठी पुढील सभेची वाट न पहाता कार्यारंभ आदेशपत्र देण्या बाबत मी आपणास शिफारस करतो. व आयुक्त महोदय व महापौर महोदया या सभेचे इतिवृत्त कायम होण्या अगोदर या कामी पुढील कार्यवाही जी आहे ती चालु केली जावी.

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—** इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता ...

**मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** पास पास



**मा.महापौर :—** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ३ :—** उल्हासनगर—४ येथील जिजामाता उद्यानाचा विकास व नुतनीकरण करणेकामी महापालिकेस अर्थसंकल्पीय (उद्यान नुतनीकरण व दुरुस्ती) लेखा शिर्षातील अनुदानात रु. २५ लाख समायोजन करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

वर्ष 2003 मध्ये उल्हासनगर-4 येथील जिजामाता व बालशिवाजी राजे यांच्या पूर्णाकृती पुतळयाच्या सभोवताली उद्यानाचे सुशोभिकरण करण्याकरिता काही नगरसेवकांनी मागणी केली होती. या कामाचे संकल्प चित्र त्यांनी खाजगीरित्या तयार करून घेतले होते. त्यावर्षी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष अ अंदाजपत्रक भाग-1 क-5 (V) मध्ये रू 10,00,000 लक्ष इतकी तरतुद होती. या तरतुदी इतके रू.9,99,418/- खर्चाचे या कामाचे प्राकलन त्यावेळी तयार करण्यात आले होते. सदर प्राकलन वर्ष 2000-2001 च्या जिल्हा दर सूची व दरपृथ्थकरणावर आधारीत होते. अर्थ संकल्पीय तरतुदीच्या प्रमाणात प्राकलन तयार करण्यात आलेले असल्याने संकल्पचित्रातील ब-याचशा बाबी त्यामध्ये अंतर्भूत नव्हत्या. सदर कामाची निविदा कार्यवाही करून सर्वात कमी दराचे निविदाकार मे.सुदेश एन्टरप्रायजेस यांना त्यांनी दिलेल्या 2.52% कमी दरावर कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. आतापर्यंत झालेले काम पहाता संकल्पचित्राप्रमाणे काही बाबींची कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्याशिवाय खालील अतिरिक्त बाबी ज्या मुळ प्राकलनात गृहित धरलेल्या नव्हत्या त्यांची कार्यवाही झालेली आहे. त्यावरील खर्च खाली नमुद आहे.

| अतिरिक्त बाब | परिमाण | दर | खर्च |
|---|---|---|---|
| 1) दर्शनी भागात खंडकी (दगडी) बांधकाम | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| बुरूजासह | 43.77 | 2771.15 | 121293.24 |
| 2) सी.सी एम 15 कोपींग | 3.74 | 2464.98 | 9219.03 |
| (कामाची कार्यवाही होणे बाकी आहे.) | | | ------- |
| | | अतिरिक्त बाबींवरील एकूण खर्च | 130512.27 |

या बाबी अतिरिक्त असल्याने त्यास मंजुरी घेणे आवश्यक होते. त्या जागेत दर्शनी भागात असलेली पोलीस चौकी हटविण्यास सुमारे 1 वर्ष लागले होते. त्यामुळे कामास विलंब झालेला असल्याचे मे.सुदेश एंटरप्रायजेस यांचे म्हणणे आहे. पोलीस चौकी हटविल्यानंतर डिसेंबर 2004 नंतर याठिकाणी दर्शनी भागात खंडकी दगडी बांधकामचे काम झालेले आहे. वर्ष 2000-2001 च्या दरसुचीवर आधारीत तयार केलेल्या प्राकलनीय खर्चावर मे. सुरेश एन्टरप्राझेस यांचे दर 2.52% कमी दराचे आहेत त्यातच अतिरिक्त कामांमुळे या कामावरील खर्चात वाढ अपेक्षित आहे. सदर काम पूर्ण करून घेणेकरीता मा. कार्यकारी अभियंता यांनी पत्र क्र.उमपा/साबांवि/काअ/583/05 नुसार मे. सुदेश एन्टरप्राझेस यांना काम ताबडतोब सुरू करण्यास अन्यथा त्यांचे जबाबदारीवर व खर्चावर सदर काम अन्य एजन्सी कडून करून घेण्यात येईल अशी ताकीद दिली होती. या पत्रास अनुसरून मे. सुदेश एन्टरप्राझेस यांनी त्यांचे कडील पत्र दि. 17/11/2005 च्या पत्राव्दारे उत्तर दिले आहे. या पत्रात त्यांनी या कामाबाबत 6 अटी टाकल्या आहेत. महानगरपालिकेशी त्यांनी केलेल्या करारनाम्याप्रमाणे व निविदा अटी शर्ती प्रमाणे त्यांची कोणतीही अट मान्य करता येणार नव्हती. तथापी उक्त कामात झालेल्या विलंबास काहि अशी मे. सुदेश एन्टरप्राझेस कारणीभूत नसल्याचे दिसत असल्याने त्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना दिनांक 30/6/2006 पर्यंत मुदत वाढ व अतिरिक्त बाबींचे देयक अदा करण्यात आले होते.

दिनांक 30/3/2006 पर्यंत कामाची मुदतवाढ देऊन मे.सुदेश एंटरप्रायजेस यांनी कोणतेही काम सुरु केलेले नाही. याबाबत इकडील पत्र क्र.उमपा/साबांवि/काअ/13/06 दिनांक 17/4/2006 व पत्र क्र.उमपा/साबांवि/काअ/31/06 दिनांक 27/4/2006 नुसार काम सुरु करण्याकरीता सूचना ही देण्यात आल्या. या पत्रास अनुसरुन मे.सुदेश एंटरप्रायजेस यांनी त्यांचेकडील दिनांक 3/5/2006 च्या पत्रानुसार उर्वरीत काम नवीन दराने देण्याची मागणी केली आहे. याबाबत असे नमुद करण्यात येत आहे की उक्त काम त्या ठिकाणी असलेल्या पोलिस चौकी हटविण्याच्या कारणामुळे व मे.सुदेश एंटरप्रायजेस यांनी कार्यवाही केलेल्या काही अतिरिक्त कामास मंजूरी नसल्यामुळे मे.सुदेश एंटरप्रायजेस यांनी थांबविले होते. पोलिस चौकी हटविल्यानंतरही सदर कामाची प्रगती केली नसल्याने त्यांचे जबाबदारीवर व खर्चावर अन्य एजन्सी कडून काम करुन घेण्याकरीता महानगरपालिकेने निविदा कार्यवाही केली होती. परंतू या निविदेस प्रतिसाद मिळाला नव्हता. दरम्यान मे.सुदेश एन्टरप्रायजेस यांनी त्यांचेकडील दिनांक 17/11/2005 च्या पत्रानुसार सदर कामाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने खालील बाबींची पूर्तता करुन दिल्यास त्यांचेकडून काम पूर्ण करुन देण्यात येईल असे कळविले होते.

1) वरील कामास तात्काळ 3 महिन्याची मुदत वाढ देण्यात यावी.
2) इस्टीमेटशिवाय करण्यात आलेल्या वाढीव कामास तात्काळ मंजूरी देणे.
3) मागील पूर्ण केलेल्या कामाचे अंदाजित रु.2.00 लाखाचे बील तात्काळ देणे.
4) पुढील काम पूर्ण करण्यास लागणारा वित्तीय पुरवठा जसजसे काम होईल त्याप्रमाणे तात्काळ देणे.
5) कोणत्याही प्रकारचे विलंबशुल्क किंवा दंड न आकारणे
6) काम पूर्ण झाल्यानंतर फायनल बीलाची रक्कम 15 दिवसात अदा करणे.

उपरोक्त पत्रात त्यांनी दर वाढवून देण्याची मागणी केली नव्हती. त्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांनी केलेल्या काही अतिरिक्त कामाचे देयकही त्यांना अदा करण्यात आलेले आहे. त्यानंतर मागील 2 पत्रे व वारंवार वैयक्तिकरित्या सांगूनही मे.सुदेश एंटरप्रायजेस यांनी त्यांच्या दिनांक 17/11/2005 च्या पत्रानुसार काम पूर्ण करुन देण्यास मान्य असल्याचे कळवूनही ते काम करीत नाहीत उलट त्यांनी त्यांच्या कडील 30/4/2006 व दिनांक 3/5/2000 च्या पत्रान्वये आता सर्व जबाबदारी महानगरपालिकेवर टाकून काम करण्यास टाळाटाळ करीत आहे. त्यांनी त्यांच्या पत्रात नमुद केलेल्या बाबी वस्तुस्थितीस धरुन नसून दिशाभूल करण्या-या आहेत. त्यांच्या पत्रातील प्रत्येक मुद्यास अनुसरुन स्पष्टीकरण व माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

1) अ) प्रस्तुत कामाचे संकल्पचित्र स्थानिक नगरसेवक यांनी तयार करुन दिले होते. अर्थसंकल्पिय तरतूद व उपलब्ध निधी यांच्या चौकटीत तयार करण्यात आलेल्या प्राकलनाप्रमाणे निविदा कार्यवाही करण्यात आलेली होती. त्याप्रमाणे निविदेतील बाबींची कार्यवाही मे.सुदेश एंटरप्रायजेस यांचेवर सोपविलेले होते.

ब) सदर आराखडा प्राकलनापूर्वीच उपलब्ध होता. या निविदा कार्यवाहीच्या वेळी मे.सुदेश एंटरप्रायजेस यांनी पाहिलेला होता.

क) सदर पोलिस चौकी दर्शनी भागात होती. चौकीचा भाग वगळता उर्वरीत कामास जागा उपलब्ध होती.

ड) निविदेत असलेल्या तरतूदीप्रमाणे मे.सुदेश एंटरप्रायजेस यांनी केलेल्या कामाचे देयक तयार करण्यात आल्याचे व त्यांना प्रत्यक्षात अदा करण्यात आल्याच्या तारखा खाली नमूद आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| पहिले देयक | 8/6/2004 | 3/7/2004 | रु.1.82 लक्ष |
| दुसरे देयक | 18/3/2005 | 12/5/2005 | रु.2.03 लक्ष |
| तिसरे देयक | 10/2/2006 | 16/2/2006 | रु.1.85 लक्ष |

3) दर्शनी भागातील दगडी बांधकाम करण्याकरीता उल्हासनगर महानगरपालिकेने सांगितले नव्हते. तरीसुध्दा त्यांनी केलेल्या कामाचे अतिरिक्त बाबीस मंजूरी घेवून देयक अदा करण्यात आले आहे.

4) मे.सुदेश एन्टरप्रायजेस यांनी पोलिस चौकी हटवून देवूनही आपल्या मर्जीने काम बंद ठेवले होते. त्यामुळे कामास विलंब झाला होता. त्यामुळे बाजारभाव वाढीमुळे होणा-या नुकसानीस तेच जबाबदार आहेत.

5) मे.सुदेश एन्टरप्रायझेस यांनी त्यांच्या दिनांक 17/11/2005 च्या पत्रात मान्य केल्याप्रमाणे उर्वरीत कामाची कार्यवाही करण्याकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे इतर बाबी महानगरपालिकेच्या दिनांक 12/5/2005 च्या पत्रात नमूद करणे आवश्यक नाही. निविदा अर्टी, शर्ती परिच्छेत 14 अनुसार कंत्राटदाराचे मुदत संपण्यापूर्वी एक महिना आधी मुदतवाढ मागण्याकरीता पत्र दिलेले आढळत नाही. तरीसुध्दा महानगरपालिकेतर्फे कामाची कार्यवाही होण्याच्या दृष्टीने दिनांक 30/3/2006 पर्यंत मुदतवाढ दिली होती.

निविदा अटी शर्ती प्रमाणे ठेकेदाराने कामाची मुदतवाढीकरीता एक महिना आगावू अर्ज करणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेने पूर्वी मुदत वाढ देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

मे.सुदेश एन्टरप्रायझेस यांनी त्यांच्या दिनांक 17/11/2005 च्या पत्रात कबुल केल्याप्रमाणे उर्वरीत कामाची कार्यवाही करणेकरीता त्यांना 30/3/2006 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

या कामास झालेला विलंब पोलिस चौकी हटविल्यामुळे झालेला होता. परंतू सदर पोलिस चौकी हटविल्यानंतर महानगरपालिकेने कामाची मुदतवाढ व मे.सुदेश एंटरप्रायजेस यांचे प्रलंबित देयक अदा करुनही त्यांनी त्यांच्या दिनांक 17/11/2005 प्रमाणे कबुल केल्याप्रमाणे उर्वरीत काम सुरु करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे दिसत असल्याने त्यांना यापूर्वी इकडील पत्र क्र.उमपा/साबांवि/काअ/13/06 दिनांक 17/4/2006 व पत्र क्र. उमपा/साबांवि/काअ/31/06 दिनांक 27/4/2006 नुसार दोन वेळा लेखी व वारंवार तोंडी सांगून मुदत कामास सुरुवात केलेली नाही उलट कामास झालेल्या विलंबामुळे बाजारभाव वाढल्यामुळे निविदा दर वाढवून देणेकरीता मागणी करीत आहेत. मे.सुदेश एंटरप्रायजेस यांच्या दिनांक 17/11/2005 च्या पत्रामध्ये त्यांनी दर्शविलेल्या अटीमध्ये दरवाढीचा उल्लेख नाही. तसेच निविदा अटी शर्ती परिच्छेद 37 अन्वये या पत्रात त्यांनी दिलेल्या सर्व अटींची महानगरपालिकेने पूर्तता करुनही ते कामास टाळाटाळ करीत असल्याने त्यांचेवर निविदा अटी शर्ती परिच्छेद 3 (C) प्रमाणे कार्यवाही करुन मे.सुदेश एंटरप्रायजेस यांची संविदा रद्द करुन त्यांचे खर्चावर (Risk Cost) वर अन्य एजन्सी कडून करुन घेण्यास प्रस्तावित करण्यात आलेले आहे. मे.सुदेश एंटरप्रायजेस यांच्या संविदेनुसार त्यांनी आतापर्यंत केलेल्या कामाचे व त्यांची महानगरपालिकेकडे जमा असलेली रक्कम खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) निविदा रक्कमेच्या 2% प्रमाणे सुरक्षा अनामत | रु.20000/- | (1) |
| 2) त्यांना अदा केलेल्या देयकामधून 3% प्रमाणे वळती केलेली सुरक्षा अनामत | रु.17088/- | (2) |
| 3) फायबरच्या धबधब्याच्या कामामध्ये त्यांना देय असलेली रक्कम (दर पृथ्थकरणानुसार) | | |
| 1) निविदा बाबीतील केलेले काम | | |
| अ) फायबरच्या धबधब्याचा साचा तयार करणे | रु.68000/- | |
| ब) फायबरच्या धबधब्याची उभारणी करणे | रु.104000/- | |
| | रु.172000/- | |
| वजा 2.50% कमी दर | रु.43344/- | |
| | रु.167666/- | |
| वजा या बाबीसाठी अदा केलेली रक्कम | रु.146200/- | |
| | रु.21466/- | (3) |

उपरोक्त (1+2+3) - 20000/- + 17088/- + 21466/- = 58554/-

तरी मे.सुदेश एंटरप्रायजेस यांना महापालिकेकडून देय असलेली रु.58400/- इतकी रक्कम जप्त करणे मे.सुदेश एंटरप्रायजेस यांची संविदा रद्द करणे व त्यांचे नाव काळया यादीत समाविष्ट करण्याकरीता प्रस्तावित आहे.

तसेच उक्त काम महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे असल्याने सदर विषय जिव्हाळयाचा आहे. मागील तीन वर्षापासून सदर काम थांबलेले असल्याने नागरीकांमध्ये असंतोष आहे. तरी सदर काम लवकरात लवकर पूर्ण होणेसाठी उक्त जिजामाता उद्यानाचा विकास करणे या अंतर्गत संभाव्य चित्राप्रमाणे उर्वरीत कामाचे चालू दराने प्राकलन तयार करण्यात आलेले आहे. त्याची प्राकलनिय किंमत रु.2486978/- इतकी होत आहे. या कामावरील खर्च लेखाशिर्ष सी-3 (i) P-I उद्यान नुतनिकरण व दुरुस्ती मधील तरतूदीमधून करणे अपेक्षित आहे. परंतू या लेखाशिर्षातर्गत असलेली तरतूद अपूरी असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 100 (i) मधील तरतूदीच्या आधारे या लेखाशिर्षात 25.00 लक्ष तरतूद समायोजित करण्याकरीता महासभेकडून मान्यता मिळणेकरीता प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र: २० दिनांक:— २०/१०/२००६

सुचकाचे नाव :— श्री. देवेंद्रसिंह खेमाणी

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती जयश्री सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर—४ येथील जिजामाता उद्यानाचा विकास व नुतनीकरण करणेकामी महापालिकेस अर्थसंकल्पीय (उद्यान नुतनीकरण व दुरुस्ती) लेखा शिर्षातील अनुदानात रु. २५ लाख समायोजन करण्यास तसेच सुधारीत प्राकलनास व मे. सुदेश एंटरप्रायजेस यांचेशी केलेली संविदा रद्द करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— विषय क्रमांक.४.....

मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :— सभेचे कामकाज पुढे चालविण्या अगोदर मी एक प्रश्न विचारु इच्छितो मी व मा. बोडारे साहेब यांनी दोन तीन अशासकिय प्रस्ताव दिले होते त्यांचे काय झाले? जे सचिवांना आम्ही दिले होते ते आजच्या सभेपुढे का आले नाहीत?

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— मा. महापौर महोदया, हे खरे आहे की, नियम १(जे) नुसार तीन अशासकीय प्रस्ताव मला मिळाले होते व ते विहित वेळेच्या आत मिळाले होते पूरक सूचना प्रसिध्द करण्या अगोदर मा.आयुक्त साहेबांचे एक पत्र मला मिळाले आहे त्याचा मजकुर असा आहे

आमचे असे निर्दशनास आणुन देण्यात आले आहे की, तुम्ही मा.महापौर यांना दिनांक १६.१०.२००६ रोजी पत्र पाठवून महापालिका कामकाजा विषयक नियम १(जे) चा गैरवापर करुन काही अशासकीय प्रस्ताव महापौरांच्या मंजुरी शिवाय सभागृहाचे पटलावर स्वत:चे अधिकारात आणण्याचा प्रयत्न चालविला आहे. सदर

बाबत दिनांक २०.९.२००६ रोजी झालेल्या महासभेच्या वेळी मा.महापौर यांच्या मंजुरी शिवाय अशासकीय प्रस्ताव आणण्यात आले होते व त्यावेळी मा.महापौर यांना सचिवांनी सभा कामकाज नियम १ (जे) नुसार महापौरांचे मंजुरीशिवाय असे प्रस्ताव सभे समोर आणता येणार नाहीत असे स्पष्ट करुन सभा संपविण्यात आली व त्यानंतर उर्वरित सदस्यांनी सभा घेवुन सदरचे अशासकीय प्रस्ताव मंजुर करण्या बाबत कार्यवाही केलेली होती. सदरची बाब मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना कळविण्यात आलेली आहे तसेच सचिवांची सदर कृति नियमा नुसार आहे किंवा नाही याबाबत मा. उच्च न्यायालय येथे याचिका दाखल करण्यात आली आहे त्यामुळे सदर बाब न्यायप्रविष्ठ असुन सचिवांना वरील नियम १(जे) नुसार मा.महापौर यांचे मंजुरी शिवाय पूरक सूचना प्रसिध्द करुन अशासकीय प्रस्ताव महासभे समोर घेण्याचेअधिकार आहे अथवा नाही याबाबत शासन अथा मा. उच्च न्यायालय यांचे आदेश प्राप्त झालेलेनाही. तरीही तुम्ही पुन्हा मा.महापौर यांना वरील दिनांक १६.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये अशासकिय प्रस्ताव सभाविषयक कामकाज नियम १ (जे) अंतर्गत घेण्याची कृती करीत आहात. सदरची आपली कृती ही कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी असुन वरिष्ठाच्या प्रति अनादरव्यक्त करणारी आहे.

तरी याबददल तुमचे काय म्हणणे आहे याचा खुलासा आमचेकडे दोन दिवसांत सादर करावा. खुलासा वरील मुदतीत प्राप्त न झाल्यास अथवा खुलासा असमाधानकारक असल्यास तुमचे विरुध्द मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मा. आयुक्त साहेबांच्या या पत्राच्या आधारावर त्या अशासकीय प्रस्तावांवर एक प्रकारे स्थगिती आदेश आला आहे त्यामुळे ते घेण्यात आले नाहीत.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—** सभेत विषय ठेवायचे किंवा नाही हा जो विषय आहे तो सचिवांचा आहे. आणि महापालिका सचिव हे एक स्वतंत्र प्राधिकारी आहेत आयुक्त यांनी त्यांचे कामा मध्ये हस्तक्षेप केला आहे न्यायालयाचा अवमान केला आहे न्यायालयाची अवमान न्यायालय पाहून घेईल त्याबाबतीत स्वतं:त्रपणे जे काही होईल ते न्यायालय व ते पाहून घेतील. परंतू मला असे वाटते की आयुक्तांनी राजकिय उद्देशाने किंवा सचिवांनवर दडपण आणण्यासाठी त्यांच्या कामामध्ये हस्तक्षेप केला आहे असा माझ्या त्यांच्यावर आरोप आहे. परंतू जसे आपण म्हटले की, मागील वेळी जे अशासकीय प्रस्ताव सभेपुढे ठेवले होते ते काही पहिल्यांदाच ठेवले नव्हते त्या अगोदर सुध्दा १९ मे रोजी एक अशासकीय प्रस्ताव आला होता निश्चित अशी तारीख मला आठवत नाही. एका उदयानामध्ये मद्यपान व मासाहारास बंदी घालण्या बाबतचा अशासकीय प्रस्ताव आणला होता. या पूर्वी सुध्दा अशासकीय प्रस्ताव आले होते व तटस्थपणे त्यांनी ते सभेपुढे ठेवले होते व आता राजकिय दडपण किंवा अन्य काही कारणामुळे हे अशासकीय प्रस्ताव आयुक्तांनी सभेपूढे ठेवले नाहीत. आरोप तर मी लावलाच आहे परंतू तरी पण मी सांगु इच्छितो की, जसे आमच्या सभागृह नेत्याने सांगितले की, जेव्हा एखादयावर आरोप लावले जातात तेव्हा तो व्यक्ती त्यावर स्पष्ट्रीकरण देण्यासाठी समोर असला पाहीजे यास्तव आम्हाला सुध्दा असे वाटत नाही की, एखादया व्यक्तीच्या अनुपस्थितीत त्यांच्यावर आरोप लावावेत व त्याच्या बाबतीत बरेवाईट बोलावे. त्या व्यक्तीस आपली बाजु मांडण्याची संधी मिळाली पाहीजे एखादया व्यक्तीस आपली बाजुस मांडण्याची संधी मिळाली नाही तर ते नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने चुकीचे होईल. मी कायदयावर विश्वास ठेवणारा व्यक्ती आहे म्हणुन मला असे वाटते की, त्या व्यक्तीस आपली बाजु मांडण्याची संधी मिळाली पाहीजे. जेव्हा श्री. भुल्लर महाराजांनी आपला मुद्दा उपस्थित केला होता तेव्हा सभागृह नेत्यांनी या बाबत म्हटले होते ज्या व्यक्तीवर आपण आरोप लावत आहात ती व्यक्ती स्पष्ट्रीकरण देण्यासाठी उपस्थित असली पाहीजे. म्हणुन याबाबतीत मी एक ठराव सुध्दा देत आहे की, आजची सभा तहकुब करुन दिनांक २७. १०.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वांजता ठेवण्यात यावी याबाबतीत मी औपचारिक ठरावही देत आहे. या ठरावावर आपण विचार करावा. व आजची सभा आयुक्तांकडून खुलासा मिळेपर्यत स्थगित केली जावी असे आम्हास वाटते.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—** मा.महापौरजी, आमच्या श्री. लाल पंजाबी यांनी जे काही म्हटले ते आपल्या ठिकाणी बरोबर आहे परंतू मी हे सांगु इच्छितो की, त्यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, आयुक्तांवर ते आरोप लावत आहेत की ते दबावा खाली आहेत मी या गोष्टीचा विरोध करतो. कारण की जेव्हा एखादी घटना घडते त्यावरील विषय न्यायालयात गेला आहे न्यायालयाचा निर्णय झाल्या नंतर त्या बाबतीत पाहता येईल परंतू आर्धी इकडची गोष्ट्र आर्धी तिकडची गोष्ट्र असे म्हणुन म्हणायचे की, माझा आरोप आहे ते बरोबर नाही.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—** आम्ही ते आरोप आयुक्तांच्या समोर लावु आयुक्तांना काही आम्ही घाबरत नाहीत. यासाठीच मी म्हणत आहे की, आजची सभा स्थगित करावी. व पुढील सभेत आम्ही आयुक्तांना याबाबत विचारणा करु.

**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—** मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी सभा तहकुब करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. थोडयावेळे पूर्वी या सभेस तहकुब करण्याचा विषय आला होता त्यावेळी कारण देण्यात आले होते की, सभागृहातील एक सदस्य श्री. अनिल जयसिंघानी यांच्या कारला अपघात झाला आहे त्यांना आता हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे व त्यांना पहाण्यासाठी सर्वाना जायचे होते परंतू सभागृहात फारच महत्वपूर्ण कामकाज असल्यामुळे सर्वानी त्यास विरोध केला त्यावर मतदान सुध्दा झाले व सभा तहकुब करण्यास बहुमताच्या जोरावर सर्वानी विरोध केला होता व दहा मिनीटा नंतर किवा अर्धातासा नंतर असा कोणता डोंगर कोसळला आहे की, जी पूरक सूचना ठेवण्यात आली होती तीच्या वरील विषयांबाबत विचारणा करण्यात आली की ते विषय का ठेवण्यात आले नाहीत? त्याचे उत्तर मा. सचिव महादेयांनी सभागृहा समोर सविस्तरपणे दिले आहे की, ही पूरक सूचना का आली नाही.आता यामध्ये यांचा रस असलेला कोणता विषय राहीला आहे की ही सभा तहकुब करुन तो विषय आयुक्तांसमोर आणुन त्यावर चर्चा करु इच्छित आहेत. जी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे त्यामध्ये ना केवळ ही मागणी केली आहे की, ठरावांवर अंमलबजावणी केली जावी, त्याच बरोबर ही सुध्दा मागणी केली आहे की, महापालिका सचिव, हे आयुक्त, महापौर एवढेच काय राज्य सरकारच्या सुध्दा पर्यवेक्षना खाली येत नाहीत. अशा प्रकारचा उच्च न्यायालयाने निर्णय दयावा अशी सुध्दा एक मागणी करण्यात आली आहे.मी समजु शकतो की, सभा स्थगित करुन चर्चा करुन हे कोणता निर्णय घेवू इच्छित आहेत. परंतू आताच आर्धा तासा पूर्वी एका सदस्यास पाहण्यास जायचे असल्याने सभा तहकुब करण्याचा याचा विचार नव्हता एक प्रशासकीय विषय आहे, सचिवाना आयुक्तांनी पत्र दिले आहे त्या पत्राचे त्यांनी उत्तर दिले आहे काय? सचिव साहेब आपण आयुक्तांना उत्तर दिले आहे काय? त्यांनी अदयाप पर्यत आयुक्तांना उत्तर दिलेले नाही. प्रशासकीय कार्यवाहीत ते आहे, एक प्रशासकीय बाब आहे व त्यामुळे सभा तहकुब करुन आपण काय मिळवू पहात आहात? ही सभा तहकुब न करता पुढील कामकाज चालविले जावे.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—** मा.महापौरजी, असे बोलले जाते की, ''समझने वाले समज गये, ना समझे वो अनाडी है'' सर्वांना माहित आहे आम्ही का सभा तहकुब करु इच्छित आहते आम्ही सर्वानी स्पष्टपणे सांगितले त्यावर त्यांनी उत्तर दिले त्यावर पुन्हा आम्ही उत्तर दिले आम्ही आयुक्तांना हे सांगु इच्छितो की, तुम्ही दबावाखाली काम करण्याचे बंद करा व आपण म्हणत होता की, पहिले आम्ही सभा स्थगित का करु इच्छित नव्हतो आपणास माहित असले पाहीजे की आज इतिवृत्त कायम करणे अतिशय महत्वाचे होते त्यासाठी आम्ही सभा तहकुब करु दिली नाही व आता सभा तहकुब करु इच्छितो. आयुक्तांच्या समोर त्यांना सडेतोड उत्तर देण्यासाठी आम्ही आजची सभा तहकुब करु इच्छितो आपण समजण्याचा प्रयत्न करा.

**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—** आपण उत्तर देण्या मध्ये कमजोर आहात काय?

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** काही सदस्यांना एक वेळा तरी बोलू दया.

**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—** महापौर महोदया सचिव साहेबा उत्तर देण्या मध्ये कमजोर आहेत काय की, हे उत्तर देतील? यांनी सचिवांचे वकील पत्र घेतले आहे काय?

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** सचिव साहेबांनी आज पर्यत प्रशंसनिय व वाखाण्याजोगे काम केले आहे त्यामुळे त्यांच्या विभागास आय.एस.ओ. मानाकंन प्राप्त झाले आहे. श्री. प्रकाश कुकरेजा हे विधी अधिकारी सुध्दा होते ते कायदाचे अतिशय चांगले जाणकार आहेत.

**मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :—** मुद्दा काय आहे व आपण कुठे चालला आहात?

**मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** मी मुद्दयावरच आहे. ब—याच वेळे पासून ऐकत होतो महासभेत निर्णय बहुमताने होतो. बहुमताचा सन्मान करायला शिका हे आपण नेहमीच समोरच्यांना सांगत आला आहात ते आज आम्ही तुम्हास सांगत आहोत. राहिला प्रश्न तो की, वारंवार सांगितले जात होते की, उच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे न्यायालयाचा अवमान होवू नये असे जर आपणास वाटत असेल तर मी आपणास सांगु इच्छितो की, उच्च न्यायालयाने कोणताही स्थगिती आदेश दिलेला नाही. उच्च न्यायालयास सांगण्यात आले आहे की, आम्हास आमचे म्हणणे मांडण्यासाठी वेळ पाहिजे, उच्च न्यायालयाने वेळ दिली आहे. इतिवृत्त कायम करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही गोष्टीसाठी उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेला नाही. व यानंतरही खरेच न्यायालयाचा जो अवमान होत आहे तो तीन अशासकीय प्रस्तावां संदर्भात आयुक्तांनी सचिवांना पत्र दिले त्यामुळे ते तीन अशासकीय प्रस्ताव सभेपुढे येवु शकले नाहीत. न्यायालयाची भिती दाखवून जनहिताचा एखादा मुद्दा दडपून ठेवणे हा न्यायालयाचा अवमानतेचा मुद्दा आहे. सचिवांवर दबाव टाकुन हे तीन अशासकीय प्रस्ताव आयुक्तांनी थांबवून ठेवले आहेत व ते केवळ आपल्या म्हणण्या नुसार थांबुन ठेवले आहेत असा आमचा

स्पष्ट आरोप आहे नाही तर सचिवांना ही कारणे दाखवा नोटीस दिली गेली नसती. कोणत्याही महानगरपालिकेत कोणत्याही महासभेत आपण जावुन पाहीले तर अशासकीय प्रस्ताव येतात व त्यांवर नेहमी महासभा निर्णय घेते मागील वेळेस सुध्दा आपण जी महासभा समाप्त केली त्यावेळी बहुसंख्य सदस्य ओरडून ओरडून सांगत होते की, महासभेची कार्यवाही सुरु ठेवली पाहीजे परंतू जेव्हा आपण निघुन गेलात त्यांनतर जे कायदयात बसत होते ती गोष्ट लक्षात घेवून सचिवांनी जे केले जे त्यांनी नंतर सांगितले ठिक आहे आपण ते बेकायदेशिर मानता ते कायदेशिर मानतात त्याचा निर्णय न्यायालय करेल. परंतू यावेळेस जे तीन अशासकीय प्रस्ताव येत होते ते थांबविणे मला वाटते की, तो शहराशी केलेला धोका आहे. व आज सभा स्थगित करण्याचे जे काही बोलले जात आहे त्यांची अनेक कारणे आहेत एक तर हे तीन अशासकीय प्रस्ताव थांबविले आहेत त्यावर भले उच्च न्यायालयाचा निर्णय येवु दया त्यानंतर सभा होवो. व दुसरी गोष्ट्र आयुक्त दोनदिवसाचे रजेवर गेले आहेत ते दोन दिवसांनतर येतील हे लक्षात घेवून आम्ही सभा स्थगित करण्याची मागणी करत आहोत नाही तर आम्ही सभा स्थगित करण्याच्या मनस्थितीत नाही. आयुक्तांनी सचिवांना कारणे दाखवा नोटीस बजावून हे जे तीन अशासकीय प्रस्ताव थांबविले आहेत ते एक सरळ सरळ राजकारण आहे याचा जेवढा निषेध करावा तेवढा थोडाच आहे व पुन्हा एकदा मी सचिव साहेबाची प्रशासा करतो.

<u>मा.सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> महापौर महोदया, मा.सचिव साहेब आमचे सन्माननिय सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी म्हटले आहे की, आयुक्त सुट्टीवर गेले आहेत ते सुट्टीवर गेले नाहीत आपणा सर्वाना एक पत्र वितरीत करण्यात आलेले आहे त्यात लिहिले आहे की ते औरगांबाद येथे न्यायालयात एका तारखेसाठी गेलेले आहेत. आपण ते पत्र वाचले नसेल.

<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :—</u> न्यायालयाच्या कामासाठी सुट्टीवर गेले आहेत ना? आम्ही काय दुसरे म्हटले आहे काय?

<u>मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> सुट्टीवर आहेत येवु तर दया, आल्यावर बोलू.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> आम्ही कुठे म्हटले की ते आराम करीत आहेत, काम करीत आहेत?

<u>मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> आयुक्त साहेब सुट्टीवर गेले आहेत न्यायालयाच्या कामासाठी गेले आहेत कि अन्य कामासाठी गेले आहेत परंतू ते जे करुन गेले ते चुकीचे करुन गेलेत.कोणत्याही गोष्टीवर चर्चा करु नका याबाबत एकतर उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेला नाही चर्चा करण्यासाठी आपणास मोकळे ठेवले आहे. जो निर्णय या अगोदरच्या अशासकीय प्रस्तांवावर होईल तोच निर्णय या अशासकीय प्रस्तावांवर होईल.जर ते योग्य होते तर हे सुध्दा, योग्यच मानावे लागले असते ते जर चुकीचे ठरविले असते तर हे सुध्दा साहजिकच चुकीचे ठरले असते परंतू असे न करता जसे श्री.लाल पंजाबी यांनी सांगितले की, जे प्रस्ताव आम्ही दिले होते ते जनहिताचे होते त्यातील एक प्रस्ताव असा होता की, ज्याचा सूचक मी आहे आणि अनुमोदक श्री. लाल पंजाबी , व श्री. बच्चाराम रुपचंदानी हे सुध्दा आहेत. शहरातील ८५५ अनाधिकृत इमारती नियीमत करण्या साठी शासनाने जो अध्यादेश काढला तो चुकीचा आहे त्यामध्ये जी दंड आकारणी सुचविली आहे ती अतिशय जास्त आहे त्यामुळेच मालमत्ता नियमित करण्यासाठी पाहिजे तेवढा प्रतिसाद मिळत नाही. १४५ चौरस मिटरच्या भुखंडास नियमित करण्यासाठी ८ लाख रुपये दंड आकारला जात आहे. झोपडपट्टीतील ७४ चौरस मिटरच्या दुकानास नियमित करण्यासाठी ३.५० लाख रुपयांची दंड आकारणी केली आहे. जी रक्कम कोणीही भरु शकत नाही ही दंड आकारणी कमी करुन लोकांना कमीत कमी दंड आकारणी करण्यात यावी. जेणे करुन अधिकाधिक लोक आपली अनाधिकृत बांधकामे नियमित करुन घेण्यासाठी पुढे येवु शकतील. म्हणुन येथे एक ठराव पारीत करण्यात यावा व तो ठराव शासनास पुर्नविचारासाठी पाठविण्यात यावा. हा एक अशासकीय प्रस्ताव होता हा लोकहिताचा होता.आयुक्तांनी काय केले? त्यानंतर सुध्दा आपणास तो ठराव पारीत करावयास पाहीजे होता परंतू आपण त्या कडे लक्ष दिले नाही. दुसरा प्रस्ताव होता कर मुल्याबाबतचा एक आयुक्त कर योग्य मुल्य वाढवून जातो परंतू त्यांचे परिणाम जनतेस भोगावे लागतात. आयुक्त श्री.रामनाथ सोनावणे होते त्यांनी कर योग्य मुल्य दूप्पट ते तिप्पट केले त्यामुळे शहरवासियांना मोठया प्रमाणावर मिळकत कर भरावा लागत आहे परंतू त्या प्रमाणावर सुविधा मात्र काही मिळत नाहीत. त्यामुळे या पूर्वी जे कर योग्य मुल्य होते ते पुन्हा लागु करुन उल्हासनगर मधील जनतेला लाभ दया. असा दुसरा आमचा अशासकीय प्रस्ताव होता. या प्रस्तावाचा सूचक मी होतो व अनुमोदक श्री. लाल पंजाबी हे होते. तो प्रस्ताव सुध्दा बाजुला सारला आहे. व तीसरा प्रस्ताव आमच्या श्री. रामदास उमाप यांच्या होता उल्हासनगर मधे डेग्यु व चिकुन गुनिया यांची जी साथ सुरु झाली आहे त्याचे कारण हे आहे की, उल्हासनगर मधील सार्वजनिक ठिकाणची साफसफाई बरोबर नाही. आणि त्यामुळेच रोगराई पसरत आहेत हे केवळ ॲन्थोनी वेस्ट हॅन्डलिंग या ठेकेदारामुळे होत आहे. पूर्वीच्या ठेकेदारास जी रक्कम दिली जात होती तीच्या अडीचपट या ठेकेदारास रक्कम देवून सुध्दा साफ सफाई बरोबर होत नाही असा त्यांचा आरोप

आहे. हे अशासकीय प्रस्ताव जनतेच्या हिताचे होते. अशा प्रस्तावांना आपण आयुक्तांच्या माध्यमातून ठोकरले आहे. हा लोकांवर अन्याय आहे. हे प्रस्ताव महासभेपुढे यावयास पाहिजे होते परंतू आपण तशी संधी दिली नाही. आयुक्तांनी असे का केले हे त्यांनाच विचारले जावु शकते. यासाठी आमचे श्री. दिलीप लालवानी, श्री. मोहन बेहरानी, श्री. बच्चाराम रुपचंदानी, यांनी जे मुद्दे उपस्थित केले...

मा. सदस्य श्री. नाना पवार :— मा. महापौर महोदया, हरकतीच्या मुद्दयांवर मी लक्षवेधु इच्छितो

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :— एक सेंकद आयुक्तांनी हे जे वर्तन केले आहे त्याचे कारण काय आहे? जे महत्वपुर्ण विषय होते ते महासभेने पूर्ण केले आहेत. इतिवृत्त कायम करणे आणि प्रश्नोत्तराचा विषय तसेच जिजामाता उदयानाचा विषय जो वर्षानुवर्षे प्रलंबित होता असे विषय महासभेने पारीत केले आहेत. एकच प्रशासकीय विषय बाकी आहे. त्याबाबतीत काय करायचे ? तो महत्वपूर्ण आहे नाही सुध्दा, महाराज भुल्लर यांनी सुध्दा लक्षवेधी सूचना दिली होती तेव्हा त्यांनी एक सूचना दिली होती की, सात दिवसांच्या आत महासभा बोलवली जावी. म्हणुन माझी हीच सूचना आहे की, आजची सभा स्थगित करुन जेव्हा आयुक्त येतील तेव्हा त्यांच्या समोर ही चर्चा झाली पाहीजे. उल्हासनगर मधील ठेकेदारास/ जनतेस आयुक्तांनी हरामखोर म्हटले आहे असे महाराज भुल्लर यांनी म्हटले आहे तसेच सचिवांना पत्र देण्या मागे राजकारण काय आहे हे त्यांच्या कडूनच माहिती पडेल म्हणुन आजची ही सभा स्थगित केली जावी. सात दिवसा नंतर म्हणजे २७ तारखेस ठेवली जावी अशी आमची सूचना आहे.

मा. सदस्य श्री. नाना पवार :— मा. महापौरजी, याच सभे मध्ये विषय आला की, सभा तहकुब केली जावी त्यावर सभेचे कामकाज चालु रहावे यासाठी मतदानही झाले. पुन्हा यासभेचे कामकाज स्थगित केले जावे अशा प्रकारचा प्रस्ताव आला अशा प्रकारे एक प्रस्ताव दोन वेळा एकाच सभेमध्ये येवुन त्यावर मतदान होवू शकते काय? याबाबत कायदेशिर माहिती जर कोणी देवु शकत असेल तर त्यांनी ती या सभेत दयावी. मा.महापौरजी, एक वेळा येथे मतदान झाले आहे की, सभेचे कामकाज सल्लगपणे चालविले जावे व पुन्हा याच सभेमध्ये सभेचे कामकाज थांबविले जावे याबाबत प्रस्ताव येतो म्हणून याबाबतीत कायदेशिर माहिती या सभागृहास मिळाली पाहिजे कृपा करुन याचे स्पष्ट्रीकरण महासभेत दिले जावे.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— मा.महापौर महोदया यांचा निर्णय बहुमताच्या आधारावर केला जावु शकतो. बहुमत जर सभा स्थगित करु इच्छित असेल तर सभा स्थगित केली जावु शकते.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— मा.महापौरजी, सभा स्थगित होण्या अगोदर, मला जी माहीती आहे त्यानुसार सांगु इच्छितो की, अशासकीय प्रस्तावां बाबत श्री. बोडारे साहेब्रंनी जे वक्तव्य केले आहे व मागील महासभे मध्ये जे अशासकीय प्रस्ताव आणले होते मला तर वाटते ते चुकीचे होते. कारण की जो नियम १(अ) आहे. अशासकीय प्रस्ताव महासभेत आणण्या अगोदर ते दोन वेळा महापौरां कडून नाकारण्यात आलेले पाहीजेत.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :— श्री. चंदाराम मोकलजी, न्यायालयाचा अवमान करु नका ते प्रस्ताव चुकीचे होते असे बोलू नका. याबाबत उच्च न्यायालयाचा निर्णय होणे बाकी आहे.

मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :— माझ्या माहिती नुसार मी बोलत आहे.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी:— कृपया असे बोलू नका.
मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :— आपणास ऐकुन घ्यावे लागेल. कारण की एखादा अशासकीय प्रस्ताव समजा दोनवेळा महापौर नाकारतात तेव्हा तिस—या वेळेस सचिवांना अधिकार आहेत की, बहुमताने तो प्रस्ताव पारीत करुन पुढील सभेत तो आणला पाहिजे. तात्काळ प्रस्ताव आणण्याचा अधिकार सचिवांना नाही.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— याविषया बाबत न्यायालयाचा अवमान होईल.

मा.महापौर :— सचिव महोदय, या प्रस्तावा बाबत मतदान घ्या.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— मा. महापौरजी, हा मुद्दा उच्च न्यायालयात प्रंलबित आहे सभा तहकुब करण्या बाबत मतदान घेण्याचा जो मुद्दा आहे त्या अगोदर सचिवांनी प्रामाणिकपणे व कायदेशिरपणे जे काम केले आहे त्याची मी प्रशासा करतो व हे ही म्हणु इच्छितो की, जे चुकीचे काम करतात त्यांना सचिव साहेबांची

भिती वाटत असते. सचिव साहेब आपले काम कायदया नुसार करत आहेत व करत राहतील व आयुक्त साहेब राजकारण्यांच्या दबावाखाली काम करत आहेत. असा आमचा आरोप आहे.जेव्हा आयुक्त साहेब समोर असतील तेव्हा या विषयावर चर्चा होवो.

मा. महापौर :– सचिव महोदय सभा तहकुबीच्या प्रस्तावावर मतदान घ्या.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :– कृपया सभा या महिन्याच्या २७ तारखे पर्यत स्थगित करण्याच्या बाजुने जे आहेत त्या सन्माननि सभा सदस्यांनी आपले हात वर करावेत.
सभा स्थगित करण्याच्या बाजुने ३७ मते

१.श्री. धनंजय बोडारे
२.श्री. मोहन बेहरानी
३.श्री. अशोक ठाकुर
४.श्रीमती मालती करोतिया
५.श्री. प्रमोद टाले
६.श्री. गौतम भालेराव
७.श्रीमती बेबी वसीटा
८.श्रीमती कोमल बठीजा
९.श्रीमती दिपा पंजाबी
१०श्रीमती मोना वनवारी
११.श्रीमती किरण माखिजा
१२. श्री. किशोर वनवारी
१३.श्री. मोहनदास रामरख्यानी
१४.श्री.श्यामसुंदर रोहरा
१५श्री. राजु टेकचंदानी
१६श्री. विनोद ठाकुर
१७.श्री. लाल बिहारी यादव
१८.श्री. सुरेश जाधव
१९श्री. अंकुश म्हस्के
२०.श्री. अन्नु मनवानी
२१. श्री. रमेश चव्हाण
२२. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२३. श्री. राजेंद्र चौधरी
२४. श्री. दिलीप गायकवाड
२५. श्री. नथु सोनावणे
२६. श्रीमती नंदिनी बामणकर
२७. श्रीमती जयश्री सुर्वे
२८. श्रीमती प्रेमा खांडेकर
२९. श्री. शामू वाघे
३०. श्री. बच्चाराम रुपचंदानी
३१. श्री. रामदास उमाप
३२. श्री. जमनु पुरस्वानी
३३. श्रीमती संगिता जावळे
३४ श्रीमती रेखा कृष्णानी
३५. श्रीमती लक्ष्मी ससाणे.
३६. श्रीमती सीमा मोकल
३७. श्री. प्रशांत जाधव

व सभा स्थगित करण्याच्या बाजुने जे नाहीत त्या सन्माननिय सदस्यांनी कृपया आपले हात वर करावेत.
<u>सभा स्थगित न करण्याच्या बाजुने २९ मते.</u>

१.श्रीमती ज्योती कालानी
२.श्री.विनोंद तलरेजा
३श्री. हौशियारसिंह लबाणा
४.श्री. सतरामदास पमनानी
५.श्री.बबन लिंगे
६.श्री. गणपत एडके
७.श्री. सुरेश गायकवाड
८.श्री. चंदाराम मोकल
९श्री. नरेंद्र कुमार ठाकुर
१०.श्री. देवेंद्रसिंह खेमाणी
११.श्री. प्रभुनाथ गुप्ता
१२.श्री. पृथ्वी वलेच्छा
१३.श्री. नाना पवार
१४.श्री. शांताराम निकम
१५.श्री. राजु जग्यासी
१६.श्री. राज असरोंडकर
१७.श्रीमती कमला शर्मा
१८श्रीमती मिनु दासानी
१९श्रीमती भारती छाब्रीया
२०श्रीमती निता आहुजा
२१डॉ. नीना नाथानी
२२.श्रीमती माया मसंद
२३. श्रीमती भावना खिलनानी
२४. श्रीमती रेखा कारीरा
२५. श्रीमती सुजाता रिझवानी
२६. श्रीमती मिना सोंडे
२७. श्री. मनोज साधवानी
२८. श्री. ईश्वर पमनानी
२९. श्रीमती भावना रामचंदानी

<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :–</u> आमचे आणखी चार पाच सदस्य आज येथे उपस्थित नाहीत.

<u>मा. महापौर :–</u> सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यात येत आहे.

सूचक : श्री. धनंजय बोडारे

अनुमोदक : श्री. बच्चाराम रुपचंदानी

विषय : दि. २०/१०/२००६ रोजी होणा–या महासभेचे कामकाज तहकुब करण्याबाबत..........

*<u>प्रस्ताव :</u>*

दिनांक २०/१०/२००६ रोजी होणा–या महासभेत सादर करण्यासाठी काही पालिका सदस्यांमार्फत महापालिका सचिवांकडे महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाज विषयक नियम १ (ज) अन्वये तीन अशासकीय प्रस्ताव सादर करण्यात आले होते. सदरच्या प्रस्तावांच्या महासभेच्या कामकाजात पुरक

विषय म्हणुन समावेश होणेकामी दिनांक १९/१०/२००६ रोजी पूरक सूचना निघणे आवश्यक होते. परंतु महापालिका सचिवांकडुन तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबद्दल महापालिका सचिवांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले आहे की, मा.आयुक्तांनी त्यांना ज्ञापन देवुन विचारणा केली आहे की, दि. २०/९/२००६ रोजीच्या महासभेत पुरक विषयांचा समावेश कसा काय करण्यात आला, तसेच दिनांक २०/१०/२००६ रोजी होणा-या महासभेत पुरक विषयांचा समावेश कसा काय करता येईल याबद्दलचा खुलासा दोन दिवसात सादर करावा. महापालिका सचिवांची ही कृती नियमबाहय असल्याचा आरोप आयुक्तांनी केलेला आहे. या बाबीमुळे पुरक सूचना काढण्यात आलेली नाही अशी माहिती सचिवांनी दिलेली आहे.

आयुक्तांची ही कृती नियमबाहय असुन त्यांच्या अधिकारक्षेत्राबाहेर जावुन महापालिकेच्या कामकाजात हस्तक्षेप करणारी आहे. तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयात याच मुद्दयावर दाखल केलेली याचिका क्रमांक ६८३०/२००६ प्रलंबित असताना अशाप्रकारे आयुक्तांनी सचिवांना ज्ञापन देवुन न्यायालयीन कामकाजाचा देखिल अवमान केलेला आहे.

आज दिनांक २०/१०/२००६ रोजी होणा-या महासभेत आयुक्त उपस्थित राहणार नसल्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यांच्या या कृतीबद्दल महासभेत त्यांच्यामार्फत खुलासा होणे आवश्यक आहे. परंतु ते अनुपस्थित राहणार असल्याने आज त्यांचा खुलासा महासभेत मिळु शकणार नाही. यास्तव सदरची महासभा दिनांक २७/१०/२००६ रोजी सायंकाळी ४-०० वाजेपर्यंत तहकुब करण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. २० अ                                                    दिनांक : २०/१०/२००६

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे दिनांक २०/१०/२००६ रोजीच्या सभेचे कामकाज स्थगित करुन दिनांक २७/१०/२००६ रोजी सायंकाळी ४-०० वाजेपर्यंत तहकुब करण्यास मान्यता देत आहे.

बहुमताने

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.महापौर :-पुढील सूचना देई पर्यत या सभेचे कामकाज स्थगित केले जात आहे. कृपया जन गण मन साठी सर्वानी उभे राहावे.

मा.सचिव :- कृपया एक मिनीट बसुन घ्यावे. आपल्या महापालिकेमध्ये श्री. सा.अ. पठाण हे एक नविन अधिकारी आले आहेत. त्यांना सहाय्यक आयुक्त तसेच प्रभाग समिती क्र.१ चे प्रभाग अधिकारी म्हणुन नियुक्ती देण्यांत आली आहे. व ही सभा दि.२७.१०.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यत स्थगित करण्यात आली आहे श्री. पठाण यांनी आपला परिचय करुन दयावा.

श्री. सा.अ.पठाण (प्रभाग अधिकारी, प्रभाग क्षेत्र क्र.१):- मा. महापौर महोदया, उप महापौर, उपस्थित अधिकारी गण, सर्व सन्माननिय सदस्य सर्वाना मी अभिवादन करतो व आपला परिचय करुन देतो की, माझे नांव साजिदखान पठाण आहे मी मंत्रालयात महसुल व वन विभागात सवर्ग I चा अधिकारी असुन दोन वर्षासाठी प्रतीनियुक्तीवर सहाय्यक आयुक्त या पदावर येथे आलो आहे मी आपणास खात्री देतो की, मी माझे काम प्रामाणिकपणे व सचोटीने करेन. नमस्कार.

**मा.महापौर :—** ही सभा पुढील सूचना देई पर्यत तहकुब करण्यात येत आहे.

**मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :—** २७ तारखे पर्यत स्थगित करण्याचे ठरले आहे. पुढील सूचना मिळे पर्यत कोण वाट पाहील?

**मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :—** २७ तारखेस ४.००वाजंता

**मा. सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.१० वाजता सभा दिनांक २७.१०. २००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–२७/१०/२००६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २७/१०/२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/१०/२००६ रोजी सायंकाळी ४–०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करून शुक्रवार दिनांक २७/१०/२००६ रोजी घेण्यांत आली त्यावेळी मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :–श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती जावळे संगिता रमेश | ३४ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ३. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | ३५.. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३६ | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ३७ | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३८. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| ७. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | ३९. | श्री. पाटील विश्वनाथ |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४०. | श्री. ठाकुर अशोक |
| ९. | श्रीमती मोकल सीमा चंदाराम | ४१. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १०. | श्री. गायकवाड दिलीप | ४२. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| ११. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४३. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १२ | श्री. एडके गणपत गोविंद | ४४. | श्री. मनवानी अन्नु (सनमुख) |
| १३. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| १५. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४७. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| १६. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४८. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| १७ | श्री. रोहरा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| १८ | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्री. लबाणा होशियारसिंह हरिसिंह |
| १९. | श्री. पवार नाना आनंदा | ५१. | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| २०. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५२. | श्रीमती छाब्रिया भारती पहलाज |
| २१ | श्री. निकम शांताराम ओंकार | ५३. | श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश |
| २२. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५४. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २३. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५५. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| २४. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५६. | श्रीमती दासानी मिनु राजकुमार |
| २५. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५७. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २६. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ५८ | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| २७. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५९ | श्री. वधारिया राजेश नानिकराम |
| २८. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | | |
| २९. | श्री. जेसवानी सतरामदास फतनदास | | |
| ३०. | श्रीमती खिलनानी भावना रवी | | |
| ३१. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल | | |
| ३२. | श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग | | |
| ३३.. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास | | |

तर,

मा. उप महापौर श्री.विनोद तलरेजा तसेच मा.सदस्य / सदस्या २. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर ३.श्री. महेंद्र मुलचंदानी ४. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन ५. श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र ६. श्री. जग्यासी राजु किशनचंद ७. श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा
८. श्रीमती वनवारी मोना अशोक ९. श्री.लुड गोविंदराम १०. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल ११.श्री. पमनानी ईश्वर सतरामदास १२.श्री. बोडारे धनंजय बाबुराव १३.श्रीमती कृष्णानी रेखा हरेश १४.श्री. भालेराव गौतम यशवंत १५. श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास १६.श्रीमती दिपा पंजाबी १७. श्री. अनिल जयसिंघानी
१८. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम १९. श्री. बठीजा संजय रामचंद्र २०. श्री. बेहरानी ठाकुरदास वर्यलदास २१. श्री. पंजाबी लाल देवनदास २२.श्री. माखिजा हरदास सन्मुखदास
हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

मा.आयुक्त श्री. सदाशिव कांबळे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन सभेस उपस्थित होते. तसेच खाली दर्शविलेले अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
२. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
३. श्री. मिलींद सावंत, उप—आयुक्त
४. श्री आर.आर.सावकारे, कार्यकारी अभियंता, (पापु)
५. डॉ. के.आर खरात, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
६. श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी
७. श्री तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक

सायंकाळी ४—१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.
मा. सचिवः— विषय क्रमांक.४ वाचुन दाखवितात.

विषय क्रमांक.४ :— पूर्वीचा महासभा ठराव क्र.३८, दिनांक २०/७/२००५ रद्द करुन कु. पौर्णिमा गणेश भिंगे ह्यांची महापालिका निवड समितीच्या शिफारसीनुसार ''स्टाफ नर्स'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— सन्माननिय महापौरजी, आपण हे सांगु शकाल का? की, आजच्या या महासभे मध्ये आयुक्त साहेब का नाहीत? कुठे गेलेत? तारीख असल्या बाबत त्यांनी मागील वेळेस पत्र दिले होते. आता काय आई आजारी आहे की काय? नाहीतर आपण यांना पाहिलेत का? अशा प्रकारची वर्तमान पत्रामध्ये जाहिरात दयावी लागेल. पकडून आणण्या—यास शंभर रुपये बक्षीस?

श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :— आदरणिय महापौर महोदया, मा. सर्व नगरसेवक महोदय, मा.आयुक्त साहेब हे एक दिवसाच्या रजेवर आहेत. त्यांच्या आईची प्रकृती बरोबर नसल्यामुळे त्यांनी आज एक दिवसाची किरकोळ रजा घेतली आहे त्यामुळे ते महासभेला उपस्थित नाहीत.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— मा. महापौरजी, एखादा ठराव अशासकिय प्रस्ताव सभे पुढे आणायचा किंवा नाही याबाबतीत आयुक्त आदेश देतात आणि त्यानंतर ते गायब होतात. एक ना एक दिवस त्यांना महासभेमध्ये उत्तर दयावेच लागेल ते आपल्या आई, बहिण, नातेवाईकांना किती दिवस आजारी पाडतील?कधी लांबच्या नातेवाईकास मारणार? एक ना एक दिवस त्यांना महासभेत उत्तर दयायचेच आहे ना? एकतर ठेकेदारास हरामखोर बोलले त्याचे त्यांना उत्तर दयायचे आहे. अशा व्यक्तीस सभागृहात उत्तर देण्यासाठी एक ना एक दिवस हजर रहावेच लागेल. ते आपल्या नातेवाईकांना किती दिवस आजारी पाडत राहतील? आपल्या नातेवाईकांना नेहमीच आजारी पाडत राहणार का? सचिव साहेब आम्हास हे सांगा की, त्यांनी हजर राहणे जरुरीचे आहे किंवा नाही? सुट्टी कशी घेतली पाहीजे?

महापालिकेने महासभा बोलविल्या नंतरही त्या दिवशी ते नव्हते त्यादिवशी त्यांनी दोन दिवस बाहेर जात असल्या बाबतचे लेखीपत्र दिले होते व ते सर्व सदस्यांना वितरीतही करण्यात आले होते त्यानंतर ते आज नाहीत आजची सुट्टी त्यांनी कोणाकडून मागावयास पाहीजे होती.? कायदयानुसार? कोणत्या कलमा नुसार कोणाकडून सुट्टी घेतली पाहीजे होती? व कोणाकडून सुट्टी घेवुन ते गेले आहेत? त्यांची आई जी आजारी आहे त्याबाबतचे प्रमाणपत्र देवून अर्ज सादर केला आहे काय? मा. महापौरांना माझी विनंती आहे की, पुढील सभेत त्यांची आई आजारी असल्या बाबतचे वैदयकिय प्रमाणपत्र त्यांचे कडून सभागृहात सादर केले जावे. कसला आजार होता त्याबाबतचे एका तज्ञ डॉक्टरांचे प्रमाणपत्र, जे ,जे किंवा केईएम किंवा शासनाच्या इतर मान्यता प्राप्त रुग्णालयाच्या डॉक्टरां कडून वैदयकिय प्रमाणपत्र मागविले जावे. आमच्या उल्हासनगरच्या जनतेस ते मुर्खतर बनवत नाहीत? सांगा तर कोणत्या अधिनियमाच्या, कलमाच्या तरतुदी नुसार सुट्टी घेतली जाते. महासभा असतांनाही, त्यांना माहित होते की,सात दिवसा नंतर महासभा आहे, पहिल्यावेळेस न्यायालयाच्या तारखेचा बहाणा केला, किती दिवस बहाणे करतील. सुट्टी कोणत्या हिशोबाने घेतली ते जर सांगितले जावे. कायदयातील तरतुद सांगितली तर आम्हाला सुध्दा माहिती होईल.

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :– नाही तर श्री. रामसिंघानी यांना येथील कायम स्वरुपी आयुक्त करा?

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– सन्माननिय महापौरजी, माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी कोणाला तरी आदेश दया. त्यांनी व्यासपीठावर येवुन आम्हास उत्तर दयावे.

श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :– मा.आयुक्तांनी रजा कशी मंजुर करुन घेतली या बद्दल मला काही माहिती नाही.

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :– माईक थोडा पुढे घेवुन बोला.

श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :– मा.महापौर, मा. नगरसेवक, मा.आयुक्त साहेबांनी किरकोळ रजा घेतली आहे ती मंजुर करणारे प्राधिकारी कोण आहेत याची मला कल्पना नाही.

म.सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– त्यांनी रजेचा अर्ज कधी केला?

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– आपणास माहिती नाही तर आयुक्तांच्या स्थानी बसुन आपण उत्तर काय देणार? व त्यांचा पदभार कोणाकडे आहे? ते आपणास लेखी पदभार देवुन गेले असतील ना? आपणास त्यांनी लेखी पदभार दिला आहे काय? आजच्या सभेसाठी त्यांनी आपणास लेखी पदभार दिला आहे काय?

श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :– नाही

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– तर मग श्री. रामसिंघानी यांना येथे आयुक्त म्हणुन बसवा?

मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :– मा. महापौरजी, मागील वेळेस दोन दिवसांसाठी सुट्टीवर जाताना आयुक्त साहेबांनी आपला पदभार श्री. रौराळे साहेबांकडे सोपविला होता. आणि आयुक्तांची ही जबाबदारी आहे की, ज्यावेळी ते उपस्थित राहू शकणार नसतील त्यावेळी आपला पदभार एखादया अधिका–याकडे सोपविला पाहीजे. आणि तसा जर यांना पदभार दिला नसेल तर यांना येथे बसण्याचा काही अधिकार नाही.

मा.महापौर :– श्री. रौराळे हे अतिरिक्त आयुक्त आहेत. आयुक्तांचे पदा खालोखाल त्यांचे पद आहे. जर आयुक्त सुट्टीवर गेले आहेत ही बाब शासनाशी संबधीत आहे. त्यांनी शासनाकडे सुट्टी मागीतली असेल. व श्री. रौराळे हे अतिरिक्त आयुक्त असल्यामुळे तेच आयुक्तांचा आसनावर बसतील.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— सन्माननिय महापौरजी, यांना एवढी सुध्दा माहिती नाही की, जी रजा दयायची आहे ती कोणाला दयायची आहे. व ती कशी घ्यायची आहे हे सुध्दा यांना माहिती नाही. हे म्हणतात की, त्यांनी सुट्टी घेतली असेल, येथे अतिरिक्त आयुक्त आहेत, उप आयुक्त आहेत यांना जर सुट्टी घ्यायची आहे तर ती कोणाकडून घ्यायची आहे? मला जर सुट्टी मागायची आहे तर मी ती कोणाकडे मागायची? मला जर सुट्टी घ्यायची असेल तर मी मा.महापौरांना पत्र लिहिन की, मला सहा महिने महासभेत यायला जमनार नाही कृपया माझी सुट्टी मंजुर करावी परंतू यांना जर सुट्टी घ्यायची असेल तर ती कोणाकडून घ्यायची? याची सुध्दा यांना माहिती नाही. त्यांना एक दिवसाच्या सुट्टीवर जायचे आहे परंतू त्या दिवशी महासभा आहे तर मी सुट्टी कोणाकडून घ्यायची हे सुध्दा यांना माहित नाही.

मा. महापौर :— एक गोष्ट ही सुध्दा आहे की, मागील वेळेस आपण आयुक्तांन बिना सभेचे कामकाज चालविले होते. तर आता आयुक्त आहेत किवा नाहीत याचा काय फरक पडतो? आता सुध्दा आयुक्ताबिना कामकाज चालवू शकता ना?

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— मा.महापौरजी, मागील वेळेसच लक्षवेधीवर चर्चा व्हावयास पाहिजे होती परंतू त्यावेळीस ते नव्हते आयुक्तांनी ठेकेदारांना उद्देशुन वापरलेल्या त्या वाक्यामुळे लोक एवढे चिडले आहेत व म्हणतात की आपण तेथे बसुन करत काय आहात? त्या आयुक्तांनी हरामखोर या शब्दा बाबत काय उत्तर दिले? लोकतर एवढे चिढले आहेत की, ते महापालिकेत येवुन आयुक्तांचे तोड काळे करु इच्छित आहेत . आम्ही त्यांना समजावले की, असे काही करु नका आपण गांधीवादी रहा चांगले नागरिक आहात, चांगले नागरिक म्हणुनच रहा. त्यांचे तोड काळे करु नका त्यांचे तोड अगोदरच काळे झाले आहे आणखी काय काळे करणार?

मा. महापौर :— आता आपणास काय करायचे आहे सभेचे कामकाज चालवायचे असेल तर सभेपुढील विषय पत्रिका आपणा समोर आहे.

मा.सदस्य श्री.धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, मागील वेळेस सभेचे कामकाज स्थगित करण्याचे कारणच हे होते की, आयुक्त उपस्थित नव्हते. व त्यांच्यावर झालेल्या आरोपांवर त्यांच्या अनुपस्थितीत चर्चा होवु नये म्हणुन मागील सभेचे कामकाज स्थगित केले होते. ज्या प्रकारे मागील वेळेस न्यायालयाचा बहाना करुन आयुक्त साहेब रजेवर गेले होते यावेळेस त्यांची आई खरेच आजारी आहे किंवा नाही हे त्यांनाच माहित? परंतू सर्वाना वाटते की, हा सुध्दा एक बहाना आहे. व या प्रकारे महासभेचा अपमान करण्याचा, व लोकां बरोबर जनतेच्या ज्या अपेक्षा आहेत त्यांचा अनादर करणे व अश्या प्रकारे निघुन जाणे यास थोडक्यात पळकुटा म्हणतात. काहीही असो, आरोप आहे असे जर म्हणत असाल तर तो तथ्यहीन असल्याचे दाखवु शकतात, मी कसा बरोबर आहे ते दाखवु शकतात परंतू दोन वेळा या महासभेचा अपमान करुन सभागृहात न येणे व ज्याप्रकारे ते रजेवर जातात तो प्रकार चुकीचा आहे. मागच्यावेळेस यासाठीच सभा स्थगित केली होती की, आयुक्त सभागृहात नव्हते. यासाठी मी असे म्हणतो की, जो पर्यत आयुक्त सभागृहात येत नाहीत तो पर्यत किंवा आम्ही एक प्रस्तावही दिलेला आहे की, श्री. लाल पंजाबी हे सुध्दा सभागृहात उपस्थित नाहीत परंतू विशेष बाब ही आहे की, जोपर्यत आयुक्त सभागृहात येत नाहीत तो पर्यत,सभा स्थगीत करण्यात यावी यासाठी आम्ही पुढील आठवडयातील तीन तारीखेस सभा ठेवण्याचे प्रस्तावित केले आहे. म्हणजे तो पर्यत आयुक्तांच्या आईची प्रकृती ठिक ठाक होवुन आयुक्त महापालिकेत येतील.

मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :— मा.महापौर महोदया, मी असे ऐकले आहे की, आयुक्त साहेब एक महिन्याच्या रजेवर जाणार आहेत? यासाठी सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन आयुक्तांनी सभागृहात उपस्थित राहण्याबाबत त्यांना आदेश दया व ही महासभा तो पर्यतच्या कालावधीसाठी स्थगित केली जावी.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— कृपया लक्ष दया, येथे मा.महापौरांना सभा स्थगितीची सूचना प्राप्त झाली आहे ती वाचून दाखविण्या बाबत मला सांगण्यात आले आहे. या सूचनेचे सूचक आहेत श्री. धनंजय बोडारे व अनुमोदक आहेत श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचा प्रस्ताव असा आहे की, ही सभा

बुधवार  दिनांक १.११.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यत स्थगित केली जावी, कोणास काही हरकत?

<u>मा.महापौर :—</u> सन्माननिय सदस्य श्री.धनंजय बोडारे, व श्री. बच्चाराम रुपचंदानी यांच्या  प्रस्तावा वरुन ही सभा दि. १.११.२००६ रोजी ४.०० पर्यत स्थगित करण्यांत येत आहे.

सूचक : श्री. धनंजय बोडारे

अनुमोदक : श्री. बच्चाराम रुपचंदानी

विषय : दि. २७/१०/२००६ रोजी होणा—या महासभेचे कामकाज तहकुब करण्याबाबत..........

<u>*प्रस्ताव :*</u>

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी हे आजच्या सभेस अनुपस्थित आहेत तसेच अन्य काही सदस्य अनुपस्थित आहेत आयुक्त सुध्दा अनुपस्थित आहेत.  अशा परिस्थितीत आजच्या सभेचे कामकाज स्थगित करण्यात यावे व ते दिनांक १.११.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजंता सभा ठेवण्यात यावी असे महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. २० ब</u>    <u>दिनांक : २७/१०/२००६</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे दिनांक २७/१०/२००६ रोजीच्या सभेचे कामकाज स्थगित करुन  दिनांक १/११/२००६ रोजी सायंकाळी ४—०० वाजें पर्यत सभा तहकुब करण्यास मान्यता देत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :—</u> मा.महापौरजी एक सूचना आहे आम्ही लोक गुरुनानक जयंतीच्या कार्यक्रमात व्यस्त आहोत पाच तारखे नंतर सभा ठेवली तर बरे होईल.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :—</u>  हा मा.महापौरांचा अपमान आहे.  त्या उभ्या राहिल्या नंतर सुध्दा आपण बोलत आहात? हा महापौरांचा अपमान आहे.

<u>मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :—</u>  मध्ये मध्ये बोलल्या शिवाय श्री. खेमाणी यांना बरे वाटत नाही काय?

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा** :– सभा स्थगित करायची काय? सर्व संमतीने ? दिनांक १.११.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यत?

**मा.सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :–** चालेल.

**महापालिका सचिव, श्री.प्रकाश कुकरेजा :–** कृपया राष्ट्रगिता कडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ४.२५ वाजता सभा दिनांक १.११.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर

दिनांकः–१/११/२००६

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १/११/२००६ रोजीच्या</u>
<u>सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/१०/२००६ रोजी सायंकाळी ४–०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करून शुक्रवार दिनांक २७/१०/२००६ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा पुन्हा स्थगित करुन ती बुधवार दिनांक १.११.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजंता घेण्यात आली. त्यावेळी मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :–श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश

२) मा. उप महापौर श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती जावळे संगिता रमेश | ३५ | श्रीमती खिलनानी भावना रवी |
| ४. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | ३६.. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३७ | श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ३८ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३९. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ८. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | ४०. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४१. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| १० | श्रीमती मोकल सीमा चंदाराम | ४२. | श्रीमती कारीरा रेखा मनुमल |
| ११. | श्री. गायकवाड दिलीप | ४३. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४४. | श्री. बोडारे धनंजय |
| १३. | श्री. एडके गणपत गोविंद | ४५. | श्रीमती कृष्णनानी रेखा हरेश |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४६. | श्री. भालेराव गौतम यशवंत |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४७. | श्री. ठाकुर अशोक |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४८. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४९. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| १८. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५०. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १९. | श्री. रोहरा श्यामसुंदर जानीलाल | ५१. | श्री. मनवानी अन्नु (सनमुख) |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५२. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २१. | श्री. पवार नाना आनंदा | ५३. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| २२ | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५४. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| २३. | श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा | ५५. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| २४. | श्री. निकम शांताराम ओंकार | ५६. | श्री. लबाणा होशियारसिंह हरिसिंह |
| २५. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५७. | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५८. | श्रीमती छाब्रिया भारती पहलाज |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५९ | श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६० | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २९. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ६१. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| ३०. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६२. | श्रीमती दासानी मिनु राजकुमार |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६३. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३२. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ६४ | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्री. जेसवानी सतरामदास फतनदास | ६५. | श्री. माखिजा हरदास |
| ३४. | डॉ. (श्रीमती) साधवानी जया मोहन | ६६ | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| | | ६७. | श्री. वधारिया राजेश नानिकराम |

**तर,**

मा.सदस्य / सदस्या १. श्री. महेंद्र मुलचंदानी २. श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र ३. श्री. जग्यासी राजु किशनचंद ४. श्री.लुड गोविंदराम ५. श्रीमती माने किरण बाळकृष्ण ६.श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल ७. श्री. पाटील विश्वनाथ ८.श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास ९. श्री. साधवानी मनोज लालचंद १०. श्री. अनिल जयसिंघानी ११. श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास १२. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम १३. श्री. बठीजा संजय रामचंद्र १४. श्री. बेहरानी ठाकुरदास वर्यलदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

मा.आयुक्त श्री. सदाशिव कांबळे हे सभेत उपस्थित होते व खाली दर्शविलेले अधिकारी सभेस हजर होते.

२. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
३ दिपक सावंत, उप—आयुक्त
१. श्री. मिलींद सावंत, उप—आयुक्त
२. श्री. एस.के.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
३. श्री. बी.सुंदरेश्वरन, प्रभारी शहर अभियंता
४. श्री.मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग
५. डॉ. के.आर खरात, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
६. श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार)
७. श्री एस.बी.सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
८. श्री एस.बी.गायकवाड, प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ)
९. डॉ. राजा रिझवानी, वैदयकिय अधिकारी
१०.श्री तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक
११.श्री. युवराज भदाणे, जनसर्पक अधिकारी

सायंकाळी ४—१० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—** मा. सचिव साहेब, राजकिय पक्षांना तर आपण नेहमीच वेगवेगळे करता. आज आपण पाण्याच्या बाटल्या सुध्दा वेगवेगळया रंगाच्या ठेवल्या आहेत. हिरवे लेबल असलेल्या बाटल्या एका बाजुला तर दुस—या बाजुला निळे लेबल असलेल्या बाटल्या ठेवल्या आहेत.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** मागील वेळेस जी सभा स्थगित करण्यात आलेली होती तेव्हा मागविण्यात आलेल्या सर्व बाटल्यांचा वापर करण्यात आलेला नव्हता त्यावेळी बाटल्यांचे जे दोन बॉक्स शिल्लक राहिले होते त्या बाटल्या आज उपयोगात आणल्या आहेत व त्याच ब्रॅन्डच्या बाटल्या आज न मिळाल्यामुळे दुस—या रंगाच्या बाटल्याचे दोन बॉक्स आणले आहेत त्यामुळे दोन वेगवेगळया रंगाचे लेबल असलेल्या बाटल्या ठेवल्या आहेत.

**मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** महापौर महोदया,माझ्या हातात पाण्याची ही जी बाटली आहे, हा कोणता ब्रॅन्ड आहे? पाण्याची ही बाटली म्हणजे निळया किंवा काळया रंगाची दारु नव्हे. धनुष्यधारी वृत्तपत्राच्या प्रेस मध्ये पाण्याची जी नळ जोडणी करण्यात आलेली आहे त्या नळ जोडणीतून येणा—या पाण्याचा हा रंग आहे. येथे आपण फक्त लेबल पहात आहात. असली माल तर इकडे आहे हे पाणी आपण पिणे पसंत कराल का? शहरामध्ये अश्या प्रकारचा पाणी पुरवठा करत आहात? कित्येक ठिकाणी नळांना दुर्गंधीयुक्त पाणी येत आहे ही आपण दिवाळी साजरी करत आहात कि, होळी साजरी करत आहात? शहराचा सत्यानाश केला जात आहे, पाण्याचा हा नमुना प्रयोग शाळेत पाठवून त्याची तपासणी केली जावी. अश्या प्रकारचे पाणी कसे वितरीत केले जात आहे? पाणी पुरवठा विभागातील जे अधिकारी आहेत त्यांनी याचा खुलासा करावा. अश्या प्रकारचे पाणी उल्हासनगर शहरामध्ये वितरीत केले जात आहे. दुर्गंधीयुक्त पाण्याचा हा नमुना आमच्या तर्फे आयुक्तांना सप्रेम भेट.

**मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—** मा. महापौर महोदया, आज काही उन्हाळयातील दिवस नाही ऋतु बदलला आहे शहरामध्ये पाण्याची ऐवढी समस्या आहे की, पहिले जसे पाणी पुरवठया साठी टॅकर्स पुरविण्यात आले होते त्यापेक्षा किती तरी बिकट समस्या आज आहे व जेथे कुठे थोडया फार प्रमाणात पाणी मिळत आहे ते एवढे दुर्गधीयुक्त आहे की, त्यामुळे रोगराई पसरत आहे ते पाणी वापरण्या योग्य नाही यास्तव मी आपणास निवेदन करतो की, आपण आयुक्त साहेबांना आदेश देवुन याबाबीचा खुलासा करावयास सांगा की, ही पाण्याची समस्या संपेल तरी केव्हा? तद्पूर्वी मा. आयुक्त साहेबांना गुलाब पुष्प देवून मी त्यांचे स्वागत करु इच्छितो. बरेच दिवस वाट पाहिल्या नंतर ते आजच्या महासभेत आले आहेत यासाठी त्यांना गुलाब पुष्प देवुन मी त्यांचे स्वागत करु इच्छितो.

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—** ही गांधीगिरी कधी पासुन चालू केलीत?

**मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** सन्माननिय महापौरजी,मी महासभे मध्ये एक लक्षवेधी सूचना मांडली होती की, आयुक्तांनी उल्हासनगर मधील जनतेस हरामखोर म्हटले आहे त्यावेळेस आपण म्हटले होते की, याबाबतची चर्चा त्यांच्या उपस्थितीत होईल, तर काय मी त्या लक्षवेधीवर चर्चा करु शकतो? जी व्यक्ती सध्या समोर बसली आहे ज्यांनी आमच्या उल्हासनगर मधील जनतेस हरामखोर म्हटले आहे. हरामखोर या शब्दाचा अर्थ यांना माहित आहे काय?

**मा.महापौर :—** आपणा सर्वांना माहित आहे की, तहकुब महासभेमध्ये दुस—या विषयावर चर्चा होत नाही ज्या विषयावर आपण या अगोदर बोलत होतात त्याच विषयावर आपण बोलू शकता. कोणत्याही अतिरिक्त विषयावर चर्चा करता येणार नाही.

**मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** त्यावेळेस आपण म्हटला होता की, पुढील महासभेत चर्चा करु त्यावेळी आपल्या एका सदस्याने म्हटले होते की, आम्ही गोळी खाण्यास सुध्दा तयार आहोत. हरामखोर शब्द उच्चारणा—या त्या व्यक्ती समोर चर्चा झाली पाहीजे असे म्हटले होते.

**मा. महापौर :—** सभा शिष्ट्राचार असो म्हणतो की, स्थगित सभेमध्ये आपण अतिरिक्त विषयावर काहीही बोलू शकत नाहीत या अगोदर ज्या विषयावर चर्चा चालू होती तेथुनच चर्चेस सुरवात होईल.

**मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** आमच्या डोक्यावर जोडे मारले तर चालतील का?या व्यक्तीने उल्हासनगर मधील जनतेच्या डोक्यावर जोडे मारले तर चालतील का?

**मा. सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :—** मा.महापौरजी, आपण श्री. भुल्लर महाराज यांना म्हटले होते की, पुढील महासभेत यावर चर्चा करता येईल.

**मा.महापौर :—** मी आपली लक्षवेधी सूचना स्विकृत केली नव्हती. आपण दबाव टाकला होता त्यावेळेस मी म्हटले होते की, मी लक्षवेधी सूचना स्विकृत करत नाही तसेच आयुक्त साहेब आज सभागृहात नाहीत. म्हणुन कृपा करुन आपण परवानगी न घेता बोलू नका. तहकुब महासभेतील विषयाकडे या.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** विषय क्रमांक.४

**मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** नाही नाही यांनी हरामखोर हा जो शब्द उच्चारला आहे त्याचा अर्थ सांगितला पाहीजे. सभेतील विषयांवर चर्चा तर होतच राहील. हरामखोर म्हणजे काय हे त्यांना माहित आहे काय?

**मा. महापौर :—** त्यांनी तसे म्हटले आहे किंवा नाही याबाबत आपण त्यांच्या दालनामध्ये जावून त्यांच्याशी चर्चा करु शकता

**मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** आम्ही त्यांच्या दालनात का जायचे? ते काय आमचे साहेब आहेत का?

**मा.महापौर :—** सचिव महोदय, आपण विषय वाचून दाखवा.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— ते काही आमचे साहेब नाहीत की, आम्ही त्यांच्या दालनामध्ये जावेत येथेच आम्ही त्यांना विचारु शकतो आम्हास जनतेने निवडून पाठविले आहे जनते बाबत जर कोणी चुकीचा शब्द वापरत असेल तर त्या बाबतीत आम्ही विचारणा केलीच पाहीजे. उल्हासनगर मधील जनता माफ करणार नाही या व्यक्तीस जर धडा शिकवीला नाही तर

मा. महापौर :— सचिव महोदय, आपण विषय वाचून दाखवा

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— आपण स्वत: म्हटले आहे की, त्यांच्या उपस्थितीत चर्चा होईल.

मा. सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :— आपणच म्हटले होते की, त्यांच्या उपस्थितीत चर्चा होईल म्हणुन

मा. महापौर :— सचिव महोदय आपण यांना नियम सांगा.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— सचिव साहेब आपण नियम सांगा, सन्माननिय महापौरांनी म्हटले होते की, आयुक्त आल्या नंतर त्यांच्या समोर चर्चा करु जो पर्यत ते सभेत उपस्थित नाहीत तो पर्यत चर्चा होणार नाही.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— मा. महापौर महोदया, जर आयुक्त साहेब जर खुलासा करीत असतील तर त्यात अडचण काय आहे? संपुर्ण शहरामध्ये हा एक चर्चेचा विषय झाला आहे.

मा.महापौर :— आपण त्यांच्या दालनामध्ये जावून खुलासा घ्या. स्थगित सभेमध्ये या विषयावर आपण चर्चा करु शकत नाहीत.

मा.सदस्य श्री. राज असरोंडकर व श्री. देवेद्रसिंह खेमानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— पुढील महासभेमध्ये जेव्हा लक्षवेधी सूचना येईल तेव्हा यांचे कुणी ना कुणी आजारी पडेल? न्यायालयाची तारीख येईल ? महासभा लावण्या अगोदर या व्यक्तीस विचारा की, तुमचे कोणी आजारी आहे काय? एखादया न्यायालयामध्ये तारीख आहे काय? सन्मानिय महापौर महोदया, याबाबतीत यांना विचारुन त्या नंतर महासभेची तारीख व वेळ ठरवा. असे मी सचिवांनाही सांगु इच्छितो पुढील महासभेच्या वेळी यांनी महासभेत उपस्थित राहिलेच पाहीजे. ते आम्हाला महासभेत हवे आहेत.

मा.महापौर :— सचिव महोदय आपण विषय वाचून दाखवा.

मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :— आयुक्त साहेबांनी स्पष्ट्रीकरण दयावे असा जर एखादया सदस्याने मुद्दा उपस्थित केला असेल तर स्पष्ट्रीकरण देण्या मागे चुकीचे काय आहे? शहरामध्ये याबाबत चुकीचा संदेश जात आहे.

मा.महापौर :— सभेच्या कामकाजा बाबत जे नियम, उपविधी तयार करण्यात आले आहेत त्यांच्या अधिन राहूनच आपणास काम करावयाचे आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— परंतू शहराच्या स्वाभीमानाचा जो प्रश्न आहे......

मा.महापौर :— स्थगित महासभेत आपण काहीही बोलू शकत नाहीत. आयुक्तांना आपण सांगु शकता का की, आपण बोला म्हणुन?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— ही सभा स्थगित यासाठी केली होती की, आयुक्त साहेबांच्या उपस्थितीत याबाबतीत स्पष्ट्रीकरण व्हावे.

मा. महापौर :— आपण विषयावर सभा स्थगित केली आहे. श्री. राज असरोंडकरजी आपण बोला.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— मा. महापौर महोदया ज्यावेळेस सभागृहामध्ये ही सभा स्थगित झाली होती.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— पाण्या बाबत मी जो मुद्दा उपस्थित केला होता त्याबाबतीत खुलासा करण्यासाठी आपण आयुक्तांना आदेश दिला नाहीत.

मा. महापौर :— सध्या ज्या विषयावर चर्चा चालू आहे त्याविषयांवरची चर्चा पुर्ण होवू दया व परवानगी घेवूनच बोला.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— महापौर महोदया यांनी तो पर्यत निर्णय घ्यावा की पाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे की, आयुक्तांच्या वक्तव्याचा प्रश्न महत्वाचा आहे तो पर्यत मी बोलू इच्छितो ....

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— मा. महापौर यांना जर आयुक्तांनी उच्चारलेल्या त्या शब्दावर चर्चा करायची आहे तर त्यावर सविस्तरपणे चर्चा झाली पाहीजे. आपल्या लोकांना असे वाटते की, उल्हासनगर मधील जनतेला हरामखोर म्हटले जावे? आपल्या लोकांना वाटते की, उल्हासनगर मधील लोकांना हरामखोर म्हटले जावे. त्या विषयावर चर्चा करण्यासाठी आपण त्यांना परवानगी देत आहात, आपण जर परवानगी देत आहात तर आम्ही सुध्दा चर्चा करु. आम्ही गप्प बसणार नाहीत.
मा.महापौर :— आपण हा विषय बंद करा आणि सर्वानी बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— सभागृहाचे मत घ्या.

मा.महापौर :— स्थगित सभेमध्ये अतिरिक्त विषयावर काही होत नाही. भलेही नियम वाचुन या.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— मा. महापौर महोदया, हरकतीच्या मुद्दयान्वये बोलू इच्छितो स्थगित सभेमध्ये चर्चा होत नाही असे आपण म्हणता आज शहरामध्ये पाण्याची फार मोठी समस्या आहे हरकतीच्या मुद्दयावर आपण आयुक्त साहेबांना याचा खुलासा करण्यास सांगा. दुर्गंधीयुक्त पाणी पिण्यास लोक मजबुर आहेत. शहरात प्रत्येक गल्ली व चौकामध्ये कच—याचे ढीग साचले आहेत. समस्याच समस्या आहेत व आपण म्हणतात की, स्थगित सभेमध्ये दुस—या कोणत्याही विषयांवर चर्चा होत नाही. यासाठी आपण याचा खुलासा करा की पाण्याची समस्या कधी पर्यत सुटेल व जे दुर्गंधीयुक्त पाणी येत आहे ते कधी बंद होईल?

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— मा. महापौरजी व आयुक्त साहेब, माझ्या प्रभागामध्ये दोन दिवसा पासुन पाणी येत नाही. पाण्याची फार मोठी समस्या निर्माण झाली आहे.

मा. महापौर :— आपण बसुन घ्या.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— पाण्याची एवढी मोठी समस्या असतांना आपण आम्हास बोलू न देता बसण्यास सांगता
मा. महापौर :— दोन दिवसापूर्वी पाण्याचा विषय का नाही आला?

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— पाण्यासाठी मोर्चा घेवुन यावा लागेल. आपण जेव्हा पासुन महापौर झाल्यात तेव्हा पासुन पाण्याची समस्या निर्माण झाली आहे त्या अगोदर पाण्याची समस्या नव्हती.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :— सभागृहाचे मत घ्या, सभा गृहातील बहुसंख्य सदस्यांना काय वाटते? ते चर्चा करु इच्छित आहेत किंवा नाही? हा विषय स्थगित महासभेत येवु शकत नाही का?दोन तीन दिवसांपासुन पाण्याची कपात चालु आहे. टॅकर व्दारे पुरविण्यात येण्या—या पाण्यासाठी लोक त्रस्त झाले आहेत बादल्या घेवुन लोक फिरत आहेत. व आपण काय म्हणत आहात की, स्थगित महासभेत या मुद्दयावर चर्चा होवु शकत नाही. या समस्येची सोडवणुक करण्यासाठी आम्ही या सभागृहात आलो आहोत. आपण या शहराच्या नेत्या म्हणुन निवडल्या गेल्या आहात. आपले काम आहे आम्हास सहकार्य देणे व आयुक्तांना या बाबतीत स्पष्ट्रीकरण विचारणे, परंतू आपण म्हणत आहात की, स्थगित महासभेत हा मुद्दा चर्चेस येवु शकत नाही. शहरा बाबतीत आम्हा सर्वाची जबाबदारी आहे. कित्येक ठिकाणी नळाना पाणी येत नाही कित्येक ठिकाणी दुर्गंधीयुक्त गढूळ पाणी येत आहे तर कित्येक ठिकाणी टॅकर व्दारे पुरविण्यात येणा—या पाण्यासाठी लोक त्रस्त आहेत. आपण म्हणत आहात की, या मुद्दयावर महासभेत चर्चा होवु शकत नाही. पुढील विषय चर्चेस घ्या. आमची काही नैतिक जबाबदारी नाही का? आपली नैतिक जबाबदारी विसरुन जायची का? आपण सभागृहाचे मत घ्या किती लोक या मुद्दया बाबत चर्चा करु इच्छित आहेत.

**मा. महापौर :—** सचिव महोदय, आपण सभेचे कामकाज पुढे चालू करा विषय वाचुन दाखवा. पाण्याच्या प्रश्ना संदर्भात संबधित अधिका—यास बोलावले जाईल व ते येवुन आपणास उत्तर देतील.

**मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** चर्चा पाहिजे, स्पष्ट्रीकरण पाहिजे.

**मा. सदस्य श्री.विनोद ठाकुर :—** पाणी पाहिजे पाणी, पाणी पाहिजे पाणी.......

**मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी:—** असाच एक मागे मुद्दा आला होता त्यावेळी तत्कालीन एक नगरसेवक श्री. बाबुराव बगाडे हे पाणी पाणी करत ओरडून मरण पावले. आज पुन्हा एकदा आम्ही ही मागणी जोरदारपणे करत आहोत की, शहरामध्ये पुरेशा प्रमाणात पाणी पूरवठा झाला पाहीजे, पाणी पाहिजे व स्पष्ट्रीकरण पाहिजे.

**मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** सन्माननिय महापौरजी, दोन वर्षा पुर्वी सभागृहाच्या प्रेक्षक गॅलरी मध्ये गोंधळ झाला होता त्यानंतर असे ठरविण्यात आले होते की, पासा विना एकाही नागरिकांस सभागृहाच्या प्रेक्षक गॅलरीत सोडले जाणार नाही. आता दहा लोक पासा बिना प्रेक्षक गॅलरी मध्ये बसले आहेत. ते कोणत्या अधिकारान्वये गेले आहेत? हे दहा लोक कोण आहेत? सर्वांचे पास चेक करा व जे दहा लोक पास नसताना प्रेक्षक गॅलरीत कसे गेले? त्यांना कोणी सोडले? पास चेक करण्यासाठी एका माणसास सांगितले जावे. उदया सकाळ एखादा व्यक्ती पास नसताना सुध्दा प्रेक्षक गॅलरीत प्रवेश करेल व तेथे बॉम्ब स्फोट घडवून आपणा सर्वांना उडवून निघुन जाईल. हा विषय काय आयत्या वेळचा नाही काय? उदया कोणी प्रेक्षक गॅलरी मध्ये बॉम्ब ठेवुन गेला तर ?

**मा.महापौर :—** बिना पासचे कोण कोण आहेत यांची सुरक्षा रक्षक तपासणी करतील.

**मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** बिना पासचे नाही, त्यांना कोणी सोडले त्यांचेवर कारवाई झाली पाहीजे. सचिव साहेब, प्रेक्षक गॅलरीत प्रवेश देणे हे कोणाच्या अधिकारात येते?

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** श्री. भदाणे हे प्रेक्षक गॅलरीतील प्रवेशाचे नियंत्रण करतात.

**मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** तर श्री. भदाणे यांना बोलवा बिना पासचे गॅलरी मध्ये कोण कोण आहेत याची तपासणी करण्यास सांगा.

**मा.महापौर :—** श्री. माखिजाजी आपण बोलां.

मा.उप महापौर श्री. विनोद तलरेजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

**मा. सदस्य श्री.हरदास माखिजा :—** मा.महापौरजी, हे मी मान्य करतो की, आजची ही सभा स्थगित सभा आहे व स्थगित सभेमध्ये लक्षवेधी सूचना घेतली जात नाही हे खरे आहे. परंतू जो मुद्दा महाराज भुल्लर यांनी उपस्थित केला आहे की, आयुक्तांनी उल्हासनगर मधील जनतेस हरामखोर म्हणुन संबोधित केले आहे ते कुठेही आणी कोणाच्याही समोर संबोधित केले असो हा अतिशय गंभीर असा मुद्दा आहे.आपण शहराच्या प्रथम नागरिक आहात आपल्या खांदयावर संपुर्ण शहराची जबाबदारी आहे. शहरातील नागरिकांचा कशा प्रकारे सन्मान होईल त्यांना सन्मानपूर्वक संबोधित करणे ही आयुक्तांची जबाबदारी आहे. स्थगित सभे मध्ये लक्षवेधी सूचना आपण चर्चेस घेवू नका परंतू मला असे वाटते की, दोन मिनीटात याबाबतचे स्पष्ट्रीकरण आयुक्त साहेबांनी सभागृहात दयावे. कारण की, महाराज भुल्लर यांनी त्यांच्यावर जो गंभीर स्वरुपाचा जो आरोप लावला आहे काय तो बरोबर आहे की चुकीचा आहे? जर त्यांनी तसे म्हटले नसेल तर सभा गृहा समोर तसे म्हणावे की, मी हे शब्द उच्चारलेलेच नाहीत त्यामुळे लक्षवेधीचा प्रश्नच उद्‌भवणार नाही. त्यामुळे हा मुद्दा येथेच संपुष्टात येईल.

**मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** हा मुद्दा उपस्थित होईलच आम्ही आमच्या सर्व नगरसेवकांना निवेदन केले आहे की, या व्यक्तीच्या विरोधात मतदान करा व यांना येथुन परत पाठवा. जी व्यक्ती उल्हासनगरवासियांना हरामखोर म्हणते. याचे स्पष्ट्रीकरणावर भागणार नाही. आम्हास सुध्दा या मुद्दयावर चर्चा करु दिली जावी. या व्यक्ती विरोधात मतदान करुन यास इथुन परत पाठविले जावे.

मा. सदस्य श्री.हरदास माखिजा :— आयुक्तांनी सभागृहात स्पष्ट्रीकरण दयावे. त्यामुळे सर्व सदस्यांचे समाधान होईल. आपले सुध्दा समाधान होईल आपण लक्षवेधी सूचना चर्चेस घेवू नका. फक्त त्यांच्या कडून स्पष्ट्रीकरण मागा व हा मुद्दा येथेच समाप्त करा.

मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :— महापौर महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या विषयावर सुरवातीलाच आपण आपला अधिनिर्णय दिला आहे की स्थगित महासभे मध्ये मागील महासभेचे जे कामकाज शिल्लक राहिलेले असते तेच होते व या विषयावर लक्षवेधी सूचना त्यावेळेस आली होती परंतू ती आपण अमान्य केली आहे.
मा. सदस्य श्री.विनोद ठाकुर :— पाण्या पेक्षा कोणताही मुद्दा महत्वपुर्ण नाही पाण्याच्या मुद्दयावर चर्चा झाली पाहीजे. बाकी सर्व मुद्दे बाजुला ठेवा. पाणी पहिले पाहिजे.

मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :— मा. महापौरांकडून प्रथम मंजुर तर करुन घ्या चर्चा करण्यासाठी,

मा. सदस्य श्री.विनोद ठाकुर:— महापौरांनी परवानगी दिली पाहिजे शहरामध्ये पाणी नाही, तुमच्या घरी पाणी आहे काय?

मा. सदस्य श्री.राज असरोंडकर:— चार वेळा मी, हरकतीच्या मुद्दाचा उल्लेख केला आहे. मला बोलु दिले जात नाही.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :— मा.महापौर महोदया, सचिव साहेबांनी सांगावे की, हरकतीच्या मुद्दान्वये एखादा मुद्दा चर्चेस आणला जावु शकतो किंवा नाही? बिस्लरी बाटलीतील पाणी आम्ही का प्यावे? शहरातील जनतेस दुर्गंधीयुक्त गढूळ पाणी पिण्यास आम्ही भाग पाडत असताना आम्ही बिस्लरीतील पाणी का प्यावे?

मा.महापौर :— श्री. जमनुजी, हे पहा ज्या विषयावर मागील महासभेत चर्चा बंद झाली होती व श्री. माखिजा साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे ते हरकतीच्या मुद्दान्वये त्यावर बोलू इच्छित आहेत त्यांचे बोलणे पुर्ण होवु दया.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :— त्या अगोदर मी बोललो आहे, हरकतीच्या मुद्दान्वये मी पाण्याचा मुद्दा उपस्थित करत आहे.

मा.महापौर :— मी सांगु इच्छिते की, दोन दिवसा पूर्वी सभा होती तेव्हा नव्हता का पाण्याचा मुद्दा? दोन दिवसा पासुन त्रास नव्हता? आजच त्रास आहे?

मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :— दोन दिवसा पूर्वी सुध्दा पाण्याचा त्रास होता परंतू आयुक्त साहेब त्यावेळी येथे नव्हते.

मा. सदस्य श्री.विनोद ठाकुर :— मा. महापौरजी, शहरात पाणी आहे किंवा नाही याची आपणास सर्वात जास्त माहिती आहे.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :— हरकतीच्या मुद्दयांन्वये पाण्याचा मुद्दा चर्चेस घेतला जावु शकतो किंवा नाही हे सचिव साहेबांनी सांगावे.

मा.सदस्य श्री.सुरेश जाधव यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :— मा. महापौर महोदया, ज्या विषयास मंजुरी देण्याचे महापौरांनी अमान्य केले आहे व जो विषय कामकाजा मध्ये सुध्दा नाही नियम असे म्हणतो की, मागील महासभेत जे कामकाज बाकी होते तेच कामकाज पुढे चालविले जावे. जो विषय लक्षवेधीच्या रुपाने ठेवला होता तो आपण अमान्य केला आहे. एकवेळा पीठासीन अधिकारी यांनी एखादा विषय अमान्य केल्या नंतर त्यावर जबरदस्तीने चर्चा चालु करणे व चालु ठेवणे हे चुकीचे आहे या लोकांची एक गोष्ट्र माझ्या लक्षात येत नाही की, कधी नियमानुसार बोलतात कधी नियमाच्या विपरीत बोलतात.

**मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–** आपल्या शाळेत आम्ही शिकण्यास येवु?

**मा. सदस्य श्री.अशोक ठाकुर :–** शहरात पाणी नाही माझ्या प्रभागात लोक पाण्या वाचुन तडफडून मरत आहेत

**मा. महापौर :–** बसुन घ्या, कृपया बसुन घ्या, मध्येच बोलु नये.

**मा. सदस्य श्री.अशोक ठाकुर :–** बसुन घ्या हा काय कायदा आहे? कायदा आहे तर माझ्या प्रभागामध्ये पाणी घेवुन या.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :–मा.** महापौर महोदया माझे मित्र श्री. अशोक ठाकुर यांनी एका सभे मध्ये रस्त्या बाबतची लक्षवेधी सूचना मांडली होती व रस्ते तयार सुध्दा झाले नव्हते तरीही ते शांत बसले होते आज आम्हाला शिकवत आहेत शहरामध्ये काय काय समस्या आहेत. जेव्हा यांनी स्वत: रस्त्यां बाबत सभागृहा मध्ये चर्चा केली होती. व आज ते उलट बोलत आहेत म्हणजेच यांना जे सोयीचे वाटते यांना जे फायदयाचे वाटते तसे ते नियम वळविण्याचा प्रयत्न करत आहेत. यांना असे वाटते की, आज आमच्या हातात बहुमत आले आहे तर दुनिया आमच्या हातात आली आहे.

**मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:– मा.** महापौरजी, यांना बोलण्यावर नियंत्रण ठेवण्यास सांगा.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :–** सभागृहाचे कामकाज नैतिकता व नियमा नुसार चालले पाहीजे.

**मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी:– मा.** महापौरजी, सचिव साहेबांना सांगितले जावे की, त्यांनी सभेच्या पुढील कामकाजा वर यावे.

**मा.सदस्य श्री.विनोद ठाकुर :–** ये नैतिकतावाला,.........चाललाय आम्हाला नैतिकता शिकवायला....

**मा. सदस्य श्री.दिलीप लालवाणी :–** नैतिकता व नियम आम्हाला सांगु नका.

**मा. सदस्य श्री.राजेद्र चौधरी :– मा.** महापौरजी आमचे मित्र श्री. राज असरोंडकर यांनी आता आताच सांगितले की, सभेचे कामकाज नियमा नुसार चालले पाहीजे बहुमताच्या जोरावर काही होत नाही. बहुमताच्या जोरावर दुनिया खरेदी केली जात नाही. परंतू जेव्हा ते या बाजुला बसत होते तेव्हा पलिकडे असेच चालु होते तेव्हा त्यांनी बरीचशी दुनिया खरेदी केली असेल हे त्यांनी या बाजुने पाहीले असेल? तर मेहरबानी करुन सभेत ज्याकाही विषयावर चर्चा चालु आहे ती चालु दया.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :–** ज्यावेळेस मी, समाजातील वेगवेगळया विषयावर बोलत होतो तेव्हा हेच लोक पहिल्या बाकावर बसुन सभागृहात माझा आवाज दाबण्याचा प्रसत्न करत होते कारण की, आज त्यांच्या गळयात गळया घालून हे लोक राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. आम्ही यांच्या कटपुतळया नाहीत की आम्ही यांच्या कोणत्याही इशारावर नाचावे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

**मा. सदस्य श्री.नथु सोनावणे :–** आपला आवाज आम्ही वर पर्यत पोहचवु.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :–** फक्त आपल्या स्वार्थ व स्वार्थासाठी राजकारण करणा–या लोकांनी मला नैतिकता शिकवण्याची गरज नाही.

यावेळी मा. सदस्या श्रीमती जया साधवानी या मा.सदस्य श्री. राज असरोंडकर यांचेकडे तोंड करुन हाताने ईशारा करुन शाब्दीक हल्ला करण्याच्या इरादयाने जोरजोराने बोलत होत्या. त्यांच्या व श्री. राज असरोंडकर यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते. चप्पल या शब्दाचा पुसटसा उल्लेख येत होता परंतू स्पष्टपणे काही ऐकु येत नव्हते.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— स्वार्थ्याचे राजकारण कोणाला शिकवता?

मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :— व्यासपीठा कडे तोंड करुन बोला.

मा.सदस्या श्रीमती जया साधवाणी :— स्वप्न पहात आहेत, स्वप्न

मा. सदस्य श्री.नथु सोनावणे :— आलेत नैतिकता शिकवणारे.

मा. सदस्य श्री.विनोद ठाकुर :— भाषण नको पाणी दया.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री.सुरेश जाधव :— कुत्रा कोण झाला? हे सर्वाना माहित आहे व सर्वजण ओळखतात. कुत्र्याची शेपटी कोण झाले ते सर्वांना माहित आहे.

**मा. सदस्या श्रीमती जया साधवाणी :— आम्हाला सर्व माहित आहे,इकडून तिकडे तिकडून इकडे कोण ये जा करते ते आम्हाला सर्व माहित आहे.**

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी:— मा. महापौरजी, हे उघड उघड गैरवर्तन होत आहे एका सदस्यांस धमकावले जात आहे.

मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :— मा.महापौर महोदया, सभागृहात हे काय चालले आहे? सदस्यास धमकावण्याचा प्रयत्न केला जात आहे. धमकावणारे कोण आहेत?

मा. सदस्या श्रीमती जया साधवाणी :— महापौर फक्त श्री. राज असरोंडकर यांना बोलण्यास परवानगी देतात. आम्हाला सुध्दा बोलण्यास परवानगी दिली पाहिजे.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— पाण्याच्या प्रश्नावर कोणाला बोलु न देता सर्वाना खाली बसण्यास सांगितले व श्री. राज असरोंडकर यांना बोलण्यास सांगितले हा कुठला कायदा आहे?

मा. सदस्या श्रीमती जया साधवाणी :— आपण न्याय करा फक्त श्री. राज असरोंडकर यांना बोलण्यास परवानगी दिली जात आहे. बाकी सदस्यांना बसुन घ्या बसुन घ्या असे म्हटले जात आहे.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— श्री. राज असरोंडकर कटपुतली आहेत ना म्हणुन त्यांना बोलण्यास परवानगी दिली जात आहे?

मा. सदस्या श्रीमती जया साधवाणी :— हे चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :— नैतिकता शिकवण्या—याने स्वत: आपल्या मनामध्ये डोकावुन पाहिले पाहिजे.

मा. महापौर :— आयुक्त साहेब, मी, ब—याच कालावधी पासुन पहात आहे की, काही सदस्य महासभेस युध्दाचा आखाडा बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत व या सभेचे कामकाज चालविण्यास ब—याचश्या अडचणी निर्माण केल्या जात आहेत. या सभे मध्ये श्री. मोहन बेहरानी, श्रीमती जया साधवाणी, श्री. किशोर वनवारी जे माईकवर ऑ—ऑ करत लोकांना चिडविण्याचा प्रयत्न करत आहेत. श्री. जमनु पुरस्वानी, श्री. अशोक ठाकुर,

व श्रीमती मालती करोतिया यांना सभागृहातून बाहेर जाण्यासाठी मी आता आदेश देत आहे. त्यांना आताच्या आता सभागृहातून बाहेर जावे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवाणी :— आपण बहुसंख्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करीत आहात.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी:— मा महापौरजी, सन्माननिय सदस्यांस उघड उघड धमकी देण्या—यांवर कारवाई केल्या बाबत आपणास धन्यवाद देतो.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— आपण लोक धमकी देत नाहीत काय?

मा. महापौर :— महासभेमध्ये जोडयाने मारण्याची काही लोक धमकी देतात. एवढे बैशिस्त वागतात. .....

मा. सदस्या श्रीमती जया साधवाणी :— फक्त एकटया श्री. राज असरोंडकर यांचीच महापौर आहे का? सर्वाची आहे ना?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— जास्त बक बक करु नका तुमच्याकडे बहुमत नाही.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :— मा. सचिव साहेब, अल्प मतात आलेल्या महापौर , ज्यांच्याकडे सभा चालविण्यासाठी आवश्यक तितके बहुमत नाही त्या असा आदेश देवु शकतात का?

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी:— जर गैरवर्तन केले असेल तर महापौर त्यांच्यावर कारवाई करु शकतात. उघड उघड गैरवर्तन केले आहे, धमकी दिली आहे, जोडे दाखवून इशारा केला आहे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवाणी :— अदयाप पर्यत धमकी दिलेली नाही.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी:— मा. महापौर महोदया, याची सुध्दा नोद घेतली जावी.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी:— मा. सचिव साहेब कृपया आपण खुलासा करावा महापौरांनी जो आदेश दिला आहे तो नियमा मध्ये आहे का ? काय येथे बहुमताच्या आदेशाचे पालन झाले पाहिजे की, महापौर जो आदेश देतील त्याचे पालन झाले पाहिजे हे आपण सांगा.

मा.महापौर :— आयुक्त साहेब, सभेचे कामकाज चालविले जाणार नाही जो पर्यत या सदस्यांना बाहेर काढले जात नाही.

यावेळी मा.महापौरांकडून पोलीसांना व महापालिका सुरक्षा अधिका—यास लेखी पत्र देण्यात आले की, त्यांनी सभागृहात येवुन त्या ६ सन्माननिय सदस्यांना बळजबरीने बाहेर काढावे. सदरचे पत्र मिळाल्याचे पोलिस अधिकारी व सुरक्षा अधिकारी यांनी पोच दिली आहे.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवाणी :— महापौर महोदया, या तमाशास जबाबदार कोण आहे? जो मुद्दा उपस्थित केला त्यावर स्पष्टीकरण देवु दया ना, आम्हालाही असे वाटत नाही की, गोंधळ व्हावा हा काही आमचा उद्देश नाही जर आयुक्त स्पष्टीकरण देत असतील तर त्यामध्ये अडचणीचे काय आहे? सभागृहाला काय पाहिजे? सभागृहाचा सन्मान झाला पाहिजे.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी:— मा. महापौरांच्या आदेशाचे पालन व्हावे.

मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:— सभागृह नेत्यास उभे राहून बोलता येत नाही का? प्रथम उभे राहून बोलण्यास शिका.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी:— मी काही गैरवर्तन केलेच नाही तर?

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी:— बसुन बोला, बसुन.

.

मा. सदस्य श्री.नथु सोनावणे :— सन्मा.महापौरजी आम्ही उल्हासनगरचे पाणी पितो,भाकरी सुध्दा खातो ,कुणी उल्हासनगरला वाईट बोलते तर आम्हाला खुप वाईट वाटते,आता काही सदस्य म्हणत होते की,अमुक या ठिकाणी कचरा पडला आहे,पाणी मिळत नाही,त्यावर चर्चा करण्यासाठी आपल्या सभागृहात कुणाला वेळ नाही,महाराष्ट्र विधान सभेत चर्चा होते,त्यांच्याकडे यासाठी वेळ आहे,दिल्लीमध्ये सत्र चालते त्याच्याकडे वेळ आहे,परंतु आपणाकडे वेळ नाही,एकदा आम्ही आपसात भांडत होतो, एक इंग्रज व्यक्ती आपल्या गोल मैदान येथुन जात होता,त्याच्या पायाला शेण लागले,तो व्यक्ती खांबाच्या बाजुला उभा राहून पायाला लागलेले शेण काढत होता,आम्ही दोघे भांडत होतो आम्हाला वाटले की या व्यक्तीला विजेचा झटका लागला असवा,त्याला आता हाताने कसे दुर करायचे? आम्ही शेजारी पडलेला बांबु उचलला,त्याचे पायावर मारला तो बिचारा जखमी झाला,त्याला उचलून रूग्णालयात दाखल केले,आम्ही त्यास जेव्हा पहाण्यास गेलो तेव्हा तर तो तेथे_गाणे गावू लागला,आय लव्ह माय उल्हासनगर,मी म्हटले याला आपण मारले,हा घायाल झाला तरी ही असे म्हणत आहे. त्यानंतर तो म्हणत होता आय लव्ह माय महाराष्ट्र, त्या नंतर तो आय लव्ह माय इंडिया म्हणत होता,त्यावर आम्ही म्हंटले की आपण असे का गात आहात? त्यावर तो म्हणाला की उल्हासनगर मधील लोक खुप चांगले आहेत. मला विजेचा झटका लागला त्यावेळेस आपण मला हाताने सुध्दा खेचु शकत होतात ,परंतु आपण माझ्यावर उपकार केलेत आपण मला काठीने मारले, तर येथे सुध्दा असेच होत आहे,जे कुणी बोलण्यासाठी उभे रहातात त्यांना बसण्यास सांगितले जाते,कुणी प्रेमाने बसवितो,जसे त्या इंग्रज व्यक्तीस विजेचा झटका लागला होता,त्यास हाताने सुध्दा बाजुला केले जावू शकत होते,काही सदस्य वरिष्ठ आहेत त्यांना_आम्ही कधी उलट उत्तरे देत नाहीत. तर आपले काही सदस्य आमच्या वरीष्ठ सदस्यांना काही अपशब्द वापरतात त्यांना आपण शिकवा की, आपल्या पेक्षा वरीष्ठ सदस्यांशी कसे बोलावे येथे तर अ वर्ग,ब. वर्ग, क वर्ग अशी काही वर्गवारी नाही. परंतू आपल्या संस्कृतीच्या हिशोबाने चांगले बोलावे. हे एक झाले व दुसरे असे की, उल्हासनगर मधील जनतेस जर कोणी अपशब्द बोलत असेल तर त्याचे आपणास सुध्दा वाईट वाटेल आम्हास सुध्दा वाईट वाटेल आमचे वरीष्ठ नगरसेवक व काही काळ सभागृह नेता राहिलेले श्री. भुल्लर महाराज यांनी जी लक्षवेधी सूचना मांडली होती तीच्यावर चर्चा करण्यास काही हरकत नाही. साहेब त्यावर उत्तर देतील. बोलले नसतील तर बोललो नाही म्हणुन सांगतील बोलले असतील तर त्याचा खुलासा करतील व हे अतिशय चांगले होईल आपल्या खुर्चीचा काही दुरुपयोग नाही असे वाटेल व चर्चा झाली पाहिजे आपण अनुमती दया.चर्चा होईल एवढे बोलुन मी माझे दोन शब्द संपवितो धन्यवाद.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:— सचिव साहेब काय पत्र लिहिले आहे ते आम्हाला सांगा.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— ज्या सदस्यांना बाहेर जाण्यासाठी महापौरांनी आदेश दिला आहे त्यांना बाहेर काढण्यासाठी मा.महापौर पोलीस अधिका—यांना विनंती करत आहेत.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:— सचिव साहेब आम्ही तुम्हाला एक ठराव देतो.

मा.सदस्य श्री. धनजंय बोडारे:— आम्ही एक ठराव दिला आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:— लेखी ठराव दिला आहे. सभागृहात वाचून दाखवा.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवाणी :— सचिव साहेब, वाचून दाखविले जावे काय दिले आहे.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:— नाही तर मी वाचुन दाखवितो.

मा.महापौर :— स्थगित सभे मध्ये काही होवु शकत नाही.

मा. सदस्य श्री. ईश्वर पमनानी, श्री. राजु टेकचंदानी, श्री.अन्नु मनवानी हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:–** महापौरांना कोणतेही अधिकार नाहीत आणि महापौरांचा प्रत्येक निर्णय हा सभेतील बहुमतावर आधारीत असतील. आम्ही अशा प्रकारचा एक ठराव दिला आहे. आपण सभागृहात ठराव करु शकता परंतू आम्ही सभागृहात लेखी ठराव दिला आहे. आपले जे निर्देश आहेत ते बेकायदेशिर आहेत व आपण आपणास बहुमतात आणण्यासाठी प्रयत्न करत आहात. कारण सध्या आपणाकडे बहुमत नाही आपण अल्प मतात आल्या आहात. बहुमत सिध्द करण्यासाठी आपण काही सदस्यांना बाहेर काढत आहात. यासाठी आम्ही हा ठराव आणत आहोत आपणास याबाबतीत कोणतेही व्यक्तिश: अधिकार नाहीत, एखादया सदस्यास निलंबित करण्याचा महापौरांना कोणताही अधिकार नाही. यासाठी आम्ही आमचा ठराव दिला आहे आपण त्यावर मतदान घ्या.

**मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–** सचिव साहेब, कायदया नुसार पोलिस सभागृहात येवु शकतात काय ते आम्हास ते जरा सांगा. कायदया नुसार पोलिस सभागृहात येवु शकतात का ते जरा सांगा.

**मा.सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–** आपण लेखी दया, लेखी दया.

**मा.सदस्य श्री. अशोक ठाकुर:–** मा. आयुक्त साहेब, जेव्हा आपण आम्हास बाहेर काढतच आहात. आमच्या प्रभागामध्ये पाण्याची समस्या आहे त्यासाठी आम्ही आवाज उठविला आहे त्यासाठी सभागृहातून बाहेर जाण्यास सांगितले आहे. तर आम्ही कोठे जायचे?

**मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–** सचिव साहेब, कायदया नुसार पोलिस सभागृहात येवु शकतात काय ते आम्हास जरा सांगा. कायदया नुसार पोलिस सभागृहात येवु शकतात का ते जरा सांगा.

**मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे:–** आम्ही काय ठराव दिला आहे तो वाचून दाखवा.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :–** मा. महापौरांनी तो घेण्यास नकार दिला आहे म्हणुन तो आपणास परत करत आहे.

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :–** असे होते का? आपण सचिव सर्वांचे आहात ना?

**मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :–** सभा नियमा नुसार चालविली जाईल की, हुकुमानुसार चालविली जाईल?

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :–** हुकुमशाही आहे काय?

**मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** पहिली गोष्ट, आपणास जर माहिती नसेल तर, किंवा महापौर महोदयांना माहिती नसेल तर श्री. लाल पंजाबी हे सांगतील, मा.महापौर महोदयांनी सहा सदस्यांना सभागृहातून बाहेर जाण्यास सांगितले होते त्याबददल कायदयात काय तरतुद आहे? ते श्री. लाल पंजाबी सांगत आहेत. आम्हास सभा चालवायची आहे कायदया नुसार ना कुण्या एकाच्या मनमानी प्रमाणे,

**मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:–** मी जसे सांगितले,

**मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:–** येथे काय यैयाखानाचे राज्य आहे काय?

**मा.सदस्य श्री. लाल पंजाबी:–** कुण्याही महापौरास कुण्याही सदस्यास सभागृहातून बाहेर काढण्या बाबत व्यक्तीश: अधिकार नाहीत. येथे प्रत्येक गोष्ट्र लोकशाही पध्दती प्रमाणे होते. येथे महापौरांचे जेव्हा आदेश होतात तेव्हा ते बहुमताने निर्णय घेतले जातात. सधारणत: नेहमी असे असते की, महापौरांकडे बहुमत असते ते आदेश देतात तर त्याचे पालन केले जाते कारण की, प्रत्येकाला वाटते त्यांच्याकडे बहुमत आहे परंतू महापौराचा जो निर्णय असतो तो सभागृहाला मार्गदर्शन करणे व सभागृहाच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करणे, महासभेचे जे सभागृह आहे ते महापौर व आयुक्त या सर्वा पेक्षा वरीष्ठ असल्याने ते कोणताही निर्णय घेवु शकते व महापौरांचा जो निर्णय असतो तो बहुमताच्या अधिन असतो. यासाठी आम्ही ठराव दिला आहे भले ही आपण त्यावर बहुमताच्या आधारावर निर्णय घ्या. असा आमचा आपणास आग्रह आहे.

मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे :— पीठासीन अधिका—यांचे आदेश कोणीही मान्य करत असतो पीठासीन अधिकारी म्हणुन तसेच सर्व प्रकारच्या अधिकारांचे व मर्यादांचे पालनही झाले पाहिजे. मागील वेळेस जेव्हा एक विषय आला होता ज्यामध्ये आपला रस होता तेव्हा श्री. जमनु पुरस्वानी यांनी एक शंका व्यक्त केली होती की, या विषया मध्ये पीठासीन अधिकारी यांचा रस आहे. म्हणुन पीठासीन अधिकारी बदला पाहिजे. प्रत्यक्षात नेहमी असे होते की, एखादया विषया मध्ये पीठासीन अधिकारी यांचा रस असेल तर त्यावेळेस ते पीठासीन अधिकारी म्हणुन असता कामा नये. पुर्वग्रह दुषित आदेश असु शकतो म्हणुन पीठासीन अधिकारी भेदभाव न करणारा असला पाहिजे. आमच्या श्री.हरदास माखिजा यांनी सांगितले की, आपण या शहराच्या महापौर आहात प्रथम नागरिक आहात त्यानंतर आपला राजकीय पक्ष आहे. सभागृह चालविणे हे आपले काम आहे याबाबत मागील वेळेस मी म्हटले आहे की, सभा योग्य प्रकारे चालविली पाहीजे परंतू जर या प्रमाणे आपण सभेचे कामकाज चालविले. कुण्या एका सदस्याला खाली बसण्यास सांगुन आपल्या पक्षाच्या सदस्यास बोलण्यास सागणे की आपण बोला, असे झाले तर सभागृहामध्ये असेच होत राहिल. व आपला आदेश चुकीचा असल्यामुळे त्याचे पालन होणार नाही. श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, कायदया नुसार सभागृहाची मर्यादा राहिली पाहीजे बहुमताचा मान सन्मान करणे हे आपले व आम्हा सर्वाचे कर्तव्य आहे बहुमत जे सांगते त्या प्रमाणे चालले पाहीजे राहिली गोष्ट्र पीठासीन अधिकारी यांचे अधिकार व निर्णयाची हा निर्णय सुध्दा बहुमताच्या आधारावर असला पाहिजे आपण जो आदेश दिला आहे तो बेकायदेशिर व पक्षातीत दिला आहे. आपण जर निपक्षपाती राहिला असता तर असे झाले नसते. या सभागृहात आपण जो आदेश दिला त्यांचे पालन करायचे किंवा नाही याबाबत बहुमताने आपण निर्णय घ्या. आमचा ठराव आहे तो आम्ही दिला आहे.

मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— या सभागृहामध्ये जी चर्चा चालू होती ती पाण्याच्या विषया बाबत होती. नगरसेवक म्हणुन या सभागृहात येवून शहरातील समस्यांबाबत येथे चर्चा करु शकलो नाहीत व पाण्याच्या प्रश्नांवरील चर्चे बाबत आपण जर आम्हास सभागृहातून बाहेर जाण्यास आदेश देत असाल तर हा सरळ सरळ जनतेचा अपमान आहे लोकशाहीची हत्या आहे.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा.महापौरजी, श्री जमनादास पुरस्वानी यांचे म्हणणे चुकीचे आहे पाणी प्रश्नांच्या चर्चे वरुन बाहेर जाण्याचा आदेश झालेला नाही.

मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— माझे नांव घेतले, मी फक्त पाण्याच्या प्रश्नांवर चर्चा केली आहे. इतिव्त्तांमध्ये नोंद आलेली आहे. आपण उल्हासनगर मधील जनतेचा अपमान केला आहे. माझा असा आरोप आहे की, आपण लोकशाहीची हत्या केली आहे. सभागृहा मध्ये शहरातील समस्यां बाबत जर आम्ही चर्चा करत आहोत आज जर आपण अल्प मतात आहात परंतू जर आपण बहुमतात सुध्दा असत्या तरीही आपणास कोणताही अधिकार पोहोचला नसता की, आपण लोकशाहीची हत्या करावी. व आपण आम्हाला सभागृहातून बाहेर जाण्याचा आदेश दयावा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा.महापौरजी, श्री. जमनादास पुरस्वानी हे पाण्याच्या प्रश्नांवर तरी बोलले परंतू मी तर काहीही बोललो नाही माझ्या नांवाने तर इतिवृत्तांत एक शब्दही आला नाही. मा. सभागृह नेता आपण जेव्हा इतिवृत्त वाचाल ना? तेव्हा माझा एक शब्द सुध्दा आल्याचे आपणास दिसुन येणार नाही मग मला सभागृहातून का बाहेर काढत आहात?

मा.महापौर :— सभागृहातील सभेचे कामकाज थांबविले आहे इतिवृत्त लिहिले जाणार नाही. जो पर्यत सभेचे कामकाज थांबविले आहे तो पर्यतचे इतिवृत्त लिहिले जाणार नाही.

या दरम्यान सत्ताधारी व विरोधीपक्षांच्या सदस्यांमध्ये जोरदार आरोप प्रत्यारोप चालू होते व ज्या सन्माननिय सदस्यांना मा. महापौरांनी सभागृहा बाहेर जाण्यास आदेश दिला होता ते सभागृहा बाहेर जात नव्हते. तसेच मा. महापौरांनी पोलिसांना पत्र देवूनही पोलिस सभागृहात येण्यास तयार नव्हते यानंतर मा. महापौरांनी महापालिकेच्या सुरक्षा अधिका—यांना याबाबतीत पत्र दिल्या नंतर त्यांनीही त्या सन्माननिय पालिका सदस्यांना सभागृहा बाहेर काढण्या बाबतीत काहीही प्रयत्न केले नाहीत. मा. महापौरांनी त्या सन्माननिय सदस्यांना सभागृहा बाहेर जाण्यासाठी वारंवार सूचना देवूनही ते सदस्य सभागृहा बाहेर जात नव्हते या दरम्यान सुरक्षा अधिकारी यांनी त्या सन्माननिय सदस्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न केले परंतू त्याचा काहीही फायदा झाला नाही. यावेळी सन्माननिय सदस्य श्री. मोहन बेहरानी यांनी सुरक्षा अधिकारी श्री. गव्हाणे यांचे हातातील पत्र घेवुन वाचले व ते फाडून त्याचे लहान लहान तुकडे करुन ते सभागृहातील त्यांच्या आसना समोरील मोकळया जागेत भिरकावून

दिले. तसेच सन्माननिय सदस्या श्रीमती जया साधवानी या सुरक्षा अधिकारी श्री. गव्हाणे यांना सूचित करीत होत्या की, आम्हा महिला सदस्यांच्या अंगाला तुम्ही हात लावु शकत नाहीत. त्यामुळे त्या सन्माननिय ६ सदस्यांना सभागृहा बाहेर काढण्याचे सुरक्षा अधिकारी यांचे प्रयत्न निष्फळ ठरले

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** कृपया लक्ष दया यावेळी सायंकाळचे ७.०० वाजले आहेत आणि नियमा नुसार सायंकाळी ७.०० वाजे नंतर सभा चालवायची नाही त्यामुळे ही सभा स्थगित करावी लागेल.

**मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :—** आम्ही ठराव देत आहोत.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** आपण ठराव देत आहात काय? तारीख निश्चित करायची आहे.

**मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** ही स्थगित सभा जेव्हा चालविली जाईल तेव्हा सुध्दा अशीच स्थिती असेल काय? एक दोन दिवसा नंतर सभा ठेवली तर पुन्हा असेच चालेल काय? शेवटी आपण शहरास काय संदेश देवू इच्छिता. सभागृहाचा अवमान का केला जात आहे. समस्यांवर चर्चा करण्यासाठी वेळ नाही शेवटी हे काय होत आहे.

**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** महापौर महोदया, आयुक्त साहेब, शहरामध्ये पाण्याची समस्या ऐवढी जटील असतानाही दोन तासा पासुन तुम्ही शांत बसला आहात त्या बाबतीत तुम्ही काही बोलत नाहीत व मार्गही काढत नाहीत याबाबतीत आम्ही काय समजायचे?

**मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** लक्षवेधी सूचना मांडतो त्यावरही तुम्ही बोलत नाहीत.लोक प्रतिनिधींची भावना समजुन घेत नाहीत. दोन—दोन, तीन—तीन तास सभागृहाचे कामकाज स्थगित केले जात आहे व ज्या संदस्यांना सभागृहातून बाहेर जाण्याचा आदेश दिला आहे ते सदस्य सभागृहातून बाहेर जात नाहीत तो पर्यत सभागृहाचे कामकाज चालविले जाणार नाही असे आपण म्हणता. सभेचे कामकाज चालवायचे नाही. असे कोणते काम आम्ही केले आहे?सायंकाळी ७.०० नंतर दुस—या दिवसाची सभा होईल त्यामध्ये काय होईल? शेवटी हे काय होत आहे. शहरातील जनता आपणास निरखुन पहात आहे. दोन तीन तासा पासुन जो तमाशा चालु आहे त्यातून काय निष्पन्न झाले. महापौर व आयुक्त साहेब संपुर्ण शहर आपणाकडे पहात आहे. शहरास आपण काय संदेश देवु पहाता? काही जबाबदारी, उत्तरदायित्व आहे किंवा नाही? तोंडावर पट्टी बांधुन मी येथे बसुन राहिलो होतो ते यासाठी की, यातून तरी आपणास काही समजुन येईल. एक निर्वाचित सदस्य, स्विकृत सदस्य सभागृहात आपले विचार व्यक्त करण्यासाठी येतो तो सुध्दा आपल्या तोंडावर पट्टी बांधतो यातून तरी प्रशासनाच्या काही लक्षात आले पाहीजे. हा तर लोकशाहीचा उघड उघडपणे अपमान आहे. शहरास आपण काय संदेश देवु इच्छिता. प्रेक्षक गॅलरी मध्ये जे पत्रकार बसले आहेत जे सभेचे कामकाज पहात आहेत त्यांच्या माध्यमातून उदयाच्या वर्तमानपत्रा मध्ये कोणत्या स्वरुपाच्या बातम्या छापुन येणार आहेत. कोणी तरी आपली जबाबदारी ओळखतो की नाही? फक्त व्यासपीठावर बसुन दोन तीन तास वेळ काढूपणा करावयाचा आहे. काही तरी मर्यादा असली पाहीजे आणि या सभेचे कामकाज दोन दिवसा साठी स्थगित करणार असाल तर, त्या नंतर तरी काय होणार आहे? याबाबतची हमी कोण घेणार आहे. प्रत्येक वेळा इथे यायच हजेरी पटावर स्वाक्षरी करायची, दोन तीन तास इथें कसे तरी काढायचे, चहा प्यायचा आणि निघुन जायचे एवढेच काही तरी झाले पाहिजे, शहरामध्ये दुर्गंधीयुक्त गढूळपाणी पुरविले जात आहे याबाबत आपले काही उत्तरदायित्व नाही का? लोकांनी आपणास मते देवुन महापौर बनवुन पाठविले आहे. मी महासभा चालु देणार नाही हा अहंकार सोडून आपण काम का नाही करत? ही जिद्दबाजी सोडा शहरा बाबतीत विचार करा. आपली जबाबदारी ओळखा, वादंग कुठे होत नाहीत? लोकसभेत होते, विधान सभेत होते, प्रत्येक महानगरपालिका, नगरपालिकेत होते. परंतू कोणत्याही परिणामा शिवाय या सभेचे कामकाज स्थगित करायचे? काही तरी उत्तर तर दया

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :—** मा.महापौरजी व आयुक्त साहेब मी आपणास विनंती करते की, शहरामध्ये पाण्याची जटील समस्या आहे. मी आपणास सांगु इच्छिते की, माझ्या प्रभागातील एका छोटयाश्या विभागामध्ये ४८ इमारती आहेत सायकांळी ७.०० वाजंता श्री. पाटील, पाण्याचे टॅकर बंद करतात.मी आपणास निवेदन करते की, जो पर्यत नळाव्दारे पाणी येत नाही तो पर्यत टॅकरव्दारे होणारा पाणी पुरवठा सायंकाळी
७.०० वाजंता बंद करु नये, उदया पासुन आपण या बाबीकडे लक्ष दयाल अशी मला खात्री आहे परंतू विशेष करुन मी टकर बाबतीत सांगु इच्छिते की, ७.०० वाजंता जे टॅकर बंद करता ते चुकीचे आहे. याबाबीकडे आपण जरुर लक्ष दयाल अशी मला खात्री आहे या बाबतीत आपल्या दालनामध्ये येवुन मी आपली भेट घेईन.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** कृपया लक्ष दया, सन्माननिय सदस्यांना सभागृहातून बाहेर जाण्या बाबतचा जो आदेश होता तो आजच्या दिवसा पुरता लागु होता. असा मा.महापौरांचा आदेश होता.

**मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** सचिव साहेब, जर ही चुक आहे तर अश्या प्रकारची चुक या सभागृहातील सदस्य वारंवार करतील.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** एक ठराव आला आहे सभा स्थगित करण्यासाठी त्याचे सूचक आहेत श्री. धनंजय बोडारे .

**मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** सचिव साहेब सभा स्थगितीचा ठराव का आला आहे? आपण म्हटले की, ७.०० वाजंता सभेचे कामकाज चालवायचे नाही. आता अशा या महासभांच्या कामकाजामुळे आम्ही ही त्रस्त झालो आहोत. ही महासभा ज्या प्रकारे पीठासीन अधिकारी यांनी चालविली या अगोदर श्री.हरदास माखिजा हे सुध्दा महापौर होते, नगरपालिकेच्या व महानगरपालिकेच्या इतिहासात अश्या प्रकारची सभा कधी चालविली गेली नाही. याचाच अर्थ आजचा दिवस उल्हासनगर वासियांसाठी काळा दिवस आहे. सत्ताधारी व विरोधीपक्षाचे सर्व सदस्य या महासभेमुळे त्रस्त झाले आहेत. ज्या महासभेमध्ये मा.महापौर दोन तासा पासुन काहीही बोलत नाहीत. आयुक्तांनी पाण्याच्या प्रश्ना बाबतीत निवेदन केले पाहीजे ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे परंतू ते सुध्दा बोलु इच्छित नाहीत अश्या प्रकारे एका मागोमाग एक सारेच गप्प आहेत व त्याचे परिणाम लोक भोगत आहेत. तीन तीन महासभा होवुन सुध्दा त्यातून परिणाम काहीच नाही. यासाठीच आम्ही ठराव दिला आहे की, आजच्या या सभेतून काही निष्पन्न होत नाही. आपला अहंकार जोपासण्या साठी एक महापौर काही सन्माननिय सदस्यांना सभागृहातून बाहेर जाण्याचा आदेश देतात हे चुकीचे आहे.या महासभेतून काही फळनिष्पत्ती होणार नाही.ही महासभा तशीही स्थगित होणार आहे म्हणुन ती पुढील सभे पर्यत म्हणजे २० तारखे पर्यत स्थगित केली जावी आपण जे कायदेशिर मत दिले त्यानुसार आम्ही हा ठराव दिला आहे. सभा स्थगित करण्याची आमची इच्छा नव्हती आपण थोडयावेळा पुर्वी सांगितले की, सायंकाळी ७.०० वाजे नंतर सभा स्थगित होत यासाठी आम्ही हा ठराव दिला आहे.

**मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** मा. महापौरजी, मागच्या वेळी सभा यासाठी स्थगीत केली होती की, महासभेत आयुक्तांना बोलावले जावे पुढील महासभेत आयुक्त उपस्थित असले पाहिजेत व आमची जी मागणी आहे त्यावर आयुक्तांनी खुलासा केला पाहीजे. मागील दोन वेळेस ही सभा स्थगित झाली ती केवळ आयुक्त नसल्यामुळेच फक्त एकाच विषयावर कामकाज चालवायचे होते ते तर आम्ही त्या दिवशी देखिल चालविले असते. परंतू आम्हाला असे वाटत होते की, आयुक्तांनी लक्षवेधीवर निवेदन करुन शंकाचे समाधान करावे परंतू आजही यातून काहीही फळनिष्पत्ती झाली नाही. जर ही सभा स्थगित होत असेल तर पुढील महासभेत आयुक्तांनी आवश्य उपस्थित राहिले पाहिजे व आमच्या शंकाचे समाधान करावे व प्रश्नांची उत्तरे दयावीत.

**मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** ही जी महासभा झाली ती काळी महासभा असल्याचे इतिहासामध्ये नोंद केली पाहिजे.

**मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—** मा.महापौर महोदया सुरूवातीस आम्ही पाण्याचा विषय उपस्थित केला होता,एकदम शांतपणे चर्चा चालु होती पाण्याच्या चर्चेवरून मा.महापौर आम्हाला सभागृहातून बाहेर जाण्याचा आदेश देत असतील व लोकशाहिची हत्या होत असेल तर त्यांनी याबाबतीत खुलासा करावा की पुढील महासभेत आम्हाला या विषयांवर बोलण्याची संधी मिळेल किंवा नाही, की तोंडावर पटटी बांधावी लागेल ? हे सांगा, नाहितर आम्ही ६ लोकांनी तोंडावर पटटी बांधुन यावी ? जर आयुक्त साहेब आमच्या मुददयांचा खुलासा करत नसतील , समस्यांचे निवारण करत नसतील तर व मा.महापौर महोदया आदेश देतात की आपण सभागृहातून बाहेर जा,तर काय आम्ही तोंडावर पटटी बांधून सभागृहात यावे ?हे आम्हास सांगावे, या अगोदर आमच्या श्रीमती मालती करोतिया या आपल्या महापौर होत्या त्यावेळेस विरोधी पक्षाचे सदस्य खुपच कमी होते,कित्येक वेळा आम्ही शहरातील समस्यां बाबत चर्चा केली परंतु त्यांनी कधीही बाहेर जाण्या बाबत आदेश दिला नाही. कॉंग्रेसची महापौर असताना आम्ही शिवसेना भाजपाचे सदस्य शहरातील समस्यांबाबत नेहमी आक्रमकपणे बोलत असत परंतु त्यानी कधीही असा आदेश दिला नाही परंतु या महापौरांनी आम्हास बाहेर जाण्यास आदेश दिला हि बाब इतिहासात काळया अक्षरात लिहिली जाईल, जर का आम्ही काही गोंधळ घातला असता किंवा काही चुकीच्या शब्दांचा प्रयोग केला असता तर व त्यावरून आम्हास सभागृहातून बाहेर जाण्यास सांगण्यांत आले असते तर आम्ही जरूर सभागृहातून बाहेर गेलो असतो परंतु आम्ही शहरातील समस्यांबाबतीत

आवाज उठविला आहे,आम्ही शांततेने चर्चा केली, असे करून ही मा.महापौरांनी आम्हाला सभागृहातून बाहेर जाण्याचा आदेश देवून इतिहासामध्ये आपले नाव काळया अक्षराने नोंदविले आहे.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :–नियमा नुसार ७.०० वाजता सभा स्थगित करायची आहे.यासाठी जो प्रस्ताव आला आहे त्यानुसार सोमवार दिनांक २० नोव्हेंबर २००६ रोजी दुपारी १२.०० वाजता सभा ठेवण्यांत येईल.

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :– २०तारखेसच का?

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :– प्रस्ताव आला आहे,

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :– दोन तीन दिवसा नंतरची वेळ ठरविली जावी. पाण्याची समस्या फार मोठी आहे त्यावर चर्चा झाली पाहिजे व या दोन तीन दिवसांमध्ये आयुक्तांनी परिणाम दाखवला पाहिजे. तो पर्यत आयुक्त रजेवर जावु नयेत सभागृहाची भावना ते समजले आहेत त्या अगोदर पाण्याची समस्या सुटली पाहिजे.व आयुक्तांनी सुट्टीवर जावु नये मला जेथ पर्यत माहिती आहे त्यावरुन असे दिसते की, आयुक्त साहेब रजेवर जाणार आहेत. आम्ही नगरसेवक आहोत आम्हाला नगरसेवक मानले जात आहे किंवा नाही? सभागृहाच्या भावना समजून घ्या.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :– सोमवार दिनांक २०.११.२००६ रोजी दुपारी १२.०० वाजे पर्यत ही सभा स्थगित करण्याचा प्रस्ताव आहे, याबाबत कोणाची काय हरकत आहे काय? सर्वसमतीने? सर्वसंमतीने स्थगित?
मा.महापौर :– प्रस्तावा नुसार सदरची सभा सोमवार दिनांक २०.११.२००६ रोजी दुपारी १२.०० वाजे पर्यत स्थगित करण्यास संमती देत आहे.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :– राष्ट्रगित गाण्या अगोदर मी एक सूचना देवू इच्छितो की, आपल्या महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर मुख्य लेखा परिक्षक म्हणुन एक अधिकारी रुजु झाले आहेत त्यांचे नांव आहे श्री. सुधीर नाकाडी. ते स्वत: व्यासपीठावर येवुन आपला परिचय करुन देतील.

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :– येवून काय करतील? या अगोदर आलेल्या अधिका–यांनी काय केले आहे?

श्री. सुधीर नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक :– मा. महापौर, उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य,मी सुधीर नाकाडी मी महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या वित्त व लेखा सेवा संवर्ग.१ या पदावरुन या महापालिकेत मुख्य लेखा परिक्षक या पदावर प्रतिनियुक्तीने हजर झालो आहे. धन्यवाद..

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :–कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायकाळी ७.१५ वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभेचे कामकाज सोमवार दिनांक २०.११.२००६रोजी दूपारी १२.०० वाजे पर्यत स्थगित करण्यात येत असल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२०/११/२००६

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/११/२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/१०/२००६ रोजी सायंकाळी ४—०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करून शुक्रवार दिनांक २७/१०/२००६ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा पुन्हा स्थगित करुन ती बुधवार दिनांक १.११.२००६ रोजी आयोजित करण्यात आली होती यासभेचे कामकाज पुन्हा स्थगित करुन सदरची सभा सोमवार दिनांक २०.११.२००६ रोजी दूपारी १२.०० वाजंता घेण्यात आली. त्यावेळी मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती जावळे संगिता रमेश | ३५ | श्रीमती खिलनानी भावना रवी |
| ३. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | ३६.. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३७ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ३८ | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३९. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ७. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | ४०. | श्री. जाधव सुरेश मधुकर |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४१. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| ९. | श्रीमती मोकल सीमा चंदाराम | ४२. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्री. गायकवाड दिलीप | ४३. | श्री. बोडारे धनंजय |
| ११. | श्री. महेंद्र मुलचंदानी | ४४. | श्रीमती कृष्णनानी रेखा हरेश |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४५. | श्री. भालेराव गौतम यशवंत |
| १३. | श्री. एडके गणपत गोविंद | ४६. | .श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७. | श्री. ठाकुर अशोक |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४९. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५०. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १८. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५१. | श्री. मनवानी अन्नु (सनमुख) |
| १९. | श्री. रोहरा श्यामसुंदर जानीलाल | ५२. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २१ | श्री. पवार नाना आनंदा | ५४. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| २२. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५५. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| २३. | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ५६. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| २४. | श्री. निकम शांताराम ओंकार | ५७. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| २५. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५८. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५९ | श्रीमती छाब्रिया भारती पहलाज |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६० | श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६१. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २९. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ६२. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| ३०. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६३. | श्रीमती दासानी मिनु राजकुमार |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६४ | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३२. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ६५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्री. जेसवानी सतरामदास फतनदास | ६६ | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३४. | डॉ. (श्रीमती) साधवानी जया मोहन | ६७. | श्री. वधारिया राजेश नानिकराम |

**तर,**

मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा तसेच मा.सदस्य / सदस्या २. श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र ३ श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा ४.श्री.लुड गोविंदराम ५.श्री. असरोंडकर राजेश जयसिंग ६.श्रीमती माने किरण बाळकृष्ण ७. श्रीमती कारीरा रेखा मनुमल

८.श्री. पाटील विश्वनाथ ९ श्री. अनिल जयसिंघानी १०. श्री. लबाणा होशियारसिंह हरिसिंह ११. डॉ (श्रीमती) नाथानी निना १२.श्री. बठीजा संजय रामचंद्र १३ श्री. बेहरानी ठाकुरदास वर्यलदास १४. श्री. हरदास माखिजा हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

मा.आयुक्त श्री. सदाशिव कांबळे यांच्या अनुपस्थित श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन सभेस उपस्थित होते. खाली दर्शविलेले अधिकारी सभेस हजर होते.

२. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
३ दिपक सावंत, उप—आयुक्त
४ श्री. एस.के.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
५ श्री.मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग
६. डॉ. के.आर खरात, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
७ श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार)
८. श्री. सेलवन, उप अभियंता,पाणी पुरवठा
९ श्री.सा.अ. पठान, प्रभाग अधिकारी
१०. श्री. काटे, प्रभाग अधिकारी,
११. श्री एस.बी.सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
१२. श्री एस.बी.गायकवाड, प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ)

१३. श्री तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक
१४. श्री. युवराज भदाणे, जनसर्पक अधिकारी

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :–</u> प्रथम वंदेमातरम होईल कृपया सर्वानी आपआपल्या आसना शेजारी उभे राहावे. वंदेमातरम म्हणुन दूपारी १२.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>विषय क्रमांक.४ :–</u> पूर्वीचा महासभा ठराव क्र.३८, दिनांक २०/७/२००५ रद्द करुन कु. पौर्णिमा गणेश भिंगे ह्यांची महापालिका निवड समितीच्या शिफारसीनुसार ''स्टाफ नर्स'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.

<u>मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> मा.महापौर महोदया, ही जी सभा दोन वेळा स्थगित केली होती त्याचे कारण हे होते की, आयुक्त साहेब सभेत उपस्थित नव्हते. परंतू मागच्याच सभेत आयुक्त साहेब उपस्थित होते. त्यावेळेस त्यांना बोलण्यास निर्देश देण्यात आले नाहीत. तसेच ७.०० वाजे पर्यत सभेची वेळ अशीच व्यर्थ घालविण्यात आली त्यावेळी सभा स्थगित झाली त्यावेळेस मी, म्हटले होते की, मला या बाबतची माहिती आहे की, पुढील महासभेत आयुक्त उपस्थित नसतील आणि आज पहात आहोत की, आयुक्त श्री. सदाशिव कांबळे महासभेच्या व्यासपीठावर उपस्थित नाहीत. अश्या प्रकारे सभागृहाच्या भावनांशी खेळले जात आहे. लोकतांत्रिक पध्दतीने निवडली गेलेली उल्हासनगर महानगरपालिकेची महापौर ज्यांना येथे भरघोस बहुमताने महापौर म्हणुन निवडून दिले आहे त्याच महापौर आज लोकतांत्रिक पध्दतीवर विश्वास ठेवत नाहीत असा माझा त्यांच्यावर आरोप आहे. हे काय आहे? हे सभागृह आयुक्तांना काही विचारु इच्छिते महासभेचे कामकाज स्थगित करण्यात आले, जेव्हा आपणास असे दिसुन आले की, सभागृहामध्ये आपणाकडे बहुमत नाही त्यावेळी आपण सहा नगरसेवकांना सभागृहातून बाहेर जाण्याचा आदेश दिला व सात वाजे पर्यत आपण सभागृहाची वेळ व्यर्थ घालविली. उल्हासनगर महानगरपालिकेच्या इतिहासात असे पहिल्यांदाच झाले आहे. आज पुन्हा या सभेचे कामकाज चालविण्या मागे अर्थच काय उरला आहे कारण की आज पुन्हा आयुक्त साहेब सभेत उपस्थित नाहीत काय ही सभा आम्ही परत अशीच चालवायची? तर काय तमाशा करण्यासाठी आपण महासभा आयोजित करतो? काय सभागृहाच्या सहमतीची काय आवश्यकता नाही? जर आज ही सभा आयुक्तांच्या अनुपस्थित चालवायची असेल तर या अगोदर दोन वेळा सभा स्थगित करण्याची आवश्यकताच नव्हती. मी सभागृहास निवेदन करतो की, आयुक्त नाहीत तर या सभागृहाचे काम सुध्दा चालविता कामा नये धन्यवाद.

<u>मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :–</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मागील महासभेत पाणी पुरवठया संदर्भात मी मुद्दा उपस्थित केला होता. या बाबत आता उत्तर देण्यासाठी पाणी पुरवठा विभागाचे कोण अधिकारी उपस्थित आहेत? श्री. सावकारे कोठे आहेत? माझ्या प्रभागामध्ये आठ दिवसा पासुन पंप बंद आहे त्यावर खर्च करण्यासाठी ५ हजार रुपये आपल्या महापालिकेकडे नाहीत. महापालिका एवढी कंगाल झाली आहे की, पंप दुरुस्तीसाठी महापालिकेकडे ५ हजार रुपये नाहीत. त्यामुळे आठ दिवसा पासुन लोकांना पाणी मिळत नाही. या मुद्दयावर उत्तर देण्यासाठी संबधित कोणते अधिकारी उपस्थित आहेत? महापालिकेला कोणी वारस नाही का?

<u>मा.महापौर :–</u> स्थगित महासभा आहे, होवु शकते पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित नसतील यासाठी आपण आपल्या विषयावर यावे.

<u>मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> मा.महापौर महोदया, विषय तर हा आहे की, मागील वेळेस महासभा आयोजित करुनही आयुक्त साहेब दोन महासभांना उपस्थित नव्हते त्या बेलगाम माणसांस सभेत उपस्थित राहण्या बाबत आपण सांगा, आज त्यांचे कोण आजारी पडले ते आपण सांगु शकाल? की स्वत: आजारी आहेत, चार अक्षरांचा तो आजार तर त्यांना झाला नाही? त्यांना कोणता आजार आहे? त्यामुळे ते प्रत्येक महासभेस येत नाहीत. मागील वेळेसच मी म्हटले होते की, पुढील महासभा ठेवतांना त्या सभेत उपस्थित राहण्या बाबतीत त्यांना ताकीद दया. मी, मागील वेळेसच म्हटले होते की, त्यांना काय आजार आहे त्यावर चर्चा केली जावी. उदया आणखी कोणी आजारी पडेल, तरीही आज ते महासभेत उपस्थित नाहीत. तर त्यांना असा काय आजार आहे?

<u>श्री. नाना रौराळे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u> मा.महापौर महोदया, सर्व सन्माननिय नगरसेवक, मा. आयुक्त श्री. सदाशिवराव कांबळे हे दिनांक २७.११.२००६ पर्यत अर्जित रजेवर असल्यामुळे त्यांचा कार्यभार कल्याण–डोबिवली महानगरपालिकेचे आयुक्त श्री. आर.डी. शिंदे यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे. आणि त्यांच्या निर्देशा नुसार आजच्या महासभेस उपस्थित राहण्यासाठी मला प्राधिकृत करण्यात आले आहे.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :– त्यांना आजार काय आहे? सुट्टी कश्यासाठी घेतली आहे?

श्री. नाना रौराळे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :– अर्जित रजेवर आहेत. शासनाकडून त्यांची रजा मंजुर झाली आहे. कश्या साठी रजा घेतली ते कारण मला माहित नाही.

मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :– सांगितले असेल ना की, मला अमुक अमुक हा अजार आहे, आई आजारी आहे, बहिण आजारी आहे. भाभी आजारी आहे, काका आजारी आहेत की, त्यांना स्वत:ला चार अक्षरी आजार आहे. रजेच्या अर्जावर यातील काही तरी कारण लिहिले असेल. त्यांना स्वत:ला जर तो चार अक्षरी आजार असेल तर त्यांनी तो महानगरपालिकेला लावु नये. यास्तव मा.महापौर महोदया, माझे असे निवेदन आहे की, या महासभेचे कामकाज २८ तारखे पर्यत स्थगित केले जावे. जो पर्यत ते येत नाहीत, ते येई पर्यत महासभा होता कामा नये. हा असा माणुस आहे की, या माणसास जर आपण पाठीशी घातले तर उल्हासनगरची जनता आपणास क्षमा करणार नाही.

मा.सदस्या श्रीमती सीमा मोकल, श्रीमती निता आहुजा, श्रीमती मिनु राज दासानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :– माा.महापौरजी, पाणी पुरवठयाचा विषय जनतेच्या जीवनाशी संबधित असल्यामुळे व आताच श्री. सेलवन साहेब सभागृहात आले असल्यामुळे त्यांना या प्रश्नावर उत्तर देण्यास सांगीतले जावे. कारण की, आठ दिवसा पासुन एक थेंब सुध्दा पाणी मिळत नाही. लाल चक्की बुस्टरचा पंप आठ दिवसा पासुन बंद आहे त्याचे काम का होत नाही ते आपण सांगा. लोकांना पाणी मिळते किंवा नाही याकडे आपण बिल्कुल लक्ष देत नाहीत आपणास फोन केला असता आपला फोन बंद असतो, श्री. सावकारे जागेवर नाहीत संबधित अधिकारी कोण आहेत? पंप का बंद आहे ते मला सांगा. नाही तर मी, आपणास सांगतो.

श्री.सेलवन, उप अभियंता :– मा.महापौरजी, लाल चक्की येथे जो पंप आहे चार पांच दिवसा पासुन तांत्रिक कारणास्तव बंद आहे.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :– आठ दिवस झाले, आज आठवा दिवस आहे

श्री.सेलवन, उप अभियंता :– बंद आहे.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :– त्याची दुरुस्ती का होत नाही?

श्री.सेलवन, उप अभियंता :– त्याचा स्टार्टर जो आहे तो खराब झाला आहे.

मा.सदस्य श्री. चंदाराम मोकल, श्री. बबन लिंगे, श्री. सुरेश जाधव, श्री. विनोद ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :– आज चार दिवसां पासुन तो ठेकेदार, कल्पतरुवाला म्हणतो की, मला पैसे दिले नाहीत आपण मला पैसे दया तर मी काम करतो ही गोष्ट सत्य आहे की, असत्य आहे.

**श्री.सेलवन, उप अभियंता :—** त्यावर जो खर्च होणार आहे त्याबाबतीत जे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे वीस हजार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन पाठविण्यात आले आहे. त्यांनतर नविन स्टार्टर लावुन पंप सुरु केला जाईल.

**मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** तांतडीच्या कामासाठी तुमच्याकडे पैसा नाही. तो तर मला म्हणाला की, ५ हजार रुपये दया मी काम करतो. बाकीचे पंधरा हजार आपले कमीशन आहे का?

**श्री.सेलवन, उप अभियंता :—** त्या विभागा मध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी पन्नास एचपी चा जो पंप आहे त्यावरुन अर्धातास पाणी येते तो त्या विभागामध्ये वळविला जावु शकतो.

**मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** आठ दिवसा पासुन लोकांना पाणी मिळत नाही आणि आपण आरामशिर बसला आहात, वीस हजारा साठी, आपल्याकडे पैसे नाहीत. महापालिका कंगाल झाली असेल तर शहरात आम्ही झोळी घेवुन फिरतो? एवढी जर महापालिकेस भिक लागली असेल तर आयुक्त साहेब उत्तर दया तांतडीने खर्च करण्यासाठी तुमच्याकडे वीस हजार रुपये नाहीत. पाण्यासाठी लोक वणवण फिरत आहेत संबधित कोणीही अधिकारी नाहीत. श्री. सावकारे नाहीत, आज हे सांगतात की, वीस हजार रुपयाचा प्रस्ताव तयार करुन पाठविला आहे. फुकटचा पगार घेता का तुम्ही? नुसते बसलात ,दिवस काढता.

**श्री.सेलवन, उप अभियंता :—** जुना स्टार्टर खराब झालेला आहे तेथे नविन स्टार्टर लागेल. नविन स्टार्टर साठी प्रस्ताव पाठविला आहे.

**मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** कधी कराल. लोकांना उत्तर देण्यासाठी कोणी आहे काय,? आज पाहिले तर ठेकेदार तेथे येवुन रडत आहे तो म्हणतो की, मला पाच हजार रुपये दया मी आता काम सुरु करतो. तुमच्याकडे नसतील तर सांगा आम्ही भिक मागुन पैसे देतो. आयुक्त साहेब तुम्ही यांचे उत्तर दया. वीस हजार रुपये देखिल तुमच्याकडे नाहीत का? महापालिका भिकारी झाली आहे का? या लोकांनी खावुन खावुन पैसे समाप्त केले का?

**मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:—** मा.महापौर व आयुक्त साहेब, हे जे पगार घेतात त्यांना काम करण्यास सांगा नाही तर हे रस्त्यावरुन जाताना यांना उल्हासनगर मधील जनता मारेल.

**मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** यांनाही माारतील आणि लोकप्रतिनिधींनाही मारतील.

**श्री.सेलवन, उप अभियंता :—** २० एचपी चा जो पंप आहे त्याच्या स्टार्टरची दोन दिवसामध्ये दुरुस्ती करुन पंप चालु केला जाईल.

**मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** आठ दिवस लोकांना तहानलेले ठेवले आणखी दोन दिवस ठेवणार का?

**श्री.सेलवन, उप अभियंता :—** ५० एचपी पंपाव्दारे त्याविभागातील लोकांना पाणी पुरवठा केला जातो.

**मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** बिल्कुल नाही एक थेंब सुध्दा पाणी येत नाही. आठ दिवसा मध्ये पाहणी करण्यासाठी तेथे कोणता अधिकारी आला होता? आपण मला त्यांचे नांव सांगा, मी फोन करुन करुन थकलो. आठ दिवसा पासुन लोकांना पाणी मिळते किंवा नाही हे पहाण्याची जबाबदारी कोणाची आहे? आपण पगार घेता

तो कसला घेता? दोन वॉल बसविण्यासाठी एम.आय.डीसी.ला देण्यासाठी आपल्याकडे पैसा नाही. बाकी ठिकाणी व्यर्थ खर्च करण्यासाठी पैसे असतात.

<u>**श्री.सेलवन, उप अभियंता :—**</u> दोन दिवसामध्ये होईल.

<u>**मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :—**</u> दोन दिवसात झाले नाही तर लोकांना घेवुन येवु व सर्वांना चपलेने मारु हे लक्षात ठेवा.

मा.सदस्या श्रीमती भावना खिलनानी, श्रीमती मालती करोतिया, श्रीमती नंदिनी बामणकर यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>**मा.सदस्य श्री.धनजंय बोडारे :—**</u> आयुक्त महोदय आणि श्री. सेलवन साहेब, दोन मिनीटे थांबा, उल्हासनगर मध्ये ज्या पध्दतीचे प्रशासन चालले आहे. शासनाला आपले काही पडलेले नाही. लोकप्रतिनिधीनी पाण्या बाबत याठिकाणी आपली भुमिका मांडल्यानंतर व मागच्या सभेचे कामकाज तीन तास व्यर्थ तेवढयासाठीच घालविण्यात आले, सर्व काही बेकायदेशिर चालले आहे. शासनाला त्याचे काही नाही परंतू प्रशासनाला तरी पाहीजे. आठ आठ दिवस पाणी नाही आणि अधिकारी कोणी तेथे जात नाहीत. कोणालाही उत्तर देता येत नाही. ५ हजारासाठी आणि २० हजारासाठी काम खोळंबून आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचा कारभार चालू आहे की, राम भरोसे हिंदु हॉटेल चालू आहे? कोणी कोणाचा मालक नाही. कारभाराची ना आयुक्तांना काळजी आहे ना महापालिका प्रशासनाला काळजी आहे. आयुक्त सुट्टीवर आणि सत्ताधारी पक्ष मनमानी कारभार चालवत आहे. पीठासीन अधिकारी आपल्या मनमानी प्रमाणे आपला अधिकार वापरत आहे. आयुक्तांना वाचविण्यासाठी पीठासीन अधिकारी एवढया दिवसा पासुन त्यांची पाठराखण करत आहे. येथील प्रत्येक बाबीसाठी आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व प्रशासनातील अधिकारी जबाबदार आहेत. लोकनियुक्त प्रतिनिधी जो काही निर्णय घेतला त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयुक्त व प्रशासनातील अधिका—यांची आहे. परंतू ते आयुक्तच लोकप्रतिनिधीचे निर्णय ऐकण्यासाठी येत नसतील, दोन वेळा त्यांच्यासाठी सभा स्थगित करावी लागली याबाबत आमच्या श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले आहे मागील वेळेस सभा झाली त्यावेळी आयुक्त आले होते त्यावेळेस काही सदस्य पाण्याच्या मुद्दयावर बोलू इच्छित होते त्यांना बोलू दिले जात नव्हते त्यावर सभागृहात गोंधळ झाला होता. त्यावेळेस पीठासीन अधिकारी यांनी जे आदेश दिले होते ते चुकीचे होते. परंतू ज्या पध्दतीने त्या दिवशी सभेचे कामकाज चालविण्यात आले त्या दिवसाची काळा दिवस म्हणुन इतिहासामध्ये नोंद झाली पाहिजे. परंतू आज सुध्दा तीच स्थिती आहे. आठ दिवसा पासुन पाणी येत नाही व केवळ ५ हजार खर्च करण्यासाठी महापालिकेकडे पैसा नाही असे श्री. रमेश चव्हाण सांगत आहेत तर ही महापालिका कुठे जात आहे? महासभेच्या माध्यमातून आम्ही काय निर्णय घेत आहोत? महासभेची फळनिष्पत्ती काय? तसेच मा.महापौर महोदया,आयुक्तांच्या विरोधात अविश्वासाचा ठराव आणण्याचा प्रस्ताव आम्ही आपल्याकडे पाठविला आहे. त्यासाठी विशेष महासभेची मागणी केली आहे. तो ३१ ऑक्ट्रोबरला आपणाकडे दिला आहे.नैतिकतेचे आधारावर, कायदयाच्या आधारावर पंधरा दिवसा मध्ये सभा बोलावली पाहीजे यापूर्वी जे महापौर होते त्यांनी पंधरा दिवसांचे आत सभा बोलावली परंतू एक आपणच अश्या महापौर आहात ज्यांनी ३१ ऑक्ट्रोबर पासुन आजच्या २० नोव्हेंबर पर्यत २१ दिवस होवूनही आज पर्यत महासभेची सूचना काढलेली नाही हा आपल्या अधिकाराचा गैरवापर आहे. आम्ही त्याचा निषेध करतो. कोणत्याही महापालिकेत असे झालेले नाही. परंतू आपण अधिकाराचा गैरवापर करत आहात.

मा.सदस्या श्रीमती मा.सदस्या श्रीमती मा.सदस्या श्रीमती जया साधवानी, श्रीमती माया मसंद, श्रीमती लक्ष्मी ससाणे, यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>**मा.महापौर :—**</u> अधिकाराचा गैरवापर बिलकुल होत नाही. व विशेष महासभा बोलविण्याची आपण ही जी मागणी केलेली आहे त्यानुसार डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात विशेष महासभा बोलविली जाईल.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– डिसेबरच्या पहिल्या आठवडयात का? पंधरा दिवसामध्ये आपणास सभा बोलवायची आहे. मग डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात का? यामागे काय कारण आहे ते सभागृहाला सांगा.

मा.सदस्य श्री.धनंजय बोडारे :– सचिव साहेब, आपण संपुर्ण महापालिकेचे सचिव आहात, फक्त सभा चालविणे व त्यांचे इतिवृत्त लिहिणे ऐवढेच आपले काम नाही. महासभा कायदया नुसार चालली पाहीजे त्यासाठी पीठासीन अधिकारी व इतर सदस्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करुन देणे, माहिती देणे हे आपले काम आहे. सचिव म्हणजे इतिवृत्त लिहित बसणे ऐवढेच काम नाही.सभागृहाला मार्गदर्शन करणे हे ही आपले काम आहे. इतिवृत्त लिहिने हे काम लिपिक सुध्दा करु शकतात व ते करतात.

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :– सचिव साहेब महापौरांना त्यांचे अधिकार व कर्तव्य हे दोन्हीही सांगा.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– मा. महापौरजी, डिसेंबरच्या पहिल्या आठवडयातच सभा बोलविली जाईल हे कोणत्या कायदया नुसार आहे.

मा.सदस्य श्री. जमनादास पुरसवानी, श्री. शांताराम निकम, श्री. गौतम भालेराव, श्री. राजु टेकचंदानी, श्री. रोहडा श्यामसुंदर यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :– सचिव साहेब सांगा.

मा.सदस्य श्री.नथु सोनावणे :– सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, इथे शासकिय अधिकारी आलेले आहेत ते बिल्कुल ऐकत नाहीत तर ठराव मंजुर करुन त्यांना परत पाठवा. नाही तर त्यांना आपली थोडी इज्जत वाचवायची असेल तर त्यांनी राजीनामा देवून चालते व्हावे. कारण आमच्याकडे सुध्दा विदयुत विभागाचे कार्यकारी अभियंता आहेत, कार्यक्षम अधिकारी आहेत. त्यांना तुम्ही पदभार दया आणि तुम्ही निघुन जा. कारण की मागील महासभेत गांधीगिरी व शांतीगिरी झाली शेवटी छत्रपतीगिरी करावयास लावु नका. तुम्ही निघुन जा. तीन महिन्यापूर्वी पाण्यासाठी मी सांगीतले होते. साहेब बसले होते माझ्या प्रश्नांचे मला उत्तर देण्यासाठी तीन महिन्याची वेळ मागीतली. आता पर्यत जलवाहिनी टाकलेली नाही व श्री. सावकारे साहेब सुध्दा महासभेत येत नाहीत.

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :– सचिव साहेब, उत्तर दया.

मा.सदस्य श्री.नथु सोनावणे :– कायदयाचे हातपाय तोडू नका त्यास फॅक्चर करु नका. ही महापालिका कायदयास व संविधानास बांधील आहे किंवा नाही.?

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :– सचिव साहेब, आचार संहिता लागल्या नंतर विशेष महासभा लावतील का? सर्वसाधारण सभा महिन्यातून एकदा व विशेष सर्व साधारण सभा दिड महिन्यातून एकदा सुध्दा नाही. अधिकार व कर्तव्ये काय ते सांगा. आम्ही आपणा कडून हे जाणुन घेवु इच्छितो की, आम्ही जी विशेष महासभेची जी मागणी केली आहे ती संविधाना नुसार पंधरा दिवसांच्या आत महापौरांनी बोलावली पाहीजे. वाजवी वेळ पंधरा दिवसांची असते. जी १४ तारखेस पुर्ण झाली. व आता महापौर म्हणत आहेत की, डिसेबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात विशेष महासभा बोलावली जाईल तर महापालिकेस कायदे लागु आहेत किंवा नाही.? ते जरा सांगा,

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :– मा.महापौर महोदया, येथे जी विशेष महासभा बोलावण्याची गोष्ट आहे जेव्हा तांतडीची सभा बोलावयाची असते तेव्हा काही सदस्य स्वाक्ष–या करुन विशेष महासभेची मागणी करतात. विशेष महासभेची मागणी केव्हा केली जावु शकते, सर्वसाधारणपणे महिन्यातून एक महासभा तर होते. दुस–या सभेसाठी वाट पाहावी लागु नये या हेतुसाठी विशेष महासभेची किंवा तांतडीच्या महासभेची मागणी

केली जावू शकते. मा. महापौरांना अशी नोटिस दिल्या नंतर त्याबाबतची तारीख व वेळ निश्चित करण्याचा महापौरांना अधिकार आहे. सर्वसाधारणपणे पंधरा दिवसाचा जो योग्य कालावधी आहे तो नियमामध्ये अंतर्भुत केलेला नाही. आपणास जर तांतडीची विशेष महासभा बोलवायची असेल तर व मा. महापौरांनी मनावर घेतले तर दोन दिवसांमध्ये किंवा तीन दिवसांमध्ये , चार दिवसांमध्ये कधीही सभासूचना काढण्यासाठी त्या आदेश देवु शकतात. यासाठीच नियमामध्ये वेळेचे बंधन घातलेले नाही. परंतू कित्येक प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाचे जे निर्देश आले आहेत त्यामध्ये वाजवी वेळ पंधरा दिवसा पेक्षा जास्त असु नये व दुसरे तत्व हे आहे की, पुढील महिन्याची महासभा होण्या अगोदर ही सभा झाली पाहिजे. व आताच मा.महापौरांनी ठरविले आहे की, त्या लवकरच तारीख व वेळ निश्चित करणार आहेत.

मा.सदस्या श्रीमती दिपा पंजाबी, श्रीमती भारती छाब्रीया यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> आम्हाला आज येथे तारीख निश्चित करुन मिळाली पाहीजे.

<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u> पंधरा दिवस तर पुर्ण झाले ना? आता आम्हाला पुढची कोणती तारीख देणार? म्हणुन आताच आम्हाला सांगा. आज २१ दिवस झाले.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> सभेची तारीख सांगा, सभा सूचना कधी काढणार? आजच सभा सूचना काढा.

<u>मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> आम्ही संर्घष करत राहणार आपण किती सदस्यांना सभागृहातून बाहेर काढत राहणार.?

<u>मा.महापौर :–</u> आपण जी सभेची मागणी केली आहे त्यानुसार सभा बोलावली जाईल.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर, श्री. लाल बिहारी यादव, श्री. प्रमोंद टाले, श्री. ईश्वर पमनाणी, श्री.प्रशांत जाधव, श्री. मनोज साधवानी, यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> एवढया उशिराची तारीख का? आजच आपण सभा सूचना काढू शकता. आज २० तारीख आहे २७ तारखेस महासभा होवू शकते.

<u>मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> मा. महापौर महोदया, शहरातील समस्या सोडवण्यासाठी आपल्याकडे वेळ नाही का?

<u>मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :–</u> २७ तारखेस सभा घेवु शकत असताना डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयातील तारीख का?

<u>मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :–</u> मा. महापौर महोदया, शहरातील समस्या सोडवण्यासाठी आपल्याकडे वेळ नाही का?

<u>मा.सदस्य श्री.देंवेद्रसिंह खेमानी :–</u> मा. महापौरांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

<u>मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :–</u> शहराच्या भावनां पेक्षा कोणाचे विचार जास्त महत्वाचे नसतात.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– महासभा भावनांवर चालत नाही. कायदया नुसार चालते.

मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमानी :– मी, म्हटले की, मा. महापौरांनी आपले विचार व्यक्त केले आहेत या महासभेची पुढील कारवाई चालविली जावी.

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :–विशेष महासभेसाठी ३५ नगरसेवकांनी स्वाक्ष–या करुन प्रस्ताव दिला आहे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :–महासभा भावनांवर चालत नाही. कायदया नुसार चालते, ही महानगरपालिका मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार चालते की, श्रीमती ज्योती कालानी यांच्या कायदया नुसार चालते.?

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :– कायदयाच्या चिंधडया–चिंधडया करु नका. फक्त अधिकाराचा वापर करता कर्तव्य विसरुन जाता.?

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– एक महिन्या नंतर सभा बोलवणार असाल तर हा कोणता कायदा आहे.?

मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :– मा.महापौरजी, सर्वात प्रथम तर हा आजच्या सभेचा विषय नव्हता. मा.श्री. धनंजय बोडारे यांच्या सांगण्या नुसार मा. महापौरांनी परवानगी दिली आहे.

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :– सभागृह नेताजी, सभागृहाच्या ३५ सदस्यांनी स्वाक्षरी करुन विशेष महासभेची मागणी केली आहे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :– महासभा भावनांवर चालत नाही. कायदया नुसार चालते, ही महानगरपालिका मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार चालते की, श्रीमती ज्योती कालानी यांच्या कायदया नुसार चालते?

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :– कायदा कानुन लागु नाही काय? महापौरांनी जे सांगितले तेच खरे काय?

मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे, श्रीमती भावना रामचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :– मा. श्री. दिलीप लालवानीजी, प्रथम तर आपण आपले कायदे कानुन पहा. आपण कोणत्या कायदे कानुन नुसार निवडून आला आहात? कोणाचा मतांवर निवडून आला आहात? आणि जर का आपणाला ऐवढे बोलायचे आहे तर प्रथम आपण राजीनामा देवुन जनतेतून निवडून या, आमच्या मतांवर निवडून आलेला व्यक्ती आम्हाला राजकारण शिकवतो.....

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :– आपण मत दिले. आपले ते मत संविधानाचे रक्षण करण्यासाठी आवाज उठवत आहे. आपण दिलेले मत शहरहितासाठी आवाज उठवत आहे. आपण दिलेले मत हे काम करत आहे. तर जे निवडून आले त्यांनी मला का निवडून पाठविले?

मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— आमच्या मतांवर निवडून आलेल्या व्यक्तीस जर आमचा कारभार योग्य वाटत नसेल तर त्यांनी प्रथम आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहीजे त्यानंतर त्यांनी बोलावे.

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :— माझ्याकडून राजीनामा मागण्याचा आपणास काहीही अधिकार नाही. आणि एवढीच जर नैतिकता आहे तर आपण महापौर पद व सभागृह नेता पद सोडा.

मा.सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— आपण कोणत्या नैतिकतेची गोष्ट करतात? निती व नैतिकता याची आपणास काय माहिती आहे?

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी:— मला निती व नैतिकतेचा धडा शिकविणारे आपण अल्प मतात आला आहात सत्ता सोडुन आपण खाली उतरा.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :— मा.महापौरजी, मी हे सांगु इच्छितो की, ही महासभा मोबाईलवर चालते आपण संपुर्ण सभागृहात जर वर पाहीले तर संपुर्ण सभागृहात असे दिसुन येईल की, मोबाईलवर आदेश दिले जात आहेत. यासाठी आापण आपल्या अधिकाराचा वापर करा.

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी:— महासभा याच महिन्यात झाली पाहिजे अशी सभागृहाची मागणी आहे.

मा.सदस्य श्री धनंजय बोडारे :— काय झाले? काय आदेश आला?

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— आपणास जे काही प्रश्न विचारायचे आहेत ते मा.महापौरांना संबोधुन विचारा.मला काही अधिकार नाहीत.

मा.सदस्य श्री धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, तारीख निश्चित केलीत का? विशेष महासभेची.

मा.सदस्य श्री बच्चाराम रुपचंदानी :— २७, २८ तारखेला ठेवा.

मा.सदस्य श्री धनंजय बोडारे :— २७, २८ तारखेला ठेवु शकता.

मा.महापौर :— डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात सभा ठेवली जाईल. आपण जर म्हणत असाल तर नंतर ठरवू या, निर्णय घेवू या.

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :— आगोदरच खुप उशिर झाला आहे. ३१ ऑक्ट्रोबरची आमची नोटिस आहे, १५ दिवसांच्या आत सभा झाली पाहीजे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :— २७ तारखेस आयुक्तांची रजा संपते ते २८ ला येतील.....

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :— २८ तारखेला ठेवा.

मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी:— महासभेला घाबरता का?

**मा.महापौर :—** माझ्या मते डिसेंबरच्या पहिल्या आठवडयातील तारीख योग्य असेल कारण की, काही दिवसां साठी मी सुध्दा बाहेर जात आहे. महापौर परिषद आहे त्यासाठी बाहेर जायचे आहे.

**मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी:—** महापौर महोदया, उप महापौर आहेत ना? महापौर नसतील तर संविधाना नुसार उप महापौर सभा चालू शकतात. ३५ नगरसेवक स्वाक्ष—या करुन विशेष महासभेची मागणी करत आहेत. महापौर नसतील तर उप महापौर सभा चालवु शकत नाही का?आणि उप महापौरही नसतील तर आमच्यातील कोणी वरीष्ठ नगरसेवक पीठासीन अधिकारी म्हणुन बसुन सभेचे कामकाज चालवु शकतो. आपण सभागृहाचा अनादर करु नका.

मा. सदस्य श्री. मोहन रामरख्यानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**मा.महापौर :—** आम्ही लोक निर्णय घेवुन ४ तारखेस सभा सूचना काढू.

**मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी:—** नोव्हेंबर महिन्यामध्येच सभा घेतली पाहीजे अशी सभागृहाची मागणी आहे. आपणास वेळ नसेल तर उप महापौर सभेचे कामकाज चालवु शकतात.

**मा.सदस्य श्री.धनंजय बोडारे :—** महापौर महोदया, मागील वेळेस सुध्दा पाहिले व आता सुध्दा पाहिले की, ४७ लोकांनी स्वाक्ष—या करुन दिल्या नंतरही त्यांचा सन्मान ठेवला जात नाही तसेच ना कायदया नुसार, ना उच्च न्यायालयाच्या निर्देशा नुसार, अश्या प्रकारे सभेचे कामकाज चालणार असेल तर आपले प्रशासनावर नियंत्रण नाही हे तर जाहिर झाले आहे. अधिकारी सुध्दा वेळेवर मिळत नाहीत व अश्या प्रकारे आपण जे महासभेचे कामकाज चालवित आहात त्याचा आम्ही निषेध करतो. आणि जो पर्यत आपण विशेष महासभेची तारीख निश्चित करत नाहीत तो पर्यत आम्ही येथे धरणे देवुन बसत आहोत.

यावेळी शिवसेना, भाजपा, कॉग्रो, आर.पी.आय.(पी.आर.पी.)सह राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीतील काही सदस्यांसह विरोधी पक्षातील सर्व सन्माननिय सदस्य व्यासपीठा समोरील मोकळया जागेत जमिनीवर बैठक मांडून बसले.

**मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :—** तो पर्यत गांधीगिरी करु या भजन म्हणुन या '' रघुपती राघव राजाराम पतीत पावन सिताराम.''

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी यांच्या पाठोपाठ इतर सदस्य '' रघुपती राघव राजाराम पतीत पावन सिताराम.'' या भजनाच्या ओव्या सर्वजण गावू लागले.

**मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :—** सर्वोच्च न्यायालयाचा सन्मान व्हावा. येथे लोकशाहीची हत्या होत आहे.

**मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमानी :—** मा.महापौरजी, आमच्या सहका—यांना किर्तन कधी पासुन करता येवु लागले?

**मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:—** तुमचे काम आम्ही करत आहोत.

**मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमानी :—** मी ही तेच म्हणत आहे की, आमचे काम तुम्ही करत आहात ही चांगली गोष्ट आहे परंतू आपण हे शिकलात कुठे? हे मी विचारत आहे.

**मा.सदस्य श्री. विनोद ठाकुर :–** "दादागिरी नही चलेगी नही चलेगी"

**मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमानी :–** मलाही वाटते की, किर्तन करावे.

**मा.महापौर :–** आज सोमवारचा दिवस आहे "ओम नमो शिवाय " चा जप करावा.

**मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :–** आम्हाला प्रशिक्षण दिले आहे, शेवटी शेवटी सर्व लोक येथेच येणार आहेत. महापौर महोदया सुध्दा येथेच येणार आहेत.

**मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमानी :–** आम्ही लोक शुभ कार्यासाठी कधीही मागे रहात नाही.

**मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :–** गंगाजल में डुबकी लगाईये, या ईलेक्ट्रेड बॉडीने शहराला काय काय दिले ते मी सांगतो.

१. गुलशननगर प्रकल्प पूर्ण झाला?
२. बीपीएल योजने नुसार सर्वाचा मालमत्ता कर माफ झाला.?
३. शहरात सर्वत्र २४ तास पाणीपुरवठा सुरु झाला?
४. शहरातील रस्ते गुळगुळीत झाले?
५. शहरातील सर्व सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती झाली?
६. शहरातील दुर्गंधी दूर झाली.?
७. गॉरबेज झीरो झाले, तसेच खजीना सूध्दा झीरो झाला?
८.

**मा.सदस्य श्री.धनंजय बोडारे :–** खजिना खाली झाला नाही. खाली केला.

**मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :–** मा. सभागृह नेता श्री. देवेंद्रसिंह खेमाणी हे मागील बाकावर जावुन हॉट लाईनवर बोलत आहेत. त्यांना कोठून आदेश येत आहेत?

**मा.सदस्य श्री.रामदास उमाप :–** लहान मुले कशी रडतात त्याचे मी प्रात्याक्षिक करुन दाखवितो.

**मा.सदस्य श्री.दिलीप गायकवाड:–** फोन आला का?

**मा.सदस्य श्री.धनजंय बोडारे :–** येथे रावण राज चालु आहे.

**श्री. मुकेश आयलानी कार्यकारी अभियंता (विदयुत ):–** आमच्या एका कर्मचा–याचा मुलगा आजारी असल्या बाबत दुरध्वनी वरुन निरोप आला आहे. कृपया मला व्यासपीठावरुन खाली जावु दया.

**मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** नाही, नाही, त्यांच्या एका कर्मचा—याचा मुलगा आजारी असल्याचे श्री. मुकेश आयलानी हे सांगत आहेत उदया त्या मुलाला काही बरे वाईट झाले तर त्यास आम्ही जबाबदार असणार नाही. आम्ही व्यासपीठावरुन कोणालाही खाली उतरु देणार नाही. जो पर्यत मा.महापौर सभेची तारीख निश्चित करुन देत नाहीत तो पर्यत.

**मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** मागच्या महासभेची वेळ व्यर्थ घालविली या सभेचीही वेळ व्यर्थ घालवत आहेत. आम्ही यांना व्यासपीठा वरुन बाहेर जावु देणार नाही. त्या मुलाचे जे काही बरे वाईट होईल त्यास आम्ही जबाबदार राहणार नाही.

**मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** सन्माननिय महापौरजी त्या कामगाराचा मुलगा आजारी आहे तो मेला तरी चालेल परंतू विशेष महासभा लावावी हे आपणास मंजुर नाही?

यावेळी यावेळी व्यासपीठा समोरील मोकळया जागेत बैठक मांडून बसलेले सदस्य शेम शेम असा आवाज देत होते.

**मा.सदस्य श्री.नथु सोनावणे :—** जे सदस्य बसले आहेत त्यांनी आपला आपला निर्णय घ्यावा. त्यामुलाची प्रकृती जर बरोबर नसेल तर वेळेची गंभीरता लक्षात घेवुन निर्णय घेतला जावा.

**मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** त्या मुलाचे जे काही बरे वाईट होईल त्यास आम्ही जबाबदार राहणार नाहीत मा. महापौर व आयुक्त हेच त्यास सर्वस्वी जबाबदार राहतील.

**मा.सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** त्या कर्मचा—यास बाहेर जावु दिले जावे.

**मा.सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—** नाही, नाही, त्यांना जावु दिले तर सर्वजण बाहेर जातील उदया मग कुणाचा मुलगा, बहिण आजारी पडत राहतील.

**मा.महापौर :—** डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात विशेष महासभा ठेवली जाईल असे मी म्हटले होते परंतू आता ती २४ डिसेंबरला सभा ठेवली जाईल, त्याबाबत आजच सभासूचना काढली जाईल.

**मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :—** २४ डिसेंबर की नोव्हेबर?

**मा.महापौर:—** क्षमा करा, २४ नोव्हेबर.

**मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :—** आपण २४ डिसेंबर बोललात.

**मा.महापौर:—** २४ नोव्हेबर, सभासूचना आजच निघेल. २४ नोव्हेबरला सभा होईल. व आता आपण आपापल्या आसनावर जावु शकता.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** शुक्रवार दिनांक २४ नोव्हेबर रोजी सभा ठेवण्यात येईल व सभासूचना आजच आपणास मिळेल.

मा.महापौर:— ज्यांच्या मुलाची प्रकृती ठिक नाही त्यांनी कृपया त्वरीत रुग्णालयात जावे.

मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी:— मा. महापौरजी, हे तर आपण या अगोदर सुध्दा करु शकत होतात ना?

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— कृपया विषय पत्रिके कडे येवु या.

विषय क्रमांक.४ :— पूर्वीचा महासभा ठराव क्र.३८, दिनांक २०/७/२००५ रद्द करुन कु. पौर्णिमा गणेश भिंगे ह्यांची महापालिका निवड समितीच्या शिफारसीनुसार ''स्टाफ नर्स'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमानी :— पास पास

मा.सदस्य श्री. लाल पंजाबी :— मा.महापौरजी, आपणास हवे असेल तर या प्रस्तावावर मतदान सुध्दा घ्या. आमचा या प्रस्तावास विरोध आहे आम्हास वाटते की, हा प्रस्ताव नाकारला जावा.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— यांचा प्रस्ताव असा आहे की, या कर्मचा—यास नियुक्ती दिली जावु नये. पहिला जो ठराव आहे तो कायम झाला पाहिजे. त्यांचा प्रस्ताव अश्या प्रकारचा आहे. याबाबतीत कोणाला काही हरकत असेल तर त्यांनी आपला प्रस्ताव मांडावा. नाही तर सर्व संमतीने ठराव पारीत झाल्याचे मानले जाईल. त्यांना नेमणुक दयायची नाही व मागच्या वेळी त्यांची नियुक्ती न करण्याचा जो ठराव केला आहे त्यांची नेमणूक करता येणार नाही.

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमानी :— आपण मतदान घ्या.

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :— त्या म्हणतात सर्व संमतीने प्रस्ताव नाकारला जावा आणि आपण म्हणता मतदान घ्या. त्यांची वारंवार बेईजत करण्यामध्ये तुम्हाला काय मिळते?

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :— कोणाला काही हरकत नाही.

मा. महापौर :— हा प्रस्ताव सर्वानुमते नाकारला जात आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :— सर्व संमतीने नाकारला जात आहे?

विषय क्र. ४:— पूर्वीचा महासभा ठराव क्र.३८, दिनांक २०/७/२००५ रद्द करुन
कु. पौर्णिमा गणेश भिंगे ह्यांची महापालिका निवड समितीच्या
शिफारसीनुसार ''स्टाफ नर्स'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'स्टाफ नर्स' या संवर्गातील एक पद मंजूर असून ते रिक्त आहे. सदर पद सरळ सेवेने भरण्यासाठी दिनांक १६.१२.२००४ रोजी जाहिरात देण्यात आली होती. जाहिरातीनुसार एकूण १९ उमेदवारांकडून अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्जाची निवड समिती व्दारे छाननी केल्यानंतर, त्यापैकी १४ उमेदवारांचे अर्ज सदर पदासाठी पात्र ठरले. पाच ठरलेल्या उमेदवारांच्या दिनांक

१६.०२.२००५ रोजी मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखतीमध्ये गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची पुढील प्रमाणे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली आहे.

| अ.क्र. | निवड यादीतील उमेदवारांचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|
| १. | कु. पौर्णिमा गणेश भिंगे | कु. सुवर्णा लडकु बेलवले |

सदर प्रस्ताव मा. महासभेने ठराव क्र. ३८ दिनांक २०.७.२००५ अन्वये नामंजूर करण्यात आला आहे. तथापि, सदर प्रस्ताव नामंजूर करतांना कोणतेही कारण नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर बाब फेरविचारार्थ करण्यात येत आहे.

तरी सदर निवड यादीतील उमेदवारास नेमणुक दयाचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९९४९ चे कलम ५३(१) मधील तरतुदीनुसार मा. महासभेच्या मंजूरीसाठी प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र: २१ दिनांक:– २०/११/२००६

सुचकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे पूर्वीचा महासभा ठराव क्र.३८, दिनांक २०/७/२००५ रद्द करण्यास व कु. पौर्णिमा गणेश भिंगे ह्यांची महापालिका निवड समितीच्या शिफारसीनुसार ''स्टाफ नर्स'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देत नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :–कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १.१५ वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— २०/११/२००६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/११/२००६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सामेवार, दिनांक २०/११/२००६ रोजी सायंकाळी ४—०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती जावळे संगिता रमेश | ३१. | श्री. जेसवानी सतरामदास फतनदास |
| ३. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | ३२. | श्रीमती खिलनानी भावना रवी |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३३. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ३४. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३५. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ७. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | ३६. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ३७. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| ९. | श्रीमती मोकल सीमा चंदाराम | ३८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्री. गायकवाड दिलीप | ३९. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ११. | श्री. एडके गणपत गोविंद | ४०. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४१. | श्री. भालेराव गौतम यशवंत |
| १३ | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४२. | श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४३. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १५. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४४. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४५. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४६. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| १८. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र | ४७ | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| १९. | श्री. पवार नाना आनंदा | ४८. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| २०. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ४९. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| २१. | श्री. निकम शांताराम ओंकार | ५०. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| २२. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५१. | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| २३. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५२. | श्रीमती छाब्रिया भारती पहलाज |
| २४. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५३. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २५. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ५४. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २६. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५५. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| २७. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५६. | श्रीमती दासानी मिनु राजकुमार |
| २८. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ५७. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २९. | डॉ. (श्रीमती) साधवानी जया | ५८. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३०. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ५९. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. तलरेजा विनोद चंदीराम, २. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ३.श्री. मोकल चंदाराम विठोबा , ४. श्री. यादव लालबिहारी बुझारत, ५. श्री. जग्यासी राजु किशनचंद, ६. श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा, ७. श्री. टाले प्रमोद नामदेवराव, ८. श्री. वधारिया राजेश नानिकराम, ९. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग, १०. श्रीमती माने किरण बाळकृष्ण, ११. श्री. चव्हाण रमेश महादेव, १२. श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल, १३. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल, १४. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश, १५. श्री. मनवानी अन्नु (सनमुख), १६. श्रीमती पंजाबी दिपा नारायण, १७. श्री. साधवानी मनोज लालचंद, १८. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, १९. श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग, २०. श्री. बठीजा संजय रामचंद्र, २१. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, २२. श्री. माखिजा हरदास सन्मुखदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

आयुक्त श्री.आर.डी.शिंदे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री.नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या वतीने प्राधिकृत अधिकारी म्हणुन सभेस उपस्थित होते. तसेच खालील अधिकारी सभेस हजर होते.

६०.श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
६१.श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
६२.डॉ. के.आर.खरात, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
६३.श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
६४.श्री. बी.सुंदरेश्वरन, प्रभारी शहर अभियंता,
६५.श्री. अ.पां.गुरगुळे, नगररचनाकार
६६.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग
६७.श्री. आर.बी. सुखरामानी प्रभारी कार्यकारी अभियंता, सार्व.बांध. विभाग
६८.श्री. सेलवन, प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग
६९.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
७०.श्री. सा.अ.पठाण, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १
७१.श्री. अ.म.काटे, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३
७२.श्री. तुकाराम तारदाळकर, वाहन विभाग प्रमुख
७३.श्री. डी.पी.चंदनशिवे, कर निरीक्षक

सायंकाळी ४–१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा.सदस्य श्री.नाना पवार :–</u>मा. महापौरजी, आर.पी.आयचे वरिष्ठ नेते व लोकसभेचे माजी खासदार मा.श्री. बापुसाहेब कांबळे यांचे नुकतेच मुंबई येथे निधन झाले आहे. त्यामुळे महासभेत त्यांना श्रध्दांजली अर्पित केली जावी तसेच भंडारा जिल्हयात खैरलांजी गावांत दलित समाजाच्या भोतमांगे या परिवाराची हत्या करण्यात आलेली आहे, त्यांना देखिल श्रध्दांजली अर्पित केली जावी.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–</u> मा.महापौर महोदया, आपले पालकमंत्री मा.श्री.गणेश नाईक यांचे बंधु श्री. तुकाराम नाईक यांचे देखिल निधन झाले आहे त्यांनाही श्रध्दांजली दिली जावी.

<u>मा.सदस्य श्री.धनंजय बोडारे :–</u> श्री. तुकाराम नाईक यांच्या सोबतच नवी मुंबई येथील शिवसेनेचे उपनेते व यापूर्वी आमदार म्हणुन निवडून आलेले श्री. विजय लोके यांचे देखिल निधन झाले आहे तसेच आमचे शाखा प्रमुख व सामाजिक कार्यकर्ते श्री. सुनिल कारेकर यांच्या आईचे देखिल निधन झाले आहे, त्यांना देखिल श्रध्दांजली दिली जावी.

<u>मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. महापौर महोदया, वरीष्ठ पत्रकार श्री. शाम थारवानी यांचे देखिल निधन झाले आहे, त्यांना देखिल श्रध्दांजली दिली जावी.

## <u>शोक प्रस्ताव</u>

सुचकाचे नाव :– श्री. देवेंद्रसिंह खेमाणी
श्री नाना पवार

अनुमोदकाचे नाव :–श्री धनंजय बोडारे
श्री. जमनादास पुरस्वानी

आर.पी.आयचे वरिष्ठ नेते व लोकसभेचे माजी खासदार मा. श्री.बापुसाहेब कांबळे यांचे नुकतेच मुंबई येथे निधन झाले आहे. तसेच भंडारा जिल्हयात खैरलांजी गावांत दलित समाजाच्या भोतमांगे परिवारातील चार जणांची निघृण हत्या करण्यात आलेली आहे.पालकमंत्री मा.श्री.गणेश नाईक यांचे बंधु तसेच नवी मुंबईचे शिवसेना अध्यक्ष श्री.तुकाराम नाईक यांचे देखिल निधन झाले आहे. नवी मुंबई येथील शिवसेनेचे उपनेते व यापूर्वी आमदार म्हणुन निवडून आलेले श्री. विजय लोके यांचे देखिल निधन झाले आहे. शाखा प्रमुख व

सामाजिक कार्यकर्ते श्री. सुनिल कारेकर यांच्या आईचे देखिल निधन झाले आहे, तसेच वरीष्ठ पत्रकार श्री. शाम थारवानी यांचे देखिल निधन झाले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. २१ अ</u> <u>दिनांक:—२०/११/२००६</u>

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री.बापुसाहेब कांबळे, श्री. विजय लोके, श्री.तुकाराम नाईक, भोतमांगे परिवारातील श्रीमती सुरेखा भोतमांगे, कु.प्रियांका भोतमांगे, श्री. सुधीर भोतमांगे व श्री. रोशन भोतमांगे तसेच श्रीमती कमल कृष्णा कारेकर व श्री. शाम थारवानी यांच्या निधनाबद्दल दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........आता ४.२९ वाजले आहेत.

प्रश्न क्र. ४९९ हा श्री.राजेंद्र चौधरी यांचा आहे.

?

<u>प्रश्न क्र.४९९ :—</u> दिनांक २६ व २७ जुलै, २००५ रोजी अतिभयंकर पुरपरिस्थिती निर्माण होवुन उल्हासनगर शहराचा बहुतांश भाग पाण्याखाली जावुन येथिल जनजिवन विस्कळीत झाले होते. पाणी, लाईट, वाहतूक, रेल्वे सेवाही पुर्णपणे ठप्प झाल्या होत्या अनेक नागरीकांचे घरात पुराचे पाणी शिरुन सामान चिजवस्तू, अन्नधान्य, कपडालत्ता, महत्वाचे कागदपत्र, घरेदारे यांचे मोठया प्रमाणात नुकसान होवून जिवीत व वित्तहानी झाली होती अश्या पुरपरिस्थीतीने बाधीत पुरग्रस्त नागरीकांना शासनाने आर्थिक मदत देवू केली असून महापालिकेनेही अन्नधान्य, औषधे, चटई, जेवण इत्यादी सेवा पुरविल्या आहेत.

आता महानगरपालिकेने जुलै, २००५ मधील पुरपरिस्थितीने बाधीत शहरातील मालमत्ता धारकांना सन २००५—२००६ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता करात सुट देणेचा महत्वपुर्ण निर्णय घेतला असून महासभा ठराव क्र. १०७, दिनांक २०/३/२००६ अन्वये त्यास महासभेने मंजुरीही दिली आहे. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळावी ही नम्र विनंती.

प्र. क्र. १ अ) सदर ठरावाबाबत महानगरपालिकेने आजतागायत कोणती कारवाई केली? किती नागरीकांना मालमत्ता करात सूट दिली? किती नागरीकांना मालमत्ता करात सुट दिली?

<u>उत्तर :—</u> पुरात बाधित झालेल्या निवासी/अनिवासी मिळकत धारकास शासना तर्फे वित्तीय मदत देण्यात आली आहे. अशा नागरीकांचा तपशील उल्हासनगर तहसिलदार कार्यालय यांच्या कडून उपलब्ध करुन घेण्यात आलेला आहे. सदर तपशिलाच्या अनुषंगाने अर्जाचे नमुने तयार करण्यात आलेले आहेत. सदर अर्जाचे प्रभागनिहाय वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे. आज पर्यत करात सुट मिळण्यासाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी —</u> मा.महापौरजी, काही दिवसांपूर्वी मी प्रश्न क्र.५३६ विचारला होता. त्याचे उत्तर आपण सचिवांतर्फे मला दिले आहे की, महानगरपालिकेने तयार केलेले महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती, इत्यादीचे कामकाज विषयक नियमावलीतील नियम क्रमांक १२ मधील पोटकलम २ व ७ अन्वये प्रश्नास परवानगी देता येत नाही, असे मा. महापौर कार्यालयाने कळविले आहे. तर तो नियम कोणता आहे व कोणत्या नियमावलीत येतो याची माहिती आम्हाला दिली तर बरे होईल.

**मा. महापौर :–** हा प्रश्न यायला अजुन बराच अवधी आहे. जेव्हा येईल तेव्हा त्यावर चर्चा करण्यात येईल. अजुन बरेच प्रश्न यायचे आहेत ते झाल्यानंतर आपल्या प्रश्नांवर चर्चा करण्यात येईल.

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :–** प्रश्न विचारणे हा आमचा अधिकार आहे, त्या अधिकारात आम्ही प्रश्न विचारला आहे. तुम्ही आम्हाला सांगितले आहे की, प्रश्नाला मान्यता देता येणार नाही, असे असताना त्यावर चर्चा कशी काय करणार?

**मा. महापौर :–** जेव्हा प्रश्न चर्चेसाठी येईल तेव्हा बघु.

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :–** मला पत्र देवुन असे सांगीतले आहे की, तुमचा प्रश्न चर्चेला घेता येणार नाही. आपण मला नियम सांगीतला आहे तो नियम कोणता आहे ते सांगावे.

**मा.सचिव :–** मा.महापौरांनी आपल्या प्रश्नास आता स्विकृती दिली आहे. आपण आपला प्रश्न क्र. ४९९ सुरु करावा.

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :–** आपण आता ज्या प्रश्नाला स्विकृती दिली आहे तो प्रश्न पुढील महासभेत येईल काय?

**मा. सचिव :–** अनुक्रमाने आपला प्रश्न येईल.

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :–** प्रश्न क्रमांक ४९९ हा मी ६ जुलै रोजी विचारला होता. आज त्याला जवळपास साडेचार महिने उलटून गेले आहे त्यामुळे कदाचित आता त्याचे उत्तर बदलले असेल.

**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :–** आदरणीय महापौर महोदया, सर्व सन्माननिय सदस्य या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, पुराने २९,९६० लोक बाधित झाले होते, त्यापैकी ९१८ अर्ज प्राप्त झाले होते व त्यांना सवलत देण्याची कारवाई अंतिम टप्प्यावर आहे. सर्व प्रकरण तयार झाले असुन अंतिम मान्यतेसाठी आयुक्तांकडे पाठविले आहे. आयुक्त साहेब आल्यानंतर त्यावर त्वरीत निर्णय घेतला जाईल.

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :–** मा. महापौरजी, ज्यावेळी या विषयाचा ठराव केला होता त्यावेळी मी सांगीतले होते की, जर कारखानदार अथवा दुकानदार पुराने बाधीत झाले असतील तर त्यांना शासनाने काही मदत केली नाही. जर शासनाने त्यांना मदत केली नसेल तर आपण त्यांना कर माफी देणार नाही काय? असा प्रश्न त्यावेळी मी विचारला होता.

**मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :–** रौराळे साहेब जे प्रश्न येथे येणार आहेत त्यावर आपण आधीच अभ्यास करुन येणे आवश्यक होते. तुम्ही आताच प्रश्न वाचत आहात हे काय सुरु आहे. तुम्ही येथे आमची थट्टा करत आहात काय? महासभेत जे प्रश्न येणार असतील त्यावर चांगल्या प्रकारे तयारी करुन येणे हे तुमचे काम आहे. तुम्ही काय मंत्रालयातील लिपीकाचे काम करीत आहात काय? तुम्ही महापौराच्या जागेवर बसला आहात त्यामुळे तयारी करुन येणे हे तुमचे काम होते. आयुक्तांच्या जागेवर बसला आहात तरी देखिल कामाकडे दुर्लक्ष करत आहात. येथे बसुन प्रश्न वाचत आहेत हे काय सुरु आहे?

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :–** मा. महापौरजी, माझा प्रश्न साधा व सरळ आहे. ठराव क्र.१०७ ज्यावेळी मंजुर झाला होता त्यावेळी देखिल आम्ही सांगितले होते की, पुरामध्ये जे दुकानदार व कारखानदार बाधीत झाले आहे त्यांना देखिल कर माफीची सवलत मिळायला हवी. असा साधा व सरळ प्रश्न असल्याने त्याचे उत्तर दयायला हवे. एवढे उत्तर देखिल देवु शकत नसतील तर प्रशासन काय काम करत आहे?

**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :–** श्री. चौधरी यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या प्रश्नांच्या अनुषंगाने जे अर्ज प्राप्त झाले आहे त्या .........

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :–** माझा हरकतीचा मुद्दा आहे. तुमचे उत्तर मला कळले आहे. माझा प्रश्न असा आहे की, पुरग्रस्त दुकानदार व कारखानदार यांना आपण कर माफीची सवलत देणार आहोत काय?

**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :–** आपण जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या अनुषंगाने प्रकरण तपासुन पुन्हा एकदा निर्णय घेण्यात येईल.

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :–** मा. महापौरजी, त्यांना ही सवलत मिळेल काय?

**मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :–** मा.महापौर महोदया, मला असे वाटते की, आपल्या अतिरिक्त आयुक्तांना या विषयाची माहितीच नाही. यामुळे ते स्वत:ची व सभागृहाची दिशाभुल करीत आहेत. हे जे अर्ज मागविले आहेत ते कशा प्रकारे मागविले आहेत त्याची माहिती तुम्हाला आहे काय? महापालिकेने तहसिलदारांकडून यादी मागवुन त्यानंतर यादीतील लोकांना अर्ज पाठविले होते. लोकांकडून अर्ज मागविले नव्हते. आमचा प्रश्न असा आहे की, ज्या दुकानदारांचे नुकसान झाले होते त्याना तुम्ही सवलत देणार आहात काय?

**मा. महापौर :–** ज्या बैठकीमध्ये हा ठराव झाला होता त्या बैठकीमध्ये असे ठरले होते की, तहसिलदार लोकांच्या नांवाची जी सीडी देतील त्या लोकांना कर माफी देण्यात यावी. ज्यांचा पंचनामा झाला असेल व ज्यांना नुकसान भरपाई मिळाली असेल त्यांना कर माफी देण्यात येईल.

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :–** मा.महापौर महोदया, दुकानदारांचा व कारखानदारांचा पंचनामा झालेला आहे परंतू त्यांना पैसे मिळालेले नाहीत. त्यांचा देखिल कर माफ केला जावा.

**मा.महापौर :–** ज्यांचा पंचनामा झाला असेल त्यांना कर माफीची सवलत मिळाली पाहीजे.

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :–** सीडी मध्ये त्यांचे नांव नसले तरी तहसिलदार कार्यालयात त्यांच्या पंचनाम्याची नोंद झाली आहे. तो रेकॉर्ड तुम्ही मागवा व त्यांना कर माफीची सवलत दया.

**मा. महापौर :–** त्यांना सवलत मिळायलाच हवी. यासाठी रेकॉर्ड मागवावा.
**मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :–** दुसरे म्हणजे ही घटना २६.७.२००५ रोजी झाली होती. आता दिड वर्षा नंतरही आपण अजुन त्यावरच चर्चा करीत आहोत. आपण प्रशासनास याबाबत दोष देतो, आपण शासना मध्ये असल्याने त्यांना काम लवकर पुर्ण करण्यासाठी निर्देश दयायला हवेत. आता अजुन एक वर्ष हे काम चालेल काय? एक महिन्यामध्ये काम पुर्ण व्हायला हवे.

**मा.महापौर :–** काम लवकर पुर्ण होवुन सर्वांना फायदा मिळायला हवा.

**मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :–** मा. महापौर व आयुक्त साहेब, कर विभागामध्ये आपण दक्षता पथक निर्माण केले आहे, त्याचे काम काय आहे ते सांगा.

**मा. सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :–** मा. महापौर महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. उल्हासनगर महापालिका कर विभागात काय सुरु आहे याची एक माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. श्री. रमेश चव्हाण यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. मी जो अहवाल सादर करणार आहे तो बघुन आपण अजुन एका दक्षता पथकाची निर्मीती करावी अशी मागणी कराल. मी महापौरांना विनंती करतो की, त्यांनी सचिवांना हा अहवाल वाचुन दाखवण्यासाठी निर्देश दयावेत. कर विभागातर्फे कशाप्रकारे काम सुरु आहे हे सभागृहाला वाचुन दाखवावे.

**मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :–** कर विभागाच्या संबधित अधिका–यांनी येथे येवुन अहवाल वाचुन दाखवावा. नक्की काय घोटाळा सुरु आहे ते दाखवा.

**मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :–** मा.महापौर महोदया, आयुक्त साहेब येथे प्रश्न वाचुन दाखवित आहेत. रौराळे साहेब, आयुक्त महोदय, नाना रौराळे साहेब लक्ष दया. तुमचे लक्षच नसते. रौराळे साहेब ऐकुन घ्या. माझा आवाज येत आहे का? आयुक्त साहेब तुम्ही प्रश्न व्यवस्थित वाचुन येत नाहीत, उत्तर योग्य प्रकारे देवु शकत नाहीत. तसेच येथे तासनतास जी चर्चा सुरु असते जी इतिवृत्तात येते, ते इतिवृत्त देखिल आपण वाचुन पहात नाही. रौराळे साहेब तुम्ही ऐकत आहात काय? आयुक्त साहेब मी पुढे येवुन बोलू का? उत्तर तरी दया. गांधीजीच्या माकडा प्रमाणे डोळे, कान बंद करुन बसु नका. येथे तासनतास जी चर्चा सुरु असते जी इतिवृत्तात

येते, ते इतिवृत्त आपण कधी वाचता का? आपण कोणते आश्वासन दिले होते, कोणते पुर्ण केले आहे. हे कधी बघता का? आपण काहीच करत नाही. प्रश्न व्यवस्थित वाचुन येत नाही तसेच त्याचे उत्तर देखिल योग्य प्रकारे देत नाहीत. सभागृहात जे आश्वासन दिले जाते त्यानंतर नगरसेवक असे समजतो की, मी माझे काम पुर्ण केले परंतू तुम्ही कधी ते इतिवृत्त उघडून वाचले आहे काय? तुम्ही जेव्हा पासुन येथे आला आहात तेव्हा पासुनचे इतिवृत्त उघडून पहा की, किती आश्वासने दिली आहेत. आश्वासनाची पुर्तता होते काय? तसेच हे जे दक्षता पथक आहे हे कोणत्या नियमान्वये तयार करण्यात आले आहे? याबाबत आम्हाला माहिती दया. महासभेकडून देखिल परवानगी घेत नाही. यांना असे वाटते की, महासभेचा एकच दिवस सांभळून घ्यायचे आहे ईतर २९ दिवस आपलेच आहेत.

<u>**मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—**</u> तसेच दक्षता पथकाची निर्मीती केल्यापासुन वसुलीत किती वाढ झाली आहे ते देखिल सांगावे.

<u>**मा. सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :—**</u> मा. महापौर महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आम्ही उल्हासनगर महानगरपालिकेत लोकप्रतिनिधी म्हणुन निवडून आलो आहोत. लोकप्रतिनिधीचे काम काय आहे याची कृपया माहिती दयावी. माझ्या माहिती प्रमाणे लोकप्रतिनिधीचे काम असे आहे की, महापालिकेच्या प्रत्येक विभागात कश्या प्रकारे काम सुरु आहे, महापालिका असफल का आहे, महापालिकेला पैसा कशाप्रकारे मिळू शकतो हे पहाणे. महापालिकेला जकात विभाग व मालमत्ता कर विभागातून पैसा मिळतो. जकात विभागाचे काम व्यवस्थितरित्या न केल्याने आपण सर्वानी मिळून त्याचे खाजगीकरण केले आहे. आज ठेकेदार काय करत आहे? ठेकेदार लोकांना किती त्रास देत आहे. उल्हासनगर मधील व्यापा—यांवर ठेकेदारां मार्फत अत्याचार सुरु आहे. ठेकेदारा विरुध्द दादफिर्याद कोण ऐकेल? असेच काम सुरु राहिले तर आज ना उदया मालमत्ता कर विभागाचे देखिल खाजगीकरण करावे लागेल. कारण त्या विभागात काम योग्य प्रकारे सुरु नाही. अशा निरीक्षकांना काम दिले आहे जे फक्त भ्रष्टाचार करतात. दक्षता विभागाने जो अहवाल दिला आहे तो आपण बघा. जेथे पज्याचे घर दाखवले होते तेथे आता तीन माळयाचे आर.सी.सी. बांधकाम उभे राहिले आहे. आम्हाला व आयुक्तांना नाईलाजाने घरपट्टीचे दर वाढवावे लागतात परंतू जर आहे तोच दर व्यवस्थितरित्या लावला तर दर वाढविण्याची आवश्यकता भासणार नाही. शहरात कुठेही नाली किंवा रस्त्याचे काम करायचे असेल तर आम्हाला असे उत्तर मिळते की, महापालिकेकडे पैसे नाहीत. महापालिकेच्या कर विभागातील मिळण्या—या पैश्याची जर चोरी होत असेल तर ती चोरी थांबविण्याचा प्रयत्न करणे हे लोकप्रतिनिधीचे काम आहे. दक्षता पथकातील लोकांनी जे काम केले आहे त्याबददल त्यांना शाबासकी दयायला हवी. त्यांनी वीस मालमत्तांचे सर्वेक्षण केले आहे त्यामध्ये त्यांना रु. दहा ते बारा लाखाची चोरी आढळून आली आहे. महापालिका हद्दीत बनणा—या काही ईमारतीना चार सहा वर्ष आकारणी केली जात नाही.एखादया ईमारतीत लोक राहायला गेल्या नंतर त्यांच्या कडून कर वसुली करणे हे महापालिकेचे काम आहे. तेथील निरीक्षकाचे काम आहे. त्या विभागातील लिपीक व निरीक्षक काय करत आहेत? कर वसुलीसाठी शहरामध्ये महापालिकेच्या आठ गाडया दिवसभर फिरत असतात. परंतू दिवसभरात ते फक्त रु. चार लाख एवढी वसुली करतात त्यापैकी रु. अडीच लाख हे नागरी सुविधा केंद्रात जमा होतात म्हणजे ५८ लिपीक व ८ गाडया मिळून फक्त रु. दिड लाख दिवसाला जमा करतात. ही त्यांची काम करण्याची क्षमता आहे? तसेच रेकॉर्डमध्ये पज्याचे घर दाखवितात परंतू प्रत्यक्षात जागेवर आरसीसी बांधकाम असते. जर दक्षता पथकातील कर्मचा—यांनी चांगल्या प्रकारे काम केले असेल तर आपण त्यांना त्यासाठी धन्यवाद दयायला हवेत, त्यांना पुरस्कार दयायला हवे, त्यांना पदोन्नती दयायला हवी. जर ते चुकीचे काम करत असतील तर मी त्यांना पाठीबा देणार नाही. परंतु लोकप्रतिनिधी म्हणुन आपण शहरातील लोकांना योग्य त्या सुविधा कशा मिळतील याकडे लक्ष दयायला हवे तसेच महापालिकेच्या महसुलात कशाप्रकारे भर पडेल हे देखिल बघायला हवे.

<u>**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :—**</u> मा. महापौरजी, आताच श्री. जेसवानी यांनी सांगितले की, कर विभागात दक्षता पथक निर्माण केल्यानंतर वसुली मध्ये वाढ होणार आहे. ते या विभागाचे सभापती आहेत, दोन तीन वर्षा पासुन ते सभापती म्हणुन काम बघत आहेत तर याआधी हे सर्व बघायचे काम कोणाचे होते? एकीकडे हे म्हणतात की, ठेकेदारामुळे त्रास होत आहे........

<u>**मा. सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :—**</u> माझा हरकतीचा मुद्दा आहे. आज पर्यत मी कधीही सभापती पद घेतलेले नव्हते तसेच मला काही दिवसांपुर्वीच सभापतीपद मिळालेले आहे. तुम्ही माहिती घेतली तर तुम्हाला कळेल की, सभापतीना काहीही अधिकार नाहीत. तसेच हे जे पथक बनविले आहे हे आयुक्तांनी बनविले आहे. मी जी सत्यता पाहिली आहे ती आयुक्तांसमोर ठेवली आहे. माझा कोणालाही विरोध नाही अथवा कोणाशीही माझी दुश्मनी नाही. एक नगरसेवक म्हणुन मी माझे कर्तव्य पार पाडले आहे. आपण सचिवांना विचारले तर

आपल्याला कळेल की, सभापतींना काहीही अधिकार नाहीत. त्यांना अधिकार देण्याचे काम स्थायी समितीचे व आयुक्तांचे आहे.

मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :— अधिकार नाहीत तर मग तुम्ही उत्तर का देता?

मा. सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :— माझा हरकतीचा मुद्दा आहे मला माझे बोलणे पुर्ण करु दया. श्री. रमेश चव्हाण यांनी हा विषय येथे उपस्थित केल्याने मी त्यांना धन्यवाद दिले.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :— महसुल विभागाच्या सभापतींचा विवेक जागृत असल्याने त्यांनी जी माहिती दिली त्याबददल आम्ही त्यांना धन्यवाद देतो. कारण सभागृहातील काही सदस्य मग ते या बाजुस असोत अथवा त्या बाजुस त्यांचा विवेक जागृत आहे यासाठी आम्ही त्यांना धन्यवाद देतो. श्री. सतरामदास जेसवानी हरकतीच्या मुददयाद्वारे जी माहिती दिली त्यासाठी आम्ही त्यांना धन्यवाद देतो. अश्या प्रकारे जागृत राहिल्या बाबत आम्ही त्यांना धन्यवाद देतो. आयुक्तांना माझा प्रश्न होता की, दक्षता पथकाची निर्मीती का केली गेली, कोणत्या नियमाद्वारे केली गेली, त्यासाठी किती खर्च आहे, त्यांचे काम काय आहे, निर्मिती झाल्यापासुन त्यांनी किती काम केले आहे, लोकांचे त्यांच्या बाबत काय मत आहे, तुम्हाला काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत काय, याची माहिती दया. तसेच येथे तासभर सुरु असलेली चर्चा इतिवृत्तामध्येच राहू देवु नका. सभागृहाची भावना लक्षात घ्या. दक्षता पथकाबद्दल संपुर्ण शहरात चर्चा सुरु आहे. हे पथक फक्त वसुली करत आहे. आयुक्तांनी याचे उत्तर दयावे.

कर निरीक्षक (डी.पी. चंदनशिवे) :— मा. महापौर व आयुक्त साहेब......

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :— आम्हाला आयुक्तांकडून उत्तर हवे आहे.

मा. सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :— उत्तर दयायला दुसरा कोणी अधिकारी नाही का? हे स्वत:च एक भ्रष्ट अधिकारी आहेत.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :— ब—याच मालमत्ता अशा आहेत की, ज्या ठिकाणी दक्षता पथकाचे कर्मचारी देखिल जावु शकत नाही. त्यांचे नांव आम्ही सांगु का? गरीब लोकांच्या समोर जावुन उभे राहता. अश्या ५०—६० मालमत्तांची यादी मी देवु का?

यावेळी मा. सदस्य श्री. शांताराम निकम यांनी सभागृहात प्रवेश केला.

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :— मा.महापौर महोदया, मा. नगरसेवक श्री. दिलीप लालवानी यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबद्दल सांगु इच्छितो की, दिनांक १३.११.२००६ रोजी एक कार्यालयीन आदेश काढण्यात आला आहे. तो मी तुम्हाला वाचुन दाखवितो. शहरातील अस्तित्वात असलेल्या अंदाजे १.५० लाख मालमत्तांवर कर आकारणी करण्यात आली असुन मालमत्तांची विभागणी एकुण १ ते ५८ प्रभागात करण्यात आली आहे. तसेच सन २००६—०७ या आर्थिक वर्षातील देयकांचे वितरण करण्याचे काम सुरु आहे. मालमत्ता कर वसुली ही महापालिकेच्या आर्थीक बाबीशी संबधित असल्याने कर वसुली मोहिम प्रभावीपणे पार पाडणे व कर निर्धारण न झालेल्या मिळकती शोधणे, त्यांचे कर निर्धारण करणे याकामी प्रायोगिक तत्वावर नियुक्ती करण्यात येत आहे. सदर बाबतीत हलगर्जीपणा , दिरंगाई होता कामा नये. यात कसुर झाल्यास आपल्या विरुध्द कारवाई करण्यात येईल. ज्यांची नियुक्ती केली आहे ते विजय मंगलानी लिपीक आहेत.

मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :— आयुक्त साहेब तुम्ही जो आराखडा वाचुन दाखविला तो प्रशासनाचा आहे की, सभापतींचा आहे.

मा. सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :— या आदेशाची प्रत तुम्ही विरोधी पक्षाला दिली आहे का?

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :— प्रशासकीय आदेशांच्या प्रती फक्त प्रशासनालाच दिल्या जातात.

मा. सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :— विजय मंगलानीला आधी निलंबीत केले होते हे तुम्हाला माहिती नाही का?

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :– ती प्रशासकीय प्रत आहे तर मग सभापतीनी तुम्हाला कशी काय दिली?

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :– सभापतींनी मला त्यांच्या हरकतीच्या मुद्दयाची माहिती दिली आहे, प्रशासकीय आदेशाची प्रत दिलेली नाही.

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :– रौराळे साहेब सभापतींनी सांगीतले की, या या ठिकाणी भ्रष्टाचार झाला आहे आणि त्यांनी त्याची प्रत तुमच्याकडे दिली आहे. असे असतांनाही तुम्ही सांगता की, त्यांनी प्रत दिलेली नाही.
मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :– तुमचा अहवाल देखिल गोपनिय असायला हवा होता.
यावेळी मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी हे व श्रीमती भावना खिलनानी हया सभागृहातून बाहेर गेल्या.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :– मा. महापौर महोदया, आयुक्तांनी आता जो आदेश वाचुन दाखविला त्याचा खुलासा मी करतो. त्यांनी जे वाचुन दाखविले त्याचा अर्थ तुम्ही सर्वजण समजुन घ्या. आम्ही या संदर्भात शिष्टमंडळासह श्री. मिलींद सावंत यांना भेटलो होतो. त्यांनी आम्हाला सांगितले होते की, त्या आदेशामध्ये दक्षता पथक असा उल्लेख केलेला नाही. हे चुकीचे आहे अथवा नाही याचा खुलासा तुम्ही करावा. दक्षता पथक फक्त जकात विभागात असते, मालमत्ता कर विभागात नाही. दुसरे त्यांनी सांगितले होते की, ज्या कर्मचा–यांची नियुक्ती केली आहे ते कर्मचारी फक्त आज पर्यत ज्या मालमत्तांचे कर निर्धारण झाले नाही अश्या मालमत्ता शोधुन त्यांचे निर्धारण करतील. जुन्या मालमत्तांचे निर्धारण ते करणार नाहीत. ज्या मालमत्तांना ४ ते ५ वर्षा पुर्वी कर आकारणी झाली असेल अश्या मालमत्तांचे निर्धारण पुन्हा करता येणार नाही. श्री. सावंत यांनी मला सांगितले होते की, जर हे लोक कोणत्याही जुन्या मालमत्ता धारकाकडे गेले तर तुम्ही मला फोन करा मी स्वत: तेथे येईन. हे दक्षता पथक नसुन कर विभागातील कर्मचा–यांची एक समिती बनवलेली आहे. त्यांनी ज्या मालमत्तांचे अदयाप निर्धारण झालेले नाही अशा मालमत्ता शोधुन काढायच्या आहेत. यांना जुन्या मालमत्तांमध्ये जाण्याचा अधिकार आहे काय? याचा खुलासा करावा.
मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :– ही समिती का बनविली आहे?

यावेळी मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे सभागृहातून बाहेर गेले.
मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :– मा. महापौरजी, श्री. सतरामदास जेसवानी यांनी ज्या २० लोकांच्या मालमत्तांची यादी तुम्हाला दिली आहे त्यामध्ये बरीच तफावत आहे. आज शहरात अशा लाखो मालमत्ता आहेत ज्यांची योग्य प्रकारे चौकशी केलेली नाही. नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी दिल्यानंतर, त्या जागी नुतनीकरण केल्यानंतरही जुन्याच दराने कर आकारणी करण्यात येत आहे. आपल्या दक्षता पथकाने अदयाप वीसच मालमत्तांचे सर्वेक्षण केले आहे. जर सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण केले तर महापालिकेचे कर्ज कमी होण्यास हातभार लागु शकतो. प्रशासन सांगते की, महापालिकेकडे पैसे नाहीत, महापालिका कर्जाच्या ओझाखाली आहे तर आज लाखो मालमत्तांमधुन फक्त २० मालमत्तांमध्ये रु. बारा लाखाची चोरी आहे. नगररचना विभागाने दिलेल्या बांधकाम परवानगी प्रमाणे जर कर आकारणी केली तर महापालिकेला करोडो रुपये मिळु शकतात. श्री. सतरामदास जेसवानी यांनी तुमच्याकडे जो अहवाल सादर केला आहे त्यातील त्रुटीवर लवकरात लवकर उपाययोजना करावी तसेच लोकप्रतिनिधींना प्रशासनाच्या चुका नजरेस आणाव्या लागतात यासाठी लांच्छनास्पद गोष्ट नाही. एवढे शिक्षित अधिकारी असतांना देखिल एक साधारण नगरसेवक तुमच्या चुका समोर आणतो यासाठी आपण त्वरीत बैठक आयोजित करुन पुढील महासभेपूर्वी योग्य ती कार्यवाही करावी. तसेच अशा मालमत्तांवर तुम्ही काय दंडात्मक कार्यवाही करणार, करणार अथवा नाही याचा अहवाल महासभे समोर आपण आणाल अशी मी अपेक्षा करतो. असे केले तर प्रशासन सक्षम आहे असे मला वाटते अन्यथा ते सक्षम नाही हे दिसुन येईल.

यावेळी मा. सदस्या श्रीमती जया साधवानी हया सभागृहातून बाहेर गेल्या.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :– माझा हरकतीचा मुद्दा आहे. श्री. मोकल यांनी सांगितले की, महापालिकेची परिस्थिती खराब आहे, शहरातील परिस्थिती खराब आहे तर मला असे वाटते की, या दक्षता पथकाची निर्मीती शहरातील अवस्था खराब करण्यासाठीच केली आहे.

मा. सचिव :– प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :– मी येथे प्रश्नोत्तराबद्दल बोलत नसुन शहराच्या मुद्दयाबाबत बोलत आहे.

**मा.सचिव :—** मा.महापौरांनी प्रश्न उत्तराचा तास संपल्याची घोषणा केली आहे. कृपया लक्ष दयावे. लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

लक्षवेधी सूचना क्र. १
सुचकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती भावना खिलनानी

विषय :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील निवासी क्षेत्रात विना परवाना अनधिकृतपणे सुरु असलेल्या वाणिज्य वापराबाबत निर्बंध घालणेबाबत

यावेळी श्री. सतरामदास जेसवानी हे अनुपस्थित असल्याने ही लक्षवेधी सुचना मा. महापौरांच्या आदेशानुसार वगळण्यात येत आहे.

लक्षवेधी सूचना क्र. २
सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

विषय :— उल्हासनगरवासियांना अपशब्द बोलणा—या आयुक्तांविरुध्द् ठराव मंजुर करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविणेबाबत

या बद्दल मा. महापौरांचे आदेश असे आहेत की, ही लक्षवेधी सूचना अस्विकृत करण्यात येत आहे कारण याच विषयावर २४ तारखेला महासभा आयोजित केली आहे. त्यावेळी आपण हा विषय उपस्थित करु शकता.

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :—** माा. महापौर व सचिव साहेब, प्रभाग समिती सभापतींची निवड न झाल्याने आमच्या क्षेत्रातील प्रभाग समिती निधीतून कामे करण्यासाठी ठराव करता आलेला नाही. यासाठी महासभेत आयत्या वेळचा विषय म्हणुन तो विषय आणला जावा. प्रभाग समिती क्र.३ व ४ साठी.

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :—** मा. महापौर व आयुक्त साहेब, प्रभाग समिती क्र.३ व ४ मध्ये सभापती नसल्याने आमच्या प्रभागातील विकास कार्ये थांबली आहेत. यासाठी लवकरात लवकर निर्णय घ्यावा. तसेच या बद्दल खुलासा करावा.

**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :—** मा. महापौर महोदया प्रभाग समिती क्र.३ व ४ मधील विकास कामांचा प्रस्तावास मान्यता देणे हा आयत्या वेळीचा विषय असुन सुचकाचे नांव श्री. धनंजय बोडारे ......

**मा. सचिव :—** प्रशासनाच्या वतीने आयत्या वेळेच्या विषयाची सूचना आलेली आहे. प्रभाग समिती क्र.३ व ४ मधील प्रत्येक प्रभागामध्ये सार्वजनिक विभागाअंतर्गत प्रत्येकी रु. २ लाख खर्चाचा व पाणी पुरवठा विभागा अंतर्गत रु. १ लाख खर्चाचा प्रस्ताव आहे. यासाठी ३/४ बहुमत असेल तर आजच्या बैठकीच्या कामकाजात सदरचा विषय सामावून घेता येईल.

**आयत्या वेळचा विषय:—** प्रभाग समिती क्रमांक.३ व ४ मधील विकास कामांच्या प्रस्तावास मान्यता देणे.

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—** ठिक आहे. याला सर्वसंमतीने मान्यता दिली तर बरे होईल. प्रभाग समिती क्र. ३ व ४ मध्ये सभापती पदाची निवडणूक झालेली नाही, सर्व नगरसेवकांची कामे व्हायला हवीत.

**मा. सचिव :—** या विषयाबद्दल कोणाची काही हरकत आहे काय?

**काही सदस्य :—** विषय सामावून घ्यावा.

**मा. महापौर :—** सदरचा विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घेण्यात येत आहे.

**मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :—** पुढील विषयांस सुरवात करण्यापूर्वी मी मा. महापौरांशी बोलू इच्छितो. आम्ही तीन विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी एक विशेष महासभा आयोजित करणे कामी आम्ही आपल्याला

एक पत्र दिले आहे. ज्याप्रमाणे सकाळी परिस्थिती निर्माण झालेली होती तशी पुन्हा व्हावी अशी आमची इच्छा नाही. त्यामधील सर्व विषय चांगले आहेत. त्यातील एक विषय दंड आकारणी बाबत असुन, आपण येथे त्यावर निर्णय घेवुन सरकारकडे प्रस्ताव पाठवायला हवा. तो जनहिताचा विषय आहे. यामुळे मी मा. महापौरांना आवाहन करतो की विशेष सभेसाठी लवकरात लवकर तारीख निश्चित करावी. आचारसंहिता लागण्यापुर्वी त्या संदर्भात आपण ठराव करुन तो शासनाकडे पाठवायला हवा अशी माझी विनंती आहे. आपण पुन्हा आम्हाला तसे कृत्य करण्यासाठी बाध्य करु नका, निर्णय घेण्याची जबाबदारी मी आपल्यावर सोडत आहे. आपण लवकरात लवकर निर्णय घेवुन सभा आयोजित केल्यास आपल्याला आपल्या कार्यकाळात त्या बद्दल निर्णय घेता येईल. शासनाकडे प्रस्ताव पाठविल्यानंतरही वेळ लागणार आहे त्यामुळे आजच त्या बैठकीची तारीख देखिल निश्चित करावी.

यावेळी मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता हयांनी सभागृहात प्रवेश केला.

**मा.महापौर :—** आपण ते पत्र कधी दिले आहे?

**मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :—** आपल्या कार्यालयात देवुन पाच ते सहा दिवस झाले आहे, सचिवांना देखिल प्रत दिली आहे.

**मा. महापौर :—** डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात आचारसंहितेपूर्वी सभा आयोजित केली जाईल.

**मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** मा.महापौर महोदयांना माझी विनंती आहे की, ज्या प्रमाणे त्यांनी मोठया मनाने दिनांक २४ नोव्हेंबरला सभा ठेवली आहे, त्याच प्रमाणे हे मुद्दे देखिल शहरहिताचे आहेत. आचारसंहिता लागु झाली तर या मुद्दयांवर अंमलबजावणी करता येणार नाही. २४ तारखेलाच ही सभा झाली तर बरे होईल अशी आम्ही मा. महापौरांना विनंती करतो.

**मा. सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** श्री.व्ही.एस.जयसिंगानी, शिक्षण मंडळातील निवृत्त अधिकारी यांना महापालिका निधीतून लेखापाल या नामंजुर पदावर अनुज्ञेय असलेल्या सेवानिवृत्ती वेतनादी इतर अनुषंगीक लाभ मान्य करणे.

---

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** यावेळी इतिवृत्त कायम करण्याचा विषय नाही का?

**मा. सचिव :—** मागील सभेचे कामकाज आजच पुर्ण झाले असल्याने विषय आणता आला नाही.

यावेळी मा. सदस्या श्रीमती जया साधवानी हयांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

**काही सदस्य :—**पास—पास......

**मा. महापौर :—** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**प्रस्तावना**

☑ **विषय क्र. २ :—** श्री.व्ही.एस.जयसिंगानी, शिक्षण मंडळातील निवृत्त अधिकारी यांना महापालिका निधीतून लेखापाल या नामंजुर पदावर अनुज्ञेय असलेल्या सेवानिवृत्ती वेतनादी इतर अनुषंगीक लाभ मान्य करणे.

श्री.व्ही.एस.जयसिंघानी हे ''लेखापाल'' या नामंजुर पदावर दिनांक ३१.१०.१९७९ पासुन दिनांक ३१.७.२००६ पर्यत सेवा करुन नियम वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत व ''लेखापाल'' या पदाच्या वेतनाचे

लाभ घेतले आहेत. तसेच, त्यांना लेखापाल या पदावर १२ वर्षाचा नियमित सेवेनंतर कालबध्द पदोन्नतीचा लाभ शासन निर्णय क्र. एसआरव्ही–१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि. ८ जुन, १९९५ व महानगरपालिका ठराव क्रमांक १०४१, दि.७.११.९८ अन्वये क्र.युएमसी/एज्यु/आस्था–१/३०५/९९, दिनांक व शर्ती नुसार देण्यात आला आहे. असे सेवापुस्तकातील नोंदीवरुन स्पष्ट होते. त्यांची मुळ नियुक्ती ही नगरपालिका आस्थापनेवर झाली असल्यामुळे त्यांचा निवृत्ती वेतनाचा धारणाधिकार कायम आहे.

२. महापालिका शिक्षण मंडळामध्ये शिपाई/वाचमन या नामंजूर पदावर कार्यरत असलेले श्री. नाना कोंडिबा साठे व इतर अशा एकूण ३३ चतूर्थश्रेणीचे कर्मचा–यांनी पदनिर्मिती, वेतन व सेवानिवृत्ती वेतन मिळण्यासाठी याचिका क्र.२३७०/१९९६ मा. उच्च न्यायालय याचीका दाखल केली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने दिनांक २६.७.२००२ रोजी दिलेल्या न्या निर्णयामध्ये सदर ३३ कर्मचा–यांच्या वेतन व सेवानिवृत्ती वेतनापोटी होणा–या खर्चासाठी शासनाकडून विशेष निधी उपलब्ध करुन कायदयाच्या चौकटीत त्यांची सेवा कायमस्वरुपी करण्या बाबत शासनाकडे विचारणा करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महानगरपालि६का शिक्षण मंडळानेठराव ११८८, दिनांक २.११.२००२ पारित करुन महापालिकेस पाठविला असता महापालिकेने का. महासभा ठराव क्र. ५८, दिनांक २६.२.२००२ अन्वये मा. महासभेने पारित केलेल्या ठरावा नुसार शासनास या कार्यालयाचे दिनांक १८.१.२००३ च्या पत्रान्वये सदर ३३ शिपाई/वाचमन पदांची निर्मिती व कर्मचा–यांच्या वेतन व सेवानिवृत्ती वेतनापोटी होणा–या खर्चासाठी विशेष निधी उपलब्ध करण्यास मंजूरी मिळाली होती. त्यानंतर शासनाने त्यांचे कडील दिनांक ३० जुन, २००५ च्या पत्राव्दारे सदर कर्मचा–यांचा वेतनाचा खर्च महानगरपालिका ज्या पध्दतीने गेल्या २०–२५ वर्षापासुन सोसत आली आहे. त्याच पध्दतीने वेतन व सेवानिवृत्ती लाभासाठी खर्च महानगरपालिकेनेत्यांच्या स्तरावर करावा असे कळविले होते. त्यानुसार मा. महासभा ठराव क्र.८६ दिनांक १८.२.२००६ अन्वये सदर ३३ कर्मचा–यांना महापालिका निधीतून सेवानिवृत्ती वेतनादी लाभ देणे व त्या प्रयोजनार्थ अर्थसंकल्पीय अंदाजास मान्यता दिली, होती. त्या प्रमाणे का. आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/२६४/०६, दिनांक २४ मार्च,२००६ अन्वये सदर कर्मचा–यांना त्यांना सध्या मिळत असलेल्या वेतनश्रेणी नुसार सेवानिवृत्त होते वेळी मिळणा–या वेतना प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील ''शिपाई'' संवर्गातील कर्मचारी प्रमाणे सेवानिव्त्त वेतनादी व इतर अनुषंगीत लाभ देण्यात येत आहेत. तथापि सदर कर्मचारी सेवा निवृत्त झाल्यानंतर सदर पदास शासनाची मंजूरी नसल्याने पदे व्यपगत होतील असा आदेश निर्गमित करणेत आला होता.

३. शासनाने शालेय शिक्षण विभागाकडिल क्र.एम.एसजी–२००१/१७१०/प्राशि–२, दिनांक २८.६.२००४ च्या पत्रान्वये लेखापाल या पदावर काम करणा–या कर्मचा–यास महापालिका आस्थापनेवर समावून घेवून त्यांना सेवा निवृत्तीचे लाभ देण्याबाबत महापालिका पातळीवरच विचार व्हावा असे महापालिकेस कळविले आहे. त्यानुसार महानगरपालिका शिक्षण मंडळाने ठराव क्र.८८ दिनांक ३१.७.२००४ अन्वये श्री. व्ही. एम. जयसिंघानी, लेखापाल यांची सेवा महानगरपालिका आस्थापनेवर लेखापाल अथवा समकक्ष वेतनश्रेणीतील पदावर समावून घेवून त्यांना महानगरपालिका शिक्षण मंडळाकडे काम करण्यास मंजुरी दिल्याचा ठराव पारित केला आहे.

४. शासनाने दिनांक ३० जून, २००५ च्या पत्रान्वये शिक्षण मंडळातील चतुर्थ श्रेणीतील नामंजूर पदावर कार्यरत ३३ कर्मचा–यांना अद्यापपर्यत ज्याप्रमाणे वेतनादी लाभ देण्यात येत आहेत. त्याप्रमाणे त्यांना सेवानिवृत्ती वेतनादी लाभ देणे बाबत महापालिका स्तरावर कार्यवाही करावी असे कळविले होते. त्यानुसार मा. महासभा ठराव क्र.८६ दिनांक १८.२.२००६ अन्वये सदर ३३ कर्मचा–यांना सेवानिवृत्ती वेतनादी लाभासाठी होणा–या खर्चास मान्यता दिली असल्याने कार्यालयीन दिनांक २४ मार्च, २००६ च्या आदेशान्वये त्यांना वेतन व सेवानिवृत्ती वेतनादी इतर अनुषंगीक लाभ देण्यात येत आहेत.त्याच धर्तीवर श्री. व्ही.एम. जयसिंघानी, लेखापाल यांचे बाबत शासनाने दिनांक २८.६.२००४ च्या पत्रान्वये त्यांना सेवानिवृत्तीचे लाभ देण्याबाबत महापालिका पातळीवरच विचार व्हावा असे कळविले आहे. त्यामुळे त्यांना केवळ सेवानिवृत्ती वेतनादी लाभ देण्यासाठी होणा–या खर्चास मंजुरी देण्याचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यते साठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:२२</u> <u>दिनांक:–२०/११/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. देवेंद्रसिंह खेमाणी

अनुमोदकाचे नाव :– श्री बच्चाराम रुपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री.व्ही.एस.जयसिंगानी, शिक्षण मंडळातील निवृत्त अधिकारी यांना महापालिका निधीतून लेखापाल या नामंजुर पदावर अनुज्ञेय असलेल्या सेवानिवृत्ती वेतनादी इतर अनुषंगीक लाभ देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>विषय क्र. ३:—</u> श्री.सु.कृ.नाकाडी यांच्या महापालिकेच्या सेवेत मुख्य लेखा परिक्षक या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीची माहिती नोंद करणे.

---

यावेळी मा. सदस्या श्रीमती माया मसंद व श्रीमती निता आहुजा हया सभागृहातून बाहेर गेल्या.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ <u>प्रस्तावना</u>

<u>विषय क्र. ३:—</u> श्री.सु.कृ.नाकाडी यांच्या महापालिकेच्या सेवेत मुख्य लेखा परिक्षक या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीची माहिती नोंद करणे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, मुंबई यांचे कडील आदेश क्र. सलेको—११.०६/प्रक्र. १४२/२००६/कोषा प्रशा—१, दिनांक २०.९.२००६ अन्वये श्री. सु.कृ नाकाडी यांची या महानगरपालिके मध्ये ''मुख्य लेखा परिक्षक '' या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्री.सु.कु. नाकाडी हे या महानगरपालिके मध्ये दिनांक २७.९.२००६ पासून रुजू झालेले आहेत.

श्री. सु.कृ. नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक यांचा प्रतिनियुक्ती वरील नेमणुकीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे माहितीसाठी ठेवणेस प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र</u>: २३ <u>दिनांक:— २०/११/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती मीना सोंडे

अनुमोदकाचे नाव :— श्री. नथु सोनवणे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री सु.कृ.नाकाडी यांच्या महापालिकेच्या सेवेत मुख्य लेखा परिक्षक या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>विषय क्र. ४:—</u> श्री.सा.अ.पठाण यांच्या महापालिकेच्या सेवेत **सहाय्यक आयुक्त** या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीची माहिती नोंद करणे.

---

यावेळी मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी व श्रीमती भावना खिलनानी हयांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ <u>विषय क्र. ४:—</u> श्री.सा.अ.पठाण यांच्या महापालिकेच्या सेवेत **सहाय्यक आयुक्त** या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मुंबई यांचे कडील शासन निर्णय क्र. उमपा/२३२४/९३५२/प्र.क्र.१५९/०४/नवि.२१, दिनांक १८.७.२००६ अन्वये श्री. सा.अ.पठाण यांची या महानगरपालिके मध्ये '' **सहाय्यक आयुक्त**'' या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्री. सा.अ. पठाण हे या महानगरपालिके मध्ये दिनांक १०.१०.२००६ पासून रुजू झालेले आहेत.

श्री. सा.अ.पठाण, सहाय्यक आयुक्त यांचा प्रतिनियुक्ती वरील नेमणूकीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे माहितीसाठी ठेवणेस प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> २४ <u>दिनांक:— २०/११/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्री चंदाराम मोकल
अनुमोदकाचे नाव :— श्री रामदास उमाप

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री सा.अ.पठाण यांच्या महापालिकेच्या सेवेत सहाय्यक आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

**मा. सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५:—** पाले ते गायकवाड पाडा दरम्यान सुधारीत पाणी पुरवठा योजना अंतर्गत जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने बाधित होणा—या चार प्रतिनिधींना महापालिकेच्या सेवेत सामावुन घेण्यास मान्यता देणे.

---

**मा. सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :—** मा. महापौर महोदया, हरकतीच्या मुद्दयाद्वारे एक विनंती करु इच्छितो. स्मशानभूमी मध्ये मोफत लाकडे देण्यासाठी यापुर्वी आपण ठराव मंजुर केला होता परंतू अदयाप त्या ठरावाची अंमलबजावणी केली जात नाही. आपण जर त्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाला निर्देश दिले तर बरे होईल.

**मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—** मा.महापौर महोदया, हरकतीच्या मुद्दयाव्दारे मी देखिल एक प्रश्न सादर करु इच्छितो. श्री. सतरामदास जेसवानी यांनी स्मशानात मोफत लाकडे देण्याचा विषय उपस्थित केला आहे तर मी देखिल सांगु इच्छितो की, स्मशानभूमी मध्ये आपण आमदार निधी व नगरसेवक निधीतून काम करतो परंतू तेथे कर वसुलीसाठी नोटिस पाठविली जात आहे. यासाठी मी आपणास निवेदन करेन की, उल्हासनगर मधील जेवढया स्मशानभूमी आहेत त्यांच्याकडून कर वसुली करण्यात येवु नये. स्मशानभूमी मध्ये जप्ती करण्यात येईल अशी नोटिस पाठविण्यात येते, तेथे काय जप्ती करणार हे मला समजुन येत नाही. स्मशानभूमी मध्ये काही संस्था चांगल्या प्रकारे काम करीत आहेत, तेथे बगीचा बनविला आहे. त्यामुळे यावर चर्चा करुन योग्य निर्णय घ्यावा. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :—** मा. महापौर महोदया, मी देखिल यांना समर्थन देत आहे. स्मशानभूमीमध्ये काही कमाई होत नाही, तेथे सेवाभावाने काम केले जाते. त्यामुळे त्यांना घरपट्टी भरता येत नाही. त्यांची घरपट्टी माफ केली तर बरे होईल धन्यवाद.

**मा. सदस्य श्री.प्रमोद टाले :—** मा. महापौरजी, सचिव साहेब, मघाशी जलवाहिनी संदर्भात जो मुद्दा आणला त्यामध्ये तुम्ही जे कामगार रुजु करुन घेणार आहात ते तुम्ही ताबडतोब रुजु करुन घेणार आहात की अजुन काही शासकीय प्रक्रीया बाकी आहे याचा खुलासा व्हायला हवा. तसेच माझी विनंती आहे की, इतिवृत्त कायम होण्यापूर्वी त्यांना कामावर रुजु करुन घ्यायला हवे.

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—** मा.महापौरजी, श्री. सतरामदास जेसवानी यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. स्मशानभूमीत अंत्य संस्कारासाठी जो मृतदेह नेला जातो त्यावर रु. ५६०/— एवढा खर्च येतो. तो महापालिकेने करण्यासाठी मीच प्रस्ताव आणला होता. दरवर्षी ३००० मृत्यु होत असुन ९५०० जन्म होत आहेत. यासाठी महापालिकेला एका वर्षात फक्त रु. ६ लाख एवढा खर्च येणार आहे. असे केल्याने लोकांना वाटेल की, महापालिका दु:खाच्या समयी त्यांच्या सोबत आहे. यासाठी या आदेशाची त्वरीत अंमलबजावणी करायला पाहिजे कारण ४ वर्षापूर्वी हा विषय मंजुर झाला होता. स्मशानभूमीसाठी देखिल अशी तरतुद आहे की, त्यांच्या कडून २५ टक्के वसुली करायची असुन ७५ टक्के कर माफ करायचा आहे. स्मशानभूमी मध्ये महापालिका देखिल विकास कामे करते त्यामुळे अंत्य संस्काराचा खर्च महापालिकेने करायला हवा. महापालिकेने स्मशानभूमी मध्ये लिपिकांची नियुक्ती केली आहे परंतू ते तेथे कधीही बसत नाहीत. यासाठी तेथे लिपिक देखिल असायला हवेत. जे स्वखुशीने पैसे भरु इच्छित असतील त्यांच्या कडून पैसे घ्या परंतू ज्यांची परिस्थिती चांगली नसेल त्यांच्याकडून लाकडाचे पैसे घेवु नयेत. कारण काही लोक पैसे भरण्यासाठी तयार असतात.

**मा. सदस्य श्री.अशोक ठाकुर :—** मा. महापौर महोदया, पाले येथील जलवाहिनीचे काम पुर्ण झाल्यानंतर कॅम्प नं. ४ व ५ येथील पाणी समस्या दुर होवू शकते, ते काम पुर्ण झाले असुन आता जलवाहिनी कधी सुरु करण्यात येणार आहे. याचा खुलासा करावा.

**मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** मा. महापौर व आयुक्त साहेब माझी अजुन एक सूचना आहे. माझ्या प्रभागात दुर्गामातेचे मंदिर आहे, त्या मंदिरात लोक दिवा लावतात व पाया पडतात. आज पर्यत त्यावर करापोटी लाखो रुपयांची थकबाकी आहे, तो कोण भरेल? त्यांच्या कडून तुम्ही काय वसुल करणार? जे मंडळ नोंदणीकृत नसेल त्याची घरपट्टीही माफ करण्यात यावी. असे केले नाही तर त्यावरील कराची रक्कम वाढतच जाईल. तुम्ही तेथे वसुली करु शकता का?

**मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :—** मी, मा.महापौरांना विनंती करीन की जेवढे मंदिर आहेत त्याची घरपट्टीची रक्कम महापौर निधीतून भरण्यात यावी.

**मा. सदस्य श्री.चंदाराम मोकल :—** मा. महापौर महोदया, श्री. सतरामदास जेसवानी यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तसेच त्यावर श्री. किशोर वनवारी यांनी जो प्रस्ताव ठेवला आहे की, गरीबांना मोफत लाकडे देण्यात यावीत या बद्दल माझाी सूचना आहे की, फक्त गरीबांनाच नाही तर सर्वासाठी लाकडे मोफत देण्यात यावीत. जर कोणी स्वत:हून पैसे भरु इच्छित असतील तर त्यांना महापालिकेला रु. ५००/— ऐवजी रु. ५,०००/— ऐवढे देणगी देण्यासाठी सांगावे. लाकडे मात्र सर्वाना मोफत मिळायला हवीत. यासाठी तेथे एक फॉर्म ठेवावा. यामुळे स्मशानभूमीला उत्पन्न प्राप्त होवु शकते. दुसरे म्हणजे ज्या लोकांची घरपट्टी कमी येत आहे त्यांच्यावर काय कारवाई करणार हे आयुक्तांनी सांगितले नाही. त्यावर काही तरी उत्तर दयायला हवे.

**मा. सदस्य श्री.विनोद ठाकुर :—** मा. महापौर व आयुक्त साहेब, काही दिवसांपूर्वी टाईम्स ऑफ इंडिया या पेपर मध्ये मा. महापौरांचा फोटो आला होता की, पाले गांवात जोरात काम सुरु आहे. त्यामुळे सर्वाना आशा होती की, लवकरच पुरेसे पाणी मिळेल परंतू आज पर्यत पाणी आले नाही. त्याचे कारण काय आहे? याबद्दल महापौर व आयुक्तांनी खुलासा केला तर बरे होईल, सभागृहाला माहिती मिळेल. कॅम्प नं.४ व ५ मध्ये पाण्याची समस्या आहे, काही ठिकाणी १० मिनीटे पाणी येते तर काही ठिकाणी अजिबात येत नाही. पालेची लाईन कधी सुरु होइल याचा खुलासा करावा कारण आम्ही विचारल्यावर असे सांगण्यात आले की, वॉल्व न लावल्याने सुरु करता आली नाही. कधी सुरवात होईल हे सांगीतले तर बरे होईल.

**मा. महापौर :—** सहका—यांनो आठवण करुन दिली हे बरे झाले. ''जिते लकडी, मरते लकडी, देख तमाशा लकडी का''. अंत्य समयी लाकडेच सर्वांच्या कामी येतात. अंत्य समयी मोफत लाकडे देण्यासाठी आम्ही ठराव मंजुर केला होता परंतू त्यामध्ये काही लोकांची हरकत अशी होती की, जे पैसे देवु इच्छित असतील ते पैसे देवु शकतात, ही योजना विशेष करुन गरीब लोकांसाठीच होती. असे ब—याच वेळा दिसुन आले आहे की, दोन चार वर्षा पुर्वी पास झालेल्या ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्त आदेश देत नाहीत. त्यामुळे आयुक्तांना सर्वांची विनंती आहे की, लाकडे मोफत देण्यासाठी आम्ही जो ठराव केला आहे तो लवकरात लवकर अंमलात आणावा. तसेच आमच्या सर्व महिलांना एक सूचना आहे की, सी.एच.एम. कॉलेजचे प्राचार्य श्री. दिनेश पंजवानी यांनी दिनांक २८.११.२००६ ते १.१२.२००६ पर्यत एका कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्यामध्ये महिलांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. सकाळी ९.३० ते दुपारी १.३० पर्यत सदरचा कार्यक्रम चालणार आहे त्यासाठी सर्व महिलांनी उपस्थित रहावे.

**मा. सदस्य श्री.विनोद ठाकुर :—** पाले गांवाचे काय झाले?

**मा.महापौर :—** लवकरात लवकर जलवाहिनीचे उद्घाटन करुन पाणी सुरु केले जाईल.

**मा. सदस्य श्री.प्रमोद टाले :—** कामगारांसाठी आपण जो ठराव पारीत करीत आहोत त्याची अंमलबजावणी त्वरीत होणार आहे की, त्याला वेळ लागणार आहे?

**मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :—** माा.महापौर महोदया, स्मशानभूमीच्या करा बद्दल काय झाले?

**उप आयुक्त (मुख्यालय) :—** मा. महापौर महोदया, श्री. टाले यांनी कामगारांच्या नियुक्ती बाबत जो मुद्दा उपस्थित केला आहे तर मी सांगु इच्छितो की सभागृहाकडून त्यांच्या नियुक्तीसाठी मंजुरी घेतली जात आहे. जो पर्यत अपंग व्यक्तींच्या भरतीची प्रक्रीया पुर्ण होत नाही तो पर्यत अन्य भरती न करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. मा. उच्च न्यायालयाचे पुढील आदेश आल्यानंतर या लोकांना नियुक्ती आदेश दिले जातील.

मा. सदस्य श्री.प्रमोद टाले :— आदेश कधी पर्यत येतील?

उप आयुक्त (मुख्यालय) :— ते मा. उच्च न्यायालयावर अवलंबून आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— मा.महापौर महोदया, आपण आताच सभागृहात सांगितले की पाले येथुन लवकरात लवकर पाणी पुरवठा सुरु करण्यात येईल. माझी सूचना वेगळी आहे, मागील आठवडयात मा. मंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्याकडे बैठक झाली होती त्यावेळी तेथे महापालिकेचे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी श्री. सेलवन हे देखिल उपस्थित होते. तेथे संबधितांनी स्पष्टपणे सांगीतले होते की आम्ही तुम्हाला पाले येथुन पाणी देणार नाही. हे खरे आहे की खोटे याबद्दल आपण श्री. सेलवन यांना येथे बोलावून विचारणा करु शकता. पाले येथुन लवकरच पाणी मिळेल असे सांगुन सभागृहाची दिशाभुल करु नका. सर्व अधिका—यांनी पाले येथुन पाणी देण्यास स्पष्ट नकार दिला आहे.

मा. महापौर :— पाले येथुन आधीपासुनच पाणी मिळत आहे.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— त्यांनी अतिरिक्त पाणी देण्यास नकार दिला आहे.

मा.महापौर :— आपल्यासाठी ३८ एमएलडी ऐवढे अतिरिक्त पाणी आधीच मंजुर केले आहे.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— त्यांनी अतिरिक्त पाणी देण्यास नकार दिला आहे.

मा.महापौर :— मी अतिरिक्त असे म्हणाले नाही मी म्हणाले की, पाणी सुरु होईल. यापूर्वी आपणास ३८एमएलडी एवढे जास्तीचे पाणी मंजुर केले आहे परंतू यासाठी आपणास पाठपुरावा करावा लागेल.

यावेळी मा. सदस्या श्रीमती माया मसंद व श्रीमती निना नाथानी हयांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी:— जेवढे पाणी मंजुर आहे त्याच्यापेक्षा जास्तीचे पाणी वाढवून देण्यास त्यांनी नकार दिला आहे. तुम्ही श्री. सेलवन यांना विचारा ते तेथे उपस्थित होते.

काही सदस्य :—पास—पास……

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ विषय क्र. ५:— पाले ते गायकवाड पाडा दरम्यान सुधारीत पाणी पुरवठा योजना अंतर्गत जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने बाधित होणा—या चार प्रतिनिधींना महापालिकेच्या सेवेत सामावुन घेण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या दृष्ट्रीने टप्पा क्र.१ अंतर्गत रु.१८.८० कोटीची योजना राबविण्यात आली या योजने अंतर्गत उल्हासनगर शहरातील विविध ठिकाणी संप, पंप गृह तसेच जलकुंभ बांधणेच्या कामांचा समावेश होता. या योजने अंतर्गत मुख्य जलवाहिन्या टाकण्याचे काम जवळ जवळ ९५ टक्के पुर्ण झालेले आहे. व यापैकी काही जलकुंभ व जलवाहिन्या कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. या योजने अंतर्गत पाले ते गायकवाड पाडा या दरम्यान ७६२ मी.मी.व्यासाच्या जलवाहिनीचे काम भुसंपादन प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्यामुळे तसेच खाजगी जमीन धारकाची हरकत असल्यामुळे टाकता आलेली नाही. याकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत भुसंपादनाचा प्रस्ताव दि.९.७.२००२ रोजी संबंधीत विशेष भुसंपादन अधिकरी, ठाणे यांचेकडे सादर केलेला आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे भुसंपादन प्रक्रिया पुर्ण करण्याच्या दृष्ट्रीने सतत पाठपुरावा सुरु आहे. भुसंपादन प्रक्रिया पुर्ण करण्यास ब—याच कालावधी लागणार आहे. उल्हासनगर शहर (दक्षिण) भागात महाराष्ट्र विकास महामंडळाच्या पाले येथुन बारवी मुख्य जलवाहिनीतून घेतलेल्या जोडणीतून सद्यस्थितीत पाणी पुरवठा होत आहे.

म.औ.वि. महामंडळाच्या बारवी जलवाहिनी वरील पाण्याचा दाब सरासरी ४.५०के.जी/से.मी. राहिल्यास दक्षिण भागास पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होवु शकतो, परंतू म.औ.वि.महामंडळाने अतिरिक्त नविन तिसरी जलवाहिनी कार्यान्वित केल्यामुळे जलवाहिनी वरील पाण्याचा दाब सरासरी ३.४० ते ३.७० के.जी/से.मी. या दरम्यान असल्यामुळे पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे उल्हासनगर दक्षिण भागातील कॅम्प क्र. ४ व ५ मध्ये ब—याच प्रमाणात पाणी टंचाई जाणवत आहे. तसेच भविष्यामध्ये म.औ.वि.महामंडळाने त्यांच्या मुख्य जलवाहिनीवरील दाब २.५० के.जी/से.मी. पेक्षाही कमी होण्याची शक्यता आहे असे कळविले आहे. कॅम्प क्र. ४ व ५ मधील पाणी टंचाई दूर करण्याच्या दृष्ट्रीने सुधारीत उल्हासनगर पाणी पुरवठा योजने अंतर्गत म. जी.प्रा. मार्फत मृदु लोखंडी जलवाहिनी ७६२ मि.मि.व्यासाचे टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. वरील मुख्य जलवाहिनी पाले ते गायकवाड पाडा दरम्यान एकुण १५०० मीटर पैकी एकूण ११०० मिटर लांबीची जलवाहिनी संबंधीत जमीनधारकांच्या सहमतीने टाकण्यात आलेली असुन त्याप्रित्यर्थ महापालिकेने आता पर्यत एकूण ४ जणांना सेवेत समावून घेतलेले आहे. सोबत या बाबतचा गोषवरा व महासभेने मंजुर केलेला ठराव जोडत आहे.

परंतू उर्वरीत ४०० मीटर लांबी पैकी काही जमीनधारकांनी आक्षेप घेतल्यामुळे काम स्थगित करावे लागले. भुसंपादनाची प्रक्रिया सुरु असुन त्यासाठी काही अवधी लागणार असून उल्हासनगर शहरातील तीव्र पाणी टंचाईची समस्या सोडविणेचे दृष्ट्रीने मुख्य जलवाहिनीचे उर्वरीत काम युध्द पातळीवर पूर्ण करणे आवश्यक त्या दृष्ट्रीने संबधित जमीनधारक यांचे समवेत मा.आमदार, मा. महापौर, उल्हासनगर व कल्याण तसेच सभापती पाणी पुरवठा व महापालिका व म.जी.प्रा.चे अधिकारी यांचे समवेत दिनांक २२.४.२००६ रोजी संयुक्त बैठक घेण्यात आली.

त्याबैठकीत ठरल्या प्रमाणे संबधीत जमीनधारकांनी खालील दिलेल्या सविस्तर विवरणा नुसार महापालिकेच्या सेवेत एकुण ४ जणांना सेवेत समावून घेतल्यास काम करण्यास सहकार्य दर्शविलेले आहे व त्यानुसार उर्वरीत जागेत कामही सुरु करण्यात आलेले आहे. याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | गावाचे नांव | सर्व्हे नं. /हिस्सा नं. | भुधारकाचे नांव | भुधारकाच्या वतीने उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत समाविष्ठ करण्यातयेणा—या व्यक्तीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे अंबरनाथ ता. अंबरनाथ। | १४७/१४ | १ श्रीमती जनाबाई दत्तू वायले<br>२ श्री.श्रीराम दत्तू वायले<br>३ कु.संगिाता दत्तू वायले<br>४ श्रीमती पार्वती सखाराम वायले<br>५ श्री. हरीचंद्र सखाराम वायले<br>६ श्री. हरीराम सखाराम वायले<br>७ श्री. अशोक सखाराम वायले<br>८ श्रीमती लक्ष्मीबाई जनार्दन भोईर | १. श्री.अशोक सखाराम वायले. |
| २. | मौजे अंबरनाथ ता. अंबरनाथ। | १५०/७ | १ श्री.गुरुनाथ कुंडलीक वायले<br>२ श्री. राम कुडलीक वायले<br>३ श्री. जयराम शंकर वायले<br>४ श्री.अनंतर शंकर वायले<br>५ श्री. गणपत शंकर वायले<br>६ श्री. अन्या शंकर वायले व इतर<br>७ श्री. गजानन सुक—या वायले<br>८ श्री. दिनकर महादु वायले<br>९ श्री. बाळाराम महादु वायले | २. श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले<br><br>३.श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले<br><br>४. श्री. राजेश ब्रम्हण तरे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | | १४७/२ | १ श्रीमती जिजाबाई गुरुनाथ दुधकर<br>२ श्रीमती अक्का रमेश म्हात्रे<br>३ श्री. फकीरा दिनकर वायले<br>४ श्रीमती लता शशिकांत शिलवे<br>५ श्रीमती सिताबाई संजय बावशे<br>६ श्री.वासुदेव बाळाराम वायले<br>७ श्री.संतोष बाळाराम वायले<br>८ श्रीमती गिता हरेश फुलोरे<br>९ श्रीमती जनाबाई दत्तू वायले<br>१० श्री.श्रीराम दत्तू वायले<br>११ श्रीमती संगिता दत्तू वायले<br>१२ श्रीमती पार्वती सखाराम वायले<br>१३ श्री. बाळु सखाराम वायले<br>१४ श्रीमती लक्ष्मी जनार्दन भोईर<br>१५ श्री. सोनु सुरेश कोटघरे<br>१६ श्री. भाउ सुरेश कोटघरे<br>१७ श्री. गुरुनाथ कुंडलीक वायले<br>१८ श्रीमती काळाबाई बळीराम भोईर<br>१९ श्रीमती शेवंताबाई बळीराम फुलोरे<br>२० श्री.गुलाब यशवंत मढवी<br>२१ श्रीमती सराबाई भगवान भोईर<br>२२ श्री. राम कुंडलीक वायले<br>२३ श्रीमती लालाबाई विठ्ठल वायले<br>२४ श्री. अंकुश विठ्ठल वायले<br>२५ श्री. श्याम विठ्ठल वायले<br>२६ श्री.महेश विठ्ठल वायले<br>२७ श्री. विशाल विठ्ठल वायले<br>२८ श्री. राजाराम वात्या भोईर<br>२९ श्रीमती नागुबाई कायोंड पाटील<br>३० श्रीमती पार्वतीबाई गणपत शेलार<br>३१ श्रीमती फसुबाई सखाराम भोईर<br>३२ श्री. बाळाराम सखाराम भोईर<br>३३ श्री. जितेंद्र सखाराम भोईर<br>३४ श्रीमती सुनिता सखाराम भोईर<br>३५ श्री. उमेश सखाराम भोईर<br>३६ श्री. किसन सखाराम भोईर<br>३७ श्रीमती अनुताई दामोदर म्हात्रे<br>३८ श्रीमती पुष्पा महादेव भोईर<br>३९ श्री. अनंत शंकर पाटील<br>४० श्री. प्रकाश शांताराम म्हात्रे<br>४१ श्रीमती रत्नाबाई बलन पाटील<br>४२ श्री. सावळाराम काळया मढवी<br>४३ श्री. जजोराम शंकर वायले<br>४४ श्री. अनंत शंकर वायले<br>४५ श्री. गणपत शंकर वायले<br>४६ श्री. अन्या शंकर वायले<br>४७ श्रीमती वेणुबाई नाना पाटील<br>४८ श्रीमती सिताबाई कान्हा चिकनकर<br>४९ श्रीमती तुळसाबाई सखाराम कडु<br>५० श्रीमती लडकुबाई रामा डोगरे<br>५१ श्रीमती सुमन पांडुरंग पाटील<br>५२ श्री. बबन पांडुरंग पाटील<br>५३ श्रीमती वत्सलाबाई पांडुरंग पाटील | |

तसेच ज्या जमीनधारकांच्या जमीनीतून जलवाहिनी टाकावयाचीआहे अशा जमिनधारकांस/त्यांने संमती दिलेल्या व्यक्तिस सेवेत समावून घेणे बाबत कोणत्याही प्रकारची कायदयात तरतूद नाही. परंतू पाण्याचा अतिमहत्वाचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्ट्रीकोनातून व योजनेचा पूर्णपणे लाभ व उपयोगितेच्या दृष्टीने एकुण ०४ जणांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत अस्थायी पदावर (वर्ग–४) सामावून घेतल्यास पाले ते गायकवाड पाडा या दरम्यान अपूर्ण असलेले जलवाहिनीचे काम पुर्ण करता येणे शक्य आहे.

भुसंपादनाच्या प्रस्तावास बराच कालावधी लागणार असल्यामुळे व पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्ट्रीने विशेष बाब म्हणून जमीन धारकांनी मागणी केल्या नुसार महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ अन्वये तात्पुरत्या स्वरुपात अस्थायी पदावर सामावून घेणेबाबत मंजूरी मिळावी. सदर प्रस्तावास मान्यता मिळणे करिता महासभेच्या मंजूरीसाठी सादर

महासभा ठराव क्र: २५ दिनांक:– २०/११/२००६

सुचकाचे नाव :– श्री. देवेंद्रसिंह खेमाणी

अनुमोदकाचे नाव :– श्री प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे पाले ते गायकवाड पाडा दरम्यान सुधारीत पाणी पुरवठा योजना अंतर्गत जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने बाधित होणा–या भुधारकांचे चार प्रतिनिधी अनुक्रमे श्री. अशोक सखाराम वायले, श्री.ज्ञानेश्वर गणपत वायले, श्री.चंद्रकांत गुरुनाथ वायले व श्री. राजेश ब्रम्हण तरे यांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत तात्पुरत्या स्वरुपात अस्थायी पदावर (वर्ग–४) सामावून घेण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :– मा.महापौर महोदया, सभागृहामध्ये महापौर केसरी कुस्ती स्पर्धा या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिका वाटल्या आहेत. जर हा कार्यक्रम महापालिकेने आयोजित केला असेल तर यामध्ये विरोधीपक्ष नेत्याचे नांव असणे देखिल आवश्यक होते, सर्व पक्षांच्या गटनेत्यांचे नांव असणे आवश्यक होते. जर हे महापालिकेच्या खर्चाने होत असेल तर. दुसरे म्हणजे कुस्तीचा कार्यक्रम मैदानात ठेवणे आवश्यक होते, राजकिय कुस्ती करण्यासाठी सभागृह पुरेसे आहे परंतू ही कुस्ती स्पर्धा टाउन हॉल मध्ये का ठेवली आहे हे मला कळून येत नाही. तसेच याची रंगीत तालीम कोणत्या मैदानात सुरु आहे याची माहिती देखिल आम्हाला दयावी.

यावेळी मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकूर हयांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :– मा. आयुक्त साहेब, हे जे कार्ड वाटले आहे ते उल्हासनगर महानगरपालिके तर्फे वाटले आहे काय याची माहिती दयावी. जर असेल तर या मध्ये विरोधी पक्षनेत्याचे नांव का टाकले नाही. हा खर्च कोणी केला आहे? खाजगी व्यक्तींनी केला आहे काय? आयुक्त साहेब तुम्हाला याची माहिती नाही काय? यामध्ये असे लिहिले आहे की, उल्हासनगर महापालिका पुरस्कृत.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :– महापौरांचे नांव देखिल चुकीचे टाकले आहे. कालानी ऐवजी कलानी लिहिले आहे.

<u>मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—</u> तुम्ही माहिती मागवा,आम्हाला काय विचारत आहात. महापालिकेने केले आहे की, महापालिका कोणाची खाजगी मालमत्ता आहे काय? हा कार्ड वाटणारा माणूस कोण आहे?

<u>मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—</u> महापालिके तर्फे कार्ड वाटत आहेत, तसेच सहया देखिल घेतल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:—</u> जर महापौरांची व महापालिकेची वागणूक अशीच राहिली तर आम्ही त्याचा निषेध करत आहोत तसेच तो कार्यक्रम आम्ही चालू देणार नाही.

<u>मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—</u> आम्ही कार्यक्रम देखिल होवु देणार नाही. हे महापालिकेतर्फे आहे काय? हे आधी आम्हाला सांगा.

<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—</u> आयुक्त साहेब शिष्टाचाराचे पालन करा. जर महापालिकेचा कार्यक्रम असेल तर कायदयाने त्यावर विरोधी पक्षनेत्याचे नांव असणे आवश्यक होते.

<u>मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—</u> आयुक्त साहेब, कार्यक्रम कोणाचा आहे ते सांगा. तुमचे नांव कोणीही वापरु शकते का?

<u>मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :—</u> मी पहिल्यांदाच होत नसुन चार साडे चार वर्षामध्ये आपण काहीच शिकलेलो नाही. शहरात बोर्ड लागतात परंतू त्यात विरोधी पक्षनेत्याचे नांव नसते. इतर सर्व महापालिकांमध्ये बोर्डवर विरोधी पक्षनेत्यांचे नांव पण असते.

<u>मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—</u> आम्हाला उत्तर दया की, कार्ड कोणी छापले आहेत ते आम्हाला माहिती नाही.

<u>मा. सदस्य श्री.प्रशांत जाधव :—</u> सावळा गोंधळ सुरु आहे.

<u>मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—</u> सर्व जण मैदानातून पळुन गेले आहेत कुस्ती कशी काय होईल.

<u>मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—</u> उठसुठ कोणीही महापालिकेच्या नांवाचा वापर करतो काय? पाच हजाराचे काम करायला पैसे नाहीत आणि लाखो रुपयांची उधळपट्टी सुरु आहे.

<u>मा. सदस्य श्री.दिलीप गायकवाड :—</u> औषध मारणा—या गाडयांवर महापौरांचे नांव टाकले आहे, त्या गाडया त्यांच्या पैश्याने चालतात काय? तुम्ही येथे बसुन दलालीचे काम करता काय? तुम्ही दलाल आहात काय? दात काढताय वरुन इथे.

<u>आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :—</u>महापौर केसरी कुस्ती स्पर्धेबद्दल जे कार्ड छापले आहे त्यावर चुकुन विरोधी पक्षनेत्याचे नांव छापणे राहून गेले आहे. जर पत्रिका वाटल्या नसतील तर दूरुस्ती करुन त्या पुन्हा वाटल्या जातील.

<u>मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—</u> हे महापालिकेने केले आहे काय ते आधी सांगा.

<u>मा. सदस्य श्री.दिलीप गायकवाड :—</u> मा. महापौर व आयुक्त साहेब यापुर्वीही आम्ही तुम्हाला सूचना दिल्या आहेत. सुवर्ण जयंती अंतर्गत महिलांसाठी जेव्हा कार्यक्रम ठेवला होता त्यावेळी सुध्दा असेच केले होते. तुम्ही आम्हाला जाणुनबुजून डावलत आहात.

<u>मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—</u> तुम्ही शहरामध्ये काय संदेश देवु इच्छित आहात?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> तुम्हाला शिष्टाचाराचे देखिल पालन करता येत नाही.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— आम्हाला जे कार्ड दिले आहे ते आम्ही आयुक्तांना परत देत आहोत. दुसरे कार्ड छापुन त्यामध्ये विरोधी पक्षनेत्यांचे नांव टाका.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— यामध्ये दुरुस्ती करुन दुसरे कार्ड छापा नाही तर आम्ही कार्यक्रम होवु देणार नाही.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :— कुस्ती येथेच होवु दया.

मा. सदस्य श्री. राजेद्र चौधरी :— माझ्या माहिती प्रमाणे जनसंपर्क अधिका—यानी हे कार्ड छापले आहे. अश्या अधिका—याला आताच लाथ मारुन काढायला हवे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— पीआरओ ना बोलवा.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— मा.महापौरजी, मी सभागृहाला विनंती करु इच्छितो की, उल्हासनगर मध्ये आधीच खेळांविषयी जागृती कमी आहे. चांगल्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :— हरकतीचा मुद्दा आहे. आम्ही खेळाचा विरोधात नाही. तुम्ही कुस्ती खेळा, कबडी खेळा, खो—खो खेळा अजुन काही खेळायचे असेल तर खावं खावं खेळा, आम्ही त्याच्या विरोधात नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— आमचे काही सदस्य येथुन त्या बाजुला गेल्या पासुन मर्यादा विसरले आहेत.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— तुम्ही तुमची मर्यादा लक्षात ठेवा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— हा मर्यादा पुरुषोत्तम राम बोलत आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— माझे असे म्हणणे होते की,हा एक चांगला प्रयत्न आहे व त्यामध्ये काही चुक झाली असेल तर ती सुधारुन घ्यायला हवी.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— हरकतीचा मुद्दा आहे, चुकीने श्री. खेमाणी यांचे नांव कसे काय टाकले आहे? तुमचे नांव कसे काय विसरले नाहीत?

*यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.*

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा.महापौरजी, विरोधी पक्षनेत्याचे नांव या मध्ये टाकणे आवश्यक होते परंतू ते टाकले गेले नाही हे योग्य झाले नाही. यामध्ये सुधारणा करुन विरोधी पक्षनेत्याचे नांव टाकायला हवे. यानंतरही कोणी माझ्या बोलण्यावर आक्षेप घेत असेल तर हा कार्यक्रम पुर्ण करण्यात येईल.

मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :— आयुक्त साहेब हा कार्यक्रम महापालिकेचा आहे, कोणाचा वैयक्तिक नाही.

*यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.*

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— मा. महापौरजी ही काही पहिलीच चुक नाही. यावर्षी गणेश दर्शन प्रतियोगिता देखिल घेण्यात आली नव्हती. महापालिकेच्या इतिहासात हे पहिल्यांदाच झाले आहे. नेहमीच चुक केली जात आहे.

मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :— दुसरे कार्ड छापायला हवे, कार्यक्रम रद्द करा नाही तर तेथे काहीही गडबड होवु शकते. हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आहे.

**उप आयुक्त (मुख्यालय) :—** मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे की, महापौर केसरी कुस्ती स्पर्धेच्या निमंत्रण पत्रिकेवर मा. विरोधी पक्षनेत्यांचे नांव टाकलेले नाही यासाठी मी दिलगिरी व्यक्त करतो व सभागृहाची माफी मागतो. हे चुकुन झाले आहे, यामागे काहीही हेतु नव्हता. जो कार्यक्रम होईल त्यामध्ये मा. विरोधी पक्षनेत्यांचे नांव टाकण्यात येईल.

**मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** हे कार्ड न वाटता दुसरे कार्ड वाटायला हवेत तसेच या कार्डाचा खर्च कोण करणार?

**मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :—** उप आयुक्त साहेब आपण हे सांगितले नाही की, हे कार्ड कोणाच्या अधिकारात छापले आहेत?

**मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** कार्ड छापण्यासाठी मॅटर कोणी दिले होते.

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—** गट नेत्याचे नांव देखिल यायला हवे.

**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :—** महापौर महोदया, क्रिडा विभागाच्या मार्फत हे कार्ड छापण्यात आलेले आहेत. यामध्ये चुक झाली असेल तर त्यासाठी मी सभागृहाची माफी मागतो.

*यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.*

**मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** क्रिडा विभाग कोण बघतो त्यांना बोलवा.

**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :—** श्री. मिलींद सावंत हे क्रिडा विभागाचे काम बघतात, त्यांची प्रकृती खराब असल्याने ते आज अनुपस्थितीत आहेत. तसेच टाउन हॉल समोरील बोर्ड मध्ये सुधारणा करुन बोर्डवर विरोधी पक्षनेत्याचे नांव टाकण्यात येईल.

**मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** आता जी चुक झाली आहे त्याला कारणीभुत कोण आहे? हा आमच्या भावनांचा प्रश्न आहे. या कार्यक्रमाला मंजुरी घेतली आहे काय? आम्हाला याचे उत्तर हवे आहे.

**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :—** संबधित विभागाचे उप आयुक्त आज रजेवर असल्याने नंतर याची सविस्तर चौकशी करण्यात येईल.

**मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :—** संबधित विभाग बंद आहे काय? त्याला टाळे लावले आहे काय? तेथुन माहिती मागवा.

**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :—** या कार्ड मध्ये जी काही चुक झाली असेल तीची चौकशी केली जाईल.

**मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** चुक झाली असेल नाही चुक झाली आहे. ते मान्य करा.

**मा. सदस्य श्री.विनोद ठाकुर :—** चुक झाली नाही चुक केली आहे.

**मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :—** मा. आयुक्त साहेब गणेश दर्शन प्रतियोगीता अथवा इतर कोणताही कार्यक्रम करण्यापूर्वी स्थायी समिती कडून अथवा महासभेकडून मान्यता घेतली जाते. परंतू या कार्यक्रमाचा खर्चाचा प्रस्ताव तुम्ही आणला आहे काय? कार्यक्रम झाल्यानंतर आणणार आहात काय?

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—** मा.महापौर महोदया आम्हाला वर्षभर असे सांगितले गेले की, प्रभाग समिती सभापतीची निवडणूक न झाल्याने प्रभाग समिती निधीतून कामे होवु शकणार नाही. तसेच जो पर्यत महासभा किंवा स्थायी समिती मान्यता देणार नाही तो पर्यत काम होणार नाही असे सांगितले आहे. उदया क्रिडा विभागाचा

कार्यक्रम असताना देखिल कोणतीही मान्यता घेतली नाही, मान्यता घेतली असेल तर ठराव क्रमांक सांगा. जर मान्यता न घेता कार्यक्रम केला तर तो अनाधिकृत कार्यक्रम असेल व त्यासाठी अधिकारी जबाबदार असतील.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :— क्रिडा समितीने ठराव केला तरी त्याला महासभेत मान्यता घेणे आवश्यक असते.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— क्रिडा समितीने ठराव केल्या नंतर तो मान्यते साठी महासभेत आला असता परंतू अदयाप असा कोणताही ठराव आलेला नाही. याला मान्यता कोणी दिली, ठराव कधी पास झाला? याची माहिती दया व नंतर कार्यक्रम करा.

मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :— ठराव कधी पास झाला त्याची माहिती दया. आम्हाला समाधानकारक उत्तर दया.

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी :— मा. महापौर महोदया, माझ्याकडे आता याची माहिती उपलब्ध नाही. या प्रकरणाची कागदपत्रे पाहुन आपणास उत्तर देण्यात येईल.

मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :— तेथे खर्च कोण करत आहे.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— कागदपत्रे मागवुन उत्तर दया.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— मुर्खा सारखे उत्तर देवु नका?

मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :— आयुक्त साहेब उदया जर तेथे कार्यक्रम झाला तर शिवसेना, भाजपा, कॉंग्रेस व गंगाजल तर्फे तेथे काळे झेंडे लावुन प्रदर्शन करण्यात येईल. ही सगळी जबाबदारी तुमची असेल हे लक्षात ठेवा. यासाठी फक्त तुम्ही आणि तुम्हीच जबाबदार असाल कारण तुम्ही व्यवस्थित उत्तर देत नाहीत, व्यवस्थित समजावुन सांगत नाहीत. पुर्ण जबाबदारी तुमची असणार आहे. हा पैसा महापालिकेचा आहे. पाच हजार रुपये खर्च करायला तुमच्या तिजोरीत पैसे नाहीत, लोक पाण्यासाठी वणवण फिरत आहेत त्यासाठी तुमच्याकडे पैसे नाहीत आणि हा कार्यक्रम करण्यासाठी तुमच्याकडे पैसे आहेत. जर तुम्ही आज यामध्ये सुधारणा केली नाही तर आम्ही उदया त्याठिकाणी काळे झेंडे दाखवुन निषेध करु. ही सगळी जबाबदारी तुमची असणार आहे.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— या कार्यक्रमासाठी महासभेची मान्यता घेतलेली नाही. तुमच्यावरच केस होईल. आम्ही उदया तेथे कार्यक्रम होवु देणार नाही.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— कुस्ती बाहेर होईल आत मध्ये होणार नाही.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :— लग्ना नंतर साखरपुडा होत नाही, साखरपुडया नंतर लग्न होते. आम्हाला समाधानकारक उत्तर दया.

मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :— आयुक्त साहेब अजुनही सांगतो तुम्ही आजच्या आज या मध्ये दुरुस्ती करा.

मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :— आयत्यावेळच्या विषयाचे काय झाले, तो पुर्ण करा.

मा. सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

*आयत्या वेळचा विषय*

**विषय क्र. ६ :—** प्रभाग समिती क्रमांक.३ व ४ मधील विकास कामांच्या प्रस्तावास मान्यता देणे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—** इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता या ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**मा. महापौर :—** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**प्रस्तावना :—**

सुचकाचे नांव :— १.श्री.धनंजय बोडारे
२. श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नांव:— १. श्री. प्रमोद टाले
२. श्रीमती मीना सोंडे

विषय:— प्रभाग समिती क्रमांक.३ व ४ मधील विकास कामांच्या प्रस्तावास मान्यता देणे.

मार्च,२००६ पर्यत सभापती पदाची निवडणूक न झाल्या मुळे प्रभाग समितीतील ३ व४ मधील विकास कामांच्या प्रस्तावास मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे प्रभागातील विकास कामे होवु शकली नाही. यास्तव या प्रस्तावांमुळे प्रत्येक नगरसेवकांच्या प्रभागा मध्ये सार्वजनिक विभागा अंतर्गत करावयाची प्रत्येकी दोन दोन लाखांच्या कामास व पाणी पुरवठा विभागा अंतर्गत करावयाच्या एक लाख कामांच्या प्रस्तावास मंजुरी मिळणे आवश्यक आहे कारण की येत्या महिन्यामध्ये आचार संहिता लागण्याची शक्यता आहे.

**महासभा ठराव क्रमांक:— २६** **दिनांक:— २०.११.२००६**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता प्रभाग समिती क्रमांक. ३ व ४ मधील प्रत्येक प्रभागांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या रु. दोन लाख खर्चाच्या व पाणी पुरवठा विभागा अंतर्गत करावयाच्या रु. एक लाख खर्चाच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

सदरहु ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव :—** मा. महापौरांनी सभा समाप्तीची घोषणा केली आहे. कृपया राष्ट्रगितासाठी उभे रहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५—४५ वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

टिप : सदस्य श्री.सतरामदास जेसवानी हे सभेत उपस्थित होते मात्र त्यांनी हजेरीपटावर स्वाक्षरी केलेली नव्हती तरी देखिल ते सभेस उपस्थित असल्याने त्यांची उपस्थिती ग्राहय धरलेली आहे.

मा.सदस्य श्री. राजु टेकचंदानी, ईश्वर पमनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:– श्री. किशोर वनवारी आपण येथे असणे हे यांना बरे वाटत नाही म्हणुन आपणास बाहेर काढत आहेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:– मा.महापौरजी, जेथपर्यत सचिव साहेब खुलासा करतील तेथ पर्यतचे इतिवृत्त लिहिले जाईल किंवा नाही., कायदया नुसार काय आहे?

मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी:– हि महासभा स्थगित करण्यात आलेली नाही.

मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे:– महासभा आहे ना? की कुण्या राजकिय पक्षाची सभा आहे?

मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी:– इतिवृत्त लिहिणे कसे थांबविले जावु शकते?

महापालिका सचिव, श्री, प्रकाश कुकरेजा :– मा. महापौरांनी पोलिसांना बोलविण्यासाठी पत्र पाठविले आहे.

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :– लष्कर बोलवा? पोलिसांना का बोलविता?

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:– अहो याना पोलिसांची सवय पडली आहे ना? पप्पु कालानी ९ वर्षे जेल मध्ये होता त्यांना पोलिसांची सवय पडली आहे ना? श्री. नारायण कालानी सुध्दा पुणे येथे जेल मध्ये होता त्यामुळे यांना पोलिसांची सवय पडली आहे ना? पोलिसांचा चेहरा पाहिल्या शिवाय यांना मजा येत नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:– मा.महापौरजी, सध्या वातावरण थोडे चांगले नाही म्हणुन एक आनंदाची बातमी ऐकवितो मा. सदस्या श्रीमती रेखा मनुमल कारिरा व सार्वजनिक बांधकाम विभागाचे सभापती श्री. ईश्वर पमनानी हे आमच्या गटामध्ये सामील होवुन आज पासुन आमच्या बरोबर बसु लागले आहेत त्यांचे आम्ही हार्दिक स्वागत करत आहोत.

मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी:– आपण आता तरी विचार करावा की, असे का होत आहे?

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :– आम्हाला जर सभागृहातून बाहेर काढले तर शहरवासी आपणास शहरातून बाहेर काढतील.

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:– यांना सुध्दा बरोबर बाहेर घेवुन जातील ना?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:– मा.महापौरजी, जो पर्यत या मुद्दयावर निर्णय होत नाही तो पर्यत, आयुक्तांचे स्वागत करतो, आयुक्त साहेब आज सभागृहात उपस्थित झाले असल्याने त्यांचे स्वागत करण्यासाठी ''लगे रहो मुन्ना भाई'' या गांधीवादी पध्दतीने आमचे काही सदस्य त्यांना गुलाब पुष्प देवनु त्यांचा सत्कार करु इच्छितात, सर्वजण त्यांना गुलाब पुष्प देतील अशी मी त्यांना विनंती करतो.

यावेळी काही सन्माननिय सदस्यांनी मा. आयुक्तांना गुलाब पुष्प दिली.



मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :– ''आप आये बहार आयी''

मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– मा.महापौरजी, मी यांच्या या कृतीचा निषेध करतो.

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :–** फुले देत आहोत, काटे तर देत नाहीत. फुले घेणार नाहीत, चिखलही घेणार नाहीत तर मग काय घेणार? जे पंसत असेल ते सांगा? फुले सांभाळून ठेवा त्यामध्ये काटे सुध्दा आहेत. हा काही निरोप संमारंभ तर नाही ना?

**मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–** मा. आयुक्त साहेब, या सभेमध्ये पाण्याच्या विषयावर जी चर्चा चालू होती त्या बाबत आपण जरा खुलासा करावा की, शहरामध्ये जी पाण्याची समस्या आहे ती सोडविण्या साठी आपणाकडे काय उपाय योजना आहे? ती कशा प्रकारे सोडवणार आहात? शहरात सगळी कडे पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. जेथे पाणी येथे तेथे ते दुर्गंधीयुक्त व गढूळ असते. तसेच कच–याचीही समस्या आहे त्याबाबतीत आपण काय करत आहात? कृपया याचा खुलासा करा.

**मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** सचिव साहेब, सभेचे कामकाज का थांबविले आहे? महापौर महोदया, सभेचे कामकाज चालविले जावे. आणि आपणास ते चालवायचे नसेल तर तसे सांगा.

**मा.सदस्य श्री.विनोद ठाकूर :–** आपण जावु शकता.

**मा.महापौर :–** माझ्या आदेशाचे पालन व्हावे, त्यानंतर सभेचे कामकाज चालू केले जाईल.

**मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** जे चुकीचे आहे ते चुकीचेच आहे. आपण महापौर म्हणुन आदेश देत असत्या तर चांगले होते परंतू आपण येथे एका पक्षाच्या वतीने आदेश देत आहात असे वाटत आहे. एकच पक्ष, एकाच वेळेला दोन्ही बाजुने हल्ला होत होता. तिकडून श्री. राज असरोंडकर व श्री. देवेंद्रसिंह खेमाणी ते सुध्दा ओरडत होते इतर काही सदस्य ओरडत होते त्यामध्ये आपणास फक्त विरोधी पक्षाचे सदस्यच दिसले? याचाच अर्थ आपण राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या अध्यक्षा या नात्याने आदेश दिला आहे व या आदेशाचे पालन कोणीही करणार नाही. मला माफ करा महापौर महोदया, मी महापौर महोदया म्हणुन आपणास संबोधीत आहे. आपण पीठासीन अधिकारी आहात. आपण महापौर म्हणुन आदेश दया. चुकीच्या पध्दतीने आपण आदेश दिलेला आहे व तो चुकीचा आहे. कायदयाची माहिती नाही आम्ही त्यास आधार दिला आहे. एक पाण्याचा मुद्दा होता जी उल्हासनगर मध्ये एक ज्वलंत समस्या आहे. दिवाळी पुर्वी पासुन कॅम्प नं.१ ते ५ मध्ये ही समस्या आहे. दिवाळीच्या ५ दिवसांमध्ये थोडा दिलासा मिळाला होता परंतु त्या नंतर वीज मंडळाची लोड शेडीग व पाण्याची कपात त्यामुळे उल्हासनगर मध्ये पाण्याची टंचाई होती. पाण्याची समस्या श्री. दिलीप लालवानी व श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभागृहात मांडली आहे. परंतू समोरुन उत्तर आल्या नंतर येथे पाण्याची समस्या आहे तिच्यावर चर्चा झाली पाहिजे या विषयावर दुस–या कुण्या एका सदस्यांने चर्चा केल्या नंतर हा गोंधळ झाला आहे. मला असे वाटते की, पाण्याच्या या समस्ये वरील चर्चे वरुन काही सदस्यांना बाहेर काढणे किंवा तसे आदेश देणे हे योग्य नाही हे चुकीचे आहे. परंतु चुकीचा आदेश देणे हे सुध्दा चुकीचे आहे.



लोकांना आपण पाणी देवु शकत नाही परंतू त्यांची जी अपेक्षा आहे की, या विषयावर चर्चा व्हावी तीच्याकडे सुध्दा आपण दुर्लक्ष करीत आहोत.

**मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी:–** एवढया वेळ गुपचुप बसण्या पेक्षा चर्चा झाली पाहिजे स्पष्ट्रीकरण झाले पाहिजे.

**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:–** मा.महापौर महोदया, मी सचिव साहेबांना विचारत आहे, अडचण काय आहे? आम्ही लोकांनी ठराव दिला होता तो त्यांनी आम्हाला परत का दिला?

**मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :–** नाही तर, नळाव्दारे विषारी पाणी पाजा आम्ही लोक ओरडू सुध्दा शकणार नाहीत.

**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:–** शहरामध्ये पाण्याची भिषण समस्या आहे आणि ती आपण गंभीरतेने घेत नाहीत.

**मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :–** नाही तर, असे करा नळाव्दारे विषारी पाणी पाजा आम्ही असेच मरुन जावु ओरडू सुध्दा शकणार नाहीत. इतिवृत्त लिहिण्यास बंदी केली आहे का?

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :— श्री** कुकरेजा साहेब, आपण सांगा काय होत आहे?

**महापालिका सचिव, श्री.प्रकाश कुकरेजा :—** मा. महापौरांनी, ज्या सन्माननिय सदस्यांना बाहेर जाण्याचा आदेश दिला आहे ते बाहेर जात नाहीत म्हणुन मा. महापौरांनी पोलिसांना एक लेखी आदेश दिला आहे की, सभागृहामध्ये प्रवेश करुन..........

**मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** तो आदेश बरोबर आहे काय? याची सुध्दा माहिती दया.

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :—** मग पुढे काय झाले?ते सांगा.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** पोलिसांना लेखी आदेश देवून सभागृहात प्रवेश करुन त्यांना बाहेर घेवुन जाण्यास आदेश देण्यात आला होता. परंतु पोलिसांनी सदरचे पत्र घेण्यास नकार दिला आहे.

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :—** हा कायदाच नाही, हा कायदाच नाही.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** त्यामुळे मा.महापौरांनी महापालिकेच्या सुरक्षा अधिकारी यांना आदेश दिला आहे.

**मा. महापौर :—** हे जे पत्र आहे ते सचिव महोदयांनी तयार केले आहे. त्यांना माहित आहे.

१०५ ड

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :—** श्री. गव्हाणे, कृपया आपण इकडे यावे.

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :—** आमच्याकडे बहुमत आहे, हात लावुन तर दाखवा?

**मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:—** यावरुन असे दिसुन येते की, पोलिसांनी यांचा आदेश मानण्यास नकार दिला आहे कारण की, पोलिसांना माहित आहे की, हे गुन्हेगार प्रवृत्तीचे लोक आहेत.

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :—** आपण निघुन जा, बहुमत आमच्याकडे आहे.

**मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** जो म्हणणे मानत नसेल त्यास मारुन टाका. आम्ही हजर आहोत, पिण्याचे पाणी तर देत नाहीत, कचरा उचलत नाहीत, जे या समस्यां बाबत आवाज उठवतात त्यांना बाहेर काढण्याचा आदेश देतात. आम्ही पहिल्या रांगेत येवुन बसलो आहोत पाहिजे तर आम्हाला बंदुकीच्या गोळीने उडवुन टाका.

**मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:—** अहो सुरक्षा अधिकारी काय करणार? पोलिस सुध्दा आपणास मदत करत नाहीत. पोलिसांना माहित आहे हे स्वत: गुन्हेगार आहेत. त्यांचा आदेश पोलिस का मानतील?

**मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** महापौर महोदया, सभेचे कामकाज चालू करा. बहुमताचा सन्मान करावयास शिका.

**मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:–** अहो हे सभागृह आहे कालानी महल थोडा आहे जेथे आपला आदेश चालेल? सभागृहामध्ये बहुमताचा आदेश चालेल, आपला नाही चालणार. नाही तर मतदान घेण्याची हिम्मत असेल तर मतदान घ्या.

**मा.महापौर :–** निवडून येण्याची हिम्मत असेल तर निवडून या.

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :–** निवडून येवु ,येथे येवुन बसु परंतु लोक तुम्हाला शहरा बाहेर काढतील.

**मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:–** लोक तुम्हाला मते देणार नाहीत, जोडे मारतील.

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :–** श्री. अन्नु मनवानी हे जे निवडून आले ते या गोष्टीचा पुरावा आहेत ही सुरुवात आहे.

**मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:–** लोक तुम्हाला मते देणार नाहीत, जोडे मारतील.

**मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :–** मा. सचिव महोदय, सभेचे हे जे कामकाज थांबले आहे त्याबाबत कायदा काय म्हणतो ते सांगा.

१०५ इ

**मा.सदस्य श्री.अशोक ठाकुर :–** यांना वालीचा कायदा माहित आहे, वालीने कायदा शिकवीला?

**मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :–** नाही तर सचिव साहेबांना दुसरी एखादी कारणे दाखवा नोटिस मिळु नये. सचिव साहेब आता तर पाण्याचा मुद्दा चालू आहे तसेच आयुक्तांनी जो अपशब्द वापरला गेला त्याचा ही मुद्दा बाकी आहे तसेच अशासकीय प्रस्तावांचा ही मुद्दा बाकी आहे.

**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :–** मा. महापौर महोदया, खुन्नसबाजी, आपसातील भांडणे वगैर बाजुला ठेवुन पाण्याच्या विषयावर चर्चा झाली पाहिजे. शहरामध्ये पाणी नाही.

**मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :–** आयुक्त साहेब काही निवेदन करा.आयुक्त साहेब आताच आम्ही आपणास फुल दिले आहे '' फुल तुम्हे भेजा है खत में, फुल नही मेरा दिल है'' आयुक्त साहेब पाण्याच्या मुद्दयावर चर्चा करुन सोडवणुक करा, नाही तर येथे मोर्चे येतील. जी गोष्ट्र चर्चे ने होवु शकते ती चर्चेने होवु दया.

**मा.सदस्या श्रीमती मालती करोतिया :–** नाही तर उदया पासुन मोर्चे येण्यास सुरवात होईल.

**मा.सदस्य श्री. विनोद ठाकुर :–** हे काय चालले आहे सभागृहाची वेळ व्यर्थ घालविली जात आहे. सन्माननिय सदस्यांचा आपण अपमान करत आहात.

**मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :–** कायदा आंधळा नाही..... महालक्ष्मी देवी?

**मा.सदस्य श्री. हरदास माखिजा :–** मा. महापौरजी, आणि सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व सन्माननिय सदस्य हो, आज सभागृहात जी स्थिती निर्माण झाली आहे, खरोखरच ती पाहुन अतिशय दु:ख होत आहे. अशी स्थिती निर्माण व्हावयास नको होती. मी सन्माननिय महापौरांना निवेदन करतो की, त्यांनी सभागृहातील सदस्यांच्या बाबतीत जो आदेश दिला आहे तो आदेश त्यांनी मागे घ्यावा. पहिले मी सुध्दा महापौर होतो त्यावेळी श्री. पंजाबी साहेबांच्या चर्चेच्या वेळी मी सुध्दा उत्तेजित झालो होतो. त्यावेळी मी सुध्दा असे म्हटले होते की,मी तुम्हाला सभागृहातून बाहेर काढण्याचा आदेश देवु शकतो परंतु तात्काळ मला जाणीव झाली की, सभागृहामध्ये प्रर्दिघ चर्चा होणे ही बाब लोकशाहीस पुरक आहे. अश्या प्रकारे लोकसभेत सुध्दा होते, देशातील कित्येक राज्यांच्या विधानसभां मध्ये सुध्दा होते, महापालिकांच्या सभागृहामध्ये होते, नगरपालिकांच्या सभागृहात होते, जिल्हा परिषदेच्या सभागृहात होते, पंचायत समित्यांच्या सभागृहात होते. अश्या प्रकारे प्रर्दिघ चर्चा मग ती पाण्याच्या मुद्दया वर असो किंवा आयुक्तांनी केलेल्या शेरेबाजीवर असो किंवा आणखी एखादा दुसरा कोणता मुद्दा असो ही लोकशाहीची एक रीत आहे. परंतू त्याच बरोबर सभागृहात माझे जेवढे काही सहकारी बसले आहेत त्यांना सुध्दा मी निवेदन करतो की, महापौर पदाचा जो मान सन्मान आहे, प्रतिष्ठा आहे, महापौर शहराच्या प्रथम

नागरिक आहेत त्यांच्याशी बोलतांना सन्मान पुर्वक बोलणे हे सुध्दा आपले कर्तव्य आहे. त्या आमच्या महापौर आहेत संपुर्ण शहराच्या महापौर आहेत आज या सभागृहाच्या व्दारे आपल्या शहरामध्ये किंवा आजुबाजुच्या महानगरांमध्ये असा संदेश जाता कामानये की उल्हासनगर महानगरपालिकेचे सन्माननिय सदस्य जे आहेत ते महापौरांशी कोणत्या पध्दतीने वागतात अश्या प्रकारचा संदेश जाता कामा नये यासाठी जेवढे काही माझे बंधु भगिनी आहेत त्यांना माझे निवेदन आहे की, जेव्हा आपण महापौरांना संबोधुन बोलता त्यावेळेस



त्यांच्याशी सन्मानपुर्वक बोलणे हे आपले कर्तव्य ठरते. मग आपण विरोधी पक्षात बसलेलो असोत अथवा सत्ताधारी पक्षात बसलेलो असोत.

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :—** त्या स्वत: आमच्याशी कश्या बोलतात. श्री. माखिजा साहेब आपण कसे बोलत आहात. श्री. माखिजा साहेब, आपण येथे होतात ना? आपण ऐकले आहे ना? त्यांनी आम्हास काय म्हटले, मर्यादेत.......नैतिकता.......निवडूक आम्ही लढवितो हे आमचे भाग्य आहे या गोष्ट्री वरुन आमचे भांडण होते. महापौर यांनी आमचे ऐकले काय? आम्ही दोन दोन वेळा हात वर करुन बोलण्यासाठी परवानगी मागतो. आम्हास त्यांनी बोलण्यास परवानगी दिली का?महापौरांना आम्ही सन्माननिय महापौर म्हणतो. जेव्हा श्रीमती मालती करोतिया महापौर होत्या तेव्हा या महापौरांनी त्यांना कधीही मा.महापौरजी म्हटले नाही. नेहमी म्हणत असे सहकारी हो, आम्ही तर कधीही सहकारी असे म्हटले नाही. आपण मागील इतिवृत्त काढून पहा ज्यावेळेस श्रीमती मालती करोतिया या महापौर होत्या त्यावेळेस श्रीमती ज्योती कालानी बोलण्यास जेव्हा उभ्या राहात तेव्हा म्हणत असत की, सहकारी हो. आम्ही आपणास महापौर महोदया म्हणतो.

**मा.महापौर :—** आपण कृपया बसुन घ्या जो पर्यत पोलिस कारवाई करत नाहीत तो पर्यत सभेचे कामकाज चालविले जाणार नाही. कृपया बसुन घ्यावे.

**मा.सदस्य श्री. हरदास माखिजा :—** मा. महापौरजी,मी आपल्याकडून परवानगी घेतली आहे मला दोन मिनीटे बोलण्याची संधी दया. तर असा संदेश आपण बाहेर पाठवू नये की, ज्यामुळे शहराच्या व महापालिकेच्या प्रतिष्ठेस धक्का पोहोचेल व त्याच बरोबर जेव्हा मी, लोकशाहीची गोष्ट्र करतो व आपल्या देशाच्या लोकसभेची व अलग अलग राज्यांच्या विधानसभांची गोष्ट्र करतो तेव्हा मग तो सदस्य सत्ताधारी पक्षाचा असो की, विरोधी पक्षाचा असो कोणत्याही मुद्दावर चर्चा करणे किवा तो उपस्थित करणे हा त्यांचा हक्क आहे.कारण की ते जनतेचे प्रतिनिधी आहेत जनतेच्या भावना ते सभागृहात मांडतात. जेणे करुन महापौरांनी त्याबाबत अधिका—यांना आदेश दयावा जेणे करुन ती समस्या सुटू शकेल. आज पुन्हा एकदा मी महापौरांना मनापासुन निवेदन करतो की, सन्माननिय सदस्यांना सभागृहातून बाहेर काढण्याचा आपण जो आदेश दिला आहात मेहरबानी करुन तो परत घ्या. लोकशाही व्यवस्था चालविण्यासाठी आपले हे पुढचे पाउल राहिल. व आम्ही सर्वजण आपली आठवण करु की, आपण अतिशय चांगल्या अश्या महापौर होता. आपण लोकशाहीची तत्वे पाळून दिलेला आदेश मागे घेतला आपण जर आदेश मागे घेतला नाही तर विनाकारण सभागृहामध्ये संसदीय क्लेष होतील त्यास तोंड देणे आपणा सर्वाना अतिशय त्रासदायक होईल. हे ही आपणास टाळायचे आहे सभागृहाची मर्यादा कायम ठेवायची आहे. यापुढे सर्व सन्माननिय सदस्य आपणाशी सन्मानपूर्वक वागतील. त्यांना सुध्दा मी विनंती केली आहे व आपणासही विनंती करतो की, मेहरबानी करुन आपण आपला आदेश मागे घ्यावा तेच अतिशय योग्य होईल.

**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** सन्माननिय महापौर महोदया, पोलिस येतात, नाही येत तो पर्यत पाण्याच्या विषया वरील चर्चा तर चालु राहू दया त्यासाठी काय अडचण आहे. आयुक्त साहेबांकडे आमचा मोर्चा आला होता त्यावेळी त्यांनी आश्वासन दिले होते की, आज संध्याकाळ पर्यत पाणी येईल असे त्यांनी मोर्चाच्याच दिवशी सांगितले होते परंतू आज पर्यत पाणी आले नाही म्हणुन जो पर्यत पोलिस येत नाहीत तो पर्यत याच विषयावर चर्चा चालु ठेवली जावी. आयुक्त साहेब, श्री. सावकारे हे येथे उपस्थित असतील त्यांना विचारले

जावे की, पाणी आले आहे काय? काल आम्ही तिकडे जावुन वॉल उघडून आलो आम्ही काय हेच धंदे करत बसायचे काय?

<u>मा.सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> मा. पालक मंत्री, श्री. गणेश नाईक जेव्हा आले होते तेव्हा त्यांनी सांगितले होते की, पाणी कपात नाही. म्हणुन तर या विषयावर उत्तर देण्यास काय हरकत आहे?

<u>मा.सदस्य श्री. नथु सोनावणे :-</u> सन्माननिय आयुक्त साहेब, तीन महिन्यापूर्वी मी सुध्दा हाच प्रश्न विचारला होता, म्हणे तीन महिन्यांनी उत्तर मिळेल उत्तर लिहायला एवढा वेळ तर लाईन टाकायला किती वेळ? ते सुध्दा बोलून घ्या. भले पाण्यावर उदया चर्चा.......पाण्यावर चर्चा करायला हरकत नाही. तुमचे आमचे काय करु नका पाण्यावर चर्चा होवु दया.

<u>मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :-</u> आयुक्त महोदय, पाण्याच्या बाटलीचा आम्ही जो नमुना दाखवला तसे पाणी प्यायले पाहिजे काय?

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> ही महासभा चालु आहे की, काय चालु आहे? राष्ट्रवादीच्या गटनेता व सभागृहनेता साठी व्यासपीठावर दोन खुर्च्या ठेवा?

<u>मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :-</u> सचिव साहेब ही सभा स्थगीत केली आहे काय? नाही तर इतिवृत्त लिहिणे तर चालू ठेवा.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u> मा. सचिव साहेब आपण गप्प का आहात? आपला आवाज बंद केला आहे काय?

<u>मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :-</u> पुन्हा कारणे दाखवा नोटिस मिळेल.

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :-</u> मा. महापौर महोदया, सुरक्षा अधिका-यांची वाट पाहात आहेत. ज्या सन्माननिय सदस्यांना बाहेर जाण्या बाबत आदेश दिला आहे ते जो पर्यत बाहेर जात नाहीत तो पर्यत सभेचे कामकाज चालू होणार नाही असा त्यांचा आदेश आहे.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> आपण एवढेच सांगा की, त्या असा आदेश देवु शकतात का?

<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :-</u> महापौरांकडे बहुमत आहे काय?

<u>मा.सदस्य श्री. मोहन साधवानी :-</u> इंग्रजांचे राज्य आहे का?

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> वेळेचे काही बंधन आहे की नाही? असेच थांबुन राहणार?

<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :-</u> बहुमत हातातून गेल्या नंतर माणसाचे डोके सुध्दा खराब होते काय?

१०५ ऊ

<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :-</u> सचिव साहेब, सर्वा साठी अल्पोहाराची सोय केली जावी.

<u>मा.सदस्य श्री.विनोद ठाकुर :-</u> अल्पोहाराची सोय करा येथे सर्व मधुमेहाचे रुग्ण आहेत.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-</u> मा.महापौरजी, व सचिव साहेब प्रेक्षक गॅलरीत बसलेल्या पत्रकारांना अदयाप चहा व पाणी सुध्दा मिळालेले नाही. तेथे सर्व लोक ओरड करीत आहेत. कृपया तेथे चहा व पाण्याची व्यवस्था केली जावी.

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा :-</u> तेथे या अगोदरच पाणी पुरविले आहे.?

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :– त्यांचा इशारा पहा, बोला आपणास चहा, पाणी मिळाले आहे काय? ''देर ना हो जाय, कही देर ना हो जाय''

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :– श्री. पप्पु कालानी हे फोनवर म्हणतात पालकमंत्री नामदार श्री. गणेश नाईकजी आम्हाला मदत करा. परंतू ते सभांमध्ये व्यस्त आहेत. ते म्हणतात की, मी सभेमध्ये बसलो आहे तर हे म्हणतात की, आहो मी उल्हासनगर मधील सर्वात मोठा गुंड बोलत आहे, साहेबांना लवकर फोन दया. आमच्या महापौरांचे आदेश पोलिसवाले मानत नाहीत. त्यावर ते म्हणतात की, मी नंतर फोन करतो, आता नाही करणार. म्हणुन महापौर महोदया आपण आमचा वेळ व्यर्थ का घालविता. हा गुंडाराज आता चालेल थोडाच? गुंडाराज आता समाप्त झाला आहे. हे पहा आपल्या विरोधात किती लोक इकडे आले आहेत. आपला गुंडाराज आता समाप्त झाला आहे. तो आता चालणार नाही. गुंडाराज समाप्त होण्याचा संपुर्ण उल्हासनगर शहर वाट पाहात आहे. गुंडाराज तर आता समाप्त झाला आहे आता फक्त औपचारिकता समाप्त करायची आहे.

मा.महापौर श्रीमती ज्योती कालानी या सभागृहाच्या बाहेर गेल्या.  व त्यांच्या जागी मा. उप महापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मा.महापौरजी, आता सभा चालू करायची?

मा.सदस्य श्री. विनोंद ठाकुर :– मा.महापौरजी, आता सभा चालू करायची?

मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मा.महापौरजी, आता सभा चालू करायची? आता आपली परवानगी आहे?

मा.उप महापौर तथा पीठासीन अधिकारी :– मा. महापौर एक मिनीटा मध्ये येत आहेत.

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :– अरे टक्कलू फारच चांगली गोष्ट्र आहे.

मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :– आता आपल्या हातात अधिकारात आले आहेत? सभेचे कामकाज चालु करायचे?

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :– आपण महापौर नाहीत का?

१०५ ए

मा.सदस्य श्री. विनोंद ठाकुर :– मा.महापौरजी, आता सभा चालू करायचे आदेश दया.

मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :– महापौर महोदय सभेचे कामकाज सुरु करा.

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :– उप महापौर आहात की, महापौर आहात?

मा. उप महापौर :– महापौर येत आहेत.

मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :– चला आता आपल्या महापौर येत आहेत.

मा.सदस्य श्री. विनोंद ठाकुर :– मा.महापौरजी, सभा चालू करण्याचा आदेश दया. मा.महापौरजी आपले अभिंनदन.

.

मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मा. महापौरजी, सभा चालू करावी.

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :– अरे चल टक्कलू?

**मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—** मा. महापौरांच्या आसनावर आसनस्त असलेल्या सन्माननिय उप महापौर श्री. विनोद तलरेजा यांच्या साठी श्री. मोहन बेहरानी यांनी ज्या शब्दांचा वापर केला आम्ही त्यांचा विरोध करतो.

**मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :—** आहो टक्कलूला टक्कलू बोललो त्यात तुम्हाला काय त्रास होतो. प्रत्येक वेळेला उभे राहून बोलत राहता.

**मा.सदस्य श्री. विनोंद ठाकुर :—** मा.महापौरजी, सभा चालू करण्याचा आदेश दया.

**मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—** मा.महापौरजी, ......

**मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** मा. महापौरजी, चांगले झाले आपण यातून मार्ग काढला.आपली जिद्द ही राहिली, आता सभा चालू करा.

**मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—** मा.महापौरजी, ज्या प्रकारे महापौरांच्या स्थानी आसनस्थ होवुन श्रीमती ज्योती कालानी यांनी जो आदेश दिला. माजी महापौर श्री. हरदास माखिजा यांनी सुध्दा खुलासा केला की, हा जो आदेश आहे तो लोकशाहीची हत्या करणारा आहे. दुर्भाग्याने किंवा भाग्याने सद्याच्या ज्या महापौर आहेत त्या अल्प मतात आल्या आहेत. परंतू ७६ नगरसेवकां पैकी ७० नगरसेवक जरी आपल्याकडे असते तरी व विरोधी पक्षांमध्ये केवळ ६ नगरसेवक असते तरी शहराच्या हिताच्या एखादया प्रश्नां बाबत सभागृहात आवाज



उठविण्या—या सदस्यांस सभागृहातून बाहेर जाण्याचा आदेश देणे हे बरोबर नाही. अश्या प्रकारचा आदेश देणे हा आपल्या इतिहासातील पहिला प्रकार असेल. जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा अपमान, लोकशाहीची हत्या, ज्या कुण्या महापौरांनी केली आहे त्यांचे नांव इतिहासा मध्ये काळया अक्षराने लिहिले जाईल.आपण महापौरांच्या स्थानी आसनस्थ आहात आपण आपला स्वत:च्या मनाला विचारुन पहा आपण आपला हा निर्णय योग्य होता का?

**मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :—** हे मुके बहिरे आहेत.

**मा.सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—** आयुक्त साहेब, आम्ही येथे जो पाणी समस्येचा मुद्दा उपस्थित केला होता. जो पर्यत ही समस्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करत नाहीत तो पर्यत महासभेचे कामकाज चालू दिले जाणार नाही. कित्येक दिवसा पासुन आपण महासभे मध्ये येत नव्हतात व आज जेव्हा आपण आलात तेव्हा गुलाब पुष्प देवुन आम्ही आपले स्वागत केले की, ब—याच दिवसा नंतर कमीत कमी आपला चेहरा तर दिसला. शहरातील समस्यां बाबत आपण काय करणार आहात ते सांगावे. व त्यांची सोडवणुक करावी. आपण अश्या प्रकारे गप्प बसुन राहिल्यात तर शहरातील समस्यांची सोडवणुक होईल काय? यासाठी मी आपणास निवेदन करेन की, आपण चर्चे मध्ये भाग घ्यावा. व सांगा की, आपण पाणी समस्येची सोडवणुक कशी कराल?

**मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :—** मा. महापौरजी, मला अतिशय आनंद होत आहे, आनंद होत आहे हे पहिलेच वाक्य म्हणत आहे. आयुक्त साहेब माझ्या प्रभागामध्ये पहाणी करण्यासाठी आले होते. गल्ल्या गल्ल्यामध्ये फिरले होते. त्यावेळी मी, माझ्या प्रभागातील महिलांना सांगितले की, हे आपल्या महानगरपालिकेतील आयुक्त साहेब आहेत. सर्वात मोठे अधिकारी आहेत. तेथे काही लोक अशिक्षित होते काही सुशिक्षित होते जेव्हा त्यांना सांगण्यात आले की, आयुक्त साहेब आले आहेत तेव्हा ते अतिशय खुश झाले आयुक्त साहेबांनी त्यांना आश्वासन दिले की, एक आठवडया मध्ये पाणी येईल. आयुक्त साहेब एक आठवडा, दोन आठवडे, तीन आठवडे,चार आठवडे, हा पाचवा आठवडा चालू आहे. आपण तर दुस—याच कोठे तरी गेले होतात परंतू त्या महिला मला विचारत होत्या ते मोठे साहेब कोठे आहेत? तरी कृपया करुन मला एक आपला फोटो तर दया मी त्याच्या हजार प्रती तयार करुन त्या महिलांना तर देवु शकेन. त्यांना पहाता तर यावे की कोणते आमचे आयुक्त साहेब आहेत. त्यांनी एक वेळा आपणास पाहिले आहे त्यांना आठवत नाही आपले आयुक्त कोण आहेत ते. तर कृपया आपण मला आपला एक फोटो दयावा म्हणजे मी त्यांच्या हजार

प्रती काढून  संपुर्ण प्रभागात त्यांचे वाटप करेन. मी अपेक्षा व्यक्त करते की, आजच पाणी नाही तर कमीत कमी आपला फोटो जरुर दयाल.   आयुक्त साहेब याचे तरी उत्तर दयाल की नाही? फोटो दयाल की नाही? हस—या चेह—याचा, जसे आपण आता हसत आहात, असाच फोटो,  हसु तर तेथे आता सुध्दा नाही पाणी महाग झाले, कचरा उचलणे महाग झाले.

<u>मा.सदस्य श्री. विनोंद ठाकुर :—</u>  आपण त्यांचा फोटो मागीतलात, ते खुश झाले.

<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>  आयुक्त साहेब जागे व्हा. समस्यांशी लढणें आमचे काम आहे. समस्या आपण लोकांनी उत्पन्न केल्या आहेत. प्रत्येक ठेक्यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे त्याकडे जरा लक्ष दया. माझ्या प्रभागात आपण स्वत: पहाणी करुन तेथील नागरिकांना आश्वासन देवुन आला आहात.  कमीत कमी या आठवडयात तरी त्या समस्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करा.

१०५ ओ

<u>मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u>  उप महापौरजी, महापौरजी, संविधाना मध्ये उप महापौर पदाचे महत्व दर्शविले आहे आपण आपला काहीतरी  निर्णय घ्या. आता आपण पीठासीन अधिकारी या स्थानी बसला आहात. आपण सभा चालु करत आहात की नाही, काही करत नसाल तर आम्ही तोंडावर पट्टी बांधुन बसायचे का? व आपण आपल्या डोळयावर रुमाल बांधा, आम्हाला काही पाहायचे नाही? कानात कापसाचे बोळे घाला, काही ऐकायचे नाही? आयुक्त साहेबांना सांगा निवेदन करण्यास, सभागृह किती तरी वेळे पासुन ओरड करत आहे ते आपणास ऐकु येत आहे किंवा नाही? उपमहापौरजी, आता आपण पीठासीन अधिकारी आहात काही तरी निर्णय घ्या. आम्ही आमच्या तोडांवर पट्टी बांधतो आपण आपल्या डोंळयावर रुमाल बांधुन कानामध्ये कापसाचे बोळे घाला.

<u>मा.सदस्य श्री. अशोक ठाकुर :—</u>  मा.महापौरजी, मा.आयुक्त साहेब, मागील महिन्यामध्ये आयुक्त साहेबांनी माझ्या प्रभागामध्ये पाणी समस्ये बाबत पाहणी केली होती.  व स्वत: त्यांनी तेथील ती गंभीर स्थिती पाहिली आहे. दिनांक २० तारखेला माझ्या प्रभागातील नागरिकांनी मोर्चा काढला होता. आपल्या कडिल पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. सावकारे साहेब हे माझ्या प्रभागात आले होते व त्यांनी मोर्चेक—यांना आश्वासन दिले होते की, पाण्याची समस्या दुर केली जाईल. परंतू आज पर्यत तीची सोडवणूक झाली नाही म्हणुन त्याबाबतीत आम्ही आवाज उठवत आहोत तर आम्हाला सभागृहातून बाहेर जाण्याचा आदेश दिला जात आहे हा कोणता न्याय आहे? पाणी समस्ये बाबत यापुढे जर कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होत असेल तर त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल.

<u>मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>  सभागृहाची वेळ का व्यर्थ घालवत आहात. महापौर महोदया येत आहेत?

<u>मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>  महापौरांच्या आसनावर आपण बसला आहात, नाही तर आपण उठा आपण सारखे म्हणत आहात महापौर येत आहेत महापौर येत आहेत सध्यातरी आपण आमचे महापौर आहात आम्ही आपणास मा. महापौर म्हणतो आपण सभा चालविण्याचे आदेश दया व सभेची कारवाई पुर्ण करा. नाही तर त्या खुर्चीतून उठा. सुरक्षा रक्षक बनुन खुर्ची सांभाळू नका.

<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u> महापौरांच्या आसनाची प्रतिष्ठा राखा.  मा. महापौर या स्वत: साठी आदेश काढून तर गेल्या नाहीत? हे  जात नसतील तर मीच बाहेर जाते असा आदेश देवुन गेल्या आहेत का? स्वत: निघुन गेल्या आहेत. सचिव साहेब त्या असे बोलून गेल्या आहेत का? ज्या सहा सदस्यांना  सभागृहा बाहेर जाण्यास आदेश दिला आहे ते जर बाहेर  जात नसतील तर स्वत:च सभागृहा बाहेर जावे असा स्वत:लाच आदेश देवुन त्या गेल्या आहेत काय?

<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :—</u>  मा. उपमहापौरजी, पिण्यास पाणी नाही. पाण्याची व्यवस्था करा. प्रेक्षक गॅलरीतील पत्रकारांना पिण्यास पाणी नाही, त्यांचासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करा हाय हाय  गली गलीमे शोर है महापौर चोर है.

<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :—</u>  गली गलीमे शोर है,महापौर चोर है.

<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी</u> :– गली गलीमे शोर है, मोहन बेहरानी चोर है

<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u>तुम भी चोर है.

<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u> गली गलीमे शोर है,महापौर चोर है.

<u>मा.सदस्या श्रीमती मालती करोतिया</u> :– असे म्हणणे आम्हास बरे वाटत नाही.

मा.महापौर :– आपण शांत रहा.

<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u>आम्ही थोडेच शांत बसुन राहणार आहोत ? ते शांत बसले तर आम्ही थोडेच शांत बसणार आहोत ?

<u>मा.सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u> सभागृहाची वेळ फुकट का घालविली जात आहे ?सर्वानी असेच बसायचे काय ? नास्ता मागवा नास्ता,पोलीस येवून बाहेर बसले आहेत, ते सभागृहात येत नाहीत, सभा चालु केली जावी.

मा.महापौर यांनी श्री.सी.अे गव्हाणे सुरक्षा अधिकारी यांना लिहिलेले पत्र मा.महापालिका सचिव यांचे हस्ते श्री गव्हाणे यांना यावेळी देण्यांत आले. श्री. गव्हाणे पत्र घेवून मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी यांचे आसना शेजारी जावुन उभे राहुन त्यांना सांगतात की,

<u>श्री.सी.अे गव्हाणे,(सुरक्षा अधिकारी) :–</u> मा.महापौरांनी मला हे पत्र दिले असल्याने माझी आपणास विनंती आहे की......

<u>मा.मोहन बेहरानी :–</u> काय पत्र दिले आहे? दाखवा.

<u>मा.मोहन बेहरानी</u> यांनी श्री.गव्हाणे यांच्या हातातील पत्र घेवून वाचले व त्याचे तुकडे करुन त्यांच्या आसना समोरील मोकळया जागेत हवेत भिरकावून दिले.
<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u> तुम्हाला अधिकार आहेत का? श्री. गव्हाणे कायदया नुसार तुम्हाला काही अधिकार नाहीत.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> तुम्हाला अधिकार आहेत का?

<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u> सभागृहाचे कामकाज सचिव चालवितात, कोणतीही कारवाई करायची असेल तर पत्र सचिवांना दया.

<u>मा.सदस्य श्री. विनोद ठाकुर:–</u> कामाला लागशील ?

१०५ अं

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> सचिव साहेब, एक गोष्ट्र सांगा सन्माननिय सदस्यांना सभागृहातून बाहेर काढण्याचा सुरक्षा अधिका–यांना अधिकार आहे काय? याबाबत उदया कोणी न्यायालयात गेले तर यांच्या पोटावर पाय येईल. त्यांनी हे जर चुकीचे काम केले आणि आम्ही कुणी जर त्या विरोधात न्यायालयात दाद मागीतली तर

हे सेवेतून निलंबित होतील. कृपया करुन याबाबत आपण सांगावे. नाहीतर उदया आम्ही उच्च न्यायालयात याच्या बाबतीत दाद मागीतली तर त्यांना घरी बसावे लागु नये. यांना अधिकार असेल तर सांगा.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :— श्री. गव्हाणे तुम्ही बाहेर जा.

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :— सचिव साहेब सभागृहाची कार्यवाही आपण चालविता की, श्री.गव्हाणे चालवितात याची आपण माहिती दया.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :— सभागृहाची कार्यवाही चालविणे हे सचिवांचे काम आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— सचिव साहेब यांना अधिकार आहेत किंवा नाहीत? काही ही न बोलता जर ते कार्यवाही करत असतील तर उदया त्यांना घरी बसावे लागु नये.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— आपणास माहित नसेल तर विधी अधिकारी यांना बोलवा.

मा.सदस्य श्री. विनोद ठाकुर:— हा, विधी अधिकारी यांना बोलवा, विधी अधिकारी यांना बोलवा.

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :— सभागृहाची कार्यवाही श्री. प्रकाश कुकरेजा आपण चालविता किंवा नाही? सचिव साहेब, कार्यवाही आपण चालविता किंवा नाही? श्री. गव्हाणे साहेब आपणास कोणताही अधिकार नाही. आपण निवडूण आलेले नगरसेवक नाहीत, आपणास कोणताही अधिकार नाही.

मा.सदस्य श्री. विनोद ठाकुर:— श्री. गव्हाणे तुम्ही बाहेर जा नाही तर तुमची नोकरी जाईल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :— विधी अधिका—याची नियुक्ती का केली जाते? त्याने कायदा काय आहे ते सांगावे म्हणुनच नांव सध्या विधी अधिकारी श्री. बागेश्वर साहेब आहेत.

मा.सदस्य श्री. विनोद ठाकुर:— विधी अधिकारी यांनी व्यासपीठावर यावे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :— तसेही सायंकाळी ७.०० वाजे नंतर सभेचे कामकाज चालविण्या बाबत सभागृहाचे मत घ्यावे लागते.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :— शहरामध्ये पाण्याची समस्या आहे. तिच्यावर तर चर्चा होवु दया.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :— सुर्यास्ता नंतर सभेचे कामकाज चालवायचे किंवा नाही याचा निर्णय सभागृह घेईल.

१०५ अ:

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :— आयुक्त साहेब, आयुक्त साहेब आणि यापेक्षा मोठयाने काय बोलु.

मा.सदस्य श्री. विनोद ठाकुर:— आयुक्त साहेबांनी शपथ खाल्लेली आहे की, मी एक शब्दही बोलणार नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :— आयुक्त साहेब हसत आहेत हेच पुष्कळ आहे. रात्रीचे अगर १०.०० ते ११.०० वाजे पर्यत बसायचे असेल तर नास्त्याची सोय करावी ही बाब आपल्या अधिकार क्षेत्रात आहे.

मा.सदस्य श्री. विनोद ठाकुर:— आम्ही नास्ता मागविला आहे. आम्ही खावु घालु आपण खा.